اِنَّ هٰذَا الْقُرْاٰنَ يَهْدِىْ لِلَّتِىْ هِىَ اَقْوَمُ۔ (القرآن)

'' नि:संशय हे कुरआन त्या मार्गाचा निर्देश करीत आहे, जो अगदी सरळ आहे''

Dawatul Quran Vol.II
in Marathi Language

# दअ्वतुल क़ुर्आन

## पवित्र क़ुरआनाचा मराठी अनुवाद व भाष्य

## खंड २

### सूरह यूनुस ते सूरह अन्कबूत

### (पारा ११ ते पारा २०)

❑❑❑❑

भाष्य :

**शम्स पीरज़ादा (रह.)**

❍❍❍❍

मराठी अनुवाद :

**मुहम्मद शफ़ी अन्सारी**

प्रकाशक :

**इदारा दअ्वतुल क़ुरआन**

५९, मुहम्मद अली रोड, मुम्बई ४०० ००३

**Idara Dawatul Quran**

**59, Muhammad Ali Road Mumbai 400003**

**Phone: 23465005**

...........2nd Edition (Vol. II) December. 2014 — किंमत रू.१२०/-

........... 1,000 — Price Rs. /-

# सूची


| सूरह क्रमांक | सूरहचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १० | यूनुस | |
| ११ | हूद | |
| १२ | यूसुफ | |
| १३ | रअद | |
| १४ | इब्राहीम | |
| १५ | हिज्र | |
| १६ | अन-नहल | |
| १७ | बनी-इस्राईल | |
| १८ | कहफ | |
| १९ | मरयम | |
| २० | ताहा | |
| २१ | अंबिया | |
| २२ | हज्ज | |
| २३ | मोमिनून | |
| २४ | नूर | |
| २५ | फुरकान | |
| २६ | अश्शोअरा | |
| २७ | अन-नम्ल | |
| २८ | अल-कसस | |
| २९ | अन्कबूत | |

# चित्रे आणि नकाशे

**शिर्षक** **पृष्ठ क्रमांक**

मस्जिदे कुबा
मस्जिदे नबवी
बनी इस्राईलच्या निर्गमनाचा मार्ग
यूनुस जन-समूहाची वसाहत
किन्आन व इजिप्त
शांतीपूर्ण शहर (मक्का)
कुरआन आपल्या मुळ-स्वरूपात सुरक्षित आहे
अरबांचा व्यापारी राजमार्ग
समूदचे अवशेष
मस्जिदे अकसा
कहफ आणि अर-रकीम
अर-रकीमचे स्थान
सागर मिलाप
सायरसची पाश्चिमेकडील मोहीम
सायरसची पूर्वेकडील मोहीम
सायरसची तीसरी मोहीम
यरोशलमच्या हैकलचा नकाशा
बॅथलहॅम
तुबा खिंड
जमलेले रक्त व मांस-गोळयाचे चित्र
अल्लाहच्या सांडणीची जागा
समूदच्या पाथरवटीचा एक नमुना
कैसर रोमच्या नावे पैगंबर यांच्या शूभ पत्राची प्रतिछाया
मदयन व तूर पर्वत
अनुक्रमाणिका

## परम दयाळू परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

# प्रस्तावना

अल्लाह चा मोठा अनुग्रह होय की दअवतुल कुरआनचा द्वितीय खंड सादर करण्याचे सद्भाग्य लाभत आहे.या खंडात पारा क्र.११ते २० सम्मिलीत आहेत. तात्पर्य दोन तृतियांश प्रवास अल्लाहच्या कृपा व त्याने दिलेल्या सुबुद्धिने पार पाडला आहे. अर्थात उर्वरित वाटचालीची पूर्तता ही त्याने प्रदान केलेल्या सुबुद्धिवर अवलंबून आहे. तो ज्याच्या कडून इच्छितो, आपल्या ग्रंथाची सेवा करवून घेतो आणि त्याच्या करीता कठीणातले कठीन कार्य ही सहज सुलभ होते. (अल्लाहच्या कृपेने तीसरा खंड ही प्रसिद्ध झाला आहे.)

क़ुरआन एक अतिशय महान व भव्य दिव्य ग्रंथ आहे ज्याने माणसाचा वैचारीक दृष्टीकोन बदलून टाकला, बुद्धिला तेज प्रदान केले,ह्रदयाला ज्ञान व विश्वासाने ओत प्रोत केले. चारित्र्यांची जडण घडण केली आणि व्यक्तित्वात ओजास्विता निर्माण केली मग याचे प्रभाव-क्षेत्र व्यक्तिगत जीवना पुरतेच राहीले नाही, तर सामूहीक जीवनात त्याने एक महान क्रान्ती घडवून आणली आणि ह्रदयांवर ताबा मिळविण्या सोबत राज्यांच्या दालनांवर ही अधिकार प्राप्त केला. ही सर्व व्यापी क्रान्ती कुरआनाच्या माध्यामानेच घडून आली. जेव्हा लोकांनी त्याचे मन:पूर्वक अनुसरण केले आणि त्याचे आवाहक बनून उभे राहीले. परंतु नंतर जेव्हा कुरआनाशी या जन समूहाचा संबंध कमकुवत झाला आणि लोकांना ना याचे ज्ञान प्राप्त करण्यात गोडी राहीली ना त्यानुसार आचरण करण्यात तेव्हा जन समूहाची अवनति सुरु झाली; आणि आता या टोका प्रत पोहोचली आहे की बहुसंख्य मुसलमान आपल्या जीवन-उद्दिष्टाशीच अपरीचित झाले आहे, श्रद्धेत नवनवीन गोष्टींचा अंतर्भाव झाला आहे आणि प्रेषित आचरणा (सुन्नाह) चे स्थान नवनवीन प्रथा (बिदअत) व कुप्रथांनी घेतले आहे. मग नैतिक व आचरण विषयक बिघाड या टोकाला जाऊन पोहोचला आहे की उचित व अनुचित आणि हराम व हलाल मध्ये कोणतेही तारतम्य उरले नाही,नमाजाला लोकांनी वृथा घालविले आहे आणि खेळण्या बागडण्यात व ऐहिक भक्तित रममाण आहेत. या सामूहीक उत्पाताचा निष्कर्ष हा निघाला की त्यांचा वासा पोकळ झाला आणि शत्रूची हिमंत वाढली. सैतानी सामर्थ्यांचे त्यांच्यावर वर्चस्व झाले आणि त्यांच्या प्राण वित्त व प्रतिष्ठे सह त्यांच्या धर्म ही धोक्यात पडला. या सर्वगोष्टीचे मुळ कारण हेच की अल्लाहच्या ग्रंथाशी अर्थात कुरआनाशी मुसलमानांचे नाते, कमकुवत झाले पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी फर्माविले होते, 'अल्लाह या ग्रंथाद्वारे कितीतरी जनसमूहांना उन्नत करील व कितीतरी जन समूहांना अवनत करील'. (मुस्लिम किताब फजाइले कुरआन)

ही वस्तुस्थिती लक्षात घेता मुसलमानांच्या समस्त दु:खाचे परिमार्जन हेच की त्यांचे नाते अल्लाहच्या ग्रंथाशी मजबूत केले जावे क़ुरआनाने ''अल्लाहच्या ग्रंथास मजबूतपणे बाळगण्या'ची ताकीद केली आहे आणि हदीस मध्ये ही याचे समर्थन केले आहे.

''मी तुमच्या दरम्यान अशी वस्तू सोडली आहे की जर तुम्ही तिला दृढपणे बाळगून राहाल तर कधीही मार्गभ्रष्ट होणार नाही आणि ती म्हणजे अल्लाहचा ग्रंथ'' (मुस्लिम किताबुल हज्ज)

ग्रंथाला मजबूतरित्या बाळगण्याचा अर्थ असा की त्याच्याशी अगदी निकटचा संबंध राखला जावा. त्याचे ज्ञान व आकलन प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला जावा आणि त्याच्या प्रकाशात जीवनाचा प्रवास पार पाडला जावा. यास्तव आज अत्याधिक आवश्यकता या गोष्टीची आहे की लोकां करीता कुरआन आकलनाची उपाय योजना केली जावी आणि त्यांना कुरआनकडे रूजू होण्याचे आवाहन केले जावे या आवाहनाला पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या आचरणाच्या (सुन्नाहच्या) अनुसरणाचे आवाहन अपरिहार्यत: सामील आहे. कारण कुरआन पैगंबराचे अनुसरण करण्याचे आवाहन करतो आणि प्रेषित आचरणा (सुन्नाह) शी बेपर्वा होऊन मनुष्य कुरआनाच्या आदेशांचे विवरण जाणू शकत नाही; तेव्हा त्यावर आचरण कसे करेल? तात्पर्य आजच्या परिस्थितीला या गोष्टीची निकड भासते की मुसलमानांमध्ये कुरआन व सुन्नाह (सहीह हदीसा) चे ज्ञान सार्वत्रिक केले जावे आणि त्यांना यांचे अनुसरण करण्याचे आवाहने केले जावे आम्ही खात्री बाळगतो की या उम्मती (जन समूहा) ची सुधारणा याच गोष्टीने होऊ शकते ज्या गोष्टीने या पूर्वीच्या लोकांची सुधारणा झाली होती. तफसीर दअवतुल कुरआन जे उर्दू भाषेच्या व्यतिरिक्त इंग्रजी, मराठी, गुजराथी व हिंदी भाषेत ही प्रसिद्ध केले जात आहे याच अनुरोधाने एक प्रयत्न आहे.

सर्वश्रेष्ठ अल्लाह याला सुधारणेचे व मार्गदर्शनाचे माध्यम बनवो.

**शम्स पीरज़ादा**
इदारा दअवतुल कुरआन
मुंबई-४००००३

**२२ ,फेब्रुवारी १९९०**

(नोट:ही प्रस्तावना भाष्यकारानी मूळ उर्दू भाष्य प्रसिद्ध करताना लिहीली होती त्याचा मराठी अनुवाद वर दिला गेला आहे.)

# १०.यूनुस

**नाव:** आयत क्र.९८ मध्ये हजरत यूनुस यांचा उल्लेख केला गेला आहे. तद्नुषंगाने या सूरहाचे नाव ''यूनुस'' असे आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे आणि सूरहच्या मजकूरांवरुन असे दिसून येते की, प्रेषित्व पद लाभल्यानंतर मक्केत वास्तव असण्यापावेतोच्या दरम्यानच्या काळात अवतरली असावी.

**मध्यवर्ति विषय:** ''वही'' (अवतरीत होणारे ईश-आदेश) व प्रेषित्वाचा इन्कार करणाऱ्यांच्या शंका-कुशंकांचे निरसन करीत असे स्पष्ट केले गेले आहे की कुरआन व पैगंबराचे मूळ आवाहन कोणते व ते सत्य कसे. ही सूरह तंबी व खुषखबर या दोन्ही पैलूंसह आहे.

**आयत रचना:** सूरह चा आरंभ (आयत क्र.१ व २) या गोष्टीने झाला आहे की कुरआन एक बुद्धियुक्त ग्रंथ आहे जो एका व्यक्तिवर या कारणास्तव अवतरीत केला गेला आहे की तिने लोकांना त्यांच्या आचरणाबाबत या गोष्टीपासून सावध करावे की मरणोत्तर जीवनात कशा प्रकारची परिणिती जाहीर होणार आहे.

आयत क्र. ३ते ७० मध्ये सविस्तर रित्या कुरआनाचे आवाहन प्रस्तुत केले गेले आहे अशा प्रकारे की अल्लाह हा एकमेव ईश व पालनकर्ता असण्याबद्दल ज्या निशाण्यांकडे लक्ष वेधले गेले आहे ज्या न केवळ बुद्धिचे योग्य मार्गदर्शन करणाऱ्या आहेत किंबहुना हृदयांनाहि प्रवृत्त करतात. तसेच ह्या निशाण्यांवर विचार-चिंतन केल्याने आखिरतची कल्पना देखील स्पष्ट होते आणि कुरआनाच्या निवेदनाचे व ईश-आदेशाचे समर्थन देखील होते. आवाहनाच्या या होकारात्मक पैलूंसोबत त्याचे नकारात्मक पैलू अर्थात शिर्क, आखिरत नकार व प्रेषित्व-नकाराचेही जोरदारपणे खंडन केले गेले आहे.

आयत क्र.७१ ते ९३ मध्ये कुरआन-आवाहनाच्या सत्यतेवर मागील आयतींचा इतिहास साक्ष म्हणून प्रस्तुत केला गेला आहे. आणि इन्कार करणाऱ्यांच्या अत्यंत वाईट परिणितीपासून धडा शिकविला गेला आहे.

आयत क्र.९४ ते १०३ मध्ये या घटना आणि वास्तविक गोष्टींच्या प्रकाशात सत्याचा इन्कार करणाऱ्यांना तंबी केली गेली आहे की कुरआनाचे अवतरण संशयापासून अलिप्त आहे. यास्तव कार्य- संधी संपण्यापूर्वीच ईमान बाळगा अन्यता ती संपल्यानंतर व अज़ाब (ईश-कोप) प्रकट झाल्यानंतर ईमान बाळगणे किंचितही लाभदायक ठरणार नाही.

आयत क्र. १०४ ते १०९ उक्ति-समारोप होय. ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मुखाने साफ साफ ही घोषणा केली गेली आहे की माझा धर्म एकेश्वरवादी धर्म आहे आणि सत्य-मार्ग हाच होय. जे लोक हा मार्ग पत्करतील ते स्वत:चेच भले करतील आणि जे तोंड फिरवतील तर त्यांची मार्गभ्रष्टता त्यांच्याच आपत्तिस कारणीभूत ठरेल.

# १०.सूरह यूनुस

سُوْرَةُ يُوْنُسَ

**आयती : १०९**

**अनुवाद:**

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अलीफ-लाम-रा [१] ह्या आयती आहेत हिकमत (बुद्धिकौशल्य)युक्त ग्रंथाच्या [२]

الٓرٰ تِلْكَ اٰيٰتُ الْكِتٰبِ الْحَكِيْمِ ①

२. काय लोकांना या गोष्टीबाबत आश्चर्य झाले की आम्ही त्यांच्यातल्याच एका पुरूषाकडे संदेश पाठविला [३] यासाठी की त्याने लोकांना खबरदार करावे व ईमान बाळगणाऱ्यांना खुश खबरी द्यावी की त्यांच्याकरीता त्यांच्या पालान कर्त्या जवळ सत्याचे स्थान आहे (यावर) काफिर म्हणाले, हा उघड जादूगार आहे।[४]

أَكَانَ لِلنَّاسِ عَجَبًا أَنْ أَوْحَيْنَآ إِلٰى رَجُلٍ مِّنْهُمْ أَنْ أَنْذِرِ النَّاسَ
وَبَشِّرِ الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا أَنَّ لَهُمْ قَدَمَ صِدْقٍ عِنْدَ رَبِّهِمْ قَالَ
الْكٰفِرُوْنَ إِنَّ هٰذَا لَسٰحِرٌ مُّبِيْنٌ ②

३. नि:संशय तुमचा पालनकर्ता अल्लाहच आहे. ज्याने आकाशांना व जमीनीला सहा दिवसात निर्माण केले [५] मग अर्श (सिंहासना) वर विराजमान झाला [६] आणि समस्त व्यवहारांची व्यवस्था करीत आहे. (त्याच्या समक्ष) त्याच्या अनुज्ञेशिवाय कोणीहि शिफारस करणारा नाही [७] हाच अल्लाह तुमचा स्वामी आहे [८] यास्तव त्याचीच उपासना करा [९] मग काय तुम्ही उपदेश ग्रहण करणार नाही?

إِنَّ رَبَّكُمُ اللّٰهُ الَّذِيْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْأَرْضَ فِيْ سِتَّةِ أَيَّامٍ
ثُمَّ اسْتَوٰى عَلَى الْعَرْشِ يُدَبِّرُ الْأَمْرَ مَا مِنْ شَفِيْعٍ إِلَّا مِنْ
بَعْدِ إِذْنِهٖ ذٰلِكُمُ اللّٰهُ رَبُّكُمْ فَاعْبُدُوْهُ أَفَلَا تَذَكَّرُوْنَ ③

४. त्याच्याच समक्ष तुम्हा सर्वांना परतून जायचे आहे हा अल्लाहचा पक्का वायदा आहे नि:संशय तोच निर्मितीचा आरंभ करतो आणि तोच दुसऱ्यांदा निर्माण करील, यासाठी की ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी नेक कामे केलीत त्यांना न्यायपूर्वक मोबदला द्यावा.[१०] राहीलेत ते लोक ज्यांनी कुफ्र (इन्कार) केले. [११] तर त्यांना पिण्या करीता उकळते पाणी असेल आणि त्यांना दु:खदायक शिक्षा यातना भोगावी लागेल.त्या कुफ्रच्या मोबदल्यात जे ते करीत राहीले.

إِلَيْهِ مَرْجِعُكُمْ جَمِيْعًا وَعْدَ اللّٰهِ حَقًّا إِنَّهٗ يَبْدَؤُا الْخَلْقَ ثُمَّ
يُعِيْدُهٗ لِيَجْزِيَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ بِالْقِسْطِ
وَالَّذِيْنَ كَفَرُوْا لَهُمْ شَرَابٌ مِّنْ حَمِيْمٍ وَّعَذَابٌ أَلِيْمٌ بِمَا كَانُوْا
يَكْفُرُوْنَ ④

# स्पष्टीकरण

१. ही वेगवेगळी अक्षरे होत,आणि जसे आम्ही सूरह बकरा टीप क्र.१ मध्ये स्पष्ट केले आहे. ही अक्षरे सूरहच्या विशिष्ट मजकूरांकडे संकेत करतात. या सूरह मध्ये **''अलीफ''** चा संकेत अल्लाहकडे आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे एकेश्वरवादाच्या मजकूरांकडे आहे जे विभिन्न आयतीत वर्णिले गेले आहेत. **''लाम''**चा इशारा لَاۤ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ **ला इलाहा इल्लल्लाहु** कडे म्हणजे त्या मजकूरांकडे आहे ज्यात शिर्कचा इन्कार दर्शविला गेला आहे. तद्वतच'रा'चा संकेत स्वामीत्वाकडे म्हणजे अशा मजकूरांकडे आहे ज्यात अल्लाह स्वामी असण्या संबधीचा उल्लेख आला आहे. उदाहरणार्थ आयत क्र.३ मध्ये फर्माविले ذٰلِكُمُ اللّٰهُ رَبُّكُمْ

''हाच अल्लाह तुमचा स्वामी आहे.'' आणि आयत क्र.३३ मध्ये फर्माविले: فَذٰلِكُمُ اللّٰهُ رَبُّكُمُ الْحَقُّ

''तेव्हा हाच अल्लाह तुमचा खराखुरा स्वामी आहे'' ''मुकत्तआत'' अक्षरांबाबत आम्ही हे जे सांगितले आहे की ही अक्षरे सूरहच्या विशिष्ट मजकूरांकडे संकेत करतात, तेव्हा आम्ही या अक्षरांचा एखादा अर्थ निश्चित केले नाही किंबहुना केवळ संकेतार्थ अभिप्रेत आहेत आणि ते देखील सूरहच्या विशिष्ट मजकूरांकडे आमच्या मते ''मुक़त्तआत'' अक्षरांबाबत हाच सुगम मार्ग होय कारण या स्थितीत मनुष्य यांचा चुकीचा मतितार्थ लावण्यापासून सुरक्षित राहतो, व त्यांना 'कोडो' ठरविण्यापासूनहि

आजच्या यांत्रिक युगात काही लोकांनी जे या अक्षरांना कोडे ठरवितात अबजद च्या हिशेबाने यांची संख्या निश्चित करून कम्प्युटर द्वार काही ठोक-ताळे निर्माण केलेत. यास्तव त्यांनी१९ या संख्येला अत्यंत महत्तवपूर्ण ठरवून कुरआनातील आयत عَلَيْهَا تِسْعَةَ عَشَرَ

''जहन्नमवर १९ फिरिश्ते नियुकत आहेत'' (सूरह अल-मुद्दस्सिर) द्वारे युक्तिवाद केला आहे परंतु या युक्तिवादाचे पितळ अशा प्रकारे उघडकीस येते की कुरआनात १९ फिरिश्त्यांचा उल्लेख जहन्नम संबंधाने आला आहे तेव्हा विचार करण्याजोगी गोष्ट अशी की ही संख्यां समृध्दीचे द्योतक आहे कि विनाशाचे? कुरआनत दुसऱ्या एका ठिकाणी हेहि फर्माविले गेले आहे की

وَيَحْمِلُ عَرْشَ رَبِّكَ فَوْقَهُمْ يَوْمَئِذٍ ثَمٰنِيَةٌ۔

''त्या दिवशी तुमच्या पालनकर्त्याचे सिंहासन आठ फिरिश्त्यांनी उचललेले असेल''- (सूरह अल् हाक्का) मग ८ यां संख्येला सर्वात अधिक महत्त्वपूर्ण का मानले जाऊ नये. वस्तुस्थिती अशी की १९ या संख्येला बहाई धर्मात विशेष महत्त्व प्राप्त आहे. तेव्हा त्यांच्या येथे महिना १९ दिवसांचा असतो व वर्ष १९ महिन्यांचे. म्हणून कुरुआनातील आयतीना १९ च्या असापास घुमविणे किंवा 'मुकत्तआत' अक्षरांद्वारे १९ या संख्येच्या महत्त्व पूर्णतेवर युक्तिवाद करणे बनावटच नव्हे तर बहाई खोडसाळपणास पुष्टि देण्यासारखे होय यात भर ही की ह्या गणक चक्राने संख्या व गणनेच्या आधारावर कियामतीची वेळ हि निर्धारीत केली आहे.आरंभ तर कम्प्युटर द्वारे पवित्र कुरुआनात चमत्कार सिद्ध करण्याच्या हेतुने होता, परन्तु गोष्ट पोहचली कियामती पर्यंत.

**बात पहुँची कियामत तक**

वस्तुत: कुरआनात स्पष्टत: म्हटले गेले आहे की कियामतची निश्चित वेळ कोणालाही माहित नाही. आणि हे की ती अकस्मात येईल.

२. कुरआन हा बुद्धिकौशल्य युक्त ग्रंथ असण्याचा अर्थ हा की त्याचे आवाहन त्याने प्रस्तुत केलेली श्रद्धा व ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण तसेच त्याची शिकवण या सर्वांची मुळे मनुष्य स्वभावात खोलवर गेली आहेत आणि सुबुद्धि यांचे समर्थन करते.

कुरआनाची ही वास्तविकता नास्तिक लोकांच्या या दाव्याचे खंडन करते की श्रद्धेचा आधार निर्बुद्धता आणि खोट्या कल्पनांवर आहे, अर्थात त्यांचा हा दावा अन्य धर्म-ग्रंथांबाबत खरा असू शकतो परंतु कुरआनाबाबत कदापि योग्य नव्हे. परंतु बुद्धिने भ्रष्ट झालेल्यांना खऱ्या-खोट्यातले तारतम्य कळत नाही.

३. त्या काळात लोकांना या गोष्टीबद्दल आश्चर्य वाटत असे की अल्लाह कडून वही (ईश-आदेशा) चे अवतरण एका व्यक्तिवर कसे होऊशकते. आणि आजच्या काळातील लोकांकरीता 'वही' (Revelation) ची कल्पनाच मान्य न करण्याजोगी बनली आहे. परंतु क़ुरआनाचे सृष्टीरहस्यांवरील आवरण हटविणे व जीवनाच्या तो गुंता उकलणे ज्यास मोठमोठे विद्वान व तत्ववेत्ते देखील उकलू शकले नाहीत, तसेच मनुष्याचे परीपूर्ण मार्गदर्शन करणे व अशी शिकवण प्रस्तुत करणे जी आगदी योग्य व अतिशय समानतेवर आधारीत आहे. इत्यादि गोष्टी कुरआन ईश-आदेश असल्याचा चक्षुर्वेसत्य

प्रमाण होय. सत्याचा इन्कार करणाऱ्यांनी वहीच्या विरोधात मोठमोठ्या गोष्टी केल्या आहेत आणि तत्वज्ञानीय विवादहि बरेच केले आहेत परंतु ते ना सृष्टीरहस्यां वरील पडदा हटवू शकलेत ना जीवनाची गुंतागुंत उकलू शकले व ना मनुष्याचे यथायोग्य मार्गदर्शन करु शकलेत. आणि याच कारणास्तव प्रत्येक दृष्टीकोन दुसऱ्या दृष्टीकोनाचे खंडन करतो व प्रत्येक तत्ववेत्ता दुसऱ्या तत्ववेत्त्याचे.परंतु ईश-आदेशाचा मामला असा आहे की तो निरंतर सत्यावर आधारित आहे व त्याला प्रस्तुत करणारे (पैगंबर) नेहमी एकाच वस्तुस्थितीला सादर करीत राहीले आहेत आणि कुरआनास प्रस्तुत करणारा पैगंबर याच माळेतील शेवटचा मौक्तिक होय.

४. सत्याचा इन्कार करणारे जेव्हा असे पाहत की कुरआनातील अलंकारीक भाषे समोर अरबी भाषेतील मोठमोठ्या साहित्यिकांची वाणी देखील फिकी पडत आहे व ते हृदयांना मोहीत करीत आहे तेव्हा याबाबत कोणतेहि स्पष्टीकरण देणे त्यांना जमत नसे, म्हणून ते हा चुटका सोडून देत की ही केवळ शब्दांची जादू आहे व हा मनुष्य वाणी-चमत्कार दाखवित आहे.

५. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र.८२मध्ये केले गेले आहे.

६. याचेही स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र.८३ मध्ये केले गेले आहे.

७. अर्थात अशी कोणतीही शक्ति नाही जी ईश्वराच्या निर्णयात हस्तक्षेप करीत असावी किंवा त्याच्याकडून एखाद्याला काही हमखास मिळवून देत असावी अथवा कियामतीच्या दिवशी त्याच्या समक्ष शिफारस करील.

याद्वारे मुसलमानांमध्ये पसरलेल्या त्या अज्ञानाचोहि खंडन होते की अमुक वली बिघडलेले कार्य बनविणारा आहे म्हणून फिर्याद (आर्जव) त्यांच्याकडे केले जावे. आणि अमुक बुजुर्ग आमचे पाप माफ करवतील म्हणून त्यांचा पदर सोडणार नाही. अशी घोषणा लावली जावी.

८. म्हणजे जेव्हा अल्लाहच सृष्टीचा निर्माता व सत्ताधिकारी आहे तेव्हा तुमचा स्वामी त्याच्या शिवाय अन्य कोण असू शकतो. (स्वामी (रब) च्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह फतिहा टीप क्र.४)

९. म्हणजे जेव्हा अल्लाह तुमचा रब (स्वामी) आहे तेव्हा तुमच्या उपासनेस पात्र देखील तोच होय. त्यालाच उपास्य मानून त्याची भक्ति करा, व त्याचे दास बनून राहा.

('उपासना' या शब्दाच्या स्पष्टीकरण साठी पहा- सूरह फातिहा टीप क्र.७)

१०. मनुष्याला ज्या हेतुसाठी दुसऱ्यांदा जीवन प्रदान केले जाईल त्याचा हा होकारात्मक पैलू आहे व हीच खरी गरज होय, म्हणजे अल्लाहने आपल्या एकनिष्ठ दासांना असा मोबदला द्यावा की ते कृतार्थ व्हावेत.

११. अर्थात अल्लाहला एकमेव स्वामी मानून त्याची भक्ति करण्याचे जे आवाहन कुरआन प्रस्तुत करीत आहे ते मान्य करण्यास ज्यांनी इन्कार केला.

**निःसंशय रात्र व दिवसाच्या एका पाठोपाठ येण्यात व त्या समस्त गोष्टींमध्ये ज्या अल्लाहने आकाशांमध्ये व जमीनीवर निर्माण केल्या आहेत, त्या लोकांकरीता निशाण्या आहेत जे अल्लाहचे भय बाळगतात ।*(अल-कुर्आन)***

५. तोच होय ज्याने सूर्याला सतेज केले व चंद्राला प्रकाशित [१२] आणि त्याच्या कला निर्धारीत केल्या [१३] अशासाठी की तुम्हाला वर्ष-गणना व हिशेब जाणणे शक्य व्हावे.[१४] अल्लाहने हे सर्व हेतुपूर्ण बनविले आहे [१५] तो आपल्या निशाण्यांचे स्पष्टत: निवेदन करतो त्या लोकांसाठी जे जाणतात.[१६]

هو الذي جعل الشمس ضياء والقمر نورا وقدره منازل
لتعلموا عدد السنين والحساب ما خلق الله ذلك إلا بالحق
يفصل الآيات لقوم يعلمون ﴿٥﴾

६. नि:संशय रात्र व दिवसाच्या एका पाठोपाठ येण्यात व त्या समस्त गोष्टींमध्ये ज्या अल्लाहने आकाशांमध्ये व जमीनीवर निर्माण केल्या आहेत, त्या लोकांकरीता निशाण्या आहेत जे अल्लाहचे भय बाळगतात ।[१७]

إن في اختلاف الليل والنهار وما خلق الله في السماوات
والأرض لآيات لقوم يتقون ﴿٦﴾

७. जे लोक आमच्या भेटीची अपेक्षा बाळगत नाही आणि ऐहिक जीवनावरच राजी व समाधानी झालेले आहेत [१८] आणि जे आमच्या निशाण्यां पासून गाफील आहेत.

إن الذين لا يرجون لقاءنا ورضوا بالحياة الدنيا
واطمأنوا بها والذين هم عن آياتنا غافلون ﴿٧﴾

८. त्यांचे ठिकाण दोज़ख़ (जहन्नम) असेल, त्या कमाईच्या पायी जे ते करीत राहीलेत.[१९]

أولئك مأواهم النار بما كانوا يكسبون ﴿٨﴾

९. ज्या लोकांनी ईमान बाळगले व सत्कृत्ये केलीत, त्यांचा पालनकर्ता त्यांच्या ईमानामुळे त्यांना सफलतेच्या मजलीवर पोहचविल [२०] त्यांच्या खालून प्रवाह वाहत असतील ईश-देणग्यांनी युक्त अशा जन्नतीमध्ये.

إن الذين آمنوا وعملوا الصالحات يهديهم ربهم
بإيمانهم تجري من تحتهم الأنهار في جنات النعيم ﴿٩﴾

१०. तेथे त्यांची पुकार असेल 'सुबहानकल्लाहुम्म'(हे अल्लाह तू पवित्र आहेस) आणि तेथे त्यांचे (आपसात) प्रार्थनामय वचन असेल 'सलाम'व त्यांच्या आर्जवाचा शेवट असेल''अलहम्दु लिल्लाहि रब्बिल आलमीन'' (स्तुती व प्रशंसा सर्व विश्वांचा पालनकर्ता अल्लाह करीता आहे).[२१]

دعواهم فيها سبحانك اللهم وتحيتهم فيها سلام وآخر
دعواهم أن الحمد لله رب العالمين ﴿١٠﴾

११. जर अल्लाहने लोकांना शिक्षा-यातना देण्यात घाई केली असती,ज्या प्रमाणे मंगल-गोष्टीत तो त्यांच्याकरिता घाई करतो, तर त्यांची मुद्दत केव्हाच संपविली गेली असती. परंतु आम्ही त्या लोकांना जे आमच्या भेटीची अपेक्षा बाळगत नाही. मोकळे सोडतो की ज्यायोगे त्यांनी आपल्या विद्रोहात भटकत रहावे.[२२]

ولو يعجل الله للناس الشر استعجالهم بالخير
لقضي إليهم أجلهم فنذر الذين لا يرجون لقاءنا في
طغيانهم يعمهون ﴿١١﴾

१२. मूळ ग्रंथात सूर्याकरिता 'जिया' व चंद्राकरीता 'नूर' हा शब्द प्रयोग झाला आहे, जो हा फरक स्पष्ट करतात की सूर्याला प्रखर प्रकाश असलेला बनविले आहे आणि चंद्राला शीतल प्रकाश असलेला.

१३. चंद्राच्या कलाशी अभिप्रेत सर्वसामान्य अवलोकनात येणाऱ्या कला होत. तो भ्रमण करीत असलेला दिसून येतो व त्याच्या घटण्या-वाढण्यामुळे विविध स्थिती निर्माण होते ज्यास चंद्रकला म्हणतात. तेव्हा चंद्र दररोज एक एक मजल पार करीत आपले भ्रमण पूर्ण करतो. क़ुरआनाचा युक्तिवाद अवलोकनात येणाऱ्या याच 'कला' शी आहे.

१४. चंद्राची ही स्थित्यंतरे तारखा निश्चित करण्यास उपयोगी पडतात.

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप.२५८ आणि सूरह तौबा टीप क्र.७०)

१५. म्हणजे ही सृष्टी-व्यवस्था या गोष्टीची साक्ष देते की हा कारखाना एका अशा हसती ने अस्तित्वात आणला आहे जो अत्यंत बुद्धिकौशल्य बाळगणारा व व्यवस्था कुशल आहे कारण तिच्या प्रत्येक भागातून हिकमत व कुशल-व्यवस्थापन प्रकट होत आहे. आणि ही गोष्ट सृष्टीच्या हेतुपूर्ण असण्याबद्दल युक्तिवाद करते तसेच कुरआन हिचे जे उद्दिष्ट वर्णन करते ते या बुद्धि कौशल्याशी पूर्णपणे सुसंगत आहे जे या सृष्टीत सर्वत्र प्रकट आहे. सारांश, सृष्टीची ही व्यवस्था या गोष्टीचे प्रमाण देते की तिचा स्वामी व सत्ताधिकारी एक दिवस न्यायालय स्थापित करील व आपल्या एकनिष्ठ दासांना मोबदला देइल व बंडखोरांना दंड देईल.

मोबदला व शिक्षेच्या घटनेवर हे मोठे स्पष्ट प्रमाण आहे. आणि क़ुरआन या प्रमाणांना अशासाठी प्रस्तुत करते की लोकांनी सामंजस्याने काम घ्यावे व वसुस्थिती प्रत पोहचणे त्यांना सोपे व्हावे इतके असूनहि आजच्या काळातील भौतिक वादी-इस्लाम व अन्य धर्मांमध्ये फरक करीत नाही. आणि असे समजतात की आखिरतची श्रद्धा केवळ नावापुरती श्रद्धा आहे जिच्या पाठीमागे कोणतेही बौद्धिक प्रमाण नाही. जर या लोकांनी मोकळ्या मनाने क़ुरआनाचे अध्यान केले असते तर त्यांना हे माहित झाले असते की कुरआन जेव्हा मूलभूत श्रद्धा प्रस्तुत करते तेव्हा त्याची युक्तिवाद-शैली मन-मस्तिष्क ला प्रभावित करणारी असते. म्हणून त्याचा मार्ग बुद्धिचा व दृष्टीचा मार्ग आहे.

१६. म्हणजे ह्या निशाण्यांचा केवळ तेच लोक लाभ घेतात जे अज्ञानात खितपत पडून राहात नाहीत, किंबहुना त्या ज्ञान-प्रकाशात शोध व संशोधनाच्या मार्गवर चालू लागतात ज्यास अल्लाहने त्यांच्या स्वभावात ठेवा म्हणून राखले आहे.

१७. अर्थात सृष्टीत सर्वत्र पसरलेल्या या निशाण्यांपासून केवळ तेच लोक मार्गदर्शन प्राप्त करतात जे आपल्या निर्मात्या (अल्लाह) चे भय बाळगतात, कारण निर्मात्याची ओळख प्रत्येक व्यक्तिच्या स्वभाव धर्मात सुप्त आहे व त्याच्या कल्पनेने अपरिहार्यत:त्याचे भय निर्माण होते. परंतु ज्यांनी आपल्या मनोवृत्तीला इतके विकृत केले आहे.की आपला एखादा निर्माता आहे कि नाही हे जाणंत नाही तर त्यांच्या अंगी ना त्याचे भय निर्माण होऊ शकते ना त्यांच्यात मार्गदर्शन मान्य करण्याची क्षमता बाकी राहते.

१८. आजच्या काळातील ईश्वराशी संबंध न ठेवणारे लोक ऐहिक जीवनाशी फार मोठ्या प्रमाणात संतुष्ट दिसून येतात ते मरणोत्तर जीवनावर नव्हे किंबहुना 'अर्थोपार्जना' वर विश्वास ठेवतात. त्यांना नैतिक प्रगतीत स्वारस्य नसते तथापि भौतिक प्रगतीने मोठे आनंदीत होतात. त्यांचे मास्तिष्क जगभरच्या माहीती करीता कंप्युटर असते परंतु त्यांचे मन आखिरतच्या मामल्यात एक गंज लगलेल्या मशीनीसारखे असते असे लोक आपल्या 'गोड' समजुतीबद्दल मोठा अभिमान बाळगतात. परंतु किती दिवस?

१९. जगात मनुष्य जे काही काम करतो त्याचा परिणाम निश्चितच दिसून येतो. मनुष्य सत्कृत्ये करो वा दुष्कृत्ये त्यांच्या परिणामांना आपल्या पदरी अपरिहार्यत: संचयित करतो. ही जणू त्याने आपल्या हाताने कमविलेली कमाई होय. आणि ही कमाई कियामतीच्या दिवशी परिणितीच्या स्वरुपात त्याच्या समोर दृगोचर होईल.

२०. हे ईमानाचे फळ वर्णिले गेले आहे, केवळ श्रद्धेचेच नव्हे कारण श्रद्धा तर मनुष्य मुस्लिम-घराण्यात जन्म घेतल्यानेहि अंगिकारतो व या आधारे मुस्लिम समाजाचा घटक बनून राहतो. जेव्हा ईमान एक बौद्धिक व विवेकशील निर्णय असतो. ज्याप्रकारे एखाद्या बल्ब मध्ये जोपर्यंत विद्युत-प्रवाह वाहत नाही तोपर्यंत तो प्रज्वलीत होऊ शकत नाही तद्वतच श्रद्धा त्याच वेळी आपला प्रभाव दाखविते जेव्हा तिच्यात ईमानाचे चैतन्य असेल.

श्रद्धा अपरोक्ष सत्यतेस मान्य करण्याचे नाव आहे तथापि ईमान म्हणजे सत्य श्रद्धेचे मन:पूर्वक समर्थन व अटळ विश्वासाची ती कैफियत होय जी माणसाच्या अंतरंगास शोभिवंत करते आणि विचार करण्याचे व निर्णय घेण्याचे एक विशेष सामर्थ्य त्याला प्रदान करते.

२१. अर्थात ईमान बाळगणारे जन्नतच्या देणग्यांमध्ये इतके मगन होणार नाहीत की आपल्या पालनकर्त्याचा

विसर पडावा. किंबहुना त्यांच्या मुखातून तस्बीह आणि ईश-स्तुतीची वचने निघत असतील व ते ईश-देण्यांचा लाभ घेऊन अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करतील. तसेच जेव्हा ते आपसात भेटतील तेव्हा ना एकमेकास बरेवाईट बोलतील ना भांडण तंटा करतील. किंबहुना सर्वजण एकमेकांचे हित इच्छितील आणि 'सलाम' या प्रार्थनामय वचनाने एकमेकांचे स्वागत करतील. तात्पर्य, जन्नतचे वातावरण ईश-स्तुतिच्या उद्‌घोषाने व प्रार्थनामय वचनांनी निनादेल. मानसिक शांती व आत्मीय अभिरुचीकरीता किती उत्कृष्ट वातावरण असेल ते !

२२. हे त्या प्रश्नाचे उत्तर होय जो 'मोबदला व शिक्षा' चा इन्कार करणारे सादर करतात. तो हा की जर सत्याचा इन्कार किंवा अपराध केल्याबद्दल अल्लाहतर्फे एखादी शिक्षा मिळावयाची आहे तर ती ताबडतोब का मिळत नाही?याचे उत्तर येथे असे दिले गेले आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह माणसाला लाभ पोहचविण्यात जी शीघ्रता अंगिकरतो ती नुकसान पोहचविण्यात अंगिकारत नाही कारण तो असे इच्छितो की माणसांना तोल सावरण्याचा व आपली सुधारणा करण्याचा अवसर दिला जावा. जर अल्लाहची पद्धत अशी नसती तर लोकांचा कर्म-अवधि केव्हाच संपला असता. परंतु जे लोक या सवडीचा दुरुपयोग करतात तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना भटकण्याकरिता मोकळे सोडतो. अशासाठी की त्यांचे कर्म-पात्र काठोकाठ भरावे.

तुमच्या पूर्वी आम्ही (कित्येक) जन समूहांना नष्ट केले आहे जेव्हा त्यांनी अत्याचार केला. त्यांचे रसूल त्यांच्याजवळ उघड निशाण्या घेऊन आले होते. परंतु ते कदापि ईमान बाळगणारे नव्हते. अशा प्रकारे आम्ही अपराधी समूहास मोबदला देतो. *(अल-कुर्आन)*

وَإِذَا مَسَّ الْإِنسَانَ الضُّرُّ دَعَانَا لِجَنبِهِ أَوْ قَاعِدًا أَوْ قَائِمًا
فَلَمَّا كَشَفْنَا عَنْهُ ضُرَّهُ مَرَّ كَأَن لَّمْ يَدْعُنَا إِلَىٰ ضُرٍّ
مَّسَّهُ ۚ كَذَٰلِكَ زُيِّنَ لِلْمُسْرِفِينَ مَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿١٢﴾

१२. आणि मनुष्या (ची दशा अशी आहे की जेव्हा त्या) ला त्रास पोहचतो तेव्हा पहुडताना, बसताना वा उभे राहतांना (ज्या स्थितीत असेल) आम्हाला आर्जव करु लागतो परंतु जेव्हा आम्ही त्याचा त्रास दूर करतो तेव्हा अशा प्रकारे चालता होतो की जणू त्याने एखाद्या त्रास-यातनेत आम्हाला पुकारलेच नव्हते. त्याच प्रकारे मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांकरिता त्यांची कामे मनोहर बनविली गेली आहेत.[२३]

وَلَقَدْ أَهْلَكْنَا الْقُرُونَ مِن قَبْلِكُمْ لَمَّا ظَلَمُوا ۙ وَجَاءَتْهُمْ
رُسُلُهُم بِالْبَيِّنَاتِ وَمَا كَانُوا لِيُؤْمِنُوا ۚ كَذَٰلِكَ نَجْزِي
الْقَوْمَ الْمُجْرِمِينَ ﴿١٣﴾

१३. तुमच्या पूर्वी आम्ही (कित्येक) जन समूहांना नष्ट केले आहे जेव्हा त्यांनी अत्याचार केला.[२४] त्यांचे रसूल त्यांच्याजवळ उघड निशाण्या घेऊन आले होते. परंतु ते कदापि ईमान बाळगणारे नव्हते. अशा प्रकारे आम्ही अपराधी समूहास मोबदला देतो.

ثُمَّ جَعَلْنَاكُمْ خَلَائِفَ فِي الْأَرْضِ مِن بَعْدِهِمْ لِنَنظُرَ كَيْفَ
تَعْمَلُونَ ﴿١٤﴾

१४. मग त्यांच्यानंतर आम्ही तुम्हाला जमीनीवर खलीफा (मुखत्यार) बनविले, अशासाठी की तुम्ही कशी कामे करता ते पहावे.[२५]

وَإِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِمْ آيَاتُنَا بَيِّنَاتٍ ۙ قَالَ الَّذِينَ لَا يَرْجُونَ
لِقَاءَنَا ائْتِ بِقُرْآنٍ غَيْرِ هَٰذَا أَوْ بَدِّلْهُ ۚ قُلْ مَا يَكُونُ لِي
أَنْ أُبَدِّلَهُ مِن تِلْقَاءِ نَفْسِي ۖ إِنْ أَتَّبِعُ إِلَّا مَا يُوحَىٰ إِلَيَّ ۖ
إِنِّي أَخَافُ إِنْ عَصَيْتُ رَبِّي عَذَابَ يَوْمٍ عَظِيمٍ ﴿١٥﴾

१५. आणि जेव्हा आमच्या स्पष्ट आयती त्यांना वाचून ऐकविल्या जातात तेव्हा ते लोक जे आमच्या भेटीची अपेक्षा बाळगत नाही. म्हणतात की या कुरआना ऐवजी अन्य एखादे कुरआन आणा अथवा यात दुरुस्ती करा [२६] सांगा, माझे हे काम नव्हे की यात आपल्यातर्फे फेरबदल करावा मी तर त्या ईश-आदेशाचे पालन करतो जो मजकडे पाठविला जातो [२७] जर मी आपल्या पालनकर्त्याची अवज्ञा करेन तर मला एका कठोर दिवसाच्या शिक्षा-यातनेचे भय आहे.[२८]

قُل لَّوْ شَاءَ اللَّهُ مَا تَلَوْتُهُ عَلَيْكُمْ وَلَا أَدْرَاكُم بِهِ ۖ
فَقَدْ لَبِثْتُ فِيكُمْ عُمُرًا مِّن قَبْلِهِ ۚ أَفَلَا تَعْقِلُونَ ﴿١٦﴾

१६. सांगा, अल्लाहने इच्छिले असते तर ना मी तुम्हाला कुरआन ऐकवू शकलो असतो व ना तो यापासून तुम्हाला जाणकार करतो. मी यापूर्वी तुमच्या दरम्यान एक आयुष्य व्यतीत केले आहे. काय तुम्ही अकलेने काम घेत नाही?[२९]

२३. अर्थात जे लोक अल्लाहने कायम केलेल्या मर्यादांचे उल्लंघन करतात व निर्बंध जीवन जगू इच्छितात. ते त्या घटना व प्रसंगांपासून कोणताही बोध घेत नाही जे दैनंदिन-जीवनात घडत असतात, व ज्यात त्यांना गफलतीतून जागृत करण्याची सामुग्री असते. परंतु अपल्या दुष्कृत्यांचा ते असा सुंदर खुलासा करीत असतात की आत्म-सुधारणेची प्रवृत्ति त्यांच्या अंगी निर्माण होत नाही.

२४. अत्याचाराशी अभिप्रेत ते चुकीचे वर्तन होय जे अल्लाहच्या निशाण्यांना, त्याच्या प्रेषितांना व त्याच्या मार्गदर्शनास खोटे ठरवून मनुष्य अंगिकारतो.

२५. इहलोकातून जेव्हा एक जन-समूह निरोप घेतो तेव्हा दुसरा जन समुह त्याचे रिक्त स्थान घेतो. तसेच क्रमा-क्रमाने जन समुहाना कर्म-क्षेत्रात आणण्याचे उद्दिष्ट हे नव्हे की त्यांनी एकाहुन एक जबरदस्त भौतिक कारनामे दाखवावे. किंबहुना परीक्षा हेच उद्दिष्ट होय. की कोण ईश्वराचा दास बनून राहतो व कोण त्याचा विद्रोही बनून. कोणता जन-समूह ईश्वराला ओळखणाऱ्या संस्कृतिला जन्म देतो व कोणता जन-समूह वाईट संस्कृतिला. कोणता जन समूह सत्कृत्यांना उंचावतो, व कोणता जन समूह या दुष्कृत्यांना. कोणता जन-समूह भौतिक प्रगतीत, नैतिक व शरीअतच्या मर्यादांचे पालन करतो व कोणता जन समूह या मर्यादाचे व बंधनातून मुक्त होऊन भौतिक प्रगती करिता झेप घेतो.

२६. अनेकेश्वर वादी असे इच्छित होते की जर कुरआन प्रस्तुत करावयाचे आहे तर असे कुरआन प्रस्तुत करा ज्यात मूर्ति-पूजे विरुद्ध काहीहि सांगितले गेले नसावे अथवा अस्तित्वात असलेल्या कुरआनात अशी दुरुस्ती करा की अनेकेश्वरवादी धर्मा करिताही जागा व्हावी.

आजच्या काळातील अनेकेश्वरवादी देखील असे इच्छितात की क़ुरआनात नाही तर निदान त्याच्या मतितार्थात असा फेरफार केला जावा की ते काळाच्या रुची नुसार व्हावे. आणि अनेकेश्वरवादी धर्मांना प्रोत्साहित करण्यासही वाव रहावा.

२७. लोक क़ुरआनात दुरुस्ती विषयीची तजवीज असे गृहीत धरुन मांडतात की हा ग्रंथ हजरत मुहम्मद यांनी लिहीलेला आहे. वस्तुत: कुरआन पैगंबर लिखीत ग्रंथ नव्हे किंबहुना अल्लाह प्रणीत ग्रंथ आहे. अर्थात ईश ग्रंथात फेरबदल करण्याचा अधिकार कोणालाही असू शक्त नाही मग तो अल्लाहचा पैगंबर का असेना.

२८. अर्थात कियामतीच्या दिवसाच्या शिक्षेचे.

२९. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर कुरआन अवतरणाचा आरंभ अशा वेळी झाला जेव्हा पैगंबराचे वय चाळीस वर्षे होते. आयुष्यातील हा दीर्घ हिस्सा पैगंबरानी मक्का वासीयांच्या दरम्यान व्यतीत केला होता. या कालावधीत त्यांचे आचरण निष्कलंक राहीले व कोणीही त्यांच्या खरेपणाबद्दल व विश्वसनियतेबद्दल शंकादेखील प्रकट केली नाही, किंबहुना त्यांना 'अमीन' ही पदवी दिली गेली.मग जर या मोठ्या मुदतीत ते सत्शील व अमीन राहीलेत तर अशा व्यक्तिकडून हे संभवनीय कसे की ती एक्केचाळीसाच्या वर्षात पदार्पण करताच खोटे बोल लागेल व तेहि ईश्वर संदर्भात.

मग ही देखील वस्तुस्थिती आहे की पैगंबरानी चाळीस वर्षाच्या या अवधित अशी कोणतीही गोष्ट केली नाही की ज्यावरुन हा संशय निर्माण व्हावा की ते धार्मिक सुधारकाच्या रुपाने उदयास येऊ इच्छितात किंवा समाजाचे नेतृत्व इच्छितात अथवा लोकांच्या हे निदर्शनास आणू इच्छितात की आपण एक असमान्य व महान व्यक्ति आहोत अशी व्यक्ति चाळीस वर्षे घालविल्यानंतर प्रेषित्वाचा खोटा दावा कसा करु शकते, जेवहा या वयात मानव-बुद्धि एका विशिष्ट साच्यात घडलेली असते आणि एक स्वभाव बनून गेलेला असतो.

आक्षेप घेणारे या प्रशनांची उत्तरे आज पावेतो देऊ शकले नाहीत.

१७. मग त्याहून अधिक अत्याचारी कोण असेल जो एक खोटी गोष्ट रचून तिचा अल्लाहकडे संबंध दर्शविल,किंवा त्याच्या आयतीना खोटे ठरवील [३०] नि:संशय अपराधी कधीही सफल होणार नाहीत.

فَمَنْ أَظْلَمُ مِمَّنِ افْتَرَىٰ عَلَى اللَّهِ كَذِبًا أَوْ كَذَّبَ بِآيَاتِهِ ۚ
إِنَّهُ لَا يُفْلِحُ الْمُجْرِمُونَ ﴿١٧﴾

१८. हे लोक अल्लाह ऐवजी अशा वस्तुंची पूजा करतात ज्या त्यांना ना नुकसान पोहचवू शकतात व ना फायदा. आणि म्हणतात की हे (अल्लाह खेरीजची उपास्ये) अल्लाह जवळ आमची शिफारस करणारे आहेत.[३१] सांगा काय तुम्ही अल्लाहला अशा गोष्टीची खबर देता जिला तो जाणत नाही-ना आकाशामध्ये ना जमीनीवर [३२] पवित्र व उच्चतम आहे तो त्या शिर्कपासून जे हे लोक करीत आहेत.

وَيَعْبُدُونَ مِن دُونِ اللَّهِ مَا لَا يَضُرُّهُمْ وَلَا يَنفَعُهُمْ
وَيَقُولُونَ هَٰؤُلَاءِ شُفَعَاؤُنَا عِندَ اللَّهِ ۚ قُلْ أَتُنَبِّئُونَ
اللَّهَ بِمَا لَا يَعْلَمُ فِي السَّمَاوَاتِ وَلَا فِي الْأَرْضِ ۚ
سُبْحَانَهُ وَتَعَالَىٰ عَمَّا يُشْرِكُونَ ﴿١٨﴾

१९. सर्व लोक एकच जमात होती, मग त्यांनी मतभेद केला [३३] आणि जर तुमच्या पालनकर्त्यातर्फे एक गोष्ट आधीच ठरुन गेलेली नसती तर ज्या गोष्टीमध्ये ते मतभेद करीत आहेत त्यांचा फैसला केला गेला असता.[३४]

وَمَا كَانَ النَّاسُ إِلَّا أُمَّةً وَاحِدَةً فَاخْتَلَفُوا ۚ وَلَوْلَا
كَلِمَةٌ سَبَقَتْ مِن رَّبِّكَ لَقُضِيَ بَيْنَهُمْ فِيمَا فِيهِ
يَخْتَلِفُونَ ﴿١٩﴾

२०. आणि (हे लोक) असे म्हणतात की या व्यक्तिवर त्याच्या पालनकर्त्याकडून एखादी निशाणी [३५] का उतरवली गेली नही. तेव्हा सांगा अपरोक्षाचा अधिकारी अल्लाहच आहे [३६] तर प्रतिक्षा करा [३७] मी देखील तुमच्या सोबत प्रतिक्षा करतो.

وَيَقُولُونَ لَوْلَا أُنزِلَ عَلَيْهِ آيَةٌ مِّن رَّبِّهِ ۖ
فَقُلْ إِنَّمَا الْغَيْبُ لِلَّهِ فَانتَظِرُوا إِنِّي مَعَكُم
مِّنَ الْمُنتَظِرِينَ ﴿٢٠﴾

२१. आणि जेव्हा आम्ही लोकांना कष्ट-यातना नंतर कृपेची गोडी चाखवितो तेव्हा ते आमच्या निशाण्याबांबत डावपेच खेळू लागतात.[३८] सांगा अल्लाह आपल्या उपाय-योजनेत मोठा शीघ्र आहे [३९] त्याचे दूत तुमच्या डावपेचांना लिहीत आहेत.[४०]

وَإِذَا أَذَقْنَا النَّاسَ رَحْمَةً مِّن بَعْدِ ضَرَّاءَ مَسَّتْهُمْ إِذَا لَهُم مَّكْرٌ
فِي آيَاتِنَا ۚ قُلِ اللَّهُ أَسْرَعُ مَكْرًا ۚ إِنَّ رُسُلَنَا يَكْتُبُونَ مَا تَمْكُرُونَ ﴿٢١﴾

३०. याचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र.४० मध्ये केले गेले आहे.

३१. हे अल्लाहजवळ आमची शिफारस करणारे आहेत. म्हणजे ही उपास्ये आमची फिर्याद ईश्वरापर्यंत पोहचविण्यात व त्याच्याकडुन उपजिविका, धन, संतति वगैरे देवविण्यात आमच्याकरीता माध्यम व वशिला आहेत. हे आमची पुकार ऐकतात व आमच्याकरिता ईश्वराकडून बऱ्याच गोष्टी मान्य करवून घेतात.

आपल्या देवतांसंबंधी मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांची ही कल्पना होती व या आधारे ते त्यांचे भक्ति करीत व त्यांना चढावे चढवित. काहीशी अशीच कल्पना मुसलमानांच्या एका मोठ्या समूहात जो धर्म-विभूतिच्या संदर्भात अतिशयोक्तिस बळी पडला आहे, पीर-वलींच्या बाबतीत निर्माण झाला आहे. यास्तव ते त्यांना ईश्वरासमोर माध्यम व वसीला ठरवून त्यांना आर्जव करु लागतात. मोठ्या इतमामाने त्यांच्या नवस मानतात, नजराणे अर्पण करतात. त्यांच्या कबरीवर चढावे चढावतात. एवढे सगळे करूनहि असे समजतात की आम्ही यांची पुजा कोठे करतो? प्रसिद्ध कवी हाली यांच्या कथनानुसार:

**करे ग़ैर बुत की पूजा तो काफ़िर**
**जो ठहराये बेटा खुदा का तो काफ़िर**
**कहे आग को अपना किबला तो काफ़िर**
**कवाकब में माने करीश्मा तो काफ़िर**
**मगर मोमिनों पर कुशादा हैं राहें**
**परस्तिश करें शौक़ से जिस की चाहें**

अर्थात: मुस्लिमेतर जर मूर्तिना पूजतील तर त्यांना काफिर म्हटले जाते. अग्निला पूज्य ठरवणारे काफिर व तसेच ईश्वराचा पूत्र ठवणारा काफिर व ताऱ्यांमध्ये चमत्कार मानणारा देखील काफिर ठरतो. परंतु मुसलमानांसाठी सगळेच मार्ग खुले आहेत.मनाला येईल त्याची मोठ्या आवडीने उपासना करायची !!

आणि अल्लामा राजी यांनी आपल्या भाष्यामध्ये अगदी योग्य लिहीले आहे:

''अनेकेश्वरवाद्यांनी ह्या मूर्ती प्रेषित व महापुरुषांच्या स्वरुपावर घडविल्या आणि अशा कल्पनेत पडले की जेव्हा ते ह्या दैवतांची पूजा करतिल तर ही दैवते अल्लाहच्या येथे आमची शिफारस करणारे बनतील.

वर्तमान काळात या गोष्टीचे उदाहरण म्हणजे बहुतेक लोकांचे बुजुर्गांच्या कबरींच्या आदर-सनमानात मग्न होणे. व तेहि या विश्वासाने की या कबरीचा आदर सन्मान केल्याने त्यातले बुजुर्ग अल्लाहच्या जवळ यांची शिफारस करणारे होतील.

(अत्तफसीरुल, कबीर. खंड-१७ पृष्ठ ६०)

३२. ज्या गोष्टीचे अल्लाहला ज्ञान नाही' याचा अर्थ असा की ती गोष्ट मुळातच अस्तित्वहीन आहे. आणि जेव्हा आकाश व जमीनीत या शिफारस करणाऱ्यांचा पत्ता सर्वश्रेष्ठ अल्लाहला ठाऊक नाही तेव्हा यांची हकीकत या खेरीज कोणती की ते अनेकेश्वरवाद्यांची आपल्या बुद्धीची उपज होय.

तसेच ही गोष्ट देखील मोठी विचित्र आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह स्वत:फर्मावित आहे की त्याच्याजवळ कोणीहि शिफारस करणारा नाही. किंबहुना तो सरळ सरळ आपल्या दासांच्या नशीबांचे फैसले करतो परंतु ज्यांनी शिर्कचे पांघरुण ओढून घेतले आहे ते हा अट्टाहास करीत आहेत की अमुक पीर वा वली अथवा अमुक महापुरुष अल्लाह समोर आमची शिफारस करणारे आहेत. जणू त्यांचे ज्ञान अल्लाहच्या ज्ञानातून वरचढ आहे आणि ते त्याला एका अशा गोष्टीची खबर देऊ इच्छितात, जिला तो जाणत नाही- अल्लाह या मार्ग भ्रष्टतेपासून आमचे रक्षण करो.

نَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ ذٰلِکَ

३३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र.३०८ व ३०९ तसेच सूरह अनआम टीप क्र.२९५.

३४. विभिन्न धर्मांच्या मतभेदास पाहून हा प्रश्न मनात उद्भवतो की ईश्वर इहलोकातच न्यायालय स्थापित करुन या मतभेदाचा फैसला का करीत नाही?याचे उत्तर या आयतीत दिले गेले आहे ज्याचा अर्थ असा की या फैसल्या करिता सर्वश्रेष्ठ अल्लाहने कियामतचा दिवस निर्धारित केलेला आहे.

इहलोकात माणसाची ही परीक्षा आहे की धर्मा-धर्मांच्या या मतभेदात तो आपल्या बुद्धिचा योग्य वापर करुन व आपल्या मनोवृत्तीची पुकार ऐकुन, तसेच त्या निशाण्या व प्रमाणपासून मार्गदर्शन प्राप्त करुन ज्या सर्वश्रेष्ठ अल्लाहने अवतरीत केल्या आहेत, सत्य धर्माला कबुल करतो किंवा नाही जर धर्मांच्या मतभेदाचा निर्णय इहलोकातच दिला गेला असता तर या स्थितीत माणसाची कसोटी कशा प्रकारे होऊ शकली असती व त्याला मोबदला किंवा शिक्षा कोणत्या कर्माआधारे दिली गेली असती?

३५. अभिप्रेत अनुभूत चमत्कार होय.

३६. म्हणजे अपरोक्षाचे ज्ञानहि केवळ अल्लाहला आहे व अपरोक्षातून एकादी गोष्ट बाहेर काढणे हेहि त्याच्याच अधिकार-कक्षेत आहे. मी ना अपरोक्ष-ज्ञान बाळगतो व ना अपरोक्षाची एखादी गोष्ट माझ्या अधिकारात आहे की तिला मी सर्वांच्या निदर्शनास आणावे व तुमची मागणी पूर्ण करावी.

स्पष्ट झाले की एखादा पैगंबर आपल्यातर्फे चमत्कार दाखविण्याबाबत समर्थ नसतो तेव्हा एखादा 'वली' आपल्यातर्फे चमत्कृति (करामत) दाखविण्यास समर्थ कसा असू शकतो? वस्तुत: अल्लाहच्या हुकुमाखेरीज कोणी काहीहि करु शकत

नाही.

३७. प्रतिक्षा या गोष्टीची की तुमच्या या निरर्थक आग्रहाचे निष्पन्न काय निघते.

३८. सामूहिक व राष्ट्रीय स्तरावर ज्या दुर्घटना व दु:खाचे जे प्रसंग उद्‌भतात ते अशा तंबी व लक्षणांनी युक्त असतात की जे लोकांच्या विवेक-बुद्धीस जागृत करणारे ईहलोकांच्या वास्तविकतेकडे मार्गदर्शानि करणारे व ईशवराकडे लक्ष केंद्रीत करणारे, असतात परंतु जे लोक ईश्वर व त्याच्या मार्गदर्शनास मान्य न करण्याची शपथ ग्रहण करुन बसतात ते या दुर्घटनांचे व प्रसंगांचे असे स्पष्टीकरण करु लागतात की लक्ष ईश्वराकडे वळायचे राहते. जर वाईट परीस्थितीत ईश्वराची आठवण झाली होती तर चांगली परिस्थिती आल्यानंतर ते आपल्या त्या अनुभुतिस दडपून टाकण्याचा प्रयत्न करतात, अशासाठी की त्यांच्यावर ईश्वर आणि आखिरत संबंधाने कोणतीही जबाबदारी न यावी. ह्याच त्यांच्या अपराधात्मक हरकती होत ज्यांना डावपेच खेळण्याच्या अर्थाने घेतले गेले आहे.

३९. म्हणजे तुमच्या या डावपेचांना चांगल्या प्रकारे निष्फळ करीत आहे. परंतु त्याच्या योजना गुप्त असतात, म्हणून लोक या भ्रमात असतात की ईश्वर त्यांच्या या गोष्टींचा दखल घेत नाही.

४०. अर्थात तुमच्या या हरकती फिरिश्ते लिहीत आहेत व अशासाठी लिहीत आहेत की कियामतीच्या दिवशी अल्लाहच्या न्यायालयात तुमच्या विरुद्ध खटला चालविला जावा.

*परंतु जेव्हा तो त्यांना मुक्ति देतो तेव्हा ते जमीनीवर नाहक बंड करु लागतात.लोक हो ! तुमचे बंड तुमच्याच विरुद्ध होत आहे. ऐहिक जीवनाचा लाभ पदरी घ्या. मग तुम्हाला आमच्याकडे परत यायचे आहे त्यावेळी आम्ही दाखवू की तुम्ही काय काय करीत राहीलात. (अल-क़ुर्आन)*

२२. तोच होय, जो तुम्हाला जमीनीवर व समुद्रात चालवितो [४१] येथपावेतो की जेव्हा तुम्ही नौकेवर चढता व त्या (नैका) अनुकूल हवा लाभल्याने चालत असतात आणि प्रवास करणारे आनंदित होत असतात, अकस्मात वेगवान वारे वाहू लागतात व सगळीकडून लाटा उंचबळतात आणि त्यांना वाटू लागते की संकटात सापडलो. त्यावेळी ते अल्लाहला आर्जव करु लागतात. विनम्रता व दास्यत्वास त्याच्याच करिता शुद्ध ठेवून [४२] की जर तू या (संकटा) पासून आम्हाला मुक्ति दिली तर आम्ही खचितच तुझे कृतज्ञ बनू.

هُوَ الَّذِىۡ يُسَيِّرُكُمۡ فِى الۡبَرِّ وَالۡبَحۡرِ ‌ؕ حَتّٰۤى اِذَا كُنۡتُمۡ فِى الۡفُلۡكِ‌ ۚ وَ
جَرَيۡنَ بِهِمۡ بِرِيۡحٍ طَيِّبَةٍ وَّفَرِحُوۡا بِهَا جَآءَتۡهَا رِيۡحٌ عَاصِفٌ
وَّجَآءَهُمُ الۡمَوۡجُ مِنۡ كُلِّ مَكَانٍ وَّظَنُّوۡۤا اَنَّهُمۡ اُحِيۡطَ بِهِمۡ‌ ۙ دَعَوُا
اللّٰهَ مُخۡلِصِيۡنَ لَهُ الدِّيۡنَ ۚ لَئِنۡ اَنۡجَيۡتَنَا مِنۡ هٰذِهٖ لَنَكُوۡنَنَّ
مِنَ الشّٰكِرِيۡنَ ﴿٢٢﴾

२३. परंतु जेव्हा तो त्यांना मुक्ति देतो तेव्हा ते जमीनीवर नाहक बंड करु लागतात. [४३] लोक हो ! तुमचे बंड तुमच्याच विरुद्ध होत आहे. ऐहिक जीवनाचा लाभ पदरी घ्या. मग तुम्हाला आमच्याकडे परत यायचे आहे त्यावेळी आम्ही दाखवू की तुम्ही काय काय करीत राहीलात.

فَلَمَّاۤ اَنۡجٰهُمۡ اِذَا هُمۡ يَبۡغُوۡنَ فِى الۡاَرۡضِ بِغَيۡرِ الۡحَـقِّ‌ ؕ يٰۤاَيُّهَا النَّاسُ
اِنَّمَا بَغۡيُكُمۡ عَلٰٓى اَنۡفُسِكُمۡ‌ ۙ مَّتَاعَ الۡحَيٰوةِ الدُّنۡيَا‌ ثُمَّ اِلَيۡنَا مَرۡجِعُكُمۡ
فَنُنَبِّئُكُمۡ بِمَا كُنۡتُمۡ تَعۡمَلُوۡنَ ﴿٢٣﴾

२४. ऐहिक जीवनाचे उदाहरण असे आहे जणू आकाशातून आम्ही पाणी वर्षविले, ज्यामुळे जमीनीवरील वनस्पती, जिला मनुष्य व गुरे खातात, खुप प्रफुल्लीत झाले येथापावेतो की जेव्हा जमीनीने आपला शृंगार केला व सुशोभित झाली [४४] आणि तिच्या मालकांना वाटले की आता आपण लाभ घेऊ शकू तेव्हा अकस्मात रात्री वा दिवसाच्या वेळी आमचा आदेश आला [४५] आणि आम्ही तिचा असा सफाया केला की जणू काल तेथे काही नव्हतेच.[४६] अशा प्रकारे आम्ही आपल्या निशाण्यांचे स्पष्टतः निवेदन करतो. त्या लोकांकरीता जे विचार-चिंतन करतात.[४७]

اِنَّمَا مَثَلُ الۡحَيٰوةِ الدُّنۡيَا كَمَآءٍ اَنۡزَلۡنٰهُ مِنَ السَّمَآءِ فَاخۡتَلَطَ
بِهٖ نَبَاتُ الۡاَرۡضِ مِمَّا يَاۡكُلُ النَّاسُ وَالۡاَنۡعَامُ ؕ حَتّٰۤى اِذَاۤ
اَخَذَتِ الۡاَرۡضُ زُخۡرُفَهَا وَازَّيَّنَتۡ وَظَنَّ اَهۡلُهَاۤ اَنَّهُمۡ
قٰدِرُوۡنَ عَلَيۡهَاۤ ۙ اَتٰٮهَاۤ اَمۡرُنَا لَيۡلًا اَوۡ نَهَارًا فَجَعَلۡنٰهَا
حَصِيۡدًا كَاَنۡ لَّمۡ تَغۡنَ بِالۡاَمۡسِ‌ ؕ كَذٰلِكَ نُفَصِّلُ
الۡاٰيٰتِ لِقَوۡمٍ يَّتَفَكَّرُوۡنَ ﴿٢٤﴾

२५. आणि अल्लाह शांति-गृहाकडे बोलवितो [४८] आणि ज्याला इच्छितो,सरळ मार्गाला लावतो.[४९]

وَاللّٰهُ يَدۡعُوۡۤا اِلٰى دَارِ السَّلٰمِ ؕ وَيَهۡدِىۡ مَنۡ يَّشَآءُ
اِلٰى صِرَاطٍ مُّسۡتَقِيۡمٍ ﴿٢٥﴾

४१. अर्थात तो अल्लाहच होय ज्याने तुम्हाला अशा योग्यतेचे बनविले की जमीनीवर व समुद्रात प्रवास करु शकाल. आजच्या काळात मनुष्य जो अवकाश प्रवास करतो तो देख़ील त्यांनेच प्रदान केलेल्या क्षमतेचा परिणाम होय.

४२. म्हणजे या स्थितीत ते पूर्ण विनम्रभावे केवळ अल्लाहशी प्रार्थना करु लागतात व आपल्या कल्पित ईश्वरांना विसरतात. मक्केतील अनेकेश्वराद्यांची हीच दशा होती. अर्थात अत्याधिक संकटात एक ईश्वराला पुकारणे या गोष्टीचे प्रमाण होय की मनुष्य-स्वभाव एकाच ईश्वराशी परिचित आहे.

४३. हे या गोष्टीचे उदाहरण होय की मनुष्य संकटात ईश्वराचे स्मरण करतो, परंतु संकट टळून गेल्यानंतर त्याला तो विसरतो.

४४. जेव्हा शेती हिरवीगार होऊन वाऱ्याबरोबर डोलू लागते व पिके कापणीस योग्य होतात तेव्हा दृश्य मोठे मनमोहक असते. व शेतकरी आपल्या शेतीकडे आशाळभूत नजरेने पाहू लागतो.

४५.अभिप्रेत आपत्ति होय,जी ईश्वराच्या आदेशान्वये येते.

४६. म्हणजे बघता बघता शेती अशा प्रकारे विध्वंसित झाली की जणू तिचे अस्तित्वच नव्हते. अशा प्रकारच्या दुर्घटना नेहमीच होत असतात. कदापी भयानक वादळामुळे विनाश येतो तर कधी महापुरामुळे तर कधी अन्य कारणांनी.

या उदाहरणाद्वारे हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की ज्या प्रकारे डोलणाऱ्या शेताचे रुप तात्पुरते असते, तद्‌वतच डोळ्यांना दिपविणाऱ्या या दुनियेचा जगमगाट देखील तात्पुरता आहे. व ज्या प्रमाणे अल्लाहचा आदेश येताच शेताचा नायनाट होतो त्याच प्रमाणे त्याचा आदेश आल्यावर एक दिवस या जगाचाही नायनाट होईल. अर्थात जेव्हा जगाचा हा शेवट होणार आहे, तेव्हा माणसाने भावी जगास (आखिरतला) ध्येय बनवून उचित मर्यादित जीवन व्यतित करावे यातच सुज्ञता आहे. यासाठी की तो सदैव राहणाऱ्या ईश देणग्यास पात्र ठरावा.

४७. पवित्र कुरआन जगाच्या या वास्तवतेस प्रस्तुत करण्यासोबतच त्यावर विचार चिंतन करण्याचे आवाहन करतो.म्हणजे या संदर्भात त्याचा अप्रोच (Approach) बौद्धिक (Rational) व युक्तिवादात्मक (Argumentative) आहे. एखाद्या श्रद्धेला बुद्धिशून्य रित्या मान्य करविण्याचा नव्हे. आणि ही ती भूलभूत बाब होय जी त्याला अन्य धर्माहून विशेष करते.

४८. अभिप्रेत जन्नत होय.याला शांती-गृह अशासाठी म्हटले गेले आहे की तेथे मनुष्य सर्व प्रकारच्या आपत्तिपासून व दुःख यातनांपासून सुरक्षित असेल तसेच तेथे आपसात ना एखादे भांडण होईल ना तंटा किंबहुना तेथील समाज शांती-प्रिय समाज असेल व तेथले वातावरण अगदी उच्च असेल.

४९. अर्थात जेथपावतो शांती गृहा (जन्नत) कडे बोलविण्याचा संबंध आहे हे आवाहन सर्वांकरीता आहे. परंतु त्या मार्गावर चालणे जो जन्नतकडे जातो केवळ अशाच लोकंना लाभतो ज्यांना अल्लाह त्याविषयांची सुबुद्धि प्रदान करतो.

लِلَّذِينَ أَحْسَنُوا الْحُسْنَىٰ وَزِيَادَةٌ ۖ وَلَا يَرْهَقُ وُجُوهَهُمْ قَتَرٌ وَلَا
ذِلَّةٌ ۚ أُولَٰئِكَ أَصْحَابُ الْجَنَّةِ ۖ هُمْ فِيهَا خَالِدُونَ ﴿٢٦﴾

२६. ज्या लोकांनी चांगले वर्तन अंगिकारले, त्यांच्याकरीता चांगला मोबदला आहे, आणि अधिक कृपा [५०] त्यांच्या चेहऱ्यांवर ना काळिमा पसरलेला असेल व ना अपमान. हेच जन्नत वाले होत. सदैव त्यात राहणारे.

وَالَّذِينَ كَسَبُوا السَّيِّئَاتِ جَزَاءُ سَيِّئَةٍ بِمِثْلِهَا وَتَرْهَقُهُمْ ذِلَّةٌ ۖ
مَا لَهُمْ مِنَ اللَّهِ مِنْ عَاصِمٍ ۖ كَأَنَّمَا أُغْشِيَتْ وُجُوهُهُمْ قِطَعًا
مِنَ اللَّيْلِ مُظْلِمًا ۚ أُولَٰئِكَ أَصْحَابُ النَّارِ ۖ هُمْ فِيهَا خَالِدُونَ ﴿٢٧﴾

२७. आणि ज्या लोकांनी वाईट कृत्ये कमविली तर वाईट कृत्यांचा मोबदला तसाच मिळेल जसे वाईट कृत्य त्यांनी केले असेल. त्यांच्यावर अपमान आच्छादित असेल. अल्लाहपासून वाचविणारा- त्यांना कोणीहि नसेल. त्यांच्या चेहऱ्यांवर अशा प्रकारे काळोख पसरलेला असेल जणू काळोख्या रात्रीच्या पडद्यांनी त्यांच्यावर आवरण घातले गेले असावे [५१] हे दोजख वाले (जहन्नमी) होत व त्यात सदैव राहणारे.

وَيَوْمَ نَحْشُرُهُمْ جَمِيعًا ثُمَّ نَقُولُ لِلَّذِينَ أَشْرَكُوا مَكَانَكُمْ
أَنْتُمْ وَشُرَكَاؤُكُمْ ۚ فَزَيَّلْنَا بَيْنَهُمْ ۖ وَقَالَ شُرَكَاؤُهُمْ
مَا كُنْتُمْ إِيَّانَا تَعْبُدُونَ ﴿٢٨﴾

२८. ज्या दिवशी आम्ही या सर्वांना एकत्रित करु. मग शिर्क करणाऱ्यांना सांगू-थांबा, तुम्ही व तुमचे ठरविलेले सहभागी. मग आम्ही यांच्या दरम्यान वियोग पाडू [५२] आणि त्यांचे सहभागी म्हणतील की तुम्ही आमची उपासना करीत नव्हते.

فَكَفَىٰ بِاللَّهِ شَهِيدًا بَيْنَنَا وَبَيْنَكُمْ إِنْ كُنَّا عَنْ عِبَادَتِكُمْ
لَغَافِلِينَ ﴿٢٩﴾

२९. अल्लाह, आमच्या व तुमच्या दरम्यान साक्षी करीता पुरेसा आहे की आम्ही तुमच्या उपासने पासून अगदी अनभिज्ञ होतो.[५३]

هُنَالِكَ تَبْلُو كُلُّ نَفْسٍ مَا أَسْلَفَتْ ۚ وَرُدُّوا إِلَى اللَّهِ مَوْلَاهُمُ
الْحَقِّ ۖ وَضَلَّ عَنْهُمْ مَا كَانُوا يَفْتَرُونَ ﴿٣٠﴾

३०. त्या वेळी प्रत्येक व्यक्तिला आपले कृतकर्म ठाऊक पडेल व सर्व जण आपल्या खऱ्याखुऱ्या स्वामी कडे परतविले जातील आणि जे असत्य यांनी रचले होते ते सर्व नाहीसे होईल.

قُلْ مَنْ يَرْزُقُكُمْ مِنَ السَّمَاءِ وَالْأَرْضِ أَمَّنْ يَمْلِكُ السَّمْعَ
وَالْأَبْصَارَ وَمَنْ يُخْرِجُ الْحَيَّ مِنَ الْمَيِّتِ وَيُخْرِجُ الْمَيِّتَ مِنَ
الْحَيِّ وَمَنْ يُدَبِّرُ الْأَمْرَ ۚ فَسَيَقُولُونَ اللَّهُ ۚ فَقُلْ أَفَلَا تَتَّقُونَ ﴿٣١﴾

३१. यांना विचारा कोण आहे जो आकाश व जमीनीतून तुम्हाला उपजिविका देतो? किंवा कोण आहे ज्याच्या ताब्यात ऐकण्याची व पाहण्याची सामर्थ्ये आहेत? आणि कोण आहे जो जिवितास मेलेल्या मधून व मेलेल्यास जिवितांमधून काढतो?[५५] कोण आहे जो सृष्टीची व्यवस्था करीत आहे? ते म्हणतील, अल्लाह. मग सांगा, तुम्ही भय का बाळगत नाही?[५६]

५०. म्हणजे त्यांना त्यांच्या सत्कृत्यांचा चांगला मोबदला तर मिळेलच त्या व्यतिरिक्त सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना आपल्या कृपेने अधिक उपकृत करील.कुरआनात दुसऱ्या ठिकाणी फर्माविले गेले आहे.

لِيُوَفِّيَهُمْ أُجُورَهُمْ وَيَزِيدَهُم مِّن فَضْلِهِ

(سوره فاطر: ٣٠)

''अशासाठी की त्यांच्या मोबदला त्यांना पुरेपुर द्यावा व आपल्या कृपेने अधिक उपकृत करावे.'' (फातिर-३०)

५१. चेहरा माणसाच्या आचरणाचा पारदर्शक असतो.सत्कर्माच्या प्रभावाने चेहऱ्यावर रोनक येते, परंतु दुष्कर्म चेहऱ्यास निस्तेज बनविते यास्तव गुन्हेगार व अपराध्यांच्या चेहऱ्यांवर काळीमाची लक्षणे दिसून येतात.ईहलोकात तर चांगल्या-वाईटाच्या प्रभावाची एक झळक मात्र चेहऱ्यावर पाहीली जाऊ शकते परंतु कियामतीच्या दिवशी चेहरा माणसाच्या अंतरंगास व त्याच्या आचरणास उघड करणारा असेल.

५२. शिर्क करणारे आपल्या दैवतांना आपले समर्थक,सहाय्यक व ईश्वरासमोर आपली शिफारस करणारे समजत राहीलेत. परंतु हश्रच्या मैदानात ते आपल्या भक्तांपासून उद्विग्नता जाहीर करतील. तसेच श्रद्धेचे ते नाते जे त्यांनी आपल्या दैवतांशी जोडले होते,अगदी तुटून जाईल व आपण अगदी एकाकी व निराधार,असहाय्य असल्याचे त्यांना दिसून येईल.

५३.या उत्तराने असे दिसून येते की येथे सहभागीशी अभिप्रेत त्या व्यक्ति होत ज्यांच्या श्रद्धेंत अतिशयोक्ति करुन त्यांना ईशत्त्वात सहभागी ठरविले गेले होते त्यांनी ईहलोकाचा निरोप घेतला होता परंतु त्यांच्याविषयी नितांत श्रद्धा बाळगणारे त्यांना अशा प्रकारे पुकारीत की जणू ते यांची पुकार ऐकतात व यांना मदत करतात. या कल्पनेनुसार ते त्यांची भक्ति करीत त्यांना नवस घालीत व त्यांच्या नावाने भेट चढावे चढवित.

परंतु हश्रच्या मैदानात ते आपल्या भक्तांच्या मेळाव्यात या समस्त गोष्टींपासून आपण अनभिज्ञ असल्याचे जाहीर करतील. जो या गोष्टीचा पुरावा असेल की पुकारणारे यांना जी आर्जवे करीत ती ते ऐकत नव्हते. ईशत्त्वात त्यांचा कसलाहि हस्तक्षेप नव्हता व त्यांच्यापावेतो ना ती भक्ति पोहचत होती जी त्यांचे भक्त करीत असत आणि ना ते नवस, नजराणे जे त्यांचे श्रद्धाळू त्यांच्यासमोर सादर करीत. अर्थात ते या समस्त गोष्टींपासून अगदी अनभिज्ञ होते.

काही भाष्यकारांनी येथे सहभागी (तथाकथित ईश) शी अभिप्रेत मूर्तिना घेतले आहे तथापि हे स्पष्टीकरण योग वाटत नाही.

**प्रथमत:** कियामतीच्या दिवशी 'सहभागी'चे हे निवेदन की 'अल्लाह साक्षी आहे की आम्ही तुमच्या उपासने पासून अनंभिज्ञ राहीलोत' व्यक्तिंचेच असू शकते, बोलू न शकणाऱ्या मूर्तीचे नव्हे.

**द्वितीयत:** मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांबाबत हे समजणे योग्य नव्हे की ते केवळ मूर्ति पूजक होते किंबहुना ते फिरिश्ते, जिन्न व होऊन गेलेल्या व्यक्तिचीहि भक्ति करीत. उदाहरणार्थ 'इसयाफ' एक पुरुषाची मूर्ति होती तर 'नाअिला' स्त्री ची मूर्ति.

**तृतीयत:** पुढे आयत क्र.३५ मध्ये जे फर्माविले गेले आहे की ते मार्गदर्शन करु शकत नाही तर स्वत:च मार्गदर्शनाचे गरजवंत आहेत तेव्हा हे या गोष्टीचे प्रमाण होय की येथे अभिप्रेत व्यक्ति' होत कारण मार्गदर्शनाची गरज व्यक्तिनाच असते, अबोल मूर्त्यांना नव्हे.

**चतुर्थत:** कुरआन प्रत्येक प्रकारच्या शिर्कचे खंडन करतो. व प्रसंगानुरोधाने काही ठिकाणी मूर्तिपूजेवर आघात घालतो तर काही ठिकाणी फिरिश्त्यांच्या भक्तिवर, काही ठिकाणी जिन्न-पूजेवर अंकूश ठेवतो तर काही ठिकाणी व्यक्ति पूजेवर. तेव्हा प्रत्येक ठिकाणी मूर्ति पूजेलाच अभिप्रेत घेण्याचे, व शिर्कला मूर्तिपूजेपर्यंत मर्यादित समजण्याचे काही कारण नाही.

आयतीचा हा विस्तृत अर्थ लक्षात घेता मुसलमानाच्या अडाणी समुदायाची 'बुजुर्ग परस्ती' (विभूति-पूजा) देखील अशाच प्रकारच्या 'शिर्क' ठरते. ज्या प्रकारे मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांची व्यक्ति-पूजा शिर्क होती.

५४. अर्थात सर्वांना अल्लाह समोर हजर केले जाईल जो एकटा या सर्वांचा स्वामी आहे.

५५. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह अनआम टीप क्र.१७७.

५६. म्हणजे जेव्हा उपजिविका देणारा अल्लाहच आहे, श्रवण आणि दृष्टीची सामर्थ्ये देखील अल्लाहनेच प्रदान केली आहेत व जीवन-मृत्युचा चमत्कार दाखविणेहि त्याचेच काम आहे आणि सृष्टी व्यवस्थेचा कर्ता देखील तोच आहे आणि मक्केचे अनेकेश्वरावादी या गोष्टीस मानणारे होते तेव्हा त्याच्याशिवाय एखाद्यास उपास्य मानणयकरिता आधार कोणता? आणि त्याच्या उपासनेत इतरांना सहभागी करतांना तुम्ही भय बाळगत नाही की तो तुम्हाला याबाबत सक्त शिक्षा देईल.

३२. तेव्हा हाच अल्लाह तुमच्या खराखुरा स्वामी आहे [५७] मग सत्या नंतर मार्गभ्रष्टते खेरीज दुसरे काय बाकी राहते ?[५८] आणि कशा प्रकारे तुम्हाला सत्या पासून पराङ्मुख केले जात आहे.[५९]

فَذٰلِكُمُ اللّٰهُ رَبُّكُمُ الْحَقُّ ۚ فَمَاذَا بَعْدَ الْحَقِّ اِلَّا الضَّلٰلُ ۚ فَاَنّٰى تُصْرَفُوْنَ ﴿٣٢﴾

३३. अशा प्रकारे तुमच्या पालनकर्त्याची गोष्ट अवज्ञा करणाऱ्यांवर खरी ठरली की ते ईमान बाळगणारे नाहीत.[६०]

كَذٰلِكَ حَقَّتْ كَلِمَتُ رَبِّكَ عَلَى الَّذِيْنَ فَسَقُوْٓا اَنَّهُمْ لَا يُؤْمِنُوْنَ ﴿٣٣﴾

३४. यांना विचारा तुम्ही ठरविलेल्या सहभाग्यांपैकी असा कोण आहे जो पहिल्यांदा निर्माण करीत असावा व मग त्याने त्याची पुनरावृत्ति करावी?[६१] सांगा,तो अल्लाहच होय जो पहिल्यांदा निर्माण करतो आणि मग त्याची पुनरावृत्ति करील. मग तुम्हाला कोठे भटकविले जात आहे?

قُلْ هَلْ مِنْ شُرَكَآئِكُمْ مَّنْ يَّبْدَؤُا الْخَلْقَ ثُمَّ يُعِيْدُهٗ ۗ قُلِ اللّٰهُ يَبْدَؤُا الْخَلْقَ ثُمَّ يُعِيْدُهٗ فَاَنّٰى تُؤْفَكُوْنَ ﴿٣٤﴾

३५. यांना विचारा, तुम्ही ठरविलेल्या सहभाग्यांपैकी असा कोण आहे जो सत्याकडे मार्गदर्शन करीत असावा? सांगा तो अल्लाहच होय जो सत्याकडे मार्गदर्शन करतो.[६२] मग जो सत्याकडे मार्गदर्शन करीत आहे तो या गोष्टीस पात्र आहे की त्याचे अनुसरण केले जावे अथवा तो ज्याला मार्ग लाभत नाही, जोपर्यंत त्याला मार्गदर्शन न केले जावे [६३] तुम्हाला काय झाले आहे? तुम्ही कशा प्रकारचे निर्णय घेता?

قُلْ هَلْ مِنْ شُرَكَآئِكُمْ مَّنْ يَّهْدِيْٓ اِلَى الْحَقِّ ۗ قُلِ اللّٰهُ يَهْدِيْ لِلْحَقِّ ۗ اَفَمَنْ يَّهْدِيْٓ اِلَى الْحَقِّ اَحَقُّ اَنْ يُّتَّبَعَ اَمَّنْ لَّا يَهِدِّيْٓ اِلَّآ اَنْ يُّهْدٰى ۚ فَمَا لَكُمْ ۟ كَيْفَ تَحْكُمُوْنَ ﴿٣٥﴾

३६. या लोकांमध्ये असे आहेत जे केवळ अनुमाना मागे चालत आहेत [६४] आणि अनुमान सत्यापुढे किंचितहिं उपयोगी पडू शकत नाही [६५] हे जे काही करीत आहेत अल्लाह ते चांगल्या प्रकारे जाणतो.

وَمَا يَتَّبِعُ اَكْثَرُهُمْ اِلَّا ظَنًّا ۗ اِنَّ الظَّنَّ لَا يُغْنِيْ مِنَ الْحَقِّ شَيْـًٔا ۗ اِنَّ اللّٰهَ عَلِيْمٌۢ بِمَا يَفْعَلُوْنَ ﴿٣٦﴾

३७. आणि हे कुरआन अशी गोष्ट नव्हे की जिला अल्लाह खेरीज इतराने रचून आणावे [६६] किंबहुना हे त्या (शिकवणी)स खरे ठरविते,जी आधीपासून अस्तित्वात आहे [६७] आणि तफसील आहे ईश-ग्रंथाचा [६८]निःसंशय हे सर्व विश्वांच्या स्वामी कडून आहे.

وَمَا كَانَ هٰذَا الْقُرْاٰنُ اَنْ يُّفْتَرٰى مِنْ دُوْنِ اللّٰهِ وَلٰكِنْ تَصْدِيْقَ الَّذِيْ بَيْنَ يَدَيْهِ وَتَفْصِيْلَ الْكِتٰبِ لَا رَيْبَ فِيْهِ مِنْ رَّبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿٣٧﴾

५७. अर्थात जेव्हा अल्लाहच तूमचे पालन-पोषण करीत आहे व समस्त ईश-व्यवस्था त्यानेच कायम केलेली आहे तेव्हा अन्य एखाद्यास आपला भाग्य-विधाता समजणे व त्यास आर्जव करणे कितपत योग्य ठरु शकते?

५८. म्हणजे एक अल्लाहला रब्ब (स्वामी) मानणेच सत्य होय. बाकी सर्व मार्ग भ्रष्टतेच्या गोष्टी आहेत.

५९. अर्थात तुम्हाला या गोष्टीची शुद्धी तरी आहे की स्पष्ट सत्यापासून तुम्हाला कोण परावृत्त करीत आहे व कोणत्या दिशेने नेत आहे-लक्षात ठेवा तो सैतान होय जो तुमचे वेसण धरुन तुम्हाला चुकीच्या मार्गाला लावत आहे आणि तुम्ही मात्र डोळे मिटून त्याच्या मागे चालत आहात.

६०. अल्लाहची गोष्ट सिद्ध होण्याशी अभिप्रेत अल्लाहच्या त्या कायद्याच्या (ईश-नियमाच्या) तावडीत सापडणे जो त्याने मार्गभ्रष्टतेबद्दल बनविला आहे व ज्यानुसार त्या लोकांना ईमान, धन लाभत नाही जे आपल्या पालन कर्त्यांच्या आज्ञा-पालनास आपल्या स्वातंत्र्यात अडसर समजतात व असे इच्छितात की जनावरांप्रमाणे निर्बंध जीवन व्यतीत करावे.

६१. हे आणखी एक बौद्धिक प्रमाण होय. ज्यावरुन हे सिद्ध होते की अनेकेश्वर वाद्यांची दैवते अगदी अवास्तव आहेत. ते हे मान्य करतात की त्यांना अभावातून अस्तित्वात आणण्यात त्यांच्या उपास्यांचा कसलाही हस्तक्षेप नाही. तद्वतच त्यांची उपास्ये या गोष्टीसहि समर्थ नाहीत की त्यांना मृत्युनंतर दुसऱ्यांदा जीवन प्रदान करावे. मग यांच्यात ईश्वरी-गुणधर्म कोठून आला व ते उपासनीय व स्वामी कसे ठरले.

स्पष्ट असावे की अरब चे अनेकेश्वरवादी या गोष्टीस मानणारे होते की त्यांच्या व सृष्टीचा निर्माण-कर्ता केवळ अल्लाह आहे आणि जर जगाच्या एखाद्या अनेकेश्वरवादी धर्मात ही कल्पना आढळून येत असेल की एक ईश्वरा खेरीज अन्य एखाद्याने मनुष्याला व एखाद्या वस्तुला निर्माण केले तर ही कल्पना कसल्याही बौद्धिक व ज्ञानविषयक प्रमाणावर आधारीत नसल्यामुळे अगदी रद्द बातल आहे.

६२. सत्याशी अभिप्रेत सार्वभौम सत्य होय म्हणजे ती पायाभूत वस्तुस्थिती जी मनुष्य-जीवनात व या सृष्टीच्या पाठीवर आहे, व जिला जाणून घेतल्या खेरीज मनुष्य स्वत:ला योग्य मार्गाला लावू शकत नाही. ही वस्तुस्थिती अर्थात केवळ अल्लाहच जाणतो यास्तव तोच मनुष्याचे याथायोग्य मार्गदर्शन करु शकतो व या मार्गदर्शनाकरिता त्याने वही (ईश-संदेशा) ची व्यवस्था केली, जी आज कुरआनाच्या स्वरुपात अस्तित्वात आहे. याउलट अनेकेश्वरवाद्यांच्या उपास्यामध्ये असा कोणी नाही जो सत्य-मार्गदर्शनाचे काम करीत असेल कारण हे कोणाच्याहि अवाक्यात नाही तेव्हा यांना ईश्वर बनविण्याचा अर्थ काय?

६३. संकेत आहे त्या भुतकालीन विभूतिकडे ज्यांना अनेकेश्वराद्यांनी उपास्य बनविले होते. ह्या विभूति मनुष्य असल्याच्या नात्याने स्वत:च मार्गदर्शनार्थ गरजवंत होत्या. अशा स्थितीत त्या ईश्वरा-समान कशा ठरु शकतात जो सर्वांचा खराखुरा मार्गदर्शक आहे?

६४. म्हणजे ही अनेकेश्वरवाद्यांची केवळ भ्रम-पूजा आहे, ज्या आधारे त्यांनी आपल्या धर्माला गाथा (Mythology) बनविले होते.

६५. माणसाने आता पावेतो जेवढे धर्म निर्माण केले, त्या सर्वांचा आधार भ्रम, संशय व अटकळीच्या गोष्टींवरच आहे.याच कारणास्तव त्यांच्यात मूलभूत गोष्टींबाबत विरोध दिसून येतो. तथापि इस्लाम असा एकमेव धर्म आहे ज्याचा पाया सत्य-ज्ञानावर आहे व ही गोष्ट या धर्मास अन्य समस्त धर्मांपासून विशेष करते. उघड आहे की धर्म-संदर्भात अटकळ गोष्टी निरर्थक मात्र होत, त्या सत्य- ज्ञानाची जागा घेऊच शकत नाही. ही इन्कार न करण्यायोग्य वस्तुस्थिती असतांनाहि आज देखील जगातील बहुसंख्य लोक धर्म-संदर्भात अटकळ (अनुमाना)च्या गोष्टीमागे धावत आहेत.

६६. ईश-वाणी व मनुष्य वाणी यात फार मोठा फरक आहे. हा असाच वास्तविक फरक होय जो ईश-निर्मिती व मनुष्य-निर्मिती मध्ये आढळून येतो व ज्या प्रकारे मनुष्य ईश-निर्मिती प्रमाणे कोणतीही वस्तू निर्माण करु शकत नाही, तद्वतच त्याच्या वाणी सारखी अन्य वाणी रचू शकत नाही. हे वैशिष्ट्य ईश्वराच्या मूळ वाणीचे होय जी अरबी भाषेत आहे. राहीला अनुवाद तर तो केवळ भावार्थ व्यक्त करणारा आहे व तोहि मनुष्य-सामर्थ्याप्रत, म्हणून कुरआनाच्या भाषांतरांवरुन ईश-ग्रंथाच्या या वैशिष्ट्यांची कल्पना केवळ अंदाजानेच होऊ शकते.

६७. म्हणजे कुरआन एखादा नवीन धर्म घेऊन आलेला नाही तर तोच धर्म व तीच शिकवण घेऊन आला आहे जी आधीपासून आलेल्या ईश ग्रंथात (तौरात व इंजील मध्ये) संक्षिप्तरित्या विद्यमान आहे. दोघांचा तुलनात्मक अभ्यास (Comparative Study)असे दर्शविल की कुरआनाचा स्त्रोत देखील तेथूनच निघत आहे जेथून तौरात व इंजीलचा स्त्रोत निघाला होता.

६८. ईश-ग्रंथाशी अभिप्रेत ते समस्त आसमानी-ग्रंथ होत चे कुरआनापूर्वी अवतरले होते. कुरआनाने केवळ या ग्रंथांच्या शिकवणींचा आपल्यात समावेश करुन घेतला नाही तर पूर्ण स्पष्टीकरणासह त्यांना सादर केले आहे. तात्पर्य कुरआन एकाच मार्गदर्शन क्रमाची परीपूर्णता होय, आणि हे या गोष्टीचे प्रमाण आहे की कुरआन माणसाने लिहीलेले नाही.

३८. काय ते असे सांगातात की या (ग्रंथा) स या व्यक्तिने रचले आहे? सांगा जर तुम्ही सच्चे असाल तर या सारखी एक सूरतच रचून आणा,आणि अल्लाहला सोडून ज्यांना तुम्ही बोलवू शकाल, बोलवा.[६९]

أم يقولون افتراه قل فأتوا بسورة مثله وادعوا من استطعتم من دون الله إن كنتم صادقين ﴿٣٨﴾

३९. वस्तुस्थिती अशी की ज्या गोष्टीला आपल्या ज्ञान-कक्षेत हे लोक आणू शकले नाहीत व जिची खरी वास्तविकता अद्याप उघड झाली नाही, तिला यांनी खोटे ठरविले [७०]यांच्या पूर्वी जे लोक होऊन गेलेत त्यांनीहि अशाच प्रकारचे खोटे ठरविले होते. तर पहा, अत्याचारी लोकांची काय परिणिती झाली.

بل كذبوا بما لم يحيطوا بعلمه ولما يأتهم تأويله كذلك كذب الذين من قبلهم فانظر كيف كان عاقبة الظالمين ﴿٣٩﴾

४०. यांच्यात असेहित आहेत जे यावर ईमान बाळगतात आणि असे देखील आहेत जे ईमान बाळगत नाहीत आणि तुमच्या रब्ब (स्वामी, पालनकर्ता) उपद्रव माजविणाऱ्यांना चांगल्या प्रकारे जाणतो.

ومنهم من يؤمن به ومنهم من لا يؤمن به وربك أعلم بالمفسدين ﴿٤٠﴾

४१. जर तुम्हाला हे खोटे ठरवितात तर सांगा, माझे आचरण माझ्या करीता आहे व तुमचे आचरण तुमच्या करीता. मी जे काही करतो त्याची जबाबदारी तुमच्यावर नव्हे आणि तुम्ही जे काही करता, त्याची जबाबदारी मजवर नव्हे.

وإن كذبوك فقل لي عملي ولكم عملكم أنتم بريئون مما أعمل وأنا بريء مما تعملون ﴿٤١﴾

४२. यांच्यात असे देखील आहेत जे तुमच्याकडे कान लावतात. मग काय तुम्ही बहिऱ्यांना ऐकवाल, ते काहीहि समजत नसले तरी?[७१]

ومنهم من يستمعون إليك أفأنت تسمع الصم ولو كانوا لا يعقلون ﴿٤٢﴾

४३. आणि यांच्यात ते लोक देखील आहेत जे तुमच्याकडे पाहतात,पण काय तुम्ही आंधळ्यांना मार्ग दाखवाल, त्यांना काहिहि दिसत नसेल तरी?[७२]

ومنهم من ينظر إليك أفأنت تهدي العمي ولو كانوا لا يبصرون ﴿٤٣﴾

४४. वस्तुतः अल्लाह लोकांवर किंचितहि जुलुम करीत नाही, किंबहुना लोक स्वतःच आपल्यावर जुलुम करतात. [७३]

إن الله لا يظلم الناس شيئا ولكن الناس أنفسهم يظلمون ﴿٤٤﴾

६९. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र.३० मध्ये केले गेले आहे.

७०. अर्थात ते 'वही' (ईश-आदेशांच्या अवतरणा)चा इन्कार अशासाठी करीत आहेत की हे माध्यम गुप्त असल्यामुळे बौद्धिक दृष्ट्या त्याचे आकलन त्यांना होऊ शकले नाही. आणि याचे दुसरे करण असे की 'ईश- आदेश' ज्या घटना उदयास येण्याची खबर देत आहे, विशेषत:कियामत घडून येण्याविषयीची खबर, जी अद्याप उदयास आली नाही. तथापि ईश-आदेशाचे आमच्या बुद्धिला आकलन न होण्याचा असा अर्थ नव्हे की तो अवास्तव आहे व असे समजून त्याचा इन्कार करावा, जेव्हा त्याच्या पाठीशी मजबूत व इन्कार न करण्याजोगो प्रमाण असावेत. एवढेच नव्हे तर अवतरीत झालेल्या ईश-आदेशाचा मजकूर खुद्द या गोष्टीची साक्ष देत आहे की ही एखाद्या मनुष्याची वाणी असू शकत नाही. तद्‌वतच हा ईश-आदेश भावी काळात उदभवणाऱ्या ज्या घटनांची खबर देत आहे, त्यांचे घडून येणे ही बुद्धि व स्वभाव आणि न्यायाची निकड आहे.

एक अल्पवयीन बालक अशा गोष्टीची कल्पना करु शकत नाही ज्यांची कल्पना एखादा प्रौढ मनुष्य करतो. तसेच सर्व सामान्य माणसाच्या आकलनात या गोष्टी येत नाहीत ज्या शास्त्रज्ञाच्या, खगोल शास्त्राच्या व एखाद्या विचारवंताच्या आकलनात योतात मग काय केवळ याच कारणास्तव मी अमुक एक गोष्टीचे बौद्धिक दृष्ट्या आकलन होऊ शकत नाही म्हणून ती इन्कार करण्या योग्य समजावी?जर याचे उत्तर नकारार्थी आहेत तर प्रेषितांना ईश-आदेश अवतरणाचा जो अनुभव होत राहीला व यामुळे त्यांनी गुप्त हकीगतीच्या ज्या ज्या वार्ता दिल्या आहेत, त्यांना केवळ या कारणास्तव रद्द बातिल ठरविणे की त्या सर्व सामान्य माणसांच्या आकलनात येत नाहीत, कितपत योग्य ठरेल?

या गुप्त हकीगतीच्या खबरी देणारे प्रेषित निती व चारित्र्याच्या दृष्टीने एवढे महान होते की त्यांच्या महानतेची उच्चता आभाळाला भिडली होती व ज्या गुप्त हकीगतीचे त्यांनी निवेदन केले आहे, त्यांचे सत्य-समर्थन अशा अगणित निशाण्यांद्वारे होते ज्या आसमांनात आढळून येतात.

७१. म्हणजे ते पैगबराच्या म्हणण्याकडे कान देऊन ऐकतात तथापि सत्य-स्वीकृतिच्या उद्देशाने नव्हे किंबहुना आक्षेप घेण्यासारखा एखादा मुद्दा लाभावा या हेतुने ऐकतात.

७२. म्हणजे ते पैगंबराना अंतर्दृष्टीने पाहत नाही. आणि

**''जो शै की हकीकत को न देखे वो नजर क्या''**

(जी एखाद्या गोष्टीची वास्तविकता पाहू शकत नाही, ती दृष्टी कसली?)

जर त्यांनी अंतर्दृष्टीने पाहिले असते तर खचितच त्यांचा विश्वास बसला असता की हे खरोखर अल्लाहचे पैगंबर आहेत.

७३. अर्थात आकलन व अंतर्दृष्टीची ही वंचितता त्यांना आपल्या अत्याचारमय आचरणापायी लाभली आहे, अन्यथा अल्लाहने आकलनाचे व दृष्टीचे सामर्थ्य एवढ्या साठीच प्रदान केले होते की त्यांनी सूज्ञतेने काम घ्यावे.

४५. आणि ज्या दिवशी तो त्यांना एकत्रित करील, तेव्हा त्यांना असे वाटेल की जणू ते (इह लोकात) घटकाभर राहीले होते, एकमेकांच्या ओळखीपायी. [७४] (त्यावेळी त्यांना माहित होईल की) तोट्यात राहीले ते लोक ज्यांनी अल्लाहच्या भेटीस खोटे ठरविले व मार्गदर्शन अंगिकारले नाही.

وَيَوْمَ يَحْشُرُهُمْ كَأَنْ لَمْ يَلْبَثُوا إِلَّا سَاعَةً
مِنَ النَّهَارِ يَتَعَارَفُونَ بَيْنَهُمْ قَدْ خَسِرَ الَّذِينَ كَذَّبُوا
بِلِقَاءِ اللَّهِ وَمَا كَانُوا مُهْتَدِينَ ﴿٤٥﴾

४६. आणि आम्ही ज्या गोष्टीचा यांच्याशी वायदा केला आहे तिचा काही हिस्सा आम्ही यांना दाखववावा किंवा (या आधी) तुमचा अवधि पूर्ण करावा, [७५] कोणत्याहि परिस्थितीत यांना आमच्याचकडे परतावयाचे आहे आणि जे काही हे करीत आहेत त्यावर अल्लाह साक्षी आहे.

وَإِمَّا نُرِيَنَّكَ بَعْضَ الَّذِي نَعِدُهُمْ أَوْ نَتَوَفَّيَنَّكَ فَإِلَيْنَا
مَرْجِعُهُمْ ثُمَّ اللَّهُ شَهِيدٌ عَلَىٰ مَا يَفْعَلُونَ ﴿٤٦﴾

४७. प्रत्येक जन-समुदायासाठी एक रसूल (प्रेषित) आहे. [७६] मग जेव्हा रसूल त्या जन-समुदायाप्रत येतो तेव्हा त्यांच्या दरम्यान न्यायपूर्ण निवाडा केला जातो आणि त्यांच्यावर कदापि अत्याचार केला जात नाही. [७७]

وَلِكُلِّ أُمَّةٍ رَسُولٌ فَإِذَا جَاءَ رَسُولُهُمْ قُضِيَ بَيْنَهُمْ
بِالْقِسْطِ وَهُمْ لَا يُظْلَمُونَ ﴿٤٧﴾

४८. ते म्हणतात, जर तुम्ही सच्चे आहात तर (सांगा) हा वायदा-केव्हा पूर्ण होईल?[७८]

وَيَقُولُونَ مَتَىٰ هَٰذَا الْوَعْدُ إِنْ كُنْتُمْ صَادِقِينَ ﴿٤٨﴾

४९. सांगा, मी तर आपल्या स्वत: करीताहि लाभ-हानी चे सामर्थ्य बाळगत नाही. घडते तेच जे अल्लाह इच्छितो. [७९] प्रत्येक जन-समूहाकरीता एक निर्धारीत समय आहे आणि जेव्हा त्यांची वेळ येते तेव्हा ना एक क्षण मागे राहू शकतात, ना एक क्षण पुढे.[८०]

قُلْ لَا أَمْلِكُ لِنَفْسِي ضَرًّا وَلَا نَفْعًا إِلَّا مَا شَاءَ اللَّهُ لِكُلِّ أُمَّةٍ
أَجَلٌ إِذَا جَاءَ أَجَلُهُمْ فَلَا يَسْتَأْخِرُونَ سَاعَةً
وَلَا يَسْتَقْدِمُونَ ﴿٤٩﴾

५०. सांगा तुम्ही याचाहि विचार केला की जर त्याची शिक्षा आपत्ति (अकस्मात) रात्री किंवा दिवसा येऊन ठेपली तर बचावाचा कोणता मार्ग आहे ज्याच्या आधारे अपराधी घाई करीत आहेत. [८१]

قُلْ أَرَأَيْتُمْ إِنْ أَتَاكُمْ عَذَابُهُ بَيَاتًا أَوْ نَهَارًا مَاذَا يَسْتَعْجِلُ
مِنْهُ الْمُجْرِمُونَ ﴿٥٠﴾

७४. म्हणजे या वेळी तर त्यांना इहलोकीय-जीवन दीर्घ कालीन वाटते परन्तु कियामतीच्या दिवशी जेव्हा आखिरतच्या जीवनाला आरंभ होईल, तेव्हा त्यांना वाटेल की,या जीवनाच्या तुलनेने इहलोकीय-जीवन घटीका-भर मात्र होते आणि लोकांशी जे सामाजिक संबंध राहीलेत ते अधिक काळासाठी नव्हे, किंबहुना केवळ परिचयाच्या मर्यादेप्रत होते. जणू एकमेकांशी नुकतीच ओळख झाली होती की मृत्युच्या फिरिश्त्याने येऊन गाठले!

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नाज़िआत,टीप ३२)

७५. म्हणजे सत्याचा इन्कार करणाऱ्यांशी शिक्षेचा जो वायदा केला गेला आहे त्याला निश्चितच त्यांना तोंड द्यावायाचे आहे. राहिले त्याचे उदयास येणे तर संभवत:शिक्षेचा काही भाग पैगंबरांच्या जीवन-काळातच काफिरांवर अवतरीत व्हावा आणि जर याबाबत अल्लाहच्या हिकमतीची काही निकड असेल तर पैगंबरांचे जीवन समाप्त झाल्यानंतर अवतरीत होईल. अर्थात अखिरत मध्ये तर त्यांना पूरेपूर शिक्षा भोगणे क्रमप्राप्तच आहे.

या आयतीद्वारे ही गोष्टहि स्पष्ट झाली की, सुरवातीला पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सूपूर्द जे काम केले गेले होते ते आवाहनाचे काम होते आणि हे कोणते आवाहन होते याबद्दल स्पष्टीकरणासह या सूरह मध्ये प्रस्तुत केले गेले आहे. यात ना या गोष्टीचा उल्लेख आहे की पैगंबर इस्लामची सामूहीक व्यवस्था कायम करण्यासाठी नियुक्त होते व ना मूळ आवाहन सोबत धर्मप्राबल्ल्याच्या पैलूस प्रकट केले आहे, किंबहुना असे फर्माविले गेले आहे की, संभवत:काफिरांच्या दुष्परिणिती आधीच सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबराना इहलोकातून उठवील. तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह ने कमीत कमी सूरह युनूसच्या अवतरणा पर्यंत आपली ही योजना की या प्रेषिताद्वारे 'इस्लाम'ला समस्त धर्मांवर प्रभावशाली करील.जसे सूरह सफ आयत क्र.९ आणि सूरह तौबा आयत क्र.३३ मध्ये फर्माविले गेले आहे. स्वत: पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर देखील उघडपणे प्रकट केले गेले नव्हते किंबहुना हिजरत (देशत्याग) नंतर जेव्हा इस्लाम व कुफ्र चा संघर्ष जिहाद-अवस्थेत दाखल झाला तेव्हा हि घोषणा केली गेली की रसूल ला सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशासाठी पाठविले आहे की सत्य धर्माला समस्त असत्य-धर्मांवर प्रभावी करावे.

तात्पर्य धर्माकरीता वर्चस्व व सत्ताधिकार-अपेक्षित आहे खरे, पण याचा संबंध जिहाद अवस्थेशी आहे किंवा त्या स्थितीशी जेव्हा इस्लामच्या व्यवस्थेस अगदी कायम व लागू केले जात असावे. राहीली आवाहनाची स्थिति तर यात खरे बळ आवाहनाच्या मूलभूत गोष्टींवर असले पाहिजे, वर्चस्व आणि सत्ताधिकार प्राप्त करण्यावर नव्हे. अन्यथा योग्य अशा धार्मिक विचाराची उभारणी होऊ शकणार नाही. आणि ना धर्म-वर्चस्वा करीता मार्ग निर्माण होऊ शकेल.

७६. अर्थात यापूर्वी जे जन-समुदाय होऊन गेले, त्यापैकी असा कोणताहि जन-समुदाय नाही ज्यात सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपला प्रेषित पाठविला नसेल. सूरह फातिर मध्ये फर्माविले आहे:

وَاِنْ مِّنْ اُمَّةٍ اِلَّا خَلَا فِيْهَا نَذِيْرٌ۔ (سوره فاطر:۲۴)

"असा कोणताहि जन-समुदाय नाही ज्यात सावध करणारा आला नसावा."(फातिर-२४)

आवाहनाचा क्रम हजरत नूह यांच्या काळापासून सतत चालू राहीला. येथपावेतो की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अंतिम प्रेषिताच्या रुपाने सर्व जगातील सर्व जन-समुदायांकडे पाठविले गेले.

७७. म्हणजे जेव्हा जेव्हा एखाद्या जन-समुदायाकडे एखाद्या प्रेषितास पाठविले गेले त्या जन-समुदायाच्या भाग्याचा निर्णय इहलोकातच लावला गेला. आणि प्रेषिताने आणलेल्या मार्गदर्शनास लोकांनी रद्द केले व त्यांच्यावर अल्लाहच्या शिक्षेचा डोंगर कोसळला नाही असे मात्र कधीहि झाले नाही तथापि एखाद्या जनसमुदायास सर्वश्रेष्ठ अल्लाहने दिर्घ काळ पर्यंत ढील देत राहावे ही गोष्ट निराळी ।

७८. अभिप्रेत शिक्षेचा वायदा होय.

७९. म्हणजे मी तुम्हाला असे केव्हा सांगितले की मी तुमच्यावर शिक्षाप्रकोप आणनि, किंबहुना असे सांगितले की जर तुम्ही अवज्ञा कराल तर संभवत:!एक ना एक दिवस अल्लाहचा प्रकोप तुम्हावर निश्चित येईल. अर्थात तो दिवस निर्धारीत करणे माझे काम नव्हे किंबहुना हे अल्लाहच्या नियमावर अवलंबू आहे.

या आयतीत ही गोष्ट जी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शुभमुखातून वदवली गेली आहे की, 'मी आपल्या स्वत:साठी लाभ-हानीचे कसलेही सामर्थ्य बाळगत नाही'तर या द्वारे बिदअत (धर्मबाह्य श्रद्धा) बाळगणाऱ्यांच्या या विचाराचे खंडन होते की पैगंबर अपरोक्षरित्या एखाद्यास लाभ-हानी पोहचवू शकतात आणि जेव्हा स्वत:पैगंबर या मामल्यात असमर्थ आहेत तर अवलीया त्यांच्याहून जास्त असमर्थ होत.

८०. येथे अभिप्रेत ते जन- समूह होत ज्यांच्याकडे प्रत्यक्षत:- प्रेषित पाठविले गेले. यांच्यापैकी प्रत्येक जन-समूहास सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रेषितांनी आणलेल्या ईश-संदेशास समजून घेण्याचा व सुधारणा करुन घेण्याचा अवसर दिला, परंतु जेव्हा जन-समूहाने खोटे ठरविले व अवज्ञा अंगिकारली तेव्हा त्याचा कार्य-अवधि-संपताच सर्वश्रेष्ठ अल्लाहने ईहलोकातच त्यांचा फैसला केला.

८१. म्हणजे काय शिक्षेपासून आपला बचाव करण्याचा एखादा मार्ग यांनी शोधून काढला आहे ज्याच्या आधारे ते एवढी घाई करीत आहेत.

५१. काय जेव्हा तसे घडून येईल त्याच वेळी तुम्ही मानाल ? आता मान्य करता [८२] आणि यापूर्वी तुम्ही याच्यासाठी मोठी घाई करीत होते !

أَثُمَّ إِذَا مَا وَقَعَ آمَنْتُمْ بِهِ ۚ آلْآنَ وَقَدْ كُنْتُمْ
بِهِ تَسْتَعْجِلُونَ ٥١

५२. मग अत्याचारीना [८३] म्हटले जाईल की सदैव कालीन शिक्षेची गोडी चाखा. तुम्ही जे काही येथे कमवित राहिलात त्याचा मोबदला तुम्हाला दिला जाईल.

ثُمَّ قِيلَ لِلَّذِينَ ظَلَمُوا ذُوقُوا عَذَابَ الْخُلْدِ هَلْ تُجْزَوْنَ
إِلَّا بِمَا كُنْتُمْ تَكْسِبُونَ ٥٢

५३. ते तुम्हाला विचारतात, काय खरोखर हे सत्य आहे ? [८४] सांगा-होय माझ्या पालन कर्त्याची शपथ [८५] हे अगदी सत्य आहे आणि तुम्ही यापासून बचाव करुन जाऊ शकत नाही.

وَيَسْتَنْبِئُونَكَ أَحَقٌّ هُوَ ۖ قُلْ إِي وَرَبِّي إِنَّهُ لَحَقٌّ ۖ وَمَا أَنْتُمْ بِمُعْجِزِينَ ٥٣

५४. असा प्रत्येक मनुष्य ज्याने अत्याचार केला आहे, जर त्याच्या जवळ ते सर्व काही असावे जे धरातलावर आहे तर या (शिक्षे) पासून बचाव करण्याकरीता तो खचितच यास फिदया म्हणून देईल.[८६] जेव्हा ते शिक्षेला पाहतील तेव्हा मनात पश्चाताप करतील आणि त्यांच्या दरम्यान न्यायाला धरुन फैसला केला जाईल व त्यांच्यावर कसल्याहि प्रकारचा अतिरेक होणार नाही.

وَلَوْ أَنَّ لِكُلِّ نَفْسٍ ظَلَمَتْ مَا فِي الْأَرْضِ لَافْتَدَتْ بِهِ ۗ
وَأَسَرُّوا النَّدَامَةَ لَمَّا رَأَوُا الْعَذَابَ ۖ وَقُضِيَ بَيْنَهُمْ بِالْقِسْطِ ۚ وَهُمْ
لَا يُظْلَمُونَ ٥٤

५५. ऐका ! आकाशात व जमीनीवर अस्तित्वात असलेले सर्व काही अल्लाहचेच आहे. लक्षात ठेवा, अल्लाहचा वायदा सच्चा आहे, परंतु बहुधा लोक जाणत नाही.

أَلَا إِنَّ لِلَّهِ مَا فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۗ أَلَا إِنَّ وَعْدَ اللَّهِ حَقٌّ
وَلَٰكِنَّ أَكْثَرَهُمْ لَا يَعْلَمُونَ ٥٥

५६. तोच जिवित राखतो व तोच मारतो व त्याच्याच कडे तुम्हाला परतून जायचे आहे.

هُوَ يُحْيِي وَيُمِيتُ وَإِلَيْهِ تُرْجَعُونَ ٥٦

५७. लोक हो ! तुमच्या जवळ तुमच्या पालन कर्त्याकडून उपदेश [८७] आला आहे आणि अशी गोष्ट जी अंत:करणांच्या रोगांकरीता उप्राय [८८] आहे आणि ईमान बाळगणाऱ्यांकरीता मार्गदर्शन [८९]व कृपा .[९०]

يَا أَيُّهَا النَّاسُ قَدْ جَاءَتْكُمْ مَوْعِظَةٌ مِنْ رَبِّكُمْ وَشِفَاءٌ لِمَا
فِي الصُّدُورِ وَهُدًى وَرَحْمَةٌ لِلْمُؤْمِنِينَ ٥٧

८२. म्हणजे शिक्षा पाहून घेतल्यानंतर.

८३. येथे अत्याचारी शी अभिप्रेत असे लोक होत जे प्रेषिताच्या तंबीला खोटे ठरवित राहीले आणि ईश्वर व आखिरतच्या कल्पने आधारे ईहलोकात कार्य करण्यास इन्कार करीत राहीले.

८४. म्हणजे काय हा मामला खरोखर घडून येणार आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह मनुष्यास त्याच्या दुराचाराबद्दल शिक्षा देईल.

८५. शपथ हे व्यक्त करण्याकरीता आहे की ही गोष्ट अगदीच खरी व विश्वसनीय आहे.

८६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मायदा टीप क्र. १२४.

८७. या आयतीत क़ुरआनाची चार वैशिष्ट्ये वर्णिली गेली आहेत.पहिले वैशिष्ट्य हे की तो एक उपदेश आहे जो मनात चैतन्य व जागृती निर्माण करतो.

८८. हे क़ुरआनाचे दुसरे वैशिष्ट्य होय की ते मनोव्याधी व सुप्त रोगांकरीता आरोग्य दायी उपाय आहे ज्याप्रमाणे माणसाला शारीरिक व बाह्य रोग जडतात, तद्वतच आत्मिक व सुप्त व्याधी देखील जडतात. उदाहरणार्थ सत्याचा इन्कार हा सुप्त कॅन्सर आहे. आपराध-वृत्ती हृदयाकरीता तपेदीक आहे धनपुजा बुद्धिला लागलेले वेड आहे आणि निर्लज्जता व कामना भक्ति आत्म्यास अंध करणारे रोग होत.

माणसाच्या अंतरंगातील या समस्त व्याधीकरीता क़ुरआनाचे रोगमुक्ती दायक असणे अत्यंत स्पष्ट अशी वस्तुस्थिती आहे. क़ुरआन अवतरणाच्या काळात हुंदके देणाऱ्या मानवतेला याद्वारेच लाभ घडला आणि इतिहास या गोष्टीस साक्षी आहे की प्रत्येक युगात याच्याकडे तन मनाने वळणारे स्वासथपूर्ण चरीत्राचे स्वामी बनले. तसेच आजच्या काळातहि जेव्हा नैतिक पतन अगदी सीमेला पोहचले आहे. क़ुरआनाच्या छत्र छायेत जीवन व्यतीत करणारेच नैतिक शुचिर्भूततेचा गुण आपल्या अंगी बाळगतात.अशा प्रकारे अनुभवाने हे सिद्ध केले अहे की माणसाच्या समस्त मानसिक,आध्यात्मिक आणि सुप्त व्याधींचा उपचार क़ुरआन आणि केवळ क़ुरआन होय.

८९. क़ुरआनाचे तिसरे वैशिष्ट्य असे की ते ईश्वरीय मार्गदर्शन आहे. ज्याद्वारे ईमान बाळगणारे जीवनाच्या प्रत्येक वळणावर प्रवासाची योग्य दिशा जाणून घेतात.

९०. क़ुरआनाचे चौथे वैशिष्ट्य असे की ते ईश्वरातर्फे कृपा आहे. ईमान बाळगणारे ईश्वरीय मार्गदर्शनानुसार चालताना पावलोपावली ईश-कृपेने लाभान्वित होत असतात.

५८. सांगा हा (ग्रंथ) अल्लाहची कृपा व त्याच्या दयेसह अवतरीत झाला आहे तेव्हा याबद्दल आनंदीत व्हावे. हा (ग्रंथ) त्या समस्त गोष्टींहून उत्कृष्ट आहे ज्या ते एकत्रित करीत आहेत.[११]

قُلْ بِفَضْلِ اللّٰهِ وَبِرَحْمَتِهٖ فَبِذٰلِكَ فَلْيَفْرَحُوْا ۭ هُوَ خَيْرٌ
مِّمَّا يَجْمَعُوْنَ ۝٥٨

५९. सांगा तुम्ही याचाहि विचार केला की अल्लाहने तुमच्या करीता जी उपजिविका अवतरीत केली होती त्यातून तुम्ही कोणत्या वस्तूस हराम (वैध ) ठरविले व कोणत्या वस्तुस हलाल. त्यांना विचारा, काय अल्लाहने तुम्हाला या गोष्टीची अनुज्ञा दिली होती, किंवा तुम्ही अल्लाहकडे खोट्या गोष्टींचा संबंध दर्शविता?[१२]

قُلْ اَرَءَيْتُمْ مَّآ اَنْزَلَ اللّٰهُ لَكُمْ مِّنْ رِّزْقٍ فَجَعَلْتُمْ مِّنْهُ حَرَامًا
وَّحَلٰلًا ۭ قُلْ آٰللّٰهُ اَذِنَ لَكُمْ اَمْ عَلَى اللّٰهِ تَفْتَرُوْنَ ۝٥٩

६०. जे लोक अल्लाह कडे खोट्या गोष्टींचा संबंध दर्शवितात त्यांनी कियामतीच्या दिवसा बाबत काय गृहीत धरले आहे (की त्यांना आपल्या कृतकर्माचा जाब द्यावा लागणार नाही?) वस्तुस्थिती ही आहे की अल्लाह लोकांच्या हक्कात मोठा मेहरबान आहे [१३]तथापि बहुधा लोक कृतज्ञता दर्शवित नाही.

وَمَا ظَنُّ الَّذِيْنَ يَفْتَرُوْنَ عَلَى اللّٰهِ الْكَذِبَ يَوْمَ الْقِيٰمَةِ ۭ اِنَّ
اللّٰهَ لَذُوْ فَضْلٍ عَلَى النَّاسِ وَلٰكِنَّ اَكْثَرَھُمْ لَا يَشْكُرُوْنَ ۝٦٠

६१. (हे पैगंबर !) तुम्ही ज्या काही स्थितीत असता आणि क़ुरआनाचा जो काही हिस्सा ऐकवित असता व जे काही कार्य तुम्ही करीत असता त्या सर्व मग्नतेत आम्ही तुम्हाला पाहत असतो. जमीन व आकाशाची कणा इतकी गोष्ट देखील तुमच्या पालन कर्त्या पासून लपलेली नाही आणि ना याहून अधिक लहान वा मोठी गोष्टी (वस्तू) अशी आहे जी एका स्पष्ट ग्रंथात समाविष्ट नसावी.[१४]

وَمَا تَكُوْنُ فِيْ شَاْنٍ وَّمَا تَتْلُوْا مِنْهُ مِنْ قُرْاٰنٍ وَّلَا تَعْمَلُوْنَ
مِنْ عَمَلٍ اِلَّا كُنَّا عَلَيْكُمْ شُهُوْدًا اِذْ تُفِيْضُوْنَ فِيْهِ ۭ وَمَا يَعْزُبُ
عَنْ رَّبِّكَ مِنْ مِّثْقَالِ ذَرَّةٍ فِي الْاَرْضِ وَلَا فِي السَّمَاۗءِ
وَلَآ اَصْغَرَ مِنْ ذٰلِكَ وَلَآ اَكْبَرَ اِلَّا فِيْ كِتٰبٍ مُّبِيْنٍ ۝٦١

६२. ऐका, जे अल्लाहचे मित्र आहेत [१५] त्यांना ना कसले भय राहील आणि ना ते दु:खी होतील.[१६]

اَلَآ اِنَّ اَوْلِيَاۗءَ اللّٰهِ لَا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُوْنَ ۝٦٢

६३. हे असे लोक होत ज्यांनी ईमान बाळगले व ज्यांनी ईश-भय अंगिकारले.

الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَكَانُوْا يَتَّقُوْنَ ۝٦٣

९१. म्हणजे या आध्यात्मिक धनाच्या तुलनेने ते भौतिक धन कस्पस्टा समान होय ज्यास एकत्रित करण्यात लोक तन्मय झाले आहेत. आणि त्यांची ही तन्मयताच होय जी त्यांना क़ुरआनाशी जवळ करीत नाही

९२. या आयतीत अल्लाहच्या उपजिवेकेशी अभिप्रेत खाण्यापिण्याच्या त्या सर्व वस्तू होत ज्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह ने आपल्या दासांच्या फायद्या करीता निर्माण केल्या आहेत परंतु अनेकेश्वर वाद्यांनी केवळ भ्रम-पूजेच्या आधारे यापैकी कित्येक वस्तूंना लोकांकरीता हराम (अवैध) ठरविले आहे की ज्या खाल्ल्याने त्यांना पाप लागते. पाप लागण्याची त्यांची ही धारणा हे दर्शविते की ते जणू असे समजतात की ईश्वरानेच या वस्तू त्यांच्याकरीता हराम ठरविल्या आहेत. पवित्र कुरआन अशा लोकांना विचारते, तुम्हाला ही गोष्ट कशी कळली की या वस्तू ईश्वराने हराम ठरविल्या आहेत आणि जर तुमचा दावा हा आहे की ईशवराने तुम्हाला या गोष्टीची परवानगी देऊन ठेवली आहे की आपल्या मर्जीनुसार वाटतील त्या वस्तू हलाल आणि वाटतील त्या वस्तू हराम ठरवित जा ; तर या गोष्टीचा सबळ पुरावा द्या. आणि जर कसलाही पुरावा उपलब्ध नाही तर मग तुमचा हा दावा ईश्वराकडे खोट्या गोष्टींचा निर्देश करण्या पलीकडे काहीच नाही. अरबच्या अनेकेश्वराद्यांनी काही विशिष्ट प्रकारचे ऊंट व सांडण्या आणि काही गुरांची वासरे हराम ठरविली होती आणि भारताच्या अनेकेश्वरवाद्यांनी गायीला किंबहुना मांसाहरालाच हराम ठरविले.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र.२६२व २६३.

९३. म्हणजे अल्लाह ज्याअर्थी अपल्या दासांवर कृपावंत आहे म्हणून तो हे इच्छित नाही की कियामतीच्या दिवशी तुम्ही ईशप्रकोपाच्या तावडीत यावे आणि म्हणूनच त्याने आपली पसंती व नापसंतीने तुम्हला सचेत केले. परंतु जर तुम्ही त्याच्या पसंती-नापसंती पासून बेपर्वा होऊन मात्र आपल्या मर्जीने एखाद्या वस्तूस हराम ठरवित राहिलात तर कियामतीच्या दिवशी तुम्हाला अनिवार्यत: यासंबंधी जाब द्यावा लागेल आणि आपल्या या बंडखोर वर्तनामुळे तुम्ही त्याच्या शिक्षेपासून स्वत:ला वाचवू शकत नाही.

९४. स्पष्ट ग्रंथा'शी अभिप्रेत अल्लाहचा तो ग्रंथ होय ज्यात समस्त सृष्टीचे रेकॉर्ड पूर्ण तपशीलासह आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने हे सर्व आपल्या ज्ञानाच्या आधारावर कलम बंद केले आहे. या ग्रंथाचे पारिभाषिक नाव 'लोहे महफ़ूज़' असे आहे, ज्याची खरी हकीगत अल्लाहलाच माहित. येथे हे स्पष्ट करण्याचा उद्देश्य आहे की अल्लाहच्या ज्ञानाने संपूर्ण सृष्टीला घेरले आहे आणि सर्व विवरण आणि कण नू कण त्याच्या की ज्ञान-कक्षेत आहे. येथ पावेतो कण अणु-रेणू इतकीहि गोष्ट त्याच्या ज्ञाना पलीकडे नाही आणि जेव्हा त्याचे ज्ञान एवढे व्यापक आहे की त्याला कसलीहि मर्यादा नाही तेव्हा तो आपल्या दासांच्या आचरणापासून कशा प्रकारे अनभिज्ञ असू शकतो? आणि जेव्हा त्याच्याजवळ कणा कणाचे रेकार्ड आहे तेव्हा ज्याच्या शिरावर जमीनीच्या प्रतिनिधीत्वाचा मुकुट आहे त्या मानवाच्या कारकीर्दीचे रेकार्ड कसे बरे नसेल? यास्तव माणसाने असे समजून ईहलोकात कार्य करावे की अल्लाह सर्व काही पहात अहे आणि त्याच्या रेकार्ड मधून कोणतीही गोष्ट गायब होऊ शकत नाही.आणि हीच धारणा व हीच श्रद्धा माणसाला ईश-मार्गावर चालण्यास प्रवृत्त करते.

९५. मूळ ग्रंथात 'अवलीया' हा शब्द प्रयोग झाला आहे. हे ''वली'' या शब्दाचे अनेकवचन होय. यांचा अर्थ मित्र असा आहे. अवलीया अल्लाह अर्थात कोणते लोक होत याचे स्पष्टीकरण स्वत: क़ुरआनाने केले आहे. नंतरच्या आयतीमध्ये फर्माविले 'हे असे लोक आहेत ज्यांनी ईमान बाळगले व ज्यांनी ईश-भय अंगिकारले' अर्थात जे लोक ईमान बाळगून ईश-भय व पाप -भीरुतेचे वर्तन आंगिकारतात तेच अल्लाहचे मित्र होत. दुसऱ्या शब्दात सागांयचे म्हणजे ईश-भय अंगिकारणारा प्रत्येक मोमीन (ईमान बाळगणारा) अल्लाहचा दोस्त होय.

क़ुरआनाच्या या स्पष्टीकरणानंतर याचा अन्य एखादा अर्थ लावण्याचा अधिकार कोणालाहि नाही.परंतु मोठ्या खेदाची गोष्ट अशी की मुसलमानांच्या एक समूहाने याचा अर्थ अगदीच बदलून टाकला. त्यांच्या मते वली (अल्लाहचा दोस्त) तो होय ज्याने सूफी-संतासारखे जीवन व्यतीत केले असावे. 'वली' च्या बाबतीत या समूहाची कल्पना अशी की त्याला विश्वात अपरोक्ष रित्या काही करण्याचे सामर्थ्य असते. यास्तव सामर्थ्याच्या दृष्टीने त्यांनी अवलीयांची पदे निश्‍चित केली आहेत. तद्नुसार गौस, क़ुतुब, अबदाल सारख्या पदव्या त्यांना बहाल केल्या आहेत. मग त्यांच्याशी अशा चमत्कारांचा (करामतींचा) संबंध जोडला आहे की ज्यांना आधार म्हणून काहीच नाही. अवलीयांबाबत या मार्गभ्रष्ट करणाऱ्या कल्पनेस ज्या गोष्टीनी अधिक मजबूत केले त्या म्हणजे त्यांच्या पक्क्या कबरी व दरगे होत. परिणामत: मुसलमानांमध्ये व्यक्ति पूजा थोरपुरुषांवरलि श्रद्धेच्या पडद्याआड व शिर्क (अनेकेश्वरवाद) नज्र-नियाजच्या आवरणा खाली आला.

९६. याचे स्थान जन्नत आहे जेथे ना भवितव्याचा कसला धोका राहील व ना भूतकाळाचे एखादे दु:ख.

لَهُمُ الْبُشْرٰى فِي الْحَيٰوةِ الدُّنْيَا وَفِي الْاٰخِرَةِ ۚ لَا تَبْدِيْلَ
لِكَلِمٰتِ اللّٰهِ ۚ ذٰلِكَ هُوَ الْفَوْزُ الْعَظِيْمُ ﴿٦٤﴾

६४. यांच्या करीता ईहलोकीय जीवनातहि खुशखबरी आहे आणि आखिरत (मरणोत्तर जीवना) मध्येहि- अल्लाहचे फर्मान बदलू शकत नाही [९७] हीच सर्वात मोठी सफलता होय.

وَلَا يَحْزُنْكَ قَوْلُهُمْ ۘ اِنَّ الْعِزَّةَ لِلّٰهِ جَمِيْعًا ۚ
هُوَ السَّمِيْعُ الْعَلِيْمُ ﴿٦٥﴾

६५. (हे पैगंबर !) या लोकांची वक्तव्ये तुम्हाला दुःखदायक न ठरोत.[९८] प्रतिष्ठा सर्वतोपरि अल्लाह करीताच आहे.[९९] तो सर्व काही ऐकतो व जाणतो.

اَلَآ اِنَّ لِلّٰهِ مَنْ فِي السَّمٰوٰتِ وَمَنْ فِي الْاَرْضِ ۗ وَمَا يَتَّبِعُ
الَّذِيْنَ يَدْعُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ شُرَكَآءَ ۗ اِنْ
يَّتَّبِعُوْنَ اِلَّا الظَّنَّ وَاِنْ هُمْ اِلَّا يَخْرُصُوْنَ ﴿٦٦﴾

६६. लक्षात ठेवा ! जे काही आकाशात आहे व जे काही जमीनीत आहे ते सर्व अल्लाहच्याच अधीन आहे.[१००]आणि जे लोक अल्लाहला सोडून स्वतःठरविलेल्या सहभागीना पुकारतात ते केवळ भ्रमकल्पनेचे अनुसरण करतात [१०१]आणि निव्वळ अनुमानाच्या गोष्टी करतात. [१०२]

هُوَ الَّذِيْ جَعَلَ لَكُمُ الَّيْلَ لِتَسْكُنُوْا فِيْهِ وَالنَّهَارَ
مُبْصِرًا ۗ اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيٰتٍ لِّقَوْمٍ يَّسْمَعُوْنَ ﴿٦٧﴾

६७. तोच आहे ज्याने तुमच्याकरीता रात्र बनविली की तिच्यात तुम्ही विश्रांती घ्यावी आणि दिवस प्रकाशमय बनविला. यात अशा लोकाकंरीता निशाण्या आहेत जे ऐकतात.[१०३]

قَالُوا اتَّخَذَ اللّٰهُ وَلَدًا سُبْحٰنَهٗ ۗ هُوَ الْغَنِيُّ ۗ لَهٗ مَا فِي
السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ ۗ اِنْ عِنْدَكُمْ مِّنْ سُلْطٰنٍۭ
بِهٰذَا ۗ اَتَقُوْلُوْنَ عَلَى اللّٰهِ مَا لَا تَعْلَمُوْنَ ﴿٦٨﴾

६८. ते म्हणतात. अल्लाहने आपल्याकरीता संतती बनवून ठेवली आहे [१०४] पावित्र्य आहे त्याच्यासाठी, तो निस्पृह आहे आकाशांमध्ये व जमीनीत जे काही आहे सर्व त्याच्या मालकीचे आहे. तुमच्या जवळ यासंबंधी काय पुरावा आहे? काय-तुम्ही अल्लाहच्या बाबतीत अशी गोष्ट सांगता की ज्यापासून तुम्ही स्वतः अज्ञानी आहात.[१०५]

قُلْ اِنَّ الَّذِيْنَ يَفْتَرُوْنَ عَلَى اللّٰهِ الْكَذِبَ لَا
يُفْلِحُوْنَ ﴿٦٩﴾ ؕ

६९. सांगा ते लोक अल्लाहच्या बाबतील खोटे बोलून कुभांड रचतात ते कधीहि सफल होणार नाहीत.[१०६]

مَتَاعٌ فِي الدُّنْيَا ثُمَّ اِلَيْنَا مَرْجِعُهُمْ ثُمَّ نُذِيْقُهُمُ
الْعَذَابَ الشَّدِيْدَ بِمَا كَانُوْا يَكْفُرُوْنَ ﴿٧٠﴾

७०. त्यांच्याकरीता फक्त इहलोकातच लाभ-सामुग्री आहे मग त्यांना आमच्याकडे परतावयाचे आहे [१०७] त्यावेळी आम्ही त्यांना कुफ्रच्या मोबदल्यात सक्त शिक्षेची गोडी चाखवू.

९७. अर्थात अल्लाहचे समस्त वायदे अगदी अटळ आहेत त्यात कसलेहि परिवर्तन होऊ शकत नाही.

९८. म्हणजे विरोधकांच्या क्लेश-दायक गोष्टींना तुम्ही खात्रीत घेऊ नका.

९९. अरबी भाषेत 'इज़्ज़त' या शब्दांचा मूलार्थ शक्ति व वर्चस्व असा आहे. तसेच याचा दुसरा अर्थ सन्मान असाहि आहे 'प्रतिष्ठा सर्वतोपरि अल्लाह करीताच आहे याचा अर्थ हाच की, शक्ति व वर्चस्व आणि मान-प्रतिष्ठा सर्व अल्लाहच्या अधिकार-कक्षेत आहे. तो ज्या कुणाला या गोष्टीनी उपकृत करु इच्छिल त्याला कोणीहि रोखू शकत नाही. यास्तव पैगंबराचे विरोधक त्यांना नतमस्तक करण्यासाठी जे सामर्थ्य पणाला लावीत आहे ते अगदी व्यर्थ होय आपल्या या प्रयत्नात ते कधीहि सफल होऊ शकत नाही.

१००. अर्थात आकाश व जमीनीचे समस्त सजीव प्राणी, मग ते फिरीश्ते असोत वा जिन्न जन्मत: अल्लाहचे दास व त्याची निर्मिती होत. असे असतांना जेव्हा स्वामी बनण्याची कोणाचीही पात्रता नाही तेव्हा ते ईश्वराचे सहभागी कसे?

१०१. म्हणजे शिर्कच्या समर्थनार्थ कोणतेहि प्रमाण उपलब्ध नाही, किंबहुना धर्मांचा पुरस्कार करणाऱ्यांनी केवळ भ्रम-समजुतीच्या आधारे ईश्वराचे सहभागी ठरविले आहेत.

१०२. अनेकेश्वरवादीय धर्मांच्या पंडीतांनी आपापल्या धर्माला खरे सिद्ध करुन दाखविण्यासाठी त्याला तत्वज्ञानीय रंग चढविला आहे. अशासाठी की ज्या गोष्टी विवेक-बुद्धि मान्य करीत नाही त्यांना तत्वज्ञानाच्या स्वरुपात सादर करुन बुद्धिला प्रभावित करणे शक्य व्हावे. याचे उदाहरण हिंदू धर्माचे वेदांत तत्वज्ञान होय.ज्यात सृष्टी निर्मात्या विषयी असे म्हटले गेले आहे की सुरवातीला तो एकटा होता मग त्याने अनेकत्वात परिवर्तित होण्याची इच्छा बाळगली म्हणून त्याने स्वत:पासूनच अनेकता निर्माण केली.

"The Vedanta says that the Supreme Being was alone, one without a second ................He desired to become the many, But as there was nothing beside Himself. He had to create the many out of himself.

(Outlines of Vedanta by R. Krishna Swami Aiyar p. 71)

केवढे लज्जास्पद असत्य आहे ज्याचा ईश्वराशी संबंध जोडला गेला आहे ! याच प्रकारे देवी देवतांच्या अस्तित्वाबाबत हा दावा केला गेला आहे की इहलोकात जेवढी गुणवैशिष्ट्ये आढळून येतात तेवढ्या संख्येने देवी देवता आहेत.

There are as many Dev as or spiritual Entities as there are qualities in the World.(Ibid p.131)

यासोबतच हा दावाहि केला गेला आहे की देवतांचे अस्तित्व ही काही भ्रामिक कल्पना किंवा दृष्टीकोनात्मक कल्पना नव्हे किंबहुना सत्य वस्तुस्थिती आहे.

"We must mention that these are not mythical entities or mere theoretical Conceptions, but are actual Facts."

( I bid p.139)

शिर्क व अनेकेश्वरवादी धर्मांचा पाया अशाच निराधार गोष्टींवर आधारीत आहे ज्यांना तत्वज्ञानाचे रुप दिले गेले आहे. या तत्वज्ञानांचा परस्पर-विरोध एकमेकांचे खंडन करतो, हा या गोष्टीचा पुरावा होय की याचा पाया सत्य ज्ञानावर नाही किंबहुना केवळ भ्रम समजुतीच्या गोष्टीवर आहे.

१०३. अर्थात ईश्वराची ओळख प्राप्त करण्याकरीता तत्वज्ञानाच्या भानगडीत पडण्याची गरज नाही सृष्टीच्या ज्या खाणा खुणांना पवित्र क़ुरआन एकेश्वर वादाच्या समर्थनादाखल प्रस्तुत करीत आहे ती एक साधी वस्तुस्थिती होय; आणि ऐकण्या-समजण्याची क्षमता ज्याच्या अंगी आहे त्याच्याकरीता हे प्रमाण पुरेसे आहे. रात्र विश्रांती पूर्ण असल्यामुळे व दिवस प्रकाशमय असल्यामुळेच माणसाला जमीनीवर जीवन जगणे शक्य झाले आहे. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या ईशत्वाची ही उघड निशाणी होय.

१०४. मूळ ग्रंथात 'वलद' हा शब्द प्रयोग झाला आहे हा शब्द अरबी भाषेत एकवचन-अनेकवचन, पुल्लिंग, स्त्रीलिंग या सर्वांकरीता वापरला जातो. उक्ती-क्रम मक्कावासी अनेकेश्वर-वाद्यांच्या विचारांचे खंडन करीत येत आहे यास्तव येथेहि त्यांच्या या विचाराचे खंडन करण्याचा हेतु आहे की फिरीश्ते ईश-कन्या होत.

१०५. येथे अल्लाहची संतती असण्याच्या खंडनात पाच गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. पहिली गोष्ट ही की अल्लाह करीता पवित्रता आहे. अर्थात अल्लाह करीता संतती कल्पिणे निर्मात्यास निर्मिति समान समजणे होय. तात्पर्य ही गोष्ट सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या शान वैभवास साजेल अशी मुळीच होऊ शकत नाही. तो या प्रकारच्या समस्त हीन गोष्टींपासून अलिप्त आहे व तो अत्यंत उच्च व श्रेष्ठ आहे. दुसरी गोष्ट ही की तो निरपेक्ष व निस्पृह आहे. एखाद्याला पुत्र बनविण्याची त्याला गरजच काय? लाक्षणिक अर्थाने मनुष्य एखाद्याला पुत्र अशासाठी बनवितो की तो स्वत: सहाय्य प्राप्तीस गरजवंत असतो अथवा आपल्या पश्चात एखाद्याला वंशाचा वारस बनवू

इच्छितो परन्तु ईश्वराच्या बाबतीत तर यापैकी कोणतीही गोष्ट उचित होऊ शकत नाही. तिसरी गोष्ट ही की आकाशात व जमीनीत जे काही आहे सर्व त्याच्या मालकीचे आहे म्हणजे सृष्टीतील समस्त निर्मिती त्याचे राज्य व दास आहे मग एखाद्याचे हे स्थान कसे होऊ शकते की तो पुत्र या नात्याने ईश्वराच्या ईशत्वात सहभागी व्हावा. चौथी गोष्ट अशी की जे लोक ईश्वराची संतती असल्याचे मानतात त्यांच्या हा दावा प्रमाणशून्य आहे. ईश्वर-वाणीत याचा कोठेही उल्लेख दाखविला जाऊ शकत नाही की ईश्वराची संतती आहे किंवा त्याने एखाद्याला आपला पुत्र बनविले आहे आणि पाचवी गोष्ट अशी की अशा प्रकारचा दावा करणे स्पष्ट अडाणीपणा होय कारण ईश्वर संदर्भात एखाद्या गोष्टीचे जोपर्यंत उचित माध्यमान्वये माणसाला ज्ञान होत नाही. ती सांगणे फार मोठी नादानी व मोठे दु:साहस होय.

१०६. ईश्वर संदर्भात एखादी गोष्ट सांगताना माणसाला फार सावध असले पाहिजे. वस्तुस्थितीच्या विपरीत गोष्टीचा ईश्वराकडे संबंध दर्शविल्याने यशाचा मार्ग बंद होतो.

१०७. म्हणजे अल्लाहच्या समोर हजर होणे.

**जर तुम्ही (माझ्या स्मरण घडविण्या पासून) तोंड फिरविता तर (स्वतःचेच नुकसान कराल ) मी तुमच्या कडून एखादा मोबदला तर मागितला नाही. माझा मोबदला तर अल्लाहच्याच हवाली आहे आणि मला आदेश दिला गेला आहे की मी मुस्लिम (आज्ञाधारक) बनून रहावे. *(अल-क़ुर्आन)***

७१. त्यांना नूह चा वृत्तांत ऐकवा. जेव्हा त्याने आपल्या जनसमूहास म्हटले होते की हे माझ्या जन-समूहातील लोकांनो ! जर माझे तुमच्या दरम्यान राहणे आणि अल्लाहच्या आयतीद्वारे [१०९] स्मरण घडविणे तुम्हाला असह्य वाटते तर माझा भरवसा केवळ अल्लाहवर आहे. तुम्ही आपली योजना आखा आणि आपल्या स्वरचित सहभाग्यांनाहि सोबतीला घ्या आणि तुमची योजना तुम्हावर अस्पष्ट न राहावी, मग माझ्या विरुद्ध तुम्ही जे काही करु इच्छिता करा व मला किंचितहि सवड देऊ नका.[११०]

وَاتْلُ عَلَيْهِمْ نَبَأَ نُوحٍ إِذْ قَالَ لِقَوْمِهِ يَا قَوْمِ إِنْ كَانَ كَبُرَ عَلَيْكُمْ
مَقَامِي وَتَذْكِيرِي بِآيَاتِ اللَّهِ فَعَلَى اللَّهِ تَوَكَّلْتُ فَأَجْمِعُوا
أَمْرَكُمْ وَشُرَكَاءَكُمْ ثُمَّ لَا يَكُنْ أَمْرُكُمْ عَلَيْكُمْ غُمَّةً ثُمَّ اقْضُوا إِلَيَّ وَ
لَا تُنْظِرُونِ ﴿٧١﴾

७२. जर तुम्ही (माझ्या स्मरण घडविण्या पासून) तोंड फिरविता तर (स्वतःचेच नुकसान कराल) मी तुमच्या कडून एखादा मोबदला तर मागितला नाही. माझा मोबदला तर अल्लाहच्याच हवाली आहे आणि मला आदेश दिला गेला आहे की मी मुस्लिम (आज्ञाधारक) बनून रहावे .[१११]

فَإِنْ تَوَلَّيْتُمْ فَمَا سَأَلْتُكُمْ مِنْ أَجْرٍ إِنْ أَجْرِيَ إِلَّا عَلَى اللَّهِ
وَأُمِرْتُ أَنْ أَكُونَ مِنَ الْمُسْلِمِينَ ﴿٧٢﴾

७३. परंतु त्यांनी त्याला खोटे ठरविले तेव्हा आम्ही त्याला व त्या लोकांना जे त्यासोबत नावेत होते वाचवले [११२] व त्याना सत्ताधारी बनविले आणि ज्या लोकांनी आमच्या निशाण्यांना खोटे ठरविले होते त्यांना बुडविले [११३] तेव्हा पहा, ज्या लोकांना खबरदार केले गेले होते त्यांचा कसा शेवटे झाला.

فَكَذَّبُوهُ فَنَجَّيْنَاهُ وَمَنْ مَعَهُ فِي الْفُلْكِ وَجَعَلْنَاهُمْ خَلَائِفَ
وَأَغْرَقْنَا الَّذِينَ كَذَّبُوا بِآيَاتِنَا فَانْظُرْ كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ
الْمُنْذَرِينَ ﴿٧٣﴾

७४. मग त्यांनतर आम्ही कित्येक प्रेषितांना त्यांच्या जन-समूहाकडे पाठविले [११४] आणि ते त्यांच्या जवळ उघड निशाण्या घेऊन आले परंतु ज्या गोष्टीला त्यांनी पूर्वी खोटे ठरविले होते, तिला मानण्याकरीता ते तयार झाले नाहित. [११५] अशा प्रकारे आम्ही मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांच्या हृदयांवर मोहर लावून देतो. [११६]

ثُمَّ بَعَثْنَا مِنْ بَعْدِهِ رُسُلًا إِلَى قَوْمِهِمْ فَجَاءُوهُمْ بِالْبَيِّنَاتِ
فَمَا كَانُوا لِيُؤْمِنُوا بِمَا كَذَّبُوا بِهِ مِنْ قَبْلُ كَذَٰلِكَ نَطْبَعُ عَلَى
قُلُوبِ الْمُعْتَدِينَ ﴿٧٤﴾

७५. मग त्यांच्या नंतर आम्ही मूसा व हारुन ला आपल्या निशाण्यांसह फिरऔन व त्याच्या दरबारी लोकांकडे पाठविले, परंतु त्यांनी गर्व केला आणि ते अपराधी लोक होते.

ثُمَّ بَعَثْنَا مِنْ بَعْدِهِمْ مُوسَىٰ وَهَارُونَ إِلَىٰ فِرْعَوْنَ وَمَلَئِهِ
بِآيَاتِنَا فَاسْتَكْبَرُوا وَكَانُوا قَوْمًا مُجْرِمِينَ ﴿٧٥﴾

१०८. हजरत नूह यांचा वृत्तांत विस्तारपूर्वक सूरह हूद आणि सूरह नूह मध्ये वर्णिला गेला आहे. येथे त्या वृत्तांताच्या अशा पैलूंना सादर केले गेले आहे ज्याद्वारे सत्य आवाहनास प्रस्तुत करण्या संबंधी हजरत नूह यांचे असाधारण धैर्य तसेच त्यांच्या कमालीचा निश्चय व ईश्वरावरील दृढ विश्वास व्यक्त होतो. आणि सत्य-आवाहनास रद्द करणाऱ्यांच्या दुष्परिणितीचीही सूचना मिळते.

हजरत नूह यांचा काळ व इतर विवरणाकरीता पहा सूरह अअराफ टीप क्र.९५.

१०९. अभिप्रेत त्या निशाण्या होत ज्या पैगंबरांच्या आवाहनास सत्य असण्याबाबत प्रमाणभूत ठरतात.

११०. हे आव्हान होते जे हजरत नूह यांनी आपल्या जन-समूहाच्या विरोधात्मक तन्मयनेस पाहून दिले होते. ज्यावरुन हे दिसून येते. की पैगंबराना आपल्या आवाहनाच्या सत्यतेचा केवढा दृढ विश्वास असतो आणि त्यांचा निश्चय कसा पर्वतासम अटळ असतो.

१११. ही आयत स्पष्ट करते की हजरत नूह ज्यांना सर्वप्रथम मानव-वस्ती कडे प्रेषित या नात्याने पाठविले गेले होते, मुस्लिम होते म्हणजे इस्लाम हाच त्यांचा धर्म होता आणि ते एकमेव ईश्वराचे आज्ञाधारक दास होते.

११२.नौकेत अशाच लोकांनी आश्रय घेतला होता ज्यांनी हजरत नूह विषयी ईमान बाळगले होते.

११३. हजरत नूह यांचा जन-समूह सत्ताधारी होता. परंतु जेव्हा कुफ्रच्या मोबदल्यात त्याला बुडविले गेले तेव्हा ईमान बाळगणाऱ्यांच्या समूहाने ज्यास सर्वश्रेष्ठ अल्लाहने वाचविले होते, जमीनीचा सत्ताधिकार सांभाळला. जमीनीवरील सत्य-असत्याचा हा पहिला संघर्ष होता ज्यात सत्य वरचढ झाले आणि ईमान बाळगाणाऱ्यांना काफिरांच्या विरोधात विजय व सफलता लाभली.

११४. म्हणजे हजरत नूह नंतर वेगवेगळ्या जनसमूहांकडे प्रेषित पाठविले. या प्रेषितांचा उल्लेख सूरह अअराफ मध्ये आला आहे व पुढे सूरह हूद मध्ये येत आहे.

११५. ही माणसाची मानसिक दूर्बलता होय की एकदा ज्या गोष्टीला तो रद्द करतो त्यावर पून्हा विचार करायला तयार होत नाही. चुकीचे पाऊल उचलल्यानंतर परतणे त्याच्याकरीता मोठे कठीण जाते.

११६. ह्रदयावर मोहर लावण्याचे स्पष्टीकरण सूरह बकर: टीप क्र.१५ मध्ये केले गेले आहे.

७६. जेव्हा आमच्या तर्फे सत्य त्यांच्या समोर आले तेव्हा ते म्हणाले, ही तर उघड जादू आहे. [११७]

فَلَمَّا جَآءَهُمُ الْحَقُّ مِنْ عِنْدِنَا قَالُوٓا اِنَّ هٰذَا لَسِحْرٌ مُّبِيْنٌ ٧٦

७७. मूसा ने म्हटले, काय तुम्ही सत्या बाबतीत जेव्हा ते तुमच्या समोर येऊन पोहचले असे म्हणता की ही एखादी जादू तर नव्हे? वस्तुत:जादूगार कधीहि सफलता प्राप्त करु शकत नाहीत.[११८]

قَالَ مُوْسٰٓى اَتَقُوْلُوْنَ لِلْحَقِّ لَمَّا جَآءَكُمْ ؕ اَسِحْرٌ هٰذَا ؕ وَلَا يُفْلِحُ
السّٰحِرُوْنَ ٧٧

७८. त्यांनी उत्तर दिले की, तुम्ही अशासाठी आमच्या जवळ आलात की ज्या रीतीरिवाजांवर आम्हाला आमचे वाडवडील आढळूने आलेत त्यापासून आम्हाला हटवून द्यावे व देशात तुम्हा दोघांना मोठेपणा प्राप्त व्हावा [११९] आम्ही तर तुमचे म्हणणे मान्य करणार नाहीत.

قَالُوٓا اَجِئْتَنَا لِتَلْفِتَنَا عَمَّا وَجَدْنَا عَلَيْهِ اٰبَآءَنَا وَتَكُوْنَ لَكُمَا
الْكِبْرِيَآءُ فِى الْاَرْضِ ؕ وَمَا نَحْنُ لَكُمَا بِمُؤْمِنِيْنَ ٧٨

७९. आणि फिरऔन म्हणाला, समस्त निष्णात जादूगारांना माझ्या जवळ आणा.

وَقَالَ فِرْعَوْنُ ائْتُوْنِىْ بِكُلِّ سٰحِرٍ عَلِيْمٍ ٧٩

८०. जेव्हा जादूगार आले तेव्हा मूसा ने त्याना म्हटले, तुम्हाला जे काही टाकायचे ते टाका.

فَلَمَّا جَآءَ السَّحَرَةُ قَالَ لَهُمْ مُّوْسٰٓى اَلْقُوْا مَآ اَنْتُمْ مُّلْقُوْنَ ٨٠

८१. मग जेव्हा त्यांनी (आपले दोर व काठ्या) टाकून दिल्या तेव्हा मूसा म्हणाला, हे जे काही तुम्ही सादर केले आहे, जादू आहे. नि:संशय अल्लाह यास खोटे ठरविल. उत्पातकारींच्या कार्याला अल्लाह तडीस नेत नाही. [१२०]

فَلَمَّآ اَلْقَوْا قَالَ مُوْسٰى مَا جِئْتُمْ بِهِ ۙ السِّحْرُ ؕ اِنَّ اللّٰهَ سَيُبْطِلُهٗ ؕ
اِنَّ اللّٰهَ لَا يُصْلِحُ عَمَلَ الْمُفْسِدِيْنَ ٨١

८२. आणि अल्लाह आपल्या फर्मानांद्वारे सत्याला सत्य करुन दाखवितो [१२१] मग अपराध्यांना ते नापसंत का वाटेना.

وَيُحِقُّ اللّٰهُ الْحَقَّ بِكَلِمٰتِهٖ وَلَوْ كَرِهَ الْمُجْرِمُوْنَ ٨٢

८३. तथापि मूसा चे म्हणणे त्याच्या जनसमूहाच्या [१२२] काही नवयुवकांखेरीज कोणीहि मानले नाही; फिरऔन व त्याच्या सरदारांचे भय [१२३] बाळगीत की त्यांनी एखाद्या संकटात न टाकावे. [१२४] वस्तुत: फिरऔन पृथ्वीतलावर मोठा बंडखोर होता व अशा लोकांपैकी होता जे मर्यादेचे उल्लंघन करतात.[१२५]

فَمَآ اٰمَنَ لِمُوْسٰٓى اِلَّا ذُرِّيَّةٌ مِّنْ قَوْمِهٖ عَلٰى خَوْفٍ مِّنْ فِرْعَوْنَ
وَمَلَا۟ئِهِمْ اَنْ يَّفْتِنَهُمْ ؕ وَاِنَّ فِرْعَوْنَ لَعَالٍ فِى الْاَرْضِ ۚ وَاِنَّهٗ
لَمِنَ الْمُسْرِفِيْنَ ٨٣

११७. ही घटना वर्णन करण्याचा हेतु प्रामुख्याने या गोष्टीकडे संकेत करणे होय की ज्याप्रमाणे हजरत मूसा यांच्या सत्य आवाहनास फिरऔन व त्याच्या दरबारींनी जादू ठरविले होते तद्‌वतच हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सत्य आवाहनास मक्केचे काफीर जादू ठरवित आहेत.

११८. जेव्हा पैगंबराचा ईश-चमत्कार (मोजिजा) व जादूगारांचा जादूटोणा यांच्या दरम्यान मुकाबला होतो तेव्हा जादूगारांना तोंडघशी पडावे लागते व त्यांना कसालाहि मान लाभत नाही. ही तर त्यांच्याकरीता इहलोकीय असफलता आहे. राहिली आखीरतची सफलता व प्रतिष्ठितता तर जादूगार निश्चितच यापासून वंचित राहतील कारण लोकांना मार्गभ्रष्ट करण्याकरीता ते डोळ्यात धूळ फेकण्याचे काम करतात.

११९. म्हणजे मिस्र (इजिप्त) चा सत्ताधिकार तुमच्या हाती यावा. फिरऔन तर्फे हजरत मुसा व हारुन यांच्यावर हा असाच आरोप होता जसा त्यांच्यावर देशात उत्पात माजविण्याचा आरोप ठेवला गेला होता. (सूरह अअराफ आयत क्र.१२७) अन्यथा राजकिय सत्तेच्या समस्येला त्यांनी अजून हातहि लावला नव्हता.कारण ही आवाहनाची अवस्था होती, शासन-व्यवस्था कायम करण्याची अवस्था नव्हती. प्रेषितांच्या आवाहनाच्या अभिव्यक्तित राजकीय सत्ताधिकाराची बाब देखील सामील असते आणि ती अशा वेळी कार्यान्वित होते जेव्हा त्यांच्याशी संबंधित असलेला जनसमूह त्याच्या आवाहनानुसार ईमान बाळगतो. हजरत मूसा व हजरत हारुन फिरऔन व त्याच्या जन समूहाला ईमान बळगण्या विषयीचे आवाहन करीत होते. फिरऔनला राज्यसत्तेपासून दूर सारण्यासाठी त्यांनी कसलीहि राजकीय योजना बनविली नव्हती. यास्तव सत्ता-प्राप्तीचा त्यांच्यावरील आरोप अगदी निराधार होता.

१२०. एखादे दुष्कृत्य करुन चांगल्या परिणामची अपेक्षा बाळगणे अगदी अशाच प्रकारचे होय, जसे आग पेटवून तिच्यापासून गारवा प्राप्त करण्याची आशा बाळगणे. अल्लाहचा नियम असा की विनाशकारी-कार्याद्वारे कधीहि विधायक कार्य तडीस पोहचत नाही. तेव्हा जादूपासून जी निव्वळ धोका आहे, लाभदायक परिणाम कसे बरे आढळतील? पैगंबर असलेली व्यक्ति माणसांचे जे मार्गदर्शन करते त्या तुलनेने जादूगार कसले मार्गदर्शन. करु शकतो?

१२१. तेव्हा त्याच्या आदेशान्वये हजरत मूसा यांची लाठी खरोखर साप बनली आणि जादूगारांच्या बनावटी सापांना ह्या सापाने गिळंकृत केले. अशा प्रकारे जादूगारांच्या विरोधात हजरत मूसा यांना सफलता लाभली व त्यांचे पैगंबर असणे सिद्ध झाले.

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप १६७,१६८,१६९)

१२२. त्याच्या जनसमूहाशी अभिप्रेत फिरऔनचा जनसमूह होय. कारण वरुन वर्णन-क्रम फिरऔन त्याचे सरदार व जादूगारांबाबत चालत आला आहे.

१२३. अर्थात हजरत मूसा यांनी जे सत्य प्रस्तुत केले होते त्याला कबूल करणारे काही धैर्यवान तरुणच निघाले. हे तरुण मिस्रच्या किब्ती जनसमूहाशी संबंधित होते कारण जेथपावेतो बनी इस्राईलचा संबंध आहे प्रेषितत्वावर ईमान बाळगून त्यांना आपला नेता मानले होते. असे नसते तर त्यांनी बनी इस्राईलच्या सुटकेची मागणी कशा रीतीने केली असती? यास्तव ज्या भाष्यकरांनी येथे बनी इस्राईलचे तरुण अभिप्रेत घेतले आहेत तर त्यांच्या या मताशी सहमत होता येणार नाही.

१२४. यावरुन असे दिसते की फिरऔन व मिस्र-जनसमूहाचे सरदार लोकांनी इस्लाम कबूल करणाऱ्यां विरुद्ध कशी अत्याचारपूर्वक पॉलीसी अंगिकारली होती. फिरऔन आपल्या जन-समूहातील लोकांना श्रद्धा आणि विवेक-स्वातंत्र्य देण्यास तयार नव्हता म्हणून सत्य प्रकट झाल्यानंतरहि ते कबूल करण्यास लोक सर्व साधारणत: तयार झाले नाहीत फक्त काही मोजक्या नवयुवकांखेरीज ज्यांनी समस्त संकटे असतांनाहि हजरत मूसा यांच्या सत्य-आवाहनास मान्य केले.

१२५. फिरऔन बंडखोरहि होता व मर्यादेपलीकडे अत्याचारी देखील. ईश्वराशी बंडखोरीच्या परिणामी त्याच्या अंगी एवढा गर्व निर्माण झाला होता की निती आणि मानवतेच्या समस्त मर्यादांना तोडून तो जंगलीपणा व पाशविकतेच्या पातळीवर येऊन पोहचला होता.

८४. आणि मूसा म्हणाला, हे माझ्या जन समूहातील
लोकांनो ! जर तुम्ही अल्लाहवर ईमान बाळगता
तर त्यावरच भरवसा करा जर खरोखर तुम्ही
मुस्लिम (आज्ञाधारक) असाल.[१२६]

وَقَالَ مُوسٰى يٰقَوْمِ اِنْ كُنْتُمْ اٰمَنْتُمْ بِاللّٰهِ فَعَلَيْهِ تَوَكَّلُوْٓا اِنْ
كُنْتُمْ مُّسْلِمِيْنَ ٨٤

८५. ते म्हणाले आम्ही अल्लाहवरच भरवसा केला.हे
आमच्या पालनकर्त्या ! आम्हाला अत्याचारींच्या
अत्याचाराचे लक्ष्य बनवू नकोस.[१२७]

فَقَالُوْا عَلَى اللّٰهِ تَوَكَّلْنَا ۚ
رَبَّنَا لَا تَجْعَلْنَا فِتْنَةً لِّلْقَوْمِ الظّٰلِمِيْنَ ٨٥

८६. आणि आपल्या कृपेद्वारे आम्हाला काफीर
जन-समुहापासून मुक्ति दे.

وَنَجِّنَا بِرَحْمَتِكَ مِنَ الْقَوْمِ الْكٰفِرِيْنَ ٨٦

८७. आणि आम्ही मूसा व त्याच्या भावावर [१२८]
'वहय' (ईश-आदेश) अवतरीत केला की
आपल्या जन-समूहाकरीता मिस्त्र देशात काही
घरे प्राप्त करा [१२९] आणि आपल्या घरांना
किब्ला बनवून घ्या. [१३०] आणि नमाज़ कायम
करा [१३१] व ईमान बाळगणाऱ्यांना खुश खबरी
द्या. [१३२]

وَاَوْحَيْنَآ اِلٰى مُوْسٰى وَاَخِيْهِ اَنْ تَبَوَّاٰ لِقَوْمِكُمَا
بِمِصْرَ بُيُوْتًا وَّاجْعَلُوْا بُيُوْتَكُمْ قِبْلَةً وَّاَقِيْمُوا الصَّلٰوةَ ۗ
وَبَشِّرِ الْمُؤْمِنِيْنَ ٨٧

८८. आणि मूसा ने दुआ केली,हे आमच्या
पालनकर्त्या तू फिरऔन व त्याच्या सरदारांना
इहलोकीय जीवनात थाटमाट आणि माल सम्पत्ति
प्रदान केली आहे. हे पालनकर्त्या यासाठी की
त्यांनी तुझ्या मार्गपासून (लोकांना) बहकवावे
[१३३] हे आमच्या पालनकर्त्या ! यांची मालमत्ता
नष्ट कर आणि यांच्या हृदयाला असे कठीण
कर की त्यांनी ईमान न बाळगावे, येथपावेतो
की दु:खदायक शिक्षेस बघावे. [१३४]

وَقَالَ مُوْسٰى رَبَّنَآ اِنَّكَ اٰتَيْتَ فِرْعَوْنَ وَمَلَاَهٗ زِيْنَةً
وَّاَمْوَالًا فِى الْحَيٰوةِ الدُّنْيَا ۙ رَبَّنَا لِيُضِلُّوْا عَنْ سَبِيْلِكَ ۚ رَبَّنَا
اطْمِسْ عَلٰٓى اَمْوَالِهِمْ وَاشْدُدْ عَلٰى قُلُوْبِهِمْ فَلَا يُؤْمِنُوْا حَتّٰى
يَرَوُا الْعَذَابَ الْاَلِيْمَ ٨٨

८९. फर्माविले, तुम्हा दोघांची दुआ कबूल केली गेली
[१३५] तुम्ही स्थैर्यशील रहा आणि अशा लोकांचा
मार्ग अनुसरु नका जे जाणात नाहीत.[१३६]

قَالَ قَدْ اُجِيْبَتْ دَّعْوَتُكُمَا فَاسْتَقِيْمَا وَلَا تَتَّبِعٰٓنِّ سَبِيْلَ
الَّذِيْنَ لَا يَعْلَمُوْنَ ٨٩

१२६. म्हणजे तुमचे ईमान धारक असण्याची व स्वत:ला अल्लाहच्या हवाली करण्याची निकड अशी की तुमचा भरवसा अल्लाहवरच असावा फिरऔनच्या अत्याचारी कारवायांची पर्वा न करता तुम्ही सत्यावर अटळ राहीले पाहीजे आणि हा दृढविश्वास राखला पाहिजे की कार्याची परिणती व सफलता ईमान बाळगणाऱ्या करीताच आहे.

अल्लाहवर भरवसा जेव्हा माणसाचा खरोखर बौद्धिक निर्णय असतो तेव्हा त्याच्या अंगी समाधानाची स्थिति निर्माण होते.जी प्रतिकूल परिस्थितीत मोमीन (ईमान बाळगणाऱ्या) चे सर्वात मोठे संरक्षक शस्त्र होय.

१२७. हजरत मूसा यांच्या जन-समूहाने अल्लाहवर दृढविश्वास व्यक्त करीत दुआ केली की ईश्वर या अत्याचारीना असे वर्चस्व प्रदान करु नकोस त्यांनी आम्हाला आपल्या अत्याचार पूर्वक कारवायां करीत लक्ष्य बनवावे.

१२८. म्हणजे हजरत हारुन यांच्यावर, जे प्रेषित होते.

१२९. म्हणजे काही घरांना मस्जिद म्हणून विशेष करा. संभवत: मिस्त्र देशात पूर्वीपासून मस्जिदी राहिल्या नसाव्यात ज्याचे कारण शक्यतो हेच असावे की फिरऔनने याची परवानगी दिलेली नसावी आणी हजरत मूसा यांना ईश्वराने प्रेषित म्हणून पाठविल्यानंतर ज्याअर्थी बनी इस्त्राईलला मिस्त्र देशातून निघून जायचे होते म्हणून तेथे कायम स्वरुपी मसजिदी उभारण्याची गरज नव्हती. यास्तव घरांना विशिष्ट करुन त्यांना तात्पुरत्या स्वरुपाच्या मसजिदी ठरविण्याचा आदेश दिला गेला अशासाठी की-जमातसह पढल्या जाणाऱ्या नमाज़चा ईतमाम राखला जावा.

यावरुन हे मार्गदर्शन लाभते की जर एखाद्या ठिकाणी मस्जिदी उभारणे शक्य नसेल तर एखाद्या घराला किंवा मदरसा (शाळे) ला तात्पुरती मस्जिद ठरविले जाऊ शकते अशासाठी की जमातीसह पढल्या जाणऱ्या नमाज़ची शक्य ती स्थिति अंगिकारली जावी.

१३०. हे हजरत मूसा यांच्या जन-समूहास उद्देशून आहे. आणि कबिल्याशी अभिप्रेत इबादत-केंद्र होय- आणि अल्लाहच्या वाणीचा अर्थ केवळ अल्लाहच चांगल्या प्रकारे जाणतो-की या घरांना नमाज़ करीता केंद्र बनावा व तात्पुरत्या स्वरुपाची मस्जिद म्हणून वापरा.

१३१. स्पष्ट झाले की नमाज़ कायम करणे हज़रत मूसा यांच्या शरीअतीच्या एक महत्वपूर्ण स्तंभ होता आणि बनी इस्त्राईल फिरऔनच्या गुलामीत जीवन जगत होते, असे असतांनाहि त्यांना नमाज़ वक्तशीर पणे अदा करण्याचा आदेश दिला गेला होता. परंतु विद्यमान तौरात मध्ये स्पष्टपणे याचा उल्लेख नाही तथापि मिस्त्र देशात बनी इस्त्राईलच्या ईश्वरासमोर सजदामय होणयाचा उल्लेख आहे. तौरात...... मध्ये असा उल्लेख आहे की- 'हे ऐकून मस्तके लवून दंडवत घातले.(निर्गमन १२-२७)

१३२. हे हजरत मूसा यांना उद्देशून आहे.त्याना अशी आज्ञा दिली गेली की ईमान बाळगणाऱ्यांना, जे अल्लाहवर भरवसा करुन फिरऔनच्या विरोधात अटळ राहीलेत व नमाज़ कायम करीत आहेत यशाचा शुभसमाचार द्या अशासाठी की त्यांचे धैर्य वृद्धिंगत व्हावे.

१३३. ही अशीच गोष्ट होय जसे एखाद्या मनुष्याने एखाद्या अपात्र शिष्याविषयी त्याच्या शिक्षकास असे म्हणावे की आपण याला अशासाठी शिकवले होते की त्याने परीक्षेत नापास व्हावे उघड आहे, ही गोष्ट परिणाम दृष्ट्या म्हटली जाते, हेतुच्या दृष्टीने नव्हे, हज़रत मूसा यांच्या या कथनाचा अर्थ देखील हाच होय की ईश्वरा ! तू ही भौतिक साधने फिरऔन व त्याच्या सरदारांना अशासाठी तर प्रदान केली नव्हती की लोकांना मार्गभ्रष्ट करण्याकरीता त्यांनी त्यांचा वापर करावा तथापि तुझ्या देणग्यांचा व प्रदानाचा ते अशा प्रकारे गैरफायदा उचलत आहेत की जणू त्यांना या गोष्टी याच हेतुस्तव दिल्या गेल्या होत्या.

१३४. ही दुआ हज़रत मूसा यांनी अशावेळी केली जेव्हा फिरऔन व त्याच्या सरदारांवर सत्याचे प्रमाण पूर्णत: कायम झाले होते आणि केवळ हटवादी पणामुळे ते यास कबूल करण्यास तयार झाले नाहीत.जेव्हा एखादा जन-समूह बंडखोरीच्या अंतिम मर्यादेप्रत पोहचतो तेव्हा तो एखाद्या सडक्या-कुजक्या प्रेतासमान होतो, ज्याच्या दुर्गंधी पासून वातावरणास स्वच्छ करण्याकरीता त्याला शक्य तितक्या लवकर जमीनीत दफन करणे आवश्यक ठरते. आणि अल्लाहचा हा नियम आहे की तो अशा जन समूहावर आपली शिक्षा अवतरीत करुन त्याच्या अस्तित्वापासून जमीनीला स्वच्छ करतो. हजरत मूसा यांची दुआ ह्याच ईश-नियामला व्यक्त करण्यासाठी होती.

१३५. ज्या अर्थी ही दुआ ईश-नियमाला व्यक्त करण्याकरीता होती व योग्य वेळी केली गेली होती म्हणून तत्क्षणी कबूल केली गेला. ही दुआ हज़रत मूसा यांनी केला होती व हज़रत हारुन या दुआत सहभागी होते.

१३६. म्हणजे ते नाही जाणत की जो मार्ग त्यांनी अंगिकारला आहे तो त्यांना जहन्नमकडे घेऊन जाणारा आहे.

९०. आणि आम्ही बनी ईस्त्राईलला समुद्र पार करुन दिले [१३७] मग फिरऔन व त्याच्या सैन्याने अत्याचार व वैरापायी त्यांचा पाठलाग केला [१३८] येथपावेतो की जेव्हा तो बुडू लागला तेव्हा तत्क्षणी पुकारु लागला मी ईमान बाळगले की त्या ईश्वराखेरीज ज्यावर बनी इस्त्राईलने ईमान बाळगले आहे, कोणीहि ईश्वर नाही आणि मी त्या लोकांमध्ये सामील आहे, जे मुस्लिम आहेत.[१३९]

وَجٰوَزْنَا بِبَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ الْبَحْرَ فَاَتْبَعَهُمْ فِرْعَوْنُ وَجُنُوْدُهٗ بَغْيًا
وَّعَدْوًا ۭ حَتّٰٓي اِذَآ اَدْرَكَهُ الْغَرَقُ ۙ قَالَ اٰمَنْتُ اَنَّهٗ لَآ اِلٰهَ اِلَّا
الَّذِيْٓ اٰمَنَتْ بِهٖ بَنُوْٓا اِسْرَاۗءِيْلَ وَاَنَا مِنَ الْمُسْلِمِيْنَ ۝٩٠

९१. आता ईमान बाळगतो ! [१४०] आणि याआधी तू अवज्ञा करीत राहीलास व उत्पातकारी बनलास.

اٰۗلْــٰٔنَ وَقَدْ عَصَيْتَ قَبْلُ وَكُنْتَ مِنَ الْمُفْسِدِيْنَ ۝٩١

९२. तेव्हा आज आम्ही तुझे शव वाचवू, अशासाठी की नंतरच्या लोकांकारीता तू (बोध) चिन्ह ठरावेस [१४१] आणि वस्तुस्थिती अशी की बहुतेक लोक आमच्या निशाण्यापासून असावध राहतात.

فَالْيَوْمَ نُنَجِّيْكَ بِبَدَنِكَ لِتَكُوْنَ لِمَنْ خَلْفَكَ اٰيَةً ۭ وَاِنَّ كَثِيْرًا
مِّنَ النَّاسِ عَنْ اٰيٰتِنَا لَغٰفِلُوْنَ ۝٩٢

९३. आम्ही बनी इस्त्राईलला फार चांगले स्थान दिले [१४२] आणि स्वच्छ शुद्ध उपजिविका प्रदान केली [१४३] मग त्यांच्याजवळ ज्ञान येऊन पोहचले असतांनाहि ते मतभेदात पडले.[१४४] निःसंशय, तुमचा पालनकर्ता कियामतीच्या दिवशी त्यांच्या दरम्यान त्या गोष्टींचा फैसला करील ज्याबाबत ते मतभेद करीत राहीलेत.

وَلَقَدْ بَوَّاْنَا بَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ مُبَوَّاَ صِدْقٍ وَّرَزَقْنٰھُمْ مِّنَ
الطَّيِّبٰتِ ۚ فَمَا اخْتَلَفُوْا حَتّٰى جَاۗءَھُمُ الْعِلْمُ ۭ اِنَّ رَبَّكَ يَقْضِيْ
بَيْنَھُمْ يَوْمَ الْقِيٰمَةِ فِيْمَا كَانُوْا فِيْهِ يَخْتَلِفُوْنَ ۝٩٣

९४. आणि जर तुम्हाला या (ग्रंथा) विषयी शंका असेल जो आम्ही तुमच्याकडे अवतरीत केला आहे तर त्या लोकांना विचारा जे पूर्वीपासून ग्रंथ वाचत राहीलेत [१४५] निःसंशय तुमच्या जवळ सत्य येऊन पोहचले आहे तुमच्या पालनकर्त्याकडून यास्तव तुम्ही कदापि शंका घेणाऱ्यांपैकी होऊ नका.

فَاِنْ كُنْتَ فِيْ شَكٍّ مِّمَّآ اَنْزَلْنَآ اِلَيْكَ فَسْــَٔـلِ الَّذِيْنَ يَقْرَءُوْنَ
الْكِتٰبَ مِنْ قَبْلِكَ ۚ لَقَدْ جَاۗءَكَ الْحَقُّ مِنْ رَّبِّكَ فَلَا تَكُوْنَنَّ
مِنَ الْمُمْتَرِيْنَ ۝٩٤

९५. आणि ना त्या लोकांपैकी व्हा ज्यांनी अल्लाहच्या आयतींना खोटे ठरविले अन्यथा तुम्ही नाश पावणाऱ्यांपैकी व्हाल.

وَلَا تَكُوْنَنَّ مِنَ الَّذِيْنَ كَذَّبُوْا بِاٰيٰتِ اللّٰهِ فَتَكُوْنَ مِنَ
الْخٰسِرِيْنَ ۝٩٥

१३७. बनी इस्त्राईलचा समुद्र पार करण्याचा किस्सा बायबल मध्येहि वर्णिला गेला आहे. सारांश असा की एका रात्री ईश्वरातर्फे फिरऔन वाल्यांवर असे संकट आले की त्या सर्वांचे पहिले अपत्य ठार झाले आणि मिस्त्र देशात मोठा हाहा:कार माजला. फिरऔन ने घाबरुन जाऊन मूसा व हारुन यांना बोलाविले व त्यांना बनी इस्त्राईल ला घेऊन निघून जाण्याची परवानगी दिली. हजरत मूसा बनी इस्त्राईल ला घेऊन रामसीस पासून जेथे त्यांच्या वस्त्या होत्या.निघाले व तेथून सक्कात पर्यंत पायी प्रवास केला. मग सक्कातहून कूच करुन ईताम पोहचले आणि ईताम पासून फी हैहरुत कडे जे बअल सफवानच्या समोर आहे वळले आणि मिजदाल स्थानी थांबून फी हैहरुतच्या समोरुन कूच केले आणि समुद्राच्या मधून निघून अशा (सीना वाळवंटात) दाखल झाले. बायबल मध्ये हे स्पष्टीकरणहि आहे की मिस्त्रहून पॅलेस्टीन ला जाण्याकरीता जो जवळचा मार्ग होता त्या मार्गाने ईश्वराने त्यांना नेले नाही किंबहुना त्यांना मोठा फेरा घालायला लावून तांबड्या समुद्राच्या निर्जन मार्गाने नेले म्हणजे जवळचा मार्ग सोडून दूरचा मार्ग चांगल्या हेतुने अंगिकारला गेला होता.

हा किस्सा विस्तारपूर्वक खुरुज (Exdous) प्रकरण १२, १३, १४, १५ आणि गणना प्रकरण ३३ मध्ये वर्णिला गेला आहे. ज्या समुद्रास बनी इस्त्राईलने पार केले होते त्याचे नाव बायबलच्या मराठी भाषांतरामध्ये तांबडा समुद्र, उर्दू भाषांतरात बहरे क़ुलजूम, इंग्रजी भाषांतरामध्ये (Read Sea) आणि अरबी भांषातरात 'बहर सूफ' असे आहे. हे मूळ इबरानी नाव 'यम सूफ'चा अनुवाद आहे. इबरानी भाषेत 'यम' समुद्राला म्हणतात.त्या काळात सुएझ उपसागराच्या उत्तरेस एक लाहन समुद्र (Bitter Lakes) होता जो सुएझच्या उपासागराशी मिळालेला होता बनी इस्त्राईल संभवत: याच समुद्राला पार करुन सीना वाळवंटात दाखल झाले होते. बायबल मध्ये विविध ठिकाणांची जी नावे येतात ती आता परिचित राहीली नाहीत. यास्तव बायबलचे भाष्यकार देखील त्या स्थानाचा यथायोगय निर्देश करु शकत नाहीत जेथून बनी इस्त्राईल ने समुद्र ओलांडला होता ए डिक्शनरी ऑफ दि बायबल'चा संकलक लिहितो:

"The general opinion, however based on Constant Scripture representation, is that the sea crossed by the Israelites was the Gulf of Suez, probably at a point immediately north or just south of the Bitter Lakes. "

(A Dictionary of the Bible, by John D. Davis, London Edition, IV. p. 647-648)

काहीही असो. बनी इस्त्राईलची समुद्र ओलांडण्याची घटना सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे एक उघड चमत्कार (मुअजिजा) होता. अधिक स्पष्टीकरण पुढे सूरह शुअरा मध्ये येत आहे.

१३८.फिरऔन ने प्रथम बनी इस्त्राईल ला आपल्या देशातून जाण्याची परवानगी दिली परंतु नंतर जेव्हा मनात हा विचार आला की अशाप्रकारे तर आम्ही त्यांना आपल्या सेवेतून मोकळे केले तेव्हा आपल्या सैन्यासह त्यांचा पाठलाग केला. फिरऔन चे हे पाऊल अगदी अत्याचारपूर्वक व वैरभावावर आधारीत होते.

१३९. फिरऔनच्या या स्वीकृतीचा उल्लेख बायबलमध्ये नाही परंतु कुरआनने या पैलूस अशा प्रकारचे सादर केले आहे की फिरऔनच्या अगतिकतेचे चित्र डोंळ्यापुढे उभे राहते.

फिरऔन चीही स्वीकृती स्वभाव धर्माची अशी साद होती जिला त्याने स्वत:वर अत्याचार करुन दडपून ठेवले होते.परंतु जेव्हा त्याने मृत्यूला समोर पाहिले तेव्हा स्वभाव धर्म जागृत होऊन बोलू लागला. अर्थात सत्य ते जे प्रभाव दाखविल्या खेरीज राहत नाही. फिरऔन सारख्या अत्याचारी व बंडखोर बादशहला देखील शेवटी एकेश्वरवाद व इस्लाम ची सत्यता मान्य करावी लागली.

१४०. म्हणजे फिरऔन जेव्हा बुडू लागला तेव्हा त्याला फर्माविले गेले की जेव्हा मृत्यु समोर उभा आहे, ईमान बाळगण्याचा काहीहि लाभ नाही कारण परीक्षेचा अवधि संपला. आता फक्त परीणामाला तोंड द्यावयाचे आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपला हा नियम कुरआनात वर्णिला आहे की ईश-शिक्षेस पाहिल्यानंतर ईमान बाळगणे किंचितहि लाभद्रायक ठरत नाहि.

فَلَمْ يَكُ يَنْفَعُهُمْ إِيمَانُهُمْ لَمَّا رَأَوْا بَأْسَنَا ـ (سورہ مومنون ـ ٨٥)

''त्यांचे ईमान बाळगणे त्यांच्या काहीहि कामी आले नाहि जेव्हा त्यांनी आमच्या शिक्षेस बघितले.'' (अल् मोमीन-८५)

१४१. फिरऔनचे शव समुद्रात विरघळले नाही, किबहुना किनाऱ्यावर आले अशासाठी, लोकांनी त्याचे प्रेत पाहून बोध घ्यावा की अत्याचारीवर अल्लाहचा प्रकोप कसा कोसळतो आणि जे आपल्या मोठेपणाचा गर्व करतात त्यांचा कसा शेवट होतो. बायबलमध्ये या घटनेचे वर्णन पुढील प्रमाणे आहे:-

''परमेश्वर मोशेला म्हणाला, आपला हात समुद्रावर उगार म्हणजे पाणी पूर्वीसारखे जमून मिसऱ्यांवर, त्यांच्या रथांवर व स्वारांवर येईल मोशेने समुद्रावर आपला हात उगारिला तेव्हा दिवस उजाडल्यावर समुद्र परतवून त्याचा लोट पूर्वीसारखा वाहू लागला, त्यापुढे मिसरी लोक पळू लागले पण परमेश्वराने त्यांना समुद्रामध्ये उलथून पाडीले पाणी पूर्वीच्या जागेवर परत आले आणि रथ घोडे आणि फारोची सर्व सेना जी त्यांच्या पाठीस लागून समुद्रामध्ये गेली होती ती सर्व त्यात गडप झाली.

त्यातला एकहि वाचला नाही पण इस्राईल लोक भर समुद्रात कोरड्या जमीनीवरुन चालून गेले आणि उजवीकडील व डावीकडील पाणी त्यांच्यासाठी भिंतीसारखे झाले. अशा प्रकारे परमेश्वराने त्या दिवशी मिसऱ्यांच्या हातातून इस्राईल लोकांना तारिले आणि मिसरी लोक समुद्र तीरी मरुन पडलेले इस्राईलांनी पाहिले. परमेश्वराने मिसऱ्यांना आपला प्रबळ हात दाखविला तो इस्राईलांनी पाहिला तेव्हा त्यांनी परमेश्वराचे भय धरिले आणि परमेश्वरावर आणि त्याचा सेवक मोशे याच्यावर विश्वास ठेविला.'' (निर्गमन:१४:२६ ते ३१)

बायबलच्या भाष्यकाराने बनी इस्राईल च्या अवागमनास १३०० इ.स. पूर्वीची घटना दर्शाविले आहे आणि असे लिहीले आहे की हा फिरऔन संभवत: रम्सेस-दुय्यम (Raamses II) होता (Peak's Commentary on the Bible-Newyork p.115)

आणि रम्सेस दुय्यमची ममी आज देखील काहिरा (कैरो) च्या प्राणीसंग्रहालयात आहे आणि आपल्या अवस्थेच्या भाषेत जणू सांगत आहे-

देखो मुझे जो दीद ए इबरत निगाह हो' (बोध प्राप्त करणारी दृष्टी असेल तर मला पहा )

His mummy is now in the museum at Bulak (A Dictionary of the Bible ... word Pha'raoh- Page-600)

१४२. चांगल्या ठिकाणाशी अभिप्रेत सीरीया व पॅलेस्टीन चा भूभागहि होय व प्रतिष्ठेचे स्थानाहि अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १९६ व १९७.

१४३. हा संकेत त्या ईश-देणग्यांकडे आहे ज्या त्यांना पॅलेस्टीन च्या भूमीत प्रदान केल्या गेल्या. बायबलमध्ये अनेक ठिकाणी या देशाची अशी स्तुती केले गेली आहे की तेथे दूध,मध वाहते उदाहरणार्थ पहा निर्गम-३:८

१४४. ज्ञानाशी अभिप्रेत धर्म आणि शरीअत संबंधीचे ज्ञान होय येथे हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की बनी इस्राईलच्या दरम्यान धर्म आणि शरीअत संदर्भात जे मतभेद निर्माण झाले होते ते या कारणास्तव नव्हते की त्यांना या गोष्टीचे उचित ज्ञान दिले गेले नव्हते. किंबहुना तौरात आणि प्रेषितांद्वारे त्यांचे योग्य असे मार्गदर्शन केले गेले होते व त्यांना हे स्पष्ट समजाविले गेले होते की खरा धर्म कोणता, अल्लाहचे आदेश कोणते व त्यांची मुक्ति कोणत्या गोष्टीवर आधारीत आहे परंतु या स्पष्ट शिकवणी नंतरहि त्यांनी मतभेदाचा मार्ग अंगिकारला.

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा-सूरह आले इमरान टीप क्र. अ.१३७ आणि सूरह बय्यिना टीप क्र.७)

१४५. ज्या वेळी ही सूरह अवतरली त्यावेळी फार थोड्या लोकांनी क़ुरआनावर ईमान बाळगले होते आणि एक भली मोठी संख्या अशा लोकांची होती जी संशयात पडली होती. ज्याअर्थी ते एका अशा जनसमूहाशी संबंधित होते ज्याच्या जवळ अल्लाहचा एखादा ग्रंथ पहिल्यापासून नव्हता, म्हणून त्यांना हे मान्य करण्यात शंका होत होती की खरोखर सर्वश्रेष्ठ अल्लाह ग्रंथ अवतरीत करतो आणि हे की कुरआन अल्लाहची वाणी आहे. त्यांची ही शंका दूर करण्या करीता येथे फर्माविले गेले की कुरआन हा काही पहिलाच ग्रंथ नाही, जो अल्लाहतर्फे अवतरीत झाला असावा,किंबहुना यापूर्वीहि सर्वश्रेष्ठ अल्लाह ग्रंथांचे अवतरण करीत राहीला आणि तुमच्या दरम्यान ग्रंथ बाळगणारे तर हजर आहेतच, जे तौरात चे पठीण करीत असतात, त्यांच्या द्वारे या गोष्टीची सत्यता सिद्ध होऊ शकेल की सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या दासांच्या मार्गदर्शनाकरीता ग्रंथांचे अवतरण करीत राहीला आणि यांच्यात जे लोक सत्य-प्रिय आहेत ते कुरआन ईश-ग्रंथ असण्याची सत्यता दर्शवतील. कारण जो मनुष्य ईश-ग्रंथाशी परिचित असेल तो क़ुरआन श्रवण करताच हे ओळखेल की ही ईश्वराची वाणी होय.




**बनी इस्त्राईलच्या निर्गमनाचा मार्ग**

सुएझ व 'मुर्रा' उपसागर त्या काळात संलग्न होते. नंतरच्या काळात दोघांच्या दरम्यान खुशकीचा हिस्सा वर आला आणि आजच्या काळात सुएझ कालव्या द्वारे सुएझ उपसागर भूमध्य समुद्राशी जोडले गेले. या संपूर्ण उपसागराला तांबडा समुद्र' देखील म्हटले जाते आणि 'बहरे अहमर'(Read Sea)देखील.

ज्या स्थानातून बनी इस्त्राईल ने समुद्र पार केला त्याचे नाव बायबल मध्ये 'फीहैहरुत' (बाल सफून व मजदाल समोर)असे आहे हे नाव आता परिचित नाही म्हणून त्याचे योग्य स्थान जाणून घेणे अवघड आहे. तरी देखील असे अनुमान आहे की 'मुर्रा' उपसागरा (तांबड्या समुद्राचा एक हिस्सा) ला पार करुन ते सीना' वाळवंटात दाखल झाले असतील आणि फिरऔन 'मुर्रा' उपसागरात बुडला असेल. अल्लाह सर्व ज्ञानी आहे.

९६. निःसंशय ज्या लोकांवर तुमच्या पालन कर्त्याचे फर्मान लागू पडले आहे ते कदापि ईमान बाळगणार नाहीत. [१४६]

إِنَّ الَّذِينَ حَقَّتْ عَلَيْهِمْ كَلِمَتُ رَبِّكَ لَا يُؤْمِنُونَ ﴿٩٦﴾

९७. जरी त्यांच्याजवळ प्रत्येक प्रकारच्या निशाण्या याव्यात, जोपर्यंत ते दुःखदायक शिक्षा बघून घेत नाहीत.

وَلَوْ جَاءَتْهُمْ كُلُّ آيَةٍ حَتَّىٰ يَرَوُا الْعَذَابَ الْأَلِيمَ ﴿٩٧﴾

९८. मग असे का झाले नाही की एखाद्या वस्तीने ईमान बाळगले असते व तिचे ईमान बाळगणे तिच्याकरीता लाभप्रद ठरले असते, एक यूनुस च्या जनसमूहाखेरीज, की जेव्हा त्याने ईमान बाळगले तेव्हा आम्ही त्याच्यावरुन इहलोकीय जीवनात अवहेलनेच्या शिक्षेस दूर सारले. [१४७] आणि एका मुदतीपर्यंत त्यास (जीवन-सामुग्री पासून) लाभ घेण्याचा अवसर दिला.

فَلَوْلَا كَانَتْ قَرْيَةٌ آمَنَتْ فَنَفَعَهَا إِيمَانُهَا إِلَّا قَوْمَ يُونُسَ
لَمَّا آمَنُوا كَشَفْنَا عَنْهُمْ عَذَابَ الْخِزْيِ فِي الْحَيَاةِ الدُّنْيَا
وَمَتَّعْنَاهُمْ إِلَىٰ حِينٍ ﴿٩٨﴾

९९. जर तुमच्या पालनकर्त्याने इच्छिले असते तर पृथ्वीतलावर जेवढे लोक आहेत त्या सर्वांनी ईमान बाळगले असते मग काय तुम्ही लोकांना विवश कराल की त्यांनी मोमीन (ईमान बाळगणारे) व्हावे ?[१४८]

وَلَوْ شَاءَ رَبُّكَ لَآمَنَ مَنْ فِي الْأَرْضِ كُلُّهُمْ جَمِيعًا ۚ أَفَأَنْتَ تُكْرِهُ
النَّاسَ حَتَّىٰ يَكُونُوا مُؤْمِنِينَ ﴿٩٩﴾

१००. आणि अल्लाहच्या हुकुमशिवाय ईमान बाळगणे हे कोणा व्यक्तीकरीता शक्य नाही, आणि तो अशा लोकांवर मलीनता टाकतो जे बुध्दीने काम घेत नाहीत.[१४९]

وَمَا كَانَ لِنَفْسٍ أَنْ تُؤْمِنَ إِلَّا بِإِذْنِ اللَّهِ ۚ وَيَجْعَلُ الرِّجْسَ
عَلَى الَّذِينَ لَا يَعْقِلُونَ ﴿١٠٠﴾

१०१. (त्यांना) सांगा, पहा आकाशात व जमीनीवर कशा कशा वस्तू आहेत.[१५०] तथापि जे लोक ईमान बाळगूच इच्छित नाही त्यांच्या करीता निशाण्या व ताकीदी किंचितहि लाभदायक होऊ शकत नाही.

قُلِ انْظُرُوا مَاذَا فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۚ وَمَا تُغْنِي الْآيَاتُ
وَالنُّذُرُ عَنْ قَوْمٍ لَا يُؤْمِنُونَ ﴿١٠١﴾

१४६. अभिप्रेत सर्वश्रेष्ठ अल्लाहचे ते फर्मान होय जे या सूरहच्या आयत क्र. ३३ मध्ये वर्णिले गेले आहे आणि ज्याचे स्पष्टीकरण टीप क्र.६० मध्ये केले गेले आहे.

१४७. म्हणजे ज्या ज्या वस्तीत प्रेषित पाठविला गेला, ती वस्ती सामूहीक रुपाने तो पर्यंत ईमान धारक झाली नाही जोपर्यंत अज़ाब (ईश-शिक्षा) प्रकट झाली नाही, आणि ईश-शिक्षा प्रकट झाल्यावर तिचे ईमान बाळगणे निरर्थक होते. कारण त्यावेळी कर्म-अवधि संपली होती. तथापि सम्पूर्ण इतिहासात एक उदाहरण हजरत युनूस यांच्या जन-समूहाचे मिळते, ज्याने ईश-शिक्षा प्रकट होण्या आधी ईमान बाळगले म्हणून अल्लाहने त्यास अपमान जनक शिक्षेपासून वाचविले.हजरत युनूस यांचे नाव बायबलमध्ये योनाह असे आहे. हे इस्राईली प्रेषित होते. आणि त्यांना नेनवा येथे पाठविले गेले होते जे इराक मध्ये दजला किनारी मौसल शहराजवळ वसले होते व जी आशूरींची राजधानी होती. हा जन-समूह बिघाड-स्थितीत होता, यास्तव त्याच्यासमोर सत्य-आवाहन सादर करण्याकरीता हजरत युनूस यांना पाठविले गेले होते ही घटना सुमारे आठव्या इसवी शतका पूर्वीची आहे.

१४८. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह अन आम टीप क्र.२०० व २०१ तसेच सूरह मायदा टीप क्र.१५९ व सूरह बकरा टीप क्र.४१७.

१४९. म्हणजे ईमानाचा मामला अल्लाहने दिलेल्या सुबुद्धिवर अवलंबून आहे आणि ही सुबुद्धि केवळ अशाच लोकांना लाभते जे बुद्धिचा वापर करतात परंतु जे अकलेने काम घेत नाहीत त्यांच्या मन-मस्तिष्कावर अल्लाह मलीनता टाकतो म्हणूनच त्यांच्यात वाईट विचार निर्माण होऊ लागतात. याच कारणास्तव ईश्वराकडे निकृष्ट गोष्टींचा संबंध दाखविण्यात व मनुष्य-जीवनाबाबत किळसवाण्या कल्पना मांडण्यात त्यांना कसलाहि संकोच वाटत नाही. अनेकेश्वर वादी धर्मीयांची देवमाला कल्पना, आधुनिक संस्कृतीचा ध्वज उंचविणाऱ्यांची नितीमत्तेचा नाश करणारी संस्कृति भौतिक वाद्यांचा हा दृष्टीकोन की मनुष्य आर्थिक प्राणी आहे. तसेच भोगवाद्यांची लैंगिकतेविषयीची कल्पना ही सर्व कुविचारसरणीची स्पष्ट उदाहरणे होत.

१५०. क़ुरआन प्रत्येक माणसाला या गोष्टीचे आवाहन करते की त्याने उघड्या डोळयांनी ताऱ्यांनी व्यापलेल्या आकाशाचे व ईश देणग्यांनी ओतप्रोत अशा जमीनीचे अवलोकन करावे अर्थात हे अवलोकन आपल्या माहितीत वाढ करण्यासाठी नव्हे, किंबहुना सत्य-ज्ञान प्राप्त करण्याच्या हेतुने केले पाहीजे. म्हणजे याचे मूलभूत उद्दिष्ट सृष्ट-निर्मात्याची ओळख प्राप्त करणे हे असावे तसेच हे जाणून घेणे की आकाश व जमीनीच्या निर्मितीचा जो उद्देश कुरआन दर्शविते व मनुष्याला ज्या गोष्टीचे आवाहन करते त्याची सत्यता सृष्टी-चिन्हांद्वारे सिद्ध होते किंवा नाही.

या शास्त्रीय युगात भूशास्त्र व खगोल शास्त्राच्या विद्वानांनी आश्चर्यजनक गोष्टी प्रकट केल्या आहेत आणी माणसापुढे ज्ञानाचे ढीग रचले आहेत परंतु ते सत्य-ज्ञानापासून अगदी वंचित आहेत कारण सृष्टीचा अभ्यास ते योग्य ॲप्रोच (Approach) सह करीत नाही.

# यूनुस जन-समूहाची वसाहत



*मग आम्ही आपल्या प्रेषितांना आणि ईमान बाळगणाऱ्यांना वाचवितो- आम्ही असेच करीत राहीलो, आमचे हे कर्तव्य आहे की ईमान बाळगणाऱ्यांना वाचवावे. (अल-क़ुरआन)*

१०२. ज्या प्रकारचे दिवस यांच्यापूर्वीच्या लोकांवर येऊन गेलेत त्याच प्रकारचे दिवस आपल्यावरहि यावेत या खेरीज हे लोक कोणत्या गोष्टीची वाट बघत आहेत ?[१५१] सांगा,तुम्ही प्रतिक्षा करा व मी देखील तुमच्या सोबत प्रतिक्षा करतो.

فَهَلْ يَنْتَظِرُونَ إِلَّا مِثْلَ أَيَّامِ الَّذِينَ خَلَوْا مِنْ قَبْلِهِمْ ۚ قُلْ
فَانْتَظِرُوا إِنِّي مَعَكُمْ مِنَ الْمُنْتَظِرِينَ ﴿١٠٢﴾

१०३. मग आम्ही आपल्या प्रेषितांना आणि ईमान बाळगणाऱ्यांना वाचवितो- आम्ही असेच करीत राहीलो, आमचे हे कर्तव्य आहे की ईमान बाळगणाऱ्यांना वाचवावे.[१५२]

ثُمَّ نُنَجِّي رُسُلَنَا وَالَّذِينَ آمَنُوا ۚ كَذَٰلِكَ ۚ حَقًّا عَلَيْنَا نُنْجِ
الْمُؤْمِنِينَ ﴿١٠٣﴾

१०४. सांगा, लोकहो ! जर तुम्ही माझ्या धर्मा बाबतीत साशंक असाल तर (ऐका ) की मी त्यांची उपासना करीत नाही ज्यांची उपासना तुम्ही अल्लाहला सोडून करता, [१५३] किंबहुना मी अल्लाहची उपासना करतो जो तुम्हाला मरण देतो [१५४] आणि मला हा आदेश दिला गेला आहे की मी ईमान बाळगणाऱ्यांपैकी व्हावे.[१५५]

قُلْ يَا أَيُّهَا النَّاسُ إِنْ كُنْتُمْ فِي شَكٍّ مِنْ دِينِي فَلَا أَعْبُدُ
الَّذِينَ تَعْبُدُونَ مِنْ دُونِ اللَّهِ وَلَٰكِنْ أَعْبُدُ اللَّهَ الَّذِي
يَتَوَفَّاكُمْ ۖ وَأُمِرْتُ أَنْ أَكُونَ مِنَ الْمُؤْمِنِينَ ﴿١٠٤﴾

१०५. आणि हे की तुम्ही आपले तोंड यथायोग्य रित्या या धर्माकडे वळवा [१५६] आणि कदापि अनेकेश्वर वाद्यांपैकी होऊ नका.

وَأَنْ أَقِمْ وَجْهَكَ لِلدِّينِ حَنِيفًا وَلَا تَكُونَنَّ مِنَ
الْمُشْرِكِينَ ﴿١٠٥﴾

१०६. आणि अल्लाह शिवाय अन्य कोणालाहि साद घालू नका [१५७] जो ना तुम्हाला लाभ पोहचवू शकतो, ना नुकसान आणि जर तुम्ही असे कराल तर अत्याचारींपैकी व्हाल. [१५८]

وَلَا تَدْعُ مِنْ دُونِ اللَّهِ مَا لَا يَنْفَعُكَ وَلَا يَضُرُّكَ ۖ فَإِنْ
فَعَلْتَ فَإِنَّكَ إِذًا مِنَ الظَّالِمِينَ ﴿١٠٦﴾

१०७. आणि जर अल्लाह तुम्हाला एखाद्या संकटात टाकील तर त्याच्याशिवाय कोणी नाही जो संकट दूर करील आणि जर तो तुमच्या हक्कात भलेपणा इच्छिल तर त्याच्या कृपेला रोखणाराहि कोणी नाही. आपल्या दासांपैकी तो ज्याला इच्छितो कृपेने उपकृत करतो तो माफ करणारा व दया करणारा आहे. [१५९]

وَإِنْ يَمْسَسْكَ اللَّهُ بِضُرٍّ فَلَا كَاشِفَ لَهُ إِلَّا هُوَ ۖ وَإِنْ يُرِدْكَ
بِخَيْرٍ فَلَا رَادَّ لِفَضْلِهِ ۚ يُصِيبُ بِهِ مَنْ يَشَاءُ مِنْ عِبَادِهِ ۚ وَهُوَ
الْغَفُورُ الرَّحِيمُ ﴿١٠٧﴾

१५१. म्हणजे पूर्वी होऊन गेलेल्या जन-समूहांवर जेव्हा प्रेषितांद्वारे सत्य चांगल्या प्रकारे स्पष्ट झाले व तद्नंतरहि त्या जन समूहांनी ईमान बाळगले नाही तेव्हा त्यांना विनाशाचे दिवस बघावे लागले.त्याचप्रमाणे या लोकांवरहि प्रेषितांद्वारे सत्य स्पष्ट झाले आहे. आता जर हे ईमान बाळगत नाहीत तर याचा देखील हाच परिणाम निघतो की त्यांनी विनाशाला तोंड द्यावे.

१५२. अभिप्रेत निर्णायक शिक्षेपासून वाचविणे होय. म्हणजे जेव्हा एखाद्या प्रेषिताद्वारे एखाद्या जन-समूहावर अल्लाहचे प्रमाण पूर्णत: प्रस्थापित होते व तो कुफ्र आणि बंडखोरी पासून परावृत्त होण्यास प्रवृत्त होत नाही तेव्हा इहलोकातच अल्लाहचा प्रकोप त्या जनसमूहास आपल्या तावडीत घेतो. अशा प्रसंगी अल्लाह आपल्या प्रेषितास व त्या लोकांना ज्यांनी त्यावर ईमान बाळगले असेल,शिक्षेच्या तावडीत येण्यापासून वाचवितो. पूर्वी होऊन गेलेल्या जन-समूहांवर जी ईश-शिक्षा कोसळली तेव्हा त्यांच्या प्रेषितांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्या वस्त्यांमधून शिक्षा येण्यापूर्वीच निघून जाण्याचा आदेश दिला होता,अशा प्रकारे प्रत्येक निर्णायक शिक्षेच्या वेळी तो प्रेषितास व त्याला साथ देणाऱ्या ईमान-धारकांना वाचवित राहिला. ज्याअर्थी हे वाचविणे सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्वत: आपल्यावर आवश्यक केले आहे म्हणून जर मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांवर ईश-शिक्षा कोसळली तर प्रेषित व ईमान बाळगणारे त्यापासून अवश्य वाचवले जातील.

स्पष्ट असावे की अरब देशीय अनेकेश्वरवादी हळू हळू ईमान बाळगत गेले म्हणून आद जनसमूह व समूद जनसमूहाप्रमाणे त्यांच्यावर ईश-शिक्षा आली नाही, किंबहुना यांच्या पैकी जे लोक कुफ्रनितीवर अडून राहिले त्यांच्या विनाशाचे साधन ईमान बाळगणाऱ्यांच्या तलवारीद्वारे बद्र आणि हुनैन सारख्या युद्धात केले गेले.

१५३. येथे पैगंबराना हा आदेश दिला गेला की त्यानी धर्मसंदर्भात आपली भूमिका स्पष्टपणे व उघडउघड प्रस्तुत करावी. हा अदेश जसा पैगंबर करीता आहे तसाच तो त्यांच्या अनुयायी करीताहि आहे. यास्तव मुसलमानाने आपली धार्मिक भूमिका उघडपणे व्यक्त केली पाहिजे. इतर धर्मीयांना खुश करण्याकरीता, धर्मसंदर्भात सारवासारव करणे, शुद्ध एकेश्वरवादास प्रस्तुत करण्यात संकोच बाळगणे की कदाचित अनेकेश्वरवादी कपाळाला आठ्या न घालोत, तसेच अनेकेश्वरवादी रीती रिवाजांशी उदारता पाळणे त्या आदेशाविरुद्ध आहे जो आयतीत दिला गेला आहे.

१५४. म्हणजे मी केवळ त्या ईश्वरची उपासना करतो जो तुमचे प्राण ताब्यात घेतो. यात ईश्वराच्या एकमेव उपास्य असण्या संबंधी पुरावा आहे. जेव्हा ही एक इन्कार न करण्याजोगी हकीगत आहे की मृत्यु अल्लाह शिवाय कोणाच्याही आखतियाराची बाब नाही तर मग अल्लाह एवजी अन्य एखादे उपास्य (दैवत) कसे होऊ शकते?

१५५. ही गोष्ट प्रेषित मुखाने वदविण्याचा हैतु हे स्पष्ट करणे होय की पैगंबराचे मोमीन (ईमान धारक) असणे व ईमान धारकांच्या समुदायात सामील असणे ईश्वर आज्ञेचे पालन होय. म्हणून हा विचार करणे अगदी चुकीचे व वस्तुस्थितीच्या विरुद्ध आहे की पैगंबरानी आपल्या तर्फे ईमान व कुफ्रचा विवाद उभा केला आहे आणि मानव-जातीस मोमीन व काफीर हया दोन पंथात विभागले आहे.

१५६. म्हणजे इस्लाम धर्मावर तुम्ही आपली दृष्टी टिकवा प्रत्येक दिशेने एक होऊन या धर्माशी एकनिष्ठता राखा व अन्य कोणत्याहि धर्म वा अधर्माकडे किंचितहि झुकु नका. तुमच्या श्रद्धेत व आचरणात शिर्क (द्वैत) चा लवलेशहि येता कामा नये.

१५७. साद घालण्याशी अभिप्रेत गरजपूर्ति,न्याय-याचना,मदत व सहाय्याकरीता आर्जव करणे होय. कोणाच्याहि बाबतीत, मग ती मूर्ति असो वा कबर. फरीश्ता असो वा जिन्न, प्रेषित असो वा वली या धारणेने आपली गरज भागविण्याकरीता त्यास पुकारणे की या सृष्टी-व्यवस्थेत उपजिविका पोहचविणे इत्यादि संबंधाने त्यालाहि काही अखत्यार आहे आणि तो अपरोक्षात राहून संबंधाने ऐकतो व मदत पोहचवितो. पहिल्या प्रतीचे शिर्क होय मग असे कृत्य अनेकेश्वरवादी करोत किंवा मुसलमान.

१५८. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून एवढी सक्त ताकीद अशासाठी दिली गेली आहे की लोकांना ही गोष्ट स्पष्टपणे कळावी की शिर्क विरुद्ध पैगंबरानी जी कठोर भूमिका अंगिकारली आहे ती अल्लाहच्या मार्गदर्शनास अनुसरुन आहे अल्लाहच्या नियमान्वये शिर्क करणारा प्रत्येक मनुष्य जालीम (अत्याचारी) आहे माग तो कितीही मोठ्या व्यक्तिमत्वाचा का असेना येथे पैगंबराना संबोधून जे सांगितले गेले आहे तिचा उद्देश या नियमास स्पष्ट करणे होय.

१५९. तो माफ करणारा आहे म्हणून त्याच्याजवळ माफी मागा आणि तो दया करणारा आहे म्हणून त्याला दयेची विनवणी करा.

قُلْ يٰٓاَيُّهَا النَّاسُ قَدْ جَآءَكُمُ الْحَقُّ مِنْ رَّبِّكُمْ ۚ فَمَنِ
اهْتَدٰى فَاِنَّمَا يَهْتَدِيْ لِنَفْسِهٖ ۚ وَمَنْ ضَلَّ فَاِنَّمَا يَضِلُّ
عَلَيْهَا ۚ وَمَآ اَنَا عَلَيْكُمْ بِوَكِيْلٍ ﴿١٠٨﴾

१०८. सांगा लोकहो ! तुमच्या पालनकर्त्या तर्फे तुमच्याजवळ सत्य येऊन पोहचले आहे, तेव्हा जो मार्गदर्शन मान्य करील तो आपल्याच हिताकरीता करील आणि जो मार्गभ्रष्ट होईल तर त्याची मार्गभ्रष्टता त्याच्या (हिताच्या) विपरीत होईल आणि मी तुमच्यावर राखणदार म्हणून नियुक्त झालेलो नाही.[१६०]

وَاتَّبِعْ مَا يُوْحٰٓى اِلَيْكَ وَاصْبِرْ حَتّٰى يَحْكُمَ اللّٰهُ ۚ وَهُوَ خَيْرُ
الْحٰكِمِيْنَ ﴿١٠٩﴾

१०९. आणि (हे पैगंबर !) तुम्ही या 'वहय' (ईश-आदेशा) चे अनुसरण करा जी तुमच्याकडे केली जात आहे आणि संयम पाळा येथपावेतो अल्लाहने निर्णय करावा [१६१] आणि तो सर्वोत्कृष्ट निर्णय करणारा आहे.

१६०. म्हणजे माझ्यावर ही जबाबदारी टाकली गेली नाही की जबरदस्तीपूर्वक तुम्हाला सत्य-मार्गावर चालवावे.

१६१. आणि याच्या काहीच काळानंतर अल्लाहचा निर्णय जारी झाला तेव्हा पैगंबराच्या हस्ते शिर्कची पाळी मुळी खणली गेली व तौहीद (एकेश्वरवादा) चा ध्वज उंचावला. असत्य नामशेष झाले व सत्याचा बोलबाला झाला.

या ऐतिहासिक निर्णयानेहि जो प्रेषिताच्या सत्यतेचे स्पष्ट प्रमाण आहे, जर जगातील राष्ट्रे धडा देऊ इच्छित नाहीत तर मग त्यांनी ईश्वराच्या त्या निर्णयाची प्रतिक्षा करावी जो कियामतीच्या दिवशी सादर केला जाईल.

# सूरह हूद

# ११. सूरह हूद

**नाव:** आयत क्र. ५० ते ६० मध्ये प्रेषित हजरत हूद व त्यांच्या जनसमूहाचा वृत्तांत वर्णिला गेला आहे. तदनुषंगाने या सूरहचे नैव ‘सूरह हूद’ असे आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे आणि मजकूरांवर विचार करता असे दिसून येते की ही सूरह, सूरह यूनुसच्या आधी अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पना:** एकमेव ईश्वराच्या उपासनेचे व दास्यत्वाचे आवाहन अल्लाहचा प्रेषित प्रस्तुत करीत आहे त्याला रद्द करण्याच्या भीषण परिणिती पासून लोकांना खबरदार करणे या सूरहचा मजकूर सूरह यूनुसशी पूर्णत: सुसंगत आहे तथापि यात ताकीदचा पैलू एवढ्या तीव्रतेने समोर आला आहे की जणू प्रेषिताच्या विरोधकांवर ईश-प्रकोप कोसळण्याच्या बेतात आहे.

**आयात रचना:** आयत क्र.१ ते ४ प्रास्तविक स्वरुपाच्या आयती होत ज्यांत कुरआनाच्या आवाहनास पूरेपूर सादर केले गेले आहे.

आयत क्र.५ते २४ मध्ये आक्षेप घेणाऱ्यांच्या आक्षेपांना उत्तर दिले गेले आहे व त्यासोबतच सावधगिरीची ताकीद दिली गेली आहे.

आयत क्र.२५ ते ९९ मध्ये पैगंबरांच्या इतिहासाची काही पृष्ठे मांडली गेली आहेत अशासाठी की पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या संबोधितांनीहि त्या ओळीमध्ये आपल्या दशेचे पठण करावे.

आयत क्र. १०० ते १०८ मध्ये या घटनांद्वारे धडा शिकवित आखिरतच्या परिणती बाबत खबरदार केले गेले आहे आणि त्या भाग्यवान लोकांना ज्यानी ईमान बाळगून सदाचाराने वर्तन अंगिकारले, सदैव कालीन जन्नतची खुश खबरी दिली गेली आहे.

आयत क्र.१०९ ते १२३ उक्ति समाप्ति होय ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या साथीदारांना सांत्वना देत आवश्यक आदेश दिले गेले आहेत.

सुरहचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य: हदीस मध्ये उल्लिखित आहे:-

قَالَ اَبُوْ بَكَرٍ يَا رَسُوْلَ اللّٰهِ قَدْ شِبْتَ قَالَ شَيَّبَتْنِي هُوْدٌ وَالْوَاقِعَةُ وَالْمُرْسِلٰتُ وَ عَمَّ يَتَسَآءَلُوْنَ وَاِذَا الشَّمْسُ كُوِّرَتْ۔ (الترمذی ابواب فضائل القرآن)

“हजरत अबु बकर यांनी सांगितले, हे अल्लाहचे पैगंबर आपणास वृद्धावस्था प्राप्त होत चालली आहे. पैगंबरानी फर्माविले, मला सूरह हूद, वाकिआ, मुर्सलात, “अम्मा यतासा अलूना व इज़शम्सो कुव्विरत ” यांनी वृद्ध केले”.(अत्तिर्मिजी अब्वाब-फज़ाइले कुरआन)

हा संकेत या गोष्टीकडे आहे की सूरह हूद व यासारख्या सूरतींमध्ये ईश-प्रकोपाचे चित्र अशा रीतीने रेखाटले गेले आहे की हे मजुकर वाचतांना माणसाचे हृदय ईशभयाने कंपित होते आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची प्रभावित होऊन ही अवस्था झाली होती की त्यांची बाह्य शक्तिसामर्थ्ये देखील भयातिरेकाने प्रभावित झाली होती.

# ११. सूरह हूद

سُوْرَةُ هُوْدٍ

(आयती : १२३)

अनुवाद

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. 'अलीफ लाम रा' [१] हा एक असा ग्रंथ आहे ज्याच्या आयतींना परिपक्व बनविले गेले आहे. [२] मग त्यांना स्पष्टतः वर्णिले गेले आहे,[३] त्याच्याकडून जो अत्यंत हिकमत (बुद्धिकौशल्य) बाळगणारा व ज्ञाता आहे.[४]

الٓرٰ كِتٰبٌ اُحْكِمَتْ اٰيٰتُهٗ ثُمَّ فُصِّلَتْ
مِنْ لَّدُنْ حَكِيْمٍ خَبِيْرٍ ①

२. हे की तुम्ही अल्लाह शिवय अन्य कोणाचीहि उपासना करू नका,[५] मी त्याच्यातर्फे तुम्हाला खबरदार करणारा [६] व खुश खबरी देणारा आहे.[७]

اَلَّا تَعْبُدُوْٓا اِلَّا اللّٰهَ ۭ اِنَّنِيْ لَكُمْ مِّنْهُ نَذِيْرٌ وَّبَشِيْرٌ ②

३. आणि हे की तुम्ही आपल्या पालन कर्त्या जवळ माफी मागा व त्याच्याकडे याचना करा [८] तो तुम्हाला एका निर्धारीत अवधिपर्यंत चांगली जीवन-सामुग्री देईल.[९]आणि प्रत्येक प्रतिष्ठा बाळगणाऱ्यास आपल्या कृपेने उपकृत करील. [१०]परंतु जर तुम्ही तोंड फिरविता, तर मला तुमच्या बाबतील एका महान दिवसाच्या शिक्षेचे भय वाटते.[११]

وَّاَنِ اسْتَغْفِرُوْا رَبَّكُمْ ثُمَّ تُوْبُوْٓا اِلَيْهِ يُمَتِّعْكُمْ مَّتَاعًا حَسَنًا اِلٰٓى
اَجَلٍ مُّسَمًّى وَّيُؤْتِ كُلَّ ذِيْ فَضْلٍ فَضْلَهٗ ۭ وَاِنْ تَوَلَّوْا فَاِنِّىْٓ
اَخَافُ عَلَيْكُمْ عَذَابَ يَوْمٍ كَبِيْرٍ ③

४. तुम्हा सर्वांना अल्लाह कडेच परतावयाचे आहे आणि तो प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.

اِلَى اللّٰهِ مَرْجِعُكُمْ ۚ وَهُوَ عَلٰي كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ④

५. बघा, हे आपल्या छातींना वळवितात यासाठी की यापासून लपावे [१२] लक्षात ठेवा ! जेव्हा हे स्वतःला कपड्यांनी झाकून घेतात तेव्हा तो गोष्टीसहि जाणतो जी ते लपवित आहेत;व ती देखील जिला ते प्रकट करीत आहेत. तो तर मनातल्या भेदांनाहि जाणून आहे.

اَلَآ اِنَّهُمْ يَثْنُوْنَ صُدُوْرَهُمْ لِيَسْتَخْفُوْا مِنْهُ ۭ اَلَا حِيْنَ يَسْتَغْشُوْنَ
ثِيَابَهُمْ ۙ يَعْلَمُ مَا يُسِرُّوْنَ وَمَا يُعْلِنُوْنَ ۚ اِنَّهٗ عَلِيْمٌۢ
بِذَاتِ الصُّدُوْرِ ⑤

१. या अक्षरांचे स्पष्टीकरण सूरह यूनुस टीप क्र.१ मध्ये केले गेले आहे.

२. ज्या प्रकारे आकाश व जमीनीची व्यवस्था मजबूत आधारांवर कायम केली गेली आहे तद्वतच या ग्रंथात जी वचने सांगितली गेली आहेत ती अत्यंत ठोस प्रमाणे, दृढ सत्ये, उच्च शिकवणी विश्वव्यापी सत्ये आणि न्याय्य जीवन- नियामांवर आधारीत आहेत म्हणून यात वैगुण्याचा कोणताहि पैलू नाहि. आणि ज्या प्रमाणे यातील मजकूर मोजले-पाखरलेले आहेत त्याच प्रमाणे यातले शब्द देखील अत्यंत प्रसंगेचित (Most Appropriate) आहेत व त्याची रचना अर्थपूर्ण आहे. जणू प्रत्येक शब्द आपल्या जागी जडलेला हीरा आहे,ज्याला दुसरा कोणताहि पर्यायी शब्द असू शकत नाही. अर्थात याची खरी कल्पना केवळ तेच लोक करु शकतात ज्यांना अरबी भाषेची अभिरुची असावी. उदाहरणार्थ قُلْ هُوَاللّٰهُ اَحَدٌ **'कुल हुवल्लाहु अहद'** (सांगा अल्लाह अद्वितीय आहे) यात अहद (एकटा) हा शब्द सर्वात योग्य आहे. याच्या ठिकाणी जर कोणी वाहीद (एक) या शब्दाचा प्रयोग करु इच्छिल तर त्यामुळे अर्थाताहि बदल होईल व गेयेतेतहि. अशाच प्रकारे 'हम्द' हा शब्द प्रशंसा आणि कृतज्ञता या दोघांचाहि संग्राहक आहे परंतु जर कोणी 'अलहम्दु लिल्लाह'(अल्लाहकरीता प्रशंसा व कृतज्ञाता आहे) ऐवजी 'अश् शुक्रु लिल्लाह' (अल्लाह करीता कृतज्ञता आहे) असा प्रयोग करील तर सर्वकषता बाकी राहात नाही. तात्पर्य हे की ही वाणी अशी सुसंगत व परिपक्व आहे की कोणी योग्य मनुष्य ना याच्या शब्दांचा दोष काढू शकतो ना त्याने सादर केलेल्या शिकवणीत एखाद्या व्यंगाकडे अंगुली निर्देश करु शकतो.

क़ुरआनाचे हे उच्चतम वैशिष्ट्य होय आणि जगातील कोणतेही पुस्तक, विश्वधर्माचे पवित्र ग्रंथ देखील या वैशिष्ट्यांनी युक्त नाही.

३. क़ुरआनाच्या प्रारंभिक सूरतींमध्ये संकलनाने ईश-शिकवणीना प्रस्तुत केले गेले आहे. परंतु नंतरच्या सूरतींमध्ये यांचे स्पष्टीकरण व विवरण व त्यांच्या निकडी वर्णिल्या गेल्या आहेत उदा.सूरह 'इखलास' मध्ये तौहीद (एकेशवरवादा) चा विषय अत्यंत संक्षेपासह वर्णिला गेला आहे, परंतु सूरह अनआम व सूरह यूनुस मध्ये विस्तार व विवरणासह. सूरह फज्र मध्ये आद व समूद च्या घटनांकडे संकेत केला गेला' आहे परंतु सूरह हूद व सूरह अआराफ मध्ये ह्या घटना विस्तारपूर्वक वर्णिल्या गेल्या आहेत. सूरह गाशिया मध्ये जन्नत व दोज़खाचा संक्षिप्त परिचय मांडला गेला आहे परंतु सूरह वाकिआ व सूरह रहमान मध्ये विवरणासह. सूरह आला मध्ये नमाज़चा आदेश संक्षिप्तरित्या दिला गेला आहे परंतु सूरह बनी इस्राईल, सूरह बकरा व सूरह निसा मध्ये याचे विवरणात्मक आदेश वर्णिले गेले आहेत. अशा प्रकारे पवित्र क़ुरआन आपले भाष्य स्वत: करतो.

४. क़ुरआनच्या आयतींचे दृढ व सविस्तर असणे हे या गोष्टीचे प्रमाण होय की ही वाणी मानव-वाणी नव्हे किंबहुना ईश-वाणी होय. ज्याची प्रत्येक गोष्ट बुद्धिकौशल्य-युक्त असते. व जो प्रत्येक गोष्टीस चांगल्या प्रकारे जाणतो.

५. ही आहे क़ुरआनाची माणसाकडून सर्वप्रथम मागणी अल्लाहला एकमेव उपास्य मानून केवळ त्याचीच इबादत करणे (उपासना) करणे ते सर्वोच उदिष्ट होय, ज्यासाठी माणसाची निर्मिती झाली आहे. इबादत'(उपासने)ची वास्तविकता अशी की माणसाने आपल्या पालनकर्त्या समोर नम्रता व शालीनता व्यक्त करावी. इमाम राजी लिहीतात:

'इबादत'शी अभिप्रेत नम्रता व शालीनता आणि अत्याधिक हीनता व शिरसावंद्यता व्यक्त करणे होय. अर्थात ही गोष्ट अल्लाह खेरीज, जो निर्माता सृष्टी व्यवस्था राखणारा कृपाळू व उपकार कर्ता आहे, कोणालाहि शोभून दिसणार नाही.

(अत्तफसीरुल कबीर खंड-७ पृष्ठ-१८०)

माणूस जर खरोखर आपली हीनता व शिरसावंद्यता अल्लाह समोर व्यक्त करील व स्वत:ला आर्जव करणाऱ्या दासाच्या रुपाने सादर करील तर तो आचरणाच्या दृष्टीने अल्लाहचा विद्रोही व बंडखोर होऊच शकत नाही. उपासना व विद्रोह या दोन्ही गोष्टी अगदी परस्पर भिन्न आहेत. जो मनुष्य खरोखर अल्लाहची उपासना करणारा असेल तो अपरिहार्य पणे त्याचे आज्ञापालन अंगिकारील.(अधिक स्पष्टीकरणा करीता पहा सूरह फातिहा टीप क्र.७)

६. म्हणजे कुफ्र व विद्रोह आणि दुष्कृत्य व दुराचाराच्या वाईट परिणिती पासून सचेत करणारा आहे.

७. म्हणजे ईमान व दृढ विश्वास आणि आज्ञापालन व सद्वर्तना च्या चांगल्या परिणितीची खुश खबरी देणारा आहे.

८. म्हणजे जे शिर्क (अनेकेश्वर-उपासना) तुम्ही करीत राहीला, आणि दुराचाराचे जे जीवन तुम्ही व्यतीत करीत राहीलात, त्याबद्दल अल्लाह जवळ क्षमा-याचना करा आणि यापुढे आपले वर्तन सुधारा. ते अशा प्रकारे की प्रत्येक स्थितीत त्याच्याकडे रुजू करण्याचा व त्याचा विनम्र दास बनून जीवन व्यतीत करण्याचा मार्ग पत्करा.

९. म्हणजे या स्थितीत सर्वश्रेष्ठ अल्लाह तुम्हाला इहलोकाच्या सर्वोत्कृष्ट ईश-देणग्यांनी उपकृत करील आणि

नंतरच्या घटनांनी क़ुरआनच्या या वायद्याची सत्यता दर्शवली. ज्या लोकांनी शिर्क पासून तौबा करुन ईमान बाळगले व सद्वर्तन अंगिकारले त्यांचे ऐहिक जीवन बिघडले नाही,किंबहुना सुशोभित झाले व त्यांच्यावर ईश-देणग्यांचा असा वर्षाव झाला, ज्याची पूर्वी कल्पनाहि केली जाऊ शकत नव्हती.

१०. म्हणजे एकदा ईमान बाळगणारा आचरणाने स्वत:ला ज्या दर्जास पात्र असल्याचे सिद्ध करुन दाखविल, त्याला सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या दर्जाचा मान व प्रतिष्ठा प्रदान करील.

११. अभिप्रेत कियामतीचा दिवस होय.

१२. छातीला वळवणे अरबी भाषेचा वाक् प्रचार आहे ज्याचा अर्थ विमुख होणे असा आहे अर्थात हे कुरआनापासुन तोंड फिरवून असे समजत आहेत की अल्लाह त्यांच्या या हरकतीपासून अनभिज्ञ आहे, वस्तुत: अल्लाह पासून कोणतीही गोष्ट लपलेली नाही. त्यांना ह्या गोष्टीची जाण असती तर अल्लाहची वाणी ऐकण्यापासून त्यांनी उपेक्षा केली नसती.

*जमीनीवर असा कोणताही सजीव प्राणी नाही ज्याची उपजिविका अल्लाहच्या जिम्मे नसावी तो त्याच्या निवासाचे स्थानहि जाणतो व ते स्थान देखील जिथे तो सोपविला जातो. सर्व काही एका स्पष्ट ग्रंथात समाविष्ट आहे.(अल-कुर्आन)*

६. जमीनीवर असा कोणताही सजीव प्राणी नाही ज्याची उपजिविका अल्लाहच्या जिम्मे नसावी [१३] तो त्याच्या निवासाचे स्थानहि जाणतो व ते स्थान देखील जिथे तो सोपविला जातो. [१४] सर्व काही एका स्पष्ट ग्रंथात समाविष्ट आहे.[१५]

وَمَا مِن دَآبَّةٍ فِي الْأَرْضِ إِلَّا عَلَى اللَّهِ رِزْقُهَا
وَيَعْلَمُ مُسْتَقَرَّهَا وَمُسْتَوْدَعَهَا ۚ كُلٌّ فِي كِتَابٍ مُّبِينٍ ﴿٦﴾

७. आणि तोच होय ज्याने आकाशांना व जमीनीला (पृथ्वीला) सहा दिवसात निर्माण केले [१६] आणि त्याचे सिंहासन पाण्यावर होते [१७] अशासाठी की आचरणात कोण अधिक श्रेष्ठ आहे हे पारखावे.[१८] आणि जर तुम्ही असे म्हणता की मेल्यानंतर तुम्हा लोकांना (पुन्हा) उठविले जाईल तेव्हा काफिर लगेच म्हणतात की ही तर स्पष्ट जादू आहे.[१९]

وَهُوَ الَّذِي خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ فِي سِتَّةِ أَيَّامٍ وَكَانَ
عَرْشُهُ عَلَى الْمَاءِ لِيَبْلُوَكُمْ أَيُّكُمْ أَحْسَنُ عَمَلًا ۗ وَلَئِن قُلْتَ
إِنَّكُم مَّبْعُوثُونَ مِن بَعْدِ الْمَوْتِ لَيَقُولَنَّ الَّذِينَ كَفَرُوا إِنْ
هَٰذَا إِلَّا سِحْرٌ مُّبِينٌ ﴿٧﴾

८. आणि जर आम्ही एक निर्धारित मुदतीपावेतो शिक्षा लांबणीवर टाकतो तेव्हा ते म्हणू लागतात की कोणती गोष्ट आहे जी या (शिक्षे)ला रोखीत आहे? ऐका ज्या दिवशी ती येईल तेव्हा मात्र टाळली जाऊ शकणार नाही आणि ज्या गोष्टीची ते थट्टा उडवित आहेत तीच त्यांना येऊन घेरेल.[२०]

وَلَئِنْ أَخَّرْنَا عَنْهُمُ الْعَذَابَ إِلَىٰ أُمَّةٍ مَّعْدُودَةٍ لَّيَقُولُنَّ
مَا يَحْبِسُهُ ۗ أَلَا يَوْمَ يَأْتِيهِمْ لَيْسَ مَصْرُوفًا عَنْهُمْ وَحَاقَ بِهِم
مَّا كَانُوا بِهِ يَسْتَهْزِئُونَ ﴿٨﴾

९. आणि जेव्हा आम्ही माणसाला आपल्या कृपेने उपकृत केल्यानंतर त्यापासून वंचित करतो तेव्हा तो निराश आणि कृतघ्न होतो.

وَلَئِنْ أَذَقْنَا الْإِنسَانَ مِنَّا رَحْمَةً ثُمَّ نَزَعْنَاهَا مِنْهُ إِنَّهُ
لَيَئُوسٌ كَفُورٌ ﴿٩﴾

१०. आणि जर दु:ख-यातना पोहचल्यानंतर त्याला आम्ही सुख शांतीची गोडी चाखवितो तेव्हा म्हणू लागतो माझ्या सर्व दु:खंयातना दुर झाल्या तो घमेंड करु लागतो व शोखी मिरवू लागतो.[२१]

وَلَئِنْ أَذَقْنَاهُ نَعْمَاءَ بَعْدَ ضَرَّاءَ مَسَّتْهُ لَيَقُولَنَّ ذَهَبَ
السَّيِّئَاتُ عَنِّي ۚ إِنَّهُ لَفَرِحٌ فَخُورٌ ﴿١٠﴾

११. तथापि जे संयम पाळणारे व सत्कृत्ये करणारे आहेत त्यांची दशा अशी नाही. त्यांच्याकरीता माफी आहे, आणि फार मोठा मोबदला.

إِلَّا الَّذِينَ صَبَرُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ أُولَٰئِكَ لَهُم
مَّغْفِرَةٌ وَأَجْرٌ كَبِيرٌ ﴿١١﴾

१३. ही अशी वस्तुस्थिती आहे जी प्रत्येक व्यक्तिच्या अवलोकनात व अनुभवात येते. पृथ्वीतलावरील कोणताही सजीव प्राणी मग तो पशू असो वा पक्षी मासा असो वा मूंगी आणि मनुष्य असो वा श्वापद सर्व आपापल्या हिश्श्याची उपजिविका प्राप्त करतात. ही उपजिविका साधनाद्वारे प्राप्त होत असली तरी या साधनांना निर्माण करणारा व त्याद्वारे उपजिविका पोहचविण्याची अशी व्यवस्था करणारा की कोणताही सजीव जोपर्यंत जीवंत आहे उपजिविके पासून वंचित न रहावा, अल्लाहच्या खेरीज कोणाचे काम आहे? काय उपजिविका पोहचविण्याची ही सार्वभौम व्यवस्था या गोष्टीचे प्रमाण नव्हे की ज्याने जीवन प्रदान केले आहे तोच जीवंत राखण्याची सामुग्रीहि करीत आहे? आणि काय या स्पष्ट प्रमाणानंतर शिर्क व नास्तिकतेच्या खंडना करीता अन्य एखाद्या प्रमाणाची गरज शिल्लक राहते?

१४. म्हणजे अल्लाहला समस्त लहान सहान गोष्टीचे ज्ञान आहे.प्रत्येक सजीवाच्या वास्तव्याचे स्थानहि त्याला माहित आहे आणि ते स्थान देखील जेथे तो मेल्यानंतर सोपविला जातो.

१५. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह यूनुस टीप क्र. ९४.

१६. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र.८२ मध्ये केले गेले आहे.

१७. म्हणजे आकाश व जमीनीच्या निर्मिती पूर्वी पाणी निर्माण केले होते. तौरात मध्ये याबाबतीतचे वर्णन आसे-

''आणि देवाचा आत्मा जलावर तळपत राहिला होता.'' (उत्पत्ति १:२)

मूळ तौरात मध्ये तिच गोष्ट वर्णिली गेली असेल जी क़ुरआनात फर्माविली गेली आहे परंतु तौरात च्या अनुवादकांनी गोंधळात टाकले.

अर्श म्हणजे सिंहासन,अर्थात ते कशा स्वरुपाचे हे आम्हाला ठाऊक नाही तथापि ह्याने अल्लाहच्या राज्य-सत्तेची कल्पना कायम होते. याचा अर्थ हा ----- आणि केवळ अल्लाहच आपल्या रहस्य-भेदांना चांगल्या प्रकारे जाणतो------ की सृष्टीच्या निर्मिती पूर्वी जेव्हा सर्वत्र पाणीच पाणी होते, अल्लाहचे शासन त्यावर कायम होते. त्याच्याच आदेशाने पाण्याने उन्नत-स्वरुपे अंगिकारली तेव्हा खुष्कीचा भाग प्रकटला, व मग क्रमा-क्रमाने विविध प्रकारे निर्माण झाले. पवित्र क़ुरआनात दुसऱ्या एका ठिकाणी फर्माविले गेले.

وَجَعَلْنَا مِنَ الْمَآءِ كُلَّ شَىْءٍ حَىٍّ (سوره الانبياء : ٣٠)

''आम्ही पाण्यापासून समस्त सजीव निर्माण केले.'' (अल् अंबिया-३०)

१८. हेच ते उद्दिष्ट जे या सृष्टीच्या निर्मिती मागे कार्यरत राहिले म्हणजे माणसाला कसोटीच्या मैदानात उभे केले गेले आहे, अशासाठी की सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशा माणसांची निवड करावी जे-आचरण दृष्ट्या स्वत:ला अधिक चांगले सिद्ध करुन दाखवतील.मग त्यांना सदैव राहणाऱ्या ईश देणग्यानी उपकृत करावे.

१९. म्हणजे जेव्हा पैगंबर या गोष्टीला सबळ प्रमाणासह प्रस्तुत करतो की तुम्हा लोकांना मेल्यानंतर (पुनश्च) उठविले जाईल तर इन्कार करणारे यास शब्दांची जादू ठरवू लागतात.

२०. माहणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या शिक्षेस अशासाठी-लांबणीवर टाकत आहे की इन्कार करणाऱ्यांना सुधारणा करुन घेण्याचा अधिक अवसर लाभावा, परंतु हे लोक या सवडीपासून लाभ घेण्या ऐवजी ईश-शिक्षेची थट्टा उडवू लागतात. त्यांनी चांगल्या प्रकारे हे ऐकून घ्यावे की ज्या दिवशी ईश-शिक्षा प्रकट होईल तेव्हा मात्र कदापि टाळू शकणार नाही व तिच्या तावडीतून ते मुळीच सुटणार नाहीत.

२१. जेव्हा जीवन कसोटी साठी आहे तेव्हा ना दु:ख यातनेत निराश होणे योग्य आहे,ना सुख आरामाच्या स्थितीत बेताल होणे योग्य, किंबहुना पहिली अवस्था संयम आणि दुसरी अवस्था कृतज्ञतेचा गुण निर्माण करण्या करीता आहे. परंतु मुळ उद्देश्य डोळ्यासमोर न ठेवल्यामुळे माणसाचा दृष्टिकोन देखील चुकीचा ठरतो व आचरणहि.

१२. असे न व्हावे की जी 'वह्य' (ईश-संदेशाचे अवतरण) तुमच्याकडे केली जात आहे तिच्या एक हिस्सा तुम्ही सोडून द्यावा [२२] आणि या गोष्टीबद्दल मनात संकोच व्हावा की ते म्हणतील याच्यावर एखादा खजिना का नाही उतरविला गेला किंवा याच्या सोबत एखादा फिरिश्ता का नाही आला? खरे पाहता, तुमचे काम केवळ खबरदार करणे हेच होय, आणि प्रत्येक गोष्टीवर देखरेख करणारा तर अल्लाच आहे.

فَلَعَلَّكَ تَارِكٌۢ بَعْضَ مَا يُوْحٰٓى اِلَيْكَ وَضَآئِقٌۢ بِهٖ
صَدْرُكَ اَنْ يَّقُوْلُوْا لَوْلَآ اُنْزِلَ عَلَيْهِ كَنْزٌ اَوْ جَآءَ مَعَهٗ
مَلَكٌ ؕ اِنَّمَآ اَنْتَ نَذِيْرٌ ؕ وَاللّٰهُ عَلٰى كُلِّ شَيْءٍ وَّكِيْلٌ ﴿١٢﴾

१३. काय हे असे म्हणतात की या (पैगंबरा) ने या (ग्रंथा) ला स्वत:गढले आहे? सांगा, जर तुम्ही सच्चे असाल तर या सारख्या दहा सूरती (अध्याय) तुम्हीहि बनवून दाखवा. आणि अल्लाहशिवाय ज्यांना तुम्ही (मदतीसाठी) बोलवू शकता, बोलावा.

اَمْ يَقُوْلُوْنَ افْتَرٰىهُ ؕ قُلْ فَاْتُوْا بِعَشْرِ سُوَرٍ مِّثْلِهٖ مُفْتَرَيٰتٍ وَّ
ادْعُوْا مَنِ اسْتَطَعْتُمْ مِّنْ دُوْنِ اللّٰهِ اِنْ كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ﴿١٣﴾

१४. परंतु जर त्यांनी तुमच्या पुकारण्यास उत्तर दिले नाही तर हे जाणून घ्या की हा ग्रंथ अल्लाहच्या ज्ञानाने अवतरला आहे. आणि हे की अल्लाह खेरीज कोणीहि ईश्वर नाही. मग काय तुम्ही इस्लाम कबूल करता? [२३]

فَاِلَّمْ يَسْتَجِيْبُوْا لَكُمْ فَاعْلَمُوْٓا اَنَّمَآ اُنْزِلَ بِعِلْمِ اللّٰهِ وَاَنْ لَّآ اِلٰهَ
اِلَّا هُوَ ۚ فَهَلْ اَنْتُمْ مُّسْلِمُوْنَ ﴿١٤﴾

१५. जे लोक ऐहिक जीवन आणि त्याच्या सजावटीची इच्छा बाळगतात आम्ही त्यांच्या आचरणाचा पूरेपूर मोबदला त्यांना येथेच देऊन टाकतो आणि यात त्यांच्याशी कसलीहि कमतरता केली जात नाही. [२४]

مَنْ كَانَ يُرِيْدُ الْحَيٰوةَ الدُّنْيَا وَزِيْنَتَهَا نُوَفِّ اِلَيْهِمْ اَعْمَالَهُمْ
فِيْهَا وَهُمْ فِيْهَا لَا يُبْخَسُوْنَ ﴿١٥﴾

१६. परंतु अशा लोकांकरीता आखिरत मध्ये आगी शिवाय काहीहि नाही. त्यांचे केले-सवरले सर्व वाया जाईल आणि त्यांची सर्व कर्मे खोटी ठरतील.

اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ لَيْسَ لَهُمْ فِي الْاٰخِرَةِ اِلَّا النَّارُ ۖ وَحَبِطَ مَا
صَنَعُوْا فِيْهَا وَبٰطِلٌ مَّا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿١٦﴾

२२. ही गोष्ट प्रेषिताच्या मनुष्य-स्थितीला समोर ठेवून सांगितली गेली आहे अन्यथा पैगंबराच्या श्रेष्ठत्वापसून ही गोष्ट फार दूर आहे की त्याने ईश-आदेशाच्या एखाद्या भागाचा त्याग करावा. हे फर्माविण्याचा हेतु खरे पाहता विरोधांच्या त्या तीव्रतेस स्पष्ट करणे होय जिचा सामना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना करावा लागत होता. विरोधांच्या या वावटळीचा मुकाबला करण्याकरीता असामान्य धैर्याची गरज होती. अशा प्रसंगी हे फर्माविणे की, कदाचित ईश आदेशाच्या एखाद्या आज्ञेस तुम्ही सोडून न द्यावे, एक ताकीदपूर्ण आदेश आहे. ज्याचा उद्देश्य स्पष्ट संभवनीयतेपासून पैगंबरास सचेत करणे हा होय अशासाठी की पैगंबराने पूर्ण निश्चयाने व धैर्यासह प्रेषित-कर्तव्यास पार पाडू-लागावे.

२३. जे लोक क़ुरआनास ईश-ग्रंथ मानीत नव्हते, किंबहुना हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) द्वारा लिखीत ठरवीत होते. त्यांना क़ुरआनने आव्हान दिले आहे की त्यांनी हि अशा प्रकारची वाणी प्रस्तुत करावी हे आव्हान क़ुरआनात बऱ्याच ठिकाणी दिले गेले आहे. या आयतीत दहा सूरती बनवून आणण्याची मागणी केली गेली आहे आणि जेव्हा या मागणीस ते पूर्ण करु शकले नाहीत तेव्हा सूरह यूनुस आयत क्र.३८ मध्ये आणि मग सूरह बकरा आयत क्र.२३ मध्ये एक सूरत प्रस्तुत करण्याची मागणी केली गेली आहे, त्यासोबतच हे आव्हान दिले गेले आहे,की अशी वाणी सादर करण्यात त्यांनी आपल्या स्वरचित उपास्यांना मदतीकरीता बोलावून घ्यावे कारण जेव्हा क़ुरआन अल्लाह शिवाय इतर सर्व उपास्यांना खोटे ठरविते तेव्हा या तथाकथित उपास्यांनी खरोखर ते उपास्य असतील तर या संदर्भात आपल्या भक्तांची मदत केली पाहीजे यासाठी की क़ुरआन हा ईश-ग्रंथ असण्यासंबंधीचा दावा तसेच त्याचे एकेश्वरवादी आवाहन चुकीचे असल्याचे सिद्ध व्हावे, परंतु सर्व जनसमूह मिळून देखील क़ुरआनाची उपमा सादर करु शकला नाही व त्यांची उपास्येहि त्यांच्या मदतीला येऊ शकले नाहीत तेव्हा हे सिद्ध झाले की क़ुरआन मनुष्य-वाणी नाही, किंबहुना ईश्वर-वाणी आहे अन्यथा अक्षर ज्ञान नसलेल्या प्रेषिताने सादर केलेल्या वाणीचा त्यासमान एक भागहि प्रस्तुत करण्यात संपूर्ण जन-समूह असमर्थ व्हावा हे कशे शक्य आहे?

कोणताहि मनुष्य मग तो कितीही मोठा साहित्यिक असो दाव्याने असे कधीहि म्हणू शकत नाही; किंबहुना समस्त उच्चकोटीचे साहित्यिक मिळून देखील याच्या अध्याय-रत्नांपैकी एक अध्याय देखील रचू शकत नाहीत. ही गोष्ट क़ुरआनानेच दाव्यासह सांगितली आहे की यासारखी वाणी सादर करण्याचे मनुष्यास किंचितहि सामर्थ्य नाही. आणि या दाव्यास अरबचा जन-समूह खोटे ठरवू शकला नाही.

या दाव्याने हेहि सिद्ध करुन दाखविले की क़ुरआनाचे एकेश्वरवादी आवाहन सत्य आहे कारण जर अनेक ईशवर अस्तित्वात असते, जसा अनेकेश्वर वाद्यांचा दावा आहे, तर त्यांनी आपल्या ईशत्वास सिद्ध करुन दाखविण्याकरीता आपल्या भक्तांची खचितच मदत केली असती. आणि जेव्हा क़ुरआनाच्या या दोन्ही गोष्टी सत्य असल्याचे सिद्ध झाले आहे तेव्हा इस्लाम हा सत्य धर्म असल्याचेहि सिद्ध झाले. यानंतरहि इस्लाम कबूल करण्यात लोकांना कोणती गोष्ट प्रतिबंध घालते?

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा-सूरह बकरा टीप क्र.-३०)

२४. म्हणजे ज्या लोकांच्या दृष्टी समोर आखिरत नाही, किंबहुना केवळ ऐहिक जीवन असते तर त्यांचे कर्म-फल त्यांना इहलोकातच दिले जाते आणि त्यांच्या कुफ्र-नितीमुळे त्यांची भौतिक प्रगती थांबावी असे मात्र होत नाही. ऐहिक साधनांव्दये ते जे काही कार्य करतील. निसर्ग-नियमानुसार त्याचे परिणाम दिसून येतील परंतु त्यांची सर्व भौतिकप्रगती, त्याची धन सम्पत्ति, त्याचे इहलोककीय ज्ञान व कलेत नैपुण्य, त्यांचा राजेशाही थाट व त्यांच्या प्रसिद्धीचे डंके, फक्त या जगातच वाजत राहतील आणि आखिरत (मरणोत्तर जीवन) मध्ये जेथे सदैव कालीन जीवन जगायचे आहे, तेथे मात्र त्यांच्या कर्माचे फळ शून्य असेल आणि अपयश व अपमाना शिवाय कोणतीहि गोष्ट त्यांच्या हिश्श्यात येणार नाही.

१७. काय तो मनुष्य जो आपल्या पालन-कर्त्या तर्फे सुस्पष्ट प्रमाण बाळगून होता मग एक साक्षी देखील त्याच्या तर्फे आला आणि यापूर्वी मूसा चा ग्रंथ मार्गदर्शक व कृपा या नात्याने अस्तित्वात होता, (तो सत्याचा स्वीकार करण्यापासून इन्कार करु शकतो?)असे लोक तर त्यावर ईमान बाळगतीलच.[२५] आणि जो समूह देखील याचा इन्कार करील [२६] तर दोज़ख़ (जहन्नम) असे ठिकाण आहे ज्याचा त्याच्याशी वायदा आहे. यास्तव तुम्ही याच्या विषयी कसल्याहि संशयात पडू नका [२७] हे सत्य आहे, तुमच्या पालनकर्त्या तर्फे परंतु बहुतेक लोक ईमान बाळगत नाहीत.

أَفَمَنْ كَانَ عَلَىٰ بَيِّنَةٍ مِّنْ رَّبِّهٖ وَيَتْلُوْهُ شَاهِدٌ مِّنْهُ وَمِنْ
قَبْلِهٖ كِتٰبُ مُوْسٰىٓ إِمَامًا وَّرَحْمَةً ۚ أُولٰٓئِكَ يُؤْمِنُوْنَ بِهٖ ۚ وَمَنْ
يَّكْفُرْ بِهٖ مِنَ الْأَحْزَابِ فَالنَّارُ مَوْعِدُهٗ ۚ فَلَا تَكُ فِيْ مِرْيَةٍ
مِّنْهُ ۚ إِنَّهُ الْحَقُّ مِنْ رَّبِّكَ وَلٰكِنَّ أَكْثَرَ النَّاسِ لَا يُؤْمِنُوْنَ ﴿١٧﴾

१८. आणि त्या व्यक्तिहून अधिक अत्याचारी कोण असेल जी असत्य रचून त्याचा संबंध अल्लाहकडे दर्शविल [२८]असे लोक आपल्या पालनकर्त्या समोर सादर केले जातील आणि साक्ष देणारे साक्ष देतील की हे असे लोक होत जे आपल्या पालनकर्त्या बद्दल असत्य बोलले. ऐका, अल्लाहतर्फे धिक्कार आहे अत्याचारींचा.

وَمَنْ أَظْلَمُ مِمَّنِ افْتَرٰى عَلَى اللّٰهِ كَذِبًا ۚ أُولٰٓئِكَ يُعْرَضُوْنَ
عَلٰى رَبِّهِمْ وَيَقُوْلُ الْأَشْهَادُ هٰٓؤُلَاءِ الَّذِيْنَ كَذَبُوْا عَلٰى
رَبِّهِمْ ۚ أَلَا لَعْنَةُ اللّٰهِ عَلَى الظّٰلِمِيْنَ ﴿١٨﴾

१९. त्यांच्यावर जे अल्लाहच्या मार्गापासून रोखतात व त्यास वक्र करु इच्छितात [२९] आणि जे आखिरत (मरणोत्तर जीवना) चा आगदी इन्कार करतात.

الَّذِيْنَ يَصُدُّوْنَ عَنْ سَبِيْلِ اللّٰهِ وَيَبْغُوْنَهَا عِوَجًا ۚ وَهُمْ
بِالْأٰخِرَةِ هُمْ كٰفِرُوْنَ ﴿١٩﴾

२०. हे लोक जमीनीवर (अल्लाहच्या) नियंत्रणातून निघून जाणारे नव्हते आणि ना अल्लाहशिवाय कोणी त्यांचा सहाय्यक होता [३०] त्यांना दुहरी शिक्षा दिली जाईल [३१] ते ना ऐकू शकत होते व ना पाहू शकत होते.[३२]

أُولٰٓئِكَ لَمْ يَكُوْنُوْا مُعْجِزِيْنَ فِي الْأَرْضِ وَمَا كَانَ لَهُمْ
مِّنْ دُوْنِ اللّٰهِ مِنْ أَوْلِيَاءَ ۘ يُضٰعَفُ لَهُمُ الْعَذَابُ ۚ مَا كَانُوْا
يَسْتَطِيْعُوْنَ السَّمْعَ وَمَا كَانُوْا يُبْصِرُوْنَ ﴿٢٠﴾

२१. हेच लोक होत ज्यांनी स्वत:ला विनाशात टाकले आणि जे काही त्यांनी गढले होते ते सर्व त्यांच्या पासून हरवले गेले.[३३]

أُولٰٓئِكَ الَّذِيْنَ خَسِرُوْٓا أَنْفُسَهُمْ وَضَلَّ عَنْهُمْ مَّا كَانُوْا
يَفْتَرُوْنَ ﴿٢١﴾

२२. निश्चितच हे लोक आखिरत मध्ये सर्वधिक दुर्दशा-ग्रस्त असतील.

لَا جَرَمَ أَنَّهُمْ فِي الْأٰخِرَةِ هُمُ الْأَخْسَرُوْنَ ﴿٢٢﴾

२५. या आयतीत 'उघड प्रमाण'शी अभिप्रेत ते प्रमाण होय जे प्रत्येक व्यक्तिच्या आत्म्यात, आपल्या पालनकर्त्याची ओळख, त्यांच्या समोर जाब द्यावा लागेल ही कल्पना, आणि चांगल्या वाईटातील फरक या संदर्भात आढळून येतो.

साक्ष देणाऱ्याशी अभिप्रेत क़ुरआन होय ज्याने या स्वाभाविक प्रमाणाचे केवळ समर्थनच केले नाही, किंबहुना त्यास पूर्णत: उघडरित्या वर्णिले आहे. अशा प्रकारे जेव्हा सत्य उघडरित्या समोर आले तेव्हा त्याचे समर्थन या गोष्टीनेहि होते की पूर्वीपासून जो आकाशी ग्रंथ तौरात प्रचलित आहे तो मूलत: याच सत्यांकडे मार्गदर्शन करतो. ज्या सत्यांचे प्रतिबिंब क़ुरआनात दिसते.

आयतीचा अर्थ हा की जो मनुष्य आपल्या स्वभावात आढळून येणाऱ्या प्रमाणावर कायम असेल तर त्याला क़ुरआनाच्या आवाहनात कसलीहि अपरिचितता व नाविन्य जाणवणार नाही, किंबहुना ते आपल्या स्वभावाशी सुसंगत असल्याचे पाहून कबूल करील. आणि याचा इन्कार करण्याचे दु:साहस केवळ तोच करील ज्याने आपल्या विवेक बुद्धिला मूठमाती दिली असेल.

या आयतीवरुन एक गोष्ट आपोआप स्पष्ट होते की पैगंबर (सल्लल्लाहू अलैहि वसल्लम) प्रेषित या नात्याने पाठविले जाण्यापूर्वी आपल्या चांगल्या स्वभावावर कायम होते कारण पैगंबराहून अधिक आपल्या स्वभावावर कायम राहणारा आणखी कोण असू शकतो.

२६. मग तो धार्मिक समूह असो वा धर्माखेरीजचा.

२७. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह यूनुस टीप क्र.१४५.

२८. याचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र. १६९ मध्ये केले गेले आहे.

२९. याचे स्पष्टीकरण सूरह आले इमरान टीप क्र. १२५ मध्ये केले गेले आहे.

३०. म्हणजे इहलोकात ते या भ्रम-जाळात अडकून राहतात की त्यांनी ठरविलेले कर्ता-करविता व सहाय्यक त्यांना अल्लाहच्या शिक्षेपासून वाचवू शकतात. म्हणून प्रेषितांच्या ताकीद वजा शिकवीचा त्यांनी कसलाही प्रभाव ग्राह्य धरला नाही.

३१. एक शिक्षा स्वत:मार्गभ्रष्ट होण्याची व दुसरी शिक्षा इतराना मार्गभ्रष्ट करण्याची.

३२. म्हणजे अल्लाहचा प्रेषित जो संदेश सादर करीत होता तो ऐकण्यापासून त्यांनी आपले कान बंद ठेवले होते आणि एकेश्वरवाद व आखिरतची जी चिन्हे सृष्टीत पसरलेली होती; ती त्यांना दिसून येत नव्हती कारण आपल्या डोळ्यांवर त्यांनी पांघरुण घातले होते.

३३. म्हणजे जी उपास्ये त्यांनी कल्पिली होती आणि ज्यांच्या मदतीवर व शिफारसीवर त्यांचा विश्वास होता; ते सर्व अदृश्य झाले आणि आज कोणी नाही जो अल्लाहच्या शिक्षेपासून त्यांना वाचवू शकेल.

२३. निःसंशय ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कृत्ये केली आणि आपल्या पालन कर्त्या समोर विनम्रता अंगिकारली [३४] ते जन्नतवाले होत, ज्यात ते सदैव राहतील.

إِنَّ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ وَأَخْبَتُوا إِلَىٰ رَبِّهِمْ
أُولَٰئِكَ أَصْحَابُ الْجَنَّةِ ۖ هُمْ فِيهَا خَالِدُونَ ﴿٢٣﴾

२४. या दोन्ही पक्षांचे उदाहरण असे आहे जणू एक आंधळा व बहीरा [३५] आणि दुसरा डोळस व ऐकणारा [३६] काय दोन्हींची स्थिती समान असू शकते? मग तुम्ही लोक समजत का नाही ?[३७]

مَثَلُ الْفَرِيقَيْنِ كَالْأَعْمَىٰ وَالْأَصَمِّ وَالْبَصِيرِ وَالسَّمِيعِ ۚ هَلْ
يَسْتَوِيَانِ مَثَلًا ۚ أَفَلَا تَذَكَّرُونَ ﴿٢٤﴾

२५. आणि आम्ही नुहला त्याच्या जन समूहाकडे पाठविले होते [३८] तो म्हणाला, मी तुम्हाला उघडरित्या खबरदार करणारा आहे.

وَلَقَدْ أَرْسَلْنَا نُوحًا إِلَىٰ قَوْمِهِ إِنِّي لَكُمْ نَذِيرٌ مُبِينٌ ﴿٢٥﴾

२६. की अल्लाह शिवाय कोणाचीहि उपासना करु नका [३९] मला तुमच्या संबंधी एका दुःखदायक दिवसाच्या शिक्षेचे भय आहे.[४०]

أَنْ لَا تَعْبُدُوا إِلَّا اللَّهَ ۖ إِنِّي أَخَافُ عَلَيْكُمْ عَذَابَ يَوْمٍ
أَلِيمٍ ﴿٢٦﴾

२७. यावर त्याच्या जन समूहातील मोठ्या लोकांनी जे काफीर होते म्हटले आम्ही तर असे पाहतो की तुम्ही आमच्या सारखेच एक मनुष्य आहात आणि हे हि पाहतो की तुमचे अनुयायी केवळ असेच लोक झाले आहेत जे आमच्यात मामुली दर्जाचे होते आणि ते देखील वरवरच्या विचाराने [४१] आणि आम्हाला आपल्या तुलनेने तुमच्या अंगी कोणतेहि श्रेष्ठत्व आढळून येत नाही, किंबहूना आम्ही तर असे समजतो कि तुम्ही खोटारडे आहात.

فَقَالَ الْمَلَأُ الَّذِينَ كَفَرُوا مِنْ قَوْمِهِ
مَا نَرَاكَ إِلَّا بَشَرًا مِثْلَنَا وَمَا نَرَاكَ اتَّبَعَكَ إِلَّا الَّذِينَ
هُمْ أَرَاذِلُنَا بَادِيَ الرَّأْيِ وَمَا نَرَىٰ لَكُمْ عَلَيْنَا
مِنْ فَضْلٍ بَلْ نَظُنُّكُمْ كَاذِبِينَ ﴿٢٧﴾

२८. तो म्हणाला, हे माझ्या जन समूहातील लोकांनो तुम्ही याचाहि विचार केला काय की जर मी आपल्या पालनकर्त्या तर्फे एका स्पष्ट प्रमाणावर आहे व त्याने आपल्या खास कृपेने मला उपकृत केले असावे परंतु तुम्हाला ती दिसत नसावी तर काय आम्ही जबरदस्तीने तुम्हावर चिकटवून द्यावी, जेव्हा ती तुम्हाला अतिशय नापसंत आहे ?[४२]

قَالَ يَا قَوْمِ أَرَأَيْتُمْ إِنْ كُنْتُ عَلَىٰ بَيِّنَةٍ مِنْ رَبِّي وَآتَانِي رَحْمَةً
مِنْ عِنْدِهِ فَعُمِّيَتْ عَلَيْكُمْ أَنُلْزِمُكُمُوهَا وَأَنْتُمْ لَهَا
كَارِهُونَ ﴿٢٨﴾

३४. सदाचारा सोबत विनम्रतेचा जो गुण वर्णिला गेला आहे तो आचरणाच्या मूल तथ्या (Spirit) ला व्यक्त करतो. अर्थात सत्कृत्ये केवळ नियामाची पूर्तता करण्याकरीता केली जाऊ नयेत, किंबहुना ती ईश्वराकडे झुकण्याच्या व विनम्रतेच्या कैफियतीसह पार पाडली जावीत.

३५. हे उदाहरण काफिरचे आहे जो अंतर्दृष्टी पासून वंचित असतो.

३६. हे उदाहरण ईमान बाळगणाऱ्याचे आहे ज्यास अंतर्दृष्टी असते.

३७. म्हणजे जेव्हा मोमीन व काफीर मध्ये अंतर्दृष्टीचा फरक असतो तेव्हा दोघांना एकाच पातळीवर कसे राखले जाऊ शकते आणि दोघांचीहि परिणिती समान कशी असू शकते? एवढी ढोबळ गोष्ट तुमच्या ध्यानी येत नाही?

३८. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह अअराफ टीप क्र. ९५.

३९. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. ९७ मध्ये केले गेले आहे.

४०. दु:खदायक दिवसाच्या शिक्षेशी अभिप्रेत कियामतीच्या दिवसाची शिक्षा होय. आणि दिवसाला दु:खदायक म्हणणे अगदी असेच आहे जसे आम्ही म्हणतो, 'शोक-दिन' अर्थात कियामतीच्या दिवशी काफिरांकरीता दु:ख यातना व संकटांचाच दिवस असेल.

४१. हजरत नूह यांच्यावर ज्या लोकांनी ईमान बाळगले होते ते या काफीर सरदारांच्या नजरेत अशासाठी तुच्छ होते की त्यांच्याजवळ काफीरांप्रमाणे ना भौतिक साधने होती. ना समाजात प्रभाव-वर्चस्व वस्तुत:मांगल्य-प्रिय या नात्याने ते समाजातील सर्वाधिक चांगले लोक होते आणि ज्या अर्थी त्यांनी सत्य उघडपणे समोर आल्यानंतर त्याचा स्वीकार करण्यात संकोच केला नाही म्हणून हे आक्षेप घेणारे लोक त्यांच्या निर्णयास वरवरच्या विचाराचा परिणाम ठरवित होते वस्तुत: ईमान बाळगणाऱ्यांची ही सत्यप्रियता साहसपूर्ण होती परंतु त्यांची ही वैशिष्ट्ये गर्विष्टांच्या नजरेत वैगुण्ये ठरली होती. कदाचित अशाच प्रसंगी एका कवीने म्हठले आहे-

**''एबो में गिने जाते है मुफलिस के हुनर भी''**

(गरीबाच्या गुणवैशिष्ट्यांचीहि वैगुण्यात गणना होते)

४२. हे आक्षेप घेणाऱ्यांच्या पहिल्या आक्षेपाचे उत्तर होय. हजरत नूह यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की मी जे एकेश्वरवादी आवाहन सादर करीत आहे त्याची मूळे मनुष्य-स्वभावात खोलवर रुजलेली आहेत. मी ह्याच स्वभाविक प्रमाणावर व मानसिक दृष्टीवर कायम होतो. यानंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने माझ्यावर ही कृपा केली की प्रेषित्व-पदा ने सम्मानित केले ज्यास असा प्रत्येक मनुष्य पाहू शकतो ज्याला अंतर्दृष्टि लाभली आहे. आता जर तुम्हीच आपल्या डोळ्यांना फोडून घेतले असेल तर तुम्हाला दिसणार तरी काय? अशा स्थितीत काय आम्ही जबरदसतीने सत्य तुमच्या गळ्यात बांधावे?

२९. आणि हे माझ्या जन समूहाच्या लोकांनो ! मी याबद्दल तुमच्या कडून कसल्याहि मालमत्तेची अपेक्षा बाळगत नाही. माझा मोबदला तर अल्लाहच्याच जबाबदारीवर आहे [४३] आणि मी त्या लोकांना धुडकविणारा नाही ज्यांनी ईमान बाळगले आहे. ते आपल्या पालनकर्त्याशी भेट घेणारे आहेत परंतु मी असे पाहतो की तुम्ही अज्ञानात ग्रस्त आहात.[४४]

وَيٰقَوْمِ لَآ اَسْـَٔلُكُمْ عَلَيْهِ مَالًا ۖ اِنْ اَجْرِيَ اِلَّا عَلَى اللّٰهِ وَمَآ اَنَا
بِطَارِدِ الَّذِيْنَ اٰمَنُوْا ۗ اِنَّهُمْ مُّلٰقُوْا رَبِّهِمْ وَلٰكِنِّيْٓ اَرٰىكُمْ قَوْمًا
تَجْهَلُوْنَ ﴿٢٩﴾

३०. आणि हे माझ्या जन समूहाच्या लोकांनो ! जर मी यांना धुडकावून लावीन तर अल्लाहच्या पकडीतून कोण आहे जो मला वाचवील [४५] काय ही गोष्ट तुमच्या ध्यानी येत नाही ?

وَيٰقَوْمِ مَنْ يَّنْصُرُنِيْ مِنَ اللّٰهِ اِنْ طَرَدْتُّهُمْ ۗ اَفَلَا تَذَكَّرُوْنَ ﴿٣٠﴾

३१. मी तुम्हाला असे सांगत नाही की माझ्याजवळ अल्लाहचे खजीने आहेत आणि ना मी अपरोक्षाचे ज्ञान बाळगतो आणि ना असे म्हणतो की मी फरीश्ता आहे व ना मी असे म्हणू शकतो की जे लोक तुमच्या नजरेत तुच्छ आहेत त्यांना अल्लाह भलाईने उपकृत करणार नाही. त्यांच्या अंत:करणाची दशा केवळ अल्लाह अधिक चांगली जाणतो.जर मी असे काही म्हणालो तर अत्याचारीपैकी होईन.[४६]

وَلَآ اَقُوْلُ لَكُمْ عِنْدِيْ خَزَآئِنُ اللّٰهِ وَلَآ اَعْلَمُ الْغَيْبَ وَلَآ
اَقُوْلُ اِنِّيْ مَلَكٌ وَّلَآ اَقُوْلُ لِلَّذِيْنَ تَزْدَرِيْٓ اَعْيُنُكُمْ لَنْ يُّؤْتِيَهُمُ
اللّٰهُ خَيْرًا ۗ اَللّٰهُ اَعْلَمُ بِمَا فِيْٓ اَنْفُسِهِمْ ۚ اِنِّيْٓ اِذًا لَّمِنَ
الظّٰلِمِيْنَ ﴿٣١﴾

३२. ते म्हणाले, हे नूह ! तुम्ही आमच्याशी विवाद केला व फार विवाद केला आता ती गोष्ट आमच्यावर आणा, जिच्या विषयी आम्हाला भय दाखविता [४७] जर तुम्ही सच्चे असाल.

قَالُوْا يٰنُوْحُ قَدْ جٰدَلْتَنَا فَاَكْثَرْتَ جِدَالَنَا فَاْتِنَا بِمَا تَعِدُنَآ اِنْ
كُنْتَ مِنَ الصّٰدِقِيْنَ ﴿٣٢﴾

३३. त्याने उत्तर दिले, ती तर अल्लाहच तुमच्यावर आणील जर त्याने तसे इच्छिले आणि तुमच्या आवाक्यात नाही की तिला रोखू शकाल.

قَالَ اِنَّمَا يَاْتِيْكُمْ بِهِ اللّٰهُ اِنْ شَآءَ وَمَآ اَنْتُمْ بِمُعْجِزِيْنَ ﴿٣٣﴾

३४. जेव्हा अल्लाहच तुम्हाला मार्गभ्रष्ट करु इच्छित असेल [४८] तेव्हा मी उपदेश करण्याची इच्छा बाळगली तरी माझा उपदेश तुमच्या करीता किंचितहि लाभदायक ठरु शकणार नाही. तो तुमचा पालन कर्ता आहे व त्याच्याच कडे तुम्हाला परतावयाचे आहे.

وَلَا يَنْفَعُكُمْ نُصْحِيْٓ اِنْ اَرَدْتُّ اَنْ اَنْصَحَ لَكُمْ اِنْ كَانَ اللّٰهُ يُرِيْدُ
اَنْ يُّغْوِيَكُمْ ۗ هُوَ رَبُّكُمْ ۣ وَاِلَيْهِ تُرْجَعُوْنَ ﴿٣٤﴾

४३. प्रेषित अल्लाहचा संदेश लोकांपर्यंत पोहचविण्याची व त्यांना सन्मार्गाकडे बोलविण्याची जी सेवा पार पाडतात त्याबद्दल ते त्यांच्या कडून कसलेही पारिश्रमिक मागत नाहित व ना त्यांच्या दृष्टीसमोर एखादा व्यक्तिगत लाभ असतो. किंबहुना ही सेवा ते निस्पृह भावनेने पार पाडीत असतात त्यांची ही नि:स्पृहता त्यांना ज्योतिषी, कवी व स्वार्थी लोकांहून अगदी भिन्न करते.

४४. हे त्यांच्या दुसऱ्या आक्षेपाचे उत्तर आहे. हजरत नूह यांनी स्पष्टत:असे फर्माविले की मी तुमच्या खातीर आपल्या साथीदारांचा ज्यांनी ईमान बाळगले आहे त्याग करणार नाही जर ते तुमच्या नजरेत अप्रतिष्ठीत आहेत तर हा तुमच्या आज्ञानाचा परिणाम होय. अन्यथा सत्य-ज्ञानाचा दिव्य प्रकाश तर माणसाला अशा लोकांची कदर बाळगण्यास लावतो जे सत्याला कबूल करतात. आणि या आयतीचा अंतिम निर्णय तर अल्लाहजवळ व्हायचा आहे कोणता मनुष्य कशा कदरीस पात्र आहे. या ईमान बाळगणाऱ्यांचा खरा दर्जा तर अल्लाहजवळ निश्चित होईल जेव्हा ते त्याला भेटतील.

४५. हजरत नूह यांच्या वक्तव्याने आम्हाला हे मार्गदर्शन लाभते की एक सत्य-आवाहक मुस्लिमेतरांना खुश करण्याकरीता मुसलमानांपासून विभक्तता अंगिकारु शकत नाही.

४६. हे त्यांच्या तिसऱ्या आक्षेपाचे उत्तर आहे म्हणजे त्या आक्षेपाचे की आम्हाला आपल्या तुलनेने तुमच्या अंगी कसलीहि श्रेष्ठता आढळत नाही. हजरत नूह यांनी प्रत्युत्तरादाखल जे काही फर्माविले त्याचा सारांश असा की मी अंतर्दृष्टीहून जे उच्चतम असण्याचा दावा कोठे केला. मी ज्या गोष्टीचा दावेदार आहे ती केवळ हीच की अल्लाहने आपला संदेश पोहचविण्याकरीता मला प्रेषित या नात्याने नियुक्त केले आहे आणि ही एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट होय. राहिले माझे साथी ईमान-धारक तर त्यांची मनोदशा अल्लाह अधिक चांगली जाणतो. जर ते खरोखर ईमान बाळगणारे आहेत तर अल्लाह त्यांना निश्चितच मांगल्याने उपकृत करील. मी हे कसे म्हणू शकतो की ते अल्लाहच्या नजरेत सद्भाग्यास पात्र ठरतात तर याहून अधिक प्रतिष्ठेची गोष्ट आणखी काय असू शकते तुम्ही इहलोकीय धन-सम्पत्तिस प्रतिष्ठा-स्तर ठरविता वस्तुत: प्रतिष्ठेची खरी पातळी ईमान-धन होय.

हजरत नूह यांच्या या वक्तव्याने की अंत:करणाची स्थिती आल्लाहच अधिक चांगली जाणतो, ही गोष्ट चांगल्या प्रकारे स्पष्ट होते की लोकांची मनोदशा पैगंबरालाहि माहित नसते मग अवलिया, बुजूर्ग इत्यादिंना कोठून माहित होईल? आणि जेव्हा पैगंबर स्वत: आपल्या जीवनात इतरांची मन:स्थिती जाणत नाही तेव्हा आपल्या मृत्युनंतर कशाप्रकारे जाणू शकतो? ही गोष्ट अवलीया पूजा, कब्र-पूजा इत्यादी गोष्टीचे खंडन करते.

४७. म्हणजे अल्लाहची शिक्षा.

४८. म्हणजे अल्लाहच्या अपमानदायक नियमानुसार जर तुमच्याकरीता मार्गदर्शनाचे दरवाजे बंद झाले आहेत तर माझ्या हितचिंतनाचा व उपदेशाचा तुमच्यावर कसलाहि परिणाम होणार नाही.

३५. काय हे असे म्हणतात की त्याने यास गढले आहे ?[४९] सांगा जर मी यास गढले आहे तर माझ्या अपराधाची जबाबदारी माझ्यावर आहे आणि जो अपराध तुम्ही करीत आहात त्यापासून मी मुक्त आहे .[५०]

أَمْ يَقُولُونَ افْتَرَاهُ ۖ قُلْ إِنِ افْتَرَيْتُهُ فَعَلَيَّ إِجْرَامِي وَأَنَا
بَرِيءٌ مِّمَّا تُجْرِمُونَ ﴿٣٥﴾

३६. आणि नूह वर 'वहय' (ईश-आदेश) केली गेली की तुमच्या जन-समूहापैकी ज्या लोकांनी ईमान बाळगले आहे, त्यांच्या शिवाय आता अन्य कोणी ईमान बाळगणारा नाही. तेव्हा हे जे काही करीत आहेत त्याबद्दल दुःख करु नका.

وَأُوحِيَ إِلَىٰ نُوحٍ أَنَّهُ لَن يُؤْمِنَ مِن قَوْمِكَ إِلَّا مَن قَدْ آمَنَ
فَلَا تَبْتَئِسْ بِمَا كَانُوا يَفْعَلُونَ ﴿٣٦﴾

३७. आणि आमच्या देखरेखी खाली व आमच्या आदेशानुसार नौका तयार करा [५१] आणि या अत्याचारीं विषयी आता आम्हाला काहीहि सांगून नका. हे बूडून जाणारे आहेत.[५२]

وَاصْنَعِ الْفُلْكَ بِأَعْيُنِنَا وَوَحْيِنَا وَلَا تُخَاطِبْنِي فِي
الَّذِينَ ظَلَمُوا ۚ إِنَّهُم مُّغْرَقُونَ ﴿٣٧﴾

३८. आणि तो नौका बनवू लागला. जेव्हा त्याच्या जन समूहाचे सरदार त्याच्या जवळून जात तेव्हा त्याची थट्टा उडवित. [५३] तो उत्तर देई. जर तुम्ही आमच्यावर हसत आहात तर आम्ही देखील तुमच्यावर अशाच प्रकारे हसू.[५४]

وَيَصْنَعُ الْفُلْكَ وَكُلَّمَا مَرَّ عَلَيْهِ مَلَأٌ مِّن قَوْمِهِ سَخِرُوا مِنْهُ ۚ
قَالَ إِن تَسْخَرُوا مِنَّا فَإِنَّا نَسْخَرُ مِنكُمْ كَمَا تَسْخَرُونَ ﴿٣٨﴾

३९. लवकरच तुम्हाला माहित होईल की कोणत्या लोकांवर ती शिक्षा येईल जी त्यांना अपमानित केल्याशिवाय राहणार नाही, आणि ती शिक्षा तुटून पडते जी कायम राहणारी आहे.[५५]

فَسَوْفَ تَعْلَمُونَ مَن يَأْتِيهِ عَذَابٌ يُخْزِيهِ وَيَحِلُّ عَلَيْهِ
عَذَابٌ مُّقِيمٌ ﴿٣٩﴾

४०. येथेपावेतो की जेव्हा आमचा आदेश आला आणि तंदूर ऊतू लागला [५६] तेव्हा आम्ही म्हटले प्रत्येक प्रकारच्या नर-मादीचा जोडा (नौकेत) चढवून घ्या [५७] आणि आपल्या घरच्या लोकांनाहि मात्र त्यांच्याखेरीज, ज्यांच्या बाबतीत आमचे फर्मान आधीच लागू झाले आहे [५८] तसेच त्या लोकांनाहि चढवून घ्या ज्यांनी ईमान बाळगले आहे. [५९] आणि त्याच्या सोबतीला ईमान बाळगणारे फार थोडे लोक होते.

حَتَّىٰ إِذَا جَاءَ أَمْرُنَا وَفَارَ التَّنُّورُ قُلْنَا احْمِلْ فِيهَا مِن كُلٍّ
زَوْجَيْنِ اثْنَيْنِ وَأَهْلَكَ إِلَّا مَن سَبَقَ عَلَيْهِ الْقَوْلُ
وَمَنْ آمَنَ ۚ وَمَا آمَنَ مَعَهُ إِلَّا قَلِيلٌ ﴿٤٠﴾

४९. हे कंसामधील वाक्य होय म्हणजे मूळ निवेदन क्रमास थांबवून त्याच प्रसंगी कुरेशच्या त्या आक्षेपास उत्तर दिले गेले जो ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ठेवत होते की क़ुरआनास त्यांनी स्वत:रचले आहे आणि यात जे किस्से सादर केले जात आहेत, त्या केवळ प्रचीन कथा होत.

५०. जर मी या कुरआनास स्वत:रचले नाही-आणि वस्तुस्थिती हीच आहे की मी स्वत:रचले नाही -तर तुमच्या या अपराधाचे संकट तुमच्यावरच कोसळेल कारण ईश्वराने अवतरीत केलेल्या ग्रंथासं तुम्ही माझा मनगढत ग्रंथ ठरवून खोटे ठरविले.

५१. म्हणजे आम्ही या गोष्टीची देखरेख करू की ह्या काफिरांनी तुम्हाला नौका बनविण्यापासून रोखू न शकावे. राहीली नौकेची बनावट तर ती देखील यथायोग्य ईश्वर-आदेशाला अनुसरुन झाली पाहिजे. अशासाठी की ती त्या भयंकर वादळात जे जबरदस्त महापूराच्या रुपाने येणार आहे, तुमच्या सरंक्षणाचे साधन व्हावे.

बायबल मध्ये निर्मिति प्रकरण ६ मध्ये या नौकेचा आकार वगैरेचे विवरणात्मक वर्णन दिले गेले आहे ज्यावरुन असे दिसून येते की ती एक असामान्य व जहाजासारखी नाव होती.

५२. म्हणजे या काफिरांविषयी कसलीहि शिफारस करु नका. यांच्यावरुन ईश-शिक्षा आता टळणार नाही. सर्व श्रेष्ठ अल्लाहने हा निर्णय देऊन टाकला आहे की ते या महापूरात बुडल्याशिवाय राहणार नाहीत.

५३. जेव्हा हज़रत नूह नौका बनवू लागले तेव्हा विरोधक एक फार मोठी नाव जमीनीवर बनत असल्याचे पाहून थट्टा करु लागले. ते या गोष्टीची कल्पना देखील करायला तयार नव्हते की एखादा वादळी महापूर येऊ शकतो ज्यात नूहची नौकाच जीवन-नौका (Life-boat) बनू शकते. त्यांनी ह्या गोष्टीस वेडसरपणा ठरवित हा टोमणा देखील मारला असेल की आता हे लोक जमीनीवर नाव चालवू इच्छितात.

५४. म्हणजे आज तुम्ही आम्हाला वेडा समजून हसत आहात, पण उद्या (आखिरतच्या दिवशी) तुमच्या वेडसरपणावर आम्ही हसू. एखाद्या अपराध्याला अटक झाल्यावर माणसाला समाधान वाटते व त्याचा अपराधांबाबत ज्यांनी त्याला 'ह्या' पातळीप्रत पोहचविले साहजिकच हसू येते तद्वतच आखिरत मध्ये ईश्वराच्या बंडखोरांना व उत्पात माजविणाऱ्यांना शिक्षा झाल्यावर ईमान बाळगणाऱ्यांचे हसणे अगदी स्वाभविक गोष्ट होय.

५५. एक शिक्षा इहलोकात व दुसरी शिक्षा आखिरत मध्ये.

५६. आमच्या दृष्टीने याचा योग्य अर्थ तोच होय जो इब्ने जरीर तबरी यांनी वर्णिला आहे. ते फर्मावितात की 'तंदूर' शी अभिप्रेत तोच तंदूर होय ज्यात भाकरी भाजली जाते, कारण अरबी भाषेत हाच परिचित आहे आणि अल्लाहच्या वाणीचे उचित स्पष्टीकरण याच स्थितीत होऊ शकते जेव्हा एखाद्या शब्दाचा असा अर्थ घेतला जावा जो अरब लोकांच्या येथे प्रसिद्ध आहे. (जामेऊल बयान खंड-१२ पृष्ठ -२५)

जणू एक तंदूर लाक्षणिक दृष्ट्या निर्धारीत केला गेला होता की जेव्हा हा ऊतून जाईल तेव्हा भयंकर वादळाला सुरुवात झाली असे समजावे व नौकेत स्वार व्हावे.

५७. प्रत्येक प्रकारच्या जनावारांशी अभिप्रेत अशी जनावरे होत जी माणसाची कोणती ना कोणती गरज भागवितात. उंदीर, सर्प या सारखे उपद्रवी प्राणी नाहीत.

प्रत्येक प्राण्याचा ऐकेक जोडा नौकेत ठेवून घेण्याचा आदेश एवढ्या साठी दिला गेला होता की वादळांनतर प्राण्यांचा वंश बाकी राहावा. जर ही सावधगिरी बाळगली गेली नसती तर वादळ संपल्यानंतर लांबवर पर्यंत कोणताहि प्राणी अस्तित्वात नसल्यामुळे त्या लोकांना जे नौकेत वाचवले गेले होते दैनंदिन गरजा भागविण्याकरीता मोठ्या बिकट स्थितीचा सामना करावा लागला असता. नौकेत जनावरांचे जोडे ठेवून घेण्याचा उल्लेख तौरात म्धेहि आहे. (उपपत्ति प्रकरण-६)

५८. म्हणजे तुमच्या घरातील ती माणसे नव्हते जी काफिर आहेत.

५९. तात्पर्य, नौकेत केवळ हजरत नूह यांच्या घराची माणसेच बसली नव्हती, किंबुना त्यांच्यासह इतर ते लोक देखील बसले होते ज्यांनी हजरत नूह वर ईमान बाळगले होते. तथापि या सर्वांची संख्या कमी होती.

४१. आणि तो म्हणाला, या (नौके) त स्वार व्हा. हिचे चालत राहणे व थांबणे अल्लाहच्याच नावाने आहे. [६०] माझा पालनकर्ता मोठा माफ करणारा व दया करणारा आहे.

وَقَالَ ارْكَبُوا فِيهَا بِسْمِ اللّٰهِ مَجْرٖىهَا وَمُرْسٰىهَا ۚ إِنَّ
رَبِّي لَغَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٤١﴾

४२. आणि नौका पर्वतां सारख्या उंचबळणाऱ्या लाटांच्या दरम्यान त्यांना घेऊन चालत होती [६१] आणि नूह ने आपल्या पुत्रास जो त्याच्यापासून अलग होता, पुकारुन म्हटले, हे माझ्या पुत्रा! आमच्यासह (नौकेत) चढ आणि काफिरां सोबत राहू नकोस.[६२]

وَهِيَ تَجْرِي بِهِمْ فِي مَوْجٍ كَالْجِبَالِ ۚ وَنَادٰى نُوحُ ۨابْنَهُ
وَكَانَ فِي مَعْزِلٍ يّٰبُنَيَّ ارْكَبْ مَّعَنَا وَلَا تَكُنْ مَّعَ الْكٰفِرِينَ ﴿٤٢﴾

४३. तो म्हणाला, मी एखाद्या पहाडवर आश्रय घेईन, जो मला पाण्यापसून वाचविल. नूह म्हणाला, आज अल्लाहच्या आदेशाने कोणतीही वस्तु वाचविणार नाही. याखेरीज की त्याने एखाद्या वर दया करावी. एवढ्यात एक लाट त्या दोघांच्या दरम्यान आड आली. आणि तो बुडणाऱ्यांमध्ये सामील झाला. [६३]

قَالَ سَاٰوِي إِلٰى جَبَلٍ يَّعْصِمُنِي مِنَ الْمَاءِ ۚ قَالَ لَا عَاصِمَ
الْيَوْمَ مِنْ أَمْرِ اللّٰهِ إِلَّا مَنْ رَّحِمَ ۚ وَحَالَ بَيْنَهُمَا الْمَوْجُ فَكَانَ
مِنَ الْمُغْرَقِينَ ﴿٤٣﴾

४४. आणि आदेश झाला की हे जमीन आपले पाणी शोषून घे आणि हे आकाशा थांबून जा. तेव्हा पाणी उतरले व निर्णय दिला गेला की नौका जूदी (पहाड)ला लागली [६५] आणि सांगितले गेले की दूर झाला अत्याचारी जन-समूह.[६६]

وَقِيلَ يٰأَرْضُ ابْلَعِي مَاءَكِ وَيٰسَمَاءُ أَقْلِعِي وَغِيضَ الْمَاءُ
وَقُضِيَ الْأَمْرُ وَاسْتَوَتْ عَلَى الْجُودِيِّ وَقِيلَ بُعْدًا لِّلْقَوْمِ
الظّٰلِمِينَ ﴿٤٤﴾

४५. आणि नूह ने आपल्या पालनकर्त्यास पुकारले, म्हणाला हे माझ्या पालनकर्त्या !माझा पुत्र तर माझ्या कुटुंबियापैकी आहे आणि तुझा वायदा सच्चा आहे आणि तू सर्व शासकाहून मोठा शासक आहेस.

وَنَادٰى نُوحٌ رَّبَّهُ فَقَالَ رَبِّ إِنَّ ابْنِي مِنْ أَهْلِي وَإِنَّ
وَعْدَكَ الْحَقُّ وَأَنْتَ أَحْكَمُ الْحٰكِمِينَ ﴿٤٥﴾

४६. फर्माविले, हे नूह तो तुमच्या कुटुंबियापैकी नाही, तो दुराचारी आहे. [६७] यास्तव ज्या गोष्टीचे तुम्हाला ज्ञान नाही, तिच्यासाठी मला विनंती करु नका. मी तुम्हाला उपदेश करतो की (तुम्ही) अज्ञानी लोकांपैकी होऊ नका. [६८]

قَالَ يٰنُوحُ إِنَّهُ لَيْسَ مِنْ أَهْلِكَ ۚ إِنَّهُ عَمَلٌ غَيْرُ صَالِحٍ ۖ فَلَا
تَسْـَٔلْنِ مَا لَيْسَ لَكَ بِهِ عِلْمٌ ۖ إِنِّي أَعِظُكَ أَنْ تَكُونَ مِنَ
الْجٰهِلِينَ ﴿٤٦﴾

६०. ही अल्लाहची कृपा व त्याच्या कार्य सिद्धीस नेण्यावर अटळ विश्वासाची अभिव्यक्ति आहे. म्हणजे ही नौका अल्लाहच्याच चालवण्याने चालेल आणि अशा वादळात जे मनुष्य-वस्त्यांकरीता मृत्युचा संदेश घेऊन आले असावे व अशा महापूरात जो प्रत्येक दिशेने विनाशाची सामुग्री करीत उंचबळत येत असावा. या नौकेचे चालणे संपूर्णपणे अल्लाहचीच कृपा असेल त्याचप्रमाणे जेव्हा ती थांबेल व आम्ही शांतीपूर्वक सलामतीने उतरु तर हा देखील त्याच्या सामर्थ्याचा व कृपेचा परिणाम असेल.

या आयतीद्वारे ओघा ओघाने हेहि स्पष्ट होते की 'बिस्मिल्लाह' असे प्राचीनतम वचन आहे जे हज़रत नूह यांच्या मुखातून निघाले होते आणि मोठा समृद्धशाली सिद्ध झाला. कुरआन ने या वचनास मांगल्याचा स्त्रोत ठरविले यास्तव पवित्र क़ुरआनाचा आरंभ देखील याच समृद्धशाली वचनाने झाले आहे.

६१. पहाडासारख्या लाटा सागरी-वादळातच उठू शकतात यावरुन हे अनुमान निघते की त्या इलाक्यात जेथे हज़रत नूह यांचा जनसमूह वसत होता,केवढे भयंकर वादळ आले असेल. नूह यांचा जनसमूह दजला नदीच्या किनारी वसत होता (पहा नकाशा पृष्ठ-५२५) आणि हा भूभाग दजला व फ़ुरात नदीच्या दरम्यान आहे. या दोन्ही नद्या अरारत पर्वतापासून निघतात व दक्षिणेकडे एकमेकास मिळतात आणि पुढे जाऊन समुद्रास मिळतात. जणू ह्या इलाक्याने बेट-स्वरुप धारण केले आहे. म्हणून नवल नव्हे की असामान्य महापूर उंचबळ झाल्याने हा संपूर्ण इलाका समुद्र बनला असावा आणि वादळी वाऱ्यांच्या प्रवाहाने यात लाटा उंचबळण्याची अशी कैफियत निर्माण झाली असावी की पहाडांसारख्या लाटा उठू लागल्या असाव्यात.

६२. हजरत नूह यांचा एक पूत्र काफिरांमध्ये सामिल होता, म्हणून तो नौकेत चढला नव्हता. हजरत नूह यांनी त्याला ऐन अशा वेळीहि उपदेश केला जेव्हा तो वादळात घेरला गेला आणि त्याच्या व मृत्युच्या दरम्यान काही क्षणांचेच आंतर राहीले होते.

६३. अल्लाहचा न्याय-विधी जेव्हा कार्यान्वित झाला तेव्हा त्याने पैगंबराच्या पुत्रासहि सोडले नाही कारण तो पुत्र काफिर होता आणि काफिरांकरीता ईश-शिक्षा निश्चित ठरली होती. हजरत नूह यांनी आपल्या डोळ्यांनी आपल्या पुत्राची परिणती पाहीली. त्याने ईमान बाळगले असते तर त्याच्यावर ही भयंकर आपत्ति ओढवली नसती.

६४. म्हणजे सत्य व असत्याचा फैसला जमीनीवरच दिला गेला. सत्यनिष्ठांना वाचवले गेले आणि असत्याच्या मलिनतेपासून जमीनीला स्वच्छ-शुद्ध केले गेले.

हे वादळ सर्वसामान्य आपत्ति सारखी आपत्ति नव्हती किंबहुना एक असामान्य घटना व असे भयंकर वादळ होते ज्याने त्या लोकांचा आपवाद वगळता ज्यांनी एकमेव ईश्वरावर ईमान बाळगून हजरत नूह यांच्यासोबत नौकेत चढले होते, सर्व मनुष्य-वस्त्यांना वाहून नेले. एक असा महापूर ज्याने पहाडांवर मात केली व ज्यात पर्वतकाय लाटा उसळत होत्या, एक महान ऐतिहासिक घटना आहे आणि ज्याअर्थी हजरत नूह यांनी याविषयी पूर्वसूचना दिली होती व ज्याप्रकारे सूचित केले होते अगदी त्याच प्रमाणे ती प्रकट झाली व तिच्या तावडीत ते सर्व लोक सापडले जे काफिर होते तेव्हा हे सिद्ध झाले की हा ईश-प्रकोप होता जो काफिर लोकांवर अवतरला आणि हे की हजरत नूह सच्चे पैगंबर होते व त्यांनी एकेशवरवादाचे जे आवाहन सादर केले होते ते सत्य-आवाहन होते.

६५. जूदी एका पाहडाचे नाव आहे. जो कुर्दिस्तान मध्ये आहे (पाह-नकाशा पृष्ठ- ५२५वर) हा अरारात पर्वताचाच एक भाग आहे. जो अर्मीनिया पासून कुर्दिस्तान पर्यंत पसरलेला आहे. हज़रत नूह यांची नौका जेथे स्थिरावली होती त्या ठिकाणाचे नाव बायबल मध्ये अरारात असे आहे (उतपत्ति:८-४) परंतु कुरआनाने स्पष्ट केले आहे की ते स्थान 'जूदी' होते. आणि वादळानंतर निवासाकरीता जूदी पाहडजवळचा इलाकाच योग्य राहिला असेल.

स्पष्ट असावे की या वादळा विषयी कुरआनाने हे कोठेहि म्हटले नाही की हे संपूर्ण पृथ्वीतलावर आले होते, किंबहुना कुरआन जे गोष्ट स्पष्ट करते ती अशी की ज्या लोकांना नौकेत वाचविले गेले होते त्यांच्याचपासून मनुष्य वंशाचा क्रम चालत राहिला. याचा अर्थ असा की त्या वेळी मनुष्य-वस्ती एक विशिष्ट भू-भागाहून पुढे जाऊ शकली नव्हती. म्हणून या भू भागवर जे वादळ आले त्याने संपूर्ण मानव-वस्तीला बुडविले, फक्त त्या ईमान-धारकांच्या समूहा खेरीज ज्यास नौकेत आश्रय मिळाला होता.

६६. म्हणजे अल्लाहच्या कृपेपासून दूर झाला व त्याच्या शापास पात्र ठरला.

६७. याचा हा अर्थ नव्हे की वांशिक दृष्ट्या तो तुमचा (नूहचा) पुत्र नाही, किंबहुना याचा अर्थ असा की तो आचरणाने एक दुराचारी इसम होता म्हणून तो तुमचा पुत्र म्हणविण्यास पात्र नाही. हे अगदी असेच आहे जसे रागाच्या भरात एखाद्या पित्याने आपल्या नालायक मुलाला म्हणावे, तू माझा मुलगा नाही उघड आहे अशा प्रसंगी शाब्दिक अर्थ अभिप्रेत नसतो.

६८. या आयतीवरुन स्पष्ट झाले की हज़रत नूह यांना हे माहित नव्हते की त्यांचा मुलगा दु:श्चरित्र व काफिरांशी मिळालेला आहे म्हणून आपल्या पुत्रास बुडत असतांना पाहून सर्वश्रेष्ठ अल्लाहशी त्यांनी फिर्याद केली.

या वरुन हे दिसून येते की हज़रत नूह यांचा पुत्र उघडपणे काफीर नव्हता,किंबहुना आपल्या कुफ्र-नितीस लपवून राखत होता. याच कारणास्तव नूह ने त्याला नौकेत बसण्यास सागितले व या प्रसंगी त्याला उद्देशून बोलतांना असे फर्माविले नाही की 'काफिरांपैकी होऊ नकोस' किंबहुना फर्माविले, 'काफिरां सोबत राहू नकोस' आणि ज्या अर्थी सर्वश्रेष्ठ अल्लाहचा वायदा होता की तो त्याच्या कुटुंबियांना वाचवील म्हणून त्यांनी आपल्या पुत्राविषयी सर्वश्रेष्ठ अल्लाहशी फिर्याद केली, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना सावध केले की तुम्हाला सत्य-स्थितीचे ज्ञान नाही व अशा परिस्थितीत केवळ भावनेच्या आहारी जाऊन फिर्याद करणे योग्य नाही, जेव्हा तुमच्या कुटुंबियां संदर्भात आधीच हा अपवाद जाहीर केला गेला होता की त्यांना सोडून ज्यांच्या विषयी आमचे फर्मान अलर्मात आधीच लागू झाले आहे' म्हणजे तुमच्या कुटुंबियांपैकीहि अशा लोकांना वाचवले जाणार नाही. जे ईमान बाळगत नाहीत एवढीच चूक हज़रत नूह यांच्याद्वारे घडली. अन्यथा आपला पूत्र खरोखर काफिर आहे हे जाणूनहि त्यांनी अल्लाह जवळ फिर्याद का केली असती परंतु ज्याअर्थी या प्रसंगी जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहचा न्याय दण्ड निर्बधरित्या लागू झाला. नूह च्या अजाणते मुळे आपल्या पुत्राच्या हक्कात फिर्याद करणे पैगंबराला शोभण्यासारखे नव्हते, म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने याबद्दल त्यांना सचेत केले.

*त्याने विनंति केली, हे माझ्या पालन कर्त्या ! मी तुझे शरण मागतो. या गोष्टीपासून की तुला एखाद्या अशा गोष्टीची विनंती करावी जिचे मला ज्ञान नाही. जर तू मला माफ केले नाहीस व मजवर दया केली नाहीत तर मी नाश पावेन.(अल-क़ुर्आन)*

४७. त्याने विनंति केली, हे माझ्या पालन कर्त्या ! मी तुझे शरण मागतो. या गोष्टीपासून की तुला एखाद्या अशा गोष्टीची विनंती करावी जिचे मला ज्ञान नाही. जर तू मला माफ केले नाहीस व मजवर दया केली नाहीस तर मी नाश पावेन.[६९]

قَالَ رَبِّ إِنِّىٓ أَعُوذُ بِكَ أَنْ أَسْـَٔلَكَ مَا لَيْسَ لِى بِهِۦ عِلْمٌ ۖ وَإِلَّا
تَغْفِرْ لِى وَتَرْحَمْنِىٓ أَكُن مِّنَ ٱلْخَٰسِرِينَ ﴿٤٧﴾

४८. आदेश दिला गेला हे नूह (नौकेतून) उतरा. आमच्या तर्फे शांती आणि समृद्धीसह [७०] तुमच्यावरहि आणि त्या जन-समूहांवरहि जे तुमच्या सोबत होते. आणि काही जन-समूह असेहि असतील ज्यांना आम्ही लाभ पोहचवू मग त्यांना आमच्या तर्फे दु:खदायक शिक्षा मिळेल.[७१]

قِيلَ يَٰنُوحُ ٱهْبِطْ بِسَلَٰمٍ مِّنَّا وَبَرَكَٰتٍ عَلَيْكَ وَعَلَىٰٓ أُمَمٍ
مِّمَّن مَّعَكَ ۚ وَأُمَمٌ سَنُمَتِّعُهُمْ ثُمَّ يَمَسُّهُم مِّنَّا عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٤٨﴾

४९. या अपरोक्ष-खबरी होत ज्या आम्ही तुमच्याकडे 'वह्य' (ईश संदेशाच्या) रुपाने पाठवित आहोत. याच्या आधी ना तुम्ही या खबरी जाणत होते ना तुमचा जन-समूह [७२] तेव्हा संयम पाळा कर्मफळ ईश-भय बाळगाऱ्यां करीताच आहे.[७३]

تِلْكَ مِنْ أَنۢبَآءِ ٱلْغَيْبِ نُوحِيهَآ إِلَيْكَ ۖ مَا كُنتَ تَعْلَمُهَآ أَنتَ
وَلَا قَوْمُكَ مِن قَبْلِ هَٰذَا ۖ فَٱصْبِرْ ۖ إِنَّ ٱلْعَٰقِبَةَ لِلْمُتَّقِينَ ﴿٤٩﴾

५०. आणि आदकडे आम्ही त्यांचे बंधू हूद ला पाठविले [७४] तो म्हणाला, हे माझ्या जन-समूहातील लोकांनो ! अल्लाहची इबादत (उपासना) करा. त्याच्या खेरीज तुमचा कोणीहि ईश्वर नाही. निखालस खोटे आहे जे तुम्ही (मनाने) रचले आहे.[७५]

وَإِلَىٰ عَادٍ أَخَاهُمْ هُودًا ۚ قَالَ يَٰقَوْمِ ٱعْبُدُوا۟ ٱللَّهَ مَا لَكُم
مِّنْ إِلَٰهٍ غَيْرُهُۥٓ ۖ إِنْ أَنتُمْ إِلَّا مُفْتَرُونَ ﴿٥٠﴾

५१. लोक हो ! या (सेवे) बद्दल मी तुमच्या कडून कसलाहि मोबदला मागत नाही. माझा मोबदला तर त्याच्याकडे आहे ज्याने मला निर्माण केले, मग काय तुम्ही बुद्धीने काम घेत नाही ?[७६]

يَٰقَوْمِ لَآ أَسْـَٔلُكُمْ عَلَيْهِ أَجْرًا ۖ إِنْ أَجْرِىَ إِلَّا عَلَى ٱلَّذِى
فَطَرَنِىٓ ۚ أَفَلَا تَعْقِلُونَ ﴿٥١﴾

५२. आणि हे माझ्या जन-समूहातील लोकांनो ! आपल्या पालनकर्त्या जवळ माफी मागा, मग त्याच्याकडे रुजू करा [७७] तो तुमच्यावर खूप वर्षाव करणारे ढग पाठवील आणि तुमच्या सामर्थ्यात अधिक सामर्थ्याची वृद्धि करील [७८] आणि (पहा) अपराधी बनून तोंड फिरवू नका.

وَيَٰقَوْمِ ٱسْتَغْفِرُوا۟ رَبَّكُمْ ثُمَّ تُوبُوٓا۟ إِلَيْهِ يُرْسِلِ ٱلسَّمَآءَ
عَلَيْكُم مِّدْرَارًا وَيَزِدْكُمْ قُوَّةً إِلَىٰ قُوَّتِكُمْ وَلَا تَتَوَلَّوْا۟
مُجْرِمِينَ ﴿٥٢﴾

६९. सर्वश्रेष्ठ अल्लाह ने सावध केल्याने जेव्हा हज़रत नूह यांना ही जाणीव झाली की त्यांचा सवाल योग्य नव्हता तेव्हा त्यांनी तत्क्षणी क्षमा व दयेची विनवणी केली व ज्यारितीने केली ती प्रामाणिक व त्यांच्या सन्मार्गीयतेचा पुरावा होय.

७०. मूळ शब्द सलामती अर्थात शांती-सुरक्षा आणि समृद्धी म्हणजे असे मांगल्य जे सतत जारी रहावे.

७१. हज़रत नूह यांच्या सोबत जे लोक नावेत बसले होते ते संख्येने कमी होते, असे असले तरी संपूर्ण मानव समाजाचे हे जणू लोणी होते जे वर आले होते आणि जगातील वंश व जन समूह यांच्याच द्वारे अस्तित्वास येणार होते जणू नौकेतील या प्रवाशांमध्ये विविध जनसमूह व जाती अंतर्भूत होत्या. याच वास्तवतेकडे संकेत करीत फर्माविले गेले की जे जन समूह तुमच्या सोबत आहेत त्यांनाहि शांती सूरक्षा व समृद्धीचा लाभ होईल, तथापि कित्येक जनसमूह असेहि असतील जे शांती सुरक्षेस पात्र ठरणार नाहीत. त्यांना ऐहिक मालमत्ता तर दिली जाईल परंतु शेवटी त्यांना आपल्या आचरणाच्या मोबदल्यापायी ईश-शिक्षा भोगणे क्रमप्राप्त ठरेल.

७२. हज़रत नूह यांचा जो वृत्तांत कुरआनात वर्णिला गेला आहे त्याचे ज्ञान याआधी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना नव्हते, यास्तव क़ुरआन अवतरणापूर्वी पैगंबरांनी हा किस्सा कधीही कोणाला सांगितला नाही व पैगंबरांचा जनसमूह देखील याबाबत अनभिज्ञ होता. राहीले ग्रंथ धारक तर बायबल चे परिशिष्ट 'निर्मिती' (प्रकरण ८,९,१०) मध्ये या वृत्तांताचे काही भाग वर्णिले गेले आहेत, परंतु तेहि विकृत स्वरुपात आणि या घटनेच्या महत्वपूर्ण पैलूंचा तर यात एखादा उल्लेखहि नाही. उदाहरणार्थ ही गोष्ट की हजरत नूह यांचे आवाहन काय होते?विरोधकांचे आक्षेप कोणते होते? हजरत नूह यांनी त्यांना काय उत्तर दिले? ईश-शिक्षा येण्यापूर्वी त्यांनी आपल्या जन समूहास यापासून कशाप्रकारे सचेत केले? हज़रत नूह यांच्या पूत्राचा बुडण्याचा किस्सा; हज़रत नूह यांच्या फिर्यादीवर सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे तंबी आणि हजरत नूह यांची क्षमा याचना. भावी वंशांशी सर्वश्रेष्ठ अल्लाह जो मामला करील त्यासंबंधीची पूर्व सूचना. या समस्त पैलू पासून बायबल चा किस्सा रिक्त आहे, तथापि यात नौकेची लांबी-रुंदी विषयी सविस्तर वर्णन केले गेले आहे. तसेच बायबल मध्ये जेथे हजरत नूह यांना ईश्वराच्या नजरेत स्वीकृत व सदाचारी पुरुष म्हटले गेले आहे (उत्पत्ति प्रकरण ६:८,९) तेथेच अशा गोष्टीचाहि त्यांच्याशी संबंध दर्शविला गेला आहे जी त्यांच्या चारित्र्यास घायाळ करणारी आहे (उत्पत्ति प्रकरण ९:२ ते २५) तथापि क़ुरआनाने लहान सहान गोष्टींना सोडून ती सत्ये सादर केली आहेत जी या घटनेचा मूळ होत. या सत्यांना अशा दृढतेसह प्रस्तुत केले गेले आहे की मनात विश्वासाची कैफियत निर्माण होते. तेव्हा या ऐतिहासिक घटनेचा ह्या अध्यारुत सत्यांसह एखाद्या अशिक्षिताच्या मुखाने उच्चार होणे, त्याचे पैगंबर असण्याचा व क़ुरआन ईश-ग्रंथ असण्याचा स्पष्ट पुरावा नव्हे काय?

७३. म्हणजे हे स्पष्ट प्रमाण असतांनाहि जर तुमचा जन-समूह तुम्हाला खोटे ठरविते तर संयम पाळा. परिणिती त्याच लोकांची चांगली होईल जे अल्लाहचे भय बाळगणारे आहेत. आणि क़ुरआनाची हे भाकीत इहलोकातहि नुशब्द खरे ठरले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) व त्यांच्या साथीदारांना खरा मान-सन्मान व प्रतिष्ठा लाभली आणि ज्या लोकांनी त्यांना खोटे ठरविले ते अपमानित होऊन मेले आणि त्यांचा लवलेशहि बाकी राहीला नाही. पैगंबर व त्याच्या साथीदारांच्या सफलतेचे हे दृश्य तर लोकांनी या जगात पाहून घेतले आणि अजून आखिरत बाकी आहे.

७४. आद जन-समूहाचा वृत्तांत सूरह अअराफ आयत क्र. ६८ ते ७२ मध्ये वर्णिला गेला आहे. या प्रसंगी ह्या आयती व त्यांचे स्पष्टीकरण टीप क्र.१०५ ते ११४ तसेच सूरह फज्रची आयत क्र.६ ते ८ व त्यांचे स्पष्टीकरण टीप ८ ते ११ दृष्टीसमोर ठेवावे.

७५. म्हणजे अल्लाहला सोडून ज्यांना तुम्ही उपास्य बनवून ठेवले आहे ते तुमचे कल्पित ईश्वर होत.

७६. बुद्धिने काम घेण्यात व इच्छा आकांक्षांच्या मागे धावण्यात मोठा फरक आहे. पहिली गोष्ट अंतर्दृष्टि होय तर दुसरी अज्ञानता.

७७. याचे स्पष्टीकरण टीप क्र.८ मध्ये केले गेले आहे.

७८. म्हणजे तौहीद (एकेश्वरवाद) कबूल करण्याच्या व अल्लाहकडे रुजू करण्याच्या स्थितीत तो तुम्हाला अधिकाधिक देणग्यांनी उपकृत करील. उपजिविकाहि प्रदान करील व सामूहीक सामर्थ्यातहि वृद्धि होईल. अर्थात राष्ट्रीय व सामूहिक पातळीवर याचे मनोहर परिणाम निघतील.

स्पष्ट असावे की एकेश्वरवादी आवाहनास प्रस्तुत करताना त्याच्या ऐहिक फायद्यांचा उल्लेख केवळ ओघाओघाने आला आहे, खऱ्या सफलतेच्या रुपाने नव्हे कारण खरी सफलता जिला समस्त प्रेषित जीवनाचे ध्येय बनविण्याचे आवाहन करीत राहिले ती आखिरतची सफलता होय.

५३. ते म्हणाले, तुम्ही एखादे स्पष्ट चिन्ह तर घेऊन आमच्या जवळ आले नाही [७९] आणि केवळ तुमच्या सांगण्यावरुन आम्ही आपल्या दैवतांना सोडणारे नाहीत आणि आम्ही कोणत्याही प्रकारे तुमच्यावर ईमान बाळगणार नाहीत.

قَالُوْا يٰهُوْدُ مَا جِئْتَنَا بِبَيِّنَةٍ وَّمَا نَحْنُ بِتَارِكِيْٓ اٰلِهَتِنَا
عَنْ قَوْلِكَ وَمَا نَحْنُ لَكَ بِمُؤْمِنِيْنَ ﴿٥٣﴾

५४. आम्ही तर म्हणतो की आमच्या उपास्यांपैकी एखाद्याचा कोप तुमच्यावर झाला आहे [८०] तो म्हणाला, मी अल्लाहला साक्षी ठरवितो आणि तुम्ही साक्षी रहा की मी त्यांच्या पासून अगदी बेजार आहे ज्यांना तुम्ही (अल्लाहचा) सहभागी ठरवून टाकले आहे.

اِنْ نَّقُوْلُ اِلَّا اعْتَرٰىكَ بَعْضُ اٰلِهَتِنَا بِسُوْٓءٍ ۭ قَالَ اِنِّيْٓ اُشْهِدُ اللّٰهَ
وَاشْهَدُوْٓا اَنِّيْ بَرِيْۗءٌ مِّمَّا تُشْرِكُوْنَ ﴿٥٤﴾

५५. त्या (एकमेव ईश्वर) खेरीज. म्हणून तुम्ही माझ्या विरुद्ध कारवाई करुन पहा व मला किंचितहि सवड देऊ नका.

مِنْ دُوْنِهٖ فَكِيْدُوْنِيْ جَمِيْعًا ثُمَّ لَا تُنْظِرُوْنِ ﴿٥٥﴾

५६. मी अल्लाहवर भरवसा केला जो माझा पालनकर्ता आहे व तुमचा पालनकर्ता देखील असा कोणताहि सजीव नाही, ज्याची शेंडी त्याने धरुन ठेवली नसावी [८१] निःसंशय माझा पालनकर्ता सरळ मार्गवर आहे .[८२]

اِنِّيْ تَوَكَّلْتُ عَلَى اللّٰهِ رَبِّيْ وَرَبِّكُمْ ۭ مَا مِنْ دَاۗبَّةٍ اِلَّا هُوَ
اٰخِذٌۢ بِنَاصِيَتِهَا ۭ اِنَّ رَبِّيْ عَلٰي صِرَاطٍ مُّسْتَقِيْمٍ ﴿٥٦﴾

५७. जर तुम्ही तोंड फिरविता तर ज्या संदेशासह मला पाठविले गेले होते तो मी तुम्हाला पोहचविला आणि माझा पालनकर्ता तुमच्या जागी दुसरा समूह आणील तुम्ही त्याचे काहीहि बिघडवू शकणार नाही. निःसंशय माझा पालनकर्ता प्रत्येक गोष्टीवर निरीक्षक आहे.

فَاِنْ تَوَلَّوْا فَقَدْ اَبْلَغْتُكُمْ مَّآ اُرْسِلْتُ بِهٖٓ اِلَيْكُمْ ۭ وَيَسْتَخْلِفُ رَبِّيْ
قَوْمًا غَيْرَكُمْ ۚ وَلَا تَضُرُّوْنَهٗ شَيْـًٔا ۭ اِنَّ رَبِّيْ عَلٰي كُلِّ شَيْءٍ حَفِيْظٌ ﴿٥٧﴾

५८. मग जेव्हा आमचा आदेश येऊन पोहचला तेव्हा आम्ही आपल्या कृपेने हूद ला व त्यालोकांना ज्यांनी त्याच्या सोबत ईमान बाळगले होते, वाचविले आणि आम्ही त्यांना एका अशा शिक्षेपासून मुक्ति दिली जी अत्यंत कठोर होती. [८३]

وَلَمَّا جَاۗءَ اَمْرُنَا نَجَّيْنَا هُوْدًا وَّالَّذِيْنَ اٰمَنُوْا مَعَهٗ بِرَحْمَةٍ مِّنَّا ۚ
وَنَجَّيْنٰهُمْ مِّنْ عَذَابٍ غَلِيْظٍ ﴿٥٨﴾

७९. हजरत हूद यांच्या व्यक्तित्वात प्रेषित-पदाची स्पष्ट चिन्हे होती, ज्यांना पाहून विश्वास केला जाऊ शकत होता की त्यांना अल्लाहने पाठविले आहे, परंतु त्यांचा जनसमूह बौद्धिक दृष्ट्या आंधळा होता यास्तव त्या लोकांना ही चिन्हे दिसून येत नव्हती.

८०. यावरुन असे दिसून येते की ते किती श्रम पूजक होते परंतु त्यांच्या भ्रमाचे पितळ तेव्हा उघडकीस आले जेव्हा अल्लाहचा प्रकोप त्यांच्यावर अवतरला व त्यांचे काल्पनिक देवी देवता त्यांच्या मदतीला येऊ शकले नाहीत व ना हज़रत हूद यांना काही नुकसान पोहचवू शकले.

८१. अर्थात मनुष्यासह समस्त सजीव निर्मिती अल्लाहच्या सामर्थ्याधीन आहेत. त्याच्या पकडीतून कोणी ही स्वतंत्र नाही.

८२. सरळ मार्गाशी अभिप्रेत न्याय आणि सच्चाईचा मार्ग होय. आणि अल्लाहचे सरळ मार्गावर असण्याचा अर्थ असा की त्याची सर्व कामे योग्य व त्याचे समस्त निर्णय सच्चाई व न्यायावर आधारित असतात, त्याच्या हातात प्रत्येक सजीवाची शेंडी असली तरी तो कोणावरहि जुलुम व अतिरेक करीत नाही.

८३. आद जन समूहावर प्रकोप सोसाट्याचे वारे व भयंकर वादळाच्या रुपाने अवतरला होता.(पहा सूरह अहक़ाफ आयत क्र.२४,२५ आणि सूरह जारीयत आयत क्र.४१,४२)

५९. हे आहेत आद. यांनी आपल्या पालन कर्त्याच्या आयतींशी इन्कार केला व त्याच्या प्रेषितांची अवज्ञा केली [८४] आणि प्रत्येक बंडखोर सत्य- विरोधकाच्या म्हणण्यानुसार चालत राहिले.[८५]

وَتِلْكَ عَادٌ جَحَدُوا بِآيَاتِ رَبِّهِمْ وَعَصَوْا رُسُلَهُ وَاتَّبَعُوا أَمْرَ كُلِّ
جَبَّارٍ عَنِيدٍ ﴿٥٩﴾

६०. यांच्या मागे या जगातहि निर्भत्सना लावली गेली आणि कियामतीच्या दिवशी देखील ऐका आद (जन-समूहा) ने आपल्या पालनकर्त्याशी कुफ्र केले. ऐका (ईश-कृपेपासून ) वंचित केले गेले 'आद' हूदचा जन-समूह.

وَأُتْبِعُوا فِي هَٰذِهِ الدُّنْيَا لَعْنَةً وَيَوْمَ الْقِيَامَةِ ۗ أَلَا إِنَّ عَادًا
كَفَرُوا رَبَّهُمْ ۗ أَلَا بُعْدًا لِعَادٍ قَوْمِ هُودٍ ﴿٦٠﴾

६१. आणि समूदकडे आम्ही त्यांचा भाऊ सॉलेहला पाठविले [८६] तो म्हणाला, हे माझ्या जन-समूहातील लोकांनो ! अल्लाहची उपासना करा, त्याच्या शिवाय तुमचा कोणीहि ईश्वर नाही त्याने तुम्हाला जमीनीपासून निर्माण केले [८७] आणि तिच्यावर तुम्हाला वसविले. यास्वत त्याच्याकडे माफी मागा व त्याच्याकडे रुजू करा. निःसंशय माझा पालनकर्ता जवळ आहे आणि दुआंना कबूल करणारा आहे . [८८]

وَإِلَىٰ ثَمُودَ أَخَاهُمْ صَالِحًا ۚ قَالَ يَا قَوْمِ اعْبُدُوا اللَّهَ مَا لَكُمْ مِنْ إِلَٰهٍ
غَيْرُهُ ۖ هُوَ أَنْشَأَكُمْ مِنَ الْأَرْضِ وَاسْتَعْمَرَكُمْ فِيهَا فَاسْتَغْفِرُوهُ
ثُمَّ تُوبُوا إِلَيْهِ ۚ إِنَّ رَبِّي قَرِيبٌ مُجِيبٌ ﴿٦١﴾

६२. ते म्हणाले, सालेह यापूर्वी तर आम्ही तुमच्या कडून मोठ्या आकांक्षा बाळगून ठेवल्या होत्या [८९] काय तुम्ही आम्हाला ह्या उपास्यांच्या भक्ति पासून रोखता ज्यांची भक्ति आमचे वाड वडील करीत आलेत.[९०] आम्हाला तर या गोष्टीत मोठी शंका आहे जिच्याकडे तुम्ही आमंत्रण देत आहात आणि या गोष्टीने तर आम्हाला मोठ्या पेचात टाकले आहे.

قَالُوا يَا صَالِحُ قَدْ كُنْتَ فِينَا مَرْجُوًّا قَبْلَ هَٰذَا ۖ أَتَنْهَانَا أَنْ نَعْبُدَ مَا
يَعْبُدُ آبَاؤُنَا وَإِنَّنَا لَفِي شَكٍّ مِمَّا تَدْعُونَا إِلَيْهِ مُرِيبٍ ﴿٦٢﴾

६३. सालेह म्हणाला, हे माझ्या जन समूहातील लोकांनो ! तुम्ही हा देखील विचार केला की जेव्हा मी आपल्या पालनकर्ता तर्फे एका उज्ज्वल प्रमाणावर कायम आहे व त्याने मला आपल्या कृपेने उपकृत केले आहे तेव्हा जर मी त्याची अवज्ञा करीन तर अल्लाहच्या पकडीतून कोण मला वाचवील? माझ्या विनाशात वाढ करण्या खेरीज तुम्ही आणखी काहीहि करु शकत नाही.[९१]

قَالَ يَا قَوْمِ أَرَأَيْتُمْ إِنْ كُنْتُ عَلَىٰ بَيِّنَةٍ مِنْ رَبِّي وَآتَانِي مِنْهُ
رَحْمَةً فَمَنْ يَنْصُرُنِي مِنَ اللَّهِ إِنْ عَصَيْتُهُ ۖ فَمَا تَزِيدُونَنِي غَيْرَ
تَخْسِيرٍ ﴿٦٣﴾

८४. समस्त प्रेषित एकच संदेश सादर करीत राहीलेत यास्तव कोणत्याहि एका प्रेषिताची अवज्ञा वस्तुत: समस्त प्रेषितांची अवज्ञा होय म्हणून येथे हजरत हूद यांच्या अवज्ञेस समस्त प्रेषितांची अवज्ञा ठरविले आहे.

८५. प्रेषित सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे अधिकारी (Authority) असतात की त्यांचे आज्ञापालन केले जावे परंतु जे लोक अल्लाहशी एकनिष्ठ होऊन राहू इच्छित नाही ते त्याच्या प्रेषिताच्या आज्ञापालनास तयार होत नाहीत, किंबहुना प्रेषिताच्या विरोधात अशा नेत्यांचे, पुढाऱ्यांचे व सत्ताधीशांच्या आदेशांचे अनुसरण करु लागतात व त्यांच्या कथानानुसार आचरण करु लागतात,जे ईश्वराचे बंडखोर व सत्याचे वैरी असतात. अर्थात त्यांची ही वागणूक ईश्वराच्या प्रकोपास आमंत्रण देते.

८६. समूद जन समूहाचा वृत्तांत सूरह अअराफ आयत क्र.७३ ते ७९ मध्ये वर्णिला गेला आहे. या प्रसंगी उल्लेखित आयती व त्यांच्या टीपा ११६ ते १२६ तसेच सूरह फज्र आयत क्र.९ व त्यावरील टीपा १२ ते १४ दृष्टीसमोर ठेवावे.

८७. पृथ्वीतलावर मानव जातीचा आरंभ अशा प्रकारे झाला की सर्वश्रेष्ठ अल्लाहने सर्वप्रथम मानव अर्थात हजरत आदम यांना मातीद्वारे निर्माण केले, यास्तव ही वस्तुस्थिती आहे की माणसाला जमीनीपासून निर्माण केले गेले आहे आणि ही देखील वास्तविकता आहे की मनुष्य-जीवन ज्या गोष्टीवर अवलंबून आहे त्या जमीनीपासूनच प्राप्त होतात, येथ पावेतो की ज्या जनावरांचे मांस तो खातो ती जनावरे देखील जमीनी पासून आपले खाद्य प्राप्त करतात.

८८. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बकरा टीप क्र.२४७ व २४८.

८९. यावरुन स्पष्ट होते की हजरत सालेह यांचे प्रेषित होण्यापूर्वीचे जीवन अगदी स्वच्छ शुद्ध होते आणि त्यांच्या असामान्य पात्रतेस व प्रतिष्ठापूर्ण व्यक्तिमत्वास पाहून लोकांनी त्यांच्या कडून अशा अपेक्षा बाळगल्या होत्या की ते जन समूहाचे नाव उंचावतील परंतु जेव्हा त्यांनी शिर्कच्या विरुद्ध आवाज उंच केला व एकेश्वर वादाचे आवाहन प्रस्तुत केले तेव्हा त्यांच्या आशा आकांक्षा धुळीस मिळाल्या.

९०. समूद जन समूहाजवळ मूर्तिपूजा योग्य व उचित असण्या संबंधीचे कसलेही प्रमाण नव्हते, किंबहुना त्यांची अशी धारणा होती की या प्रकारचे अनुसरण एवढ्यासाठीच केले गेले पाहीचे की हा या संस्कृतिचा भाग आहे जो वाडवडीला पासून चालत आला आहे.

९१. म्हणजे जर मी तुमच्या बहकविण्याने अल्लाहची अवज्ञा करीन, वस्तुत: मला अंतर्दृष्टि चा मार्ग लाभला आहे तेव्हा अल्लाहच्या पकडीतून तुम्ही मला सोडायचे तर राहीले मात्र तुमच्या मुळे मी अपराधा वर अपराध करण्याचीच शक्यता आहे आणि ही गोष्ट माझ्या नाशात वाढ होण्यास कारणीभूत ठरु शकते.

६४. आणि हे माझ्या जन समूहा ! ही सांडणी तुमच्या करीता एक निशाणी आहे [९२] तिला सोडून द्या की अल्लाहच्या जमीनीवर चरत रहावे व तिला कोणत्याहि प्रकारचा त्रास देऊ नका अन्यथा लवकरच ईश-शिक्षा तुम्हाला येऊन गाठील.

وَيَٰقَوْمِ هَٰذِهِۦ نَاقَةُ ٱللَّهِ لَكُمْ ءَايَةً فَذَرُوهَا تَأْكُلْ فِىٓ أَرْضِ ٱللَّهِ
وَلَا تَمَسُّوهَا بِسُوٓءٍ فَيَأْخُذَكُمْ عَذَابٌ قَرِيبٌ ﴿٦٤﴾

६५. परंतु त्यांनी तिच्या कूच्या कापून टाकल्या [९३] तेव्हा तो म्हणाला, आपल्या घरांमध्ये आणखी तीन दिवस निवास करा. हा वायदा आहे जो खोटा साबीत होणार नाही.

فَعَقَرُوهَا فَقَالَ تَمَتَّعُوا۟ فِى دَارِكُمْ ثَلَٰثَةَ أَيَّامٍ ۖ ذَٰلِكَ وَعْدٌ غَيْرُ
مَكْذُوبٍ ﴿٦٥﴾

६६. मग जेव्हा आमचा आदेश आला तेव्हा आम्ही सालेहला व त्या लोकांना ज्यांनी त्याच्यासह ईमान बाळगले होते, आपल्या कृपेने वाचविले आणि त्या दिवसाच्या अपमानापासून मुक्ति दिली. नि:संशय तुमचा पालन कर्ताच सामर्थ्यवान व प्रभावशाली आहे.

فَلَمَّا جَآءَ أَمْرُنَا نَجَّيْنَا صَٰلِحًا وَٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ مَعَهُۥ بِرَحْمَةٍ مِّنَّا
وَمِنْ خِزْىِ يَوْمِئِذٍ ۗ إِنَّ رَبَّكَ هُوَ ٱلْقَوِىُّ ٱلْعَزِيزُ ﴿٦٦﴾

६७. आणि ज्या लोकांनी अत्याचार केला होता त्यांना एका जबरदस्त गर्जनेने धरले आणि ते आपल्या घरांमध्ये तोंडघशी पडून राहीले. [९४]

وَأَخَذَ ٱلَّذِينَ ظَلَمُوا۟ ٱلصَّيْحَةُ فَأَصْبَحُوا۟ فِى دِيَٰرِهِمْ جَٰثِمِينَ ﴿٦٧﴾

६८. जणू त्या (घरां) मध्ये कधी राहीलेच नव्हते [९५] ऐका ! समूदने आपल्या पालनकर्त्याशी कुफ्र केले. ऐका ! ईश-कृपेपासून वंचित केले गेले समूद !

كَأَن لَّمْ يَغْنَوْا۟ فِيهَآ ۗ أَلَآ إِنَّ ثَمُودَا۟ كَفَرُوا۟ رَبَّهُمْ ۗ أَلَا بُعْدًا
لِّثَمُودَ ﴿٦٨﴾

६९. आणि आमचे संदेश-वाहक (ईश-दूत) इब्राहीम जवळ खुशखबरी घेऊन पोहोचले. [९६] ते म्हणाले सलाम (शांती) असो तुमच्यावर त्याने उत्तर दिले तुमच्यावरहि सलाम असो. [९७] मग त्याने विलंब न करता एक भाजलेले वासरु आणले .[९८]

وَلَقَدْ جَآءَتْ رُسُلُنَآ إِبْرَٰهِيمَ بِٱلْبُشْرَىٰ قَالُوا۟ سَلَٰمًا ۖ قَالَ سَلَٰمٌ ۖ
فَمَا لَبِثَ أَن جَآءَ بِعِجْلٍ حَنِيذٍ ﴿٦٩﴾

७०. परंतु जेव्हा पाहिले की त्यांचे हात त्या (वासरु) कडे सरसावत नाहीत तेव्हा त्यांना अनोळखी समजला व त्यांच्या कडून भिती जाणली [९९] ते म्हणाले भिती बाळगू नका आम्हाला लूत जन समूहाकडे पाठविले गेले आहे.[१००]

فَلَمَّا رَءَآ أَيْدِيَهُمْ لَا تَصِلُ إِلَيْهِ نَكِرَهُمْ وَأَوْجَسَ مِنْهُمْ خِيفَةً ۚ
قَالُوا۟ لَا تَخَفْ إِنَّآ أُرْسِلْنَآ إِلَىٰ قَوْمِ لُوطٍ ﴿٧٠﴾

९२. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अअराफ टीप क्र.११९

९३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह शम्स टीप क्र.१५

९४. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अअराफ टीप क्र.१२३ व १२४

९५. ही देखील एक फार मोठी ऐतिहासीक घटना आहे, ज्यात सत्याचा बोलबाला झाला, म्हणून हज़रत सालेह व त्यांच्या ईमान-धारक साथीदारांना वाचविले गेले आणि समस्त अनेकेश्वरवादी व काफिर ईश शिक्षेच्या तावडीत सापडले आणि हे सर्व काही अशा प्रकारे झाले की हज़रत सालेह यांनी त्यांना आधीच खबरदार केले होते म्हणून याचा खुलासा असा केला जाऊ शकत नाही की हा सर्वसामान्यत:घडून येणाऱ्या प्रसंगापैकीच एक प्रसंग होता. असे असते तर ना हज़रत सालेह यांना त्याची पूर्व सूचना लाभली असती व ना त्याच्या तावडीतून ईमान धारक वाचले असते.

९६. हे फिरिशते होते जे मनुष्य रुपाने हजरत इब्राहीम यांच्याजवळ आले होते. ही घटना त्या काळची होय जेव्हा ते आपल्या देशातून स्थलांतरीत होऊन पॅलेस्टीन मध्ये वसले होते.

९७. सलाम चा अर्थ आहे अल्लाह तुम्हाला सलामत राखो. हे दुआ स्वरुप वचन फिरिश्त्यांच्या शिष्टाचार व प्रेषित संस्कृतिचा अंश आहे. म्हणून इस्लाम ने यास सांस्कृतिक रितीचे स्वरुप दिले आहे की जेव्हा मुसलमान आपसात भेटतील तेव्हा सर्वप्रथम एकमेकाला सलाम करावा. हा सलाम रीवाजात्मक नाही किंबहुना खऱ्या अर्थाने ईश्वराशी दुआ आहे आणि आपल्या भावाशी हितचिंतन व्यक्त करणे देखील.

९८. ज्या अर्थी फिरिशते मनुष्य स्वरुपात होते म्हणून अनोळखी माणसांना पाहून हज़रत इब्राहीम असे समजले की हे पाहुणे आहेत जे प्रवास करीत आले आहेत म्हणून त्यांनी तत्क्षणी त्यांच्या आतिथ्याची व्यवस्था केली.एक वासरु भाजून आणले व त्याचे मांस पाहुण्यांच्या पुढ्यात ठेवले. या घटनेने जेथे हजरत इब्राहीम यांचे औदार्य व आतिथ्याचा पुरावा मिळतो तिथे हा संकेतहि मिळतो की अतिथीच्या आगमनावर त्यांच्या खाण्यापिण्याची त्वरीत व्यवस्था केली पाहीजे कारण प्रवासाच्या स्थितीत माणसाला प्रसंगी जेवण सुद्धा लाभत नाही.

या खेरीज ही गोष्ट देखील स्पष्ट होते की गाय सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या शरीयतीत अतिप्राचीन काळापासून हलाल होत आली आहे. हज़रत इब्राहीम यांची शरीयत प्राचीनतम शरीयत होय,ज्यानुसार गाय हलाल होती. म्हणून त्यांनी वासरु ला जिबह केले व त्याचे मांस भाजून पाहुण्यापुढे ठेवले.

९९. जेव्हा हज़रत इब्राहीम यांनी असे पाहिले की पाहुण्या मंडळीचे हात खाण्यासाठी पुढे होत नाही तेव्हा त्यांनी ताडले की हे मनुष्य नाहीत किंबहुना फिरीश्ते आहेत व त्यांचे मनुष्य स्वरूपात येण्याचे कारण संभवत: एखादी कसोटी असावी व कसोटीच्या विचारनेच त्यांना भिती वाटली की अल्लाहने यांना कोणती कसोटी घेण्यासाठी पाठविले आहे व त्या कसोटीचे स्वरुप काय आहे माहित नाही.

१००. अर्थात आम्हाला लूत जन समूहाच्या कसोटीसाठी पाठविले गेले आहे. यासाठी की त्यांना अपराध करतानाच पकडावे व त्यांच्यावर ती ईश-शिक्षा आणावी जिचा फैसला सर्वश्रेष्ठ अल्लाहने फर्माविला आहे.

७१. आणि त्या (इब्राहीम) ची पत्नी देखील उभी होती. ती हसली. तेव्हा आम्ही तिला इसहाक व इसहाक नंतर याकूबची खुशखबरी दिली. [१०१]

وَامْرَاَتُهٗ قَآئِمَةٌ فَضَحِكَتْ فَبَشَّرْنٰهَا بِاِسْحٰقَ ۙ وَمِنْ وَّرَآءِ اِسْحٰقَ يَعْقُوْبَ ﴿٧١﴾

७२. ती म्हणाली, हाय ![१०२] मला संतति होईल. वस्तुतःमी म्हातारी झाले आहे व माझे पती देखील म्हातारे झाले आहेत ही तर मोठी विचित्र गोष्ट आहे. [१०३]

قَالَتْ يٰوَيْلَتٰۤى ءَاَلِدُ وَاَنَا عَجُوْزٌ وَّهٰذَا بَعْلِىْ شَيْخًا ؕ اِنَّ هٰذَا لَشَىْءٌ عَجِيْبٌ ﴿٧٢﴾

७३. त्यांनी (संदेश वाहकांनी) म्हटले, काय तुम्ही अल्लाहच्या आदेशावर आश्चर्य व्यक्त करता? हे पैगंबर घराण्याच्या लोकांनो ! अल्लाहची कृपा व त्याची समृद्धि असो तुमच्यावर, निःसंशय तो स्तुतिस पात्र आणि मोठा वैभवशाली आहे. [१०४]

قَالُوْۤا اَتَعْجَبِيْنَ مِنْ اَمْرِ اللّٰهِ رَحْمَتُ اللّٰهِ وَبَرَكٰتُهٗ عَلَيْكُمْ اَهْلَ الْبَيْتِ ؕ اِنَّهٗ حَمِيْدٌ مَّجِيْدٌ ﴿٧٣﴾

७४. मग जेव्हा इब्राहीमचे भय दुर झाले व त्यास खुशखबरी मिळाली तेव्हा तो लूत जन-समूहाबाबत आमच्याशी विवाद करु लागला. [१०५]

فَلَمَّا ذَهَبَ عَنْ اِبْرٰهِيْمَ الرَّوْعُ وَجَآءَتْهُ الْبُشْرٰى يُجَادِلُنَا فِىْ قَوْمِ لُوْطٍ ﴿٧٤﴾

७५. वस्तुतः इब्राहीम मोठा गंभीर, कनवाळू आणि (अल्लाहकडे) रुजू होणारा होता. [१०६]

اِنَّ اِبْرٰهِيْمَ لَحَلِيْمٌ اَوَّاهٌ مُّنِيْبٌ ﴿٧٥﴾

७६. हे इब्राहीम ! ही गोष्ट सोडून द्या. तुमच्या पालकर्त्याचा हुकूम सादर झाला आहे. आणि या लोकांवर अशा प्रकारची शिक्षा आपत्ती येण्याच्या बेतात आहे, जी कशा प्रकारेहि टळू शकत नाही.

يٰۤاِبْرٰهِيْمُ اَعْرِضْ عَنْ هٰذَا ۚ اِنَّهٗ قَدْ جَآءَ اَمْرُ رَبِّكَ ۚ وَاِنَّهُمْ اٰتِيْهِمْ عَذَابٌ غَيْرُ مَرْدُوْدٍ ﴿٧٦﴾

७७. आणि जेव्हा आमचे संदेश वाहक लूत, [१०७] जवळ पोहोचले तेव्हा त्यांच्या आगमनाने तो चिंताग्रस्त झाला आणि मन संकोचले व म्हणू लागला. आज तर मोठा संकटाचा दिवस आहे. [१०८]

وَلَمَّا جَآءَتْ رُسُلُنَا لُوْطًا سِىْٓءَ بِهِمْ وَضَاقَ بِهِمْ ذَرْعًا وَّقَالَ هٰذَا يَوْمٌ عَصِيْبٌ ﴿٧٧﴾

१०१. हजरत इब्राहीम यांची पत्नी पाहुण्यांच्या सेवेकरीता जवळच उभी होती. तिने जेव्हा ऐकले की हे फिरीश्ते आहेत व हज़रत इब्राहीम ना पुत्रप्राप्तीची खुशखबरी देत आहेत तेव्हा तिला आपोआप हसू आले कारण म्हातारपणात मूल होण्याची खबर बाह्यत: आश्चर्यचकीत करणारी होती. स्पष्ट असावे की खुशखबरी देण्याची ही घटना येथे संक्षिप्तपणे वर्णिली गेली आहे. सूरह जारीयात मध्ये आहे की फिरिश्त्यांनी पुत्र जन्माला येण्याची खुशखबरी हजरत इब्राहीम यांना दिली होती व त्यावर त्यांच्या पत्नीने आश्चर्य व्यक्त करीत म्हटले होते मी तर म्हतारी, वांझ आहे म्हणून या आयतीत त्यांच्या पत्नीच्या हसण्याचा जो उल्लेख आहे त्याचा संबंध त्या खुशखबरीशी आहे जी हजरत इब्राहीम यांना दिली गेली होती व जेव्हा ती आर्श्चयाने हसली तेव्हा तिला अधिक ही खुशखबरी दिली गेली की तुमच्या घरात केवळ पुत्रच जन्माला येणार नाही किंबहुना त्याच्या नंतर नातू देखील जन्माला येईल.

हजरत इब्राहीम यांची पत्नीचे नाव सारा होते आणि त्या वेळपावेतो त्यांना कसलेही संतान नव्हते हा किस्सा बायबल चे पुस्तक उत्पत्ति प्रकरण १८ मध्येहि वर्णिला गेला आहे परंतु मिश्रणासह.

१०२. आश्चर्य प्रकट करण्याकरीता त्यांनी स्त्री-सुलभ शैलीत असे म्हटले अशा प्रसंगी शाब्दीक अर्थ अभिप्रेत नसतो.

१०३. बायबल मधील उल्लेखानुसार त्या वेळी हजरत इब्राहीम यांचे वय शंभर वर्षे व सारचे वय ९० वर्षे होते. (उत्पत्ति १७:१७)

१०४. फिरिश्त्यांनी हजरत साराचे आश्चर्य दूर करण्याकरीता एक गोष्ट तर ही फर्माविली की अल्लाहचा कोणताही आदेश नवल करण्या योग्य नाही. दुसरी गोष्ट ही फर्माविली की तुम्ही पैगंबर घराण्यातील आहात ज्यांच्यावर अल्लाहची विशेष कृपा आहे म्हणून जर त्याने तुम्ही वृद्ध असून देखील तुम्हाला संतती प्रदान करण्याचा फैसला फर्माविला आहे तर यास त्याची विशेष कृपा समजले पाहीजे आणि तिसरी गोष्ट अशी फर्माविले की तो गुणांनी युक्त आहे. त्याचे प्रत्येक काम खूबीचे असते आणि तो मोठा वैभवशाली आहे म्हणून त्याची कामे अशी असतात की प्रत्येक निर्णयाद्वारे ईश-कौशल्य व्यक्त होते. ओघाओघाने हे हि स्पष्ट झाले की अहले बैत (प्रेषित-घरण्यात) पत्नीचाहि समावेश आहे कारण येथे हज़रत इब्राहीम यांना संबोधून फिरिश्त्यांनी अहले बैत असे म्हटले आहे. प्रेषित-घराण्याचा हा स्पष्ट अर्थ असूनहि मुसलमानांचा एक पंथ असा आहे जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अहले बैत (प्रषित घराण्यात) मध्ये त्यांच्या पवित्र पत्नीना समाविष्ट जाणत नाही. उघड आहे हे त्याच्या अर्थापासून स्पष्टत: तोंड फिरवणे होय.

१०५. हा वाद सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून आपले म्हणणे मान्य करुन घेण्याच्या अर्थाने नव्हता, किंबहुना एक सहानुभूतिपुर्वक विनंति होती. ईश-शिक्षेची खबर ऐकून हजरत इब्राहीम यांना एक तर ही भिती वाटली की त्या जन समूहात अल्लाहचा पैगंबर हजरत लूत उपस्थित आहे यास्तव सूरह अन्कबूत (आयत क्र.३२) मध्ये हजरत इब्राहीम चे हे कथन उल्लिखित आहे. اِنَّ فِيهَا لُوطًا "त्यात लूत उपस्थित आहे" आणि दुसरे असे की त्यांच्या विचारात या जन-समूहापैकी काही लोकांनी तर खचितच ईमान बाळगले असेल आणि जर सर्वश्रेष्ठ अल्लाहने या जन समूहास अधिक अवसर दिला तर आणखी काही लोक ईमान बाळगण्याची शक्यता आहे. ज्याअर्थी हजरत इब्राहीम यांना परिस्थितीचे पूर्णत:ज्ञान नव्हते, म्हणून ते संभाव्य गोष्टींचा विचार करता फिरिश्त्यांशी वाद करीत राहीले ज्यावरुन त्यांची मनुष्य सहानुभूति आणि सहृदयता व्यक्त होते. परंतु पुढे आयत क्र.७६ मधील वर्णना नुसार फिरिश्त्यांनी त्यांना सांगितले की या समस्ये बाबत विवाद करणे व्यर्थ होय, अशासाठी की सर्वश्रेष्ठ अल्लाहने लूत जन समूहावर शिक्षा आणण्याचा निर्णय सादर केला आहे अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाह एखाद्या जन समूहावर शिक्षेचा निर्णय अशाच वेळी फर्माविता जेव्हा त्या जन-समूहातून अधिक असे लोक निर्माण होण्याची शक्यता उरत नाही जे ईमान आणतील. फिरिश्त्यांशी इब्राहीमच्या या विवादाचा उल्लेख बायबल मध्ये सविस्तर रित्या वर्णिला गेला आहे. (उत्पत्ति प्रकरण १८)

१०६. म्हणजे हजरत इब्राहीम मध्ये ज्या अर्थी हे गुण होते म्हणून त्यांनी लूत जनसमूहा बाबत कनवाळू वृत्तीचे प्रमाण दिले आणि ईश-शिक्षेला टाळण्याकरीता सर्वश्रेष्ठ अल्लाहशी विनम्रभावे विनंती केली.

१०७. हजरत लूत यांचा वृत्तांत संक्षिप्तपणे सूरह अअराफ आयत क्र.८० ते ८४ मध्ये वर्णिला गेला आहे.या प्रसंगी त्याच्या स्पष्टीकरणात्मक टीपा १२७ ते १३३ दृष्टीसमोर ठेवाव्यात.

१०८. म्हणजे फिरिश्ते जेव्हा हजरत इब्राहीम यांचा निरोप घेऊन हजरत लूत जवळ पोहोचले तेव्हा त्यांना (लूतला) मोठी चिंता झाली आणि अगदी विमनस्क झाले. घटना अशी की, फिरिश्ते हजरत लूत जवळ मनुष्य स्वरुपात पोहोचले होते आणि संभवत:देखण्या मुलांच्या रुपाने यासाठी की लूत जन समूह ज्या दुष्कर्मात व्यस्त होता, त्याच्यासाठी कसोटी ठरावी आणि अपराधीना घटना स्थळीच पकडले जावे हे

उद्दिष्ट लक्षात घेऊन त्यांनी हजरत लूत यांना देखील आपण फिरिश्ते असल्याचे जाहीर केले नाही म्हणून ते असे समजले की हे प्रवाशी आहेत व माझ्या घरी अतिथी म्हणून आले आहेत आणि पाहुण्यांचे आदरातिथ्य तर ईमानाची निकड आहे. परंतु जन समूह तर इतका दुराचारी आहे की प्रवाशांनाहि पळवून नेतो. ते या तरुणांवरहि हात टाकतील व आपली किळसवाणी वासना शमविण्याचा प्रयत्न करतील या विचाराने त्यांच्या मन मस्तिष्कास इतके प्रभावीत केले की ते अत्यंत दिलगीर झाले अन्यथा पाहुण्यांच्या आगमनाने एका पैगंबरास जो चरित्र्याच्या उच्च पातळीवर असतो आनंदच होऊ शकतो.

**मग जेव्हा आमचा हुकुम येऊन पोहोचला तेव्हा आम्ही या वस्तीला उलथून टाकले आणि तिच्यावर भाजलेल्या मातीच्या खंगराचा सतत वर्षाव केला जे तुमच्या पालन कर्त्याजवळ चिन्हांकित केलेले होते आणि हे अत्याचारींपासून काहीच दूर नाही. *(अल-क़ुर्आन)***

७८. आणि त्याच्या जन समूहाचे लोक धावत त्याच्या जवळ आले. ते पूर्वीपासून व्यभिचारात व्यस्त होते [१०९] तो म्हणाला लोक हो ! ह्या माझ्या मुली आहेत या तुमच्याकरीता अत्यंत स्वच्छ शुद्ध आहेत तेव्हा अल्लाहचे भय बाळगा आणि माझ्या अतिथीबाबत मला अपमानित करु नका.[११०] काय तुमच्यात एकही माणूस समंजस नाही?

وَجَآءَهٗ قَوۡمُهٗ يُهۡرَعُوۡنَ اِلَيۡهِ ؕ وَمِنۡ قَبۡلُ كَانُوۡا يَعۡمَلُوۡنَ
السَّيِّاٰتِ ؕ قَالَ يٰقَوۡمِ هٰٓؤُلَآءِ بَنَاتِىۡ هُنَّ اَطۡهَرُ لَـكُمۡ فَاتَّقُوا اللّٰهَ
وَلَا تُخۡزُوۡنِ فِىۡ ضَيۡفِىۡ ؕ اَلَـيۡسَ مِنۡكُمۡ رَجُلٌ رَّشِيۡدٌ ﴿۷۸﴾

७९. ते म्हणाले, तुम्हाला हे माहितच आहे की तुमच्या मुलींशी आम्हाला काही गरज नाही [१११] आणि तुम्ही हे देखील जाणता की आम्हाला काय हवे आहे .[११२]

قَالُوۡا لَـقَدۡ عَلِمۡتَ مَا لَـنَا فِىۡ بَنٰتِكَ مِنۡ حَقٍّ ۚ وَاِنَّكَ
لَـتَعۡلَمُ مَا نُرِيۡدُ ﴿۷۹﴾

८०. तो म्हणाला, जर तुमचा सामना करण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी असते किंवा एखादा मजबूत सहारा असता ज्याचा मी आश्रय घेतला असता तर किती बरे झाले असते.[११३]

قَالَ لَوۡ اَنَّ لِىۡ بِكُمۡ قُوَّةً اَوۡ اٰوِىۡۤ اِلٰى رُكۡنٍ شَدِيۡدٍ ﴿۸۰﴾

८१. तेव्हा फिरिश्ते म्हणाले, हे लूत ! आम्हला तुमच्या पालनकर्त्याने पाठविले आहे [११४] हे कदापि तुमच्या पर्यंत पोहचू शकणार नाहीत. [११५] तुम्ही रात्रीच्या अंधारमय हिश्श्यात आपल्या घरच्या लोकांना घेऊन निघून जा आणि तुमच्यापैकी कोणी मागे वळूनहि पाहू नये [११६] परंतु तुमची पत्नी कारण तिच्यावरहि तेच (संकट) ओढवणार आहे जे यांच्यावर ओढवेले [११७] यांच्या (शिक्षे) करीता सकाळची वेळ निर्धारीत आहे. काय सकाळ जवळ नाही?[११८]

قَالُوۡا يٰلُوۡطُ اِنَّا رُسُلُ رَبِّكَ لَنۡ يَّصِلُوۡۤا اِلَيۡكَ فَاَسۡرِ
بِاَهۡلِكَ بِقِطۡعٍ مِّنَ الَّيۡلِ وَلَا يَلۡتَفِتۡ مِنۡكُمۡ اَحَدٌ اِلَّا
امۡرَاَتَكَ ؕ اِنَّهٗ مُصِيۡبُهَا مَاۤ اَصَابَهُمۡ ؕ اِنَّ
مَوۡعِدَهُمُ الصُّبۡحُ ؕ اَلَـيۡسَ الصُّبۡحُ بِقَرِيۡبٍ ﴿۸۱﴾

८२. मग जेव्हा आमचा हुकुम येऊन पोहोचला तेव्हा आम्ही या वस्तीला उलथून टाकले आणि तिच्यावर भाजलेल्या मातीच्या खंगराचा सतत वर्षाव केला [११९]

فَلَمَّا جَآءَ اَمۡرُنَا جَعَلۡنَا عَالِيَهَا سَافِلَهَا وَاَمۡطَرۡنَا عَلَيۡهَا
حِجَارَةً مِّنۡ سِجِّيۡلٍ ۙ مَّنۡضُوۡدٍ ﴿۸۲﴾

८३. जे तुझ्या पालन कर्त्याजवळ चिन्हांकित केलेले होते [१२०] आणि हे अत्याचारींपासून काहीच दूर नाही.[१२१]

مُّسَوَّمَةً عِنۡدَ رَبِّكَ ؕ وَمَا هِىَ مِنَ الظّٰلِمِيۡنَ بِبَعِيۡدٍ ﴿۸۳﴾

१०९. म्हणजे ते समलिंगी समागमा (Homo Sexuality)सारख्या व्याधीत पूर्वीपासूनच ग्रसत होते आणि या नवागत देखण्या तरुणांचे हजरत लूतच्या घरी पोहचण्याची खबर मिळताच त्यांना पळवून नेण्यासाठी त्यांच्या घरी पोहोचले.

११०. प्रसंगोक्ति या गोष्टीला प्रमाणित करते की हजरत लूत यांनी आपल्या जन समूहातील मुलींना आपल्या मुली म्हटले होते. ज्याप्रमाणे एखादा थोर पुरुष दुसऱ्याच्या मुलींना स्नेहापोटी आपल्या मुली म्हणतो तद्वतच ही गोष्ट होय. अशा प्रसंगी शाब्दिक अर्थ अभिप्रेत नसतो म्हणून असे गृहीत धरणे कदापि योग्य नव्हे की हजरत लूत यांनी स्वत:च्या मुलींचा प्रस्ताव मांडला होता. प्रथम तर बायबलच्या वर्णनानुसार त्यांच्या स्वत:च्या मुली फक्त दोन होत्या. मात्र कुरआनाने त्यांच्या करीता 'दोन' (विन्तैन) हा शब्द प्रयोजिला नाही किंबहुना बहुवचनी मुली (बनात) हा शब्द प्रयोजिला आहे. दुसरे हे की जेव्हा एका समूहाने हजरत लूत यांच्या घराला वेढले तेव्हा दोन किंवा काही मुलींचा निकाह तर काही मोजक्या पुरुषांशीच होऊ शकत होता जमावातल्या सर्वच पुरुषांशी त्यांचा विवाह या स्थितीत शक्येच नव्हता. तिसरे असे की काय हे सर्वजण अविवाहित होते की ज्यामुळे त्यांना निकाह करुन घेण्यास सांगितले गेले असावे? वस्तुस्थिती अशी की ते आपल्या पत्नींना सोडून देखण्या मुलांशी प्रणय करण्यात मग्न होते. यास्तव सूरह शुअरा मध्ये फर्माविले गेले आहे.

اَتَاْتُوْنَ الذُّكْرَانَ مِنَ الْعٰلَمِيْنَ ـ وَتَذَرُوْنَ مَا خَلَقَ لَكُمْ رَبُّكُمْ مِّنْ اَزْوَاجِكُمْ ـ (سورہ الشعراء:١٦٥ـ١٦٦)

"काय तुम्ही जगातील लोकांहून भिन्न होऊन असली हरकत करता की मुलांवर आसक्त होतात व आपल्या पत्नींना ज्यांना तुमच्या पालनकर्त्याने तुमच्यासाठी निर्माण केले आहे, सोडून देता?"(अल् शुअरा १६५-१६६)

यास्तव हजरत लूत यांनी त्या लोकांच्या पत्नींना स्नेहाने व आदराने आपल्या मुली संबोधून हे फर्माविले की जेव्हा स्वाभाविक इच्छेच्या पूर्ति करीता स्वच्छ शुद्ध मार्ग उपलब्ध आहे तेव्हा अस्वच्छ मार्ग का पत्करता?

هٰؤلاءبناتی

"या माझ्या मुली आहेत" चे भाष्य सईद बिन जुबेर द्वारे उल्लिखित आहे, ते फर्मावितात की :-

"म्हणजे जन समूहाचा प्रेषित या नात्याने समूहातील स्त्रीया हज़रत लूत च्या मुली होत्या." (तफसीर तबरी खंड ११ पृष्ठ ५१)

आणि मुजाहिद वगैरे द्वारेहि जवळ हेच भाष्य उल्लिखित आहे. तसेच इब्ने जरीर तबरी आणि इमाम राजी सारख्या भाष्यकारांनीहि याचा अर्थ जनसमूहातील स्त्रीया असाच घेतला आहे. आणि हजरत लूत यांचे हे फर्माविणे की "ह्या तुमच्यासाठी अगदी स्वच्छ शुद्ध आहेत तेव्हा अल्लाहचे भय बाळगा"एखाद्या अशा अर्थाला वाव राखत नाही जो अयोग्यरित्या कामवासना पूर्ततेच्या समान अर्थी असावा.

१११. म्हणजे ज्यांना तुम्ही आपल्या मुली संबोधिता त्या स्त्रीयांशी आम्हाला काही गरज नाही. त्यांच्या या उत्तरावरुन असे दिसून येते की ते कोणत्या पातळीचे लोक होते व निर्लज्जतेत किती निर्ढावलेले होते. हजरत लूत ना त्यांचे हे सांगणे की 'तुम्हाला माहितच आहे' हा अधिक या गोष्टीचा पुरावा होय की मुलीसंबंधी जे हज़रत लूत नी सांगितले होते ते सर्वसामान्य स्त्रीयांच्या अर्थाने, त्यांच्या स्वत:च्या मुलींविषयी नव्हे. अन्यथा त्यांच्या समूहातील लोक 'तुम्हाला हे माहितच आहे' असे म्हणाले नसते. हे शब्द असे दर्शावितात की गोष्ट सर्व सामान्य स्त्रीयांसंबंधी होती. ज्यांच्या बाबत हज़रत लूत ना हे माहित होते की त्यांच्या जन समूहाला स्त्रीयांविषयी कसलीहि आवड नाही.

११२. म्हणजे ही गोष्ट की आम्ही पुरुषांशी लैगिक संबंध कायम करु इच्छितो.

११३. हज़रत लूत यांची ही याचना असे दर्शाविते की ते आपल्या पाहुण्यांची आबरु वाचविण्याकरीता किती बेचैन होते आणि अत्याचारीनी त्यांना कोणत्या संकटात टाकले होते. या प्रसंगी त्यांच्या मुखातून जी वचने निघालीत त्यांचा अर्थ असा की जर माझ्याजवळ असे सामर्थ्य असते की ज्याचा वापर करुन तुम्हाला या बळजबरी पासून रोखले असते व तुमचे डोके ठिकाणावर आणले असते आणि जर हे सामर्थ्य प्राप्त नाही तर निदान असा मजबूत सहारा तरी असता जेथे आश्रय घेऊन मी आपल्या पाहुण्यांची लाज राखली असती.

हदीस मध्ये उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजरत लूत यांच्या या कथनासंबंधी फर्माविले,

يغفرُ اللهُ لِلوطٍ اِنْ كَانَ لَيَاوِی اِلٰی رُكْنٍ شَدِيْدٍ ـ

(بخاری کتاب احادیث الانبیاء)

"अल्लाह लूत ना क्षमा करो. ते एका मजबूत सहाऱ्याच्या आसाऱ्याखाली होते." (अल् बुखारी किताब अहादीसिल अंबिया)

महणजे हज़रत लूत यांना कोणताहि भौतिक आधार नव्हता असे असले तरी त्यांच्या करीता सर्वात मोठा आधार ईश्वराचा होता व ईश्वराने त्यांच्या संरक्षणाची अशी उपाय योजना केली की काफिर त्यांना कसलीहि हानी पोहचवू शकले नाहीत व ना

अतिथि संबंधाने आपल्या किळसवाण्या योजनेत सफल होऊ शकले.

११४. जेव्हा गोष्ट पराकोटीला पोहचली आणि जन समूहाने आपण अपराधी असल्याचा अंतिम पुरावाहि उपलब्ध करुन दिला तेव्हा त्या अतिथीनी आपला खरा परिचय हजरत लूत यांना कळविला की आम्ही फिरिश्ते आहोत व ईश्वराने आम्हाला एका विशिष्ट हेतुने पाठविले आहे.

११५. अर्थात तुमच्यावर काबू करु शकणार नाहीत.

११६. अर्थात रात्रीच्या अंध:कारात अशा प्रकारे निघून जा की जन-समूहाला थांगपत्ता लागू नये आणि या स्थलांतरात तुम्ही सरळ आपल्या मजली कडे वळले पाहिजे. धन सम्पत्तिला सोडून जावे लागत आहे म्हणून कोणीहि परत जाऊन आणण्याचा इरादा करु नये व ना वस्तीवाल्यांची काय दशा होते हे बघण्याच्या हेतुने उभे रहावे. येथेपावेतो की मागे वळून देखील पाहू नये बायबल मधील उल्लेखानुसार:-

> 'त्यांना बाहेर आणल्यावर दूत त्यास म्हणाला,आपला जीव घेऊन पळ; मागे पाहू नको व खोऱ्यात कोठे थांबू नको; डोंगराकडे पळ काढ,नाहीतर तुझा संहार होईल' (उत्पत्ति १९:१७)

११७. म्हणजे तुमची पत्नी ईश शिक्षेच्या तावडीत सापडेल. हजरत लूत यांची पत्नी बाहयत: हज़रत लूत सोबत होती तथापि खरे पाहता ती काफिरांच्या साथीला होती म्हणून ती देखील ईश-शिक्षेस पात्र ठरली. हजरत नूह यांच्या पुत्राचे उदाहरण वर दिले गेले आहे. आता हे दुसरे उदाहरण लूत च्या पत्नीचे प्रस्तुत केले गेले आहे, ज्यावरुन हे स्पष्ट होते की सर्वश्रेष्ठ अल्लाहचा न्याय निर्बंध आहे. तद्नुसार जो कोणी कुफ्र करील ईश-शिक्षेस पात्र ठरले मग तो एखाद्या प्रेषिताचा पुत्र असो वा प्रेषिताची पत्नी.

११८. याद्वारे हजरत लूत यांची सांत्वना करण्याचा उद्देश्य होता. कारण प्रात:कालीन सूर्य ह्या दुराचारी जनसमूहा करीता विनाशाचा संदेश घेऊन येईल तसेच ही ताकीद देणे की सकाळ होण्यापूर्वीच तुम्ही आपल्या कुटुंबियांना घेऊन या इलाक्यातून निघून गेले पाहिजे जो ईश-शिक्षेकरीता प्रारब्ध झाला होता.

११९. यावरुन असे दिसून येते की ईश-शिक्षा भूकंपाच्या रुपाने आली जिने इमारतीना भुईसपाट व वस्तीला तळपट केले. त्याबरोबरच ज्वलामुखीचा उद्रेक झाल्याने भाजलेल्या मातीच्या दगडांचा (खंगरांचा) र्वषाव झाला ज्यासोबत नवल नव्हे की लाव्हा देखील असेल.यास्तव बायबलच्या वर्णना वरुन असे दिसून येते की लाव्हा उचंबळला होता !

> 'तेव्हा परमेश्वराने सदोम व गमोरा यांवर गंधक व अग्नि यांचा वर्षाव आकाशातून केला आणि ती नगरे आणि ती सर्व तळवट, त्या नगरांतले सर्व रहिवासी आणि तेथे जमीनीत उगवलेले सर्व काही यांचा त्याने नाश केला, पण लोटाची बायको त्याच्यामागून चालली होती ती मागे पाहत राहिली तो ती मिठाचा खांब झाली. इकडे अब्राहम मोठ्या पहाटेस उठून, जेथे तो परमेश्वरापुढे उभा राहिला होता त्या ठिकाणी गेला. त्याने सदोम व गमोरा आणि अवघ्या तळवटीचा प्रदेश यांजकडे नजर फेकिली तो पाहा ! त्या प्रदेशातून भट्टीच्या धुरासारखा धूर वर चालला होता.'
>
> (उत्पत्ति-१.९:२४ ते २८)

लूत जन-समूह कुफ्र बरोबरच निर्लज्जतेतहि निर्ढावलेला होता म्हणून त्याच्या अपराधाला अनुरुप अशी अपमानदायक शिक्षा त्यास लाभली म्हणजे पाषाणांच्या वर्षावाद्वारे त्याला ठेचून मारले गेले.

१२०. अर्थात हे विशिष्ट प्रकारचे दगड होते आणि त्यांना विनाशाकरीता नियुक्त केले गेले होते.

१२१. म्हणजे तो भूभाग ज्यावर ईश शिक्षा अवतरली मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांपासून अधिक लांब नाही सदूम व अमूरह च्या वस्त्या मृत सागराच्या किनाऱ्यावर होत्या आणि शाम (सिरीया) ला जात असतांना मार्गात हा विध्वंसित भूभाग पडत होता म्हणून संकेत दिला गेला आहे की मक्केच्या या अनेकेश्वर वाद्यांकरीता बोध-स्थळ जवळ आहे. दुसरा या गोष्टीकडेहि संकेत आहे की या जन समुहावरील ईश शिक्षा या अत्याचारींवरहि येऊ शकते.

प्रेषितांनी प्रमाण प्रस्थापित केल्यानंतरहि त्यांच्या जन समुहावर कुफ्रच्या मोबदल्यात जी ईश-शिक्षा येते तिचे स्वरुप निर्णायक शिक्षेचे असते व त्याद्वारे असत्याचा नायनाट केला जातो व सत्याला विजयी केले जाते परंतु जेथपावतो बंडखोर व दुराचारी जन समूहांना या जगात शिक्षा देण्याचा संबंध आहे, सर्वश्रेष्ठ अल्लाहचा शिक्षा-नियम विविधरित्या त्यांना लागू पडत असतो. याचे ताजे उदाहरण मॅक्सिको (Maxico) ची सन १९८५ ची घटना होय. तेथे ज्वालामूखी उद्रेक होऊन सुमारे वीस हजार माणसे मरणाच्या खाईत लोटली गेली आणि आधुनिक संस्कृतीचा सर्व जगमगाट धुळीस मिळाला टी.व्ही वर या विनाशाची दृश्ये दाखविली गेली परंतु बोध प्राप्त करण्याच्या दृष्टीने पाहणारे डोळे आहेत कोठे?

**आणि हे माझ्या जन समूहातील लोकांनो ! माप-तोल न्यायाला धरुन पूर्ण करा आणि लोकांना त्यांच्या वस्तू कमी देत जाऊ नका व जमीनीवर उत्पात माजवित फिरु नका.*(अल-क़ुर्आन)***

وَإِلَىٰ مَدْيَنَ أَخَاهُمْ شُعَيْبًا ۚ قَالَ يَا قَوْمِ اعْبُدُوا اللَّهَ
مَا لَكُم مِّنْ إِلَٰهٍ غَيْرُهُ ۖ وَلَا تَنقُصُوا الْمِكْيَالَ
وَالْمِيزَانَ ۚ إِنِّي أَرَاكُم بِخَيْرٍ وَإِنِّي أَخَافُ عَلَيْكُمْ
عَذَابَ يَوْمٍ مُّحِيطٍ ﴿٨٤﴾

८४. आणि मदयन कडे आम्ही त्यांचा बंधू शुऐब ला पाठविले [१२२] तो म्हणाला, हे माझ्या जन-समूहातील लोकांनो !अल्लाहची उपासना करां, त्याच्या खेरीज तुमचा कोणीहि ईश्वर नाही आणि माप-तोल करण्यात कमी करु नका [१२३] मी असे पाहतो की तुम्ही चांगल्या स्थितीत आहात तथापि मला भय वाटते की, तुमच्यावर शिक्षेचा असा दिवस न यावा जो सर्वांना घेरील.

وَيَا قَوْمِ أَوْفُوا الْمِكْيَالَ وَالْمِيزَانَ بِالْقِسْطِ ۖ وَلَا تَبْخَسُوا
النَّاسَ أَشْيَاءَهُمْ وَلَا تَعْثَوْا فِي الْأَرْضِ مُفْسِدِينَ ﴿٨٥﴾

८५. आणि हे माझ्या जन समूहातील लोकांनो ! माप-तोल न्यायाला धरुन पूर्ण करा आणि लोकांना त्यांच्या वस्तू कमी देत जाऊ नका व जमीनीवर उत्पात माजवित फिरु नका.

بَقِيَّتُ اللَّهِ خَيْرٌ لَّكُمْ إِن كُنتُم مُّؤْمِنِينَ ۚ وَمَا أَنَا عَلَيْكُم
بِحَفِيظٍ ﴿٨٦﴾

८६. अल्लाहने दिलेली शिल्ल्क तुमच्याकरीता अधिक चांगली आहे, जर तुम्ही ईमान बाळगाल [१२४] आणि मी तुमच्यावरील निरीक्षक नाही.[१२५]

قَالُوا يَا شُعَيْبُ أَصَلَاتُكَ تَأْمُرُكَ أَن نَّتْرُكَ مَا يَعْبُدُ
آبَاؤُنَا أَوْ أَن نَّفْعَلَ فِي أَمْوَالِنَا مَا نَشَاءُ ۖ إِنَّكَ
لَأَنتَ الْحَلِيمُ الرَّشِيدُ ﴿٨٧﴾

८७. ते म्हणाले, हे शुऐब काय तुमची नमाज़ तुम्हाला हे शिकविते की आम्ही आपल्या उपास्यांना सोडून द्यावे ज्यांना आमचे वाडवडील पूजत राहीलेत किंवा आम्हाला या गोष्टीचा अधिकार नाही की आपल्या धन सम्पत्तित वाटेल तशी उलाढात करावी [१२६] फक्त तुम्हीच तेवढे बुद्धिमान व सदाचारी बाकी आहात ! [१२७]

قَالَ يَا قَوْمِ أَرَأَيْتُمْ إِن كُنتُ عَلَىٰ بَيِّنَةٍ مِّن رَّبِّي وَرَزَقَنِي
مِنْهُ رِزْقًا حَسَنًا ۚ وَمَا أُرِيدُ أَنْ أُخَالِفَكُمْ إِلَىٰ مَا
أَنْهَاكُمْ عَنْهُ ۚ إِنْ أُرِيدُ إِلَّا الْإِصْلَاحَ مَا اسْتَطَعْتُ ۚ
وَمَا تَوْفِيقِي إِلَّا بِاللَّهِ ۚ عَلَيْهِ تَوَكَّلْتُ وَإِلَيْهِ
أُنِيبُ ﴿٨٨﴾

८८. तो म्हणाला,हे माझ्या जन समूहातील लोकांनो! तुम्ही हा विचार तरी केला काय की जर मी आपल्या पालन कर्त्या तर्फे एका स्पष्ट प्रमाणावर आहे व त्याने आपल्यातर्फे मला चांगली उपजिविकाहि प्रदान केली [१२८](तर काय मी सत्य-मार्ग न पत्करावा ?) आणि मी असे इच्छित नाही की ज्या गोष्टीपासून मी तुम्हाला रोखतो त्याविरुद्ध चालावे [१२९] मी तर सुधारणा इच्छितो, जेथपावेतो माझ्या आवाक्यात आहे आणि माझ्या करीता (या कार्यात) अनुकूलता अल्लाहच्याच मदतीने शक्य आहे [१३०] त्याच्यावर मी भरवसा केला व त्याच्याच कडे मी रुजू करतो.

१२२. मदयन वाल्यांचा वृत्तांत सूरह अअराफ आयत ८५ ते ९३ मध्ये वर्णिला गेला आहे. याप्रसंगी उल्लिखित आयती व त्यांचे स्पष्टीकरण टीप १३४ ते १४९ नजरे समोर ठेवावे.

१२३. माप-तोल करण्यात कमी करणे एक जबरदस्त गुन्हा आहे आणि हे अशा लोकांचे काम होय जे ईश्वरासमोरील उत्तरदायित्वाचा विचार बाळगत नाही. पहा सूरह मुतफ्फिफीन टीप-१.

१२४. अर्थात जर तुम्ही ईमान बाळगाल व उचित नफ्यावर संतुष्ट रहाल तर इहलोकातहि हे मांगल्या समृद्धीस कारक ठरेल व आखिरताची सफलताहि प्राप्त होईल. धंदा-व्यापारात लोकांना धोका दिल्याने बाह्यत: धन वाढीस लागते परंतु असे धन मांगल्य विरहित असते व आखिरतमध्ये विनाशास कारणीभूत ठरते.

१२५. अर्थात माझे काम केवळ अल्लाहचा संदेश पोहचविणे होय गुप्तहेर (Detective) बनून तुमच्या प्रत्येक कृत्याचे निरीक्षण करीत रहाणे नव्हे; आणि ना ईश्वराच्या येथे तुमच्या आचरणाबाबत मला जाब द्यायचा आहे.

१२६. त्यांचा हा प्रश्न त्यांच्या त्या विचारसरणीची चहाडी करतो की जो मनुष्य नमाज़ पढू इच्छितो त्याने नमाज़ पढावी, परंतु त्याला हा अधिकार कसा की एखाद्या अशा धर्माला ज्यात संस्कृती म्हणून मूर्तिपूजा चालत यावी. चुकीची व खोटी ठरवू लागावे? तद्वतच उद्योग व व्यापारात उचित व अनुचित आणि न्याय व हक्क गिळंकृत करणे याविषयीचा विवाद उभा करुन आमच्या आर्थिक स्वातंत्र्यास मर्यादित करण्याचा याला काय अधिकार आहे?

आजच्या काळातील सेक्युलॉरिस्ट (Secularist) ह्याच विचरसरणीचे निदर्शन करीत आहेत. त्यांच्या दृष्टीने धर्माचे क्षेत्र वैयक्तिक श्रद्धा व उपासनेपर्यंतच मर्यादित आहे. सामूहिक जीवन, अर्थोपार्जना, सामाजिकता व राजकारण इत्यादित धर्माला दखल देण्याचा कसलाही हक्क नाही. याच कारणास्तव ते मुसलमानांना सांगतात की नमाज़ रोज़ा च्या मर्यादेप्रत इस्लाम धर्मानुसार आचरण करा, मात्र सामूहीक व्यवहारात इस्लाम ला दाखल करु नका आणि ही विचार सरणी आता एवढी क्रूर झाली आहे की निकाह, तलाक व वारसाधिकार या सारख्या कौटुंबिक समस्यांमध्येहि त्यांना मुसलमानांनी ईश्वरी-नियमां (Divine Laws) चे पालन करणे आक्षेपार्ह वाटते.

१२७. हा टोमणा होता जो त्यांनी पैगंबर शुऐब यांना मारला.

१२८ चांगल्या उपजिविकेशी अभिप्रेत आत्मीय उपजिविका (ईश-आदेश) देखील आहे आणि भौतिक उपजिविकाहि. अर्थात अल्लाहने मला प्रेषत्वहि प्रदान केले व हलाल उपजिविकाहि. असे असतांनाहि काय मी त्याचा कृतघ्न होऊ व जो मार्ग त्याने मला दाखविला आहे त्याचा अंगिकार न करु?

१२९. अर्थात मी शिर्कपासूनहि स्वत:ला वाचविले आहे व हरामाच्या कमाई पासूनहि आणि ह्या गोष्टी माझ्या सत्यतेला प्रमाणभूत आहेत.

१३०. हजरत शुऐब यांच्या या कथनात अशा लोकांकारीता जे लोकांच्या सुधारणेसाठी उभे राहतील, हे मार्गदर्शन आहे की त्यांचे कार्य जेथ पावेतो त्यांच्या अवाक्यात आहे सुधारणेचा प्रयत्न करणे परंतु भरवसा आपलं प्रयत्नावर नव्हे तर अल्लाह प्रणित सुबुद्धिवर ठेवला पाहिजे.

८९. आणि हे माझ्या जन-समूहातील लोकांनो ! माझा विरोध तुमच्याकरीता कदाचित या गोष्टीस करणीभूत न व्हावा की तुमच्यावर देखील तशीच शिक्षा यावी जशी नूह जनसमूह किंवा हूद जन-समूह किंवा सालेह जनसमूहावर अवतरली आणि लूत जन समूह तर तुमच्या पासून काही दूर नाही.[१३१]

وَيَٰقَوْمِ لَا يَجْرِمَنَّكُمْ شِقَاقِىٓ أَن يُصِيبَكُم مِّثْلُ مَآ أَصَابَ
قَوْمَ نُوحٍ أَوْ قَوْمَ هُودٍ أَوْ قَوْمَ صَٰلِحٍ ۚ وَمَا قَوْمُ لُوطٍ مِّنكُم
بِبَعِيدٍ ٨٩

९०. आणि (बघा) आपल्या पालन कर्त्याजवळ माफी मागा व त्याच्याकडे रुजू करा [१३२] नि:संशय माझा पलनकर्ता मोठा दयाळू व (आपल्या दासंशी) प्रेम राखणारा आहे.[१३३]

وَٱسْتَغْفِرُوا۟ رَبَّكُمْ ثُمَّ تُوبُوٓا۟ إِلَيْهِ ۚ إِنَّ رَبِّى رَحِيمٌ وَدُودٌ ٩٠

९१. ते म्हणाले, शुऐब ! तुमच्या बहुतेक गोष्टी तर आमच्या ध्यानीच येत नाहीत [१३४] आणि आम्ही असे पाहतो की तुम्ही आमच्या दरम्यान एक कमजोर माणूस आहात.[१३५] आणि जर तुमच्या बिरादरीची माणसे नसती तर आम्ही तुम्हाला दगड मार करुन ठार केले असते.[१३६] तुम्ही आमच्या विरोधात काही शक्तिशाली तर नाही.

قَالُوا۟ يَٰشُعَيْبُ مَا نَفْقَهُ كَثِيرًا مِّمَّا تَقُولُ
وَإِنَّا لَنَرَىٰكَ فِينَا ضَعِيفًا ۖ وَلَوْلَا رَهْطُكَ
لَرَجَمْنَٰكَ ۖ وَمَآ أَنتَ عَلَيْنَا بِعَزِيزٍ ٩١

९२. तो म्हणाला, हे माझ्या जन-समूहातील लोकांनो ! काय माझी बिरादरी तुम्हावर अल्लाह पेक्षा अधिक भारदस्त आहे की अल्लाहला तुम्ही पाठीमागे टाकले [१३७] तुम्ही जे काही करीत आहात, माझा पालन कर्ता त्यास व्यापून (घेरुन) आहे.

قَالَ يَٰقَوْمِ أَرَهْطِىٓ أَعَزُّ عَلَيْكُم مِّنَ ٱللَّهِ وَٱتَّخَذْتُمُوهُ
وَرَآءَكُمْ ظِهْرِيًّا ۖ إِنَّ رَبِّى بِمَا تَعْمَلُونَ مُحِيطٌ ٩٢

९३. आणि हे माझ्या जन-समूहातील लोकांनो ! तुम्ही आपल्या जागी काम करीत जा, मी देखील आपल्या जागी काम करतो. लवकरच तुम्हाला कळून येईल की कोणावर ती शिक्षा येते जी त्याला अपमानित करुन टाकील आणि असा कोण आहे जो खोटारडा आहे-प्रतिक्षा करा, मी देखील तुमच्या सोबत प्रतिक्षा करतो.

وَيَٰقَوْمِ ٱعْمَلُوا۟ عَلَىٰ مَكَانَتِكُمْ إِنِّى عَٰمِلٌ ۖ سَوْفَ تَعْلَمُونَ
مَن يَأْتِيهِ عَذَابٌ يُخْزِيهِ وَمَنْ هُوَ كَٰذِبٌ ۖ وَٱرْتَقِبُوٓا۟ إِنِّى
مَعَكُمْ رَقِيبٌ ٩٣

९४. मग जेव्हा आमचा हुकुम येऊन पोहोचला तेव्हा आम्ही शुऐब व त्याच्या सोबतच्या ईमान बाळगणाऱ्यांना आपल्या कृपेने वाचविले व ज्या लोकांनी अत्याचार केला होता त्यांना एका भयंकर ध्वनीने असे धरले की ते आपल्या घरात तोंडघशी पडून राहीले.[१३८]

وَلَمَّا جَآءَ أَمْرُنَا نَجَّيْنَا شُعَيْبًا وَٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ مَعَهُۥ بِرَحْمَةٍ
مِّنَّا وَأَخَذَتِ ٱلَّذِينَ ظَلَمُوا۟ ٱلصَّيْحَةُ فَأَصْبَحُوا۟ فِى
دِيَٰرِهِمْ جَٰثِمِينَ ٩٤

१३१. लूत जन समूहाच्या विनाशाची घटना मदयन वाल्यांकरीता काही जुनी घटना नव्हती, किंबहुना जवळच्याच काळात घडली होती तसेच लूत जन समूहाचा इलाका देखील मदयन पासून जवळच होता.

१३२. याचे स्पष्टीकरण टीप क्र.८ मध्ये केले गेले आहे.

१३३. अर्थात त्याला आपल्या दासांचा तिटकारा नाही, किंबहुना प्रेम आहे म्हणून तो उगीचच आपल्या दासांना आगीत झोकू इच्छित नाही, किंबहुना मांगल्याचा व समृद्धिचा मार्ग त्यांना मोकळा करु इच्छितो तथापि दासांनीच त्यांच्याशी घृणा करु लागावी व बंडखोरीचे वर्तन अंगिकारावे तर मात्र ते त्याच्या प्रकोपालाच पात्र ठरु शकतात.

१३४. हजरत शुऐब यांच्या गोष्टी ना तत्वज्ञानीय स्वरुपाच्या होत्या ना गोंधळात टाकणाऱ्या किंबहुना साध्या सरळ व मनमस्तिष्कात शिरणाऱ्या होत्या परंतु जन समूहातील लोक स्वच्छ बुद्धि व मोकळ्या मनाने विचार करण्यास तयार नव्हते म्हणून या गोष्टी त्यांच्या आकलनात येत नव्हत्या. मनुष्य जेव्हा आपल्या बुद्धिला विशिष्ट साच्यात घडवितो तेव्हा त्याविपरीत कोणतीहि गोष्ट त्याच्या गळी उतरत नाही मग ती कितीही स्पष्ट वस्तुस्थिती का असेना.

१३५. म्हणजे गोत्रवंश व सामर्थ्याच्या दृष्टीने.

१३६. कबिला पद्धतीत बिरादरी व कुटुंबांचा मोठा विचार केला जात असे अन्यथा एखाद्याच्या वधाबद्दल सूडाचा क्रम चालत. राही. हजरत शुऐब यांना दगडांनी मारण्यात हाच अडसर होता. जन समूहाने दगडांनी मारण्याची जी धमकी दिली त्यावरुन त्यांच्या अत्याचारी विचारसरणीची कल्पना येते तसेच या हि गोष्टीची कल्पना येते की त्या समाजात लोकांना एकेश्वरवादाचे आमंत्रण देणे व दुष्कृत्यांचा नाशा करण्याचा प्रयत्न करणे देखील अपराध समजला जात असे.

१३७. म्हणजे तुम्ही केवळ माझ्या बिरादरीच्या भयाने पाऊल उचलण्यास धजले नाहीत व अल्लाहचे भय मात्र बाळगले नाही तर काय माझा कबीला तुमच्या दृष्टीने अल्लाहपेक्षा अधिक प्रकोपी व प्रभुत्वशाली आहे?

१३८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र.१४७.

९५. जणू त्या ठिकाणी ते कधी वसलेच नव्हते. ऐका ! मदयन वाल्यांकरीताहि (ईश-कृपेपासून) वंचिवता झाली [१३९] ज्याप्रमाणे समूद करीता वंचितता झाली होती.[१४०]

كَأَن لَّمْ يَغْنَوْا فِيهَا ۗ أَلَا بُعْدًا لِّمَدْيَنَ كَمَا بَعِدَتْ ثَمُودُ ﴿٩٥﴾

९६. आणि आम्ही मूसाला आपल्या निशाण्या व स्पष्ट जबरदस्त [१४१] प्रमाणासह पाठविले होते.

وَلَقَدْ أَرْسَلْنَا مُوسَىٰ بِآيَاتِنَا وَسُلْطَانٍ مُّبِينٍ ﴿٩٦﴾

९७. फिरऔन व त्याच्या सरदारांकडे परंतु ते फिरऔनच्या हुकमांनुसार चालले वस्तुत:फिरऔनचा हुकुम दुरुस्त नव्हता.[१४२]

إِلَىٰ فِرْعَوْنَ وَمَلَئِهِ فَاتَّبَعُوا أَمْرَ فِرْعَوْنَ ۖ وَمَا
أَمْرُ فِرْعَوْنَ بِرَشِيدٍ ﴿٩٧﴾

९८. कियामतीच्या दिवशी तो आपल्या जन समूहाच्या अग्रस्थानी असेल व त्यांना जहन्नम मध्ये नेईल [१४३] कसे वाईट स्थान आहे जिथे ते पोहोचले.

يَقْدُمُ قَوْمَهُ يَوْمَ الْقِيَامَةِ فَأَوْرَدَهُمُ النَّارَ ۖ وَبِئْسَ الْوِرْدُ
الْمَوْرُودُ ﴿٩٨﴾

९९. आणि त्यांच्या मागे या जगातहि शाप लावला गेला व कियामतीच्या दिवशीहि-किती वाईट मोबदला आहे जो त्यांना मिळाला !

وَأُتْبِعُوا فِي هَٰذِهِ لَعْنَةً وَيَوْمَ الْقِيَامَةِ ۚ بِئْسَ الرِّفْدُ
الْمَرْفُودُ ﴿٩٩﴾

१००. ह्या त्या वस्त्यांच्या काही घटना आहेत ज्या आम्ही तुम्हाला ऐकवित आहोत. यांच्यापैकी काही क़ायम आहेत तर काही उजाड झाल्या.[१४५]

ذَٰلِكَ مِنْ أَنبَاءِ الْقُرَىٰ نَقُصُّهُ عَلَيْكَ ۖ مِنْهَا قَائِمٌ وَحَصِيدٌ ﴿١٠٠﴾

१०१. आम्ही यांच्यावर एखादा अत्याचार केला नाही, किंबहुना त्यांनी स्वत:च आपल्यावर अत्याचार केला आणि जेव्हा तुमच्या पालनकर्त्याचा हुकुम येऊन पोहोचला तेव्हा त्यांचे ते ईश्वर ज्यांचा ते अल्लाह ला सोडून धावा करीत असत त्यांच्या कीहीच कामी आले नाहीत आणि त्या (कल्पित ईश्वरां)नी त्यांच्या विनाशातच भर घातली. [१४६]

وَمَا ظَلَمْنَاهُمْ وَلَٰكِن ظَلَمُوا أَنفُسَهُمْ ۖ فَمَا أَغْنَتْ عَنْهُمْ
آلِهَتُهُمُ الَّتِي يَدْعُونَ مِن دُونِ اللَّهِ مِن شَيْءٍ لَّمَّا جَاءَ أَمْرُ
رَبِّكَ ۖ وَمَا زَادُوهُمْ غَيْرَ تَتْبِيبٍ ﴿١٠١﴾

१०२. आणि तुमच्या पालनकर्त्याची पकड अशीच असते. जेव्हा तो वस्त्यांना त्या अत्याचारी असण्यामुळे पकडतो. नि:संशय त्याची पकड मोठी दु:खदायक व मोठी सक्त असते.[१४७]

وَكَذَٰلِكَ أَخْذُ رَبِّكَ إِذَا أَخَذَ الْقُرَىٰ وَهِيَ ظَالِمَةٌ ۚ إِنَّ
أَخْذَهُ أَلِيمٌ شَدِيدٌ ﴿١٠٢﴾

१३९. अभिप्रेत अल्लाहच्या कृपेपासून वंचितता होय.

१४०. यावरुन दिसून येते की समूद जन समूहावर जी ईश-शिक्षा अवतरली होती, काही शी त्याच स्वरुपाची शिक्षा मदयन वाल्यांवर अवतरली होती.

१४१. म्हणजे हज़रत मूसा यांचे प्रेषित्व प्रमाणित करणाऱ्या ज्या निशाण्या. होत्या त्यातल्या काही निशाण्या तर अगदी जबरदस्त प्रमाणाची पात्रता बाळगून होत्या. यास्तव त्यांच्या लाठीचे सापात रुपांतर होणे व जादूगरांच्या मुकाबल्यात त्यांचे वरचढ ठरणे या गोष्टीची स्पष्ट उदाहरणे होत. आणि दृढ प्रमाणे असतांनाहि त्यांचा प्रेषित्व संदर्भाने संशय घेण्याचे काहिहि कारण असू शकत नव्हते.

१४२. म्हणजे फिरऔनच्या गोष्टी विवेकशील गोष्टी नव्हत्या आणि ना त्याचे नेतृत्व सत्य व न्याय आणि अदल व सदाचाराशी परिचित होते परंतु लोक मात्र त्याच्या पाठोपाठ चालत राहिले आणि अल्लाहच्या प्रेषिताचे अनुसरण करण्यास तयार झाले नाहीत.

१४३. जगात फिरऔनला त्याच्या जन समूहाने नेता बनविले होते म्हणून कियामतीच्या दिवशीहि तो आपल्या जन समूहाचे नेतृत्व करील ही गोष्ट वेगळी की त्याच्या नेतृत्वात निघणारी ही मिरवणूक सरळ जहन्नमकडे रवाना होईल व विनाशाच्या अशा खोल गर्तेत जाऊन पडेल की पुन्हा निघणे अशक्य होईल.

१४४. बंडखोरांच्या परिणतीचे हे जे चित्र कुरआनने सादर केले आहे वाचकांना कियामतीच्या स्थितीचे या जगीच दर्शन घडवते अशासाठी की त्यांनी बोध घ्यावा,परंतु ज्या लोकांनी बोध ग्रहण न करण्याची शपथ घेतली आहे ते तर जहन्नम मध्ये जाऊनच बोध ग्रहण करतील !

१४५. अर्थात काही वस्त्यांचे अवशेष तर अजूनहि (कुरआन अवतरण काळात) बाकी आहेत उदाहरणार्थ समूद चे अवशेष आणि काही वस्त्यांचे अवशेष अगदी मिटले आहेत उदा. हज़रत नूह यांचा जन-समूह, व हज़रत लूत यांचा जनसमूह इत्यादि. परंतु अवशेष मिटल्याने त्यांचा इतिहास मिटला नाही किंबहुना क़ुरआन सुरक्षित आहे, यासाठी की जगाच्या अस्तित्वापर्यंत लोकांनी या ऐतिहासिक घटनांपासून बोध प्राप्त करीत रहावा.

१४६. म्हणजे हे जनसमूह आपापल्या दैवतांची व मूर्तीची पूजा अशासाठी करीत होते की ते त्यांना लाभ पोहचवतील परन्तु जेव्हा-अल्लाहची शिक्षा अवतरली तेव्हा ही दैवते आपल्या भक्तांची काहीहि मदत करु शकले नाहीत किंबहुना त्यांची भक्ती त्यांच्या भक्तांकरीता ईश-शिक्षेत भर घालण्यास कारक ठरली. यावरुन हे सिद्ध झाले की यांची दैवते व मूर्ती वगैरे केवळ थोतांड होते.

१४७. ही मनुष्य वस्त्यांकरीता सावधगिरीची सूचना होय की त्यांनी हे गृहीत धरु नये की ह्या गतकाळाच्या कथा होत व त्यांच्यावर अशी काही शिक्षा येऊ शकत नाही. किंबहुना ते देखील ईश शिक्षेच्या तावडीत अशाच प्रकारे येऊ शकतात ज्या प्रकारे भूतकालीन जनसमूह आले आणि वस्तुस्थिती अशी की विविध प्रकारच्या ईश-शिक्षेचा क्रम या जगात अत्याचारी जनसमूहांसाठी जारी आहे.

१०३. यात मोठी निशाणी आहे त्या लोकांकरीता जे आखिरतच्या शिक्षेचे भय बाळगतात [१४८]तो दिवस असा असेल की जेव्हा समस्त लोक एकत्रित केले जातील आणि तो दिवस उपस्थितीचा असेल. [१४९]

إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَةً لِّمَنْ خَافَ عَذَابَ الْآخِرَةِ ۚ ذَٰلِكَ يَوْمٌ
مَّجْمُوعٌ لَّهُ النَّاسُ وَذَٰلِكَ يَوْمٌ مَّشْهُودٌ ﴿١٠٣﴾

१०४. आणि आम्ही तो आणण्यात विलंब करीत नाही तथापि थोड्या मुदती करीता

وَمَا نُؤَخِّرُهُ إِلَّا لِأَجَلٍ مَّعْدُودٍ ﴿١٠٤﴾

१०५. जेव्हा तो (दिवस) येईल तेव्हा कोणीही त्याच्या (अल्लाहच्या) अनुज्ञेशिवाय बोलू शकणार नाही [१५०] मग काही लोक दुर्दैवी असतील तर काही लोक सुदैवी .[१५१]

يَوْمَ يَأْتِ لَا تَكَلَّمُ نَفْسٌ إِلَّا
بِإِذْنِهِ ۚ فَمِنْهُمْ شَقِيٌّ وَسَعِيدٌ ﴿١٠٥﴾

१०६. तेव्हा जे दुर्दैवी असतील ते जहन्नम मध्ये टाकले जातील जेथे त्यांच्या नशीबी आरडा ओरड असेल.[१५२]

فَأَمَّا الَّذِينَ شَقُوا فَفِي النَّارِ لَهُمْ فِيهَا
زَفِيرٌ وَشَهِيقٌ ﴿١٠٦﴾

१०७. त्यात ते सदैव राहतील जोपर्यंत आकाश व जमीन कायम आहेत [१५३] परंतु जे तुमच्या 'रब्ब' (स्वामी) इच्छिल. नि:संशय तुमचा 'रब्ब' इच्छील तसे करुन टाकणारा आहे. [१५४]

خَالِدِينَ فِيهَا مَا دَامَتِ السَّمَاوَاتُ وَالْأَرْضُ إِلَّا مَا شَاءَ
رَبُّكَ ۚ إِنَّ رَبَّكَ فَعَّالٌ لِّمَا يُرِيدُ ﴿١٠٧﴾

१०८. आणि जे सुदैवी असतील ते जन्नत मध्ये दाखल होतील ज्यात ते सदैव राहतील जोपर्यंत आकाश व ज़मीन कायम आहेत परंतु जे तुमचा पालनकर्ता इच्छिल हे असे इनाम असेल की ज्याचा क्रम कधीहि खंडित होणार नाही. [१५५]

وَأَمَّا الَّذِينَ سُعِدُوا فَفِي الْجَنَّةِ خَالِدِينَ فِيهَا مَا دَامَتِ السَّمَاوَاتُ
وَالْأَرْضُ إِلَّا مَا شَاءَ رَبُّكَ ۖ عَطَاءً غَيْرَ مَجْذُوذٍ ﴿١٠٨﴾

१०९. तेव्हा तुम्ही त्या उपास्याबाबत कसल्याहि संशयात पडू नका ज्यांची ते भक्ति करीत आहेत. हे अशा प्रकारे पूजा करीत आहेत ज्या प्रकारे त्यांच्या पूर्वी त्यांचे वाडवडील करीत होते आणि आम्ही त्यांना त्यांच्या हिस्सा काहीहि कमी न करता पूरेपूर देऊ.[१५६]

فَلَا تَكُ فِي مِرْيَةٍ مِّمَّا يَعْبُدُ هَٰؤُلَاءِ ۚ مَا يَعْبُدُونَ إِلَّا كَمَا
يَعْبُدُ آبَاؤُهُم مِّن قَبْلُ ۚ وَإِنَّا لَمُوَفُّوهُمْ نَصِيبَهُمْ غَيْرَ
مَنقُوصٍ ﴿١٠٩﴾

१४८. अर्थात या महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनांमध्ये आखिरतच्या मोबदल्या विषयीचे प्रमाण अंतर्भूत आहे. जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह जनसमूहांना त्यांच्या बंडखोरीबद्दल व प्रेषितांची अवज्ञा करण्याबद्दल शिक्षा देत राहीला आहे तेव्हा हे या गोष्टीचे प्रमाण आहे की तो आपल्या दासांशी असंबंधित नाही किंबहुना त्यांच्या आचरणानुसार त्यांच्याशी व्यवहार करतो यास्तव जगातील सर्व राष्ट्रे व मनुष्यांना त्यांच्या आचरणानुसार मोबदला वा शिक्षा देण्याकरीता कियामतीच्या दिवशी त्याचे न्यायालय स्थापित करणे अत्यंत योग्य अशी गोष्ट होय तसेच या घटनांमध्ये बोध घेण्यायोग्य असा पैलू आहे की जेव्हा तो बंडखोर जनसमूहांना इहलोकात अशा सक्त शिक्षा देत राहिला तेव्हा आखिरतची शिक्षा, जेथे निरंतर जीवन असेल, याहून अधिक सक्त व दु:खकारक असेल.

१४९. अर्थात तो दिवस अल्लाहच्या समोर हजर होण्याचा दिवस असेल. एकेक करुन प्रत्येकाला त्याच्या समोर हजर होऊन जे काही जगात तो बोलत व करीत राहिला त्यासंबंधी जाब द्यावा लागेल. त्या वेळी ना कोणी व्यक्ति सुटेल ना जन समूह आणि ना राव ना रंक.

१५०. अर्थात इहलोकात बोलण्याचे जे स्वातंत्र्य माणसाला प्राप्त आहे कियामतीच्या दिवशी यावर बंधन लावले जाईल. त्या दिवशी माणसाला विविध अवस्था व प्रसंगातून पार पडावे लागेल आणि ज्या अवस्था व प्रसंगाबद्दल त्याला बोलण्याची परवानगी दिली जाईल त्याचवेळी तो बोलू शकेल अन्यथा त्याची काय हिंमत की त्याने आपले तोंड उघडावे!

१५१. म्हणजे दर्जाच्या फरकानुसार लोक दोन समूहात विभागले जातील एक तो ज्याने मांगल्य व सदभाग्याचा मार्ग अंगिकारला होता आणि अल्लाहच्या कृपेने तो सुदैवी ठरला आणि दुसरा समूह तो ज्याने अमांगल्या व दुर्भाग्याचा मार्ग पत्करला होता व तो दुष्परिणतिस पोहचले.

स्पष्ट असावे की लोकांचे हे विभाजन व त्यांची परिणति ईमान व कुफ्र च्या दृष्टीने होय कारण प्रसंगोक्ति या गोष्टीचा तगादा करते. राहिला त्या लोकांचा मामला ज्यांनी ईमान बाळगून गुन्हे केले असतील तर या संदर्भात कुरआनाच्या दुसऱ्या आयतीकडे रुजू केले पाहिजे.

१५२. अर्थात जहन्नममध्ये त्यांना असा सक्त त्रास यातना असेल की ते मोठमोठ्याने ओरडतील.

१५३. अभिप्रेत आखिरतचे आकाश व जमीन होय कारण की कियामतीच्या दिवशी, क़ुरआनात अन्य ठिकाणी वर्णिल्यानुसार जमीन व आकश बदलतील आणि क़ुरआनाच्या स्पष्टीकरणानुसार आखिरतचे विश्व निरंतर स्वरुपाचे आहे यास्तव त्याचे आकाश व जमीन देखील सदैव कालीन असतील.

१५४. ही अशीच गोष्ट होय जसे क़ुरआनात हे फर्माविले आहे की 'तो ज्याला इच्छितो मार्गदर्शन करतो व ज्याला इच्छितो मार्गभ्रष्ट करतो' (अन् नहल-९३) यावरुन त्याच्या अधिकारास स्पष्ट करण्याचा हेतु होय.तसेच येथे ही गोष्ट स्पष्ट करण्याचा हेतु आहे की अल्लाहच्या मर्जीत अडथळा आणणारा कोणीहि नाही तो सर्वाधिकार बाळगणारा आहे जर तो या जहन्नमी लोकांबाबत अन्य काही निर्णय घेऊ इच्छिल तर त्याला आड येणारा कोणीहि नाही. एखाद्या निर्णयाला कार्यान्वित करण्याकरीता त्याची मर्जी पुरेशी ठरते.

१५५. म्हणजे सुदैवी नेहमी जन्नत मध्ये राहतील जो पैवेतो आखिरत विश्वाचे आकाश व जमीन कायम आहेत. आणि त्याचे निरंतर जन्नतमध्ये राहणे या कारणास्तव आहे की अल्लाहची हीच मर्जी होय अन्यथा निर्णयाकरीता त्याला कोणी विवश केले नाही, त्याने इच्छा बाळगली तर अन्य एखादा निर्णय घेऊ शकतो तथापि त्याची मर्जी ही आहे की त्यांना (दासांना) आपल्या इनामाने उपकृत करावे की हा क्रम कधीहि खंडीत न व्हावा, व ईश-देणग्यांचा वर्षाव त्यांच्यावर सदैव होत रहावा. त्याच्या कृपेचे जे स्त्रोत दासांकरीता जारी होतील ते कधीही आटणार नाहीत.

१५६. म्हणजे इहलोकाच्या लाभांमध्ये यांचा जो हिस्सा आहे तो तर त्यांना मिळेलच पण त्या बरोबरच आपल्या आचरणाचा परिणामहि त्यांना भोगावा लागेल. आम्ही ना त्याना भौतिक लाभ पोहचविण्यात कसली काटकसर करु व ना शिक्षा देण्यात कमतरता करु ज्यास ते पात्र आहेत.

११०. आम्ही मूसाला ग्रंथ प्रदान केला होता परंतु त्यात मतभेद केला गेला. आणि जर तुमच्या पालनकर्त्या तर्फे एक गोष्ट अधीपासून ठरविली गेली नसती तर यांच्या दरम्यान केव्हाच निर्णय दिला गेला असता. आणि हे लोक या (कुरआना)च्या संबंधाने संशयग्रस्त झाले आहेत, ज्याने त्यांना गोंधळात टाकले आहे .[१५७]

وَلَقَدْ اٰتَيْنَا مُوْسَى الْكِتٰبَ فَاخْتُلِفَ فِيْهِ ۭ وَلَوْلَا كَلِمَةٌ
سَبَقَتْ مِنْ رَّبِّكَ لَقُضِيَ بَيْنَهُمْ ۭ وَاِنَّهُمْ لَفِيْ شَكٍّ مِّنْهُ
مُرِيْبٍ ﴿١١٠﴾

१११. आणि निःसंशय तुमच्या पालनकर्ता प्रत्येकास त्याच्या कर्माचा पूरेपूर मोबदला देईल. तो त्यांच्या आचरणाला पूर्णतः जाणून आहे.

وَاِنَّ كُلًّا لَّمَّا لَيُوَفِّيَنَّهُمْ رَبُّكَ اَعْمَالَهُمْ ۭ اِنَّهٗ بِمَا يَعْمَلُوْنَ
خَبِيْرٌ ﴿١١١﴾

११२. तेव्हा तुम्ही सन्मार्गावर निश्चल रहा, ज्याप्रमाणे तुम्हाला आदेश दिला गेला आहे तसेच ते लोक देखील जे क्षमा याचना करुन तुमच्या सोबत झाले आहेत आणि मर्यादेचे उल्लंघन करु नका [१५८] तुम्ही जे काही करता ते तो पाहत आहे.

فَاسْتَقِمْ كَمَآ اُمِرْتَ وَمَنْ تَابَ مَعَكَ وَلَا تَطْغَوْا ۭ اِنَّهٗ بِمَا
تَعْمَلُوْنَ بَصِيْرٌ ﴿١١٢﴾

११३. आणि अत्याचारींकडे किंचित झुकू नका अन्यथा जहन्नमची आग आपल्या लपेटीत घेईल [१५९] मग अल्लाह शिवाय तुमचा कोणीहि मित्र असणार नाही, ना तुमची मदतहि केली जाईल.[१६०]

وَلَا تَرْكَنُوْٓا اِلَى الَّذِيْنَ ظَلَمُوْا فَتَمَسَّكُمُ النَّارُ ۙ وَمَا لَكُمْ مِّنْ
دُوْنِ اللّٰهِ مِنْ اَوْلِيَاۗءَ ثُمَّ لَا تُنْصَرُوْنَ ﴿١١٣﴾

११४. आणि नमाज़ कायम करा, दिवसाच्या दोन्ही टोकांवर व रात्रीच्या घटीकांमध्ये [१६१] निःसंशय सत्कृत्ये दुष्कृत्यांना दूर सारतात [१६२] ही स्मरणिका आहे, स्मरणिका प्राप्त करणाऱ्यांकरीता.

وَاَقِمِ الصَّلٰوةَ طَرَفَيِ النَّهَارِ وَزُلَفًا مِّنَ الَّيْلِ ۭ اِنَّ الْحَسَنٰتِ
يُذْهِبْنَ السَّـيِّاٰتِ ۭ ذٰلِكَ ذِكْرٰى لِلذّٰكِرِيْنَ ﴿١١٤﴾

११५. आणि धैर्य बाळगा [१६३] कारण अल्लाह अशा लोकांचा मोबदला वाया घालवित नाही जे सद्‌गुणांसह कार्य करतात.

وَاصْبِرْ فَاِنَّ اللّٰهَ لَا يُضِيْعُ اَجْرَ الْمُحْسِنِيْنَ ﴿١١٥﴾

११६. मग असे कां झाले नाही की जे जनसमूह तुमच्या पूर्वी होऊन गेले त्यांच्यातून कल्याणकारी लोक निघाले असते जे जमीनीवर विघ्न व उत्पात (पसरविण्या) पासून रोखते, त्या थोड्या लोकांखेरीज ज्यांना आम्ही त्या जन समूहांमधून वाचविले [१६४] अन्यथा अत्याचार पूर्वक वर्तन अंगिकारणारे तर ह्याच विलास सामुग्रीच्या मागे धावत राहीले जी त्यांना दिली गेली होती व ते अपराधी बनून राहीले.[१६५]

فَلَوْلَا كَانَ مِنَ الْقُرُوْنِ مِنْ قَبْلِكُمْ اُولُوْا بَقِيَّةٍ
يَّنْهَوْنَ عَنِ الْفَسَادِ فِي الْاَرْضِ اِلَّا قَ
اَنْجَيْنَا مِنْهُمْ ۚ وَاتَّبَعَ الَّذِيْنَ ظَلَمُوْا مَآ اُتْرِفُوْا
فِيْهِ وَكَانُوْا مُجْرِمِيْنَ ﴿١١٦﴾

१५७. येथे मक्केचा अनेकेश्वरवाद्यांच्या त्या संशयाचे निराकरण करण्याचा हेतु आहे जो त्यांना 'क़ुरआन' ईश-ग्रंथ असण्या संबंधी होता. त्यांना हे स्पष्ट समजाविले जात आहे की कुरआन हा पहिलाच ग्रंथ नव्हे जो लोकांच्या मार्गदर्शनार्थ पाठविला गेला असावा, किंबहुना यापूर्वीहि ग्रंथ पाठविले जात राहीले तद्नुषंगे हज़रत मूसा यांनाहि ग्रंथ दिला गेला होता, मात्र त्यांच्या अनुयायीनी त्यात मतभेद करुन त्यास आपल्या मूळ स्वरुपात राहू दिले नाही, ही गोष्ट वेगली. या स्थितीची ही निकड होती की सर्वश्रेष्ठ अल्लाहने लोकांच्या मार्गदर्शनासाठी अन्य एखादा ग्रंथ पाठवावा. ही निकड भागविण्याकरीता सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या प्रेषितास हा ग्रंथ देऊन पाठविले आहे यास्तव या ग्रंथाचे अवतरण तुमच्या करीता समाधान कारक झाले पाहिजे, बुचकळ्यात टाकणारे नव्हे.

ही वस्तुस्थिती असतांनाहि जर लोक संशयातच खितपत पडून राहू इच्छितात तर त्यांनी खुशाल रहावे. अशा लोकांच्या भाग्याचा निर्णय तर केव्हाच लावला गेला असता, परंतु असे एवढ्यासाठी केले जात नाही की सर्वश्रेष्ठ अल्लाहने आधीपासून हे ठरविले आहे की प्रत्येक जन समूहास कर्म-अवधि दिला जावा. म्हणून या फर्मानानुसार या लोकांनाहि एका विशिष्ट वेळेपर्यंत ढील दिली जात आहे.

१५८. अर्थात आज्ञापालन व दास्यत्वच्या सीमेत रहा व तिचे उल्लंघन करुन अल्लाहची अवज्ञा करु नका.

१५९. येथे अत्याचारींशी अभिप्रेत, उपरोक्त वर्णन क्रमानुसार अनेकेश्वरवादी, काफिर व बंडखोर लोक होत व त्यांच्याकडे झुकण्याचा अर्थ शिर्क (द्वैत) कुफ्र (इन्कार) व अपराधांच्या कामांमध्ये त्यांचे समर्थन करणे होय.मग हे समर्थन मुखाने असो वा कृतीने.

हा मनाई आदेश लक्षात घेता मुसलमानांनी आपल्या हृदयात अनेकेश्वरवादी, काफिर व ईश्वराशी उद्विग्न असलेल्या लोकांबाबत कसलीहि कोमलता ठेवू नये, तसेच त्यांना खुश करण्याकरीता त्यांच्या अनेकेश्वरवादी रिती रीवाजांमध्ये किंवा त्यांच्या अशा सभा-समारभांमध्ये ज्यात माणसाला ईश-मार्गदर्शनापासून दूर करुन त्याला अधार्मिक बनण्यास प्रवृत्त केले जात असावे. कदापि सहभागी होऊ नये अन्याथा शिर्क व कुफ्रशी सहकार्य निर्माण करण्याचा हा परिणाम होऊ शकतो की या प्रयत्नात ते आपले ईमानच हरवून बसतील.

१६०. म्हणजे चांगले लक्षात असू द्या की या अत्याचारींकडे जर तुम्ही वळलात तर कियामतीच्या दिवशी ते तुमच्या काहीहि कामी येणार नाहीत. त्या दिवशी तर जो कोणी ईश्वराच्या तावडीत येईल तो असहाय्य व मित्रहीन बनून राहील.

१६१. दिवसाच्या दोन्ही टोकांवर नमाज़ कायम करण्याशी अभिप्रेत फज्र (प्रात:कालीन) व मग़रीब (सूर्यास्ता समयी) ची नमाज़ होय. एखाद्या गोष्टीचा किनारा तिचे टोक असते. दिवसाच्या मर्यादेचा आरंभ तेथून होतो जिथे रात्र संपते. ही फज्रची वेळ होय, आणि दिवसाची हद्द जिथे संपते ती मग्रिब ची वेळ होय.

आणि रात्रीच्या घटीकांमध्ये नमाज़ कायम करण्याशी अभिप्रेत इशा ची नमाज़ होय. घटीका हा अनेकवचनी शब्द ईशाच्या वेळेच्या दीर्घतेकडे संकेत करतो. ह्या तीन वेळच्या नमाज़ी होत ज्यांची ताकीद मक्केच्या त्या काळात केली गेली जेव्हा ही सूरह अवतरली होती. यानंतर पाच वेळच्या नमाज़चा आदेश अवतरीत झाला.

१६२. हा संकेत आहे या गोष्टीकडे की नमाज़ अशी उपासना आहे ज्यास तुम्ही जर इतमामाने पार पाडाल तर सत्कृत्यांचा तो स्त्रोत तुमच्या अंगी वाहू लागेल जो दृष्कर्माच्या मलीनतेस धुऊन काढील जी तुमच्या व्यक्तित्वात आढळून येते व त्या अपराधांनाहि मिटवील जे तुमच्या हातून घडले असतील. यावरुन नमाज़चे लाभ व या उपासनेच्या असामान्य महत्तेची चांगल्या प्रकारे कल्पना येते. हदीसमधील उल्लेखानूसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले का

اَرَايتم لو اِنَّ نهرًا بباب احدكم يغتسلُ فيه كل يَوْمٍ خمساً هل يبقى من درنهٖ شیءٌ؟ قالوا: لايبقىٰ من درنهٖ شیءٌ، قال: فَذَٰلِکَ مثل الصلوات الخمس يَمْحُوْ الله بِهِنَّ الخطايا۔ (مشکوٰۃ بحوالہ بخاری ومسلم)

"जर तुमच्या पैकी एखाद्या व्यक्तिच्या दरवाज्या जवळ पाण्याचा एखादा प्रवाह असेल ज्यात तो दर रोज पाच वेळ स्नान करीत असेल तर काय त्याच्या शरीरावर किंचितहि घाण-मळ राहील? सहाबा (सहवासातील अनुयायी) नी म्हटले, कसलांही मळ राहणार नाही, पैगंबरानी फर्माविले, तेव्हा पाच वेळच्या नमाज़चीहि हीच स्थिती आहे की यांच्या द्वारे अल्लाह अपराधांना मिटवितो." (मिश्कात, बुख़ारी व मुस्लिमच्या संदर्भासह)

१६३. म्हणजे विरोधकांकडून दिल्या जाणाऱ्या त्रास-यातनांवर संयम पाळा.

१६४. अर्थात ज्या जनसमूहांना विनाशाला तोंड द्यावे लागले, त्यांच्या विनाशाचे मोठे कारण असे की त्यांच्यातून कल्याणकारी व सुधारणा प्रिय लोक निघाले नाहीत. परिणामत:बिघाड सार्वत्रिक झाला व दुराचाराची पाळे-मुळे मजबूत झाली. आणि जे काही लोक निघाले ते संख्येने अत्यल्प होते. यास्तव बिघडलेल्या

लोकांवर त्यांच्या प्रयत्नाचा कसलाहि प्रभाव पडला नाही तथापि सर्वश्रेष्ठ अल्लाहने या सुधारणा प्रिय लोकांना अशा वेळी वाचविले जेव्हा त्या जनसमूहांवर अजाब (ईश-प्रकोप) अवतरला. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या फर्माविण्यावरुन ही गोष्ट स्पष्ट होते की बिघाड-मग तो श्रद्धासंबंधी असो वा आचरणासंबंधी. जेव्हा एखाद्या जनसमूहात निर्माण होतो तेव्हा कल्याणकारी लोकांनी सुधारणे करीता उभे राहिले पाहिजे. हदीस मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मुसलमानांना सक्त ताकीद केली आहे की त्यांनी सुधारणेच्या संबंधाने आपल्या जबाबदारीना पार पाडण्याचा पूरेपूर प्रयत्न केला पाहिजे.

पैगंबरांनी फर्माविले:

وَالَّذِیْ نفسی بِیَدِهٖ لتامُرُن بالمعروف ولتنهون عن المنکراولیوشکن اللہ ان یبعث علیکم عقاباً منه فتدعونهفلایستجیب لکم۔(الترمذی ابواب الفتن)

"शपथ आहे त्याची, ज्याच्या हाती माझा प्राण आहे तुम्हाला भलेपणाचा आदेश द्यावा लागेल व दुष्कर्मापासून रोखावे लागेल अन्यथा नवल नव्हे की अल्लाहने आपल्यातर्फे तुमच्यावर शिक्षा पाठवावी, मग तुम्ही त्याला दुआ (प्रार्थना) करु लागावे व तुमची दुआ त्याने कबूल न करावी." (तिर्मिज़ी)

१६५. म्हणजे सर्व सामान्यत: लोकांनी चुकीचे वर्तन अंगिकारले आणि जी विलास- सामुग्री त्यांना विपुलतेसह कसोटीच्या दृष्टीने दिली गेली होती. तिला त्यांनी चैन-विलासीतेचे साधन बनविले आणि आखिरत ऐवजी इहलोकासच सर्वकाही जाणले. या विचार सरणीने त्यांना अपराध व वाम मार्गवर टाकले मग त्यांना चांगल्या व सुधारणेच्या कामांविष्यी कसलीहि अभिरुची राहिली नाही.

जर तुमच्या पालन कर्त्याने इच्छिले असते तर लोकांना एकच जमात बनविले असते परंतु ते मतभेद करीत राहतील. यापासून केवळ तेच लोक वाचतील ज्यांच्यावर तुमच्या रब्ब (पालनकर्ता) कृपा करील आणि यासाठीच तर त्याने यांना निर्माण केले आहे  की मी जहन्नमला जिन्न आणि मनुष्य या सर्वांनी भरीन.(अल-क़ुर्आन)

११७. आणि तुमचा पालनकर्ता असा नव्हे की तो वस्त्यांना नाहक नष्ट करील जेव्हा त्यांचे रहिवाशी सुधारणा करणारे असावेत.

وَمَا كَانَ رَبُّكَ لِيُهْلِكَ الْقُرَىٰ بِظُلْمٍ وَأَهْلُهَا
مُصْلِحُونَ ﴿١١٧﴾

११८. जर तुमच्या पालन कर्त्याने इच्छिले असते तर लोकांना एकच जमात बनविले असते परंतु ते मतभेद करीत राहतील. [१६६]

وَلَوْ شَاءَ رَبُّكَ لَجَعَلَ النَّاسَ أُمَّةً وَاحِدَةً ۖ وَلَا يَزَالُونَ
مُخْتَلِفِينَ ﴿١١٨﴾

११९. यापासून केवळ तेच लोक वाचतील ज्यांच्यावर तुमच्या रब्ब (पालनकर्ता) कृपा करील [१६७] आणि यासाठीच तर त्याने यांना निर्माण केले आहे [१६८] आणि तुमच्या पालनकर्त्याचे वचन पूर्ण होऊन राहीले की मी जहन्नमला जिन्न आणि मनुष्य या सर्वांनी भरीन. [१६९]

إِلَّا مَن رَّحِمَ رَبُّكَ ۚ وَلِذَٰلِكَ خَلَقَهُمْ ۗ وَتَمَّتْ كَلِمَةُ
رَبِّكَ لَأَمْلَأَنَّ جَهَنَّمَ مِنَ الْجِنَّةِ وَالنَّاسِ أَجْمَعِينَ ﴿١١٩﴾

१२०. आणि आम्ही प्रेषितांचे जे वृत्तांत तुम्हाला ऐकवित आहोत तर त्यांच्या माध्यमाने तुमच्या मनाला दृढता प्रदान करतो. यांच्यात तुम्हाला सत्य लाभले आणि ईमान बाळगणाऱ्यांना बोध व स्मरणिका लाभली.

وَكُلًّا نَّقُصُّ عَلَيْكَ مِنْ أَنبَاءِ الرُّسُلِ مَا نُثَبِّتُ بِهِ فُؤَادَكَ ۚ
وَجَاءَكَ فِي هَٰذِهِ الْحَقُّ وَمَوْعِظَةٌ وَذِكْرَىٰ لِلْمُؤْمِنِينَ ﴿١٢٠﴾

१२१. जे लोक ईमान बाळगत नाही त्यांना सांगा, तुम्ही आपल्या जागी कर्म करा, आम्ही आपल्या जागी कर्म करीत राहू.

وَقُل لِّلَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ اعْمَلُوا
عَلَىٰ مَكَانَتِكُمْ إِنَّا عَامِلُونَ ﴿١٢١﴾

१२२. आणि तुम्हीहि प्रतिक्षा करा, आम्ही देखील प्रतिक्षा करतो.

وَانتَظِرُوا إِنَّا مُنتَظِرُونَ ﴿١٢٢﴾

१२३. आकाश व जमीनीचे अपरोक्ष (ज्ञान) अल्लाह करीताच आहे आणि सर्व मामले त्याच्याचकडे परतविले जातात तेव्हा तुम्ही त्याचीच 'इबादत' (उपासना) करा व त्यावरच भरवसा राखा. तुम्ही जे काही करीत आहात त्यापासून तुमचा पालनकर्ता अनभिज्ञ नाही.

وَلِلَّهِ غَيْبُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَإِلَيْهِ يُرْجَعُ الْأَمْرُ كُلُّهُ فَاعْبُدْهُ
وَتَوَكَّلْ عَلَيْهِ ۚ وَمَا رَبُّكَ بِغَافِلٍ عَمَّا تَعْمَلُونَ ﴿١٢٣﴾

१६६. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह बकरा टीप क्र.३०८ व ३०९.

१६७. म्हणजे जो मनुष्य धर्मांच्या मतभेदाच्या चक्रव्यूहात फसला नाही किंबहुना असा सन्मार्ग अंगिकारला ज्याकडे क़ुरआन मार्गदर्शन करतो आणि जो खरे पाहता माणसाच्या स्वभावधर्माचा स्वर आहे व ज्याच्या सत्यतेबद्दल संपूर्ण सृष्टीव्यवस्था साक्षी आहे, तर निश्चितच त्याच्यावर सर्वश्रेष्ठ अल्लाहची मोठी कृपा झाली आणि असा मनुष्य अल्लाहच्या असीम कृपेस पात्र ठरला.

जगतील धर्मांच्या मतभेदास पाहून मनुष्य खचितच हैराण होतो व मोठ्या गोंधळात पडतो अर्थात या विमनस्कतेतून बाहेर पडणे अल्लाहप्रणित सुबुद्धि खेरीज शक्य नाही. आणि जो मनुष्य सत्याभिलाषी असतो सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला सहाय्य करतो व त्याला सत्य-मार्ग दाखवितो.

१६८. म्हणजे याच परीक्षेसाठी त्यांना निर्माण केले गेले आहे की कोण स्वत:ला अल्लाहच्या कृपेस पात्र बनवितो व कोण त्याच्या प्रकोपास. जर या परीक्षेचे हे उद्दिष्ट नसते तर त्याने समस्त माणसांचा एकच समूह बनविला असता व सर्वच जण सत्य मार्गावर चालण्यास अगतिक झाले असते, परंतु ज्याअर्थी परीक्षा घेण्याचा उद्देश्य आहे म्हणून त्याने माणसाला चांगले वाईट मत क़ायम करण्याचे, सत्य व असत्याची निवड करण्याचे व यापैकी कोणा एका मार्गाचे अनुसरण करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. म्हणून माणसांच्या फार मोठ्या संख्येचे सत्य मार्गापासून विभक्त होऊन आपल्या करीता अन्य मार्ग तजवीज करणे व सत्य धर्मा (इस्लाम) शी मतभेद करुन अन्य इतर धर्म अस्तित्वात आणणे किंवा त्यांचा स्वीकार करणे हे अल्लाहने प्रदान केलेल्या स्वातंत्र्याचा चुकीचा लाभ घेणे होय. असे असले तरी ही परिस्थिती त्या योजनेच्या बाहेर नाही जी सर्वश्रेष्ठ अल्लाहने मनुष्य निर्मितीच्या प्रसंगी तयार केली होती. यास्तव धर्मांचा मतभेद जर जगात चालतच राहील आणि त्याच्या दुष्परिणतिलाहि त्यांना तोंड द्यावे लागेल परंतु जो कोणी आपला शेवट चांगला व्हवा अशी इच्छा बाळगतो त्याने हे समस्त धर्म व प्रत्येक प्रकारच्या वैचारीक व आचरणीय मार्गभ्रष्टतेचा त्याग करुन केवळ त्याच मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे जो क़ुरआनने दर्शाविला आहे व जो खरे पाहता समस्त प्रेषितांचा मार्ग आहे व ज्याचे नाव इस्लाम धर्म आहे.

१६९. अभिप्रेत ते समस्त जिन्न व मनुष्य होत ज्यांनी मार्गभ्रष्टता अंगिकारुन अल्लाहच्या प्रकोपाला आमंत्रण दिले.

# १२. सूरह यूसुफ़

**नावः** या सूरह मध्ये अल्लाहचे पैगंबर हजरत यूसुफ यांचा वृत्तांत सम्मिलित आहे तद्नुषंगाने या सूरह चे नाव 'सूरह यूसुफ' आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे, आणि मजकुरांवरुन असे दिसून येते की हिचे अवतरण सूरह हूद च्या नंतर झाले असावे.

**मध्यवर्ति कल्पनाः** हजरत यूसुफ यांच्या निष्कलंक चारित्र्यास प्रकट करीत त्यांच्या आवाहनास प्रस्तुत केले गेले आहे आणि सत्य विरोधकांना हे स्पष्ट केले गेले आहे की त्यांच्या विरोधात्मक व कारस्थानात्मक कारवायांचे निराकरण सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या नि:शब्द उपाय योजनांनी कसे होते.

**आयत रचनाः** आयत १ व २ आरंभीच्या आयती होत. आयत क्र. ३ ते १०१ मध्ये हज़रत यूसुफ यांचा वृत्तांत आहे आयत क्र. १०२ ते १११ संभाषणाचा शेवट होय ज्यात ही घटना लक्षात घेता स्मरणाचे पैलू सादर केले गेले आहेत.

**मागील सूरहशी संबंधः** सूरह यूसुफ चे सूरह हूद शी बरेच औचितय आहे. एकतर या पैलूने की सूरह हूद मध्ये अनेक प्रेषितांचे वृत्तांत वर्णिले गेले आहेत आणि या सूरह मध्ये हज़रत यूसुफ यांचा वृत्तांत विस्तारपूर्वक.दुसरा या पैलूने की सूरह हूद च्या अंतीम आयतींमध्ये ज्या गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत त्यांच्याशी ही सूरह पूर्णत: सुसंगत आहे. उदाहरणार्थ तेथे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना संबोधून असे फर्माविले गेले होते की हे प्रेषित-वृत्तांत तुमच्या मनाला दृढता देणारे व वास्तव पूर्ण आहेत आणि ईमान बाळगणाऱ्यां करीता संकेत आणि स्मरणिका आहेत. या गोष्टी सूरह यूसुफ मध्येहि उत्तम प्रकारे आहेत. तेथे विरोधकांना सांगितले गेले होते की अंतिम निर्णयाची तुम्ही प्रतिक्षा करा, आम्ही हि प्रतिक्षा करतो या नंतर सूरह यूसुफ ने जणू या गोष्टीची खूण सांगितली आहे की परिस्थिती - कोणती दिशा घेणार आहे व कठीण अवस्थेतून पार पडल्यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना कशाप्रकारे सत्ताधिकार व वर्चस्व प्राप्त होणार आहे आणि त्यांच्या बिरादरीच्या त्या लोकांना जे हज़रत यूसुफ च्या बिरादरीच्या लोकांचे अनुसरण करीत आहेत, कशा रीतीने लज्जित व्हावे लागले. सूरह हूदच्या अंतिम आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहवर विश्वास ठेवण्याची ताकीद केली गेली होती. या सूरहने हज़रत यूसुफच्या अल्लाहवरील विश्वासाचे उत्कृष्ट उदाहरण मांडले आहे, त्याबरोबरच अल्लाहवरील विश्वासाचे निष्कर्षहि मांडले गेले आहेत, जो या गोष्टीचा पुरावा आहे की जो मनुष्य योग्य आचरण-मार्ग अंगिकारुन परिणामांना अल्लाहवर सोपवितो, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याचे काम पार पाडतो; व सफलता त्याच्या पायाशी लोळण घेते.

**कुटुंब आणि निवास स्थानः** हजरत इब्राहीम यांनी आपल्या एका पुत्रास इसहाकला पॅलेस्टीन (किन्आन)मध्ये वसविले होते हजरत इसहाक हेहि पैगंबर होते.त्यांचा पुत्र याकूब-ज्यांचे दुसरे नाव इसराईल आहे, यांनाहि सर्वश्रेष्ठ-अल्लाहने प्रेषित पदाने सन्मानित केले. बायबलच्या वर्णनानुसार हजरत याकूब यांचे बारा पुत्र होते. ज्यांच्यापासून 'बनी इस्राईल'चा वंश चालला हजरत यूसुफ व बिन यमीन लहान होते व एकाच मातेपासून होते आणि दुसरे पूत्र इतर मातांपासून. हे कुटुंब पॅलेस्टीनच्या 'हिब्रून' क्षेत्रात राहत होते यांचा काळ सुमारे अठराशे इसवी सना पूर्वीचा होता.

# किन्आन आणि इजिप्त

## (युसूफ़च्या काळांत)

**हिब्रुन :-** हज़रत इब्राहीम व हज़रत याक़ूब येथे राहत होते. यांचे दूसरे नांव अल-खलील आहे ।

**रामसीस :-** इजिप्त ची जुनी राजधानी ।

**गोशेन (जुश्न):-** इजिप्तचा तो प्रांत जेथे हज़रत युसुफ़ यांनी बनी इस्राईलला वसविले.



# १२.सूरह यूसुफ

سُورَةُ يُوسُف

(आयती १११)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

الٓرٰ تِلْكَ اٰيٰتُ الْكِتٰبِ الْمُبِيْنِ ﴿١﴾

१. अलिफ़ - लाम - रा [१] ह्या आयती आहेत स्पष्ट ग्रंथाच्या.[२]

اِنَّآ اَنْزَلْنٰهُ قُرْءٰنًا عَرَبِيًّا لَّعَلَّكُمْ تَعْقِلُوْنَ ﴿٢﴾

२. आम्ही त्यास अरबी क़ुरआनाच्या स्वरुपात अवतरीत केले आहे , अशासाठी की तुम्ही समजावे.[३]

نَحْنُ نَقُصُّ عَلَيْكَ اَحْسَنَ الْقَصَصِ بِمَآ اَوْحَيْنَآ اِلَيْكَ
هٰذَا الْقُرْاٰنَ ۖ وَاِنْ كُنْتَ مِنْ قَبْلِهٖ لَمِنَ الْغٰفِلِيْنَ ﴿٣﴾

३. आम्ही तुम्हाला सर्वोत्कृष्ट वृत्तांत ऐकवितो [४] या क़ुरआनाद्वारे ज्याचे ‘वहय’ (ईश-संदेश) आम्ही तुमच्याकडे पाठविले आहे. अन्यथा यापूर्वी तुम्ही याविषयी अगदी अनभिज्ञ होता.[५]

اِذْ قَالَ يُوْسُفُ لِاَبِيْهِ يٰٓاَبَتِ اِنِّيْ رَاَيْتُ اَحَدَ
عَشَرَ كَوْكَبًا وَّالشَّمْسَ وَالْقَمَرَ رَاَيْتُهُمْ لِيْ سٰجِدِيْنَ ﴿٤﴾

४. जेव्हा असे झाले की यूसुफ [६] आपल्या पित्यास म्हणाला, हे पिता ! मी (स्वप्नात) असे पाहिले की अकरा नक्षत्रे आणि सूर्य व चंद्र आहेत, आणि काय पाहतो की ते माझ्यापुढे झुकलेले आहेत.[७]

قَالَ يٰبُنَيَّ لَا تَقْصُصْ رُءْيَاكَ عَلٰٓى اِخْوَتِكَ فَيَكِيْدُوْا لَكَ
كَيْدًا ۗ اِنَّ الشَّيْطٰنَ لِلْاِنْسَانِ عَدُوٌّ مُّبِيْنٌ ﴿٥﴾

५. तो म्हणाला, हे माझ्या पुत्रा !आपले हे स्वप्न आपल्या भावांना ऐकवू नकोस अन्यथा ते तुझ्या विरुद्ध एखादा कट रचतील [८] नि:संशय सैतान माणसाचा उघड वैरी आहे.

وَكَذٰلِكَ يَجْتَبِيْكَ رَبُّكَ وَيُعَلِّمُكَ مِنْ تَاْوِيْلِ
الْاَحَادِيْثِ وَيُتِمُّ نِعْمَتَهٗ عَلَيْكَ وَعَلٰٓى اٰلِ يَعْقُوْبَ كَمَآ اَتَمَّهَا
عَلٰٓى اَبَوَيْكَ مِنْ قَبْلُ اِبْرٰهِيْمَ وَاِسْحٰقَ ۗ
اِنَّ رَبَّكَ عَلِيْمٌ حَكِيْمٌ ﴿٦﴾

६. आणि अशा प्रकारे तुझा पालनकर्ता तुझी निवड करील [९] व तुला गोष्टींची मूळ हकीगत माहित करणे शिकवील [१०] आणि तो आपली देणगी तुझ्यावर व याकूबच्या वंशावर त्याच प्रकारे पूर्ण करील ज्या प्रकारे यापूर्वी त्याने तुझे आजोबा इब्राहीम व इसहाक यांच्यावर पूर्ण केली आहे. [११] नि:संशय तुझा पालनकर्ता ज्ञान व हिकमत (बुद्धि कौशल्य) बाळगणारा आहे. [१२]

१. या अक्षरांचे स्पष्टीकरण सूरह यूनुस टीप क्र.१ मध्ये केले गेले आहे.

या सूरह मध्ये **'अलिफ'** चा संकेत अल्लाह (एकेश्वरवादी विषया) कडे आहे. **लाम** चा संकेत **''ला ताबुदू इल्ला इय्याहु''** لَا تَعۡبُدُوٓاْ إِلَّآ إِيَّاهُ (त्याच्या खेरीज कोणाचीहि उपासना करु नका आयत क्र. ४०) कडे आहे दुसऱ्या शब्दात शिर्कच्या खंडनाकडे आणि **'रा'** चा संकेत रब्ब (अल्लाहचे स्वामीत्वा) कडे आहे ज्याचा उल्लेख अनेक आयतीत आला आहे. तसेच त्या खऱ्या स्वप्नांकडेहि ज्याचा उल्लेख या सूरतीत विशेष करुन आला आहे व जी रब्ब ज्या निशाण्यांपैकी एक निशाणी होय.

२. क़ुरआन स्पष्ट ग्रंथ आहे कारण याची शिकवण अगदी स्पष्ट आहे. त्याचे आवाहन, त्याने प्रस्तुत केलेली श्रद्धा त्याचे मार्गदर्शन व त्याचे ध्येय-उद्दिष्ट तात्पर्य सर्व गोष्टी साफरित्या वर्णिल्या गेल्या आहेत. एकीकडे क़ुरआनाचे हे वैशिष्ट्य आहे. ज्यामुळे त्याची शिकवण मनमस्तिष्काप्रत भिनत जाते तर दुसरीकडे विविध धर्माचे ते 'पवित्र' ग्रंथ होत जे विमनस्कतेने परिपूर्ण आहेत व ज्यांचा अभ्यास मोठे कठीण काम आहे!

३. संबोधन प्रत्यक्षत: अरब जनसमूहाशी आहे. ज्या अर्थी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रत्यक्षत: अरब जन-समूहाकडे पाठविले गेले होते म्हणून कुरआनाचे अवतरण देखील त्यांच्या मातृभाषेत झाले जी अरबी होती. अरबेतर जन समूहांकडे त्यांना अप्रत्यक्षपणे पाठविले गेले आहे तद्वतच क़ुरआन देखील समस्त अरबेतर जनसमूह व अरबी न जाणणाऱ्या लोकांकरीता अप्रत्यक्षत: प्रमाण आहे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कैसर व किसरा यांना जे आवाहनात्मक खेलीते लिहीली होती ती अरबी भाषेतच होती व त्यात कुरआनाच्या आयती देखील सामील केल्या होत्या. वस्तुत: त्या बादशहांची भाषा अरबी नव्हती म्हणूनच त्यांना भाषांत कारांची मदत घेणे भाग पडले. या वरुन हे स्पष्ट झाले की क़ुरआनाचा संदेश किंवा त्याचे खरे भाषांतर विश्वसनीय माध्यमान्वये एखाद्या व्यक्ति वा समूहाप्रत पोहचल्या त्यावर अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित होते.

आणि हे जे फर्माविले गेले आहे की 'अशासाठी की तुम्ही समजावे' तर यावरुन ही गोष्टी चांगल्या प्रकारे स्पष्ट होते की क़ुरआनाचे केवळ पठण करणे पर्याप्त नाही किंबहुना ते समजून घेणे व त्याचा अर्थ प्राप्त करणे आवश्यक आहे तसेच हे की यास समजून वाचण्याचे आवाहन केवळ मुसलमानांकरीता खास नाही तर समस्त लोकांसाठी सार्वत्रिक आहे. मग एखादा मनुष्य अन्य एखाद्या धर्माशी संबंधित असो, आणि तो विद्वान असो वा निरक्षर आणि हा विचार अगदी चुकीचा आहे की क़ुरआनास केवळ उलमाच (धर्म शास्त्रात पारंगत असलेले विद्वान) समजू शकतात किंवा क़ुरआन केवळ मुसलमानांच्या पढण्या करीता आहे.

४. हज़रत यूसुफ यांचा वृत्तांत सर्वोत्कृष्ट वृत्तांत असणे निरनिराळ्या कारणांनी आहे.

**प्रथमत:** या वृत्तांतात हे वर्णिले गेले की हजरत यूसुफ यांच्या जीवनात ते सूज्ञ झाल्यापासून वयस्क होई पावेतो कसकशा प्रकारची वळणे आलीत व प्रत्येक वळणावर अल्लाहने त्यांना कसे मार्गदर्शन केले व त्यांनी कशा प्रकारे उच्च चारित्र्याचा पुरावा दिला.

**द्वितीयत:** तरुण वयात त्यांच्या सत्शीलतेची अशी परीक्षा होते ज्याचे उदाहरण इतिहासात शोधून सापडायचे नाही. या परीक्षेत ते अशा प्रकारे खरे ठरले की त्यांच्या शत्रूंना ते फिरिश्ते असल्याचा संशय येऊ लागला.

**तृतीयत:** त्यांच्या वृत्तांतात बोध व उपदेशाचे थोडेसेच नव्हे तर असंख्य पैलू आहेत.

**चतुर्थत:** हा वृत्तांत यूसुफ यांच्या चारित्र्याचे असे चित्र सादर करते जे मोठे आश्चर्यकारक व मोठे मनोहारी आहे आणि वास्तवतेशी किंचितही दूर नाही.

**पंचमत:** हा एक सर्वकष वृत्तांत होय ज्याच्यासाठी संपूर्ण एक सूरत अवतरली ज्यात शंभराहून अधिक आयती सामील आहेत व याच वृत्तांतासाठी विशेषत्वाने आहेत.

**षष्ठंत:** या वृत्तांतात भिन्न भिन्न चरित्रे दिसून येतात तथापि हजरत यूसुफ यांचे चरित्र आपली बहूमूल्यात अशाप्रकारे मान्य करावयास लावते की ज्यास कदर न बाळगणाऱ्यांनी तुच्छ दगड समजून फेकून दिले होते. तो वस्तुत:मूल्यवान हीरा होता व शेवटी तो मुकुट बनून चमकला.

५. हजरत यूसुफ यांचा किस्सा बायबल मध्ये वर्णिला गेला असला (निर्मिती प्रकरण ३७ ते ५०) तरी प्रथम तर या घटनेचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ज्ञान नव्हते कारण ते निरक्षर होते, म्हणून ना तौरात वाचू शकत होते ना अन्य एखादा ग्रंथ एवढेच नव्हे तर हा वृत्तांत कुरआनात ज्या प्रकारे वर्णिला गेला आहे तो बायबलच्या वर्णनाहून फार वेगळा आहे. जर पैगंबरांनी ग्रंथ धारकांकडून ऐकून या वृत्तांताचे निवेदन केले असते तर हा फरक व विशेषता राहीली नसती.व ते पैलूही समोर आले नसते जे बायबल मध्ये सुरवातीपासूनच वर्णिले गेले नाहीत.

६. हजरत यूसुफ यांची वेश-परंपरा अतिशय श्रेष्ठ होती. त्यांचे पिता हजरत याक़ूब हे पैगंबर होते त्यांचे आजोबा इसहाक हे देखील पैगंबर होते व त्यांचे पणजोबा हजरत इब्राहीम हेहि. हजरत यूसुफ या प्रेषित-वंशाचे केवळ वंशजच नव्हते तर भविष्यात तेहि प्रेषित्व पदाने सन्मानित झाले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजरत यूसुफ यांच्या संदर्भात असे फर्माविले !

الكريم ابن الكريم ابن الكريم ابن الكريم يوسف بن
يعقوب بن اسحاق بن ابراهيم۔ (بخاری کتاب التفسیر)

“ते स्वत:पण सभ्य होते व सभ्य पित्याचे पुत्रहि. त्यांचे आजोबा देखील सभ्य होते व पणजोबाहि सभ्य होते यूसुफ पिता याकूब पिता इसहाक पिता इब्राहीम”

(अल बुखारी किताबुत्तफसीर )

७. मूळ ग्रंथात ‘साजेदीन’ (सजदा करीत असलेले) हा शब्द वापरला गेला आहे. सजद्याचा शाब्दिक अर्थ झुकणे असा आहे हा अर्थ कपाळ जमीनीवर टेकण्यावरहि लागू पडतो व केवळ झुकण्यावरहि अरबी भाषेत खजूरांच्या झुकलेल्या झाडांना “नखलतुन साजिदह” **نخلة الساجدة** (सजदा करणारे वृक्ष) म्हणतात. आयतीत ‘नक्षत्रे आणि सूर्य-चंद्राचे सजदा अवस्थेत होते.’ उघड आहे जमीनीवर कपाळ टेकण्याच्या अर्थानेच होऊ शकत नाही किंबहुना आपल्या मूळ लाक्षणिक अर्थानेच होऊ शकते म्हणजे त्यांचे झुकलेल्या स्थितीत खाली येणे (आणि सत्य परिस्थितीचे ज्ञान अल्लाहलाच आहे).

८. हजरत यूसुफ यांचे वडील याकूब पैगंबर होते स्वप्नाचा अर्थ ते उमजले की अकरा नक्षत्रांशी अभिप्रेत यूसुफचे अकरा भाऊ होत व सूर्य-चंद्राशी अभिप्रेत यूसुफचे माता-पिता त्यांना असेहि समजले की या स्वप्नाचा संकेत या गोष्टीकडे आहे की यूसुफचे भविष्य अतिशय उज्जवल आहे ते सत्ताधिकार पदावर आरुढ होतील व हे संपूर्ण कुटुंब त्यांच्या सत्ताधिकारखाली असेल.

ज्याअर्थी यूसुफ यांचे दहा भाऊ सावत्र होते व त्यांच्याशी मत्सर भाव ठेवीत म्हणून हजरत याकूब यांनी सावत्र भावांच्या मनांत मत्सराग्नि न भडकावा व त्यांनी यूसुफ विरुद्ध एखादे कट-कारस्थान न रचावे या भयाने हे स्वप्न सांगण्यास मनाई केली. भाष्यकारांनी केवळ या कारणास्तव की हज़रत यूसुफ यांनी स्वप्नात आपल्या भावांना नक्षत्रांच्या रुपाने पाहिले होते. हे मत कायम केले की ते सर्व नंतर प्रेषित होतील तथापि ही केवळ भोळसट कल्पना होय कारण प्रेषिताचे चारित्र्य प्रेषित्व पदा पूर्वीहि अत्यंत स्वच्छशुद्ध असते व तो नैतिकतेच्या उच्च पातळीवर असतो जेव्हा हज़रत यूसुफ यांच्या या सावत्र भावांविषयी ते कशा प्रकारचे लोक आहेत व कसकसे अपराध करीत हे माहितच आहे. राहिले त्यांचे नक्षत्र- रुपाने दिसून येणे तर याने त्यांचे पैगंबर होणे अपरिहार्य ठरत नाही. हज़रत यूसुफ ने आपल्या मातेस चंद्र-रुपाने पाहिले होते तर काय ती देखील प्रेषित झाली? अल्लामा इब्ने तयमिय्या यांनी या विचाराचे सक्त खंडन केले आहे ज्याचा खुलासा असा:

‘ज़्या गोष्टीस कुरआनी शब्दकोष व अभिप्रेत अर्थ प्रमाणित करतात ती ही की हज़रत यूसुफ यांचे भाऊ प्रेषित नव्हते आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना प्रेषित बनविले होते असे कुरआनात कोठेहि नाही व ना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) द्वारे अलिखित आहे व ना एखाद्या प्रेषित सहवासातील अनुयायींचे कथन याच्या समर्थनार्थ आहे राहिला ‘अस्बात’ ने युक्तिवाद तर याचा अर्थ हज़रत याकूब यांची स्वत:ची संतती नव्हे, किंबहुना त्यांचा वंश होय आणि खरी गोष्ट अशी की अस्बात ची उपाधि हजरत मूसाच्या काळात दिली गेली होती. व त्या वेळपासून यांच्यात (म्हणजे बनी इस्राईलमध्ये) प्रेषित्व क्रम चालला अन्यथा त्यांच्या पूर्वी हजरत यूसुफ खेरीज कोणत्याहि प्रेषिताचा उल्लेख आढळत नाही आणि अल्लाहने यूसुफ यांच्या समाजातील ज्या मोठमोठ्या अपराधांचा उल्लेख केला आहे. अशा प्रकारच्या अपराधांचा उल्लेख कोणत्याहि प्रेषिताच्या संबंधाने केला नाही की तो प्रेषित्वापूर्वी असे अपराध करीत होता.’ (रुहुल मआनी खं.४ पा. १८४)

९. म्हणजे प्रेषित्व पदाने विभूषित करील.

१०. मूळ ग्रंथात ‘तावीलुल अहादीस’ हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा अर्थ गोष्टीच्या मूळाशी जणे व त्यांचे खरे स्वरुप जाणणे असा आहे. तात्पर्य व्यवहार आकलन, अंतर्दृष्टि व उचित निष्कर्ष काढणे ज्यात स्वप्नाचा अर्थ लावण्याचे ज्ञान विशेषत्वाने सामील आहे.

११. अभिप्रेत श्रेष्ठत्व व नेतृत्वाची ईश-देणगी आणि इहलोकीय व आखीरतीय सद्‌भागय होय. याकूब वंशाशी अभिप्रेत हजरत याकूब यांचे वंशज होता जे भविष्यात बनी इस्राईल या नावाने संबोधित केले गेले व ज्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने जगातील जन-समूहांच्या दरम्यान एक विशेष स्थान दिले व लोकांच्या मार्गदर्शनाचे माध्यम बनविले.

१२. तो ज्ञान बाळगणारा आहे म्हणूनच त्याला भविष्याचे पूर्ण ज्ञान आहे आणि तो हिकमत (बुद्धि कौशल्य) बाळगणारा आहे म्हणून त्याचे निर्णय अत्यंत बुद्धि कौशल्ययुक्त असतात.

*तो म्हणाला, तुमचे त्याला आपल्या सोबत नेणे माझ्याकरीता दुःखकारक आहे आणि मला असे भय वाटते की कदाचित एखाद्या लांडग्याने त्याला खाऊन टाकावे व तुम्ही त्यापासून गाफील असावे. ते म्हणाले, आमचा संपूर्ण जथा हजर असतांना लांडग्याने त्याला खाऊन टाकले तर आम्ही अगदीच बेकार ठरु ! (अल-क़ुर्आन)*

७. खरे पाहता, यूसुफ व त्याच्या भावांच्या वृत्तांतात पृच्छा करणाऱ्यां करीता मोठ्या निशाण्या आहेत.[१३]

لَقَدْ كَانَ فِي يُوسُفَ وَإِخْوَتِهِ آيَاتٌ لِلسَّائِلِينَ ﴿٧﴾

८. जेव्हा असे झाले की ते (अर्थात यूसुफ चे भाऊ) म्हणू लागले, यूसुफ व त्याचा भाऊ आमच्या पित्यास आम्हा सर्वांहून अधिक प्रिय आहेत.[१४] जेव्हा आम्ही एक जथा आहोत [१५] नि:संशय आमचे पिता स्पष्ट चूकीवर आहेत.

إِذْ قَالُوا لَيُوسُفُ وَأَخُوهُ أَحَبُّ إِلَىٰ أَبِينَا مِنَّا
وَنَحْنُ عُصْبَةٌ إِنَّ أَبَانَا لَفِي ضَلَالٍ مُبِينٍ ﴿٨﴾

९. यूसुफची हत्त्या करा किंवा त्याला एखाद्या ठिकाणी फेकून द्या, अशासाठी की तुमच्या पित्याचे लक्ष तुमच्या कडेच व्हावे-यानंतर तुम्ही सदाचारी व्हाल.[१६]

اقْتُلُوا يُوسُفَ أَوِ اطْرَحُوهُ أَرْضًا يَخْلُ لَكُمْ وَجْهُ أَبِيكُمْ
وَتَكُونُوا مِنْ بَعْدِهِ قَوْمًا صَالِحِينَ ﴿٩﴾

१०. यांच्यापैकी एक बोलणारा बोलला यूसुफची हत्त्या करु नका, किंबहुना तुम्हाला काही करायचेच आहे तर एखाद्या खोल,कोरड्या विहीरीत टाकून द्या. एखादा जवळून जाणारा काफिला त्याला बाहेर काढून घेईल.

قَالَ قَائِلٌ مِنْهُمْ لَا تَقْتُلُوا يُوسُفَ وَأَلْقُوهُ فِي غَيَابَتِ الْجُبِّ
يَلْتَقِطْهُ بَعْضُ السَّيَّارَةِ إِنْ كُنْتُمْ فَاعِلِينَ ﴿١٠﴾

११. ते म्हणाले, हे पिता !आपण यूसुफ बाबत आम्हावर विश्वास कां नाही ठेवत, वस्तुतः आम्ही त्याचे मोठे हितचिंतक आहोत.

قَالُوا يَا أَبَانَا مَا لَكَ لَا تَأْمَنَّا عَلَىٰ يُوسُفَ
وَإِنَّا لَهُ لَنَاصِحُونَ ﴿١١﴾

१२. उद्या त्याला आमच्या सोबत पाठवा की त्याने खावे, प्यावे व खेळावे, रमावे [१७] आम्ही त्याच्या संरक्षणास जबाबदार आहोत.[१८]

أَرْسِلْهُ مَعَنَا غَدًا يَرْتَعْ وَيَلْعَبْ وَإِنَّا لَهُ لَحَافِظُونَ ﴿١٢﴾

१३. तो म्हणाला, तुमचे त्याला आपल्या सोबत नेणे माझ्याकरीता दु:खकारक आहे आणि मला असे भय वाटते की कदाचित एखाद्या लांडग्याने त्याला खाऊन टाकावे व तुम्ही त्यापासून गाफील असावे.[१९]

قَالَ إِنِّي لَيَحْزُنُنِي أَنْ تَذْهَبُوا بِهِ وَأَخَافُ
أَنْ يَأْكُلَهُ الذِّئْبُ وَأَنْتُمْ عَنْهُ غَافِلُونَ ﴿١٣﴾

१४. ते म्हणाले, आमचा संपूर्ण जथा हजर असतांना लांडग्याने त्याला खाऊन टाकले तर आम्ही अगदीच बेकार ठरु !

قَالُوا لَئِنْ أَكَلَهُ الذِّئْبُ وَنَحْنُ عُصْبَةٌ
إِنَّا إِذًا لَخَاسِرُونَ ﴿١٤﴾

१३. यावरुन हे स्पष्ट झाले की सूरह यूसुफ मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांच्या प्रश्नास उत्तर म्हणून अवतरीत झाली, प्रश्न संभवत:यहूद्यांच्या संकेतानुसार केला गेला असेल, अशासाठी की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची परीक्षा घेतली जावी की ते हजरत यूसुफची घटना कशा प्रकारे निवेदन करतात, जेव्हा त्यांनी तौरात वाचलेले नाही. त्यांच्या या प्रश्नास उत्तर म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत यूसुफ यांचा वृत्तांत बोधदायक रित्या निवेदिला व प्रश्नकर्त्यांना वैचारीक आवाहन केले की यूसुफ व त्यांच्या भावांच्या दरम्यान जो मामला झाला त्यात अल्लाहचे सामर्थ्य व बुद्धिकौशल्याच्या आश्चर्यकारक निशाण्या आहेत. अर्थात असे की कशा रीतीने अल्लाहची उपाय योजना प्रभावी ठरते व त्याची योजना फलद्रुप पावते.

**'मुद्दई लाख बुरा चाहे तो क्या होता है**
**वही होता है जो मन्जूरे खुदा होता है,**

(शत्रू आमचे अहित होण्याची लाख इच्छा बाळगतो पण त्याने काय होते, होते तेच जे ईश्वराला मंजूर असते)

हजरत यूसुफ यांना त्यांच्या सदाचारामुळे अल्लाहचा पाठींबा व मदत प्राप्त होती म्हणून ना त्यांचे कुटुंबीय त्यांना कसली हानी पोहचवू शकले, ना मिस्र च्या त्या स्त्रीया ज्यांनी यूसुफ विरुद्ध कारस्थान रचले व त्यांना कैदेत पाठविले. आज पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी जो व्यवहार करीत आहेत तो त्या व्यवहाराहून काही भिन्न नाही जो यूसुफच्या भावांनी त्यांच्याशी केला होता त्याचप्रमाणे ते स्वत:ला अशा परिणतिकडे लोटत आहेत, ज्यात त्यांच्या करीता प्रश्चात्तापाखेरीज आणखी काहीही नाही.

१४. बिन यमीन होय जो हजरत यूसुफ यांचा सख्खा भाऊ होता.

१५. यूसुफ व बिन यमीन सर्वांहून लाहन होते म्हणून स्वाभाविकपणे हजरत याकूबना अधिक प्रिय असतील आणि हजरत यूसुफ तर आपल्या सदाचार, बुद्धिमत्ता व उच्च पात्रतेमुळे पिता याकूबला प्राणप्रिय होते, तथापि त्यांनी आपल्या इतर मुलांशी कसलाहि अन्याय केला नव्हता अन्यथा या प्रसंगी त्यांनी आपल्या पित्यासंबंधी गाऱ्हाणे जरुर मांडले असते. बायबल मधील उल्लेखानुसार:-

'आपला बाप आपल्या इतर सर्व भावांपेक्षा त्याच्यावर अधिक प्रीति करितो हे पाहून ते त्याचा द्वेष करु लागले व त्याच्याशी सलोख्याचे भाषण करीनासे झाले.' (उत्पत्ति ३७:४)

'वस्तुत: आम्ही एक जथा आहोत' यांने हेहि अभिप्रेत होते की कुटुंब-संरक्षणाच्या दृष्टीने खरे महत्त्व जथ्याचे होते. एकमात्र व्यक्तिचे नव्हे कारण त्या काळात किनआनमध्ये (प्रतिहिंसा) नुसार लोक स्वतंत्र कबिल्यांनी जीवन व्यतीत करीत व कोणतेहि योजनाबद्ध शासन नव्हते.त्यांचे असे म्हणणे होते की या परिस्थितीत अम्ही दहा भाऊ जो एक जथा आहे आपल्या पित्याकरीता अधिक लाभदायक सिद्ध होऊ शकतो म्हणून पित्याच्या प्रेमास आम्हीच जास्त पात्र आहोत, यूसुफ व बिन यमीन नव्हे. परंतु हजरत याकूब यांच्या नजरेत खरे मुल्य नितीमत्ता व चारित्र्य यांचे होते म्हणूनच यूसुफ त्यांना अधिक प्रिय होते.

१६. या कट कारस्थानामागे त्यांच्या ह्या इच्छा आकांक्षा होत्या की त्यांच्या पित्यांचे प्रेम केवळ त्यांच्याच करीता खास होऊन रहावे, परंतु त्यांच्या विवेक अंतर्मनातून सांगत होता की या स्थितीत ते अपराधी ठरतील परंतु सैतानाने हा पाठ पढविला की आपल्या मार्गातील काटे दुर सारण्या करीता जर अपराध करणे अनिवार्य आहे तर करण्यास हरकत नाही. कारण यानंतर जेव्हा पित्याचे प्रेम व लक्ष त्यांच्या करीता विशेषत्वाने होइल तेव्हा ते देखील एकचित होऊन सदाचाराकडे प्रवृत्त होऊ शकतील व त्यांना सदाचारी बनून राहणे सोपे होईल.

यावरुन हे अनुमान लावले जाऊ शकते की सैतान माणसाला किती मोहकपणे अपराध करण्यास प्रवृत्त करतो व कशा प्रकारे चुकीच्या मार्गाला लावतो.

१७. खेळण्या बागडण्याशी अभिप्रेत धावणे व तिरंदाजी सारखे खेळ जे तत्कालीन ग्रामीण जीवनात संरक्षणाच्या दृष्टीकोनातुन आवश्यक होते.

१८. त्यांचे या योजनेवर एकमत झाले की यूसुफला विहीरीत टाकले जावे आणि चाल अशी चालले की यूसुफला फिरावयास नेण्याच्या बहाण्याने जंगलात घेऊन जाण्याची अनुज्ञा आपल्या पित्याकडून घ्यावी व त्यांना हा विश्वास द्यावा की ते पूर्णत: यूसुफचे संरक्षण करतील. यावरुन स्पष्ट झाले की जेव्हा मनुष्य असत्य बोलण्यास योग्य ठरवितो तेव्हा ना बनावटी गोष्टी करण्यात त्याला संकोच वाटतो ना भयंकर कारस्थान बनविण्यात.

१९. हजरत याकूब यांच्याकरीता ही गोष्ट अशासाठी दु:खकारक होती की त्यांना यूसुफ बाबत हे भय वाटत होते की कदाचित सावत्र भावांनी त्यांना हैराण न करावे, तसेच त्यांना हा धोका हि जाणवत होता की त्यांच्या बेपर्वा वृत्तीमुळे यूसुफ एखाद्या संकटाला बळी न पडावा. यावरुन असे ज्ञात होते की त्या काळात किनआन च्या जंगलात लांडगे अधिक होते व त्यांच्या हल्लातून वाचणे मोठे कठीण होते म्हणून हजरत याकूब यांनी अस्तित्वात असलेल्या धोक्याचा उल्लेख केला.

१५. मग जेव्हा ते यूसुफला घेऊन गेले [२०] व त्यांना खोल-कोरड्या विहीरीत टाकण्याचे ठरविले गेले तेव्हा आम्ही त्याच्याकडे (यूसुफकडे) 'वही' (ईश-संदेश) पाठविला की, (एक वेळ अशी येईल की) तुम्ही त्यांना त्यांचा हा मामला जतवून सांगाल व त्यांना याची कल्पनाहि नसेल.[२१]

فَلَمَّا ذَهَبُوا بِهِ وَأَجْمَعُوا أَنْ يَجْعَلُوهُ فِي
غَيٰبَتِ الْجُبِّ ۚ وَأَوْحَيْنَا إِلَيْهِ لَتُنَبِّئَنَّهُمْ بِأَمْرِهِمْ
هٰذَا وَهُمْ لَا يَشْعُرُونَ ﴿١٥﴾

१६. आणि थोडी रात्र लोटल्यावर ते आपल्या पित्याजवळ रडत रडत आले .[२२]

وَجَاءُوا أَبَاهُمْ عِشَاءً يَبْكُونَ ﴿١٦﴾

१७. ते म्हणाले, हे पिता !आम्ही धावण्यात एकमेकांशी स्पर्धा करीत होतो व यूसुफ ला आपल्या सामानाजवळ सोडले होते की लांडग्याने त्याला खाऊन टाकले [२३] आणि आम्ही खरे बोलत असलो तरी तुम्ही आमच्या गोष्टीवर विश्वास ठेवणार नाहीत. [२४]

قَالُوا يٰأَبَانَا إِنَّا ذَهَبْنَا نَسْتَبِقُ
وَتَرَكْنَا يُوسُفَ عِنْدَ مَتَاعِنَا فَأَكَلَهُ الذِّئْبُ ۚ
وَمَا أَنْتَ بِمُؤْمِنٍ لَنَا وَلَوْ كُنَّا صٰدِقِينَ ﴿١٧﴾

१८. आणि त्यांनी त्याच्या (यूसुफच्या) आंगरख्यावर खोटे रक्त लावून आणले होते, त्याने (पित्याने ) म्हटले, नव्हे किंबहुना तुमच्या मनाने एक गोष्ट रचली आहे [२५] आता माझ्याकरीता उत्तम धैर्य आहे [२६] आणि जे काही तुम्ही निवेदन करीत आहात त्यावर अल्लाहकडूनच मदत मागतो. [२७]

وَجَاءُوا عَلٰى قَمِيصِهِ بِدَمٍ كَذِبٍ ۚ
قَالَ بَلْ سَوَّلَتْ لَكُمْ أَنْفُسُكُمْ أَمْرًا ۚ فَصَبْرٌ
جَمِيلٌ ۚ وَاللّٰهُ الْمُسْتَعَانُ عَلٰى مَا تَصِفُونَ ﴿١٨﴾

१९. आणि (इकडे) एक काफिला आला तेव्हा त्याने आपल्या पाणक्याला पाठविले त्याने डोल विहीरीत टाकला तत्क्षणी उद्गारला, किती आनंदाची गोष्ट आहे, हा तर एक मुलगा आहे [२८] व त्यास व्यापार-वस्तू समजून लपविले. [२९] ते जे काही करीत होते अल्लाह ते जाणून होता.

وَجَاءَتْ سَيَّارَةٌ فَأَرْسَلُوا وَارِدَهُمْ فَأَدْلٰى دَلْوَهُ ۚ
قَالَ يٰبُشْرٰى هٰذَا غُلٰمٌ ۚ
وَأَسَرُّوهُ بِضٰعَةً ۚ وَاللّٰهُ عَلِيمٌ بِمَا يَعْمَلُونَ ﴿١٩﴾

२०. आणि त्यांनी काही मोजक्या दिरहमच्या तुच्छ किंमतीवर त्याला विकून टाकले [३०] व या मामल्यात त्यांना कसलेही स्वारस्य नव्हते. [३१]

وَشَرَوْهُ بِثَمَنٍ بَخْسٍ دَرٰهِمَ مَعْدُودَةٍ ۚ
وَكَانُوا فِيهِ مِنَ الزّٰهِدِينَ ﴿٢٠﴾

२०. म्हणजे आपल्या पित्याशी आग्रह करुन त्यांनी यूसुफला आपल्या सोबत नेले.

२१. अर्थात 'वह्य' (ईश-संदेश) पाठवून आम्ही यूसुफला धीर दिला की हे तुमच्याशी जे काही करीत आहे त्याने तुमचे काहीहि बिघडणार नाही, किंबहुना अशी एक वेळ येईल जेव्हा यांना आपल्या या कृत्याचा पश्चात्ताप होईल. तुम्ही सकुशल जीवंत राहून यांना जतवून द्याल की त्यांनी तुमच्याशी कसे वर्तन केले होते, व ज्या वेळी तुम्ही त्यांना जतवून सांगाल तेव्हा त्यांना कल्पना देखील नसेल की जो मनुष्य त्यांना ह्या घटनेची आठवण करुन देत आहे तो त्याचा भाऊ 'यूसुफ'आहे. पुढे ही घटना ज्या प्रकारे घडली त्यसंबंधीचा उल्लेख आयत क्र.८९ व ९० मध्ये आला आहे. स्पष्ट असावे की 'वह्य' हज़रत यूसुफ प्रेषित होण्यापूर्वी त्यांच्याकडे पाठविली गेली होती. त्यावेळी त्यांचे वय बायबलच्या निवेदनानुसार फक्त १७ वर्षाचे होते.

२२. म्हणजे हज़रत यूसुफ यांना विहीरीत सोडून ते रात्रीच घरी परतले. यावरुन असे कळते की ते जवळच्याच इलाक्यात गेले होते अन्यथा रात्री पावेतो घरी पोहचू शकले नसते.

नक्राश्रू ढाळीत आपल्या पित्याजवळ पोहचले अशासाठी की यूसुफशी सहानुभूति व्यक्त व्हावी व आपल्या पित्याने आपल्या म्हणण्यावर भरवसा करावा.

२३. हजरत याकूब यांच्या मुखातून एक संभाव्य धोका लक्षात घेता जे शब्द निघाले होते यूसुफच्या भावांनी त्यांचा आधार घेऊन यूसुफ ठार झाल्याचा किस्सा रचला.

२४. त्यांनी किस्सा तर रचला पण त्यांना स्वत:विश्वास होत नव्हता की त्यांचे पिता त्यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवतील.

२५. त्यांच्या असत्याचे पितळ जर या गोष्टीनेच उघडे पडत होते की अंगरखा फाटलेला नव्हता. लांडग्याने हल्ला करावा व अंगरखा फाटू नये हे कसे शक्य होते.या उघड असत्यास हजरत याकूब यांनी कशा प्रकारे खरी घटना मानले असते? त्यांनी तत्क्षणी म्हटले की हा मनगढत किस्सा आहे. यावरुन ही तात्त्विक गोष्ट स्पष्ट होते की जेव्हा एखाद्या वार्तेचे समर्थन कुरआन किंवा लक्षणांद्वारे न व्हावे व खबर देणारे अविश्वसनीय असावेत तर अशी वार्ता रद्द करण्यायोग्य ठरेल.

२६. उत्तम धैर्याचा अर्थ संकटाला चांगल्या प्रकारे संहन करणे व त्रास पोहोचल्यावर कुलीनतेचा पुरावा देणे, आकांडतांडव तर संयमाच्या विरुद्धच आहे.

क़ुरआन हजरत याकूब यांच्या चारित्र्यास या प्रकारे सादर करते जे एखाद्या पैगंबराला शोभून दिसावे तथापि बायबलची शैली तर अगदीच भिन्न आहे. तेव्हा बायबलमध्ये असे आहे की यूसुफ विषयीची ही वार्ता ऐखून हज़रत याकूब यांनी आपली वस्त्रे फाडली व बऱ्याच दिवसापावेतो शोक करीत राहिले. आणि अशा कित्येक ठिकाणी बायबलच्या संकलन कर्त्यांनी आपल्या प्रेषितांच्या चारित्र्यास विकृत स्वरुपात सादर केले आहे.

२७. अल्लाहवरील दृढ विश्वासाची ही अभिव्यक्ति होय.

२८. बायबलच्या वर्णनावरुन असे दिसून येते की हा इस्माईलीयांचा काफिला होता. जो व्यापार-सामुग्री घेऊन मिस्र (इजिप्त) कडे जात होता. यावरुन हे अनुमान निघते की ती विहीर ज्यात यूसुफला टाकले गेले होते, अशा राजमार्गावर होती जो किनआन हून मिस्र कडे जात होता. यूसुफला त्यांच्या भावांनी जंगलात नेले नाही. किंबहुना राजमार्गवर येऊन एका अशा विहीरीत की जिच्या तोंडावर दगडांची मुंढेर बनलेली नव्हती. ('जुब्ब' अशाच विहीरीला म्हणतात) यूसुफला सोडले. संयोगाने काफिला जेव्हा या विहीरीजवळ थांबला तेव्हा त्याने आपल्या एका माणसाला पाणी आणण्यासाठी विहिरीवर पाठवले त्याने जेव्हा विहिरीत डोल टाकला तेव्हा यूसुफने त्या डोलाचा आधार घेतला व जेव्हा ते वर आले तेव्हा पाणक्याला हे पाहून मोठा आनंद झाला की हा एक मुलगा आहे जो विहिरीत अडकला होता व ज्याच्या करीता डोल सुटकेचे साधन ठरले. अधिक आनंद या गोष्टीचा झाला की आयता एक गुलाम हाती लागला ज्याची किंमत वसूल करता येईल.

२९. त्या काळात जेव्हा एखाद्याला एखादा हरवलेला मुलगा रस्त्यात पडलेला लाभत असे-ज्याला धर्मशास्त्रीय परिभाषेत 'लकीत' म्हणतात -तर तो त्यास गुलाम बनवत असे व वाटल्यास एखाद्याच्या हाती विकत असे. काफिला वाल्यांनीहि हजरत यूसुफ बरोबर हाच व्यवहार केला. त्यांना व्यापार-सामुग्री समजून त्यावेळी लपविले, अशासाठी की मुलाचा कोणी दावेदार न निघावा त्यानंतर त्यांना (यूसुफला) मिस्र देशात नेऊन विकून टाकले यासंबंधीचा उल्लेख पुढे येत आहे.

३०. विकणारे हेच काफिले वाले होते व मिस्र देशी नेऊन त्यांनी यूसुफला विकले होते. त्यांना कल्पनाहि नव्हती की केवढे महान व्यक्तिमत्व आपल्या हाती लागले आहे. म्हणून त्यांनी चांदीच्या काही शिक्क्यांच्या बदली हज़रत यूसुफला विकून टाकले.

बायबलचे निवेदन गोंधळात टाकणारे आहे. त्यात हे सांगितले गेले आहे की यूसुफला विहीरीतून तर काफिला वाल्यांनी बाहेर काढले पण तेथे यूसुफचे भाऊ हजर होते व त्यांनी वीस दिरहम किंमत वसूल केली होती. तथापि ही गोष्ट ना क़ुरआनाच्या निवेदनानुसार आहे ना तर्कशुद्ध.

३१. अर्थात काफिला वाल्यांना याबाबत कसलेहि स्वारस्य नव्हते की या गुलामाचे उचित मूल्य त्यांना लाभावे कारण हा गुलाम त्यांना फुकटात गवसला होता.

**हज़रत यूसुफ हज़रत याकूब यांच्या नयनांचा तारा व त्यांचा जीव कि प्राण होते कारण ते जाणून होते की हजरत यूसुफसारखे व्यक्तिमत्व जगात क्वचितच निर्माण होते.**

**''हजारो साल नरगीस अपनी बे नूरी पे रोती है**
**बड़ी मुश्किल से होता है चमन में दीदावर पैदा''**

**अर्थः सहस्त्रवधि वर्ष 'नरगीस' पुष्प आपल्या निस्तेजपणावर अश्रु ढाळीत असते. तेव्हा महत्प्रयासाने त्याची पारख करणारा बागेत निर्माण होतो.**

आणि जेव्हा तो आपल्या परिपक्वतेस पोहचला, तेव्हा आम्ही त्याला 'हुकम' (निर्णय-शक्ति) व ज्ञान प्रदान केले. सदाचाराचे वर्तन अंगिकारणाऱ्यांना आम्ही अशाच प्रकारे मोबदला प्रदान करतो.(अल-कुर्आन)

२१. आणि मिस्रच्या ज्या माणसाने याला विकत घेतले होते, तो आपल्या पत्नीला म्हणाला याला मान-प्रतिष्ठेसह राख[३२] नवल नव्हे की हा आमच्या करीता लाभदायक सिद्ध व्हावा किंवा याला आम्ही पुत्र बनवावे. [३३] अशा प्रकारे आम्ही यूसुफचे पाय त्या भूमीवर स्थिरवले [३४] व (ही कसोटी अशासाठी घेतली) की त्याला गोष्टींची हकीगत माहित करणे शिकवावे. [३५]अल्लाह आपला आदेश लागू केल्याखेरीज राहात नाही, तथापि बहुतेक लोक जाणत नाहीत.[३६]

وَقَالَ الَّذِي اشْتَرَاهُ مِن مِّصْرَ لِامْرَأَتِهِ أَكْرِمِي مَثْوَاهُ
عَسَىٰ أَن يَنفَعَنَا أَوْ نَتَّخِذَهُ وَلَدًا ۚ وَكَذَٰلِكَ مَكَّنَّا لِيُوسُفَ
فِي الْأَرْضِ وَلِنُعَلِّمَهُ مِن تَأْوِيلِ الْأَحَادِيثِ ۚ وَاللَّهُ غَالِبٌ
عَلَىٰ أَمْرِهِ وَلَٰكِنَّ أَكْثَرَ النَّاسِ لَا يَعْلَمُونَ ﴿٢١﴾

२२. आणि जेव्हा तो आपल्या परिपक्वतेस पोहचला, [३७] तेव्हा आम्ही त्याला 'हुकम' (निर्णय-शक्ति) व ज्ञान प्रदान केले. सदाचाराचे वर्तन अंगिकारणाऱ्यांना आम्ही अशाच प्रकारे मोबदला प्रदान करतो.[३८]

وَلَمَّا بَلَغَ أَشُدَّهُ آتَيْنَاهُ حُكْمًا وَعِلْمًا ۚ
وَكَذَٰلِكَ نَجْزِي الْمُحْسِنِينَ ﴿٢٢﴾

२३. आणि ज्या स्त्रीच्या घरात तो होता ती त्याला आपल्याकडे आकृष्ट करु लागली [३९] तिने दरवाजे बंद केले व म्हणाली ये ! तो (यूसुफ) म्हणाला, अल्लाह रक्षण करो ! तो माझा पालनकर्ता आहे त्याने मला चांगले स्थान प्रदान केले आहे. कुकर्मी लोक कधीही सफलता प्राप्त करीत नाही.[४०]

وَرَاوَدَتْهُ الَّتِي هُوَ فِي بَيْتِهَا عَن نَّفْسِهِ وَغَلَّقَتِ الْأَبْوَابَ
وَقَالَتْ هَيْتَ لَكَ ۚ قَالَ مَعَاذَ اللَّهِ ۖ إِنَّهُ رَبِّي أَحْسَنَ مَثْوَايَ ۖ
إِنَّهُ لَا يُفْلِحُ الظَّالِمُونَ ﴿٢٣﴾

२४. स्त्री ने तर या गोष्टीचा निश्चय केलाच होता आणि त्यानेहि या गोष्टीचा इरादा केला असता, जर आपल्या पालनकर्त्याची निशाणी पाहिली नसती. [४१] हे अशासाठी झाले की आम्ही दुष्कर्म व निर्लज्जतेस त्याच्यापासून दूर राखावे [४२] निःसंशय तो आमच्या खास दासांपैकी होता. [४३]

وَلَقَدْ هَمَّتْ بِهِ ۖ وَهَمَّ بِهَا لَوْلَا أَن رَّأَىٰ بُرْهَانَ رَبِّهِ ۚ
كَذَٰلِكَ لِنَصْرِفَ عَنْهُ السُّوءَ وَالْفَحْشَاءَ ۚ
إِنَّهُ مِنْ عِبَادِنَا الْمُخْلَصِينَ ﴿٢٤﴾

२५. आणि दोघेहि दरवाज्याकडे धावले आणि स्त्री ने यूसुफचा अंगरखा मागच्या बाजूने फाडला व दोघांनीहि स्त्रीच्या पतीस दरवाज्यावर हजर असलेले पाहिले- ती म्हणू लागली, अशा माणसा करीता कोणती शिक्षा आहे, जो तुमच्या पत्नीशी कुकर्माचा इरादा करील, याखेरीज की त्याला कैद केले जावे किंवा एखादी दुःखदायक शिक्षा दिली जावी ?[४४]

وَاسْتَبَقَا الْبَابَ وَقَدَّتْ قَمِيصَهُ مِن دُبُرٍ وَأَلْفَيَا
سَيِّدَهَا لَدَى الْبَابِ ۚ قَالَتْ مَا جَزَاءُ مَنْ أَرَادَ
بِأَهْلِكَ سُوءًا إِلَّا أَن يُسْجَنَ أَوْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٢٥﴾

३२. काफिला मिस्त्रकडे जात होता म्हणून आपल्यासोबत यूसुफलाहि त्यांनी मिस्त्रकडे नेले व तेथे त्यांना गुलाम म्हणून विकले. मिस्त्र देशात ज्या माणसाने हज़रत यूसुफला खरेदी केले तो शासनाच्या उच्च पदावर होता. बायबल मध्ये याचे नाव फोतीफार असे आहे व त्यास मिस्त्र च्या बादशहाचा एक अधिकारी व संरक्षक दलाचा उच्चाधिकारी म्हटले गेले आहे. कुरआनात पुढील निवेदनानुसार याच्याकरीता अजीज ही उपाधि वापरली गेली आहे. यूसुफला पाहताच त्यांनी ताडले की हा एखाद्या सभ्य व कुलीन घराण्याचा मुलगा आहे जो संकट ग्रस्त होऊन येथे पोहचला आहे. मुलगा अत्यंत बुद्धिमान, चारीत्र्यशील व विश्वासपात्र आहे म्हणून तो आपल्या पत्नीस म्हणाला की याच्याशी गुलामांसारखा व्यवहार करु नकोस किंबहुना त्याला मान सन्मानाने राख.

३३. अधिकाऱ्याला माणसाची पारख होती म्हणून हज़रत यूसुफ यांची कदर त्याने जाणली व संभवत तो नि:संतान होता म्हणून त्याने हा विचारहि बोलून दाखवला की शक्यतो आम्ही याला आपला पूत्र मानावे.

३४. सर्वश्रेष्ठ अल्लाहची योजना अशी होती की हज़रत यूसुफ यांना मिस्त्र देशाचा शासक बनवावे या उद्दिष्टाकरीता हे आवश्यक होते की त्यांना मिस्त्रच्या नागरी जीवनाचा अनुभव व्हावा. सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी उपाय योजना केली की मिस्त्र देशात त्याचे पाय रोवले व एका उच्चाधिकाऱ्याच्या घरात राहून त्यांना या अनुभवाची चांगली संधी लाभली.

३५. अर्थात हज़रत यूसुफ ना कसोटीतून पार पाडण्यात सर्वश्रेष्ठ अल्लाहची मर्जी ही होती की त्यांच्यात असा गुणधर्म यावा जो गोष्टीच्या मूळाप्रत पोहचण्यास व खरी हकीगत जाणून घेण्यास आवश्यक आहे. परिस्थितीचे धक्के माणसाला खोलवर जाण्यास विवश करतात. आणि जेव्हा तो खोलवर जातो तेव्हा त्याची ओंजळ मोत्यांनी भरते.

३६. ही एक इन्कार न करण्यायोग्य वस्तुस्थिती आहे आणि येथे तिचे वर्णन करण्याचा हेतु एक तर हे स्पष्ट करणे होय की यूसुफ करीता मत्सर करणाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध इहलोकीय व आखीरतीय सद्भाग्यांची द्वारे उघडत गेली तर दुसरीकडे हा संकेत करणे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविषयी सर्वश्रेष्ठ अल्लाहची जी योजना आहे ती कशाहि परिस्थितीत लागू होईल आणि ती लागू होण्यास ना कुरेश रोखू शकतात ना अन्य एखादे सामर्थ्य.

३७. परिपक्वेतस اشد पोहचण्याशी अभिप्रेत तारुण्यावस्थेस पोहचणे होय हा अठरा-वीस वर्षे वयाचा काळ असतो जेव्हा चांगल्या प्रकारे सूज्ञता निर्माण होते. सूरह अनआम आयत क्र. १५२ मध्ये 'अशुद्द' اشد हा शब्द याच अर्थाने वापरला गेला आहे.

३८. 'हुकम'शी अभिप्रेत निर्णय-शक्ति होय आणि ज्ञानाशी अभिप्रेत अंतर्दृष्टिचा प्रकाश होय या गोष्टी हज़रत यूसुफना प्रेषित्वापूर्वी तारुण्यावस्थेस पोहचल्यावर प्राप्त झाल्या होत्या आणि हे सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे त्यांच्या सदाचाराचा त्वरीत मोबदला होता जो त्यांना मिळाला. या प्रसंगी सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या या नियमाचा उल्लेख केला आहे की जे लोक सादचाराचे वर्तन अंगिकरतात म्हणजे ईश्वराचा दास होण्याच्या नात्याने आपल्या जबाबदारीना चांगल्या प्रकारे अदा करतात व आपल्या अंतर्यामी चांगल्या गुणांना वाढीस लावतात त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह खरा निर्णय घेण्याची शक्ति प्रदान करतो व त्याच्या कार्याकरीता जी अंतर्दृष्टी अपेक्षित आहे ती देऊन उपकृत करतो. सदाचाराचा हा मोबदला माणसाला त्याच्या दर्जा अनुसार या जगातच लाभतो.

३९. बायबलच्या निवेदनानुसार हज़रत यूसुफ फार देखणे व सुंदर होते (उत्पत्ति ३९:६ ) तात्पर्य सर्वश्रेष्ठ अल्लाहने शारीरिक व नैतिक दोन्ही प्रकारचे सौंदर्य प्रदान केले होते. हजरत यूसुफ यांना मिस्त्रच्या अजीजने अपल्या घरी ठेवले होते व आपल्या घराचा व्यवस्थापक बनवून सर्व काही त्यांना सोपवले होते (उत्पत्ति ३९:२ ते ४) अजीज ची पत्नी हज़रत यूसुफ वर मुग्ध झाली व एक दिवस संधी लाभताच त्यांना आपल्या प्रेम-पाशात तिने बांधू इच्छिले.

स्पष्ट असावे की यूसुफ-सौंदर्याचे जे सर्वसामान्य किस्से प्रसिद्ध आहेत ते मोठ्या अतिशयोक्ति वर आधारीत व केवळ काल्पनिक आहेत. आणि जर हे सौंदर्य असे असते जे जगात कोणालाच प्रदान केले गेले नसावे तर क़ुरआनाने याचा निश्चित उल्लेख केला असता तथापि क़ुरआनात सुरवातीपासूनच या संबंधीचा उल्लेख नाही. उलट क़ुरआनने हज़रत यूसुफच्या उत्कृष्ट चारित्र्यास व्यक्त केले आहे जे या वृत्तांताचे खरे उद्दिष्ट होय. वस्तुत:कथा-प्रिय स्वभाव यास कथेच्या रुपात पाहू इच्छितो. यास्तव त्यांनी हज़रत यूसुफच्या या वृत्तांतास ज्यास क़ुरआनाने अगदी निरखून पारखून सादर केले होते, 'यूसुफ व जुलेखा' चा किस्सा बनवून टाकले.

४०. अज़ीज़च्या पत्नीने एकदिवस संधी साधून घराचे दरवाजे बंद केले व यूसुफला उघडपणे कुकर्माचे आमंत्रण दिले परंतु हज़रत यूसुफ साक्षात सभ्याता होती. ते कशा प्रकारे आपल्या चारित्र्यास डागाळू करू शकत होते. तत्क्षणी त्यांनी उत्तर दिले, अल्लाह रक्षण करो मी हे कृत्य कसे करु शकतो माझ्या पालनकर्त्याने मला चांगले स्थान प्रदान केले आहे. हे सांगण्यात यूसुफला हे अभिप्रेत होते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना आपल्या खास कृपेने उपकृत केले आहे. त्यांना प्रेषित-पूत्र असण्याचा मान दिला, पावलो पावली त्यांचे मार्गदर्शन व मदत केली. मिस्त्र देशात त्यांना चांगली प्रतिष्ठा दिली, ज्ञान व

अंतर्दृष्टीचा प्रकाश दिला चारित्र्याच्या उच्च पदावर विराजमान केले आणि सत्शीलता व लज्जा करीता असा संवेदनशील स्वभाव प्रदान केला की त्यांच्या उच्च व्यक्तिमत्वास कोणाच्याहि प्रशिक्षणाची गरज उरत नाही.

हज़रत यूसुफ यांच्या म्हणण्याचा हेतु हा होता की ज्या हस्तीने मला हे उच्च स्थान प्रदान केले आहे. मी त्याच्याशी कृतघ्न होऊन स्वत:ला त्याचा अपात्र ठरवू ? जर मी तुमच्या बहकविण्यात येऊन निर्लज्जतेचे काम केले तर कुकर्मी व अत्याचारी ठरेन व अत्याचारीबाबत विदीत आहे की ते कधीहि सफल होत नाहीत. जगात त्यांच्या करीता अपमान आहे व आखिरत मध्ये त्यांना सक्त शिक्षा. विचार करा, हज़रत यूसुफ यांचे उत्तर किती संक्षिप्त पण केवढे तर्कसंगत होते व त्यातल्या प्रत्येक शब्दाने कशा प्रकारे ईश-भय व आखिरतविषयीची जाणीव व्यक्त होत होती.

स्पष्ट असावे की सर्वसामान्यत: भाष्यकार या आयतीत اِنَّهٗ رَبِّىۡ ''तो माझा रब्ब (स्वामी) आहे'' चा अर्थ असा निवेदन करतात की ही गोष्ट त्यांनी आपल्या मालका (अजीजे मिस्र) बद्दल म्हटली होती तथापि शब्द कोषात पारंगत विद्वान ज़ज्जाज असे म्हणता की यात ہٗ 'हू' (तो) हे सर्वनाम अल्लाह ला उद्देशुन अहे (फतहुल् कदीर खण्ड ३ पृष्ठ १७) अर्थात ही गोष्ट हजरत यूसुफ यांनी अल्लाह विषयी सांगितली होती की तो माझा 'रब्ब' (स्वामी) आहे, त्याने मला चांगले स्थान प्रदान केले आहे. आम्ही यांच्या कथनाशी सहमत आहोत कारण प्रथमالله तर ہٗ 'हू' (तो) हे सर्वनाम आपल्या जवळचा शब्द 'अल्लाह' कडे परतविण्या ऐवजी मिस्रच्या अजीजकडे परतविण्यास काही एक कारण नाही. वस्तुत: अजीज चा या आयतीत कसलाहि उल्लेख नाही. दुसरे हे की पुढे आयत क्र. २५ मध्ये मिस्रच्या अजीज करीता त्याच्या पत्नीच्या संबंधाने سَيِّدَهَا 'सय्यिदहा' (तिचा स्वामी) हा शब्द वापरला गेला आहे. तिथेहि कुरआनने मिस्रच्या अजीज करीता رَبَّهَا 'रब्ब'हा शब्द वापरला नाही, वस्तुत: लाक्षणिक अर्थाने 'तिचा रब्ब'हा शब्द वापरला जाऊ शकत होता. तिसरे हे की कुरआनात असे कोणतेहि उदाहरण नाही की एखाद्या बंदीने एखाद्या माणसाला लाक्षणिक अर्थान رَبِّىۡ माझा 'रब्ब' म्हटले असावे.चौथे हे की या वाक्याचे तीन अंश आहेत व तीन्ही परस्पर सुसंगत आहे पहिला अंश 'अल्लाह रक्षण करो' हा आहे ज्यात ईश भय व्यक्त आहे. दुसरा अंश 'तो माझा रब्ब आहे.' त्याने मला चांगली प्रतिष्ठा प्रदान केली आहे. यात अल्लाहकरीता कृतज्ञतेची अभिव्यक्ति आहे आणि 'कुकर्मी लोक कदापि सफलता प्राप्त करणार नाहीत' यात आखिरतच्या शिक्षा व मोबदल्यावर विश्वासाची अभिव्यक्ति आहे. परंतु 'रब्ब'शी अभिप्रेत अजीज घेण्याच्या स्थितीत या वाक्याचे अंश विसंगत होतात. पाचवे हे की हा प्रसंग ईश्वराच्या उपकारांचा उल्लेख करण्याचा होता, अजीजच्या उपकारांच्या उल्लेखाचा नव्हे. या कारणामुळे सर्वसामान्य भाष्यकारांच्या मताशी सहमत होता येणार नाही.

४१. म्हणजे त्या स्त्रीने तर पाऊल उचलले होते व यूसुफहि तसे करण्यास सरसावला असता जर त्याने आपल्या पालनकर्त्याची निशाणी पाहीली नसती. अर्थात हे की स्त्री ने पुढाकार घेतला असतांनाहि यूसुफला कुकर्मापासून दूर राखणारी गोष्ट अल्लाहची निशाणी होती. निशाणी (बुरहान) शी अभिप्रेत अल्लाहचे ते प्रमाण होय जे हज़रत यूसुफच्या वर उल्लेखिलेल्या वर्णनात समाविष्ट आहे. म्हणजे ही गोष्ट की मनुष्य अपराध करुन अल्लाहच्या पकडीतून सुटू शकत नाही व निशाणीस पाहण्याचा अर्थ तिला अंतर्दृष्टीच्या नेत्रांनी पाहणे व त्यावर विश्वास करणे होय. हज़रत यूसुफ यांना ही अंतर्दृष्टी लाभली होती म्हणून या नाजूक प्रसंगी देखील आपले चारित्र्य कलंकित न होऊ देण्यात यशस्वी झाले.

आयतीच्या ह्या साध्या सरळ अर्थाला सोडून भाष्यकारांच्या एका गटने बिनबुडाच्या कथनांवर विश्वास ठेवून विचित्र गोष्टी लिहिल्या आहेत. उदाहरणार्थ:- यूसुफने याकूबचा किंवा फिरिश्त्याचा चेहरा पाहिला होता, अगदी संकोच आहे व कुरआनाच्या स्पष्ट निवेदानास संदिग्ध बनवून त्यात मुद्दे निर्माण करण्या खेरीज आणखी काहिहि नाही. अशा कथनांनी कुरआनच्या मुळ अर्थावर व उद्देश्यांवर पांघरुण घातले आहे म्हणून सक्तीपूर्वक या गोष्टीचे खंडन आवश्यक आहे. तसेच

وَهَمَّ بِهٖ لَوۡلَاۤ اَنۡ رَّاٰ بُرۡهَانَ رَبِّهٖ

''त्यानेहि इरादा केला असता जर आपल्या पालन कर्त्याचे चिन्ह (बुरहान) पाहिले नसते'' यास काही भाष्यकारांनी अशा कथनांच्या आधारे जी नदीच्या पात्रात टाकण्यायोग्य आहेत. यूसुफकडे कुनिश्चय व काही अशा गोष्टींचा संबंध जोडला आहे, ज्यांचा उल्लेखहि उचित वाटत नाही. परहतु इमाम राजी यांनी जोरदार शैलीत याचे खंडन केले आहे. ज्याचे स्पष्टीकरण असे की, आम्ही हे मान्य करीत नाही की हज़रत यूसुफ यांनी स्त्री विषयी इरादा केला होता आणि या वर प्रमाण अल्लाहचे हे फर्मान होय की

وَهَمَّ بِهَا لَوۡلَاۤ اَنۡ رَّاٰ بُرۡهَانَ رَبِّهٖ

''त्यानेहि इरादा केला असता जर आपल्या पालनकर्त्याची निशाणी पाहिली नसती'' येथे لَوۡلَا 'लवला' (जर) हा शब्द अधीच आला आहे. यावर कोषकारांचा हा आक्षेप की لَوۡلَا 'लौ ला' चे उत्तर अरबी व्यकरण नुसार प्रथम होऊ शकत नाही. योग्य नव्हे कारण काही प्रसंगी एखादी गोष्ट लक्षात घेता 'लौ ला' لَوۡلَا चे उत्तर पुढे राखतात क़ुरआनात याचे उदाहरण

आहे:- اِنۡ كَادَتۡ لَتُبۡدِىۡ بِهٖ لَوۡلَاۤ اَنۡ رَّبَطۡنَا عَلٰى قَلۡبِهَا۔

(القصص: ١٠)

‘जर आम्ही तिच्या मनाला मजबूत केले नसते तर ती (मूसा ची आई) या गोष्टीस उघड करण्याच्या बेतात होती’ (अल् कस्स-१०)

ह्या आयतीतहि لَوۡلَا ‘लौ ला’ चे उत्तर प्रमुख आहे म्हणजे सुरवातीलाच वर्णिले गेले आहे. राहीली कथने तर याची काय हमी की ज्या लोकांनी या भाष्यकारां ( अर्थात सहाबा व ताबईन) पासून हे भाष्य उल्लेखित केले आहे ते प्रमाणिक होते?

४२. हज़रत यूसुफ यांचे चारित्र्य खोट्या कर्मापासून स्वच्छ शुद्ध आहे व तो हराम निश्चयापासून अगदी मुक्त आहे. संशोधक, भाष्यकार व मीमांसकांचे हे कथन आहे आणि आम्ही सुद्धा हेच सांगतो (पहा- अत्तफसीरूल कबीर खंड १८ वा पृ. ११५ ते १३०)

वास्तविक हे की क़ुरआनने या नाजूक प्रसंगाचा उल्लेख ज्या प्रकारे केला आहे त्यात यूसुफच्या एखाद्या मामुली चुकीकडेहि संकेत नाही. जर त्यांच्या हातून असे काही घडले असते तर त्यांच्या तौबा (क्षमा-यानचे) चाहि उल्लेख झाला असता, परंतु जेव्हा क़ुरआनात असले काही निवेदन नाही तर अशा स्थितीत या भाष्य-कथनांचे आपोआप खंडन होते जे कुरआनच्या निवेदनाशी अनुकूलता राखीत नाही.

हज़रत यूसुफ यांनी आपल्या सत्शीलतेचे असे आदर्श उदाहरण कायम केले ज्याचा उल्लेख पैगंबर-वचनात अशा प्रकारे आला आहे:-

‘सात माणसे अशी आहेत ज्यांच्यावर सर्वश्रेष्ठ अल्लाह कियामतीच्या दिवशी आपली कृपा-छाया करील. यांच्यात एक मनुष्य असा असेल की ज्याला श्रेष्ठ व सुंदर स्त्री ने कुकर्माचे आमंत्रण दिले परंतु त्याने उत्तर दिले, मी अल्लाहचे भय बाळगतो.’ (बुखारी किताबुल अजान)

४३. म्हणजे तो आमच्या मान्यवर दासांपैकी होता.

४४. हज़रत यूसुफ दरवाज्याकडे अशासाठी धावले की स्वत:ला या उपद्रवापासून वाचवावे, परंतु अजीजची पत्नी अशासाठी धावली की त्यांना दरवाजा उघडू न द्यावा व कुकर्माकरीता विवश करावे यास्तव तिने यूसुफचा अंगराखा पाठीमागून एवढ्या जोराने खेचला की तो फाटला, तथापि यूसुफ दरवाजा उघडण्यात सफल झाले. संयोगवश त्याचवेळी दरवाज्यावर अजीज हजर होता. त्याला पाहून त्याच्या पत्नीचे तोंडचे पाणीच पळाले व आपल्या कुकर्मावर आवरण घालण्यासाठी त्वरीत यूसुफवर आरोप ठेवला.

قَالَ هِيَ رَاوَدَتْنِي عَنْ نَّفْسِي وَشَهِدَ شَاهِدٌ مِّنْ أَهْلِهَا
إِنْ كَانَ قَمِيصُهُ قُدَّ مِنْ قُبُلٍ فَصَدَقَتْ
وَهُوَ مِنَ الْكَٰذِبِينَ ﴿٢٦﴾

२६. यूसुफ म्हणाला, हिनेच मला रिझवण्याचा प्रयत्न केला [४५] आणि त्या स्त्रीच्या कुटुंबियांपैकी एका साक्षीदाराने साक्ष दिली की जर याचा अंगरखा पुढच्या बाजूने फाटला आहे तर स्त्री खरी आहे व तो खोटारडा आहे.

وَإِنْ كَانَ قَمِيصُهُ قُدَّ مِنْ دُبُرٍ فَكَذَبَتْ وَهُوَ مِنَ
الصَّٰدِقِينَ ﴿٢٧﴾

२७. आणि जर त्याचा अंगरखा मागच्या बाजूने फाटला आहे तर स्त्री खोटारडी आहे व तो सच्चा आहे. [४६]

فَلَمَّا رَأَىٰ قَمِيصَهُ قُدَّ مِنْ دُبُرٍ قَالَ إِنَّهُ مِنْ
كَيْدِكُنَّ ۖ إِنَّ كَيْدَكُنَّ عَظِيمٌ ﴿٢٨﴾

२८. जेव्हा त्याने असे पाहिले की त्याचा (यूसुफ चा) अंगरखा मागच्या बाजूने फाटला आहे तेव्हा म्हणाला, हे तुम्हा स्त्रीयांचे कारस्थान होय व तुम्ची कारस्थाने महाभयंकर असतात.[४७]

يُوسُفُ أَعْرِضْ عَنْ هَٰذَا ۚ
وَاسْتَغْفِرِي لِذَنْبِكِ ۖ إِنَّكِ كُنْتِ مِنَ الْخَاطِئِينَ ﴿٢٩﴾

२९. हे यूसुफ!जाऊ दे या गोष्टीला आणि हे स्त्रीये ! तू आपल्या आपराधाची माफी माग, वस्तुत:तूच अपराधी आहेत.[४८]

وَقَالَ نِسْوَةٌ فِي الْمَدِينَةِ امْرَأَتُ الْعَزِيزِ تُرَاوِدُ فَتَاهَا
عَنْ نَّفْسِهِ ۖ قَدْ شَغَفَهَا حُبًّا ۖ إِنَّا لَنَرَاهَا
فِي ضَلَٰلٍ مُّبِينٍ ﴿٣٠﴾

३०. आणि शहरातील काही स्त्रीया म्हणू लागल्या 'अजीज'ची पत्नी आपल्या गुलामास रिझविण्यात मग्न आहे. त्याच्या प्रेमाने तिच्या मनात ठाण मांडले आहे.आमच्या मते ती स्पष्टत: वाम मार्गाला लागली आहे.[४९]

فَلَمَّا سَمِعَتْ بِمَكْرِهِنَّ أَرْسَلَتْ إِلَيْهِنَّ وَأَعْتَدَتْ لَهُنَّ مُتَّكَأً
وَآتَتْ كُلَّ وَاحِدَةٍ مِّنْهُنَّ سِكِّينًا وَقَالَتِ اخْرُجْ عَلَيْهِنَّ ۖ فَلَمَّا
رَأَيْنَهُ أَكْبَرْنَهُ وَقَطَّعْنَ أَيْدِيَهُنَّ وَقُلْنَ حَاشَ لِلَّهِ مَا هَٰذَا بَشَرًا
إِنْ هَٰذَا إِلَّا مَلَكٌ كَرِيمٌ ﴿٣١﴾

३१. तिने ('अजीज' च्या पत्नीने ) जेव्हा त्यांच्या ह्या कपटपूर्ण गोष्टी ऐकल्या तेव्हा त्यांना बोलवणे पाठविले [५०] व त्यांच्याकरीता तकीये-लोड असलेली बैठक सुशोभित केली व प्रत्येकीला एक एक सुरी दिली [५१] आणि यूसुफला म्हणाली, यांच्या समोर बाहेर या-जेव्हा त्या स्त्रीयांनी यूसुफला पाहिला तेव्हा त्या त्याच्या श्रेष्ठत्याने प्रभावित झाल्या व आपापल्या हातांना जखमी करुन बसल्या व उद्गारल्या, अल्लाह सर्व व्यंग-दोषा पासून अलिप्त आहे ! हा मनुष्य नव्हे किंबहुना हा एक थोर फिरिश्ता होय.[५२]

४५. हज़रत यूसुफ यांनी अत्यंत सभ्य शैलीत संक्षिप्त उत्तर दिले जी त्यांची निरपराधीला जाहीर करण्यास पुरेशी आहे व या गोष्टीचेहि उदाहरण होते की

"पाक दामानी हरीफे चाक दामानी नहीं"

४६. दोघांचे निवेदन भिन्न होते व घटनेचा कोणी प्रत्यक्ष दर्शी साक्षी नव्हता म्हणून स्त्रीच्या नातेवाइकांपैकी व्यवहार ज्ञान बाळगणाऱ्या माणसाने परिस्थितीजन्य साक्ष (Circumstantial Evidance)दिली की जर यूसुफचा अंगरखा पुढच्या बाजूने फाटला आहे तर हे या गोष्टीचे लक्षण होय की स्त्री यूसुफ मागे लागली होती व जेव्हा तो स्वत:ला वाचविण्याकरीता धावू लागला तेव्हा स्त्री ने मागून त्याचा अंगरखा खेचला. या गोष्टीला, जी चिन्ह व लक्षणाच्या आधारावर सांगितली गेली, क़ुरआनने 'साक्ष' या अर्थाने घेतले ज्यावरुन हे मार्गदर्शन लाभते की दाव्याच्या मामलात परिस्थितीची साक्ष (Circumstantial Evidance)म्हणजे चिन्ह व लाक्षणांनी उघड होणाऱ्या गोष्टींचेहि एक स्थान आहे.

४७. अंगरखा पाठीमागून फाटणे ही या गोष्टीची साक्ष होती की हा प्रयत्न हजरत यूसुफ यांच्यातर्फे झाला नव्हता म्हणून मिस्त्रच्या अजीज ने आपल्या पत्नीलाच दोषी ठरविले व तिने हजरत यूसुफ यांच्यावर जो आरोप ठेवला होता त्यास एक स्त्री-कारस्थान व धूर्तता ठरविले. याप्रसंगी अजीजने सर्व सामान्यत: असे फर्माविले की तुम्हा स्त्रीयांची कारस्थाने मोठी भयंकर असतात. यांचा अर्थ असा की स्त्रीया जेव्हा एखाद्या माणसाला आपल्या प्रेम-पाशात अडकवू इच्छितात तेव्हा महाभयंकर खेळ खेळतात. स्वत:चूक करुन आरोप दुसऱ्याच्या माथी ठेवतात कारण त्यांना आपल्या अंगी असलेले अवगुण दिसून येत नाही व ना आपल्या अपराध कबूल करण्याचे धैर्य त्यांना असते. अर्थात सर्वच स्त्रीया अशाच असतात असे मुळीच नाही. किंबहुना येथे अभिप्रेत अशाच स्त्रीया होत ज्यांची विचारसरणी चुकीची असते कारण अशा प्रकारच्या घटना यांच्याच हातून घडतात.

४८. अजीज ने आपल्या पत्नीस दोषी तर ठरविले परंतु तिच्या विरुद्ध एखादी कारवायी करण्याची त्यांच्या अंगी हिंमत नव्हती तसेच अपल्या पत्नीच्या बदनामीचेहि त्याला भय होते म्हणून तो यूसुफला म्हणाला की जाऊ दे ह्या गोष्टीला.

४९. जेव्हा शहरात या घटनेची चर्चा होऊ लागली तेव्हा काही स्त्रीयांनी याबाबत आश्चर्य व्यक्त करीत म्हटले, ही मिस्त्र देशीय स्त्री, जी एका उच्चाधिकाऱ्याची पत्नी आहे आणि कोठे तो किनआनी गुलाम ज्यावर ती आसक्त झाली आहे. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की या गुलामला काय हिरे माणके जडली आहे की ज्यामुळे त्याला अभिलाषेचे लक्ष्य बनविण्याकरीता विवश करीत आहे. धन वैभव सर्व काही बाळगून असतांनाहि आपला हव्यास पूर्ण करण्यासाठी ती अन्य साधनांचा अवलंब करु शकत नाही काय?

५०. अर्थात जेव्हा अजीजच्या पत्नीने असे ऐकले की स्त्रीया तिच्या विरुद्ध गोष्टी रचीत आहेत तेव्हा त्याच्या उत्तरा दाखल तिने हा कावा केला की त्या सर्वांना घरी बोलावून घेतले.

५१. हे आमंत्रण औपचारीक होते व मोठ्या इतमामाने दिले गेले होते. त्या काळी मिस्त्र एक सुसंस्कृत देश होता म्हणून तत्कालीन प्रथेनुसार तकीये-लोड लावलेली बैठक सुशोभित केली गेली आणि पाहूणचारा साठी ज्या वस्तू सादर केल्या गेल्या त्यांच्या समवेत सूऱ्या पण ठेवल्या गेल्या अशासाठी की त्यांनी फळे आपल्या हातांनी कापून खावीत. (अरब लोकांमध्ये आज देखील ही प्रथा आहे की ते पाहुण्यामंडळी समोर अख्खी फळे ठेवतात व सोबत सूरी देखील, यासाठी की अतिथीने आपल्या इच्छेनुसार फळ कापून खावे)

५२. हजरत यूसुफ गुलामाच्या स्वरुपात होते म्हणून स्त्रीयांच्या त्या बैठकीत त्यांना बाहेर येण्याचा जो आदेश दिला गेला, त्याचे पालन करणे अनिवार्य होते, तथापि अशा प्रसंगीहि त्यांनी ईश-भयाला कवटाळून धरले. या बैठकीत भाग घेणाऱ्या स्त्रीया उघड आहे श्रीमंत व सरदारांच्या घरातील स्त्रीया असतील व ह्या भडक बैठकी करीता चांगल्या नटून-थटून आल्या असतील, परंतु यूसुफ त्यांच्यासमोर अशा सभ्यपणाने आले की त्यांच्याकडे चुकीच्या नजरेने सुद्धा पाहिले नाही. त्यांचे बाह्य सौंदर्य त्यांच्या आंतरिक सौंदर्याचा व त्यांचा सुंदर चेहरा त्यांच्या सुंदर चारित्र्याचा पारदर्शक होता जणू यूसुफच्या सौंदर्याने यूसुफच्या श्रेष्ठत्वाचे रुप धारण केले म्हणून जेव्हा बैठकीतल्या स्त्रीयांनी त्यांना पाहिले तेव्हा एका महान व्यक्तिमत्वाची झळक त्यांच्या चेहऱ्यावर दिसून आली व त्या अशा प्रभावित झाल्या की तत्क्षणी उद्गारल्या, हा मनुष्य नव्हे,किंबहुना थोर गुणसम्पन्न फिरिश्ता आहे. त्यांचे हे कथन त्यांच्या विवेकाची साद होती म्हणून अनावधनाने त्यांच्या मुखातून निघाले आणि हजरत यूसुफ यांचा सौंदर्यपूर्ण व प्रतिष्ठापूर्ण चेहऱ्यास पाहून अशा बेभान झाल्या की फळ कापण्याचे सोडून आपल्या हातांनाच जख़्मी करुन घेतले. वस्तुत: ही स्वाभाविक शिक्षा होती जी त्यांना त्यांच्या वाईट हेतुपायी त्वरीत मिळाली. त्यांची ही बैठक एखाद्या चांगल्या उद्दिष्टासाठी नियोजित केली गेली नव्हती, किंबहुना यामागे एक कारस्थान होते जे हजरत यूसुफ यांच्या विरुद्ध रचले गेले होते. ही गोष्ट आयतींच्या मधल्या ओळीवरुनहि स्पष्ट होते व पुढे आयत क्र.३३ मध्ये वर्णिल्या प्रमाणे हज़रत यूसुफ यांनी

स्पष्टत: या घटनेस 'कैद' (कारस्थान) या अर्थाने घेतले आहे. हे षड्‌यंत्र अजीजच्या पत्नीने रचले होते व त्यात ह्या स्त्रीयाहि सहभागी होत्या.या बैठकीला सजविण्यामागे अजीजच्या पत्नीचा हेतु हा होता की मला नाव ठेवणाऱ्या या बायकांना या गोष्टीची चांगल्या प्रकारे कल्पना यावी की मी एखाद्या थातुर मातुर गुलामाच्या नादी लागले नाही किंबहुना अशा तरुणाशी प्रेम संधान बांधीत आहे जो ह्या काळातील अद्धितीय आहे. यास्तव मी कसलाही मूर्खपणा केला नाही.त्याचबरोबर ती हे इच्छित होती की,जो अपराध स्वत: करु इच्छिते त्यात ह्या स्त्रीयांनाहि सहभागी करावे अशासाठी की पुन्हा त्यानी याबाबत माझी निंदा करु नये तसेच सर्व स्त्रीयांनी मिळून हजरत यूसुफ यांना आपल्या सौंदर्याने आकर्षित करण्याचा असा प्रयत्न करावा की ज्या योगे त्यांनी भावनाविवश व्हावे.

यावरुन हेहि दिसून येते की त्या काळात मिस्र (इजिप्त) देशाचे वातावरण कशा प्रकारचे होते. महालात राहणाऱ्या बेगमा आपली कामवासना शमविण्यासाठी गुलामांचा वापर करीत कारण त्या काळात घरोघरी गुलाम होते आणि व्यभिचाराचा हा अत्यंत सोपा व सुरक्षित मार्ग होता. या कारणास्तव अजीजची पत्नी व बैठकीतल्या स्त्रीयांद्धारे हजरत यूसुफना आकृष्ट करण्याचा प्रयत्न ही काही नवीन गोष्ट नेव्हती. तथापि हजरत यूसुफ खरे पाहता एखाद्या माणसाचे नव्हे तर ईश्वराचे गुलाम होते म्हणून त्यांनी त्या सर्वांच्या आकांक्षा मातीत मिळविल्या.

*यूसुफ ने दुआ केली. हे माझ्या स्वामी !बंदीवास मला त्या गोष्टीच्या तुलनेने पसंत आहे जिच्याकडे ह्या मला बोलवित आहे आणि जर तु मला यांच्या कारस्थानांपासून वाचवले नाही, तर मी यांच्याकडे आकृष्ट होईन व अज्ञानी लोकांपैकी होईन . (अल-कुर्आन)*

३२. ती म्हणाली हाच तो मनुष्य ज्याच्या बाबतीत तुम्ही माझी निंदा करीत होत्या [५३] मी त्याला! आपल्याकडे आकृष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु तो स्वत:ला वाचवित राहीला [५४] आणि जर हा माझे म्हणणे मानणार नाही तर बंदी केला जाईल व अपमानित होईल.[५५]

قَالَتْ فَذٰلِكُنَّ الَّذِيْ لُمْتُنَّنِيْ فِيْهِ ۭ وَلَقَدْ رَاوَدْتُّهٗ عَنْ نَّفْسِهٖ
فَاسْتَعْصَمَ ۭ وَلَىِٕنْ لَّمْ يَفْعَلْ مَآ اٰمُرُهٗ
لَيُسْجَنَنَّ وَلَيَكُوْنًا مِّنَ الصّٰغِرِيْنَ ﴿٣٢﴾

३३. यूसुफ ने दुआ केली. हे माझ्या स्वामी !बंदीवास मला त्या गोष्टीच्या तुलनेने पसंत आहे जिच्याकडे ह्या मला बोलवित आहेत [५६] आणि जर तु मला यांच्या कारस्थानांपासून वाचवले नाही, तर मी यांच्याकडे आकृष्ट होईन व अज्ञानी लोकांपैकी होइन .[५७]

قَالَ رَبِّ السِّجْنُ اَحَبُّ اِلَيَّ مِمَّا يَدْعُوْنَنِيْٓ اِلَيْهِ ۚ
وَاِلَّا تَصْرِفْ عَنِّيْ كَيْدَهُنَّ اَصْبُ
اِلَيْهِنَّ وَاَكُنْ مِّنَ الْجٰهِلِيْنَ ﴿٣٣﴾

३४. त्याच्या स्वामीने त्याची दुआ कबूल फर्माविले व त्यांच्या कारस्थानापासून त्याला वाचवले [५८] नि:संशय तो सर्व काही ऐकणारा व जाणणारा मनुष्य आहे.

فَاسْتَجَابَ لَهٗ رَبُّهٗ فَصَرَفَ عَنْهُ كَيْدَهُنَّ ۭ
اِنَّهٗ هُوَ السَّمِيْعُ الْعَلِيْمُ ﴿٣٤﴾

३५. त्यांनी स्पष्ट निशाण्या पाहून घेतल्या होत्या, तरीदेखील त्यांचे हेच मत ठरले की याला काही काळ पावेतो बंदीस्त राखावे.[५९]

ثُمَّ بَدَا لَهُمْ مِّنْۢ بَعْدِ مَا رَاَوُا الْاٰيٰتِ لَيَسْجُنُنَّهٗ حَتّٰى حِيْنٍ ﴿٣٥﴾

३६. आणि त्याच्या सोबत अन्य दोन तरुणहि तुरुंगात दाखल झाले [६०] एक म्हणाला (स्वप्नात) काय पाहतो की मी मध पिळीत आहे [६१] दुसरा म्हणाला, मला असे दिसले की मी आपल्या डोक्यावर भाकरी उचलल्या आहेत व पक्षी त्या (भाकरी) खात आहेत [६२]आम्हाला याचा अर्थ सांगा आम्हाला असे दिसून येते की आपण मोठे सदाचारी पुरुष आहात. [६३]

وَدَخَلَ مَعَهُ السِّجْنَ فَتَيٰنِ ۭ قَالَ اَحَدُهُمَآ اِنِّىْٓ اَرٰىنِيْٓ اَعْصِرُ خَمْرًا ۚ
وَقَالَ الْاٰخَرُ اِنِّىْٓ اَرٰىنِيْٓ اَحْمِلُ فَوْقَ رَاْسِيْ خُبْزًا تَاْكُلُ الطَّيْرُ مِنْهُ ۭ
نَبِّئْنَا بِتَاْوِيْلِهٖ ۚ اِنَّا نَرٰىكَ مِنَ الْمُحْسِنِيْنَ ﴿٣٦﴾

३७. यूसुफ म्हणाला, जे भोजन तुम्हला येथे मिळते ते येण्यापूर्वीच मी तुम्हाला याचा अर्थ सांगेन.[६४] हे त्या ज्ञानापैकी होय जे माझ्या स्वामी ने मला शिकविले आहे.[६५] मी त्या लोकांच्या धर्मास रद्द केले [६६] जे अल्लाहवर ईमान बाळगत नाहीत व आखिरतचाहि इन्कार करतात.

قَالَ لَا يَاْتِيْكُمَا طَعَامٌ تُرْزَقٰنِهٖٓ اِلَّا نَبَّاْتُكُمَا
بِتَاْوِيْلِهٖ قَبْلَ اَنْ يَّاْتِيَكُمَا ۭ ذٰلِكُمَا مِمَّا عَلَّمَنِيْ رَبِّيْ ۭ اِنِّىْ تَرَكْتُ
مِلَّةَ قَوْمٍ لَّا يُؤْمِنُوْنَ بِاللّٰهِ وَهُمْ بِالْاٰخِرَةِ هُمْ كٰفِرُوْنَ ﴿٣٧﴾

५३. म्हणजे त्यांना आता कळून चुकले की हा इतर गुलामांसारखा नाही, किंबहुना जिथे तो सौंदर्यरुपी गगनाचा तेजस्वी तारा आहे तिथे एक विशिष्ट व्यक्तिमत्वाचा स्वामीहि आहे म्हणूनच मी त्याला आपल्याकडे आकृष्ट करण्याचा प्रयत्न करुन चूक केली नाही.

५४. त्याचप्रमाणे अजीजच्या पत्नी ने स्त्रीयांच्या त्या भर बैठकीत ती गोष्टहि जाहीर केली जी आतापर्यंत तिने लपवून ठेवली होती. हे अपराध कबूल करणे नव्हते किंबहुना शिरजोरी व उघड अशी निर्लज्जता होती आणि ज्या स्त्रीयां समोर तिने हे जाहीर केले त्या सुद्धा अशाच प्रतीच्या होत्या.

**''ईं गुना हेस्त के दर शहर शुमा नीज़ कुनन्द''**

५५. जेव्हा शृंगाराने नटलेल्या या स्त्रीयांद्वारेहि ती हज़रत यूसुफ यांना आकृष्ट करण्यात असफल झाली तेव्हा सामर्थ्याचा दबाव आणणे सुरु केले व बंदीवासात टाकण्याची धमकी दिली.

५६. म्हणजे बंदीवासातील त्रास चालेल परंतु निर्लज्जतेचे कृत्य करणे व पाप करणे मला पसंत नाही.

५७. अरबी भाषेत जाहील हा शब्द 'आकील' (बुद्धिमान ) या शब्दाच्या विरुद्ध अर्थाने वापरला जातो (लिसानुल् अरब खंड १२ पृ.१३०) येथे ह्याच अर्थाने तो वापरला गेला आहे म्हणजे जे इच्छा व भावनांना बळी पडतात व बुद्धिचा वापर करीत नाही. हजरत यूसुफना आपल्या शुचिर्भूततेचा गर्व नव्हता किंबहुना ते यास अल्लाहची कृपा जाणत म्हणून या नाजुक प्रसंगी त्यांनी अल्लाहच्या मदतीची अपेक्षा बाळगली.

५८. ज्याअर्थी ही दुआ मन:पूर्वक केली गेली होती व स्वच्छ शुद्ध भावनांसह होती म्हणून ढगांना फाडत सरळ आकाशावर पोहचली व ईश-दरबारात स्वीकृत झाली. तेव्हा हजरत यूसुफ यांना अडकविण्यासाठी त्या स्त्रीयांनी जे जाळे पसरवले होते त्यापासून ते सुरक्षित राहीले.

५९. म्हणजे हजरत यूसुफ यांना निर्दोष सिद्ध करणारी सर्व लक्षणे पाहूनहि त्या लोकांनी चांगल्या-वाईटाचा हाच विचार केला की हज़रत यूसुफना एक ठराविक मुदती पावेतो बंदीवासात पाठवावे. अशासाठी की अपराध यूसुफच्याच हातून घडला होता असे लोकांनी समजावे आणि मिस्त्रच्या अजीजच्या पत्नीची जी बदनामी होत आहे, त्यापासून ती सुरक्षित रहावी.

६०. बायबलच्या वर्णनानुसार एक मिस्त्रच्या बादशहाकडे मद्य पाजणाऱ्यांचा नायक होता तर दुसरा भाकरी तयार करणाऱ्यांचा नायक काही अपराधापायी मिस्त्रच्या बादशहाने या दोघांना कैदखान्यात पाठविले होते.

६१. दोघांनी आपापली स्वप्ने सांगितली एकाने (मद्यपाजणाऱ्याने) सांगितले मी स्वत:ला मद्य पिळतांना पाहिले म्हणजे मद्य प्राप्तीच्या हेतुने द्राक्षे पिळतांना पाहिले.

६२. दुसरा मनुष्य ज्याने हे स्वप्न पाहिले होते तो भाकरी तयार करणाऱ्यांचा नायक होता (बायबलचे पुस्तक उत्पत्ति प्रकरण ४० मध्ये ही घटना वर्णिली गेली आहे तथापि एवढ्या खऱ्या रुपात नव्हे जेवढ्या सचोटीने क़ुरआनात वर्णिली गेली आहे.)

६३. त्यांच्या या निवदेनावरुन स्पष्ट झाले की हजरत यूसुफ यांचे चारित्र्य कारागृहातहि उच्च प्रतीचे राहीले व तिथेहि ते सदाचारी पुरुष या नात्यानेच ओळखले गेले.

बायबलच्या वर्णनानुसार:-

''तथापि परमेश्वर योसेफा बरोबर असून त्याने त्याजवर दया केली आणि त्या बंदिशाळेच्या आधिकाऱ्यांची त्याजवर कृपादृष्टि होईल असे केले. बंदिशाळेच्या अधिकाऱ्याने त्या बंदिखान्यात असलेले सर्व बंदिवान योसेफाच्या स्वाधीन केले; आणि येथे जे काही ते करीत, ते करुन घेणारा तो असे त्याच्या स्वाधीन जे काही होते त्याकडे बंदिशाळेचा अधिकारी पाहत नसे. कारण परमेश्वर योसेफा बरोबर होता आणि जे काही तो हाती घेई ते परमेश्वर यशस्वी करी.''

(उत्पत्ति ३९:२१ ते ते २३)

स्वप्नाचा अर्थ उकलण्याची पात्रता केवळ सदाचारी माणसाच्या अंगीच असू शकते या गोष्टीची जाणीव स्वाभाविकपणे होते म्हणून स्वप्न पाहणाऱ्यांनी अर्थ जाणून घेण्यासाठी हज़रत यूसुफ कडे रुजू केले.

६४. हजरत यूसुफ ज्या अर्थी ह्या प्रसंगी त्यांच्या समोर तौहीद (एकेश्वरवादा) चे आवाहन करु इच्छित होते म्हणून त्यांच्या समाधानासाठी त्यांनी हे सांगीतले, यासाठी की त्यांनी असे समजून घेऊ नये की कथन फार लांबले व या अवधित जर भोजनाची वेळ झाली तर त्यांना उठून जावे लागले आणि त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळायचे राहिल.

६५. म्हणजे स्वप्नाचा अर्थ लावण्याचे ज्ञान अल्लाहने प्रदान केले आहे. हजरत यूसुफ यांनी यास आपले नैपूण्य दर्शविले नाही किंबहुना अल्लाहची कृपा या अर्थाने घेतले.

६६. हा संकेत मिस्त्र देशाच्या सत्ताधारी जन समूहाच्या धर्माकडे आहे जो ना अल्लाहच्या एकमेवतेवर विश्वास बाळगत होता व ना आखिरतच्या शिक्षा-मोबदल्यास मानणारा होता. त्यांचा धर्म शिर्क आणि ऐहिक भक्तिचा धर्म होता.

हज़रत यूसुफ हे गुलामाच्या स्वरुपात होते व मिस्त्र देशाचे वातावरण त्यांच्या करीता अगदी नवीन होते असे असले तरी वातावरणाचा कसलाहि प्रभाव स्वत:वर होऊ दिला नाही किंबहुना अंतर्दृष्टि असल्यामुळे अल्लाहच्या सत्य धर्म (इस्लाम) वर कायम राहीले.

३८. आणि आपले वाडवडील इब्राहीम, इसहाक आणि याकूब यांचा धर्म अंगिकारला. [६७] अल्लाह बरोबर एखाद्या वस्तूस (गोष्टीस) सहभागी ठरवावे हे आमचे काम नव्हे. ही अल्लाहची कृपा होय आम्हावर आणि लोकांवर [६८] तथापि बहुतेक लोक आभार मानीत नाहीत.[६९]

وَاتَّبَعْتُ مِلَّةَ اٰبَآءِیْٓ اِبْرٰهِیْمَ وَاِسْحٰقَ وَیَعْقُوْبَ ۭ مَا كَانَ
لَنَآ اَنْ نُّشْرِكَ بِاللّٰهِ مِنْ شَیْءٍ ۭ ذٰلِكَ مِنْ فَضْلِ اللّٰهِ عَلَیْنَا
وَعَلَی النَّاسِ وَلٰكِنَّ اَكْثَرَ النَّاسِ لَا یَشْكُرُوْنَ ۝۳۸

३९. हे तुरुंगातील साथीदारांनो !अनेक भिन्न स्वामी चांगले कि एक अल्लाह जो सर्वांवर प्रभावशाली आहे ?[७०]

یٰصَاحِبَیِ السِّجْنِ ءَاَرْبَابٌ مُّتَفَرِّقُوْنَ
خَیْرٌ اَمِ اللّٰهُ الْوَاحِدُ الْقَهَّارُ ۝۳۹

४०. त्याला सोडून तुम्ही ज्यांची भक्ति (उपासना) करता ती केवळ काही नावे आहेत जी तुम्ही व तुमच्या वाडवडीलांनी ठेवली आहेत.[७१] अल्लाहने त्यांच्याकरीता कोणतेहि प्रमाण अवतरीत केले नाही. शासनाधिकार अल्लाह शिवाय अन्य कोणा करीताहि नाही [७२] त्याने हुकुम दिला आहे की त्याच्या शिवाय अन्य कोणाचीहि उपासना करु नका [७३] हाच खरा धर्म होय [७४] तथापि बहुतेक लोक जाणत नाहीत. [७५]

مَا تَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِهٖٓ اِلَّآ اَسْمَآءً سَمَّیْتُمُوْهَآ اَنْتُمْ
وَاٰبَآؤُكُمْ مَّآ اَنْزَلَ اللّٰهُ بِهَا مِنْ سُلْطٰنٍ ۭ اِنِ الْحُكْمُ اِلَّا لِلّٰهِ ۭ
اَمَرَ اَلَّا تَعْبُدُوْٓا اِلَّآ اِیَّاهُ ۭ ذٰلِكَ الدِّیْنُ الْقَیِّمُ وَلٰكِنَّ اَكْثَرَ
النَّاسِ لَا یَعْلَمُوْنَ ۝۴۰

४१. हे कारागृहातील साथीदारांनो ! तुमच्या पैकी एक जण तर आपल्या मालकास मद्य पाजील व दुसरा सूळावर चढविला जाईल आणि पक्षी त्याचे शिर टोच टोचून खातील. त्या गोष्टीचा निर्णय होऊन गेला ज्या विषयी तुम्ही विचारत होते.[७६]

یٰصَاحِبَیِ السِّجْنِ اَمَّآ اَحَدُكُمَا
فَیَسْقِیْ رَبَّهٗ خَمْرًا ۚ وَاَمَّا الْاٰخَرُ فَیُصْلَبُ فَتَاْكُلُ الطَّیْرُ
مِنْ رَّاْسِهٖ ۭ قُضِیَ الْاَمْرُ الَّذِیْ فِیْهِ تَسْتَفْتِیٰنِ ۝۴۱

४२. आणि ज्याच्या विषयी त्याने जाणले की त्याची सुटका होणार आहे त्याला म्हणाला की आपल्या स्वामींजवळ माझा उल्लेख कर [७७] परंतु सैतानाने त्यास आपल्या स्वामीजवळ उल्लेख करण्यापासून विसर पाडला आणि तो (यूसुफ)-कित्येक वर्षे कारागृहात पडून राहीला. [७८]

وَقَالَ لِلَّذِیْ ظَنَّ اَنَّهٗ نَاجٍ مِّنْهُمَا
اذْكُرْنِیْ عِنْدَ رَبِّكَ ۡ فَاَنْسٰىهُ
الشَّیْطٰنُ ذِكْرَ رَبِّهٖ فَلَبِثَ فِی السِّجْنِ بِضْعَ سِنِیْنَ ۝۴۲ ع

६७. यूसुफच्या ह्या म्हणण्याचा अर्थ असा की जो धर्म मी अंगिकारला आहे तो काही समाजाकडून मिळालेला वारसा नव्हे किंबहुना प्रेषितांकडून लाभलेला वारसा होय. हा धर्म इतिहास घडविणाऱ्या त्या महापुरुषांचा धर्म आहे जे आपल्या सचोटी, शुचिर्भूतता व ईश-भया बाबत प्रसिद्ध आहेत-त्याच बरोबर हजरत यूसुफ यांनी आपला परिचय सुद्धा दिला की ते (स्वत:) ह्याच मौक्तिक-माळेतील एक मोती होय.

६८. अर्थात हा अल्लाहचा फार मोठा उपकार होय की त्याने प्रेषितांद्वारे ह्या एकेश्वरवादी धर्माकडे मार्गदर्शन केले जो स्वभाविक धर्म आहे. त्याचा हा उपकार केवळ प्रेषित वंशावरच नव्हे तर समस्त मानव जातीवर आहे कारण महापुरुष इतस्तत: भटकणाऱ्या मानवांकरीता दीपस्तंभ होते.

६९. कृतज्ञतेचा अर्थ येथे अगदी स्पष्ट आहे म्हणजे एकेश्वरवाद व प्रेषितांच्या धर्माला अल्लाहची कृपा समजून कबूल करणे.

७०. म्हणजे लोकांनी या सृष्टीची वेगवेगळ्या ईश्वरांमध्ये जी विभागणी केली आहे व प्रत्येक सामर्थ्याकरीता एक वेगळा ईश्वर कल्पून त्यांची आराधना करीत आहे ही परिस्थिती केवळ वस्तुस्थितीच्या विपरीतच नव्हे तर माणसा करीता कलेश दायक देखील आहे, की त्याने कोणकोणत्या ईश्वराशी एकनिष्ठ बनून रहावे? कोणकोणत्या ईश्वराला प्रसन्न करावे? याऊलट अल्लाहला एकमेव ईश्वर मानण्याच्या स्थितीत सर्व बौद्धि कलेश नाश पावतात व मनाला खरी शांती लाभते, कारण एका ईश्वराला मानणे म्हणजेच खऱ्या वस्तुस्थितीस मान्य करणे होय-असा ईश्वर की ज्या समोर सृष्टीतील प्रत्येक वस्तू अगतिक आहे, लाचार आहे जो सर्वांवर प्रभावशाली आहे व एकटाच सर्वांवर नियंत्रण राखत आहे.

अनेक ईश्वरांना मानण्याच्या स्थितीत माणसाची निष्ठा विभागली जाते याउलट एका ईश्वरावरील श्रद्धा त्याच्या निष्ठेला आपल्या निर्मात्याकरीता खास ठरवते. एक गुलाम अनेक मालकांच्या गुलामगिरीस कदापि पसंत करीत नाही किंबहुना एकाच मालकाची गुलामी अधिक चांगली जाणतो परंतु एवढी उचित गोष्ट देखील अनेकेश्वरवाद्यांच्या लक्षात येत नाही व ते अनेक विविध ईश्वरांना मानणारे बनतात. तत्कालीन मिस्र (ईजिप्त) देशात जर काही ईश्वरांची आराधना होत होती तर-भारतात असंख्य ईश्वर कल्पिले गेले, दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे भारताचा अनेकेश्वरवादी धर्म प्राचीन ईजिप्तच्या अनेकेश्वरवादी धर्मापेक्षा फार पुढे आहे!

७१. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र.११२ मध्ये केले गेले आहे.

७२. म्हणजे आदेश नैसर्गिक (Physical) स्वरुपाचा असो किंवा शरीअतचा (Shariat Law) असो, समस्त व्यवहारात निर्णय करण्याचा अधिकार केवळ अल्लाहलाच आहे. जेथपावेतो नैसर्गिक विश्वाचा संबंध आहे त्यात अल्लाहचाच हुकुम व त्याचा निर्णय लागू पडतो. त्यात अन्य कोणाचाहि तिळमात्र हस्तक्षेप नाही. राहिला धर्म व शरीअतचा मामला तर यातहि अल्लाहलाच हुकुम देण्याचा, विधिनियम बनविण्याचा व निर्णय देण्याचा अधिकार आहे कारण तोच खऱ्या अर्थान कायदे बनविणारा (Law-giver) आहे आणि या गोष्टीस पात्र आहे की त्यास जीवनाच्या समस्त व्यवहारांमध्ये शासक मानले जावे

وَمَا اخْتَلَفْتُمْ فِيهِ مِن شَيْءٍ فَحُكْمُهُ إِلَى اللَّهِ۔ (سورہ الشوریٰ:١٠)

"ज्या गोष्टीत तुम्ही मतभेद करता, तिचा निर्णय अल्लाहकडेच आहे." (सूरह शूरा-१०)

७३. अल्लाहने हुकुम दिला आहे --------- व हुकुम देण्याचा अधिकारहि त्यालाच आहे ---------- की त्याच्या खेरीज अन्य कोणाचीहि उपासना करु नका. परंतु लोक आदेश देतात -------वस्तुत:आदेश देण्याचा त्यांना काही एक अधिकार नाही --------- की मूर्ति पूजा करा व अल्लाहखेरीज इतर दैवतांची उपासना करा. अल्लाहचा हुकुम पूर्णपणे सत्य आहे व लोकांचा आदेश पूर्णत: खोटा.

७४. म्हणजे उचित व खरा धर्म केवळ एकेश्वरवादी धर्म होय याखेरीज जेवढे धर्म आहेत ते ना योग्य आहेत, ना खरे.

७५. ही गोष्ट हजरत यूसुफ यांनी अशा वेळी फर्माविली जेव्हा संपूर्ण विश्वावर अंध:काराचे सावट पसरले होते तथापि आजच्या विश्वावर देखील, वस्तुत: शिक्षणाचा प्रकाश सर्वत्र पसरला आहे-ही गोष्ट पूर्णत: सिद्ध ठरली आहे कारण जगातील अधिकांश वस्त्या एकेश्वरवादी धर्मापासून अनभिज्ञ आहेत.

हजरत यूसुफ यांचे हे आवाहन जे त्यांनी आपल्या बंदीगृहातील साथीदारांसमोर मांडले, या गोष्टीचे प्रमाण होय की त्यांना कारागृहात प्रेषित्व प्रदान केले गेले होते व त्यांनी धर्म प्रचाराचा प्रारंभ कारागृहातंच केला होता.

७६. त्यांच्या स्वप्नाचा अर्थ हजरत यूसुफ यांनी निश्चितपणे अशासाठी सांगितला की त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने विशेष रित्या याचे ज्ञान प्रदान केले तसेच प्रेषित पदानेहि त्यांचा सम्मान केला गेला होता. स्वप्नांचा अर्थ असा की मद्य पाजणाऱ्यांचा नायक कैदेतून मुक्त झालयावर पूर्वीप्रमाणे बादशहास मद्य पाजण्याची सेवा पार पाडील आणि भाकरी बनविणाऱ्यांच्या नायकास फाशी वर चढवले जाईल व पक्षी त्याचे शिर टोच टोचून खातील. हे भाकित अगदी खरे ठरले.

७७. उल्लेख शी अभिप्रेत हजरत यूसुफ यांचा तो परिचय होय जो ह्या कैदेतून मुक्त होणाऱ्या माणसाला कारागृहात लाभला होता. उपरोक्त आयतींमध्ये स्पष्ट असल्यानुसार या

परिचयात तीन गोष्टींचा समावेश आहे. पहिली, हजरत यूसुफ यांचे सत्शील असणे,दुसरी त्यांच्यातर्फे सादर केले जाणारे एकेश्वरवादी आवाहन व तिसरी स्वप्नाचा अर्थ लावण्याचे ते ज्ञान जे सर्वश्रेष्ठ अल्लाहने विशेषरित्या त्यांना प्रदान केले होते व ज्या नुसार त्यांनी सांगीतलेला स्वप्नार्थ खरा ठरला. यावरुन हजरत यूसुफ यांचा असा हेतु होता की पैगंबराचा परिचय बादशहाला एका अशा माणसाद्वारे व्हावा ज्याला त्याच्या सहवासात राहण्याची व त्याविषयी उचित मन कायम करण्याची संधी लाभली होती अशासाठी की विनाकारण स्वरुपाचा बंदीवास संपावा आणि प्रेषित कर्तव्या (आवाहन व प्रसारा) करीता मार्ग मोकळा व्हावा. हे अत्यंत पवित्र उद्दिष्ट होते म्हणून यावर कसलाहि आक्षेप आला नसता. त्यांनी ना आपल्या अत्याचार पिडीत असण्याची कहाणी ऐकवण्यास सांगितले, ना या कारणास्तव एखाद्या विमनस्क मन:स्थितीचा उद्रेक केला होता. तथापि त्यांनी आपल्या अत्याचार पिडीत असण्याचा उल्लेख बादशहाजवळ करण्यास सांगितले होते असे थोडा वेळ गृहित धरले तर यात आक्षेपार्ह ते काय? अत्याचार पिडीतास न्यायासाठी याचना करण्याचा हक्क नसतो काय? एखाद्या मुस्लिमेतर शासना पासूनहि न्याय-याचना करण्यात शरीअत दृष्ट्या कसलीहि हरकत नाही आणि हजरत यूसुफ यांना बादशहाने कारागृहात पाठविले नव्हते किंबहुना अजीजने पाठविले होते व संभवता बादशहाला या गोष्टी चे ज्ञान नसेल. यास्तव हजरत यूसुफ यांचे हे कथन की ‘बादशहाजवळ माझा उल्लेख कर’ शिफारस करण्याच्या अर्थाने नव्हते किंबहुना सत्य घटनेशी परिचित करण्याच्या अर्थाने होते हे लक्षात घेता हा आरोप येत नाही की हजरत यूसुफ यांनी एखादी अशी गोष्ट म्हटली जी त्यांच्या प्रेषित पदाला साजेशी नव्हती.

यास्तव भाष्यकारांनी काही कथनांचा आधार घेऊन हज़रत यूसुफ यांच्या या गोष्टीस त्यांची चूक गृहीत धरले आहे तथापि ते स्वत: चूकीवर आहेत आणि ती कथने विश्वासाई नाहीत.

७८. म्हणजे सैतानाने त्याला असे गाफील केले की एवढ्या महत्त्वपूर्ण गोष्टीचा उल्लेख तो बादशहा जवळ करु शकला नाही परिणामत: हजरत यूसुफ यांच्या सुटकेचा मार्ग निघू शकला नाही व अणखी काही वर्षे त्यांना तुरुंगात रहावे लागले.

यावरुन असे कळते की एखाद्या महत्त्वपूर्ण गोष्टीचा विसार पाडण्यात सैतानास विशेष सामर्थ्य आहे व तो हे काम मनात कुविचार निर्माण करुन करतो. यावरुन हे ही स्पष्ट होतो की हजरत यूसुफ यांनी बादशहाजवळ उल्लेख करण्यास जे सांगीतले होते ती एक चांगली गोष्ट होती म्हणून सैतानाला ती पसंत पडली नाही व कैदेतून मुक्त होणाऱ्या इसमास त्याने विस्मृतीत टाकले. हजरत यूसुफ यांचे हे कथन जर एक चूक स्वरुप असते तर त्या माणसाचे विसरणे हे चांगले ठरले असते. या स्थितीत त्याच्या विस्मृतीस सैतान जबाबदार ठरविला गेला नसता.

**ते म्हणाले, हे अस्वस्थ स्वप्न आहे आणि आम्ही अशा अस्वस्थ स्वप्नांचा अर्थ लावणे जाणत नाही.आणि त्या दोघांपैकी ज्याची सुटका झाली होती त्याला एका मुदतीनंतर गोष्ट आठवली व तो उद्‌गारला मी तुम्हा लोकांना याचा अर्थ सांगतो मला (यूसुफकडे) पाठवा.(अल-क़ुर्आन)**

४३. आणि बादशहाने म्हटले मी काय पाहतो की सात धष्टपुष्ट गायी आहेत ज्यांना सात दुबळ्या गाई खात आहेत आणि सात हिरवी कणसे आहेत व सात सुकलेली. हे दरबारी लोकांनो ! माझ्या स्वप्नाचा अर्थ सांगा जर तुम्ही स्वप्नाचा अर्थ लावणे जाणत असाल.

وَقَالَ الْمَلِكُ إِنِّي أَرَىٰ سَبْعَ بَقَرَاتٍ سِمَانٍ يَأْكُلُهُنَّ
سَبْعٌ عِجَافٌ وَسَبْعَ سُنبُلَاتٍ خُضْرٍ وَأُخَرَ يَابِسَاتٍ ۖ يَا أَيُّهَا
الْمَلَأُ أَفْتُونِي فِي رُؤْيَايَ إِن كُنتُمْ لِلرُّؤْيَا تَعْبُرُونَ ﴿٤٣﴾

४४. ते म्हणाले, हे अस्वस्थ स्वप्न आहे आणि आम्ही अशा अस्वस्थ स्वप्नांचा अर्थ लावणे जाणत नाही. [७९]

قَالُوا أَضْغَاثُ أَحْلَامٍ ۖ وَمَا نَحْنُ بِتَأْوِيلِ الْأَحْلَامِ بِعَالِمِينَ ﴿٤٤﴾

४५. आणि त्या दोघांपैकी ज्याची सुटका झाली होती त्याला एका मुदतीनंतर गोष्ट आठवली [८०] व तो उद्‌गारला मी तुम्हा लोकांना याचा अर्थ सांगतो मला (यूसुफकडे) पाठवा.

وَقَالَ الَّذِي نَجَا مِنْهُمَا وَادَّكَرَ بَعْدَ أُمَّةٍ أَنَا أُنَبِّئُكُم بِتَأْوِيلِهِ
فَأَرْسِلُونِ ﴿٤٥﴾

४६. हे यूसुफ ! हे सत्यनिष्ठ ![८१] आम्हाला या (स्वप्ना) चा अर्थ सांगा की सात धष्टपुष्ट गायी सात दुबळ्या गायीना खात आहेत आणि सात हिरवी कणसे आहेत व दुसरी सात सुकलेली– यासाठी की मी लोकांजवळ परत जावे व त्यांनी (या स्वप्नाचा ) अर्थ जाणून घ्यावा.[८२]

يُوسُفُ أَيُّهَا الصِّدِّيقُ أَفْتِنَا فِي سَبْعِ بَقَرَاتٍ
سِمَانٍ يَأْكُلُهُنَّ سَبْعٌ عِجَافٌ وَسَبْعِ سُنبُلَاتٍ خُضْرٍ وَأُخَرَ
يَابِسَاتٍ لَّعَلِّي أَرْجِعُ إِلَى النَّاسِ لَعَلَّهُمْ يَعْلَمُونَ ﴿٤٦﴾

४७. तो म्हणाला, सात वर्षापावेतो तुम्ही सतत शेती कराल या अवधित जी पीके तुम्ही कापाल ती त्यांच्या कणसांतच राहू द्या, त्या अत्य प्रमाणाखेरीज जे तुमच्या खाण्यासाठी कामी येईल.[८३]

قَالَ تَزْرَعُونَ سَبْعَ سِنِينَ دَأَبًا فَمَا حَصَدتُّمْ فَذَرُوهُ
فِي سُنبُلِهِ إِلَّا قَلِيلًا مِّمَّا تَأْكُلُونَ ﴿٤٧﴾

४८. मग त्यानंतर सात वर्षे अगदी कठीण येतील, जी तुम्ही जमा करुन ठेवलेल्या संचयास (अन्न साठा) गिळंकृत) करतील त्या थोड्याशा प्रमाणाखेरीज जे तुम्ही सुरक्षित करुन ठेवले असेल. [८४]

ثُمَّ يَأْتِي مِن بَعْدِ ذَٰلِكَ سَبْعٌ شِدَادٌ يَأْكُلْنَ مَا
قَدَّمْتُمْ لَهُنَّ إِلَّا قَلِيلًا مِّمَّا تُحْصِنُونَ ﴿٤٨﴾

४९. मग त्यानंतर एक वर्ष असे येईल ज्यात लोकांकारीता लाभदायक वर्षा होईल व ते रस पिळतील.[८५]

ثُمَّ يَأْتِي مِن بَعْدِ ذَٰلِكَ عَامٌ فِيهِ يُغَاثُ النَّاسُ
وَفِيهِ يَعْصِرُونَ ﴿٤٩﴾

७९. बादशहाच्या स्वप्नाचा अर्थ सांगण्याकरीता ज्या अंतर्दृष्टीची गरज होती ती दरबारी मंडळी पैकी कोणाच्याहि अंगी नव्हती म्हणून जेव्हा हे स्वप्न त्यांच्या ध्यानी आले नाही तेव्हा त्यांनी हे अस्वस्थ स्वप्न असल्याचे सांगितले ज्याचा काही अर्थ नसतो.

स्पष्ट असावे की स्वप्ने तीन प्रकारची असतात एक ते ज्यात अप्रबुद्धता (Sub Conscious) काम करीत असते व दबलेल्या इच्छा-आकांक्षा कोणत्या तरी रुपाने दृग्रोचर होतात किंवा जठर विकारामुळे माणसाला भयानक स्वप्ने पडतात अशा स्वप्नांना उद्विग्न स्वप्ने म्हणतात व त्यांना कसलाहि अर्थ नसतो. दुसरे ते स्वप्न जे सैतानाने उद्युक्त केल्यामुळे पडते अशा स्वप्नांलाहि काही अर्थ नसतो परंतु ते उपद्रव कारक असतात. सैतान स्वप्नात चुकीच्या गोष्टीची खात्री पटवून सदाचाराच्या श्रद्धेला तडा पाडतो. शिर्क व कबरपूजा कडे प्रवृत्त करण्याचा, आपसात गैरसमज निर्माण करण्याचा व पति-पत्निच्या दरम्यान फूट पाडण्याचा प्रयत्न करतो म्हणून माणसाने सावध राहिले पाहिजे व अशा स्वप्नांचा मनावर कसलाहि प्रभाव करुन घेऊ नये.

तिसऱ्या प्रकारची स्वप्ने अगदी सत्य स्वरुपाची असतात. खऱ्या स्वप्नाचे लक्षण असे की माणसाला आपल्या मनात त्याचा प्रभाव जाणवतो. ही स्वप्ने तर कधी अशा प्रकारे पूर्ण होतात की त्यांचा अर्थ लावण्याची गरज भासत नाही. स्वप्नात मनुष्य जे काही पाहतो प्रसंगाच्या रुपाने तेच त्याच्यापुढे घडून येते तथापि बहुतेक खरी स्वप्ने संकेताच्या शैलीत असतात. ही स्वप्ने मोठी अर्थपूर्ण असतात.म्हणून यांचा अर्थ केवळ असाच मनुष्य सांगू शकतो जो या ज्ञानात अंतर्दृष्टी बाळगतो कुरआनात तसेच योग्य हदीस व वचनांमध्ये सत्य स्वप्नांचे जे प्रसंग सादर केले गेले आहेत व त्यांचा जो अर्थ वर्णिला गेला आहे तो मोठा अंतर्दृष्टीवर्धक आहे (अधिक स्पष्टीकरण पुढे येत आहे पहा टीप क्र.८५)

८०. म्हणजे मद्य पाजणारा, ज्याला यूसुफ संबंधी बादशहा जवळ उल्लेख करण्याविषयी विसर पडला होता, या प्रसंगी जेव्हा बादशहाला अस्वस्थ स्वप्ने पडत होती, अकस्मात यूसुफचे स्मरण ताजे झाले बायबलमध्ये देखील बादशहाचे स्वप्न वर्णिले गेले आहे आणि हे स्पष्टीकरण आहे की बादशहाने इजिप्त देशाच्या समस्त जादूगारांना व विद्वानांना बोलवून त्यांना या स्वप्नाचा अर्थ विचारला परंतु त्यांना अर्थ सांगणे शक्य झाले नाही त्यावेळी मद्य पाजणाऱ्यांच्या सरदारने बादशहाला संगितले, ''माझ्या अपराधांची आज मला आठवण होत आहे.''

तेथे त्या गारद्यांच्या सरदाराचा दास कोणी इब्री तरुण पुरुष आम्हा बरोबर होता त्याला आम्ही आप आपली स्वप्ने सांगितली व त्याने त्यांचा अर्थ आम्हास सांगितला, त्याने प्रत्येकाच्या स्वप्नानुसार अर्थ सांगितला त्याने आम्हास अर्थ सांगितला तसेच घडून आले.'' (उत्पति ४१:९ ते १३)

८१. मद्य पाजणारा बादशहाच्या आज्ञेने कारागृहात गेला व हजरत यूसुफ यांना सत्यनिष्ठ या विशेषणाने संबोधिले तेव्हा यावरुन असे दिसून येते की हजरत यूसुफ त्यांच्यासह कारागृहात राहून तो त्यांच्या चारित्र्याने केवढा प्रभावित झाला होता.

८२. म्हणजे लोकांना बादशहाच्या स्वप्नाचा अर्थ जाणण्याची तीव्र प्रतिक्षा आहे यास्तव आपण मला त्याचा अर्थ सांगावा, यासाठी की मी परत जाऊन लोकांना सांगावे.

८३. हजरत यूसुफ यांनी स्वप्नाचा अर्थ अशा प्रकारे सांगितला की त्यासोबत उपाय योजनेचा पैलूहि स्पष्ट झाला. अर्थात हे की अशा प्रसंगी सावधगिरीचे कोणते उपाय योजले जाऊ शकतात.

धान्यास कणसांमध्ये राहू देण्याची आज्ञा या कारणास्तव केली की कृमी किटाकांपासून ते सुरक्षित रहावे. स्वप्नाचा अर्थ असा की सात धष्टपुष्ट गायीशी अभिप्रेत समृद्धीची सात वर्षे व सात हिरव्या कणसांशी अभिप्रेत सात वर्षांपर्यंतचे चांगले पीक.

८४. सात दुबळ्या गायींचा अर्थ असा की सात वर्षे विपन्नावस्था राहील व सात सुकलेल्या कणसांचा अर्थ दुष्काळाची सात वर्षे तसेच सात दुबळ्या गायींनी सात धष्टपुष्ट गायींना खाऊन टाकण्याचा अर्थ असा की समृद्धीच्या काळात जे पीक साठवून ठेवले जाईल ते दुष्काळात खाण्याकरीता उपयोग पडेल आणि फक्त तेवढेच धान्य शिल्लक राहिल जे पेरणीच्या उद्देश्याने राखले जाईल.

८५. स्वप्नाच्या स्पष्टीकरणावर एका खबरीची ही वाढ होती. जिच्याविषयीचे भाकित हजरत यूसुफ यांनी केले. अर्थात ही गोष्ट हजरत यूसुफ यांना वही (ईश-संदेशा) द्वारे माहित झाली असेल.

रस पिळण्याच्या अर्थात द्राक्ष इत्यादींचा रस पिळणेहि अंतर्भूत आहे व जैतून वगैरे पासून तेल काढणेहि. अर्थात दुष्काळ निघून गेल्यानंतर जे वर्ष येईल त्यात चांगला पाऊस पडेल व पाऊस चांगला पडल्यामुळे खूप उत्पन्न येईल आणि फळांचा रस लोक विपुलतेने प्राप्त करु शकतील.

पुढील वर्णनानुसार स्वप्नाचा हा अर्थ शत प्रतिशत खरा ठरला. बादशहा मुसलमान नसला तरी त्याचे स्वप्न खरे होते.

खरे स्वप्न वस्तुत: सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे एक निशाणी आहे जे कधी कधी काफिरांना (सत्याचा इन्कार करणाऱ्यांना)

देखील दाखविले जाते यासाठी की त्यांच्याकरीता प्रमाण प्रस्थापित व्हावे. अशा प्रकारचे स्वप्न भविष्यात उद्‌भवणाऱ्या घटनाकडे अंगुली निर्देश करते आणि तेव्हा ती घटना त्याच स्वरूपात घडून येते तेव्हा ती या गोष्टीचा पुरावा ठरते की जगात ज्या घटना उद्‌भवतात, त्या केवळ आकस्मिक घटना नसतात, किंबहुना एका योजनेनुसार घडून येतात आणि या सृष्टीवर एक व्यवस्थाकुशल शक्तीचे शासन आहे जी आपल्या योजनांना लागू करीत असतो. जर जगातील समस्त घटना-प्रसंग एखाद्या योजनेशिवाय घडून आले असते तर एखाद्या घटनेची पूर्वसूचना कोणालाच मिळाली नसती. खरी स्वप्न जी माणसाच्या अनुभवात येतात, भावी प्रसंगाची पूर्व-सूचना देऊन जातात, हे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की या संपूर्ण सृष्टीचा एकच ईश्वर आहे व इथे जे काही घडते ते त्याच्या पूर्व-नियोजित कार्यक्रमानुसार (तकदीर-Pre-Planning) नुसार घडते.

यास्तव जो कोणी खरे स्वप्न पाहतो, मग तो ईमान बाळगणारा असो वा सत्यविरोधक, तो केवळ स्वप्न पाहात नाही, किंबहुना अल्लाहचे प्रमाण पाहतो.

आणि बादशहा म्हणाला, त्याला माझ्या
जवळ आणा  जेव्हा दूत त्याच्याजवळ
पोहचला तेव्हा तो म्हणाला, आपल्या
मालकाजवळ परत जा व त्याला विचारा
की त्या स्त्रीयांचा काय मामला आहे, ज्यांनी
आपल्या हातांना जखमी करुन घेतले ?
माझा पालन कर्ता त्यांचे डावपेच चांगल्या
प्रकारे जाणून आहे.(अल-क़ुर्आन)

५०. आणि बादशहा म्हणाला, त्याला माझ्या जवळ आणा [८६] जेव्हा दूत त्याच्याजवळ पोहचला तेव्हा तो म्हणाला, आपल्या मालकाजवळ परत जा [८७] व त्याला विचारा की त्या स्त्रीयांचा काय मामला आहे, ज्यांनी आपल्या हातांना जखमी करुन घेतले? [८८] माझा पालन कर्ता त्यांचे डावपेच चांगल्या प्रकारे जाणून आहे.

وَقَالَ الْمَلِكُ ائْتُوْنِيْ بِهٖ ۚ فَلَمَّا جَآءَهُ الرَّسُوْلُ
قَالَ ارْجِعْ اِلٰى رَبِّكَ فَسْـَٔلْهُ مَا بَالُ
النِّسْوَةِ الّٰتِيْ قَطَّعْنَ اَيْدِيَهُنَّ ؕ اِنَّ رَبِّيْ بِكَيْدِهِنَّ عَلِيْمٌ ﴿٥٠﴾

५१. त्याने विचारले तुमच्या काय मामला आहे, जेव्हा तुम्ही यूसुफला आकृष्ट करण्याचा प्रयत्न केला ? [८९] त्या (स्त्रीया) म्हणाल्या अल्लाह सर्व वैगुण्यांपासून विरहित आहे ! आम्हाला त्याच्या अंगी वाईट अशी कोणतीहि गोष्ट आढळली नाही. अजीजची पत्नी तत्क्षणी उद्‌गारली, अता सत्य अगदी उघड झाले. मीच त्याला आंकृष्ट करण्याचा प्रयत्न केला आणि निःसंशय तो सच्चा आहे.[९०]

قَالَ مَا خَطْبُكُنَّ اِذْ رَاوَدْتُّنَّ يُوْسُفَ عَنْ نَّفْسِهٖ ؕ قُلْنَ حَاشَ
لِلّٰهِ مَا عَلِمْنَا عَلَيْهِ مِنْ سُوْٓءٍ ؕ قَالَتِ امْرَاَتُ الْعَزِيْزِ الْـٰٔنَ حَصْحَصَ
الْحَقُّ ۫ اَنَا رَاوَدْتُّهٗ عَنْ نَّفْسِهٖ وَاِنَّهٗ لَمِنَ الصّٰدِقِيْنَ ﴿٥١﴾

५२. हे एवढ्यासाठी की त्याला हे माहित व्हावे की त्याच्या पश्चात मी विश्वासघात केला नाही आणि हे की अल्लाह विश्वासघात करणाऱ्यांचे डावपेच तडीस नेत नाही.[९१]

ذٰلِكَ لِيَعْلَمَ اَنِّيْ لَمْ اَخُنْهُ بِالْغَيْبِ
وَاَنَّ اللّٰهَ لَا يَهْدِيْ كَيْدَ الْخَآئِنِيْنَ ﴿٥٢﴾

५३. आणि मी आपल्या मनाला मुक्त ठरवित नाही. मन तर वाईटाकडे मोठे प्रवृत्त करणारे आहे त्या व्यतिरिक्त ज्याच्यावर माझ्या पालनकर्त्याने कृपा केली. निःसंशय माझा पालनकर्ता मोठा क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.[९२]

وَمَآ اُبَرِّئُ نَفْسِيْ ۚ اِنَّ النَّفْسَ لَاَمَّارَةٌ ۢ بِالسُّوْٓءِ اِلَّا
مَا رَحِمَ رَبِّيْ ؕ اِنَّ رَبِّيْ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ ﴿٥٣﴾

५४. बादशहा म्हणाला, त्याला माझ्याजवळ आणा की मी त्यास-आपल्या करीता खास करुन घ्यावे [९३] मग जेव्हा त्याने संभाषण केले तेव्हा बादशहा म्हणाला आज तुम्ही आमच्या येथे सन्माननीय व विश्वसनीय आहात.[९४]

وَقَالَ الْمَلِكُ ائْتُوْنِيْ بِهٖٓ اَسْتَخْلِصْهُ لِنَفْسِيْ ۚ فَلَمَّا كَلَّمَهٗ
قَالَ اِنَّكَ الْيَوْمَ لَدَيْنَا مَكِيْنٌ اَمِيْنٌ ﴿٥٤﴾

५५. तो म्हणाला देशाच्या खजिन्यांवर मला मुखत्यार नेमा. मी संरक्षण करणारा आहे व ज्ञानहि बाळगतो. [९५]

قَالَ اجْعَلْنِيْ عَلٰى خَزَآئِنِ الْاَرْضِ ۚ اِنِّيْ حَفِيْظٌ عَلِيْمٌ ﴿٥٥﴾

८६. जेव्हा मद्य पाजणाऱ्याने बादशहाला हज़रत यूसुफ यांनी निवेदिलेल्या स्वप्नार्थाची सूचना दिली तेव्हा त्याला समाधान वाटले व आश्चर्य वाटले की या योग्यतेचा माणूस कैदेत पडला आहे. म्हणून त्याने यूसुफला बोलावणे पाठविले.

८७. मूळ ग्रंथात 'रब्ब' हा शब्दप्रयोग झाला आहे. अरबी भाषेत त्याचा अर्थ स्वामी (मालक) असा आहे न त्या काळात गुलाम आपल्या मालका करीता हा शब्दप्रयोग करीत असे, येथे ह्याच अर्थाने बादशहा करीता हा शब्द वापरण्यात आला आहे कारण संदेश घेऊन येणारा हा बादशहाचा गुलाम होता परंतु ज्या अर्थी रब्ब (स्वामी) खऱ्या अर्थाने अल्लाह आहे व मालकाकरीता हा शब्दप्रयोग केल्याने संदेहावस्था निर्माण होते जसे यहूदी व ख्रिश्चनांच्या इतिहासावरुन ही गोष्ट दिसून येते, यास्तव इस्लामच्या परिपूर्ण शरीअत मध्ये याचा प्रयोग अल्लाह करीताच विशेषत्वाने केला गेला आहे.

८८. हजरत यूसुफ यांच्या वर्णनावरुन एक गोष्ट स्पष्ट झाली की ते आपल्या सुटकेसाठी अगदीच बेचैन नव्हते किंबहुना सुटका होण्यापूर्वी त्यांना आपल्या मामल्याची छानबीन आवश्यक वाटली, अशासठी की ज्या आरोपाखाली त्यांना बंदीवासात पाठविले गेले होते त्याची हकीगत स्पष्ट व्हावी यावरुन ह्या विचाराचे खंडन होते की हजरत यूसुफ यांनी اُذْكُرْنِي عِنْدَ رَبِّكَ ''आपल्या स्वामीजवळ माझा उल्लेख करा.'' असे सांगण्यात एखादी चूक केली होती.(पहा टीप क्र. ७७).

हजरत यूसुफ यांची ही सज्जनता होय की त्यांनी अजीज च्या पत्नीचा स्पष्ठत: उल्लेख केला नाही, किंबहुना त्या स्त्रीयांचा उल्लेख केला ज्या अजीजच्या पत्नीचा कट कारस्थानानुसार एकत्र जमल्या होत्या व आपल्या हातांना जख्मी करुन घेतले होते. या प्रकारणाच्या तपासणी पासून अजीजची पत्नी अपवाद ठरु शकत नव्हती म्हणून तिचे नाव घेणे अनावश्यक होते.

८९. बादशहाने त्या स्त्रीयांना व अजीजच्या पत्नीला तपासणी करीता बोलावणे पाठविले व त्याने त्यांना जो प्रश्न केला त्यावरुन हे उघड होते की बादशहाचे व्यक्तिश:समाधान झाले होते की यूसुफ निरपराध आहे आणि आकृष्ट करण्याचा प्रयत्न स्त्रीयांनीच केला होता.

९०. हात जख्मी करुन घेणाऱ्या स्त्रीयांनी देखील हजरत यूसुफ निरपराध असण्याबद्दल साक्ष दिली आणि अजीज च्या पत्नीने देखील आपण अपराधी असल्याचे मान्य केले व हेहि मान्य केले की हजरत यूसुफ निरपराध व सच्चे आहेत.

अशा प्रकारे चंद्राची ग्रहणापासून सुटका झाल्यावर सर्वांनी त्याच्या निष्कलंक चेहऱ्यास पाहिले व लोकांना हे दिसून आले की हे तर साक्षात तेज आहे ज्याला कसलीहि उपमा नाही.

९१. अजीजच्या पत्नीचे निवेदन वर आयत क्र. ५१ मध्ये 'नि:संशय तो अगदी सच्चा आहे ' येथे समाप्त झाले. हे निवेदन हजरत यूसुफ यांचे आहे. बंदीवासात जेव्हा त्यांना असे कळले की बादशहाद्वारे छानबीन केल्याने सिद्ध झाले आहे की ते निरपराध आहेत तेव्हा त्यांनी सांगितले की मला या अवस्थेत ही छानबीन एवढ्यासाठी जरुरी वाटली की अजीजच्या घरात त्याच्या पश्चात माझ्या हातून विश्वासघाताचे कृत्य घडले नाही हे स्पष्ट व्हावे. येथे या संदर्भात विश्वासघाताशी अभिप्रत अजीजच्या पत्नीशी अनैतिक संबंध कायम करणे आहे.

हजरत यूसुफ यांनी अधिक ही तात्विक बाबही स्पष्ट केली की विश्वासघात करणारे लोक आपल्या विश्वासघातावर पांघरुण घालण्याकरीता एखाद्या निरपराध माणसाविरुद्ध जे डावपेच खेळतात, त्यांचे हे डावपेच त्यावेळेपुरते कितीहि भ्रमकारक असोत परंतु अंतिम परिणामाच्या दृष्टीने असे लोक कधीहि सफल होत नाही आणि त्यांनी सोडलेले बाण खरे लक्ष्य गाठत नाहीत, ह्याचे उदाहरण अजीजच्या पत्नीचा हा किस्सा होय की तिने विश्वासघात करुन आरोप हजरत यूसुफ यांच्या माथी ठेवण्याचा प्रयत्न केला, त्यांच्याविरुद्ध कारस्थान रचले व त्यांना बदनाम करण्यात कसलीहि कसर बाकी ठेवली नाही पण अशाने हजरत यूसुफ यांचे काडीमात्र बिघडले नाही उलट त्यांचे स्थान आणखी उंचावले व अजीजच्या पत्नीला घोर अपमानास तोंड द्यावे लागले.

स्पष्ट असावे की अजीजच्या पत्नीचे आपला अपराध कबूल करणे तर क़ुरआनाने सिद्ध आहे. परंतु अल्लाह समोर तिचे तौबा करणे व ईमान बाळगणे सिद्ध नाही. तसेच हजरत यूसुफ यांनी नंतर अजीजच्या पत्नी (जुलेखा) शी विवाह केला अशी जी आख्यायिका आहे ती केवळ कल्पित कथा होय जिला कसलीहि वास्तवता नाही आणि ना हे अनुमान गम्य आहे की एखादा पैगंबर अशा स्त्रीशी विवाह करणे पसंत करील जी चारीत्र्यहीन असावी व जिच्या नशीबी अवहेलना आली असावी. ती अजीजची पत्नी होती व हेहि सिद्ध नाही की त्यावेळी अजीज मरण पावला होता कि त्याने तिला घटस्फोट दिला होता, तेव्हा या स्थितीत तिचे नाते हजरत यूसुफशी जोडण्यात कोणती सूज्ञता आहे? एवढेच नव्हे तर अजीजच्या पत्नीचे नाव जुलेखा होते ही गोष्ट देखील ना क़ुरआनाद्वारे सिद्ध आहे ना हदीसद्वारे, ना बायबलमध्ये या संबंधीचा उल्लेख आहे.

खेदाची गोष्ट अशी की माणसाच्या बोध ग्रहणाकरीता क़ुरआनाने जे वृत्तांत सादर केले, त्यांना कथाकारांनी भलते सलते रुप देऊन टाकले.

९२. हज़रत यूसुफ यांनी आपले निवेदन पुढे चालू ठेवत म्हटले की जेव्हा माझे निर्दोष असणे सिद्ध झाले आहे मी या गोष्टीचे क्रेडीट(Credit) आपल्या मनाला देत नाही, किंबहुना

यास अल्लाह ची कृपा समजतो कारण माणसाचे मन तर त्याला वाईट गोष्टीकडे प्रवृत्त करीत असते परंतु ज्यांना अल्लाह सुबुद्धि प्रदान करतो ते आपल्या मनाच्या इच्छा आकांक्षावर निमंत्रण ठेवतात व त्याच्या हाती स्वत:ला पूर्णत: सोपवण्या ऐवजी त्यास नामोहरम करतात. मनाला पराभूत करण्याचे काम अल्लाहच्या कृपेशिवाय व सुबुद्धिविना शक्य नाही.

ज्याअर्थी माणसाची कसोटी मांगल्य व अमांगल्यात अपेक्षित आहे म्हणून मनुष्य स्वभावात इच्छा आकांक्षा ठेवल्या गेल्या आहेत. ह्या इच्छा आकांक्षा वाईट कृत्ये व अपराधाची गोडी चाखाण्या करीता आतून जोर लावतात. परंतु जो मनुष्य अल्लाहचे भय बाळगतो त्यावर अल्लाहची कृपा दृष्टी असते व तो अल्लाहने प्रदान केलेल्या सुबुद्धि मुळे ह्या आकांक्षांवर निमत्रंण राखण्यात यशस्वी होतो.

स्पष्ट असावे की काही भाष्यकारांनी या निवेदनास जे ذٰلِكَ لِيَعْلَمَ ''हे अशासाठी की त्यांनी जाणून घ्यावे'---------- येथून सुरु होत. अजीज च्या पत्नीचे निवेदन ठरविले आहे तथापि या विधानाशी सहमत होता येणार नाही कारण खुद्द संभाषण प्रमाण आहे की हे हजरत यूसुफ यांचेच निवेदन होय. संभाषणाचे तथ्य, अर्थाचा चांगलेपणा व भारदस्त निवेदन शैली या गोष्टी एका पैगंबराच्या व्यक्तिमत्वासच शोभण्या सारख्या आहेत. अजीजच्या पत्नीच्या मुखाने या गोष्टी न शोभण्याजोग्या आहेत.

९३. तपासणीच्या निष्कर्ष समोर आल्यानंतर बादशहाने दुसऱ्यांदा यूसुफला बोलाविलो व तेहि या घोषणेसह की ते कोणाचेहि गुलाम नाहीत किंबहुना माझ्या राज्य कारभारा करीता खास केले जातील.

९४. उघड आहे, हजरत यूसुफ यांच्या संभाषणावरुन विद्वता, बुद्धि कौशल्य, सत्य प्रियता, व दूरदर्शीता या सारखे गुण व्यक्त झाले असतील म्हणून बादशहा फार प्रभावित झाला व त्यांची कदर बाळगीत त्याने त्यांच्यावर आपला पूर्ण विश्वास व्यक्त केला हा संकेत या गोष्टीकडे होता की हजरत यूसुफ हे मोठे मोठ्या पदास पात्र आहेत. आता त्यांनी सांगावे की दुष्काळ स्थितीत देशाला ज्या समस्यांना तोंड द्यावे लागेल त्या ध्यानी घेता त्यांना आपल्या विचारपूर्वक प्रयत्नांनी काम घेण्यास कशा प्रकारच्या अधिकाराची आवश्यकता भासेल.

९५.जमीनीच्या खजिन्यांशी अभिप्रेत जमीनीपासून प्राप्त होणारी सम्पत्ति, अर्थात शेतीचे उत्पन्न होय व त्यावर व्यवस्थापक म्हणून नेमण्याशी अभिप्रेत त्याचा व्यय व तत्संबंधीच्या व्यवस्थापन इत्यादि संदर्भात पूर्ण अधिकार सूपूर्द करणे. ज्या अर्थी समस्या प्रत्यक्षात धान्योत्पादन व त्याच्या विभागणीशी संबंधित होत्या म्हणून हजरत यूसुफ यांनी या बाबत संपूर्ण अधिकार सोपविण्याची मागणी केली व बादशहाच्या समाधानासाठी ही गोष्ट जाहीर केली की या कामाकरीता जे गुण-संरक्षण व ज्ञान- अपेक्षित आहे ते माझ्या अंगी आहेत.

मागणी तर हजरत यूसुफ यांनी प्रसंगानुरोधाने एवढीच केली पण पुढे मार्ग मोकळे होत गेले, येथपावेतो की मिस्र देशाचे संपूर्ण अधिकार त्यांच्या हाती आले व ते राज्याच्या सिंहासनाचे स्वामी झाले. यास्तव आयत क्र.१०० मध्ये हे स्पष्टीकरण आहे की जेव्हा त्यांचे मातापिता मिस्र देशात पोहचले तेव्हा त्यांनी त्यांना सिंहासनावर बसविले.

हजरत यूसुफ यांनी जी मागणी केली होती त्यावरुन हा गैरसमज न व्हावा की ही मगणी इस्लामेतर शासन चालविण्याकरीता होती ही गोष्ट ना प्रेषित-पदाशी अनुकूल आहे आणि ना इतिहासात असे एखादे उदाहरण आहे की एखाद्या पैगंबराने एखाद्या इस्लामेतर वा काफिरांच्या शासनास चालविण्यात काही हिस्सा घेतला असेल. हजरत यूसुफ यांनी ज्या गोष्टीची मागणी केली होती ती अशी की धान्योत्पादनाची संपूर्ण व्यवस्था त्यांच्या नियंत्रणाखाली असावी व शासनाने त्यात काही हस्तक्षेप करण्या ऐवजी त्यांचे सहकार्य करावे. अर्थात त्यांनी स्वत:करीता असे कार्य-क्षेत्र योजिले जे मूलत:विहित होते आणि लोकांना दुष्काळाच्या क्लेशापासून व संकटापासून वाचविण्या करीता ही सेवा अगत्याची होती. तसेच या द्वारे समाजाला ईश्वराची ओळख करुन देण्यात मोठी मदत लाभू शकत होती.

यास्तव अल्लामा जमख्शरी लिहितात:

''हजरत यूसुफ यांनी हे अशासाठी सांगितले की या द्वारे त्यांना अल्लाहचे आदेश जारी करणे शक्य व्हावे, हक (सत्य) प्रस्थापित करणे शक्य व्हावे, न्यायाचे युग यावे आणि सामर्थ्य प्राप्त करु शकावे.''

एकंदरीत हे त्या उद्दिष्टांकरीता आहे ज्यांच्याकरीता पैगंबर मानव समूहाकडे पाठविले जात राहीले आणि हजरत यूसुफ यांना हे माहित होते की त्यांच्या खेरीज अन्य एखादा असा नाही. जो त्यांच्या जागी या जबाबदारीस पूर्ण करु शकेल. यास्तव त्यांनी अधिकाराची मागणी केवळ अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी केली, पद लालसा व ऐहिक सुखासाठी नव्हे.

(तफसीर कश्शाफ खंड २ पृष्ठ ३२८)

म्हणून हज़रत यूसुफ यांचे वक्तव्य इस्लामेतर शासन चालविण्यासाठी नव्हते, किंबहुना काळाच्या हिकमतीस एक योग्य सार्वजनिक गरजे करीता अनुकुल करण्यासाठी होते आणि क्रमाक्रमाने आजच्या काळातील शासन व्यवस्थेवरुन कयास करणे योग्य नव्हे जेथे या स्वरुपाचे अधिकार एखाद्या माणसाला सोपविण्याची कल्पना केली जाऊ शकत नाही आणि ज्याचा कोणताही विभाग कायद्यांच्या बंधनांपासून मुक्त नसतो. तरी देखील जर एखाद्या इस्लामेतर शासन व्यवस्थेत विहित वर्तुळात

म्हणजे जेथे शरीअतच्या आदेश व नियमांशी संघर्ष होत नसेल आणि ईमान बाळगणारे यास इस्लामच्या फाद्याची निकड समजत असतील तर त्यापासून लाभ घेण्यात शरीअत दृष्ट्या कोणताहि अडथळा नाही. यावर हा आक्षेप घेणे की हे असत्य शासन व्यवस्थेशी सहकार्य करणे होय किंवा त्यासोबत समझोता होय. एक भ्रम आहे, आणखी काही नाही. पैगंबरांच्या कार्य पद्धतित प्रत्येक प्रकारच्या परिस्थिती करीता मार्गदर्शन आहे,अर्थात हजरत यूसुफ यांची पद्धत देखील आमच्या करीता आदर्शच आहे.

आयतीवरुन ओघाओघाने ही गोष्ट देखील स्पष्ट होते की अधिकाराचे पद एखाद्या आशा प्रसंगी जेव्हा एखादा ईमान बाळगणाऱ्यास आपल्या अंगी त्याविषयीची पात्रता जाणवत असेल व परिस्थिती प्रखरतेने या गोष्टीची निकड बाळगत असेल की त्यने या सेवेसाठी स्वत:ला पुढे करावे तर असे केले जाऊ शकते. ज्या हदीस वचनात पदाधिकार मांगण्याची मनाई केली गेली आहे ती प्रतिष्ठा ललसेच्या अर्थाने होय व जी स्थिती वर वर्णिली गेली आहे ती याहून भिन्न आहे.

५६. अशा रीतीने आम्ही देशात यूसुफला सत्ताधिकार प्रदान केला [९६] तो वाटेल त्या ठिकाणी राहू शकत होता [९७] आम्ही ज्याला इच्छितो. आपल्या कृपेने उपकृत करतो आणि सदाचारी लोकांचा मोबदला कधीहि वाया जाऊ देत नाही.[९८]

وَكَذٰلِكَ مَكَّنَّا لِيُوْسُفَ فِى الْاَرْضِ يَتَبَوَّاُ مِنْهَا حَيْثُ
يَشَآءُ نُصِيْبُ بِرَحْمَتِنَا مَنْ نَّشَآءُ وَلَا نُضِيْعُ اَجْرَ الْمُحْسِنِيْنَ ٥٦

५७. आणि आखिरतचा मोबदला त्या लोकांकरीता किती तरी पटींनी चांगला आहे ज्यांनी ईमान बाळगले व ईश-भय अंगिकारले. [९९]

وَلَاَجْرُ الْاٰخِرَةِ خَيْرٌ لِّلَّذِيْنَ اٰمَنُوْا وَكَانُوْا يَتَّقُوْنَ ٥٧

५८. मग असे झाले की यूसुफचे भाऊ (मिस्त्र देशी) आले व त्याच्याजवळ हजर झाले [१००] त्याने त्यांना ओळखले परंतु ते त्याला ओळखू शकले नाहीत. [१०१]

وَجَآءَ اِخْوَةُ يُوْسُفَ فَدَخَلُوْا عَلَيْهِ
فَعَرَفَهُمْ وَهُمْ لَهٗ مُنْكِرُوْنَ ٥٨

५९. आणि जेव्हा त्याने त्यांचा समान तयार करविला तेव्हा म्हणाला, या पुढे आपल्या सावत्र भावाला देखील माझ्याजवळ आणा. काय तुम्ही पाहत नाही की मी माप पूरेपूर भरुन देतो व उत्तमरित्या आतिथ्य करणारा आहे. [१०२]

وَلَمَّا جَهَّزَهُمْ بِجَهَازِهِمْ قَالَ ائْتُوْنِىْ بِاَخٍ لَّكُمْ مِّنْ اَبِيْكُمْ اَلَا
تَرَوْنَ اَنِّىْٓ اُوْفِى الْكَيْلَ وَاَنَا خَيْرُ الْمُنْزِلِيْنَ ٥٩

६०. जर तुम्ही त्याला माझ्याजवळ आणणार नाहीत तर माझ्याजवळ तुमच्या करीता कसलेहि धान्य नाही आणि ना तुम्ही माझ्याजवळ यावे.

فَاِنْ لَّمْ تَاْتُوْنِىْ بِهٖ فَلَا كَيْلَ لَكُمْ عِنْدِىْ وَلَا تَقْرَبُوْنِ ٦٠

६१. ते म्हणाले, आम्ही याकरीता त्याच्या पित्यास राजी करण्याचा प्रयत्न करु आणि निशिचतच आम्ही असे करु.

قَالُوْا سَنُرَاوِدُ عَنْهُ اَبَاهُ وَاِنَّا لَفٰعِلُوْنَ ٦١

६२. त्याने आपल्या सेवकांना आदेश दिला की त्यांनी दिलेले मूल्य त्यांच्या सामानात ठेवून द्या (त्याने हे अशासाठी केले) की जेव्हा हे लोक स्वगृही परततील तेव्हा त्यास ओळखावे व अशासाठी की त्यांनी परत यावे. [१०३]

وَقَالَ لِفِتْيٰنِهِ اجْعَلُوْا بِضَاعَتَهُمْ فِىْ رِحَالِهِمْ لَعَلَّهُمْ
يَعْرِفُوْنَهَآ اِذَا انْقَلَبُوْٓا اِلٰٓى اَهْلِهِمْ لَعَلَّهُمْ يَرْجِعُوْنَ ٦٢

९६. म्हणजे हज़रत यूसुफ यांना विविध अवस्थेतून जावे लागले तरीहि सर्वश्रेष्ठ अल्लाहने सत्ताधिकाराचे मार्ग त्यांच्या करीता अशा प्रकारे अनुकूल केले की प्रत्येक अवस्था त्यांच्या करीता प्रगतीचे साधन ठरले आणि

**''तलातुम हाय दरीया हि से है गोहर की सैराबी''**

अर्थ: सागरात लाटा उचंबळल्यानेच भौत्तिक तृप्त होतात. बाह्य साधने अशा प्रकारे घडलीत की बादशहाने त्यांना ते समस्त अधिकार देऊन टाकले जे त्यांनी सादर केलेल्या चौदा वर्षाच्या योजनेस कार्यान्वित करण्याकरीता आवश्यक होते एवढेच नव्हे तर त्यांना मिस्त्र (इजिप्त) देशाचा हाकीम (अधिकारी) बनविले. म्हणून पुढे आयत क्र. ७८ मध्ये हजरत यूसुफ करीता 'अजीज' अधिकार संपन्न शासक) हा शब्द वापरला गेला आहे. बायबल मधील उल्लेख असा-

''आणि फारो योसेफास म्हणाला, देवाने तुला ह्या सर्व गोष्टीचे ज्ञान करुन दिले आहे व त्या अर्थी तुझ्या सारखा चतुर व शहाणा दुसरा कोणी नाही तर तू माझ्या घराचा अधिकारी हो, तुझ्या आज्ञे प्रमाणे माझी सर्व प्रजा चालेल. राजासना पुरताच काय तो मी तुज पेक्षा मोठा फारो योसेफास आणखी म्हणाला, पाहा तुला मी अवघ्या मिसर देशावर नेमितो.''

(उत्पत्ति-४१:३९ ते ४१)

९७. कोठे ही गोष्ट की हजरत यूसुफ यांना बंदीवासाच्या तंग कोठडीत दिवस घालावे लागत होते व कोठे ही स्थिती की मिस्त्र देशाच्या भूमीवर वाटेल त्या ठिकाणी ते वास्तव्य करु शकत होते. बायबल मधील उल्लेख असा-

> ''मिसरी राजा फारो याजपुढे योसेफ जाऊन उभा राहिला तेव्हा तो तीस वर्षाचा होता. मग योसेफ फारो जवळून निघून सर्व देशात दौरा करु लागला त्या सुकाळाच्या सात वर्षात जमीनीस भरघोस पीक आले. त्याने या सात वर्षात मिसर देशातील सर्व प्रकारची अन्न-सामग्री गोळा करुन नगरो-नगरी साठवून ठेविली; एकेका नगराच्या आसपासचे पीक त्याने त्या त्या नगरातच साठवून ठेविले योसेफाने समुद्राच्या वाळू सारखा धान्याचा महामूर संचय करुन ठेविला.'
>
> (उत्पत्ति ४१:४६ ते ४९)

९८. आणि ही वस्तुस्थिती आहे की सदाचाराचे परिणाम इहलोकात चांगलेच निघतात तथापि याला काही अवधि लागतो. ज्याप्रमाणे एक बीज पेरणे व त्याचे वृक्षात रुपांतर होणे या दरम्यान काही काळाचे अंतर असते.

येथे ही गोष्ट देखील समजून घेतली पहिजे की अधिकार-अधिकारात फरक असतो. अत्याचारी लोकांना जो अधिकार प्राप्त असतो तो केवळ कसोटी करीता असतो व कल्याण कारक नसतो. परंतु जो अधिकार सदाचारी लोकांना प्राप्त असतो त्यासोबत खरी प्रतिष्ठाहि असते व तो कल्याणकारक असतो. हजरत यूसुफ यांना जो अधिकार लाभला, त्याचे नेमके हेच स्वरुप होते. म्हणून यास सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपली कृपा या अर्थाने घेतली आहे.

९९. म्हणजे ईमान बाळगून ईश-भयाचे वर्तन अंगिकारणाऱ्यांना जो मोबदला इहलोकात दिला जातो तो त्या मोबदल्याच्या तुलनेने अगदी अल्प असतो जो त्यांना आखिरत मध्ये देऊन उपकृत केले जाईल. इहलोकाचा मोबदला दवबिंदू समान आहे तर आखिरतचा मोबदला लाभदायक पर्जन्य वृष्टि समान.

१००. जेव्हा दुष्काळ आला तेव्हा मिस्त्र देशाबरोबरच शेजारचे देश पॅलेस्टीन वगैरेहि दुष्काळाच्या तावडीत सापडले. त्यावेळी हजरत यूसुफ यांच्या चांगल्या व्यवस्थापनामुळे मिस्त्र देशात धान्याचा संचय होता म्हणून त्यांचे भाऊ किनआनहून धान्य विकत घेण्यास मिस्त्र देशात आले आणि ते परदेशातून आले होते म्हणून त्यांना मिस्त्र देशाच्या शासका (यूसुफ) जवळ हजर व्हावे लागले.

बायबल मध्ये याचा उल्लेख पुढील प्रमाणे-

> 'मग योसेफने सांगितल्या प्रमाणे दुष्काळाची सात वर्षे सुरु झाली तेव्हा देशो देशी दुष्काळ पडला तथापि मिसर देशात सर्वत्र अन्न.............. याकोबाने ऐकले की मिसर देशात धान्य आहे तेव्हा तो आपल्या मुलास म्हणाला. ................तुम्ही तेथे जाऊन आपणासाठी धान्य विकत आणा म्हणजे आपण जगू मरणार नाही. मग योसेफाचे दहा भाऊ धान्य खरेदी करण्यासाठी मिसर देशात गेले ................... योसेफ त्या देशाचा मुख्य अधिकारी होता आणि देशातल्या सर्व लोकास तोच धान्य विकीत असे...............योसेफने आपल्या भावांना ओळखिले पण त्यांनी त्याला ओळखले नाही.
>
> (उत्पत्ति ४१: ५३-५४ आणि ४२:१ ते ८)

१०१. ते हजरत यूसुफ यांना अशासाठी ओळखू शकले नाहीत की त्यांना कल्पना देखील नव्हती ज्या भावाला त्यांनी विहीरीत फेकून दिले होते तो मिस्त्रचा शासक होऊ शकतो. आणि हजरत यूसुफ यांची भावापासून ताटातूट होण्यास बराच काळ लोटला होता म्हणून त्यांच्यात जे बाह्य परिवर्तन घडले असेल ते लक्षात घेता त्यांना ओळखणे अवघड होते.

हजरत यूसुफ देखणे होते. परंतु यूसुफ सौंदर्याचे स्वरुप जर खरोखर एक ईश्वरी-चमत्काराचे (Miracle) असते तर त्यांच्या भावांनी पाहताक्षणीच त्यांना ओळखले असते, तथापि त्यांच्या न ओळखण्याने हे स्पष्ट होते की यूसुफ सौंदर्याचा जो किस्सा वर्णिला जातो तो केवळ अतिशयोक्ति वर आधारीत आहे.

१०२. मिस्र देशात शिधा-वाटप पद्धत होती म्हणून हजरत यूसुफ यांनी विचारले की तुमच्या घरात किती जण आहेत आणि जेव्हा त्यांनी आपल्या सावत्र भावचा-बिन यमीनचा उल्लेख केला असेल तेव्हा यूसुफ म्हणाले असतील की यापुढे येतांना त्याला सोबत आणा, जेणे करुन तुमच्या कथनाचे समर्थन व्हावे. अर्थात ही रीतसर गोष्ट होती व खरे पाहता हज़रत यूसुफ आपल्या भावाशी भेटू इच्छित होते परंतु एवढ्यात गौप्य स्फोट करणे उचित नव्हते म्हणून त्यांनी ही रीतसर गोष्ट केली. त्याच बरोबर आपल्या आतिथ्य वगैरेचाहि उल्लेख केला यासाठी की प्रेम वाढावे व त्यांनी स्वेच्छेने पुन्हा यावे.

१०३. धान्याची जी किंमत त्यांनी अदा केली होती, ती हजरत यूसुफ यांच्या आदेशान्वये त्यांच्या सामानात ठेवली गेली. हजरत यूसुफ इच्छित होते की त्यांनी दुसऱ्यांदा त्यांच्या जवळ यावे व पुन्हा येण्यात त्यांना आर्थिक अडचण न भासावी.

*जेव्हा ते आपल्या पित्याजवळ परतले तेव्हा म्हणाले, हे पिता ! आता यापुढे आम्हाला धान्य देण्यापासून रोखले गेले आहे. यास्तव आमच्या सोबत आमच्या भावाला पाठवून द्या की जेणेकरुन आम्ही धान्य आणावे आणि आम्ही अवशय त्याचे संरक्षण करु.(अल-क़ुर्आन)*

६३. जेव्हा ते आपल्या पित्याजवळ परतले तेव्हा म्हणाले, हे पिता ! आता यापुढे आम्हाला धान्य देण्यापासून रोखले गेले आहे. यास्तव आमच्या सोबत आमच्या भावाला पाठवून द्या की जेणेकरुन आम्ही धान्य आणावे आणि आम्ही अवशय त्याचे संरक्षण करु.

فَلَمَّا رَجَعُوٓا إِلَىٰٓ أَبِيهِمْ قَالُوا يَٰٓأَبَانَا مُنِعَ مِنَّا
الْكَيْلُ فَأَرْسِلْ مَعَنَآ أَخَانَا نَكْتَلْ وَإِنَّا لَهُۥ لَحَٰفِظُونَ ﴿٦٣﴾

६४. तो म्हणाला, काय मी याच्या बाबतीत तुमच्यावर त्याच प्रकारे भरवसा करु ज्याप्रकारे यापूर्वी याच्या भावा बाबत करुन बसलो.[१०४] अल्लाहच सर्वोत्कृष्ट संरक्षक व सर्वाहून अधिक कृपा करणारा आहे.

قَالَ هَلْ ءَامَنُكُمْ عَلَيْهِ إِلَّا كَمَآ أَمِنتُكُمْ عَلَىٰٓ أَخِيهِ مِن قَبْلُ
فَاللَّهُ خَيْرٌ حِفْظًا وَهُوَ أَرْحَمُ الرَّٰحِمِينَ ﴿٦٤﴾

६५. आणि जेव्हा त्यांनी आपले सामान उघडले तेव्हा पाहिले की त्यांचे धन देखील त्यांना परत केले गेले आहे. म्हणूं लागले, हे पिता ! आम्हाला आणखी काय पाहिजे. हे आमचे धन आम्हाला परत केले गेले आहे.आता आम्ही आपल्या कुटुंबियांकरीता शिधा घेऊन येऊ व आपल्या भावाचे संरक्षणहि करु. तसेच एक उंट धान्य अधिक प्राप्त करु. [१०५] एवढे धान्य तर सहजपणे मिळेल.

وَلَمَّا فَتَحُوا مَتَٰعَهُمْ
وَجَدُوا بِضَٰعَتَهُمْ رُدَّتْ إِلَيْهِمْ قَالُوا يَٰٓأَبَانَا مَا
نَبْغِى هَٰذِهِۦ بِضَٰعَتُنَا رُدَّتْ إِلَيْنَا وَنَمِيرُ أَهْلَنَا وَنَحْفَظُ أَخَانَا
وَنَزْدَادُ كَيْلَ بَعِيرٍ ذَٰلِكَ كَيْلٌ يَسِيرٌ ﴿٦٥﴾

६६. तो म्हणाला, जोपर्यंत अल्लाहच्या नावाने मला हे वचन देत नाही की तुम्ही निश्चित त्याला माझ्याजवळ परत आणाल येथो पावेतो मी त्याला तुमच्यासोबत कदापि पाठविणार नाही, मात्र तुम्ही घेऱ्यात सापडाल ती गोष्ट वेगळी [१०६] जेव्हा त्यांनी त्याला आपले पक्के वचन दिले तेव्हा तो म्हणाला आमच्या या वचनास अल्लाह साक्षी आहे.

قَالَ لَنْ أُرْسِلَهُۥ مَعَكُمْ حَتَّىٰ تُؤْتُونِ مَوْثِقًا مِّنَ اللَّهِ
لَتَأْتُنَّنِى بِهِۦٓ إِلَّآ أَن يُحَاطَ بِكُمْ فَلَمَّآ ءَاتَوْهُ مَوْثِقَهُمْ
قَالَ اللَّهُ عَلَىٰ مَا نَقُولُ وَكِيلٌ ﴿٦٦﴾

६७. आणि तो म्हणाला, पुत्रांनो ! एकाच दरवाज्याने दाखल होऊ नका, किंबहुना वेगवेगळ्या दरवाज्यांनी दाखल व्हा [१०७] मी अल्लाहच्या विरोधात तुमच्या काहीहि कामी येऊ शकत नाही. फैसला तर अल्लाहचाच लागू पडतो. त्यावरच मी भरवसा केला आणि भरवसा करणाऱ्यांनी त्यावरच भरवसा केला पाहिजे.[१०८]

وَقَالَ يَٰبَنِىَّ لَا تَدْخُلُوا مِنۢ بَابٍ وَٰحِدٍ وَادْخُلُوا مِنْ
أَبْوَٰبٍ مُّتَفَرِّقَةٍ وَمَآ أُغْنِى عَنكُم مِّنَ اللَّهِ مِن شَىْءٍ
إِنِ الْحُكْمُ إِلَّا لِلَّهِ عَلَيْهِ تَوَكَّلْتُ وَعَلَيْهِ فَلْيَتَوَكَّلِ
الْمُتَوَكِّلُونَ ﴿٦٧﴾

१०४. हजरत याकूब यांना यापूर्वी हजरत यूसुफ बाबतीत अत्यंत कटू अनुभव झाला होता म्हणून ते म्हणाले की काय मी त्याच प्रकारे तुमच्यावर विश्वास ठेवून बिन यमीनला तुमच्या सोबत पाठवू?

बिन यमीन वयाने मोठा झाला असला तरी तो त्यांचा सावत्र भाऊ होता व त्यांना नापसंत होता व त्यावेळच्या परिस्थितीत त्यांच्या सोबत परदेशी पाठविणे काळजीची गोष्ट होती की न जाणो हा दहा जणांचा जथा त्याच्याशी काय करील.

१०५. हजरत यूसुफ यांनी जी शिधा-वाटप पद्धत जारी केली होती त्यानुसार परदेशातून येणाऱ्या लोकांना प्रत्येक एक उंट वजना इतके धान्य दिले जात होते म्हणून ते म्हणाले की बिन यमीन ला सोबत नेण्याच्या स्थितीत आम्ही एक उंट धान्य अधिक प्राप्त करु शकू.

१०६. म्हणजे एखादी अशी स्थिती समोर यावी की त्याचे संरक्षण करणे तुमच्या अवाक्यात न रहावे.

१०७. यावरुन हे दिसून येते की मिस्र देशाच्या बाहेर एखादा तट राहिला असेल व त्याला अनेक दरवाजे असतील. हजरत याकूब ने त्यांना ही आज्ञा अशासाठी दिली की एक समूहाच्या रुपाने मिस्र मध्ये दाखल झाल्यावर त्यांना संशय-दृष्टीने न पाहिले जावे की न जाणो हा समूह कोणत्या उद्देशाने देशात आला आहे. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता लूटमारीचाहि संशय केला जाऊ शकत होता व हेरगिरीचाहि.

१०८. हजरत याकूब यांनी सावधगिरीचा उपाय तर सांगितला, त्याबरोबरच हेहि स्पष्ट केले की कोणताहि प्रयत्न तो कितीहि उचित का असेना अल्लाहने निर्धारीत केलेल्या भाग्याच्या विरोधात कदापि परिणामकारक ठरु शकत नाही. अल्लाहचा निर्णय लागू झाल्याखेरीज राहात नाही, व सर्व प्रयत्न फोल ठरतात म्हणून माणसाच्या अवाक्यात जो चांगल्याहून चांगला प्रयत्न आहे तो त्याने करावा पण प्रयत्नालाच सर्व काही समूज नये. किंबहुना अल्लाहच्या इच्छेवर भरवसा करावा की होईल तेच जे अल्लाहला मंजूर आहे.

६८. मग जेव्हा ते दाखल झाले ज्या प्रकारे त्यांच्या पित्याने त्यांना आज्ञा केली होती तर हे (प्रयत्न) अल्लाह (ने निर्धारीत केलेल्या भाग्या) च्या मुकाबल्यात त्यांच्या काही कामी येऊ शकले नाही मात्र, याकुबला आपल्या मनात एक आवश्यकता जाणवली होती जिला त्याने पूर्ण केले. निःसंशय तो आम्ही प्रदान केलेल्या विद्येमुळे ज्ञानी होता [१०९] तथापि बहुतेक लोक जाणत नाहीत. [११०]

وَلَمَّا دَخَلُوا مِنْ حَيْثُ أَمَرَهُمْ أَبُوهُمْ مَا
كَانَ يُغْنِي عَنْهُمْ مِنَ اللَّهِ مِنْ شَيْءٍ إِلَّا حَاجَةً فِي نَفْسِ
يَعْقُوبَ قَضَاهَا ۚ وَإِنَّهُ لَذُو عِلْمٍ لِمَا عَلَّمْنَاهُ وَلَٰكِنَّ أَكْثَرَ
النَّاسِ لَا يَعْلَمُونَ ﴿٦٨﴾

६९. आणि जेव्हा हे लोक यूसुफ जवळ पोहोचले तेव्हा त्याने आपल्या भावास आपल्या जवळ जागा दिली व सांगितले की मी तुझा भाऊ आहे तेव्हा हे लोक जे काही करीत राहिलेत त्यावर दुःख करु नकोस. [१११]

وَلَمَّا دَخَلُوا عَلَىٰ يُوسُفَ آوَىٰ إِلَيْهِ أَخَاهُ ۖ قَالَ إِنِّي
أَنَا أَخُوكَ فَلَا تَبْتَئِسْ بِمَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿٦٩﴾

७०. मग जेव्हा त्याने (यूसुफ ने) त्यांचा सामान तयार करविला तेव्हा आपल्या भावाच्या सामानात प्याला ठेवून दिला [११२] मग एका पुकारणाऱ्याने पुकारले की हे काफिला वाल्यांनो, तुम्ही चोर आहात.[११३]

فَلَمَّا جَهَّزَهُمْ بِجَهَازِهِمْ جَعَلَ السِّقَايَةَ فِي رَحْلِ
أَخِيهِ ثُمَّ أَذَّنَ مُؤَذِّنٌ أَيَّتُهَا الْعِيرُ إِنَّكُمْ لَسَارِقُونَ ﴿٧٠﴾

७१. त्यानी त्यांच्याकडे वळून विचारले, तुमची कोणती वस्तू हरवली आहे ? [११४]

قَالُوا وَأَقْبَلُوا عَلَيْهِمْ مَاذَا تَفْقِدُونَ ﴿٧١﴾

७२. ते म्हणाले, आम्हला बादशहाचा प्याला मिळत नाही आणि जो कोणी तो आणून देईल त्याच्याकरीता एक उंट धान्य (बक्षीस ) आहे व यासाठी मी जबाबदार आहे.[११५]

قَالُوا نَفْقِدُ صُوَاعَ الْمَلِكِ وَلِمَنْ جَاءَ بِهِ
حِمْلُ بَعِيرٍ وَأَنَا بِهِ زَعِيمٌ ﴿٧٢﴾

७३. ते म्हणाले,[११६] अल्लाह शपथ तुम्ही लोक चांगल्या प्रकारे जाणता की आम्ही या देशात उत्पात माजविण्यास आलो नाहीत आणि चोरी करणे आमची पद्धत नाही.

قَالُوا تَاللَّهِ لَقَدْ عَلِمْتُمْ مَا جِئْنَا لِنُفْسِدَ فِي الْأَرْضِ وَمَا
كُنَّا سَارِقِينَ ﴿٧٣﴾

७४. ते [११७] म्हणाले जर तुम्ही खोटारडे साबीत झालात तर (सांगा) याची काय शिक्षा आहे?

قَالُوا فَمَا جَزَاؤُهُ إِنْ كُنْتُمْ كَاذِبِينَ ﴿٧٤﴾

१०९. हजरत याकूब पैगंबर होते म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाह ने त्यांना प्रत्यक्षत: ज्ञान प्रदान केले होते. या प्रसंगी सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत याकूब यांची स्तुती केली आहे की त्यांचा प्रयत्न अल्लाहने निर्धारीत केलेल्या भाग्याच्या विरोधात परिणामकारक ठरु शकला नाही तरी तो प्रयत्न आपल्यापरिने योग्यच होता आणि तो त्या ज्ञानाच्या आधारावर जे त्यांना प्रदान केले गेले होते व हजरत याकूब प्रयत्न आणि भाग्य यांच्यामधील फरक जाणत होते.

११०. म्हणजे बहुतेक लोक हे जाणत नाही की मानवी प्रयत्नांच्या दरम्यान निर्णायक गोष्ट ईश्वरी फैसला होय. लोक मात्र आपल्या प्रयत्नांनाच सर्व काही समजतात. म्हणून त्यांची सर्व भिस्त आपल्या प्रयत्नांवरच असते व जेव्हा त्यात अपयश येते तेव्हा निराश होतात अर्थात वस्तुस्थितीशी अनभिज्ञ असण्याचा हा परिणाम होय.

१११. म्हणजे हजरत यूसुफ यांनी आपला सख्खा भाऊ बिन यमीन याला. आपल्या जवळ बोलवून हळूच सांगितले की मी तुझा भाऊ यूसुफ आहे. आता हे लोक आमच्याशी जो दुर्व्यवहार करीत राहीलेत त्याबद्दल दु:ख करु नकोस.

११२. हा सरकारी प्याला होता, तेव्हा खचितच मौल्यवान असेल आणि बहुधा हजरत यूसुफ यांनी ईश आदेशान्वये हा प्रयत्न अंगिकारला असेल की त्यास आपला भाऊ बिन यमीनच्या सामानात गुपचूपरित्या ठेवून द्यावा. संभवत:ही गोष्ट त्यांनी बिन यमीन ला सांगितली असावी.

११३. पुकारणारा सरकारी अधिकारी होता व त्याला हे माहित नव्हते की हजरत यूसुफ यांनी स्वत: हा प्याला बिन यमीन च्या सामानात ठेवला आहे म्हणून काफिला निघून गेल्या नंतर जेव्हा प्याला मिळाला नाही तेव्हा सरकारी अधिकाऱ्यांच्या मते ज्या काफिल्याने येथे मुक्काम केला होता त्यातल्याच एखाद्याने चोरला आहे. म्हणून तो काफिल्याच्या शोधात राहिला असेल व रस्त्यात काफिला आढळल्यावर त्याने आपल्या कल्पनेआधारे त्या लोकांवर चोरीचा आरोप ठेवला.

११४. म्हणजे काफिला वाल्यांनी सरकारी नोकरा (शिपायां) ना, जे अधिकाऱ्या सोबत आले होते विचारले की तुमची कोणती वस्तू हरवली आहे?

११५. सरकारी नोकरां (शिपायां) नी जेव्हा सांगितले की बादशहाचा प्याला गायब झाला आहे तेव्हा त्यांच्या अधिकाऱ्याने या गोष्टीची घोषणा केली की जो कोणी तो प्याला आणून देईल त्याला एक उंट धान्य इनाम दिले जाईल. आणि इनाम देवविण्याची जबाबदारी माझी राहील. यावरुन अनुमान होते की तो प्याला मोठा मौल्यवान होता.

११६. म्हणजे यूसुफच्या भावांनी म्हटले.

११७. म्हणजे सरकारी नोकरांनी म्हटले.

७५. त्यांनी उत्तर दिले, याची शिक्षा हीच की ज्याच्या सामानात ती वस्तू निघेल तो स्वत:त्याचा बदल ठरेल [११८]आम्ही अशा अत्याचारींना अशाच प्रकारे शिक्षा देत असतो.[११९]

قَالُوا جَزَاؤُهُ مَن وُجِدَ فِي رَحْلِهِ فَهُوَ جَزَاؤُهُ ۚ كَذَٰلِكَ
نَجْزِي الظَّالِمِينَ ﴿٧٥﴾

७६. मग त्याने (अर्थात यूसुफ ने) आपल्या भावाच्या गोणी आधी त्यांच्या गोण्या तपासायला सुरवात केली मग आपल्या भावाच्या गोणीतून त्या (प्याल्या) स बाहेर काढले. [१२०] अशा प्रकारे आम्ही यूसुफ करीता युक्ति योजना केली. [१२१] तो बादशहाच्या कायद्यानुसार त्याला अडवून ठेवू शकत नव्हता परंतु हे की अल्लाहने इच्छिले असते. [१२२] आम्ही ज्याच्याकरीता इच्छितो त्याचे दर्जे उंचावितो. [१२३] आणि प्रत्येक ज्ञानी वर एक असे अस्तित्व हजर आहे जे जबरदस्त ज्ञान बाळगणारे आहे.[१२४]

فَبَدَأَ بِأَوْعِيَتِهِمْ قَبْلَ وِعَاءِ أَخِيهِ ثُمَّ
اسْتَخْرَجَهَا مِن وِعَاءِ أَخِيهِ ۚ كَذَٰلِكَ كِدْنَا لِيُوسُفَ ۖ مَا
كَانَ لِيَأْخُذَ أَخَاهُ فِي دِينِ الْمَلِكِ إِلَّا أَن يَشَاءَ اللَّهُ ۚ نَرْفَعُ
دَرَجَاتٍ مَّن نَّشَاءُ ۗ وَفَوْقَ كُلِّ ذِي عِلْمٍ عَلِيمٌ ﴿٧٦﴾

७७. ते म्हणाले, जर याने चोरी केली आहे तर यापूर्वी याच्या भावानेही चोरी केली होती.[१२५] यूसुफने गोष्ट आपल्या मनातच ठेवली व त्यांच्यावर ती जाहीर होऊ दिली नाही (म्हणजे तो मनातल्या मनात म्हणाला) तुम्ही फार वाईट लोक आहात [१२६] आणि जे काही निवेदन तुम्ही करीत आहात अल्लाह त्याची हकीगत चांगल्या प्रकारे जाणतो.

قَالُوا إِن يَسْرِقْ فَقَدْ سَرَقَ أَخٌ لَّهُ مِن قَبْلُ ۚ فَأَسَرَّهَا
يُوسُفُ فِي نَفْسِهِ وَلَمْ يُبْدِهَا لَهُمْ ۚ قَالَ أَنتُمْ شَرٌّ مَّكَانًا ۖ
وَاللَّهُ أَعْلَمُ بِمَا تَصِفُونَ ﴿٧٧﴾

७८. म्हणू लागले, हे अजीज ! [१२७] याचे पिता फार म्हातारे झाले आहेत [१२८] यास्तव याच्या जागी आमच्यापैकी एखाद्यास ठेवून घ्या. आम्ही असे पाहतो की आपण मोठे सदाचारी आहात.

قَالُوا يَا أَيُّهَا الْعَزِيزُ إِنَّ لَهُ أَبًا شَيْخًا كَبِيرًا
فَخُذْ أَحَدَنَا مَكَانَهُ ۖ إِنَّا نَرَاكَ مِنَ الْمُحْسِنِينَ ﴿٧٨﴾

७९. तो म्हणाला, अल्लाह रक्षण करो या गोष्टींपासून की आम्ही ज्याच्याजवळ आमची वस्तू निघाली आहे त्याला सोडून अन्य एखाद्यास धरावे [१२९] जर आम्ही असे करु तर अत्याचारी ठरु.

قَالَ مَعَاذَ اللَّهِ أَن نَّأْخُذَ إِلَّا مَن وَجَدْنَا مَتَاعَنَا عِندَهُ
إِنَّا إِذًا لَّظَالِمُونَ ﴿٧٩﴾

११८. म्हणजे ज्याच्या सामानात चोरीची वस्तू निघेल त्याला धरले जावे व त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जावे.

११९. म्हणजे आमच्या येथे चोरी शिक्षेकरीता हाच कायदा आहे. संभवत: हा कायदा हजरत इब्राहीम यांच्या शरीअतचा असेल.

१२०. सरकारी अधिकारी त्यांना हजरत यूसुफ जवळ घेऊन आले आणि जेव्हा यूसुफच्या आज्ञेनुसार त्याच्या सामानाची तपासणी घेतली गेली तेव्हा प्याला बिन यमीनच्या गोणीतून निघाला. ही देखील शक्याता आहे की तपासणी स्वत: हजरत यूसुफ यांनी घेतली असावी.

१२१. हजरत यूसुफ वस्तुत: आपला सख्खा भाऊ बिन यमीन यास आपल्याजवळ ठेवू इच्छित होते. कारण उघड आहे की हे असले पाहिजे की आपल्या या कार्यात जे त्यांच्या सूपूर्द केले गेले होते आपल्या भावाला आपला सहाय्यक बनवू इच्छित असावे, जेणे करुन मिस्र समाजास इस्लामशी जवळ करण्यात मदत मिळावी. बिन यमीन त्यांच्या दुर्वर्तनी भावांपैकी नव्हते किंबहुना सदाचारी होते आणि त्यांचे पैगंबर (याकूब) घराण्यात प्रशिक्षण झाले होते म्हणून मिस्र मध्ये त्यांचे वास्तव्य समोर असलेल्या उद्दिष्टा करीता चांगले लाभप्रद होऊ शकत होते. यास्तव हजरत यूसुफ यांची उत्कट इच्छा होती की बिन यमीन ने आपल्याजवळ राहावे. तथापि हजरत यूसुफ आपल्या व्यक्तिमत्वास अद्याप चांगल्या वाईटाचा विचार करुन आपल्या भावांवर जाहीर करु इच्छित नव्हते, म्हणून त्यांनी काफिल्या सोबत त्यांना जाऊ दिले परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी खास उपाय योजना केली की बिन यमीन यूसुफ जवळ पोहचले व गौप्य स्फोट केल्याविना बिन यमीनला आपल्याजवळ ठेवण्याची संधी त्यांना लाभली.

१२२.मूळ ग्रंथात ''फ़ी दीनिल् मलिक'' فِی دِیۡنِ الۡمَلِکِ 'बादशहाच्या धर्मात' या अर्थाचा शब्दप्रयोग झाला आहे. मूळ शब्द 'दीन' त्याचा खरा अर्थ आज्ञापालन असा आहे आणि येथे हा शब्द बादशहाचा कायदा या अर्थाने वापरला गेला आहे. तेव्हा इब्ने जरीर तबरी यांनी याचा अर्थ,

فی حُکمِ مَلِکِ مِصر و قضائِہٖ وَ طَاعتِہٖ مِنۡھُمۡ۔

''मिस्त्रच्या बादशहाचा आदेश, त्याचा फैसला व त्याच्या आज्ञापालनात' असा केला आहे.'' (जामेऊल बयान खंड १३ पृ.१७)

ज्यावेळी बिन यमीनच्या अटकेचा मामला उद्भवला त्यावेळी मिस्र मध्ये बादशहाचा कायदा लागू होता आणि नागरी कायद्यान्वये चोरीची शिक्षा नजरकैद किंवा गुलामी नव्हती, किंबहुना दुसरी एखादी शिक्षा होती. संभवत: मारहाण किंवा दंडाची शिक्षा असेल. जर ही शिक्षा लागू केली गेली असती तर अशाने ते उद्दिष्ट साध्य होऊ शकत नव्हते जे बिन यमीनला रोखण्याच्या स्थितीत साध्य झाले असते. तसेच या स्थितीत बिन यमीनला निष्कारण त्रास झाला असता. उघड आहे ही गोष्ट न्यायाच्या विरुद्ध होती. तथापि नजरबंदी किंवा गुलामीची शिक्षा केवळ स्थितीवश शिक्षा होती,वास्तविकपणे नव्हे,कारण हजरत यूसुफ यांनी त्याना आपल्याजवळ रोखून घेतले होते आणि स्वत: बिन यमीन असे समजत होते की ही एखादी शिक्षा नव्हे किंबहुना मला रोखून ठेवण्याची सूक्ष्म उपाय योजना आहे. याच कारणास्तव त्यांनी आपल्या अटके विरुद्ध कसलाही निषेध केला नाही, ना आपल्या बादशहाचा जो कायदा मिस्र मध्ये प्रचलित होता त्यानुसार हजरत यूसुफ बिन यमीनला शिक्षा तर देऊ शकत होते, परंतु आपल्याजवल रोखून ठेवू शकत नव्हते तथापि अल्लाहची मर्जी अशी स्थिती निर्माण करु शकत होती की त्यांनी बिन यमीनला रोखून घ्यावे. यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी स्थिती निर्माण केली व यूसुफ करीता बिन यमीनला रोखणे सोपे झाले. ज्याअर्थी बिन यमीनचा संबंध किनआन देशाशी होता म्हणून नवल नव्हे की आंतरराष्ट्रीय कायदा हा आसावा की, अपराधी ज्या देशाचा रहिवासी असेल, त्याला त्या देशाचा कायदा लागू केला जावा. अशा प्रकारे बिन यमीनला हजरत इब्राहीमच्या शरीअतीचा कायदा लागू केला गेला जो सर्वतोपरि योग्य होता.

या आयती संबंधाने काही प्रश्न मनात उद्भवतात परंतु प्रदीर्घतेच्या आशंकेने आम्ही विवरणात न जाता काही आवश्यक स्पष्टीकरणांना पर्याप्त समजतो.

१) आयतीतील शब्द उदा.**''मा काना लि''** क़ुरआनात 'त्याला शोभनीय नाही किंवा त्याचे हे काम नव्हे'च्या अर्थानेहि वापरले गेले आहेत आणि सामर्थ्य न बाळगणे व करु न शकणे या अर्थानेहि. पहिल्या अर्थाचे उदाहरण

مَا کَانَ لِلّٰہِ اَنۡ یَّتَّخِذَ مِنۡ وَّلَدٍ ۔ (مریم ـ ۳۵)

''अल्लाहच्या वैभवाला साजेसे नाही (किंवा अल्लाहचे हे काम नव्हे) की एखाद्याला पुत्र बनवावे'' (मरीयम-३५) आणि दुसऱ्या अर्थाचे उदाहरण

وَمَا کَانَ لِنَفۡسٍ اَنۡ تَمُوۡتَ اِلَّا بِاِذۡنِ اللّٰہِ ۔ (آل عمران ـ ۱۴۵)

''कोणताही जीव अल्लाहच्या हुकुमाशिवाय मरू शकत नाही'' (आले इमरान -१४५) हे आहे. खालील आयतीचे स्पष्टीकरणा मध्ये 'इल्ला' व्यकरणचे अर्थाने आहे (अरबी व्याकरणात याला इस्तिस्ना मुन्कते म्हणतात) म्हणून व्यकरण दृष्ट्या येथे सामर्थ्य न बळगणे किंवा अधिकार नसण्याच्या अर्थाने उचित होत आहेत म्हणजे ठेवू शकत नव्हते. दुसऱ्या शब्दात त्यांना

हा अधिकार नव्हता की आपल्या भावाला रोखून घ्यावे.

२) हजरत इब्राहीम यांना जी शरीअत दिली गेली होती त्यात संक्षिप्त आदेश सम्मिलित होते. विवरणात्मक आदेश नंतर हजरत मूसा यांच्यावर 'तौरात'च्या रुपाने अवतरीत झाले म्हणून हजरत यूसुफ यांनी मिस्र देशाची शासन-सूत्रे हाती घेतल्यावर अशी स्थिती फार कमी प्रमाणात उद्‌भवली असेल की शरीअतचा कायदा निभवणे त्यांच्याकरीता अवघड झाले असेल. उघड आहे, त्यावेळी विहित गोष्टींचे क्षेत्र फार व्यापक होते आणि जेथे शरीअतचा कायदा अबोल असेल तेथे हजरत यूसुफ करीता ही संधी असेल की न्यायाच्या चांगल्या कल्पनेनुसार आदेश व कायदे जारी करावे व जेथपावेतो देशाचे प्रचलित कायदे न्यायावर आधारीत असतील, त्यांना लागू करण्यात कोणताही शरीअत विषयक अडथळा राहिला नसेल. एका अशा देशात, जेथला समाज इस्लामशी अपरिचित होता, परंतु ज्याने हजरत यूसुफ यांना राज्याचा प्रमुख म्हणून मान्य केले होते. देशाच्या सामूहिक जीवनात क्रमाक्रमानेच परिवर्तन आणले जाऊ शकत होते. अल्लामा इब्ने तैमिय्या लिहितात. आणि यासारखी गोष्टी (म्हणजे शासन एखाद्या विशिष्ट व्यक्तिच्या हक्कात आवश्यक होण्याच्या संबंधाने) हजरत यूसुफ यांचे मिस्त्रच्या बादशहाकरीता देशाच्या खजिन्यांवर शासक होणे होय. जेव्हा बादशहा व त्याची प्रजा काफिर होती जसे आयत,

وَلَقَدْ جَآءَكُمْ يُوسُفُ مِن قَبْلُ بِالْبَيِّنٰتِ فَمَا زِلْتُمْ فِى شَكٍّ مِّمَّا جَآءَكُم بِهِۦ

''यापूर्वी यूसुफ तुमच्यावळ स्पष्ट प्रमाणांसह आले होते, परंतु त्यांनी जे मार्गदर्शन आपल्या सोबत आणले होते त्याविषयी तुम्ही संशयग्रस्तच राहिलात.'' (सूरह मोमीन- ३४) तसेच आयत,''**आ अरबाबुन मुताफ़र्रिक़ून** أَأَرْبَابٌ مُّتَفَرِّقُونَ----اَ

''काय वेगवेगळे ईश्वर अधिक चांगले कि एक अल्लाह'' सूरह यूसुफ-३९) ने स्पष्ट होते. आणि ही गोष्ट देखील स्पष्ट आहे की कुफ्रसह माल वसूल करणे व त्यास बादशहाचे निकटस्थ, मुलेबाळे, फौज व प्रजेवर खर्च करण्या संदर्भात त्यांची विशेष पद्धति खचितच राहीली असेल. अर्थात त्यांची पद्धति पैगंबरांच्या पद्धतिशी व न्यायाशी सुसंगत राहिली नसेल. परंतु हजरत यूसुफ यांच्याकरीता हे शक्य नव्हते की वाटेल ते करावे अर्थात जी गोष्ट देखील त्यांच्या नजरेत अल्लाहच्या धर्माशी संबंधित असेल ती करावी. कारण जन-समूहाने त्यांचे आवाहन कबूल केले नव्हते तरी देखील हजरत यूसुफ यांना जेवढे शक्य होते न्याय व उपकारास अमलात आणले व अधिकार प्राप्त करुन आपल्या कुटुंबाच्या ईमानधारक लोकांना तो मान सन्मान दिला जो अधिकाराशिवाय शक्य नव्हता आणि ह्या सर्व गोष्टी अल्लाहच्या या फर्माविण्यात,

فَاتَّقُوا اللّٰهَ مَا اسْتَطَعْتُمْ

(''अल्लाहचे भय बाळगा. जेवढे तुमच्या अवाक्यात असेल'' सूरह तग़ाबून -१६) सामील आहे. यास्तव जेव्हा दोन आवश्यक गोष्टींमध्ये संघर्ष होणे व दोघांना एकत्रित करणे शक्य नसावे तेव्हा जी गोष्ट अधिक ताकीद करणारी असेल तिला प्राधान्य दिले जावे. या स्थितीत दुसरी गोष्ट आवश्यक राहणार नाही आणि ना तिला सोडून देणारा. अधिक ताकीद करणाऱ्या गोष्टीस आचरणात आणल्यामुळे वास्तविकपणे एखाद्या आवश्यक गोष्टीस सोडून देणारा ठरेल.

(मजमूअ फतावा इब्ने तैमिय्या खंड २० पृ. ५६)

३) हजरत यूसुफ मिस्र देशाचे शासक होते म्हणून त्यांनी मनात आणले असते तर आपल्या पित्याशी संबंध निर्माण करु शकत होते परंतु ज्या अर्थी ते पैगंबर होते म्हणून ईश-आदेशानुसारच एखादा निर्णय घेऊ शकत होते आणि ईश्वरी योजना अशी होती की गोष्ट अजून पडद्याआडच रहावी आणि हजरत यूसुफ यांनी आपले व्यक्तिमत्व आपल्या भावांवर अशा वेळी जाहीर करावे जेव्हा त्यांची मने संकटग्रस्त होण्याच्या परिणामी पाझरावीत, यासाठी की त्यांनी आत्मसुधार मान्य करावा. आणि ही वस्तुस्थिती आहे की जे लोक उपदेश ऐकण्याकरीता तयार नसतात ते याच अवस्थेत बोध ग्रण करतात जेव्हा त्यांना ठोकर खावी लागते आणि जे लोक गाफीलपणे झोपून राहतात त्यांना परिस्थिताच्या प्रहारानेच जाग येते जर हजरत यूसुफ यांचे भाऊ सावध असते तर आपल्या पित्याच्या प्रशिक्षणात राहून उत्तम मनुष्य होऊ शकले असते. परंतु जेव्हा त्यांनी पित्याचे मार्गदर्शन असूनहि चुकीचे वर्तन अंगिकारले तेव्हा त्यांच्या सुधारणेसाठी हे आवश्यक होते की त्यांनी ठोकर खावी, जेणेकरुन त्यांना अपल्या दुर्वर्तनाची जाणीव व्हावी ईश्वराची हीच इच्छा होती जिने यांच्या मामल्यास एक विशेष दिशा दिली आणि हजरत यूसुफ यांनी त्यांच्याशी व्यवहार करण्यात असे बुद्धिकौशल्ययुक्त आचरण अंगिकारले की त्यांचे दृष्टीकोण बदलून गेले व जेव्हा त्यांचे दृष्टीकोण बदलले तेव्हा जसे पुढे माहित होईल त्यांचे जीवन- विश्वच बदलले.

४) हजरत यूसुफ यांनी आपल्या भावांच्या संदर्भात जी उपाय योजना किंवा बुद्धिकौशल्ययुक्त आचरण अंगिकारले त्याचा संबंध सुधारणेशी आहे. त्यांनी जे काही केले त्यात ना असत्याचे मिश्रण होते व ना अत्याचार वा अतिरेकाची ती गोष्ट होती किंबहुना स्वच्छ शुद्ध मनोभावे व एका महत्वपूर्ण उद्दिष्टाकरीता काही अशा उपाय योजना अंगिकारल्या गेल्या

ज्या स्थितीवत काही काळ चुकीचा प्रभाव पाडणाऱ्या होत्या, परंतु परिणामांच्या दृष्टीने त्या योग्य होत्या म्हणून हजरत यूसुफ यांच्या युक्तिपूर्ण धोरणास 'जायज़ हिल्यां'चे शिर्षक देणे व अनुचित कामांना उचित ठरविण्याकरीता 'फिकहाची किताबुल हिअल' उघडून बसणे, स्वत:ला भ्रमात टाकण्याजोगे आहे. शरीअतचा मार्ग सदाचाराचा मार्ग आहे ज्यात आवश्यकता असल्यास युक्तिपूर्ण धोरणाचा अवलंब करण्याची मुभा निश्‍चित आहे परंतु निमित्त पुढे करुन हराम गोष्टीस हलाल ठरविण्याची किंचित मात्र मुभा नाही.

१२३. संकेत या गोष्टीकडे आहे की जेव्हा हजरत यूसुफ यांनी अल्लाहने प्रदान केलेल्या ज्ञानामुळे चांगली उपाययोजना व बुद्धिकौशल्यायुक्त निती अंगिकारली आणि हिकमत व राजकारणाच्या मामल्यात न्यायाला आधार बनविले तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांचे दर्जे उंचाविले.

१२४. हा एक योग्य वेळीचा निष्कर्ष आहे प्रत्येक ज्ञानी पुरुषाकरीता की त्याला आपल्या ज्ञानाविषयी गर्व न व्हावा, किंबहुना त्याने हे चांगल्या प्रकारे जाणावे की त्यांच्यावर उच्चतम अशी एक हस्ती (अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाह) आहे ज्याच्या ज्ञानाला कसलीही सीमा नाही. कोणी कितीही मोठा प्रकांड विद्वान का असेना त्याचे ज्ञान अल्लाहच्या ज्ञानापुढे तुच्छ आहे.

१२५. जेव्हा बिन यमीनच्या गोणीतून प्याला निघाला व यूसुफच्या भावांना उत्तर देणे अशक्य झाले तेव्हा लगेच त्यांनी बिन यमीनचे सख्खे भाऊ हजरत यूसुफ यांच्यावर आरोप ठेवला की यापूर्वी त्याने देखील हे कृत्य केले आहे व आता ज्या अर्थी बिन यमीनने हे कृत्ये केले आहे तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. हा यूसुफचाच भाऊ आहे. त्यांना ठाऊक नव्हते की ज्या माणसा समोर ते एवढे मोठे असत्य कथन करीत होते, तो दुसरा कुणी नसून स्वत: हजरत यूसुफ आहे. यावरुन असे दिसते की अद्यापहि ते आपल्या मनात हजरत यूसुफ संबंधी चुकीच्या भावना लपवून होते.

१२६. जो मनुष्य एखाद्या निरपराध इसमावर खोटा आरोप लादतो तो स्वत:लाच अध:पतित करतो व स्वत:ला हीन असल्याचा पुरावा देतो.

१२७. त्यांनी हजरत यूसुफ यांना 'अजीज' या नावाने संबोधिले. अजीजचा अर्थ 'अधिकार बाळगणारा' असा आहे ही एक प्रकारची सरकारी उपाधि होती, जी मिस्र देशाच्या शासकाकरीता विशेषत्वानी होती. यावरुन हे जाहीर होते की ज्यावेळी यूसुफच्या भावांची ही घटना घडली हजरत यूसुफ मिस्र देशावर शासन करीत होते, तथापि अजून त्यांना बादशहाचे पद लाभले नव्हते.

१२८. महणजे हजरत याकूब म्हातारे झाले आहेत आणि बिन यमीनला अडवून ठेवल्याने त्यांना मोठे दु:ख होईल.

१२९. हजरत यूसुफ यांनी फार सावधगिरीचे शब्द वापरले आहेत. त्यांनी असे म्हटले नाही की 'ज्याने चोरी केली आहे' किंबहुना असे म्हटले ज्याच्याजवळून आमची वस्तू निघाली म्हणजे की वास्तविकपणे बिन यमीनने चोरी केली नाही.

فلما استيئسوا منه خلصوا نجيا ۖ
قال كبيرهم ألم تعلموا أن أباكم قد أخذ عليكم
موثقا من الله ومن قبل ما فرطتم في يوسف ۖ فلن
أبرح الأرض حتى يأذن لي أبي أو يحكم الله لي ۖ وهو
خير الحاكمين ﴿٨٠﴾

८०. जेव्हा ते यापासून निराश झाले तेव्हा अलग होऊन सल्ला मसलत करु लागले. त्यांच्यात जो मोठा होता, तो म्हणाला, काय तुम्ही नाही जाणत की तुमच्या पित्याने तुमच्याकडून अल्लाहच्या नावाने वचन घेतले आहे आणि यापूर्वी यूसुफ बाबतीतहि तुमच्याकडून चूक घडली आहे. जो पर्यंत माझे पिता मला आदेश देत नाही किंवा अल्लाह माझ्या हक्कात एखादा फैसला फर्मावित नाही तोपर्यंत मी या देशातून जाणार नाही. आणि तो सर्वात चांगला फैसला करणारा आहे. [१३०]

ارجعوا إلى أبيكم فقولوا يا أبانا إن
ابنك سرق وما شهدنا إلا بما علمنا وما كنا
للغيب حافظين ﴿٨١﴾

८१. तुम्ही लोक आपल्या पित्याजवळ जा आणि सांगा हे पिता ! तुमच्या पुत्राने चोरी केली [१३१] आणि आम्ही तीच गोष्ट निवेदन केली जिचे आम्हाला ज्ञान झाले. अपरोक्ष गोष्टीचे निरीक्षक तर आम्ही नव्हतो.

واسأل القرية التي كنا فيها
والعير التي أقبلنا فيها ۖ وإنا لصادقون ﴿٨٢﴾

८२. आपण त्या वस्तीच्या लोकांना विचारा, जेथे आम्ही मुक्काम केला होता आणि त्या काफिल्या वाल्यांना विचारा ज्यांच्या सोबत आम्ही आलो आहोत [१३२] आम्ही (आपल्या निवेदनात) अगदी सच्चे आहोत.

قال بل سولت لكم أنفسكم أمرا ۖ فصبر جميل ۖ
عسى الله أن يأتيني بهم جميعا ۚ
إنه هو العليم الحكيم ﴿٨٣﴾

८३. तो म्हणाला, नाही, किंबहुना तुमच्या मनाने एक गोष्ट गढून घेतली आहे. [१३३] तेव्हा मला आता चांगल्या प्रकारे सबूरीने काम घ्यावे लागेल. नवल नव्हे की अल्लाह या सर्वांना माझ्याजवळ घेऊन येईल. [१३४] निःसंशय तो सर्व काही जाणणारा व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे .[१३५]

وتولى عنهم وقال يا أسفى على يوسف وابيضت
عيناه من الحزن فهو كظيم ﴿٨٤﴾

८४. आणि त्याने त्यांच्याकडून तोंड फिरविले व आवेगात म्हणू लागला. हाय यूसुफ ! दुःखातिरेकाने त्याचे डोळे पांढरे झाले व तो उदास राहू लागला. [१३६]

قالوا تالله تفتأ تذكر يوسف حتى
تكون حرضا أو تكون من الهالكين ﴿٨٥﴾

८५. ते म्हणू लागले अल्लाह शपथ, आपण नेहमी यूसुफचीच आठवण करीत राहाल, येथपावेतो की स्वतःला झुरवाल किंवा मरण पावाल.

१३०. हजरत यूसुफ यांच्या भावांमध्ये सर्वात मोठा रुबेन होता (उत्पती:४६:९) त्याच्या या निवेदनावरुन जाहीर होते की हे सर्व भाऊ अल्लाहवर ईमान राखत होते तथापि त्यांच्यात नैतिक व आचरण विषयक दोष निर्माण झाले होते.

१३१. त्यांनी आपल्या पित्यास असे म्हटले नाही की 'आमच्या भावाने चोरी केली आहे' किंबहुना 'तुमच्या मुलाने चोरी केली' असे म्हणाले. त्यांची ही शैली उपरोधात्मक होती.

१३२. म्हणजे या घटनेची चर्चा सर्वत्र झाली आहे म्हणून आपण मिस्रच्या रहिवाश्यांना किंवा ज्यांच्यासोबत आलो त्या काफिल्या वाल्यांना यासंबंधी विचारु शकता.

१३३. म्हणजे ह्या गोष्टीवर की बिन यमीनने चोरी केली तुम्ही विश्वास ठेवू शकता. परंतु मी खात्री करु शकत नाही कारण मी यांच्या चारित्र्याशी चांगल्याप्रकारे परिचित आहे आणि सत्य घटना हीच होती की बिन यमीनने ना चोरी केली होती ना हज़रत यूसुफ यांनी चोरीचा आरोप ठेवला होता. किंबहुना स्थितीचे स्वरुपच असे होते की त्या लोकांनी हे गृहीत धरले की बिन यमीनने चोरी केली आहे.

१३४. हजरत याकूब त्या स्वप्नामूळे जे हज़रत यूसुफ यांनी पहिले होते. अशा बाळगून होते की हजरत यूसुफ जीवंत असतील व एक दिवस त्यांचे स्वप्न पूरे होईल.

१३५. हजरत याकूब यांनी या प्रसंगी सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या दोन वैशिष्ट्यांचा जो उल्लेख केला आहे, तर त्याद्वारे हे स्पष्ट करण्याचा हेतु होता की हजरत यूसुफ व बिन यमीनचे वृत्तांत केवळ वृत्तांत नाहीत. किंबहुना त्यांच्यामागे सर्वश्रेष्ठ अल्लाहची महान योजना कार्यान्वित आहे व ती ज्ञान आणि हिकमतीवर आधारीत आहे.

१३६. यावरुन असे दिसते की हजरत याकूब यांना हज़रत यूसुफ यांच्या दुरावण्याचे किती मोठे दु:ख झाले होते. त्यांच्या अंत: करणातहि मानवी-भावना होत्या. तेव्हा पुत्र-वियोगाचे दु:ख का म्हणून झाले नसते. परंतु ज्या संयमाने ते सहन करीत होते त्यात त्या लोकांकरीता आदर्श आहे ज्यांना जगात या प्रकारचे दु:ख पोहोचत आहे.

८६. तो म्हणाला, मी आपली विवंचना व आपल्या दु:खाचे गाऱ्हणे अल्लाहपुढेच मांडतो [१३७] आणि मी अल्लाहतर्फे त्या गोष्टी जाणतो, ज्या तुम्ही जाणत नाहीत. [१३८]

قَالَ إِنَّمَآ أَشْكُوا بَثِّي وَحُزْنِيٓ إِلَى ٱللَّهِ
وَأَعْلَمُ مِنَ ٱللَّهِ مَا لَا تَعْلَمُونَ ﴿٨٦﴾

८७. पुत्रांनो ! जा आणि यूसुफ व त्याच्या भावाचा शोध घ्या आणि अल्लाहच्या कृपेपासून निराश होऊ नका. त्याच्या कृपेपासून तर काफिर (अल्लाहवर श्रद्धा न ठेवणारे ) च निराश होतात.

يَٰبَنِيَّ ٱذْهَبُوا فَتَحَسَّسُوا مِن يُوسُفَ وَأَخِيهِ وَلَا تَاْيْـَٔسُوا
مِن رَّوْحِ ٱللَّهِ إِنَّهُۥ لَا يَاْيْـَٔسُ مِن رَّوْحِ ٱللَّهِ إِلَّا ٱلْقَوْمُ
ٱلْكَٰفِرُونَ ﴿٨٧﴾

८८. जेव्हा ते त्याच्याजवळ पोहोचले तेव्हा म्हणाले, हे अजीज ![१३९] आम्ही आणि आमच्या घरातील लोक मोठ्या बिकट स्थितीत ग्रस्त आहेत. आणि आम्ही अल्पसे द्रष्य घेऊन आलो आहोत, तेव्हा आपण आम्हाला धान्य पूरेपूर द्यावे आणि सदका (दान) देखील द्यावा. अल्लाह सदका देणाऱ्यांना मोबदला देतो.

فَلَمَّا دَخَلُوا عَلَيْهِ قَالُوا يَٰٓأَيُّهَا ٱلْعَزِيزُ مَسَّنَا
وَأَهْلَنَا ٱلضُّرُّ وَجِئْنَا بِبِضَٰعَةٍ مُّزْجَىٰةٍ فَأَوْفِ لَنَا ٱلْكَيْلَ
وَتَصَدَّقْ عَلَيْنَآ إِنَّ ٱللَّهَ يَجْزِي ٱلْمُتَصَدِّقِينَ ﴿٨٨﴾

८९. तो म्हणाला, तुम्हाला माहित आहे की तुम्ही यूसुफ व त्याच्या भावाशी काय वर्तन केले, जेव्हा तुम्ही अज्ञानग्रस्त होते ?

قَالَ هَلْ عَلِمْتُم مَّا فَعَلْتُم بِيُوسُفَ وَأَخِيهِ
إِذْ أَنتُمْ جَٰهِلُونَ ﴿٨٩﴾

९०. ते म्हणाले, काय खरोखरीच आपण यूसुफ आहात ? तो म्हणाला, होय मी यूसुफ आहे [१४०] आणि हा माझा भाऊ आहे. अल्लाहने अमच्यावर कृपा केली आणि वस्तुस्थिती अशी की जो कोणी तक़्वा (ईश-भय) अंगिकारतो आणि धैर्य बाळगतो तर अल्लाह अशा सदाचारी लोकांचा मोबदला वाया जाऊ देत नाही.[१४१]

قَالُوٓا أَءِنَّكَ لَأَنتَ يُوسُفُ قَالَ أَنَا۠ يُوسُفُ وَهَٰذَآ أَخِي
قَدْ مَنَّ ٱللَّهُ عَلَيْنَآ إِنَّهُۥ مَن يَتَّقِ وَيَصْبِرْ فَإِنَّ ٱللَّهَ
لَا يُضِيعُ أَجْرَ ٱلْمُحْسِنِينَ ﴿٩٠﴾

९१. ते म्हणाले, अल्लाह शपथ अल्लाहने आपणास आम्हावर श्रेष्ठत्व दिले आणि खरोखर आम्ही अपराधी होतो. [१४२]

قَالُوا تَٱللَّهِ لَقَدْ ءَاثَرَكَ
ٱللَّهُ عَلَيْنَا وَإِن كُنَّا لَخَٰطِـِٔينَ ﴿٩١﴾

९२. तो म्हणाला आजच्या दिवस तुम्हावर कोणताही दोषारोप नाही [१४३] अल्लाह तुम्हाला क्षमा करो व तो सर्वाहून अधिक कृपा करणारा आहे.

قَالَ لَا تَثْرِيبَ عَلَيْكُمُ
ٱلْيَوْمَ يَغْفِرُ ٱللَّهُ لَكُمْ وَهُوَ أَرْحَمُ ٱلرَّٰحِمِينَ ﴿٩٢﴾

१३७. अल्लाहशी गाऱ्हाणे करण्या-करण्यात मोठा फरक आहे अल्लाहचे गाऱ्हाणे मनुष्य, निर्मित्ती समोर करतो. हे अल्लाह विषयी चुकीचे अनुमानहि होय व उतावळेपणाची अभिव्यक्ति देखील, तथापि अल्लाहशी गाऱ्हणे त्याच्याच समोर केले जाते जे एक दु:खी मनाची फिर्यादहि आहे व त्याच्याशी आशा बाळगण्याची अभिव्यक्तिहि.

१३८. हजरत याकूब पैगंबर होते. त्यांच्या या निवेदनावरुन जाहीर होते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना 'वही' (ईश-संदेशा) द्वारे, दर्शविले की हजरत यूसुफ मेले नाहीत किंबहुना जीवंत आहेत व एक दिवस त्यांची भेट होणार आहे. या गोष्टीने त्यांच्यात हज़रत यूसुफशी भेट घेण्याचा उत्साह निर्माण केला होता, मग हेहि सत्य आहे की जर एखाद्याचा लाडका पुत्र मरण पावतो तेव्हा त्याला दु:ख निश्चित होते. तथापि हे दु:ख वेळेपुरते असते. याऊलट जर त्याचा लाडका पुत्र हरवतो तेव्हा त्या स्थितीत जे दु:ख होते ते केवळ असह्यच नसते तर कोण जाणो आपला मुलगा कोणत्या स्थितीत असेल या विचाराने विमनस्क व बेचैन होतो. हजरत याकूब यांच्या दुखाचे स्वरुप हेच होते.

१३९. यूसुफचे भाऊबंद किनआनहून मिस्त्र देशी आले व हजरत यूसुफ जवळ पोहोचले व त्यांना 'अजीज' या विशेषणाने संबोधले.

१४०. हजरत यूसुफ यांनी जेव्हा आपल्या भावांची विवंचना पाहिली की ते दुष्काळाच्या बिकट स्थितीने व हलाखीमुळे दानधर्म मागण्यास प्रवृत्त झाले आहेत तेव्हा त्यांच्याने राहावले गेले नाही आणि संधीला योग्य जाणून त्यांनी आपले खरे नाव त्यांना सांगितले जे आतापर्यंत गुप्त होते. नाव गुप्त असण्याचे कारण असे की यूसुफ मिस्त्रचे शासक असल्यामुळे त्यांना अजीज ही पदवी बहाल केली गेली. तसेच बायबलच्या उल्लेखानुसार बादशहाने त्यांचे दुसरे नाव ठेवले होते (उत्पत्ती ४१:४५) यास्तव शासनाची सूत्रे सांभाळल्यानंतर ते मिस्त्र देशात नव्या नावाने प्रसिद्ध झाले असतील.

हजरत यूसुफ यांना जेव्हा विहीरीत फेकले गेले होते तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना याविषयी पूर्व सूचना दिली की एक वेळ अशी येईल की जेव्हा तुम्ही यांना त्या व्यवहाराची आठवण करुन द्याल, जो आज तुमच्याशी ते करीत आहेत. वस्तुत: त्यांना या गोष्टीची कल्पना देखील नसेल. (आयत:१५). सर्वश्रेष्ठ आल्लाहचे हे वचन अगदी खरे ठरले. म्हणून हजरत यूसुफ यांनी या प्रसंगी आपल्या भावांना त्या घटनेची आठवण करून दिली जेव्हा ते या विषयी अनभिज्ञ होते की ते ज्याच्या बरोबर संभाषण करीत आहोत तो दुसरा कोणी नसून स्वत: यूसुफ आहे.

१४१. म्हणजे ईश-भय व सदाचाराचे वर्तन अंगिकाराणाऱ्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह इहलोकातहि आपल्या कृपेने उपकृत करतो.

१४२. परिस्थितीने त्यांना चांगलेच झिंझोडले होते परंतु जेव्हा त्यांनी अल्लाहच्या सामर्थ्याचा हा अद्‌भूत चमत्कार पाहिला की ज्या माणसाला त्यांनी विहीरीत फेकून दिले होते तो आज संपूर्ण मिस्त्र देशावर शासन करीत आहे तेव्हा त्यांना आपल्या दुष्कृत्याची जाणीव झाली व तत्क्षणी त्यांनी आपला अपराध कबूल केला. यावरुन असे दिसून येते की परिस्थितीची बिकटता माणसाच्या प्रशिक्षणास कारणीभूत ठरते व ईश-सामर्थ्याचे चमत्कार त्याच्या मन मस्तिष्कास जागृत करण्यास कारणीभूत ठरतात.

१४३. चारीत्र्य आणि सभ्यतेचे केवढे उच्च उदाहरण आहे. जे हज़रत यूसुफ यांनी कायम केले की अशा वेळी आपल्या भावांशी सूड घेण्यास पूर्णात: समर्थ होते त्यांनी कोणताहि बदला घेतला नाही किंबहुना त्यांना माफ केले व त्यांच्याशी उपकाराची वागणूक केली.चारित्र्याची हीच महानता होय जी मनाला मोहून घेते व शत्रूलाहि मित्र बनविते. ही सूरह अवतरीत होत असतांना मक्केत कुरेशच्या दोन समूहांच्या दरम्यान जो संघर्ष निर्माण झाला होता तो लक्षात घेता यूसुफ व त्यांच्या भावाचा हा वृत्तांत, योग्य वेळीचे मार्गदर्शन होते आणि मक्का-विजयाच्या प्रसंगी पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी सार्वजनिक माफीची घोषणा करतांना ह्याच शब्दांची पुनरावृत्ति केली की

لَا تَثْرِيبَ عَلَيْكُمُ الْيَوْمَ

'आजच्या दिवशी तुमच्यावर कोणताहि दोषारोप नाही'

९३. माझा हा अंगरखा घेऊन जा व माझ्या पित्याच्या चेहऱ्यावर टाका. त्यांची दृष्टि परत येईल [१४४] आणि आपल्या समस्त कुटुंबियांना घेऊन माझ्याजवळ या.[१४५]

اِذْهَبُوْا بِقَمِيْصِيْ هٰذَا فَاَلْقُوْهُ عَلٰى وَجْهِ اَبِيْ يَاْتِ
بَصِيْرًا ۚ وَاْتُوْنِيْ بِاَهْلِكُمْ اَجْمَعِيْنَ ﴿۹۳﴾

९४. मग जेव्हा काफिला रवाना झाला तेव्हा त्यांचे पिता म्हणू लागले, जर तुम्ही लोक, मला म्हातारचळ लागले आहे असे म्हणत नसाल तर मी म्हणेन मला यूसुफचा सुगंध येत आहे.[१४६]

وَلَمَّا فَصَلَتِ الْعِيْرُ قَالَ اَبُوْهُمْ اِنِّيْ لَاَجِدُ رِيْحَ
يُوْسُفَ لَوْلَآ اَنْ تُفَنِّدُوْنِ ﴿۹۴﴾

९५. लोक म्हणाले, अल्लाह शपथ, आपण आपल्या जुन्या भ्रमातच ग्रस्त आहात. [१४७]

قَالُوْا تَاللّٰهِ اِنَّكَ لَفِيْ ضَلٰلِكَ الْقَدِيْمِ ﴿۹۵﴾

९६. मग जेव्हा खुशखबरी देणारा आला तेव्हा त्याने अंगरखा त्याच्या चेहऱ्यावर टाकला व त्याची दृष्टि परत आली. [१४८] तो म्हणाला की मी तुम्हाला सांगितले नव्हते मी अल्लाहतर्फे त्या गोष्टी जाणतो ज्या तुम्ही जाणत नाही. [१४९]

فَلَمَّآ اَنْ جَآءَ الْبَشِيْرُ اَلْقٰىهُ عَلٰى وَجْهِهٖ فَارْتَدَّ بَصِيْرًا ۚ
قَالَ اَلَمْ اَقُلْ لَّكُمْ ۚ اِنِّيْٓ اَعْلَمُ مِنَ اللّٰهِ مَا لَا تَعْلَمُوْنَ ﴿۹۶﴾

९७. ते म्हणू लागले, हे पिता, आमच्या अपराधांच्या माफीकरीता दुआ करा. खरोखर आम्ही अपराधी होतो. [१५०]

قَالُوْا يٰٓاَبَانَا اسْتَغْفِرْ لَنَا ذُنُوْبَنَآ اِنَّا كُنَّا خٰطِئِيْنَ ﴿۹۷﴾

९८. तो म्हणाला, मी आपल्या पालनकर्त्याशी तुमच्या करीता दुआ करीन.[१५१] नि:संशय तो मोठा माफ करणारा, कृपा करणारा आहे.

قَالَ سَوْفَ اَسْتَغْفِرُ لَكُمْ رَبِّيْ ۭ اِنَّهٗ هُوَ الْغَفُوْرُ الرَّحِيْمُ ﴿۹۸﴾

९९. मग जेव्हा हे लोक यूसुफ जवळ पोहोचले तेव्हा त्याने आपल्या माता पित्यास आपल्याजवळ जागा दिली आणि म्हणाला, मिस्त्र मध्ये दाखल व्हा अल्लाहने इच्छिल्यास शांती व सुखाने. [१५२]

فَلَمَّا دَخَلُوْا عَلٰى يُوْسُفَ اٰوٰٓى اِلَيْهِ اَبَوَيْهِ وَقَالَ ادْخُلُوْا
مِصْرَ اِنْ شَآءَ اللّٰهُ اٰمِنِيْنَ ۭ﴿۹۹﴾

१४४. याचे स्पष्टीकरण पुढे टीप क्र.१४८ मध्ये येत आहे.

१४५. हजरत यूसुफ यांनी आपले पिता याकूब यांच्या संपूर्ण कुटुंबास मिस्र बोलावले एखाद्या पैगंबराचे अन्य ठिकाणी स्थानांतर अल्लाहच्या आदेशान्वयेच होऊ शकते म्हणून हजरत यूसुफ ईश संदेशान्वये संकेत प्राप्त करुन असे म्हणाले असतील.

१४६. हज़रत यूसुफ मिस्र देशात दीर्घ काळापासून होते, परंतु हजरत याकूब यांना त्यांचा सुगंध आला नाही, परंतु आता जेव्हा काफिला मिस्त्रकडे चालला तेव्हा त्यांना यूसुफचा सुगंध जाणवला यावरुन असे दिसते की ही सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे प्रेरणा (Inspiration) होती जी हजरत याकूब यांच्या मनाला जाणवली.

अनुमान प्रमाण आहे की येथे यूसुफच्या गंधाशी अभिप्रेत यूसुफचा शोध लागल्याची आनंद-वार्ता होय. ही खुशखबरी हज़रत याकूब यांना ईश-आदेशान्वये त्याच वेळी मिळाली जेव्हा तो .... काफिला यूसुफचा अंगरखा घेऊन मिस्त्रहून किनआनकडे निघाला परंतु ही खुशखबरी संकेतार्थी होती. उघडपणे ही खुश खबरी त्यांना अशा वेळी मिळाली जेव्हा काफिला त्यांच्या सेवेत हजर झाला.

१४७. ही गोष्ट त्यांच्या कुटुंबियांच्या मुखातून निघाली असेल व ते या कारणास्तव बोलले असतील की हज़रत याकूब हज़रत यूसुफ यांच्या स्मरणात लीन सतात हे त्यांनी नेहमी पाहिले होते म्हणून त्यांना वाटले की आता यूसुफचा सुगंध जाणवत असल्याचा उल्लेख करीत आहेत, ती केवळ कल्पनाच होय यावरुन हे दिसते की ते लोक ना पैगंबराच्या महानतेस योग्यपणे समजू शकत होते, ना त्यांना या गोष्टीचे अनुमान होते की यूसुफ-गंधाचा संबंध ईश-प्रेरणेशी (Inspiration)आहे.

१४८. ही असामान्य घटना सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्याचा चमत्कार होता आणि या प्रकारचे चमत्कार सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबरांच्याद्वारे उदयास आणत राहिला व त्यांच्या माध्यमाने पैगंबरांच्या समर्थन व मदत करीत राहिला. केवळ या कारणास्तव की सर्व सामान्यपणे आमच्या अनुभवात या प्रकारच्या गोष्टी येत नाहीत. त्यांचा इन्कार करणे योग्य नव्हे, वस्तुत: त्याची खबर आम्हला अशा मध्यमान्वये मिळते. ज्याची सत्यता संशयापासून उच्च आहे.

पवित्र क़ुरआनाच्या पानांमध्ये इतिहासाच्या अशा कित्येक घटना अंकित आहेत, यासाठी की माणसाने आपल्या मर्यादित ज्ञान व अनुभवालाच सर्व काही समजून न घ्यावे किंबहुना त्याची दृष्टि या वस्तुस्थितीवर असावी की या समस्त सृष्टीचा एकमात्र ईश्वर आहे जो सृष्टी व्यवस्था चालवितो आणि जो आल्या सामर्थ्याचे चमत्कार ज्या प्रकारे इच्छितो दाखवितो.

१४९. हजरत याकूब यांच्या या वर्णनावरुन उघड आहे की त्यांना हज़रत यूसुफ संबंधी ईश-आदेशाच्या माध्यमाने हे माहित झाले होते की ते जीवंत आहेत म्हणून आपल्या प्राणप्रिय पुत्रास भेटण्याची उत्कट इच्छा त्यांच्या मनास उचंबळत होती, तथापि या प्रसंगी सर्वश्रेष्ठ अल्लाह याकूबच्या संयमाचीहि परीक्षा घेऊ इच्छित होता म्हणून हज़रत यूसुफचा संपूर्ण अहवाल त्यांच्यावर जाहीर केला गेला नाही.

१५०. अशा प्रकारे मुलांनी आपण अपराधी असल्याचे आपल्या पित्यासमोरहि मान्य केले व त्यांना विनंति केली की आमच्या अपराधांना क्षमा केले जावे म्हणून अल्लाहशी आपण प्रार्थना करा. ही आहे माणसाची दशा, तो भला होतो व बिघडतोहि आणि बिघडून पुन्हा चांगला होतो म्हणून त्याच्या सुधारणेचा प्रयत्न जारी राहिला पाहिजे न जाणो कोणत्या वेळी त्याचा अंतरात्मा जागृत व्हावा.

१५१. दुआला तहकूब करण्याचे एक कारण तर हे असू शकते की हजरत याकूब आपल्या मुलांच्या वर्तनास पाहू इच्छित असावेत की यांनी खरोखर सुधारणा कबूल केली आहे किंवा नाही आणि दुसरा मामला ज्याअर्थी हजरत यूसुफशी संबंधित होता म्हणून त्या वेळेस त्यांनी दुआ कबूल होण्यास अधिक योग्य जाणले असावे जेव्हा यूसुफ जवळ सर्व एकत्रित होतील.

१५२. हजरत यूसुफ आपल्या माता पित्याच्या स्वागतासाठी मिस्र देशाच्या हद्दीवर स्वत:गेले व तेथे आपल्या कुटुंबियांचे स्वागत करीत आपल्या माता- पित्यास मान-सन्मानाने विशेषरित्या आपल्या जवळ बसविले व त्यांना सांगितले की आता मिस्त्र देशात दाखल व्हा. अल्लाहने इच्छिल्यास आपणास येथे सर्व प्रकारची सुख शांती लाभेल.

وَرَفَعَ اَبَوَيْهِ عَلَى الْعَرْشِ
وَخَرُّوْا لَهٗ سُجَّدًا ۚ وَقَالَ يٰۤاَبَتِ هٰذَا تَاْوِيْلُ رُءْيَايَ مِنْ
قَبْلُ ۫ قَدْ جَعَلَهَا رَبِّيْ حَقًّا ۗ وَقَدْ اَحْسَنَ بِيْۤ اِذْ اَخْرَجَنِيْ
مِنَ السِّجْنِ وَجَآءَ بِكُمْ مِّنَ الْبَدْوِ مِنْۢ بَعْدِ اَنْ نَّزَغَ
الشَّيْطٰنُ بَيْنِيْ وَبَيْنَ اِخْوَتِيْ ۗ اِنَّ رَبِّيْ لَطِيْفٌ لِّمَا يَشَآءُ ۗ
اِنَّهٗ هُوَ الْعَلِيْمُ الْحَكِيْمُ ﴿١٠٠﴾

**१००.** आणि आपल्या माता-पित्यास सिंहासनावर उच्च स्थानी बसविले आणि ते त्याच्या पुढे झुकले [१५३] तो म्हणाला, हे पिता ! हा आहे अर्थ माझ्या त्या स्वप्नाचा जे मी पूर्वी पाहिले होते. माझ्या पालनकर्त्याने खरे करुन दाखविले. ही त्याचीच कृपा होय की मला कैदखान्यातून काढले व तुम्हा लोकांना वाळवंटातून (काढून माझ्याजवळ) आणले अशा परिस्थितीत की, सैतानाने माझ्या व माझ्या भावांच्या दरम्यान उपद्रव माजविला होता नि:संशय माझा पालनकर्ता जे काही इच्छितो त्यासाठी सुक्ष्म उपाय योजना करतो.तो ज्ञानीहि आहे व बुद्धिकौशल्य बाळगणारा देखील. [१५४]

رَبِّ قَدْ اٰتَيْتَنِيْ مِنَ الْمُلْكِ وَ عَلَّمْتَنِيْ مِنْ تَاْوِيْلِ
الْاَحَادِيْثِ ۚ فَاطِرَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۫ اَنْتَ وَلِيّٖ فِي الدُّنْيَا
وَالْاٰخِرَةِ ۚ تَوَفَّنِيْ مُسْلِمًا وَّاَلْحِقْنِيْ بِالصّٰلِحِيْنَ ﴿١٠١﴾

**१०१.** हे माझ्या पालनकर्त्या ! तू मला राज्य शासन प्रदान केलेस व गोष्टींचा अर्थ लावणयास शिकविले. आकाश व जमीनीस निर्माण करणाऱ्या ! तूच इहलोक व आखिरतमध्ये माझा पाठीराखा आहेस. मला अशा स्थितीत मरण येऊ दे की मी मुस्लिम असावे आणि मला सदाचारी लोकांच्या समूहात सामील कर.[१५५]

ذٰلِكَ مِنْ اَنْۢبَآءِ الْغَيْبِ نُوْحِيْهِ اِلَيْكَ ۚ
وَمَا كُنْتَ لَدَيْهِمْ اِذْ اَجْمَعُوْۤا اَمْرَهُمْ وَهُمْ يَمْكُرُوْنَ ﴿١٠٢﴾

**१०२.** हे अपरोक्षातील खबरींपैकी आहे ज्याचे आम्ही तुम्हावर 'वह्य' करीत आहोत. अन्यथा त्यांनी जेव्हा आपसात एक गोष्ट निश्‍चित करुन कारस्थान रचले होते त्यावेळी तुम्ही त्यांच्या जवळ हजर नव्हता. [१५६]

وَمَاۤ اَكْثَرُ النَّاسِ وَلَوْ حَرَصْتَ بِمُؤْمِنِيْنَ ﴿١٠٣﴾

**१०३.** आणि बहुतेक लोकांची ही दशा आहे की तुम्ही कितीही इच्छा बाळगा ते ईमान बाळगणारे नाहीत.[१५७]

وَمَا تَسْـَٔلُهُمْ عَلَيْهِ مِنْ اَجْرٍ ۚ اِنْ هُوَ اِلَّا ذِكْرٌ لِّلْعٰلَمِيْنَ ﴿١٠٤﴾

**१०४.** अशा स्थितीत की याबाबत तुम्ही त्यांच्याकडून एखाद्या मोबदल्याची अपेक्षा बाळगत नाही [१५८] ही तर एक स्मरणिका आहे समस्त इहलोकवासीयांकरीता. [१५९]

وَكَاَيِّنْ مِّنْ اٰيَةٍ فِي السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ يَمُرُّوْنَ
عَلَيْهَا وَهُمْ عَنْهَا مُعْرِضُوْنَ ﴿١٠٥﴾

**१०५.** आणि आकाशांमध्ये व जमीनीवर कित्येक निशाण्या आहेत, ज्याच्याजवळून हे लोक गुदरतात परंतु काहीहि लक्ष देत नाही.[१६०]

१५३. म्हणजे जेव्हा मिस्त्रच्या राजधानीत पोहोचले व हजरत यूसुफ यांचा दरबार भरला तेव्हा हज़रत यूसुफ यांनी पारंपारीक गोष्टीचा विचार न करता आपल्या माता पित्यांना अत्याधिक मान सन्मान दिला व त्यांना सिंहासनावर बसविले.

हजरत यूसुफ यांच्या हाती आता पूर्ण सत्ता आली होती व ते सिंहासनाचे स्वामी बनले होते, म्हणूनच आपल्या माता पित्यास सिंहासनावर बसविण्या योग्य ते झाले होते. त्या प्रसंगी दरबारी लोकांमध्ये एक नवी शान निर्माण झाली होती. जुन्या स्मृतीना उजाळा मिळत होता आणि हजरत यूसुफ यांच्या क्षमाशीलतेने व उच्च चारीत्र्याने त्यांच्या भावांना अतिश्य प्रभावित केले होते.त्यांनी जेव्हा हे पाहिले की हा मनुष्य बादशहा होऊन देखील इतका विनम्र आहे की आपल्या माता पित्यास राजसिंहासनावर बसवितो तेव्हा अगतिक होऊन त्याच्यापुढे झुकले. ही आंतरिक भावना होती जिने त्यांना झुकविले. हजरत यूसुफ यांनी त्यांना झुकण्याचा आदेश दिला नव्हता व ना हा सन्मानार्थ (तअज़ीमी) सजदा होता किंबहुना अनुकंपामय वातावरणाच्या प्रभावाखाली ते आपोआप झुकले होते व हजरत युसुफ यांनी हे केवळ एवढ्यासाठी सहन केले की जे स्वप्न त्यांनी आपल्या किशोरवयात पाहिले होते त्याचा हा उलगडा होता. अशा प्रकारे अल्लाहची योजना लागू होऊनच राहिली व ते सर्व हजरत यूसुफ यांच्या अधिकाराखाली आले. आता चर्चेचे काही मुद्दे शिल्लक राहतात:-

१) मूळ ग्रंथात خَرُّوا لَهٗ سُجَّدًا 'खर्रु लहू सुज्जदा' हे शब्द प्रयोगात आले आहेत. त्याचा एक अनुवाद तर 'ते त्याच्यापुढे सजद्यात पडले' असा होता तर दुसरा अनुवाद ते त्याच्या पुढे झुकले' असा होऊ शकतो संभाषण प्रसंगाच्या दृष्टीने हा दुसरा अनुवादच उचित आहे साजद्याचा अर्थ टीप क्र. ७ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे केवळ झुकण्याच्या अर्थानेहि वापरला गेला आहे व हजरत यूसुफ यांच्या भावांचे झुकणे त्या स्वप्नाचा उलगडा होता ज्यात हज़रत यूसुफ यांनी ताऱ्यांना आपल्यापुढे झुकत असलेले पाहिले होते, म्हणून येथे पारिभाषिक सजद्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ताऱ्यांना काय शिर असते की त्यांनी सजदा म्हणून आपला माथा जमीनीवर टेकवावा. ताऱ्यांच्या सजदा करण्याचा हाच अर्थ होऊ शकतो की ते उंचीवरुन खाली येऊन यूसुफच्या दिशेने झुकले असावेत म्हणून यूसुफ पुढे जेव्हा त्यांचे भाऊ झुकले तेव्हा ते स्वप्न खरे झाले. خَرُّوا **'खररू'** चा शाब्दिक अर्थ आहे 'ते पडले' हा शब्द हे जाहीर करतो की यूसुफचे भाऊ स्वयंप्रेरित होऊन झुकले होते म्हणजे वातावरण काहीसे असे झाले होते की आंतरिक भावनेचे प्रभावित होऊन ते यूसुफ पुढे नतमस्तक झाले. दुसऱ्या शब्दात, बाह्यत:एखाद्याने त्यांना झुकण्यासाठी पवृत्त केले नव्हते त्यांनी ही कृति स्वत: सहजासहजी केली होती. आणि हे निवेदन करण्यात क़ुरआनाचा हेतु हे स्पष्ट करणे होय की यूसुफच्या भावांना शेवटी त्यांच्यापुढे झुकावे लागले व त्यांच्या सत्तेखाली यावे लागले.

२) या सजद्याचे इबादत (उपासना) असण्याचा तर प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण कोणताहि पैगंबर आपल्यासाठी उपासनेचा सजदा सहन करुच शकत नाही राहिले या सजद्याचे (तअज़ीमी) आदराप्रित्यर्थ असणे तर हेहि योग्य नव्हे कारण ना हजरत यूसुफ यांनी तसा आदेश दिला होता ना त्यांनी आपल्यासाठी अशाप्रकारचे शिष्टाचार प्रचलीत केले होते की लोकांनी त्यांच्यापुढे सन्मानार्थ सजदा करावा. पवित्र कुरआनात यासाठी कोणतेहि प्रमाण नाही. आयतीत जे काही सांगितले गेले आहे फक्त एवढेच की यूसुफचे भाऊ आपोआप त्यांच्यापुढे झुकले होते.

आयतीचा मतितार्थ स्पष्ट झाल्यावर त्या लोकांच्या विचाराचे/कल्पनेचे आपोआप खंडन होते ज्यांनी सन्मानार्थ सजद्यास (सजदा तअज़ीमीला) योग्य ठरविण्याकरीता या आयतीचा आधार घेतला आहे मग पीर, बुजुर्ग दरगाह व बादशहांना सजदा करणे उचित ठरविले आहे. मोगल राजांनीहि आपल्याकरीता सन्मानार्थ सजदा जारी केला होता परंतु शेख अहमद सरहिंदी यांनी या शरीअत विरुद्ध प्रथेच्या विरोधात जबरदस्त जिहाद केले.

३) हजरत यूसुफ यांनी आपल्या माता-पित्यास आधीच सिंहासनावर बसविले होते म्हणून त्यांच्यापुढे झुकण्यात ते सामील नव्हते. राहिला हा प्रश्न कि त्यांच्या न झुकण्याने स्वप्नाचा अर्थ कसा खरा ठरतो? याचे उत्तर असे की हजरत यूसुफ यांनी आपले जे स्वप्न निवैदिले आहे (आयत क्र.५) त्यात दोन भागांचा समावेश होता एक हा की, 'मी अकरा तारे व सूर्य आणि चंद्राला पाहिले आहे' व दुसरा हा की 'मी पाहिले की ते माझ्यापुढे झुकले आहेत' या दुसऱ्या भागात त्यांनी सामूहिक रुपाने त्यांच्या झुकण्यासंबंधी सांगितले होते व्यक्तिश: प्रत्येक जणाच्या झुकण्याचा उल्लेख केला नाही म्हणून सामूहिक रुपाने येथे देखील झुकण्याची गोष्ट खरी ठरली, त्यांचे माता-पिता झुकण्यात सहभागी नसले तरी स्वप्नाचा खरा अर्थ असा की सर्व हजरत यूसुफच्या आधिपत्याखाली आले आणि ही गोष्ट अशाप्रकारे पूर्ण झाली की त्याचे माता-पिता भाऊ-बंद सर्वजण देशत्याग करुन हजरत यूसुफ जवळ आले व त्यांच्या अधिकाराखाली राहणे सर्वानी मान्य केले.

४) हजरत यूसुफ ज्या वेळी मिस्त्रचे शासक म्हणून नियुक्त झाले त्यावेळी ते सिंहासनाचे स्वामी बनले नव्हते किंबहुना प्रथेनुसार बादशहाच सिंहासनाचा स्वामी राहिला असेल नंतर हजरत यूसुफ यांची पोजीशन मजबूत होत गेली व त्यांचे भाऊ जेव्हा धान्य घेण्यासाठी आले तेव्हा ते मिस्त्रचे शासक होते आणि आता जेव्हा त्यांनी आपल्या माता पित्यास सिंहासनावर बसविले आहे ते साम्राज्य सिंहासनाचे स्वामी बनले होते. क़ुरआनच्या

निवेदनावरुन हीच कल्पना समोर येते. म्हणूनच बायबलच्या गुंतागुंतीच्या निवेदनावर विश्वास ठेवला जाऊ शकत नाही.

१५४. या प्रसंगी हजरत यूसुफ यांचे हे निवेदन त्यांच्या चारीत्र्याचे उत्कृष्ट उदाहरण होय. मिस्र देशाचे ते सर्व सत्ताधिकारी होते असे असतांनाहि त्यांच्या या निवेदनात गर्वाचा लवलेशहि आढळून येत नाही किंबहुना त्याच्या एक एक शब्दाने ईश-देणगीची स्वीकृति, कृतज्ञता आणि नम्रता व्यक्त होत आहे.

१५५. या प्रसंगी हजरत यूसुफ यांनी दुआ देखील केली. या प्रार्थनेत त्यांनी प्रथम अल्लाहच्या अनुग्रहाचा उल्लेख करीत त्यांची स्तुती, प्रशंसा केली आणि आपला चांगला शेवट (अंत समय) व आखिरतमध्ये सदाचारी लोकांच्या समूहामध्ये समावेश होण्याकरीता अल्लाहला विनवणी केली. ही गोष्ट दुआ (प्रार्थनेच्या) शिष्टाचारापैकी आहे की आधी अल्लाहची स्तुती व प्रशंसा करावी नंतर आपली विनवाणी त्याच्या समोर सादर करावी.

१५६. ज्यावेळेस ही घटना घडली ती क़ुरआन अवतरणापूर्वी सुमारे दोन हजार चारशे वर्षे अधीची गोष्ट होती आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना यासंबंधी काही माहित नव्हते, ना त्यांचा जनसमूह हे जाणत होता. राहिले ग्रंथ-धारक तर बायबलचे पुस्तक 'उत्पत्ति' मध्ये या घटनेचे वर्णन निश्चित आहे तथापि प्रथम तर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना यापासून लाभ घेऊन निवेदन करण्याची संधी नव्हते कारण पैगंबर अशिक्षित होते व ग्रंथ-धारक विद्वानांशीहि त्यांचा कसलाहि संबंध नव्हती, एवढेच नव्हते तर या वृत्तांताचे वर्णन जेवढ्या निर्दोषपणे क़ुरआनात आहे तेवढ्या निर्दोषपणे बायबलमध्ये नाही. क़ुरआनाचे निवेदन उचितहि आहे व विश्वास निर्माण करणारेहि याऊलट बायबलच्या निवेदनात हे वैशिष्ट्य नाही. दुसरा फरक असा की या घटनेची सर्व सूत्रे बायबलमध्ये वर्णिली गेली नाहीत, उलट क़ुरआनाने यास एक सुसंगत घटनेच्या रुपाने सादर केले आहे व त्या महत्वपूर्ण पैलूंवर प्रकाश टाकला आहे जे अपरोक्षाच्या आवरणाखाली होते. उदाहरणार्थ हजरत यूसुफ यांच्या स्वप्नाचा अर्थ जो हजरत याकूब यांनी सांगितला होता. यूसुफच्या भावांचे कट कारस्थानानुसार हज़रत यूसुफ यांना घेऊन जाणे व आपल्या पित्यास खोटा विश्वास देणे की ते याची निगह राखतील. यूसुफना विहिरीत फेकून दिले गेल्यानंतर त्याच्या मन:शांतीसाठी त्यांच्याकडे वह्य पाठविले जाणे, हजरत यूसुफ यांना स्वप्नाचा अर्थ लावण्याचे ज्ञान प्रदान होणे, हजरत यूसुफ यांचा अंगरखा पाठीच्या बाजूने फाटला जाणे व अनुमानाच्या साक्षीची ती घटना जिने त्याचे निरपराध साबीत होणे. मिस्रच्या अजीज (शासका) चे हे कबुल करणे की त्याची पत्नीच अपराधी आहे, अजीजच्या पत्नीचे एका कारस्थानान्वये मिस्रच्या स्त्रीयांना आमंत्रित करणे, मिस्रच्या स्त्रीयांचे भर बैठकीत उद्‌गारणे की यूसुफ मनुष्य नव्हे किंबहुना फिरिश्ता आहे, अजीजच्या पत्नी तर्फे हजरत यूसुफ यांना तुरुंगात पाठविण्याची धमकी, हजरत यूसुफ यांची स्थैर्यशील प्रसार, बादशहाच्या स्वप्नाचा अर्थ जाणून घेण्यासाठी मद्य-पाजणाऱ्याचे बादशहाच्या परवानगीने तुरुंगात जाणे व हज़रत यूसुफ यांचा आपली सुटका करुन घेण्यास इन्कार आणि मिस्रच्या स्त्रीयांच्या कारस्थानाची चौकशी करण्याची मागणी बादशहाचे चौकशी करणे व हजरत यूसुफ यांचे निरपराध असणे सिद्ध होणे. बिन यमीनला रोखून ठेवल्याबद्दल हजरत याकूब यांना दु:ख, हज़रत याकूबचे आपल्या पुत्रांना ही आज्ञा देणे की त्यांनी यूसुफचा शोध घ्यावा, हजरत यूसुफ यांचे आपल्या भावांना माफ करणे, काफिल्याने हज़रत यूसुफचा अंगरखा घेऊन मिस्र होऊन रवाना झाल्यावर हज़रत याकूब यांना हज़रत यूसुफचा सुगंध जाणवणे, यूसुफचा अंगरखा हजरत याकूब यांच्या चेहऱ्यावर टाकून दिल्याने त्यांची दृष्टि परत येणे, हजरत यूसुफ यांच्या भावांचे माफी मागणे, हज़रत यूसुफचे आपल्या माता-पित्यास सिंहासनावर बसविणे वं त्याचा पूरेपूर मान सन्मान करणे, हजरत यूसुफच्या भावांचे त्यांच्याकडे झुकणे, हजरत यूसुफचे अल्लाहसमोर स्तुति प्रशांसा करणे व त्यांच्याशी कृतज्ञता व्यक्त करीत आपला चांगला शेवट व्हावा म्हणून प्रार्थना करणे. ह्या व अशा प्रकारच्या अन्य महत्वपूर्ण गोष्टींचा उल्लेख बायबलच्या पृष्ठांमध्ये नाही. मग एका अशिक्षित पैगंबराने ह्या वृत्तांताचे काहीहि कमी अधिक न करता कशा प्रकारे वर्णन केले आणि इतिहासाच्या हरवलेल्या पृष्ठांना कशा प्रकारे लोकांसमोर आणले? याचे योग्य उत्तर याखेरीज दुसरे काहीच होऊ शकत नाही की ईश आदेशानेच ह्या वृत्तांताचे वर्णन दिले आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्यातर्फे किंवा बायबल मधून उद्‌धृत करुन निवेदन केले नाही आणि आज देखील जो मनुष्य संशोधनाच्या हेतुने क़ुरआन व बायबलचा तुलनात्मक अभ्यास करील, त्याला ही वस्तुस्थिती जाणवल्याखेरीज राहणार नाही.

१५७. म्हणजे अधिकांश लोकांची ही दशा आहे की ते प्रमाणांद्वारे गोष्ट समजू इच्छित नाही, किंबहुना आपल्या चुकीच्या धोरणेवर कायम राहू इच्छितात अन्यथा क़ुरआनावर ईमान बाळगण्यास हे एकच प्रमाण पुरेसे आहे जे त्याच्या 'वह्य' (ईश-आदेश) असण्याच्या पुराव्यादाखल वर निवेदिले गेले आहे.

१५८. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अल्लाहचा संदेश लोकांपर्यंत पोहचविण्याची सेवा नि:स्पृह होऊन व कोणत्याहि प्रकारचा मोबदला न मागता पार पाडीत होते.

१५९. म्हणजे पैगंबरांद्वारे एकेश्वरवादाचा जो धडा लोकांना शिकविला गेला होता व ज्याला लोक विसरले आहेत, क़ुरआन

त्याच धड्याची स्मरणिका आहे. अर्थात ही स्मरणिका उजळणी एखाद्या विशिष्ट जनसमूहापुरती नव्हे किंबहुना समस्त जन-समूह व समस्त मानवांकरीता आहे.

१६०. हे खरे कारण होय ते सत्य आढळून न येण्याचे ज्याकडे क़ुरआन आमंत्रित करीत आहे तौहीद (एकेश्वर वादाच्या) निशाण्यात जगात पावलो पावली आहेत परंतु लोकांनी या सृष्टीची अशी चुकीची व्याख्या करुन घेतली आहे व आपल्या जीवनाबाबत असे चुकीचे दृष्टीकोन कायम केले आहेत व त्यावर असे दृढ आहेत की या निशाण्यांना दृष्टी वर करुन पाहण्यासहि ते तयार नाहीत.

१०६. आणि बहुतेक लोकांची दशा अशी आहे की ते अल्लाहला मानतात देखील पण अशा प्रकारे की त्यासोबत (अन्य) सहभागी ठरवितात. [१६१]

وَمَا يُؤْمِنُ أَكْثَرُهُم بِاللَّهِ إِلَّا وَهُم مُّشْرِكُونَ ١٠٦

१०७. काय हे लोक या गोष्टीपासून निश्चिंत आहेत की अल्लाहच्या प्रकोपाचे संकट त्यांच्यावर न ओढवेल, किंवा अनभिज्ञतेत कियामतीची घटिका त्यांच्यावर अकस्मात न येईल ?

أَفَأَمِنُوا أَن تَأْتِيَهُمْ غَاشِيَةٌ مِّنْ عَذَابِ اللَّهِ
أَوْ تَأْتِيَهُمُ السَّاعَةُ بَغْتَةً وَهُمْ لَا يَشْعُرُونَ ١٠٧

१०८. (हे पैगंबर !) सांगा, हा आहे माझा मार्ग [१६२] मी अंतर्दृष्टीसह अल्लाहकडे बोलवितो [१६३] मी देखील व ते लोक देखील जे माझे अनुसरण करीत आहेत. [१६४] आणि अल्लाह करीता पाकी (स्वच्छ-शुद्धता ) आहे व मी शिर्क करणाऱ्यांपैकी नाही.

قُلْ هَٰذِهِ سَبِيلِي أَدْعُو إِلَى اللَّهِ ۚ عَلَىٰ بَصِيرَةٍ أَنَا وَمَنِ
اتَّبَعَنِي ۖ وَسُبْحَانَ اللَّهِ وَمَا أَنَا مِنَ الْمُشْرِكِينَ ١٠٨

१०९. आणि आम्ही तुमच्या पूर्वीहि पुरुषांनाचा रसूल बनवून पाठविले होते जे वसाहतींचे रहिवाशी होते आणि आम्ही त्यांच्यावर 'वह्य' केले होते [१६५] काय हे लोक जमीनीवर हिंडले-फिरले नाहीत की बघितले असते त्या लोकांचा कस कसा शेवट झाला जे यांच्या पूर्वी होऊन गेले आहेत. [१६६] आणि आखिरतचे घर [१६७] त्या लोकांसाठी अधिक चांगले आहे, ज्यांनी ईश-भय अंगिकारले. मग काय तुम्ही बुद्धीने काम न घ्याल?

وَمَا أَرْسَلْنَا مِن قَبْلِكَ إِلَّا رِجَالًا نُّوحِي إِلَيْهِم مِّنْ أَهْلِ الْقُرَىٰ ۗ
أَفَلَمْ يَسِيرُوا فِي الْأَرْضِ فَيَنظُرُوا كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ الَّذِينَ
مِن قَبْلِهِمْ ۗ وَلَدَارُ الْآخِرَةِ خَيْرٌ لِّلَّذِينَ اتَّقَوْا ۗ أَفَلَا تَعْقِلُونَ ١٠٩

११०. (त्या भूतकालीन जन-समूहांनाहि ढील दिली गेली होती) येथपावेतो की जेव्हा रसूल (आपल्या जन-समूहांबाबत) निराश झाले व लोकांना वाटले की त्यांना खोट्या खबरी ऐकविल्या गेल्या होत्या तेव्हा आमची मदत त्यां (प्रेषितां) च्या जवळ येऊन पोहोचली [१६८] आणि त्या लोकांना वाचवले गेले, ज्यांना आम्ही वाचवू इच्छिले आणि अपराध्यांवरुन तर आमची शिक्षा टाळली जाऊ शकत नाही.

حَتَّىٰ إِذَا اسْتَيْأَسَ الرُّسُلُ وَظَنُّوا أَنَّهُمْ قَدْ كُذِبُوا جَاءَهُمْ
نَصْرُنَا فَنُجِّيَ مَن نَّشَاءُ ۖ وَلَا يُرَدُّ بَأْسُنَا
عَنِ الْقَوْمِ الْمُجْرِمِينَ ١١٠

१६१. म्हणजे ईश्वरला मानणे तेच योग्य होय जे तौहीद (एकेश्वर वादा) सह असावे कारण शिर्क (अनेकेश्वरवाद) ईश्वराच्या गुणवैशिष्ट्यांचा नकार आहे आणि दासाचा ईश्वराशी खरा संबंध त्याच वेळी कायम होतो जेव्हा तो ईश्वराला त्याच रीतीने मानत असेल जशी त्याची गुणवैशिष्ट्ये आहेत.

आज देखील जगातील अधिकांश लोक ईश्वरावर श्रद्धा ठेवतात. परंतु ना मार्गदर्शना संदर्भात त्याच्याकडे रुजू करण्याची त्यांना गरज जाणवते व ना त्याच्या आज्ञापालन व दास्यत्वाशी त्यांचा काही संबंध आहे तसेच ते एक ईश्वरावर मुळीच संतुष्ट नाहीत किंबहुना आपल्या समाधाना साठी त्यांनी असंख्य देव घडवले आहेत. अशा स्थितीत त्यांचे ईश्वरावर श्रद्धा ठेवणे अगदीच निरर्थक ठरते. परंतु अधिकांश लोक मनोभ्रमात गुरफटलेले आहेत.

१६२. म्हणजे ही आहे माझी पद्धत व माझा धर्म.

१६३. म्हणजे माझे आवाहन ना प्रमाणहिन व ना अयोग्य आणि ना अशा एखाद्या धर्मास कबूल करण्याचे आवाहन आहे ज्यासोबत ज्ञान व स्वभावाचा प्रकाश नाही, किंबहुना माझे आवाहन पूर्णत: योग्य, सप्रमाण, स्वभावनिष्ठ व ज्ञानाचा संपूर्ण प्रकाशाने मुक्त आहे.

१६४. स्पष्ट झाले की मक्के मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यासह त्यांचे अनुयायी देखील आवाहन-कार्यात व्यस्त होते. जणू मुस्लिम जन समूहास आगदी आरंभापासूनच आवाहन-कार्यासाठी तयार केले गेले.

१६५. तात्पर्य जेवढे प्रेषित जगात आले ते सर्व माणसांपैकीच होते व पुरुष होते तसेच ते शहरांचे रहिवाशी होते कारण प्रेषित्व पद अत्यंत प्रतिष्ठित पद आहे, ज्यासाठी पुरुषच योग्य ठरु शकतात व प्रेषित्व पदाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याकरीता उच्च बौद्धिक पात्रतेबरोबरच काळाच्या फिरऔनांशी संबोधन करण्याची संधी प्राप्त होणेहि आवश्यक आहे व या गोष्टी शहरांतच उपलब्ध होऊ शकतात यास्तव पैगंबरना मोठ मोठ्या शहारातच पाठविले गेले.

१६६. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अनआम टीप क्र.२०

१६७. आखिरतच्या घराशी अभिप्रेत जन्नत होय.

१६८. म्हणजे आमची मदत प्रेषितांना ठीक अशा वेळी पोहचली जेव्हा ते आपल्या जन-समूहांच्या ईमान बाळगण्याबाबत निराश झाले व लोकांना जी ढील दिली गेली त्यामुळे त्यांनी हे गृहीत धरले की ईश-शिक्षेच्या ज्या ताकीदी ऐकविल्या गेल्या होत्या त्या खोट्या होत्या. ईमान न बाळगण्या पायी कोणतीहि शिक्षा येणार नाही.

येथे ह्या गोष्टीचे निवेदन करण्याचा हेतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या साथीदारांना सांत्वना देणे होय की काफिरांना जी ढील दिली जात आहे, ती अल्लाहच्या हिकमतीची निकड होय. अर्थात ही ढील त्या वेळ पर्यंतच आहे जोपर्यंत प्रेषित त्यांच्या ईमान बाळगण्याबाबत अगदी निराश होत नाही. जर गोष्ट निराशे-प्रत पोहचली तर ते शिक्षेच्या तावडीत सापडतील आणि ईमान बाळगणाऱ्यांच्या हक्कात अल्लाहची मदत अवतरीत होईल व त्यांना या काफिरांपासूनहि मुक्ति मिळेल व ईश शिक्षेपासून सुरक्षित राहतील.

१११. निःसंशय त्यांच्या वृत्तांतात विद्वानांकरीता मोठा बोध आहे. [१६९] ही काही गढून घेतलेली वाणी नव्हे किंबहुना समर्थन आहे त्या (ग्रंथा) चे जो पूर्वी आलेला आहे [१७०] आणि विवरण आहे प्रत्येक गोष्टीचे [१७१] व मार्गदर्शन आणि कृपा आहे ईमान बाळगणाऱ्यांकरीता.[१७२]

لَقَدْ كَانَ فِیْ قَصَصِهِمْ عِبْرَةٌ لِّاُولِی الْاَلْبَابِ ؕ مَا كَانَ
حَدِیْثًا یُّفْتَرٰی وَلٰكِنْ تَصْدِیْقَ الَّذِیْ بَیْنَ یَدَیْهِ وَ
تَفْصِیْلَ كُلِّ شَیْءٍ وَّهُدًی وَّرَحْمَةً لِّقَوْمٍ یُّؤْمِنُوْنَ ﴿١١١﴾ ع

१६९. क़ुरआनात पैगंबरांचे व त्यांच्या जन-समूहांचे वृत्तांत वर्णिले गेले आहेत त्याचा खरा हेतु हाच की लोकांनी त्यांद्वारे बोध-ग्रहण करावा व केवळ भूतकालीन किस्से समजून वाचू नये.

१७०. संकेत आहेत 'तौरात' कडे की त्यात जे मार्गदर्शन दिले गेले होते, क़ुरआन त्याची सत्यता दर्शविते. तौरात चे विद्यमान पुस्तक 'उत्पत्ति' मध्ये हजरत यूसुफचा जो किस्सा वर्णिला गेला आहे तो क़ुरआनाच्या वर्णनाहून भिन्न असला तरी जेथपावेतो मूळ घटनेचा संबंध आहे दोघांत अनुकूलता आढळून येते व ही अनुकूलता या गोष्टीचे प्रमाण होय की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हा किस्सा आपल्या तर्फे रचून प्रस्तुत केला नाही, किंबहुना ज्या हस्तीने 'तौरात' अवतरीत केले होते त्याच हस्तीने क़ुरआन अवतरीत केले आहे आणि 'तौरात'च्या पृष्ठांमधून ज्या हकीगती मिटल्या गेल्या होत्या क़ुरआन मध्ये त्या अंकित केल्या गेल्या.

१७१. विवरणाचा खरा अर्थ स्पष्ट रित्या वर्णन करणे होय. अर्थात क़ुरआनात सर्व आवश्यक बाबींना सखोलपणे वर्णिले गेले आहे, अशासाठी की अल्लाहचा मार्ग कोणता आहे, तो कोणत्या गोष्टींना पसंत करतो व कोणत्या गोष्टींना नापसंत करतो व त्याची शिकवण काय आहे हे जाणून घेण्यात एखाद्याला कसलीहि अडचण भासू नये.

१७२. म्हणजे क़ुरआन मार्गदर्शनाचा जो मार्ग उघडतो त्यावर चालून करुन ईमान बाळगणारे अल्लाहच्या कृपेस पात्र ठरु शकतात.

# सूरह अर्रअद

# १३. सूरह अर्रअद

**नावः** आयत क्र. १३ मध्ये 'रअद' अर्थात मेघगर्जनेचा उल्लेख केला गेला आहे की ती अल्लाहची पवित्रता प्रशंसेसह वर्णन करते तद्नुषंगाने या सूरहचे नाव 'अर्रअद' असे ठरले आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे; आणि मजकूरांवरुन असे दिसून येते की सूरह यूसुफच्या शेवटी असे फर्माविले गेले होते,

قُلْ هٰذِهٖ سَبِيْلِيْٓ

**कुल हाजिही सबीली** .........................'(हे पैगंबर!) सागा, हा आहे माझा मार्ग मी अल्लाहकडे अंतर्दृष्टी सह बोलवितो. मी देखील व ते लोक देखील जे माझे अनुसरण करीत आहेत' तेव्हा ही सूरह खरे पाहता याचेच स्पष्टीकरण होय.

**मध्यवर्ती कल्पनाः** हा ग्रंथ पैगंबर (सल्लाल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर आकाशातून अवतरीत झाला आहे व यात जे आवाहन सादर केले गेले आहे ते अगदी सत्य आहे. सृष्टीत इतस्ततः पसरलेल्या निशाण्यांवर विचार चिंतन केल्यास तीच हाक तुम्हाला ऐकू येईल जी प्रेषिताची व या ग्रंथाची आहे.

**आयत रचनाः** आयत क्र.१ प्रस्तावना स्वरुप आहे, ज्यात असे फर्माविले गेले आहे की हया ग्रंथाचे ईश्वरा तर्फे अवतरीत होणे एक सत्य गोष्ट आहे.

आयत क्र.२ ते ४ मध्ये त्या निशाण्यांकडे निर्देश केला गेला आहे ज्यांच्या द्वारे आखिरत विषयी विश्वास निर्माण होतो.

आयत क्र. ५ ते ७ मध्ये इन्कार करणाऱ्यांच्या शंका-कुशंका बाबत त्यांना ताकीद केली गेली आहे.

आयत क्र. ८ते १६ मध्ये एकेश्वरवादाचा मजकूर आहे.

आयत क्र.१७ मध्ये सत्य व असत्याच्या वेग वेगळया परिणामांबाबत घटनांची साक्ष प्रस्तुत केली गेली आहे.

आयत क्र. १८ ते २५ मध्ये कुरआनाच्या आवाहनास कबूल करणाऱ्यांची गुणवैशिष्टये व त्यांची आखिरतची परिणती वर्णिली गेली आहे, तद्वतच या आवाहनास रद्द करणाऱ्यांचे वाईट आचरण व त्यांच्या दुष्परिणितीसहि सादर केले गेले आहे.

आयत क्र. २६ ते २९ मध्ये इन्कार करणाऱ्यांना ताकीद व ईमान बाळगणाऱ्यांना खुशखबरी ऐकवली गेली आहे.

आयत क्र. ३० ते सूरह समाप्ती पावेतो प्रेषित्वाचा इन्कार करणाऱ्यांना सचेत केले गेले आहे, त्याच बरोबर ईश-भय अंगिकारणाऱ्यांच्या चांगल्या परिणितीसाहि प्रस्तुत केले गेले आहे. अशासाठी की इन्कार करणाऱ्यांना ईश भय अंगिकारण्यास प्रोत्साहन लाभावे.

# १३.सूरह अर-रअद

سُورَةُ الرَّعۡدِ

(आयती :४३)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسۡمِ ٱللَّهِ ٱلرَّحۡمَٰنِ ٱلرَّحِيمِ

१. अलिफ, लाम, मीम, रा [१] या (अल्लाहच्या) ग्रंथाच्या [३] आयती [२] आहेत आणि जी गोष्ट तुमच्या पालन कर्त्यातर्फे तुमच्यावर अवतरीत झाली आहे ती अगदी सत्य आहे तथापि बहुतेक लोक ईमान बाळगत नाही. [४]

الٓمٓرۚ تِلۡكَ ءَايَٰتُ ٱلۡكِتَٰبِۗ وَٱلَّذِيٓ أُنزِلَ إِلَيۡكَ مِن رَّبِّكَ ٱلۡحَقُّ
وَلَٰكِنَّ أَكۡثَرَ ٱلنَّاسِ لَا يُؤۡمِنُونَ ١

२. अल्लाह तो होय ज्याने आकाशांना, जसे तुम्ही पाहत खांबांशिवाय उंच [५] केले मग तो अर्श (सिंहासना) वर विराजमान झाला [६] आणि त्याने सूर्य व चंद्राला कार्यरत केले [७] प्रत्येक एक निर्धारीत वेळे पावेतो चालत आहे [८] समस्त कार्यांची व्यवस्था तोच राखत आहे.तो निशाण्यांचे उघडरित्या वर्णन करीत आहे. यासाठी की तुम्ही आपल्या स्वामी (रब्ब )च्या भेटीचा विश्वास बाळगावा.[९]

ٱللَّهُ ٱلَّذِي رَفَعَ ٱلسَّمَٰوَٰتِ بِغَيۡرِ عَمَدٖ تَرَوۡنَهَاۖ ثُمَّ ٱسۡتَوَىٰ عَلَى
ٱلۡعَرۡشِۖ وَسَخَّرَ ٱلشَّمۡسَ وَٱلۡقَمَرَۖ كُلّٞ يَجۡرِي لِأَجَلٖ مُّسَمّٗىۚ
يُدَبِّرُ ٱلۡأَمۡرَ يُفَصِّلُ ٱلۡأٓيَٰتِ لَعَلَّكُم
بِلِقَآءِ رَبِّكُمۡ تُوقِنُونَ ٢

३. आणि तोच होय ज्याने जमीनीला पसरविले [१०] व तिच्यात पर्वत,[११] नद्या बनविल्या [१२] आणि प्रत्येक प्रकारच्या फळांचे दोन दोन प्रकार निर्माण केले [१३] तो दिवसावर रात्रीचे आवरण घालतो. नि:संशय यात त्या लोकांकरीता निशाण्या आहेत जे विचार-चिंतन करतात.

وَهُوَ ٱلَّذِي مَدَّ ٱلۡأَرۡضَ وَجَعَلَ فِيهَا رَوَٰسِيَ وَأَنۡهَٰرٗاۖ وَمِن
كُلِّ ٱلثَّمَرَٰتِ جَعَلَ فِيهَا زَوۡجَيۡنِ ٱثۡنَيۡنِۖ يُغۡشِي ٱلَّيۡلَ
ٱلنَّهَارَۚ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَأٓيَٰتٖ لِّقَوۡمٖ يَتَفَكَّرُونَ ٣

४. आणि (पहा) जमीनीवर एकमेकास मिळालेले भूभाग आहेत. [१४] द्राक्षांच्या बागा आहेत, शेते आहेत व खजुरीची झाडे आहेत. मूळापासून वेगळे देखील आहेत व मूळाशी जुळलेलेहि आहेत [१५] सर्व एकाच (प्रकारच्या) पाण्याने तृप्त होतात परंतु स्वादात आम्ही एकाला दुसऱ्याहून आधिक श्रेष्ठ बनवितो.नि:संशय या गोष्टीत त्या लोकांकरीता निशाण्या आहेत जे बुद्धिचा वापर करतात.[१६]

وَفِي ٱلۡأَرۡضِ قِطَعٞ مُّتَجَٰوِرَٰتٞ وَجَنَّٰتٞ مِّنۡ أَعۡنَٰبٖ وَزَرۡعٞ وَنَخِيلٞ
صِنۡوَانٞ وَغَيۡرُ صِنۡوَانٖ يُسۡقَىٰ بِمَآءٖ وَٰحِدٖ وَنُفَضِّلُ بَعۡضَهَا
عَلَىٰ بَعۡضٖ فِي ٱلۡأُكُلِۚ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَأٓيَٰتٖ لِّقَوۡمٖ يَعۡقِلُونَ ٤

१. अक्षरांच्या स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह बकर: टीप क्र. १ आणि सूरह यूनुस टीप क्र.१.

या सूरह मध्ये **'अलीफ'** चा इशारा अल्लाह (अर्थात एकेश्वर वादा) कडे **'लाम'** चा संकेत ''ला इलाहा इल्लल्लाह'' (म्हणजे शिर्कच्या नकार) कडे आणि **'मीम'** चा इशारा 'मुतआल' (अर्थात अत्यंत उच्च दर्जा) कडे आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या गुणवैशिष्ट्याचे वर्णन आयत क्र. ९ मध्ये केले गेले आहे. राहिला **'रा'** तर त्याचा संकेत रब्ब (अल्लाहच्या ईशत्वा) कडे हि आहे व 'रअद' (मेघ गर्जना ) कडे हि ज्याचा उल्लेख आयत क्र.१३ मध्ये वैशिष्ट्यासह आला आहे, व ज्यात या वस्तुस्थितीस अनावरित केले गेले आहे की ढगांच्या बाह्य गर्जनेमागे ईश-स्मरणाची नांदी देखील आहे-आणि अल्लाहच्या वाणीचा अर्थ तर अल्लाहच अधिक चांगल्या रीतीने जाणतो.

२. अरबी भाषेत आयतीचा शब्दार्थ लक्षण व चिन्ह असा आहे पवित्र क़ुरआनातील सूरती (अध्याय) ज्या लहान मोठ्या वाक्यांनी युक्त आहेत त्यांना आयती म्हणतात. आयत प्रसंगी संपूर्ण वाक्य, कधी वाक्याचा अंश तर कधी काही वाक्यांनी युक्त असते. आयतची निश्‍चितता व त्याचा क्रम वही (ईश-आदेशा) द्वारे निर्धारीत झाला आहे. ज्या अर्थी क़ुरआनातील प्रत्येक आयत या गोष्टीची निशाणी आहे की ही अल्लाहची वाणी आहे म्हणून त्यास आयत (ईश-चिन्ह) या अर्थाने घेतले गेले आहे.

३. ग्रंथाशी अभिप्रेत ईश-ग्रंथ म्हणजे क़ुरआन होय.

४. अर्थात सूरह रआदच्या ह्या आयती तसेच त्या समस्त आयती ज्या पैगंबरावर अवतरीत झाल्या आहेत, त्याचे अल्लाह कडून अवतरीत होणे एक सत्य घटना वस्तुस्थिती आहे. ही गोष्ट वेगळी की बहुतेक लोक या वस्तुस्थितीस ती सत्य घटना असूनहि मान्य करीत नाही परंतु वस्तुस्थिती शेवटी वस्तुस्थिती आहे. एखाद्याने मान्य न केल्याने त्यात काही फरक पडत नाही.

५. वातावरणच्या विस्तारात आकाशस्थ घटक दूर पावेतो पसरलेले आहेत. शास्त्रीय संशोधानाचा अनुषंगाने काही तारे लक्षावधी प्रकाश वर्षाच्या अंतरावर आहेत. यावरुन आकाशाच्या उंचीचे अनुमान केले जाऊ शकते. या उंची ला कोणत्याहि परिणामाने मापले जाऊ शकत नाही. आकाशाचे एखाद्या छताप्रमाणे कसल्याहि आधारे विना कायम राहणे ही त्याच्या निर्मात्याच्या जबरदस्त शक्ती सामर्थ्याची उघड निशाणी आहे.

स्पष्ट असावे की कसल्याहि आधाराविना आकाशाचे कायम असणे ही सर्वसामान्य पणे अवलोकनात येणारी गोष्ट आहे याने ही गोष्ट नकारात्मक ठरत नाही की ग्रह-नक्षत्रे गुरुत्वाकर्षणाच्या नियमानुसार आपापल्या जागी स्थिर आहेत. अर्थात हे गुरुत्वाकर्षण देखील अल्लाहच्याच शक्ति सामर्थ्याचा चमत्कार होय.

राहिला हा प्रश्‍न की काय आकाशाचे एखादे भौतिक अस्तित्व आहे तर आम्ही या संदर्भात सूरह इन्शिकाक टीप क्र.१ मध्ये चर्चा केली आहे. या प्रसंगी त्या चर्चेस विचाराधीन ठेवले जावे.

६. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. ८३ मध्ये केले गेले आहे.

७. म्हणजे सूर्य आणि चंद्राचे स्वत:असे काहीच बळ नाही ते अल्लाहच्या विधि नियमात जखडलेले आहेत आणि जे काय त्यांना सोपविले गेले आहे ते पार पाडीत आहेत.

८. يَجْرِىْ चालत राहण्याशी अभिप्रेत कार्यान्वित असणे होय. याखेरीज की त्यांची कृति कोणत्या प्रकारची आहे ही आयत असे स्पष्ट करते की केवळ चंद्रच नव्हे तर सूर्य देखील गतीशील आहे. आणि आजचे अंतरीक्ष-विज्ञान (Astronomy) देखील सूर्याला गतीशील मानते.

'The Sun rotates on its axis in a period of about 25 1/3 days.'(Astronomy

(The Marvels & Mysteries of Science P. 15)

अर्थात सूर्य आपल्या आंसाभोवती २४ १/३ दिवसात एक फेरी पूर्ण करतो आणि शास्त्र म्हणते की सूर्य आपल्या आंसाभोवती फिरत नाही किंबहुना आपल्या ग्रहांसह सेकंदाला दोनशे मैल या गतीने आपल्या गुरु केंद्राभोवती फेरी घालत आहे.

'Our own star, the Sun is no exception to the general rule, for with its attendant planets it is moving through space at a speed of 200 miles a second, travelling around the centre of gravity of its cosmic system.At this speed it requires 250,000,000 years to complete a revolution in its gigantic orbit'.(Do p. 82)

पवित्र क़ुरआन हेहि स्पष्ट करते की सूर्य आणि चंद्राचे हे भ्रमण निर्धारीत मुदतीशिवाय नाही. किंबहुना एक निश्‍चित मुदती पावतो आहे. अर्थात ही मुदत कियामतीच्या दिवसा पावेतो आहे. तेव्हा या विश्वाचे अंथरुण लपेटले जाईल आणि एक नवीन विश्व अस्तित्वात आणले जाईल.

९. म्हणजे आकाशात विखुरलेल्या या निशाण्यांवर विचारचिंतन केल्याने ते ध्येय उद्दिष्ट व ती बुद्धिकौशल्य युक्त योजना सहजगत्या ध्यानी येते जी या सृष्टीच्या निर्मितीमागे कार्यान्वित आहे व जिला पवित्र क़ुरआन पूर्ण स्पष्टीकरणासह प्रस्तुत करीत आहे. आणि या गोष्टी सहजगत्या लक्षात येतात, एवढेच नव्हे तर या गोष्टीचा विश्वास निर्माण होतो की एक दिवस आम्हाला आपल्या पालनकर्त्याशी भेटावयाचे आहे व अपल्या कृतकर्माचे फळ चाखावयाचे आहे.

१०. म्हणजे जमीनीला ईश्वराने अशा प्रकारे पसरविले की ती अब्जावधी लोकांना राहण्यायोग्य झाली. त्याच्या या महान

शक्ति सामर्थ्याच्या निशाणीस लक्षात घेता माणसाने त्याच्या महानतेपुढे नतमस्तक व्हायला पाहिजे होते व तो एकमेव ईश्वर असण्याचा विश्वास बाळगावयास हवा होता. तथापि अधिकांश लोक यापासून विमुख झाले आहेत. आणि यात असेहि लोक आहेत जे जमीनीच्या निर्मात्याऐवजी जमीनीचीच पूजा करण्यात अभिमान बाळगतात. तद्नुसार त्यांनी 'भूमी पूजे'ला आपले धार्मिक कार्य ठरविले आहे. एवढी साधी गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही की ज्या वस्तूला आपण पायदळी तुडवितो, तिचीच पूजा करण्यात कसले प्रयोजन आहे? हे नादान तर प्रथम आपल्या 'ईश्वरा'स स्वत:च घडवितात व त्यानंतर त्यास आपल्याच पायांनी तुडवितात. त्यांचा 'ईश्वर' ही विचित्र आहे व त्यांची भक्ति उपासनाहि विचित्र.

११. जमीनीवर इतस्तत: विखुरलेले पर्वत हे देखील ईश्वराच्या सामर्थ्याची चिन्हे होत जी ठिक ठिकाणी उभी केली गेली आहेत. अशासाठी की माणसाने त्यांना पाहून आपल्या निर्मात्याच्या महानतेस मान्य करावे, पण माणसाच्या अंगी एवढी उत्सुकता कोठे की त्याने वस्तुस्थितीचा शोध घ्यावा. भूतकाळात जर त्याने पर्वताच्या उच्चतेस पाहून त्यांना देवता बनविले होते तर वर्तमानकाळात तो पर्वतांचे प्रकार, त्यांचे थर, घटक द्रव्याची व्यवस्था त्यात आढळून येणारे अश्मीभूत (Fossil) वगैरे जाणून घेण्यात इतका तल्लीन झाला आहे की निर्मात्याकडे आपली बुद्धि वळविण्यास तयार नाही. परिणामी या सर्व माहितीचा संग्रह असूनहि तो भौतिक वादात वाईरित्या गुरफटलेला आहे.

१२. सर्वश्रेष्ठ अल्लाहने जमीनीवर नद्या प्रवाहित केल्या, अशा साठी की त्यांच्या प्रवाहास पाहून माणसाच्या जीभेवाटे ईश स्मरणाचा स्त्रोत वाहू लागावा तथापि नद्यांना श्रेष्ठ जाणून तो त्यांची पूजा करु लागला व त्यांना भेट-नजराणे अर्पण करु लागला किंवा त्याने प्रगती केली तर अशी की या नद्यांवर मोठ मोठी धरणे उभारली, यासाठी की त्यांच्या पाण्यापासून पूरेपूर लाभ घ्यावा.याहून पुढे आणखी काही विचार करण्यास तो तयार नाही.

१३. मूळ ग्रंथात वापरलेला ثمرات 'समरात' हा शब्द फळांसाठीहि वापरला जातो व उत्पादनाकरीताहि म्हणून यात सुका मेवा, धान्य व पालेभाज्या सर्व सामील आहेत. अर्थात ईश्वराने जमीनीवर वनस्पती अशा प्रकारे उगविली की त्यांचे जोडे (Couple) तयार झाले. नर व मादी यासाठी की उत्पादन क्रम जारी रहावा. वनस्पती मध्ये नर व मादीचे आढळून येणे ही सर्वपरिचित बाब होय. परंतु आजच्या वनस्पतीशास्त्रा (Botany) ने यास ज्या विवरणात्मकरित्या सादर केले आहे त्यांच्या अध्ययनाने वनस्पतीविषयीची आश्चर्यकारक व्यवस्था दिसून येते. उदाहरणार्थ रोपट्यांमध्ये पेशी (Cells)आढळून येतात ज्यात रंगद्रव्ये (Chromosomes) असतात जे अनुवांशिक सहाय्याने पाहिले जाऊ शकते अथवा हे की फुला मध्ये जे पिवळे तंतू (Stomens)असतात, त्यात नर व मादीचे प्रकार आढळून येतात. फुले जेव्हा विकसित होतात तेव्हा मधमाशा व फुलपाखरे त्यांच्याकडे आकृष्ट होतात आणि परागकणांचे एका फुलावरुन दुसऱ्या फुलावर स्थलांतर करतात अशा प्रकारे फलधारणा (Fertilization) होते व पुष्पकोष फळाचे स्वरुप धारण करते.

काय सृष्टीची ही आश्चर्यजनक व्यवस्था सर्व शक्तिमान अल्लाहचे अस्तित्व प्रमाणित करीत नाही?

१४. म्हणजे जमीनीवर सर्वभाग समान नाहीत किंबहुना विविध प्रदेश आढळून येतात; जे एकमेकाजवळ व संलग्न असूनहि आपल्या वैशिष्ट्यांनध्ये भिन्न आहेत. एखादा लाल आहे तर दुसरा काळा, एखादा सुपीक आहे तर दुसरा नापीक एखादा भूभाग एका प्रकारच्या उत्पादना करीता योग्य आहे तर दुसरा अन्य प्रकारच्या उत्पादना करीता. एखाद्या प्रदेशात तेलाचे साठे असतात तर एखाद्या प्रदेशांत सोन्याच्या खाणी.

माणसाच्या पालन पोषणा करीता कस कसे खंजीने आहेत जे जमीनीच्या कुशीत ठेवले गेले आहेत. काय ईशत्वाची/पालन पोषणाची ही सर्व व्यवस्था आपोआप घडली कि तिला अस्तित्वात आणणारा पालनकर्ता आहे?

१५ . खजूरीचे वृक्ष दोन प्रकारचे असतात. एक तो ज्याच्या मूळापासून एकच खोड निघते तर दुसरा असा की ज्याच्या मूळापासून दोन किंवा अधिक खोड निघतात. वस्तुत:एकाच पाण्याने दोघांना तृप्त केले जाते. ही अद्भूतता काय हया विचाराचे खंडन करण्यास पुरेशी नाही की ही संपूर्ण सृष्टी केवळ योगायोग म्हणून अस्तित्वात आली आहे व एखाद्या कर्त्याविना आपोआप चालत आहे? असे असते तर ही चित्रविचित्रता, ही रंगबिरंगीता व हे विभिन्न प्रकार मुळीच असू शकत नव्हते.

१६. एकाच पाण्याने वृक्षांना सिंचित केले जाते, तथापि त्यांची फळे स्वादात वेगवेगळी असतात, एखादे गोड तर एखादे आंबट, एखादे फिके तर एखादे कडू. प्रत्येक वस्तुत प्रकारांची ही विभिन्नता पाहून एका कवीने योग्यच म्हटले आहे:-

**''ऐ जौक इस जहाँ को है ज़ेब इख्तिलाफ से''**

अर्थ: हे ज़ोक या सृष्टीला विविधतेनेच सौंदर्य लाभले आहे.

ही विभिन्नता माणसाला विचार चिंतनाचे आवाहन करते. माणसाने बुद्धिचा उचित वापर केल्यास त्या सत्यांना तो प्राप्त करु शकतो ज्यांना कबूल करण्याचे आवाहन पवित्र क़ुरआन करीत आहे.

आणि हे लोक भलेपणाच्या आधी वाईट गोष्टींसाठी तुमच्या जवळ घाई करीत आहेत वस्तुतः यांच्या पूर्वी कित्येक बोधदायक उदाहरणे होऊन गेली आहेत. निःसंशय तुमचा पालनकर्ता लोकांना ते अतिरेक करीत असतानाही क्षमा करीत राहतो आणि यातहि संशय नाही की तुमचा पालनकर्ता शिक्षा देण्यात मोठा सक्त आहे. (अल क़ुर्आन)

५. आणि जर तुम्हाला विचित्र गोष्ट ऐकायची असेल तर त्या लोकांचे हे कथन मोठे विचित्र आहे की जेव्हा आम्ही माती होऊन जाऊ तेव्हा आम्हाला पुन्हा नव्याने निर्माण केले जाईल काय [१७] हे असे लोक होत ज्यांनी आपल्या पालनकर्त्याशी कुफ्र केले आणि हेच ते लोक होत ज्यांच्या गळयात जोखंड पडलेले असतील.[१८] आणि हेच लोक जहन्नमवाले होत, सदैव त्यात राहणारे !

وَإِن تَعْجَبْ فَعَجَبٌ قَوْلُهُمْ أَءِذَا كُنَّا تُرَٰبًا أَءِنَّا لَفِى خَلْقٍ
جَدِيدٍ ۗ أُو۟لَٰٓئِكَ ٱلَّذِينَ كَفَرُوا۟ بِرَبِّهِمْ ۖ وَأُو۟لَٰٓئِكَ ٱلْأَغْلَٰلُ فِىٓ
أَعْنَاقِهِمْ ۖ وَأُو۟لَٰٓئِكَ أَصْحَٰبُ ٱلنَّارِ ۖ هُمْ فِيهَا خَٰلِدُونَ ٥

६. आणि हे लोक भलेपणाच्या आधी वाईट गोष्टींसाठी तुमच्या जवळ घाई करीत आहेत [१९] वस्तुतः यांच्या पूर्वी कित्येक बोधदायक उदाहरणे होऊन गेली आहेत. निःसंशय तुमचा पालनकर्ता लोकांना ते अतिरेक करीत असतानाही क्षमा करीत राहतो आणि यातहि संशय नाही की तुमचा पालनकर्ता शिक्षा देण्यात मोठा सक्त आहे.[२०]

وَيَسْتَعْجِلُونَكَ بِٱلسَّيِّئَةِ قَبْلَ ٱلْحَسَنَةِ وَقَدْ خَلَتْ مِن
قَبْلِهِمُ ٱلْمَثُلَٰتُ ۗ وَإِنَّ رَبَّكَ لَذُو مَغْفِرَةٍ لِّلنَّاسِ عَلَىٰ
ظُلْمِهِمْ ۖ وَإِنَّ رَبَّكَ لَشَدِيدُ ٱلْعِقَابِ ٦

७. काफिर म्हणतात या व्यक्तिवर तिच्या पालनकर्त्या तर्फे एखादी निशाणी का अवतरली नाही ?[२१] (हे पैगंबर) तुम्ही तर केवळ खबरदार करणारे आहात आणि प्रत्येक जनसमूहा करीता एका मार्गदर्शक होऊन गेला आहे.[२२]

وَيَقُولُ ٱلَّذِينَ كَفَرُوا۟ لَوْلَآ أُنزِلَ عَلَيْهِ ءَايَةٌ مِّن رَّبِّهِۦٓ ۗ
إِنَّمَآ أَنتَ مُنذِرٌ ۖ وَلِكُلِّ قَوْمٍ هَادٍ ٧

८. अल्लाह प्रत्येक स्त्री च्या गर्भास जाणतो आणि जे काही गर्भाशयां मध्ये घटते व वाढते ते देखील जाणतो.[२३] त्याच्या येथे प्रत्येक गोष्टीकरीता एका अनुमान निर्धारित आहे.[२४]

ٱللَّهُ يَعْلَمُ مَا تَحْمِلُ كُلُّ أُنثَىٰ وَمَا تَغِيضُ ٱلْأَرْحَامُ
وَمَا تَزْدَادُ ۖ وَكُلُّ شَىْءٍ عِندَهُۥ بِمِقْدَارٍ ٨

९. अपरोक्ष आणि प्रत्यक्ष सर्वांचा तो ज्ञाता आहे. सर्वाहून श्रेष्ठ,अत्यंत उच्चतम दर्जाचा.[२५]

عَٰلِمُ ٱلْغَيْبِ وَٱلشَّهَٰدَةِ ٱلْكَبِيرُ ٱلْمُتَعَالِ ٩

१०. तुमच्या पैकी एखादा मनुष्य अतिशय हळू स्वरात बोलत असो वा मोठयाने बोलत असो, रात्री (च्या अंधःकारा)त लपलेला असो वा दिवसा (च्या प्रकाशात) हिंडत फिरत असो, त्याच्या (अल्लाहच्या ) करीता सर्व सारखेच आहे.

سَوَآءٌ مِّنكُم مَّنْ أَسَرَّ ٱلْقَوْلَ وَمَن جَهَرَ بِهِۦ
وَمَنْ هُوَ مُسْتَخْفٍۭ بِٱلَّيْلِ وَسَارِبٌۢ بِٱلنَّهَارِ ١٠

१७. म्हणजे हया इन्कार करणाऱ्यांना आश्चर्य या गोष्टीबद्दल वाटत आहे की माणसाला मेल्यानंतर पुन्हा जिवंत केले जाईल ज्याची खबर क़ुरआन देत आहे. परंतु खरे पाहता आश्चर्य करण्या योग्य तर त्यांचे हे कथन होय की मातीत मिळाल्यानंतर कशा प्रकारे दुसऱ्यांदा जिवित केला जाईल. जणू त्यांच्या मते सृष्टीचा हा हंगामा केवळ एवढयासाठी आहे की माणसाने मेल्यानंतर माती व्हावे व जीवन-क्रम डोळे मिटताच नेहमीकरीता संपुष्ट व्हावा. ना ईश्वरासमोर हजर होण्याचा प्रश्न, ना आखिरत विश्व व ना मोबदला व शिक्षा. ही आहे त्यांची जीवन विषयक कल्पना, जिचा अर्थ जीवन ध्येय शून्य व सृष्टी हेतुविरहित अर्थात हा निर्णय बुद्धिचा मुळीच नाही किंबहुना आंधळया इच्छा-आकांक्षांचा आहे. यास्तव प्रत्येक बुद्धिमान मनुष्य इन्कार करणाऱ्यांच्या या जीवन विषयक कल्पनेबाबत आश्चर्य करील. क़ुरआनाने प्रस्तुत केलेल्या जीवन विषयक कल्पनेबाबत नव्हे.

१८. आखिरतचा इन्कार करणाऱ्यांनी इहलोकात अज्ञान सत्याविरुद्ध पक्षपात आणि असत्य पूजकांचे अंधानुकरण इ. गोष्टीचे जोखंड आपल्या गळयात अडकविले आहे, म्हणून कियामतीच्या दिवशी हे जोखंड आगीच्या जोखंडाच्या स्वरुपात त्याच्या गळयात पडतील.

१९. म्हणजे पैगंबराना सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशासाठी पाठविले आहे की लोकांनी त्यांचे आवाहन मान्य करुन कल्याणदायी मार्गकडे धाव घ्यावी, दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसांच्या भलेपणा करीता पैगंबराना पाठविले आहे तथापि हया इन्कार करणाऱ्यांची अशी दशा आहे की ते मांगल्य पदरी पाडण्याऐवजी विनाशकारक गोष्टींना निमंत्रण देत आहेत. ते असे म्हणत की ईश-शिक्षेची तुम्ही धमकी देत आहात तो येत का नाही. या प्रकारे ते स्वत:ला मांगल्या पासून वंचित राखून ईश-शिक्षा येण्याची वाट बघत होते. येथे त्यांच्या हया चुकीचा विचार सरणीवर अंकूश ठेवला गेला आहे.

२०. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह लोकांचे चुकीचे वर्तन व त्यांचा अतिरेक असूनहि इहलोकात त्यांना त्वरीत शिक्षा देत नाही, किंबहुना क्षमाशील वृत्ती अंगिकारत राहतो. अशासाठी की त्यांना आपली सुधारणा करुन घेण्याचा अवसर लाभावा व त्यांनी तोल सावरावा, परंतु याचा असा अर्थ नव्हे की त्यांनी आपली सुधारणा केली नाही तरी तो त्यांना शिक्षा देणार नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाह जसा क्षमाशील आहे तसा कठोर शिक्षा देणारा हि आहे.

२१. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अनआम टी क्र. ६४ व ६५.

२२. म्हणजे ज्या प्रकारे मागील जन समूहांकडे त्यांच्या मार्गदर्शानासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे प्रेषित येत राहिलेत तद्‌वतच हे मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) तुम्हाला देखील लोकांच्या मार्गदर्शना साठी पाठविले गेले आहेत. यास्त्व गफलतीत पडलेल्या लोकांना सावध करणे व त्यांना ईश-मार्ग दाखविणे तुमचे कर्तव्य होय. त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याची जबाबदारी तुम्हावर नाही यास्तव अनुभूत ईश-चमत्कारांची जी मागणी ते करीत आहेत. तिला तुम्ही खात्रीत घेऊ नका.

स्पष्ट असावे की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे प्रेषित्व केवळ अरब वासीयापुरते नव्हते. किंबहुना पवित्र क़ुरआनात स्पष्टीकरणासह केल्या गेलेल्या निवेदना प्रमाणे समस्त जाति-समूहा करीता आहे. यास्तव त्यांच्या नंतर एखाद्या जन-समूहाकरीता एखाद्या नव्या प्रेषित वा पैगंबराची गरज भासण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

२३. म्हणजे केवळ अल्लाह जाणतो की मातेच्या उदरात मूल कशा प्रकारचे व कोणत्या गुणवैशिष्ट्यांचे वाढत आहेत आणि ती नऊ महिन्यां पूर्वीच मूलास जन्म देईल किंवा त्याहून अधिक मुदतीत. अशाच प्रकारे जनावरांच्या मादीच्या गर्भाचे विवरणात्मक ज्ञानहि अल्लाहलाच आहे.

२४. म्हणजे प्रसूतीची बाब असो वा अन्य एखादी, त्याने विश्वाच्या समस्त गोष्टींना निर्धारित वेळे सह योजनाबद्ध केले आहे आणि त्याचे ज्ञान प्रत्येक गोष्टीस व्यापून आहे. त्याच्या हया योजना बद्धतेत ही गोष्ट देखील आवश्यकरित्या सामील आहे की एखाद्या जन समूहावर कोणत्या वेळी अजाब (ईश-शिक्षा) आणली जावी. यास्तव प्रेषिताचे आवाहन रद्द केल्यानंतरहि तुमच्यावर ईश-शिक्षा येत नाही तेव्हा याचा अर्थ असा नव्हे की ईश-शिक्षा येणारच नाही. प्रेषितास खोटे ठरविण्याच्या स्थितीत अजाब निश्‍चिंतच येईल परंतु निर्धारीत वेळेवर चिजे ज्ञान केवळ अल्लाहला आहे.

२५. हया आयतीत सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या तीन गुणवैशिष्ट्यांचे वर्णन केले गेले आहे. त्यापैकी एक हे की तो अदृष्ट व दृष्ट आणि अनुभूत व अअनुभूत सर्व गोष्टींचा ज्ञाता आहे. दुसरे असे की तो कबीर (सर्वाहून श्रेष्ठ) आहे म्हणजे आपल्या शक्ति सामर्थ्यात व अन्य गुणवैशिष्टयात परिपूर्ण व सर्वोच्च आहे. तिसरे हे की तो अतिशय उच्चतम दर्जाचा आहे म्हणजे निर्मिती वरुन त्याचा दर्जाची कल्पना करणे कदापि योग्य नाही, तो त्याहूनहि अत्यंत उच्च व श्रेष्ठ आहे.

येथे या गुणवैशिष्ट्यांचा उल्लेख करण्याचा हेतु अल्लाहच्या महानतेची योग्य कल्पना मांडणे हा होय, जेणे करुन माणसाच्या अंगी त्याची उपासना व त्याच्या समोर जाब देण्याविषयीची जाणीव निर्माण व्हावी आणि त्याच्या शिक्षेच्या कल्पनेनेच त्याचा थरकाप उडावा.

११. एकामागून एक येणारे त्याच्या पुढे व मागे आहेत जे अल्लाहच्या हुकुमाने त्याचे संरक्षण करतात [२६] जोपर्यंत एखादा जन-समूह आपल्या वर्तनात बदल करीत नाही [२७] तोपर्यंत अल्लाह एखाद्या समूहावर संकट आणू इच्छिल तेव्हा मात्र ते टळू शकत नाही आणि असा कोणी नाही जो त्याच्या विरोधात यांचा सहाय्यक होईल.

لَهُ مُعَقِّبٰتٌ مِّنْ بَيْنِ يَدَيْهِ وَمِنْ خَلْفِهِ يَحْفَظُوْنَهُ
مِنْ اَمْرِ اللّٰهِ ؕ اِنَّ اللّٰهَ لَا يُغَيِّرُ مَا بِقَوْمٍ حَتّٰى يُغَيِّرُوْا مَا
بِاَنْفُسِهِمْ ؕ وَاِذَا اَرَادَ اللّٰهُ بِقَوْمٍ سُوْٓءًا فَلَا مَرَدَّ لَهُ ۚ وَمَا لَهُمْ
مِّنْ دُوْنِهِ مِنْ وَّالٍ ﴿١١﴾

१२. तोच आहे जो तुम्हाला वीजा दाखवितो, ज्या भय देखील निर्माण करतात आणि आशा देखील [२८] आणि तोच जड ढगांना उंच उभारतो.[२९]

هُوَ الَّذِيْ يُرِيْكُمُ الْبَرْقَ خَوْفًا وَّطَمَعًا
وَّيُنْشِئُ السَّحَابَ الثِّقَالَ ۚ ﴿١٢﴾

१३. आणि ढगांची गर्जना स्तुतीसह त्याच्या पावित्र्याचे वर्णन करते [३०] आणि फिरिश्ते देखील त्याच्या भयाने कंपित होऊन.[३१] तोच कडाडणाऱ्या वीजा पाठवितो आणि त्यांच्या आघातात ज्यांना इच्छितो आणतो [३२] परंतु लोक अल्लाह विषयी (आपसात) भांडत राहतात आणि (वस्तुस्थिती अशी आहे की) तो जबरदस्त शक्ति-सामर्थ्य बाळगणारा आहे.[३३]

وَيُسَبِّحُ الرَّعْدُ بِحَمْدِهِ وَالْمَلٰٓئِكَةُ مِنْ خِيْفَتِهِ ۚ وَيُرْسِلُ
الصَّوَاعِقَ فَيُصِيْبُ بِهَا مَنْ يَّشَآءُ وَهُمْ يُجَادِلُوْنَ
فِي اللّٰهِ ۚ وَهُوَ شَدِيْدُ الْمِحَالِ ؕ ﴿١٣﴾

१४. त्यालाच पुकारणे खरे आहे.[३४] जे लोक त्याच्या खेरीज दुसऱ्यांना पुकारतात ते त्यांच्या पुकारण्यास कसलाहि प्रतिसाद देऊ शकत नाही [३५] (त्यांचे पुकारणे ) असेच आहे जसे एखादा मनुष्य आपले हात पाण्यासमोर पसरवित असावा, अशासाठी की त्याच्या तोंडापर्यंत पोहचावे. वस्तुत: ते कधीहि त्याच्यापर्यंत पोहचणारे नाही [३६] आणि काफिरांची (सत्याचा विरोध करणाऱ्यांची ) पुकार तर अगदीच निरर्थक होय.[३७]

لَهُ دَعْوَةُ الْحَقِّ ؕ وَالَّذِيْنَ يَدْعُوْنَ مِنْ دُوْنِهِ لَا يَسْتَجِيْبُوْنَ
لَهُمْ بِشَيْءٍ اِلَّا كَبَاسِطِ كَفَّيْهِ اِلَى الْمَآءِ لِيَبْلُغَ فَاهُ وَمَا هُوَ
بِبَالِغِهِ ؕ وَمَا دُعَآءُ الْكٰفِرِيْنَ اِلَّا فِيْ ضَلٰلٍ ﴿١٤﴾

१५. आणि आकाश व जमीनीत जे काही आहे ते सर्व स्वखुशीने वा विवशतेने अल्लाहलाच सजदा करतात आणि सकाळ- संध्याकाळ त्यांच्या सावल्या देखील.[३८]

وَلِلّٰهِ يَسْجُدُ مَنْ فِي السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ طَوْعًا وَّكَرْهًا
وَّظِلٰلُهُمْ بِالْغُدُوِّ وَالْاٰصَالِ ۩ السجدة ﴿١٥﴾

२६. अभिप्रेत फिरीश्ते होत जे प्रत्येक व्यक्ति सोबत त्याच्या संरक्षणार्थ लागून राहतात. त्यांची ड्युटी अशा प्रकारे निर्धारीत आहे की एका पाठोपाठ दुसरा येत राहतो व त्यांच्या अवागमनाचा क्रम सतत जारी राहतो.

मनुष्य-जीवन तर प्रत्येक प्रकारच्या सकटांनी घेरले आहे आणि तो क्षणोक्षणी कोणत्या ना कोणत्या संकटात सापडण्याच्या बेतात असतो, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाला संकटांपासून व आपत्ति पासून सुरक्षित राखण्याची अशी उपाय योजना केली आहे की त्याच्या मागे व पुढे फिरिश्ते लावले गेले आहेत जे त्याचे संरक्षण करीत राहतात आणि फक्त अशाच वेळी त्याला नुकसान पोहोचते जेव्हा अल्लाह तर्फे ती गोष्ट ठरविलेली असते.

२७. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने जसा प्रत्येक व्यक्तिच्या संरक्षणाची उपाय योजना करुन ठेवली आहे तद्वतच जन-समूहांच्या सूख समृद्धिचीहि उपाय योजना करुन ठेवली आहे यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाह जेव्हा एखाद्या जन-समूहास शांती व सुबत्तेची ईश-देणगी प्रदान करतो तेव्हा अशाच स्थितीत ही ईश देणगी त्याच्याकडून हिरावून घेतली जाते ज्यावेळी तो स्वत: या ईश-देणगीची अवहेलना करीत विद्रोह करु लागतो, अन्यथा एखादी ईश देणगी प्रदान केल्यानंतर अकारण ती हिरावून घेण्याचा अल्लाहचा नियम नाही.

येथे विशेषत:या गोष्टीकडे संकेत करण्याचा हेतु आहे की हे इन्कार करणारे यावेळी सुख शांतीपूर्वक जीवन व्यतीत करीत आहेत तो दिर्घकाळ टिकून राहणारे नाही कारण त्यांनी स्वत:ला या ईश देणगीस अपात्र असल्याचे साबीत केले आहे. आता ही ईश देणगी अपरिहार्यत: त्यांच्याकडून हिरावून घेतली जाईल. यास्तव काही वर्षे लोटत नाहीत तोच अरब भूमीत काफिरांकरीता तोंड लपविणे कठीण झाले व अल्लाहचा नियम त्यांना लागू पडल्याखेरीज राहिला नाही.

२८. वीजा चमकतात तेव्हा एकीकडे हे भय निर्माण होते की एखाद्यावर कोसळणार तर नाही, तर दुसरीकडे पावसाची आशा बळावते. जणू वीज एकाचवेळी दोन गोष्टीचे स्मरण करते. एक हे की लोकांनी याबाबत सावध व्हावे की अल्लाहच्या शिक्षेचा आसूड त्यांच्यावर पडू शकतो, दुसरे असे की लोकांनी अल्लाहशीच कृपेची अभिलाषा बाळगावी.

२९. म्हणजे पाण्याने भरलेल्या मेघांना अल्लाहच उंच उठवितो. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे ही अल्लाहनेच बनविलेली व्यवस्था आहे ज्यायोगे पाण्याने भरलेले ढग उंचावतात व वातावरणात पसरुन दूर पावेतो पर्जन्यवृष्टी करण्याचे काम करतात.

३०. जेथापावेतो विज्ञानाचा संबंध आहे ढगांची गर्जना विद्युतभार (Electrical Charge) बाहेर पडल्याने निर्माण होते. धूलीकणांच्या परस्पर कृतीमुळे ढगांच्या वरच्या भागात अधिक भार (Positive Charge) आणि दरम्यानच्या भागात ऋण भार (Negative Charge) निर्माण होते. जेव्हा विद्युत भाराचे प्रमाण अधिक जास्त वाढते तेव्हा वीज बाहेर पडते आणि वीजेचा प्रवाह (Current) जबरदस्त उष्णतेसह हवेत पोकळी निर्माण करतो आणि विद्युत लहर ध्वनी लहरीचे रुप धारण करते यालाच आपण वीज कडाडणे असे म्हणतो ही झाली मेघ गर्जनेची भौतिक वस्तुस्थिती जी ज्ञानविषयक स्वरुपाची आहे तथापि पवित्र क़ुरआन हिच्या आंतरिक वस्तुस्थितीकडे लक्ष वेधू इच्छिते जी खरे महत्व बाळगणारी गोष्ट आहे. ती अशी की ढगांची गर्जना या गोष्टीचे ऐलान करते की या सृष्टीचा एक ईश्वर आहे जो तिला निर्माण करुन असंबंधित झाला नाही. किंबहुना तिची व्यवस्था स्वत:सांभाळली आहे व आपल्या शक्ति सामर्थ्याचे चमत्कार तो दाखवित राहतो आणि तो या गोष्टीवर सर्मथ आहे की विद्रोही. दासांवर आपल्या शिक्षेचा आसूड मारावा. तात्पर्य ज्यांच्या कानांवर पडदे पडलेले नाहीत ते ढगांच्या गर्जनेत अल्लाहच्या महानतेची घोषणा ऐकतात.

३१. म्हणजे ती एवढी महान शक्ति आहे की फिरिश्ते देखील तिच्या प्रतापाने भयकंपित होतात तेव्हा माणसाने ढगांचा कडकडाट ऐकून कोणता प्रभाव ग्राह्य धरला पाहिजे?

३२. कडाडणारी वीज ज्या कोणावर कोसळते त्याला नष्ट केल्याशिवाय राहात नाही. सर्वसामान्यपणे माणसाच्या अवलोकनात येणारी ही बाब आहे. आणि कोण-कोणत्या क्षणी वीजेच्या तावडीत सापडेल हे सांगता येऊ शकत नाही.

३३. म्हणजे ह्या कडाडणाऱ्या वीजा व गर्जना करणाऱ्या मेघांद्वारे या गोष्टीचा उद्घोष व अभिव्यक्ति होत आहे की या सृष्टीचा रब्ब (स्वामी,पालनकर्ता) जबरदस्त शक्ति सामर्थ्य बाळगणारा आहे. वस्तुत:माणसाने ही निनादरुपी घोषणा ऐकून भयकंपित व्हावयास हवे होते परंतु लोकांची ही दशा आहे की ते ईश्वर संदर्भात वाद विवाद करण्याची धृष्टता अंगिकारतात कोणी म्हणतो की हे ईश्वराचे नव्हे किंबहुना देवढांचे कार्य आहे. तर कोणी म्हणतो ईश्वराच्या अंगी मेलेल्यास जिवंत करण्याचे सामर्थ्य कसले आणि आजच्या युगातील 'विद्वान' तर ईश्वर राहित सृष्टीचा दृष्टीकोन मांडतात. अशासाठी की त्यांना ईश्वरापासून सदैव करीता 'मुक्ति' मिळावी.

३४. पुकारण्याशी अभिप्रेत गरजा पूर्ण करण्यासाठी, व दु:ख निवारण करण्यासाठी आर्जव करणे होय.अर्थात हे अल्लाहचेच गुणवैशिष्ट्य आहे की तो पुकारणाऱ्यांची पुकार ऐकतो व त्यांच्या गरजा भागवितो व त्याच्या हाकेला धावून येतो. म्हणून त्याला पुकारणे अगदी योग्य व वस्तुस्थितीस अनुसरुन आहे. आणि ज्या अर्थी अल्लाहखेरीज इतर कोणाचेहि हे गुणवैशिष्ट्य नाही

म्हणून अल्लाहला सोडून इतरांना पुकारणे मग ते मूर्ति स्वरुप असोत, जिन्न असोत, फिरिश्ते असोत, वली असोत वा प्रेषित पैगंबर, अगदी चुकीचे व वस्तुस्थितीच्या विपरीत आहे.

३५. कित्येक मुसलमान देखील अज्ञानापायी आपल्या गरजापूर्ति करीता दरगा व मजारींकडे रुजू करतात. ते असे समजातात की जे बुजुर्ग कबरीमध्ये दफनस्थ आहेत ते त्यांच्या प्रार्थना ऐकतात व त्यांची बिघडलेली कार्ये तडीस नेतात. तथापि त्यांची ही धारणा तितकीच चुकीची आहे जेवढी अनेकेश्वरवाद्यांची आपल्या उपास्यांसंबंधी होती.

आयतीत स्पष्टपणे फर्माविले गेले आहे की अल्लाह खेरीज असा कोणीहि नाही जो प्रार्थना वा आर्जव यांना प्रतिसाद देऊ शकेल.

३६. म्हणजे ज्या प्रकारे एखाद्या माणसाणे हात पसरुन पाण्याला विनवणी करावी की त्याच्या तोंडापर्यंत पोहचावे तर त्याची ही विनवणी ना पाण्याला ऐकू जाईल ना ते तहान भागविण्यासाठी ओठापर्यंत येईल. त्याचप्रमाणे अनेकेश्वरवादी अल्लाहला सोडून ज्या कोणापुढे प्रार्थनेसाठी हात पसरवितात व त्यांना दु:ख निवारणासाठी फिर्याद करतात तेव्हा ते ना त्यांची प्रार्थना वा फिर्याद ऐकतात व ना त्यांची गरज पूर्ण करतात.

स्पष्ट असावे की 'पाण्यापुढे हात पसरविणे' अशासाठी की ते तोंडापावेतो पोहचावे. अरबी भाषेतील वाक्प्रचार आहे. ज्याचा अर्थ असाध्य गोष्टीची अभिलाषा बाळगणे असा होय. आणि हाच अर्थ आयतीत अभिप्रेत आहे.

३७. म्हणजे काफिर अल्लाहला सोडून ज्यांना पुकारतात, त्यांना पुकारणे अगदी व्यर्थ होय.

३८. म्हणजे आकाश व जमीनीवरील समस्त निर्मिती, मग ती फिरिश्ते असो जिन्न अथवा मनुष्य असो अथवा अन्य एखादी, सर्व अल्लाहला कोणत्या ना कोणत्या रीतीने सजदा करतात. एखादा आपले शिर स्वेच्छेने त्याच्यापुढे झुकवितो आणि एखादा स्वेच्छेने का नसेना पण निसर्ग नियम त्याला आपल्या निर्मात्यापुढे शिरसावंद्य होण्यास भाग पाडतो. एखाद्या काफिराचे जिवंत राहण्याकरीता श्वास घेणे, वा अन्न ग्रहण करणे किंवा चालण्याकरीता पायांना चालना देणे म्हणजे ईश्वराच्या विधिनियमांचे पालन करणे होय. अर्थात त्यांच्या विधिनियमांची अंमलबजावणी हे एका परीने त्याच्यापुढे नतमस्तक होणे आहे. आता ही गोष्ट वेगळी की ही नतमस्तकता आगतिक स्वरुपाची आहे आणि म्हणूनच अशा झुकण्यावर माणसाला 'मोमीन' ईमान बाळगणारा म्हटले जाऊ शकत नाही.

प्रत्येक वस्तू ईश्वराला सजदा करीत असल्याचे स्पष्ट लक्षण तिची सावली होय. अर्थात हे की अल्लाहच्या निर्धारीत नियमानुसार सावली लाहन मोठी होत राहते. ईश्वराचा इन्कार करणाऱ्या कोणत्याहि मनुष्यात एवढे सामर्थ्य नाही की आपली सावली जमीनीवर पडू न द्यावी. अधिकार असलेल्या जीवनात तो अल्लाहच्या आज्ञापालनाचा इन्कार करीत आहे परंतु अधिकारहीन जीवनात मात्र त्याचे अस्तित्व ईश्वरापुढे झुकलेले आहे. माणसाने या गोष्टीचा विचार केल्यास त्याचे किती भले होईल ही सजद्याची आयत आहे म्हणून हिचे पठण झाल्यावर त्वरीत सजदा केला पाहिजे.

ज्या लोकांनी आपल्या पालन कर्त्याचे आवाहन कबूल केले त्यांच्या करीता अखेरीस भलाई आहे आणि ज्यांनी त्यांच्या आवाहानास क़बूल केले नाही, तेव्हा त्यांना जर ज़मीनवरील समस्त धन सम्पत्ति प्राप्त होईल व तेवढीच अधिक जास्त तर ते 'फिदया' (मुक्ति-दंड) म्हणून देऊ इच्छितील अशा लोकांना मोठ्या वाईट हिशोबाला तोंड द्यावे लागेल आणि त्यांचे ठिकाण-जहन्नम असेल-मोठे वाईट स्थान.(अल-क़ुर्आन)

१६. यांना विचारा आकाशांचा व जमीनीचा स्वामी (रब्ब) कोण आहे? सांगा-अल्लाह-त्यांना विचारा मग काय तुम्ही त्याला सोडून इतरांना आपला कार्य घडविणारा बनविले आहे, जे स्वत:साठीहि ना एखाद्या लाभाचा अधिकार बाळगतात, ना नुकसानाचा.[३९] सांगा, काय आंधळा व डोळस दोन्ही समान आहेत ?[४०] अथवा अंध:कार आणि प्रकाश सारखे आहेत?[४१] किंवा त्यांनी ठरविलेल्या सहभागीनी त्याच प्रकारे निर्माण केले जसे त्याने (अल्लाहने) निर्माण केले आहे की ज्यामुळे हा मामला त्यांच्याकरिता संशयास्पद ठरला.[४२] सांगा-अल्लाहच प्रत्येक वस्तुचा निर्माता आहे, व तो एकटा आहे सर्वाना आपल्या काबूत राखणारा.[४३]

قُلْ مَنْ رَّبُّ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِؕ قُلِ اللّٰهُؕ قُلْ
اَفَاتَّخَذْتُمْ مِّنْ دُوْنِهٖۤ اَوْلِيَآءَ لَا يَمْلِكُوْنَ لِاَنْفُسِهِمْ نَفْعًا
وَّلَا ضَرًّاؕ قُلْ هَلْ يَسْتَوِى الْاَعْمٰى وَالْبَصِيْرُ ۙ اَمْ هَلْ
تَسْتَوِى الظُّلُمٰتُ وَالنُّوْرُ ۚ اَمْ جَعَلُوْا لِلّٰهِ شُرَكَآءَ خَلَقُوْا
كَخَلْقِهٖ فَتَشَابَهَ الْخَلْقُ عَلَيْهِمْؕ قُلِ اللّٰهُ خَالِقُ كُلِّ شَىْءٍ
وَّهُوَ الْوَاحِدُ الْقَهَّارُ ﴿١٦﴾

१७. त्याने आकाशातून पाणी वर्षाविले तेव्हा खोरे-आपापल्या व्यापकतेनुसार वाहू लागले मग महापुराने उमळणाऱ्या फेणास पृष्ठावर आणले आणि अशाच प्रकारचा फेण त्या वस्तुंमधूनहि उमळतो ज्यांना लोक दागिने किंवा अन्य इतर वस्तू बनविण्याकरीता आगीत तापवितात. अशा प्रकारे अल्लाह सत्य व असत्याचे स्पष्टीकरण फर्माविती तेव्हा जो फेण आहे तो वाया जातो आणि जी वस्तू लोकांकरीता लाभदायक आहे ती जमीनीवर साचत राहते. अशा प्रकारे अल्लाह उदाहरणे सादर करतो.[४४]

اَنْزَلَ مِنَ السَّمَآءِ مَآءً فَسَالَتْ اَوْدِيَةٌۢ بِقَدَرِهَا
فَاحْتَمَلَ السَّيْلُ زَبَدًا رَّابِيًاؕ وَمِمَّا يُوْقِدُوْنَ
عَلَيْهِ فِى النَّارِ ابْتِغَآءَ حِلْيَةٍ اَوْ مَتَاعٍ زَبَدٌ مِّثْلُهٗؕ
كَذٰلِكَ يَضْرِبُ اللّٰهُ الْحَقَّ وَالْبَاطِلَ ۬ؕ فَاَمَّا
الزَّبَدُ فَيَذْهَبُ جُفَآءًۚ وَاَمَّا مَا يَنْفَعُ النَّاسَ
فَيَمْكُثُ فِى الْاَرْضِؕ كَذٰلِكَ يَضْرِبُ اللّٰهُ الْاَمْثَالَؕ ﴿١٧﴾

१८. ज्या लोकांनी आपल्या पालन कर्त्याचे आवाहन कबूल केले त्यांच्या करीता अखेरीस भलाई आहे आणि ज्यांनी त्यांच्या आवाहानास क़बूल केले नाही, तेव्हा त्यांना जर ज़मीनवरील समस्त धन सम्पत्ति प्राप्त होईल व तेवढीच अधिक जास्त तर ते 'फिदया' (मुक्ति-दंड) म्हणून देऊ इच्छितील.[४५] अशा लोकांना मोठ्या वाईट हिशोबाला तोंड द्यावे लागेल [४६] आणि त्यांचे ठिकाण-जहन्नम असेल-मोठे वाईट स्थान.

لِلَّذِيْنَ اسْتَجَابُوْا لِرَبِّهِمُ الْحُسْنٰىؔؕ وَالَّذِيْنَ لَمْ يَسْتَجِيْبُوْا لَهٗ لَوْ اَنَّ
لَهُمْ مَّا فِى الْاَرْضِ جَمِيْعًا وَّمِثْلَهٗ مَعَهٗ لَافْتَدَوْا بِهٖؕ اُولٰٓئِكَ لَهُمْ
سُوْٓءُ الْحِسَابِ ۙ وَمَاْوٰىهُمْ جَهَنَّمُؕ وَبِئْسَ الْمِهَادُ ﴿١٨﴾

३९. येथे ज्या 'शिर्क'चे खंडन केले गेले आहे ते असे की अल्लाह खेरीज इतरांस 'वली' म्हणजे 'कारसाज' (कार्य तडीस नेणारा) समजणे अर्थात एखाद्याविषयी ही श्रद्धा बाळगणे की तो आमच्या दृष्टीला दिसत नसला तरी आम्हाला लाभ-हानी पोहोचविण्याचा त्याला अधिकार आहे व अपरोक्षरित्या तो आमची मदत करु शकतो. ही कल्पना अगदी खोटी व ही श्रद्धा अगदी अनेकेश्वरवादीय आहे कारण अल्लाह खेरीज असा कोणी नाही जो वास्तविक पणे नफा किंवा नुकसान पोहचनू शकेल. मग ही श्रद्धा ज्या कोणाबाबतहि राखली जाईल. 'शिर्क'च ठरेल मग ती मूर्ति असो वा वृक्ष, आत्मा असो वा फिरिश्ता आणि वली असो कि पैगंबर आणि त्याला 'ईश्वर' किंवा 'पालनहार' असे सरळरित्या संबोधले जात नसले तरी त्या अर्थाने त्यास वली (कारसाज) ठरविणे हेच 'ईश्वर' बनविणे झाले. यास्तव जो मनुष्य एखाद्याशी असा मामला करतो जो केवळ ईश्वराशीच केला गेला पाहिजे तो स्पष्टत: शिर्क करणारा ठरतो

पवित्र क़ुरआन अशा लोकांना विचारते की जेव्हा समस्त स्वामी-पालनकर्ता केवळ अल्लाह आहे तेव्हा हे (इतर) वली, कारसाज कसे बनले?

४०. 'आंधळ्या'शी अभिप्रेत बौद्धिक दृष्ट्या आंधळा आणि 'डोळस'शी अभिप्रेत अंतर्दृष्टी बाळगणारा.

४१. अंध:काराशी अभिप्रेत अज्ञानाचा अंध:कार आणि प्रकाशाशी अभिप्रेत सत्य ज्ञानाचा प्रकाश होय.

४२. म्हणजे जेव्हा एक ईश्वराखेरीज अन्य एखाद्याचे काही निर्माण करणे सिद्ध नाही तेव्हा एकाहून अधिक ईश्वर कसे झाले? त्याच्याखेरीज जे काही आहे निर्मिती मात्र आहे. मग निर्मितीलाच निर्मात्याचा दर्जा देण्यात अर्थ कसला? ईश्वराचे गुणवैशिष्ट्य निर्मितीत कोठून येऊ शकते?

४३. म्हणजे निर्माण केल्यानंतर कोणतीहि वस्तू अल्लाहच्या नियंत्रणाबाहेर नाही, किंबहुना प्रत्येक वस्तू पूर्णत: त्याच्या काबूत आहे. मग ज्या गोष्टीवर अल्लाहचे अधिपत्य असावे ती 'ईश्वर' कशी?

४४. हे सत्य व असत्याच्या संघर्षाचे उदाहरण होय आकाशातून पाणी वर्षाविण्याशी अभिप्रेत ईश-आदेशांचे अवतरण होय.दऱ्या-खोऱ्यांचे आपल्या व्यापकतेनुसार वाहू लागण्याचा अर्थ सत्य-स्वीकृतिची क्षमता बाळगणाऱ्यांचे आपापल्या सामर्थ्यानुसार लाभ ग्रहण करणे. महापूराशी अभिप्रेत सत्याचा महापूर होय आणि फेणचा अर्थ असत्याचा फेण होय जो सत्य व असत्याच्या संघर्षात उमळून वर येतो. दुसऱ्या उदाहरणात सोन्यात चांदीच्या दागिन्याशी अभिप्रेत प्रथम दर्जाचे खरे मोमीन (ईमान बाळगणारे) होत व इतर वस्तूंशी अभिप्रेत सर्वसामान्य सदाचारी (ईमान बाळगणारे) लोक होत. आणि त्यांना तापविण्याचा अर्थ कसोटीच्या अग्निकुण्डातून पार पाडणे. अर्थात सत्य व असत्याचा जेव्हा संघर्षा उद्भवतो तेव्हा असत्य उन्मळून समोर येते पण त्यांची वास्तविकता फेणाहून अधिक काहीच नाही. तेव्हा थोड्या अवधितच लयाला जाते. तथापि सत्य अशा प्रकारे बाकी राहते ज्या प्रकारे पाणी जमीनीवर सांचून राहते त्याचप्रमाणे सोने-चांदी व अन्य द्यातूंना जेव्हा भट्टीत तापविले जाते तेव्हा त्यातली मळ घाण उमळून वर येते व लगेच नाहीशी होते आणि जे शुद्ध सोने-चांदी वा धातू असेल ते बाकी राहते. तात्पर्य निसर्गाचा हा नियम आहे की जी गोष्ट लोकांना खरोखर लाभदायक आहे ती टिकून राहावी व जी हानीकारक आहे ती नष्ट व्हावी. कुरआन अवतरणानंतर सत्य व असत्याचा जो संघर्ष घडून आला होता त्यात असत्य थोड्या अवधिकरीता फेणासारखे उमळून आले होते परंतु परिणामी सत्यालाच अनश्वरता व स्थायित्व लाभले व असत्याचा अगदी नायनाट झाला.

४५. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह मायदा टीप क्र.१२४

४६. म्हणजे आपल्या कर्माचा हिशोब देण्याकरीता जेव्हा त्यांना सामोरे जावे लागेल तेव्हा अगदी सक्तपणे त्यांना जाब विचारला जाईल व त्यांना थेंबा थेंबाचा हिशेब द्यावा लागेल.

१९. काय तो मनुष्य जो जाणतो की जे काही तुमच्या पालन कर्त्या तर्फे अवतरित झाले आहे सत्य आहे, त्या माणसासारखा असू शकतो जो आंधळा आहे? शुद्धीवर तर बुद्धिमान लोकच येतात.[४७]

أَفَمَن يَعْلَمُ أَنَّمَا أُنزِلَ إِلَيْكَ مِن رَّبِّكَ الْحَقُّ كَمَنْ هُوَ أَعْمَىٰ ۚ
إِنَّمَا يَتَذَكَّرُ أُولُو الْأَلْبَابِ ﴿١٩﴾

२०. जे अल्लाहशी केलेल्या करारास पूर्ण करतात आणि आपल्या वचन-करारांचा भंग करीत नाही. [४८]

الَّذِينَ يُوفُونَ بِعَهْدِ اللَّهِ وَلَا يَنقُضُونَ الْمِيثَاقَ ﴿٢٠﴾

२१. आणि ज्या नात्यांना अल्लाहने जोडण्याचा आदेश दिला आहे त्यांना जोडतात.[४९] आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगतात व वाईट हिशेबाची भिती बाळगतात. [५०]

وَالَّذِينَ يَصِلُونَ مَا أَمَرَ اللَّهُ بِهِ أَن يُوصَلَ
وَيَخْشَوْنَ رَبَّهُمْ وَيَخَافُونَ سُوءَ الْحِسَابِ ﴿٢١﴾

२२. आणि ज्यांनी आपल्या पालनकर्त्याची मर्जी प्राप्त करण्याकरीता संयम पाळला [५१] नमाज़ कायम केली व आम्ही प्रदान केलेल्या उपजिविकेमधून उघडरित्या व लपवून खर्च केला [५२] आणि वाईट गोष्टीस चांगल्या गोष्टीने दूर करीत राहिलेत [५३] तर हेच लोक होत ज्यांच्या करीता शेवटचे घर आहे .[५४]

وَالَّذِينَ صَبَرُوا ابْتِغَاءَ وَجْهِ رَبِّهِمْ وَأَقَامُوا الصَّلَاةَ
وَأَنفَقُوا مِمَّا رَزَقْنَاهُمْ سِرًّا وَعَلَانِيَةً وَيَدْرَءُونَ
بِالْحَسَنَةِ السَّيِّئَةَ أُولَٰئِكَ لَهُمْ عُقْبَى الدَّارِ ﴿٢٢﴾

२३. सदैवकालीन बागा ज्यांत ते दाखल होतील आणि ते देखील, जे त्यांचे माता पिता, त्यांच्या पत्न्या व त्यांच्या संततीपैकी सदाचारी असतील [५५] आणि फिरिश्ते प्रत्येक दरवाज्यातून त्यांच्या जवळ येतील.

جَنَّاتُ عَدْنٍ يَدْخُلُونَهَا وَمَن صَلَحَ مِنْ آبَائِهِمْ وَأَزْوَاجِهِمْ
وَذُرِّيَّاتِهِمْ ۖ وَالْمَلَائِكَةُ يَدْخُلُونَ عَلَيْهِم مِّن كُلِّ بَابٍ ﴿٢٣﴾

२४. (आणि म्हणतील) तुम्हावर सलामती (शांती) असो अशासाठी की तुम्ही संयम पाळला [५६] तेव्हा किती चांगले आहे शेवटचे घर.

سَلَامٌ عَلَيْكُم بِمَا صَبَرْتُمْ ۚ فَنِعْمَ عُقْبَى الدَّارِ ﴿٢٤﴾

२५. आणि जे लोक अल्लाहशी मजबूत वचन-करार केल्यानंतर त्याचा भंग करतात व त्या संबंधांना तोडून टाकतात ज्यांना जोडण्याचा आदेश अल्लाहने दिला आहे व जमीनीवर उत्पात माजवितात.[५७] त्यांच्याकरीता (अल्लाहचा) शाप आहे व त्यांच्याकरीता फार वाईट स्थान.

وَالَّذِينَ يَنقُضُونَ عَهْدَ اللَّهِ مِن بَعْدِ مِيثَاقِهِ
وَيَقْطَعُونَ مَا أَمَرَ اللَّهُ بِهِ أَن يُوصَلَ وَيُفْسِدُونَ فِي
الْأَرْضِ ۙ أُولَٰئِكَ لَهُمُ اللَّعْنَةُ وَلَهُمْ سُوءُ الدَّارِ ﴿٢٥﴾

४७. म्हणजे ह्या ज्या गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत त्या माणसाला सत्याशी परिचित बनविण्याकरीता पुरेशा आहेत. तथापि शुद्धीत असत्याचा पुरावा केवळ तेच लोक देतात जे बुद्धिमान व अंतर्दृष्टी बाळगणारे आहेत. बुद्धि आणि मनातील अंध:कारावर कोणताहि उपदेश लाभप्रद ठरत नाही.

४८. मनुष्य जेव्हा आपल्या बुद्धिचा उचित वापर करतो तेव्हा तो ईश्वरला ओळखणाराहि बनतो व स्वत:ला ओळखणाराहि व ही गोष्ट त्याच्या अंगी जबाबदारींची जाणीव निर्माण करते, ज्यायोगे त्याच्या अंगी उत्कृष्ट गुण वाढू लागतात. या गुणांमध्ये जो गुण प्राथमिकता राखतो तो अल्लाहशी प्रतिज्ञेबाबत एकनिष्ठ असणे होय. प्रतिज्ञेशी अभिप्रेत अल्लाहला आपला स्वामी-पालनकर्ता मान्य करण्याची ती प्रतिज्ञाहि होय जी मानव जातीकडून ती इहलोकात येण्यापूर्वीच घेतली गेली होती आणि जी माणसाच्या स्वभावधर्मात अशा प्रकारे रुजली आहे की तो आपल्या स्वामी व पालनकर्त्याला सहजगत्या ओळखतो (पहा सूरह अअराफ टीप क्र. २६४, २६५) आणि ती प्रतिज्ञाहि जी मनुष्य अल्लाहवर ईमान बाळगून त्याच्याशी घेतो.

४९. अभिप्रेत कौटुंबिक आप्त संबंध होत व त्यांना जोडण्याशी अभिप्रेत त्यांच्याशी सद्व्यवहार करणे व त्यांचे हक्क अदा करणे होय.या बाबतीत माणसाची मोठी कठीण परिक्षा होते की आपल्या नातेवाईकांशी तो कसा व्यवहार करतो. संबंध जोडणे ही फार मोठी नैतिक वैशिष्ट्य होय, उलट संबंध विच्छेद फार मोठी अनैतिकता.

५०. म्हणजे सदाचाराच्या मार्गाचे अनुसरण करुनहि ही भिती बाळगतात की कियामतीच्या दिवशी कदाचित आम्हाला सक्तीने विचारपूस केली न जावी. ही भिती त्यांच्या जीवनाला सावध बनवितात व सदाचाराचे मार्ग त्यांना मोकळे होतात.

५१. स्पष्ट झाले की अल्लाहजवळ तया संयमाचे व सहनशीलतेचे कदर व महत्व आहे जी त्याची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी केली जावी. अर्थात हे उद्दिष्ट डोळ्यासमोर नसेल तर संयमावर कोणत्याहि मोबदल्याची अपेक्षा केली जाऊ शकत नाही.

संयमाशी अभिप्रेत माणसाने सत्य मार्गावर सहनशील रहावे. अल्लाहच्या उपासनेकरीता व आज्ञापालनाकरीता कष्ट यातना सहन कराव्यात. दु:स्थितीस व आजारपणास सहन करावे, संकटांना व विपदांना झेलावे आणि लोकांची सुधारणा व अल्लाहच्या मार्गात प्रयत्न संदर्भात धैर्याने व निश्चयपूर्वक वागावे.अशा प्रकारे ईमान बाळगणाऱ्याचे संपूर्ण जीवन संयम व सहनशीलतेचे जीवन असते.

५२. अभिप्रेत अल्लाहच्या प्रसन्नतेकरीता खर्च करणे. व कल्याणदायी कार्यांकरीता खर्च करणे होय. अधिक स्पष्टीकरण साठी पहा सूरह बकरा टीप क्र.४५२

५३. मलीनतेस मलीनतेनेच दूर केले जाऊ शकत नाही किंबहुना तिला स्वच्छ करण्यासाठी पाण्याची गरज भासते. तद्वतच अनितीस अनितीच्या प्रत्युत्तराने नव्हे किंबहुना सदाचार व सदव्यवहाराद्वारेच दूर केले जाऊ शकते. म्हणून बिघडलेल्या वातावरणास सुधारणेचे कार्य करणाऱ्यांचे खरे शस्त्र 'सदाचार' हेच असते.

५४. म्हण्जे आखिरत (मरणोत्तर जीवना) चे घर ज्याच्या ईश देणग्या अशाच लोकांना लाभतील.

५५. ईमान बाळगणाऱ्यांना ही अधिक खुश खबरी ऐकविली गेली आहे की त्यांचे माता पिता, पत्न्या व संतती पैकी जे जे सदाचारी असतील त्यांच्यासह जन्नतमध्ये एकत्र होतील अशासाठी की त्यांना अधिक आनंददायक ठरावे. ही खुश खबरी ईमान बाळगणाऱ्यांना या गोष्टीसाठी प्रवृत्त करते की त्यांनी आपल्या घरच्या वातावरणास सदाचारी बनविण्याचा प्रयत्न करावा, यासाठी की घरातील सर्व लोक जन्नत साठी पात्र व्हावेत.

५६. म्हणजे जे सहनशीलतापूर्वक जीवन ईहलोकात तुम्ही व्यतीत केले त्याचा मोबदला म्हणून तुम्ही जन्नत करीता पात्र ठरविले गेले जिथे तुमच्या करीता शांतीच शांती आहे. या कल्पनेतच ईमान बाळगणाऱ्या करीता आत्मीय स्वादाची मोठी सामुग्री आहे की जन्नतमध्ये फिरिश्ते त्यांना भेटावयास येतील व त्यांना या सफलते बद्दल धन्यवाद देतील.

५७. ही त्या लोकांची दशा होय जे एक ईश्वराचे दास बनून राहू इच्छित नाही. ते दास्यत्वाच्या त्या वचनाचा जे स्वाभाविक वचन आहे, भंग करतात तसेच एखाद्या संकटात सापडण्याच्या स्थितीत ईश्वराशी दास्यत्वाची जाणीवपूर्वक जी प्रतिज्ञा घेतात तिचाहि संकट मुक्त होताच भंग करतात आणि कुफ्र व शिर्कच्या मार्गावर चालून जगात सर्व प्रकारचा बिघाड निर्माण करतात.

اَللّٰهُ يَبْسُطُ الرِّزْقَ لِمَنْ يَّشَآءُ وَيَقْدِرُ ۚ وَفَرِحُوْا بِالْحَيٰوةِ
الدُّنْيَا ۚ وَمَا الْحَيٰوةُ الدُّنْيَا فِى الْاٰخِرَةِ اِلَّا مَتَاعٌ ﴿٢٦﴾

२६. अल्लाह ज्याच्या करीता इच्छितो उपजिविका विस्तृत करतो आणि ज्याच्या करीता इच्छितो मर्यादित करतो. [५८] लोक इहलोकीय जीवनाबद्दल खुष आहेत वस्तुतः इहलोकीय जीवन आखिरत (मरणोत्तर जीवन) च्या तुलनेने काहीच नाही, या खेरीज की थोड्याशा लाभाची सामुग्री आहे.[५९]

وَيَقُوْلُ الَّذِيْنَ كَفَرُوْا لَوْلَآ اُنْزِلَ عَلَيْهِ اٰيَةٌ مِّنْ رَّبِّهٖ ۗ قُلْ اِنَّ اللّٰهَ
يُضِلُّ مَنْ يَّشَآءُ وَيَهْدِىْٓ اِلَيْهِ مَنْ اَنَابَ ﴿٢٧﴾

२७. हे लोक ज्यांनी कुफ्र केले आहे असे म्हणतात की या माणसावर त्याच्या पालनकर्त्यातर्फे एखादी निशाणी का उतरली नाही ?[६०] सांगा, अल्लाह ज्याला इच्छितो मार्गभ्रष्ट करतो आणि आपल्याकडे अग्रसर होण्याचा मार्ग त्याला दाखवितो जो त्याच्याकडे (अल्लाहकडे) रुजू करतो. [६१]

اَلَّذِيْنَ اٰمَنُوْا وَتَطْمَئِنُّ قُلُوْبُهُمْ بِذِكْرِ اللّٰهِ ۗ
اَلَا بِذِكْرِ اللّٰهِ تَطْمَئِنُّ الْقُلُوْبُ ﴿٢٨﴾

२८. जे ईमान बाळगतात व ज्यांची मने अल्लाहच्या स्मरणाने संतुष्ट होतात. ऐका ! अल्लाहच्या स्मरणानेच हृदयांना समाधान लाभते.[६२]

اَلَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ طُوْبٰى لَهُمْ وَحُسْنُ مَاٰبٍ ﴿٢٩﴾

२९. ज्या लोकांनी ईमान बाळगले व सत्कर्मे केलीत, त्यांच्याकरीता अभिनंदन आहे [६३] व उत्कृष्ट परिणती.

كَذٰلِكَ اَرْسَلْنٰكَ فِىْٓ اُمَّةٍ قَدْ خَلَتْ مِنْ قَبْلِهَآ اُمَمٌ لِّتَتْلُوَا۟
عَلَيْهِمُ الَّذِىْٓ اَوْحَيْنَآ اِلَيْكَ وَهُمْ يَكْفُرُوْنَ بِالرَّحْمٰنِ ۗ قُلْ هُوَ رَبِّىْ
لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ۚ عَلَيْهِ تَوَكَّلْتُ وَاِلَيْهِ مَتَابِ ﴿٣٠﴾

३०. अशा प्रकारे आम्ही तुम्हाला एका अशा जन-समूहात पैगंबर बनवून पाठविले आहे ज्यापूर्वी अनेक जन समूह होऊन गेले यासाठी की तुम्ही त्यांना ती गोष्ट सांगावी जी आम्ही तुम्हावर अवतरित केली आहे.[६४] या स्थितीत की ते रहमानचा इन्कार करीत आहेत [६५] सांगा तोच माझा पालनकर्ता आहे, त्याच्या खेरीज कोणीहि उपासनीय नाही मी त्यावर भरवसा केला व त्याच्याचकडे रुजू करतो.

५८. अनेकेश्वरवादी व काफिरांच्या ठायी धनसम्पत्तिची रेलचेल आणि त्यांची आर्थिक 'प्रगती' पाहून लोक या भ्रमात पडतात की जर हे लोक ईश-निर्भत्सनेस पात्र असते तर ऐहिक जीवन यांच्याकरीता एवढे व्यापक का झाले असते. याच भ्रमाला दूर करण्यासाठी फर्माविले गेले की उपजिविकेची व्यापकता व संकुचितता अल्लाहच्या मर्जीवर अवलंबून आहे व मनुष्याची या संदर्भात ही कसोटी घेतली जाते की तो इहलोकास ध्येय बनवितो कि आखिरतला, म्हणून एखाद्या करीता उपजिविकेची व्यापकता या गोष्टीचे प्रमाण नव्हे की अल्लाहच्या नजरेत तो प्रिय आहे.

५९. लोकांचे आखिरतच्या जीवनास दृष्टीआड करुन इहलोकीय जीवनास सर्व काही समजणे आणि ऐहिक प्रगतीवर डिंग मारणे ही मूलभूत चूक होय जिने त्यांना आगदी चुकीच्या मार्गाला लावले आहे. या वेळी तर ते आपली दुनिया सजविण्यात मग्न आहेत, पण त्यावेळी मात्र त्यांचे डोळे उघडतील जेव्हा आखिरत घडून येईल. त्यावेळी त्यांना जाणीव होईल की ना ऐहिक सम्पत्ति खरी सम्पत्ति होती व ना ऐहिक प्रगती खरीखुरी प्रगति. त्यांनी आपल्या जीवनाला चुकीच्या वळणावर टाकून आखिरतच्या सदैवकालीन सम्पत्तिस व अनश्वर ईश देणग्यांपासून स्वत:ला वंचित केले.

६०. अभिप्रेत अनुभूत निशाणी म्हणजे ईश-चमत्कार होय अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. ६४ व ६५.

६१. अर्थात हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या व्यक्तित्वात पैगंबर असण्याची चिन्हे एवढी जमा झाली आहेत की कोणत्याहि अनुभूत ईश-चमत्काराची गरज उरली नाही या सर्व निशाण्या पाहूनहि जे लोक त्यांच्या प्रेषित्वास मान्य करण्यास इन्कार दर्शावित आहेत त्यांना सत्य मार्ग प्राप्त करण्याची सुबुद्धि कोठून होणार. सत्य मार्गाकडे अग्रेसर होण्याची सुबुद्धि तर सर्वश्रेष्ठ अल्लाह अशाच माणसाला प्रदान करतो जो अल्लाहकडे रुजू करतो व त्याला विनंती करतो की हे ईश्वर मला सत्य-मार्ग दाखव.

६२. म्हणजे अल्लाहकडे रुजू करणारे लोकच ईमान बाळगतात आणि जेव्हा ईमान बाळगतात तेव्हा अल्लाहचे स्मरण त्यांच्या मनाच्या समाधानाची सामुग्री बनते कारण ईमान बाळगणे अल्लाहला प्राप्त करणे होय आणि जेव्हा एक मोमीन अल्लाहला प्राप्त करतो तेव्हा समस्त बौद्धिक क्लेशांपासून त्याला मुक्ति मिळते व त्याच्या भावना सर्वश्रेष्ठ अल्लाहशी संबंध होतात ज्याने हृदयात शांती व समाधानाची कैफियत निर्माण होते.

ही आयत ईमान बाळगणाऱ्यास आत्मीक धनसम्पित्तिने धनाढ्य करते एक मोमीन अल्लाहचे जेवढे स्मरण करील तेवढी त्याला आत्मीक व मानसिक शांती लाभेल आणि ही अशी सम्पत्ति होय की जिच्यापुढे सर्व प्रकारची सम्पति तुच्छ आहे.

६३. या अभिनंदनात ईमान बाळगणाऱ्यांकरीता आनंद आणि आशेची दुनिया वसली आहे कारण हे अभिनंदन अल्लाहतर्फे आहे आणि जेव्हा या गोष्टीची जाणीव एखाद्या ईमान बाळगणाऱ्यास होते तेव्हा तो मरण्यापूर्वीच भरारी घेण्याकरीता झेप घेतो.

६४. या आयतीत अनेकेश्वर वाद्यांना क़ुरआन ऐकविण्याचा आदेश दिला गेला आहे जे या गोष्टीचे प्रमाण होय की क़ुरआन मुस्लिम व मुस्लिमेत्तर सर्वांनीय समजून घेण्याची बाब होय. जर ते अरबी भाषा जाणत नसतील तर अनुवादाच्या सहाय्याने त्यांना क़ुरआन समजविले जावे.

६५. प्रेषित्व आणि ईश-आदेशाचा इन्कार करणारे वस्तुत: रहमान (अत्यंत दयाशील ईश्वरा) चा इन्कार करणारे होत. कारण जर त्यांनी अल्लाहला 'रहमान' मानले असते तर त्यांना प्रेषितांचे अल्लाहतर्फे येणे व क़ुरआनाचे अवतरण या गोष्टीबद्दल आश्चर्य वाटले नसते किंबहुना त्यांना हे कळून आले असते की अत्यंत दयाशील ईश्वर आपल्या दासांवर मेहरबान होऊ इच्छितो म्हणून त्यांने ही कृपा अवतरीत केली.

३१. आणि जर एखादे असे कुरआन अवतरले असते ज्याद्वारे पहाड चालायला लागले असते किंवा जमीनीचे तुकडे तुकडे झाले असते किंवा मुर्दे बोलू लागले असते. [६६] (तरी देखील या लोकांनी ईमान बाळगले नसते-आणि ना असे करुन दाखविणे तुमच्या अवाक्यात आहे) किंबहुना समस्त अधिकार केवळ अल्लाहला आहे [६७] मग काय ईमान बाळगणारे, हे जाणून की , अल्लाहने जर इच्छिले असते तर सर्व लोकांना मार्गदर्शन केले असते (या हटवाद्यांच्या ईमान न बाळगणयाने ) निराश झाले नाही ? [६८] आणि काफिरांवर त्यांच्या दुष्कर्मामुळे कोणती ना कोणती आपत्ति येतच राहील किंवा त्यांच्या वस्त्यांशेजारी अवतरीत होत राहील येथपावेतो की अल्लाहचा वायदा उदयास यावा [६९] अल्लाह कधीहि वचनभंग करीत नाही.

وَلَوْ أَنَّ قُرْآنًا سُيِّرَتْ بِهِ الْجِبَالُ أَوْ قُطِّعَتْ بِهِ الْأَرْضُ
أَوْ كُلِّمَ بِهِ الْمَوْتَىٰ ۗ بَل لِّلَّهِ الْأَمْرُ جَمِيعًا ۗ أَفَلَمْ يَيْأَسِ الَّذِينَ آمَنُوا أَن
لَّوْ يَشَاءُ اللَّهُ لَهَدَى النَّاسَ جَمِيعًا ۗ وَلَا يَزَالُ الَّذِينَ كَفَرُوا تُصِيبُهُم
بِمَا صَنَعُوا قَارِعَةٌ أَوْ تَحُلُّ قَرِيبًا مِّن دَارِهِمْ حَتَّىٰ يَأْتِيَ وَعْدُ اللَّهِ ۚ إِنَّ
اللَّهَ لَا يُخْلِفُ الْمِيعَادَ ٣١

३२. तुमच्या पूर्वीहि प्रेषितांची थट्टा उडविली गेली आहे. तेव्हा मी काफिरांना ढील दिली मग त्यांना पकडले, तर पहा माझी शिक्षा कशी राहिली !

وَلَقَدِ اسْتُهْزِئَ بِرُسُلٍ مِّن قَبْلِكَ فَأَمْلَيْتُ
لِلَّذِينَ كَفَرُوا ثُمَّ أَخَذْتُهُمْ ۖ فَكَيْفَ كَانَ عِقَابِ ٣٢

३३. मग काय तो जो प्रत्येक मनुष्यावर नजर ठेवतो त्याने काय कमविले (तो त्याला असेच सोडून देईल?-या वस्तुस्थितीला त्यांनी खोटे ठरविले) आणि त्यांनी अल्लाहचे सहभागी ठरविले [७०] त्यांना सांगा, जरा त्यांची नावे तर घ्या.[७१] काय तुम्ही त्याला अशा गोष्टीची खबर देत आहात जिला तो जाणत नाही की जमीनीवर त्याचे एखादे अस्तित्व आहे ? [७२] किंवा तुम्ही निव्वळ वरवरच्या गोष्टी करीत आहात ?[७३] वस्तुस्थिती अशी आहे की काफिरांकरीता त्यांच्या लबाड्या शोभायमान बनविल्या गेल्या आहेत [७४] आणि त्यांना सन्मार्गापासून रोखले गेले आहे [७५] आणि ज्याला अल्लाह मार्गभ्रष्ट करील त्याला कोणीहि मार्ग दाखविणारा नाही.[७६]

أَفَمَنْ هُوَ قَائِمٌ عَلَىٰ كُلِّ نَفْسٍ بِمَا كَسَبَتْ ۗ
وَجَعَلُوا لِلَّهِ شُرَكَاءَ قُلْ سَمُّوهُمْ ۚ أَمْ تُنَبِّئُونَهُ بِمَا لَا يَعْلَمُ فِي الْأَرْضِ
أَم بِظَاهِرٍ مِّنَ الْقَوْلِ ۗ بَلْ زُيِّنَ لِلَّذِينَ كَفَرُوا مَكْرُهُمْ وَصُدُّوا
عَنِ السَّبِيلِ ۗ وَمَن يُضْلِلِ اللَّهُ فَمَا لَهُ مِنْ هَادٍ ٣٣

६६. ह्या शर्तरुपी वाक्याचे उत्तर संबोधिले गेले नाही कारण याचे उत्तर अगदी स्पष्ट आहे. अरबी भाषेची ही शैली होय की अशा प्रसंगी उत्तर कमी करतात व वाचक त्याचा अर्थ ध्यानी घेतो आम्ही त्याला कंसामध्ये उघड केले आहे.

६७. अर्थात हे की जर त्यांच्यावर असे क़ुरआन अवतरीत केले जाते ज्याद्वारे पर्वतांच्या चालण्याचे किंवा जमीनीचे तुकडे तुकडे होण्याचे अथवा प्रेतांनी बोलण्याचे चमत्कार दिसून आले असते तरीही त्या लोकांनी जे आपल्या हटवादी धोरणाला चिकटून बसले आहेत, ईमान बाळगले नसते, किंबहुना त्यास जादू वगैरे म्हटले असते. दुसरी गोष्ट अशी की ईश-चमत्कार दाखविणे प्रेषिताच्या अधिकारातील बाब नव्हे, किंबहुना याचे सामर्थ्य केवळ अल्लाहला आहे त्याने इच्छा बाळगली तरच चमत्कार दाखविल अन्यथा दाखविणार नाही.

६८. काफिरांकडून चमत्कारांची अत्याधिक मागणी लक्षात घेता काही मुसलमानांची अशी कल्पना होती की सर्वश्रेष्ठ अल्लाहने जर एखादा अनुभूत चमत्कार दाखविला असता तर कदाचित या लोकांनी ईमान बाळगले असते. त्याच्या ह्याच विचाराचे येथे खंडन केले गेले आहे की ईमानचा संबंध बुद्धि आणि अंतर्दृष्टीशी आहे व बुद्धि आणि अंतर्दृष्टीचा वापर करणाऱ्यासाठी क़ुरआन आपल्या परिने फार मोठा ईश-चमत्कार आहे, तथापि जे लोक आपल्या बुद्धीचा व अंतर्दृष्टीचा वापर करु इच्छित नाही त्यांना अपेक्षित ईश-चमत्कार दाखविल्यानंतरहि ते ईमान बाळगणारे नाहीत. मात्र अल्लाहने इच्छिले असते तर सर्वांनाच मार्गदर्शनाच्या पथावर चालण्यास विवश केले असते. परंतु जेव्हा त्याने असे केले नाही, किंबहुना माणसाला हा अधिकार प्रदान केला की त्याने आपल्या इच्छेने मार्गदर्शनाचा किंवा मार्गभ्रष्टतेचा अवलंब करावा. तेव्हा ज्या लोकांनी मार्गभ्रष्टतेची निवड करुन हटवादी धोरण अंगिकारले आहे त्यांच्याकडून ही अपेक्षा कशी केली जाऊ शकते की अपेक्षित ईश-चमत्कार पाहूनहि ते सन्मार्गावर येतील?

६९. म्हणजे कियामती पर्यंत काफिरांवर (सत्य-विरोधकांवर) एक ना एक आपत्ति येत राहील, कधी एका जनसमूहावर तर कधी दुसऱ्या जनसमूहावर, कधी एका वस्तीवर तर कधी दुसऱ्या वस्तीवर, कधी एका देशात तर कधी दुसऱ्या देशात अशासाठी की त्यांनी आपल्या दुष्कर्माचे फळ इहलोकातही चाखावे, व यासाठी हि की त्यांना तंबी व्हावी. ही संकटे नैसर्गिक स्वरुपाचीहि असू शकतात व मनुष्य निर्मित देखील, जसे युद्ध वगैरेच्या स्थितीत होते.

आजच्या काळात तर ही संकटे एवढ्या वेगाने येत आहेत की असा कोणताहि दिवस जात नाही की कोणत्या न कोणत्या ठिकाणाहून लाहन मोठ्या आपत्तिची खबर मिळत नसावी.

वादळ, महापूर, दुष्काळ व भूकंपा सारख्या नैसर्गिक संकटांखेरीज मोठमोठ्या दुर्घटना, दंगे व युद्धविषयक कारवायांनी शोकजनक परिस्थिती निर्माण केली आहे.

७०. म्हणजे जो ईश्वर प्रत्येक मनुष्याच्या प्रत्येक कर्मावर देखरेख ठेवत आहे तो यांना विचारपूस का करणार नाही, तथापि या लोकांनी ईशत्वात इतरांना सहभागी ठरवून विचारपूस बाबतच्या कल्पनेपासूनच मुक्ति प्राप्त केली आहे कारण ते असे समजतात की आमचे हे समर्थक व शिफारस करणारे प्रत्येक ठिकाणी आमच्या मदतीकरीता पुरेसे आहेत. जर मेल्यानंतर एखादी समस्या उद्‌भवली तर तिथेहि आमची ही उपास्ये (दैवते) मुक्तिचे माध्यम ठरतील.

७१. ही उपरोध शैली त्यांनी ठरविलेल्या सहभागींच्या अवास्तव असण्याबद्दल आहे.त्यांना हे सांगितले जात आहे की अल्लाह अशी ज़बरदस्त हस्ती आहे जी प्रत्येकावर देखरेख ठेवीत आहे, म्हणून त्याला उपास्य बनविणे उचित होय आणि त्याच्या कडून होणाऱ्या विचारपूस बाबत भय बाळगणेहि उचित, परंतु ज्यांना तुम्ही उपास्य बनवून ठेवले आहे त्यांच्यात असा कोण आहे जो ईशत्वाची ही शान दाखवित असावा?काय तुम्ही नावांच्या स्पष्टीकरणासह हे सांगू शकता की अमुक व अमुक उपास्ये अल्लाह समान गुणवैशिष्ट्ये व अधिकार बाळगतात?

७२. जर तुम्ही असा दावा करता तर याचा अर्थ असा की तुम्ही अल्लाहला अनेक ईश्वरांच्या अस्तित्वाची खबर देत आहात जेव्हा अल्लाहला माहित नाही की कोठे एखाद्या ईश्वराचे अस्तित्व आहे आणि जी गोष्ट अल्लाहला ज्ञात नाही ती अपरिहार्यपणे अस्तित्वशून्य ठरते.

७३. म्हणजे ज्या गोष्टीची कसलीहि वास्तविकता नाही, तिचा दावा म्हणजे विवेकशून्य व अयोग्य गोष्ट होय. तथापि आपण कशा बिनबुडाच्या गोष्टी करीत आहोत याची साधी जाणीव देखील तुम्हा लोकांना नाही.

ईश्वर संदर्भात माणसाने सर्वाधिकरित्या गंभीर झाले पाहिजे परंतु वस्तुस्थिती अशी की ईश्वरा बाबतीत बहुतेक लोक गांभीर्यशून्य झाले आहेत. पुराव्याशिवाय ते ईश्वराबाबत मनाला येईल ते बोलत जातात.

७४. म्हणजे शिर्क'ची अयोग्यता स्पष्ट झाल्यानंतरहि लोक ते सोडण्यास एवढ्यासाठी तयार होत नाहीत की असे केल्याने त्यांचा लाभ प्रभावित होईल. समाजात त्यांना जे स्थान लाभले आहे ते कायम राहणार नाही,व त्यांचे अधिपत्य संकटात सापडेल. आपल्या ह्या अनुचित गरजांवर आवरण घालण्यासाठी ते शिर्क व अनेकेश्वरवादी धर्मास उचित सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. अर्थात ही त्यांची कूट निती होय.

७५. म्हणजे अल्लाहच्या मार्गभ्रष्टतेचा नियम त्यांना लागू पडला.

७६. जो मनुष्य डोळे मिटून ठेवतो त्याला मार्ग दर्शनाचा सूर्य दिसत नाही हा निसर्ग-नियम आहे व अशा माणसाला प्रकाशाचा लाभ घडविणे कोणाच्या आवाक्यात नाही.

३४. त्यांच्या करीता ईहलोकीय जीवनात शिक्षा आहे [७७] व आखिरतची शिक्षा तर कित्येक पटीनी सक्त राहील. असा कोणी नाही जो यांना अल्लाह (च्या शिक्षे) पासून वाचवू शकेल.

لَهُمْ عَذَابٌ فِي الْحَيٰوةِ الدُّنْيَا وَلَعَذَابُ الْاٰخِرَةِ اَشَقُّ ۚ وَمَا
لَهُمْ مِّنَ اللّٰهِ مِنْ وَّاقٍ ﴿٣٤﴾

३५. ईश-भय बाळगणाऱ्यांशी ज्या जन्नतचा वादा केला गेला आहे तिचे वैशिष्ट्य हे आहे की तिच्या खाली प्रवाह वाहत आहेत. तिची फळे सदैव कालीन आहेत व तिची सावली देखील सदैव कालीन [७८]ही परिणिती अशा लोकांची होय ज्यांनी ईश-भय अंगिकारले [७९] आणि काफिरांचा शेवट आग होय.

مَثَلُ الْجَنَّةِ الَّتِيْ وُعِدَ الْمُتَّقُوْنَ ۭ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ ۭ
اُكُلُهَا دَاۗىِٕمٌ وَّظِلُّهَا ۭ تِلْكَ عُقْبَى الَّذِيْنَ اتَّقَوْا ڰ وَّعُقْبَى
الْكٰفِرِيْنَ النَّارُ ﴿٣٥﴾

३६. ज्या लोकांना आम्ही ग्रंथ दिला होता ते या (ग्रंथा) शी खुष आहेत जो तुम्हावर अवतरित केला गेला आहे [८०] आणि या समूहांपैकी काही असेहि आहेत जे यातल्या काही गोष्टींचा इन्कार करीत आहेत.[८१] सांगा,मला तर हाच आदेश दिला गेला आहे की मी अल्लाहची उपासना करावी व त्याचा सहभागी न ठरवावा- त्याच्याच कडे मी बोलवितो व त्याच्याचकडे परतावयाचे आहे.

وَالَّذِيْنَ اٰتَيْنٰهُمُ الْكِتٰبَ يَفْرَحُوْنَ بِمَآ اُنْزِلَ اِلَيْكَ
وَمِنَ الْاَحْزَابِ مَنْ يُّنْكِرُ بَعْضَهٗ ۭ قُلْ اِنَّمَآ اُمِرْتُ
اَنْ اَعْبُدَ اللّٰهَ وَلَآ اُشْرِكَ بِهٖ ۭ اِلَيْهِ
اَدْعُوْا وَاِلَيْهِ مَاٰبِ ﴿٣٦﴾

३७. अशा प्रकारे आम्ही यास अरबी फर्मानाच्या स्वरुपात अवतरीत केले आहे.[८२] आणि जर तुम्ही हे ज्ञान [८३]येऊन पोहचले असतांनाहि त्यांच्या इच्छा-आकाक्षांचे अनुसरण केले [८४]तर अल्लाहच्या विरोधात ना तुमचा कोणी सहाय्यक असेल व ना कोणी संरक्षक.

وَكَذٰلِكَ اَنْزَلْنٰهُ حُكْمًا عَرَبِيًّا ۭ وَلَىِٕنِ اتَّبَعْتَ
اَهْوَاۗءَهُمْ بَعْدَمَا جَاۗءَكَ مِنَ الْعِلْمِ ۙ مَا لَكَ مِنَ اللّٰهِ
مِنْ وَّلِيٍّ وَّلَا وَاقٍ ﴿٣٧﴾ ع

३८. आणि ही वस्तुस्थिती आहे की आम्ही तुमच्या पूर्वीहि प्रेषित पाठविले होते आणि त्यांना पत्न्या व संतती बाळगणारे बनविले होते.[८५] आणि कोणत्याहि पैगंबराच्या हे अवाक्यात नव्हते की अल्लाहच्या हुकुमाशिवाय एखादी निशाणी आणून दाखविली असती. प्रत्येक युगाकरीता एक लिखित आहे.[८६]

وَلَقَدْ اَرْسَلْنَا رُسُلًا مِّنْ قَبْلِكَ وَجَعَلْنَا لَهُمْ
اَزْوَاجًا وَّذُرِّيَّةً ۭ وَمَا كَانَ لِرَسُوْلٍ اَنْ يَّاْتِيَ
بِاٰيَةٍ اِلَّا بِاِذْنِ اللّٰهِ ۭ لِكُلِّ اَجَلٍ كِتَابٌ ﴿٣٨﴾

७७. इहलोकात जो ईश-प्रकोप काफिर, अनेकेश्वरवादी व नास्तिकांवर होतो तो विविध स्वरुपात दिसून येतो आणि दर्जाच्या दृष्टीनेहि तो भिन्न असतो. प्रेषिताद्वारे प्रमाण प्रस्थापित झाल्यानंतर जी ईश-शिक्षा येते ती तर एक निर्णायक शिक्षा असते तथापि याखेरीजहि लहान मोठ्या शिक्षेचा क्रम जगात जारी राहतो आणि ही वस्तुस्थिती आहे की काफिर मनुष्यावर ईश्वराचा एवढा प्रकोप होतो की त्याला कठोर हृदयता, कष्टयातना व मानसिक दुःखे जाणू लागतात. मग तो कितीहि वैभवाने व ऐश आरामाचे जीवन जगत का असेना. याऊलट एखाद्या प्रामाणिक 'मोमीन' ईमान बाळगणाऱ्या) मनुष्यास इहलोकात ज्या कष्ट यातना पोहचतात त्या ज्या अर्थी कसोटी स्वरुप असतात व त्या सहन करणे मोबदला प्राप्त करण्यास कारक ठरतात म्हणून ह्या कष्टयातना मोमीन व्यक्ति-करीता ईश-शिक्षा नव्हे किंबहुना त्याला शांती व मुक्ति देणाऱ्या ठरतात.

७८.म्हणजे ती सदा बहार जन्नत आहे जिची फळे एखाद्या विशिष्ट ऋतुपुरती नाहीत किंबहुना सर्वकालीन आहेत. व तिची सावली देखील सदैव कायम राहणारी आहे. यावरुन असे दिसते की जन्नतचे विश्व आमच्या या विश्वाहून किती वेगळे असेल आणि तेथील प्रत्येक वस्तु किती उच्च दर्जाची व श्रेष्ठतम असेल.

७९. येथे 'तकवा' हा शब्द शिर्क आणि कुफ्रच्या विरुद्धार्थी वापरला गेला आहे ज्यावरुन हे स्पष्ट झाले की तकवा (ईश-भय) चा मूलभूत अर्थ असा की माणसाने 'शिर्क व कुफ्र' पासून अलिप्त रहावे जेव्हा त्याच्या व्यापक अर्थात प्रत्येक प्रकारच्या गुन्ह्यापासून अलिप्त राहणे सामील आहे.

८०. अभिप्रेत ग्रंथधारकांपैकी ते लोक होत जे अल्लाहवर प्रमाणिकपणे ईमान बाळगत होते व कोणत्याहि गटबाजी व धार्मिक पक्षपातास बळी पडले नव्हते. जेव्हा क़ुरआन यांच्या समोर आले तेव्हा त्यांना आनंद झाला की आमच्या पालनकर्त्यातर्फे आमच्या मार्गदर्शनाची सामुग्री झाली हा संकेत बहुधा हब्शाच्या नसाराकडे आहे जेथे मुसलमान हिजरत (स्थलांतर) करुन गेले होते व तेथल्या बादशहाने इस्लाम धर्म स्वीकारला होता.

८१.संकेत आहे ग्रंथधारकांच्या त्या पंथांकडे ज्यांना क़ुरआनातील काही गोष्टींचा,विशेषत:विशुद्ध एकेश्वरवादाचा इन्कार होता.

८२. म्हणजे ज्या प्रमाणे आम्ही तुम्हाला अरब जन समूहाकडे प्रेषित बनवून पाठविले आहे-ज्याचा उल्लेख आयत क्र. ३० मध्ये केला गेला आहे-तद्‌वतच आम्ही त्यांची मातृभाषा असलेल्या अरबी भाषेत कुरआनास फर्मान स्वरुपात अवतरीत केले अशासाठी की त्यांनी याला समजून घ्यावे आणि प्रेषिताचे आगमन ज्या अर्थी सरळपणे या जन-समूहाकडे आहे म्हणून त्यावर अल्लाहचे प्रमाण पूर्णत: प्रस्थापित व्हावे.

८३. ज्ञानाशी अभिप्रेत धर्माचे यथायोग्य ज्ञान होय जे कुरआनच्या रुपाने अवतरीत झाले आहे.

८४. इच्छा-आकांक्षाशी अभिप्रेत ती श्रद्धा व रीतीरिवाज होत जे सत्य ज्ञानावर नव्हे किंबहुना लोकांच्या इच्छा आकांक्षावर आधारीत आहेत.

हा नियम त्या 'बिदआत' (धर्मबाह्य प्रथां) ना देखील लागू पडतो ज्यांना मुसलमानांनी कवटाळून ठेवले आहे व ज्यांनी धर्माचे स्वरुपच बदलून टाकले आहे.

८५. इन्कार करणाऱ्यांच्या त्या आक्षेपाचे हे उत्तर होय की ही व्यक्ति जर पैगंबर आहे तर याला मुले बाळे कशी? त्यांची अशी धारणा होती की पैगंबर असणारी व्यक्ति मानव स्वरुपाहून उच्चतम असली पाहिजे. त्याचे उतर असे दिले गेले आहे की यापूर्वी जे जे रसूल (प्रेषित) पाठविले गेले होते ते देखील मनुष्यच होते व तेहि मनुष्यत्वाच्या निकडी भागवित असत आणि असे असणे प्रेषित पदास गालबोट लावणारे नाही.

८६. म्हणजे ज्या काळात सर्वश्रेष्ठ अल्लाहने ज्या प्रेषितास पाठविले त्या काळानुषंगाने त्याला निशाण्या प्रदान केल्या ज्या त्याच्या प्रेषित्वास प्रमाणित करीत. त्या निशाण्या सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या त्या बुद्धिकौशल्य युक्त निर्णयानुसार जाहीर झाल्या होत्या. जो त्या काळाकरीत त्याने घेतला होता आणि प्रत्येक कालखंडाकरीता त्याचे निर्णय ग्रंथ स्वरुप असत.

अर्थात हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा कालखंडपूर्वी होऊन गेलेल्या कालखंडाहून भिन्न आहे यास्तव भूतकाळात ज्या प्रकारचे अनुभूत ईश-चमत्कार प्रेषितांना दिले गेले होते त्याच प्रकारच्या अनेक ईश चमत्कारांची मागणी या काळात करणे उचित नाही. हजरत मूसा यांच्या काळात जादू टोण्याचे प्राबल्य होते म्हणून त्यांना काठीचा साप होण्याचा ईश चमत्कार दिला गेला अशासाठी की त्यांनी जादू टोण्यावर वरचढ व्हावे व हा ईश चमत्कार त्यांच्या प्रेषित्वाचे प्रमाण ठरावे.

तद्‌वतच हजरत ईसा यांच्या काळात वैद्यक शास्त्र शिखरावर होते म्हणून त्यांना आंधळ्या व कोढी इसमांना चांगले करण्याचा ईश-चमत्कार दिला गेला. हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळात भाषेने प्रासादिक व अलंकारीकतेचे उत्तुंग शिखर गाठले होते यास्तव एवढा अलंकारपूर्ण ग्रंथ प्रदान केला गेला की त्याच्या अलंकारीक शब्दरचनेपुढे या कलेतील मोठ मोठ्या निष्णात साहित्यिकांनाहि आपली मान वाकवावी लागली. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा काळ कियामती पावेतो आहे म्हणून एखादा असाच ईश-चमत्कार त्यांच्याकरीता ईश चमत्कार ठरु शकत होता जो सदैव रहावा, व ज्याला नंतरच्या लोकांनीहि पहावे. यास्तवर कुरआन कियामती पर्यंत एक जिवंत ईश-चमत्कार आहे या काळाकरीता अल्लाहचा हाच निर्णय होय जो एका ग्रंथाचे स्वरुप बाळगतो.

३९. अल्लाह ज्या गोष्टीस इच्छितो मिटवितो व ज्या गोष्टीस इच्छितो कायम राखतो [८७] उम्मुल किताब (मूलग्रंथ) त्याच्याच जवळ आहे.[८८]

يَمْحُوا اللّٰهُ مَا يَشَآءُ وَ يُثْبِتُ ۖۚ وَ عِنْدَهٗۤ اُمُّ الْكِتٰبِ ﴿۳۹﴾

४०. आणि आम्ही ज्या गोष्टीचा यांच्याशी वायदा केला आहे तिचा काही भाग आम्ही तुम्हास दाखवावा किंवा (तत्पूर्वीच) तुम्हाला मरण द्यावे [८९] कोणत्याहि स्थितीत तुम्हावर केवळ संदेश पोहचविण्याची जबाबदारी आहे आणि हिशेब घेणे आमचे काम होय.

وَ اِنْ مَّا نُرِيَنَّكَ بَعْضَ الَّذِيْ نَعِدُهُمْ اَوْ نَتَوَفَّيَنَّكَ
فَاِنَّمَا عَلَيْكَ الْبَلٰغُ وَ عَلَيْنَا الْحِسَابُ ﴿۴۰﴾

४१. काय या लोकांना हे दिसत नाही की आम्ही या भूमीकडे तिच्या सरहद्दींना घटवित वाढ करीत आहोत. [९०] अल्लाह आदेश लागू करतो. त्याच्या हुकुमाला टाळू शकेल असा कोणी नाही आणि हिशेब घेण्यात तो मोठा शीघ्र आहे.

اَوَ لَمْ يَرَوْا اَنَّا نَاْتِي الْاَرْضَ نَنْقُصُهَا مِنْ اَطْرَافِهَا ؕ
وَ اللّٰهُ يَحْكُمُ لَا مُعَقِّبَ لِحُكْمِهٖ ؕ وَ هُوَ سَرِيْعُ الْحِسَابِ ﴿۴۱﴾

४२. आणि जे लोक यांच्यापूर्वी होऊन गेले आहेत त्यांनीहि कावेबाजी केली होती. तथापि समस्त उपाय योजना अल्लाहच्याच अधिकारात आहे. तो प्रत्येक व्यक्तिच्या कमाईला जाणतो आणि लवकरच या काफिरांना कळून येईल की शेवटचे घर कोणाकरीता आहे.

وَ قَدْ مَكَرَ الَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ فَلِلّٰهِ الْمَكْرُ جَمِيْعًا ؕ يَعْلَمُ
مَا تَكْسِبُ كُلُّ نَفْسٍ ؕ وَ سَيَعْلَمُ الْكُفّٰرُ لِمَنْ عُقْبَى الدَّارِ ﴿۴۲﴾

४३. काफिर म्हणतात की, तुम्ही त्याचे प्रेषित नाहीत. सांगा माझ्या व तुमच्या दरम्यान साक्ष देण्यास अल्लाह पुरेसा आहे. तसेच ते लोक जे ईश-ग्रंथाचे ज्ञान बाळगतात.[९१]

وَ يَقُوْلُ الَّذِيْنَ كَفَرُوْا لَسْتَ مُرْسَلًا ؕ قُلْ كَفٰى بِاللّٰهِ شَهِيْدًۢا
بَيْنِيْ وَ بَيْنَكُمْ ۙ وَ مَنْ عِنْدَهٗ عِلْمُ الْكِتٰبِ ﴿۴۳﴾

८७. वरील आयतीत ‘निशाणी’ (ईश-चमत्कार) च्या संबंधाने जे फर्माविले गेले आहे ते लक्षात घेता ह्या आयतीचा अर्थ असा की सर्वश्रेष्ठ अल्लाह ज्या निशाणीस (ईश-चमत्कारास) इच्छितो तात्पुरता बनवितो व ज्या निशाणीस इच्छितो सदैव टिकणारी बनवितो. गतकालीन प्रेषितांना जे ईश-चमत्कार दिले गेले होते ते कालानुरुप व तात्पुरते होते परंतु क़ुरआनच्या स्वरुपात जो ईश-चमत्कार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिला जात आहे तो यावच्चंद्र दिवाकरो कायम व जिवंत राहणारा ईश चमत्कार आहे.

८८. म्हणजे त्याच्याजवळ असा ग्रंथ आहे ज्यात सर्वश्रेष्ठ अल्लाहचे समस्त निर्णय सामील आहेत. कोणत्या प्रेषितास कोणत्या काळात कोणता ईश-चमत्कार देऊन पाठविले जावे ही एक निर्धारीत गोष्ट होय जिचा तपशील ‘उम्मुल किताब’ मुळ ग्रंथात आहे. अर्थात प्रेषितांचे पाठविले जाणे व त्यांच्याहातून विविध प्रकारचे ईश-चमत्कार दाखविण्याकरीता सर्वश्रेष्ठ अल्लाहची एक निर्धारीत योजना आहे जी मजबूत स्वरुपात त्याच्याजवळ आहे व त्यानुसारच घटना घडत असतात यास्तव तुम्ही उलटसुलट मागण्या करण्याऐवजी या योजनेला या हिकमतीला समजून घेण्याचा प्रयत्न करा ज्यानुसार या पैगंबरास पाठविले गेले आहे.

८९. याचे स्पष्टीकरण सूरह यूनुस टीप क्र.७५ मध्ये केले गेले आहे.

९०. म्हणजे मक्केच्या आसपास उदा. मदीना वगैरेत इस्लामचा प्रभाव वाढत चालला होता आणि वेगवेगळ्या कबिल्यामध्ये इस्लाम धर्म कबूल करणाऱ्यांची संख्या वाढत चालली होती हे या गोष्टीचे लक्षण होय की इस्लाम प्रभावाकडे वाढत जात आहे अनेकेश्वरवाद्यांवर व काफिरांवर मक्केची भूमी दिवसेंदिवस संकुचित होत चालली आहे. क़ुरआनाचे हे निवेदन तंतातंत खरे ठरले व काही वर्षांच्या कालावधीत केवळ मदीनेतच इस्लाम प्रभावशाली झाला नाही मक्केवर विजय मिळवित संपूर्ण अरब देशात पसरला.

९१. अभिप्रेत ग्रंथ धारकांपैकी ते लोक होत ज्यांना ईश ग्रंथाचे ज्ञान होते व जे सत्य-प्रिय होते. त्यांच्या साक्षीला हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषित्वाच्या समर्थनार्थ अशासाठी प्रस्तुत केले गेले आहे की मागील ग्रंथांमध्ये एका पैगंबराच्या आगमनाबाबत जी भाकिते होती ती पूर्णपणे त्यांच्यावर खरी ठरत होती व त्यांचे आवाहन अगदी तेच आवाहन होते ज्याविषयी इतर पैगंबर आवाहन देत आलेत. म्हणून नसारा जन समूहापैकी नज्जाशी (हब्शाधिपति) सारख्या लोकांचे त्यांच्यावर ईमान बाळगणे साक्ष संदर्भात मोठी महत्वपूर्ण गोष्ट होय. ज्याअर्थी मक्केचे अनेकेश्वरवादी प्रेषित्वाविषयी अनभिज्ञ होते आणि ग्रंथ बाळगणारे याबाबत चांगल्या प्रकारे जाणून होते म्हणून मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांचे लक्ष वेधले गेले की त्यांच्याकडून जाणून घ्या की यापूर्वीहि प्रेषित येत राहिले किंवा नाही व ते मनुष्य होते कि आणखी काही.

# सूरह इब्राहीम

# १४. सूरह इब्राहीम

**नाव:** आयत क्र. ३५ मध्ये हजरत इब्राहीम यांच्या प्रार्थनेचे वर्णन केले गेले आहे.तद्नुषंगाने या सूरह चे नाव 'इब्राहीम' असे आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे आणि मजकूरांवरुन असे दिसून येते की ही सूरह अशा वेळी अवतरली जेव्हा ईमान बाळगणाऱ्यांना असह्य कष्ट-यातना दिल्या जात होत्या. हा काळ हब्शाकडे स्थलांतर व त्या नंतर चा आहे आणि संभवत: सूरह 'रअद' नंतर अवतरली असावी.

**मध्यवर्ति विषय:** हे स्पष्ट करणे होय की प्रेषित पाठविण्याचे प्रयोजन काय व त्याच्या माध्यमाने समस्त मानवजातिकरीता ईश-मार्ग कशा प्रकारे उजेडात येत आहे. ज्या लोकांनी या महान उद्दिष्टाकडे डोळे झाक केली आहे ते प्रेषित विरोधास सज्ज झाले आहेत व पैगंबराच्या अनुयायीना कष्ट यातना देण्यास टपून बसले आहेत. अशा लोकांवर अल्लाहचा प्रकोप कोसळल्या खेरीज राहत नाही, पर्यायाने ते अत्यंत कठोर शिक्षेस पात्र ठरु शकतात.

**आयत रचना:** आयत क्र.१ ते ४ मध्ये पैगंबर आणि क़ुरआन पाठविण्याचा हेतु स्पष्ट केला गेला आहे.

आयत क्र.५ ते १७ मध्ये प्रेषितांच्या इतिहासाची काही पृष्ठे सादर केली गेली आहेत. ज्यावरुन हा बोध प्राप्त होतो की प्रेषिताचा विरोध करणाऱ्या व त्यांच्या मार्गात काटे पसरविणाऱ्यांची या जगात काय परिणति होते. अशा लोकांना आखिरत मध्ये जी शिक्षा भोगावी लागेल, तिचीहि एक झळक सादर केली गेली आहे जी रोमांच कारक आहे.

आयत क्र. १८ ते २३ मध्ये त्यांच्या विफल मन:स्थितीचे अधिक वर्णन करतांना हे दर्शविले गेले आहे की ईमान बाळगणारे कशा प्रकारे सफल मनोरथ होतील.

आयत क्र. २४ ते ३४ मध्ये ईमान व कुफ्र च्या विविध परिणामांना उदाहरणाद्वारे स्पष्ट केले गेले आहे. इन्कार करणाऱ्यांना ईश देणग्यांशी कृतघ्नता केल्याबद्दल सावध केले गेले आहे आणि ईमान बाळगणाऱ्यांना कृतज्ञता व्यक्त करण्याची पद्धति सांगितली गेली आहे.

आयत क्र. ३५ ते ४१ मध्ये पैगंबर इब्राहीम यांच्या त्या दुआ (प्रार्थना) प्रस्तुत केल्या आहेत ज्यांना ऐतिहासिक महत्ता लाभली आहे. आपल्या वंशाला शिर्क (अनेकेश्वरवादा) पासून सुरक्षित व तौहीद (एकेश्वरवादा) वर कायम राखण्याकरीता ते अत्यंत व्याकुळ हृदय बाळगत होते, तथापि त्यांचे वंशज (बनी इस्माईल) त्यांना आपला प्रमुख मान्य करीत असतानाहि आज जे काही करीत आहेत ते त्यांच्या अभिलाषा, त्यांच्या प्रार्थना व त्यांच्या कार्यप्रणालीच्या अगदी विपरीत आहे.

आयत क्र.४२ते ५२ सूरतीचा शेवट आहे. ज्यात कियामत व तिच्या भयानक शिक्षेचे चित्र रेखाटले गेले आहे.

# १४. सूरह इब्राहीम

سورة إبراهيم

(आयत-५२)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بسم الله الرحمن الرحيم

१. अलिफ. लाम. रा.[1] हा एक ग्रंथ आहे.जो आम्ही (हे पैगंबर !) तुमच्यावर अवतरीत केला आहे. अशासाठी की लोकांना तुम्ही त्यांच्या पालन कर्त्याच्या हुकुमाने अंधःकारातून बाहेर काढून प्रकाशात आणावे[2] त्याच्या मार्गावर जो प्रभावशाली हि आहे व गुणवैशिष्ट्यांनी युक्त हि.[3]

الر كتب أنزلنه إليك لتخرج الناس من الظلمت إلى
النور بإذن ربهم إلى صراط العزيز الحميد ﴿١﴾

२. अल्लाह जो आकाशांमध्ये व जमीनीवर जे काही आहे त्या सर्व गोष्टींचा स्वामी आहे. आणि विनाश आहे काफिरांकरीता की त्यांना सक्त शिक्षा भोगावी लागेल.

الله الذي له ما في السموت وما في الأرض وويل للكفرين
من عذاب شديد ﴿٢﴾

३. जे आखिरतच्या तुलनेत इहलोकीय जीवन पसंत करतात[4] आणि अल्लाहच्या मार्गापासून लोकांना रोखतात व त्यात तेढ निर्माण करु इच्छितात.[5] हे लोक सर्वात खालच्या प्रतीच्या मार्गभ्रष्टतेत ग्रस्त आहेत.

الذين يستحبون الحيوة الدنيا على الأخرة ويصدون عن
سبيل الله ويبغونها عوجا أولئك في ضلل بعيد ﴿٣﴾

४. आम्ही जो प्रेषितहि पाठविला त्याच्या जन-समूहाच्या भाषेतच (संदेश देऊन) पाठविला, या साठी की (या संदेशास) त्याने लोकांना चांगल्या रीतीने स्पष्ट करावे[6] मग अल्लाह ज्याला इच्छितो मार्गभ्रष्ट करतो व ज्याला इच्छितो सन्मार्गाला[7] लावतो तो प्रभावशाली व बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.

وما أرسلنا من رسول إلا بلسان قومه
ليبين لهم فيضل الله من يشاء ويهدي من يشاء
وهو العزيز الحكيم ﴿٤﴾

५. आम्ही मूसाला आपल्या निशाण्यांसह पाठविले होते की आपल्या जमातीला अंधः कारातून काढून प्रकाशात आणा व त्यांना अल्लाहच्या स्मरणीय दिवसांची[8] आठवण करुन द्या. यात संयमशील व कृतज्ञ असलेल्या प्रत्येक मनुष्याकरीता मोठी (बोध-) चिन्हे आहेत.[9]

ولقد أرسلنا موسى بايتنا أن أخرج قومك
من الظلمت إلى النور وذكرهم بأيم الله
إن في ذلك لأيت لكل صبار شكور ﴿٥﴾

१. ह्या अक्षरांच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह यूनुस टीप क्र.१ व सूरह बकरा टीप क्र.१

२. हेच ते महान उद्दिष्ट ज्याच्या करीता पवित्र क़ुरआन अवतरले. अर्थात लोकांना कल्पित श्रद्धा व दुराचाराच्या दाट अंध:कारातून बाहेर काढून ईमान व सदाचाराच्या तेजस्वी प्रकाशात आणणे. पैगंबरांची जबाबदारी ही की त्याने आवाहन व प्रसार, ताकीद व स्मरण आणि शिकवण व कथनां द्वारे लोकांना या उजेडात आणण्याचा प्रयास करावा मात्र या उजेडात येण्याची सुबुद्धि देणे अल्लाहच्या हाती आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास जे जे लोक या उज्वल मार्गावर आलेत ते अल्लाहने प्रदान केलेल्या सुबुद्धिमुळेच आलेत;तथापि पैगंबर आणि कुरआनाच्या माध्यमाने.

३. अर्थात प्रकाशात आणण्याचा अर्थ अल्लाहच्या मार्गावर आणणे होय. इथे अल्लाहची दोन गुणवैशिष्ट्ये वर्णिली गेली आहेत. एक हे की तो प्रभावशाली आहे व दुसरे हे की तो गुणवैशिष्ट्यांनी युक्त आहे. या द्वारे हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की ईश्वराप्रत पोहचण्याचा एकमेव मार्ग असलेल्या ह्या धर्मानुसार आचरण करुन माणूस एका अशा सामर्थ्याशी आपला संबंध कायम करतो ज्याच्या कब्जात संपूर्ण सृष्टी आहे व जे विविध गुणवैशिष्ट्यांनी युक्त आहे म्हणून त्याच्याशी संबंध जोडून मनुष्य खुशाल होऊ शकतो आणि त्याची कोणतीहि अशा पूर्ण झाल्याविना राहू शकत नाही.

४. मनुष्य ज्या गोष्टीस सर्वाधिक प्रिय जाणतो, तिच्यासाठी दुसऱ्या गोष्टीचे बलीदान करण्यास तयार होतो.जे लोक इहलोकास प्रिय समजतात ते ऐहिक लाभांना कोणत्याहि प्रकारे सोडावयास तयार होत नाही, मग त्या साठी आखिरतच्या लाभांवर पाणी सोडावे लागले तरी चालेल! इहलोकाची अत्याधिक आसक्तिच त्यांना आखिरतच्या इन्कारासाठी प्रवृत्त करते. उघडपणे ते आखिरतचा इन्कार करीत नसले तरी याचा अर्थ असा नव्हे की खरोखर त्यांनी आखिरतला आपले ध्येय बनविले आहे कारण त्यांनी जर खरोखरीच आखिरतला आपले ध्येय बनविले असते तर आपले प्रत्येक पाऊल आखिरतच्या लाभांना नजरे समोर ठेवूनच त्यांनी उचलले असते.

५. याचे स्पष्टीकरण सूरह आले इमरान टीप क्र.१२५ मध्ये केले गेले आहे.

६. म्हणजे पैगंबरास पाठविण्याचा हेतु चमत्कार दाखविणे नव्हे किंबहुना लोकांपर्यंत अल्लाहचा संदेश पोहचविणे होय. हे उद्दिष्ट समोर ठेवता सर्वश्रेष्ठ अल्लाहची ही पद्धत आहे की ज्या ज्या जन समूहात त्याने पैगंबर पाठविला त्याच्या भाषेला तो जाणणारा होता. अशासाठी की अल्लाहच्या संदेशाचे चांगल्या रीतीने स्पष्टीकरण करणे त्याला शक्य व्हावे. अल्लाहच्या याच नियमानुसार अरबी पैगंबरांचा उदय झाला व क़ुरआन अरबी भाषेत अवतरीत केले गेले. यासाठी की सर्वप्रथम संबोधित असलेल्या अरब जन समूहास पुर्ण स्पष्टीकरणासह अल्लाहचा संदेश पोहचविला जावा व त्या जन समूहावर अल्लाहचे प्रमाण पूर्णत: प्रस्थापित व्हावे.

७. म्हणजे प्रमाण प्रस्थापित झाल्यानंतर मार्गदर्शन स्वीकृतिची सुबुद्धि केवळ अशाच लोकांना लाभते जे अल्लाहच्या मर्जीनुसार त्यास पात्र ठरतील.

८. अभिप्रेत ते ऐतिहासिक दिवस ज्यात सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे बोध कारक घटना घडल्या. एखाद्या जन-समूहावर ईश-शिक्षेचा कोडा बरसला तर एखाद्या जन समूहास ईश-देणग्यांनी उपकृत केले गेले.

९. अर्थात हया घटना मध्ये जन-समूहांच्या उत्कर्ष व पतन संबंधाने मार्गदर्शनाची मोठी सामुग्री उपलब्ध आहे. तथापि या मार्गदर्शनापासून केवळ तेच लोक लाभ घेतात ज्यांच्या अंगी सहनशीलता आणि कृतज्ञता हे गुण असतात. संयमशी अभिप्रेत अल्लाहकडून मोबदला मिळेल या अपेक्षेने त्यांच्या मार्गात पोहचणाऱ्या कष्ट यातना माणसाने सहन कराव्यात आणि कृतज्ञतेशी अभिप्रेत त्याने धर्माची जी देणगी प्रदान केली व माणसाच्या आत्म शांतीची जी उपाय योजना केली आहे तिची माणसाने पूरेपूर कदर बाळगावी.

६. आणि जेव्हा मूसा आपल्या जमातीस म्हणाला [१०] अल्लाहने तुम्हांवर जी कृपा केली आहे तिचे स्मरण राखा जेव्हा त्याने तुम्हाला फिरऔन वाल्यांपासून मुक्ति दिली जे तुम्हाला वाईटरित्या कष्ट यातना देत होते आणि तुमच्या पुत्रांची हत्या करीत व मुलीना जिवंत राखीत. [११] ह्यांत तुमच्या पालनकर्त्यातर्फे मोठी कसोटी होती.

وَإِذْ قَالَ مُوسَىٰ لِقَوْمِهِ اذْكُرُوا نِعْمَةَ اللَّهِ عَلَيْكُمْ إِذْ
أَنجَاكُم مِّنْ آلِ فِرْعَوْنَ يَسُومُونَكُمْ سُوءَ الْعَذَابِ
وَيُذَبِّحُونَ أَبْنَاءَكُمْ وَيَسْتَحْيُونَ نِسَاءَكُمْ ۚ
وَفِي ذَٰلِكُم بَلَاءٌ مِّن رَّبِّكُمْ عَظِيمٌ ٦

७. आणि जेव्हा तुमच्या पालन कर्त्याने खबरदार केले होते की जर तुम्ही कृतज्ञता व्यक्त कराल तर मी तुम्हाला अधिक देईन [१२] आणि जर कृत्घ्नता दर्शवाल तर (लक्षात ठेवा) माझी शिक्षा मोठी सक्त आहे.[१३]

وَإِذْ تَأَذَّنَ رَبُّكُمْ لَئِن شَكَرْتُمْ
لَأَزِيدَنَّكُمْ ۖ وَلَئِن كَفَرْتُمْ إِنَّ عَذَابِي لَشَدِيدٌ ٧

८. आणि मूसा म्हणाला, जर तुम्ही व धरातलावर असलेले सर्व जण कृत्घ्नता दर्शवतील तर अल्लाह (ला याची पर्वा नाही तो) निस्पृह आणि गुणवैशिष्ट्ये बाळगणारा आहे.[१४]

وَقَالَ مُوسَىٰ إِن تَكْفُرُوا أَنتُمْ وَمَن فِي الْأَرْضِ
جَمِيعًا فَإِنَّ اللَّهَ لَغَنِيٌّ حَمِيدٌ ٨

९. काय तुमच्या पर्यंत[१५] त्या लोकांच्या खबरी पोहचल्या नाहीत जे तुमच्या पूर्वी होऊन गेले आहेत ? 'नूह'च्या लोकांचा 'आद' व समूद जनसमूहांचा आणि ते जन समूह जे त्यांच्या नंतर होऊन गेले. ज्यांना अल्लाह खेरीज अन्य कोणीहि जाणत नाही. [१६] त्यांच्या जवळ त्यांचे पैगंबर उघड चिन्हे घेऊन आले होते परंतु त्यांनी आपल्या तोंडात आपले हात घातले [१७] व म्हणाले, ज्या संदेशासह तुम्हाला पाठविले गेले आहे त्याचा आम्हाला इन्कार आहे आणि ज्या गोष्टीकडे तुम्ही बोलावित आहात त्यात आम्हाला शंका आहे, जिने आम्हाला किंकर्तव्यमूढ केले आहे.

أَلَمْ يَأْتِكُمْ نَبَأُ الَّذِينَ مِن قَبْلِكُمْ قَوْمِ نُوحٍ وَعَادٍ
وَثَمُودَ ۛ وَالَّذِينَ مِن بَعْدِهِمْ ۛ لَا يَعْلَمُهُمْ
إِلَّا اللَّهُ ۚ جَاءَتْهُمْ رُسُلُهُم بِالْبَيِّنَاتِ فَرَدُّوا
أَيْدِيَهُمْ فِي أَفْوَاهِهِمْ وَقَالُوا إِنَّا كَفَرْنَا بِمَا أُرْسِلْتُم بِهِ
وَإِنَّا لَفِي شَكٍّ مِّمَّا تَدْعُونَنَا إِلَيْهِ مُرِيبٍ ٩

१०. म्हणजे बनी इस्राईल ला म्हणाला.

११. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र.२०५ मध्ये केले गेले आहे.

बायबल मधील उल्लेखानुसार मिस्र (इजिप्त) च्या बादशहाने इस्राईली लोकांची संख्या अधिक न व्हावी या भयापोटी सुईणीना आदेश दिला होता की इबरानी स्त्रीयांची जेव्हा त्या प्रसूत होतील तेव्हा-

> ''मुलगा असला तर त्यास जिवे मारा, पण मुलगी असली तर तिला जिवंत ठेवा................. तेव्हा फारोने आपल्या सर्व लोकांस आज्ञा केली की, जन्मेल तो प्रत्येक मुलगा नदीत टाका आणि प्रत्येक मुलगी जिवंत ठेवा.''
>
> (निर्गम १ :१६ -२२)

१२. कृतज्ञतेत अपरिहार्यत: तीन गोष्टींचा अंतर्भाव आहे. एक ही की दासाने आपणास लाभलेल्या प्रत्येक देणगीस अल्लाहने प्रदान केलेली समजावे, अन्य एखाद्याने प्रदान केलेली नव्हे दुसरी ही की त्याच्या मनात कृतज्ञता भाव निर्माण व्हावा आणि तिसरी गोष्ट अशी की त्याने आपल्या खऱ्याखुऱ्या उपकार कर्त्याशी एकनिष्ठता, उपासना व आज्ञापालनाचे वर्तन अंगिकारावे.

जेव्हा दास कृतज्ञतेचे वर्तन अंगिकारतो तो अधिक इनामास पात्र ठरतो.

१३. तौरात मध्ये ही गोष्ट अशा प्रकारे उल्लिखित आहे: ''उलटपक्षी तू आपला देव परमेश्वर ह्याची वाणी ऐकली नाही आणि त्याच्या ज्या सर्व आज्ञा व विधी पाळायला मी आज तुला सांगत आहे. त्या तू काळजीपूर्वक पाळल्या नाहीत तर पुढील सर्व शाप तुझ्यामागे येऊन तुला गाठतील. नगरात तू शापीत होशील व शेतीवाडीत तू शपित होशील.'' (अनुवाद -२८:१५-१६)

१४. हदीस मध्ये उल्लिखित आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने फर्माविले, ''हे माझ्या दासांनो! जर तुमचे पूर्वीचे व नंतरचे सर्व मनुष्य व जिन्न सर्वाधिक दुराचारी व्यक्ति समान होतील तरी अशाने माझ्या राज्यात किंचितही त्रुटी घडून येणार नाही.'' (सहीह मुस्लिम-किताबुल् बिर्र)

१५. वर हजरत मूसा यांचे निवेदन संपले येथे क़ुरआनच्या संबोधितांना उद्देश्यून म्हटले गेले आहे.

१६. हा संकेत जन समूहांच्या इतिहासाच्या त्या भागाकडे आहे जो अपरोक्षाच्या आवारणाआड नाहीसा झाला. समूद जन समूहाचा काळ संभवत: २५०० इसवीसनापूर्वीचा होता. त्या नंतर हजरत मूसा यांच्या कालखंडापर्यंत कित्येक जन समूह असे होऊन गेले ज्यांच्याकडे अल्लाहतर्फे प्रेषित पाठविले गेले आणि त्यांच्या इन्कार व बंडखोरीचा परिणाम म्हणून ईश-शिक्षेचा आसूड त्यांच्यावर ओढवला. अर्थात ह्या समस्त घटना इतिहासाच्या पृष्ठांमध्ये आज सुरक्षित नाहीत परंतु अल्लाहच्या ज्ञान कक्षेत निश्चित आहेत.

जेथपावेतो भारत देशाचा संबंध आहे. इथेहि असले प्राचीन अवशेष आढळून येतात ज्याद्वारे जन समूहांच्या विनाशाची माहिती मिळते उदाहरणार्थ पंजाब मधील 'हडप्पा' सिंध मधील 'मोहंजोदारो' तसेच गुजरात राज्यातील 'लोथल' इत्यादि सर्व प्राचीन वसाहती होत ज्या आपल्या संपूर्ण संस्कृतिसह जमीनीत गाडल्या गेल्या होत्या व ज्यांचा गौप्य स्फोट या काळात झाला. ह्या प्राचीन अवशेषांवरुन हेहि दिसून येते की त्यांची संस्कृती अनेकेश्वरवादी संस्कृती होती यास्तव नवल नव्हे की ह्या वस्त्यांकडेहि प्रेषित पाठविले गेले असावेत व एकेश्वरवादाच्या आवाहनास त्यांनी रद्द केल्याचा परिणाम म्हणून अल्लाहची शिक्षा भूकंप वगैरेच्या रुपाने त्यांच्यावर कोसळली असावी व त्याने ह्या जन समूहांना जमीनीत गाडले असावे. हा काळ समूद जन समूहाच्या नंतर व हजरत इब्राहीम यांच्या पूर्वीचा, म्हणजे २००० वर्षे इसवीसनापूर्वीचा असावा. इतिहासाने ना त्या जन समूहांची नावे सुरक्षित ठेवली आणि ना त्यांच्या प्रेषितांची -अर्थात त्यांचे ज्ञान केवळ अल्लाहला आहे तथापि हे प्राचीन अवशेष या गोष्टीची साक्ष निश्चित देतात की प्राचीन भारत देशात देखील शिर्क (मूर्तीपूजा) आणि कुफ्र (सत्याचा इन्कार) च्या परिणाम स्वरुपात अल्लाहच्या शिक्षेचा आसूड निश्चितपणे बरसला आहे.

१०. त्यांच्या पैगंबरांनी म्हटले, काय तुम्हाला अल्लाह संबंधी शंका आहे जो आकाशांचा व जमीनीचा निर्माता आहे.?[१८] तो तुम्हाला बोलवितो अशासाठी की तुमच्या अपराधांना क्षमा करावी व एक निर्धारीत वेळे पावेतो सवड द्यावी. [१९] ते म्हणाले, तुम्ही तर आमच्या सारखेच एक मुनष्य आहात. तुम्ही हे इच्छिता की आम्हाला त्यांच्यापासून रोखावे ज्यांची भक्ति आमचे वाडवडील करीत आले आहेत. बरे, तर आणा एखादा उघड ईश-चमत्कार.

قَالَتْ رُسُلُهُمْ أَفِي اللَّهِ شَكٌّ فَاطِرِ السَّمَاوَاتِ
وَالْأَرْضِ ۖ يَدْعُوكُمْ لِيَغْفِرَ لَكُم مِّن ذُنُوبِكُمْ
وَيُؤَخِّرَكُمْ إِلَىٰ أَجَلٍ مُّسَمًّى ۚ قَالُوا إِنْ أَنتُمْ
إِلَّا بَشَرٌ مِّثْلُنَا تُرِيدُونَ أَن تَصُدُّونَا
عَمَّا كَانَ يَعْبُدُ آبَاؤُنَا فَأْتُونَا
بِسُلْطَانٍ مُّبِينٍ ﴿١٠﴾

११. त्यांचे पैगंबर म्हणाले, निःसंशय आम्ही तुमच्यासारखे मनुष्य आहोत तथापि अल्लाह आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो आपल्या कृपेने उपकृत करतो. [२०] आणि ह्या गोष्टीचे आम्हाला सामर्थ्य नाही की तुम्हाला एखादा चमत्कार आणून दाखववावा मात्र अल्लाहच्या हुकुमाने असे होऊ शकते आणि ईमान बाळगणाऱ्यांनी अल्लाह वरच भरवसा केला पाहिजे.

قَالَتْ لَهُمْ رُسُلُهُمْ إِن نَّحْنُ إِلَّا بَشَرٌ مِّثْلُكُمْ وَلَٰكِنَّ اللَّهَ يَمُنُّ
عَلَىٰ مَن يَشَاءُ مِنْ عِبَادِهِ ۖ وَمَا كَانَ لَنَا أَن نَّأْتِيَكُم بِسُلْطَانٍ
إِلَّا بِإِذْنِ اللَّهِ ۚ وَعَلَى اللَّهِ فَلْيَتَوَكَّلِ الْمُؤْمِنُونَ ﴿١١﴾

१२. आणि आम्ही अल्लाहवर भरवसा का करु नये जेव्हा त्याने आमचे मार्ग आम्हाला मोकळे केलेत [२१] आम्ही त्या कष्ट यातानांवर संयम पाळू ज्या तुम्ही आम्हाला देत आहात. आणि भरवसा करणाऱ्यांनी अल्लाहवरच भरवसा केला पाहिजे.

وَمَا لَنَا أَلَّا نَتَوَكَّلَ عَلَى اللَّهِ وَقَدْ هَدَانَا سُبُلَنَا ۚ وَلَنَصْبِرَنَّ
عَلَىٰ مَا آذَيْتُمُونَا ۚ وَعَلَى اللَّهِ فَلْيَتَوَكَّلِ الْمُتَوَكِّلُونَ ﴿١٢﴾

१३. आणि काफिर आपल्या पैगंबरांना म्हणाले, आम्ही तुम्हाला आपल्या देशातून बाहेर घालवून देऊ अथवा तुम्हाला आमच्या धर्मात परत यावे लागेल. [२२] तेव्हा त्यांच्या पालनकर्त्याने त्यांच्याकडे वही (ईश-संदेश) पाठविली की आम्ही ह्या अत्याचारीना निश्चित नष्ट करु.

وَقَالَ الَّذِينَ كَفَرُوا لِرُسُلِهِمْ لَنُخْرِجَنَّكُم مِّنْ أَرْضِنَا أَوْ
لَتَعُودُنَّ فِي مِلَّتِنَا ۖ فَأَوْحَىٰ
إِلَيْهِمْ رَبُّهُمْ لَنُهْلِكَنَّ الظَّالِمِينَ ﴿١٣﴾

१४. आणि त्यांच्या नंतर तुम्हाला जमीनीवर वसवू हे (प्रतिफल) अशा मनुष्यासाठी आहे जो माझ्या समोर उभे राहण्यास भ्याला व ज्याने माझ्या तंबीचे भय बाळगले.

وَلَنُسْكِنَنَّكُمُ الْأَرْضَ مِن بَعْدِهِمْ ۚ ذَٰلِكَ
لِمَنْ خَافَ مَقَامِي وَخَافَ وَعِيدِ ﴿١٤﴾

१७. 'तोंडात हात घालणे' हा अरबी भाषेतील वाक्प्रचार आहे ज्याचा अर्थ आश्चर्यातिरेकाने तोंडात बोट घालणे असा होय.

१८. म्हणजे जे आवाहन आम्ही तुमच्या समोर प्रस्तुत करीत आहोत ते शुद्ध एकेश्वरवादाचे आवाहन होय. जे स्वभावत: शंके पलीकडे आहे. याबाबत शंका केवळ असाच मनुष्य करु शकतो ज्याला या मूलभूत वास्वततेविषयी शंका असावी की या सृष्टीला एकाच ईश्वराने निर्मिले आहे. जर तुमचा दृढ विश्वास आहे की या सृष्टीचा निर्माता अल्लाहच आहे तर मग तो उच्चतम व एकमेव आणि उपासनेस पात्र असण्याविषयी शंका बाळगण्यास वावच उरत नाही.

१९. म्हणजे एकेश्वर वादाचे जे आवाहन तुमच्या समोर मांडले जात आहे त्याला जर तुम्ही कबूल कराल तर शिर्क व अपराधांची जी कामे आतापावेतो तुम्ही केलीत त्या सर्व दुष्कृत्यांना अल्लाह माफ करील व तुम्हावर आपली शिक्षा लागू करण्याऐवजी निर्धारीत वेळेपावेतो जीवन व्यतीत करण्याची सवलत देईल.

२०. अर्थात आम्ही असा दावा केव्हा केला की आम्ही मनुष्य नव्हे तर अन्य एखादी निर्मिती आहोत? आम्ही तर तुमच्या सारखीच रक्त मांसाची माणसे आहोत, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने आम्हला आपल्या विशेष कृपेने उपकृत करुन पैगंबर पदावर बसविले आहे.

यावरुन हे स्पष्ट होते की 'प्रेषित-पद' माणसाला स्वप्रयत्नाने प्राप्त होणारे पद नव्हे किंबहुना ही अल्लाहची खास देणगी व विशेष कृपा होय तो ज्याला इच्छितो प्रदान करतो.

२१. मनुष्य जेव्हा सूज्ञतापूर्वक अल्लाहवर ईमान बाळगतो तेव्हा ईश्वर व धर्म संबंधाने त्यांच्या समस्त विवंचना नाहीशा होतात. आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्याच्या करीता अग्रेसर होण्यासाठी व यशाच्या मजली प्रत पोहचण्यासाठी मार्ग उघडू लागतात.

२२. हे कथन काफिरांचे आहे. यावरुन हा निष्कर्ष काढणे उचित ठरणार नाही की पैगंबर प्रेषित-पद लाभण्या पूर्वी त्यांच्या (काफिरांच्या) धर्माचा अवलंब करीत होते. वस्तुस्थिती अशी की पैगंबर, प्रेषित-पद लाभण्यापूर्वी स्वाभाविक-धर्म म्हणजे एकेश्वर वादावरच कायम राहिलेत. परंतु ज्याअर्थी प्रेषित्व दाव्यासह ते एकेश्वर वादाचा प्रचार करताना आढळून येत नव्हते म्हणून श्रद्धा विषयक मतभेद असूनहि एकाच समाजातील असल्या कारणाने काफिरांना ते सह धर्मीय समजत. त्यांनी जी धमकी दिली तिचा अर्थ असा की तुम्ही एकेश्वरवाद व प्रेषित्वाचा हा प्रचार सोडून द्याल व आपल्या पूर्वस्थितीवर याल तर आम्ही तुमचा विरोध करणार नाही.

१५. आणि त्यांनी निर्णयाची अपेक्षा केली व (निर्णय अशा प्रकारे झाला की )प्रत्येक बंडखोर व हेकेखोर विफल मनोरथ झाला.[२३]

وَاسْتَفْتَحُوا وَخَابَ كُلُّ جَبَّارٍ عَنِيدٍ ﴿١٥﴾

१६. त्याच्या पुढे जहन्नम आहे [२४] आणि त्याला पीप-रक्त पाजले जाईल. [२५]

مِّن وَرَائِهِ جَهَنَّمُ وَيُسْقَىٰ مِن مَّاءٍ صَدِيدٍ ﴿١٦﴾

१७. ज्यास तो एकेक घोट करुन पील परंतु घशाखाली सहजगत्या उतरवू शकणार नाही.मृत्यु प्रत्येक दिशेने त्याच्यावर ओढवेल परंतु तो मरु शकणार नाही. पुढे अत्यंत कठोर शिक्षेला त्याला तोंड द्यावे लागेल.

يَتَجَرَّعُهُ وَلَا يَكَادُ يُسِيغُهُ وَيَأْتِيهِ الْمَوْتُ مِن كُلِّ
مَكَانٍ وَمَا هُوَ بِمَيِّتٍ ۖ وَمِن وَرَائِهِ عَذَابٌ غَلِيظٌ ﴿١٧﴾

१८. ज्या लोकांनी आपल्या पालन-कर्त्याशी कुफ्र केले, त्यांच्या कर्मांचे उदाहरण असे होय जणू राख, की वादळाच्या दिवशी वाऱ्याने तिला वेगाने उडवून न्यावे. [२६] जे काही त्यांनी कमविले आहे त्यापासून त्यांना काहीहि साध्य होऊ शकणार नाही. हीच सर्वात खालच्या प्रतीची मार्गभ्रष्टता होय.

مَّثَلُ الَّذِينَ كَفَرُوا بِرَبِّهِمْ ۖ أَعْمَالُهُمْ كَرَمَادٍ اشْتَدَّتْ بِهِ
الرِّيحُ فِي يَوْمٍ عَاصِفٍ ۖ لَّا يَقْدِرُونَ مِمَّا كَسَبُوا عَلَىٰ شَيْءٍ ۚ
ذَٰلِكَ هُوَ الضَّلَالُ الْبَعِيدُ ﴿١٨﴾

१९. काय तुम्ही हे पाहत नाही की अल्लाह ने आकाशांना व जमीनीला सत्यासह निर्मिले आहे. जर तो इच्छील तर तुम्हा लोकांस नष्ट करील आणि एक नवीन निर्मिती आणील.[२७]

أَلَمْ تَرَ أَنَّ اللَّهَ خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ بِالْحَقِّ ۚ إِن يَشَأْ يُذْهِبْكُمْ
وَيَأْتِ بِخَلْقٍ جَدِيدٍ ﴿١٩﴾

२०. असे करणे अल्लाह करीता किंचितहि अवघड नाही.

وَمَا ذَٰلِكَ عَلَى اللَّهِ بِعَزِيزٍ ﴿٢٠﴾

२१. आणि (असे होईल की) अल्लाह समोर सर्व हजर होतील.त्यावेळी दुर्बल लोक, त्या लोकांना जे मोठेपणा मिरवित होते म्हणतील की आम्ही तर तुमच्या अधीन होतो.काय आता तुम्ही आम्हाला अल्लाहच्या शिक्षेपासून वाचविण्याकरीता काही करु शकाल ? ते म्हणतील, अल्लाहने जर आम्हाला मार्ग दाखविला असता तर आम्ही खचितच तुम्हाला दाखविला असता.आता आम्ही आक्रोश केला काय आणि झेलले काय. आमच्या करीता सारखेच आहे.यातून सुटका होण्याचा आमच्यासाठी कोणताहि मार्ग नाही.[२८]

وَبَرَزُوا لِلَّهِ جَمِيعًا فَقَالَ الضُّعَفَاءُ لِلَّذِينَ اسْتَكْبَرُوا إِنَّا
كُنَّا لَكُمْ تَبَعًا فَهَلْ أَنتُم مُّغْنُونَ عَنَّا مِنْ عَذَابِ اللَّهِ مِن
شَيْءٍ ۚ قَالُوا لَوْ هَدَانَا اللَّهُ لَهَدَيْنَاكُمْ ۖ سَوَاءٌ عَلَيْنَا أَجَزِعْنَا أَمْ
صَبَرْنَا مَا لَنَا مِن مَّحِيصٍ ﴿٢١﴾

२३. म्हणजे जगातच त्यांचा फैसला केला गेला, व तो अशा रीतीने की अल्लाहच्या प्रकोपाने पैगंबरांच्या विरोधकांचा नायनाट केला व त्यांच्या आवाहनास कबूल करणाऱ्यांना वाचविले.

२४. म्हणजे जगात ईश-शिक्षा भोगल्यानंतर त्यांना आखिरत मध्ये जहन्नमच्या असह्य व निरंतर कष्ट यातनांना तोंड द्यावे लागेल.

२५. शिक्षेच्या ह्या कल्पनेनेच अंगावर काटा उभा राहतो माणसाने या गोष्टीवर विचार चिंतन केल्यास त्याच्या मनात भिती निर्माण होईल व जहन्नमच्या महाभयंकर शिक्षेपासून बचाव करण्याची काळजी लागून राहील.

प्रसंगानुरुप संभाषण दृष्ट्या ही ताकीद अशा लोकांना दिली गेली आहे जे पैगंबरांच्या विरोधात अग्रसर होते व त्यांचे अनुसरण करणाऱ्यांवर अत्याधिक जुलुम करीत होते. तेव्हा त्यांना सांगितले गेले आहे की शिर्क व अत्याचाराची वाटेल ती उदाहरणे कायम करा,पुढे तुमच्यासाठी विविध प्रकारच्या शिक्षा-यातना तयार आहेत.

स्पष्ट असावे की शिक्षा भौतिक आचरणाने होते. त्यांच्या श्रद्धा अपवित्र होत्या, त्याचे आचरण अमंगल होते आणि ते गलीच्छ अन्न व मलीन धनसंपादने ने उदरनिर्वाह करीत राहिले यास्तव या शिक्षेस पात्र ठरले की पू सारखी अत्यंत घाणेरडी वस्तू त्यांना प्यायला दिली जावी.

२६.म्हणजे कुफ्र समस्त आचरणास अवास्तव व भारशून्य बनविते मग ते आचरण धार्मिक प्रथा असो, बाह्य सत्कृत्ये असोत किंवा दानपुण्याचे वा संकट निवारणाचे कार्य असो. ज्या लोकांनी कुफ्रच्या आधारावर पुण्य कर्मे पार पाडली असतील त्यांच्या त्या सत्कृत्यांना कुफ्र ची आग जाळून राखी करील. म्हणून त्यांची सर्व धार्मिक कृत्ये कियामतीच्या दिवशी राखीचे ढीग ठरतील जिला कियामतीचे रौद्र वादळ उडवून नेईल.

२७. म्हणजे जो मनुष्य उघड्या डोळ्यांनी ह्या सृष्टीचे अवलोकन करील, त्याला असे स्पष्ट दिसून येईल की तिच्या निर्मिती व व्यवस्थापनेत अत्याधिक दर्जाचे बुद्धिकौशल्य आढळून येते. कोणतीहि वस्तू अकारण निर्माण झाली नाही तेव्हा मनुष्य जो सृष्टीत सर्वश्रेष्ठ निर्मिती आहे उद्दिष्टा विना कशी असू शकते, वस्तुस्थिती अशी की सृष्टी-निर्मात्याने माणसाला एका उच्च ध्येयाकरीता निर्माण केले आहे म्हणून त्याने आपल्या निर्मितीच्या हेतुस समजून घेतले पाहिजे व त्यानुसार जीवन यात्रा पार पाडली पाहिजे. आणि त्याने जर असे केले नाही तर अल्लाहचे काहीहि बिघडणार नाही, असे करुन मनुष्य स्वत:लाच अपयशाच्या हवाली करतो.

सर्वश्रेष्ठ अल्लाहला एवढे सामर्थ्य आहे की तो संपूर्ण मानव जातीचा नाश करु शकतो व त्या जागी अन्य एखादी नवी निर्मिती आणू शकतो, माणसाने तर अल्लाहशी कृतज्ञता बाळगावयास हवी की त्याने ही संधी प्रदान केली आहे की इहलोकाच्या कसोटी गृहातून सही सलामत बाहेर पडून अल्लाहच्या निरंतर कृपा व अविनाशी देणग्यांना पात्र व्हावे.

२८. हे त्या नेत्यांच्या व प्रमुखांच्या अगतिकतेचे चित्र आहे ज्यांच्या मागे लोक डोळे मिटून चालतात व असे समजतात की ते आपले योग्य मार्गदर्शन करीत आहेत. कियामतीच्या दिवशी जेव्हा दोघांना आपापल्या अपराधांपोटी शिक्षा-यातनेंकडे ढकलले जाईल तेव्हा या नेत्यांना व प्रमुखांना त्यांचे अनुयायी विनवणी करतील की आमच्या करीता ईश-शिक्षेच्या तावडीतून सुटका होण्याचा एखादा मार्ग काढा. परंतु त्या वेळी ते आपल्या विवशेतस उघडपणे मान्य करतील तेव्हा त्यांचे अनुसरण करणाऱ्यांना या गोष्टीची जाणीव होईल की जगात यांच्या पाऊलांवर पाऊल ठेवून आपण मोठी भंयकर चूक केली आहे.

लोकांचा या दुष्परिणितीशी सामना व्हावा, या आधीच कुरआन लोकांना सावध करीत आहे की त्यांनी भ्रमाच्या भोपळ्याबाहेर पडावे व मार्गभ्रष्ट नेते व प्रमुखांच्या बहकाविण्यात येऊ नये. पैगंबरांच्या मार्गदर्शनास कबूल करुन त्या मार्गवर चालावे जो क़ुरआनने दाखविला आहे.

२२. आणि जेव्हा निर्णय लावला जाईल तेव्हा सैतान बोलेल, अल्लाहने तुमच्याशी वायदा केला होता. सच्चा वायदा आणि मी तुमच्याशी वायदा केला होता पण वचनभंग केला.[२९] माझा तुमच्यावर काही जोर नव्हता तथापि मी तुम्हाला बोलविले व तुम्ही माझे आवाहन कबूल केले.[३०] म्हणून माझी निर्भत्सना करु नका, स्वतःचीच निर्भत्सना करा. ना मी तुमच्या फिर्यादीस पोहोचू शकतो, ना तुम्ही माझ्या फिर्यादीस पोहोचू शकता. या आधी तुम्ही मला जे सहभागी ठरविले होते तर मी त्यापासून आपली विमनस्कता जाहीर करतो.[३१] अत्याचारीं करीता दुःखदायक शिक्षा आहे.

وَقَالَ الشَّيْطٰنُ لَمَّا قُضِيَ الْاَمْرُ اِنَّ اللّٰهَ وَعَدَكُمْ وَعْدَ الْحَقِّ
وَوَعَدْتُّكُمْ فَاَخْلَفْتُكُمْ ؕ وَمَا كَانَ لِيَ عَلَيْكُمْ مِّنْ سُلْطٰنٍ
اِلَّاۤ اَنْ دَعَوْتُكُمْ فَاسْتَجَبْتُمْ لِيْ ۚ فَلَا تَلُوْمُوْنِيْ وَلُوْمُوْۤا
اَنْفُسَكُمْ ؕ مَاۤ اَنَا بِمُصْرِخِكُمْ وَمَاۤ اَنْتُمْ بِمُصْرِخِيَّ ؕ اِنِّيْ كَفَرْتُ
بِمَاۤ اَشْرَكْتُمُوْنِ مِنْ قَبْلُ ؕ اِنَّ الظّٰلِمِيْنَ لَهُمْ
عَذَابٌ اَلِيْمٌ ﴿٢٢﴾

२३. आणि ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कृत्ये केलीत त्यांना अशा उद्यानांमध्ये दाखल केले जाईल ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. त्यात ते आपल्या पालनकर्त्याच्या हुकुमाने सदैव राहतील. तिथे (परस्पर) भेटीच्या वेळी त्यांची प्रार्थना 'सलाम' असेल.[३२]

وَاُدْخِلَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ جَنّٰتٍ تَجْرِيْ
مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ فِيْهَا بِاِذْنِ رَبِّهِمْ ؕ
تَحِيَّتُهُمْ فِيْهَا سَلٰمٌ ﴿٢٣﴾

२४. काय तुम्ही विचार चिंतन केले नाही की कशा प्रकारे अल्लाहने ''कलम-ए-तय्यिबह'' पवित्र-वचना) ची उपमा वर्णिली आहे. ती उपमा अशी की जणू एक चांगला वृक्ष ज्याची मुळे मजबूतपणे रोवलेली व फांद्या आकाशात पसरलेल्या.[३३]

اَلَمْ تَرَ كَيْفَ ضَرَبَ اللّٰهُ مَثَلًا كَلِمَةً طَيِّبَةً كَشَجَرَةٍ
طَيِّبَةٍ اَصْلُهَا ثَابِتٌ وَّفَرْعُهَا فِي السَّمَآءِ ﴿٢٤﴾

२५. तो (वृक्ष) सदैव आपल्या पालन कर्त्याच्या हुकुमाने फळ देतो [३३] आणि अल्लाह लोकांकरीता उदाहरणे प्रस्तुत करतो यासाठी की त्यांनी भानावर यावे.

تُؤْتِيْۤ اُكُلَهَا كُلَّ حِيْنٍۭ بِاِذْنِ رَبِّهَا ؕ وَيَضْرِبُ اللّٰهُ الْاَمْثَالَ
لِلنَّاسِ لَعَلَّهُمْ يَتَذَكَّرُوْنَ ﴿٢٥﴾

२६. आणि दुष्ट (खबीस) वचनाचे उदाहरण एखाद्या वाईट' झाडासारखे आहे ज्याला जमीनीच्या पातळीवरुनच (मुळासकट) उपटून फेकले जाते. त्याला मजबूती कशी ती नाहीच.[३४]

وَمَثَلُ كَلِمَةٍ خَبِيْثَةٍ كَشَجَرَةٍ خَبِيْثَةِ ۨاجْتُثَّتْ
مِنْ فَوْقِ الْاَرْضِ مَا لَهَا مِنْ قَرَارٍ ﴿٢٦﴾

२९. ईश्वराच्या न्यायालया द्वारे जेव्हा हा फैसला दिला जाईल की कोण मोबदल्यास पात्र आहे व कोण शिक्षेस. तेव्हा सैतान आपल्या समस्त अनुयायी समोर हे मान्य करील की सर्वश्रेष्ठ अल्लाहने आखिरतचा तुमच्याशी जो वायदा केला होता तो अगदी खरा होता आणि त्यानुसार आज सारे काही समोर आले परंतु ज्या ज्या गोष्टींचा मी तुम्हाला विश्वास दिला होता त्या सर्व चुकीच्या व खोट्या ठरल्या सैतानाची ही स्वीकृति त्याच्या अनुयायी करीता चपराक मारल्यासारखे होईल ज्यामुळे त्यांच्या नैराश्य व अवहेलनेत वाढ होईल.

स्पष्ट असावे की सैतानाचे वायदे म्हणजे माणसाच्या मनात त्याच्याद्वारे निर्माण केले जाणारे विचार होत. उदाहरणार्थ अमुक एखाद्या दैवतास पुकारा म्हणजे ते तुझ्या सहाय्याला धावून येईल. अमुक अमुक सामर्थ्ये वा विभूति ईश्वरासमोर तुमची शिफारस करणारे आहेत. जीवन खऱ्या अर्थाने इहलोकीय जीवन आहे. मेल्यानंतर पुन्हा कसले जीवन? म्हणून इहलोकात खूप सुखोपभोग घ्या वगैरे व यासारख्या अन्य गोष्टी सैतान मनात निर्माण करतो आणि जेव्हा एखादा मनुष्य या गोष्टींना बळी पडतो तेव्हा त्याची ती विचार प्रणाली बनते. आजच्या काळात सैतानाने मानवाच्या मन-मस्तिष्कास प्रभावित करण्या करीता अत्याधुनिक साधनांचा अवलंब केला आहे. तो म्हणतो, ईश्वराला मानवाने निर्माण केले आहे अन्यथा त्याचे कोठेहि अस्तित्व नाही. 'धर्म अफूची गोळी आहे', 'जे आम्ही जाणत नाही त्याला मानणे चुकीचे आहे' घटक स्वयंभूत अस्तित्व आहे आणि जीवन परस्पर विरोधी कल्पनांची एकवाक्यता (Dialectic Process)आहे.

३०.सर्वश्रेष्ठ अल्लाहने सैतानाला हे सामर्थ्य प्रदान केले नाही की त्याने माणसाला भार्गभ्रष्टता कबूल करण्यास व वाम मार्गावर चालण्यास विवश करावे, तो फक्त एवढेच करु शकतो की माणसाला मार्गभ्रष्टतेकडे बोलवावे व वाईट गोष्टींना प्रवृत्त करावे म्हणून माणूस सैतानावर आरोप ठेवून सुटका करु शकत नाही. तो स्वत:च आपल्या दुष्कृत्यांना जबाबदार राहील.

३१. सैतानाच्या या कथनाचा की 'तुम्ही या पूर्वी मला सहभागी ठरविले होते' अर्थ असा की जगात तुम्ही माझे आज्ञा पालन अशा प्रकारे करीत राहिलात ज्या प्रकारे अल्लाहचे आज्ञान पालन केले जाते. माझ्या म्हणण्यानुसार तुम्ही एकेश्वरवादाचा इन्कार केला,आल्लाहला सोडून इतरांना उपास्य ठरविले, पैगंबरांना खोटे ठरविले, आखिरत चा विश्वास केला नाही, शरीअतचा इन्कार करीत राहिले व आपल्या जीवनाची सूत्रे माझ्या हाती सोपविली की आपल्या मर्जीनुसार तुम्हाला चालवावे अशा प्रकारे तुम्हीच मला ईश्वराच्या स्थानी बसविले.

३२. म्हणजे जन्नत मध्ये ईमान बाळगणाऱ्यांचे स्वागत शांतीच्या शुभेच्छेने होईल व प्रत्येक दिशेने त्यांच्या करीता शांती व सलामतीचे निनाद बुलंद होतील. तेथे जेव्हा एकमेकांना ते भेटतील तेव्हा भेटीच्या शिष्टाचारात सलाम (शांती) वचन सामील राहील. यावरुन असे दिसून येते की जन्नतमध्ये ईमान बाळगणाऱ्यांना किती प्रतिष्ठापूर्ण जीवन लाभेल व तेथले वातावरण किती शांतीमय असेल. याऊलट जहन्नमवासी जेव्हा एकमेकांना भेटतील तेव्हा चोहोकडून त्यांची निर्भत्सना व धिक्कार होईल.

३३. पवित्र वचनाचा अर्थ चांगली व मांगल्यापूर्ण गोष्ट याशी आहे याने अभिप्रेत एकेश्वरवादाचे (तौहीदचे) वचन होय जे इस्लामी श्रद्धेचे मूळ व ईमानाचा आधार स्तंभ आहे.याचे उदाहरण एक चांगल्या वृक्षाने दिले गेले आहे ज्याची मूळे जमीनीत खोलवर रुजलेली व फांद्या वातावरणात पसरल्या आहेत. हेच वैशिष्ठ्य एकेश्वरवादाच्या वचनाचे आहे की त्याची मूळे मनुष्य स्वभावात रोवलेली आहेत व त्यांच्या फांद्या आकाशात पसरलेल्या आहेत. म्हणजे एकेश्वरवादाच्या वचना आधारे आचरणाचा एक भरभक्कम वृक्ष अस्तित्वात येतो आणि कर्म चांगले असल्या कारणाने उंचीकडे चढतात व त्यांचा खूप विकास होतो मग हा उदाहरणा दाखल वृक्ष ज्या प्रकारे नेहमी फळे देतो तद्वतच एकेश्वरवादी वचनाचा लाभ नित्य घडत राहतो आणि आखिरत मध्ये याची फळे व समृद्धि सदैवकालीन देणगींच्या स्वरुपात दृगोचर होतील.

३४. दुष्ट (खबीस) वचनाचा अर्थ वाईट व घाणेरडी गोष्ट अर्थात असत्य वचन होय मग ते शिर्क (अनेकेश्वरवाद) असो, नास्तिकता असो किंवा कुफ्र असो. यांचे उदाहरण झाडाझुडपासारखे आहे ज्याची मूळे जमीनीत रोवलेली नसतात त्याचप्रकारे असत्य वचनाचे मूळ मनुष्य स्वभावात रोवलेले नसते महणून त्यास सहजगत्या उपटून फेकले जाऊ शकते. असे वचन लाभशून्य वचन असते जे माणसाला सदाचारा पासून वंचित राखते आणि आखिरत मध्ये निराशे शिवाय काहीच हाती लागणार नाही.

२७. अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांना दृढ़ वचना द्वारे ऐहिक जीवनातहि दृढ़ता प्रदान करतो व आखिरत मध्ये देखील.[३५] आणि दुराचारी लोकांना अल्लाह मार्गभ्रष्ट करतो व अल्लाह जे इच्छितो ते करतो.[३६]

يُثَبِّتُ اللّٰهُ الَّذِيْنَ اٰمَنُوْا بِالْقَوْلِ الثَّابِتِ فِي الْحَيٰوةِ الدُّنْيَا
وَفِي الْاٰخِرَةِ ۚ وَيُضِلُّ اللّٰهُ الظّٰلِمِيْنَ ۙۗ وَيَفْعَلُ اللّٰهُ مَا يَشَآءُ ﴿٢٧﴾

२८. तुम्ही त्या लोकांचे अवलोकन नाही केले, ज्यांनी अल्लाहच्या देणगीस कुफ्र ने बदलून टाकले व आपल्या जन-समूहास विनाशाच्या घरात नेऊन उतरविले.[३७]

اَلَمْ تَرَ اِلَى الَّذِيْنَ بَدَّلُوْا نِعْمَتَ اللّٰهِ كُفْرًا وَّاَحَلُّوْا قَوْمَهُمْ
دَارَ الْبَوَارِ ﴿٢٨﴾

२९. (अर्थात) जहन्नम ज्यात ते दाखल होतील आणि ते मोठे वाईट ठिकाण होय.

جَهَنَّمَ ۚ يَصْلَوْنَهَا ۗ وَبِئْسَ الْقَرَارُ ﴿٢٩﴾

३०. आणि त्यांनी अल्लाहचे समकक्ष बनविले [३८] यासाठी की लोकांना त्याच्या मार्गा पासून विचलीत करावे. सांगा-मौज करुन घ्या, शेवटी तुम्हाला जहन्नम मध्येच जायचे आहे.

وَجَعَلُوْا لِلّٰهِ اَنْدَادًا لِّيُضِلُّوْا عَنْ سَبِيْلِهٖ ۗ
قُلْ تَمَتَّعُوْا فَاِنَّ مَصِيْرَكُمْ اِلَى النَّارِ ﴿٣٠﴾

३१. माझ्या त्या दासांना ज्यांनी ईमान बाळगले आहे, सांगा नमाज़ कायम करा व जे काही आम्ही त्यांना दिले आहे, त्यातून गुप्तपणे व उघडपणे खर्च करा [३९] मात्र तो दिवस येण्यापूर्वी ज्यात ना खरेदी-विक्री होईल व ना मैत्री कामी येईल.

قُلْ لِّعِبَادِيَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا يُقِيْمُوا الصَّلٰوةَ
وَيُنْفِقُوْا مِمَّا رَزَقْنٰهُمْ سِرًّا وَّعَلَانِيَةً مِّنْ قَبْلِ اَنْ
يَّاْتِيَ يَوْمٌ لَّا بَيْعٌ فِيْهِ وَلَا خِلٰلٌ ﴿٣١﴾

३२. अल्लाहनेच आकाशांना व जमीनीला निर्माण केले आणि वरुन पाणी वर्षविले व त्याद्वारे तुमच्या उपजिविके साठी फळे निर्माण केलीत व तुमच्यासाठी नौकेला सेवा कार्यात लावले की त्याच्या हुकुमाने समुद्रात भ्रमण करावे आणि तुमच्या साठी नद्यांना सेवा कार्यात लावले.[४०]

اَللّٰهُ الَّذِيْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ
وَاَنْزَلَ مِنَ السَّمَآءِ مَآءً فَاَخْرَجَ بِهٖ
مِنَ الثَّمَرٰتِ رِزْقًا لَّكُمْ ۚ وَسَخَّرَ لَكُمُ الْفُلْكَ لِتَجْرِيَ فِي الْبَحْرِ
بِاَمْرِهٖ ۚ وَسَخَّرَ لَكُمُ الْاَنْهٰرَ ﴿٣٢﴾

३३. आणि तुमच्या साठी सूर्य व चंद्राला सेवा कार्यात लावले की एका पद्धतिवर अमंल बजावणी करीत आहेत तसेच रात्र व दिवसालादेखील सेवा कार्यात लावले.[४१]

وَسَخَّرَ لَكُمُ الشَّمْسَ وَالْقَمَرَ
دَآئِبَيْنِ ۚ وَسَخَّرَ لَكُمُ الَّيْلَ وَالنَّهَارَ ﴿٣٣﴾

३५. दृढ़ वचनाशी अभिप्रेत एकेश्वरवादी वचन होय आणि आयतीचा अर्थ असा की जे लोक एकेश्वरवादी वाचनास कबूल करतात म्हणजे ईमान बाळगतात त्यांना एक मजबूत पाया लाभतो, ह्या भक्कम पायामूळे त्यांच्या श्रद्धेत मजबूती, त्यांच्या विचार व आचरणात स्थैर्य निर्माण होते. अशा प्रकारे जीवनाच्या रणांगणात सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना स्थैर्य व निश्चलता प्रदान करतो आणि जेव्हा कब्र म्हणजे आलमे बर्ज़ख (मरणोत्तर जीवनाची प्रथमावस्था) मध्ये पोहचतात तर तिथेहि त्यांना दृढता लाभते.

हदीस वचनात उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले: يثبت الله ـــــــ الخ

‘मुसलमानाला कबरीत जेव्हा प्रश्न केला जातो तेव्हा तो साक्ष देतो की अल्लाह शिवाय कोणीही उपास्य नाही आणि मुहम्मद अल्लाहचे प्रेषित होत-हीच ती गोष्ट जिच्या विषयी फर्माविले गेले आहे. ‘अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांना दृढ़ वचना द्वारे ऐहिक जीवनातही दृढ़ता प्रदान करतो व आखिरत मध्येहि’ (बुखारी-किताबुत्तफसीर)

अशा प्रकारे कियामतीच्या दिवशी त्यांना स्थानाची दृढ़ता लाभेल ज्यामुळे त्यांना सदैव कालीन साफल्य प्राप्त होईल.

३६. स्पष्ट असावे की अल्लाहचे इच्छिणे त्याच्या बुद्धि कौशल्यानुसार असते व त्याचे समस्त निर्णय बुद्धि कौशल्ययुक्त असतात.

३७. संकेत कुरेशकडे आहे ज्यांना अरब जन-समूहाचे नेतृत्व लाभले होते व ज्यांनी अनेकेश्वरवादी रिती रिवाज प्रचलीत करुन संपूर्ण जन समूहाला विनाशाच्या गर्तेत लोटून दिले.

३८. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह बकरा टीप क्र.२९व २००.

३९. मक्का येथे जेव्हा शरीअतचे प्रारंभिक आदेशच अवतरले होते, नमाज़ कायम करण्याचा व अल्लाह करीता खर्च करण्याचा ताकीदपूर्ण आदेश दिला गेला,ज्यावरुन या दोन्ही गोष्टीचे महत्तव स्पष्ट होते तसेच यावरुन हे हि स्पष्ट होते की एखाद्या मुसलमानावर जकात (कर्तव्य-दान) लागू होत असो वा नसो त्याने अल्लाहच्या प्रसन्नते खातीर खर्च करीत राहिले पाहिजे व हा खर्च दोन्ही प्रकारांनी अपेक्षित आहे- गुप्तपणेही व उघडरित्याहि. गुप्तपणे जो खर्च अल्लाह खातीर केला जातो तो दिखावा व प्रदर्शना पासून अलिप्त राहतो आणि उघडरित्या करण्याचा फायदा असा की त्याने इतरांनाहि खर्च करण्याचे प्रोत्साहन मिळेते, परंतु या स्थितीतहि त्यास दिखावा व प्रदर्शनापासून अलिप्त राखणे अगत्याचे आहे.

४०. हा अल्लाहच्या ईशत्वाचा पुरावा होय की तुमच्या पालन पोषणाची ही सर्व सामुग्री त्यानेच करुन ठेवली आहे. तर इतरांना तुम्ही ईश्वर कशा प्रकारे बनविले पालन पोषणाच्या या संपूर्ण व्यवस्थेत काय एखाद्याचा काही हिस्सा आहे-जर नाही व खरे पाहता कोणाचा कसलाच हिस्सा नाही तर मग ते ‘ईश्वर’ क़से ठरले? आणि उपासना जो पूर्णत: अल्लाहचाच हक्क आहे त्यात इतरांना सामील करुन घेण्याचा अर्थ काय?

४१. मुसख्खर करण्याचा अर्थ असा नव्हे की या गोष्टी माणसाच्या ताब्यात दिल्या गेल्या; जसे सर्वसामान्य पणे लोक समजतात कारण दिवस व रात्र कोणत्याही स्थितीत माणसाच्या ताब्यात नाहीत, किंबहुना मुसख्खर करण्याचा अर्थ हा की या वस्तू मनुष्याच्या सेवा कार्यात लावल्या गेल्या आहेत व त्यांच्या द्वारे माणसाला लाभान्वित करण्याची उपाय योजना केली गेली आहे.

३४. ज्याने तुमची प्रत्येक अपेक्षा पूर्ण केली [४२] जर तुम्ही अल्लाहच्या देणग्यांची गणना करु इच्छिले तर गणना करु शकणार नाहीत.[४३] वस्तुस्थिती अशी की मनुष्य मोठा अन्यायी, मोठा कृतज्ञ आहे.[४४]

وَآتَاكُم مِّن كُلِّ مَا سَأَلْتُمُوهُ ۚ وَإِن تَعُدُّوا نِعْمَتَ اللَّهِ
لَا تُحْصُوهَا ۗ إِنَّ الْإِنسَانَ لَظَلُومٌ كَفَّارٌ ﴿٣٤﴾

३५. आणि (स्मरण करा) जेव्हा इब्राहीम ने दुआ (प्रार्थना)केली होती की हे माझ्या पालन कर्त्या ! या शहराला शांती-स्थळ बनव [४५] आणि मला व माझ्या संततीस या गोष्टीपासून अलिप्त राख की मूर्तिपूजा करु लागावे.[४६]

وَإِذْ قَالَ إِبْرَاهِيمُ رَبِّ اجْعَلْ هَٰذَا
الْبَلَدَ آمِنًا وَاجْنُبْنِي وَبَنِيَّ أَن نَّعْبُدَ الْأَصْنَامَ ﴿٣٥﴾

३६. हे माझ्या पालन कर्त्या !या मूर्तिनी अनेक लोकांना मार्गभ्रष्ट केले आहे. [४७] तेव्हा जो माझे अनुसरण करील तो माझा आहे व जो माझी अवज्ञा करील तर तू माफ करणारा व कृपा करणारा आहे. [४८]

رَبِّ إِنَّهُنَّ أَضْلَلْنَ كَثِيرًا مِّنَ النَّاسِ ۖ فَمَن
تَبِعَنِي فَإِنَّهُ مِنِّي ۖ وَمَنْ عَصَانِي فَإِنَّكَ غَفُورٌ
رَّحِيمٌ ﴿٣٦﴾

३७. हे आमच्या पालन कर्त्या ! मी आपल्या अपत्त्यांपैकी काहींना [४९] अशा खोऱ्यात जिथे शेती होत नाही, [५०] तुझ्या प्रतिष्ठित घराजवळ आणून बसविले आहे. [५१] हे आमच्या पालन कर्त्या ! यासाठी की त्यांनी नमाज़ कायम करावी. [५२] यास्तव तू लोकांच्या हृदयांना त्यांच्याकडे आकर्षित कर [५३]आणि फळांद्वारे त्यांना उपजिविका पुरवित राह [५४] अशासाठी की त्यांनी कृतज्ञशील व्हावे.

رَّبَّنَا إِنِّي أَسْكَنتُ مِن ذُرِّيَّتِي بِوَادٍ غَيْرِ
ذِي زَرْعٍ عِندَ بَيْتِكَ الْمُحَرَّمِ رَبَّنَا لِيُقِيمُوا
الصَّلَاةَ فَاجْعَلْ أَفْئِدَةً مِّنَ النَّاسِ تَهْوِي إِلَيْهِمْ
وَارْزُقْهُم مِّنَ الثَّمَرَاتِ لَعَلَّهُمْ يَشْكُرُونَ ﴿٣٧﴾

३८. हे आमच्या पालन कर्त्या ! जे काही आम्ही लपवितो व जे काही जाहीर करतो ते तू जाणतोस आणि अल्लाह पासून कोणती हि गोष्ट लपलेली नाही, ना जमीनीत ना आकाशात.[५५]

رَبَّنَا إِنَّكَ تَعْلَمُ مَا نُخْفِي وَمَا نُعْلِنُ ۗ وَمَا يَخْفَىٰ
عَلَى اللَّهِ مِن شَيْءٍ فِي الْأَرْضِ وَلَا فِي السَّمَاءِ ﴿٣٨﴾

३९. आभार अल्लाहचे ज्याने मला म्हातारपणात इस्माईल व इसहाक प्रदान केले.[५६] नि:संशय माझा पालनकर्ता दुआ (प्रार्थना) ऐकणारा आहे.

الْحَمْدُ لِلَّهِ الَّذِي وَهَبَ لِي عَلَى الْكِبَرِ إِسْمَاعِيلَ
وَإِسْحَاقَ ۚ إِنَّ رَبِّي لَسَمِيعُ الدُّعَاءِ ﴿٣٩﴾

४०. हे माझ्या पालन कर्त्या ! मला नमाज़ कायम करणारा बनव व माझ्या संततीलाहि. हे आमच्या पालन कर्त्या ! माझी दुआ कबूल कर.[५७]

رَبِّ اجْعَلْنِي مُقِيمَ الصَّلَاةِ وَمِن ذُرِّيَّتِي ۚ
رَبَّنَا وَتَقَبَّلْ دُعَاءِ ﴿٤٠﴾

४२. म्हणजे माणसाच्या ज्या नैसर्गिक गरजा होत्या त्या सर्व पूर्ण केल्या गेल्या. उदाहरणार्थ श्वास घेण्यासाठी हवा, तहान भागविण्यासाठी पाणी, क्षुधा शमनासाठी अन्न व लैंगिक इच्छा पूर्ति करीता जोडी ची गरज या समस्त गरजांना, ज्या माणसाच्या स्वाभाविक गरजा आहेत पूर्ण करण्याची व्यवस्था सृष्टी-निर्मात्याने केली. तसेच मनुष्य स्वभावाची सर्वात महत्त्वपूर्ण गरज मार्गदर्शनाची आहे व ती पूरी करण्याची व्यवस्थाहि त्याच्या निर्मात्याने केली आहे.

४३. माणसाने खोलवर विचार केल्यास त्याला हे निश्चितपणे मान्य करावे लागेल की त्याच्या निर्मात्याने त्यास असंख्य देणग्यांनी उपकृत केले आहे व त्याचे माणसावर अगणित उपकार आहेत. त्याने केवळ जेवणाच्या एका घासावरच विचार केला तर कृतज्ञतेची भावना त्याच्या मनात वाढू लागेल की त्याच्या पालन कर्त्याने हा एक घास तयार करण्यासाठी कशी साधने योजिली. आकाश व जमीन,पाऊस, हवा व सूर्याच्या उष्णतेस त्याने कशा प्रकारे अनुकूल बनविले की विविध अवस्थेतून पार पडून धान्य तयार झाले व धान्य विविध अवस्थेतून पार पडून 'घास' तयार झाला. ज्यास तो मोठ्या चवीने खात आहे. आपल्या केसांची किंवा आकाशातील तारकांची गणना करणे जेव्हा माणसाला शक्य नाही तेव्हा अल्लाहच्या अमर्याद व अगणित देणग्यांची गणना तो कशा प्रकारे करु शकतो?

४४. ही सर्व सामान्य माणसाची दशा वर्णिली गेली आहे की तो ना आपल्या पालन कर्त्याचा हक्क अदा करण्यास तयार असतो, ना त्याच्या देणग्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यास.

४५. 'या शहरा' शी अभिप्रेत मक्का शहर होय व त्यास शांतीपूर्ण शहर बनविण्याची प्रार्थना हजरत इब्राहीम यांनी अशासाठी केली होती की त्याचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य, लोकांचे या गोष्टीकडे लक्ष केंद्रित करीत रहावे की त्याचे हे वैशिष्ट्य ते एकेश्वरवादाचे केंद्र स्थान असल्यामुळे आहे व त्याची निकड ही की त्यास शिर्क व मूर्तिपूजेपासून अगदी अलीप्त राखले जावे.

या प्रार्थनेस सर्वश्रेष्ठ अल्लाहने कबूल फर्माविले व मक्का शहरास हरम (आदरणीय स्थान) ठरवून तेथे लढाई नेहमी करीता वर्ज्य ठरावी.

४६. त्या काळात मूर्तिपूजेचा उपद्रव सार्वत्रिक होता आणि वातावरणाच्या वर्चस्वा नुसार मनुष्य या प्रकारच्या उपद्रवाना सहज बळी पडतो म्हणून हजरत इब्राहीम यांनी स्वत:साठी व आपल्या संततीसाठी यापासून सुरक्षित राखण्याची प्रार्थना केली कारण अल्लाहने प्रदान केलेल्या सुबुद्धि खेरीज मनुष्य या उपद्रवांपासून सुरक्षित राहू शकत नाही.

४७. म्हणजे ह्या मूर्ति असंख्य लोकांच्या मार्गभ्रष्टतेचे कारण बनल्या आहेत. हजरत इब्राहीम यांचे हे निवेदन ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. जगातील मोठ मोठी राष्ट्रे मूर्तिपूजेत लीन राहीले आहेत आणि नूह जनसमूहा पासून आज पावेतो हा क्रम सातत्याने जारी आहे. आजच्या काळातील माणसाने ज्ञान क्षेत्रात फार मोठी मजल गाठली असली तरी मोठ मोठे सभ्य व सुसंस्कृत जन समूह मूर्ति पूजेच्या संदर्भात त्यात अज्ञानात खितपत पडले आहेत ज्यात हजरत इब्राहीम कालीन जनसमूह पडले होते. मूर्ति पूजा पूर्णता अयोग्य असणे अगदी उघड आहे परंतु याची किमया जनसमूहांवर अशी झाली की ते मूर्तिपूजेला चिकटून राहिले आमच्या देशात तर असलीहि दृश्ये पाहण्यात येतात की मूर्तिपूजक प्रथम आपल्या हातांनी आपल्या उपास्यांना घडवितात मग त्यांची मिरवणूक काढून आपल्या हाताने त्यांना जल समाधी देतात. हे अकलेचे अंधत्व आणि सर्वात खालच्या प्रतीची मार्गभ्रष्टता नव्हे तर आणखी काय आहे?

४८. हजरत इब्राहीम यांनी आपली अवज्ञा करणाऱ्यांच्या व्यवहारास अल्लाहच्या हवाली करतांना त्याच्या त्या दोन गुणवैशिष्ट्यांचा उल्लेख केला ज्याद्वारे ही गोष्ट व्यक्त करणे अभिप्रेत आहे की तुझ्याकडून क्षमा व माफी आणि कृपा लाभात त्रुटी होऊ शकत नाही तथापि दास याबाबत पात्र न ठरले तर गोष्ट वेगळी.

४९. म्हणजे हजरत इस्माईल यांना.

५०. अभिप्रेत मक्केची निर्जल व ओसाड जमीन जी पर्वतांच्या पायथ्याशी आहे. काबगृहासाठी एखाद्या हिरव्यागार व प्रफुल्लीत भू भागा ऐवजी या वाळवंटमय जमीनीची निवड अशासाठी केली गेली की लोकांकरीता आकर्षणाचे कारण ऐहिक सौंदर्य नव्हे किंबहुना धर्म-संपदा ठरावे व अत्यंत शांतीपूर्ण वातावरणाचा त्यांना लाभ घडावा येथे ईमानाचे पोषण व आत्म्याच्या विकासाची भरपूर सामुग्री असावी.

५१. प्रतिष्ठित घराशी अभिप्रेत काबागृह होय जे अत्यंत पवित्र व अतिशय आदरणीय आहे. हजरत इब्राहीम यांनी आपल्या संतती पैकी हजरत इस्माईल यांना मक्का येथे वसविले आणि इसहाकला पॅलेस्टीन मध्ये. हजरत इस्माईल यांच्या वंशास बनी इस्माईल म्हटले जाते. कुरेश यांच्याच वंशाचे होते व हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना याच लोकांकडे पैगंबर या नात्याने पाठविले गेले. हजरत इब्राहीम यांच्या या प्रार्थनेद्वारे हे स्पष्ट झाले की ही प्रार्थना त्यांनी काबागृहाच्या उभारणी नंतर केली व दुसरे हे की आपला पुत्र इस्माईल यांना अशा वेळी मक्का येथे वसविले जेव्हा काबागृहाची उभारणी पूर्ण झाली होती. कुरआनाने अन्य स्थानी स्पष्ट केले आहे की काबागृहाच्या उभारणीत हजरत इब्राहीम बरोबर हजरत इस्माईल देखील सहभागी होते.

राहीलीत ती कथने ज्यात हजरत इस्माईल यांना जेव्हा ते

दूध पिणारे बालक होते. त्यांची माता हजरत हाजरासह मक्केच्या वाळवंटात एकटे सोडून जाण्याचा विचित्र किस्सा वर्णिला गेला आहे तर ही कथने ना क़ुरआनाच्या या निवेदनाशी सुसंगत आहेत ना अनुमानगम्य आहेत. तद्वतच या कथनांचा संबंध पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी जोडणे योग्य नव्हे जसे विद्वान सैय्यद सुलेमान नदवी यांनी 'अर्दुल् क़ुरआन' या पुस्तकात लिहिले आहे:

'याद्वारे (म्हणजे सूरह इब्राहीमची आयत ३९ द्वारे) हे सिद्ध होते की हजरत इस्माईल यांचे मक्केत आगमन झाल्या वेळी हजरत इसहाक यांचा जन्म झाला होता. तौरात ने हे सिद्ध आहे की हजरत इस्माईल हज़रत इसहाक यांच्याहून तेरा वार्षांनी मोठे होते. बुखारी किताबुररुया व किताबुल अंबिया मध्ये हजरत इब्ने अब्बास यांचे जे हदीस वचन इस्माईल यांच्या दूध पिण्या संबंधी आहे त्याचा क्रम पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) पर्यांत पोहचत नाही. (प्रसंगानुरोधाने आलेल्या काही खास वाक्यां खेरीज) म्हणून ते हजरत इब्ने अब्बास यांच्या इस्राईली कथना पैकी आहेत व त्याचा पुरावा आजहि अस्तित्वात आहे. बुखारीत या विषयी जी दीर्घ हदीस आहे ती जुरहम व मक्केचा उल्लेख वागळता मिदराश व तालमूद या ग्रंथात शब्दात: उल्लिखित आहे.'' (अर्दुल् क़ुरआन खंड-२ पृष्ठ ४४०)

तसेच एक विद्वान अल्लामा इब्ने कसीर यांनी या प्रदीर्घ हदीस वचनास ज्यात हज़रत इस्माईल ना दूध पिण्याच्या स्थितीत मक्केत सोडून देण्यास आल्याचा उल्लेख आहे. निवेदनान्वये लिहितात:-

''हे हदीस वचन इब्ने अब्बास यांचे म्हणणे आहे तथापि त्याचा एक भाग पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याद्वारे उल्लिखित आहे आणि त्यातल्या एका भागात विचित्र गोष्टी आहेत व असे दिसून येते की इब्ने अब्बास यांनी या कथनास इस्राईल कथनातून घेतले आहे व त्यात हे हि निवेदिले गेले आहे की त्यावेळी हजरत इस्माईल दूध पिणारे बालक होते.

(अल-बिदाया वन्निहाया खंड १ पा. १५६ )

५२. नमाज़ काबागृहाच्या उभारणीचे सर्वप्रथम उद्दिष्ट होय व हजरत इब्राहीम यांनी आपल्या पुत्र इस्माईलला येथे या हेतुने पाठविले होते की त्यांच्या वंशजांनी अल्लाहच्या कृपा छत्राखाली नमाज़ कायम करावी परंतु त्यांचेच वंशज असलेल्या कुरेश लोकांनी नमाज़ ऐवजी मूर्तिपूजा पत्करली. हजरत इब्राहीम यांच्या पद्धतिशी किती विसंगत वर्तन होते जे कुरेश लोकांनी पत्करले !

५३. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने लोकांच्या हृदयांना त्यांच्याकडे अशा प्रकारे झुकविले की 'बनी-इस्माईल' (इस्माईल-वंश संपूर्ण अरब देशाचे लक्ष-केंद्र बनले.

५४. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. १४६ मध्ये केले गेले आहे.

५५. म्हणजे अल्लाहला आमची मन:स्थितीहि ठाऊक आहे व त्याच्यापासून जमीन व आकाशाची कोणतीहि वस्तू लपलेली नाही.

५६. स्पष्ट झाले की जेव्हा हजरत इब्राहीम यांनी ही प्रार्थना केली होती तेव्हा त्यांचे दुसरे पुत्र हजरत इसहाक यांचा जन्म झालेला होता. बायबलच्या निवेदनानुसार हजरत इस्माईल यांचा जन्म झाला त्यावेळी हजरत इब्राहीम यांचे वय ८६ वर्ष व हजरत इसहाक यांच्या जन्माच्या वेळी १०० वर्ष होते म्हणजे हजरत इसहाक हजरत इस्माईल नंतर १४ वर्षानी जन्मले आणि दोघांचा जन्म किनआन (पॅलेस्टीन) मध्ये झाला होता.

'हागारे ला अब्रामा पासून इश्माएल झाला तेव्हा अब्राम शहांयशी वर्षाचा होता'. (उत्पत्ति- १६ :१६)

' इसहाक झाला तेव्हा अब्राहम शंभर वर्षाचा होता' (उत्पत्ति -२१ : ५)

तात्पर्य काबागृहाची उभारणी व हजरत इस्माईल यांना मक्केत वसविण्याची घटना त्यावेळची आहे जेव्हा हज़रत इस्माईल यांचे वय १४ वर्षाहून अधिक होते.

५७. यावरुन हे ज्ञात झाले की हजरत इब्राहीमच्या शरीयतील देखील नमाज़ला सर्वात प्रथम महत्व होते आणि हा धर्माचा असा आधारस्तंभ होय ज्यास कायम करण्याकरीता ईमान धारक व्यक्तिने अल्लाहकडून सुबुद्धिची अभिलाषा करावी तसेच आपल्या संततीच्या हक्कात देखील प्रार्थना करावी की त्यांनीहि नियमितपणे नमाज़ अदा करणारे व्हावे.

हे आमच्या पालनकर्त्या ! मला व माझ्या माता-पित्यास व ईमान बाळगणाऱ्यांना त्या दिवशी क्षमा कर ज्या दिवशी हिशेब कायम होईल. हे अत्याचारी जे काही करीत आहेत त्या पासून तुम्ही अल्लाहला गाफील समजू नका तो तर त्यांना त्या दिवसापावेतो संधी देत आहे जेव्हा नेत्र विस्फारलेलेल्या स्थितीतच राहतील.(अल-क़ुर्आन)

४१. हे आमच्या पालनकर्त्या ! मला व माझ्या माता-
पित्यास व ईमान बाळगणाऱ्यांना त्या दिवशी क्षमा
कर ज्या दिवशी हिशेब कायम होईल.[५८]

رَبَّنَا اغْفِرْ لِي وَلِوَالِدَيَّ
وَلِلْمُؤْمِنِينَ يَوْمَ يَقُومُ الْحِسَابُ ﴿٤١﴾

४२. हे अत्याचारी जे काही करीत आहेत त्या पासून
तुम्ही अल्लाहला गाफील समजू नका.[५९] तो तर
त्यांना त्या दिवसापावेतो संधी देत आहे जेव्हा नेत्र
विस्फारलेलेल्या स्थितीतच राहतील.[६०]

وَلَا تَحْسَبَنَّ اللَّهَ غَافِلًا عَمَّا يَعْمَلُ الظَّالِمُونَ ۚ
إِنَّمَا يُؤَخِّرُهُمْ لِيَوْمٍ تَشْخَصُ فِيهِ الْأَبْصَارُ ﴿٤٢﴾

४३. शिर उंचावून पळत सुटतील. [६१] दृष्टी अशी की
परत वळून येणारी नाही.[६२] आणि मने अशी की
(भयातिरेकाने ) उडत जात आहेत .[६३]

مُهْطِعِينَ مُقْنِعِي رُءُوسِهِمْ
لَا يَرْتَدُّ إِلَيْهِمْ طَرْفُهُمْ ۖ وَأَفْئِدَتُهُمْ هَوَاءٌ ﴿٤٣﴾

४४. लोकांना त्या दिवसा विषयी सावध करा जेव्हा
ईश-प्रकोप त्यांच्याशी येऊन ठेपेल.[६४] त्यावेळी
अत्याचारी म्हणतील,हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हला
थोड्या अवधिपर्यंत संधी दे. आम्ही तुझे आवाहन
कबूल करु व पैगंबरांचे अनुसरण करु-काय यापूर्वी
तुम्ही शपथपूर्वक सांगत नव्हते की आम्हाला
(इहलोकातून) स्थानांतरीत व्हायचे नाही.[६५]

وَأَنْذِرِ النَّاسَ يَوْمَ يَأْتِيهِمُ الْعَذَابُ فَيَقُولُ الَّذِينَ
ظَلَمُوا رَبَّنَا أَخِّرْنَا إِلَىٰ أَجَلٍ قَرِيبٍ نُجِبْ دَعْوَتَكَ وَنَتَّبِعِ
الرُّسُلَ ۗ أَوَلَمْ تَكُونُوا أَقْسَمْتُمْ مِنْ قَبْلُ مَا لَكُمْ مِنْ زَوَالٍ ﴿٤٤﴾

४५. आणि तुम्ही अशा लोकांच्या वसाहतीत वसले
होते ज्यांनी स्वत:वरच अत्याचार केला होता [६६]
आणि तुम्हाला चांगले कळून चुकले होते की
आम्ही त्यांच्याशी कोणते वर्तन केले होते व
तुमच्यासाठी आम्ही उदाहरणे देखील प्रस्तुत केली
होती. [६७]

وَسَكَنْتُمْ فِي مَسَاكِنِ الَّذِينَ ظَلَمُوا أَنْفُسَهُمْ وَتَبَيَّنَ لَكُمْ كَيْفَ
فَعَلْنَا بِهِمْ وَضَرَبْنَا لَكُمُ الْأَمْثَالَ ﴿٤٥﴾

४६. आणि ते वेगवेगळे डाव पेच खेळलेत तथापि
अल्लाहजवळ त्यांच्या प्रत्येक डावपेचास उत्तर होते,
जरी त्यांचे डावपेच असे होते की पर्वतानेहि स्थान
बदलावे. [६८]

وَقَدْ مَكَرُوا مَكْرَهُمْ وَعِنْدَ اللَّهِ مَكْرُهُمْ
وَإِنْ كَانَ مَكْرُهُمْ لِتَزُولَ مِنْهُ الْجِبَالُ ﴿٤٦﴾

४७. तेव्हा तुम्ही अशी कल्पना करु नका की अल्लाहने
आपल्या प्रेषितांशी जो वायदा केला आहे त्यांच्या
विरुद्ध करील. [६९] अल्लाह प्रभुत्वशाली व शिक्षा
देणारा आहे.[७०]

فَلَا تَحْسَبَنَّ اللَّهَ مُخْلِفَ
وَعْدِهِ رُسُلَهُ ۗ إِنَّ اللَّهَ عَزِيزٌ ذُو انْتِقَامٍ ﴿٤٧﴾

५८. हज़रत इब्राहीम यांनी आपल्या पित्यासाठी जी क्षमायाचनेची प्रार्थना केली होती तिचे स्पष्टीकरण सूरह तौबा टीप क्र.२१०व २११ मध्ये केले गेले आहे. या प्रसंगी वरील उल्लिखित टीपांचा संदर्भ लक्षात घ्यावा.

'ज़्या दिवशी हिशोब कायम होईल'शी अभिप्रेत कियामतीचा दिवस होय जेव्हा प्रत्येकास अल्लाह समोर हजर व्हावे लागेल व त्यास आपल्या जीवन कर्माचा हिशेब सादर करावा लागेल.

हजरत इब्राहीम यांची ही महत्वपूर्ण प्रार्थना बायबलच्या पृष्ठात आढळत नाही, परंतु क़ुरआनने तिला सुरक्षित राखले. याने विरोधकांच्या या आक्षेपाचे आपोआप खंडन होते की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी बायबलचा लाभ घेतला आहे.

५९. हे, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना उद्देश्यून असले तरी त्याद्वारे सर्व सामान्य लोकांना सावध करण्याचा हेतु आहे की सत्याची पिळवणूक व असत्याचे प्राबल्य पाहून एखाद्याने असा गैर समज करुन घेऊ नये की हे जग 'अंधेर नगरी' आहे व ईश्वर इथल्या अत्याचाराविषयी गाफील आहे. पण वस्तुस्थिती अशी की जगात जे काही होत आहे त्यास ईश्वर चांगल्या प्रकारे जाणून आहे परंतु ज्याअर्थी हिशेबाकरीता व शिक्षा-मोबदल्याकरीता त्याने कियामतीचा दिवस निश्चित केला आहे म्हणून लोकांना तो संधी देत आहे की लोकांनी चांगले-वाईट जसे मनाला येईल ते आचरण करावे. ही अंधेर नगरी नव्हे किंबहुना बुद्धि कौशल्य युक्त योजना होय.

६०. म्हणजे कियामतीच्या दिवशी अशी भयानक दृश्ये समोर येतील की दुराचारी लोकांचे डोळे भयातिरेकाने विस्फारीत होतील ते कियामतीवर विश्वास ठेवत नव्हते म्हणून हे दृश्य पाहून आश्चर्यचकीत होतील की आम्ही कोणत्या जगात येऊन पोहचलो !

६१. कबरीतून उठल्यानंतर ते आपल्या स्थानाकडे (हजर होण्याच्या ठिकाणी) पळत सुटतील आणि त्यासाठी त्यांना केवढे प्रदीर्घ अंतर पार पाडावे लागेल ते ईश्वरालाच माहित.

६२. म्हणजे भयातिरेकाने ते एकटक पहात राहतील.

६३. दु:ख व भयातिरेकाने त्यांची मोठी वाईट दशा होईल व त्यांच्या मनाची ही अवस्था होईल की जणू उडत जात आहेत. खरे पाहता हृदयांना दृढता प्रदान करणारी गोष्ट ईमान आहे आणि जेव्हा त्यांची मने ईमान-शून्य राहिलीत तर परिणामी कियामतीच्या विशी अपरिहार्यत: त्याचे डोके ठिकाणावर राहणार नाही.

६४. कियामतीच्या शिक्षेविषयी लोकांना सावध करण्याचा हा ताकीदपूर्ण आदेश या गोष्टीकडे अंगुली निर्देश करतो की क़ुरआनाच्या आवाहनाचा हा अत्यंत महत्वपूर्ण बिंदू आहे ज्यास पूर्णत: स्पष्ट करुन अत्यंत प्रभावीपणे लोकांसमोर सादर केले गेले पाहिजे.

आजच्या गाफील जगास झंझोडणे व कियामतीच्या शिक्षेविषयी त्यास खबरदार करणे हे कुरआनाचे अनुसरण करणाऱ्यांचे महत्वपूर्ण कर्तव्य आहे व काळाची सर्वात मोठी गरज देखील.

६५. म्हणजे पूर्ण विश्वासाने तुम्ही सांगत होते की या जगातून दुसऱ्या जगात आम्हाला जायचेच नाही. जीवन याच जगी आहे व आखिरत निव्वळ एक कल्पाना आहे. आता मात्र तुम्हाला आपल्या भ्रमाची जाणीव मात्र कसोटीची वेळ टळून गेली. ही वेळ तर परिणितीच्या उदयाची वेळ आहे.

६६. अभिप्रेत अरब देश होय ज्याच्या विविध क्षेत्रात नष्ट झालेल्या जन समूहांचे प्राचीन अवशेष आढळून येतात. उदाहरणार्थ 'हिज्र' च्या खोऱ्यात समूद जन समूहाचे अवशेष इत्यादी.

६७. म्हणजे तुम्हाला बोध व उपदेश घडावा म्हणून ऐतिहासिक घटनाहि प्रस्तुत केल्या गेल्या आणी वेगवेगळी उदाहरणेहि दिली गेली. यास्तव या सूरहमध्ये पवित्र-वचन व वाईट वचनाची उदाहरणे दिली गेली आहेत तथापि तुम्ही कोणत्याहि गोष्टीने धडा घेतला नाही.

६८. म्हणजे या जन समूहांनी प्रेषितांविरुद्ध जबरदस्त डावपेच खेळले होते. परंतु अल्लाहने यांच्या प्रत्येक डावपेचास असफल बनविले, तेव्हा काय आता तुम्ही (हे कुरेश!) ही अपेक्षा बाळगता, आमच्या पैगंराविरुद्ध तुमचे कट-कारस्थान यशस्वी होईल?

६९. हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून आहे व याद्वारे त्यांना व त्यांच्या अनुयायींना दिलासा देण्याचा हेतु आहे जेणेकरुन विरोधकांच्या डाव-पेचांनी त्यांनी त्रस्त होऊ नये. ज्याप्रकारे भूतकाळात अल्लाह आपल्या प्रेषितांचे सहाय्य करीत राहिला तद्वतच तो आपल्या या प्रेषिताचीहि मदत करील अल्लाहचा वायदा पूर्ण न व्हावा असे कधीहि झाले नाही.

७०. अल्लाह वर्चस्वशाली आहे म्हणून सर्व त्याच्या कब्जात आहे आणि तो शिक्षा देणारा आहे म्हणून तो या अत्याचारींना जे त्याच्या प्रेषितास विरोध करतात व त्याविरुद्ध डावपेच खेळतात, निश्चितपणे शिक्षा देईल.

يَوْمَ تُبَدَّلُ الْاَرْضُ غَيْرَ الْاَرْضِ وَالسَّمٰوٰتُ
وَبَرَزُوْا لِلّٰهِ الْوَاحِدِ الْقَهَّارِ ﴿٤٨﴾

४८. तो दिवस की जेव्हा ही जमीन दुसऱ्या जमीनने बदलली जाईल व आकाश देखील.[७१] आणि सर्व एकमेव जबरदस्त सामर्थ्यशाली अल्लाह समोर हजर होतील ![७२]

وَتَرَى الْمُجْرِمِيْنَ يَوْمَئِذٍ مُّقَرَّنِيْنَ فِي الْاَصْفَادِ ﴿٤٩﴾

४९. आणि त्या दिवशी अपराध्यांना तुम्ही साखळ्यांनी जकडलेल्या स्थितीत पहाल.

سَرَابِيْلُهُمْ مِّنْ قَطِرَانٍ وَّتَغْشٰى وُجُوْهَهُمُ النَّارُ ﴿٥٠﴾

५०. त्यांच्या पोषाख डांबराचा असेल व चेहऱ्यांवर आग पसरलेली असेल.

لِيَجْزِيَ اللّٰهُ كُلَّ نَفْسٍ مَّا كَسَبَتْ اِنَّ اللّٰهَ
سَرِيْعُ الْحِسَابِ ﴿٥١﴾

५१. हे एवढ्यासाठी असेल की अल्लाहने प्रत्येक मनुष्यास त्याच्या कमाईचा मोबदला द्यावा. नि:संशय अल्लाह हिशेब घेण्याबाबत अतिशीघ्र आहे.

هٰذَا بَلٰغٌ لِّلنَّاسِ وَلِيُنْذَرُوْا بِهٖ وَلِيَعْلَمُوْٓا اَنَّمَا هُوَ اِلٰهٌ وَّاحِدٌ
وَّلِيَذَّكَّرَ اُولُوا الْاَلْبَابِ ﴿٥٢﴾

५२. हा समस्त मनुष्यांकरीता एक संदेश आहे.[७३] व या उद्देश्याने पाठविला गेला आहे की याद्वारे लोकांना खबरदार केले जावे व त्यांनी हे जाणून घ्यावे की केवळ तोच एक ईश्वर आहे आणि जे सूज्ञता बाळगतात त्यांनी बोध ग्रहण करावा.[७४]

७१. कियामतीच्या दिवशी जमीन व आकाशात असे स्थित्यांतर (Changes) आणले जाईल की ते नवीन स्वरुपात व नवीन व्यवस्थेसह अस्तित्वात येतील.

हदीसमध्ये अंतिम दिवशी जमीनीचे स्वरुप अशा प्रकारे वर्णिले गेले आहे:-

يحشر الناس يوم القيامة على ارضٍ بيضاء عفراء

كقرصه النقى ليس فيها معلم لاحد۔ (بخاری کتاب الرقاق)

“कियामतीच्या दिवशी लोकांना किंचित लाल-शुभ्र जमीनीवर एकत्रित केले जाईल, जी मैद्याच्या पोळीसारखी असेल तिच्यावर एखाद्याच्या घरादाराचे चिन्हहि नसेल.” (बुखारी किताबुर रिकाक)

भूतकाळात जेव्हा घटकामध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आलीत, येथपावेतो की तिने आजच्या जमीनीचे रूप अंगिकारले तेव्हा यापुढे तिच्या रचनेत परिवर्तन घडून येणे मुळीच असंभव नाही. व तिचा निर्माता खचितच या गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो की तिची मूलतत्वे व निसर्ग-नियमांना बदलून टाकावे.

तात्पर्य कियामतीच्या दिवशी आजचे विश्व एका नवीन विश्वात रुपांतरीत होईल, जिचा स्थळ काळ अगदी भिन्न असेल व त्यावेळी लोकांना अल्लाहच्या सामर्थ्य शक्तिचे खरे अनुमान होईल व ते जाणून घेतील की अल्लाह त्यांच्या विश्वाला नवीन विश्वात परिवर्तित करण्यास पूरेपूर समर्थ होता.

७२. कियामतीच्या दिवशी मनुष्य,मनुष्य स्वरुपातच उठेल म्हणजे आत्मा व शरीरासह आणी श्रीमंत असो वा गरीब, राजा असो कि रंक, स्त्री असो वा पुरुष, सामान्य व्यक्ति असो वा विशेष व्यक्तिमत्व सर्वांनाच अल्लाह समोर हजर व्हावे लागेल. अशासाठी की दुनियेत ते जे काही कर्म करीत राहिलेत, त्यांचा जाब द्याव व आपल्या चांगल्या-वाईट आचरणानुसार शिक्षा व मोबदला प्राप्त करावा.

ही आहे क़ुरआनची आखिरत संबंधीची कल्पना जी बुद्धि आणि न्यायाच्या तराजूत पूरेपूर उतरते, याऊलट भारतीय अनेकेश्वरवादी आवागमन कल्पनेवर श्रद्धा ठेवतात, ज्यानुसार आत्मा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात कधी मनुष्यात तर कधी जनावरात स्थलांतरत होत राहतो व आपल्या पालनकर्त्यापुढे जाब देण्यासाठी हजर होण्याचा दुर्धर प्रसंग ओढवत नाही ईश्वरापुढे हजर न होण्याची ही कल्पना बुद्धि आणि न्यायाच्या अगदी विपरित व कुरआनाच्या दृष्टीने अगदी असत्य आहे.

७३. म्हणजे 'क़ुरआन' अल्लाहचा संदेश आहे आणि हा संदेश खास अरब लोकांसाठी नाही किंबहुना विश्वातील समस्त जनसमूहांकरीता व समस्त माणसांकरीता आहे.

७४. हे आहे क़ुरआनाचे मूळ मिशन (Mission) सर्वप्रथम ईश्वर व आखिरत विषयी गाफील लोकांना जागृत करणे व त्यांना याच्या दुष्परिणिती बाबत सावध करणे द्धितीयत: एकेश्वरवाद म्हणजे अल्लाह शिवाय ना कोणा ईश्वराचे अस्तित्व आहे, ना त्याच्या खेरीज कोणी उपासनीय आहे या वस्तुस्थितीशी लोकांना अवगत करणे.

तृतीयत: जे लोक बुद्धिचे काम घेतात त्यांच्याकरीता स्मरण (बोध) अशासाठी की त्यांनी विश्वात जबाबदारीचे जीवन व्यतीत करावे.

# सूरह अल्-हिज्र

# १५. सूरह अल्-हिज्र

**नावः** आयत क्र.८० ते ८४ मध्ये हिज्र वाल्यांचा उल्लख केला गेला आहे ज्यांना, प्रेषितांसना खोटे ठरविल्याच्या परिणामी नष्ट केले गेले होते. हा पैगंबर समूद यांचा जन-समूह होता, ज्यांचे केंद्र-स्थान हिज्र होते. हे स्थान मदीना व तबूक यांच्या दरम्यान आहे. तद्नुषंगाने या सूरह चे नाव 'अल् हिज्र' असे आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे आणि मजकूरावरुन असे दिसून येते की मक्केच्या मध्य युगात अवतरली असावी ही सूरह,सूरह इब्राहीम व सूरह हूदच्या आधी अवतरली.

**मध्यवर्ति कल्पनाः** प्रेषित्व आणि वही संबंधीच्या शंका दूर करणे व खोटे ठरविणाऱ्यांना याच्या परिणति बाबत सावध करणे.

**आयत रचनाः** आयत क्र.१ मध्ये प्रस्तावना म्हणून क़ुरआनाचे विशेष वैभव वर्णिले गेले आहे.

आयत क्र. २ ते १५ मध्ये प्रेषित्वाचा इन्कार करणाऱ्यांच्या शंका व आक्षेपांना उत्तर दिले गेले आहे.

आयत क्र.१६ ते २५ मध्ये निसर्गाच्या आश्चर्यजनक गोष्टींकडे संकेत केला गेला आहे ज्यांच्यावर विचार चिंतन केल्याने, वही (ईश संदेश), प्रषित्व व कियामतीच्या दिवसा विषयींच्या शंकांचे निरसन होते.

आयत क्र.२६ते ४४ मध्ये इब्लीस (सैताना) च्या मार्गभ्रष्टते ची ती घटना वर्णिली गेली आहे जी हज़रत आदम यांच्या निर्मिती पश्चात लगेच घडली होती. याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की तो सैतान होय जो माणसाला मार्गभ्रष्ट करण्यास टपून बसला आहे आणि बहुसंख्य लोक त्याच्या बहकविण्यात येत आहेत, तो वही आणि प्रेषित्वा विषयी लोकांच्या मनात शंका निर्माण करुन त्यांना सत्य-मार्गा पासून दूर ठेवू इच्छितो. परिणामी तो व त्याच्या इशाऱ्यावर चालणारे सर्व जहन्नम मध्ये पोहचल्याविना राहणार नाहीत.

आयत क्र. ४५ ते ४८ मध्ये त्या लोकांच्या उत्कृष्ट परिणतिचा उल्लेख केला आहे जे सैतानाच्या बहकाविण्यात आले नाहीत किंबहुना आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगित राहीले आणि शिर्क व अल्लाहच्या अवज्ञे पासून अलिप्तता अंगिकारली.

आयत क्र. ४९ ते ८४ मध्ये पैगंबरांच्या इतिहासातील काही वृत्तांत सादर केले गेले आहेत जे या गोष्टीस प्रमाणभूत होत की अल्लाहच्या सदाचारी दासांवर तर त्याची कृपा अवतरीत होते, परंतु त्याच्या विद्रोही दासांवर शिक्षेचा आसूड ओढवतो.

आयत क्र.८५ ते ९९ सूरहची समाप्ती होय ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या अनुयायीना सत्यासाठी सांत्वनाची सामुग्रीहि आहे व हे मार्गदर्शन देखील की जे लोक भौतिक वादात तल्लीन आहेत त्यांच्या भौतिक सम्पत्तिस इर्ष्या दृष्टीने पाहू नका तर त्या अनमोल सम्पत्तिची कदर बाळगा जी क़ुरआनाच्या स्वरुपात तुम्हास प्रदान केली गेली आहे.

# १५. सूरह अल-हिज्र

سُورَةُ الْحِجْرِ

(आयती- ९९)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. अलिफ. लाम. रा.[१] या आयती आहेत दिव्य ग्रंथ [२] असलेल्या क़ुरआनाच्या. [३]

الٓرۚ تِلْكَ آيَاتُ الْكِتَابِ وَقُرْآنٍ مُّبِينٍ ①

२. ती वेळ येईल जेव्हा हे काफिर अभिलाषा बाळगतील की आम्ही मुस्लिम असतो तर किती चांगले झाले असते ![४]

رُّبَمَا يَوَدُّ الَّذِينَ كَفَرُوا لَوْ كَانُوا مُسْلِمِينَ ②

३. त्यांना सोडा की त्यांनी खावे, प्यावे, मौज करावी व (खोट्या) आशेने त्यांना गफलतीत पडू द्यावे. लवकरच त्यांना माहित होईल.[५]

ذَرْهُمْ يَأْكُلُوا وَيَتَمَتَّعُوا وَيُلْهِهِمُ الْأَمَلُ ۖ فَسَوْفَ يَعْلَمُونَ ③

४. आम्ही ज्या ज्या वस्तीचा विनाश केला तिच्या करीता एक निर्धारित लिखित (ग्रंथ) राहिला आहे. [६]

وَمَا أَهْلَكْنَا مِن قَرْيَةٍ إِلَّا وَلَهَا كِتَابٌ مَّعْلُومٌ ④

५. कोणताहि जन समूह ना आपल्या निर्धारित समया पुढे जाऊ शकतो ना मागे राहू शकतो. [७]

مَّا تَسْبِقُ مِنْ أُمَّةٍ أَجَلَهَا وَمَا يَسْتَأْخِرُونَ ⑤

६. हे लोक म्हणतात हे अशा माणसा ज्यावर उपदेश अवतरीत केला गेला आहे, खचितच तू वेडा आहेस. [८]

وَقَالُوا يَا أَيُّهَا الَّذِي نُزِّلَ عَلَيْهِ الذِّكْرُ إِنَّكَ لَمَجْنُونٌ ⑥

७. जर तू सच्चा आहेस तर आमच्या समक्ष फिरिश्त्यांना का आणीत नाही ?

لَّوْ مَا تَأْتِينَا بِالْمَلَائِكَةِ إِن كُنتَ مِنَ الصَّادِقِينَ ⑦

८. आम्ही फिरिश्त्यांना विनाकारण उतरवित नाही. किंबहुना फैसल्यानिशी उतरवितो आणि त्या वेळी लोकांना संधी दिली जात नाही [९]

مَا نُنَزِّلُ الْمَلَائِكَةَ إِلَّا بِالْحَقِّ وَمَا كَانُوا إِذًا مُّنظَرِينَ ⑧

१. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह यूनुस टीप क्र.१ तसेच सूरह बकरा टीप क्र.१.

२. अभिप्रेत ईश-ग्रंथ होय. क़ुरआन ग्रंथ असण्या संदर्भात पुढील गोष्टींचा समावेश आहे (१) हा एक परिपूर्ण ग्रंथ आहे ज्याच्या आयती व सूरतीचा (अध्यायांचा) क्रम अल्लाह तर्फे लावला गेला आहे. कारण कोणत्याहि ग्रंथाची क्रम-रचना त्याचा लेखक करतो व त्याच्या मर्जी विरुद्ध ग्रंथास क्रम-बद्ध करण्याचा अधिकार इतरास नसतो.(२) लेखन व्यवस्थेत या ग्रंथाचा अंतर्भाव होतो कारण अरबी भाषेत लिखित गोष्टीला 'किताब' म्हणतात.(३) हा एक क्रम-बद्ध ग्रंथ आहे. कारण कोणताहि महत्वपूर्ण ग्रंथ असा असू शकत नाही की ज्याचे भाग एकमेकांशी सुसंगत नसावेत.

३. अरबी भाषेत क़ुरआनाचा शब्दार्थ पढणे, 'वाचणे' असा आहे. ईश ग्रंथाची ही धातू संज्ञा आपल्या ह्या गुणास जाहीर करते की हा ग्रंथ वारंवार वाचण्या योग्य व अत्याधिक प्रमाणात पढला (वाचला) जाणारा ग्रंथ आहे. ईश-संदेशाचा आरंभ 'इकरा' पढा (वाचा) या शब्दाने झाला आहे. तद्नुषंगानेहि या ग्रंथाचे 'क़ुरआन' हे नाव सार्थ ठरले.

राहिले याचे दिव्य असणे तर या संबंधीचे स्पष्टीकरण सूरह युसूफ टीप क्र.२ मध्ये केले गेले आहे.

४. अभिप्रेत मृत्यु- समय हि आहे व कियामतीची वेळ देखील. जेव्हा काफिर सत्य धर्मापासून आपल्या वंचितते बद्दल पश्चाताप व्यक्त करतील व आकांक्षा बाळगतील की इस्लाम धर्म स्वीकारुन आपण मुसलमान झालो असतो तर आपल्या केवढ्या हिताचे झाले असते!

पवित्र कुरआन ने ही गोष्ट स्पष्ट शैलीत लोकांसमोर मांडली आहे. यासाठी की त्यांनी धर्मा-धर्माच्या चक्रव्यूहातून बाहेर यावे व सरळ सरळ इस्लाम प्रवेश करावा कारण- आखिरत मध्ये हाच एक मुक्ति-मार्ग आहे.

५. म्हणजे क़ुरआन ज्या सत्यास प्रस्तुत करीत आहे त्यास ऐकण्या करीता व मानण्या करीता जे लोक तयार नाहीत त्यांना त्यांच्या दशेवरच सोडा. काही दिवस दुनियेच्या मौज मस्तीत हे दंग राहतील परंतु डोळे मिटताक्षणीच त्यांना कळून येईल की वस्तु स्थिती काय होती.

६. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे ही गोष्ट निश्चित होती की त्यास कोणत्या वेळे पर्यंत संधी दिली जावी अर्थात अल्लाहची कामे यथायोग्य योजने नुसार पार पडतात.

७. म्हणजे कोणताहि जन-समूह अल्लाहने निर्धारित केलेल्या वेळे आधी ना नाश पावू शकतो व ना तद्नंतर जिवंत राहू शकते.

८. इन्कार करणारे पैगंबराना म्हणत की, ईश्वरातर्फे माझ्यावर उपदेश अवतरला आहे. हा तुमचा दावा अगदी वेडेपणाचा आहे आणि वही (ईश-संदेश) ची जी कैफीयत तुमच्यावर होऊ लागते, ती वेडसर पणाची लहर मात्र आहे आणखी काही नाही, ज्यात तुम्ही गुरफटलेले आहात.

इन्कार करणाऱ्यांच्या या आक्षेपास इतिहासाने खोटे ठरविले कारण पैगंबर केवळ इतिहास घडविणारे व क्रांतीकारक या नात्यानेच उद्यास आले नाहीत तर एक आदर्श शिक्षक व आदर्श चरित्र कर्ता या नात्याने त्यांनी ती चिन्हे आपल्या मागे सोडली की संपूर्ण मानव-विश्व, जगाच्या अंतापर्यंत एक 'आदर्श व्यक्तिमत्व' म्हणून त्याचे स्मरण करील आणि ती दिव्यं वाणी जिला 'वेडेपणा' ठरविले होते अत्युच्य दर्जाची बुद्धिकौशल्य युक्त वाणीच्या रुपात आमच्या समोर आहे काय एवढी महान कामगिरी एखाद्या वेडसर माणसाची असू शकते?

९. हे त्यांच्या विरोधास प्रत्युत्तर होय. अर्थात हे की फिरिश्त्यांना तुमच्या म्हणण्या प्रमाणे उतरविले गेल्यास तुमच्या कसोटीचा प्रश्नच उद्भवत नाही. फिरिश्त्यांना फक्त अशाच वेळी उतरविले जाते जेव्हा एखाद्या जन समूहाचा कर्म-अवधि संपला असेल व त्याचा भाग्य निर्णय लावला गेला असेल.

إِنَّا نَحْنُ نَزَّلْنَا الذِّكْرَ وَإِنَّا لَهُ لَحَافِظُونَ ٩

९. नि:संशय ही स्मरणिका आम्ही अवतरीत केली आहे आणि आम्ही स्वत:च त्याचे संरक्षक आहोत [१०]

وَلَقَدْ أَرْسَلْنَا مِن قَبْلِكَ فِي شِيَعِ الْأَوَّلِينَ ١٠

१०. आणि ही सत्य घटना होय की आम्ही तुमच्या पूर्वी होऊन गेलेल्या जन-समूहां मध्ये पैगंबर पाठविले होते.

وَمَا يَأْتِيهِم مِّن رَّسُولٍ إِلَّا كَانُوا بِهِ يَسْتَهْزِئُونَ ١١

११. तथापि असे कधीहि झाले नाही की एखादा प्रेषित त्यांच्याजवल आला असावा व त्यांनी थट्टा उडविली नसावी.

كَذَٰلِكَ نَسْلُكُهُ فِي قُلُوبِ الْمُجْرِمِينَ ١٢

१२. अशा प्रकारे आम्ही अपराध्यांच्या मनात या गोष्टीचा प्रादुर्भाव करतो.[११]

لَا يُؤْمِنُونَ بِهِ وَقَدْ خَلَتْ سُنَّةُ الْأَوَّلِينَ ١٣

१३. ते यावर ईमान बाळगीत नाहीत व भूतपूर्व जन समूहांच्या घटना होऊन गेल्या.[१२]

وَلَوْ فَتَحْنَا عَلَيْهِم بَابًا مِّنَ السَّمَاءِ فَظَلُّوا فِيهِ يَعْرُجُونَ ١٤

१४. जर यांच्यासाठी आम्ही आकाशाचा एखादा दरवाजा उघडला असता, ज्यावर हे चढू लागले असते.

لَقَالُوا إِنَّمَا سُكِّرَتْ أَبْصَارُنَا بَلْ نَحْنُ قَوْمٌ مَّسْحُورُونَ ١٥

१५. तरीहि हेच म्हणाले असते की आमची दृष्टी बांधली गेली आहे. किंबहुना आमच्यावर जादू केली गेली आहे. [१३]

وَلَقَدْ جَعَلْنَا فِي السَّمَاءِ بُرُوجًا وَزَيَّنَّاهَا لِلنَّاظِرِينَ ١٦

१६. आणि आम्ही आकाशात बुरुज बनविले व पहाणाऱ्यांकरिता त्यांना मनोहर बनविले. [१४]

وَحَفِظْنَاهَا مِن كُلِّ شَيْطَانٍ رَّجِيمٍ ١٧

१७. तसेच प्रत्येक बहिष्कृत (रद्द केलेल्या) सैताना पासून त्यास सुरक्षित केले.[१५]

إِلَّا مَنِ اسْتَرَقَ السَّمْعَ فَأَتْبَعَهُ شِهَابٌ مُّبِينٌ ١٨

१८. आणि जो चोरुन लपून ऐकू इच्छिल तर एक प्रकाशमय निखळणारा निखारा त्याचा पाठलाग करतो. [१६]

१०. म्हणजे सर्वांग परिपूर्ण बोध व उपदेश असलेल्या क़ुरआनास आम्हीच अवतरीत केले. याला ना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी लिहिले, ना यात सैतानाचा वा अन्य एखाद्याचा हात आहे. आणि 'नि:संशय' आम्हीच त्याचे संरक्षक आहोत' असे जे फर्माविले गेले आहे तर याने भावीकाळाची हमी दिली आहे की ना यातील एखादा हिस्सा वाया जाईल, ना यात कशाही प्रकारचा फेरफार होऊ शकेल, किंबहुना आपल्या मूळ स्वरुपात शब्दश: जसे च्या तसेच बाकी राहील, यासाठी की ह्या शुद्ध करणाऱ्या स्त्रोता पासून मानव जातीने जगाच्या अंतापर्यंत लाभ घेत रहावा.

तसेच क़ुरआनच्या सत्यतेचा हा स्पष्ट पुरावा होय की आज क़ुरआन आपल्या मूळ स्वरुपात शब्दश: आमच्या समोर विद्यमान आहे. याला केवळ हिफ्ज (पठण) करणारे वंशानुवंश या हृदयातून त्या हृदयात स्थानांतरित करीत राहीले नाहीत तर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळापासून लिखित स्वरुपातहि ते स्थानांतरित होत राहीले. त्याची सर्वात प्राचीन प्रत जे तृतीय खलीफा हजरत उस्मान यांच्या हस्ते लिहिली गेली आहे व ज्यास 'मुस्हफे उस्मानी' म्हटले जाते. आज हि अस्तित्वात आहे (मुस्हफे उस्मानी च्या छायाचित्रासाठी पहा पृष्ठ क्र.२१७)

११. म्हणजे जेव्हा ते मागदर्शन मान्य करु इच्छित नाही तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या मनात मार्गभ्रष्टतेचे विचार दाखल करतो.

१२. म्हणजे काफिर जन-समूहांच्या विनाशाचे वृत्तांत होऊन गेले, ज्यावरुन हे दिसून येते की अल्लाहचा नियम कसा आहे.

१३. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने जर एखादा असा चमत्कार दाखविला असता की आकाशाचे द्वार उघडले असते व हे त्यातून आकाशात चढू लागले असते तरी देखील त्यांनी ईमान बाळगले नसते, किंबहुना या चमत्काराचा खुलासा त्यांनी या शब्दात केला असता की, या माणसाने आमच्या दृष्टीला जादू टोणा करुन बांधले आहे म्हणून आकाशात आम्हाला जे द्वार दिसत आहे ती केवळ जादूच होय. एवढेच नव्हे तर, या माणसाने आमच्या शुद्धीला इतके प्रभावित केले आहे की आम्ही स्वत:ला आकाशात चढत असलेले पाहत आहोत. वस्तुत: हा सर्व आभास आहे.

याद्वारे या काफिरांच्या हटवादी प्रवृत्तीस स्पष्ट करण्याचा हेतु आहे की त्यांना अगदी मोठ्यात मोठा चमत्कार दाखविण्यात आला तरी ते ईमान बाळगणार नाहीत.

१४.'बुरुज' शी अभिप्रेत प्रकाशमय ताऱ्यांचे पुंज( Constellation) होत.ज्यांची मनमोहता बघणाऱ्यांच्या दृष्टीला आकृष्ट करते. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा 'सूरह बुरुज' 'टीप क्र.२

१५. म्हणजे सैतानांना आकाशा पर्यंत पोहचणे शक्य नाही. ते आकाशाच्या हद्दीत दाखल होऊ शकत नाही. म्हणून, त्यांच्या साठीना तेथे उपद्रव पसरविण्याची संधी आहे आणि ना तेथल्या खबरी आणण्याची संधी.

१६. जिन्न आणि सैतान अतिशय सूक्ष्म अस्तित्व बाळगणारी ईश-निर्मिती आहे. आकाशाकडे उंच झेप घेण्याचे त्यांना सामर्थ्य प्राप्त आहे; तथापि आकाशाच्या हद्दीत प्रवेश करण्यापासून त्यांना रोखले गेले आहे. क़ुरआन अवतरणा पूर्वी ते आकाशा जवळ फिरकण्याचा प्रयत्न करीत, यासाठी की वरच्या विश्वाच्या खबरी जाणून घ्याव्यात, परंतु यात त्यांना यश लाभत नसे, तरी देखील त्यांनी जोतिष्यांवर ही छाप पाडली होती की ते अपरोक्षाच्या खबरी आणण्यास समर्थ आहेत. आणि या कारणास्तव क़ुरआन अवतरणा पूर्वी ज्योतिष विद्येचा क्रम मोठ्या प्रमाणात चालत होता व ज्योतिषी सैतानाच्या प्रभावाखाली लोकांना मूर्ख बनवून चांगला धंदा चालवीत व त्यांना मार्गभ्रष्ट करण्याचा कसोशीने प्रयत्न करीत. या ज्योतिष- विद्येचा पाया असत्यावर असला तरी ते अपरोक्ष वार्ता देण्याचा दावा करील होते, म्हणून त्यांच्या धंदा जोरात चालत असे. जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ईश-आदेशाच्या आधारावर अपरोक्ष वार्ता ऐकविण्यास सुरवात केली तेव्हा काफिरांनी पैगंबरावर ज्योतिष असल्याचा आरोप ठेवला. वस्तुत: प्रेषित्व आणि ज्योतिष- विद्येत सत्य व असत्याचा फरक अगदी स्पष्ट आहे. क़ुरआन अवतरण संदर्भात अधिक इतमाम हा केला गेला की जर कोणी जिन्न वा सैतान कानोसा घेण्याचा प्रयत्न करीत असे तर एक तेजस्वी अग्निशिखा ताऱ्यांमधून निघून त्यांचा पाठलाग करीत असे या इतमामाने ज्योतिष-विद्या संदर्भास जी प्रेषित्वाच्या सादृश्य होती, नेहमी करीता संपुष्टात आली, यास्तव आता जगात त्या प्रकारच्या भविष्य-वाणीचे आस्तित्व राहिले नाही; ज्या प्रकारच्या भविष्य वाणीचे अस्तित्व क़ुरआन अवतरणाच्या व प्रेषित्व सामाप्ती पूर्वी होते. आता ती भविष्य विद्या शिल्लक आहे ती पॉमेस्ट्री (Palmistry) ज्योतिष (Astrology) वगैरे प्रकारची आहे. आणि हे भविष्य वेत्ते भाग्य-दशा वर्तविण्याचा दावा करतात.

सूरह जिन्न मध्ये जिन्नांचे स्वत:चे निवेदन खालील प्रमाणे आहे-

وَاَنَّا لَمَسْنَا السَّمَآءَ فَوَجَدْنٰهَا مُلِئَتْ حَرَسًا شَدِيْدًا وَّ شُهُبًا ـ وَّاَنَّا كُنَّا نَقْعُدُ مِنْهَا مَقَاعِدَ لِلسَّمْعِ فَمَنْ يَّسْتَمِعِ الْاٰنَ يَجِدْ لَهٗ شِهَابًا رَّصَدًا ـ (سورہ جن: ۷ ـ ۹)

'आणि आम्ही आकाशाला चाचपून पाहिले तर ते सक्त पहारेकरी व तेजस्वी निखाऱ्यांनी व्यापलेले आहे आणि हे

की काही गुपित ऐकून घेण्याकरीता आम्ही त्याच्या ठिकाणांवर बसत होतो परंतु आता जो ऐकण्याचा प्रयत्न करतो तर एक अग्निशिखा आपला पाठलाग करीत असल्याचे त्याला दिसून येते.' (सूरह जिन्न: ७-९)

जिन्नांचे हे उड्डाण आकाशाशी जवळच्या क्षेत्रापर्यंत असते तेव्हा उघड आहे, त्यांच्यावर तेजस्वी अग्निझोत तिथेच सोडले जात असतील आणि क़ुरआनाच्या निवेदनावरुन स्पष्ट होते की हे प्रखर झोत ताऱ्यांमधून सोडले जातात.

وَلَقَدْ زَيَّنَّا السَّمَآءَ الدُّنْيَا بِمَصَابِيْحَ وَجَعَلْنٰهَا رُجُوْماً

لِلشَّيٰطِيْنِ۔ (سوره الملک:۵)

'आम्ही आकाशाच्या विश्वास दिव्यांनी सुशोभित केले व त्यांना सैतानांवर मारा करण्याचे साधन बनविले.' (अल् मुल्क-५)

तेव्हा तेजस्वी अग्निज्वाला वर्षाव किंवा अग्निशिखांचा वर्षाव जो जिन्न व सैतानांची आकाशाकडील उंच झेप रोखतो, अतिशय उंचीवर ताऱ्यांच्या क्षेत्रात होतो म्हणून क़ुरआनाने निवेदिलेल्या तेजस्वी अग्निज्वालाशी ते तूटणारे तारे (Meteor) अभिप्रेत घेणे योग्य ठरणार नाही. जे पृथ्वी पासून पन्नास-साठ मैलांच्या उंचीवर दररोज विपुल संख्येत निखळत राहतात. कारण हे तुटणारे तारे जेव्हा माणसाने चंद्रावर उड्डाण केले असतांना अडसर बनले नाहीत तेव्हा जिन्नांच्या उड्डाणात कशा प्रकारे अडसर बनू शकतात? आणि जेव्हा मनुष्याची झेप चंद्रापर्यंत होऊ शकते. तेव्हा जिन्नांची झेप त्याहून पुढे का असू शकणार नाही?

## क़ुर्आन आपल्या मूल-स्वरूपात सुरक्षित आहे

मुस्हफे उस्मानी जे. समरकंद मध्ये सुरक्षित आहे.



सुरह बक़रह
आयत ८७, ८८

■ صفحة من مصحف سيدنا عثمان رضي الله عنه ( نسخة سمرقند ) ■

الْقُدُسِ أَفَكُلَّمَا جَاءَكُمْ رَسُولٌ بِمَا لَا تَهْوَىٰ أَنفُسُكُمُ
اسْتَكْبَرْتُمْ فَفَرِيقًا كَذَّبْتُمْ وَفَرِيقًا تَقْتُلُونَ ﴿٨٧﴾ وَقَالُوا قُلُوبُنَا
غُلْفٌ بَل لَّعَنَهُمُ اللَّهُ بِكُفْرِهِمْ فَقَلِيلًا مَّا يُؤْمِنُونَ ﴿٨٨﴾

إِنَّا نَحْنُ نَزَّلْنَا الذِّكْرَ وَإِنَّا لَهُ لَحَافِظُونَ

**निःसंशय ही स्मरणिका आम्ही अवतरीत केली आहे आणि आम्ही स्वतःच त्याचे सरंक्षक आहोत (सूरह अल-हिज्र :९)**

१९. आणि जमीनीला आम्ही पसरविले, तिच्यात पर्वत रोवले आणि तिच्यात प्रत्येक प्रकारच्या वस्तू योग्य प्रमाणात उगविल्या.[१७]

وَالْأَرْضَ مَدَدْنَاهَا وَأَلْقَيْنَا فِيهَا رَوَاسِيَ وَأَنْبَتْنَا فِيهَا
مِنْ كُلِّ شَيْءٍ مَوْزُونٍ ﴿١٩﴾

२०. आणि तिच्यात तुमच्या उदर निर्वाहाची सामुग्री उपलब्ध करुन दिली; तसेच त्यांच्या निर्वाहाची हि, ज्यांना तुम्ही उपजिविका देत नाही.[१८]

وَجَعَلْنَا لَكُمْ فِيهَا مَعَايِشَ وَمَنْ لَسْتُمْ لَهُ بِرَازِقِينَ ﴿٢٠﴾

२१. आशी कोणतीहि वस्तू नाही की जिचे खजीने आमच्या जवळ नसावेत. परंतु आम्ही ती एका निश्चित प्रमाणातच अवतरीत करतो.[१९]

وَإِنْ مِنْ شَيْءٍ إِلَّا عِنْدَنَا خَزَائِنُهُ وَمَا
نُنَزِّلُهُ إِلَّا بِقَدَرٍ مَعْلُومٍ ﴿٢١﴾

२२. आणि आम्ही वाऱ्यांना (पाण्याने) भारदस्त बनवून वाहवितो आणि आकाशातून (वरुन) पाणी वर्षवितो व त्याद्वारे तुम्हाला तृप्त करतो; अन्यथा तुम्ही त्याचा संग्रह करुन ठेवू शकत नाही.[२०]

وَأَرْسَلْنَا الرِّيَاحَ لَوَاقِحَ فَأَنْزَلْنَا مِنَ السَّمَاءِ مَاءً
فَأَسْقَيْنَاكُمُوهُ وَمَا أَنْتُمْ لَهُ بِخَازِنِينَ ﴿٢٢﴾

२३. आणि आम्हीच जीवन आणि मृत्यु देतो आणि आम्हीच सर्वांचे वारस आहोत.[२१]

وَإِنَّا لَنَحْنُ نُحْيِي وَنُمِيتُ وَنَحْنُ الْوَارِثُونَ ﴿٢٣﴾

२४. आम्ही त्यांना देखील जाणतो जे तुमच्या पूर्वी होऊन गेलेत आणि त्यांना देखील जे नंतर येणार आहेत.[२२]

وَلَقَدْ عَلِمْنَا الْمُسْتَقْدِمِينَ مِنْكُمْ
وَلَقَدْ عَلِمْنَا الْمُسْتَأْخِرِينَ ﴿٢٤﴾

२५. आणि निःसंशय तुमच्या पालनकर्ता या सर्वांना एकत्रित करील. तो बुद्धि कोशल्य बाळगणारा व ज्ञानी आहे.[२३]

وَإِنَّ رَبَّكَ هُوَ يَحْشُرُهُمْ إِنَّهُ حَكِيمٌ عَلِيمٌ ﴿٢٥﴾

२६. आणि ही वस्तुस्थिती आहे की आम्ही मनुष्यास सडलेल्या गाऱ्याच्या खणखण वाजणाऱ्या माती पासून निर्माण केले.[२४]

وَلَقَدْ خَلَقْنَا الْإِنْسَانَ مِنْ صَلْصَالٍ
مِنْ حَمَإٍ مَسْنُونٍ ﴿٢٦﴾

२७. आणि या पूर्वी आम्ही जिन्नांना अग्निशिखे द्वारे निर्मिले होते.[२५]

وَالْجَانَّ خَلَقْنَاهُ مِنْ قَبْلُ مِنْ نَارِ السَّمُومِ ﴿٢٧﴾

१७. या निवेदनाने येथे हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की ज्या प्रकारे अल्लाहचे सामर्थ्य,त्याचे बुद्धि कौशल्य व त्याच्या ईशत्वाची चिन्हे आकाशात विखुरलेली आहेत. तद्‌वतच त्याची ही चिन्हे जमीनीवर देखील पसरलेली आहेत. जमीनी पासून वेगवेगळया प्रकारच्या वस्तू निर्माण होतात.परंतु योग्य प्रमाणात जर केवळ धान्यच निर्माण झाले असते तर मनुष्य फळांपासून वंचित राहिला असता आणि जर फळेच निर्माण झाली असती तर मनुष्य धान्याला मुकला असता तथापि हे माणसाच्या निर्मात्याचेच कार्य होय की त्याने जी उपजिविका माणसाला प्रदान केली आहे. त्या अनुषंगाने वस्तु निर्माण केल्या व अशा प्रमाणात निर्माण केल्या ज्या त्याच्या स्वभावधर्मास अपेक्षित होत्या. अल्लाहच्या ईशत्वाचे व बुद्धिकौशल्याचे हे केवढे स्पष्ट चिन्ह आहे.

१८. जमीनीवर चालणारी अगणित जनावरे आणि हवेत उडणारे असंख्य पक्षी असे आहेत ज्यांच्या उपजिविकेची कसलीहि सामुग्री मनुष्य करीत नाही, किंबहुना त्यांचा या सार्वभौमिक अर्थ व्यवस्थेला पाहता अल्लाहच्या ईशत्वाबद्‌ल किंचितहि संशयाला जागा कोठे राहते?

१९. ज्या वेळी जमानीवर मनुष्य-वस्ती अगदी मर्यादित होती. त्या वेळी जमीनीचे उत्पन्न देखील अगदी मर्यादित होते. परंतु आज ज्या अर्थी लोक संख्या अब्जावधी माणसा पर्यंत पोहचली आहे, जमीनीच्या उत्पन्नात हि अत्याधिक वाढ झाली आहे. हे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की अल्लाहजवळ प्रत्येक वस्तूचे खजीने आहे आणि तो एका योजने नुसार वस्तू-निर्मिती करतो. माणसांची एवढी मोठी संख्या, हवा, पाणी, धान्य आणि फळ वगैरेचा ज्या प्रमाणात उपभोग घेत आहेत. तो गणना न करण्याजोगा आहे, तथापि त्यामुळे अल्लाहच्या खजीन्यांमध्ये कसलीहि कमतरात होत नाही.

२०. सर्वश्रेष्ठ आल्लाह वाऱ्यांना वाहविती,जे ढगांनी भारयुक्त असतात. मग या ढगांपासून पर्जन्य वृष्टि होते ज्याने लोक तृप्त होतात.पर्जन्य व्यवस्थेने माणसाकरीता पाण्याची उपलब्धता कशा रीतीने सोपी केली आहे, अन्यथा हे माणसाच्या अवाक्यात नव्हते की पाण्याचे असे साठे जमा करुन ठेवावेत जे आयुष्यभर त्याला उपयोगी पडावेत.

२१. मनुष्य जेव्हा या जगाचा निरोप घेतो तेव्हा त्याचे नातेवाईक त्याचे वारस बनतात परंतु सांसारीक दृष्टीने, कारण त्यांचे उत्तराधिकारी होणे अल्लाहच्या मर्जीवर अवलंबून असते म्हणून खरे पाहता अल्लाहच त्या धनसंपदेचा उत्तराधिकारी असतो. आणि याहून स्पष्ट हकीगत अशी की जेव्हा कियामतीचा बिगुल वाजेल व समस्त मानव या दुनियेचा निरोप घेतील तेव्हा मानव-जातीची सर्व जमीन जायदाद व सर्व साधन सामुग्री अल्लाच्याच ताब्यात येईल.

२२. म्हणजे अल्लाहकरीता हे काहीच कठीन नाही की कियामती पर्यंत निर्माण होणाऱ्या माणसांचा हिशेब चुकता करावा. यासाठी की जे लोक मरण पावलेत त्यांचेहि ज्ञान अल्लाह ला आहे व नंतर येणाऱ्या लोकांनाहि तो जाणतो. वर्तमान, भूत व भविष्य या तिन्ही काळापैकी कोणत्याहि काळाचा मनुष्य असो, अल्लाहचे ज्ञान सर्वांना व्यापून आहे आणि अल्लाहकडून कदापि भूलचूक होत नाही.

२३. म्हणजे त्याचा गुणविशेष असलेल्या बुद्धिकौशल्याची ही निकड आहे की एक दिवस सर्वांना आपल्या समोर एकत्रित करावे. आणि जेव्हा तो ज्ञानी आहे तर माणसाच्या आचरण विषयी तो अनभिज्ञ असणे शक्य नाही.

२४. माणसाचा आरंभ या जमीनीवर कशा प्रकारे झाला? हा अगदी महत्वाचा प्रश्न आहे. ज्याचा संबंध ना केवळ ऐतिहासिक घटनांशी आहे, किंबहुना त्याचा स्वत:च्या आस्तित्वाच्या वस्तुस्थितीशीहि आहे आणि मनुष्याकरिता आपल्या आस्तित्वाच्या हकीगतीशी जाणकार असणे आवश्यक आहे, अशासाठी की, संपूर्ण प्रकाशात जीवन यात्रा पार पाडणे त्याला शक्य व्हावे. क़ुरआनाने या प्रश्नाचे येथे आणि अन्य इतर स्थानांवर स्पष्ट उत्तर दिले आहे. या आयतीत मनुष्य निर्मिती संबंधी जी गोष्ट सांगितली आहे त्यावरून पुढील हकीगती स्पष्ट होतात.

प्रथम हे की मनुष्य योगायोगाने घडणारी घटना म्हणून आपोआप अस्तित्वात आला नाही, किंबहुना सृष्टीच्या निर्मात्याने आपल्या बुद्धि कौशल्य युक्त योजने नुसार त्याला निर्माण केले आहे.

दुसरे असे की माणसाची निर्मिती माती द्वारे झाली आहे. आणि त्याचा तपशील असा की सडलेल्या मातीपासून माणसाचे शरीर बनविले गेले आहे. मग जेव्हा तो सुकून खणखणणाऱ्या मातीचा पुतळा बनला तेव्हा त्याच्यात प्राण ओतला गेला.

तिसरे असे की सडक्या कुजक्या मातीपासून एक उत्कृष्ट निर्मिती हे निर्मात्याच्या सामर्थ्य प्रतापाचे चिन्ह व त्याच्या अप्रतिम चमत्काराचे प्रमाण आहे. त्याने इच्छा बाळगल्यास कुणालाहि सूर्यांचे स्वरूप प्राप्त होईल.

चौथे हे की माणसाची निर्मिती जेव्हा सडलेल्या मातीसारख्या तुच्छ वस्तू पासून झाली आहे तेव्हा त्याला गर्व शोभा देत नाही. ईश्वर समोर त्याचे स्थान दासाचे व आज्ञाधारकाचे आहे.कारण तो एक निर्मिती मात्र आहे, निर्माता नव्हे- दास आहे ईश्वर नव्हे.

या वास्तविक गोष्टी डार्विनच्या या सिद्धांताचे खंडन करतात की मनुष्य निर्मिती माकडापासून झाली आहे. सत्य घटना अशी की या सिद्धान्ताच्या समर्थनार्थ कसलाहि ज्ञानविषयक पुरावा उपलब्ध नाही. किंबहुना ही केवळ कयासावर आधारीत गोष्ट आहे आणि निर्मात्याचे निवेदन असताना ईश-निर्मितीचे कयास (अनुमाना) ने काम घेणे असत्य व मार्गभ्रष्टता आहे मग ही ईश-

निर्मिती कितीहि मोठी विद्वान वा विचारवंत का असेना. जेव्हा माणसाच्या निर्मात्यो स्पष्ट पणे दर्शाविले आहे की माणसाला त्याने मातीपासून निर्माण केले आहे; तर त्यास महत्व न द्यावे. आणि एका तत्वतेत्त्याच्या या मताने की माणसाची निर्मिती माकडा पासून झाली आहे. प्रभावित होणे उघडपणे मूर्खता पूर्ण गोष्ट होय. जी माकडालाच शोभून दिसते. माणसाला नव्हे.

स्पष्ट असावे की तौरात मध्येहि ही हकीगत वर्णिली गेली आहे. माणसाची निर्मिती मातीपासून झाली आहे:-

''मग परमेश्वर देवाने जमीनीतील मातीचा मनुष्य घडिला व त्याच्या नाकपुड्यांत जीवनाचा श्वास फुकिला; तेव्हां मनुष्य जीवधारी प्राणी झाला.'' (उतपत्ती २:७)

म्हणजे माणसाच्या निर्मिती बाबत तौरात चे निवेदन क़ुरआनच्या निवेदानाशी सुसंगत आहे तथापि क़ुरआनाने अधिक स्पष्टीकरण केले आहे की माती कशा प्रकारची होती व तिला कशा प्रकारे मनुष्य रुप दिले गेले.

२५. ज्या प्रमाणे उपरोक्त आयतीत 'अल इन्सान' शी अभिप्रेत पहिला मानव आहे ज्यास मातीपासून निर्माण केले गेले, व नंतर त्यापासून मानव-क्रम चालता राहीला. तद्वतच या आयतीत 'अल् -जान' शी अभिप्रेत पहिला जिन्न होय ज्यास अग्निशिखे पासून निर्माण केले गेले व नंतर त्यापासून जिन्नांचा क्रम चालला 'जिन्न' चा शाब्दिक अर्थ आहे. लपलेली निर्मिती ज्या अर्थी जिन्नांना सूक्ष्म तत्वा द्वारे निर्मिले गेले आहे म्हणून ते दृष्टीस पडत नाही. तथापि सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या ह्या निर्मितीची खबर आम्हाला देऊन केवळ आमच्या ज्ञानातच वाढ केली नाही, तर आम्हाला आपल्या सुप्त शत्रू (इब्लीस) विषयीहि सावध केले आहे. ज्याचा संबंध जिन्न समूहाशी आहे.

जिन्न आमच्या दृष्टीस पडत नाही म्हणून त्यांच्या आस्तित्वास नकार दर्शविणे उचित नाही. जेव्हा त्यांच्या अस्तित्वा विषयीची खबर आम्हाला त्यांचा व आमचा पालनकर्ता देत आहे. जगात अशा अनेक गोष्टी आहेत ज्यांना मनुष्य सूक्ष्म दर्शक यंत्र वा दूर दर्शक यंत्राचा शोध लावण्यापूर्वी जाणत देखील नव्हता. उदाहरणार्थ तो हे जाणत नव्हता की 'जंतू' हि एखादी सृष्ट निर्मिती आहे. जी मानव-शरीरात प्रवेश करुन त्याच्या आजारपणाला कारणीभूत ठरते.

स्पष्ट असावे की जिन्नांच्या निर्मिती विषयी. एखादे स्पष्टीकरण तौरात मध्ये नाही. किंबहुना पवित्र क़ुरआन ने याविषयी स्पष्टीकरण करुन मानव-ज्ञानात भर घातली आहे. यामुळे विरोधकांच्या ह्या आरोपाचेहि खंडन होते की क़ुरआन तौरातची नक्कल आहे.

**आणि जेव्हा तुमच्या पालनकर्त्याने फिरिशत्यांना म्हटले की मी सडलेल्या गाऱ्याच्या खणखण वाजणाऱ्या माती पासून एक मनुष्य निर्माण करणार आहे.(अल-क़ुर्आन)**

२८. आणि जेव्हा तुमच्या पालनकर्त्याने फिरिशत्यांना म्हटले की मी सडलेल्या गाऱ्याच्या खणखण वाजणाऱ्या माती पासून एक मनुष्य निर्माण करणार आहे.

وَإِذْ قَالَ رَبُّكَ لِلْمَلَٰٓئِكَةِ إِنِّى خَٰلِقٌۢ بَشَرًا مِّن
صَلْصَٰلٍ مِّنْ حَمَإٍ مَّسْنُونٍ ﴿٢٨﴾

२९. तर जेव्हा मी त्याला यथा योग्य बनवीन [२६] व त्यात आपला आत्मा फूंकीन [२७] तेव्हा तुम्ही त्याच्या पुढे सजद्यात पडावे.

فَإِذَا سَوَّيْتُهُۥ وَنَفَخْتُ فِيهِ مِن رُّوحِى
فَقَعُوا۟ لَهُۥ سَٰجِدِينَ ﴿٢٩﴾

३०. यास्तव सर्वच्या सर्व फिरिश्ते सजदा अवस्थेत पडले. [२८]

فَسَجَدَ ٱلْمَلَٰٓئِكَةُ كُلُّهُمْ أَجْمَعُونَ ﴿٣٠﴾

३१. इबलीस शिवाय,[२९] कारण त्याने सजदा करणाऱ्यांची साथ देण्यास इन्कार केला.

إِلَّآ إِبْلِيسَ أَبَىٰٓ أَن يَكُونَ مَعَ ٱلسَّٰجِدِينَ ﴿٣١﴾

३२. विचारले, हे इबलीस ! तुला झाले तरी काय की तू सजदा करणाऱ्यांना साथ दिली नाहीस.

قَالَ يَٰٓإِبْلِيسُ مَا لَكَ أَلَّا تَكُونَ مَعَ ٱلسَّٰجِدِينَ ﴿٣٢﴾

३३. तो म्हणाला, हे माझ्याकडून होणे शक्य नाही की एखाद्या अशा मानवास सजदा करावा ज्याला तू सडक्या-कुजक्या गाऱ्यांच्या खणखण वाजणाऱ्या माती पासून निर्माण केले आहे. [३०]

قَالَ لَمْ أَكُن لِّأَسْجُدَ لِبَشَرٍ خَلَقْتَهُۥ مِن صَلْصَٰلٍ
مِّنْ حَمَإٍ مَّسْنُونٍ ﴿٣٣﴾

३४. हुकुम झाला, जा चालता हो येथून कारण तू बहिष्कृत (रद्द केलेला) आहेस. [३१]

قَالَ فَٱخْرُجْ مِنْهَا فَإِنَّكَ رَجِيمٌ ﴿٣٤﴾

३५. आणि मोबदल्याच्या दिवस पावेतो तुझ्यावर शाप आहे .[३२]

وَإِنَّ عَلَيْكَ ٱللَّعْنَةَ إِلَىٰ يَوْمِ ٱلدِّينِ ﴿٣٥﴾

३६. तो म्हणाला, तू मला त्या दिवसा पावेतो संधी दे जेव्हा लोकांना (मरणोत्तर) उठविले जाईल.

قَالَ رَبِّ فَأَنظِرْنِىٓ إِلَىٰ يَوْمِ يُبْعَثُونَ ﴿٣٦﴾

३७. फर्माविले, तुळा तशी संधी दिली गेली.[३३]

قَالَ فَإِنَّكَ مِنَ ٱلْمُنظَرِينَ ﴿٣٧﴾

२६. म्हणजे याला मनुष्य-स्वरुपात घडवीन व त्याची रचना परिपूर्ण करीन.

२७. ह्या आयाती मानव-आस्तित्व संबंधाने अत्यंत महत्वपूर्ण वस्तुस्थिती वर्णिली गेली आहे. अर्थात हे की मानवाचे आस्तित्व केवळ भौतिक नव्हे किंबहुना भौतिकता आणि आत्म्याचे मिश्रण आहे. हा आत्मा एक सूक्ष्म रत्न आहे जे ज्ञान, बुद्धि, वाक्‌शक्ती आणि चांगल्या वाईटातील तारतम्य या सारख्या गुणांनी परिपूर्ण आहे, आणि ह्या वैशिष्ट्या मुळेच मनुष्य सर्वोत्कृष्ट ईश-निर्मिती ठरला आहे. हा जणू आतला मानव आहे जो पाहतो, ऐकतो, बोलतो आणि कृती करतो. डोळे, कान जिव्हा आणि मेंदूची पात्रता केवळ उपकरण व साधनांची आहे, व जोपर्यंत मनुष्य आपल्या ह्या वास्तवतेशी परिचित होत नाही तोपर्यंत आपल्या अस्तित्वाच्या उद्दीष्टा प्रत पोहचू शकत नाही. भौतिकवादी लोक, ज्यांच्या नजरेत मनुष्य हाडा-मांसा पेक्षा अधिक वस्तुस्थिती बाळगत नाही. माणसाला त्याच्या स्थानापासून अध:पतित करतात, मग तो केवळ 'सामजिक प्राणी' बनून राहतो.

स्पष्ट असावे की आयतीत हे जे फर्माविले गेले आहे की, 'त्यात आत्मा फूकेन' तर यात आत्म्याचा संबंध सर्वश्रेष्ठ अल्लाह कडे त्याचे सान्निध्य स्पष्ट करण्या करीता आहे. याचा हा अर्थ मुळीच नव्हे की ईशत्वाचा एखादा अंश माणसात समाविष्ट झाला आहे की एखादी वस्तू वा गोष्टी त्याच्या पासून अलग व्हावी. किंवा त्याचा एखादा अंश एखाद्याच्या अंगी असावा. तो एकमेव आहे ज्याचा ना एखादा अंश असू शकतो ना एखादी वस्तू वा गोष्ट त्याच्यासमान असू शकते. (पहा सूरह ईखलास) क़ुरआनात ज्याप्रमाणे काबा गृहाचा संबंध सर्वश्रेष्ठ अल्लाहकडे त्याच्या श्रेष्ठते मुळे दर्शविला गेला आहे. ज्याचा असा अर्थ नव्हे की सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या घरात बंदीस्त आहे. तद्‌वतच इथे आत्म्याचा संबंध अल्लाहकडे त्याच्या श्रेष्ठता व प्रतिष्ठे मुळे दर्शविला गेला आहे. एखाद्या आयतीचा खरा अर्थ समजून घेण्याकरीता संभाषण प्रसंगासहि दृष्टीपथात राखणे अगत्याचे आहे आणि त्या मूलभूत सत्यांना व शिकवणीनाहि ज्यांना कुरआनने स्पष्टीकरणे प्रस्तुत केले आहे.

२८. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र.४७ मध्ये केले गेले आहे.

२९. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ४८ मध्ये केले गेले आहे.

३०. या प्रसंगी सूरह अअराफ टीप क्र १६ विचाराधीन आहे.

३१. पहा सूरह अअराफ टीप क्र. १७.

३२. म्हणजे कियामती पर्यंत तर मांगल्य व ईश-कृपे पासून वंचित आहेत आणि कियामतीचा दिवस तर निर्णयाचा व मोबदल्याचा दिवस असेल.

३३. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. १८ मध्ये केले गेले आहे.

३८. त्या दिवसा पावेतो ज्याची वेळ निश्चित ठरलेली आहे .[३४]

إِلَىٰ يَوْمِ الْوَقْتِ الْمَعْلُومِ ﴿٣٨﴾

३९. तो म्हणाला, हे माझ्या पालनकर्त्या!ज्या अर्थी तू मला बहकविले आहेस [३५] म्हणून मी जमीनीवर त्यांच्या करीता मन मोहकता निर्माण करीन व त्या सर्वांना बहकावीन.[३६]

قَالَ رَبِّ بِمَا أَغْوَيْتَنِي لَأُزَيِّنَنَّ لَهُمْ فِي
الْأَرْضِ وَلَأُغْوِيَنَّهُمْ أَجْمَعِينَ ﴿٣٩﴾

४०. मात्र तुझ्या त्या दासा खेरीज ज्यांना तू यांच्यामधून विशिष्ट करुन घेतले असेल.[३७]

إِلَّا عِبَادَكَ مِنْهُمُ الْمُخْلَصِينَ ﴿٤٠﴾

४१. फर्माविले, हा सरळ मार्ग आहे जो मजपावेतो पोहचतो. [३८]

قَالَ هَٰذَا صِرَاطٌ عَلَيَّ مُسْتَقِيمٌ ﴿٤١﴾

४२. खरोखर जे माझे दास आहेत त्यांच्यावर तुझा काहिहि जोर चालणार नाही [३९] केवळ त्या बहकलेल्या लोकांवरच चालेल जे तुझे अनुसरण करतील.[४०]

إِنَّ عِبَادِي لَيْسَ لَكَ عَلَيْهِمْ سُلْطَانٌ
إِلَّا مَنِ اتَّبَعَكَ مِنَ الْغَاوِينَ ﴿٤٢﴾

४३. आणि त्या सर्वांकरीता जहन्नम चा वायदा आहे.[४१]

وَإِنَّ جَهَنَّمَ لَمَوْعِدُهُمْ أَجْمَعِينَ ﴿٤٣﴾

४४. त्याचे सात दरवाजे आहेत. प्रत्येक दरवाज्या करीता त्यांचा एक भाग विशेषत्वाने असेल. [४२]

لَهَا سَبْعَةُ أَبْوَابٍ لِكُلِّ بَابٍ مِنْهُمْ جُزْءٌ مَقْسُومٌ ﴿٤٤﴾

४५. नि:संशय ईश भय बाळगणारे लोक [४३] बागांमध्ये व झऱ्यां मध्ये असतील.

إِنَّ الْمُتَّقِينَ فِي جَنَّاتٍ وَعُيُونٍ ﴿٤٥﴾

४६. दाखल व्हा त्यांच्यात शांतीपूर्वक व निर्भय होऊन. [४४]

ادْخُلُوهَا بِسَلَامٍ آمِنِينَ ﴿٤٦﴾

४७. त्यांच्या हृदयांमध्ये जी मलिनता असेल ती आम्ही काढून टाकू [४५] (आपसात) भाऊ-भाऊ बनून ते एकमेकां समोर सिंहासनांवर बसलेले असतील.

وَنَزَعْنَا مَا فِي صُدُورِهِمْ مِنْ غِلٍّ إِخْوَانًا عَلَىٰ
سُرُرٍ مُتَقَابِلِينَ ﴿٤٧﴾

३४. म्हणजे कियामती पावेतो.

३५. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. १९ मध्ये केले गेले आहे.

३६. अर्थात जगाला त्यांच्या नजरेत अशा प्रकारे मनोवेधक बनवून प्रस्तुत करीन की ते अल्लाह व आखिरतला विसरतील व त्यांना आमीष दाखवीन जेणे करून त्यांनी माझ्या मागून चालू लागावे.

३७. अर्थात माझा प्रभाव तुझ्या त्या दासांवर होऊ शकणार नाही. ज्यांना तू स्वत:साठी विशिष्ट करुन घेतले आहेस. अल्लाहचे एखाद्या दासास विशिष्ट करुन घेण्याचा अर्थ असा की अल्लाहने प्रदान केलेल्या सुबुद्धिने तो केवळ अल्लाहचाच दास बनून राहिला आणि ही सुबुद्धि केवळ अशाच लोकांना लाभते जे स्वत:ला त्यास पात्र बनवितात.

३८.'हा सरळ मार्ग'शी अभिप्रेत अल्लाहच्या विशिष्ट व मान्यवर दासांचा मार्ग होय.जसे यापूर्वीच्या व नंतरच्या आयतीद्वारे स्पष्ट आहे. आणि सूरह फातेहा मध्ये यास

صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ

''त्यांचा मार्ग, ज्यांना तू तुझ्या इनामाने उपकृत केले आहेस'च्या अर्थाने घेतले आहे. हा एकेश्वरवादाचा आणि अल्लाहच्या उपासना व आज्ञा पालनाचा मार्ग आहे. ज्याचे नाव 'इस्लाम' आहे.

ह्या मार्गाचे अल्लाहप्रत पोहचण्याचा अर्थ असा की या मार्गाचे अनुसरण करुन मनुष्य अल्लाहला प्राप्त करतो आणि दुसरा कोणताहि मार्ग नाही ज्याचे अनुसरण करुन माणसाला अल्लाहला प्राप्त करणे शक्य व्हावे.

३९. अर्थात जे माझे दास बनून राहतील त्यांना तू जबरदस्तीपूर्वक आपल्या मार्गावर चालवू शकत नाही. स्पष्ट झाले की सैतानाचे काम दुष्कृत्या विषयी केवळ प्रोत्साहन देणे होय. मनुष्य जर सदाचारी बनू इच्छित असेल तर सैतान त्यास बलपूर्वक वाम मार्गाला लावू शकत नाही.

४०. म्हणजे तुझ्या भुरळीस केवळ तेच लोक बळी पडतील जे बहकलेले असतील म्हणजे ज्यांनी स्वत:ला इच्छा अभिलाषांच्या हवाली केले असावे व ज्यांनी तुझे अनुसरण पत्करले असावे. ''ग़वा'' غوى बहकण्याचा अर्थ इच्छा-अभिलाषांचे अनुसरण करणे व अज्ञान ग्रस्त होणे होय. ज्याचे दुसरे नाव 'मार्गभ्रष्टता' आहे.

४१ मग त्यांची संख्या कितिहि जास्त का असेना.

४२. मार्गभ्रष्टता व अपराध वेगवेगळया प्रकारचे असतात. उदा. नास्तिकता, शिर्क (अनेकेश्वरवाद) दंभ, हत्त्या, व्यभिचार इत्यादि म्हणून शिक्षा देखील वेगवेगळया प्रकारची असेल. आयतीचा संकेत या गोष्टीकडे आहे की जहन्नमचे सात दरवाजे शिक्षा स्वरुप म्हणून आहेत. कियामतीच्या दिवशी अपराधींच्या मार्गभ्रष्टता व अपराधांना पाहून त्यांचे गट पाडले जातील व जो गट ज्या शिक्षेस पात्र असेल त्याला अनुरुप अशा दरवाज्यातून जहन्नम मध्ये तो दाखल होईल.

४३. वरील आयती वरुन स्पष्ट आहे की येथे ईश-भय बाळगणाऱ्यांशी अभिप्रेत ते लोक होत जे अल्लाहचे भय बाळगून सैतानाच्या अनुसरणा पासून दूर राहतील व अल्लाहचे दास्यत्व आणि आज्ञा पालनाचा मार्ग अंगिकारतील.

४४. अर्थात कियामतीच्या दिवशी ईश-भय बाळगणाऱ्यांना म्हटले जाईल की जन्नतच्या बागांमध्ये ज्यात झरे वाहत असतील दाखल व्हा. 'शांतीपूर्वक' म्हणजे प्रत्येक प्रकारच्या संकटा पासून सुरक्षित आणि 'निर्भय होऊन' म्हणजे, भावी काळा कडून निश्चित होऊन की ह्या ईश-देणग्या तुमच्या कडून कधीहि हिरावून घेतल्या जाणार नाहीत. किंबहुना सदैव तुम्ही शांती व समाधानाने राहाल.

४५. म्हणजे त्यांच्या अंत:करणांना स्वच्छ शुद्ध केले गेले असेल. जन्नतच्या वातावरणात एखाद्या विरुद्ध कपट, तिरस्कार, मत्सर सारखी कोणतीहि गोष्ट तयांच्या मनात नसेल. जगात आपसात जे वैमनस्य राहिले असेल त्यापासून त्यांची मने अगदी स्वच्छ केली गेली असतील. म्हणून ते प्रेम व प्रामाणिक भावनेसह एक मेकांशी अशा प्रकारे भेटतील की जणू दूधात साखर !

४८. तिथे ना त्यांना एखादा त्रास जाणवेल [४६] आणि ना त्यांना तिथून बाहेर घालविले जाईल.

لَا يَمَسُّهُمْ فِيهَا نَصَبٌ وَّمَا هُمْ مِّنْهَا بِمُخْرَجِيْنَ ﴿٤٨﴾

४९. माझ्या दासांना सचेत करा [४७] की मी माफ करणारा, दया करणारा आहे.

نَبِّئْ عِبَادِيْٓ أَنِّيْٓ أَنَا الْغَفُوْرُ الرَّحِيْمُ ﴿٤٩﴾

५०. आणि हे हि की माझी शिक्षा मोठी दुःख दायक शिक्षा आहे.[४८]

وَأَنَّ عَذَابِيْ هُوَ الْعَذَابُ الْأَلِيْمُ ﴿٥٠﴾

५१. आणि त्यांना इब्राहीमच्या अतिथींचा वृत्तांत ऐकवा.[४९]

وَنَبِّئْهُمْ عَنْ ضَيْفِ إِبْرٰهِيْمَ ﴿٥١﴾

५२. जेव्हा ते [५०] त्याच्या जवळ आले तेव्हा म्हणाले, सलाम (शांती) असो तुम्हावर.[५१] तो म्हणाला, मला तुम्हा लोकां पासून भय वाटते.[५२]

إِذْ دَخَلُوْا عَلَيْهِ فَقَالُوْا سَلٰمًا قَالَ إِنَّا مِنْكُمْ وَجِلُوْنَ ﴿٥٢﴾

५३. ते म्हणाले, तुम्ही भय वाटून घेऊ नका. आम्ही तुम्हाला एका ज्ञानी पुत्राची शुभसूचना देतो.[५३]

قَالُوْا لَا تَوْجَلْ إِنَّا نُبَشِّرُكَ بِغُلٰمٍ عَلِيْمٍ ﴿٥٣﴾

५४. तो म्हणाला, काय तुम्ही मला ह्या म्हातारपणात ही शुभ-सूचना देत आहात, तर ही कशी शुभ सूचना आहे?[५४]

قَالَ أَبَشَّرْتُمُوْنِيْ عَلٰٓى أَنْ مَّسَّنِيَ الْكِبَرُ فَبِمَ تُبَشِّرُوْنَ ﴿٥٤﴾

५५. ते म्हणाले, आम्ही तुम्हाला सत्यतेसह शुभ-सूचना दिली आहे तेव्हा तुम्ही निराश होऊ नका.

قَالُوْا بَشَّرْنٰكَ بِالْحَقِّ فَلَا تَكُنْ مِّنَ الْقٰنِطِيْنَ ﴿٥٥﴾

५६. तो म्हणाला, आपल्या पालनकर्त्याच्या कृपेपासून मार्गभ्रष्ट लोकांखेरीज आणखी कोण निराश होऊ शकतो ?[५५]

قَالَ وَمَنْ يَّقْنَطُ مِنْ رَّحْمَةِ رَبِّهٖٓ إِلَّا الضَّآلُّوْنَ ﴿٥٦﴾

५७. त्याने विचारले, हे ईश-दूतांनो ! कोणत्या मोहीमे निमित तुमचे आगमन झाले आहे ?[५६]

قَالَ فَمَا خَطْبُكُمْ أَيُّهَا الْمُرْسَلُوْنَ ﴿٥٧﴾

५८. ते म्हणाले, आम्हाला एका अपराधी जन-समूहाकडे पाठविले गेले आहे. [५७]

قَالُوْٓا إِنَّآ أُرْسِلْنَآ إِلٰى قَوْمٍ مُّجْرِمِيْنَ ﴿٥٨﴾

४६. म्हणजे जन्नतचे जीवन ऐहिक जीवनापेक्षा अगदी भिन्न असेल. तिथे ना कष्ट,त्रास भोगावा लागेल ना शीण येईल आणि ना गांजल्या सारखे वाटेल. हदीस मधील एका उल्लेखानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्मावले.

يُنَادِیْ مُنَادٍ اِنَّ لَکُمْ اَنْ تَصِحُّوْا فَلَا تَسْتَقَمُوْا اَبَدًا وَاِنَّ لَکُمْ اَن تَحْیُوْا فَلَا تمُوتُوا اَبدًا و اِنَّ لَکُمْ اَنْ تَشَبُّوْ فَلَا تَھْرَمُوْا اَبَدًا وَ اِنَّ لَکُمْ اَنْ تَنْعِمُوْ فَلَا تَبَاسُوْا اَبَدًا۔ (مسلم کتاب احوال القیامۃ)

''एक पुकारणारा पुकारेल की आता तुम्ही निरोगी राहाल, कधीहि आजारी पडणार नाहीत. आणि जिवंत राहल, तुम्हाला कधी मरण येणार नाही. आणि तरुण राहाल तुम्हाला कधी म्हातारपण येणार नाही आणि ऐषआरामात राहाल, तुम्हाला कधी त्रास होणार नाही.''
(मुस्लिम किताब अहवालुल क़ियामह)

४७. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना उद्देशून आहे.

४८. अर्थात माझे दास माझ्या क्षमाशीलतेचे व कृपेचे जसे स्मरण बाळगतात. तसेच त्यांनी हे हि ध्यानात ठेवावे की माझी शिक्षा मोठी दु:खदायक असते. या दोन्ही गोष्टीचे स्मरण बाळगल्यानेच आशा आणि भयासह जीवन व्यतीत केले जाऊ शकते. या उलट जे लोक अल्लाहच्या शिक्षेश दृष्टीआड करतात ते अपराधा वर अपराध करीत जातात आणि भ्रामिक अभिलाषांवर भरवसा करतात.

४९. हा वृत्तांत सूरह हूद आयत क्र. ६९ ते ७५ मध्ये निवेदिला गेला आहे. या प्रसंगी उल्लेखित आयती व त्यांच्या स्पष्टीकरणात्मक टीपा दृष्टीसमोर असाव्यात.

५०. हे फिरिश्ते होते जे मनुष्य स्वरुपात हजरत इब्राहीम जवळ आले होते.

५१. याचे स्पष्टीकरण सूरह हूद टीप क्र. ९७ मध्ये केले गेले आहे.

५२. याचे स्पष्टीकरण सूरह हूद टीप क्र.९९ मध्ये केले गेले आहे.

५३. ही शुभ वार्ता हजरत इसहाक यांच्या जन्माविषयी होती आणि अधिक शुभ वार्ता या गोष्टी विषयी होती की हा पुत्र बुद्धिमान असेल. तात्पर्य हा इशारा या गोष्टीकडे होता की हा पुत्र प्रेषित ज्ञानाने आभुषित होईल. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. १०१.

५४. ज्याअर्थी हजरत इब्राहीम त्यावेळी म्हातार वयाप्रत पोहचले होते. म्हणून त्यांना पुत्र-जन्माची शुभवार्ता ऐकून आश्चर्य वाटले.

५५. स्पष्ट झाले की अल्लाहच्या कृपेपासून निराश होणे मार्गभ्रष्टता आहे. ईमान बाळगणारा नेहमी अल्लाहशी कृपाभिलाषी राहतो आणि त्याच्या कृपा व मेहरबानी पासून कधीहि निराश होत नाही.

५६. फिरिश्त्यांचे अशा प्रकारे मनुष्य स्वरूपात येणे एखादी कसोटी वा एखाद्या असामान्य उद्दिष्टाकरिताच असू शकत होते. यास्तव हजरत इब्राहीम यांनी हा प्रश्न विचारला की ते महत्वपूर्ण कार्य कोणते ज्यासाठी तुम्हाला पाठविले गेले आहे.

५७. अर्थात लूत जन-समूहाकडे आम्हाला पाठविले गेले आहे. जो एक अपराधी जन समूह आहे. या जन समूहाचा विशेष अपराध म्हणजे पुरूषाचा पुरूषाशी लैंगिक संबंध कायम राखणे होय.

सूरह अअराफ आयत क्र. ८० ते ८४ मध्ये हजरत लूत यांचा वृत्तांत निवेदिला गेला आहे तसेस सूरह हूद आयत क्र, ७७ ते ८३ मध्ये हा वृत्तांत निवेदिला गेला आहे. या प्रसंगी उल्लिखित आयती व त्यांच्या स्पष्टीकरणात्मक टीपा दृष्टीसमोर असाव्यात.

إِلَّا آلَ لُوطٍ إِنَّا لَمُنَجُّوهُمْ أَجْمَعِينَ ٥٩

५९. तथापि लूतचे कुटुंबीय आम्ही त्या सर्वांना वाचवून घेऊ.[५८]

إِلَّا امْرَأَتَهُ قَدَّرْنَا إِنَّهَا لَمِنَ الْغَابِرِينَ ٦٠

६०. त्याच्या पत्नी व्यतिरिक्त,[५९] आम्ही निर्धारीत केले [६०] आहे की ती मागे राहणाऱ्यांपैकी होईल.[६१]

فَلَمَّا جَاءَ آلَ لُوطٍ الْمُرْسَلُونَ ٦١

६१. मग जेव्हा हे दूत लूतच्या कुटुंबियांजवळ पोहचले.

قَالَ إِنَّكُمْ قَوْمٌ مُنْكَرُونَ ٦٢

६२. तेव्हा तो म्हणाला, तुम्ही अनोळखी माणसे वाटता.[६२]

قَالُوا بَلْ جِئْنَاكَ بِمَا كَانُوا فِيهِ يَمْتَرُونَ ٦٣

६३. ते म्हणाले, नव्हे किंबहुना आम्ही तुमच्याजवळ तीच गोष्ट घेऊन आलो आहोत ज्या बाबतीत हे लोक संशय करीत होते.[६३]

وَأَتَيْنَاكَ بِالْحَقِّ وَإِنَّا لَصَادِقُونَ ٦٤

६४. आम्ही तुमच्या जवळ सत्य घेऊन आलो आहोत आणि आम्ही आपल्या निवेदनात अगदी सच्चे आहोत.

فَأَسْرِ بِأَهْلِكَ بِقِطْعٍ مِنَ اللَّيْلِ وَاتَّبِعْ أَدْبَارَهُمْ
وَلَا يَلْتَفِتْ مِنْكُمْ أَحَدٌ وَامْضُوا حَيْثُ تُؤْمَرُونَ ٦٥

६५. यास्तव तुम्ही रात्रीचा काही अवधि उरला असतांना आपल्या कुटुंबियांसह (वस्ती बाहेर) निघून जावे व स्वतः त्यांच्या मागोमाग चालावे [६४]आणि तुमच्या पैकी कोणीहि मागे वळूनहि पाहू नये [६५] आणि निघून जा, जिकडे जाण्याचा तुम्हाला आदेश दिला गेला आहे.

وَقَضَيْنَا إِلَيْهِ ذَٰلِكَ الْأَمْرَ أَنَّ دَابِرَ هَٰؤُلَاءِ
مَقْطُوعٌ مُصْبِحِينَ ٦٦

६६. आणि अम्ही या निर्णयाविषयी त्यास सचेत केले की प्रातःकाळ होताच या लोकांचा मूलच्छेद केला जाईल. [६६]

وَجَاءَ أَهْلُ الْمَدِينَةِ يَسْتَبْشِرُونَ ٦٧

६७. आणि नगरातील लोक आनंदविभोर होऊन येऊन पोहचले. [६७]

قَالَ إِنَّ هَٰؤُلَاءِ ضَيْفِي فَلَا تَفْضَحُونِ ٦٨

६८. तो म्हणाला हे माझे अतिथी आहेत [६८] तेव्हा तुम्ही माझी फजिती करु नका. [६९]

५८. म्हणजे हजरत लूत यांचे कुटुंबीय ईमान बाळगणारे आहेत. आणि ते अपराधी नाहीत म्हणून त्यांना त्या ईश-शिक्षेपासून वाचविले जाईल जी लूत जनसमूहावर अवतरीत होणार आहे.

५९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र.१३२ तसेच सूरह हूद टीप क्र.११७.

६०. हे फिरिश्त्यांचे स्वत:चे कथन नव्हे किंबहुना सर्वश्रेष्ठ अल्लाहचे कथन आहे जे फिरिश्त्यांच्या मुखाद्वारे अदा झाले आहे.यास्तव सूरह नमल आयत क्र.५७ मध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहचे कथन म्हणून निवेदन केली गेली आहे.

فَاَنۡجَيۡنٰهُ وَاَهۡلَهٗۤ اِلَّا امۡرَاَتَهٗ قَدَّرۡنٰهَا مِنَ الۡغٰبِرِيۡنَ۔

''आम्ही त्याला व त्याच्या कुटुंबीयांना वाचविले, त्याच्या पत्नीला सोडून, कारण आम्ही निधारीत केले होते की ती मागे राहणाऱ्यांपैकी असेल''

६१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप क्र. ११७

६२. फिरिश्ते हजरत लूतजवळ मानव स्वरूपात आले होते आणि क़ुरआनच्या निवेदनावरून असे दिसून येते की ते रुपवान मुलांच्या रुपात होते. म्हणून हजरत लूत यांना असे वाटले की हे अनोळखी लोक आहेत जे दुसऱ्या प्रदेशातून इथे आले आहेत आणि माझ्याकडे अतिथी म्हणून राहू इच्छितात. ज्याअर्थी जन समूहाची कसोटी घेण्याचा हेतू होता म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने फिरिश्त्यांना या स्वरूपात पाठविले व योजनेच्या अनुषंगाने फिरिश्त्यांनी सुरवातीस आपण फिरिश्ते असल्याचे हजरत लूत यांना कळू दिले नाही.

६३. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे शिक्षा यातना घेऊन आलो आहोत जिच्या आगमनाबद्दल या लोकांना शंका वाटत होती. ही गोष्ट फिरिश्त्यांनी हजरत लूत यांना अशा वेळे सांगितली जेव्हा शहरवासीयांनी त्यांच्या घराला वेढा दिला होता.

६४. मागोमाग चालण्याचा आदेश यासाठी दिला गेला होता की मागे राहून हे पाहता यावे की एखादा इसम आपल्या घराकडे परत न फिरावा आणि ना त्याने मागे वळून पहावे. तसेच यात ईमान बाळगणाऱ्या करीता आज्ञापालन व अल्लाह वरील भरवशाची परिक्षा होती की ते आपल्या पैगंबरास समक्ष पाहत नसतानाहि त्या मार्गावर चालतात किंवा नाही. ज्यावर चालण्याचा त्यांना आदेश दिला गेला आहे.

६५. याचे स्पष्टीकरण सूरह हूद टीप क्र. ११६ मध्ये केले गेले आहे.

६६. अर्थात त्यांचा अगदी सर्वनाश केला जाईल.

६७. म्हणजे शहरातील लोक देखण्या अतिथींना पाहून वाईट उद्देशाने हजरत लूत यांच्या घरी पोहचले. त्यांना या गोष्टीचा आनंद होता की सावज हाती लागणार आहे.

६८. त्यावेळेपावेतो फिरिश्त्यांनी हजरत लूत यांना हे जाहीर होऊ दिले नव्हते की ते फिरिश्ते आहेत. वर आयत क्र. ६३ ते ६५ मध्ये फिरिश्त्यांचे जे निवेदन उल्लेखिले गेले आहे ती त्यावेळेची गोष्ट होय. जेव्हा शहरच्या लोकांनी हजरत लूत यांच्या घराला घेरले होते आणि हज़रत लूत आपल्या अतिथीची अब्रू संकटात येईल हे पाहून फार विमनस्क होत होते.

६९. म्हणजे माझ्या अतिथींना जर तुम्ही पळवून नेले तर माझ्या करीता ही मोठी लज्जास्पद बाब होईल.

६९. अल्लाहचे भय बाळगा आणि मला अपमानित करु नका.

وَاتَّقُوا اللّٰهَ وَلَا تُخْزُوْنِ ﴿٦٩﴾

७०. ते म्हणाले काय आम्ही तुम्हाला अन्य जन समूहाच्या लोकां (ना थांबविण्या) बाबत मनाई केली नव्हती ?[७०]

قَالُوْٓا اَوَلَمْ نَنْهَكَ عَنِ الْعٰلَمِيْنَ ﴿٧٠﴾

७१. तो म्हणाला, ह्या माझ्या मुली हजर आहेत, जर तुम्हाला (योग्य मार्गाचा अवलंब) करावयाचा आहे .[७१]

قَالَ هٰٓؤُلَاۗءِ بَنٰتِيْٓ اِنْ كُنْتُمْ فٰعِلِيْنَ ﴿٧١﴾

७२. तुमच्या जीवनाची शपथ, हे लोक आपल्या कामुकतेत आंधळे झाले आहेत.[७२]

لَعَمْرُكَ اِنَّهُمْ لَفِيْ سَكْرَتِهِمْ يَعْمَهُوْنَ ﴿٧٢﴾

७३. शेवटी प्रात:काळ होताच एका भयंकर आवाजाने त्यांना धरले.

فَاَخَذَتْهُمُ الصَّيْحَةُ مُشْرِقِيْنَ ﴿٧٣﴾

७४. आणि आम्ही त्या वस्तीचा तळपट केला व त्यांच्यावर भाजलेल्या मातीच्या खंगरांचा वर्षाव केला.[७३]

فَجَعَلْنَا عَالِيَهَا سَافِلَهَا وَاَمْطَرْنَا عَلَيْهِمْ حِجَارَةً مِّنْ سِجِّيْلٍ ﴿٧٤﴾

७५. नि:संशय या (वृत्तांता)त त्या लोकांकरीता मोठी चिन्हे आहेत जे सूज्ञतेने काम घेतात.[७४]

اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيٰتٍ لِّلْمُتَوَسِّمِيْنَ ﴿٧٥﴾

७६. आणि ही (ओसाड झालेली) वस्ती दळणवळणाच्या मार्गावर आहे.[७५]

وَاِنَّهَا لَبِسَبِيْلٍ مُّقِيْمٍ ﴿٧٦﴾

७७. नि:संशय यात ईमान बाळगणाऱ्यां करीता मोठी निशाणी आहे. [७६]

اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيَةً لِّلْمُؤْمِنِيْنَ ﴿٧٧﴾

७८. आणि (पहा) 'ऐकह् वाले' मोठे जालीम होते.[७७]

وَاِنْ كَانَ اَصْحٰبُ الْاَيْكَةِ لَظٰلِمِيْنَ ﴿٧٨﴾

७९. तेव्हा आम्ही त्यांना देखील शिक्षा दिली आणि ह्या दोन्ही वस्त्या राजमार्गावर आज देखील आहेत.[७८]

فَانْتَقَمْنَا مِنْهُمْ ۘ وَاِنَّهُمَا لَبِاِمَامٍ مُّبِيْنٍ ﴿٧٩﴾

७०. म्हणजे आम्ही तर बाहेरच्या कोणत्याहि मनुष्यास आश्रय देण्याबाबत तुम्हाला मनाई केली होती, मग ह्या प्रवाशांना तुम्ही आपल्या घरी का थांबवून घेतले? यावरुन लूत जन-समूहाच्या गुंडगिरीची कल्पना येते. हे लोक ही गोष्ट सहन करण्यास तयार नव्हते की बाहरून आलेल्या एखाद्या सज्जन माणसाला मानवतेच्या एखाद्या हितचिंतकाने आपला अतिथी बनवावे.

७१. अर्थात आपल्या काम वासनेला योग्य रित्या शमवू इच्छित असाल तर तुमच्या घरात तुमच्या पत्न्या हजर आहेत. तेव्हा एका नैसर्गिक व योग्य पद्धतिला सोडून अनैसर्गिक व हराम पद्धतिचा अवलंब करण्याचा अर्थ काय? ह्याच गोष्टीकडे हजरत लूत यांनी अत्यंत प्रतिष्ठापूर्ण व शालीनता पूर्ण शैलीत लोकांचे लक्ष वेधले. याच कारणास्तव जन-समूहातील स्त्रीयांबाबत त्यांनी म्हटले की ह्या माझ्या मुली आहेत. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टिप क्र. ११०.

७२. अशा प्रसंगी जेव्हा हजरत लूत यांचा अंतिम उपदेशहि त्यांच्या जन समूहावर परिणाम कारक होऊ शकला नाही. तेव्हा सर्व श्रेष्ठ अल्लाहने त्यांची सांत्वना करीत फर्माविले की तुमचे जीवन या गोष्टीस साक्ष आहे की तुम्ही आपल्या जन समूहांच्या सुधारणेत कसलीहि कसर बाकी ठेवली नाही. तथापि हा जन-समूह इतका दुराचारी आहे की कोणताहि उपदेश ग्रहण करण्यास तयार नाही आणि त्या लोकांवर कामवासनेचे भूत असे बसले की त्यांची बुद्धिच भ्रष्ट झाली आहे आणि ते अगदीच आंधळे बनले आहेत. आता त्यांच्यासाठी ईश-शिक्षा भोगणे क्रम प्राप्त होय.

स्पष्ट असावे की अशा प्रसंगी 'कसम' हा शब्द अरबी भाषेत साक्ष या अर्थाने घेतला जातो आणि ही अलंकारीक भाषेची एक शैली आहे.

७३. याचे स्पष्टीकरण सूरह हूद टीप क्र ११९ मध्ये केले गेले आहे.

७४. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हूद टीप क्र.१४७व १४८.

७५. सदूम व अमूरा चा इलाक़ा ज्या ठिकाणी लूत जन समूह वसत होता. हिजाज व शाम (सिरीया) यांच्या दरम्यान आहे आणि तो राजमार्गावर पडत होता. जावरुन व्यापारी काफीले जात होते.

७६. चिन्ह या गोष्टीचे की सरते शेवटी अल्लाहची कृपा ईमान बाळगणाऱ्यांच्याच हिश्यात येते आणि खरी खुरी प्रतिष्ठा व मान त्यांनाच लाभतो.

७७. 'एका' घनदाट वृक्षांना म्हणतात. मदयन जवळचा इलाका घनदाट वृक्षांनी व्यापलेला होता. ज्यात शोऐब यांचा जन समूह वसत होता म्हणून या जन समूहास 'ऐकावाले' म्हटले गेले आहे.

शोऐब-जनसमूहाचा वृत्तांत सूरह अअराफ आणि सूरह हूद मध्ये केला गेला आहे.स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अअराफ टीप क्रं.१३४ते१४९आणि सूरह हूद टीप क्र.१२२ते १४०.

७८. म्हणजे जो राजमार्ग हिजाज हून सिरीया व पॅलेस्टीनला जातो त्यावर घनदाट वृक्ष वाले व लूत जन समूहांच्या ओसाड वस्त्या पडतात. त्यांचे अवशेष या राजमार्गावरुन जाणाऱ्यांना बोध प्राप्त करण्याचे आमंत्रण देतात.

जोपावेतो शोऐब जन समूहाचा संबंध आहे, त्याचे अवशेष तर आज देखील अस्तित्वात आहेत. तथापि लूत जन समूहांच्या वसाहती ज्या इलाक्यात होत्या त्याचे समुद्रात रुपांतर झाले आहे; त्यालाच मृत सागर (Dead Sea) म्हणतात. हा भाग समुद्राच्या पातळोने ४००मीटर खाळी आहे. जो असा समजुन यते की भूकंपीचा परीणाम होय काही वर्षा पूर्वी यांच्या तटावरे काही अवशेष चा रहस्योद्घाटन झला होता.(क़स्सुल अंबिया - अब्दुल वहाब नज्जार पृष्ट ११३)

८०. आणि 'हिज्र' [७९] वाल्यांनी हि पैगंबरांना खोटे ठरविले.[८०]

وَلَقَدْ كَذَّبَ أَصْحَابُ الْحِجْرِ الْمُرْسَلِينَ ﴿٨٠﴾

८१. आम्ही त्यांना आपल्या निशाण्या दाखविल्या तथापि ते तोंड फिरवित राहिले. [८१]

وَآتَيْنَاهُمْ آيَاتِنَا فَكَانُوا عَنْهَا مُعْرِضِينَ ﴿٨١﴾

८२. ते पर्वतांना कोरुन सुख-शांती पूर्वक घरे बनवीत होते. [८२]

وَكَانُوا يَنْحِتُونَ مِنَ الْجِبَالِ بُيُوتًا آمِنِينَ ﴿٨٢﴾

८३. मग असे झाले की (एके दिवशी प्रातःकाळ होताच भीषण आवाजाने त्यांना येऊन धरले. [८३]

فَأَخَذَتْهُمُ الصَّيْحَةُ مُصْبِحِينَ ﴿٨٣﴾

८४. आणि जे काही त्यांनी कमविले होते ते त्यांच्या काहीहि कामी आले नाही.[८४]

فَمَا أَغْنَىٰ عَنْهُمْ مَا كَانُوا يَكْسِبُونَ ﴿٨٤﴾

८५. आम्ही आकाशांना व जमीनीला आणि जे काही त्यांच्या दरम्यान आहे. सत्याच्या आधारावरच निर्माण केले आहे.[८५] आणि कियामतीची वेळी निश्चितच येणार आहे. यास्तव सुंदर रित्या दुर्लक्ष करा.[८६]

وَمَا خَلَقْنَا السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ وَمَا بَيْنَهُمَا إِلَّا بِالْحَقِّ ۗ وَإِنَّ السَّاعَةَ لَآتِيَةٌ ۖ فَاصْفَحِ الصَّفْحَ الْجَمِيلَ ﴿٨٥﴾

८६. निःसंशय तुमचा पालन कर्ता मोठा निर्माण-कर्ता, ज्ञानी आहे.[८७]

إِنَّ رَبَّكَ هُوَ الْخَلَّاقُ الْعَلِيمُ ﴿٨٦﴾

८७. आम्ही तुम्हाला पुनरावृत्ति (द्विरुक्ति) केल्या जाणाऱ्या सात आयती आणि महान क़ुरआन प्रदान केले आहे.[८८]

وَلَقَدْ آتَيْنَاكَ سَبْعًا مِنَ الْمَثَانِي وَالْقُرْآنَ الْعَظِيمَ ﴿٨٧﴾

८८. तुम्ही ह्या जीवन-सामुग्रीवर दृष्टीक्षेपहि टाकू नका, जी आम्ही यांच्या विविध समूहांना देऊन ठेवली आहे. [८९] आणि ना त्यांच्या स्थितीबद्दल दुःख करा [९०] आणि ईमान बाळगणाऱ्यां करीता आपल्या भूजा झुकवा. [९१]

لَا تَمُدَّنَّ عَيْنَيْكَ إِلَىٰ مَا مَتَّعْنَا بِهِ أَزْوَاجًا مِنْهُمْ وَلَا تَحْزَنْ عَلَيْهِمْ وَاخْفِضْ جَنَاحَكَ لِلْمُؤْمِنِينَ ﴿٨٨﴾

८९. आणि सांगा, मी तर उघडरित्या सावध करणारा आहे.

وَقُلْ إِنِّي أَنَا النَّذِيرُ الْمُبِينُ ﴿٨٩﴾

७९.'हिज्र' एका खिंडीचे नाव आहे जी मदीनेच्या उत्तरेस तबूक जाणाऱ्या मार्गात पडते. येथे समूद जन समूह वसत होता व त्याचे मध्यवर्ति स्थान मदायनसालेह होते. या जन समूहाचे भग्नावशेष आज देखील आहेत. तबूक युद्धाच्या प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे या अवशेषांजवळून जाणे झाले होते. त्या प्रसंगी पैगंबरांनी आपल्या सहवासातील अनुयायींना आज्ञा केली होती की येथून जातांना अश्रू ढाळावे. (बुखारी)

८०. हजरत सालेह यांचे आवाहन देखील तेच होते जे अन्य प्रेषितांचे होते. म्हणून त्यांना खोटे ठरविणे सर्व प्रेषितांना खोटे ठरविण्या समान होते.

८१. हजरत समूद यांचा वृत्तांत सूरह अअराफ आणि सूरह हूद मध्ये निवेदिला गेला. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र.११५ ते १२६ आणि सूरह हूद टीप क्र. ८६ ते ९५.

८२. म्हणजे आपल्या जीवनाच्या बहुमूल्य क्षणांना ते वैभवशाली भवन बांधण्यात व सुख विलासात लोळण्यात घालवित होते. इहलोकालाच त्यांनी ध्येय बनविले होते व अल्लाह पुढे आपल्याला वृत कर्माचा जाब द्यावा लागेल अशी कल्पनाहि नव्हती.

८३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १२३.

८४. म्हणजे स्वसंरक्षणाकरीता जी मजबूत घरे त्यांनी बांधली होती, ती त्यांचे काहीहि संरक्षण करु शकली नाहीत. आणि त्यांची सर्व धन संपत्ति, समस्त कार्ये व त्यांची संपूर्ण संस्कृति मातीला मिळाली.`

८५. याचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र.१२४ मध्ये केले गेले आहे.

८६. म्हणजे जेव्हा कियामत येणार आहे व सर्वांना आपल्या कृत कर्माचा जाब द्यावयाचा आहे तेव्हा हे पैगंबर! हे विरोधक तुमच्या विरुद्ध ज्या असभ्य गोष्टी करीत आहेत त्या द्वारे तुम्हाला दु:खी होण्याची गरज नाहि. त्यांना आपला शेवट दिसून येईल. तुम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. अर्थात ही दुर्लक्षता चांगल्या रीतीने म्हणजे नैतिक गुणांसह असावी.

८७. अल्लाहच्या ह्या दोन गुण वैशिष्ट्यांचा उल्लेख करण्याचा हेतु कियामत संबंधी इन्कार करण्याऱ्यांच्या आक्षेपांना रद्द करणे व हे सिद्ध करणे की कियामतीचे घडून येणे कदापि अशक्य नाही. ही सृष्टी अल्लाहच्या या गुणवैशिष्ट्याची अभिव्यक्ति होय की तो जबरदस्त निर्माण शक्ति बाळगतो. म्हणून माणसाला दुसऱ्यांदा निर्माण करणे व अखिरत-विश्वाचा उदय करणे त्याच्या करीता किंचितहि कठीण नाही. तसेच निर्माण करणारा आपल्या निर्मितीशी अनभिज्ञ कशा प्रकारे असू शकतो. म्हणून तो (अल्लाह) निर्माताहि आहे व ज्ञानीहि आहे, ही इन्कार न करण्याजोगी वस्तुस्थिती आहे. आणि जेव्हा तो ज्ञानी आहे तर त्याच्या करीता हे कठीण नव्हे की अब्जावधि खरबावधि व्यक्तिंचा कियामतीच्या दिवशी हिशेब घ्यावा.

८८. سبعًامن المثانی मूळ ग्रंथातील शब्दाचा अर्थ आहे सात द्विरुक्ति केल्या जाणाऱ्या आयती. अरबी भाषेचा प्राचीन व प्रमाणित शब्दकोश 'सहाह जौहरी' मध्ये 'मसानी'चा अर्थ 'द्विरुक्ति केली जाणारी' सा वर्णिला गेला आहे.

وَتُسَمّیَ فَاتِحَةُ الکتاب مثانی لِاَنَّھَاتُثَنّی فی کُلِّ رکعةٍ۔ (الصحاح ص ۲۲۹۶)

"फातेहा अल् किताब" (अर्थात सूरह फ़ातेहा) ला मसानी म्हटले जाते. कारण याची प्रत्येक रकातीत पुनरावृत्ति होते." (अल् सहाह - पृ. २२९६)

तसेच सहीह हदीस द्वारे सिद्ध आहे की त्या सात आयतींशी अभिप्रेत 'सूरह फातेहा' होय.

عن ابی ھریرة رضی اللہ عنہ قال۔ قال رسول اللہ صلی اللہ علیہ وآلہٖ وسلم : اُم القرآن ھی السبع المثانی والقرآن العظیمُ۔ (بخاری کتاب التفسیر)

"अबु हुरैरा (रजि.) फर्मावितात की - पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले. उम्मुल क़ुरआन ह्याच त्या सात पुनरावृत्तिच्या आयती होत व महान क़ुरआन देखील. (बुखारी)

'सूरह फातेहा' मध्ये सात आयती आहेत आणि नमाज़चा अत्यंत यथायोग्य भाग आहे. म्हणून प्रत्येक रकअतीत सूरह फतिहा अपरिहार्यत: سبعًامن المثانی "सबअम मिनल मसानी" पढली जाते. मोजक्या शब्दात सूरह फातेहाचा असा परिचय आहे जो त्याच्या अत्याधिक पठणाच्या पैलूस प्रस्तुत करण्याखेरीज या गोष्टीकडे संकेत करतो की यात अर्थ आणि आत्मीय धनाचे सात समुद्र सामावलेले आहेत. तसेच माणिक मोत्यांनी युक्त अशा या प्रारंभिक सूरती सह क़ुरआन रुपी मौल्यवान खजिना देखील प्रदान केला गेला. या आत्मीय धन संपदेच्या तुलनेत भौतिक सम्पत्तिची वास्तवता कोणती, जी ईश्वरला न ओळखणाऱ्या लोकांच्या हिश्यात आली आहे व ज्या सोबत सहस्रावधि कसोट्या आहेत.

८९. जरी आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना उद्देशून ही आज्ञा दिली गेली आहे की जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने तुम्हाला क़ुरआन रुपी सम्पत्ति ने श्रीमंत केले आहे. तेव्हा त्या ऐहीक धनावर चुकीची नजरहि टाकू नका

जे भौतिक वाद्यांना लाभले आहे. तथापि अप्रत्यक्षरित्या ही आज्ञा त्या प्रत्येक माणसा करीता आहे. ज्याला क़ुरआन रुपी ईश-देणगी लाभली आहे.

९० अर्थात हे धनाचे पुजारी जर यातच मग्न राहू इच्छितात व त्या ईश देणगीची कदर करण्यास तयार नाहीत जी क़ुरआन स्वरुपात सर्वश्रेष्ठ अल्लाहने अवतरीत केली आहे. तर त्यांच्या दशे बद्दल दु:ख करण्यात काय फायदा ते त्या महान ईश-देणगी पासून वंचित राहण्या योग्यच आहेत.

९१. म्हणचे अशा लोकांची कदर जाणा जे ऐहीक सम्पत्ती पासून वंचित आहेत. मात्र ज्यांनी ईमान-धन प्राप्त केले आहे. असेच लोक तुमच्या कृपा व दयेस पात्र आहेत.




## अरबांचा व्यापारी राजमार्ग

وَإِنَّهُمَا لَبِإِمَامٍ مُّبِينٍ ﴿٧٩﴾

आणि ह्या दोन्ही वस्त्या राजमार्गवर आज देखील आहेत।

# समूद चे अवशेष (१)



# समूद चे अवशेष (२)



कَمَآ أَنزَلْنَا عَلَى ٱلْمُقْتَسِمِينَ ﴿٩٠﴾

९०. आम्ही (हा ग्रंथ त्याच प्रमाणे अवतरीत केला आहे) ज्या प्रमाणे हिस्से विखुरणाऱ्यांवर अवतरीत केला होता.[९२]

ٱلَّذِينَ جَعَلُوا۟ ٱلْقُرْءَانَ عِضِينَ ﴿٩١﴾

९१. ज्यांनी (आपल्या) क़ुरआनाचे तुकडे तुकडे केले.[९३]

فَوَرَبِّكَ لَنَسْـَٔلَنَّهُمْ أَجْمَعِينَ ﴿٩٢﴾

९२. तेव्हा तुमच्या पालन कर्त्याची शपथ, [९४] आम्ही खचितच ह्या सर्वांना जाब विचारणार.

عَمَّا كَانُوا۟ يَعْمَلُونَ ﴿٩٣﴾

९३. त्या कार्यांबाबत जी ते करीत राहिलेत.[९५]

فَٱصْدَعْ بِمَا تُؤْمَرُ وَأَعْرِضْ عَنِ ٱلْمُشْرِكِينَ ﴿٩٤﴾

९४. तेव्हा जो काही आदेश तुम्हाला दिला जात आहे तो त्यांना उघड पणे ऐकवा आणि अनेकेश्वर वाद्यांची तमा बाळगू नका.[९६]

إِنَّا كَفَيْنَـٰكَ ٱلْمُسْتَهْزِءِينَ ﴿٩٥﴾

९५. त्या थट्टा उडविणाऱ्यांच्या विरोधात आम्ही तुमच्या करीता पुरेसे आहोत.

ٱلَّذِينَ يَجْعَلُونَ مَعَ ٱللَّهِ إِلَـٰهًا ءَاخَرَ ۚ فَسَوْفَ يَعْلَمُونَ ﴿٩٦﴾

९६. ज्यांनी अल्लाह सोबत अन्य ईश्वर बनवून ठेवले आहेत. लवकरच त्यांना माहित होईल.[९७]

وَلَقَدْ نَعْلَمُ أَنَّكَ يَضِيقُ صَدْرُكَ بِمَا يَقُولُونَ ﴿٩٧﴾

९७. आम्हाला ठाऊक आहे की ज्या गोष्टी हे सांगतात त्या द्वारे तुमचे मन संकुचित होते.[९८]

فَسَبِّحْ بِحَمْدِ رَبِّكَ وَكُن مِّنَ ٱلسَّـٰجِدِينَ ﴿٩٨﴾

९८. तेव्हा आपल्या पालन कर्त्याच्या पवित्रतेचे त्याच्या प्रशंसेसह वर्णन करा आणि सजदा करणारे बना.[९९]

وَٱعْبُدْ رَبَّكَ حَتَّىٰ يَأْتِيَكَ ٱلْيَقِينُ ﴿٩٩﴾

९९. आणि आपल्या पालन कर्त्याच्या उपासनेत [१००] व्यस्त रहा, येथ पावेतो की ती वेळ येऊन ठेपावी. जिचे येणे निश्चित आहे. [१०१]

९२. संकेत यहुदीं कडे आहे. ज्यांनी अल्लाहच्या ग्रंथास अनेक भागात विखरले होते. आयतीचा अर्थ असा की, क़ुरआन हा काही पहिला ग्रंथ नव्हे जो तुमच्या कडे पाठविला गेला असावा. किंबहुना यापूर्वी हि ग्रंथांचे अवतरण होत राहिले. सर्वश्रेष्ठ अल्लाहने ज्या प्रमाणे इब्राहीमी वंशाची एक शाखा बनी इस्राईलवर ग्रंथ अवतरीत केला होता. तद्वतच त्याने या वंशाची दुसरी शाखा बनी इस्माईलवर ग्रंथ अवतरीत केला आणि ज्या अर्थी बनी इस्राईलने धर्माला मूळ स्वरुपात बाकी ठेवले नाही. म्हणून क़ुरआनाचे अवतरण आवश्यक ठरले. यासाठी की लोकांना अल्लाहच्या धर्माचे खरे स्वरुप उमजावे; व त्याच्या ईश देणग्या योग्य स्वरुपात दिसून याव्यात.

९३. आपल्या क़ुरआनाशी अभिप्रेत यहुदींचा ग्रंथ 'तौरात' होय. आणि त्याचे तुकडे तुकडे करण्याचा अर्थ असा की त्यांनी अल्लाहच्या ह्या ग्रंथात फेरबदल केला, त्याचा क्रम परिवर्तित केला, त्याचा अर्थ बदलून टाकला, त्यात आपल्या स्पष्टीकरणाचा समावेश केला, त्याच्या एका हिश्यात अशा प्रकारे लपवित राहिले की हळू हळू तो हिस्साच गायब झाला. आणि जो हिस्सा जाहीर केला त्यातहि काही आदेशांचे पालन केले व काही आदेशांची उघड पायमल्ली केली.

९४. पालन कर्त्याची शपथ तयाच्या महानतेस व पवित्रतेस व्यक्त करते. याने संभाषणात बळ देण्याची कैफियत निर्माण झाली आहे.

९५. म्हणजे अल्लाहच्या धर्माशी व त्याच्या ग्रंथाशी हा जो व्यवहार त्यांनी केला आहे त्या संबंधी क़ियामतीच्या दिवशी अवश्य त्यांना जाब विचारला जाईल. कोणीहि ह्या भ्रमात राहू नये की आम्ही अल्लाह व त्याच्या ग्रंथास मानण्याचा दावा करीत राहिलो म्हणून सहज सुटका होईल. मुळीच नव्हे किंबहुना त्यांच्या दाव्यास कर्माच्या कसोटीवर पारखले जाईल.

९६. मक्केच्या अनेकेश्वरादी वातावरणात एकेश्वरवादाचे आवाहन करणे सोपे काम नव्हते. या संदर्भात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विरोधांच्या वादळातून जावे लागले आणि या विरोधाने विडंबनाचे स्वरुप धारण केले होते. तथापि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आदेश दिला गेला की त्यांची पर्वा न करता त्या गोष्टींना जाहिर पणे प्रस्तुत करा ज्यांचा अल्लाह ने आदेश दिला आहे. याद्वारे हे मार्ग दर्शन लाभते की वातावरण कितीहि अनेकेश्वरवादीय व विरोधात्मक का असेना, ईमान बाळगणाऱ्याने धर्माचे आवाहन व त्याच्या शिकवणींना प्रस्तुत करण्या संदर्भात हयगय करता कामा नये. तसेच या गोष्टींची जरा देखील पर्वा करु नये की मूर्ति पूजा व शिर्क विरुद्ध अधिक उणे बोलण्याने अनेकेश्वरवादी आकांड तांडव करतील.

९७. अर्थात लवकरच त्यांच्या या कृत्यांच्या दुष्परिणाम त्यांच्या समोर येईल. त्यावेळी ते जाणून घेतील की पैगंबर व त्यांच्या आवाहनाची थट्टा उडवून त्यांनी कशा प्रकारे स्वत:ला विनाशाच्या मार्गाला लावले.

९८. म्हणजे हे पैगंबर ! हे लोक तुमची जी थट्टा उडवीत आहेत, ती तुमच्या करीता मानसिक दु:खाचे कारण जरुर आहे. तथापि तुम्ही यावर संयम पाळला पाहिजे.

९९. हा तौहीद (एकेश्वरवादा) वर कायम राहण्याचा आणि अल्लाहच्या उपासनेत व्यस्त राहण्याचा उपदेश आहे.

१००. उपरोक्त आयतीतील निवेदनानुसार उपासनेशी अभिप्रेत येथे विशेषत्वाने स्तुती जाप्य आणि सजदामय उपासना होय. मक्का कालावधीत याचा इतमाम बाळगण्याची ज्या प्रकारे ताकीद केली गेली त्यावरुन उपासनेचे प्राधान्य व धर्मातील त्याचे महत्व स्पष्ट होते.

१०१. अर्थात मृत्यु-समय, जो येण्याविषयी कसल्याहि शंकेला वाव नाही.

हदीस वचनात मृत्युला 'विश्वास' या अर्थाने घेतले गेले आहे. म्हणून याकरिता उस्मान बिन मजऊनच्या मृत्यु समयी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले.

اَمَّاهُوَ فَقَدْ جَاءَهُ الْيَقِيْنُ۔ (بخاری کتاب الجنائز)

''उस्मान बिन मजऊन जवळ विश्वास येऊन पोहचला.'' (बुखारी)

आयतीचा मतीतार्थ असा की मरेपर्यंत एकमेव ईश्वराच्या उपासनेत स्थैर्यशील व व्यस्त रहा.

# सूरह अन-नहल

# १६.सूरह अन-नहल

**नाव:** आयत क्र. ६८ मध्ये अल्लाहच्या ईशत्वाचे चिन्ह म्हणून 'नहल' अर्थात मधमाशीचा उल्लेख केला गेला आहे. तदनुषांगाने या सूरहचे नाव 'अन् नहल' ठेवण्यात आले आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे; आणि मजकूरांवरून असे दिसून येते की मक्केच्या मध्य युगात हब्शा (ॲबिसिनिया) कडे स्थलांतर झाल्या नंतर अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पना:** अनेकेश्वरवाद हा असत्य व एकेश्वरवाद हा सत्य असल्याचे स्पष्ट करणे व या संदर्भात अल्लाहच्या देणग्यांची जाणीव करविणे अशासाठी की माणसाने आपल्या वास्तविक स्वामी व उपकार कर्त्यास ओळखावे. सूरहचा मध्यवर्ति विषय हाच आहे तथापि तत्कालीन परिस्थिती व आवश्यकता लक्षात घेता अन्य गोष्टीहि निवेदिल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ ईश–शिक्षे साठी घाई केल्या बद्दल ताकीद केली गेली आहे आणि इन्कार करणाऱ्यांनी प्रस्तुत केलेल्या शंका-कुशंकाना उत्तर दिले गेले आहे.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ३ प्रस्तावना स्वरुप आहेत. ज्यात अनेकेश्वर वाद्यांना झिंझोडीत 'वही' (ईश-आदेशा) ची गरज आणि सृष्टी-निर्मितीचे उद्दिष्ट स्पष्ट केले गेले आहे.

आयत क्र. ४ ते १८ मध्ये अल्लाहच्या देणग्यांचा उल्लेख केला गेला आहे. ज्या माणसाला विचार-चिंतन करण्याचे आवाहन करतात आणि आपल्या खऱ्याखुऱ्या उपकार कर्त्याची जाण मनात निर्माण करतात.

आयात क्र. १९ ते ३२ मध्ये अनेकेश्वरवादाचे खंडन करीत अनेकेश्वर वाद्यांच्या दुष्परिणितीस व संयमी लोकांच्या चांगल्या परिणतिस सादर केले गेले आहे.

आयत क्र. ३३ ते ४० मध्ये अनेकेश्वर वाद्यांच्या काही आक्षेपांना उत्तर दिले गेले आहे.

आयत क्र. ४१ व ४२ मध्ये अल्लाहच्या मार्गात स्थलांतर करणाऱ्यांना खुश खबरी दिली गेली आहे.

आयत क्र. ४३ ते ४७ मध्ये प्रेषित्व संबंधाने आवश्यक स्पष्टीकरण व इन्कार करणाऱ्यांना तंबी.

आयत क्र. ४८ ते ६० मध्ये एकेश्वरवादाची प्रमाणे व अनेकेश्वरवादाचे खंडन.

आयत क्र. ६१ ते ६५ मध्ये इन्कार करणाऱ्यांच्या काही शंकाचे निरसन केले गेले आहे.

आयत क्र. ६६ ते ८३ मध्ये अल्लाहच्या देणग्यांचा उल्लेख करुन अनेकेश्वरवाद्यांच्या विवेकास जागृत करण्याची उपाय योजना केली गेली आहे.

आयत क्र. ८४ ते ८९ मध्ये सचेत केले गेले आहे की कियामतीच्या दिवशी जेव्हा अनेकेश्वरवादी व इन्कार करणारे हजर केले जातील तेव्हा त्यांची काय दशा होईल.

आयत क्र. ९० ते ९७ मध्ये दासांच्या हक्काची पूर्तता दुष्कृत्यां पासून अलिप्तता आणि स्वच्छ शुद्ध जीवन व्यतीत करण्याचे प्रोत्साहन दिले गेले आहे.

आयत क्र.९८ ते १०५ मध्ये सैताना पासून आश्रय मागण्याची ताकीद केली गेली आहे कारण तो हे इच्छित नाही की लोकांनी क़ुरआनास योग्यरित्या समजून घ्यावे, यास्तव तो शंका-कुशंका निर्माण करीत राहतो. इन्कार करणाऱ्यांच्या शंका वस्तुत: सैतानाद्वारे मनात कुविचार निर्माण करण्याचाच परिणाम होय.

आयत क्र. १०६ ते १११ मध्ये अत्याचार पिडीत ईमान धारकाचे सांत्वन व त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्यांना तंबी.

आयत क्र. ११२ ते ११४ मध्ये मक्कावासीयांकरीता एका वस्तीचे उदाहरण जिने कृतघ्नता दर्शविली.त्याच बरोबर अल्लाहच्या कृतज्ञ बनण्याची ताकीद.

आयत क्र. ११५ ते ११९ मध्ये ही ताकीद की शिर्क (अनेकेश्वरवाद) व भ्रमपूजेत गुरफटून अल्लाहने हलाल ठरविलेल्या गोष्टींना हराम ठरवू नका.

आयत क्र १२० ते १२३ मध्ये हजरत इब्राहीम यांच्या चारित्र्याचा पैलू प्रस्तुत केला गेला आहे की ते अल्लाहशी कृतज्ञ होते. एकेश्वरवादाचे कट्टर पुरस्कर्ते होते. अनेकेश्वरवादी मुळीच नव्हते.

आयत १२४ मध्ये या गोष्टीचे स्पष्टीकरण केले गेले आहे की सब्त (शनीवार) पाळण्याचा आदेश केवळ यहुदींना त्यांच्या आपसातील मतभेदामुळे दिला गेला.

आयत क्र. १२५ ते १२८ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व ईमान बाळगणाऱ्यांना काही आदेश दिले गेले आहेत.

# १६.सूरह अन-नहल

سُورَةُ النَّحْلِ

(आयती-१२८)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. येऊन पोाेहचला अल्लाहचा आदेश, त्याच्यासाठी घाई करू नका. [1] तो पवित्र आणि अत्युच्च आहे त्या पासून ज्याला हे त्याचा सहभागी ठरवितात. [2]

أَتَىٰٓ أَمْرُ ٱللَّهِ فَلَا تَسْتَعْجِلُوهُ ۚ سُبْحَٰنَهُۥ وَتَعَٰلَىٰ عَمَّا
يُشْرِكُونَ ١

२. तो फिरिश्त्यांना रूह (वही) सह आपल्या आज्ञेने ज्या दासांवर इच्छितो अवतरीत करतो [3] की लोकांना खबरदार करा की माझ्या खेरीज कोणीहि उपास्य (ईश्वर) नाही, यास्तव माझे भय बाळगा. [4]

يُنَزِّلُ ٱلْمَلَٰٓئِكَةَ بِٱلرُّوحِ مِنْ أَمْرِهِۦ عَلَىٰ مَن يَشَآءُ
مِنْ عِبَادِهِۦٓ أَنْ أَنذِرُوٓا۟ أَنَّهُۥ لَآ إِلَٰهَ إِلَّآ أَنَا۠ فَٱتَّقُونِ ٢

३. त्याने आकाशांना व जमीनीला सत्याच्या आधारावर निर्माण केले आहे. [5] तो उच्चतम आहे त्याहून ज्याला हे त्याचा सहभागी ठरवितात.

خَلَقَ ٱلسَّمَٰوَٰتِ وَٱلْأَرْضَ بِٱلْحَقِّ ۚ تَعَٰلَىٰ عَمَّا يُشْرِكُونَ ٣

४. त्याने माणसाला पाण्याच्या एका थेंबा पासून निर्माण केले मग पहा तो स्पष्ट भांडणखोर बनला. [6]

خَلَقَ ٱلْإِنسَٰنَ مِن نُّطْفَةٍ فَإِذَا هُوَ خَصِيمٌ مُّبِينٌ ٤

५. त्याने तुमच्या करीता चतुष्पाद निर्माण केले. ज्यात तुमच्या करीता उनी पोषाखहि आहे [7] व इतर फायदे देखील, [8] तसेच त्यांच्या पासून तुम्ही खाद्य देखील प्राप्त करता. [9]

وَٱلْأَنْعَٰمَ خَلَقَهَا ۗ لَكُمْ فِيهَا دِفْءٌ وَمَنَٰفِعُ
وَمِنْهَا تَأْكُلُونَ ٥

६. आणि त्यांच्यात तुमच्या साठी शोभा आहे, जेव्हा संध्याकाळी त्यांना परत आणता व जेव्हा सकाळी चरण्या करीता सोडून देता. [10]

وَلَكُمْ فِيهَا جَمَالٌ حِينَ تُرِيحُونَ وَحِينَ تَسْرَحُونَ ٦

७. ते तुमचे ओझे अशा ठिकाणा पर्यंत नेतात जेथे तुम्ही कष्ट-परिश्रम केल्या खेरीज पोहचू शकत नव्हते. [11] नि:संशय तुमचा पालन कर्ता मोठा दयाळू व कृपाळू आहे. [12]

وَتَحْمِلُ أَثْقَالَكُمْ إِلَىٰ بَلَدٍ لَّمْ تَكُونُوا۟ بَٰلِغِيهِ إِلَّا بِشِقِّ
ٱلْأَنفُسِ ۚ إِنَّ رَبَّكُمْ لَرَءُوفٌ رَّحِيمٌ ٧

१. अनेकेश्वरवादी ज्या गोष्टीकरीता घाई करीत होते ती ईश-शिक्षा होती. ते म्हणत की पैगंबर ज्या ईश-शिक्षेची आम्हाला धमकी देत आहेत ती येत का नाही?

وَيَسْتَعْجِلُوْنَکَ بِالْعَذَابِ ـ وَلَوْلَآ اَجَلٌ
مُّسَمًّى لَّجَآءَهُمُ الْعَذَابُ ـ (العنكبوت:٥٣)

"ते ईश-शिक्षेकरीता घाई करीत आहेत. जर तिची वेळ निश्चित केली गेली नसती तर ईश-शिक्षा तत्क्षणीच त्यांच्यावर कोसळली असती." (अल-अन्कबूत)

म्हणून आयतीत اَمْرُ اللهِ 'अम्रूल्लाह'(अल्लाहचा आदेश) शी अभिप्रेत अल्लाहची शिक्षाच होय; आणि हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की जे लोक अल्लाहच्या शिक्षेकरीता घाई करीत आहेत. त्यांच्या करीता भाग्य लेख झाली व ती वेळ जवळ येऊन ठेपली. जेव्हा ते ह्या शिक्षेची गोडी चाखतील. काही वर्षाच्या आतच. त्या लोकांचा नायनाट केला गेला. जे शेवटपर्यंत शिर्क (अद्वैतभक्ति) करीत राहिले येथपावेतो की निरोपाच्या हज्ज याचे प्रसंगी (हिजरी सन ९) मक्केत एकहि अनेकेश्वरवादी शिल्लक राहिला नाही, एवढेच नव्हे तर संपूर्ण अरब देशात अनेकेश्वर वाद्यांचा नायनाट झाला होता. जणू मुसलमानांची तलवार अनेकेश्वर वाद्यांसाठी ईश-शिक्षा ठरली. अर्थात ही ईश-शिक्षा पूर्वीच्या जनसमूहांच्या ईश-शिक्षे पासून भिन्न जरुर होती परंतु पैगंबरांच्या विरोधकाना प्रत्येक स्थितीत विनाशाला तोंड द्यावे लागले.

या खेरीज हे हि एक सत्य आहे की मृत्यु अतिशय जवळची बाब होय आणि जेव्हा एखाद्या अनेकेश्वरवादी व काफीर इसमास मरण येते तेव्हा ईश शिक्षा घेऊन येणारे फिरिश्ते प्रकट होतात व त्याचा आत्मा आलम बर्जख (मरणोत्तर जीवनाची प्रथम अवस्था अर्थात कबरी) मध्ये ईश-शिक्षेची गोडी चाखत राहतो. मग कियामतीच्या दिवशी जी लवकरच प्रस्थापित होणार आहे अशा लोकांना नेहमी साठी जहन्नम मध्ये ढकलले जाईल. तात्पर्य अनेकेश्वरवादी व काफीर लोकांकरीता अल्लाहची शिक्षा कोणत्याही प्रकारे जवळ आहे.

२. अर्थात अल्लाहची शान या गोष्टी पासून उच्च आहे की त्याच्या ईशत्वात कोणी सहभागी असावा आणि जेव्हा हे लोक त्याच्याकडे अशा गोष्टीचा निर्देश करतात जी त्याच्या वैभवाहून उच्चतम आहे तेव्हा त्याच्या तर्फे ते शिक्षेलाच पात्र ठरु शकतात.

३. इथे 'रूह'शी अभिप्रेत वही (ईश-आदेश) होय, जी सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबरांवर अवतरीत करतो. ज्यार्थी ही आत्म्या प्रमाणे पैगंबराच्या हृदयावर अवतरीत होते तसेच याने माणसाला जीवन लाभते म्हणून यास आत्मा (Spirit)या अर्थाने घेतले गेले आहे.

आयतींवरून हे हि स्पष्ट झाले की प्रेषित्व हा अल्लाह प्रणित एक विशेष उपहार होय. ज्याने तो आपल्या त्या दासांना उपकृत करतो ज्यांना प्रेषित पदासाठी निवडतो. दुसऱ्या शब्दात प्रेषित्व ही अशी गोष्ट नव्हे जिला मनुष्य प्रयत्नाद्वारे प्राप्त करू शकेल किंबहुना ही अगदी अल्लाहकडूनच प्रदान केली जाणारी गोष्ट आहे. ज्यात मानव प्रयत्नांचा किंचित मात्र हस्तक्षेप नाही.

४. अर्थात जेव्हा जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे 'वही'आली आहे, तौहीद (एकेश्वरवादा) चाच संदेश घेऊन आली आहे. म्हणून समस्त प्रेषितांची शिकवण एकेश्वरवादाची शिकवण होती. आणि ईश-भयाच्या आधारावरच त्यांना जीवन व्यतीत करण्याचा आदेश दिला गेला होता.

स्पष्ट झाले की ज्या ज्या धर्मामध्ये शिर्क (द्वैतवादा) ची शिकवण दिसून येते तिचा संबंध एखाद्या पैगंबराशी जोडणे कदापि योग्य नव्हे आणि ना अशा प्रकारची गोष्ट 'वही' किंवा ईश-वाणी होऊ शकते.

५. याचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र. १२४ मध्ये केले गेले आहे.

६. म्हणजे मनुष्य आपल्या या वास्तवतेस विसरतो की तो एका तुच्छ वस्तु द्वारे निर्माण केला गेला आहे. आणि वाद करू लागला की दुसऱ्यांदा जीवन कसे शक्य आहे. जर त्याने आपल्या पहिल्या निर्मितीवर विचार केला असता तर त्याला हे उमजले असते की जो ईश्वर पाण्याच्या एका क्षुद्र थेंबापासून उच्च गुणांनी युक्त असा मान्व निर्माण करू शकतो. तो निश्चितच त्याला दुसऱ्यांदा निर्माण करण्याचे सामर्थ्य बाळगतो आणि या वस्तुस्थितीचे माणसाला आकलन झाल्यास तो ईश्वराच्या विरोधात वाद विवाद करण्याचे दु:साहस मुळीच करणार नाही.

७. म्हणजे त्यांच्या केसांपासून तुम्ही उबदार कपडे बनविता.

८. म्हणजे काही सवारीच्या कामी येतात तर काही नांगर चालविण्यासाठी तसेच त्यांच्यापासून दुधहि लाभते व त्यांचे चामडेहि उपयोगी पडते. अशा प्रकारे त्यांच्यापासून एक ना एक लाभ घडत असतो.

९. म्हणजे त्यांचे मांस तुमच्या खाद्याची गरज भागवते.

१०. ज्या अर्थी या चतुष्पादांपासून वेगवेगळे लाभ घडतात आणि ते वंश-संवर्धनासाठी पाळले जातात, जे आर्थिक प्राप्तीचे एक साधन आहे. म्हणून ते दृश्य मानव नजरेत मोठे नयन रम्य ठरते जेव्हा तो त्यांना चरल्यानंतर परत आणतो किंवा चरण्यासाठी मोकळे सोडतो.

स्पष्ट असावे की कुरआन अवतरणाच्या काळात अरब लोकात चतुष्पाद पाळण्याची प्रथा सार्वात्रिक होती तसेच हा त्यांचा खास धंदा हि होता म्हणून कुरआनने या ईश-देणगीची जाणीव देण्याकरीता हे दृश्य रेखाटले.

११. त्या काळात उंट व बैल ओझे वाहून नेण्याचे फार मोठे साधन होते.

१२. अल्लाह दयाळू आहे, म्हणून ह्या गोष्टी त्याने माणसाकरीता निर्माण केल्या ज्या त्याला कष्ट-यातनांपासून सुरक्षित राखणाऱ्या आहेत आणि तो मेहरबान आहे म्हणून त्याने माणसाला विविध देणग्यांनी उपकृत केले आहे.

आणि अल्लाह पावेतो सरळ मार्ग पोहचतो आणि असेहि मार्ग आहेत जे वक्र आहेत. त्याने इच्छिले असते तर तुम्हा सर्वांना सन्मार्गाला लावले असते. तोच होय ज्याने अकाशातून (वरून ) पाणी वर्षाविले, जे तुमच्या पिण्यास हि उपयोगी पडते व त्यापासून वनस्पति हि उगतात. ज्यात तुम्ही (गुरांना) चरवितात. (अल-क़ुर्आन)

८. त्याने घोडे, खच्चर व गाढवे निर्माण केलीत, अशासाठी की तुम्ही त्यांच्यावर सवार व्हावे [१३] आणि ते तुमच्या करीता शोभायमान व्हावेत आणि तो अशा वस्तूदेखील निर्माण करतो, ज्यांचे तुम्हाला ज्ञान नाही.[१४]

وَّالْخَيْلَ وَالْبِغَالَ وَالْحَمِيرَ لِتَرْكَبُوهَا وَزِينَةً ۚ
وَيَخْلُقُ مَا لَا تَعْلَمُونَ ﴿٨﴾

९. आणि अल्लाह पावेतो सरळ मार्ग पोहचतो [१५] आणि असेहि मार्ग आहेत जे वक्र आहेत. [१६] त्याने इच्छिले असते तर तुम्हा सर्वांना सन्मार्गाला लावले असते. [१७]

وَعَلَى اللَّهِ قَصْدُ السَّبِيلِ وَمِنْهَا جَائِرٌ ۚ وَلَوْ شَاءَ لَهَدَاكُمْ
أَجْمَعِينَ ﴿٩﴾

१०. तोच होय ज्याने अकाशातून (वरून ) पाणी वर्षाविले, जे तुमच्या पिण्यास हि उपयोगी पडते व त्यापासून वनस्पति हि उगतात. ज्यात तुम्ही (गुरांना) चरवितात.

هُوَ الَّذِي أَنزَلَ مِنَ السَّمَاءِ مَاءً ۖ لَّكُم مِّنْهُ
شَرَابٌ وَمِنْهُ شَجَرٌ فِيهِ تُسِيمُونَ ﴿١٠﴾

११. तो त्या पासून तुमच्यासाठी शेती, जैतून, खजूर, द्राक्षे व प्रत्येक प्रकारचे फळ निर्माण करतो. नि:संशय यात त्या लोकांकरीता मोठी निशाणी आहे जे विचार चिंतन करणारे आहेत.[१८]

يُنبِتُ لَكُم بِهِ الزَّرْعَ وَالزَّيْتُونَ وَالنَّخِيلَ
وَالْأَعْنَابَ وَمِن كُلِّ الثَّمَرَاتِ ۗ إِنَّ فِي ذَٰلِكَ
لَآيَةً لِّقَوْمٍ يَتَفَكَّرُونَ ﴿١١﴾

१२. त्याने रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्राला तुमच्या सेवेत लावले आहे.[१९] आणि तारे देखील त्याच्या हुकुमाने सेवेत आहेत.[२०]यात त्या लोकांकरीता मोठ्या निशाण्या आहेत जे बुद्धिचा वापर करतात.[२१]

وَسَخَّرَ لَكُمُ اللَّيْلَ وَالنَّهَارَ وَالشَّمْسَ وَالْقَمَرَ ۖ
وَالنُّجُومُ مُسَخَّرَاتٌ بِأَمْرِهِ ۗ إِنَّ فِي
ذَٰلِكَ لَآيَاتٍ لِّقَوْمٍ يَعْقِلُونَ ﴿١٢﴾

१३. आणि जमीनीवर ज्या रंग बिरंगी वस्तु निर्माण केल्या त्यातहि अशा लोकां करीता मोठी निशाणी आहे जे स्मरणिका प्राप्त करणारे आहेत.[२२]

وَمَا ذَرَأَ لَكُمْ فِي الْأَرْضِ مُخْتَلِفًا أَلْوَانُهُ ۗ إِنَّ فِي
ذَٰلِكَ لَآيَةً لِّقَوْمٍ يَذَّكَّرُونَ ﴿١٣﴾

१४. तोच होय ज्याने सागराला तुमच्या सेवेस लावले यासाठी की तुम्ही त्यापासून ताजे मांस (काढून) खावे [२३] त्या पासून दागिने काढावेत, ज्यांना तुम्ही घालता. [२४] तुम्ही हे पाहता की नावा पाण्यास फाडत चालतात, हे अशासाठी की तुम्ही त्याची कृपा शोधावी.[२५] व त्याच्याशी कृतज्ञशील व्हावे

وَهُوَ الَّذِي سَخَّرَ الْبَحْرَ لِتَأْكُلُوا مِنْهُ لَحْمًا
طَرِيًّا وَتَسْتَخْرِجُوا مِنْهُ حِلْيَةً تَلْبَسُونَهَا
وَتَرَى الْفُلْكَ مَوَاخِرَ فِيهِ وَلِتَبْتَغُوا
مِن فَضْلِهِ وَلَعَلَّكُمْ تَشْكُرُونَ ﴿١٤﴾

१३. वर अशा गुरांचा उल्लेख केला गेला ज्यांना अरबी भाषेत ‘अन्‌आम’ म्हटले जाते अर्थात उंट, गाय, शेळी, मेंढी वगैरे यांच्या विषयी फर्माविले गेले की مِنْهَا تَاْكُلُوْنَ ‘त्यांच्या पासून तुम्ही खाद्य प्राप्त करता’ तथापि येथे घोडे, खच्चर व गाढवांविषयी फर्माविले की ‘त्यांना या कारणास्तव निर्माण केले गेले की तुम्ही त्यांच्यावर सवार व्हावे’ या द्वारे हा संकेत मिळतो की ही जनावरे खाण्यायोग्य नाहीत, तर सवार होण्या योग्य. मनुष्य स्वभाव देखील घोडे, खच्चर व गाढवे खाण्यास प्रवृत्त नाही.

१४. संभवत: हा संकेत त्या सामर्थ्यांकडे आहे जी त्या वेळी माणसाच्या ज्ञान संग्रहात नव्हती तथापि नंतरच्या रहस्योद्‌घाटनांद्वारे त्यांच्याचमुळे माणसाला दळण वळणाची आधुनिक साधने लाभली. उदाहरणार्थ वाफ, पेट्रोल, वीज इत्यादी, ज्या द्वारे मोटारी, रेल्वे, विमाने ही वाहने चालतात आणि अल्लाहच जाणतो की आणखी कोण कोणत्या वस्तू आहेत ज्या त्याने माणसाच्या सेवेसाठी निर्माण केल्या आहेत.

१५. म्हणजे श्रद्धा व कर्माचा जो सरळ मार्ग आहे तोच अल्लाह पर्यंत पोहचणारा आहे. मनुष्य त्याच मार्गाने अल्लाहला प्राप्त करू शकतो व त्याची मर्जी संपादन करू शकतो. ह्या सरळ मार्गाचे परिभाषिक नाव ‘इस्लाम’ आहे ज्याकडे क़ुरआन आवाहन करीत आहे.

उपरोक्त आयतीत अल्लाहच्या ह्या देणगीचा उल्लेख केला गेला होता की त्याने सवारीकरीता जनावरे निर्माण केली याद्वारे मार्ग आणि ध्येय स्थळाची कल्पना आपोआप दृगोचर होते या प्रसंगानुषंगाने वाचकाच्या बुद्धित आंतरिक मार्ग व खऱ्याखुऱ्या ध्येयाकडे वळविले गेले की एकेश्वरवादाचा मार्ग हाच सरळ मार्ग होय व तोच अल्लाहपर्यंत पोहचतो. या द्वारे हे अनुमान लावले जाऊ शकते की क़ुरआनाच्या आयती कशा प्रकारे परस्पर सुसंगत आहेत ज्याअर्थी क़ुरआनाच्या दृष्टीपथात वैचारीक उभारणीचे उद्दिष्ट आहे म्हणून प्रसंगानुषंगाने कुरआन अत्युच्च सत्यांकडे बुद्धिला वळवितो आणि या पैलू द्वारे आयतींच्या दरम्यान गाढ संबंध निर्माण होतो.

१६. म्हणजे एकेश्वरवादा खेरीज जो इस्लामचा मार्ग आहे. अन्य मार्ग सरळ नाहीत, किंबहुना वेडे वाकडे आहेत आणि ते अल्लाहप्रत मुळीच पोहचत नाही. कोणीहि ह्या भ्रमात राहू नये की कोणत्याहि मार्गाचा अवलंब करून मनुष्य ईश्वर प्राप्ती करू शकतो आणि माणसाने एकेश्वरवाद मानावा किंवा अनेकेश्वरवादाचा अवलंब करावा याने ना शेवट बदलतो ना परिणतीमध्ये फरक घडून येतो.

आजच्या काळात केवळ लाभामागे धावणारे लोक राजकीय उद्दिष्टांना लक्षात घेऊन अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजेच्या मार्गासहि एकेश्वरवादाच्या मार्गा बरोबर व इस्लामसह अनेकेश्वरवादीय खोट्या धर्मांनाहि एकसमान ठरविण्याच्या वल्गना मोठ्या मनोवेधक शैलीत सादर करतात. या संदर्भात काही उदाहरणे पहा-

> ‘समस्त धर्मांचा आत्मा एक आहे मग त्याची रूपे अनेक का असेनात. अगदी तसेच, ज्याप्रमाणे पाण्याची हकीगत एक आहे जे विहीरीतूनहि उपलब्ध होते आणि झऱ्यांपासूनहि लाभते तसेच नद्या खोऱ्यांमधूनहि प्राप्त केले जाऊ शकते’. (गगनचा मजाहिब आलम अंक पा.६४)

> ‘‘जगातील समस्त श्रद्धा एकाच वृक्षाच्या फांद्यासमान आहेत व प्रत्येक फांदी दुसऱ्या फांदी पासून वेगळी आहे आणि आपले एक विशेष वैभव बाळगते तथापि या फांद्यांचे मूळ वा केंद्र एकच आहे’’.(वरील हवाला पा.८१८)

ही दोन्ही उदाहरणे मार्गभ्रष्ट करणारी आहेत कारण ज्या पाण्यात शिर्क (अनेकेश्वरवादा) ची घाण मिश्रित असावी ते एकेश्वरवादाच्या शुद्ध पाण्यापासून कसे असू शकते तसेच जो वृक्ष कडू फळे देतो तो गोड फळे देणाऱ्या वृक्षासमान कसा असू शकतो?

१७. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह अनआम टीप क्र. २७१.

१८. म्हणजे दैनंदिन जीवनात मनुष्य खाण्यापिण्याच्या ज्या देणग्यांचा लाभ घेतो त्यावर त्याने विचार चिंतन केले तर त्याला आपल्या पालन कर्त्याची ओळख पटू लागेल की ज्याने त्यास निर्माण केले आहे तोच त्याचा खराखुरा स्वामी व उपकार कर्ता आहे. ज्याने विविध देणग्यांनी त्याला उपकृत केले आहे.

आज मनुष्य आपल्या वैचारीक शक्तिला हे जाणून घेण्यास तर वापरतो की खाण्याच्या कोणत्या पदार्थात कोणत्या प्रकारचे जीवनसत्व (Vitamin)आहे आणि कॅलरीज (Calories) किती प्रमाणात आहे परंतु हा विचार करण्याचे श्रम घेत नाही की या सर्व वस्तू कोणी प्रदान केल्या आहेत आणि यांच्यापासून लाभ घेत, त्या सामर्थ्य बाबत तयांचा विचार करो असेल पाहिजेत व त्याच्याशी कसल्या प्रकारचे संबंध असले पाहिजे. ज्याने ही वस्तु त्याला दिले आहे मनुष्य जेव्हा आपल्या विचार शक्तिस या उद्दिष्टासाठी वापरत नाही तेव्हा तो केवळ ‘आर्थिक प्राणी’ बनून राहतो.

१९. मुसख्खर केले आहे. म्हणजे आपल्या जबरदस्त सामर्थ्यान्वये त्यांना असे बनविले आहे की ते तुमची सेवा करण्यात व तुम्हाला लाभ पोहचविण्याच्या कार्यास लागून

राहतात. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह इब्राहीम टीप क्र.४१

२०. ताऱ्यांचे काही लाभ तर अगदी उघड आहेत. उदा. त्यांचे आकाशाला शोभून दिसणे ज्याने माणसाच्या सौंदर्याभिरूचीच तृप्ति होते. त्यांच्या उदय अस्तामुळे वेळ निश्चितीत मदत मिळते. दिशा जाणून घेण्याचे ते साधन आहे यास्तव वाळवंटातील व सागरी प्रवासात त्यांचा उपयोग अगदी उघड आहे. या लाभांखेरीज ते आमची कोण कोणत्या प्रकारे सेवा करतात ते तर अल्लाहच अधिक चांगले जाणतो.

२१. म्हणजे माणसाने सामाणन्य बुद्धि चा (Common Sence) चा जर वापर केला तर त्याला हे जाणवल्याशिवाय राहणार नाही की त्याच्या निर्मात्याने देणग्यांचा खजिना केवळ जमीनीवरच ठेवलेला नाही, किंबहुना आकाशात हि त्याच्यासाठी सभा शोभविली आहे व त्याच्या सेवेची भरपूर सामुग्री केली आहे. ही जाणीव ज्यावेळी माणसाच्या मनात निर्माण होते तेव्हा त्याच्याकरीता मार्गदर्शनाचे द्वार उघडले जाते.

२२. अर्थात ह्या विविध रंगांच्या वस्तू ज्या जमीनीवर विखुरलेल्या आहेत. कलेचा उत्कृष्ट नमुना नव्हे काय? त्या पासून तुम्हाला बोध प्राप्त नाही होत? बोध ग्रहण करणारे तर पाना पाना वर त्याच्या कारागिरीच्या हातांनी लिहिलेला धडा वाचतात.

२३. म्हणजे समुद्रालाहि सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या जबरदस्त सामर्थ्यान्वये माणसा करीता लाभप्रद बनविले आहे. यास्तव समुद्र माणसा करीता मासळीच्या रुपाने खाद्यान्न उपलब्ध करून देतो.

२४. अर्थात मोती, प्रवाळ व शिंपले इत्यादिंची आभुषणे स्त्रीया परिधान करतात. हा मानव जातीचाच एक गुण आहे. म्हणून मानव जातीवर अल्लाहचा हा उपकार होय.

२५. म्हणजे व्यापार-यात्रा करून आपल्या आर्थिक गरजा भागविण्याकरीता उचित मार्गाचा अवलंब करा.

**आणि अल्लाह जाणतो जे काही तुम्ही लपविता व जे काही जाहीर करता. आणि हे लोक अल्लाहला सोडून ज्यांना पुकारतात ते कोणतीहि वस्तू निर्माण करीत नाही, किंबहुना स्वतः ईश-निर्मिती होत. (अल-क़ुर्आन)**

१५. आणि त्याने जमीनीवर पहाड कायम केलेत, जेणेकरून ती तुमच्या सवे डगमगू नये.[२६] त्याने नद्या प्रवाहित केल्या आणि मार्ग काढलेत [२७] यासाठी की तुम्हाला मार्ग लाभावा.[२८]

وَاَلْقٰى فِی الْاَرْضِ رَوَاسِیَ اَنْ تَمِیْدَ بِكُمْ وَاَنْهٰرًا وَّسُبُلًا
لَّعَلَّكُمْ تَهْتَدُوْنَ ۝١٥

१६. आणि त्याने इतर लक्षणे हि ठेवलीत. [२९] आणि ताऱ्यांपासूनहि लोग मार्ग प्राप्त करतात. [३०]

وَعَلٰمٰتٍ ؕ وَبِالنَّجْمِ هُمْ یَهْتَدُوْنَ ۝١٦

१७. मग काय जो निर्माण करतो, तो त्यांच्या समान आहे जे काही निर्माण करीत नाही ?[३१] काय तुम्हाला (एवढी गोष्ट देखील) समजत नाही?

اَفَمَنْ یَّخْلُقُ كَمَنْ لَّا یَخْلُقُ ؕ اَفَلَا تَذَكَّرُوْنَ ۝١٧

१८. जर तुम्ही अल्लाहच्या देणग्यांची गणना करू इच्छित असाल तर गणना करू शकत नाही. [३२] नि:संशय अल्लाह मोठा माफ करणारा, मोठा कृपावंत आहे.[३३]

وَاِنْ تَعُدُّوْا نِعْمَةَ اللّٰهِ لَا تُحْصُوْهَا ؕ اِنَّ اللّٰهَ لَغَفُوْرٌ رَّحِیْمٌ ۝١٨

१९. आणि अल्लाह जाणतो जे काही तुम्ही लपविता व जे काही जाहीर करता.[३४]

وَاللّٰهُ یَعْلَمُ مَا تُسِرُّوْنَ وَمَا تُعْلِنُوْنَ ۝١٩

२०. आणि हे लोक अल्लाहला सोडून ज्यांना पुकारतात ते कोणतीहि वस्तू निर्माण करीत नाही, किंबहुना स्वतः ईश-निर्मिती होत.[३५]

وَالَّذِیْنَ یَدْعُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ لَا یَخْلُقُوْنَ
شَیْـًٔا وَّهُمْ یُخْلَقُوْنَ ؕ ۝٢٠

२१. ते मृत आहेत, जिंवत नव्हे आणि त्यांना हे हि माहित नाही की त्यांना केव्हा उठवले जाईल.[३६]

اَمْوَاتٌ غَیْرُ اَحْیَآءٍ ۚ وَمَا یَشْعُرُوْنَ ۙ اَیَّانَ یُبْعَثُوْنَ ۝٢١

२२. तुमचा ईश्वर एकमेव ईश्वर आहे परंतु जे आखिरत वर ईमान राखत नाही त्यांची मने इन्कारच करीत राहतात आणि ते अंहकार-ग्रस्त झाले आहेत [३७]

اِلٰهُكُمْ اِلٰهٌ وَّاحِدٌ ۚ فَالَّذِیْنَ لَا یُؤْمِنُوْنَ
بِالْاٰخِرَةِ قُلُوْبُهُمْ مُّنْكِرَةٌ وَّهُمْ مُّسْتَكْبِرُوْنَ ۝٢٢

२३. नि:संशय अल्लाह जाणतो जे काही हे लपवितात व जे काही हे जाहरि करतात.तो अंहकार करणाऱ्यांना मुळीच पसंत करीत नाही.

لَا جَرَمَ اَنَّ اللّٰهَ یَعْلَمُ مَا یُسِرُّوْنَ وَمَا یُعْلِنُوْنَ ؕ
اِنَّهٗ لَا یُحِبُّ الْمُسْتَكْبِرِیْنَ ۝٢٣

२६. जमीनीचा ३/४ हिस्सा समुद्राने व्यापलेला आहे व भूमंडळ हवेत अधांतरीत आहे म्हणून नवल नव्हे की ज्या प्रमाणे नौका पाण्यात हेलकावेत व तिच्यात ओझे लादण्याने स्थिरता निर्माण होते तद्‌वतच अगदी सुरवातीला जमीनीची स्थिती देखील डळमळीत राहिली असेल आणि तिच्यावर पर्वतांचे ओझे टाकल्यामुळे समतोल स्थिती निर्माण झाली असेल.

२७. अभिप्रेत नैसर्गिक मार्ग होत.

२८. म्हणजे आपल्या ध्येया- प्रत पोहचू शकावे.

२९. अर्थात अशी चिन्हे की ज्यांना पाहून प्रवाशास आपला मार्ग ओळखणे शक्य व्हावे व आपल्या मजली पावेतो त्याने पोहचू शकावे.

३०. तारे दिशा जाणून घेण्याचे साधन आहे म्हणून प्राचीन काळात प्रवाशी यांच्याद्वारे मार्ग दर्शन प्राप्त करीत आणि आजच्या काळातहि नौकानयना (Nevigation)च्या कामात यांच्या साह्याने मार्गदर्शन प्राप्त केले जाते.

३१. म्हणजे जेव्हा ही एक इन्कार न करण्यायोग्य वस्तुस्थिती आहे की समस्त देणग्या अल्लाहनेच निर्मिलेल्या व त्यानेच प्रदान केलेल्या आहेत तेव्हा त्याचा दर्जा सर्वोच्च दर्जा ठरतो परंतु निर्मितीत ज्यांचा कसलाहि हिस्सा नाही, किंबहुना ते स्वत:च निर्मित आहेत तर त्यांचा दर्जा उच्च कसा असू शकतो. ही अगदी अयोग्य व न्यायाविरूद्ध गोष्ट होय की निर्माता व निर्मितीस एकाच तराजूत तोलले जावे आणि दोघांचे हक्क-अधिकार एकसमान मानावे, किंवा निर्मात्याचा दर्जा घटवून त्यास निर्मितीच्या पातळीवर आणावे अनेकेश्वरवाद्यांची खरी मार्गभ्रष्टता हीच होय की ते निर्माता व निर्मितीत फरक जाणत नाही आणि निर्मात्याची वैशिष्ट्ये व त्याच्या हक्काधिकारात निर्मितीस सहभागी ठरवितात. मूर्तिपूजा असो किंवा व्यक्तिपूजा सर्व ह्याच खोट्या श्रद्धेचा परिणाम होय.

३२. याचे स्पष्टीकरण सूरह इब्राहीम टीप क्र. ४३ मध्ये केले गेले आहे.

३३. अल्लाह मोठा माफ करणारा आहे. म्हणून तो तुम्हाला या गोष्टीचे आमंत्रण देत आहे की त्याच्या देणग्यांची कदर जाणत त्याच्या क्षमाशीलतेकडे द्रुतगतीने धाव घ्यावी आणि तो मोठा दयाळू आहे म्हणून तो असे इच्छितो की तुम्ही त्याचे दास्यत्व पत्करून त्याच्या दया-छत्राचा आश्रय घ्यावा.

३४. ही ताकीद आहे की जर तुम्ही अल्लाहच्या देणग्यांचा इन्कार करता तर लक्षात ठेवा अल्लाह तुमच्या अंतर्बाह्य स्वरूपास चांगल्या प्रकारे जाणतो आणि एक दिवस असा येईल की जेव्हा अल्लाह ह्या सर्व गोष्टी तुमच्या समोर उघडरित्या मांडील.

३५. येथे विशेषत: अनेकेश्वर वाद्यांच्या उपास्यांचा उल्लेख केला गेला आहे जी भूतकाळातील व्यक्तित्वे होती. जसे नंतरच्या आयतींवरून स्पष्ट होते.

३६. अर्थात भूतकाळातील त्या व्यक्ति होत ज्यांना अनेकेश्वरवादी लोक गरजपूर्ति करीता पुकारीत, त्यांना आर्जव करीत, दुआ (प्रार्थना) मागत आणि त्यांना अल्लाह समोर आपली शिफारस करणारे समजत इथे त्यांच्या या शिर्क वृत्तीचे खंडन करीत फर्माविले की ते प्रथम तर जिवंतच नाहीत जेणेकरून तुमची फिर्याद ऐकू शकतील कारण त्यांनी इहलोकाचा केव्हाच निरोप घेतला आहे. मरणोत्तर जीवनात यांचे आत्मे हे हि नाही जाणत की कियामत केव्हा प्रस्थापित होईल व त्यांना कबरीमधून केव्हा उठविले जाईल आणि जेव्हा हे आत्मे आपली स्थिती जाणत नाही तेव्हा तुमची स्थिती जाणण्यास, तुमचे आर्जव ऐकण्यास व तुमच्या गरजा भागविण्यास कशा प्रकारे समर्थ असू शकतात?गरजपूर्तिकरिता सर्वप्रथम त्या अपरोक्ष ज्ञानाची आवश्यकता आहे ज्या आधारे प्रत्येक व्यक्तिच्या स्थितीचे ज्ञान व्हावे व त्याचे आर्जव ऐकले जावे. अर्थात हे ज्ञान अल्लाहचे विशेष गुणवैशिष्ट्य आहे. ज्यात कोणीहि सहभागी नाही.

मेलेल्या लोकांना ईश्वरासमान हजर असल्याचे व पाहत असल्याचे समजणे एक मनोकल्पना आहे. ज्याला कसलेहि प्रमाण नाही व हेच शिर्कचे मूळ आहे.

स्पष्ट असावे की अरबचे अनेकेश्वरवादी, मरणोत्तर जीवनास मानणारे नसले तरी पूर्वी होऊन गेलेल्या ज्या विभूतिविषयी त्यांच्या मनात श्रद्धा होती, त्यांच्या बद्दल ते असे समजत की त्यांचे आत्मे ईश्वरीय व्यवस्थापनात काही ना काही अधिकार बाळगतात ते आमच्या फिर्यादीला प्रतिसाद देऊ शकतात. आमच्या भाग्य लेखावर प्रभाव पाडू शकतात. ते अल्लाह समोर आमच्यासाठी शिफारस करणारे आहेत आणि त्यांच्या माध्यमान्वये आम्ही अल्लाहशी निकट होऊ शकतो, म्हणून गरज पूर्ति करीता त्यांना पुकारण्यात व त्यांच्यापासून मदत मागण्यात काहीच हरकत नाही तथापि क़ुरआनने या संपूर्ण कल्पनेलाच खोटे व अनेकेश्वरवादीय ठरविले.

सर्व सामान्यात: भाष्यकारांनी या आयतीचा संबंध मूर्तिशी जोडला आहे परंतु आयतीचे शब्द याशी सुसंगत नाही विशेषत: त्यांना हे हि माहित नाही की ते केव्हा उठविले जातील या शब्द रचनेत स्पष्टत: मनुष्यच अभिप्रेत होऊ शकतात मूर्ति नव्हे. म्हणून याचा अर्थ निश्चित करण्यात ओढाताण करण्याची गरज नाही.

३७. म्हणजे ईश्वराचे एक:असणे ही एक स्पष्ट वस्तुस्थिती आहे. परंतु ज्या अर्थी एकेश्वरवादास मानल्याने अखिरतला मानणे आवश्यक ठरते. म्हणून ते लोक या गोष्टीस कोणत्याहि प्रकारे मानण्यास तयार होत नाही जे इहलोकात स्वैर जीवन व्यतीत करू इच्छितात आणि असत्य भक्तिच्या परिणामी त्यांचा स्वभाव असा बनला आहे की सत्यापुढे झुकण्यात आपल्या वैभवात तोटा होईल असे समजतात.

२४. आणि जेव्हा यांना विचारले जाते की तुमच्या पालन कर्त्याने कोणती गोष्ट अवतरीत केली आहे तेव्हा म्हणतात, पूर्वी होऊन गेलेल्या लोकांचे किस्से.[३८]

وَإِذَا قِيلَ لَهُم مَّاذَآ أَنزَلَ رَبُّكُمْ ۙ قَالُوٓا أَسَٰطِيرُ
ٱلْأَوَّلِينَ ﴿٢٤﴾

२५. अशासाठी की कियामतीच्या दिवशी त्यांनी आपली ओझी पूरेपूर उचलावीत आणि त्या लोकांच्या ओझ्याचा एक हिस्सा ज्यांना हे ज्ञानाशिवाय मार्गभ्रष्ट करीत आहेत [३९] तर पहा किती वाईट' ओझे आहे जे हे उचलतील !

لِيَحْمِلُوٓا أَوْزَارَهُمْ كَامِلَةً يَوْمَ ٱلْقِيَٰمَةِ ۙ
وَمِنْ أَوْزَارِ ٱلَّذِينَ يُضِلُّونَهُم بِغَيْرِ عِلْمٍ ۗ أَلَا سَآءَ مَا
يَزِرُونَ ﴿٢٥﴾

२६. यांच्या पूर्वीच्या लोकांनीहि डाव पेच खेळले परंतु अल्लाहने त्यांची इमारत पायापासून उखडून टाकली तेव्हा तिचे छत वरून त्यांच्यावर कोसळले [४०] आणि ईश-शिक्षा त्यांच्यावर अशा मार्गाने आली ज्याची त्यांना कल्पना सुद्धा नव्हती.

قَدْ مَكَرَ ٱلَّذِينَ مِن قَبْلِهِمْ فَأَتَى
ٱللَّهُ بُنْيَٰنَهُم مِّنَ ٱلْقَوَاعِدِ فَخَرَّ عَلَيْهِمُ ٱلسَّقْفُ مِن
فَوْقِهِمْ وَأَتَىٰهُمُ ٱلْعَذَابُ مِنْ حَيْثُ لَا يَشْعُرُونَ ﴿٢٦﴾

२७. मग क़्रियामतीच्या दिवशी तो त्यांना अपमानित करील व विचारेल, कोठे आहेत माझे ते सहभागी ज्यांच्या विषयी तुम्ही वाद घालीत होते ?[४१] (त्यावेळी) ते लोक ज्यांना ज्ञान प्रदान केले गेले होते, पुकारतील की आज आपमान आणि दुर्दशा आहे काफीरांकरीता. [४२]

ثُمَّ يَوْمَ ٱلْقِيَٰمَةِ يُخْزِيهِمْ وَيَقُولُ أَيْنَ شُرَكَآءِىَ ٱلَّذِينَ
كُنتُمْ تُشَٰٓقُّونَ فِيهِمْ ۚ قَالَ ٱلَّذِينَ أُوتُوا ٱلْعِلْمَ إِنَّ ٱلْخِزْىَ
ٱلْيَوْمَ وَٱلسُّوٓءَ عَلَى ٱلْكَٰفِرِينَ ﴿٢٧﴾

२८. प्राण ताब्यात घेणारे फिरिश्ते त्यांचा प्राण अशा स्थितीत ताब्यात [४३] घेतात की ते आपल्या प्राणांवर अत्याचार करीत असतात.[४४] त्यावेळी ते विनवणी करू लागतात की आम्ही तर कसले दुष्कृत्य करीत नव्हतो. नाही कसे ? तुम्ही जे काही करीत होता अल्लाह त्याबाबत चांगल्या प्रकारे जाणकार आहे.[४५]

ٱلَّذِينَ تَتَوَفَّىٰهُمُ ٱلْمَلَٰٓئِكَةُ ظَالِمِىٓ أَنفُسِهِمْ ۖ فَأَلْقَوُا ٱلسَّلَمَ
مَا كُنَّا نَعْمَلُ مِن سُوٓءٍ ۚ بَلَىٰٓ إِنَّ ٱللَّهَ
عَلِيمٌۢ بِمَا كُنتُمْ تَعْمَلُونَ ﴿٢٨﴾

२९. दाखल व्हा जहन्नमच्या दरवाज्यांमध्ये. त्यातच तुम्हाला सदैव रहावयाचे आहे. [४६] तर पहा, किती वाईट ठिकाण आहे गर्व करणाऱ्यांकरीता !

فَٱدْخُلُوٓا أَبْوَٰبَ جَهَنَّمَ خَٰلِدِينَ فِيهَا ۖ فَلَبِئْسَ
مَثْوَى ٱلْمُتَكَبِّرِينَ ﴿٢٩﴾

३८. क़ुरआनात सत्य व असत्याच्या संघर्षाचा इतिहास आणि होऊन गेलेल्या जन समूहांचे बोधजनक वृत्तांत वर्णिले गेले आहेत. याने बुद्धित एक भूकंप तर निर्माण केलेच होते, म्हणून लोक आपल्या प्रमुखांना विचारीत की हे क़ुरआन कशा प्रकारची वाणी आहे ते तत्क्षणी उत्तर देत की ह्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या कथा मात्र होत. सत्य काहीच नाही.

३९. अर्थात हे सरदार व नेते जे लोकांना मार्गभ्रष्ट करीत आहेत. कियामतीच्या दिवशी केवळ आपल्याच अपराधांचे ओझे लादून नसतील किंबहुना त्या लोकांच्या अपराधांच्या ओझाचाहि एक हिस्सा त्यांना उचलावा लागेल. ज्यांना त्यांनी मार्गभ्रष्ट केले होते. हदीस वचनानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांनी असे फर्माविले-

ومن دعا الی ضلالة کان علیه من الاثم مثل آثام من تبعه لا ینقص ذلک من آثامهم شیئا۔ (مسلم)

"आणि ज्याने मार्गभ्रष्टतेकडे बोलाविले. त्यावर अपराधाचा भार अशा प्रकारे असेल ज्या प्रकारे मार्गभ्रष्टता कबूल करणाऱ्यांवर असेल या शिवाय की त्यांच्या अपराधांमध्ये काही कमी न व्हावी." (मुस्लिम )

आणि 'ज्ञाना शिवाय'चा अर्थ असा की ईश्वर व धर्माबाबत हे जे काही म्हणतात त्या केवळ अज्ञानाच्या गोष्टी होत. सत्यज्ञानाचा प्रकाश त्यांना प्राप्तच नाही. उघड आहे ईश्वराबाबत तीच गोष्ट ज्ञाननिष्ठ असू शकते जी ईश्वराने दाखविली असेल, ती नव्हे जी माणसाने आपल्यातर्फे तिच्या संबंधी बोलावे. अर्थात ईश्वराच्या दाखविण्याचा मार्ग असा की तो आपल्या पैगंबरांवर वही पाठवितो जे ज्ञानाचे खास मध्यम आहे, म्हणून जी गोष्ट प्रेषितांच्या माध्यमान्वये लाभते ती ज्ञानावर आधारीत असते.

स्पष्ट झाले की समस्त अनेकेश्वरवादीय तत्वज्ञान आणि नास्तिक वादी दृष्टीकोन, मग ते कितीहि विद्वत्तापूर्ण शैलीत सादर केले गेले असोत. निव्वळ अज्ञान होय सत्य-ज्ञानाशी त्यांचा लांबूनहि संबंध नाही.

४०. म्हणजे असे कित्येक जन समूह यापूर्वी होऊन गेले आहेत ज्यांनी आपल्या प्रेषितांविरूद्ध कारस्थाने रचली, तथापि शिर्क आणि कुफ्र (इन्कार) च्या आधारावर जी व्यवस्था त्यांनी प्रस्थापित केली होती, प्रेषिताच्या सत्य- आवाहनाने तिचा धज्जा उडविला आणि जेव्हा अल्लाहचा फैसला लागू झाला तेव्हा ही व्यवस्था मुळासकट उपटली गेली व तिला प्रस्थापित करणाऱ्यांवर अशी आपत्ति कोसळली की अगदी नाशिवंत झाले. शिर्क आणि कुफ्र (इन्कार) चा हा परिणाम प्रत्यक्षत: ज्या स्वरूपात प्रकटला ती एक अशी ईश-शिक्षा होती जिने त्यांच्या बनविलेल्या ईमारतीस त्यांचेच थडगे बनविले. उदाहरणार्थ भूकांपाच्या धक्क्याने खालूनच त्यांच्या इमारतींचा पाया हादरविले आणि मग छतासह संपूर्ण इमारत त्यात राहणाऱ्यांवर कोसळली.

४१. म्हणजे ज्यांना तुम्ही माझ्या ईशत्वात सहभागी ठरवले होते व त्यासाठी तुम्ही मोठा वाद उभा केला होता. सांगा आता ते कुठे गायब झालेत!

४२. अर्थात जगात ज्यांना ज्ञान प्रदान केले गेले होते, दुसऱ्या शब्दात ज्यांनी या ज्ञानापासून लाभ प्राप्त केला होता ज्याचे मूल स्त्रोत ईश आदेश आहे हश्रच्या मैदानात अनेकेश्वरवाद्यांची ही स्थिती पाहून त्यांना हे जाणवेल की अनेकेश्वरवाद्यांच्या ज्या परिणतिची खबर ईश-आदेशाने दिली होती ती अगदी समक्ष आहे. तेव्हा ते उद्‌गारतील, आज काफीरांना आपली दुष्परिणति भोगावीच लागेल!

आयतीने हे हि स्पष्ट झाले की सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे हे कियामतीच्या दिवशी ज्ञानी लोकांना कशा प्रकारे सम्मानित करील.

४३. काफीरांबाबत सर्वश्रेष्ठ आल्लाहतर्फे हे स्पष्टीकरण होय की कियामतीच्या दिवशी तर यांचा असा शेवट होईल जो वर निवेदिला गेला परंतु ईश-शिक्षेच्या तावडीत तर ते त्याच वेळी सापडतात जेव्हा फिरिशते त्यांचे प्राण ताब्यात घेतात.

४४. म्हणजे शिर्क कुफ्र व बंडखोरी करून ते स्वत:वरच अत्याचार करीत असतात कारण ते आपल्या विवेकध्वनीची जो एकेश्वरावादाशीच परिचित आहे मुस्कटदाबी करतात ज्याच्या परिणामी आत्म्याची केवळ वाढ व विकासच थांबत नाही तर तो गुदमरत राहतो.

४५. म्हणजे मृत्युच्या फिरिश्त्यांना पाहताच त्यांच्या गर्वाची धुंद नाहीशी होते आणि आपले समस्त वाद आटोपते घेऊन स्वीकृति व आज्ञा पालनाचा मार्ग पत्करतात. त्या वेळी त्यांना एवढी दहशत होते की हे आपल्या दुष्कर्मांचा इन्कार करू लागतात परंतु फिरिशते त्यांच्या या असत्याचे खंडन करीत म्हणतात की अल्लाह तुमच्या कर्माविषयी अनभिज्ञ नाही, की ज्यामुळे खोटे बोलून तुम्ही सुटका करून घ्यावी.

४६. म्हणजे अनेकेश्वरवादी व काफीरांना फिरिश्ते मृत्यु-समयीच ही खबर देऊन टाकतात की तुम्हाला कियामतीच्या दिवशी जहन्नम मध्ये दाखल व्हावयाचे आहे.

हा मामला मुत्यु-हद्दीला सुरूवात होताच म्हणजे मरणोत्तर जीवनाच्या प्रथमावस्थेत उद्‌भवतो ज्याला हदीस वाचनात कबरीच्या अर्थाने घेतले गेले आहे.

३०. आणि जेव्हा अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांना विचारले जाते की तुमच्या पालन कर्त्याने कोणती गोष्ट अवतरीत केली आहे तेव्हा म्हणतात, सर्वोत्कृष्ट गोष्ट अवतरीत केली आहे. ज्या लोकांनी या जगात भलेपणाची कृत्ये केलीत, त्यांच्याकरीता भलेपणाच आहे. [४७] आणि आखिरतचे घर तर निश्चितच अधिक चांगले आहे आणि अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांचे घर किती चांगले आहे !

وَقِيلَ لِلَّذِينَ اتَّقَوْا مَاذَا أَنزَلَ رَبُّكُمْ ۚ
قَالُوا خَيْرًا ۗ لِّلَّذِينَ أَحْسَنُوا فِي هَٰذِهِ الدُّنْيَا
حَسَنَةٌ ۚ وَلَدَارُ الْآخِرَةِ خَيْرٌ ۚ وَلَنِعْمَ دَارُ الْمُتَّقِينَ ﴿٣٠﴾

३१. सदैव राहणाऱ्या बागा, ज्यांच्यात ते दाखल होतील. त्यांच्या खालून प्रवाह वाहत असतील तिथे त्यांच्याकरीता ते सर्व काही असेल जे काही ते इच्छितील.[४८]अशा प्रकारे अल्लाह ईश-भय बाळगणाऱ्यांना मोबदला प्रदान करील.

جَنَّاتُ عَدْنٍ يَدْخُلُونَهَا تَجْرِي مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ ۖ لَهُمْ فِيهَا
مَا يَشَاءُونَ ۚ كَذَٰلِكَ يَجْزِي اللَّهُ الْمُتَّقِينَ ﴿٣١﴾

३२. फिरिश्ते ज्यांचा स्वच्छ शुद्ध अवस्थेत [४९] प्राण ताब्यात घेतात. ते म्हणतात, सलाम (शांती) असो तुम्हावर दाखल व्हा जन्नतीत, आपल्या आचरणाच्या मोबदल्यात. [५०]

الَّذِينَ تَتَوَفَّاهُمُ الْمَلَائِكَةُ طَيِّبِينَ ۙ يَقُولُونَ سَلَامٌ عَلَيْكُمُ
ادْخُلُوا الْجَنَّةَ بِمَا كُنتُمْ تَعْمَلُونَ ﴿٣٢﴾

३३. या लोकांना या गोष्टी खेरीज अन्य कोणत्या गोष्टीची प्रतिक्षा आहे की फिरिश्ते त्यांच्याजवळ यावेत [५१] किंवा तुमच्या पालन कर्त्याचा आदेश (निर्णय) यावा. [५२] त्या लोकांनी देखील असेच केले होते, जे यांच्या पूर्वी होऊन गेले. अल्लाहने त्यांच्यावर अत्याचार केला नव्हता, किंबहुना ते स्वत:च आपल्यावर अत्याचार करीत राहिले.

هَلْ يَنظُرُونَ إِلَّا أَن تَأْتِيَهُمُ الْمَلَائِكَةُ أَوْ يَأْتِيَ أَمْرُ رَبِّكَ ۚ
كَذَٰلِكَ فَعَلَ الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ ۚ وَمَا ظَلَمَهُمُ اللَّهُ
وَلَٰكِن كَانُوا أَنفُسَهُمْ يَظْلِمُونَ ﴿٣٣﴾

३४. तेव्हा त्यांच्या दृष्कृत्यांची शिक्षा त्यांना मिळालीच आणि ज्या गोष्टीची ते थट्टा उडवित होते तिनेच त्यांना विळखा घातला. [५३]

فَأَصَابَهُمْ سَيِّئَاتُ مَا عَمِلُوا وَحَاقَ بِهِم
مَّا كَانُوا بِهِ يَسْتَهْزِئُونَ ﴿٣٤﴾

४७. ईश-भय आणि सत्कर्मांचे वर्तन अंगिकारणाऱ्यांना जो चांगला मोबदला इहलोकात मिळतो तो म्हणजे स्वच्छ शुद्ध उपजिविका स्वच्छ शुद्ध जीवन, मन:शांती, ईमानाची गोडी आणि खरी मान प्रतिष्ठा.

४८. माणसाला त्रास अशासाठीच होतो की तो इच्छितो ते त्याला मिळत नाही. अर्थात इहलोकात हे शक्यच नाही की माणसाची प्रत्येक इच्छा अभिलाषा पूर्ण व्हावी व जगात कोणताहि मनुष्य अगदी मोठ्यात मोठा बादशहा का असेना असा होऊन गेला नाही की ज्याच्या सर्व इच्छा फलद्रुप झाल्या असतील. असे असते तर हे विनाशी विश्व 'जन्नत' बनले असते परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने या जगास या उद्दिष्टाकरिता बनविलेच नाही म्हणून एखाद्याचे या जगापासून ही अपेक्षा बाळगणे की त्याच्या सर्व इच्छा-आकांक्षा येथे पूर्ण होतील तर हा निव्वळ भ्रम होय. सर्वश्रेष्ठ अल्लाहने या हेतुसाठी आखिरतमध्ये जन्नत बनविली आहे जिची व्याख्याच अशी की तिच्यात दाखल होणाऱ्याची प्रत्येक इच्छा पूर्ण होईल त्याची प्रत्येक अपेक्षा फलद्रुप होईल. त्याची प्रत्येक अभिलाषा वस्तुस्थितीचे रुप धारण करील, त्याची सर्व स्वप्ने साकार होतील व त्याचे प्रत्येक मनोरथ पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही.

४९. अर्थात या स्थितीत की त्यांचा आत्मा शिर्क (अनेकेश्वरवाद) सत्याचा विरोध,गर्व आणि अपराधांच्या मिश्रणापासून अगदी स्वच्छ-शुद्ध होतो.

५०. खऱ्या ईश-भय बाळगणाऱ्यांना फिरिश्ते जन्नतची खुश खबरी मृत्यु समयीच देऊन टाकतात.

५१. म्हणजे मृत्युचे फिरिश्ते.

५२. अर्थात अजाब (अल्लाहचा प्रकोप, शिक्षा)

५३.म्हणजे ज्या ईश-शिक्षेची ते थट्टा उडवित होते. तिने वाईटरित्या त्यांना वेढून घेतले.

३५. अनेकेश्वरवादी म्हणतात की अल्लाहने इच्छिले असते तर त्याच्या खेरीज आम्ही कोणाचीहि भक्ति उपासना केली नसती ना आम्ही ना आमचे वाडवडील, आणि ना आम्ही त्याच्या (आदेशा) शिवाय एखाद्या गोष्टीस हराम ठरविले असते. हेच वर्तन त्या लोकांनीहि अंगिकारले होते जे यांच्या पूर्वी होऊन गेले. [५४] तर काय प्रेषितांवर उघड उघड संदेश पोहचविण्या खेरीज अन्य एखादी जबाबदारी आहे?

وَقَالَ الَّذِينَ أَشْرَكُوا لَوْ شَاءَ اللَّهُ مَا عَبَدْنَا مِن دُونِهِ
مِن شَيْءٍ نَّحْنُ وَلَا آبَاؤُنَا وَلَا حَرَّمْنَا مِن دُونِهِ مِن شَيْءٍ
كَذَٰلِكَ فَعَلَ الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ فَهَلْ عَلَى الرُّسُلِ إِلَّا
الْبَلَاغُ الْمُبِينُ ٣٥

३६. आम्ही प्रत्येक जन समूहात एक प्रेषित पाठविला (या मार्गदर्शना सह) की अल्लाहची उपासना करा 'तागूत' (मूर्ति) पासून स्वत:ला वाचवा. [५५] मग त्याने काहींना मार्गदर्शन केले व काहींवर मार्गभ्रष्टता आच्छादित झाली. [५६] तेव्हा जमीनीवर हिंडून फिरून बघा की खोटे ठरविणाऱ्यांचा काय शेवट झाला.

وَلَقَدْ بَعَثْنَا فِي كُلِّ أُمَّةٍ رَّسُولًا أَنِ اعْبُدُوا اللَّهَ
وَاجْتَنِبُوا الطَّاغُوتَ فَمِنْهُم مَّنْ هَدَى اللَّهُ وَمِنْهُم
مَّنْ حَقَّتْ عَلَيْهِ الضَّلَالَةُ فَسِيرُوا فِي الْأَرْضِ فَانظُرُوا
كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ الْمُكَذِّبِينَ ٣٦

३७. जर तुम्ही त्यांना मार्गदर्शन लाभावे या गोष्टीची उत्कट इच्छा बाळगता तर अल्लाह अशा लोकांना मार्गदर्शन करीत नाही ज्यांना तो मार्ग भ्रष्ट करतो. [५७] आणि त्यांना कोणी सहाय्य कर्ता असू शकत नाही.

إِن تَحْرِصْ عَلَىٰ هُدَاهُمْ فَإِنَّ اللَّهَ لَا يَهْدِي
مَن يُضِلُّ وَمَا لَهُم مِّن نَّاصِرِينَ ٣٧

३८. आणि हे अल्लाहच्या दृढ शपथा वाहून म्हणतात की जो मरण पावतो त्याला अल्लाह (पून्हा उठविणार नाही-का नव्हे ? हा तर एक अत्यावश्यक वायदा होय जो त्याच्या जबाबदारीवर आहे. तथापि अधिकांश लोक जाणत नाहीत.[५८]

وَأَقْسَمُوا بِاللَّهِ جَهْدَ أَيْمَانِهِمْ لَا يَبْعَثُ اللَّهُ مَن يَمُوتُ
بَلَىٰ وَعْدًا عَلَيْهِ حَقًّا وَلَٰكِنَّ أَكْثَرَ النَّاسِ لَا يَعْلَمُونَ ٣٨

३९. अशासाठी की ज्या गोष्टी बाबत हे मतभेद करीत आहेत तिला त्याने उघड करावे आणि काफिरांना कळून यावे की ते खोटारडे होते. [५९]

لِيُبَيِّنَ لَهُمُ الَّذِي يَخْتَلِفُونَ فِيهِ وَلِيَعْلَمَ الَّذِينَ كَفَرُوا
أَنَّهُمْ كَانُوا كَاذِبِينَ ٣٩

४०. आम्ही जेव्हा एखाद्या गोष्टीचा इरादा करतो तेव्हा आम्हाला फक्त हेच म्हणावे लागते की घडून ये व ती घडून येते. [६०]

إِنَّمَا قَوْلُنَا لِشَيْءٍ إِذَا أَرَدْنَاهُ أَن نَّقُولَ لَهُ كُن فَيَكُونُ ٤٠

५४. म्हणजे या केवळ सबबी होत. सत्य-स्वीकृतिच्या जबाबदारीपासून स्वत:ला वाचविण्या करिता. आणि असेच बहाणे व विवाद भूतकाळातील मार्गभ्रष्ट जन-समूह करीत राहीले. आपल्या मार्गभ्रष्टतेची जबाबदारी अल्लाहवर टाकणे त्याच लोकांचे काम होय जे अल्लाह व त्याच्या धर्माबाबत गंभीर होत नाही.

५५. इथे 'तागूत'शी अभिप्रेत मूर्ति होय व त्यांना 'तागूत' अशासाठी म्हटले गेले आहे की त्यांची उपासना करून मनुष्य अल्लाहशी बंडखोर व विद्रोही बनतो. तात्पर्य मूर्ति विद्रोह व बंडखोर वृत्तीचे माध्यम होय व केंद्र देखील आणि 'तागूत' पासून सुरक्षित राहण्याचा अर्थ मूर्ति पूजेपासून अलिप्त राहणे. यास्तव पवित्र क़ुरआनात अन्यस्थानी फर्माविले गेले आहे:-

وَالَّذِيْنَ اجْتَنَبُوا الطَّاغُوْتَ اَنْ يَّعْبُدُوْهَا وَاَنَابُوْٓا اِلَى اللّٰهِ لَهُمُ الْبُشْرٰى۔ (سورہ زمر آیت نمبر:١٧)

''आणि ज्यांनी तागूतच्या पूजेपासून अलिप्तता अंगिकारली व अल्लाहकडे रूजू केले. त्यांच्या करीता खुशखबरी आहे'' (ज़ुमर :१७)

فَاجْتَنِبُوا الرِّجْسَ مِنَ الْاَوْثَانِ۔ (سورہ حج:٣٠)

''मूर्तिच्या घाणीपासून स्वत:ला वाचवा'' (हज्ज :३०)

وَاجْنُبْنِىْ وَبَنِىَّ اَنْ نَّعْبُدَ الْاَصْنَامَ۔ (سورہ ابراہیم:٣٥)

''(इब्राहीम ने प्रार्थना केली) मला व माझ्या संततीला मूर्ति पूजेपासून वाचव.'' (इब्राहीम -३०)

आयतीचा अर्थ असा की मूर्ति पूजा जी प्रत्येक काळात ईश्वराशी विद्रोहाचे माध्यम राहीले आहे प्रत्येक प्रेषित आपल्या जन-समूहास यापासून स्वत:ला वाचविण्याची ताकीद करीत राहीला व त्याचे आवाहन देखील हेच राहिले की एकमेव ईश्वराचीच उपासना करा.

स्पष्ट व्हावे की मूळ शब्द 'तागूत' शैतानाला देखील लागू पडतो व खोट्या उपास्यांनाहि तसेच बंडखोर नेते, व प्रमूखांनाहि तो लागू पडतो. आणि ईश्वराच्या कायद्याच्या विरोधात कायदा रचणारे व स्वरचित कायद्यांप्रमाणे निर्णय देणाऱ्या शासकांनाहि लागू पडतो. तथापि तो परिस्थितीनुरूप लागू पडतो. इथे संभाषण-प्रसंग प्रमाण होय की विशेषत:मूर्ति पूजेपासून अलिप्त राहण्याची ताकीद केली जात आहे.

('तागूत'च्या अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र.४१८ सूरह निसा टीप क्र.१२८ व १४३ तसेच सूरह मायदा टीप क्र.१८०)

५६. म्हणजे या प्रेषितांच्या सत्य आवाहनाचा परिणाम म्हणून एका समूहाने अल्लाह प्रणित सुबुद्धिने मार्गदर्शन प्राप्त केले आणि दुसरा समूह आपल्या हटवादीपणामूळे मार्गदर्शनापासून वंचित राहिला व त्यावर मार्गभ्रष्टता वाईटरित्या आच्छादित झाली.

५७. म्हणजे ज्या लोकांना अल्लाहचा अपमानीत करणारा कायदा लागू झाला आहे त्यांना मार्गदर्शनाचा लाभ कधीच घडणार नाही मग तुम्ही कितीहि उत्कटतेने त्यांना मार्गदर्शन लाभण्याची इच्छा बाळगा.

५८. अल्लाहचे हे निश्चित वचन आहे की कियामतीच्या दिवशी मरण पावलेल्या लोकांना तो दुसऱ्यांदा जिवंत करील यासाठी की मोबदला व शिक्षेचा व्यवहार घडावा. परंतु बहुतेक लोक या वचनाशी बेखबर असल्याने ते मोठ्या दृढतेने याचे खंडन करतात. तथापि त्यांच्या अजाणतेमुळे वस्तुस्थिती बदलणार नाही. दुसऱ्यांदा (जिवंत) उठविले जाण्याची घटना अनिवार्यपणे घडेल मग यावर कोणी ईमान बाळगो अथवा न बाळगो.

५९. म्हणजे ईश्वर व धर्माविषयी जे मतभेद लोकांमध्ये निर्माण झाले तसेच आचरणाचे जे विविध मार्ग निर्माण झाले त्यांना लक्षात घेता हे आवशयक ठरते की सर्वांना दुसऱ्यांदा जिवंत करून एकत्रित केले जावे व वस्तुस्थितीस अनावरित करून त्यांना दाखवून दिली जावी आणि जे लोक वस्तुस्थितीचा इन्कार करीत राहिले त्यांचे खोटेपण सिद्ध व्हावे म्हणजे त्यांनी आपल्या कृत कर्मांचे फळ चाखावे. न्यायाची ही उघड निकड आहे. दुसऱ्यांदा (जिवंत) उठविली जाण्याची खबर बुद्धिच्या विपरीत नाही किंबहुना बुद्धिला अगदी अनुसरून आहे.

६०.इन्कार करणाऱ्यांच्या त्या शंकेला हे उत्तर आहे की अगणित माणसांना पुनश्च जीवन प्रदान करणे कशा प्रकारे शक्य आहे? फर्माविले की अल्लाह जेव्हा एखाद्या गोष्टीचा इरादा फर्मावितो तर त्यासाठी त्याला काहीहि करावे लागत नाही. तो केवळ आदेश देतो की 'घडून ये' तत्क्षणी ती गोष्ट अस्तित्वात येते. एवढे जबरदस्त सामर्थ्य बाळगणाऱ्या अल्लाह करीता मृतांना पुन्हा जिवंत करणे किंचितहि कठीण नाही.

खरे म्हणजे मनुष्य मोठा संकुचित दृष्टीकोन बाळगणारा आहे. अल्लाहच्या सामर्थ्याचे तो स्वत:च बनविलेल्या परिमाणांनी मोज माप घेतो व जे काही अस्तित्वात आहे तेच शक्य असल्याचे समजते सृष्टी रचयित्याने अस्तित्वात नसलेल्या गोष्टीस अस्तित्वात आणण्याची खबर दिली असली तरी तो मान्य करण्यास तयार नसतो.

४१. ज्या लोकांनी स्वत:वर अत्याचार झाला असतांना अल्लाहच्या मार्गात हिजरत (स्थलांतर) केली [६१] आम्ही त्यांना जगात खचितच चांगले स्थान देऊ [६२] आणि आखिरतचा मोबदला तर किती तरी अधिक आहे, जर त्यांनी हे जाणून घेतले असते.[६३]

وَالَّذِيْنَ هَاجَرُوْا فِي اللّٰهِ مِنْ بَعْدِ مَا
ظُلِمُوْا لَنُبَوِّئَنَّهُمْ فِي الدُّنْيَا حَسَنَةً وَلَاَجْرُ
الْاٰخِرَةِ اَكْبَرُ لَوْ كَانُوْا يَعْلَمُوْنَ ﴿٤١﴾

४२. ज्यांनी धीर धरला आणि जे आपल्या पालन कर्त्यावर भरवसा ठेवतात.

الَّذِيْنَ صَبَرُوْا وَعَلٰى رَبِّهِمْ يَتَوَكَّلُوْنَ ﴿٤٢﴾

४३. आम्ही तुमच्या पूर्वीहि पुरुषांनाच रसूल (प्रेषित) बनवून पाठविले होते. ज्यांच्याकडे आम्ही वही पाठवित राहिलो [६४] जर तुम्ही हे जाणत नाही तर 'जिक्र' वाल्यांना (ज्यांच्यावर या पूर्वी ग्रंथ अवतरले होते) विचारून घ्या.[६५]

وَمَآ اَرْسَلْنَا مِنْ قَبْلِكَ اِلَّا رِجَالًا نُّوْحِيْٓ اِلَيْهِمْ فَسْـَٔلُوْٓا اَهْلَ
الذِّكْرِ اِنْ كُنْتُمْ لَا تَعْلَمُوْنَ ﴿٤٣﴾

४४. त्या (प्रेषितां) ना दिव्य चिन्हे आणि ग्रंथांसह पाठविले होते आणि (हे पैगंबर) तुमच्यावर देखील आम्ही ही समरणिका अवतरीत केली आहे अशासाठी की तुम्ही लोकांना ती गोष्ट स्पष्टपणे सांगावी, जी त्यांच्याकडे पाठविली गेली आहे [६६] आणि यासाठी की त्यांनी विचार-चिंतन करावे.

بِالْبَيِّنٰتِ وَالزُّبُرِ وَاَنْزَلْنَآ اِلَيْكَ الذِّكْرَ لِتُبَيِّنَ لِلنَّاسِ
مَا نُزِّلَ اِلَيْهِمْ وَلَعَلَّهُمْ يَتَفَكَّرُوْنَ ﴿٤٤﴾

४५. मग काय हे लोक जे वाईट कारस्थाने रचत आहेत या गोष्टीपासून निर्भय झाले आहेत की अल्लाहने त्यांना जमीनीत धसवून द्यावे किंवा अशा मार्गाने त्यांच्यावर ईश-शिक्षा यावी ज्याची त्यांना कल्पनाहि नसावी.

اَفَاَمِنَ الَّذِيْنَ مَكَرُوا السَّيِّاٰتِ اَنْ يَّخْسِفَ اللّٰهُ بِهِمُ الْاَرْضَ
اَوْ يَاْتِيَهُمُ الْعَذَابُ مِنْ حَيْثُ لَا يَشْعُرُوْنَ ﴿٤٥﴾

४६. किंवा अशा वेळी त्यांना धरावे की ते चालत फिरत असावेत. हे लोक त्याच्या पकडीतून मुळीच सुरक्षित राहू शकत नाही.

اَوْ يَاْخُذَهُمْ فِيْ تَقَلُّبِهِمْ فَمَا هُمْ بِمُعْجِزِيْنَ ﴿٤٦﴾

४७. किंवा अशा वेळी त्यांना धरावे की ते भय ग्रस्त असावेत.[६७] वस्तुतः तुमचा पालनकर्ता मोठा ममताळू व कृपाळू आहे. [६८]

اَوْ يَاْخُذَهُمْ عَلٰى تَخَوُّفٍ فَاِنَّ رَبَّكُمْ لَرَءُوْفٌ رَّحِيْمٌ ﴿٤٧﴾

६१. हबश (ॲबिसिनीया ) देशाकडे झालेल्या स्थलांतराकडे इशारा आहे ही घटना प्रेषितत्वाच्या पाचव्या वर्षी घडली. मक्केत ज्या लोकांनी इस्लाम धर्म स्वीकारला होता त्यांच्यावर अनेकेश्वरवादी निरनिराळ्या प्रकारे अत्याचार करीत होते. ते त्यांना विवेक व धर्म स्वातंत्र्य देण्यास तयार नव्हते. त्यांच्या या अत्याचारांनी अगतिक होऊन आपल्या धर्माच्या रक्षणार्थ मुसलमानांच्या एका संख्येने हबश (ॲबिसिनिया) कडे स्थलांतर केले. पहिल्या काफिल्यात सुमारे १५ जण होते ज्यात चार स्त्रीया होत्या नंतर ही संख्या ८३ पर्यंत पोहचली हबश स्थलांतराचे सद्भाग्य प्राप्त करणाऱ्यांमध्ये हजरत उस्मान, त्यांची पत्नी रूकय्या जी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची सुपुत्री होती. हजरत जुबेर बिन अलअवाम हजरत अब्दुल रहमान बिन औफ, हातिब बिन अम्र व हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद आणि हजरत जाफर (रजि.) सारखे थोर पुरुष सामील होते. (या घटनेचे विवरण सिरत इब्ने हिशाम खंड १ पृ. ३४३ ते ३६४ मध्ये निवेदन केले गेले आहे.)

६२. सर्वश्रेष्ठ अल्लाहचा हा वायदा महाजिरीन (देश-त्याग केलेल्या) च्या हक्कात पूर्ण झाला. यास्तव हबशाधिपतीने, जो हजरत ईसा यांच्यावर ईमान बाळगत होता, त्यांना आपल्या देशात शांतीपूर्वक राहण्याची अनुज्ञा दिली आणि अनेकेश्वर वाद्यांचे जे नेते मक्केहून त्याला भडकविण्यासाठी हबश देशास पोहचले होते, त्यांचा कसलाहि परिणाम मनावर होऊ दिला नाही. एवढेच नव्हे तर त्याने स्वत: पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ईमान आणले.

नंतर जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मदीनेस स्थलांतर केले तेव्हा ह्या महाजिरीननी देखील मदीनेस स्थलांतर केले. ही त्यांची दुसऱ्यांदा हिजरत होती आणि मदीनेत सर्वश्रेष्ठ अल्लाहने देश-त्याग केलेल्यांना अशी मान-प्रतिष्ठा प्रदान केली ज्याची यापूर्वी कोणी कल्पना करू शकत नव्हता.

६३. म्हणजे देश-त्याग केलेल्यांना जर या गोष्टींची जाणीव होईल की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्यासाठी केवढा मोठा मोबदला तयार राखला आहे तर त्यांच्या सर्व कष्ट-यातना ज्या हिजरतच्या मार्गात होत आहेत, नाहिशा होतील.

६४. मूळ ग्रंथात 'रिजालन' हा शब्द प्रयोग झाला आहे. त्याचा अर्थ 'पुरुष' अशा आहे. यावरून हे स्पष्ट झाले की माणसांपैकी पुरुषांनाच प्रेषित बनवून पाठविले गेले.

६५. अभिप्रेत ग्रंथ-धारक होत. ज्यांच्यावर जिक्र अर्थात बोध (स्मरणिका) अवतरली होती. या स्मरणिकेचा जो हिस्सा त्यांच्या ग्रंथांमध्ये अस्तित्वात आहे तो या गोष्टीस सिद्ध करण्यास पुरेसा आहे की अल्लाह तर्फे जेजे प्रेषित पाठविले गेले ते सर्व मनुष्यच होते. एखाद्या फिरिश्त्यास प्रेषित बनवून एखाद्या जनसमूहाकडे कधीहि पाठविले गेले नाही हे एक स्पष्ट असे ऐतिहासिक सत्य होय आणि जर या सत्याशी एखादा मनुष्य परिचित नाही तर ग्रंथ धारकांना विचारून तो आपल्या शंकेचे निरसन करू शकतो.

स्पष्ट व्हावे की ग्रंथ-धारक या गोष्टीस मानणारे होते की प्रेषित माणसांमधूनच बनविले जात राहिले उदा. हजरत मूसा व हजरत ईसा दोन्हीहि मनुष्य होते, यास्तव बायबलमध्ये त्यांच्या बाल वयातील परिस्थितीहि वर्णिली गेली आहे की त्यांना कशा प्रकारे संगोपन लाभले म्हणून पवित्र क़ुरआनने अनेकेश्वरवाद्यांना जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वस्ल्लम) यांच्या प्रेषितत्वाचा या कारणास्तव इन्कार करीत होते जे की तुम्ही मनुष्य आहात व एका अशा गोष्टीकडे लक्ष वेधता जी ग्रंथ धारकांच्या येथे सर्वमान्य होती.

यावरून ओघाओघाने ही गोष्ट देखील ज्ञात होते की क़ुरआनातील ज्या गोष्टींचे समर्थन पूर्वीच्या ग्रंथांद्वारे होते. त्याचा हवाला देण्यात हरकत नाही.

काही विद्वानांनी क़ुरआनातील,'जर तुम्ही जाणत नाही तर जिक्र वाल्यांना विचारा' या कथनाने फिकही मसलक (पंथा) च्या अनुसरणास योग्य साबीत करण्याची इच्छा बाळगली आहे. वस्तुत: ह्या आयतीचा 'फिकही' व वैयक्तिक 'तकलीद'शी दूरचा देखील संबंध नाही. क़ुरआनने एका स्पष्ट सत्या संदर्भात जे क्रमानुसार होते, ग्रंथ-धारकांकडे रूजू करण्याकरीता म्हटले होते, अशासाठी की जी शंका अनेकेश्वरवाद्यांना जाणवत होती तिचे निरसन व्हावे परंतु फिकहानुयायींच्या (तकलीद करणाऱ्यांच्या) उद्धृत समस्या (इस्तिबांती मसाइल) बाबत व्यक्तिगत अनुनया (शख्सी तकलीद) करिता यास प्रमाण बनवितात उलट उद्धृत केल्या गेलेल्या समस्यांमध्ये चूक घडण्याची हि शक्यता आहे आणि कोणत्याहिं स्थितीत त्यांचे स्वरूप सर्वमान्य (मुसलमान) चे नाही. क़ुरआनाने कसल्याहि वैशिष्ट्याविना जिक्र वाल्यांना विचारण्यास सांगितले आहे म्हणजे टकसाळी विद्वानच हवा असे बंधन नाही, तर तो जाणकार असावा एवढेच पुरेसे आहे.

६६. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने जे काही अवतरीत केले आहे. त्याचे स्पष्टीकरणासह लोकांसमोर निवेदन करा. पुढे आयत क्र.६४ मध्येहि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना याच प्रकारचा आदेश दिला गेला आहे.

وَمَآ اَنۡزَلۡنَا عَلَيۡكَ الۡكِتٰبَ اِلَّا لِتُبَيِّنَ لَهُمُ الَّذِى اخۡتَلَفُوۡا فِيۡهِ ۙ (نحل:٦٤)

'' आम्ही तुम्हावर ग्रंथ या करीताच अवतरीत केला आहे की तुम्ही लोकांना त्यांच्या मतभेदाची हकीगत उघडरित्या निवेदन करावी''. (नहल-६४)

यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी क़ुरआनातील आयती, त्याची शिकवण व त्याच्या आदेशांचे ज्या प्रकारे स्पष्टीकरण केले आहे आणि त्याच्या रहस्य भेदांना व बुद्धि कौशल्यास ज्या प्रकारे विशद केले आहे. ते ईश-ग्रंथाचे (अर्थात क़ुरआनाचे ) प्रमाणभूत स्पष्टीकरण व भाष्य आहे आणि आमच्या साठी ते जाणून घेण्याचे साधन 'अहादीस सहीह' होय.

६७. म्हणजे आधीच भयग्रस्त दशेत असावेत, मग नंतर ईश्वरातर्फे पकड व्हावी आणि संकटा मागून संकटाची गोडी त्यांना चाखावी लागावी. या आयतींच्या अवतरणा नंतर काही वर्षांनी याच प्रकारच्या परिस्थितीशी मक्केच्या काफिरांना सामना करावा लागला. बद्रचे युद्ध एक भय ग्रस्त दशा होती ज्यात मुसलमानांची तलवार काफीरांवर ईश-प्रकोप बनून प्रहार करीत गेली.

६८. अल्लाह ममताळू व कृपाळू आहे म्हणून शिक्षा देण्यात तो घाई करीत नाही, किंबहुना संधी देतो. अशासाठी की तुम्ही स्वत:ला सावरून घ्यावे व त्याच्या कृपेस पात्र व्हावे.

काय या लोकांना दिसून येत नाही की अल्लाहने जी काही वस्तू निर्माण केली आहे तिची छाया कशा प्रकारे अल्लाह समोर सजदा करीत उजवीकडे व डावीकडे पडते सर्व त्याच्या समोर झुकलेले आहेत. आकाशांमध्ये व जमीनीवर जेवढे सजीव आहेत सर्व अल्लाहलाच सजदा करतात आणि फिरिश्ते देखील ते विद्रोह करीत नाहीत. (अल-क़ुर्आन)

४८. काय या लोकांना दिसून येत नाही की अल्लाहने जी काही वस्तू निर्माण केली आहे तिची छाया कशा प्रकारे अल्लाह समोर सजदा करीत उजवीकडे व डावीकडे पडते [६९] सर्व त्याच्या समोर झुकलेले आहेत. [७०]

أَوَلَمْ يَرَوْا إِلَىٰ مَا خَلَقَ اللَّهُ مِن شَيْءٍ يَتَفَيَّأُ ظِلَالُهُ عَنِ
الْيَمِينِ وَالشَّمَائِلِ سُجَّدًا لِّلَّهِ وَهُمْ دَاخِرُونَ ﴿٤٨﴾

४९. आकाशांमध्ये व जमीनीवर जेवढे सजीव आहेत सर्व अल्लाहलाच सजदा करतात [७१] आणि फिरिश्ते देखील ते विद्रोह करीत नाहीत.

وَلِلَّهِ يَسْجُدُ مَا فِي السَّمَاوَاتِ وَمَا فِي الْأَرْضِ مِن
دَابَّةٍ وَالْمَلَائِكَةُ وَهُمْ لَا يَسْتَكْبِرُونَ ﴿٤٩﴾

५०. आपल्या वरती असलेल्या पालन कर्त्याचे भय बाळगतात आणि जो आदेश दिला जातो, त्याची अमल बजावणी करतात. [७२]

يَخَافُونَ رَبَّهُم مِّن فَوْقِهِمْ وَيَفْعَلُونَ مَا يُؤْمَرُونَ ۩ ﴿٥٠﴾

५१. आणि अल्लाहने फर्माविले, दोन ईश्वर बनवू नका. ईश्वर केवळ एकच आहे.[७३] यास्तव माझेच भय बाळगा.

وَقَالَ اللَّهُ لَا تَتَّخِذُوا إِلَٰهَيْنِ اثْنَيْنِ ۖ
إِنَّمَا هُوَ إِلَٰهٌ وَاحِدٌ ۖ فَإِيَّايَ فَارْهَبُونِ ﴿٥١﴾

५२. आकाशांमध्ये व जमीनीवर जे काही आहे ते (सर्व) त्याचेच आहे. त्याच्याच करीता आहे अनिवार्य आज्ञा पालन.[७४] मग काय तुम्ही अल्लाहला सोडून इतरांचे भय बाळगाल?

وَلَهُ مَا فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَلَهُ الدِّينُ
وَاصِبًا ۚ أَفَغَيْرَ اللَّهِ تَتَّقُونَ ﴿٥٢﴾

५३. तुम्हाला जी जी ईश-देणगी लाभली आहे. ती अल्लाह तर्फेच लाभली आहे. मग जेव्हा तुम्हाला एखादे दुःख पोहचते तेव्हा त्याच्याच पुढे आर्जव करू लागतात.[७५]

وَمَا بِكُم مِّن نِّعْمَةٍ فَمِنَ اللَّهِ ۖ ثُمَّ إِذَا مَسَّكُمُ الضُّرُّ فَإِلَيْهِ
تَجْأَرُونَ ﴿٥٣﴾

५४. मग जेव्हा तो तुमचे दुःख दूर करतो तेव्हा तुमच्यापैकी एक समूह [७६] आपल्या पालन कर्त्याचा सहभागी ठरवू लागतो.[७७]

ثُمَّ إِذَا كَشَفَ الضُّرَّ عَنكُمْ إِذَا فَرِيقٌ مِّنكُم بِرَبِّهِمْ يُشْرِكُونَ ﴿٥٤﴾

५५. अशासाठी की त्यांनी आम्ही प्रदान केलेल्या देणग्याशी कृतघ्नता बाळगावी. तेव्हा लाभ प्राप्त करून घ्या. लवकरच तुम्हाला कळून येईल.

لِيَكْفُرُوا بِمَا آتَيْنَاهُمْ ۚ فَتَمَتَّعُوا ۖ فَسَوْفَ تَعْلَمُونَ ﴿٥٥﴾

६९. ही गोष्ट सर्व सामान्य पणे दिसून येते की प्रत्येक वस्तू अल्लाहच्या विधि-नियामात जकडलेली आहे आणि आपल्या साऊलीस जमीनीवर पडण्यापासून रोखू शकत नाही आणि जमीनीवर साऊलीचे पडणे हे गोष्टीचे लक्षण होय की ती अल्लाहला सजदा करीत आहे.

तसेच साऊली सूर्याच्या विरुद्ध दिशेने पडते सूर्य पूर्वेस असतो तर साऊली पश्चिमेकडे पडेल आणि जर सूर्य पश्चिमेकडे आहे तर साऊली पूर्वेकडे पडेल. हे या गोष्टीचे प्रमाण होय की साऊली सूर्याला सजदा करीत नाही किंबहुना आपल्या पालन कर्त्यास सजदा करते. काफीरचा मामला देखील विचित्र आहे. तो अल्लाहला सजदा करण्यास इन्कार करतो, परंतु त्याची साऊली अल्लाहलाच सजदा करते. त्याने या गोष्टीवर विचार केल्यास खचितच एकेश्वरवादास तो कबूल करील व स्वत:ला अल्लाह पुढे झुकविल.

७०. म्हणजे निर्मात्या पुढे मोठा कोणीहि नाही. सर्व निर्मिती त्याच्या समोर नतमस्तक व विनम्र आहे. असे असतांना एखादी गोष्टी वा वस्तू ईश्वर असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही व त्या तथाकथित उपास्याच्या उपासनेलाहि काही अर्थ राहात नाही.

७१. वरील आयतीत सर्वसामान्य अवलोकनात येणारी गोष्ट साऊलीचा सजदा करण्याचा उल्लेख होता. या आयतीत या वस्तुस्थिती विषयी अवगत केले गेले आहे की आकाश व जमीनी वरील समस्त सजीव निर्मिती अल्लाहलाच सजदा करते म्हणजे स्वत:ला त्याच्यापुढे झुकविते आणि ज्या सजीवा करिता झुकण्याचे जे स्वरूप सर्वश्रेष्ठ अल्लाहने निश्चित केले आहे. त्यानुसारच तो झुकतो.

या आयतीने हे उघडे हि केले की सजीव निर्मिती केवळ जमीनीवरच नाही तर आकाशामध्येहि अस्तित्वात आहे.

७२. येथे फिरिश्त्यांच्या चार गुणवैशिष्ट्यांचा उल्लेख केला गेला आहे. एक हे की ते अल्लाहलाच सजदा करतात दुसरे असे की ते मोठेपणा व विद्रोह करीत नाही. तिसरे हे की ते आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगतात. या जाणीवेसह की तो त्यांच्या वरती अस्तित्वात आहे आणि चौथे असे की ते आज्ञाधारक आहेत. पालन कर्त्याच्या प्रत्येक आदेशाची अंमलबजावणी करतात. जेव्हा फिरिश्त्यांची स्वत:ची ही स्थिती आहे तर त्यांना ईश्वराचा सहभागी ठरविण्यात काय अर्थ? हे निखालस अज्ञान नव्हे तर आणखी काय आहे?

ही सजद्याची आयत होय म्हणून हिचे पठण करीत असता सजदा केला पाहिजे.

७३. अल्लाहचे हे फर्मान नेहमी पासूनच राहिले आहे आणि पवित्र क़ुरआनात त्याने आपल्या फर्मानास अगदी सुरक्षित केले आहे.

एकाहून अधिक ईश्वराविषयीची श्रद्धा प्रत्येक प्रकारे खोटी आहे मग एखादा मनुष्य दोन ईश्वरांना (Dualism) मानणारा असो किंवा तीन (Trinity) ला मानणारा असो अथवा एखादा मनुष्य अनेक उपास्यांना वा सहस्त्रावधी उपास्यांना मानणारा असो. अज्ञान आणि मूर्खतेचे एकाहून एक वरचढ असे नमुने आहेत.

दोन ईश्वरांविषयीची कल्पना(Dualism) विशेषता: झरतृष्टाच्या अनुयायींमध्ये (पारशी लोकांत) आढळून येते. त्यांच्या मते मांगल्याचा ईश्वर यजदान हा आहे तर अमांगल्याचा ईश्वर अहरमन आहे. जगात चांगल्या वाईटाचा जो संघर्ष आहे त्याचे त्यांनी हे तत्वज्ञानीय स्पष्टीकरण केले की मांगल्याचा ईश्वर वेगळा आहे व वाईटाचा वेगळा. जणू दोन ईश्वरांमध्ये संघर्ष जारी आहे आणि मनुष्य अकारण या संघर्षाच्या तावडीत सापडतो आणि जेव्हा हे दोन्ही ईश्वर युद्धापासून अजून मोकळे होऊ शकले नाहीत तेव्हा मनुष्य युद्धा पासून कसा मोकळा होऊ शकतो? ही कल्पना दोन्ही ईश्वरांच्या दुर्बलतेस प्रकट करते. कारण दोघांपैकी एकहि ईश्वर सामर्थ्यशाली नाही की दुसऱ्यावर वर्चस्व स्थापीत करील या स्थितीत माणसाच्या पदरी निराश शिवाय काहीच राहत नाही. ईश्वराविषयीची ही कल्पना किती तुच्छ आहे जी एखाद्या धर्मात आढळून यावी.(अल्लाह अलिप्त आहे व अत्युच्च आहे त्या गोष्टी पासून जी त्याच्या संबंधाने हे म्हणतात.)

سُبۡحَانَهٗ وَتَعَالٰى عَمَّا يَقُوۡلُوۡنَ عُلُوًّا كَبِيۡرًا۔

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र.३)

७४. मूळ ग्रंथात 'अद्दीन' हा शब्दप्रयोग झाला आहे. ज्याचा अर्थ या ठिकाणी 'आज्ञा पालन' असा आहे; जे मन:पूर्वक असावे आणि 'वासिबा'चा अर्थ आवश्यक व निरंतर असा आहे अर्थात अल्लाहचे अनिवार्य व निरंतर आज्ञापालन करणे हा अल्लाहचा हक्कच होय. हे आज्ञापालन ना प्रसंगिक आहे आणि ना एखाद्याच्या आवडीवर अवलंबून आहे, किंबहुना दासा या नात्याने माणसाचा संबंध आपल्या पालनकर्त्याशी याच प्रकारच्या आज्ञापालनाचा असावयास पहिजे व अगदी मनापासून असला पाहिजे;केवळ पारंपारिक व नियम पालनाच्या मर्यादेप्रत नव्हे.

७५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. ७१.

७६. म्हणजे मानव जातीतला एक समूह.

७७. म्हणजे जेव्हा अल्लाह तुमचे दु:ख निवारण करतो,

तेव्हा त्याची कृपा मानण्या ऐवजी तुम्ही अल्लाह खेरीज इतर उपास्यांची कृपा मानू लागतात की अमुक एका देवताची कृपा झाली.

अनेकेश्वरवादी देवी, देवतांची कृपा संमजतात आणि मुसलमाना मध्ये जे लोक शिर्क करीत आहेत ते यास 'अवलीया' व पीरांची मेहरबानी ठरवून त्यांच्याशी कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता त्यांच्या नावे नजराणे व न्याज करतात. शिर्कचा हा प्रकार सुरवातीच्या मुसलमानांमध्ये नव्हता. तो नंतर उदयास आला आणि आता एवढा प्रचलित झाला आहे की आजच्या मुसलमानांची एक मोठी संख्या या गोष्टीला मुळातच 'शिर्क' समजत नाही. या आयतींच्या दर्पणात यांनी आपला चेहरा बघितला असता तर बरे झाले असते !

**आणि ज्या गोष्टी आम्ही त्यांना प्रदान केल्या आहेत त्यांच्या पैकी एक हिस्सा ते त्या (उपास्यां) करीता निश्चित करतात. ज्यांच्या विषयी त्यांना कसलेहि ज्ञान नाही अल्लाह शपथ ! या मन-गढत गोष्टीं विषयी निश्चितच जाब विचारला जाईल.(अल-क़ुर्आन)**

وَيَجْعَلُونَ لِمَا لَا يَعْلَمُونَ نَصِيبًا مِّمَّا رَزَقْنَٰهُمْ ۗ تَٱللَّهِ
لَتُسْـَٔلُنَّ عَمَّا كُنتُمْ تَفْتَرُونَ ﴿٥٦﴾

५६. आणि ज्या गोष्टी आम्ही त्यांना प्रदान केल्या आहेत त्यांच्या पैकी एक हिस्सा ते त्या (उपास्यां) करीता निश्चित करतात. ज्यांच्या विषयी त्यांना कसलेहि ज्ञान नाही. [७८]अल्लाह शपथ ! या मन-गढत गोष्टीं विषयी निश्चितच जाब विचारला जाईल.

وَيَجْعَلُونَ لِلَّهِ ٱلْبَنَٰتِ سُبْحَٰنَهُۥ ۙ وَلَهُم مَّا يَشْتَهُونَ ﴿٥٧﴾

५७. अल्लाह करिता हे मुली (कन्या) ठरवितात- अलिप्त आहे तो-आणि त्यांच्या करिता ते जे इच्छितील ! [७९]

وَإِذَا بُشِّرَ أَحَدُهُم بِٱلْأُنثَىٰ ظَلَّ وَجْهُهُۥ مُسْوَدًّا وَهُوَ كَظِيمٌ ﴿٥٨﴾

५८. जेव्हा त्यांच्या पैकी एखाद्यास कन्येची खुश खबरी दिली जाते तेव्हा त्याचा चेहरा काळा ठिक्कर पडतो आणि तो उदासवाणा राहू लागतो.

يَتَوَٰرَىٰ مِنَ ٱلْقَوْمِ مِن سُوٓءِ مَا بُشِّرَ بِهِۦٓ ۚ أَيُمْسِكُهُۥ عَلَىٰ هُونٍ أَمْ
يَدُسُّهُۥ فِى ٱلتُّرَابِ ۗ أَلَا سَآءَ مَا يَحْكُمُونَ ﴿٥٩﴾

५९. तो या खुशखबरीस वाईट जाणून लोकांपासून लपत फिरतो की तिला अपमानासह (जिवीत) राखावे किंवा मातीत दफन करावे.[८०] पहा कसा वाईट निर्णय आहे जो हे करतात !

لِلَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِٱلْءَاخِرَةِ مَثَلُ ٱلسَّوْءِ ۖ وَلِلَّهِ ٱلْمَثَلُ
ٱلْأَعْلَىٰ ۚ وَهُوَ ٱلْعَزِيزُ ٱلْحَكِيمُ ﴿٦٠﴾

६०. वाईट उदारहण अशा लोकांकरिता आहे जे आखिरत वर ईमान बाळगत नाही. [८१]आणि अल्लाह करिता तर उच्च गुण वैशिष्ट्ये आहेत [८२] तो प्रभावशाली व बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.

وَلَوْ يُؤَاخِذُ ٱللَّهُ ٱلنَّاسَ بِظُلْمِهِم مَّا تَرَكَ عَلَيْهَا مِن دَآبَّةٍ وَلَٰكِن
يُؤَخِّرُهُمْ إِلَىٰٓ أَجَلٍ مُّسَمًّى ۖ فَإِذَا جَآءَ أَجَلُهُمْ لَا يَسْتَـْٔخِرُونَ
سَاعَةً ۖ وَلَا يَسْتَقْدِمُونَ ﴿٦١﴾

६१. आणि अल्लाहने जर लोकांना त्यांच्या अत्याचाराबद्दल त्वरीत पकडले असते तर जमीनीवरील कोणत्याहि सजीवास सोडले नसते [८३] परंतु एक निश्चित वेळे पावेतो तो त्यांना सवड देतो. मग जेव्हा त्यांचा निर्धारीत समय येऊन ठेपतो तेव्हा ना एक घटीका मागे राहू शकतात ना एक घटिका पुढे. [८४]

وَيَجْعَلُونَ لِلَّهِ مَا يَكْرَهُونَ وَتَصِفُ أَلْسِنَتُهُمُ ٱلْكَذِبَ أَنَّ لَهُمُ
ٱلْحُسْنَىٰ ۖ لَا جَرَمَ أَنَّ لَهُمُ ٱلنَّارَ وَأَنَّهُم مُّفْرَطُونَ ﴿٦٢﴾

६२. ते अल्लाह करिता अशा गोष्टी ठरवितात ज्या स्वत:करिता नापसंत ठरवितात [८५] आणि त्यांच्या जिव्हा खोटा दावा करतात की त्यांच्या करिता पूर्णत: भलेपणा आहे.[८६] त्यांच्या करिता तर अनिवार्यत: आग आहे. ते त्यातच सोडले जातील. [८७]

७८. म्हणजे ईशत्वात ते ज्यांना सहभागी मानतात, त्याचे कसलेहि प्रमाण त्यांच्याजवळ नाही. तरीहि त्यांना अल्लाहचा सहभागी मानून त्यांना नजराणा चढविण्याकरीता आपल्या उत्पन्नातून एक हिस्सा निश्चित करतात. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र.२४७

७९. अरब देशीय अनेकेश्वरवादी फिरिश्त्यांना अल्लाहच्या मुली ठरवीत, जी अगदी निराधार गोष्ट आहे. कन्या होणे त्यांच्या दृष्टीने एक वैगुण्यपूर्ण बाब होती; यास्तव स्वत:साठी ते पुत्र पसंत करीत आणि जर मुलगी जन्माला येई तर तिला स्वत:साठी लज्जास्पद समजत. अशा प्रकारे स्वत:साठी त्यांनी जी पातळी कायम केली होती त्यातून खालची पातळी अल्लाह करिता कायम केली होती. त्यांच्या ह्या दूषित विचार सरणीवर येथे प्रहार केला गेला आहे.

८०. अरब देशात कबीला पद्धति प्रचलीत होती. ज्यात संरक्षणादिच्या संबंधाने पुरुषांना विशेष महत्व होते. या गोष्टीचा त्यांच्या विचार सरणीवर एवढा प्रभाव होता की मुलींचा जन्म त्यांना अप्रिय वाटू लागला आणि समाजाची बुद्धि इतकी भ्रष्ट झाली की मुलगी जन्माला येणे वैगुण्य समजले जाऊ लागले. परिणामी जेव्हा एखाद्यास कन्या-जन्माचा समाचार मिळे तेव्हा दु:खाने त्याचा चेहरा काळवंडत असे व तो क्रोधायमान होत असे. आणि तिचे पालन पोषण करतांना लज्जास्पद समजून करीत असे किंवा या लज्जे पासून स्वत:ला वाचविण्याकरिता त्या अबोध बालीकेला खड्डा खोदून जमीनीत जिवंत पुरत असे. त्यांच्या या अत्याचार पूर्वक कृतीचे चित्र या आयतीमध्ये रेखाटले गेले आहे. अशासाठी की त्यांना आपल्या चुकीच्या विचार सरणी विषयी जाणीव व्हावी.

८१. म्हणजे जे लोक आखिरत वर विश्वास ठेवत नाही. त्यांच्या अंगी अनिवार्यपणे वाईट गुणवैशिष्ट्ये वाढीस लागतात. उदाहरणार्थ दूषित श्रद्धा,अप्रामाणिकता, दिखावा करणे, द्वेष-मत्सर, हराम खाणे पिणे, निर्लज्जता, हक्क हिरावणे, अपव्यय, अत्याचार व अतिरेक आणि इतर अनेक वाईट गोष्टी म्हणून ते याच पात्रतेचे आहेत की त्यांच्या स्थितीस स्पष्ट करण्याकरिता वाईट उपमा दिल्या जाव्यात. यास्तव क़ुरआनात त्यांनी अल्लाह खेरीज इतरांना कर्ता-करविता बनविण्याच्या गोष्टीस कोष्टी किटकाच्या वाईट घराची उपमा दिली गेली आहे. (सूरह अन्कबूत-४१) त्यांना आंधळे व बहिऱ्यांची उपमा दिली गेली आहे. (सूरह हूद २४) त्यांना जनावरांची उपमा दिली गेली आहे. ज्यांना काहीच समजत नाही. (सूरह अेअराफ-१७९)

८२. अर्थात अल्लाह करिता एखादे असे उदाहरण मुळीच योग्य होऊ शकत नाही की ज्यामुळे एखादे वैगुण्य वा दोष त्याच्या संबंधाने दाखविला जावा. त्याची गुणवैशिष्ट्ये अगदी उच्च आहेत म्हणून त्याच्या बाबतीत फक्त अशाच गोष्टी सांगितल्या जाऊ शकतात ज्या द्वारे त्याची अद्वितीय महानता व प्रतिष्ठेची उच्चता व्यक्त व्हावी.

फिरिश्त्यां संबंधी ते 'ईश्वराच्या मुली आहेत किंवा मुली समान आहेत' हे म्हणणे म्हणजे ईश्वराकडे अशा गोष्टीचा संबंध दर्शविणे जी त्याच्या दर्जाहून निम्न स्तर असावी. तसेच ईश्वराला बादशहावर कयास करून असे म्हणणे की आम्ही आपल्या गरजा सरळ सरळ ईश्वरासमोर सादर करू शकत नाही. म्हणून आपल्या विनवण्या व प्रार्थना त्याच्या पावेतो पोहचविण्या करिता माध्यम व वशीले आवश्यक आहेत असे म्हणणे ईश्वरासाठी चुकीच्या व अयोग्य उपमा रचण्या खेरीज आणखी काहीच नाही.

८३. येथे सजीवाशी अभिप्रेत मनुष्य होय जसे आयतीतील 'जर अल्लाहने लोकांना त्यांच्या अत्याचारा बद्दल पकडले असते' या शब्दावरून स्पष्ट होते.

८४. प्रत्येक व्यक्ति करिता सवलतीचा अवधि त्याच्या मृत्यु पर्यंत आहे आणि जन-समूहा करिता त्यांच्या सामूहिक विनाशा पावेतो.

८५. संकेत या गोष्टीकडे आहे की हे लोक स्वत: साठी मुलींना नापसंत करतात. मात्र अल्लाहसाठी मुली योजितात.

८६. म्हणजे ह्या अनेकेश्वरवादी श्रद्धा व कर्मा नंतरहि ते या गोष्टीचा दावा करतात की आमच्यासाठी सर्वथा भलाई आहे.ऐहिक लाभ आम्हाला या सहभागी (देवता) च्याच कृपेने घडतात आणि जर आखिरतची अवस्था उद्भवलीच तर हेच (फिरिश्ते) आमची शिफारस करतील व आमचे मुक्ति-दाता बनतील.

८७. म्हणजे ते भलेपणाचे स्वप्न पाहात आहेत. वस्तुत: जहन्नम अनिवार्मत: त्याचे ठिकाण राहील आणि त्यात त्यांना अशा प्रकारे सोडले जाईल की ते या शिक्षेपासून कदापि सुटका प्राप्त करू शकणार नाहीत.

تالله لقد ارسلنا الى امم من قبلك
فزين لهم الشيطن اعمالهم فهو وليهم
اليوم ولهم عذاب اليم ﴿٦٣﴾

६३. अल्लाह शपथ [८८] तुमच्या पूर्वीहि आम्ही कितीतरी जनसमूहांकडे प्रेषित पाठविले होते. मात्र सैतानाने लोकांना त्यांची कृत्ये शोभायामान करून दाखविलीत आणि आज तोच त्यांच्या मित्र आहे [८९] अशा लोकांकरिता तर दु:ख दायक शिक्षा आहे.

وما انزلنا عليك الكتب الا لتبين لهم الذي
اختلفوا فيه وهدى ورحمة لقوم يؤمنون ﴿٦٤﴾

६४. आम्ही ग्रंथ तुमच्यावर या साठीच अवतरीत केला आहे की ज्या गोष्टींमध्ये हे मतभेद करीत आहेत, त्या गोष्टींची हकीगत त्यांना विशद करून सांगावी [९०] आणि हे मार्गदर्शन व कृपा आहे त्या लोकांकरिता, ज्यांनी ईमान बाळगले.

والله انزل من السماء ماء فاحيا به الارض بعد موتها ان في
ذلك لاية لقوم يسمعون ﴿٦٥﴾

६५. अल्लाहने आकाशातून पाणी वर्षविले व त्या द्वारे मृत जमीनीस जिवंत केले.[९१] नि:संशय या गोष्टीत त्या लोकांकरीता निशाणी [९२] आहे जे ऐकतात.[९३]

وان لكم في الانعام لعبرة نسقيكم مما في بطونه من بين فرث
ودم لبنا خالصا سائغا للشربين ﴿٦٦﴾

६६. आणि तुमच्या करिता चतुष्पादांमध्येहि बोध आहे.[९४] आम्ही त्यांच्या उदरातून शेण व रक्त या दोघांमधून निव्वळ दूध तुम्हाला पाजतो, जे पिणाऱ्यांकरिता स्वादिष्ट असते.[९५]

ومن ثمرت النخيل والاعناب تتخذون منه سكرا ورزقا
حسنا ان في ذلك لاية لقوم يعقلون ﴿٦٧﴾

६७. आणि खजूर व द्राक्षाच्या फळांपासून तुम्ही मादक वस्तुहि बनविता आणि चांगली उपजिविका देखील प्राप्त करता. [९६] नि:संशय यात निशाणी आहे त्या लोकांकरिता जे बुद्धिने काम घेतात.[९७]

واوحى ربك الى النحل ان اتخذي من الجبال بيوتا
ومن الشجر ومما يعرشون ﴿٦٨﴾

६८. आणि तुमच्या पालन कर्त्याने मधमाशीस अंत:प्रेरणा दिली की पर्वतांवर, वृक्षावर व तटांवर ज्यांना लोक उंच उभारतात, मोहोळ बनव.[९८]

ثم كلي من كل الثمرت فاسلكي سبل ربك ذللا يخرج من
بطونها شراب مختلف الوانه فيه شفاء للناس ان في ذلك
لاية لقوم يتفكرون ﴿٦٩﴾

६९. मग प्रत्येक प्रकारच्या फळांचा रस शोषून घे. [९९] आणि आपल्या पालन कर्त्याने अनुकूल केलेल्या मार्गावर चल.[१००] तिच्या पोटातून विविध रंगाचे एक पेय बाहेर पडते;[१०१] ज्यात लोकांकरिता आरोग्य आहे.[१०२] नि:संशय यात निशाणी आहे [१०३] त्या लोकांकरिता जे विचार-चिंतन करतात.

८८. अल्लाहने येथे आपल्या स्वता विषयी शपथ वाहिली आहे ज्याहून अधिक विश्वास व लालसा निर्माण करणारी गोष्ट आणखी कोणती असू शकते?

८९. या आयतीत पैगंबर (सल्लल्लाहू अलैहि वसल्लम) यांना सांत्वना दिली गेली आहे की तुमच्या पूर्वी बहुतेक जन समूहाकडे प्रेषित पाठविले गेले होते. परंतु त्यांनी प्रेषितांचे म्हणणे ऐकले नाही किंबुना सैतानाच्या भुलावणीस बळी पडले व तुमचा जन-समूह देखील आज या सैतानास मित्र बनवून आहे.

९०. ईश्वर आणि धर्मा बाबत लोकांमध्ये कमालीचा मतभेद आढळून येतो. या मतभेदांची वस्तुस्थिती विशद करण्याकरीता सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर क़ुरआन उतरविले त्यांनतर लोकांना या मूलभूत गोष्टीमध्ये मतभेद करण्याचे कसलेहि कारण बाकी राहिले नाही. असे असतांनाहि जर लोक आपल्या मतभेदांवर अडून बसले तर आपल्या कृतकर्मास ते स्वत:च जबाबदार राहतील.

९१. म्हणजे कोरड्या जमीनीवर पावसाचे थेंब पडताच ती हिरवीगार व टवटवीत झाली.

९२. निशाणी या गोष्टीची की जो ईश्वर मृत जमीनीस जिवंत करतो तो मृत माणसांनाहि जिवंत करू शकतो. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १९७.

९३. म्हणजे जे लक्षपूर्वक ऐकतात.

९४. बोध एकेश्वरवादाचा, अल्लाहच्या ईशत्वाचा व त्याच्या असामान्य सामर्थ्याचा.

९५. म्हणजे जनावराच्या पोटात जिथे शेण व रक्त निर्माण होते तिथेच एक तिसरी वस्तु निखालस दूधहि निर्माण होते. ज्यात या दोन वस्तुंचा लवलेशहि नसतो; आणि माणसाला ते स्वादिष्ट लागते. जणू सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाच्या भल्याकरीता अगणित चालतेफिरते कारखाने बनविले आहेत. ज्यात विचित्ररित्या उच्च स्तरीय पेय तयार होते जे स्वादिष्टहि आहे आणि आरोग्यदायक देखील.

९६. खजूरांच्या वृक्षापासून व द्राक्षांच्या वेलीपासून प्राप्त होणारी फळे अल्लाहची उत्कृष्ट देणगी होय; परंतु लोक या फळांपासून मद्य बनवून या ईश-देणगीचा चुकीच्या मार्गाने वापर करतात. आयती मधील, 'तुम्ही मादक वस्तुहि बनविता व चांगली उपजिविकाहि' हे शब्द या गोष्टीकडे संकेत करतात की मादक वस्तु चांगली उपजिविका नव्हे.

मद्य वर्ज्य असल्याचा आदेश नंतर अवतरला असला (सूरह बकरा आयत क्र. २१९ व सूरह मायदा आयत ९१) तरी याच्या फार पूर्वी या आयतीद्वारे हे स्वच्छ-शुद्ध उपजिविका नसण्याबद्दल स्पष्ट संकेत केला गेला आहे.

पूर्वी होऊन गेलेल्या शरीअतीमध्ये मद्य वैध होते असा विचार करणे योग्य नव्हे, कारण क़ुरआनाच्या अनुषंगाने मद्य एक घाणेरडी वस्तु व सैतानी कर्म होय. अर्थात अशा वस्तूंना ईश्वरी शरीअत कधीहि धार्मानुकूलता प्रदान करीत नाही. बायबलची पुस्तके यशया मध्ये मद्यास नापसंत ठरविले गेले आहे.

''ज्यांचे शौर्य द्राक्षरस पिण्यात आणि ज्यांची बहादुरी मद्य मिळण्यात त्यास धिक्कार असो.''

(यशया ५-२२)

'मद्यपी व मांसाचे अतिभक्षण करणारे यांच्या वाऱ्यास उभा राहू नको.'(नीति सूत्रे २३ - २०)

'द्राक्षारस चेष्टा करणारा आहे, मद्य गलबला करणारे आहे. त्यांच्यामुळे झिंगणारा शहाणा नव्हे.'

(नीति सूत्रे २० - १)

९७. म्हणजे माणसाने सामान्य बुद्धिचा वापर केल्यास त्याला हे जाणवल्या खेरीज राहणार नाही की त्याचा पालन कर्ता मोठा उपकार कर्ता आहे की त्याने उत्कृष्ट देणग्या त्याच्यासाठी निर्माण केल्या आहेत आणि जेव्हा ही जाणीव होईल तेव्हा त्याला एकेश्वर भक्ति आढळून येईल ज्याचे आवाहन कुरआन करीत आहे.

९८. अर्थात अल्लाहने मधमाशीच्या मनाला ही प्रेरणा दिली की तिने उंच जागी मोहोळे बनवावीत आणि फळा-फुलांचा रस शोषून मध तयार करावे. मधमाशी या कार्यास ज्या प्रकारे पार पाडते ते आश्चर्य चकित करणारे आहे. मोहोळात ती षटकोनी कप्पे बनविते ज्याचे कोन इतके योग्य असतात की जणू भूमितिच्या एखाद्या तज्ज्ञाने उपकरणांच्या सहाय्याने बनविली असावीत. मग ती मध जमा करण्याचे कार्य सामूहीक रित्या व्यवस्थितपणे अत्यंत मग्नतेने व चांगल्या रीतीने पार पाडते. मध माशांची ही कारागिरी त्याच्या पालनकर्त्याच्या शिकवणीचा परिणाम होय. या शिकवणीस जी सरळ सरळ ईश्वरातर्फे मिळते तिला 'वही' या अर्थातन्‍े घेतले आहे ज्याचा अर्थ आम्ही अंत: प्रेरणा दिली असा आहे.

९९. मूळ ग्रंथात 'समरात' हा शब्द- प्रयोग झाला आहे. जो फळे फुले व उत्पादना करिता सर्वसामान्यत: वापरला जातो . मधमाशी विविध फळा-फुलांचा व जडीबुटीचा रस शोषते. हा रस तिच्या लोटाच्या थैलीत जमा होऊन मधात परिवर्तित होतो ज्यास ती मुखावाटे बाहेर काढून आपल्या मोहोळात जमा करते. फळांपासून ती अशा वेळी रस शोषते जेव्हा त्याची साल नरम असावी किंवा फाटलेली असावी.

१००. पालन कर्त्याचे अनुकूल मार्गशी अभिप्रेत त्या

चाली-रिती होत ज्यांचा अंगिकार करून मधमाशीला मध बनविणे सोपे ठरते. मधाचा जो एक एक थेंब ती जमा करते त्यासाठी तिला मोठे कष्ट उचलावे लागतात व कित्येक अवस्था मधून बाहेर पडावे लागते. परंतु त्या सर्व कठिन अवस्था तिच्या पालन कर्त्याने तिच्या साठी एवढया सोप्या केल्या आहेत की ती यथोचित आपल्या कार्यात मग्न राहते आणि लांबवर पर्यंत फुलांच्या शोधात जाते आणि रस्ता न विसरता आपल्या मोहोळात येऊन मध जमा करते. एक पौंड मध जमा करण्याकरिता तिला जेवढया फेऱ्या घालाव्या लागतात त्या सर्वांचे एकंदरीत अंतर पृथ्वी भोवती तीन फेऱ्यांच्या अंतरा इतके असते. (पहा पुस्तक Honey by Eva crane Director Bee Research Association London. P.4)

१०१. मधाचे विविध रंग असतात. पिवळे, पांढरे, लाल. ज्या प्रकारच्या फुलांचा व फळांचा रस मधमाशी शोषून घेते तद्‌नुषंगाने मधात रंग, स्वाद आणि औषधी तत्वे (Medical properties) निर्माण होतात.

१०२. मध एक स्वादिष्ट व लाभदायक खाद्य असण्यासोबत विविध रोगांकरिता आरोग्यप्रद औषधहि आहे. प्राचीन काळा पासून लोक यास आरोग्य करिता वापरत आले आहेत. मध एक चांगले सुरक्षित ठेवणारा घटक हि (Preservative) आहे. कारण यात बॅक्टरीया (Bacteria) वाढीस लागत नाही. म्हणून आयुर्वेदीक औषंधामध्ये याचा मोठया प्रमाणात वापर होतो आधुनिक वैद्यकिय संशोधनाच्या दृष्टीने मधात विविध प्रकारची जीवनसत्वे (Vitamins) व खनिज पदार्थ (Minerals) आढळून येतात. तात्पर्य मध एक चांगले टॉनिकहि आहे.

१०३. निशाणी या गोष्टीची की तऱ्हेतऱ्हेच्या वैशिष्ट्यांनी व लाभांनी ओतप्रोत असे पेय तयार करण्याच्या कार्यास मधमाशीला लावून माणसाला ईश्वराने एक उत्कृष्ट देणगी प्रदान केली आहे. या द्वारे त्याच्या ईशत्वाची शान जाहीर होते.

आणि अल्लाहला सोडून अशांची भक्ति करतात.
जे या बाबत कसलाहि अधिकार बाळगत नाही
की त्यांना आकाशातून व जमीनीतून उपजिविका
द्यावी. ही गोष्ट कदापि त्यांच्या आवाक्यात नाही.
तर (पहा) अल्लाह करिता उदाहरणे रचू नका.
अल्लाह जाणतो, तुम्ही नाही जाणत. (अल-क़ुर्आन)

७०. अल्लाहनेच तुम्हाला निर्माण केले मग तोच तुम्हाला मरण देतो. आणि तुमच्या पैकी एखाद्यास निकृष्ट वयाप्रत पोहचविले जाते. यासाठी की जाणून घेतल्या नंतर काहीहि न जाणावे नि:संशय अल्लाहच सर्व काही जाणणारा व मोठा सामर्थ्यशाली आहे.[१०४]

وَاللّٰهُ خَلَقَكُمْ ثُمَّ يَتَوَفّٰىكُمْ ۙ وَمِنْكُمْ مَّنْ يُّرَدُّ اِلٰٓى اَرْذَلِ
الْعُمُرِ لِكَيْ لَا يَعْلَمَ بَعْدَ عِلْمٍ شَيْـًٔا ۭ اِنَّ اللّٰهَ عَلِيْمٌ قَدِيْرٌ ۝70

७१. आणि अल्लाहने तुमच्या पैकी काहींना उपजिविके बाबत काहींवर श्रेष्ठत्व दिले आहे तर ज्यांना श्रेष्ठत्व दिले गेले आहे तो आपली उपजिविका आपल्या गुलामांकडे वळविणारे नाहीत की ते यात बरोबरीचे (हिस्सेदार) व्हावेत.[१०५] मग काय हे लोक अल्लाहच्या देणग्यांचा इन्कार करतात ?[१०६]

وَاللّٰهُ فَضَّلَ بَعْضَكُمْ عَلٰي بَعْضٍ فِي الرِّزْقِ ۚ فَمَا الَّذِيْنَ
فُضِّلُوْا بِرَاۗدِّيْ رِزْقِهِمْ عَلٰي مَا مَلَكَتْ اَيْمَانُهُمْ فَهُمْ فِيْهِ سَوَاۗءٌ ۭ اَفَبِنِعْمَةِ
اللّٰهِ يَجْحَدُوْنَ ۝71

७२. अल्लाहने तुमच्या साठी तुमच्यातूनच पत्न्या बनविल्या [१०७] आणि तुमच्या पत्न्यां पासून पुत्र व पौत्र निर्माण केले आणि तुम्हाला स्वच्छ शुद्ध उपजिविका प्रदान केली.तर काय हे लोक असत्यावर विश्वास राखतात व अल्लाहच्या उपकारास मानत नाहीत ? [१०८]

وَاللّٰهُ جَعَلَ لَكُمْ مِّنْ اَنْفُسِكُمْ اَزْوَاجًا وَّجَعَلَ لَكُمْ مِّنْ
اَزْوَاجِكُمْ بَنِيْنَ وَحَفَدَةً وَّرَزَقَكُمْ مِّنَ
الطَّيِّبٰتِ ۭ اَفَبِالْبَاطِلِ يُؤْمِنُوْنَ وَبِنِعْمَتِ اللّٰهِ هُمْ يَكْفُرُوْنَ ۝72

७३. आणि अल्लाहला सोडून अशांची भक्ति करतात. जे या बाबत कसलाहि अधिकार बाळगत नाही की त्यांना आकाशातून व जमीनीतून उपजिविका द्यावी. ही गोष्ट कदापि त्यांच्या आवाक्यात नाही.

وَيَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ مَا لَا يَمْلِكُ لَهُمْ رِزْقًا مِّنَ
السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ شَيْـًٔا وَّلَا يَسْتَطِيْعُوْنَ ۝73

७४. तर (पहा) अल्लाह करिता उदाहरणे रचू नका. अल्लाह जाणतो, तुम्ही नाही जाणत.[१०९]

فَلَا تَضْرِبُوْا لِلّٰهِ الْاَمْثَالَ ۭ اِنَّ اللّٰهَ يَعْلَمُ
وَاَنْتُمْ لَا تَعْلَمُوْنَ ۝74

७५. अल्लाह एक उदाहरण कथन फर्मावितो [११०] एक गुलाम आहे (दुसऱ्याचा) दास, जो कसलाहि अधिकार बाळगत नाही. आणि दुसरा मनुष्य तो ज्याला आम्ही आपल्या तर्फे चांगली उपजिविका प्रदान केली आहे.आणि त्यातून तो गुप्तपणे व उघडपणे खर्च करतो. काय हे दोन्ही समान आहेत ?[१११] प्रशांसा केवळ अल्लाह करिता आहे, परंतु अधिकांश लोक जाणत नाहीत.[११२]

ضَرَبَ اللّٰهُ مَثَلًا عَبْدًا مَّمْلُوْكًا لَّا يَقْدِرُ عَلٰي شَيْءٍ وَّمَنْ
رَّزَقْنٰهُ مِنَّا رِزْقًا حَسَنًا فَهُوَ يُنْفِقُ مِنْهُ سِرًّا وَّجَهْرًا ۭ
هَلْ يَسْتَوٗنَ ۭ اَلْحَمْدُ لِلّٰهِ ۭ بَلْ اَكْثَرُهُمْ لَا يَعْلَمُوْنَ ۝75

१०४. वयाच्या निकृष्ट हिश्श्याची अभिप्रेत अत्याधिक वार्धक्याचे वय होय, जेव्हा माणसाच्या सर्व शक्ति लयास जाऊ लागतात आणि काही लोकांची तर अशी दशा होते की त्यांना स्वत:चे भान देखील राहत नाही. अन्य शक्ति बरोबरच स्मरण शक्तिहि कमकुवत होत जाते. पवित्र क़ुरआनात अन्य एका स्थानी फर्माविले गेले आहे की-

اَللّٰہُ الَّذِیْ خَلَقَکُمْ مِّنْ ضُعْفٍ ثُمَّ جَعَلَ مِنْۢ بَعْدِ ضُعْفٍ قُوَّۃً ثُمَّ جَعَلَ مِنْۢ بَعْدِ قُوَّۃٍ ضُعْفًا وَّ شَیْبَۃً ؕ (سورۂ روم:۵۴)

"अल्लाहने तुम्हाला कमकुवत स्थितीत निर्माण केले. मग दुर्बलते नंतर तुम्हाला शक्तिशाली बनविले.मग शक्तिशाली बनविल्यानंतर तुम्हाला कमजोर व म्हातारे बनविले.'' (सूरह रूम - ५४ )

وَمَنْ نُّعَمِّرْہُ نُنَکِّسْہُ فِی الْخَلْقِ ؕ (سورہ یٰس ـ ۶۸)

"आणि ज्याला आम्ही दीर्घायुष्य देतो त्याला अधोमुखी करतो.'' (सूरह यासीन - ६८)

अशा प्रकारे माणसात नैसर्गिकरित्या घडून येणारा हा ऱ्हास त्याचे डोळे उघडविण्यास पुरेसा आहे. शक्तिमधील उत्कर्षा नंतर ऱ्हास या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की माणसाचे स्वत:चे असे सामर्थ्य काहीच नाही ज्यावर त्याला अभिमान वाटावा; किंबहुना सर्व प्रकारची शक्ति सामर्थ्य त्याच्या निर्मात्याने प्रदान केलेली आहेत; व तो वाटेल तेव्हा त्यांना हिरावून घेतो. खरे पाहता ज्ञानी व सामर्थ्यशाली असा केवळ अल्लाहच आहे.

१०५. ही वस्तुस्थिती आहे की उपजिविका प्राप्ती संदर्भात सर्व माणसांची दशा सारखी नाही. एखाद्याला फार कमी व जेथपावेतो गुलामांचा संबंध आहे त्यांचे हक्काधिकार आपल्या परिने; परंतु जगाचा हा नियम आहे की गुलाम आपल्या मालकाच्या मिळकतीत सहभागी नाही की जेणे करून दोघांची स्थिती समान व्हावी. असे असते तर गुलाम गुलाम राहिला नसता. यास्तव जेव्हा मनुष्य आपल्या मिळकतीत आपल्या गुलामांना हिस्सेदाराची पात्रता देत नाही तेव्हा ईश्वराच्या ईशत्वात त्याच्यात दासांना सहभागी कसा ठरवितो? जी गोष्ट तो स्वत:साठी पसंत करीत नाही तिचा सर्वश्रेष्ठ अल्लाहशी संबंध जोडण्याचे दु:साहस का म्हणून करतो ?

स्पष्ट असावे की या उदाहरणाचा हेतु अल्लाहचा सहभागी ठरविणाऱ्यांची चुकीच्या विचार सरणीस स्पष्ट करणे हा आहे. आणि ही अशीच गोष्ट होय, जशी क़ुरआनाने अनेकेश्वर वाद्यांच्या या श्रद्धेवर की फिरिश्ते अल्लाहच्या मुली आहेत, अंकूश ठेवीत म्हटले की तुम्ही आपल्या साठी तर मुलींना नापसंत करता, मात्र ईश्वरासाठी मुली योजितात. याने त्यांच्या बुद्धिच्या खराबीस व श्रद्धेच्या उत्पादास स्पष्ट करण्याचा हेतु आहे. माणसाने स्वत:साठी मुलींना वैगुण्य दर्शक समजावे या गोष्टीला प्रमाण देण्यासाठी नव्हे. तद्वतच या ठिकाणी हि गुलामांच्या तात्विक पात्रतेस डोळयासमोर ठेवीत उदाहरण दिले गेले आहे. त्यांच्याशी वागणूक वा वर्तनाच्या प्रश्नावर येथे चर्चा-विवाद नाही म्हणून बाब अध्यारुत ठेवून विचार चिंतन केले पाहिजे काही विद्वानांनी येथे आर्थिक तत्वज्ञानाची चर्चा केली आहे, जी अगदी अप्रासंगिक आहे.

१०६. म्हणजे जेव्हा हे मालक व गुलामाच्या फरकास चांगल्या प्रकारे समजतात तेव्हा ईश्वराने दिलेल्या देणग्यांचा त्याच्या दासांशी कशा प्रकारे संबंध जोडतात? काय ईश्वराचे दास व त्याची निर्मिती त्याच्या ईश्त्वात व त्याच्या साम्राज्यात सहभागी आहे? जर असे नाही आणि वस्तुत: असे मुळीच नाही. तेव्हा कोणतीहि ईश-देणगी लाभल्यानंतर अल्लाहदशीच कृतज्ञ झाले पाहिजे. परंतु अल्लाहचा सहभागी ठरविणारे कोणतीहि ईश- देणगी लाभल्यानंतर अल्लाह ऐवजी त्यांच्या दासांशी व निर्मितीशी कृतज्ञ होतात की त्यांच्या मेहरबानी ने आम्हाला ही देणगी लाभली.

ही अनेकेश्वरवाद्यांची दशा वर्णिली गेली आहे परंतु आजच्या काळात धर्मात नव्या प्रथा पसंत करणाऱ्या मुसलमानांची दशा देखील अशीच आहे. त्यांच्यापैकी एखाद्यास जेव्हा एखादे अपत्थ लाभते किंवा अन्य एखादी ईश- देणगी लाभते तर यास 'ख्वाजा गरीब नवाज' व 'पीराने पीर' वगैरे ची मेहरबानी ठरवितात व कृतज्ञता म्हणून त्यांच्या समोर श्रद्धेच्या भेटी व नजराणे सादर करु लागतात. असल्या ह्या अनेकेश्वरवादी कृत्यांनतरहि हे लोक असे समजतात की-यामुळे त्यांच्या एकेश्वर वादी श्रद्धेवर काहीच आंच येत नाही. त्यांनी क़ुरआनाच्या शिकवणीवर गंभीरपणे विचार केला असता तर बरे झाले असते!

१०७. म्हणजे तुमच्यासाठी पत्न्या एखाद्या अन्य प्रकार वा जातीतून नव्हे किंबहुना तुमच्याच पैकी म्हणजे मनुष्य जातीतूनच निर्माण केल्या गेल्या यासाठी की तुम्हाला त्यांचे प्रेम वाटावे.

१०८. म्हणजे त्या लोकांचा मामला विचित्र आहे. लाभ तर ते अल्लाहच्या देणग्यांपासून उचलतात, परंतु कृतज्ञता दुसऱ्यांची बाळगतात.

स्पष्ट असावे की मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांना या गोष्टीचा इन्कार नव्हता की या व अशाच स्वरुपाच्या इतर ईश-देणग्या अल्लाहने निर्माण केलेल्य व त्याने प्रदान केलेल्या आहेत. परंतु यासोबतच ते ही श्रद्धाहि बाळगीत की अमुक एक दैवत ईश्वरासमोर आमची शिफारस करणारे आहे. त्यांच्या शिफारसीमुळे व वशिल्यामुळे आम्हाला विविध प्रकारच्या ईश देणग्या लाभतात

म्हणून त्यांचा उपकार मानणे व त्यांच्याशी कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. या श्रद्धेचा परिणाम म्हणून त्यांची शिफारस करणाऱ्यांनी ईश्वराची जागा घेतली होती म्हणून त्यांच्याशी ते असा मामला करत जो केवळ अल्लाह बरोबर केला गेला पाहिजे होता.

१०९. ईश्वर करिता उदाहरणे व उपमा देण्यानेच शिर्क चे द्वार उघडते. उदाहरणार्थ ईश्वर करिता पुत्र व कन्या असल्याची कल्पना सुरवातीस एक उदाहरण म्हणून होती परंतु ज्या ज्या वेळी या कल्पनेने मजबूत श्रद्धेचे स्वरुप धारण केले तेव्हा उदाहरण व उपमा नावाला उरली नाही, व त्यांनी योजिलेले पुत्र-कन्या ईश्वर वा उपास्य झालेत.

त्याचप्रमाणे ईश्वरास मानवी बादशहा वर कयास करुन असे म्हटले गेले की ज्या प्रमाणे राजापर्यंत आपली विनवणी वा गाऱ्हाणे पोहचविण्या करिता माध्यम व वशिल्याची गरज असते तद्वतच आपल्या गरजा ईश्वरापर्यंत पोहचविण्या करिता अमुक अमुक माध्यम व वशीले आवश्यक आहेत. मग जेव्हा या कल्पनेने श्रद्धेचे स्वरुप धारण केले तेव्हा या माध्यमांनी ईश्वरीय दर्जा प्राप्त केला. आता गरजपूर्ति करिता त्यांनाच पुकारले जाऊ लागले, त्यांनाच आर्जव केले जाऊ लागले, त्यांनाच नवस, केले जाऊ लागले व त्यांच्याच करिता भेटी नजराणे चढविले जाऊ लागले. तात्पर्य त्यांच्या भक्ति-आराधनेचे विविध मार्ग अंगिकारले गेले. परिणामत: आपल्या वास्तविक पालनकर्त्याशी संबंध कमजोर व या स्वरचित ईश्वरांशी संबंध दृढ झाला.

क़ुरआनाने ईश्वराकरिता उदाहरणे रचण्याची मनाई करुन शिर्कचा दरवाजा बंद केला. क़ुरआनाच्या कथना नुसार ईश्वराबाबत कयास रचणे अज्ञान होय, ज्ञानाचा मार्ग तर हाच की अल्लाहने आपली जी गुणवैशिष्ट्ये वर्णिली आहेत त्यांच्यावर ईमान बाळगा. कारण अल्लाह पेक्षा अधिक त्याच्या गुणवैशिष्ट्यांना जाणणारा कोण असू शकतो?

११०. एक असे उदाहरण ज्याने शिर्कचे खंडन होते.

१११. म्हणजे एक मनुष्य अधिकारहीन गुलाम आहे आणि दुसरा स्वंत्र व अधिकार बाळगणारा असूनहि सहृदय देखील आहे. तर काय तुम्ही दोघांना सारखेच समजता? नव्हे, किंबहुना जेव्हा तुम्ही एखादी वस्तू मागू इच्छिता तर दुसऱ्या प्रकारच्या माणसाकडूनच मागता. पहिल्या प्रकारच्या माणसाकडून नव्हे कारण तुम्ही हे जाणता की त्याला कोणताहि अधिकार नाही, तो काही करू शकत नाही. अधिकार असलेला व अधिकारशून्य या दोघांमधील फरकास तुम्ही आपल्या परस्पर व्यवहारात चांगल्या प्रकारे समजता व त्यानुसार वर्तन अंगिकारता परंतु जेव्हा आपल्या गरजा भागविणाऱ्या समोर सादर करण्याचा प्रसंग येतो. तेव्हा निर्मात्याला सोडून निर्मितीकडे रुजू करता व त्याच्या अधिकारहीन दासांना आपला उपकार कर्ता मानून त्याची कृतज्ञता बाळगू लागतात. काय हे उघड अज्ञान नव्हे?

११२. म्हणजे खराखुरा उपकार करा अल्लाहच आहे म्हणून कृतज्ञतेस पात्र तोच होय. परंतु अधिकांश लोक या स्पष्ट वस्तुस्थितीशीही परिचित नाहीत. म्हणून ते अल्लाहला सोडून इतरांना आपला उपकारकर्ता समजतात व त्यांची कृतज्ञता व्यक्त करु लागतात.

**काय ते पक्ष्यांना पहात नाही की कशा प्रकारे आकाशाच्या वातावरणात मुग्ध आहेत. अल्लाहनेच त्यांना सांवरुन धरले आहे. नि:संशय, यात निशाण्या आहेत त्या लोकां करीता, जे ईमान बाळगतात. (अल-कुर्आन)**

७६. आणि अल्लाह (अन्य एक) उदाहरण फर्मावितो. दोन माणसे आहेत. ज्यांच्यापैकी एक मूका आहे. कोणत्याही गोष्टीचे सामर्थ्य बाळगत नाही. आपल्या मालकावर तो एक भार आहे कोठेहि त्याला पाठवा, कोणतेही भले काम त्याच्याने न व्हावे काय असा मनुष्य, त्या माणसा समान असू शकतो, जो न्यायाचा आदेश देतो व (स्वत:) सन्मार्गावर आहे. [११३]

وَضَرَبَ اللّٰهُ مَثَلًا رَّجُلَيْنِ اَحَدُهُمَآ اَبْكَمُ لَا يَقْدِرُ عَلٰى
شَيْءٍ وَّهُوَ كَلٌّ عَلٰى مَوْلٰىهُ ۙ اَيْنَمَا يُوَجِّهْهُّ لَا يَاْتِ بِخَيْرٍ ۭ
هَلْ يَسْتَوِيْ هُوَ ۙ وَمَنْ يَّاْمُرُ بِالْعَدْلِ ۙ
وَهُوَ عَلٰى صِرَاطٍ مُّسْتَقِيْمٍ ﴿٧٦﴾

७७. आणि आकाशांच्या व जमीनीच्या सुप्त गोष्टींचे ज्ञान अल्लाहलाच आहे आणि कियामतीचा मामला तर अशाच प्रकारे समोर येईल ज्या प्रमाणे डोळ्यांचे लवणे किंबहुना त्याहूनहि फार लवकर.[११४] नि:संशय अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य आहे.

وَلِلّٰهِ غَيْبُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۭ وَمَآ اَمْرُ السَّاعَةِ اِلَّا
كَلَمْحِ الْبَصَرِ اَوْ هُوَ اَقْرَبُ ۭ اِنَّ اللّٰهَ عَلٰى كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ﴿٧٧﴾

७८. अल्लाहने तुम्हाला तुमच्या मातांच्या उदरातून अशा स्थितीत काढले की तुम्ही काही हि जाणत नव्हता आणि त्याने तुमच्या साठी कान,डोळे व हृदय बनविले. अशासाठी की तुम्ही कृतज्ञ व्हावे.[११५]

وَاللّٰهُ اَخْرَجَكُمْ مِّنْۢ بُطُوْنِ اُمَّهٰتِكُمْ لَا تَعْلَمُوْنَ شَـيْـــًٔا ۙ
وَّجَعَلَ لَكُمُ السَّمْعَ وَالْاَبْصَارَ وَالْاَفْـِٕدَةَ ۙ لَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ ﴿٧٨﴾

७९. काय ते पक्ष्यांना पहात नाही की कशा प्रकारे आकाशाच्या वातावरणात मुग्ध आहेत. अल्लाहनेच त्यांना सांवरुन धरले आहे. नि:संशय, यात निशाण्या आहेत त्या लोकां करीता, जे ईमान बाळगतात.[११६]

اَلَمْ يَرَوْا اِلَى الطَّيْرِ مُسَخَّرٰتٍ فِيْ جَوِّ السَّمَاۗءِ ۭ مَا يُمْسِكُهُنَّ
اِلَّا اللّٰهُ ۭ اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيٰتٍ لِّقَوْمٍ يُّؤْمِنُوْنَ ﴿٧٩﴾

८०. आणि अल्लाहने तुमच्या साठी तुमच्या घरांना निवास स्थान बनविले [११७] आणि तुमच्या साठी चतुष्पादांच्या कातडी पासून घरे बनविलीत जी तुम्हाला प्रवासाच्या व वास्तव्याच्या प्रसंगी अगदी हलकी-फुलकी वाटतात. [११८] आणि त्यांच्या लोकरी पासून त्यांच्या लंव पासून व केसांपासून तुमच्या करिता (निरनिराळया तऱ्हेचे) सामान व लाभदायक वस्तू बनविल्यात,[११९] या साठी की एक विशेष वेळे पावेतो कामी याव्यात.

وَاللّٰهُ جَعَلَ لَكُمْ مِّنْۢ بُيُوْتِكُمْ سَكَنًا وَّجَعَلَ لَكُمْ مِّنْ جُلُوْدِ
الْاَنْعَامِ بُيُوْتًا تَسْتَخِفُّوْنَهَا يَوْمَ ظَعْنِكُمْ وَيَوْمَ اِقَامَتِكُمْ ۙ
وَمِنْ اَصْوَافِهَا وَاَوْبَارِهَا وَاَشْعَارِهَآ اَثَاثًا وَّمَتَاعًا
اِلٰى حِيْنٍ ﴿٨٠﴾

११३. पहिले उदाहरण एकेश्वरावादच्या संबंधाने होते, तर दुसरे उदाहरण प्रेषित्व संबंधाने आहे.

ज्यांच्या जिव्हा सत्यवादितेकरिता बंद आहेत मांगल्याच्या गुणांनी अगदी वंचित, आपल्या पालनकर्त्याची उपजिविका खातात परंतु कृतघ्न आहेत. भलाईची जी कामे करण्यासाठी त्यांच्या पालनकर्त्याने त्यांना जगात पाठविले आहे, ते ती कामे पार पाडीत नाहीत. दुसरीकडे अल्लाहचा पैगंबर आहे जो आपल्या पालन कर्त्याचा सरळ मार्ग म्हणजे एकेश्वरवादावर कायम आहे आणि आपल्या वाकू शक्तिचा सत्य आणि न्यायाच्या शिकवणी करीता वापर करीत आहे. तेव्हा सांगा, या दोघांपैकी मार्गदर्शक बनविण्यायोग्य असा कोण आहे? जाहिर होय की पैगंबर, परंतु मोठी विचित्र गोष्ट आहे की लोक ईश्वराच्या प्रेषितास सोडून व्यर्थ पुढाऱ्यांचे अनुसरण करतात.

११४. अर्थात ज्याने सृष्टीव्यवस्था बनविली आहे,त्याच्यासाठी या व्यवस्थेचा भंग करणे व त्यातून नव्या व्यवस्थेसह एक नवे विश्व निर्माण करणे काहीहि कठीण नाही, ज्या दिवशी अल्लाह कियामत घडवू इच्छिल तर हे कार्य डोळ्याचे पाते लवण्याच्या आत, किंबहुना याहून कमी वेळेत घडवील.

भूतकालीन मनुष्य या कारणास्तव कियामतीला बुद्धिपासून दूर समजत होता की या सृष्टीची व्यवस्था अतिशय मजबूत आहे, ती कशी भंग होऊ शकते आणि हे मोठे मोठे पहाड. तंतूमय कसे होऊ शकतील परंतु विज्ञानाच्या प्रगतिने याची संभावना अगदी उघड केली आहे. यास्तव अणुला विभागल्याने (Spilt)एवढी जबरदस्त शक्ति बाहेर पडते की क्षणार्धात ती संपूर्ण शहराचा विनाश करते. तेव्हा ज्याचे कणाकणांवर नियंत्रण आहे त्याचा एक संकेत मात्र कणांना फाडण्यास पुरेसा आहे व ते फाटल्याने असे भयानक स्फोट होऊ शकतात ज्याचेच नाव कियामत आहे. या सृष्टीचा निर्माता नि:संशय या गोष्टीस समर्थ आहे की एका सेकंदात कियामतीचा स्फोट घडवून आणावा.

११५. मनुष्य जेव्हा जन्माला येतो तेव्हा ज्ञानाने विरहित व अजाण असतो. परंतु हळू हळू त्याच्या अंगी दृष्टी-श्रवण व विचार चिंतनाची सामर्थ्ये वाढीस लागतात. ज्या आधारे त्यास अन्य प्राण्यांवर विशेषत्व प्राप्त होते. ही सामर्थ्ये अल्लाहनेच प्रदान केलेली आहेत म्हणून या देणग्यांचा हक्क हा माणसाने आपल्या उपकार कर्त्यास ओळखावे व त्याच्याशी कृतज्ञता व्यक्त करावी. परंतु या बाबत तो बेपर्वा होऊन कृतघ्नता करू लागतो.

११६. म्हणजे जर लोकांनी डोळे उघडून आकाशाच्या वातावरणात उडणाऱ्या पक्ष्यांना पाहिले तर त्यांना अल्लाहचे सामर्थ्य व त्याच्या ईशत्वाची चिन्हे दिसून येतील व ते यावर ईमान बाळगतील. पक्षी एखाद्या कृत्रिम सामर्थ्याचा सहारा न घेता आपल्या पंखा द्वारे कशा प्रकारे आकाशात उडतात. कोण आहे ज्यांने यांना उडण्याकरिता पंख दिलेत व त्यांना अशा प्रकारे उडण्याचे प्रशिक्षण दिले. ज्यायोगे ते अवकाशात मैलो गणती प्रवास करतात, पण खाली पडत नाही? तो कोण आहे ज्याच्या हुकुमाच्या व नियमाच्या हे अधीन आहेत?

११७. घर बनविण्याची कला अल्लाहनेच शिकवली व त्यासाठी साधनेहि उपलब्ध करून दिली. घरात माणसाला जी शांती लाभते ती देखील त्याचीच देणगी होय.

११८. म्हणजे गुरांच्या चामडयापासून तंबू बनविले जातात ज्यांची घडी करून प्रवासात सोबत नेणेहि सोपे आहे आणि वास्तव्या करिता त्यांना खोलून छावणी बनविणेहि सोपे. तात्पर्य हे घडी केली जाणारी घरे (Folding Houses)आहेत जी अल्लाहनेच प्रदान केली आहेत.

११९. मेंढीपासून लोकर, उंटापासून लंव आणि बकरी पासून केस प्राप्त केले जातात व यापासून कांबळ, पोषाख आणि बिछाईत इत्यादि बनतात.

८१. आणि अल्लाहने आपल्या निर्माण केलेल्या वस्तूं पासून तुमच्यासाठी सावल्या बनविल्यात.[१२०] आणि पहाडांमध्ये आश्रय स्थाने बनविलीत [१२१] आणि असे पोषाख जे तुम्हाला गरमी (उन्हाळया ) पासून सुरक्षित राखतात [१२२] तसेच असे पोषाख जे तुमच्या युद्धांमध्ये तुम्हाला सुरक्षित राखतात.[१२३] अशा प्रकारे तो तुमच्यावर आपली देणगी पूर्ण करतो. अशा साठी की तुम्ही आज्ञा धारक बनावे [१२४]

وَاللَّهُ جَعَلَ لَكُم مِّمَّا خَلَقَ ظِلَالًا وَجَعَلَ لَكُم
مِّنَ الْجِبَالِ أَكْنَانًا وَجَعَلَ لَكُمْ سَرَابِيلَ تَقِيكُمُ الْحَرَّ
وَسَرَابِيلَ تَقِيكُم بَأْسَكُمْ كَذَٰلِكَ يُتِمُّ نِعْمَتَهُ عَلَيْكُمْ
لَعَلَّكُمْ تُسْلِمُونَ ﴿٨١﴾

८२. यानंतर हि जर ते तोंड फिरवितात तर तुमच्यावर फक्त स्पष्टतः संदेश पोहचविण्याचीच [१२५] जबाबदारी आहे.

فَإِن تَوَلَّوْا فَإِنَّمَا عَلَيْكَ الْبَلَاغُ الْمُبِينُ ﴿٨٢﴾

८३. अल्लाहच्या देणग्यांना हे ओळखतात मग त्यांचा इन्कार करतात [१२६] आणि यांच्यापैकी बहुतेक कृतघ्न आहेत.

يَعْرِفُونَ نِعْمَتَ اللَّهِ
ثُمَّ يُنكِرُونَهَا وَأَكْثَرُهُمُ الْكَافِرُونَ ﴿٨٣﴾

८४. आणि ज्या दिवशी आम्ही प्रत्येक जन-समूहातून एक साक्षी उभा करू [१२७] मग काफीरांना ना (सबब मांडण्याची) आज्ञा दिली जाईल आणि ना त्यांच्याकडून तौबा (क्षमायाचने ) ची मागणी केली जाईल.[१२८]

وَيَوْمَ نَبْعَثُ مِن كُلِّ أُمَّةٍ شَهِيدًا ثُمَّ لَا
يُؤْذَنُ لِلَّذِينَ كَفَرُوا وَلَا هُمْ يُسْتَعْتَبُونَ ﴿٨٤﴾

८५. आणि जेव्हा अत्याचारी अजाब (ईश-शिक्षा) पाहून घेतील तेव्हा ना त्यांचा अजाब सौम्य केला जाईल आणि ना त्यांना सवडच दिली जाईल.

وَإِذَا رَأَى الَّذِينَ ظَلَمُوا الْعَذَابَ فَلَا يُخَفَّفُ عَنْهُمْ
وَلَا هُمْ يُنظَرُونَ ﴿٨٥﴾

८६. आणि ते लोक ज्यांनी (अल्लाहचे) सहभागी ठरविले होते, जेव्हा आपल्या ठरविलेल्या सहभागींना पाहतील तेव्हा उद्गारतील, हे आमच्या पालनकर्त्या ! हे आहेत आमचे ठरविलेले ज्यांना आम्ही तुला सोडून पुकारीत होतो. यावर ते त्यांची गोष्ट त्यांच्या तोंडावर मारतील की तुम्ही खोटारडे आहात.[१२९]

وَإِذَا رَأَى الَّذِينَ أَشْرَكُوا شُرَكَاءَهُمْ قَالُوا رَبَّنَا هَٰؤُلَاءِ
شُرَكَاؤُنَا الَّذِينَ كُنَّا نَدْعُو مِن دُونِكَ فَأَلْقَوْا
إِلَيْهِمُ الْقَوْلَ إِنَّكُمْ لَكَاذِبُونَ ﴿٨٦﴾

८७. त्या दिवशी ते अल्लाह पुढे शिरसावंध होतील [१३०]आणि जे असत्य ते रचत राहीलेत ते सर्व नाहीसे होईल.[१३१]

وَأَلْقَوْا إِلَى اللَّهِ يَوْمَئِذٍ السَّلَمَ وَضَلَّ عَنْهُم
مَّا كَانُوا يَفْتَرُونَ ﴿٨٧﴾

१२०. वृक्षांच्या व पर्वतांच्या सावल्या.

१२१. गुहा व गुफा.

१२२. कडक उन्हाळ्यापासून सुरक्षित राखणारे पोषाखवर लोकरीचा उल्लेख केला गेला आहे. ज्याद्वारे थंडीपासून बचाव होण्याकरिता गरम कपडे तयार केले जातात. म्हणून येथे विशेषत्वाने उन्हाळ्यापासून वाचविण्याच्या कपड्यांचा उल्लेख केला गेला आहे जे रुई वगैरे पासून तयार केले जातात व ज्यांची आवश्यकता अरबस्ताना सारख्या उष्ण देशात अधिक भासते.

१२३. अर्थात चिलखत.

१२४. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने तुमच्यावर देणग्यांचा असा वर्षाव केला आहे की तुमची कोणतीहि नैसर्गिक व स्वाभाविक गरज अशी नाही राहिली जिच्या पूर्ततेची उपाय योजना केली गेली नसावी. या देणग्या त्याने अशा साठी प्रदान केल्या आहेत की तुम्ही आपल्या पालन कर्त्यास ओळखावे व त्याचे आज्ञाधारक दास व्हावे.

१२५. म्हणजे जर उपरोक्त सर्व गोष्टी असतांनाहि त्यांच्या अंगी आपल्या पालन कर्त्याच्या दास्यत्वाची जाणीव बळावत नाही आणि आपल्या चुकीच्या श्रद्धा-तत्वांवरच अटळ राहू इच्छितात, तर आपल्या आचरणास ते स्वत: जबाबदार आहेत.पैगंबरांवर तर केवळ संदेश पोहचविण्याची जबाबदारी होती.

१२६. अनेकेश्वरवादी या गोष्टीचा इन्कारच करीत होते की या देणग्या अल्लाहनेच निर्माण केलेल्या आहेत, परंतु जेव्हा यांच्या पैकी एखाद्यास विशेषत्वाने एखादी ईश-देणगी लाभत असे तेव्हा तो अल्लाहला सोडून इतरांचा अनुग्रह मानत असे की हा अमुक एका दैवताच्या मेहरबानीचा परिणाम आहे किंवा त्याच्या माध्यम व वशिल्याने ही देणगी लाभली आहे. या श्रद्धेमुळे हे माध्यम व वशिलेच त्यांच्या कृतज्ञतेस पात्र ठरतात मग त्यांच्याशी तो व्यवहार करतात, जो केवळ ईश्वराशी केला गेला पाहिजे.अशा प्रकारे ते एकीकडे ईश्वराच्या देणग्यांना मान्य करीत तर दुसरी कडे ते असे आचरण अंगिकारीत की ज्यामुळे स्वीकृतिचा नकार होत असे. शिर्क करणाऱ्यांच्या याच हरकतीवर येथे अंकुश ठेवला गेला आहे.

१२७. म्हणजे प्रेषित जो या जन-समूहाकडे पाठविला गेला होता तो कियामतीच्या दिवशी ईश्वरा समोर साक्ष देईल की मी तुझा संदेश या लोकांपर्यंत पोहचविला होता.

१२८. अर्थात प्रेषिताच्या साक्षी नंतर काफिरांना खोट्या सबबी मांडण्याचा अवसर शिल्लक राहणार नाही कारण प्रेषिताच्या साक्षीने त्यांचा अपराध सिद्ध झालेला असेल व त्यांना हे हि सांगितले जाणार नाही की आपल्या अपराधांची क्षमा मागा कारण माफी मागण्याची वेळ निघून गेलेली असेल. त्याची संधी तर त्यांना दुनियेतच प्राप्त होती. आखिरत तर मोबदल्याचे ठिकाण आहे.

१२९. या खंडनाने स्पष्ट जाहीर होते की येथे ठरविलेल्या सहभागींशी अभिप्रेत मूर्ति नव्हे, किंबहुना ती व्यक्तीमत्चे होत, ज्यांच्याशी शिर्क करणारे असा व्यवहार करतात जो केवळ ईश्वरा सोबत केला गेला पाहिजे होता उदाहरणार्थ त्यांना हाजीर नाजीर जाणून मदततीसाठी पुकारणे, त्यांच्या विषयी ही श्रद्धा बाळगणे की त्यांना असले अधिकार प्राप्त आहेत की ते ईश्वराकडून वाटेल ते देववू शकतीत, ते भाग्य-विधाता आहेत, दु:ख निवारक आहेत आणि अपरोक्षातून धन-संतती प्रदान करतात इत्यादी.

कियामतीच्या दिवशी ही व्यक्तिमत्वे आपल्यावर श्रद्धा राखणाऱ्यांना खोटारडे ठरवतील, की आम्हाला या गोष्टीची खबरहि नव्हती की तुम्ही आम्हाला गरज पूर्ततेकरिता पुकारीत होता, व आम्ही तुमच्या गरजा भागवू शकत नव्हतो, तुम्ही आमच्या बद्दल ज्या गोष्टीचा दावा करीत होते तो पूर्णत:खोटा होता.

१३०. म्हणजे त्या दिवशी हे शिर्क करणारे आपले नखशिखान्त चुकीचे असणे मान्य करतील आणि ईश्वरा समोर आपली अगतिकता व्यक्त करतील.

१३१. अर्थात त्यांचे हे असत्य की, ईश्वराने आपल्या अधिकारा पैकी अमक्या अमक्याला हे अधिकार देऊन ठेवले आहेत आणि तो अमुक एक गोष्ट काण्यास समर्थ आहे. अगदी खोटे सिद्ध होईल आणि त्यांना ईश्वराच्या शिक्षेपासून वाचविण्याकरिता कोणीहि असणार नाही.

स्पष्ट असावे की शिर्क केवळ मूर्तिपूजेतच दिसून येत नाही; किंबहुना आजच्या काळातील मुसलमानांची चांगली मोठी संख्या शिर्क मध्ये वाईट रित्या ग्रस्त आहे. यास्तव त्यांनी आपल्या बुजुर्गांपैकी एखाद्यास मुशिकलकुशा (संकट-निवारक) ची उपाधि देऊन ठेवली आहे तर एखाद्यास दस्तगीर (सहाय्यकर्ता) ची, एखाद्यास 'गरीब नवाज' तर एखाद्यास 'गौस पाक'ची आणि स्पष्टीकरणाने ते ही खात्री देण्याचा प्रयत्न करतात की हे शिर्क नाही, वस्तुत: कुरआनाने तात्विक दृष्ट्या ज्या गोष्टीना शिर्क ठरविले आहे त्यापासून त्यांचा व्यवहार मुळीच भिन्न नाही. अज्ञानी मुसलमानांच्या या

अनेकेश्वरवादीय हरकतीना नामधारी उलेमांचा गट सनद प्रदान करतो. यास्तव आजच्या काळातील एका नव्या भाष्यात येथपावेतो लिहीले गेले आहे की:

‘अशाच प्रकारे रब्ब (पालनकर्ता) आपल्या काही मान्यवर दासांना आपल्या कृपेने ईशत्वाचा मालक बनवितो पण तरी देखील ते पालनकर्ता समान होत नाही. किबहुना त्याचे दासच राहतात.’

हे उघड विरोधात्मक निवेदन आहे आणि जबरदस्त फसवणूक देखील.जणू ईशत्वचा स्वामी बनविण्याची श्रद्धाहि शिर्क ठरत नाही.अल्लाह रक्षण करो असल्या फसवणुकीपासून !

ज्या लोकांनी कुफ्र केले व (लोकांना) अल्लाहच्या मार्गपासून रोखत राहीले. आम्ही त्यांच्या शिक्षेत अधिक शिक्षेची भर घालू, त्या उत्पाता (बिघाडा) च्या मोबदल्यात ज्यास ते निर्माण करीत राहीले. (अल-क़ुर्आन)

الَّذِينَ كَفَرُوا وَصَدُّوا عَن سَبِيلِ اللَّهِ زِدْنَاهُمْ عَذَابًا
فَوْقَ الْعَذَابِ بِمَا كَانُوا يُفْسِدُونَ ﴿٨٨﴾

८८. ज्या लोकांनी कुफ्र केले व (लोकांना) अल्लाहच्या मार्गपासून रोखत राहीले. आम्ही त्यांच्या शिक्षेत अधिक शिक्षेची भर घालू, त्या उत्पाता (बिघाडा) च्या मोबदल्यात [१३२] ज्यास ते निर्माण करीत राहीले.

وَيَوْمَ نَبْعَثُ فِي كُلِّ أُمَّةٍ شَهِيدًا
عَلَيْهِم مِّنْ أَنفُسِهِمْ وَجِئْنَا بِكَ شَهِيدًا
عَلَىٰ هَٰؤُلَاءِ وَنَزَّلْنَا عَلَيْكَ الْكِتَابَ تِبْيَانًا لِّكُلِّ شَيْءٍ
وَهُدًى وَرَحْمَةً وَبُشْرَىٰ لِلْمُسْلِمِينَ ﴿٨٩﴾

८९. आणि ज्या दिवशी आम्ही प्रत्येक जन-समूहात एक साक्षी त्यांच्यातूनच त्यांच्या विरुद्ध उभा करु आणि तुम्हाला त्या लोकांबद्दल साक्ष देण्याकरिता आणू [१३३] आणि त्याच्यांवर प्रमाण कायम करण्याकरिता आम्ही हा ग्रंथ तुमच्यावर अवतरित केला आहे जो प्रत्येक गोष्टीचे स्पष्टत: निवेदन करणारा आहे.[१३४] आणि मार्गदर्शन व कृपा आणि शुभ-समाचार आहे अशा लोकांकरिता जे मुस्लिम (आज्ञाधारक) बनतील.

إِنَّ اللَّهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْإِحْسَانِ وَإِيتَاءِ
ذِي الْقُرْبَىٰ وَيَنْهَىٰ عَنِ الْفَحْشَاءِ وَالْمُنكَرِ وَالْبَغْيِ
يَعِظُكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُونَ ﴿٩٠﴾

९०. अल्लाह आदेश देतो न्यायाचा [१३५] भलाईचा [१३६] आणि नातेवाईकांना देण्याचा [१३७] आणि निर्लज्जता, दुष्कृत्य व अत्याचारापासून रोखतो. तो तुम्हाला उपदेश करतो. अशासाठी की तुम्ही बोध ग्रहण करावा.

وَأَوْفُوا بِعَهْدِ اللَّهِ إِذَا عَاهَدتُّمْ وَلَا تَنقُضُوا الْأَيْمَانَ
بَعْدَ تَوْكِيدِهَا وَقَدْ جَعَلْتُمُ اللَّهَ عَلَيْكُمْ كَفِيلًا إِنَّ اللَّهَ
يَعْلَمُ مَا تَفْعَلُونَ ﴿٩١﴾

९१. आणि अल्लाहच्या वचनास जेव्हा तुम्ही बांधले असेल [१३८] पूर्ण करा व शपथांना दृढ केल्यानंतर तोडून टाकू नका.जेव्हा अल्लाहला तुम्ही आपल्यावर साक्षी बनवून घेतले आहे. [१३९] अल्लाह जाणतो जे काही तुम्ही करता.

وَلَا تَكُونُوا كَالَّتِي نَقَضَتْ غَزْلَهَا مِن بَعْدِ قُوَّةٍ
أَنكَاثًا تَتَّخِذُونَ أَيْمَانَكُمْ دَخَلًا بَيْنَكُمْ أَن
تَكُونَ أُمَّةٌ هِيَ أَرْبَىٰ مِنْ أُمَّةٍ إِنَّمَا يَبْلُوكُمُ اللَّهُ بِهِ وَلَيُبَيِّنَنَّ
لَكُمْ يَوْمَ الْقِيَامَةِ مَا كُنتُمْ فِيهِ تَخْتَلِفُونَ ﴿٩٢﴾

९२. आणि त्या स्त्री समान नका होऊ जिने मोठ्या कष्टाने सूत कातले मग त्याचे तुकडे तुकडे केलेत. [१४०] तुम्ही आपल्या शपथांना आपसातील विशवास घाताचे साधन बनविता या कारणास्तव की एक समूह दुसऱ्या समूहाहून अधिक (शक्ति शाली) आहे.[१४१] अल्लाह याद्वारे तुमची कसोटी घेतो. [१४२] कियामतीच्या दिवशी तो तुमच्या मतभेदांची हकीगत तुम्हाला खचितच उकलून दाखवील.[१४३]

१३२. क़ुरआनाच्या दृष्टीने सर्वात मोठा उत्पात (बिघाड) असा की माणसाने शिर्क करावे व त्यास पसरावे आणि एकेश्वरवादाच्या मार्गापासून लोकांना रोखावे.

१३३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह निसा टीप ९६.

१३४. क़ुरआनाचा विषय आहे 'अल्लाहचा मार्ग लोकांवर स्पष्ट करणे व मार्गभ्रष्टते पासून त्यांना वाचविणे याचा विचार क़ुरआनने समस्त आवश्यक गोष्टी स्पष्टत: निवेदिल्या आहेत ज्या माणसाच्या मार्गदर्शनासाठी अगदी पुरेशा व लाभदायक आहेत राहिलेत क़ुरआनाच्या आदेशांचे विवरण व त्याची कार्य प्रणाली वर पैगंबरांच्या आचरणाने ती चांगल्या प्रकारे स्पष्ट केली आहे.

आणि जेव्हा ही वस्तुस्थिती आहे की क़ुरआनात त्या समस्त गोष्टी सस्पष्टीकरण निवेदिल्या गेल्या आहेत ज्या माणसाच्या मार्गदर्शना संबंधी आहेत व ज्यावर त्याच्या आखिरतमध्ये मुक्ती लाभणे अवलंबून आहे तर कोणतीहि श्रद्धा अशी असू शकत नाही जी धर्मात आवश्यक असावी व क़ुरआनात निवेदिली गेली नसावी यास्तव जे मुसलमान क़ुरआनाने प्रस्तुत केलेल्या श्रद्धेस अन्य एखाद्या श्रद्धेची भर घालतात ते धर्मात फार मोठ्या बिदअत (नवीन प्रथे) ची भर घालतात आणि यामुळेच मुसलमानामध्ये अनेक पंथ निर्माण झालेत. जर श्रद्धे बाबतीत ते क़ुरआनास पर्याप्त समजू लागतील तर फिरका बंदी नाहीशी होईल.

१३५. क़ुरआन जेथे या गोष्टीवर जोर देतो की माणसाने आपल्या पालन कर्त्याशी सदाचाराच्या अधारे संबंध प्रस्थापित करावा. तेथे तो ही ताकीदहि करतो की माणसाने आपल्या नैतिक जबाबदाऱ्या ओळखाव्यात व एकाने दुसऱ्याशी आपले संबंध चांगले ठेवावेत दासांच्या अधिकारांबाबत दुर्लक्षिता किंवा त्यांचा हक्क मारण्यास त्याने गुन्हा ठरविले आहे.

या आयातीत जो हुकुम दिला गेला आहे तो मोठा परिपूर्ण व मूलभूत नैतिक आदेशांनी युक्त असा आहे. तसेच सर्वसाधारण पणे हा आदेश दिला गेला आहे म्हणजे प्रत्येक व्यक्तिला संबोंधून आहे अवतरणाच्या दृष्टीने आयत व आयतच नव्हे तर संपूर्ण सूरह अशा वेळी अवतरली जेव्हा ईमान बाळगणाऱ्यावर मक्केच्या काफीरांचा जुलूम वाढला होता. त्या प्रसंगी न्यायाचा आदेश देऊन मनुष्याच्या विवेकास जागृत केले गेले. न्याय असा गुणविशेष आहे जो माणसाकरिता केवळ प्रतिष्ठा कारकच नाही तर त्यास सादाचारी बनवितो. कथन असा किंवा कृति दोघांतहि न्याय आवश्यक आहे.

१३६. मनुष्य कोणताहि असो त्याच्याशी भलाईचे वर्तन करा.

१३७. नातेवाईकांच्या हक्कास अग्रक्रम आहे. त्यांच्याशी चांगले वर्तणूक व त्यांना आर्थिक मदत देणे आवश्यक आहे.

१३८. जेव्हा तुम्ही वचन बांधलेले असेल हे शब्द जाहीर करतात की येथे अल्लाहच्या वचनाशी अभिप्रेत ते वचन होय जे जाणीव पूर्वक मनुष्य अल्लाहशी बांधील. उदाहरणार्थ संकटग्रस्त माणसाचे अल्लाहला हे वचन देणे की जर या संकटातून तू मला सोडविले तर मी तुझा कृतज्ञ दास बनेन परंतु संकटातून सुटका झाल्यनंतर आपल्या वचना विरुद्ध शिर्क करणे व ईश्वराशी कृतघ्न होणे (सूरहअनआम आयत क्र.६३,६४) अथवा माणसाचे अल्लाहला हे वचन देणे की जर तू भली चांगली संतती प्रदान केली तर मी तुझा कृतज्ञ दास होईन परंतु चांगली संतती प्रदान झाल्यावर आपल्या वचनाशी मुकरणे व ईश्वराच्या देणगीत इतरांना सहभागी ठरविणे (अआराफ १८९-१९०) उघडरित्या या प्रकारच्या वचनांविरुद्ध जाणे स्पष्टत: वचनभंग करणे होय.

अल्लाहशी केलेल्या वचना मध्ये या प्रकारच्या वचना खेरीज नवस (नजर ) हि सामील आहेत जे एखाद्याने अल्लाहसाठी मानले असावेत आणि व्यापक अर्थाने अल्लाहचे आज्ञापालन व दास्यत्वाचे वचन देखील.

१३९. येथे शपथांशी अभिप्रेत ते करार होत जे अल्लाहच्या शपथेवर केले गेले जावेत यास्तव अरब लोकांमध्ये अशी प्रथा होती की जेव्हा एखाद्याशी ते करार करीत तेव्हा त्यास दृढ करण्याकरिता अल्लाहची शपथ घेत आणि शपथ तोडण्याचा अर्थ वचनभंग करणे होय जी फार मोठ्या अपराधाची बाब होय.

१४०. म्हणजे ज्या प्रमाणे मोठ्या कष्टाने कातलेल्या सूताचे तुकडे तुकडे करून टाकणे स्पष्ट नादानी व आपल्या कष्टास व्यर्थ घालविणे होय. तद्वतच आपल्या वचन-करारास ईश्वराच्या शपथेने दृढ केल्यानंतर तोडणे फार मोठी नादानी व मोठ्या नुकसानाची बाब आहे. हा संकेत यहुद्यांकडे आहे ज्यांनी अल्लाहला त्याच्या शरीयतीचे पालन करण्याचे वचन दिले होते. परंतु त्यांनी वचन भंग केला व त्याच्या शरीयतीचे पालन करण्याचे वचन दिले होते. परंतु त्यांनी वचन भंग केला व त्याच्या आज्ञा पालनास झुगारले. या उदाहरणाचा हेतु नव्याने इस्लाम धर्मात प्रवेश केलेल्या लोकांना दृढता अंगिकारण्याची ताकीद करणे हा होय.

१४१. हे अशा लोकांना संबोधून आहे ज्यांनी इस्लामचा स्वीकार तर केला पण परिस्थितीच्या प्रखरतेने ज्यांचे पाय डगमगत होते हे नंतरच्या आयतीवरून स्पष्ट आहे. उदाहरणार्थ उबैदुल्लाह बिन जहशने इस्लाम कबूल करून हब्श (ॲबिसिनीया) देशाकडे स्थलांतर केले परंतु नंतर ईसाई (ख्रिश्चन) झाला. (अल-बिदाया ख. ४ पा. १४३)

या आयतीत शपथांशी अभिप्रेत 'कलमए शहादत' (साक्षीचे वचन) होय. ज्याचा उच्चार करून एखादा मनुष्य इस्लाम धर्मात दाखल होतो.यास्तव सूरह मुनाफिकून मध्ये दांभिकांच्या या साक्षीस की 'मुहम्मद अल्लाहचे प्रेषित आहेत' 'इमान'ला शपथांच्या अर्थानी घेतले गेले आहे. (सूरह मुनाफिकून आयत १-२ )

आणि शपथाना अपहाराचे साधन बनविण्याचा अर्थ असा की इस्लाममध्ये दाखल झाल्यानंतर त्याच्या पासून परावृत्त होणे ईश्वराशी वचनभंगहि आहे आणि मुस्लिम जन- समूहाशी प्रतारणा देखील. त्या काळी मक्केत मुसलमानांचा समूह अत्यल्प होता जो स्वसंरक्षणाचेहि सामर्थ्य बाळगत नव्हता आणि दुसरीकडे अनेकेश्वरवाद्यांचा समूह होता जो विपुल संख्येबरोबरच भौतिकदृष्ट्या मोठा सामर्थ्यशाली होता.हा समूह आपल्या बळाच्या जोरावर मुसलमानाविरूद्ध अत्याचार व अतिरेकाच्या पातळीवर येऊन होता. या बिकट व असह्य परिस्थितीमुळे काही कमजोर मुसलमानांचे पाय डागमगू लागले होते ज्याबाबत त्यांना येथे सावध केले गेले आहे.

१४२. कसोटी या गोष्टीची की तुम्ही एका अशा समूहात सामील होता जो अल्प व दुर्बल आहे परंतु ज्या समवेत सत्याची शक्ति आहे किंवा अशा समूहाची साथ देता जो बाह्यत शक्तिशाली आहे परंतु नखशिखान्त असत्य आहे.

१४३. म्हणजे कियामतीच्या दिवशी माहित होईल की सत्यनिष्ठ कोण होता? एकेश्वरवाद व इस्लामच्या आधारावर अस्तित्वात येणारा समूह किंवा अनेकेश्वरवादी धर्माच्या आधारावर तयार होणारा समूह.

अल्लाहने इच्छिले असते तर तुम्ही सर्वांना एकच जन-समूह बनविले असते परंतु तो ज्याला इच्छितो. मार्गभ्रष्ट करतो व ज्याला इच्छितो मार्गदर्शन करतो. [१४४] आणि तुम्ही जे काही करीत आहात त्या संबंधी तुम्हाला निश्चित पणे विचारले जाईल. (अल-क़ुर्आन)

९३. अल्लाहने इच्छिले असते तर तुम्ही सर्वांना एकच जन-समूह बनविले असते परंतु तो ज्याला इच्छितो. मार्गभ्रष्ट करतो व ज्याला इच्छितो मार्गदर्शन करतो.[१४४] आणि तुम्ही जे काही करीत आहात त्या संबंधी तुम्हाला निश्चित पणे विचारले जाईल.

وَلَوْ شَاۤءَ اللّٰهُ لَجَعَلَكُمْ اُمَّةً وَّاحِدَةً وَّلٰكِنْ يُّضِلُّ
مَنْ يَّشَاۤءُ وَيَهْدِيْ مَنْ يَّشَاۤءُ ۭ وَلَتُسْـَٔـلُنَّ
عَمَّا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٩٣﴾

९४. आणि आपल्या शपथांना आपसातील विश्वासघाताचे साधन बनवू नका की एखादे पाऊल स्थिरावल्यानंतर डगमगावे.[१४५]व अल्लाहच्या मार्गा पासून रोखण्याच्या मोबदल्यात तुम्हाला दुष्परिणतिची गोडी चाखावी लागावी. आणि तुम्ही मोठ्या अजाबास (ईश-शिक्षेस) पात्र व्हावे.[१४६]

وَلَا تَتَّخِذُوْٓا اَيْمَانَكُمْ دَخَلًۢا بَيْنَكُمْ فَتَزِلَّ قَدَمٌۢ بَعْدَ
ثُبُوْتِهَا وَتَذُوْقُوا السُّوْۗءَ بِمَا صَدَدْتُّمْ عَنْ سَبِيْلِ اللّٰهِ ۚ
وَلَكُمْ عَذَابٌ عَظِيْمٌ ﴿٩٤﴾

९५. अल्लाहच्या वचनास थोड्या किमतीवर विकू नका अल्लाहजवळ जे काही आहे ते तुमच्याकरिता अधिक चांगले आहे, जर तुम्ही जाणाल. [१४७]

وَلَا تَشْتَرُوْا بِعَهْدِ اللّٰهِ ثَمَنًا قَلِيْلًا ۭ
اِنَّمَا عِنْدَ اللّٰهِ هُوَ خَيْرٌ لَّكُمْ اِنْ كُنْتُمْ تَعْلَمُوْنَ ﴿٩٥﴾

९६. जे काही तुमच्या जवळ आहे ते संपुष्टात येईल आणि जे अल्लाहजवळ आहे ते बाकी राहणारे आहे. [१४८] व ज्या लोकांनी संयम पाळला, त्यांना आम्ही त्यांच्या उत्कृष्ट आचरणानुसार मोबदला प्रदान करू. [१४९]

مَا عِنْدَكُمْ يَنْفَدُ وَمَا عِنْدَ اللّٰهِ بَاقٍ ۭ وَلَنَجْزِيَنَّ الَّذِيْنَ
صَبَرُوْٓا اَجْرَهُمْ بِاَحْسَنِ مَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿٩٦﴾

९७. जो कोणी सत्कृत्य करील मग तो पुरूष असो वा स्त्री मात्र या अटीवर की तो ईमान बाळगणारा असावा आम्ही त्याच्याकडून स्वच्छ-शुद्ध जीवन व्यतीत करवू.[१५०] आणि त्यांना त्यांच्या उत्कृष्ट आचरणानुसार मोबदला प्रदान करू.

مَنْ عَمِلَ صَالِحًا مِّنْ ذَكَرٍ اَوْ اُنْثٰى وَهُوَ مُؤْمِنٌ
فَلَنُحْيِيَنَّهٗ حَيٰوةً طَيِّبَةً ۚ وَلَنَجْزِيَنَّهُمْ اَجْرَهُمْ بِاَحْسَنِ
مَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿٩٧﴾

९८. तर ज्व्हा तुम्ही क़ुरआन वाचू (पठण करू) लागाल तेव्हा धि:कारलेल्या सैतानापासून अल्लाहचे शरण मागत जा. [१५१]

فَاِذَا قَرَاْتَ الْقُرْاٰنَ فَاسْتَعِذْ بِاللّٰهِ
مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ ﴿٩٨﴾

९९. त्याचा जोर अशा लोकांवर चालत नाही ज्यांनी ईमान बाळगले व जे आपल्या पालन कर्त्यावर भरवसा ठेवतात. [१५२]

اِنَّهٗ لَيْسَ لَهٗ سُلْطٰنٌ عَلَى الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَلٰي رَبِّهِمْ
يَتَوَكَّلُوْنَ ﴿٩٩﴾

१००. त्याचा जोर फक्त अशाच लोकांवर चालतो जे त्याला आपला मित्र बनवितात आणि जे अल्लाहचा सहभागी ठरवितात. [१५३]

اِنَّمَا سُلْطٰنُهٗ عَلَى الَّذِيْنَ يَتَوَلَّوْنَهٗ وَالَّذِيْنَ
هُمْ بِهٖ مُشْرِكُوْنَ ﴿١٠٠﴾ ع

१४४. म्हणजे अल्लाह समस्त माणसांना आपल्या जबरदस्त सामर्थ्याद्वारे मुसलमान बनवू शकत होता ज्या अर्थी कसोटीचा हेतु होता म्हणून त्याने माणसाला हे स्वतंत्र्य बहाल केले की सत्य व असत्यापैकी वाटेल त्याची निवड करावी. तेव्हा जो मनुष्य ज्या गोष्टीचा अभिलाषी, असतो अल्लाहची मर्जी त्यास त्याच मार्गाला लावते. म्हणून अनेकेश्वरवादी व काफीरांची विपुलता बघून प्रभावीत व्हावयास नको, किबहुना हे पाहिले पाहिजे की मुक्ति कोणत्या मार्गाने लाभेल.

१४५. हे मुसलमानांना संबोधून आहे आणि वरील टीप क्र.१४१ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे येथे शपथांशी अभिप्रेत कलम -ए-शहादतचा उच्चार करून अल्लाहची दास्यत्व व आज्ञा पालनाबाबत वचनबद्ध होणे होय. आणि पाय डगमगण्याचा अर्थ या वचनाविरूद्ध जाणे होय.

१४६. म्हणजे जर तुम्ही इस्लाम कबूल केल्यानंतर त्याविरूद्ध मार्गाचा अंगिकार केला तर तुमचे हे कृत्य कितीतरी लोकांना अल्लाहच्या मार्गापासून रोखण्यास कारणीभूत ठरेल. अशा प्रकारे तुम्ही स्वत: देखील मार्गभ्रष्ट व्हाल आणि ईश-निर्मिती करीता मार्गभ्रष्टतेची सामुग्री कराल. आणि जर तुम्ही असे केले तर त्याचे अत्यंत भीषण परिणाम तुम्हाला भोगावे लागतील व सक्त शिक्षेस तुम्ही पात्र ठराल.

१४७. म्हणजे जर एखाद्या ऐहिक लाभाकरिता तुम्ही वचनभंग केला किंवा लोभाला बळी पडून तुम्ही इस्लामशी प्रतारणा केली तर लक्षात ठेवा हा लाभ ऐहीक दृष्ट्या कितीहि मोठा असो आखिरतच्या तुलनेने अगदी तुच्छ असेल म्हणून आखिरतला ध्येय-उद्दिष्ट बनवा आणि जगाच्या तुच्छ फायद्यासाठी आपल्या धर्माचा बळी देऊ नका.

१४८. म्हणजे जगाची मालमत्ता संपणारी आहे आणि आखिरत बकी राहणारी आरे म्हणून अखिरतला आपले ध्येय-उद्दिष्ट बनवा व त्याच्या देणग्यांचे अभिलाषी व्हा.

१४९. म्हणजे या कठीण कसोटीत जे लोक सत्यनिष्ठ राहतील, त्यांच्याकरिता हे उत्कृष्ट आचरण अखिरतमध्ये त्यांचा दर्जा निश्‍चित करतील व त्यांना या उत्कृष्ट आचरणानुसार मोबदला प्रदान केला जाईल.

१५०. ईमान बाळगणाऱ्यांना आखिरतमध्ये जे यशस्वी जीवन लाभेल ते तर लाभेलच, पण या जगातहि सर्वश्रेष्ठ आल्लाहचा वायदा आहे की तो त्यांना अत्यंत स्वच्छ शुद्ध जीवन व्यतीत करवील. स्वच्छ शुद्ध जीवनात श्रद्धेची स्वच्छ-शुद्धता, ईमानचा नूर, अंत:करणाची शुचिर्भूतता बुद्धिचे श्रेष्ठत्व, आत्माची शांती, डोळ्यांचा थंडावा शरीराची स्वच्छ-शुद्धता, उपासनेचे सौंदर्य, हलाल उपजिविका, शुद्ध नितिमत्ता, जबाबदारीची जाणीव, सत्कृत्यांची ओढ व दुष्कृत्यांचा तिरस्कार या सारख्या गोष्टी सामील आहेत. ईमान बाळगणाऱ्या मनुष्याला या स्वच्छ शुद्ध जीवनाच्या प्राप्तीने जी गोडी जाणवते, त्याची किंचित मात्र कल्पना भौतिक वाद्यांना येऊ शकत नाही आणि या स्वच्छ शुद्ध जीवनाच्या तुलनेत सुख विलासाचे जीवन अगदी तुच्छ होय.

१५१. अर्थात सद्भाग्याचा हा मार्ग ज्याचा वरील आयतीमध्ये उल्लेख केला गेला क़ुरआनाद्वारे तुमच्यावर उघडू शकतो. मात्र या अटीवर की तुम्ही कुरआन पठण करतांना सैतानापासून सावध रहावे कारण सैतान आपल्या कुविचार प्रेरणेद्वारे या बेतात असतो की माणसाला योग्यरित्या क़ुरआन समजून न यावे. तो मस्तिष्कात बेचैनी निर्माण करून क़ुरआनाच्या शिकवणीस गलत सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो.

या आदेशाच्या पालनार्थ क़ुरआन पठण करतांना

اَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطَانِ الرَّجِيْمِ

''मी अल्लाहचे शरण मागतो, धि:कारलेल्या सैतानापासून'' हे प्रार्थना स्वरूप वचन उच्चारणे आवश्यक आहे परंतु याचा पूर्ण लाभ त्याच स्थितीत लाभू शकतो जेव्हा मनुष्य जाणीवपूर्वक या वचनाचा उच्चार करील व क़ुरआनास समजून घेण्याची इच्छा बाळगील.

१५२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हिज्र टीप क्र. ३९

१५३. म्हणजे सैतान अशाच लोकांना बहकविण्यात यशस्वी होता जो आपल्या पालन कर्त्या ऐवजी सैतानाशी दोस्ती करतात आणि एकेश्वर वादास सोडून शिर्क (अनेकेश्वरभक्ति) करू लागतात.

१०१. आणि जेव्हा आम्ही एक आयतीच्या जागी दुसरी आयत अवतरीत करतो [१५४] आणि अल्लाहच अधिक चांगले जाणतो त्या गोष्टी जी तो अवतरीत करतो. तेव्हा हे लोक म्हणतात की तुम्ही तर आपल्यातर्फे गढून घेता. वास्तविकता अशी की यांच्यापैकी अधिकांश लोक जाणत नाहीत (की हकीगत काय आहे).

وَإِذَا بَدَّلْنَا آيَةً مَكَانَ آيَةٍ ۙ وَاللَّهُ أَعْلَمُ بِمَا يُنَزِّلُ
قَالُوا إِنَّمَا أَنْتَ مُفْتَرٍ ۚ بَلْ أَكْثَرُهُمْ لَا يَعْلَمُونَ ﴿١٠١﴾

१०२. सांगा, यास रूहुल् कुदुस (पवित्र आत्म्या) ने तुमच्या पालन कर्त्या तर्फे सत्यासह अवतरीत केले आहे.[१५५] अशासाठी की त्याने (अल्लाहने) ईमान बाळगणाऱ्यांना मजबूती प्रदान करावी आणि मार्गदर्शन व शुभ समाचार असो इस्लाम कबूल करणाऱ्यांकरिता.

قُلْ نَزَّلَهُ رُوحُ الْقُدُسِ مِنْ رَبِّكَ بِالْحَقِّ
لِيُثَبِّتَ الَّذِينَ آمَنُوا وَهُدًى وَبُشْرَىٰ لِلْمُسْلِمِينَ ﴿١٠٢﴾

१०३. आम्हाला माहित आहे. की हे असे म्हणतात की या माणसाला एक मनुष्य शिकवितो वस्तुतः ज्याच्याकडे हे निर्देश करतात तो मनुष्य अरबेतर आहे आणि ही स्पष्ट अरबी भाषा आहे.[१५६]

وَلَقَدْ نَعْلَمُ أَنَّهُمْ يَقُولُونَ إِنَّمَا يُعَلِّمُهُ بَشَرٌ ۗ لِسَانُ الَّذِي
يُلْحِدُونَ إِلَيْهِ أَعْجَمِيٌّ وَهَٰذَا لِسَانٌ عَرَبِيٌّ مُبِينٌ ﴿١٠٣﴾

१०४. खरे पाहता जे लोक अल्लाहच्या आयतींवर ईमान बाळगत नाही अल्लाह त्यांना मार्ग दाखवीत नाही व त्यांच्याकरिता दुःखदायक शिक्षा आहे.

إِنَّ الَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِآيَاتِ اللَّهِ لَا يَهْدِيهِمُ اللَّهُ وَلَهُمْ
عَذَابٌ أَلِيمٌ ﴿١٠٤﴾

१०५. खोटे (कथन) तर तेच लोक रचतात जे अल्लाहच्या आयतींवर ईमान बाळगत नाही. [१५७] तेच नखशिखान्त खोटारडे होत.

إِنَّمَا يَفْتَرِي الْكَذِبَ الَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ
بِآيَاتِ اللَّهِ ۖ وَأُولَٰئِكَ هُمُ الْكَاذِبُونَ ﴿١٠٥﴾

१०६. ज्या एखाद्याने अल्लाहवर ईमान बाळगल्यानंतर, त्याच्याशी कुफ्र केले या स्थिती खेरीज की त्याला विवश केले गेले असावे व त्याचे मन ईमानाबाबत समाधानी असावे.[१५८] परंतु ज्याने कुफ्रसाठी हृदय खुले केले तर अशा लोकांवर अल्लाहचा प्रकोप होय व त्यांच्याकरिता फार मोठी शिक्षा आहे.[१५९]

مَنْ كَفَرَ بِاللَّهِ مِنْ بَعْدِ إِيمَانِهِ إِلَّا مَنْ أُكْرِهَ وَقَلْبُهُ
مُطْمَئِنٌّ بِالْإِيمَانِ وَلَٰكِنْ مَنْ شَرَحَ بِالْكُفْرِ صَدْرًا
فَعَلَيْهِمْ غَضَبٌ مِنَ اللَّهِ ۖ وَلَهُمْ عَذَابٌ عَظِيمٌ ﴿١٠٦﴾

१०७. हे एवढ्यासाठी की त्यांनी ऐहिक जीवनास अखिरतच्या तुलनेत पसंत केले. [१६०] आणि अल्लाह काफीर लोकांना मार्गदर्शन करीत नसतो.

ذَٰلِكَ بِأَنَّهُمُ اسْتَحَبُّوا الْحَيَاةَ الدُّنْيَا
عَلَى الْآخِرَةِ وَأَنَّ اللَّهَ لَا يَهْدِي الْقَوْمَ الْكَافِرِينَ ﴿١٠٧﴾

१५४. क़ुरआन मनुष्य लिखित ग्रंथासारखा ग्रंथ नव्हे की त्यास पूर्णकरून एकाच वेळी सादर केले जाते व त्या द्वारे लोकांच्या ज्ञानात वाढ केली जाते किंवा एखादे ज्ञान विषयक संशोधन प्रस्तुत केले जाते, किंबहुना हा ग्रंथ माणसाच्या निर्मात्याने त्याच्या मार्गदर्शन, शिकवण व प्रशिक्षणासाठी अवतरीत केला आहे म्हणून बुद्धिकौशल्याची निकड अशी भासली की क़ुरआनावर ईमान बाळगणाऱ्यांची जी जमात आरंभी घडून येईल तिच्या समोर उद्‌भवणाऱ्या परिस्थितीनुषंगाने योग्य वेळी व योग्य प्रसंगी मार्गदर्शन केले जात राहावे जेणेकरून क़ुरआनाचा उद्देश्यहि चांगल्या प्रकारे स्पष्ट व्हावा आणि योग्यवेळी मार्गदर्शन लाभल्यामुळे ईमान बाळगणाऱ्यांमध्ये दृढता व कर्मात मजबूतीहि व्हावी. या महान उद्दिष्टाचा विचार करता कुरआनाचे अवतरण टप्पा टप्प्याने झाले आणि त्यात संक्षेप व विवरणाचा फरक घडला. उदाहरणार्थ सुरवातीच्या सुरतींमध्ये तौहीद (एकेश्वरवादा) ला सर्वकष शैलीत प्रस्तुत केले गेले परंतु नंतरच्या सुरतींमध्ये त्याच्या निकडी मांडल्या गेल्या. तसेच सुरतीला एकमेव ईश्वराच्या उपासनेचा सर्वसाधारण आदेश दिला गेला परंतु नंतर त्याचे विवरण नमाज इत्यादि निवेदिले गेले. काफिरांच्या अत्याचार व अतिरेकाच्या विरोधात मुसलमानांना संयम पाळण्याची आज्ञा दिली गेली आहे परंतु नंतरच्या अवस्थेत त्यांना देश त्यागाची अनुज्ञा दिली गेली .यास्तव या सूरहमध्ये देशत्यागा (ॲबिसिनीया) चा उल्लेखहि केला गेला आहे.

काफिरांना सावधगिरीची सूचना देण्याचा आदेश दिला गेला आहेत परंतु नंतर हटवादीपणा अंगिकारणाऱ्यांशी विरोध करण्याचा आदेशाहि दिला गेला. याच गोष्टी आहेत ज्यांना क़ुरआनने एक आयतीच्या जागी दुसरी आयत आणण्याच्या अर्थाने घेतले आहे. अन्याथा या आयतीमध्ये दुसऱ्या आयतीशी ना कसला विरोध आहे आणि ना एखादी आयत पारिभाषिक अर्थाने रद्द आहे.सूरह नहल मक्की सूरह आहे व ती हि मध्य कालीन म्हणून त्या वेळे पावेतो असा कोणताहि आदेश अवतरला नाही ज्यास एखाद्या दुसऱ्या आयतीने पारिभाषिक अर्थात रद्द ठरविले गेले असावे. यास्तव आयतीच्या हुकुमाला रद्द ठरविण्याची (नासिख मन्सूखची) पारिभाषिक चर्चा येथे अप्रासंगिक आहे आणि आयतीत याच्यासाठी कोणतेहि प्रमाण नाही. नंतरच्या आयतीतील हे वाक्य की 'अशासाठी की त्याने ईमान बाळगणाऱ्यांना दृढता प्रदान करावी' या उद्देश्यास स्पष्ट करण्याकरिता पुरेसे आहे जे वर निवेदिले गेले आहे.

१५५. रूहुल क़ुदुसचा अर्थ पवित्र आत्मा असा आहे. ही हजरत जिब्रील यांची उपाधि आहे जे फिरिश्त्यांचे सरदार आहेत. आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर 'वही' घेऊन येत असत.

१५६. क़ुरआनाने नावाचे स्पष्टीकरण केले नाही की तो कोणता मनुष्य होता ज्याच्या विषयी अनेकेश्वरवादी म्हणत की तो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना शिकवितो. रीवायतीत (कथनांमध्ये) विविध नाव आले आहेत ज्यांची निर्दोषिता संदिग्ध आहे. हा या गोष्टीचा पुरावा होय की ते एखादे उल्लेखनीय व्यक्तिमत्व नव्हते ज्या संबंधी शिकण्या शिकविण्याचा संशय केला जाऊ शकत होता. असे असते तर ते व्यक्तिमत्व प्रसिद्ध राहिले असते व निवेदनकर्त्यांनी मतभेदाशिवाय त्याच्या नावाचा उल्लेख केला असता.

क़ुरआन स्पष्टीकरण करतो की ज्या माणसाकडे अनेकेश्वर वादी संकेत करीत होते त्याची भाषा अरबी नव्हती अशा व्यक्तिकडून हे कसे शक्य आहे की तो कुरआन लिहील जे प्रासादयुक्त अरबीत आहे आणि प्रसादिकतेत व अलंकारीक शैलीत त्याला दुसरे उदाहरण नाही. अनेकेश्वरवाद्यांच्या आक्षेपाचे खंडन करण्याकरिता हे एक प्रमाणच पुरेसे होते अन्यथा विचार चिंतन करणाऱ्यांकरिता तर प्रमाणांची कमतरता नाही जे कुरआनाचे मनुष्य-वाणी असण्याविषयी नकार दर्शवितात आणि हा विश्वास निर्माण करतात की ही पूर्णत: अल्लाहची वाणी होय.

१५७. म्हणजे ईश्वराविषयी असत्य गोष्टी रचणारे तेच लोक असू शकतात जे अल्लाहने अवतरीत केलेल्या 'वही' वर ईमान बाळगत नसावेत. अल्लाहच्या 'वही' वर ईमान आणि ईश्वराकडे मनगढत गोष्टींचा निर्देश करणे दोन अगदी परस्पर विरूद्ध गोष्टी आहेत. म्हणून पैगंबरांवर तर खोटेपणाचा आक्षेप कोणत्याहि प्रकारे लागू होत नाही, तथापि हा आक्षेप अनेकेश्वरवाद्यांवर व पैगंबरांचा विरोध करणाऱ्यांवर लागू पडतो कारण ते ईश्वराच्या नावाने खोटे बोलतात कारण त्यांनी आपल्या श्रद्धेला व आपल्या धर्माला एक तर स्वत:घडवले आहे किंवा रचणाऱ्यांचे अनुसरण करीत आहेत प्रत्येक प्रकारे ते खोटारडे आहेत.

१५८. या आयतीत अशा लोकांना की ज्यांना कुफ्र-वचन मुखाने काढण्यास अगदी विवश केले गेले असावे, असे करण्याची अनुज्ञा या अटीसह दिली गेली आहे की त्यांनी 'ईमाना'वर मन पूर्वक समाधान बाळगावे ही अनुज्ञा केवळ सवलत म्हणून आहे .अन्यथा संकल्पाची गोष्ट अशी की मुसलमानाने प्राणाची बाजी लावाली, पण कुफ्र-वचन मुखातून काढू नये याचे उत्कृष्ट उदाहरण हजरत यासिर व हजरत सुमय्या यांचे आहे की अनेकेश्वरवाद्यांनी त्यांच्यावर सक्त अत्याचार केलेत व शेवटी त्यांची हत्या केली परंतु ते

कुफ्र-वचन उद्‌गारण्यास कोणत्याहि स्थितीत तयार झाले नाहीत. हजरत यासिर पहिले मुसलमान पुरूष होत आणि हजरत सुमय्या पहिली मुसलमान स्त्री होय जे मक्केत शहीद झाले.

१५९. म्हणजे जो कुफ्र वर राजी झाला आणि ज्यांच्या श्रद्धा काफिरांसारख्या झाल्या ते अल्लाहचा प्रकोप व त्याच्या शिक्षेपासून वाचू शकणार नाही.

१६०. स्पष्ट झाले की ऐहीक लाभास आख़िरतच्या लाभावर प्राधान्य देणे काफ़ीरांचे काम होय.

हेच लोक होत ज्यांच्या अंतःकरणांवर, कानांवर व डोळ्यांवर अल्लाहने मोहर लावली आणि हेच लोक गाफील लोक होत. अपरिहार्यतः हे लोक आखिरतमध्ये दुर्दशाग्रस्त असतील. (अल-क़ुर्आन)

१०८. हेच लोक होत ज्यांच्या अंत:करणांवर, कानांवर व डोळ्यांवर अल्लाहने मोहर लावली [१६१] आणि हेच लोक गाफील लोक होत.

أُولَٰئِكَ الَّذِينَ طَبَعَ اللَّهُ عَلَىٰ قُلُوبِهِمْ وَسَمْعِهِمْ وَأَبْصَارِهِمْ ۖ
وَأُولَٰئِكَ هُمُ الْغَافِلُونَ ﴿١٠٨﴾

१०९. अपरिहार्यतः हे लोक आखिरतमध्ये दुर्दशाग्रस्त असतील.

لَا جَرَمَ أَنَّهُمْ فِي الْآخِرَةِ هُمُ الْخَاسِرُونَ ﴿١٠٩﴾

११०. तथापि ज्या लोकांनी कसोटीत पडल्यानंतर देश त्याग केला जिहाद केला [१६२] व संयम पाळला तर या (कर्मा) नंतर निश्चितपणे तुमचा पालनकर्ता त्यांच्यासाठी क्षमा करणारा, कृपा करणारा आहे.

ثُمَّ إِنَّ رَبَّكَ لِلَّذِينَ هَاجَرُوا مِنْ بَعْدِ
مَا فُتِنُوا ثُمَّ جَاهَدُوا وَصَبَرُوا إِنَّ رَبَّكَ مِنْ بَعْدِهَا
لَغَفُورٌ رَحِيمٌ ﴿١١٠﴾

१११. तो दिवस की जेव्हा प्रत्येक मनुष्य आपल्या बचावासाठी वाद घालीत हजर होईल [१६३] आणि प्रत्येक मनुष्याला त्याच्या कर्मांचा पूरेपूर मोबदला दिला जाईल व त्यांच्याशी किंचितहि अन्याय केला जाणार नाही.

يَوْمَ تَأْتِي كُلُّ نَفْسٍ تُجَادِلُ عَنْ
نَفْسِهَا وَتُوَفَّىٰ كُلُّ نَفْسٍ مَا عَمِلَتْ وَهُمْ لَا يُظْلَمُونَ ﴿١١١﴾

११२. अल्लाह एका वस्तीचे उदाहरण वर्णन करतो, जी शांती व समाधानाच्या स्थितीत होती. प्रत्येक दिशेने तिला समृद्धी उपजिविका पोहचत होती परंतु तिने अल्लाहच्या देणग्यांशी कृतघ्नता केली तेव्हा अल्लाहने त्यांच्या (वस्तीवाल्यांच्या) करतूतीपायी त्यांना भूक व भयाने आच्छादित होऊन जाण्याची गोडी चाखविली.[१६४]

وَضَرَبَ اللَّهُ مَثَلًا قَرْيَةً كَانَتْ آمِنَةً مُطْمَئِنَّةً
يَأْتِيهَا رِزْقُهَا رَغَدًا مِنْ كُلِّ مَكَانٍ فَكَفَرَتْ بِأَنْعُمِ
اللَّهِ فَأَذَاقَهَا اللَّهُ لِبَاسَ الْجُوعِ وَالْخَوْفِ بِمَا كَانُوا
يَصْنَعُونَ ﴿١١٢﴾

११३. आणि यांच्या जवळ यांच्या मधूनच एक प्रेषित आला परंतु यांनी त्यास खोटे ठरविले. शेवटी ईश-शिक्षेने त्यांना येऊन गाठले अशा स्थितीत की ते अत्याचारी होते.[१६५]

وَلَقَدْ جَاءَهُمْ رَسُولٌ مِنْهُمْ فَكَذَّبُوهُ
فَأَخَذَهُمُ الْعَذَابُ وَهُمْ ظَالِمُونَ ﴿١١٣﴾

११४. तेव्हा अल्लाहने जी हलाल व स्वच्छ-शुद्ध उपजिविका तुम्हाला प्रदान केली आहे त्यातून खा व अल्लाहच्या देणगीशी कृतज्ञता व्यक्त करा जर तुम्ही केवळ त्याचीच उपासना करीत असाल.[१६६]

فَكُلُوا مِمَّا رَزَقَكُمُ اللَّهُ حَلَالًا طَيِّبًا وَاشْكُرُوا
نِعْمَتَ اللَّهِ إِنْ كُنْتُمْ إِيَّاهُ تَعْبُدُونَ ﴿١١٤﴾

१६१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र.१५

१६२. येथे जिहादशी अभिप्रेत ती धडपड (प्रयत्न) होय जे सक्त बिकट परिस्थितीत जीवावर खेळून अल्लाहच्या धर्माचा प्रचार करण्याकरिता केले जावेत.

१६३. म्हणजे कियामतीच्या दिवशी प्रत्येक माणसाला आपल्या आपल्या मुक्तिची काळजी लागेल आणि तो आपल्या बचावासाठी निरनिराळ्या प्रकारच्या सबबी मांडील.

१६४. या उदाहरणाच्या शैलीने मक्का वासियांचीच दशा वर्णिली गेली आहे. ते शांतीपूर्वक व सुखासमाधानाचे जीवन व्यतीत करीत होते आणि खाद्य वस्तू देखील चोहोकडून तेथे पोहचत होती, परंतु अल्लाहच्या देणग्यांची कदर करण्याऐवजी त्यांनी कृतघ्नता केली ज्यामुळे अल्लाहने त्यांच्यावर दुष्काळ लादला हा दुष्काळ एवढा तीव्र होता की उपासमारीची हि वेळ आली व प्राणहानीचे भय वाटू लागले.

१६५. वर मक्कावासीयांची जी दशा वर्णिली गेली आहे, त्याचा परिणाम असा की अल्लाहने त्यांच्या मार्गदर्शनाकरिता त्यांच्या मधूनच एक प्रेषित उदयास आणला पण अल्लाहच्या या उपकाराची कदर करण्याऐवजी त्यांनी प्रेषिताला 'प्रेषित' मानण्यासहि इन्कार दर्शविला व सर्वाधिक मोठा गुन्हा असलेल्या 'शिर्क' वर अटळ राहिले. शोवटी अल्लाहने त्यांना सक्त शिक्षा दिली ही शिक्षा भावी काळात लवकरच त्यांना मिळणार होती यास्तव तिचे अशा प्रकारे वर्णन केले गेले की, 'ही शिक्षा त्यांना मिळालीच'

मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांवर ईश-शिक्षा अशा प्रकारे कोसळली की त्या आयती अवतरल्यानंतर काही वर्षांनीच बद्रयुद्धाचा प्रसंगी ओढवला ज्यात यांचे मोठे मोठे सरदार मारले गेले आणि यानंतर दुसऱ्या लढाया देखील झाल्या अशा प्रकारे अल्लाहची शिक्षा मुसलमानांच्या तलवारीच्या रूपाने त्यांच्यावर अशा प्रकारे कोसळला की त्या क्षेत्रात ना कोठे शिर्कचे नाव राहिले, ना शिर्क करणाऱ्याचे.

१६६. अनेकेश्वरवादी मूर्तिपूजा करीत होते तरीहि ईश्वर भक्तिचा दावा करीत. यास्तव त्यांना सांगितले गेले की जर खरोखर तुम्ही एकमेव ईश्वराचे उपासक आहात तर निश्चितपणे त्याने प्रदान केलेल्या स्वच्छ शुद्ध व हलाल उपजिविकेस नि:संकोचपणे खा आणि अनेकेश्वरवादी भ्रम पूजेत ग्रस्त होऊन अशा कोणत्याहि गोष्टीस आपल्या करिता हराम ठरवू नका तद्वतच ईश-भक्तिची निवड ही देखील आहे की त्याने प्रदान केलेल्या देणग्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करा, म्हणने अल्लाहखेरीज अन्य एखाद्याच्या नावाने जनावरांना जबह करणे आणि अन्य एखाद्या उपास्याच्या उत्सव- समारंभाकरिता नवस नजराणे करणे हे अल्लाहखेरीजच्या उपास्यांची उपासना करण्यासमान होय व एकमेव ईश्वराच्या उपासनेच्या विरूद्ध आहे.

हा संकेत अनेकेश्वरवाद्यांच्या संशय वादाकडे आहे ज्यात गुरफटून ते काही गुरांना मूर्त्यांच्या नावे सोडून देत, मग ना त्याचे दूध पीत, ना त्यांच्यावर स्वार होत आणि ना त्यांचे मांस खात. अशा प्रकारे ते ईश्वराने हलाल ठरविलेल्या गोष्टीस हराम ठरवित व त्यांच्या (ईश्वराच्या देणगीचा अन्य उपास्याशी संबंध जोडून ईश्वराशी कृतघ्नताहि करीत तसेच या गोष्टीस अल्लाहचे सानिध्य प्राप्तीचे साधनहि ठरवित.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मायदा टीप क्र. २४९ व सूरह आनाम टीप क्र.२५१ व २५३

येथे या जनावरांना खाण्यासंबंधी जो आदेश दिला गेला आहे तर त्याचा अर्थ असा की मूर्त्यांसाठी त्यांना अधिकृत करून तुम्ही त्यांच्या अंगी जे 'धार्मिक पावित्र्य' निर्माण केले आहे ते संपुष्टात आणा व अल्लाहने प्रदान केलेल्या चतुष्पाद प्राण्यांना अल्लाहचा अनुग्रह मानून केवळ त्याच्याच नावाने जबह करा व खा.

११५. त्याने तर तुमच्यासाठी केवळ मुरदार, रक्त, डुकराचे मांस व तो (जबीहा ) हराम ठरविला आहे ज्यावर अल्लाह खेरीज अन्य एखाद्याचे नाव घेतले गेले असावे [१६७] मग जो कोणी अगतिक होईल व ना त्या गोष्टीचा ईच्छुक असावा आणि ना मर्यादेचे (गरजेचे) उल्लंघन करणारा तर खचितच अल्लाह माफ करणारा, कृपा करणारा आहे .[१६८]

إِنَّمَا حَرَّمَ عَلَيْكُمُ الْمَيْتَةَ وَالدَّمَ وَلَحْمَ الْخِنْزِيرِ
وَمَا أُهِلَّ لِغَيْرِ اللَّهِ بِهِ ۖ فَمَنِ اضْطُرَّ غَيْرَ بَاغٍ وَلَا عَادٍ
فَإِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَحِيمٌ ﴿١١٥﴾

११६. आणि तुमच्या जीभा जे खोटे आदेश लागू करतात त्या कारणास्तव असे म्हणू नका की हे हलाल आहे व हे हराम जेणेकरून अल्लाहकडे खोट्या गोष्टीचा निर्देश करू लागा.[१६९] जे लोक अल्लाहकडे खोट्या गोष्टीचा निर्देश करतात ते कदापि सफलता प्राप्त करणार नाहीत.

وَلَا تَقُولُوا لِمَا تَصِفُ أَلْسِنَتُكُمُ الْكَذِبَ هَٰذَا
حَلَالٌ وَهَٰذَا حَرَامٌ لِتَفْتَرُوا عَلَى اللَّهِ الْكَذِبَ ۚ إِنَّ
الَّذِينَ يَفْتَرُونَ عَلَى اللَّهِ الْكَذِبَ لَا يُفْلِحُونَ ﴿١١٦﴾

११७. हा अल्पसा सुख विलास आहे, नंतर त्यांच्याकरिता दुःखदायक शिक्षा आहे.[१७०]

مَتَاعٌ قَلِيلٌ وَلَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿١١٧﴾

११८. आणि यहुदी लोकांकरिता आम्ही त्या गोष्टी हराम केल्या होत्या ज्या आम्ही यापूर्वीच तुम्हाला निवेदन केल्या आहेत.[१७१]आम्ही त्यांच्यावर कोणताहि अत्याचार केला नव्हता,किंबहुना ते स्वतः आपल्यावर अत्याचार करीत राहिलेत. [१७२]

وَعَلَى الَّذِينَ هَادُوا حَرَّمْنَا مَا قَصَصْنَا عَلَيْكَ
مِنْ قَبْلُ ۖ وَمَا ظَلَمْنَاهُمْ وَلَٰكِنْ كَانُوا أَنْفُسَهُمْ
يَظْلِمُونَ ﴿١١٨﴾

११९. तथापि तुमचा पालनकर्ता अशा लोकांकरिता ज्यांनी अज्ञानामुळे दुष्कर्म केले मग तौबा (क्षमा याचना ) करून सुधारणा करून घेतली तर निश्चितच तुमचा पालन कर्ता यानंतर (त्यांच्याकरिता) माफ करणारा, कृपा करणारा आहे. [१७३]

ثُمَّ إِنَّ رَبَّكَ لِلَّذِينَ عَمِلُوا السُّوءَ بِجَهَالَةٍ ثُمَّ تَابُوا مِنْ
بَعْدِ ذَٰلِكَ وَأَصْلَحُوا إِنَّ رَبَّكَ مِنْ بَعْدِهَا لَغَفُورٌ رَحِيمٌ ﴿١١٩﴾

१२०. निःसंशय इब्राहीम एक आर्दश व्यक्तिमत्व होते [१७४] अल्लाहचे आज्ञाधारक.[१७५] व त्याचेच होऊन राहणारे.[१७६] ते कधीहि अनेकेश्वरवादी राहिले नाहीत. [१७७]

إِنَّ إِبْرَاهِيمَ كَانَ أُمَّةً قَانِتًا لِلَّهِ حَنِيفًا وَلَمْ يَكُ مِنَ
الْمُشْرِكِينَ ﴿١٢٠﴾

१२१. त्याच्या देणग्यांशी ते कृतज्ञशील होते. [१७८] त्याने त्यांना निवडले [१७९] आणि सरळ मार्गाकडे त्यांचे मार्गदर्शन केले.[१८०]

شَاكِرًا لِأَنْعُمِهِ ۚ اجْتَبَاهُ وَهَدَاهُ إِلَىٰ صِرَاطٍ مُسْتَقِيمٍ ﴿١٢١﴾

१६७. या गोष्टीच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप २०९ ते २१३ स्पष्ट असावे की जबह (पशू-बली) केवळ अल्लाहच्याच नावाने केला गेलेला योग्य आहे कारण जबह करण्याची कृति आपल्या परीने ईश-सान्निध्य व उपासना आहे. म्हणून या प्रसंगी अल्लाहच्या नावासह अन्य एखाद्याचे नाव सामील करणे या सान्निध्य व उपासनेत अन्य उपास्यास सामील करणे होय. जर एखादा मुसलमान जबह करतांना अल्लाहचे नाव घेतो व त्या सोबतच एखाद्या वली वा पीराचेहि नाव घेतो तर हे हि अल्लाहखेरीजच्या उपास्यांपुढे जबह करणे झाले.

१६८. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. २१४ मध्ये केले गेले आहे

१६९. एखाद्या गोष्टीस हलाल किंवा हराम ठरविण्याचा अर्थ असा की अल्लाहने या बाबतीत हा आदेश दिला आहे या दाव्यामागे अपरिहार्यत: अवश्य एखादे प्रमाण असले पाहिजे आणि हे प्रमाण अल्लाहची शरीयतच असू शकते जी प्रेषितांच्या माध्यमाने माणसाला लाभली आहे म्हणून एखाद्या शरअी (शरीअतच्या) प्रमाणा शिवाय केवळ आपल्या इच्छेने एखाद्या गोष्टीस हलाल किंवा हराम ठरविणे अल्लाहकडे खोट्या गोष्टीचा संबंध जोडणे होय.

हे होते अनेकेश्वरवाद्यांचे असत्य परंतु यापेक्षाहि मोठे असत्य आजच्या काळातील निधर्मी लोकांनी शोधून काढले आहे ते असे की ईश्वराचे कसलेहि अस्तित्व नाही किंबहुना ती केवळ मनुष्य-बुद्धिची निर्मिती आहे. तेव्हा हलाल व हरामचा प्रश्नच उद्‌भवत नाही. (نعوذ بالله من ذلك) (अल्लाह यापासून आमचे रक्षण करो).

१७०. म्हणजे अल्लाहशी खोट्या गोष्टीचा संबंध जोडणारे थोडे दिवस मौज मजा लुटू शकतात परंतु ना त्यांचे ऐहिक जीवन खऱ्या अर्थाने यशस्वी आहे आणि ना आखिरतचे यश त्यांना कदापि लाभू शकेल. तेथे तर त्यांना निरंतर भोगावी लागणारी दु:खदायक शिक्षा भोगावीच लागेल.

१७१. हा संकेत सूरह अनआम आयत क्र.१४६ कडे आहे.

स्पष्ट असावे की सूरह अनआम, जसे की विषयांवरून दिसून येते सूरह नहल नंतर अवतरीत झाली आहे. परंतु सूरह नहलच्या काही आयती, ज्यात यहुदींच्या संबंधाने आक्षेपांना उत्तर दिले गेले आहे.सूरह अनआम नंतर अवतरली आणि विषयानुषंगाने त्याची जागा सूरह नहल मध्ये ठरली.

१७२. स्पष्टीकरणाकरिता पहा सूरह अनआम टीप क्र. २६६

१७३. ही आयत त्या लोकांना जे अज्ञानामुळे चुकीच्या धार्मिकतेस बळी पडत राहिले, तौबा (क्षमायाचने) चे व सुधारणेचे आवाहन करते.

१७४. मूळ ग्रंथात 'उम्मा' हा शब्द प्रयोग झाला आहे. त्याचे अनेक अर्थ आहेत. एक अर्थ अनुपमेय व्यक्तिमत्व असा आहे. दुसरा अर्थ नेता व मांगल्याची शिकवण देणारा असा आहे. (लिसानूल अरब खंड१२ पृष्ठ २७) इब्ने तैमिय्या यांनी याला 'आदर्श व्यक्तिमत्व' या अर्थाने घेतले आहे (मज्मुआ फतावा इब्ने तैमिय्या खंड-१७ पृष्ठ ४८३ ) आणि आम्ही या अर्थाला प्राधान्य दिले आहे.

हजरत इब्राहीम यांच्या या वैशिष्ट्याचे निवेदन करण्याचा हेतू त्यांना आपला नेता मानणाऱ्या व त्यांच्या अनुसरणाचा दावा करणाऱ्या अनेकेश्वरवाद्यांवर हे स्पष्ट करणे होय की हजरत इब्राहीम ज्या वातावरणात जन्माला आले तो तर पूर्णत: अनेकेश्वरवादी होते परंतु त्यांचे व्यक्तिमत्व एक अद्वितीय व वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्व होते जे मुव्हहिद बनून उदयास आले व ज्याने संपूर्ण जगास एकेश्वरवादाचा पाठ शिकविला. म्हणून ते मुव्हहिदीनचे ईमाम (नेता) आहेत, अनेकेश्वरवाद्यांचे नव्हे आणि जर खरोखर तुम्हाला त्यांचे अनुसरण करावयाचे आहे तर एकेश्वरवादाचा मार्ग अंगिकारा. यापुढे त्यांचे अन्य गुणविशेष वर्णिले गेले आहेत जे त्यांच्या सर्वकष व आदर्श व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब आहे.

१७५. मूळ ग्रंथात 'क़ानित' हा शब्द वापरला गेला आहे, ज्याचा अर्थ असा मनुष्य जो सदैव आज्ञाधारक असावा या संदर्भात इब्ने तैमिय्या फर्मावितात-

''कुनूतचा अर्थ नित्य स्वरूप आज्ञापालन असा गेला आहे आणि कानित तो होय जो नित्यतेने अल्लाहचे आज्ञा पालन करील'' (मज्मुआ फतावा इब्ने तैमिय्या खंड-५ पृ. २३)

१७६. मूळग्रंथात 'हनीफ' हा शब्द प्रयोग केला गेला त्याचा अर्थ सदाचारी व अल्लाहचाच होऊन राहणारा असा आहे. इब्ने तैमिय्या फर्मावितात-

فَهو مستقيم القلب الى الله دون ماسواه ۔

(مجموع فتاوىٰ ابن تيميہ ج ٢٨ صفحہ ٣٢)

''हनीफ म्हणजे मन:पूर्वक अल्लाहकडेच वळणारा अन्य एखाद्याकडे नव्हे''. (मजमूअ फतावा ख. २८ पृ. ३२ )

१७७. हजरत इब्राहीम कधीहि अनेकेश्वरवादी राहिले नाहीत म्हणून आपल्या अनेकेश्वरवादी धर्माचा तुम्ही जो त्यांच्याशी संबंध जोडता तो अगदी चुकीचा आहे. तात्पर्य हजरत इब्राहीमनी आपल्या संपूर्ण जीवनात कधीहि शिर्क केले नाही म्हणून

ताऱ्याला पाहून त्यांनी जे काही म्हटले होते त्यास शिर्क ठरविले जाऊ शकत नाही किंबहुना ती केवळ वादविवादाची गोष्ट होती. (पहा सूरह अनआम टीप क्र. १३१)

१७८. म्हणजे ते ईश-देणग्याबाबत ईश्वराचीच कृतज्ञता व्यक्त करीत व त्याच्या उपकारास ओळखणारे होते.

१७९.म्हणजे अल्लाहने हजरत ईब्राहीम यांना प्रेषित पदासाठी निवडले.

१८०. म्हणजे प्रेषितपदाने सम्मानित केल्यानंतर धर्मा (इस्लाम) चा मार्ग पूर्णतः त्यांच्यावर खुला केला, जो सरळ अल्लाह पर्यंत पोहचतो.

आम्ही त्यांना इहलोकातहि भलाई प्रदान केली आणि आखिरतमध्येहि ते सदाचारी लोकांपैकी असतील. मग आम्ही तुमच्याकडे वही (ईश-संदेश) पाठविली की इब्राहीमच्या पद्धतिवर चाला, जे सदाचारी होते आणि अनेकेश्वरवद्यांपैकी मुळीच नव्हते. (अल-क़ुर्आन)

१२२. आम्ही त्यांना इहलोकातहि भलाई प्रदान केली [१८१] आणि आखिरतमध्येहि ते सदाचारी लोकांपैकी असतील.[१८२]

وَاٰتَيْنٰهُ فِى الدُّنْيَا حَسَنَةً ۗ وَاِنَّهٗ فِى الْاٰخِرَةِ لَمِنَ
الصّٰلِحِيْنَ ؕ ﴿١٢٢﴾

१२३. मग आम्ही तुमच्याकडे वही (ईश-संदेश) पाठविली की इब्राहीमच्या पद्धतिवर चाला, जे सदाचारी होते आणि अनेकेश्वरवाद्यांपैकी मुळीच नव्हते.[१८३]

ثُمَّ اَوْحَيْنَآ اِلَيْكَ اَنِ اتَّبِعْ مِلَّةَ اِبْرٰهِيْمَ حَنِيْفًا ؕ
وَمَا كَانَ مِنَ الْمُشْرِكِيْنَ ﴿١٢٣﴾

१२४. सब्तचे बंधन अशाच लोकांना लागू केले गेले ज्यांनी या बाबतीत मतभेद केला होता. [१८४] आणि निश्चितच तुमचा पालनकर्ता कियामतींच्या दिवशी यांच्या दरम्यान या गोष्टीचा फैसला फर्माविल ज्यांच्यात हे मतभेद करीत राहीलेत. [१८५]

اِنَّمَا جُعِلَ السَّبْتُ عَلَى الَّذِيْنَ اخْتَلَفُوْا فِيْهِ ؕ وَاِنَّ رَبَّكَ
لَيَحْكُمُ بَيْنَهُمْ يَوْمَ الْقِيٰمَةِ فِيْمَا كَانُوْا فِيْهِ يَخْتَلِفُوْنَ ﴿١٢٤﴾

१२५. आपल्या पालनकर्त्याच्या मार्गाकडे बुद्धि कौशल्य व चांगल्या उपदेशासह आवाहन करा आणि त्यांच्याशी उत्कृष्ट रीतीने वाद विवाद करा [१८६] तुमचा पालनकर्ताच अधिक चांगले जाणतो की कोण त्याच्या मार्गापासून भटकला आहे आणि तोच अधिक चांगले जाणतो मार्गदर्शन प्राप्त करणाऱ्यांना.

اُدْعُ اِلٰى سَبِيْلِ رَبِّكَ بِالْحِكْمَةِ وَالْمَوْعِظَةِ الْحَسَنَةِ
وَجَادِلْهُمْ بِالَّتِىْ هِىَ اَحْسَنُ ؕ اِنَّ رَبَّكَ هُوَ اَعْلَمُ
بِمَنْ ضَلَّ عَنْ سَبِيْلِهٖ وَهُوَ اَعْلَمُ بِالْمُهْتَدِيْنَ ﴿١٢٥﴾

१२६. आणि जर तुम्ही सूड घ्याल तर तेवढाच घ्या जेवढे तुमच्याशी केले गेले आहे आणि जर सहनशीलता पाळाल तर निश्चितच ही गोष्ट सहनशीलता पाळणाऱ्यांकरिता अधिक चांगली आहे.[१८७]

وَاِنْ عَاقَبْتُمْ فَعَاقِبُوْا بِمِثْلِ مَا عُوْقِبْتُمْ بِهٖ ؕ وَلَئِنْ
صَبَرْتُمْ لَهُوَ خَيْرٌ لِّلصّٰبِرِيْنَ ﴿١٢٦﴾

१२७. आणि (हे पैगंबर !) सहनशीलता पाळा आणि तुमचे सहनशीलता पाळणे अल्लाह प्रणीत सुबुद्धिनेच आहे आणि त्या लोकांच्या (दशे) बद्दल दु:ख करू नका आणि ना त्यांच्या कट कारस्थानांमुळे मन संकुचित करा.

وَاصْبِرْ وَمَا صَبْرُكَ اِلَّا بِاللّٰهِ وَلَا تَحْزَنْ عَلَيْهِمْ وَلَا تَكُ فِىْ
ضَيْقٍ مِّمَّا يَمْكُرُوْنَ ﴿١٢٧﴾

१२८. नि:संशय अल्लाह त्या लोकांसोबत आहे ज्यांनी ईश-भय अंगिकारले व जे सदाचारी आहेत.

اِنَّ اللّٰهَ مَعَ الَّذِيْنَ اتَّقَوْا وَّالَّذِيْنَ هُمْ مُّحْسِنُوْنَ ؏ ﴿١٢٨﴾

१८१. हज़रत इब्राहीम यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने इहलोकात जी भलाई प्रदान केली त्यात मान-सन्मान, हजरत इस्माईल व हजरत इसहाक सारखे सुपुत्र, सिरीयाचा समृद्धशाली इलाका, मक्केची आत्मावर्धक भूमी आणि सत्कृत्यांसाठी साधनांची विपुलता या सारख्या गोष्टी सामील होत. तसेच ही गोष्ट देखील की सत्यतेच्या जीव्हा यावच्चंद्र दिवाकरौ त्यांच्याकरिता बुलंद स्वर राहतील. सलाम (शांती) असो हजरत इब्राहीम यांच्यावर

१८२. आखिरतच्या यशाकरिता सदाचारी असणे ही प्रथम शर्त होय. दर्जाची बुलंदी नंतर होय. हजरत इब्राहीम यांनी जगात सदाचाराचे जीवन व्यतीत केले होते म्हणून अखिरतमध्येहि ते सदाचारी असतील.

१८३. इब्राहीमच्या पद्धतिशी अभिप्रेत हजरत इब्राहीम यांचा धर्म व त्यांची शरीयत होय. त्यांचा धर्म एकेश्वरवादाचा धर्म अर्थात इस्लाम होता व त्यांची शरीयत साधी शरीयत होती,ज्यात ती बंधने नव्हती जी यहुदींवर त्यांच्या अवज्ञाकारीतेमुळे लादली गेली. होती आणि 'हज्ज'चे विधी हजरत इब्राहीमच्या शरीअतीचाच एक भाग होय.

क़ुरआनाचे अवतरण हजरत इब्राहीम यांच्या धर्मास व शरीयतीस जिवंत करण्यासाठीच झाले आहे आणि त्यांच्या मार्गाचे अनुसरण करण्याची पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जी आज्ञा दिली गेली आहे तर तिचा अर्थ असा की क़ुरआनाचा मार्ग तोच जो हजरत इब्राहीम यांचा होता. यास्तव क़ुरआनाच्या मार्गावर चालणे म्हणजे हजरत इब्राहीम यांच्या मार्गावर चालणे होय. याऊलट अरबच्या अनेकेश्वरवाद्यांचा मार्ग हजरत इब्राहीम यांचा मार्ग नव्हे.

१८४. 'सब्त' (शनीवारचा दिवस पाळण्याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. २५० मध्ये केले गेले आहे. येथे हे जे फर्माविले गेले आहे की 'सब्त'चे बंधन फक्त अशाच लोकांवर होते ज्यांनी त्याबाबत मतभेद केला होता तर याचे खरे व उत्कृष्ट स्पष्टीकरण हदीस मध्ये निवेदिले गेले आहे-

قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ صلى الله عليه وآله وسلم نَحْنُ الْاٰخِرُوْنَ السَّابِقُوْنَ
يَوْمَ الْقِيَامَةَ بَيْدَ اَنَّهُمْ اُوْتُوا الْكِتٰبَ مِنْ قبلنا وَ اُوْتِيْنَاهُ مِنْ
بَعْدِهم فَهٰذا يَوْمَهُمُ الَّذِىْ فُرِضَ عَلَيْهِمْ فَاخْتَلَفوا فِيه
فَهَدانا اللّٰهُ لَهُ فَهُمْ لَنَا فِيهِ تَبَعٌ فالْيَهُوْدُ غداً وَ النَّصَارىٰ
بَعْدَ غدٍ۔ (مسلم كتاب الجمعة)۔

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले आम्ही नंतर येणारी उम्मत आहेत, परंतु कियामतीच्या दिवशी सर्वात पुढे असू. जरी त्या लोकांना ग्रंथ आमच्या आधी मिळाला आणि आम्हाला त्यांच्यानंतर हा (जुमआचा) दिवसच होय जो त्यांच्या वर फर्ज बंधनकारक केला गेला होता. परंतु त्यांनी यात मतभेद केला, तेव्हा अल्लाहने या संदर्भात आम्हाला मार्गदर्शन केले. आता ते आमच्या मागे राहीले. यहुद (यहुदी लोक) कालच्या दिवसाकरीता आणि ख्रिश्चन परवा करिता.'' (मुस्लिम किताबुत जुमुआ)

अर्थात हे की यहुदी लोकांना सुरवातीला हाच आदेश दिला गेला होता की त्यांनी जुमआ (शुक्रवार) च्या दिवसाला अल्लाहच्या विशिष्ट आदेशाची अमलबजावणी करण्याकरिता खास करून घ्यावे.परंतु त्यांनी आपल्या प्रेषिताशी या संदर्भात मतभेद केला आणि या गोष्टीवर अडून बसले की शनीवारचा दिवस निश्चित केला जावा. त्यांच्या या मतभेदामुळे सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्यासाठी शनीवारचा दिवस निश्चित केला व त्याच बरोबर त्यांना हा दिवस साजरा करण्यासंबंधाने सक्त आदेश दिले. त्यांनी 'जमुआ'ला कबुल केले असते तर एवढे सक्त आदेश त्यांना दिले गेले नसते. या नंतर जेव्हा ख्रिश्चन आले तर त्यांनी सब्त संदर्भात मतभेद करून रविवारच्या दिवसाला आपल्यासाठी खास करून घेतले. तथापि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या उम्मतीने आल्लाहच्या कृपेने जुमआचा दिवस प्राप्त केला. त्यांना जेव्हा जुमआचा दिवस उपासनेसाठी खास करण्याचा आदेश दिला गेला तेव्हा त्यांनी कसलाहि मतभेद केला नाही. अशाप्रकारे जुमआचा दिवस ज्याने खरोखर सप्ताहाचा आरंभ होतो मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हिश्शयात आला यहुदी शनीवारमुळे एक दिवस मागे राहिले व ख्रिश्चन रविवारमुळे दोन दिवस मागे राहीले.

यहुदींना गायीचा जबह करण्याचा आदेश दिला गेला होता, त्या बाबतीतहि त्यांनी सूरह बकराच्या आयत क्रमांक ६७ ते ८१ मधील उल्लेखानुसार वेगवेगळे प्रश्न निर्माण केले. तसेच त्यांनी त्या वचनासहि बदलून टाकले होते जे त्यांना शहरात विजेता म्हणून पाऊल टाकतांना उच्चारण्यास सांगितले गेले होते (सूरह बकरा आयत क्र.५८) म्हणून नवल नव्हे की जेव्हा त्यांना जुमआचा दिवस निश्चित करण्यास सांगितले गेले असेल तेव्हा त्यात त्यांनी मतभेद केला असेल व त्यांच्या या मतभेदामुळे व दुष्टपणामुळे सर्वश्रेष्ठ अल्लाहने जुमा ऐवजी शनीवारचा दिवस साजरा करण्याचा आदेश दिला असेल, आणि सक्त बंधनेहि लादली असतील.

राहीलेत ख्रिश्चन तर त्यांनी यहुदींशी मतभेद करीत शनीवार ऐवजी रविवारचा दिवस आपल्यासाठी निश्चित केला. जेव्हा ते 'तौरात'ला मानतात. यास्तव बायबलचा भाष्यकार लिहितो-

" The change over from Sabbath (Saturday in the Gentile Calendar) to Sunday as the day of worship was accomplished by the early 2nd Cent."

(The Interpreters Commentary on the Bible P. 650)

या आयतीत वास्तविक अनेकेश्वर वाद्यांच्या या आक्षेपास उत्तर दिले गेले आहे की हा प्रेषित 'सब्त'चा आदेश का देत नाही त्यांना हे उत्तर दिले गेले आहे की सब्तचा आदेश हजरत इब्राहीम यांच्या शरीयतमध्ये नव्हता किंबहुना यहुदींना विशेष कारणास्तव दिला गेला होता आणि ज्या अर्थी या प्रेषितास मूलत: तीच शरीअत दिली गेली जी हजरत इब्राहीम यांना दिली गेली होती म्हणून या शरीयतीमध्ये सब्त सारखी सक्त बंधने नाहीत.

१८५. म्हणजे ह्या सर्व मतभेदांचा जे ईश्वराचा धर्म व त्याच्या शरीअत बाबत निर्माण केले गेले आहेत अंतिम फैसला कियामतीच्या दिवशीच होऊ शकेल.

१८६. अल्लाहच्या मार्गाकडे म्हणजे सत्य धर्माकडे आवाहन करण्याच्या तीन पद्धति येथे निवेदित्या गेल्या आहेत.

पहिली पद्धत बुद्धि कौशल्याची आहे म्हणजे अशा गोष्टी ज्या मन-मस्तिष्कास अपील करणाऱ्या असाव्यात ज्यात ती प्रमाणे सामील आहेत जी मनुष्य स्वभावात समाविष्ट आहेत व सुष्टी अवशेषांशी युक्तिवादहि ही पद्धति बुद्धिवंतांकरिता व विचारवंत करिता अधिक योग्य आहे.

दुसरी पद्धत चांगल्या गोष्टीचा सदुपदेश करणे ही आहे. अर्थात मनाला अपील करणाऱ्या व हृदयाला पीळ पाडणाऱ्या गोष्टी सादर करणे जेणेकरून अंत:करणाने उपदेशात्मक गोष्टी ग्रहण करण्यास तयार व्हावे हे निरूद्देश्य प्रवचन नव्हे किंबहुना शिकवण व प्रशिक्षण आणि चर्चा करणे आहे यात प्रेषित इतिहासापासून बोधजनक गोष्टी सादर करणे, मृत्युची आठवण करून देणे; आखिरतच्या शिक्षा व मोबदल्याचे निवेदन करणे इत्यादि गोष्टी सामील आहेत. ही पद्धति सर्वसामान्य लोकांकरिता अधिक फायदेशीर आहे.

राहिली तिसरी पद्धत तर ती चर्चा-विवादाची आहे ज्याचा अर्थ असा की जर वादविवादची गरज असेल तर त्याचा अवलंब केला जाऊ शकतो मात्र या अटीवर की गोष्टी मांडण्याची चांगल्यात चांगली रीत अंगिकारली जावी म्हणजे एखादी गोष्ट रद्द करावयाची झाल्यास तर उचितरित्या रद्द केली जावी व एखाद्या आक्षेपास उत्तर द्यावयाचे तर चांगल्या प्रकारे व नैतिक मर्यादा सांभाळून की जेणेकरून समोरच्या व्यक्तिस चीड, राग हट्ट व प्रक्षोभ येऊ नये. अन्यथा ती मूळ आवाहन समजून घेण्यास तयार होणार नाही.

आवाहनाचे खरे प्रकार दोनच आहेत जे वर निवेदिले गेले आहेत आणि वादविवादाची पद्धत आवश्यकता असेल तरच अंगिकारावी व याची गरज त्याच ठिकाणी भासते जिथे समोरच्या इसमाकडून आक्षेप शका किंवा एखादा खोटा दृष्टीकोन व तत्वज्ञान मांडले जात असेल. कुरआनात याची अनेक उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ हजरत इब्राहीम यांचा आपल्या जन-समूहाशी व नमरूदशी वादविवाद, माणसाला दुसऱ्यांदा जिवित केले जाण्या संदर्भात अनेकेश्वरवाद्यांच्या आक्षेपांना उत्तरे इत्यादि.

१८७. या आयतीची पाश्वभूमी अशी की मक्केत अनेकेश्वरवादी ईमान बाळगणाऱ्यांवर अत्याधिक अत्याचार करीत होते व त्यांचा दोष या खेरीज काहीहि नव्हता की त्यांनी आपल्या विवेक बुद्धीच्या आवाहनास प्रतिसाद देत एकमेव ईश्वरावर ईमान बाळगले होते. ती मुठभर माणसे होती व सामूहीकरित्या आपल्या सामर्थ्याचा वापर करण्याजोगी नव्हती. अशा परिस्थितीत त्यांना सबूरी पाळण्यास प्रोत्साहन दिले गेले परंतु या गोष्टीचीहि आज्ञा दिली गेली की जर ते अत्याचारीचा बदला घेऊ इच्छितात तर बरोबरीने बदला घेऊ शकतात. म्हणजे जेवढ्या प्रमाणात तुमच्यावर अत्याचार केला गेला असेल तेवढाच अत्याचार तुम्ही करू शकतात त्याहून अधिक पुढे जाण्याची मुळीच अनुज्ञा नाही.

यावरून हे तात्विक मार्गदर्शन लाभते की इस्लामेतर समाजात मुसलमानाकरिता मग तो आवाहक का असेना, या गोष्टींची मुभा आहे की ठोशाला ठोशानेच उत्तर द्यावे.

# १७. बनी इस्राईल

**नावः** सुरवातीच्या आयतींमध्ये बनी इस्राईलच्या इतिहासाच्या एका महत्वपूर्ण प्रकरणाकडे संकेत केला गेला आहे. तद्नुषंगाने सूरहचे नाव 'बनी इस्राईल' ठरले आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे आणि मजकूरांवरून दिसून येते की मदीनेहून स्थलांतराच्या सुमारे एका वर्ष आधी म्हणजे हिजरी सन १२ मध्ये अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पनाः** बनी इस्राईल व बनी इस्माईल (अरबचे अनेकेश्वरवादी) दोघांना सचेत करणे की मसजिदे हराम (काबागृह) व मसजिदे अक्सा या पैगंबरांच्या हवाली करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. जर तुम्ही आपल्या बंडखोर वृत्ती पासून परावृत्त न झालात व आमच्या प्रेषिताचा विरोध केळा तर लक्षात ठेवा अल्लाहचा आसूड तुमच्यावर ओढविल्या विना राहणार नाही. जर तोल सावरू इच्छित असाल तर पैगंबराच्या मार्गात अडथळे निर्माण करण्याऐवजी त्या शिकवणींना आत्मसात करा ज्या त्यावर अवतरीत केल्या गेल्या आहेत.

**उक्ति रचनाः** आरंभ 'मेअराज'च्या घटनेने झाला आहे, ज्यात हा संकेत अध्यारूत आहे की मसजिदे हराम व मसजिदे अक्सावर प्रेषित व त्याच्या अनुयायींचा प्रभाव पडणार आहे.

आयत क्र.२ते८ मध्ये अक्सा मसजिदी संबंधाने बनी ईस्राईलला त्यांच्या इतिहासातील बोधदायक घटना ऐकवून सावध केले गेले आहे.

आयत क्र. ९ ते २२ मध्ये क़ुरआनाच्या आवाहनास सादर केले गेले आहे.

आयत क्र.२३ ते ३९ मध्ये मौखिक शिकवणींचे निवेदन आहे ज्या मनुष्याच्या चारित्र्यास सुशोभित करतात व त्याच्या पालनकर्त्याशी त्याचा संबंध जोडतात.

आयत क्र. ४० ते ६० मध्ये इन्कार करणाऱ्यांच्या शंकांना व आक्षेपांना उत्तर दिलेले गेले आहे.

आयत क्र. ६१ ते ६५ मध्ये सैतानाच्या या घटनेस सादर केले आहे की त्याने आदमला सजदा करण्यापासून इन्कार करून मानव-जातीशी शत्रुत्त्व केले व त्याला मार्ग भ्रष्ट करण्याचे मनात ठाणले आणि तोच आज लोकांना क़ुरआनापासून दूर करीत आहे. तेव्हा लोकांनीच आपल्या या शत्रूपासून सावध राहणे अगत्याचे आहे.

आयत क्र. ६६ ते ७२ मध्ये एकेश्वरवाद व आखिरतचा विश्वास निर्माण करणाऱ्या गोष्टी मांडल्या गेल्या आहेत.

आयत क्र. ७३ ते ७७ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही ताकीद की आपण विरोधाच्या वादळातून मार्ग काढीत. सत्य मार्गावर दृढता पूर्वक अटळ रहा.

आयत ७८ ते ८२ मध्ये नमाज़ची ताकीद, देशत्यागाकडे हा संकेत की लवकरच ही घटना घडून येणारी आहे. सत्याच्या वर्चस्वाची खुशखबरी व अत्याचारींना तंबी.

आयत क्र.८३ ते १०० मध्ये माणसाच्या चुकीच्या वर्तनावर अंकुश व इन्कार करणाऱ्यांच्या आक्षेपाना उत्तरे.

आयत क्र.१०१ ते १०४ मध्ये हजरत मूसा यांच्या चमत्कारंचा उल्लेख व हे स्पष्टीकरण की चमत्कार पाहूनहि फिरऔनने ईमान बाळगले नाही व शेवटी त्यावर ईश-शिक्षा कोसळली.

आयत क्र.१०५ ते १११ उक्ति-समाप्ति होय ज्यात ईश्वराला पुकारण्याच्या शिष्टाचारांना विचाराधीन ठेवण्याची व त्याची महानता व श्रेष्ठता निवेदिण्याची आज्ञा केली गेली आहे. सूरहचा आरंभ या गोष्टीने झाला होता की अल्लाहसाठी पवित्रता आहे व समारोप या गोष्टीवर झाला की तो अत्यंत प्रतिष्ठित अस्तित्व आहे म्हणून त्याची श्रेष्ठता वर्णन करा.

# १७. सूरह बनी इस्त्राईल

سُوْرَةُ الْاِسْرَاۗءِ

अनुवाद

आयती १११

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. पवित्र आहे तो जो आपल्या दासाला एका रात्री मस्जिदे हराम (काबागृहा) पासून दूर त्या मसजिदी पावेतो घेऊन गेला ज्याच्या सभोवती आम्ही समृद्धी राखली आहे. अशासाठी की त्याला आपल्या काही निशाण्या दाखवाव्यात. नि:संशय तोच सर्व काही ऐकणारा व पाहणारा आहे.[१]

سُبْحٰنَ الَّذِيْٓ اَسْرٰى بِعَبْدِهٖ لَيْلًا مِّنَ الْمَسْجِدِ
الْحَرَامِ اِلَى الْمَسْجِدِ الْاَقْصَا الَّذِيْ بٰرَكْنَا حَوْلَهٗ لِنُرِيَهٗ مِنْ
اٰيٰتِنَا ۭ اِنَّهٗ هُوَ السَّمِيْعُ الْبَصِيْرُ ۝١

२. आणि आम्ही मूसाला ग्रंथ प्रदान केला होता [२] आणि त्यास बनी इस्त्राईल करिता मार्गदर्शनाचे साधन बनविले होते की माझ्या शिवाय कोणासहि आपला पुरस्कर्ता बनवू नका.[३]

وَاٰتَيْنَا مُوْسَى الْكِتٰبَ وَجَعَلْنٰهُ هُدًى لِّبَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ
اَلَّا تَتَّخِذُوْا مِنْ دُوْنِيْ وَكِيْلًا ۝٢

३. तुम्ही त्या लोकांची संतती आहात ज्यांना आम्ही नूह सोबत (नौकेत) स्वार केले होते. [४] तो खरोखर एक कृतज्ञ दास होता.

ذُرِّيَّةَ مَنْ حَمَلْنَا مَعَ نُوْحٍ ۭ اِنَّهٗ كَانَ عَبْدًا شَكُوْرًا ۝٣

४. आणि आम्ही ग्रंथात बनी इस्त्राईलला आपल्या या निर्णयाबाबत सावध केले होते. की तुम्ही दोन वेळा जमीनीवर उत्पात माजवाल आणि मोठी बंडखोरी कराल.

وَقَضَيْنَآ اِلٰى بَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ فِي الْكِتٰبِ لَتُفْسِدُنَّ فِي الْاَرْضِ
مَرَّتَيْنِ وَلَتَعْلُنَّ عُلُوًّا كَبِيْرًا ۝٤

५. मग जेव्हा प्रथम वायद्याची वेळ आली तेव्हा आम्ही तुमच्यावर आपले असे दास सोडले जे मोठे शक्ती शाली होते ते तुमच्या घरांमध्ये घुसले आणि वायदा पूर्ण होऊन राहिला.

فَاِذَا جَاۗءَ وَعْدُ اُوْلٰىهُمَا بَعَثْنَا عَلَيْكُمْ عِبَادًا لَّنَآ اُولِيْ بَاْسٍ
شَدِيْدٍ فَجَاسُوْا خِلٰلَ الدِّيَارِ ۭ وَكَانَ وَعْدًا مَّفْعُوْلًا ۝٥

१. या आयतीत ज्या घटनेचा उल्लेख आहे तो इसरा व मेअराजच्या नावाने प्रसिद्ध आहे. येथे मक्केहून बैतुल मक्दिस पर्यंतचा प्रवास एका रात्रीत करविल्याचे स्पष्टीकरण दिले गेले आहे. जी मेअराज ची प्रथमावस्था होती. राहिली दुसरी अवस्था की जिच्यात पैगंबराना सातव्या आकाशावर असलेल्या सिद्रतुल मुन्तहा पावेतोचे अवलोकन करविले गेले. तर याचा उल्लेख सूरह नजम मध्ये केला गेला आहे म्हणून आम्ही येथे त्याच गोष्टीचे स्पष्टीकरण पुरेसे समजतो जे पहिल्या अवस्थेशी म्हणजे बैतुल मक्दिस (अथवा बैतुल मुकद्दस) पर्यंतच्या प्रवासाशी संबंधित होते.

आयतीत अब्द (दास) शी अभिप्रेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) होत आणि अल्लाहचे हे कथन की तो आपल्या दासाला घेऊन गेला. त्याच्या विशेष कृपेची अभिव्यक्ती होय जी या दासावर झाली.

मस्जिदे हराम शी अभिप्रेत मक्केची ती प्रतिष्ठित मसजिद की जिच्या दरम्यान काबागृह आहे व जिची स्थापना हजरत इब्राहीम यांनी केली होती. (इ.स. पूर्वी दोन हजार वर्षे) दूरच्या मसजिदीशी अभिप्रेत मस्जिदे अक्सा होय जी बैतुल मक्दिस (यरोशलम) या ठिकाणी आहे. अक्साचा अर्थ दूर असलेली. याने क़ुरआनाचा संकेत या गोष्टीकडे आहे की बैतूल मक्दिसची मस्जिद मक्केच्या मस्जिदे हराम पासून बरीच लांब अंतरावर आहे. परंतु हे प्रदीर्घ अंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या पैगंबराकरिता रात्रीच्या काही हिश्यात पार पाडविले. क़ुरआनाच्या या शब्दांच्या अनुरोधाने बैतुल मक्दिसच्या या ऐतिहासिक मसजिदीचे नाव मसजिदे अक्सा प्रसिद्ध झाले अन्याथा क़ुरआन अवतरणाच्या वेळी तिचे हे पारिभाषिक नाव नव्हते. बैतुल मक्दिसची मस्जिद हजरत सुलेमान यांनी इ. स. पूर्वी ९५९ मध्ये उभारली होती जो बनी इस्राईल करिता इस्लामी आवाहन व धार्मिक तन्मयतेचे केंद्र होते व किब्ला देखील ठरले होते.

त्याच्या सभोवती समृद्धी राखण्याचा अर्थ असा की संपूर्ण इलाका धार्मिक व ऐहिक समृद्धीनी सम्पन्न आहे. जेथपावेतो धार्मिक समृद्धींचा संबंध आहे ही भूमी हजरत इब्राहीम यांचे स्थलांतरित स्थान व हजरत इसहाक यांचे वास्तव्य-स्थान ठरले तसेच बनी इस्राईलच्या अनेक प्रेषितांचा उद्रय येथे झाला व त्यांनी या भूमीवर अशा पाऊल खुणा सोडल्यात ज्या विश्व वासीयांचे सत्य धर्माकडे मार्गदर्शन करीत राहिल्यात. येथे हजरत सुलेमान यांना अनुपमेय साम्राज्य लाभले आणि बनीइस्राईलला जे काही प्रदान केले गेले ते जगातील कोणत्याहि जन समूहास प्रदान केले गेले नाही तात्पर्य या भूमीचा प्रत्येक भाग प्रेषितांचे स्मारक असल्यामुळे धार्मिक संपत्तिचे खजीने ओकत राहिला. राहिले ऐहिक समृद्धीने सम्पन्न असणे तर हा इलाका मोठा सुपीक व हिरवागार आहे. आणि बायबल मध्ये तर याची प्रशंसा अशी केली गेली आहे की येथे दूधाचे व मधाचे प्रवाह वाहतात.

मक्केपासून बैतुल मक्दिसचे अंतर सुमारे एक हजार मैलांचे आहे. त्या काळात हा प्रवास चाळीस दिवसात पार पडत असे परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करिता हा प्रवास चमत्कारीकरित्या एका रात्रीत पार पाडला. हदीस मधील उल्लेखानुसार पैगंबर 'बुराक' वर सवार होऊन गेले होते व हजरत जिब्रील त्यांच्या सोबत होते म्हणजे हा प्रवास विद्युत वेगाने चालणाऱ्या वाहनावर झाला होता. ही गोष्ट त्या काळात तर मोठी विचित्र वाटत होती.परंतु आजच्या काळात जेव्हा मनुष्याने अत्यंत वेगवान विमान व रॉकेट यांचा शोध लावलेला आहे, विचित्र वाटण्याजोगी राहिली नाही. कारण जेव्हा मनुष्य अनेक महिन्यांचे अंतर काही तासात पार करू शकतो तर सृष्टीचा पालनकर्ता काय या गोष्टीस समर्थ नाही की मक्केपासून बैतुल मक्दिसचा प्रवास काही मिनिटांत करवील?

यास्तव या सूरहचा आरंभ या गोष्टीने झाला आहे की अल्लाह पवित्र आहे म्हणजे हा चमत्कार पूर्ण प्रवास पार पाडविणे अल्लाहच्या सामर्थ्या बाबत किंचितहि अशक्य नाही. ज्यांना ही गोष्ट अशक्य वाटते त्यांना अल्लाहच्या सामर्थ्याची कल्पनाहि नसावी.

येथूनच ही गोष्ट देखील स्पष्ट होते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा हा प्रवास शारीरिक होता व जागृतावस्थेत होता. केवळ आध्यात्मिक (आत्मीय) प्रवास असता किंवा स्वप्नावस्थेत असता तर ना त्याचा उल्लेख अशा प्रकारे केला गेला असता की आम्ही आपल्या दासाला एका रात्री घेऊन गेलो आणि ना यात नवल करण्यासाठी एखादी बाब असती जिचे निरसन करण्यासाठी अल्लाह पवित्र असण्याचा हवाला दिला गेला असता आणि ना लोकांसाठी ही गोष्ट कसोटीचे कारण बनली असती.

जो मनुष्य निर्मळ बुद्धिने या आयतीचे अध्ययन करील, त्याला हे जाणवल्या खेरीज राहणार नाही आणि बुखारीच्या या हदीस वचनाने याचे अधिक समर्थन होते ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, जेव्हा मला कुरेश लोकांनी खोटे ठरविले तेव्हा मी 'हिज्र' (काबा गृहाच्या बाहेरच्या भागात) मध्ये उभा राहिलो त्या वेळी अल्लाहने मजवर बैतुलमक्दिसला जाहीर केले की त्यास पाहून त्याची लक्षणे त्यांना सांगत होतो' (बुखारी हदीसुल्इस्रा)

तरीहि लोक विवादग्रस्त राहतील तर त्यांना सावध केले आहे की अल्लाह त्यांच्या सर्व गोष्टी ऐकत आहे आणि ते जे काही करतात त्यास पाहत आहे.

राहिला या प्रवासाचा हेतु तर आयतीत सांगितले गेले आहे

की सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या प्रेषितास आपल्या काही निशाण्या दाखवू इच्छित होता. निशाण्यांशी अभिप्रेत त्या निशाण्या होत ज्या मस्जिदे अक्सा मध्ये दिसून येतात. ह्या निशाण्या, एकेश्वरवाद, एकमेव ईश्वराची (अल्लाहची ) उपासना प्रेषितांचे एकमत आवाहन आणि सत्य धर्मासाठी त्यांचे प्रयत्न, बनी इस्राईलच्या उदय व पतनाचा इतिहास आणि अल्लाहच्या शिक्षा व मोबदल्याविषयीच्या नियमांना प्रमाणित करतात. ज्याअर्थी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दोन किब्ल्यांचे नबी बनविले जात होते म्हणून मस्जिदे अक्साचे हे अवलोकन अतिशय महत्वपूर्ण होते. या निशाण्या खरीज अल्लाहच्या सामर्थ्याच्या चित्रविचित्र निशाण्या दाखविण्याचाहि हेतु होता.

स्पष्ट असावे की ही घटना कोणत्या महिन्यात व कोणत्या तारखेस घडली याचे स्पष्टीकरण ना कुरआनने केले आहे ना प्रेषित वचनाने. राहीलीत निवेदने (रिवायात) तर ती याबाबतीत भिन्न आहेत आणि हा या गोष्टीचा पुरावा होय की त्या रात्रीला वर्षानुवर्षे साजरी करण्याचा हेतु नव्हता अन्यथा याचे स्पष्टीकरण कुरआन किंवा प्रेषित वचनात केले गेले असते. राहिले मुसलमानांचे रजबच्या सत्तावीस तारखेस 'शबे मेअराज' म्हणून साजरा करणे तर हा मुसलमानंचा आपला 'परिपाठ' आहे. धार्मिक दृष्ट्या त्यात काहिहि मूलभूतता नाही. ना या रात्रीला उपासने करिता खास केले गेले आहे आणि ना मेअराजचा समारंभ साजरा करण्याचा आदेश दिला गेला आहे.

२. म्हणजे तौरात.

३. 'तौरात' मध्ये आज देखील एकेश्वरवादाचा पाठ आहे. उदाहरणार्थ निर्गम मधील उल्लेख पहा.

'ज्याने तुला मिसर देशातून, दास्यगृहातून आणिले तो मी परमेश्वर तुझा देव आहे माझ्या खेरीज तुला वेगळे देव नसावेत (निर्गमः २०-२३)

४. म्हणजे, हे मानवांनो ! बनी इस्राईल सह तुम्ही सर्व त्या लोकांचे वंशज आहात ज्यांना नूहच्या नौकेत सवार करवून विनाशकारी वादळापासून वाचविले गेले होते. सर्वश्रेष्ठ अल्लाहचा हा अनुग्रह संपूर्ण मानव-जातीवर आहे. म्हणून प्रत्येक मानावाने त्याचे कृतज्ञ झाले पाहिजे. अर्थात ही कृतज्ञता त्याच स्थितीत व्यक्त होऊ शकते जेव्हा तो अल्लाहलाच आपला खराखुरा उपकार-कर्ता मानतील.

५. ग्रंथाशी अभिप्रेत वरील उल्लेखानुसार हजरत मूसा यांचा ग्रंथ अर्थात 'तौरात' होय. कुरआनाच्या निवेदना नुसार तौरात मध्ये ही पूर्व सूचना दिली गेली होती की बनी इस्राईल देशात दोन वेळा मोठा उत्पात माजवतील आणि जबरदस्त बंड करतील, परिणामी त्यांना दोन्ही वेळा विनाशाला तोंड द्यावे लागेल. हा मजकूर आजच्या तौरात मध्ये या शब्दांत तर बाकी राहू शकला नाही तथापि या वार्तेकडे संकेत दिसून येतात. अहबार मधील उल्लेखानुसार:

'परंतु तुम्ही जर माझे ऐकले नाही, ह्या सर्व आज्ञा पाळल्या नाहीत..... माझा करार मोडिला तर मी तुमचे काय करीन ते ऐका...... तुमच्या शत्रूंपुढे तुमचा पराभव होईल. तुमचे वैरी तुमच्यावर अधिकार गाजवतील...... एवढ्या गोष्टी करूनहि तुम्ही सुधारून माझ्याकडे वळला नाही आणि माझ्या विरूद्ध वागला तर मी हि तुमच्या अगदी विरुद्ध जाईन.... तुमच्या पूजेची उच्चस्थाने मी उध्वस्त करीन...... मी तुमची नगरे उजाड करीन. तुमची पवित्र स्थळे ओसाड करीन.... परराष्ट्रांमध्ये मी तुमची पांगा पांग करीन. मी तलवार उपसून तुमच्या पाठीस लागेन, तुमचा देश उध्वस्त होईल आणि तुमची नगरे ओसाड पडतील.' (अहबार २६: १४ ते ३३ )

अनुवादच्या २८ व्या प्रकरणातील उल्लेख-

'परमेश्वर तुझा देव ह्या प्रतापी व भय योग्य नावाचे भय बाळगण्यासाठी ह्या ग्रंथात जी नियम शास्त्राची वचने लिहिलेली आहेत ती तू काळजी पूर्वक पाळली नाहीत तर तुला व तुझ्या संतानाला परमेश्वर विलक्षण रोग लावील आणि जी भूमी वतन करून घ्यावयाला तुम्ही जात आहात तेथून तुमचे उच्चाटन होईल. पृथ्वीच्या एका टोकपासून दुसऱ्या टोका पर्यंत सर्व राष्ट्रांमध्ये परमेश्वर तुमची पांगा पांग करील.

(अनुवादः २८ : ५८ ते ६४)

मग जेव्हा बनी इस्राईल मध्ये मोठ्या प्रमाणात नैतिक आचरणाविषयीचा बिघाड निर्माण झाला आणि सर्व सामान्यतः लोक बंडखोरी करू लागले तेव्हा.......प्रेषिताने तत्क्षणी सावध केले आणि बाबिंलच्या बादशहाच्या हस्ते ते नष्ट केले जाण्याची खबर दिली.

''यास्तव सेनाधीश परमेश्वर म्हणतो, तुम्ही माझी वचने ऐकली नाहीत, म्हणून पाहा मी उत्तरे कडील सर्व राष्ट्रांना व माझा सेवक बाबेलचा राजा नबुखद्रेस्सर याला बोलावून आणतो. परमेश्वर म्हणतो, त्यास या देशावर, त्यातील रहवाश्यांवर आणि आसपासच्या सर्व राष्ट्रांवर आणतो व त्यांचा अगदी नाश करून टाकतो. आणि ही राष्ट्रे सत्तर वर्षे बाबेलच्या राजांचे दास्य करितील. (यिर्मया - २५ : ८ ते ११)

६. संकेत बाबिंलचा बादशहा नबू कद्नजर (Nebu Chadrezzar) च्या हलल्याकडे आहे. हा हल्ला त्याने इ. स. पूर्वी ५८६-५८८ मध्ये यहुदी राज्यावर केला होता. त्याने यहुदींचे केंद्र असलेल्या यरुशलेमला पूर्णतः उध्वस्त केले, येथपावेतो की पवित्र मस्जिदीलाहि उध्वस्त केले. हजारो यहुदींची हत्या केली आणि असंख्य लोकांना दासी-गुलाम बनवून बाबिल घेऊन गेला. या संदर्भात बायबलचा भाष्यकार लिहितो-

'शेवटी बाबिलचे लोक शहरात घुसले तेव्हा त्यांनी भिंती व महाल जमीनदोस्त केले व उपास्यास जमीनीशी समान केले जिडकीयाच्या मुलास त्याच्या समक्ष ठार केले गेले व त्याला आंधले करून व साखळ दंडाने बांधून बाबिल ला नेले गेले. यरूशलेमच्या वस्तीच्या मोठ्या भागास हद्‌पार करून ते आपल्या सोबत घेऊन गेले. अशा प्रकारे दाऊद साम्राज्याच्या शोकजनकरित्या अंत झाला.

(The Interpreter's Commentary on the Bible P. 1025)

हीच ती जबरदस्त शिक्षा जी बनी इस्राईलला या पूर्वी सामूहीक बिघाडाच्या प्रसंगी दिली गेली. यावरून हे हि माहित झाले की जेव्हा एखाद्या जन-समूहात बिघाड सार्वजनिक रित्या होतो व विद्रोही बनतो तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याची मुस्कटदाबी करण्यासाठी त्या जनसमूहाला शत्रूंच्या व अत्याचारी शासकांच्या हवाली करतो. ईश-शिक्षेचे हे मोठे दु:खदायक स्वरूप असते.

६. मग आम्ही त्यांच्या विरोधात तुम्हाला वर्चस्व प्रदान केले आणि धन व संतती द्वारे तुमची मदत केली आणि तुमची संख्या वाढविली. [७]

ثُمَّ رَدَدْنَا لَكُمُ الْكَرَّةَ عَلَيْهِمْ وَأَمْدَدْنَاكُمْ بِأَمْوَالٍ
وَبَنِينَ وَجَعَلْنَاكُمْ أَكْثَرَ نَفِيرًا ﴿٦﴾

७. जर तुम्ही सत्कृत्य केले तर स्वत:साठीच केले आणि जर दुष्कृत्य केले तर तेहि स्वत:साठीच केले,[८] मग जेव्हा दुसऱ्या वायद्याची वेळ आली तेव्हा आम्ही पुन्हा शक्तीशाली दास तुमच्या विरुद्ध उभे केले. यासाठी की त्यांनी तुमच्या चेहऱ्यांना विद्रुप करावे आणि त्याच प्रमाणे मसजिदीत घुसावे. ज्या प्रमाणे पहिल्यांदा घुसले होते व जी गोष्ट यांच्या आवाक्यात येईल, तिचा नाश करून टाकावे.[९]

إِنْ أَحْسَنْتُمْ أَحْسَنْتُمْ لِأَنْفُسِكُمْ ۖ وَإِنْ أَسَأْتُمْ فَلَهَا ۚ
فَإِذَا جَاءَ وَعْدُ الْآخِرَةِ لِيَسُوءُوا وُجُوهَكُمْ وَلِيَدْخُلُوا
الْمَسْجِدَ كَمَا دَخَلُوهُ أَوَّلَ مَرَّةٍ وَلِيُتَبِّرُوا مَا عَلَوْا تَتْبِيرًا ﴿٧﴾

८. नवल नव्हे की तुमचा पालनकर्ता तुमच्यावर कृपा करील. परंतु जर तुम्ही पुन्हा तेच वर्तन अंगिकारले तर आम्ही पुनश्च त्याच प्रकारे शिक्षा देऊ.[१०]आणि आम्ही काफिरांसाठी जहन्नमला कैदखाना बनवून ठेवले आहे.[११]

عَسَىٰ رَبُّكُمْ أَنْ يَرْحَمَكُمْ ۚ وَإِنْ عُدْتُمْ عُدْنَا ۘ وَجَعَلْنَا جَهَنَّمَ
لِلْكَافِرِينَ حَصِيرًا ﴿٨﴾

९. नि:संशय हे क़ुरआन त्या मार्गाकडे मार्गदर्शन करते जो अगदी सरळ आहे [१२] आणि ईमान बाळगणाऱ्यांना जे सत्कर्म करतात या गोष्टीची खुशखबरी देतो की त्यांच्या करिता फार मोठा मोबदला आहे.

إِنَّ هَٰذَا الْقُرْآنَ يَهْدِي لِلَّتِي هِيَ أَقْوَمُ وَيُبَشِّرُ الْمُؤْمِنِينَ
الَّذِينَ يَعْمَلُونَ الصَّالِحَاتِ أَنَّ لَهُمْ أَجْرًا كَبِيرًا ﴿٩﴾

१०. आणि जे लोक आखिरत वर ईमान बाळगत नाही, त्यांच्या करिता आम्ही दु:खदायक शिक्षा तयार करून ठेवली आहे.

وَأَنَّ الَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِالْآخِرَةِ أَعْتَدْنَا لَهُمْ عَذَابًا أَلِيمًا ﴿١٠﴾

११. आणि मनुष्य वाईटा करिता अशा प्रकारे दुआ (प्रार्थणा) करू लागतो. ज्या प्रकारे कल्याणाकरिता दुआ केली पाहिजे. मनुष्य फारच उतावळा आहे.[१३]

وَيَدْعُ الْإِنْسَانُ بِالشَّرِّ دُعَاءَهُ بِالْخَيْرِ ۖ وَكَانَ الْإِنْسَانُ عَجُولًا ﴿١١﴾

१२. आणि आम्ही रात्रीला व दिवसाला दोन निशाण्या बनविल्यात रात्रीच्या निशाणीला आम्ही निस्तेज केले व दिवसाच्या निशाणीला तेजस्वी केले. अशासाठी की तुम्ही आपल्या पालन कर्त्याची कृपा शोधावी आणि वर्षांची गणना व हिशोब जाणून घ्यावा.[१४] आणि आम्ही प्रत्येक गोष्टीचे उघडरित्या निवेदन केले आहे.[१५]

وَجَعَلْنَا اللَّيْلَ وَالنَّهَارَ آيَتَيْنِ ۖ فَمَحَوْنَا آيَةَ اللَّيْلِ وَجَعَلْنَا آيَةَ
النَّهَارِ مُبْصِرَةً لِتَبْتَغُوا فَضْلًا مِنْ رَبِّكُمْ وَلِتَعْلَمُوا عَدَدَ السِّنِينَ
وَالْحِسَابَ ۚ وَكُلَّ شَيْءٍ فَصَّلْنَاهُ تَفْصِيلًا ﴿١٢﴾

७. बनी इस्राईलची बाबिंल मध्ये बंदीवासाच्या काळात सुधारणेची आवाहने प्रस्तुत झाली मग हळू हळू ते ईश्वराकडे रुजू होऊ लागले. शोवटी ईश-कृपा त्यांच्याकडे परतली व त्यांना बाबिंलच्या अत्याचारापासून मुक्ति मिळाली. ती अशी की फारसचा बादशहा सायरस याने इ.स. पूर्वी ५३९ मध्ये बाबिल जिंकले व त्यानंतर यहूदींना यरूशलम जाणयाची व तेथे ईश्वराच्या घराची उभारणी करण्याची परवानगी दिली. अशा प्रकारे यहुदींना पुन्हा आपल्या केंद्राकडे वळण्याचा व बैतुल मक्दिस उभारण्याचा अवसर लाभला मग हजरत अजीज यांनी त्यांच्या समोर तौरातचे अशा प्रकारे स्पष्टीकरण केले की त्यांच्यात एक नवजीवन निर्माण झाले आणि शरीअत विरुद्ध गोष्टींचा त्याग करून ईश्वराच्या शरीअतीचे अनुसरण करण्यास ते तयार झाले. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह तौबा टीप क्र.५८) ही बनी इस्राईलची पूर्वस्मृती होती आणि जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहची कृपा त्यांच्यावर परतली तेव्हा त्यांच्यासाठी प्रत्येक प्रकारे परिस्थिती अनुकूल होत गेली. धन-संपत्तिची विपुलताहि झाली आणि वंश-वृद्धीची सामुग्रीहि झाली.

ओघाओघाने या द्वारे हे हि स्पष्ट झाले की वंश-वृद्धि अल्लाहची देणगी व त्याचा अनुग्रह आहे.म्हणून ईमान बाळगणारे त्यांची कदर करणारे असतात. राहिलेत वंश-मर्यादेचे फार्म्युले तर ते अशाच लोकांना शोभून दिसतात. जे ईश्वर व त्याच्या देणग्यांची कदर न करणारे असतात.

८. हे खरे पाहता अल्लाहच्या नियमाचे ऐलान होय की ग्रंथ बाळगणारी कोणताहि जन-समूह असो त्याचे सामूहीक आचरण जर चांगले असेल तर सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला आपल्या कृपेने उपकृत करतो आणि जगात मान-सन्मान लाभतो परंतु जेव्हा त्याचे सामूहीक चारित्र्य बिघडते तेव्हा अल्लाह त्याच्या शत्रूंना त्याच्या शिरावर बसवितो; व त्याला अपमानाची गोडी चाखवितो.

९. हा संकेत बनी इस्राईलच्या दुसऱ्या मोठ्या बिघाडाकडे व परिणाम स्वरूपी दिसून येणाऱ्या दुसऱ्या मोठ्या विनाशाकडे आहे. हा बिघाड पूर्वीच्या बिघाडाहूनहि अधिक प्रखर होता आणि धर्म केवळ बाह्यांगाचेच नाव राहिले होते. त्यांना सुधारणेकडे प्रवृत्त करण्यासाठी व त्यांच्यात धर्माचा खरा आत्मा ओतण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत यहया व हजरत ईसा या पैगंबरांना पाठविले. परंतु तत्कालीन यहुदी शासकाने एका नर्तकीच्या मागणीनुसार हजरत यहया यांचा शिरच्छेद करून तिला भेट म्हणून दिले.(इंजील-मत्तय- प्रकरण-१४) आणि हजरत ईसा यांच्या विरोधात यहुदींनी कसलीहि कसर बाकी राखली नाही. येथपावेतो त्यांची हत्या करण्याच्या हेतुने पाठीशी लागले. हा यहुदींचा दुसरा मोठा बिघाड होता ज्यांच्या दुष्परिणती बाबत हजरत ईसा (येशू) यांनी अशा प्रकारे सावध केले होते.

'मी तुम्हाला खचित सांगतो, येथे चिऱ्यावर असा एकहि चिरा राहणारे नाही की जो पाडला जाणार नाही.'(मत्तय २४:२)

'अहो यरूशलेमच्या कन्यांनो, माझ्या साठी रडू नका तर स्वत: साठी व आपल्या मुलाबाळांसाठी रडा. कारण पहा असे दिवस येतील की ज्यात वांझ, न प्रवसलेली उदरे व न पाजिलेले स्तन ही धन्य आहेत असे म्हणतील. त्यावेळी ते पर्वतास म्हणू लागतील आम्हावर पडा व टेकड्यास म्हणतील, आम्हाला झांका.' (लूक २३:२८-३०)

आणि या दुसऱ्या मोठ्या बिघाडाची शिक्षा यहुदींना अशा प्रकारे मिळाली की इ.स. ७० मध्ये रोमच्या टायटस (Titus) ने बैतुल मक्दिसवर जबरदस्त हल्ला करून त्याचा विध्वंस केला. हैकल सुलेमानी मस्जिदीस नष्ट केले आणि असंख्य लोकांना ठार केले. या घटनेने त्यांच्या संघटनाना अशा प्रकारे विस्कळीत केले की ते वेगवेगळ्या देशात विभक्त होऊन राहिले.

१०. बनी इस्राईलला त्यांच्या इतिहासातील ह्या बोधदायक घटना ऐकविल्यानंतर त्यांना हे सांगितले जात आहे की या प्रेषिताला पाठविण्यात आल्याने तुम्हाला ईश-कृपेस पात्र होण्याचा आणखी एक अवसर देण्यात आला आहे. जर अजूनहि तुम्ही तोल सावराल व त्या मार्गदर्शनाचे अनुसरण कराल जी या प्रेषितावर अवतरीत केली गेली आहे तर ईश्वराच्या कृपेचे दरवाजे तुमच्यावर उघडू शकतात परंतु जर तुम्ही या प्रेषिताचा विरोध केला व बंडखोरीचे वर्तन अंगिकारले तर लक्षात ठेवा अल्लाह आपल्या शिक्षेचा आसूड पुन्हा तुमच्यावर मारील.

क़ुरआनाने ही तंबी दिली असतांनाहि जेव्हा मदीनेच्या जवळपासचे यहुदी कबील्यांनी आपल्या बंडखोरीचा ताजा पुरावा असा दिला की क़ुरआनाचे विरोधक आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे शत्रू बनून उभे राहिले व पैगंबरांविरुद्ध कट रचू लागले तेव्हा अल्लाहच्या शिक्षेचा आसूड त्यांच्यावर पुन्हा ओढवला. यास्तव पैगंबरांच्या हयातीतच त्यांना मुसलमानांच्या हातून शिक्षा भोगावी लागली.

बनी कैन्का व बनी नजीर यांना हद्दपार केले गेले व बनी कुरैजाचा शेवट तरवारीने झाला. राहिलेत खैबरचे यहुदी तर त्यांना प्रभावित होऊन रहावे लागले आणि हजरत उमरच्या खिलाफतीच्या काळात त्यांनाहि हद्दपार केले गेले.

दीर्घकाळ विखुरलेल्या स्थितीत राहिल्यानंतर यहुदी पुन्हा पॅलेस्टीन मध्ये एकत्रित होत आहेत आणि त्यांच्या या सम्मेलनाने जागतिक शांततेस धोका निर्माण झाला आहे. असे वाटते की

सर्वश्रेष्ठ अल्लाह पुन्हा त्यांना मोठी शिक्षा देऊ इच्छितो. नवल नव्हे की त्याची प्रकोपरुप वीज त्यांच्या घरावर कोसळावी व त्याची राख रांगोळी करून टाकावी लक्षणे अशीच दिसतात आणि अपरोक्षाचे ज्ञान केवळ अल्लाहला आहे.

११. म्हणजे जे जे लोक वास्तविक दृष्टीने काफीर झालेत मग बाह्यत: ते ईश-ग्रंथाला मानणारे का असेनात, आखिरत मध्ये त्यांचे ठिकाण जहन्नमचा कैदखाना असेल.

१२. विश्वातील समस्त राष्ट्रांना हे आवाहन आहे की त्या मार्गाचा अंगिकार करा, ज्याकडे पवित्र क़ुरआन बोलवित आहे व यासाठी की हाच एक साधा व सरळ मार्ग आहे. ध्येय शिखर असलेल्या आखिरतच्या यशापर्यंत पोहचविणारा.

पवित्र क़ुरआन ज्या मार्गावर चालण्याचे आवाहन करते तो प्रत्येक दृष्ट्या अगदी सरळ मार्ग आहे. बुद्धिगम्य आहे. स्वभाव त्याच्या खरेपणाबाबत साक्षी आहे. सहज ज्ञानाची पुकार अशी की तो सत्य आहे. हाच मार्ग होऊन गेलेल्या प्रत्येक पैगंबराचा मार्ग होता. तो न्याय की ज्याच्यावर जमीन व आकाश कायम आहेत. याच मार्गात दिसून येतो. हा विश्वांच्या पालन कर्त्याप्रत सरळ पोहचतो व पोहचवितो. या मार्गाचे परिभाषिक नाव इस्लाम आहे राहिलेत अन्य मार्ग मग ते धार्मिक मार्ग असोत वा धर्मापासून मुक्त, कोणत्याहि दृष्टीने सरळ नाहीत. आणि ना ते ईश्वरापर्यंत पोहचणारे आहेत.

१३. म्हणजे माणसाची दशा मोठी विचित्र आहे. चांगल्या व कल्याणकारी गोष्टींसाठी त्याने आपल्या पालन कर्त्याशी प्रार्थना करीत राहिले पाहिजे. परंतु प्रतिकूल परिस्थितीत तो घाई पूर्वक आपल्या स्वत:च्या हक्कात 'बददुआ' (अनिष्ट प्रार्थना) करू लागतो. माणसाचे हे सर्वसामान्य वैगुण्य होय. ज्यात स्त्री-पुरुष सर्वच सामील आहेत. आयतीच्या सर्वसामान्य अर्था खेरीज तिचा संकेत विशेषत: मक्केच्या काफिरांकडे आहे जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी ही मागणी करीत होते की ज्या ईश-शिक्षेची धमकी आपण आम्हाला देत आहात, तो येत का नाही. त्यांना हे सांगितले जात आहे की क़ुरआनाच्या स्वरूपात तुमच्या पालन कर्त्याकडून मांगल्य अवतरते आहे म्हणून तुम्ही आपल्या पालनकर्त्याशी ही प्रार्थना करायला हवे होते की हे मांगल्य आमच्या पदरी पडू दे. परंतु या सद्‌भाग्याकडे धाव घेण्याऐवजी तुम्ही ईश-शिक्षेची मागणी करता आणि जर ती आली तर उघडपणे तुमच्या हक्कात अमंगल ठरेल.

१४. म्हणजे रात्र व दिवसाच्या या निशाण्या ज्यांचे तुम्ही अहोरात्र अवलोकन करता. त्यांच्यावर सखोल विचार केल्यास तुमचे दृष्टीकोन बदलविण्यास पुरेसे आहेत. रात्रीला अंध:कारमय बनविले गेले नसते तर तुमच्या आराम,विश्रांतीची व्यवस्थाच होऊ शकत नव्हती आणि दिवसाला तेजस्वी बनविले गेले नसते तर अल्लाहच्या कृपेला शोधण्याचे म्हणजे अर्थोपार्जनाच्या धावपळीचे कार्य शक्यच नव्हते. तथापि रात्र व दिवसाच्या येण्या-जाण्याने तुम्हाला हे दोन्ही लाभ घडविले व त्याचा अधिक फायदा हा की दिवसांच्या गणनेने मनुष्य वर्षांची गणना व इतर हिशेब जाणून घेतो. उदाहणार्थ भूतकाळातीला घटना. त्या केव्हा घडून आल्या होत्या अथवा हे की दिवसाचे किति तास होऊन गेलेत व रात्रीचे किती तास. अशा प्रकारे माणसाकरिता वेळापत्रक निश्चित करणे सोपे झाले.

अल्लाहच्या ईशत्वाची ही स्पष्ट चिन्हे माणसाला या गोष्टीचे आमंत्रण देतात की त्याने स्वत:ला आपल्या पालनकर्त्याच्या मार्गाला लावावे आणि पवित्र क़ुरआन याच गोष्टीचे आवाहन करीत आहे.

१५. म्हणजे माणसाला मार्गदर्शन लाभावे म्हणून ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता होती त्या सर्व क़ुरआनात विशद करून निवेदिल्या गेल्या आहेत; तेव्हा माणसाला हे सांगण्याची संधी राहत नाही की सत्य मार्गाच्या निशाण्या मला स्पष्टत:कळल्या नव्हत्या.

आणि आम्ही प्रत्येक माणसाचा शकुन त्याच्या गळ्यात बांधून दिला आहे. आणि कियामतीच्या दिवशी आम्ही त्याच्या करिता एक लेख बाहेर काढू जो त्याला उघडलेला दिसून येईल. वाच आपला कर्म लेख ! आज तू स्वतः आपला हिशेष करून घेण्यास पुरेसा आहेस. (अल-कुर्आन)

१३. आणि आम्ही प्रत्येक माणसाचा शकुन त्याच्या गळ्यात बांधून दिला आहे आणि क़ियामतीच्या दिवशी आम्ही त्याच्या करिता एक लेख बाहेर काढू जो त्याला उघडलेला दिसून येईल.[१६]

وَكُلَّ إِنْسَانٍ أَلْزَمْنٰهُ طٰٓئِرَهُ فِيْ عُنُقِهٖ ۭ وَنُخْرِجُ لَهٗ يَوْمَ الْقِيٰمَةِ كِتٰبًا يَّلْقٰىهُ مَنْشُوْرًا ﴿١٣﴾

१४. वाच आपला कर्म लेख !आज तू स्वत: आपला हिशेष करून घेण्यास पुरेसा आहेस.[१७]

اِقْرَاْ كِتٰبَكَ ۭ كَفٰى بِنَفْسِكَ الْيَوْمَ عَلَيْكَ حَسِيْبًا ﴿١٤﴾ۭ

१५. जो मार्गदर्शनाचा मार्ग अंगिकारतो तो स्वत: साठीच अंगिकारतो आणि जो मार्गभ्रष्टता अंगिकारतो त्याची आपत्ति हि त्याच्यावरच आहे. कोणी ओझे उचलणारा दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही.[१८] आणि आम्ही (एखाद्या जन-समुहास) शिक्षा-यातना तोपर्यंत देत नाही, जो पावेतो त्यात एक पैगंबर पाठवित नाही.[१९]

مَنِ اهْتَدٰى فَاِنَّمَا يَهْتَدِيْ لِنَفْسِهٖ ۚ وَمَنْ ضَلَّ فَاِنَّمَا يَضِلُّ عَلَيْهَا ۭ وَلَا تَزِرُ وَازِرَةٌ وِّزْرَ اُخْرٰى ۭ وَمَا كُنَّا مُعَذِّبِيْنَ حَتّٰى نَبْعَثَ رَسُوْلًا ﴿١٥﴾

१६. आणि जेव्हा आम्ही एखाद्या वस्तीला नष्ट करू इच्छितो तेव्हा त्यातल्या सुखुवस्तु लोकांना आदेश देतो, परंतु ते याबाबत अवज्ञा करु लागतात. अशा प्रकारे ईश-शिक्षेची बाब त्यांना लागू पडते आणि आम्ही त्या वस्तीचा नाश करुन टाकतो. [२०]

وَاِذَآ اَرَدْنَآ اَنْ نُّهْلِكَ قَرْيَةً اَمَرْنَا مُتْرَفِيْهَا فَفَسَقُوْا فِيْهَا فَحَقَّ عَلَيْهَا الْقَوْلُ فَدَمَّرْنٰهَا تَدْمِيْرًا ﴿١٦﴾

१७. आणि नूह नंतर आम्ही कितितरी जन-समूहांना नष्ट करुन टाकले आहे. आणि तुमचा पालन कर्ता या गोष्टीसाठी पुरेसा आहे की आपल्या दासांच्या अपराधांशी अभिज्ञ असावे व त्यांना पहावे.

وَكَمْ اَهْلَكْنَا مِنَ الْقُرُوْنِ مِنْۢ بَعْدِ نُوْحٍ ۭ وَكَفٰى بِرَبِّكَ بِذُنُوْبِ عِبَادِهٖ خَبِيْرًۢا بَصِيْرًا ﴿١٧﴾

१८. जो क्षणभंगुर (विश्वाचा) इच्छुक असतो, तर आम्ही ज्याला इच्छितो व ज्या प्रमाणात इच्छितो येथेच देऊन टाकतो.मग त्याच्यासाठी आम्ही जहन्नम उपलब्ध केलेली आहे, जिच्यात तो निर्भत्सना-ग्रस्त व धिक्कारलेल्या स्थितीत दाखल होईल.[२१]

مَنْ كَانَ يُرِيْدُ الْعَاجِلَةَ عَجَّلْنَا لَهٗ فِيْهَا مَا نَشَاۗءُ لِمَنْ نُّرِيْدُ ثُمَّ جَعَلْنَا لَهٗ جَهَنَّمَ ۚ يَصْلٰىهَا مَذْمُوْمًا مَّدْحُوْرًا ﴿١٨﴾

१९. आणि जो अखिरतचा इच्छुक असेल व त्यासाठी पाहिजे तसा प्रयत्न करिल व तो मोमीन-(ईमान बाळगणारा ) असेल तर अशाच लोकांचा प्रयत्न स्वीकृत होईल.[२२]

وَمَنْ اَرَادَ الْاٰخِرَةَ وَسَعٰى لَهَا سَعْيَهَا وَهُوَ مُؤْمِنٌ فَاُولٰۗىِٕكَ كَانَ سَعْيُهُمْ مَّشْكُوْرًا ﴿١٩﴾

१६. म्हणजे माणसाचे दुर्भाग्य किंवा सद्‌भाग्य त्याच्या स्वत:च्या आचरणात अध्यारूत आहे. आणि प्रत्येक इसमाच्या कर्माचे नोंदपत्र (Record) त्याचा कंठहार बनलेला आहे. कियामातीच्या दिवशी हे नोंद-पत्र एक खुले पुस्तक वा खुल्या रजिस्टरच्या स्वरूपात त्याच्या समक्ष येणार आहे. यास्तव दुष्परिणती बाहेरच्या एखाद्या शकूनाशी संबंधित नाही, किंबहुना त्याच्या कर्माशीच संबंधित आहे.

माणुस जे काही चांगले वाईट कर्म करतो त्याचा चांगला वाईट परिणाम त्याला अंत:करणात जाणवतो व त्याची आठवण त्याच्या स्मृती-पटावर अस्तित्वात असते. हे या गोष्टीचे लक्षण होय की त्याचे कोणतेहि कर्म परिणाम शुन्य वा परिणती शुन्य नाही व त्याचे रेकॉर्ड सुरक्षित ठेवले जात आहे.

राहिला हा प्रश्न की ज्या अर्थी आमचा कर्म-लेख आमच्या गळ्यात लटकत आहे तेव्हा तो आम्हला दिसत कसा नाही? याचे उत्तर हेच की जर आम्हाला बाह्य दृष्टीने तो दिसला असता तर कसोटीचा प्रश्नच उरला नसता. खरे पाहता, सर्वश्रेष्ठ अल्लाहने हे विश्व कसोटी घेण्याच्या हेतुने बनविले आहे. आणि यात आमची परिक्षा जशी की आम्ही अल्लाहच्या संदेशाच्या प्रकाशात बुद्धि व सामंजस्याचा वापर करून अपरोक्ष सत्यांना मान्य करतो व त्यानुसार आपले आचरण निर्धारीत करतो किंवा नाही.

१७. अर्थात कियामतीच्या दिवशी प्रत्येक मनुष्य सहजगत्या आपला कर्म-लेख वाचेल. मग तो साक्षर असो वा निरक्षर, आणि तो कोणतीहि भाषा जाणणारा असो. त्या वेळी तो हे मान्य केल्याशिवाय राहणार नाही की यात जे काही मांडले गेले आहे तो त्याच्या आचरणाचा अगदी योग्य हिशेब आहे.

या वस्तुस्थिनीचा विचार करता बुद्धिमान मनुष्य आपल्या कर्माच्या हिशेबाची तपासणी इहलोकतच करतो. अशासाठी की कियामतीच्या दिवशी पश्चाताप करण्याची वेळ येऊ नये.

१८. म्हणजे चांगले जाणून घ्या की कियामतीच्या दिवशी प्रत्येक मनुष्य आपल्या ओझे उचलील, दुसऱ्या कुणाच्या अपराधांचे ओझे शिरावर लादणार नाही त्या दिवशी तुम्ही असे म्हणून आपल्या अपराधांचा भार हलका करू शकत नाही की आम्हाला अमुक एका प्रमुखाने किंवा सरदाराने किंवा अमक्या नेत्याने मार्गभ्रष्ट केले होते अथवा आमच्या मार्गभ्रष्टतेस खऱ्या अर्थाने सैतानच जबाबदार आहे, म्हणून या मार्गभ्रष्ट करणाऱ्यांनीच आमच्या अपराधांचे ओझे आपल्या शिरावर घ्यावे. नव्हे, किंबहुना ते आपली ओझे उचलतील व तुम्हाला आपले ओझे उचलावे लागेल.

१९. अभिप्रेत तो अजाब (ईश-शिक्षा) होय जो जन समूहांचा समूळ नाश करतो. आणि जो सत्य व असत्याकरिता फर्मान (कसोटी) असतो. पूर्वी होऊन गेलेल्या आद जन-समूह, समूद जन समूह, लूत जन समूह इत्यादींवर जी ईश-शिक्षा अवतरली ती अल्लाहच्या पैगंबरांद्वारे त्यांच्यावर अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित झाल्यानंतरच अवतरली. अल्लाहच्या ह्याच नियमास येथे निवेदीले गेले आहे.

यावरून असा निष्कर्ष काढणे की ज्या लोकांपर्यंत पैगंबरांचा संदेश पोहचला नाही, त्यांना आपल्या दुष्कर्माबाबत ना ईश्वरासमोर जाब द्यावा लागेल ना त्यांना त्याची शिक्षा भोगावी लागेल, तर हे ना केवळ क़ुरआन व प्रेषित आचरणाच्या स्पष्टीकरणा विरुद्ध आहे किंबहुना एक अनुचित गोष्टीहि होय. क़ुरआनाच्या कथनानुसार अशी किती तरी दुष्कर्मे आहेत की ती वाईट असण्याविषयीची सुज्ञता मनुष्य स्वभावात सुप्त ठेवली गेली आहे. जर तो दुष्कर्मे करतो तर अपराधी आहे व ईश्वरासमोर जबाबदार आहे. हदीस वचनां वरूनहि कळून येते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आगमनापूर्वी ज्या लोकांनी मूर्तिपूजा किंवा निर्लज्जता वगैरे पसरविली होती; ते जहन्नमला पात्र ठरले. अम्रीबन लुहि, इम्रऊलकैस इत्यादि.

आणि जेथपावेतो बुद्धिचा संबंध आहे, ती उघड दुष्कर्म करणाऱ्यास उदा. अत्याचार करणाऱ्यास किंवा नाहक एखाद्याची हत्त्या करणाऱ्यास गुन्हेगार व अपराधीच ठरविते. मग पैगंबरांचा संदेश त्याच्या पर्यंत पोहचलेला असो किंवा नसो. मात्र हे की पैगंबरांचा संदेश न पोहचण्याच्या स्थितीत, त्यांच्या जबाबदारींचे क्षेत्र कोणते होते व कोणत्या मर्यादेप्रत दुर्लक्षित करण्यास ते पात्र आहेत याचे ज्ञान केवळ अल्लाहला आहे व या सर्व गोष्टींच्या निर्णयासाठी कियामतीचा दिवस निर्धारीत आहे. यास्तव आम्ही तात्विक बाब समजून घ्यावी एवढेच पुरे आणि अधिक विवादात न पडता या गोष्टीची काळजी करावी की जेव्हा अल्लाहचा संदेश त्याच्या पैगंबराद्वारे आमच्या पावेतो पोहचला आहे तर आम्ही आपल्या मुक्तिची कोणती उपाय योजना करीत आहोत व या संदेशाला अल्लाहच्या अन्य दासांपावेतो पोहचविण्यासाठी काय करीत आहोत?

२०. वरील आयतीत जनसमूहांच्या शिक्षे संदर्भात अल्लाहचा नियम स्पष्ट केला गेला होता. या आयतीत हा पैलू स्पष्ट केला जात आहे की एखाद्या वस्ती वा समूदायाचा सर्वनाश त्याच वेळी घडून येतो जेव्हा त्यात दुराचार सार्वत्रिक होतो व तो असा की वस्तीच्या सुखवस्तु लोकांना ज्यांच्यात शासक, समाज प्रमुख (सरदार) व श्रीमंत लोकांचा समावेश आहे म्हणून अल्लाह आपल्या आज्ञापालनाचा आदेश त्यांना देतो तेव्हा पैगंबर प्रामुख्याने याच वर्गाला संबोधितात. या उद्देश्याने की या लोकांवर प्रमाण प्रस्थापित व्हावे व त्यांच्या माध्यमाने जनतेवर, परंतु हे लोक ऐहीक भक्ति एवढे रममाण व सुखविलासात असे बेभान असतात की अल्लाहच्या आदेशांची पर्वा करीत नाही. ते स्वत:हि अवज्ञा

व अपराध कृत्ये करतात आणि दुराचारात्मक पद्धति प्रचलीत करून संपूर्ण वस्तीवर दुराचाराचा रंग चढवितात. अशा प्रकारे संपूर्ण वस्ती ईश-शिक्षेला पात्र ठरते, मग अल्लाह कोणती ना कोणती आपत्ति अवतरीत करून त्या वस्तीला उध्वस्त करतो. नंतरच्या आयतीत त्या जन समूहांकडे संकेतहि केला गेला आहे, ज्यांच्या सोबत असा मामला उद्‌भवला.

काही भाष्याकारांनी 'आम्ही त्यांना आदेश देतो'चा अर्थ मांडतांना मोठी औपचारिकता बाळगली आहे. कोणी अनिवार्य आदेश अभिप्रेत घेतला आहे. म्हणजे आम्ही अनिवार्य पणे दुराचाराला आदेश देतो तर कोणी वेगळाच अर्थ घेतला आहे. परंतु शब्दार्थाच्या दृष्टीनेहि व वर्णन शैलीच्या दृष्टीनेहि याचा तोच अर्थ निश्चित होतो. जो वर निवेदिला गेला आहे. अरबी भाषेत जेव्हा 'अमरना' असे म्हटले जाईल तेव्हा त्याचा अर्थ आज्ञा पालन हाच होईल. यास्तव इब्ने जरीर तबरी यांनी या अर्थास प्राधान्य दिले आहे व या संदर्भात अल्लामा शौकानी लिहितात की:

'जो मनुष्य देखील अरबी भाषेशी परिचित असेल तो याचा हाच अर्थ ध्यानी घेईल की ज्या गोष्टीचा आदेश दिला गेला होता ती गुन्ह्यापासून वेगळी अशी गोष्ट होती. कारण गुन्हा आज्ञेच्या नकारार्थी व तिचे खंडन करणारा आहे. यास्तव 'मी त्याला आदेश दिला तर त्याने दुराचार केला' हे शब्द या गोष्टीवर युक्तिवाद करतात की त्याला ज्या गोष्टीचा आदेश दिला गेला होता ती दुराचाराहून भिन्न होती कारण दुराचाराशी अभिप्रेत अशी गोष्टी जी दिल्या गेलेल्या हुकुमाच्या विपरीत असावी.

(फतहूल कदीर खंड ३ पृष्ठ - २१४)

२१. मूळ ग्रंथात 'आजिला' हा शब्द प्रयोग करण्यात आला आहे. ज्याचा अर्थ 'घाई करणारी' अभिप्रेत इहलोक होय जो आपले लाभ लवकर पोहचवितो व त्याचा इच्छुक होण्याचा अर्थ जगाचे तात्पुरते व लवकर प्राप्त होणाऱ्या लाभांचा अभिलाषी होय. जो मनुष्य आखिरतच्या तुलनेने इहलोकास ध्येय-उद्दिष्ट बनवितो तो जगातील अनेक फायदे प्राप्त करण्यात यशस्वी होईलच असे नाही, किंबहुना हे अल्लाहच्या मर्जीवर अवलंबून आहे. तो ज्याला जेवढे इच्छिल तेवढे देईल. हा तर झाला ऐहीक प्राप्तीचा मामला. यानंतर अशा माणसा करिता आखिरत मध्ये कसलाहि हिस्सा नाही किंबहुना त्याला फार वाईट स्थितीत व अल्लाहच्या कृपेपासून वंचित होऊन जहन्नम मध्ये दाखल व्हावे लागेल. ही कठोर शिक्षा त्याला अशासाठी दिली जाईल की त्याला जगात एवढ्या साठीच पाठविले गेले होते की आखिरतला समोर ठेवून त्याने इहलोकात असे काम करावे ज्याचे परिणाम आखिरत मध्ये लाभदायक निघणारे असावेत. परंतु त्याने आखिरतची पर्वा न करता ऐहीक लाभ समेटण्यातच आयुष्य वेचले. अशा प्रकारे तो आपल्या पालन कर्त्याचा विद्रोही बनून राहिला; व त्याचे संपूर्ण आयुष्य व्यर्थ झाले.

२२. मनुष्याला वस्तुत: त्याच्या पालन कर्त्याने इहलोकासाठी नव्हे, किंबहुना आखिरत साठी निर्माण केले आहे. इहलोक तर जीवनाची एक कसोटीमय अवस्था आहे. ज्यातून पार पडल्यानंतर जेथे त्याला सदैव रहावयाचे आहे ती आखिरतच होय. म्हणून आखिरतला आपले जीवन-ध्येय समजणे व आपल्या समस्त प्रयत्नांसाठी त्यास केंद्र बिंदू कल्पिणे अगदी या हकीगती नुसार आहे जी मनुष्याच्या तसेच संपूर्ण सृष्टीच्या निर्मितीत कार्यरत आहे.

ही आयत हया गोष्टीचे स्पष्टीकरण करते की अल्लाह जवळ अशाच लोकांचा प्रयत्न कदर करण्याजोगा व स्वीकृत ठरेल, ज्यांनी आखिरतला ध्येय, म्हणजे यशासाठी उद्दिष्ट ठरवून अशा प्रकारे प्रयत्न केला असेल, ज्या प्रकारे प्रयत्न करावयास पाहिजे. अर्थात असा प्रयत्न जो आखिरत वर विश्वास ठेवणारा मनुष्य त्याच्या प्राप्तीसाठी करू शकतो व ज्याचा मार्ग क़ुरआनने दाखविला आहे. त्याचबरोबर ही अट देखील आहे की तो ईमान बाळगणारा असावा म्हणजे त्या समस्त गोष्टीवर ईमान बाळगत असावा ज्यांच्यावर ईमान बाळगणे कुरआनने आवश्यक ठरविले आहे.

**आम्ही त्यांनाहि व यांनाहि, प्रत्येकाला (जीवन-सामुग्री) देत जात आहोत, जे तुमच्या पालन कर्त्याचे दान आहे. आणि तुमच्या पालन कर्त्याचे दान कोणावर देखील बंद नाही. पहा, आम्ही कशा प्रकारे एका (समूहा) ला दुसऱ्या (समूहा) वर श्रेष्ठत्व प्रदान केले आहे आणि आखिरत तर दर्जांच्या दृष्टीनेहि थोर आहे व श्रेष्ठत्वाच्या दृष्टीनेहि.(अल-कुर्आन)**

२०. आम्ही त्यांनाहि व यांनाहि, प्रत्येकाला (जीवन-
सामुग्री ) देत जात आहोत, जे तुमच्या पालन
कर्त्याचे दान आहे. आणि तुमच्या पालन कर्त्याचे
दान कोणावर देखील बंद नाही.[२३]

كُلًّا نُّمِدُّ هٰٓؤُلَآءِ وَهٰٓؤُلَآءِ مِنْ عَطَآءِ رَبِّكَ ۚ وَمَا كَانَ عَطَآءُ رَبِّكَ
مَحْظُوْرًا ﴿٢٠﴾

२१. पहा, आम्ही कशा प्रकारे एका (समूहा) ला
दुसऱ्या (समूहा) वर श्रेष्ठत्व प्रदान केले आहे. [२४]
आणि आखिरत तर दर्जांच्या दृष्टीनेहि थोर आहे
व श्रेष्ठत्वाच्या दृष्टीनेहि.[२५]

اُنْظُرْ كَيْفَ فَضَّلْنَا بَعْضَهُمْ عَلٰى بَعْضٍ ۚ وَلَلْاٰخِرَةُ اَكْبَرُ دَرَجٰتٍ
وَّاَكْبَرُ تَفْضِيْلًا ﴿٢١﴾

२२. अल्लाह बरोबर दुसरा ईश्वर बनवू नका. अन्यथा
धि:क्कारित व असहाय अगतिक होऊन बसाल.[२६]

لَا تَجْعَلْ مَعَ اللّٰهِ اِلٰهًا اٰخَرَ فَتَقْعُدَ مَذْمُوْمًا مَّخْذُوْلًا ﴿٢٢﴾ ع

२३. आणि तुमच्या पालन कर्त्याने फैसला केलेला
आहे की त्याच्या शिवाय कोणाचीहि उपासना
करू नका [२७] आणि माता-पित्याशी सद्व्यवहार
करा. जर तुमच्या समोर यांच्या पैकी एक किंवा
दोन्ही म्हतारपणास पोहचतील तर त्यांना उफ
(अरे) म्हणू नका, व ना त्यांना झिडकवा, किंबहुना
त्यांच्याशी आदर सन्मानाने संभाषण करा.[२८]

وَقَضٰى رَبُّكَ اَلَّا تَعْبُدُوْٓا اِلَّآ اِيَّاهُ وَبِالْوَالِدَيْنِ اِحْسَانًا ۚ اِمَّا يَبْلُغَنَّ
عِنْدَكَ الْكِبَرَ اَحَدُهُمَآ اَوْ كِلٰهُمَا فَلَا تَقُلْ لَّهُمَآ اُفٍّ وَّلَا تَنْهَرْهُمَا
وَقُلْ لَّهُمَا قَوْلًا كَرِيْمًا ﴿٢٣﴾

२४. आणि त्यांच्यासाठी दयापूर्वक नम्रतेचे बाजू नमवून
राखा [२९] आणि दुआ (प्रार्थना) करा की, पालन
कर्त्या ! यांच्यावर दया कर. ज्या प्रमाणे यांनी
बालपणात माझे पालन-पोषण केले.[३०]

وَاخْفِضْ لَهُمَا جَنَاحَ الذُّلِّ مِنَ الرَّحْمَةِ وَقُلْ رَّبِّ ارْحَمْهُمَا
كَمَا رَبَّيٰنِيْ صَغِيْرًا ﴿٢٤﴾

२५. तुमचा पालन कर्ता चांगल्या प्रकारे जाणतो की
तुमच्या मनात काय आहे.[३१] जर तुम्ही सदाचारी
व्हाल तर तो रूजू करणाऱ्यां करिता मोठा क्षमाशील
आहे. [३२]

رَبُّكُمْ اَعْلَمُ بِمَا فِيْ نُفُوْسِكُمْ ۚ اِنْ تَكُوْنُوْا صٰلِحِيْنَ فَاِنَّهٗ كَانَ
لِلْاَوَّابِيْنَ غَفُوْرًا ﴿٢٥﴾

२६. आणि नातेवाईकाला त्याचा हक्क द्या व गरीब
आणि प्रवाशाला त्याचा हक्क [३३] आणि व्यर्थ
खर्च करू नका.[३४]

وَاٰتِ ذَا الْقُرْبٰى حَقَّهٗ وَالْمِسْكِيْنَ وَابْنَ السَّبِيْلِ
وَلَا تُبَذِّرْ تَبْذِيْرًا ﴿٢٦﴾

२३. म्हणजे इहलोकाचे अभिलाषी असोत वा आखिरतचे, काफ़ीर असोत वा मोमीन सर्वांनाच या जगात तुमचा पालनकर्ता जीवन-सामुग्री देत आहे व त्याचा अनुग्रह कोणालाहि नाकारला गेलेला नाही. हे दान अगदी त्या बुद्धि कौशल्या नुसार आहे. जे इहलोकात मानवाच्या उदयास कारणीभूत ठरले आहे.

२४. म्हणजे ज्या लोकांनी आखिरतला आपले ध्येय-उद्दिष्ट बनविले आहे त्यांना भौतिकवाद्यांवर जे श्रेष्ठत्व लाभले आहे ते या जगातच पाहिले जाऊ शकते. त्यांचा आपल्या पालन कर्त्याशी स्नेह व भय, अल्लाहच्या दासांच्या हक्कांची अदायगी, जबाबदारींची जाणीव, विश्वस्तता व सत्यनिष्ठा उचित कमाई, हराम गोष्टीपासून अलिप्तता. भलेपणाच्या मार्गात खर्च, सत्यासाठी त्याग बलीदान, संयम व सहनशीलता, न्याय प्रियता आणि इतर नैतिक व कर्माविषयक वैशिष्ट्ये स्पष्टत: त्यांच्या श्रेष्ठत्वाबद्दल युक्तिवाद करतात. मग ते धन सम्पत्तिच्या दृष्टीने शुन्य का असेनात.

२५. म्हणजे अखिरत मध्ये तर ईमान बाळगणाऱ्यांना काफिरांवर उघडरित्या श्रेष्ठत्व लाभेल. यास्तव काफीर जहन्नमच्या खालच्या वर्गात असतील. या उलट ईमान बाळगणारे उच्च व श्रेष्ठ जन्नत मध्ये, मग ईमान धारक आपल्या ईमान व कर्माच्या दर्जाच्या दृष्टीने जन्नतमध्ये उच्च पदहि पावतील व या अनुषंगाने त्यांना श्रेष्ठत्वहि लाभेल.

२६. म्हणजे अल्लाह सोबत अन्य एखाद्या ईश्वराला मानणारे झालात तर तुमची अशी दशा होईल की प्रत्येक बाजूने तुमचा धि:कार व निर्भत्सना केली जाईल व तुम्ही अगदीच असहाय व अगतिक व्हाल.

२७. म्हणजे अल्लाहचा हा दृढतापूर्वक निर्णय व अटळ आदेश आहे की केवळ त्याचीच उपासना करा, अन्य कोणाचीहि नव्हे. वरील आयतीत अल्लाह बरोबर अन्य एखाद्यास ईश्वर बनविण्याची, मनाई केली गेली होती व या आयतीत अल्लाह शिवाय कोणाचीहि उपासना करण्याची मनाई केली गेली आहे. यावरून ही गोष्ट चांगल्या प्रकारे स्पष्ट होते की अल्लाह खेरीजच्या अन्य उपास्यांची उपासना त्याला ईश्वर मानण्याच्या अर्थासमान आहे; मग तो वाचेने त्याला ईश्वर म्हणत असो किंवा नसो. उदाहरणार्थ जर एखादा मनुष्य जमीनीची (भूमी) पूजा करतो तर हे उघडरित्या शिर्क होय आणि जमीनीला ईश्वर व उपास्य ठरविणे होय.

स्पष्ट असावे की इबादत (उपासने) शी अभिप्रेत भक्ति-आराधना होय ज्यास अल्लाह करिता खास करून घेण्याचा आदेश दिला गेला आहे. राहिले आज्ञापालन तर ते याची आवश्यक निकड आहे. म्हणून यानंतर आज्ञा पालना संबंधीचे आदेश दिला गेला आहे. राहिले आज्ञापालन तर ते याची आवश्यक निकड आहे. म्हणून यानंतर आज्ञा पालनासंबंधीचे आदेश वेगळे निवेदिले गेले आहेत. उपासना व आज्ञा पालनाच्या या भेदास विचाराधीन राखणे आवश्यक आहे. अन्यथा उपासनेचे ते महत्व शिल्लक राहत नाही जे धर्मात दिले गेले आहे.

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हूद टीप- ५)

या प्रसंगी आम्ही हे स्पष्ट करणेहि आवश्यक समजतो की या आयतीत व यानंतरच्या आयतींमध्ये जे आदेश दिले गेले आहेत. त्यांच्या बाबत काही विद्वानांची ही कल्पना की त्यांचे स्वरूप मदीनेच्या इस्लामी राज्याच्या मॅन्युफेस्टो (मन्शूर) चे होते, उचित नाही. मॅनुफेस्टो एक राजकीय परिभाषा आहे आणि येथे ना राजकारणावर चर्चा करावयाची आहे ना राज्यावर किंबहुना ते उच्च गुण वर्णिले गेले आहेत जे माणसाला मानवतेचा मान प्रदान करणारे व त्याला अखिरतचे यश मिळवुन देणारे आहेत आणि जेव्हा या उच्च गुणांनी युक्त असा एखादा समूह उदयास येतो तेव्हा त्याचे राजकारण देखील याच रंगात रंगते व राज्य-व्यवस्था देखील त्यानुसारच साकार होऊ लागते. म्हणून या आदेशांचे राजकारणाच्या आवरणाखाली वर्णन करण्याची गरज नाही. अन्यथा याचे नुकसान हे होईल की वाचक या गोष्टी स्वत:ला संबोधून न समजता इस्लामी राज्याला संबोधून आहेत असे समजू लागेल. व या आदेशांचे तथ्यहि विकृत होईल. या प्रकारच्या ओढा-ताणी मुळे योग्य अशी धार्मिक विचार सरणी बनत नाही.

२८. अल्लाहच्या दासांमध्ये सर्वात मोठा हक्क माता-पित्याचा आहे, जो एक स्वाभाविक हक्क आहे; व या कारणास्तव की त्यांनी पालन पोषण केले त्यांचा हक्क हा की संततीने त्यांच्याशी आयुष्यभर चांगली वागणूक ठेवावी. म्हणजे त्यांच्याशी चांगल्या नितीने वागावे, त्यांची सेवा करावी. त्यांच्यावर खर्च करण्याची आवश्यकता असेल तर खर्चहि करावा. अवज्ञा करणारा व त्यांना दु:ख पोहचविणारा न व्हावे.

म्हातार वयात माता-पिता सेवेला अधिक पात्र असतात व या वयात स्वभाव देखील चिडखोर बनतो. म्हणून विशेष रित्या ताकीद केली गेली की अशी कोणतीहि गोष्ट बोलू नका जी त्यांच्या साठी त्रासदायक ठरेल. ना कधी झिडकारणारी गोष्ट करा किंबहुना त्यांच्याशी आदर सन्मानाने बोलत जा.

२९. म्हणजे त्यांच्याशी दयेने व प्रेमाने वागा आणि नम्रताभाव अंगिकारा.

३०. अर्थात तुम्ही हे विसरता कामा नये की तुमच्या मातापित्याने तुमचे पालन पोषण केले, कष्ट-भावना भोगल्या त्यांच्या या उपकाराची जाणीव बाळगून तुम्ही त्यांच्या हक्कात दयेची प्रार्थना करा.

दयेची ही प्रार्थना त्यांची बाह्य-स्थिती व त्यांच्या म्हातरपणाचा

त्रास लक्षात घेता आहे, म्हणून ते मुसलमान नसतील तरीहि ही प्रार्थना करण्यात काहीच हरकत नाही. राहिली क्षमा याचनेची प्रार्थना, तर ती अनेकेश्वरवादी माता-पित्याकरिता केली जाऊ शकत नाही. जसे की सूरह तौबा आयत क्र. ११३ मध्ये उल्लेखिले गेले आहे (पहा सूरह तौबा टीप क्र. २०९)

३१. म्हणजे तुमच्या नियती, तुमच्या मनोभावना, तुमच्या अंत:करणाच्या कैफीयतीस तो चांगल्या प्रकारे जाणतो.

३२. अर्थात माता पित्याशी सद्व्यवहार करण्यात जर तुमच्या हातुन चुका घटल्या असतील तर अल्लाह पुढे क्षमा याचना करा व भावी काळासाठी स्वत:ची सुधारणा करून घ्या की अल्लाह सदाचारी बनणाऱ्यांची तौबा कबूल करतो व त्यांच्या अपराधांना माफ करतो.

३३. हक्काशी अभिप्रेत सांपत्तिक हक्क होय जो त्यांच्या गरजा व माणसाच्या परिस्थितीच्या दृष्टीने निश्चित होतो. तसेच हा हक्क ज़कात पर्यंत मर्यादीत नाही, किंबहुना या खेरीजहि असू शकतो.

३४. 'तब्ज़ीर' (फुजूल खर्ची) शी अभिप्रेत संपत्तिचा अपव्यय होय. अर्थात हा अपव्यय माणसाला हक्कांच्या अदायगी कडून बेपर्वा करतो. ज्यांना धन संपदा तारुण्यासह लाभते ते त्यास आपली मिळकत समजू लागतात. मग अनुचित कामांमध्ये किंवा आपली हौस भागविण्यात निर्धास्तपणे खर्च करतात. वस्तुत: संपत्ति, सर्वश्रेष्ठ अलाह कडून लाभलेली अमानत (ठेव) आहे. जिला उचित मार्गात खर्च करण्यास तो जबाबदार आहे. तसेच यात इतरांचेहि हक्क आहेत. ज्यांच्या पूर्ततेची जबाबदारी लागू पडते.

धन सम्पत्ति बाबत योग्य इस्लामी कल्पना नसल्यामुळे व या संदर्भात जबाबदारीची जाणीव नसल्यामुळे मनुष्य संपत्तिचा उधळपट्टीने विनिमय करू लागतो :

**वायफळ खर्च करणारे सैतानाचे भाऊ आहेत आणि सैतान आपल्या पालन कर्त्याशी मोठा कृतघ्न आहे. आणि जर तुम्हाला आपल्या पालन कर्त्याच्या मेहरबानीच्या शोधार्थ ज्याची तुम्ही आशा बाळगता, यांच्याकडून तोंड फिरवावे लागेल तर यांच्याशी नरमीने बोला. (अल-कुर्आन)**

२७. वायफळ खर्च करणारे सैतानाचे भाऊ आहेत आणि सैतान आपल्या पालन कर्त्याशी मोठा कृतघ्न आहे.[३५]

إِنَّ الْمُبَذِّرِينَ كَانُوا إِخْوَانَ الشَّيَاطِينِ ۖ وَكَانَ الشَّيْطَانُ
لِرَبِّهِ كَفُورًا ﴿٢٧﴾

२८. आणि जर तुम्हाला आपल्या पालन कर्त्याच्या मेहरबानीच्या शोधार्थ ज्याची तुम्ही आशा बाळगता, यांच्याकडून तोंड फिरवावे लागेल तर यांच्याशी नरमीने बोला.[३६]

وَإِمَّا تُعْرِضَنَّ عَنْهُمُ ابْتِغَاءَ رَحْمَةٍ مِنْ رَبِّكَ تَرْجُوهَا فَقُلْ لَهُمْ
قَوْلًا مَيْسُورًا ﴿٢٨﴾

२९. आणि ना आपला हात आपल्या गळ्याशी बाधूंन ठेवा व ना त्याला अगदी मोकळा सोडा की जेणेकरून धि:कारीत न अगतिक होऊन बसाल.[३७]

وَلَا تَجْعَلْ يَدَكَ مَغْلُولَةً إِلَىٰ عُنُقِكَ وَلَا تَبْسُطْهَا كُلَّ الْبَسْطِ
فَتَقْعُدَ مَلُومًا مَحْسُورًا ﴿٢٩﴾

३०. तुमचा पालनकर्ता ज्याच्यासाठी इच्छितो, उपजिविका विपुल करतो व ज्याच्यासाठी इच्छितो संकुचित करतो.[३८] तो आपल्या दासांची खबर राखणारा व त्यांना पाहणारा आहे.

إِنَّ رَبَّكَ يَبْسُطُ الرِّزْقَ لِمَنْ يَشَاءُ وَيَقْدِرُ ۚ إِنَّهُ كَانَ بِعِبَادِهِ
خَبِيرًا بَصِيرًا ﴿٣٠﴾

३१. आपल्या संततीची दारिद्र्याच्या भयाने हत्या करू नका आम्ही त्यांनाहि उपजिविका देतो व तुम्हालाहि.[३९] नि:संशय त्यांची हत्या फार मोठ्या अपराधाची गोष्ट आहे.[४०]

وَلَا تَقْتُلُوا أَوْلَادَكُمْ خَشْيَةَ إِمْلَاقٍ ۖ نَحْنُ نَرْزُقُهُمْ
وَإِيَّاكُمْ ۚ إِنَّ قَتْلَهُمْ كَانَ خِطْئًا كَبِيرًا ﴿٣١﴾

३२. आणि व्यभिचाराच्या जवळहि जाऊ नका. ही उघड अशी निर्लज्जता आहे व अतिशय वाईट मार्ग.[४१]

وَلَا تَقْرَبُوا الزِّنَىٰ ۖ إِنَّهُ كَانَ فَاحِشَةً وَسَاءَ سَبِيلًا ﴿٣٢﴾

३३. आणि कोणत्याहि जीवाची, ज्याला अल्लाहने आदरणीय ठरविले आहे, हत्या करू नका. परंतु सत्याच्या आधारावर.[४२] आणि जो कोणी अत्याचार पिडीत अवस्थेत मारला जाईल तर त्याच्या पालकाला आम्ही अधिकार दिला आहे. यास्तव त्यांनी हत्या करण्यात मर्यादेचे उल्लंघन करू नये.[४३] त्याची मदत केली गेली आहे.[४४]

وَلَا تَقْتُلُوا النَّفْسَ الَّتِي حَرَّمَ اللَّهُ إِلَّا بِالْحَقِّ ۗ وَمَنْ قُتِلَ
مَظْلُومًا فَقَدْ جَعَلْنَا لِوَلِيِّهِ سُلْطَانًا فَلَا يُسْرِفْ فِي الْقَتْلِ ۖ
إِنَّهُ كَانَ مَنْصُورًا ﴿٣٣﴾

३५."संपत्ति'' अल्लाहची फार मोठी देणगी आहे आणि अपव्यय या देणगीची सर्वात मोठी हेंडसाळ, म्हणून जो मनुष्य अपव्यय करतो तो सैतानाशी आपले नाते जोडतो व सैतान अल्लाहशी सर्वात अधिक कृतघ्न आहे.

३६. म्हणजे जर तुमची सांपत्तिक स्थिती अशी नाही की त्यांची मदत करू शकाल. तर मृदुभावात एखादी अशी गोष्ट बोला की जिच्याद्वारे त्यांच्याविषयीची सहानुभूति व्यक्त व्हावी.

या आयतीने हे हि माहित झाले की हक्कांच्या पूर्ततेकरिता अल्लाहच्या कृपेची आशा बाळगणे व त्यासाठी अधिक प्रयत्न करणे एक आवडती गोष्ट आहे.

३७. हात गळ्याशी बांधणे कंजूस वृत्तीचे धोतक होय व अगदी मोकळा सोडणे खर्चाचे. अर्थात माणसाने स्वत:वर व आपल्या मुलांबाळांवर खर्च करण्यात ना कृपणता अंगिकारावी व ना अत्याधिक खर्च करावा, किंबहुना समतोल वृत्तीवर कायम रहावे. जे लोक खर्च करण्यात अफरातफरी करतात, त्यांच्या हिश्श्यात बदनामीहि येते व लाचारी देखील. याऊलट समतोल वृत्तीने खर्च करण्यात मनुष्य प्रतिष्ठित बनून राहतो व ही वृत्ती त्याच्या मांगल्य व समृद्धीस कारक ठरते.

३८. याचे स्पष्टीकरण सूरह रअद टीप क्र. ५८ मध्ये केले गेले आहे.

३९. याचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र. २७६ मध्ये केले गेले आहे.

४०. म्हणजे आपल्या संततीची हत्त्या करणे ही काही साधी बाब नव्हे. किंबहुना फार मोठ्या अपराधाची बाब आहे. अज्ञान काळात अरब लोकांमध्ये लहान मुलांना दारिद्र्याच्या भयाने जिवंत गाडले जात असे किंवा अन्यरित्या ठार केले जात असे. म्हणून याचा उल्लेख विशेषत्वाने केला गेला. अन्यथा त्यांची हत्त्या करण्यास चालना देणारा कोणीहि असो, हे निर्दय पणाचे कृत्य जबरदस्त अपराधाचे कृत्य होय.

आजच्या संस्कृतीने व्यभिचाराला इतके सार्वत्रिक सर्वसामान्य केले आहे की अनौरस संतती मोठ्या प्रमाणात जन्माला येऊ लागली आहे आणि लोक यावर पांघरूण घालण्या करिता मुल जन्माला येताच त्याची हत्त्या-करण्यास चुकत नाही. अशा प्रकारे ते आपल्या शिरावर एक तर हरामकारीचा गुन्हा लादून घेतात व दुसरे नाहक हत्या करण्याचा.

४१. इस्लाम मध्ये व्यभिचार कोणत्याहि स्थितीत हराम (अवैध) शिक्षापात्र गुन्हा आहे. मग तो स्त्री व पुरुष दोघांनी एकमेकांच्या राजी खुशीने केलेला का असेना. तसेच व्यभिचार करणारा विवाहीते असो वा अविवाहीत.

व्यभिचार ही उघड निर्लज्जता असणे बुद्धि व स्वभावाच्या दृष्टीने अगदी स्वीकृत आहे. राहिले याचे वाईट मार्ग असणे तर या वाटेवर पाऊल ठेवल्यानंतर मनुष्य आपली नैतिक ओजास्विता गमवितो आणि कुमार्गावर चालू लागतो.

आयतीत व्यभिचारापासून अलिप्त राहण्याची ताकीद एवढ्या तीव्रतेने केली गेली आहे की माणसाने त्याच्या जवळपासहि फिरकू नये. म्हणजे ज्या गोष्टी व्यभिचाराला प्रवृत्त करणाऱ्या आहेत त्यांच्यापासून अगदी अलिप्तता बाळगावी. (पहा सूरह अनआम टीप क्र.२७७)

हदीस-वचनात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अशा गोष्टींचे निवेदन फर्मावले आहे, ज्यांच्या पासून व्यभिचाराचा आरंभ होतो.

كُتِبَ عَلَى ابْنِ آدَمَ نَصِيبُهُ مِنَ الزِّنٰى ـ مدركٌ ذٰلک لا
محالة فالعينان زناهما النَّظرُ ، وَالْاُذُنَانِ زنا هما
الاستماعُ وَاللِّسانُ زناه الكلامُ واليَدُزنا ها البطشُ ،
والرجلُ زناها الخطا، والقلبُ يهوىٰ و يتمنّٰى ، ويُصَدِّق
ذلک الفرجُ اويكَذِّبُهٗ ـ (مسلم كتاب القدر)

''माणसाचा व्यभिचारात जो हिस्सा असतो तो लिहिला जातो,ज्याला (अर्थात त्याच्या गुन्ह्याला) तो अपरिहार्यत:पावेल. यास्तव डोळ्यांचा व्यभिचार (काम वासनेची) नजर होय, कानांचा व्यभिचार (वासना कारक गोष्टी) ऐकणे होय. जीभेचा व्यभिचार (प्रेम विषयक) गोष्टीकरणे होय. हाताचा व्यभिचार (कामवासनेने) पकडणे व पायाचा व्यभिचार (ती) पाऊले होत (जी या कुमार्गावर पडलीत) मन, इच्छा व अभिलाषा बाळगतो आणि लज्जास्थान याला खरे किंवा खोटे करून दाखविते.''(मुस्लिम-किताबुलकद्र)

४२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र.२७८

४३. 'वली'शी अभिप्रेत वारस होय जे एक वा अनेक असू शकतात. वारसाला हा अधिकार दिला गेला आहे की त्याने वध करणाऱ्या कडून एक तर प्राण-मूल्य स्वीकारावे किंवा किसास द्वारे त्याला ठार करावे. यात मर्यादेचे उल्लंघन न करण्याचा अर्थ असा की वध करणाऱ्या शिवाय अन्य कोणाचीहि हत्त्या केली जाऊ नये. अज्ञान-काळात एका वधापायी कित्येकांचे बळी घेतले जात होते किंवा मारेकऱ्यास सोडून कबिल्याच्या प्रभावशाली माणसाची हत्या केली जात असे. हे प्रकार न्याय-विसंगत आहेत. यास्तव त्यांच्या बाबत मनाई केली गेली आहे.

हा तर होता अरब लोकांचा अडाणीपणा परंतु आजच्या काळातील अज्ञान देखील याहून कमी नाही. जे आमच्या देशात नित्य नेमाने दिसून येते. जेव्हा जातीयवादी परिस्थिती तणाव पूर्ण होते व एका संप्रदायाचा एखादा मनुष्य ठार केला जातो तर

त्या संप्रदायाचे लोक दुसऱ्या संप्रदायाच्या कोणत्याहि माणसाला, मग तो रस्त्याने जाणारा असो, पकडून ठार करतात व याला अत्याचार समजत नाहीत. वस्तुतः हत्या करणाऱ्या, शिवाय दुसऱ्याला ठार करणे उघड अत्याचार आहे.

ही सूरह मक्की आहे ज्यात अत्याचार पिडीत मृत इसमाच्या वारसाला हा अधिकार दिला गेला की त्याने मारेकऱ्याची हत्या करावी. जेव्हा इस्लामी राज्य अस्तित्वात आले नव्हते. यावरून हे स्पष्ट झाले की हत्या करणाऱ्यास ठार करण्याचा अधिकार शरीअती नुसार मुस्लिमेतर राज्यातहि मुसलमानाला प्राप्त आहे. तथापि जर मुस्लिमेतर राज्याचे कायदे याला आड येत असतील तर गोष्ट वेगळी.

हे हि स्पष्ट व्हावे की या आयतीत हत्या करणाऱ्यास ठार करण्याचा अधिकार वधित इसमाच्या वारसाला दिला गेला आहे. परंतु नंतर जेव्हा मदीनेत इस्लामी रज्य अस्तित्वात आले तेव्हा या अधिकारास विधिवत लागू करण्याची जबाबदारी राज्य शासनावर आली. तात्पर्य या कायद्याचे उदयोन्मुख स्वरूप हे की तो इस्लामी न्यायालयाद्वारे लागू करण्यात येईल. यास्तव इस्लामचे प्रसिद्ध प्रचारक व विधिज्ञ अब्दुल कादीर औदा शहीद या कायद्याचे स्पष्टीकरण करतांना लिहितात-

तात्विक बाब अशी की किसासच्या अपरधाची शिक्षा लागू करणे दुसऱ्या शिक्षेप्रमाणे कार्याधिकाऱ्याच्या मर्जीवर सोडले गेले आहे. परंतु अपवादात्मक रित्या या गोष्टीची परवानगी दिली गेली आहे की वधित इसमाच्या वारसाद्वारे 'किसास'ची पूर्तता व्हावी व याला आधार ही आयत होय

وَمَنْ قُتِلَ مَظْلُومًا فَقَدْ جَعَلْنَا لِوَلِيِّهِ سُلْطَانًا فَلَا يُسْرِفْ فِي الْقَتْلِ-

''आणि ही गोष्ट सर्व संमत आहे की वधित इसमाच्या वारसाला वधाचा बदला घेण्याचा हक्क आहे. या अटीवर की ही कारवाई शासनाच्या देखरेखी खाली पार पडावी. कारण हा एक असा मामला आहे ज्यात आपल्या बुद्धिने निर्णय घेण्याची गरज भासते व या मामल्यात कोणत्याहि प्रकारचा अतिरेक करणे हराम (अवैध) आहे.''

(अत-तशरीऊल जिनाई अल-इस्लामी खं.१पा. ७५७)

४४. अर्थात शरीअत व इस्लामी समाजाची पाठ राखण त्याला (म्हणजे वधित इसमाच्या वारसाला) लाभला आहे. यास्तव त्याने मर्यादांचे बंधन पाळावे.

काय तुमच्या पालन कर्त्याने तुमच्यासाठी तर पुत्र खास केलेत व स्वत:साठी फिरिश्त्यांना 'मुली' बनविले? मोठी उद्दाम गोष्ट आहे जी तुम्ही बोलता. आम्ही या कुरआनात विविधरित्या गोष्ट स्पष्ट केली. अशासाठी की त्यांनी स्मरणिका प्राप्त करावी परंतु या पासून त्यांचे दूरत्व वाढतच जात आहे.(अल-क़ुर्आन)

३४. आणि अनाथाच्या सम्पतिच्या जवळहि जाऊ नका. मात्र अशारीतीने जी अधिक चांगली असावी. येथ पावेतो की ते तारूण्यावस्थेप्रत पोहचावेत.[४५] आणि वचनाचे पालन करा. निःसंशय वचना बाबतीत विचारपूस होईल.

وَلَا تَقْرَبُوا مَالَ الْيَتِيمِ إِلَّا بِالَّتِي هِيَ أَحْسَنُ حَتَّىٰ يَبْلُغَ
أَشُدَّهُ ۚ وَأَوْفُوا بِالْعَهْدِ ۖ إِنَّ الْعَهْدَ كَانَ مَسْئُولًا ﴿٣٤﴾

३५. आणि जेव्हा मापून द्याल तर माप पूरेपूर भरून द्या व सरळ तराजू ने तोला [४६] ही पद्धत चांगली आहे व परिणामाच्या दृष्टीने अधिक चांगली.[४७]

وَأَوْفُوا الْكَيْلَ إِذَا كِلْتُمْ وَزِنُوا بِالْقِسْطَاسِ الْمُسْتَقِيمِ ۚ
ذَٰلِكَ خَيْرٌ وَأَحْسَنُ تَأْوِيلًا ﴿٣٥﴾

३६. आणि ज्या गोष्टीचे तुम्हाला ज्ञान नाही तिच्या मागे लागू नका.[४८] कान, डोळे व हृदय यापैकी प्रत्येकाच्या बाबतीत विचार. पूस होईल.[४९]

وَلَا تَقْفُ مَا لَيْسَ لَكَ بِهِ عِلْمٌ ۚ إِنَّ السَّمْعَ وَالْبَصَرَ وَالْفُؤَادَ كُلُّ
أُولَٰئِكَ كَانَ عَنْهُ مَسْئُولًا ﴿٣٦﴾

३७. आणि जमीनीवर ऐटीने चालू नका. तुम्ही ना जमीनीला फाडू शकता आणि ना पर्वतांच्या उंची प्रत पोहचू शकता.[५०]

وَلَا تَمْشِ فِي الْأَرْضِ مَرَحًا ۖ إِنَّكَ لَنْ تَخْرِقَ الْأَرْضَ وَلَنْ تَبْلُغَ
الْجِبَالَ طُولًا ﴿٣٧﴾

३८. या समस्त गोष्टींचा वाईटपणा तुमच्या पालन कर्त्याजवळ अतिशय नापसंत आहे.[५१]

كُلُّ ذَٰلِكَ كَانَ سَيِّئُهُ عِنْدَ رَبِّكَ مَكْرُوهًا ﴿٣٨﴾

३९. ह्या बुद्धि कौशल्याच्या त्या गोष्टीपैकी होय. ज्यांची 'वही' तुमच्या पालन कर्त्याने तुमच्यावर अवतरीत केली आहे.[५२] आणि अल्लाह सोबत दुसरे उपास्य ठरवू नका [५३] की ज्यामुळे जहन्नम मध्ये टाकले जाल, निंदनीय व धिःकारलेल्या स्थितीत.

ذَٰلِكَ مِمَّا أَوْحَىٰ إِلَيْكَ رَبُّكَ مِنَ الْحِكْمَةِ ۗ وَلَا تَجْعَلْ مَعَ
اللَّهِ إِلَٰهًا آخَرَ فَتُلْقَىٰ فِي جَهَنَّمَ مَلُومًا مَدْحُورًا ﴿٣٩﴾

४०. काय तुमच्या पालन कर्त्याने तुमच्यासाठी तर पुत्र खास केलेत व स्वतःसाठी फिरिशत्यांना 'मुली' बनविले?[५४] मोठी उद्दाम गोष्ट आहे जी तुम्ही बोलता.

أَفَأَصْفَاكُمْ رَبُّكُمْ بِالْبَنِينَ وَاتَّخَذَ مِنَ الْمَلَائِكَةِ إِنَاثًا ۚ إِنَّكُمْ
لَتَقُولُونَ قَوْلًا عَظِيمًا ﴿٤٠﴾

४१. आम्ही या कुरआनात विविधरित्या गोष्ट स्पष्ट केली. अशासाठी की त्यांनी स्मरणिका प्राप्त करावी [५५] परंतु या पासून त्यांचे दूरत्व वाढतच जात आहे.[५६]

وَلَقَدْ صَرَّفْنَا فِي هَٰذَا الْقُرْآنِ لِيَذَّكَّرُوا وَمَا يَزِيدُهُمْ إِلَّا نُفُورًا ﴿٤١﴾

४५. याचे स्पष्टीकरण सूरह निसा टीप १७ मध्ये केले गेले आहे.

४६. म्हणजे मापण्या तोलण्याची परिमाणेहि दुरुस्त असली पाहिजेत व त्यांचा वापर देखील सचोटीने झाला पाहिजे. चोरमाप व दांडी मारण्याचा प्रकार ते लोक अंगिकारतात ज्यांना आखिरतच्या विचारपूस विषयी काळजी वाटत नाही.

ही आयत या तात्विक बाबीकडे मार्गदर्शन करते की माणसाने समस्त व्यावहारीक मामल्यांत प्रामाणिक पणाचे वर्तन अंगिकारावे (अधिक स्पष्टीकपणासाठी पहा सूरह ततफीफ टीप क्रं १)

४७. ही पद्धत चांगली आहे म्हणजे याद्वारे विश्वासहि कायम होतो, नैतिक प्रभावहि चांगला पडतो व कारभारात समृद्धी होते.

राहिले परिणामाच्या दृष्टीने अधिक चांगले होणे तर याशी अभिप्रेत आखिरतच्या परिणामाचा चांगुलपणा होय. अर्थात हे त्या लोकांसाठीच होय जे कोणत्याही मामल्यात आपली प्रामाणिकता सिद्ध करून दाखवितात. मात्र अशा लोकांसाठी नव्हे जे सर्व प्रकारच्या अप्रामाणिकतेस केवळ आपला धंदा वाढविण्यासाठी चालू ठेवतात.

४८. ही सर्वकष आज्ञा आहे ज्यात, ईश्वराकडे प्रमाण-शून्य गोष्टींचा संबंध जोडणे, भ्रम पूजा, कोणताहि आधार नसलेल्या कथनांना महत्व देने, धार्मिक समस्यांबाबत अटकळीच्या गोष्टी करणे. अपरोक्ष हकीगती विषयी तत्वज्ञानाचा पाया रचणे, विवाद निर्माण करणे, जिन्नां बाबत ऐकीव गोष्टीवर विश्वास ठेवणे,जाच-पडताळ न करता आरोप ठेवणे या सारख्या गोष्टींचा समावेश आहे.

४९. म्हणजे श्रवण, दृष्टी व विवेक इत्यादि सामर्थ्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे अनामत म्हणून आहेत, जी योग्य वापरासाठी प्रदान केली गेली आहेत. कियामतीच्या दिवशी प्रत्येक माणसाला या गोष्टीचा जाब द्यावा लागेल की त्याने ह्या सामर्थ्यंचा उचित वापर केला होता कि अनुचित.

५०. म्हणजे गर्विष्ठ बनून उन्मत्तपणे चालू नका. तुम्ही एवढे देखील सामर्थ्य बाळगत नाहीत की जमीनीवर पाय आदळून तिला फाडू शकाल आणि ना आपली मान उंच करून पर्वतांच्या उंचीप्रत पोहचू शकाल आणि गर्वाचे हे चालणे कोणत्या बळावर आहे? माणसाने तर अल्लाहचे सामर्थ्य व त्याची महानता डोळ्यासमोर ठेवून व आपल्या अगतिकतेची जाणीव ठेवून नम्रता व शालीनतेने चालले पाहिजे.

५१. म्हणजे वर ज्या निषिद्ध गोष्टींचा उल्लेख केला गेला आहे त्यातली प्रत्येक गोष्ट वाईट असल्यामुळे सर्वश्रेष्ठ अल्लाह जवळ अतिशय अप्रिय आहे.

५२. म्हणजे हे समस्त आदेश बुद्धि कौशल्यावर आधारीत आहे. तुम्ही जर विचार चिंतन केले तर तुम्ची बुद्धि व स्वभाव साक्ष देईल की या सर्व बुद्धिमत्तेच्या गोष्टी आहेत आणि माणसाला मांगल्य व यशाच्या मार्गाला लावणाऱ्या आहेत.

५३. आदेशांचा आरंभ एकेश्वरवादाने झाला होता व समारोप देखील एकेश्वरवादानेच होत आहे. तात्पर्य एकेश्वर वादच शरीअतचा केंद्र बिंदू आहे आणि हे आदेश त्याच्या व्यवहारीक निकडी आहेत. एकेश्वरवादा सोबत उपासना व आज्ञा पालन दोन्ही आवश्यक आहेत.

५४. याचे स्पष्टीकरण सूरह नहल टीप क्र. ७९ मध्ये केले गेले आहे.

५५. यांचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र. १०९ मध्ये केले गेले आहे.

५६. सर्वश्रेष्ठ अल्लाहने लोकांना समजाविण्याकरीता क़ुरआनात वेगवेगळ्या शैली व पद्धति अंगिकारल्या आहेत. प्रमाणेहि प्रस्तुत केले आहेत व बोधप्रद ऐतिहासिक घटना देखील, उपदेशहि व ताकीदीहि, हकीगतीहि व उदाहरणेहि. परंतु जे लोक हटवादी पणाला चिकटून राहतात, त्यांच्यावर कसल्याहि उपदेशाचा परिणाम होत नाही. ते क़ुरआनातील गोष्टींना चुकीच्या अर्थाचा साज चढवू लागतात व परिणामी ते सत्यापासून अधिकाधिक दूर होत जातात.

४२. सांगा, जर त्याच्या सोबत अन्य ईश्वरहि राहीले असते जसे हे लोक सांगतात, तर त्यांनी अर्श (ईश-सिंहासना) च्या स्वामीकडे (वर्चस्व प्राप्त करण्याकरीता) मार्ग खचितच शोधून काढला असता.[५७]

قُلْ لَّوْ كَانَ مَعَهٗٓ اٰلِهَةٌ كَمَا يَقُوْلُوْنَ اِذًا لَّابْتَغَوْا
اِلٰى ذِى الْعَرْشِ سَبِيْلًا ﴿٤٢﴾

४३. पवित्र आहे तो आणि अतिशय उच्च आहे त्या गोष्टींपासून ज्या हे सांगतात.

سُبْحٰنَهٗ وَتَعٰلٰى عَمَّا يَقُوْلُوْنَ عُلُوًّا كَبِيْرًا ﴿٤٣﴾

४४. सप्त आकाश व जमीन आणि जे काही यांच्यात आहे. सर्व त्याची पवित्रता वर्णन करतात. अशी कोणतीहि वस्तू नाही जी त्याच्या स्तुतीसह त्याच्या पवित्रतेचा जाप करीत नसेल, परंतु तुम्ही त्यांचे जाप्य समजत नाही. [५८] निःसंशय तो मोठा महान व मोठा क्षमा करणारा आहे.[५९]

تُسَبِّحُ لَهُ السَّمٰوٰتُ السَّبْعُ وَالْاَرْضُ وَمَنْ فِيْهِنَّ ۗ وَاِنْ مِّنْ شَيْءٍ
اِلَّا يُسَبِّحُ بِحَمْدِهٖ وَلٰكِنْ لَّا تَفْقَهُوْنَ تَسْبِيْحَهُمْ ۗ اِنَّهٗ كَانَ
حَلِيْمًا غَفُوْرًا ﴿٤٤﴾

४५. आणि जेव्हा तुम्ही क़ुरआन-पठण करता तेव्हा आम्ही तुमच्या व त्या लोकांच्या दरम्यान जे आखिरतवर ईमान बाळगत नाही, एक अदृश्य पडदा टाकतो.[६०]

وَاِذَا قَرَاْتَ الْقُرْاٰنَ جَعَلْنَا بَيْنَكَ وَبَيْنَ الَّذِيْنَ
لَا يُؤْمِنُوْنَ بِالْاٰخِرَةِ حِجَابًا مَّسْتُوْرًا ﴿٤٥﴾

४६. आणि त्यांच्या मनावर आवरण चढवितो की त्यांना काहीच समजू नये व त्यांच्या कानात जडत्व निर्माण करतो.[६१] आणि जेव्हा तुम्ही क़ुरआनात आपल्या एकाच पालनकर्त्याचा उल्लेख करता तेव्हा ते पाठ फिरवून पळ काढतात.[६२]

وَّجَعَلْنَا عَلٰى قُلُوْبِهِمْ اَكِنَّةً اَنْ يَّفْقَهُوْهُ وَفِيْٓ اٰذَانِهِمْ وَقْرًا ۗ وَاِذَا
ذَكَرْتَ رَبَّكَ فِى الْقُرْاٰنِ وَحْدَهٗ وَلَّوْا عَلٰٓى اَدْبَارِهِمْ نُفُوْرًا ﴿٤٦﴾

४७. आम्ही (चांगल्या प्रकारे) जाणतो जेव्हा हे तुमच्याकडे कान लावतात तेव्हा ते काय ऐकतात. तसेच जेव्हा हे कान गोष्टी करतात-जेव्हा हे अत्याचारी म्हणतात की तुम्ही तर एका अशा माणसा मागे चालत आहात, जो जादूने झपाटलेला आहे. [६३]

نَحْنُ اَعْلَمُ بِمَا يَسْتَمِعُوْنَ بِهٖٓ اِذْ يَسْتَمِعُوْنَ اِلَيْكَ وَاِذْ هُمْ نَجْوٰٓى
اِذْ يَقُوْلُ الظّٰلِمُوْنَ اِنْ تَتَّبِعُوْنَ اِلَّا رَجُلًا مَّسْحُوْرًا ﴿٤٧﴾

४८. पहा ह्या कशा प्रकारच्या गोष्टी आहेत. ज्या तुमच्या संबंधी ते सांगतात. ज्यामुळे ते दिशाहीन झालेत. आता मार्ग प्राप्त करू शकत नाहीत.

اُنْظُرْ كَيْفَ ضَرَبُوْا لَكَ الْاَمْثَالَ فَضَلُّوْا فَلَا يَسْتَطِيْعُوْنَ سَبِيْلًا ﴿٤٨﴾

५७. म्हणजे अनेकेश्वरवाद्यांचा हा दावा की या सृष्टीत अनेक ईश्वर आहेत, जर गृहीत म्हणून खरा असता तर समस्त लहान लहान ईश्वर (देव) या मोठ्या ईश्वराला प्रभावीत करण्याकरिता पुढे सरसावले असते, जो अर्शचा स्वामी आहे; व ज्याच्या हाती संपूर्ण सृष्टीची सता आहे आणि जेव्हा ईश्वरांच्या (देवांच्या) दरम्यान सत्ता-संघर्ष माजला असता तर सुष्टीची ही व्यवस्था चांगल्या रीतीने कशी चालली असती. अशा स्थितीत ही सृष्टी अपरिहार्यत: अस्ताव्यस्त झाली असती. परंतु तुम्ही हे पाहता की वस्तुस्थिती अशी नाही. सृष्टी-व्यवस्थेत कोठेहि कसली उणीव वा दोष दिसत नाही हा या गोष्टीचा स्पष्ट पुरावा होय की संपूर्ण सृष्टीवर एकाच ईश्वराचे शासन आहे. ना दुसरा एखादा ईश्वर किंवा देव आहे, ना एकमेव ईश्वराच्या शासनात कोणाचा हिस्सा आहे.

५८. ही एक अपरोक्ष हकीगत आहे. जिला क़ुरआन ने अनावरीत केले आहे. क़ुरआन स्पष्टीकरण करते की सृष्टीची अशी कोणतीहि वस्तू नाही जी अल्लाहचे पावित्र्य व त्याची स्तुती वर्णन करीत नसेल.

याचा अर्थ फक्त एवढाच नव्हे की प्रत्येक वस्तु परिस्थितीच्या वाचेने ईश-स्तुती व गुणगान करीत आहे. म्हणजे एकेश्वर वादावर युक्तिवाद करीत आहे. किंबहुना अर्थ असा की प्रत्येक वस्तू बोलणाऱ्या जीभेनेहि स्तुती व गुणगान करीत आहे. आता ही गोष्ट वेगळी की त्यांची ईश-स्तुती व गुणगान आमच्या लक्षात येत नाही.

आज विज्ञानाने माणसाच्या ज्ञानात विलक्षण भर घातली आहे. अणु (Atom) विषयी आधुनिक दृष्टीकोन असा की त्याच्या केंद्रा (Nucleus) भोवती इलेक्ट्रान (Electron) फिरतो. तात्पर्य कण न कण गतीमान आहे. परंतु आम्हाला त्यांची ही गती दिसत नाही व दिसून येत नाही म्हणून विज्ञानाच्या या संशोधनाचा कोणी इन्कार करीत नाही, मग जर आम्हाला अल्लाहची 'वही' (संदेश) जो ज्ञानाचे विश्वसनीय माध्यम आहे या गोष्टीची खबर देते की सृष्टीची प्रत्येक वस्तू अल्लाहचे गुणगान करण्यात मग्न आहे. तेव्हा यावर विश्वास का करू नये? काय केवळ या कारणास्तव याचा इन्कार करणे योग्य ठरेल की गुप्त ध्वनी आमच्या कानांना ऐकू येत नाही? क़ुरआनाने खरे पाहता सृष्टीच्या रहस्य भेदांना अनावरित करून माणसाच्या ज्ञानात विलक्षण भर घातली आहे. अशासाठी की त्याने या पासून सत्याचा प्रकाश प्राप्त करावा. यास्तव याचा इन्कार माणसा करीता वंचिततेलाच कारणीभूत ठरेल.

५९. अर्थात ईश-निर्मितीचे हे कर्तव्य आहे की तिने आपल्या निर्मात्याचे गुण-गान करावे. आता जर माणसांमध्ये असे लोक आहेत जे आपल्या निर्मात्याशी दोष व उणीवपूर्ण गोष्टींचा संबंध जोडतात व अन्य उपास्यांना त्याचा सहभागी ठरवितात. तर त्यांच्या या कारवाया अशा होत की अल्लाहचा प्रकोप ताबडतोब त्यांच्यावर कोसळावा. परंतु अल्लाह सहनशील आहे. म्हणून त्यांच्या या कारवाया सहन करतो आणि तो मोठा माफ करणारा आहे. म्हणून सवडहि देतो. अशासाठी की लोकांनी तौबा (क्षमा-याचना) करून त्यांच्या माफीस पात्र व्हावे.

६०. ऐहीकतेचे भूत ज्या लोकांच्या मानगुटीवर असे बसते की आखिरतची कल्पना त्यांच्यासाठी कोणत्याहि प्रकारे मान्य करण्यासारखी नसेल अशा लोकांनी क़ुरआन ऐकले किंवा स्वत:वाचले तरी त्याचा काहीहि परिणाम त्यांच्यावर होत नाही आणि याला कारण अल्लाहचा हा नियम की जो सत्य-स्वीकृतीस तयार नाही तो त्याच्या प्रदान केल्या जाणाऱ्या सुबुद्धि पासून वंचित राहील. हा नियम आपले कार्य करतो. मात्र अशा प्रकारे की बाह्य दृष्टीला दिसून येत नाही. यास्तव यास 'अदृश्य पडदा' या अर्थाने घेतले गेले आहे.

६१. याचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र. ४४ मध्ये केले गेले आहे.

६२. म्हणजे जे क़ुरआन तुम्ही प्रस्तुत करता त्यात एकाच पालन कर्त्याचा उल्लेख आहे व त्यांनी ठरविलेल्या उपास्यांचा किंचित मात्र उल्लेख नाही की ईशत्वाच्या मामल्यात त्यांचा काही हस्तक्षेप आहे, हे पाहून ते या क़ुरआनास ऐकणेहि पसंत करीत नाही. किंबहुना पाठ फिरवून पळ काढतात.

६३. संकेत मक्केच्या काफिरांच्या सरदारकडे आहे, जे प्रसंगी क़ुरआन ऐकण्याचा प्रयत्नहि करीत तर विरोध करण्याच्या हेतुने. यास्तव ते आपसात या विरूद्ध कुजबुज करीत आणि जेव्हा असे पाहत की त्यांच्या साथीदारांपैकी एखादा मनुष्य पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आवाहनाने प्रभावीत होत आहे तेव्हा म्हणत की तुम्ही एका अशा माणसामागे चालत आहात ज्यावर एखाद्याने जादूटोणा केला आहे. त्या जादूच्या प्रभावाने तो वेडसरपणाच्या गोष्टी बोलत आहे.

ही आयत हे स्पष्ट करते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर जादूने भारल्याचा आरोप काफिरांनी ठेवला होता. जो अगदी चुकीचा होता. यावरून हे हि स्पष्ट झाले की पैगंबरांवर जादूचा प्रभाव होऊ शकत नव्हता. कारण ही प्रेषितत्व पदाला आघात पोहचविणारी गोष्ट आहे. म्हणून ज्या कथनांमध्ये हे निवेदन आहे की मदीनेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर यहुदींनी जादूटोणा केला होता व पैगंबरांवर त्याचा काहीसा परिणाम झाला, होता क़ुरआनाशी विसंगत असल्यामुळे रद्द करण्याजोगे आहे.

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फलक टीप क्र.६)

४९. ते म्हणतात जेव्हा आम्ही हाडे व चूर होऊन जाऊ तर काय आम्हाला पुन्हा नव्याने निर्माण करून उठविले जाईल?

وَقَالُوٓا۟ ءَإِذَا كُنَّا عِظَٰمًا وَرُفَٰتًا ءَإِنَّا لَمَبْعُوثُونَ خَلْقًا جَدِيدًا ﴿٤٩﴾

५०. सांगा, तुम्ही दगड व्हा कि लोखंड.

قُلْ كُونُوا۟ حِجَارَةً أَوْ حَدِيدًا ﴿٥٠﴾

५१. किंवा अन्य एखादी वस्तु जी तुमच्या मते यापेक्षाहि अधिक कठीन असेल. [६४] ते म्हणतील कोण आम्हाला दुसऱ्यांदा जिवंत करील? सांगा, तोच ज्याने तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले. मग ते माना डोलावून विचारतील की हे केव्हा होईल? सांगा, नवल नव्हे की याची वेळ जवळ येऊन ठेपली असेल.

أَوْ خَلْقًا مِّمَّا يَكْبُرُ فِى صُدُورِكُمْ ۚ فَسَيَقُولُونَ مَن يُعِيدُنَا ۖ قُلِ ٱلَّذِى فَطَرَكُمْ أَوَّلَ مَرَّةٍ ۚ فَسَيُنْغِضُونَ إِلَيْكَ رُءُوسَهُمْ وَيَقُولُونَ مَتَىٰ هُوَ ۖ قُلْ عَسَىٰٓ أَن يَكُونَ قَرِيبًا ﴿٥١﴾

५२. ज्या दिवशी तो तुम्हाला पुकारिल तर तुम्ही त्याची प्रशंसा करीत त्याच्या पुकारण्यास उत्तर द्याल व अशी कल्पना कराल की फक्त थोडाच वेळ राहीलो.[६५]

يَوْمَ يَدْعُوكُمْ فَتَسْتَجِيبُونَ بِحَمْدِهِۦ وَتَظُنُّونَ إِن لَّبِثْتُمْ إِلَّا قَلِيلًا ﴿٥٢﴾

५३. आणि माझ्या दासांना सांगा की त्यांनी अशी गोष्ट बोलावी जी अधिक चांगली असेल. सैतान लोकांच्या दरम्यान उत्पात माजवितो.[६६] नि:संशय सैतान माणसाचा उघड शत्रू आहे.

وَقُل لِّعِبَادِى يَقُولُوا۟ ٱلَّتِى هِىَ أَحْسَنُ ۚ إِنَّ ٱلشَّيْطَٰنَ يَنزَغُ بَيْنَهُمْ ۚ إِنَّ ٱلشَّيْطَٰنَ كَانَ لِلْإِنسَٰنِ عَدُوًّا مُّبِينًا ﴿٥٣﴾

५४. तुमचा पालन कर्ता तुम्हाला चांगल्या प्रकारे जाणतो. त्याने इच्छिले तर तुमच्यावर कृपा करील आणि इच्छिले तर तुम्हाला शिक्षा-यातना देईल. [६७] आणि (हे पैगंबर !) आम्ही तुम्हाला त्यांच्यावर त्यांच्या कर्मास जबाबदार बनवून पाठविले नाही.[६८]

رَّبُّكُمْ أَعْلَمُ بِكُمْ ۖ إِن يَشَأْ يَرْحَمْكُمْ أَوْ إِن يَشَأْ يُعَذِّبْكُمْ ۚ وَمَآ أَرْسَلْنَٰكَ عَلَيْهِمْ وَكِيلًا ﴿٥٤﴾

५५. आणि तुमचा पालनकर्ताच अधिक चांगले जाणतो, त्यांना जे आकाशात व जमीनीवर आहेत. आम्ही काही पैगंबरांना काहींवर श्रेष्ठत्व प्रदान केले आणि आम्ही दाऊदला 'जबूर' प्रदान केले.[६९]

وَرَبُّكَ أَعْلَمُ بِمَن فِى ٱلسَّمَٰوَٰتِ وَٱلْأَرْضِ ۗ وَلَقَدْ فَضَّلْنَا بَعْضَ ٱلنَّبِيِّـۧنَ عَلَىٰ بَعْضٍ ۖ وَءَاتَيْنَا دَاوُۥدَ زَبُورًا ﴿٥٥﴾

६४. म्हणजे मेल्यानंतर माणसाचे शरीर विरघळून माती व्हावे, लोखंड व्हावे किंवा याहून अधिक कठीण असा धातू व्हावे, अल्लाहसाठी त्याला दुसऱ्यांदा त्याच्या शरीरासमेत उठविणे किंचितहि कठीण नाही. ज्या शक्ति ने माणसाला पहिल्यांदा जीवन प्रदान केले, तिच्यासाठी याची पुनरावृत्ती करणे अवघड का ठरेल?

६५. कियामतीचा दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाह समस्त मानवांना उद्देश्यून पुकारेल की उठा व माझ्या समक्ष हजर व्हा. तेव्हा माणेस दुसऱ्यांदा जिवित होऊन त्याच्या बोलाविण्यावर हजर होतील. त्या वेळी त्यांच्या जीभेवर स्तुती-वचने जारी राहतील. हे मनुष्याच्या स्वभावानुरूप असेल जो आपल्या पालनकर्त्यासाठी प्रशंसेनेच परिचित आहे.

ईश्वरा समोर होणाऱ्या या हजेरीस हज्जच्या मेळाव्यात तुलनात्मक शैलीत सादर केले गेले आहे. यास्तव काबागृहाच्या दर्शनासाठी 'लब्बैक' म्हणजे 'मी तुझ्या समोर हजर आहे' असे म्हणत जातो व त्याच्या जीभेवर स्तुती-वचने असतात.

إِنَّ الْحَمْدَ وَالنِّعْمَةَ لَكَ

"इन्नल हम्दा वन्निमता लका" (प्रशंसा व देणगी/चांगल्या गोष्टी तुझ्याच करिता आहेत.)

लोकांना कियामत फार लांब वाटते. परंतु जेव्हा ते जिवंत होऊन उठतील तेव्हा त्यांना असे वाटेल की जो अवधी इहलोक व कियामतीच्या दरम्यान पार पडला तो फारच थोडा होता."आलमे-बर्जख" मरणोत्तर अवस्थेत) मध्ये थोडाच वेळ राहील होते. तेवढ्यात कियामत आली.

६६. म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांना सांगा की त्यांनी सत्याचा इन्कार करणाऱ्यांशी वादविवाद करू नये आणि एखादी अशी गोष्ट बोलू नये जी प्रक्षोभ निर्माण करणारी असावी. किंबहुना ताकीद पूर्ण शैली अंगिकारावी व आवाहन चांगल्या प्रकारे सादर करावे. लक्षात ठेवा सैतान प्रक्षोभ व कलह निर्माण करून मानवी संबंधाना खराब करू इच्छितो आणि असे इच्छित नाही की लोकांनी सत्य कबूल करावे.

६७. हे सर्वसामान्य माणसांना इद्देशून आहे की तुमचा पालनकर्ता तुमची मन:स्थिती चांगल्या प्रकारे जाणतो आणि कृपा व प्रकोप त्याच्या मर्जीवर अवलंबून आहे, परंतु त्यांच्या मर्जीचे फैसले लोकांच्या आंतरिक स्थितीला समोर ठेवून केले जातात. जो मनुष्य सत्य-स्वीकृती करिता मनापासून तयार असतो, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याच्यावर कृपा करतो व असा मनुष्य सत्याला प्राप्त करून त्याच्या कृपेस पात्र ठरतो. याऊलट जो मनुष्य सत्य-स्वीकृतिसाठी मनापासून तयार नसतो सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला आपल्या कृपेपासून वंचित राखतो आणि तो कुफ्र मुळे अजाब (ईश-शिक्षे) ला मात्र ठरतो.

६८. म्हणजे पैगंबराचे काम अल्लाहचा संदेश पोहचविणे एवढे आहे. तो कोणाच्या आचरणास जबाबदार नाही.

६९. उद्देश त्या विवादा पासून रोखणे होय. ज्यात लोक पैगंबरांच्या श्रेष्ठत्वा संबंधाने वादग्रस्त आहेत. यहुदी हजरत मूसा यांच्या श्रेष्ठत्वास मानणारे होते. तर ख्रिश्चन हजरत ईसा यांना सर्वश्रेष्ठ ठरवीत होते. आणि मक्केचे अनेकेश्वरवादी तर केवळ विवादासाठी यांच्या कडून ऐकून अनेक गोष्टींची छेड काढीत असत. या पार्श्वभूमीवर येथे ही तात्विक बाब सांगितली गेली आहे की पैगंबर असो वा फिरिश्ता. कोणाचाहि दर्जा निश्चित करणे तुमचे काम नव्हे. किंबहुना हे अल्लाहचे काम होय. कारण तो आकाश व जमीनीच्या समस्त निर्मितीला चांगल्या रीतीने जाणतो आणि जेथपावेतो पैगंबरांचा संबंध आहे. त्याने एक पैगंबराला जर एका दृष्टीने श्रेष्ठत्व बहाल केले आहे तर दुसऱ्याला दुसऱ्या दृष्टीने. उदाहरणार्थ हजरत दाऊद यांना हे श्रेष्ठत्व प्रदान केले की त्यांना 'जबूर' सारखा ईश-ग्रंथ प्रदान केला. जो आपल्या माधुर्य व प्रभावा बाबतीत कुरआनाशी एकरुपता बाळगत होता. यास्तव ज्या पैगंबरास जे श्रेष्ठत्व सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रदान केले होते, त्याला मान्य करा आणि एखाद्याच्या श्रेष्ठत्वात ना अतिशयोक्ति करा, ना एखाद्याचा दर्जा कमी करा.

याच प्रकारची एक अनावश्यक चर्चा ती होय जी खुलफाए राशेदीन (खलीफांच्या) संबंधाने प्रचलीत झाली की या उम्मत (संप्रदायात) सर्वात श्रेष्ठ दर्जा हजरत अबू बकर यांचा आहे कि हजरत अलींचा. मग विवादाच्या प्रत्येक गटाने यास आपापल्या श्रेद्धेचा प्रश्न बनविला.वस्तुत: त्यांचा दर्जा निश्चित करण्याची जबाबदारी आम्हावर सोपविली गेली नाही. अल्लाहच अधिक चांगले जाणतो की कोण कोणत्या दर्जास पात्र आहे व त्याच्या जवळ एखाद्याला कोणते स्थान लाभेल? मग आम्हाला अशा गोष्टींना वादविवादाचा विषय बनविणायाची गरज काय?

५६. सांगा, बोलावून पहा त्यांना, ज्यांना तुम्ही अल्लाह खेरीज ईश्वर समजून घेतले आहे. ते ना तुमचा कसला त्रास दूर करू शकतात, ना तुमची स्थिती बदलू शकतात.[७०]

قُلِ ادْعُوا الَّذِينَ زَعَمْتُمْ مِنْ دُونِهِ فَلَا يَمْلِكُونَ
كَشْفَ الضُّرِّ عَنْكُمْ وَلَا تَحْوِيلًا ٥٦

५७. ज्यांना हे लोक पुकारतात ते स्वत:आपल्या पालनकर्त्याचे सान्निध्य शोधत असतात की कोण सर्वाधिक निकटस्थ बनतो ते.त्याच्या कृपेची आशा बाळगतात व त्याच्या शिक्षेचे भय बाळगतात.[७१] नि:संशय तुमच्या पालनकर्त्याची शिक्षा आहेच भय बाळगावी अशी.

أُولَٰئِكَ الَّذِينَ يَدْعُونَ يَبْتَغُونَ إِلَىٰ رَبِّهِمُ الْوَسِيلَةَ أَيُّهُمْ أَقْرَبُ
وَيَرْجُونَ رَحْمَتَهُ وَيَخَافُونَ عَذَابَهُ ۚ إِنَّ عَذَابَ رَبِّكَ
كَانَ مَحْذُورًا ٥٧

५८. आणि अशी कोणतीहि वस्ती नाही, जिला आम्ही कियामती पूर्वी नष्ट करणार नाही वा सक्त शिक्षा-यातना देणार नाही. ही गोष्ट ग्रंथात लिहिली गेली आहे.[७२]

وَإِنْ مِنْ قَرْيَةٍ إِلَّا نَحْنُ مُهْلِكُوهَا قَبْلَ يَوْمِ الْقِيَامَةِ
أَوْ مُعَذِّبُوهَا عَذَابًا شَدِيدًا ۚ كَانَ ذَٰلِكَ فِي الْكِتَابِ مَسْطُورًا ٥٨

५९. आणि आमच्यासाठी निशाण्या पाठविण्यात कोणतीहि गोष्ट आड येत नाही. मात्र हे की पूर्वीच्या लोकांनी त्यांना खोट्या ठरविल्या होत्या.[७३] समूदला आम्ही सांडणी दिली की एक उघड निशाणी होती. परंतु त्यांनी तिच्यावर अत्याचार केला.[७४] आणि निशाण्या तर अम्ही एवढ्या साठीच पाठवितो की (लोकांना त्या द्वारे) भय दाखवावे.[७५]

وَمَا مَنَعَنَا أَنْ نُرْسِلَ بِالْآيَاتِ إِلَّا أَنْ كَذَّبَ بِهَا الْأَوَّلُونَ ۚ
وَآتَيْنَا ثَمُودَ النَّاقَةَ مُبْصِرَةً فَظَلَمُوا بِهَا ۚ
وَمَا نُرْسِلُ بِالْآيَاتِ إِلَّا تَخْوِيفًا ٥٩

६०. आणि जेव्हा आम्ही तुम्हाला म्हटले होते की तुमच्या पालनकर्त्याने लोकांना घेरलेले आहे.[७६] आणि तो साक्षात्कार जो आम्ही तुम्हाला घडविले, लोकांकरिता कसोटी म्हणून ठरविला.[७७] तसेच त्या झाडालाहि ज्याला क़ुरआनात शापित केले गेले आहे.[७८] आम्ही त्यांना भय दाखवितो. परंतु त्याने त्यांच्या बंडखोर वृत्तीत भरच पडत आहे.

وَإِذْ قُلْنَا لَكَ إِنَّ رَبَّكَ أَحَاطَ بِالنَّاسِ ۚ وَمَا جَعَلْنَا الرُّؤْيَا الَّتِي أَرَيْنَاكَ
إِلَّا فِتْنَةً لِلنَّاسِ وَالشَّجَرَةَ الْمَلْعُونَةَ فِي الْقُرْآنِ ۚ وَنُخَوِّفُهُمْ فَمَا يَزِيدُهُمْ
إِلَّا طُغْيَانًا كَبِيرًا ٦٠

६१. आणि जेव्हा आम्ही फिरिशत्यांना म्हटले की आदमला सजदा करा तर त्यांनी सजदा केला.[७९] परंतु इब्लीस (सैताना) ने केला नाही.[८०]तो म्हणाला काय मी त्याला सजदा करू ज्यास तू माती द्वारे निर्माण केले आहे.[८१]

وَإِذْ قُلْنَا لِلْمَلَائِكَةِ اسْجُدُوا لِآدَمَ فَسَجَدُوا إِلَّا إِبْلِيسَ قَالَ
أَأَسْجُدُ لِمَنْ خَلَقْتَ طِينًا ٦١

७०. म्हणजे तुम्ही या चुकीच्या भ्रमात आहात की अल्लाह खेरीज आणखीहि गरज भागविणारे आहेत. जर तुम्ही बुद्धि व भानाने काम घेऊ इच्छित नाही व या चुकीच्या भ्रमातच ग्रस्त होऊन राहू इच्छितात तर भलेच रहा व त्यांना पुकारण्याची हौसहि पूर्ण करा. परंतु वस्तुस्थिती अशी की ना ते तुमचा एखादा त्रास दूर करण्याचा अधिकार बाळगतात ना तुमच्या वाईट परिस्थितीला चांगल्या परिस्थितीत बदलू शकतात.

७१. अभिप्रेत फिरिश्ते होत, मूर्ति नव्हे कारण अल्लाहचे सान्निध्य शोधणे, त्याच्या कृपेची आशा बाळगणे व त्याच्या शिक्षेला भिणे. मूर्तिंची नव्हे तर फिरिश्त्यांचीच गूण वैशिष्ट्ये असू शकतात. आणि वर आयत क्र. ४० मध्येहि हा मजकूर येऊन गेला की अनेकेश्वरवादी फिरिश्त्यांना अल्लाहच्या मूली म्हणत. फिरिश्त्या संबंधी त्याच्या ह्याच चुकीच्या श्रद्धेचे खंडन करीत फर्माविले जात आहे की तुम्ही फिरिश्त्यांना ईश्वराच्या कामात हस्तक्षेप करणारे समजून गजरपूर्ति व संकट निवारणाकरिता पुकारतात. परंतु त्यांची स्वत:ची ही दशा आहे की ते स्वत:आपल्या पालन कर्त्याचे सान्निध्य शोधतात की कोण सर्वात जास्त अल्लाहच्या निकट होतो ते. जेथे त्याच्या कृपेचे अभिलाषी आहेत तिथे त्याच्या शिक्षेचे भय देखील बाळगतात. तेव्हा अल्लाहच्या जागी त्यांना पुकारण्याचा काय अर्थ?

हा तर होता अनेकेश्वरवाद्यांचा फिरिशत्यांबरोबरचा मामला. परंतु शिर्क त्यांच्याच पर्यंत मर्यादित नाही. आजच्या काळतील मुसलमानांचा एक मोठा समूह आपल्या पैगंबर, औलीया व पीरां सोबत असा मामला करतो जो ईश्वराशीच केला गेला पाहिजे. त्यांनी माध्यम व वाशिल्याचे एक तत्वज्ञान शोधून काढले आहे; व त्या आधारावर मदतीसाठी कधी पैगंबराना पुकारतात तर कधी आपल्या मनाने रचलेल्या 'गौस'ला कधी आपल्या स्वरचित मुशकिल कुशा (संकट निवारका) ला आर्जव करतात, तर कधी आपणच दिलेली पदवी ''गरीब नवाज़'' कडून नवस मागतात. त्यांना मार्गदर्शन करणारे विद्वान या आयतीचे व या सारख्या अन्य आयतींचे अशा प्रकारे स्पष्टीकरण करतात की या सर्व शिर्कच्या (अनेकेश्वरवादी) रीती रिवाजानंतरहि त्यांच्या तौहीद (एकेश्वरवादी) श्रद्धेवर आच येत नाही. त्यांनी जर मोकळ्या मनाने क़ुरआनाचा अभ्यास केला तर त्यांना मार्गदर्शन लाभेल.

७२.अभिप्रेत अनेकेश्वरवादी, काफीर व विद्रोही लोकांच्या वस्त्या होत. यास्वत वर आयत क्र. १६ मध्येहि यास मिळती जुळती गोष्ट निवेदिली गेली आहे. येथे अल्लाहच्या या नियमाचे वर्णन फर्माविले आहे की अशा प्रत्येक वस्ती करिता जी श्रद्धा व कर्माच्या या उपद्रवात गुरफटलेली असेल व त्यापासून परावृत्त होण्यास तयार नसेल तर अल्लाहचा फैसला हा आहे की तिला या जगात एक तर पूर्णत:विनाशाला तोंड द्यावायाचे आहे की ती नावालाहि उरता कामा नये किंवा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात सक्त शिक्षेची गोडी चाखवायची आहे. सवड कितीहि दीर्घ का असेना, तथापि कियामती पूर्वी दोघांपैकी एक गोष्ट निश्चित घडून येईल.

इतिहास याच्या सत्यतेची ग्वाही देतो आणि आजच्या काळात तर अशा घटना मोठ्या प्रमाणात होत आहेत. उदाहरणार्थ भूकंपाने मोठमोठ्या वस्त्या उध्वस्त होत आहेत आणि ईश-प्रकोप मानव-रोगाच्या स्वरुपात मोठमोठ्या शहरांवर अवतरित होऊन त्यांना आपल्या वाईट कर्माची गोडी चाखवीत आहे.

स्पष्ट असावे की वस्त्यांवर अल्लाहची ही शिक्षा सार्वत्रिक बिघाडामुळे अवतरीत होते. अशा वेळी जे सदाचारी लोक त्या वस्तीत राहत असतील व तेहि या शिक्षेच्या तावडीत सापडतील तर वास्तविक ही शिक्षा त्यांच्या हक्कात शिक्षा नसते आणि कियामतीच्या दिवशी त्यांच्या कर्मास पाहून त्यांच्याशी मामला केला जाईल.

हे हि स्पष्ट असावे की ही शिक्षा त्या शिक्षेहून भिन्न असते जी एखाद्या पैगंबरास खोटे ठरविल्याबद्दल त्याच्या जन समूहावर पैगंबरांच्या सत्यतेचे प्रमाण बनून अवतरते. यात कुफ्र व ईमानचा सरळ फैसला असतो म्हणून पैगंबर व ईमान बाळगणाऱ्यांना शिक्षा अवतरीत केल्या जाणाऱ्या वस्तीतून आधीच बाहेर काढले जाते.

७३. येथे निशाण्यांशी अभिप्रेत अनुभूत ईश-चमत्कार होत.

७४. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. ११९ मध्ये केले गेले आहे.

७५. म्हणजे ईश-चमत्कार म्हणून ज्या गोष्टी पाठविल्या जातात त्या केवळ नवल दाखविण्या साठीच पाठविल्या जात नाही तर त्यांना पाठविण्याचा हेतु ईश-शिक्षेचे भय दाखविणे हा असतो की या स्पष्ट निशाणीला पाहूनहि जर तुम्ही ईमान बाळगले नाही तर समजून घ्या अल्लाहची शिक्षा तुमच्या शिरावर येऊन ठेपली आहे.

७६. संकेत सूरह बरुजच्या ह्या अयतीकडे आहे-

بَلِ الَّذِينَ كَفَرُوا فِي تَكْذِيبٍ وَاللَّهُ مِن وَرَائِهِم مُّحِيطٌ -

''परंतु हे काफिर खोटे ठरविण्यातच लागलेले आहेत आणि अल्लाहने त्यांना पुढून मागून घेरलेले आहे.''

अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाह आधीच हे स्पष्ट करून चुकला आहे की लोक पैगंबर व क़ुरआनाला खोटे ठरविण्याकरीता कसली न कसली हरकत घेत राहतील परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने यांना पूर्णपणे आपल्या वेढ्यात घेतलेले आहे म्हणून अपल्या इराद्यांमध्ये ते सफल होऊ शकणार नाहीत आणि क़ुरआन व

पैगंबराच्या संबंधाने त्याची जी योजना आहे ती पूर्ण होईल.

७७. मूळ ग्रंथात 'अर-रुअया' हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा शाब्दिक अर्थ निद्रावस्थेत पाहणे असाहि आहे व जागृतावस्थेत डोळ्यांनी पाहणे असाहि आहे (पहा, लिसानुल, अरब खंड-१४ पृष्ठ २९७)

आणि बुखारी मध्ये हजरत इब्ने अब्बास द्वारे याचे हे भाष्य उल्लिखित आहे की-

هی رُؤیا عین اُریها رسول الله ﷺ لیلة اُسرِیَ بِه۔ (بخاری کتاب التفسیر)

'' हे स्वत:च्या डोळ्यांनी केलेले अवलोकन होते जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना इसराच्या रात्री करविले गेले.'' (बुखारी, किताबुत्तफसीर)

म्हणून याशी अभिप्रेत आपल्याच डोळ्यानी केलेले निरीक्षण होय जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अक्सा मस्जिदी पर्यंतच्या यात्रे प्रसंगी करविले गेले आणि याला 'रुअया' या अर्थाने अशासाठी घेतले गेले की बैतुल मक्दिस चा हा प्रवास अत्यंत असामान्य कैफयती निशी झाला होता ज्याची कल्पना जर मनुष्य करु शकतो तर ती स्वप्नाद्वारेच करु शकतो. परंतु हे सत्य मुळीच नव्हते. असे असते तर ना या इतमामाने त्याचा उल्लेख करण्याची गरज राहिली असती, ना कुरेश जन समूहाने पैगंबराना खोटे ठरविले असते आणि ना लोकांसाठी हे कसोटीचे कारण बनले असते. कसोटी तर लोकांची या स्थितीत होऊ शकते जेव्हा या प्रवासाला शरीरासह केलेला प्रवास व याच्या निरीक्षणास जागृतावस्थेत केले गेलेले निरीक्षण ठरविले जावे, जसे की क़ुरआनात वर्णिले गेले आहे.

७८. आभिप्रेत जक्कूमचे झाड होय ज्याचा उल्लेख क़ुरआनात सूरह साफ्फात (आयत ६३ ते ६६) मध्ये केला गेला आहे. हे मलिन झाड जहन्नम मध्ये असेल आणि जहन्नमी लोक त्याच्यानेच पोट भरतील. तात्पर्य हे झाड निर्भत्सनेचे निशाण असेल म्हणून त्याला शापित म्हटले गेले आहे. क़ुरआनाच्या या खबरीला इन्कार करणाऱ्यांनी थट्टामस्करी बनविले व म्हणू लागले की आगीतहि झाड उगतील ! वस्तुत: हे आखिरत-विश्वा संबंधीचे निवेदन आहे ज्याचे स्थळ काळ इहलोकाच्या स्थळ काळाहून अगदी भिन्न असेल जर सर्वश्रेष्ठ अल्लाहने जक्कूमच्या झाडाला आगीपासून सुरक्षित (Fire Proof ) बनविले असेल तर यात नवल कसले?

७९. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र ४७ मध्ये केले गेले आहे.

८०. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ४८ मध्ये केले गेले आहे.

८१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १६

नि:संशय माझ्या दासांवर तुझा काही जोर चालणार नाही आणि तुमचा स्वामी कार्य बनविण्यासाठी पुरेसा आहे.तुमचा रब्ब (पालनकर्ता) तर तो आहे जो तुमच्या साठी समुद्रात नौका चालवितो, जेणेकरुन तुम्ही त्याच्या कृपेचा शोध घ्यावा. नि:संशय तो तुमच्यावर फार मेहेरबान आहे.(अल-क़ुर्आन)

६२. (तसेच) तो म्हणाला. काय हाच तुझा निर्णय झाला की तू याला मजवर श्रेष्ठत्व प्रदान केले.[८२] जर तू मला कियामतीच्या दिवसा पावेतो सवड दिली तर मी याच्या संपूर्ण वंशाचा मूलच्छेद करीन. केवळ थोडेच लोक या पासून वाचू शकतील.[८३]

قَالَ أَرَءَيْتَكَ هَٰذَا ٱلَّذِى كَرَّمْتَ عَلَىَّ لَئِنْ أَخَّرْتَنِ إِلَىٰ يَوْمِ
ٱلْقِيَٰمَةِ لَأَحْتَنِكَنَّ ذُرِّيَّتَهُۥٓ إِلَّا قَلِيلًا ﴿٦٢﴾

६३. फर्माविले जा यांच्यापैकी जे जे तुझ्या मागे चालतील तर जहन्नमच (अग्नीच) तुम्हा सर्वांकरिता पूरेपूर शिक्षा आहे.[८४]

قَالَ ٱذْهَبْ فَمَن تَبِعَكَ مِنْهُمْ فَإِنَّ جَهَنَّمَ جَزَآؤُكُمْ
جَزَآءً مَّوْفُورًا ﴿٦٣﴾

६४. तू यांच्यापैकी ज्याला ज्याला आपल्या हाकेने बहकवू शकतो.बहकव [८५] त्यांच्यावर आपल्या सवार व प्यादे यांच्या द्वारे हल्ला कर,[८६] धन व संतती मध्ये त्यांचा सहभागी हो,[८७]त्यांच्याशी वायदे कर आणि सैतान जो वायदा देखील करतो तो एक धोका असण्याखेरीज आणखी काहीच नाही.[८८]

وَٱسْتَفْزِزْ مَنِ ٱسْتَطَعْتَ مِنْهُم بِصَوْتِكَ
وَأَجْلِبْ عَلَيْهِم بِخَيْلِكَ وَرَجِلِكَ وَشَارِكْهُمْ فِى ٱلْأَمْوَٰلِ
وَٱلْأَوْلَٰدِ وَعِدْهُمْ ۚ وَمَا يَعِدُهُمُ ٱلشَّيْطَٰنُ إِلَّا غُرُورًا ﴿٦٤﴾

६५. नि:संशय माझ्या दासांवर तुझा काही जोर चालणार नाही.[८९]आणि तुमचा स्वामी कार्य बनविण्यासाठी पुरेसा आहे.[९०]

إِنَّ عِبَادِى لَيْسَ لَكَ عَلَيْهِمْ سُلْطَٰنٌ ۚ وَكَفَىٰ بِرَبِّكَ وَكِيلًا ﴿٦٥﴾

६६. तुमचा रब्ब (पालनकर्ता) तर तो आहे जो तुमच्या साठी समुद्रात नौका चालवितो, जेणेकरुन तुम्ही त्याच्या कृपेचा शोध घ्यावा.[९१]नि:संशय तो तुमच्यावर फार मेहेरबान आहे.

رَّبُّكُمُ ٱلَّذِى يُزْجِى لَكُمُ ٱلْفُلْكَ فِى ٱلْبَحْرِ لِتَبْتَغُوا۟ مِن فَضْلِهِۦٓ ۚ
إِنَّهُۥ كَانَ بِكُمْ رَحِيمًا ﴿٦٦﴾

६७. जेव्हा समुद्रात तुम्हाला संकट येऊन गाठते तर या एका खेरीज ज्यांना ज्यांना तुम्ही पुकारता, सर्व अदृश्य होतात [९२]मग जेव्हा तो तुम्हाला वाचवून जमीनीवर पोहचवितो तेव्हा तुम्ही त्याच्याकडून तोंड फिरवितात,मनुष्य मोठा कृतघ्न आहे.

وَإِذَا مَسَّكُمُ ٱلضُّرُّ فِى ٱلْبَحْرِ ضَلَّ مَن تَدْعُونَ إِلَّآ إِيَّاهُ ۖ
فَلَمَّا نَجَّىٰكُمْ إِلَى ٱلْبَرِّ أَعْرَضْتُمْ ۚ وَكَانَ
ٱلْإِنسَٰنُ كَفُورًا ﴿٦٧﴾

६८. मग काय तुम्ही या गोष्टी पासून निर्धास्त झाला आहात की तो खुश्कीच्या एखाद्या हिश्श्यात तुम्हाला धसवून देईल किंवा तुमच्यावर दगडांचा वर्षाव करणारे वादळ पाठवील. मग तुम्हाला स्वत:साठी कोणी सहाय्यक न आढळेल.[९३]

أَفَأَمِنتُمْ أَن يَخْسِفَ بِكُمْ جَانِبَ ٱلْبَرِّ أَوْ يُرْسِلَ
عَلَيْكُمْ حَاصِبًا ثُمَّ لَا تَجِدُوا۟ لَكُمْ وَكِيلًا ﴿٦٨﴾

८२. इब्लीस (सैताना) चा हा आक्षेप सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या निर्णयाबद्दल होता, ज्यानुसार आद्यमानव हजरत आदम यांना जमीनीवर खलीफा (सत्ताधारी) बनविले गेले व त्याला हा मान बहाल केला गेला की त्याच्यापुढे फिरिश्त्यांनी व इब्लीसने सजदा करावा हा अक्षेप घेण्यांचा इब्लीस ला ना हक्क होता व ना तो योग्य असू शकत होता. सर्वश्रेष्ठ अल्लाहला अधिकार आहे की तो आपल्या ज्या निर्मितेस जो दर्जा इच्छिल प्रदान करील, यावर आक्षेप घेण्याचा कोणाला कसलाही हक्क नाही. मग अल्लाह ज्याअर्थी ज्ञानी व बुद्धिकौशल्यावर बाळगणारा आहे म्हणून त्याचे निर्णय ज्ञान व बुद्धिकौशल्यावर आधारीत असतात. आता जर हे बुद्धिकौशल्य इब्लीसच्या ध्यानी आले नव्हते किंवा अल्लाहच्या मर्जीचे प्रयोजन तो समजू शकला नव्हता तर कोणत्या प्रकारे उचित ठरु शकत होते की अल्लाहच्या निर्णयालाच चुकीचा ठरविला जावा.

८३. सैतानला कळून चुकले की भावना व इच्छा अभिलाषा बागणाऱ्या मानवाला जेव्हा लाभ व स्वादांनी युक्त अशा जगाच्या आकर्षक वातावरणात कसोटीसाठी उभे केले जाईल तेव्हा त्याला सहजगत्या बहकविले जाऊ शकेल म्हणून दाव्याने तो म्हणाला की मला जर कियामती पावेतो सवड दिली गेली तर मी आदमच्या संपूर्ण वंशाला त्याच्या खऱ्या जीवन ध्येयापासून गाफील करुन चुकीच्या मार्गाला लावीन. परंतु अपवाद म्हणून फार थोडेच लोक असे असतील जे माझ्या कारस्थानला बळी पडणार नाहीत.

८४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. २२.

८५. सैतानाची हाक म्हणजे त्याचे पुकारणे व आवाहन होय मार्गभ्रष्टता व अपराधांकडे ज्यासाठी तो मनात वाईट विचारांचा उद्रेक करतो.आजच्या काळात प्रसारण साधनांच्या प्रगतीने सैतानाला ही सवलत पुरवली आहे रेडीओ,टेलीव्हीजन व वृत्तपत्रांद्वारे त्याचे आवाहन जगाच्या कोना कोपऱ्या पर्यंत जाऊन पोहचत आहे आणि दिवसेदिवस त्याचा गोंगाट वाडतच चालला आहे.

८६. अभिप्रेत सैतानाची अपत्ये व त्याचे शिष्य होत. ते माणसाला बहकविण्यासाठी अगदी सैन्यासारखा हल्ला चढवितात. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. २१)

८७. धनसम्पत्तित सैतानाच्या सहभागी होण्याचा अर्थ असा की माणसाने हरामच्या मार्गाने अर्थोपार्जन करावे व हरामच्याच मार्गाने खर्च करावा-अल्लाह खेरीजच्या उपास्यांसाठी नवस नजराणे, खोट्या उद्दिष्टांसाठी सम्पत्तिची उधळपट्टी, वाईट कृत्यांच्या विकासा साठी आर्थिक साधनांचे पाटबळ देणे इत्यादि गोष्टी सैतानी गरजा पूर्ण करण्याची व त्याला आपल्या सम्पत्तित सहभागी करुन घेण्याची उदाहरणे होत.

संततीत सैतानाच्या सहभागी होण्याचा अर्थ असा की माणसाने सैतानाच्या इशाऱ्यावर आपल्या मुलांना एखाद्या देवी, देवता किंवा बुजूर्ग वा वली चे दान ठरविणे अथवा त्यांना मुशिरक (अनेकेश्वरवादी) व काफीर बनविणे किंवा त्यांना चुकीचे संगोपन देऊन कुमार्गाला लावणे.

८८. याचे स्पष्टीकरण सूरह इब्राहीम टीप क्र.३९ मध्ये केले गेले आहे.

८९. याचे स्पष्टीकरण सूरह हिज्र टीप क्र. ३९ मध्ये केले गेले आहे.

९०. म्हणजे ते अल्लाह वर भरवसा करतील आणि अल्लाह त्यांचे कार्य तडीस नेण्यास पुरेसा ठरेल.

९१. अभिप्रेत हलाल उपजिविका होय.

९२. हा या गोष्टीचा पुरावा होय की मनुष्य स्वभाव एकाच ईश्वराशी परिचित आहे. अन्यथा वादळाच्या भंयकर संकटात सापडल्यावर एकाच ईश्वराची आठवण यायला काय कारण असू शकते.

९३. म्हणजे समुद्री वादळाच्या संकटातून सुटका झाल्यानंतर जेव्हा तुम्ही सही सलामत जमीनीवर येऊन पोहचता तेव्हा पुन्हा आपल्या अनेकेश्वरवादी वर्तनाकडे वळतात व कोरड्या जमीनीवर कसलेहि भय जाणवत नाही. वस्तुत:संकट तिथेहि असते. एखाद्या वेळेस भूकंप येऊ शकतो आणि जमीन धसल्यामुळे तुम्ही तिच्यात गाडले जाऊ शकतात. किंवा दगड वर्षविणारा झंझावात वाहू शकतो व तुम्ही त्या वादळाच्या संकटात सापडू शकता. या प्रकारची कोणतीहि आपत्ति सर्वश्रेष्ठ अल्लाहने पाठविल्यास असा कोण आहे जो तुम्हाला यापासून वाचवील?

६९. अथवा या गोष्टी पासून तुम्ही निर्भय झाला आहात की तो तुम्हाला दुसऱ्यांदा त्यात (समुद्रात) नेईल व तुमच्यावर हवेचे भयंकर वादळ पाठवील आणि तुमच्या कृतघ्नतेमुळे तुम्हाला पाण्यात बुडवील. मग तुम्हाला असा कोणी न आढळेल जो आम्हाला विचार पूस करू शकले.[९४]

أَمْ أَمِنتُمْ أَن يُعِيدَكُمْ فِيهِ تَارَةً أُخْرَىٰ
فَيُرْسِلَ عَلَيْكُمْ قَاصِفًا مِّنَ الرِّيحِ فَيُغْرِقَكُم بِمَا كَفَرْتُمْ
ثُمَّ لَا تَجِدُوا لَكُمْ عَلَيْنَا بِهِ تَبِيعًا ﴿٦٩﴾

७०. आम्ही आदमच्या संततीला मान बहाल केला [९५] आणि त्याला जमीनीवर व पाण्यावर वाहन प्रदान केले [९६] आणि स्वच्छ, शुद्ध वस्तूंपासून उपजिविका दिली.[९७] व आपल्या अनेक निर्मितीवर त्याला श्रेष्ठत्व बहाल केले. परिपूर्ण श्रेष्ठत्व.[९८]

وَلَقَدْ كَرَّمْنَا بَنِي آدَمَ وَحَمَلْنَاهُمْ فِي الْبَرِّ وَالْبَحْرِ وَرَزَقْنَاهُم مِّنَ
الطَّيِّبَاتِ وَفَضَّلْنَاهُمْ عَلَىٰ كَثِيرٍ مِّمَّنْ خَلَقْنَا تَفْضِيلًا ﴿٧٠﴾

७१. ज्या दिवशी आम्ही प्रत्येक मनुष्य-समुदायास त्याच्या नेत्यासह बोलावू [९९] तेव्हा ज्यांना त्यांचा कर्म-लेख उजव्या हातात दिला जाईल [१००] ते आपला कर्म-लेख वाचतील [१०१] व त्यांच्याशी किंचितहि अन्याय होणार नाही.

يَوْمَ نَدْعُو كُلَّ أُنَاسٍ بِإِمَامِهِمْ فَمَنْ أُوتِيَ كِتَابَهُ بِيَمِينِهِ
فَأُولَٰئِكَ يَقْرَءُونَ كِتَابَهُمْ وَلَا يُظْلَمُونَ فَتِيلًا ﴿٧١﴾

७२. आणि जो या जगात आंधळा बनून राहिला तो आखिरत मध्येहि आंधळाच राहील [१०२] व मार्गापासून अगदी भटकलेला.

وَمَن كَانَ فِي هَٰذِهِ أَعْمَىٰ
فَهُوَ فِي الْآخِرَةِ أَعْمَىٰ وَأَضَلُّ سَبِيلًا ﴿٧٢﴾

७३. हे लोक या गोष्टीच्या पाठीशी होत की तुम्हाला उपद्रव-ग्रस्त करुन या (वाणी) पासून फिरवावे जी आम्ही तुमच्यावर 'वही' केली आहे. अशा साठी की तुम्ही अन्य एखादी गोष्ट आमच्या नावाने रचून सादर करावी व या स्थितीत त्यांनी तुम्हाला आपला मित्र बनवावे.[१०३]

وَإِن كَادُوا لَيَفْتِنُونَكَ عَنِ الَّذِي أَوْحَيْنَا إِلَيْكَ
لِتَفْتَرِيَ عَلَيْنَا غَيْرَهُ وَإِذًا لَّاتَّخَذُوكَ خَلِيلًا ﴿٧٣﴾

७४. आणि जर आम्ही तुमचे पाय रोवले नसते तर नवल नव्हते की तुम्ही यांच्याकडे काही न काही प्रमाणात झुकले असते.[१०४]

وَلَوْلَا أَن ثَبَّتْنَاكَ لَقَدْ كِدتَّ تَرْكَنُ إِلَيْهِمْ شَيْئًا قَلِيلًا ﴿٧٤﴾

७५. अशा स्थितीत आम्ही तुम्हाला जीवनाचीहि दुहेरी शिक्षा चाखवली असती व मरणाचीहि दुहेरी शिक्षा. मग तुम्हाला आमच्या विरोधात कोणीहि सहाय्यक आढळला नसता.[१०५]

إِذًا لَّأَذَقْنَاكَ ضِعْفَ الْحَيَاةِ وَضِعْفَ الْمَمَاتِ ثُمَّ لَا تَجِدُ لَكَ
عَلَيْنَا نَصِيرًا ﴿٧٥﴾

९४. म्हणजे हे हि शक्य आहे की त्याने अशी उपाय योजना करावी की तुम्ही पुनश्च समुद्र-यात्रेकरीता विवश व्हावे व तेथे त्याने पुन्हा सोसाट्याचे वादळ पाठवून तुम्हाला पाण्यात बुडवावे; व तुम्हाला आपल्या कृतघ्न पणाची गोडी चाखवावी. अशा स्थितीत कोण आहे जो ईश्वराच्या विरोधात तुमचा समर्थक बनून उभा राहील व त्याला जाब विचारेल की त्याने तुम्हाला पाण्यात का बुडविले?

९५. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाला मान-सन्मान दिला. जन्मत:मनुष्य गुन्हेगार किंवा अपमानित निर्मिती नाही व ना त्याला जनावरांच्या पातळीवर ठेवणे योग्य आहे, ना त्याचा एखादा जाति प्रकार किंवा एखादा वंश किंवा एखादा वर्ग मूलभूत दृष्ट्या खालावलेल्या दर्जाचा आहे, किंबहुना प्रत्येक मनुष्य मग तो पुरुष असो वा स्त्री आणि कोणत्याहि वर्ग, रंग, वंश वा गटाशी संबंधित असो. मानव जातीचा एक सद्स्य या नात्याने प्रतिष्ठित व सन्माननीय आहे.

जातीभेद, अस्पृश्यता, रंग व वंशाचे विशेषत्व आणि स्त्रीया अपमानित असण्याची कल्पना या सर्व अशा गोष्टी होत ज्या माणसाच्या जन्मजात पदा विरूद्ध आहेत आणि इस्लाम या गोष्टींना मिटवू इच्छितो.

९६. हा अल्लाहने प्रदान केलेला केवढा मोठा मान आहे की त्याच्या सेवे करीता जमीनीवरहि वाहन हजर आहे व समुद्रातहि वाहन उपलब्ध आहे आणि आता आणखी एका देणगीची भर पडली आहे. ती म्हणजे हवेत उड्डाण घेण्याकरिता देखील वाहन उपलब्ध आहे. जर अल्लाहने माणसाला जनावरांवर सवार होण्याची व अन्य प्रकारची वाहने शोधून काढण्याची पात्रता बहाल केली नसती तर काय तो उच्च स्थान प्राप्त करु शकला असता?

९७. पशू चारा,वैरण व कृमी किटक खातात, परंतु माणसाला सर्वश्रेष्ठ अल्लाहने खाण्यापिण्या बाबत उच्च अभिरुची प्रदान केली व या अभिरुचीच्या पूर्तते करिता जमीनीवर अनेक प्रकारच्या स्वच्छ-शुद्ध वस्तूंचे भोज-पत्र मांडले आहे.

९८. 'तफजीला'चा अर्थ परिपूर्ण श्रेष्ठत्व होय. ही आयत हे स्पष्ट करते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाला आपल्या अनेक निर्मितीवर पूरेपूर श्रेष्ठत्व बहाल केले. जेथ पावेतो जमीनीच्या निर्मितीचा संबंध आहे, ही एक स्पष्ट हकीगत आहे की मनुष्य सर्वश्रेष्ठ ईश-निर्मिती होय. तथापि आकाशातील निर्मितीपैकी एखादी निर्मिती अशीहि असू शकते जी काही दृष्ट्या माणसावर श्रेष्ठत्व बाळगणारी असावी. यास्तव फिरिश्ते काही दृष्टीने माणसाहून श्रेष्ठ आहेत. परंतु काही इतर पैलू लक्षात घेता माणसाला हे श्रेष्ठत्व दिले गेले आहे की तो फिरिश्त्यां द्वारे सजदा केला गेलेला ठरला.

तात्पर्य मनुष्य आणि फिरिश्त्यांच्या दरम्यान श्रेष्ठत्वाचा मामला पूरेपूर श्रेष्ठत्वाचा नव्हे तर काही पैलूनी आहे. आणि हे श्रेष्ठत्व माणसाचे प्रतिनिधितत्व, त्याची सामर्थ्ये व पात्रता व त्याच्या नेतृत्व पदावर आरुढ होण्याच्या दृष्टीने आहे. त्याचे खरेखुरे स्थान व दर्जा तर कियामतीच्या दिवशीच जाहीर होईल. जेव्हा माणसाचे प्रयत्न व कर्म-फळ उदयास येईल. यास्तव या विवादात खोलवर जाण्याची गरज नाही की मनुष्य श्रेष्ठ आहे कि फिरिश्ते. किंबहुना या गोष्टीची काळजी करावयास हवी की जे श्रेष्ठत्व सर्वश्रेष्ठ अल्लाहने आम्हाला बहाल केले आहे त्याला पाय असणे आम्ही कितपत सिद्ध करतो अन्यथा अपात्रता व कृतधनतेच्या परिणामी सर्वात निकृष्ट दर्जाच्या अधोगतीला पोहचू शकतो.

९९. अर्थात श्रद्धा व कर्माच्या मामल्यात ज्या माणसाने ज्याला आपला प्रमुख वा नेता बनविले होते त्याला त्याच्या सोबत हजर व्हावे लागेल प्रामाणिक मोमीन (ईमान बाळगणारे) पैगंबरांच्या नेतृत्वात एकच असतील की त्यानी पैगंबराना आपला इमाम मानून त्यांचे सचोटीने अनुसरण केले होते. या उलट अनेकेश्वरवादी व काफीर आपल्या मार्गभ्रष्ट नेत्यांसोबत आणि असत्य धर्माचे अनुयायी त्या त्या धर्माच्या मार्ग भ्रष्ट करणाऱ्या संस्थापकांसह हजर होतील.

१००. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह इन्शिकाक टीप क्र. ७

१०१. म्हणजे ते आनंदाने आपला कर्म-लेख वाचतील. कारण कर्मलेख उजव्या हातात दिला जाणे सफलतेचे लक्षण असेल.

१०२. म्हणजे जगात तो अल्लाहच्या निशाण्या पहात राहिला तरीहि आंधळा बनून राहिला. म्हणून त्याचे हे फळ असेल की तो आखिरत मध्ये आंधळाच राहिल. पुढे आयत क्र. ९७ मध्ये या शिक्षेचे अधिक स्पष्टीकरण दिले गेले आहे.

स्पष्ट असावे की कियामतीच्या दिवशी वेगवेगळ्या अवस्था मधून जावे लागेल. एक अवस्था ती असेल ज्यात काफीरांची दृष्टी मोठी तीक्ष्ण असेल. जसे क़ुरआनात या संबंधी निवेदन केले गेले आहे,(ق:٢٢) فَبَصَرُكَ الْيَوْمَ حَدِيْدٌ "तर आज तुझी दृष्टी फार तीक्षण आहे" दृष्टीची ही तीक्ष्णता ईश-शिक्षेच्या अवलोकनासाठी असेल. दुसरी अवस्था अशी असेल ज्यात ते आपल्या खोट्या उपास्यांना पाहून म्हणतील, हे पालनकर्त्या! हे आहेत आम्ही ठरविले सहभागी ! आणि एक अवस्था ती असेल की त्यांना आंधळे, बहीरे व मूके बनवून उलट तोंडी जहन्नमच्या दिशेने हाकलले जाईल (अल्लहा रक्षण करो या शिक्षेपासून)

१०३. यावरून अंदाज होतो की एनेकेश्वरवादी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर क़ुरआनात परिवर्तन करण्यासाठी केवढा दबाव आणत होते. ते इच्छित होते की जर

पैगंबर कुरआनास अगदी सोडून देण्यास तयार नाहीत तर कमीत कमी यात असा काही बदल करावा की ते मूर्ति पूजेच्या अगदी विरुद्ध नसावे. या अटीवर ते पैगंबरांशी समन्वय व मैत्री करण्यास तयार झाले होते.

आजच्या काळातील अनेकेश्वरवादी व काफीरांमध्ये याच विचार सरणीची झळक दिसून येते. ते मुसलमानानां म्हणतात की तुम्ही एकेश्वरवाद अशा प्रकारे सादर करा की अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजा यांचे खंडन न व्हावे व इस्लामला अशा प्रकारे सादर करावे की इतर धर्मांच्या सत्यतेवर आंच न यावी.

१०४. म्हणजे अनेकेश्वरवाद्यांचा दबाव इतका तीव्र होता की पैगंबरांनाहि आपल्या भूमिकेवर अटळ राहणे कठीण होते; परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे पैगंबरांच्या मानाच्या संरक्षणाची जी उपाय योजना होते व त्याने प्रदान केलेली सुबुद्धि यात सहभागी असते. त्याच आधारावर पैगंबर आपल्या स्थानावर पूर्णत: अटळ राहिले.

१०५. ही अंगावर रोमांच उभे करणारी तंबी आहे आणि हेतु अनेकेश्वर वाद्यांवर हे स्पष्ट करणे होय की तुम्ही आमच्या पैगंबराकडून तर ही अपेक्षा बाळगता की त्याने तुमच्या कह्यात येऊन शिर्कच्या मामल्यात काही नरमी दाखवावी आणि जर समजा असे झाले तर हे पैगंबर पदाशी अगदी विसंगत होईल व या कारणास्तव पैगंबर इहलोक व आखिरत दोन्ही ठिकाणी दुहेरी शिक्षेस पात्र ठरेल. या उत्तराने ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की शिर्कच्या मामल्यात पैगंबराकडून कोणत्याहि समझोत्याची अपेक्षा करणे व्यर्थ आहे.

**आणि हे या गोष्टीच्या पाठीशी आहेत की तुमचे पाय या भूमीतून उखडून द्यावेत. जेणेकरून तुम्हाला येथून बाहेर घालवावे परंतु जर त्यांनी असे केले तर तुमच्या नंतर फार थोडेच दिवस थांबू शकतील. (अल-क़ुर्आन)**

७६. आणि हे या गोष्टीच्या पाठीशी आहेत की तुमचे पाय या भूमीतून उखडून द्यावेत. जेणेकरून तुम्हाला येथून बाहेर घालवावे परंतु जर त्यांनी असे केले तर तुमच्या नंतर फार थोडेच दिवस थांबू शकतील.[१०६]

وَإِنْ كَادُوا لَيَسْتَفِزُّونَكَ مِنَ الْأَرْضِ لِيُخْرِجُوكَ
مِنْهَا وَإِذًا لَّا يَلْبَثُونَ خِلٰفَكَ إِلَّا قَلِيلًا ﴿٧٦﴾

७७. तुमच्या पूर्वी आम्ही जे पैगंबर पाठविले होते त्यांच्या बाबतीत आमचा हाच कायदा राहिला आहे आणि आमच्या कायद्यात तुम्हाला कोणतेहि परिवर्तन आढळून येणार नाही. [१०७]

سُنَّةَ مَنْ قَدْ أَرْسَلْنَا قَبْلَكَ مِنْ رُّسُلِنَا
وَلَا تَجِدُ لِسُنَّتِنَا تَحْوِيلًا ﴿٧٧﴾

७८. नमाज़ कायम करा. सूर्याच्या ढळल्या पासून रात्रीच्या काळोखापर्यंत आणि प्रात:कालीन (फज्र) क़ुरआन-पठणाचा इतमाम राखा.कारण प्रात:कालीन क़ुरआन- पठणात मोठी हुजुरी असते.[१०८]

أَقِمِ الصَّلٰوةَ لِدُلُوكِ الشَّمْسِ إِلٰى غَسَقِ الَّيْلِ وَقُرْاٰنَ الْفَجْرِ
إِنَّ قُرْاٰنَ الْفَجْرِ كَانَ مَشْهُودًا ﴿٧٨﴾

७९. आणि रात्री तहज्जुद पढा, ही तुमच्यासाठी अधिक नमाज़ आहे.[१०९] नवल नव्हे की तुमचा पालन कर्ता तुम्हाला अशा स्थानी पोहचवील जे अतिशय प्रशंसनीय आहे.[११०]

وَمِنَ الَّيْلِ فَتَهَجَّدْ بِهِ نَافِلَةً لَّكَ عَسٰى أَنْ يَّبْعَثَكَ
رَبُّكَ مَقَامًا مَّحْمُودًا ﴿٧٩﴾

८०. आणि प्रार्थना करा की हे माझ्या पालन कर्त्या मला (ज्या ठिकाणीहि ) दाखल कर तर सत्यासह दाखल कर व मला (जेथून) बाहेर काढशील तर सत्यासह बाहेर काढ [१११] आणि आपल्या तर्फे असे वर्चस्व प्रदान कर जे मला सहाय्यक ठरेल.[११२]

وَقُلْ رَّبِّ أَدْخِلْنِي مُدْخَلَ صِدْقٍ وَّأَخْرِجْنِي مُخْرَجَ صِدْقٍ
وَّاجْعَلْ لِّي مِنْ لَّدُنْكَ سُلْطٰنًا نَّصِيرًا ﴿٨٠﴾

८१. आणि घोषित करा की सत्य आले व असत्य नष्ट झाले. आणि असत्य आहेच नामशेष होणारे.[११३]

وَقُلْ جَآءَ الْحَقُّ وَزَهَقَ الْبَاطِلُ إِنَّ الْبَاطِلَ كَانَ زَهُوقًا ﴿٨١﴾

८२. आणि आम्ही क़ुरआनाच्या स्वरुपात अशी गोष्ट अवतरीत करीत आहोत, जी ईमान बाळगणाऱ्यां करिता स्वास्थ्य (रोगमुक्ति) हि आहे [११४] व कृपा देखील. [११५] परंतु अत्याचारींकरिता नुकसानात वाढच होत आहे. [११६]

وَنُنَزِّلُ مِنَ الْقُرْاٰنِ مَا هُوَ شِفَآءٌ وَّرَحْمَةٌ لِّلْمُؤْمِنِينَ وَلَا يَزِيدُ
الظّٰلِمِينَ إِلَّا خَسَارًا ﴿٨٢﴾

१०६. म्हणजे मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी अशी परिस्थिती निर्माण केली आहे की हे पैगंबर तुम्ही या भूमीवर राहू न शकावे व स्थलांतर करण्यास विवश व्हावे. जर असे झाले तर या लोकांनी लक्षात ठेवावे की पैगंबरांच्या स्थलांतरानंतर ते अधिक काळ येथे टिकू शकणार नाहीत त्यांच्यावर ईश शिक्षेचा आसूड ओढविल्याविना राहणार नाही.

१०७. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या हा कायदा अपरिवर्तनीय आहे की जेव्हा एखादा जन-समूह आपल्या पैगंबरास वस्ती बाहेर घालवितो तेव्हा पैगंबराच्या स्थलांतरा नंतर त्याचा कर्म-अवधि संपतो व तो शिक्षेच्या तावडीत सापडतो. हा कायदा मक्केच्या अनेकेश्वर वाद्याबाबतहि उदयास आला. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मक्केहून स्थलांतर केल्यानंतर दोन वर्षाच्या अवधितच बद्रची लढाई उद्‌भवली. ज्यात अनेकेश्वराद्यांचे मोठे मोठे नेते मारले गेले व त्या नंतर काही वर्षांच्या आत मक्केतून अनेकेश्वरवाद्यांचा पूरेपूर नायनाट झाला. ही होती शिक्षा जी अल्लाहच्या नियमानुसार त्या लोकांना लाभलीच. ज्यांनी पैगंबराना या भूमीतून बाहेर घालविले होते व शेवट वेळ पर्यंत शिर्क व कुफ्र नितीवर अटळ राहिले.

१०८. सूर्याच्या कलण्याच्या तीन वेळा आहेत. एक वेळ ती जेव्हा सूर्य मध्य आकाशापासून ढळू लागतो, ज्याला माध्यान्ह म्हणतात. माध्यान्हा नंतर जुहरच्या नमाज़ची वेळ सुरु होते, दुसरी वेळ ती जेव्हा कोणत्याहि वस्तूची सावली तिच्या इतकी होते ही 'अस्त्र'च्या नमाजची वेळ होय. तिसरी वेळ अर्थात सूर्यास्ताची वेळ होय. ही वेळ मगरीबच्या नमाज़ची वेळ आहे.

रात्रीच्या अंधाराशी अभिप्रेत ती वेळ होय. जी क्षितीजावरील लालीमा नाहीसा होताच सुरु होते. ही वेळ 'ईशा'च्या नमाज़ची वेळ होय. आणि प्रात:काळशी अभिप्रेत पहाटेची वेळ होय. या वेळी 'फज्र'ची नमाज़ अदा केली जाते. अशा प्रकारे दिवस व रात्र मिळून पाच वेळा नमाज़ अदा केली जाते, जी प्रत्येक मुसलमाना करिता अनिवार्य धर्म-कर्तव्य आहे. या वेळां संबंधीचे विवरण हदीस वचनात उल्लेखिले गेले आहे.

प्रात:कालीन क़ुरआन-पठणाशी अभिप्रेत 'फज्र'ची नमाज़ होय व हिला प्रात:कालीन क़ुरआन-पठणाच्या अर्थाने अशासाठी घेतले गेले आहे की फज्रच्या नमाज़चे हे वैभव स्पष्ट व्हावे की ती दीर्घ क़ुरआन-पठणाची नमाज़ होय. मग फज्रच्या नमाज़ला 'मश्हूद'या कारणास्तव म्हटले. गेले आहे की ती वेळ मनाच्या उपस्थितीचीहि वेळ असते आणि फिरिशत्यांच्या हजर होण्याचीहि. यास्तव हदीस वचनात हा उल्लेख आहे-

تَشْهَدُ مَلَائِكَةُ الليل وملائكة النهار۔

"त्या वेळी रात्रीचे फिरिश्ते व दिवसाचे फिरिश्ते हजर होतात."

(तिर्मिजी अबवाबुत्तफसीर)

१०९. तहज्जुदशी अभिप्रेत रात्री झोपेतून उठल्यानंतर अदा केली जाणारी नमाज़ होय. या नमाज़ला ठराविक अशी वेळ नाही तथापि रात्रीच्या उत्तरार्धास मोठे महत्व दिले गेले आहे.

पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही आज्ञा दिली गेली की ही नमाज़ तुमच्या हक्कात वाढ म्हणून आहे म्हणजे त्या कर्तव्या खेरीज ज्यांचावर उल्लेख केला गेला.

११०. महमूद स्थानाशी अभिप्रेत पदाची ती उच्चतमता जी जीव्हांवर प्रशंसा वचने जारी करील.

ज्या वेळी ही सूरह अवतरली. इन्कार करणारे लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मागे लागले होते त्यांनी याबाबत काहीच कसर शिल्लक ठेवली नव्हती की त्यांना लोकांच्या नजरेत तुच्छ ठरवावे. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या पैगंबरास ही शुभवार्ता ऐकविली की तुमचा पालनकर्ता तुम्हाला महमूद स्थानावर (अत्यंत प्रशंसनीय स्थानी) बसवू इच्छितो. ही गोष्ट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हक्कात प्रोत्साहनदायक असण्या सोबतच अशी होती की तिची सत्यता जगावर जाहीर झाल्याविना राहीली नाही. पैगंबरांचे व्यक्तिमत्व प्रत्येक न्याय प्रिय माणसाच्या नजरेत प्रशंसनीय ठरले आणि त्यांच्या अनुयायींना जी श्रद्धा त्यांच्या विषयी आहे, ती अन्य कोणाबद्दलहि नाही. जगातील प्रत्येक मुसलमान नमाज़ मध्ये दररोज दरुद व सलामचा अनमोल नजराणा त्यांना पाठवितो. आणि जगात जे स्थान त्यांना लाभले आहे त्याहून अधिक उच्च स्थान त्यांना अखिरत मध्ये लाभले. कियामतीच्या दिवशी त्यांच्या अत्युच्य प्रतिष्ठेचे वैभव पूर्णत: दिसून येईल. 'कौसर' हौदावरहि आणि अन्य प्रसंगी देखील.

१११. संकेत या गोष्टीकडे आहे की हिजरत (स्थलांतरा) ची वेळ जवळ येऊन ठेपली आहे. म्हणून याच्या काही दिवसा नंतरच हिजरत ची घटना घडली.

या प्रार्थनेत हिजरत (स्थलांतरा) चे मूल तथ्य दृगोचर होते. अर्थात हे की प्रस्थान देखील सत्य आणि मानाने व्हावे व आगमन देखील सत्य आणि मानाने. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची हिजरत म्हणजे पलायन नव्हते किंबहुना अल्लाहच्या मार्गात सन्मानपूर्वक केला गेलेला देशत्याग होता आणि मदीना शहरात त्यांचा प्रवेश एखाद्या शरणागता प्रमाणे नव्हते. किंबहुना एका महान व्यक्तिमत्वाचे एका महान उद्दिष्टाकरिता केले गेलेले आगमन होते. म्हणून त्यांच्या साथीदारांनी त्यांचे स्वागत अशा प्रकारे केले की त्यांच्यासाठी हृदयाची बिछाईत केली.

११२. वर्चस्वाशी अभिप्रेत सामर्थ्य आणि सत्ता होय व

सहायकाचा गुणविशेष या गोष्टीला जाहीर करतो की असे वर्चस्व अपेक्षित आहे जे इस्लामच्या शत्रूंना पराभूत करण्यात सहाय्यक ठरेल व सत्याला प्रभावशाली करील.

ही प्रार्थना मक्केत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व त्यांच्या माध्यमाने ईमान बाळगणाऱ्यांना शिकविली गेली होती, जी या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की सत्य धर्माकरिता सामर्थ्य, वर्चस्व व सत्तेची अपेक्षा एक आवडती व अपेक्षित गोष्ट होय. आजच्या काळात मुसलमान. या मागणीवर आक्षेप घेतात व असे इच्छितात की इस्लाम सह वर्चस्व व सत्तेची गोष्ट सुरवाती पासून केलीच जाऊ नये. ते आपली धर्म विषयक कल्पना क़ुरआनातून ग्रहण करण्या ऐवजी अन्य एखाद्या मार्गाने ग्रहण करतात.

११३. हे क़ुरआनाचे भाकित होते की या वेळी मक्केत ''सत्य'' अत्याचार पिडीत असले तरी ते प्रभावशाली झाले व असत्याचा नाश झाला म्हणून समजा. या घोषणेस दहा वर्षाचाहि काळ लोटला नव्हता की हिजरी सन ८ मध्ये 'इस्लाम' मक्केत विजेत्या स्वरुपात दाखल झाला. या प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) काबागृहात ठेवलेल्या मूर्त्यांना आपल्या भाल्याने खाली पाडत जात आणि या आयतीचे पठण करीत,

جَآءَ الْحَقُّ وَزَهَقَ الْبَاطِلُ اِنَّ الْبَاطِلَ كَانَ
زَهُوْقًا۔ (سورہ بنی اسرائیل آیت۔۸۱)

''(सत्य आले आणि असत्य नष्ट झाले आणि असत्य नष्ट होण्याकरिताच होते)'' अशा प्रकारे सत्याच्या प्रभावित होण्याचा व असत्य नष्ट होण्याचे दृश्य लोकांनी पाहिले. व क़ुरआनाच्या निवेदनाची सत्यता सिद्ध झाली.

११४. याचे स्पष्टीकरण सूरह युनूस टीप क्र. ८८ मध्ये केले गेले आहे.

११५. याचे स्पष्टीकरण सूरह युनूस टीप क्र.९० मध्ये केले गेले आहे.

११६. अत्याचाराशी अभिप्रेत असे लोक होत जे सत्य व न्यायाची गोष्ट ऐकू इच्छित नाही. असले लोक क़ुरआनाच्या सत्य-आवाहनास का म्हणून ऐकतील. अशाच लोकांवर क़ुरआनाची हुज्जत (प्रमाण) प्रस्थापित होते. आणि त्यांचा वाढता विरोध त्यांच्या विनाशास आणखी जास्त वाढवतो.

आणि माणसाला आम्ही जेव्हा देणगी प्रदान करतो. तेव्हा तो तोंड फिरवितो व अंग चोरतो आणि जेव्हा त्याला त्रास पोहचतो तेव्हा निराश होऊ लागतो. सांगा प्रत्येक मनुष्य आपल्या पद्धतिनुसार कार्य करतो आणि तुमचा पालन कर्ताच आधिक चांगले जाणतो की कोण सरळ मार्गावर आहे.(अल-क़ुर्आन)

८३. आणि माणसाला आम्ही जेव्हा देणगी प्रदान करतो. तेव्हा तो तोंड फिरवितो व अंग चोरतो आणि जेव्हा त्याला त्रास पोहचतो तेव्हा निराश होऊ लागतो.[११७]

وَإِذَآ أَنْعَمْنَا عَلَى ٱلْإِنسَٰنِ أَعْرَضَ وَنَـَٔا بِجَانِبِهِۦ ۖ
وَإِذَا مَسَّهُ ٱلشَّرُّ كَانَ يَـُٔوسًا ٨٣

८४. सांगा प्रत्येक मनुष्य आपल्या पद्धतिनुसार कार्य करतो आणि तुमचा पालन कर्ताच आधिक चांगले जाणतो की कोण सरळ मार्गावर आहे.[११८]

قُلْ كُلٌّ يَعْمَلُ عَلَىٰ شَاكِلَتِهِۦ فَرَبُّكُمْ أَعْلَمُ بِمَنْ
هُوَ أَهْدَىٰ سَبِيلًا ٨٤

८५. हे लोक तुम्हाला 'रूह' (वह्य) विषयी विचारतात. सांगा, 'रूह' माझ्या पालनकर्त्याचे फर्मान आहे आणि तुम्हाला जे ज्ञान दिले गेले आहे ते फार थोडे आहे.[११९]

وَيَسْـَٔلُونَكَ عَنِ ٱلرُّوحِ ۖ قُلِ ٱلرُّوحُ مِنْ أَمْرِ رَبِّى
وَمَآ أُوتِيتُم مِّنَ ٱلْعِلْمِ إِلَّا قَلِيلًا ٨٥

८६. आणि जर आम्ही इच्छिले तर जी 'वह्य' (ईश-संदेश) तुम्हावर अवतरीत केली आहे ती हिरावून घेऊ. मग तुम्हाला आमच्या विरोधात कोणी समर्थक न लाभावा.[१२०]

وَلَئِن شِئْنَا لَنَذْهَبَنَّ بِٱلَّذِىٓ أَوْحَيْنَآ إِلَيْكَ ثُمَّ
لَا تَجِدُ لَكَ بِهِۦ عَلَيْنَا وَكِيلًا ٨٦

८७. परंतु ही तुमच्या पालन कर्त्याची कृपा होय (जी तुम्हाला प्रदान केली गेली आहे). नि:संशय तुम्हावर त्याची कृपा फार मोठी आहे.

إِلَّا رَحْمَةً مِّن رَّبِّكَ ۚ إِنَّ فَضْلَهُۥ كَانَ عَلَيْكَ كَبِيرًا ٨٧

८८. सांगा जर समस्त मनुष्य व जिन्न मिळून व एकमेकांचे सहाय्यक होऊन या क़ुरआनासारखी गोष्ट आणू इच्छितील तरीहि या सारखी गोष्ट आणू शकणार नाहीत.[१२१]

قُل لَّئِنِ ٱجْتَمَعَتِ ٱلْإِنسُ وَٱلْجِنُّ عَلَىٰٓ أَن يَأْتُوا۟ بِمِثْلِ هَٰذَا
ٱلْقُرْءَانِ لَا يَأْتُونَ بِمِثْلِهِۦ وَلَوْ كَانَ بَعْضُهُمْ لِبَعْضٍ ظَهِيرًا ٨٨

८९. आम्ही या क़ुरआनात लोकां (ना समजाविण्या) साठी निवेदनाच्या विविध शैली अंगिकारल्या परंतु अधिकांश लोकांनी याचा कोणताहि प्रभाव आत्मसात केला नाही. जर केलेच तर कुफ्र.[१२२]

وَلَقَدْ صَرَّفْنَا لِلنَّاسِ فِى هَٰذَا ٱلْقُرْءَانِ مِن
كُلِّ مَثَلٍ فَأَبَىٰٓ أَكْثَرُ ٱلنَّاسِ إِلَّا كُفُورًا ٨٩

११७. म्हणजे माणसाची ही दशा आहे की तो अल्लाहच्या एखाद्या देणगीस प्राप्त करून आपल्या उपकार कर्त्याशी बेपर्वा होतो व एखादा त्रास पोहचल्यावर निराश होण्याच्या गोष्टी करू लागतो. म्हणजे तो ना कृतज्ञतेचा पुरावा देतो आणि ना सहनशीलतेचा. क़ुरआना सारख्या देणगीस प्राप्त करूनहि तो अशा विचार सरणीला प्रकट करीत आहे. वस्तुत: त्या देणगीचा लाभ घडल्या बद्दल त्याने अल्लाहशी कृतज्ञ व्हावयास पाहिजे होते.

११८. म्हणजे ईश्वर व आखिरत संबंधाने प्रत्येक मनुष्याने स्वत: साठी आचरणाचा एक मार्ग निर्धारीत केला व प्रत्येकाचा एक धर्म आहे, ज्याच्याशी त्याची बांधीलकी आहे व ज्याच्या योग्यतेविषयी व सत्य असण्या विषयी तो दावा करतो, परंतु अंतिम ज्ञान तर अल्लाहलाच असू शकते की कोण सत्य मार्गावर आहे यास्तव त्याने प्रेषिताचे सत्य मार्गावर असणे व सन्मार्गावर असणे वही द्वारे तुमच्यावर जाहीर केले आहे. आता जर तुम्हीच मानत नसाल तर आपल्या आचरणास तुम्हीच जबाबदार राहाल.

११९. इथे 'रूह'शी अभिप्रेत 'वह्य' (ईश-संदेश) होय आणि क़ुरआनात हा शब्द 'वह्य' क़रिता पारिभाषिकरित्या वापरला गेला आहे.(पहा -सूरह नहल टीप क्र.३) इथे संभाषण क्रम प्रमाण आहे की प्रश्न क़ुरआनाच्या अवतरण विषयी होता. म्हणजे प्रश्नकर्ते या अध्यारूत संदेश पोहचविण्याची हकीगत जाणून घेऊ इच्छित होते. त्यांना उत्तर दिले गेले की तुमच्या साठी एवढे जाणून घेणे पुरेसे आहे की हे अल्लाहचे फर्मान आहे. राहीली यांची हकीगत की हे कृत्य कशा प्रकारे पार पडते तर हे अपरोक्षाच्या त्या रहस्यांपैकी आहे ज्याचे माणसाला ज्ञान नाही. अर्थात माणसाला तेवढेच ज्ञान दिले गेले आहे जेवढे या कसोटीमय जीवनातून पार पडण्याकरिता आवश्यक होते. तर जेव्हा एका महान उद्दिष्टास लक्षात घेता 'वह्य'च्या कैफीयतीचे रहस्य पूर्णत:माणसावर उकलले गेले नाही तेव्हा तिच्या कैफीयतीस विवरणात्मकरित्या समजण्या करिता आग्रह करणे उचित नव्हे आणि ना या कारणास्तव त्याचा इन्कार करणे योग्य आहे की ही गोष्ट आमच्या ज्ञान-कक्षेत येऊ शकली नाही. जर यापूर्वी मनुष्य रेडीओच्या लहरीशी परिचित नव्हता तर काय याचा हा अर्थ होता की त्यांचे अस्तित्वच नाही? मग जर 'वह्य'चा अनुभव आम्हाला होत नाही व केवळ पैगंबरांनाच होतो, ज्यांची सत्यता संशया विरहित असते आणि त्यांनी आणलेला संदेश स्वत:या गोष्टीची साक्ष देतो की हा अल्लाहचा संदेश आहे. तर यावर विश्वास का केला जाऊ नये? काय याचा इन्कार सत्याचा इन्कार नव्हे?आणि वस्तुस्थितीचा इन्कार करून आम्ही आपल्या जीवनाला चुकीच्या मार्गाला लावणार नाही?

१२०. म्हणजे ज्या प्रकारे अल्लाहने आपल्या पैगंबरावर हे क़ुरआन अवतरीत केले आहे, त्याने इच्छिले तर तो यास हिरावूनहि घेऊ शकतो आणि जर त्याने असे केले तर अशी कोणतीहि शक्ती नाही जी त्याला परत देऊ शकेल. हेतु हे स्पष्ट करण्याचा आहे की क़ुरआनाचे अवतरण अल्लाह कडून होत आहे. यात पैगंबराचा कसलाहि हस्तक्षेप नाही. म्हणून त्यास पैगंबर लिखीत समजणे वस्तुस्थितीच्या विरूद्ध आहे.

१२१. क़ुरआनाचे हे आव्हान आहे की कोणी एखादा मनुष्यच नव्हे तर संपूर्ण मानव जाती किंबहुना त्या सोबत समस्त जिन्नसमूह मिळून या सारखा ग्रंथ लिहू इच्छितील तरी तसा लिहू शकणार नाहीत. या आव्हानाला चौदा शतके लोटली परंतु आजपावेतो कोणी याला उत्तर देऊ शकले नाही.

वस्तुस्थिती अशी की 'क़ुरआन' सर्वश्रेष्ठ अल्लाहचा जिवंत चमत्कार होय. यावच्चंद्र दिवाकरौ यात तिळमात्र अतिशयोक्ति नाही. किंबहुना ही सत्य घटना होय. याच्या चमत्कार पूर्ण पैलूच्या स्पष्टीकरण करिता पहा सूरह बकरा टीप क्र.३०.

१२२. म्हणजे आम्ही क़ुरआनात आवाहनास विविधरित्या सादर केले आणि उपदेश व समजाविण्या करिता विविध शैलींचा अंगिकार केला, यासाठी की जो स्वभावधर्म ज्या आचरण संहितेशी परिचित असेल त्यानुसार आकलन व्हावे परंतु अधिकांश लोकांची ही दशा आहे की ते इन्कार करण्यात अटळ आहेत व कोणतीहि गोष्ट समजून घेण्यास तयार नाहीत.

आजच्या काळात इन्कार करणाऱ्यांचा क़ुरआना विषयी एक मोठा आक्षेप असा की यात एकाच गोष्टीची वारंवार आवृत्ति केली गेली आहे. अर्थात पुनरावृत्ति- (Repetition)फार आहे. वस्तुत: क़ुरआन यास मार्गदर्शन व सामंजस्य संदर्भात आवश्यक ठरवित आहे.

खरे पाहता, लोक सर्वसामान्य पुस्तका वरून क़ुरआना विषयी कयास करतात, जी एखाद्या ज्ञान विषयक हेतुने किंवा सामान्य माहितीत भर घालण्याकरिता लिहिली जातात. याऊलट क़ुरआनाचा विषय 'अल्लाहचे मार्गदर्शन' आहे व याच्या अवतरणाचा उद्देश्य लोकांचा जीवन प्रवाह बदलणे व त्यांना योग्य वैचारीक व आचरण विषयक प्रशिक्षण देणे. आता मार्गदर्शन व प्रशिक्षणासाठी आवश्यक आहे की प्रत्येक वळणावर चिन्ह-विशेष स्पष्ट केले जावे आणि प्रसंगानुरोधाने धड्याची पुनरावृत्ति केली जावी. यासाठी की बुद्धित तो दृढपणे बसावा. तसेच हेतु स्पष्ट करण्यासाठी विविध शैली अंगिकारल्या जाव्यात. तात्पर्य क़ुरआनाची जी वैशिष्ट्ये होती ती या कदर न जाणणाऱ्यांच्या नजरेत दोष म्हणून ठरतील !

स्पष्ट असावे की अन्य आकाशस्थ ग्रंथाचीहि हीच शैली आहे. यास्तव तौरात व जबूर मध्ये एकाद्या गोष्टीची बऱ्याच वेळा पुनरावृत्ति केली गेली आहे. तात्पर्य आकाशस्थ ग्रंथांचे हे सामाईक वैशिष्ट्य होय.

وَقَالُوا لَن نُّؤْمِنَ لَكَ حَتَّىٰ تَفْجُرَ لَنَا مِنَ الْأَرْضِ يَنبُوعًا ﴿٩٠﴾

९०. ते म्हणतात, जो पर्यंत तुम्ही जमीनीतून आमच्या साठी झरा जारी करीत नाही, आम्ही तुमचे म्हणणे मान्य करणार नाहीत.

أَوْ تَكُونَ لَكَ جَنَّةٌ مِّن نَّخِيلٍ وَعِنَبٍ
فَتُفَجِّرَ الْأَنْهَارَ خِلَالَهَا تَفْجِيرًا ﴿٩١﴾

९१. किंवा तुमच्या जवळ खजूर व द्राक्षांची एखादी बाग असावी व तिच्यात प्रवाह जारी करावा.

أَوْ تُسْقِطَ السَّمَاءَ كَمَا زَعَمْتَ عَلَيْنَا كِسَفًا أَوْ تَأْتِيَ بِاللَّهِ
وَالْمَلَائِكَةِ قَبِيلًا ﴿٩٢﴾

९२. किंवा आकाशाला आमच्यावर तुकडे तुकडे करून कोसळून द्यावे. जसा की तुमचा दावा आहे किंवा अल्लाह व फिरिश्त्यांना समोर आणावे.

أَوْ يَكُونَ لَكَ بَيْتٌ مِّن زُخْرُفٍ أَوْ تَرْقَىٰ فِي السَّمَاءِ وَلَن نُّؤْمِنَ
لِرُقِيِّكَ حَتَّىٰ تُنَزِّلَ عَلَيْنَا كِتَابًا نَّقْرَؤُهُ ۗ قُلْ سُبْحَانَ رَبِّي هَلْ
كُنتُ إِلَّا بَشَرًا رَّسُولًا ﴿٩٣﴾

९३. किंवा तुमच्यासाठी सोन्याचे एखादे घर असावे किंवा तुम्ही आकाशावर चढावे आणि आम्ही तुमच्या चढण्याचाहि विश्वास करणार नाही जोपर्यंत तुम्ही आम्हावर एक (लिखीत) ग्रंथ अवतरीत करीत नाही. जो आम्ही वाचू शकू. सांगा पवित्र आहे माझा पालनकर्ता ! (संदेश पोहचविणारा ) व मनुष्य असण्या खेरीज माझे अस्तित्व तरी काय आहे?[१२३]

وَمَا مَنَعَ النَّاسَ أَن يُؤْمِنُوا إِذْ جَاءَهُمُ الْهُدَىٰ
إِلَّا أَن قَالُوا أَبَعَثَ اللَّهُ بَشَرًا رَّسُولًا ﴿٩٤﴾

९४. आणि लोकांना मार्गदर्शन त्यांच्या जवळ येऊन पोहचल्यावरहि ईमान बाळगण्या पासून याच गोष्टीने रोखले की म्हणू लागले, काय अल्लाहने एका मनुष्याला पैगंबर बनवून पाठविले ?[१२४]

قُل لَّوْ كَانَ فِي الْأَرْضِ مَلَائِكَةٌ يَمْشُونَ مُطْمَئِنِّينَ لَنَزَّلْنَا
عَلَيْهِم مِّنَ السَّمَاءِ مَلَكًا رَّسُولًا ﴿٩٥﴾

९५. सांगा जर जमीनीवर फिरिशते समाधानाने चालत-फिरत राहिले असते तर आम्ही त्यांच्या जवळ एखाद्या फिरिश्त्यालाच पैगंबर बनवून पाठविले असते.[१२५]

قُلْ كَفَىٰ بِاللَّهِ شَهِيدًا بَيْنِي وَبَيْنَكُمْ ۚ إِنَّهُ كَانَ
بِعِبَادِهِ خَبِيرًا بَصِيرًا ﴿٩٦﴾

९६. सांगा अल्लाह माझ्या व तुमच्या दरम्यान साक्ष देण्यास पुरेसा आहे. तो आपल्या दासांची खबर बाळगून आहे व त्यांना पाहत आहे.

وَمَن يَهْدِ اللَّهُ فَهُوَ الْمُهْتَدِ ۖ وَمَن يُضْلِلْ فَلَن تَجِدَ لَهُمْ
أَوْلِيَاءَ مِن دُونِهِ ۖ وَنَحْشُرُهُمْ يَوْمَ الْقِيَامَةِ عَلَىٰ وُجُوهِهِمْ عُمْيًا
وَبُكْمًا وَصُمًّا ۖ مَّأْوَاهُمْ جَهَنَّمُ ۖ كُلَّمَا خَبَتْ زِدْنَاهُمْ سَعِيرًا ﴿٩٧﴾

९७. ज्याला अल्लाह मार्गदर्शन करील तोच मार्गदर्शन प्राप्त करणारा आहे आणि ज्याला तो मार्गभ्रष्ट करील तर अशा लोकांकरिता त्याच्या शिवय कोणीहि सहाय्यक तुम्हाला आढळणार नाही आणि कियामतीच्या दिवशी आम्ही त्यांना तोंड घशी उठवू. आंधळे, मुके व बहीरे.[१२६] त्यांचे ठिकाण जहन्नम असेल. जेव्हा एखाद्या वेळी तिची आग मंद होऊ लागेल, आम्ही तिला पुन्हा आणखी भडकवून देऊ.[१२७]

१२३. हे त्यांच्या त्या लांबलचक मागण्याचे संक्षिप्त उत्तर आहे. अर्थात मी ईश्वर असणाचा दावा केव्हा केला. जेणेकरून तुम्ही माझ्याकडे या मागण्याकरता अल्लाह प्रत्येक प्रकारच्या शिर्क पासून अलिप्त आहे. मी स्वत:ला केवळ रसूल (संदेश-वाहक) या नात्याने सादर केले आहे. यास्तव तुम्ही माझ्या संदेशास पारखून पहा. लहान मोठे चमत्कार दाखविणे रसूलच्या अवाक्यात नाही. किंबहुना अल्लाहच्या अधिकारातील गोष्ट आहे. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह इब्राहीम टीप क्र. २०)

१२४. म्हणजे लोक आपल्या परीने असे समजतात की जमीनीवर हिंडत फिरत राहणारा मनुष्य पैगंबर कसा असू शकतो. जर अल्लाहला खरोखर पैगंबर पाठवायचे असते, तर त्याने फिरिशत्यास पैगंबर बनवून पाठविले असते या चुकीच्या कल्पनेमुळे ते एक मनुष्य पैगंबर असण्या विषयी इन्कार करतात आणि परिणामी पैगंबरावर अवतरीत झालेल्या मार्गदर्शना पासून वंचित राहतात.

१२५. ज़मीनीवर फिरिश्त्यांचे येणे जाणे चालू असते. परंतु जमीनीवर समाधानाने चालत फिरत राहणारी निर्मिती जिला कसोटीच्या मैदानात उभे केले गेले आहे. मनुष्यच आहे. म्हणून मानव जाती कडे एखाद्या मनुष्यास पैगंबर बनवून पाठविणे बुद्धिकोशल्याची निकड आहे. पैगंबराचे जीवन एक आदर्श म्हणून असते व ते अनुसरणीय असते. जर फिरिश्त्यास पैगंबर बनवून पाठविले गेले तर त्याचे जीवन कशा प्रकारे नमुना ठरेल व ते कशा प्रकारे अनुसरणीय ठरेल?

१२६. याचे स्पष्टीकरण टीप क्र. १०२ मध्ये केले गेले आहे

१२७. म्हणजे जहन्नमची आग कधीहि न विझणारी आहे. जरा मंद व्हायला लागली की पुन्हा भडकवली जाईल.

शास्त्रज्ञ म्हणतात की सूर्यात आण्विक स्फोट होत राहतात, ज्यामुळे त्याची उष्णता कायम राहते. ही आहे भौतिक विश्वाची दशा व आखिरतचा तर यावरून कयास केला जाऊ शकत नाही. यास्तव जर जहन्नमची आग सदैव काळ भडकत राहण्याची खबर क़ुरआन आम्हाला देत आहे तर यात आश्चर्य कसले ?

९८. हा मोबदला या गोष्टीचा असेल की यांनी आमच्या आयतींचा इन्कार केला व म्हणाले, काय जेव्हा आम्ही हाडे व कण कण होऊन जावू तेव्हा आम्हाला नव्याने निर्माण करून उठविले जाईल?[१२८]

ذَٰلِكَ جَزَآؤُهُم بِأَنَّهُمْ كَفَرُوا۟ بِـَٔايَـٰتِنَا وَقَالُوٓا۟ أَءِذَا كُنَّا عِظَـٰمًا
وَرُفَـٰتًا أَءِنَّا لَمَبْعُوثُونَ خَلْقًا جَدِيدًا ﴿٩٨﴾

९९. यांनी हा विचार केला नाही की ज्या अल्लाहने आकाश व जमीनीस निर्माण केले तो या सारख्यांना दुसऱ्यांदा निर्माण करण्यास खचितच समर्थ आहे.[१२९] त्याने यांच्या करिता एक वेळ निश्चित करून ठेवली आहे. ज्यात कसलीहि शंका नाही. परंतु अत्याचारी करिता इन्कारा शिवय कोणतीहि गोष्ट मान्य करण्यासारखी नाही.[१३०]

أَوَلَمْ يَرَوْا۟ أَنَّ ٱللَّهَ ٱلَّذِى خَلَقَ ٱلسَّمَـٰوَٰتِ وَٱلْأَرْضَ قَادِرٌ عَلَىٰٓ
أَن يَخْلُقَ مِثْلَهُمْ وَجَعَلَ لَهُمْ أَجَلًا لَّا رَيْبَ فِيهِ فَأَبَى ٱلظَّـٰلِمُونَ
إِلَّا كُفُورًا ﴿٩٩﴾

१००. सांगा, जर माझ्या पालनकर्त्याच्या कृपेचे खजीने तुमच्या ताब्यात असते तर तुम्ही निश्चितच खर्च होण्याच्या भितीने त्यांना रोखून ठेवले असते. मनुष्य मोठा संकुचित मनाचा होय.[१३१]

قُل لَّوْ أَنتُمْ تَمْلِكُونَ خَزَآئِنَ رَحْمَةِ رَبِّىٓ إِذًا لَّأَمْسَكْتُمْ
خَشْيَةَ ٱلْإِنفَاقِ ۚ وَكَانَ ٱلْإِنسَـٰنُ قَتُورًا ﴿١٠٠﴾

१०१. आणि आम्ही मूसाला नऊ उघड निशाण्या दिल्या होत्या.[१३२] तुम्ही बनी इस्राईलला विचारा. जेव्हा ते यांच्या जवळ आले तेव्हा फिरऔन म्हणाला, हे मूसा, मला वाटते तुमच्यावर जादू केली गेली आहे.[१३३]

وَلَقَدْ ءَاتَيْنَا مُوسَىٰ تِسْعَ ءَايَـٰتٍۭ بَيِّنَـٰتٍ ۖ فَسْـَٔلْ بَنِىٓ إِسْرَٰٓءِيلَ إِذْ جَآءَهُمْ
فَقَالَ لَهُۥ فِرْعَوْنُ إِنِّى لَأَظُنُّكَ يَـٰمُوسَىٰ مَسْحُورًا ﴿١٠١﴾

१०२. त्यानी (मूसा)ने उत्तर दिले, तुम्ही चांगल्या प्रकारे जाणता की ह्या अंतर्दृष्टिच्या निशाण्या त्यानेच अवतरीत केल्या आहेत. जो आकाश व जमीनीचा स्वामी आहे.[१३४] आणि मी असे समजतो की, हे फिरऔन तू स्वत:ला विनाश-ग्रस्त केले आहेस.

قَالَ لَقَدْ عَلِمْتَ مَآ أَنزَلَ هَـٰٓؤُلَآءِ إِلَّا رَبُّ ٱلسَّمَـٰوَٰتِ وَٱلْأَرْضِ بَصَآئِرَ
وَإِنِّى لَأَظُنُّكَ يَـٰفِرْعَوْنُ مَثْبُورًا ﴿١٠٢﴾

१०३. मग त्याने (फिरऔनने) इच्छिले की यांचे पाय जमीनीवरून उखडून द्यावेत. तेव्हा आम्ही त्याला व त्याच्या साथीदारांना एकत्र पणे बुडविले.[१३५]

فَأَرَادَ أَن يَسْتَفِزَّهُم مِّنَ ٱلْأَرْضِ
فَأَغْرَقْنَـٰهُ وَمَن مَّعَهُۥ جَمِيعًا ﴿١٠٣﴾

१०४. आणि त्यानंतर बनी इस्राईलला सांगितले की तुम्ही जमीनीवर वसा.[१३६] मग जेव्हा आखिरतचा वायदा (घडून) येईल तेव्हा आम्ही सर्वाना एकत्र करून हजर करू.[१३७]

وَقُلْنَا مِنۢ بَعْدِهِۦ لِبَنِىٓ إِسْرَٰٓءِيلَ ٱسْكُنُوا۟ ٱلْأَرْضَ
فَإِذَا جَآءَ وَعْدُ ٱلْـَٔاخِرَةِ جِئْنَا بِكُمْ لَفِيفًا ﴿١٠٤﴾

१२८. मनुष्य या गोष्टीस जबाबदार आहे की त्याने अल्लाहच्या निशाण्यांना मानावे व आखिरतवर ईमान बाळगावे. याचा इन्कार करणे म्हणजे अल्लाहशी कुफ्र व बंड आहे आणि जहन्नमची ही कठोर शिक्षा ह्याच कुफ्र व बंडखोरीचा योग्य बदला होय.

१२९. म्हणजे एवढी ढोबळ गोष्टहि ह्या इन्कार करणाऱ्यांच्या ध्यानी येत नाही की जो आकाश व जमीनीचा निर्माता आहे, त्याच्यासाठी माणसाला दुसऱ्यांदा निर्माण करणे अवघड कसे?

१३०. म्हणजे कियामत नि:संशय घडून येईल व अत्यंत दृढ प्रमाणांसह या गोष्टीस स्पष्ट केले गेले आहे. परंतु जे लोक वाईट आहेत व वाईट मार्गाला लागले आहेत ते इन्कार करण्यात एवढे निर्ढावले आहेत की त्यांना अन्य एखादी गोष्ट वा पुरावा देखील मान्य नाही.

१३१. हेतु हे स्पष्ट करणे होय की आखिरत ईश-कृपेची निकड होय. त्याची कृपा असीम आहे व खर्च केल्याने त्याच्या खजिन्यां मध्ये कसलीहि कमी होत नाही. तो हे इच्छितो की अशा प्रामाणिक दासांना आपल्या कृपेने सदैव काळ अशा प्रकारे उपकृत करावे की त्यांनी धन्य व्हावे. कृपेचा लाभ घडविण्या करिताच त्याने जन्नत बनविली आहे. म्हणून माणसाचा आखिरतशी इन्कार व जन्नतला अशक्य समजणे अल्लाहच्या 'कृपा' गुणविशेषा विषयी अगदी चुकीची कल्पना होय. खरे पाहता मनुष्य मोठा संकुचित मनाचा व कंजुस आहे. म्हणून अल्लाहच्या कृपेची ही व्यापकता त्याला मान्य करण्याजोगी ठरत नाही आणि ह्या इन्कार करणाऱ्यांची ही दशा आहे की जर अल्लाहने आपल्या कृपेच्या खजिन्यांचा यांना मालक बनविले असते म्हणजे धन सम्पत्तिच्या खजिन्यांना यांच्या हवाली केले असते तर कदाचित संपून न जावे या भिती पोटी यांनी खर्च करण्यापासून व लोकांना याचा फायदा पोहचविण्या पासून हात रोखले असते तर काय हे ईश्वरालाहि स्वत:वरून कयास करतात? जर त्याने आपल्या एकनिष्ठ दासां करिता कृपेचे सर्व दरवाजे उघडले तर काय त्याच्या कृपेत कमतरता होईल? तेव्हा जर असा विचार करणे योग्य नाही. तर मग समजा की जन्नत अगदी कृपेच्या निकडीला अनुसरून आहे व त्यासाठी दुसरे जीवन आवश्यक.

१३२. जे नऊ चमत्कार हजरत मूसा यांच्या हातून प्रकट झाले त्यांचे वर्णन सूरह अअराफ मध्ये केले गेले. अर्थात (१) काठीचा साप होणे (२) हात सफेद व चमकदार होणे (३) दुष्काळ (४) शेती-उत्पादनात घट (५) वादळ (६) वावटळ (७) उवा (८) बेडूक (९) रक्त.

स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप १६३, १६४. १८६, १८७, १८८, १८९, १९०, १९१.

१३३. म्हणजे बनी इस्राईलला हे चांगल्या प्रकारे माहित आहे की हजरत मूसा यांचे नऊ चमत्कार पाहिल्यानंतरहि फिरऔनने ईमान बाळगले नव्हते, किंबहुना हजरत मूसा यांना असे म्हणून खोटे ठरविले होते की तुमच्यावर कोणी तरी जादू टोणा केला आहे. ज्यामुळे तुम्ही मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांसमोर जे चमत्कारांची मागणी करीत होते, उदाहरणा दाखल मांडले जात आहे. अशासाठी की त्यांनी ह्या अनावश्यक मांगण्या पासून परावृत्त व्हावे.

१३४. म्हणजे ह्या निशाण्या माणसाचे डोळे उघडण्या करिता पुरेशा आहेत व या गोष्टीचा स्पष्ट पुरावा आहे की त्या सृष्टी-निर्मात्याद्वारे उदयास आल्या आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे ते ईश-चमत्कार असण्याविषयी कसल्याहि संशयाला जागा नाही.

१३५. बनी इस्राईल देश सोडून जाऊ इच्छित होते:परंतु फिरऔन त्यांना आज्ञा देत नव्हता. तथापि हे पाहून की हजरत मूसा व बनी इस्राईल मुळे कोणत्या न कोणत्या आपत्तिला त्याला तोंड द्यावेच लागते. देशातून बेदखल करू इच्छिले परंतु परिणामी फिरऔनला स्वत:च आपल्या देशातून नेहमी साठी बे दखल व्हावे लागले. तो व त्याचे साथीदार समुद्रात बुडाले.

कुरेश देखील या गोष्टीस टपून बसले होते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना देशात राहणे दुर्धर व्हावे म्हणून त्यांना हा वृत्तांत बोध प्राप्ती करिता ऐकविला गेला. परंतु त्यांनी या पासून कसलाहि बोध घेतला नाही. उलट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना मक्का सोडून देण्यास विवश केले. परिणामी त्यांना स्वत:लाच मक्का सोडून जावे लागले व उलट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) विजेता म्हणून मक्केत दाखल झाले.

१३६. अभीप्रेत सिरिया व पॅलेस्टीनची भुमी होय. कारण मिस्र (इजिप्त) सोडल्यानंतर बनी इस्राईल सीना खोऱ्या मार्गे आपल्या पूर्वजांच्या देशास पोहचले होते.

१३७. म्हणजे यांना जगात नेहमी साठी राहावयाचे आहे असे समजू नका. उलट खरे घर आखिरतचे आहे हे लक्षात ठेवा आणि जेव्हा कियामत घडून येईल तेव्हा आम्ही तुम्हा सर्वांना आपल्या समोर एकत्रित करू. परंतु हा धडा इस्राईल विसरले. यास्तव आजच्या तौरात मध्ये याचा कसलाहि उल्लेख नाही. त्यांनी फक्त एवढेच लक्षात ठेवले की त्यांना एक असा देश मिळाला आहे ज्यात दूधा-मधाच्या नद्या वाहताहेत.

१०५. आम्ही याला सत्यासह अवतरीत केले आहे आणि हे सत्या सहच अवतरले आहे. [१३८] आणि आम्ही तुम्हाला अशासाठी पाठविले आहे की खुशखबरी ऐकवावी व खबरदार करावे.[१३९]

وَبِالْحَقِّ أَنزَلْنَاهُ وَبِالْحَقِّ نَزَلَ ۗ وَمَا
أَرْسَلْنَاكَ إِلَّا مُبَشِّرًا وَنَذِيرًا ﴿١٠٥﴾

१०६. आणि आम्ही क़ुरआनास वेगवेगळ्या हिश्शयांच्या स्वरुपात अवतरीत केले आहे.या साठी की लोकांना तुम्ही थांबून थांबून ऐकवावे आणि आम्ही यास क्रमशः अवतरीत केले आहे.[१४०]

وَقُرْآنًا فَرَقْنَاهُ لِتَقْرَأَهُ عَلَى النَّاسِ عَلَىٰ مُكْثٍ
وَنَزَّلْنَاهُ تَنزِيلًا ﴿١٠٦﴾

१०७. सांगा तुम्ही यावर ईमान बाळगा किंवा न बाळगा, ज्या लोकांना यापूर्वी ज्ञान दिले गेले आहे,[१४१] त्यांना जेव्हा हे ऐकविले जाते तेव्हा ते हनवटी टेकून सजद्यात पडतात.[१४२]

قُلْ آمِنُوا بِهِ أَوْ لَا تُؤْمِنُوا ۚ إِنَّ الَّذِينَ أُوتُوا الْعِلْمَ مِن قَبْلِهِ إِذَا
يُتْلَىٰ عَلَيْهِمْ يَخِرُّونَ لِلْأَذْقَانِ سُجَّدًا ﴿١٠٧﴾

१०८. आणि उद्‌गार काढतात की पवित्र आहे. आमचा पालनकर्ता. आमच्या पालन कर्त्याचा वायदा तर यासाठीच होता की पूर्ण व्हावा.[१४३]

وَيَقُولُونَ سُبْحَانَ رَبِّنَا إِن كَانَ وَعْدُ رَبِّنَا لَمَفْعُولًا ﴿١٠٨﴾

१०९. आणि ते हनुवटी टेकून रडत रडत सजदा करतात व अशाने त्यांची नम्रता अधिक वाढते.[१४४]

وَيَخِرُّونَ لِلْأَذْقَانِ يَبْكُونَ وَيَزِيدُهُمْ خُشُوعًا ۩ ﴿١٠٩﴾

११०. सांगा, तुम्ही अल्लाह म्हणून पुकारा किंवा ‘रहमान’ म्हणून [१४५] ज्या नावानेहि पुकारा. त्याच्या करिता सर्व चांगलीच नावे आहेत.[१४६] आणि तुम्ही आपल्या नमाज़चे ना जास्त मोठया स्वरात पठण करा आणि ना अगदीच खालच्या स्वरात, किंबहुना यांच्या दरम्यानचे स्वरुप अंगिकारा.[१४७]

قُلِ ادْعُوا اللَّهَ أَوِ ادْعُوا الرَّحْمَٰنَ ۖ أَيًّا مَّا تَدْعُوا فَلَهُ الْأَسْمَاءُ
الْحُسْنَىٰ ۚ وَلَا تَجْهَرْ بِصَلَاتِكَ وَلَا تُخَافِتْ بِهَا
وَابْتَغِ بَيْنَ ذَٰلِكَ سَبِيلًا ﴿١١٠﴾

१११. आणि सांगा, सर्व प्रशांसा अल्लाह करिताच आहे, [१४८] ज्याने स्वतः करिता ना एखादी संतती बनविली आणि ना राज्यसत्तेत त्याचा कोणी सहभागी आहे आणि ना तो अगतिक आहे की कोणी त्याला सहाय्यक असावा. [१४९] आणि त्याची अशी महानता निवेदन करा जशी निवेदन करावयास पाहिजे.[१५०]

وَقُلِ الْحَمْدُ لِلَّهِ الَّذِي لَمْ يَتَّخِذْ وَلَدًا وَلَمْ يَكُن لَّهُ شَرِيكٌ
فِي الْمُلْكِ وَلَمْ يَكُن لَّهُ وَلِيٌّ مِّنَ الذُّلِّ ۖ وَكَبِّرْهُ تَكْبِيرًا ﴿١١١﴾

१३८. निवेदन क्रम क़ुरआना संबंधी होता. मध्येच ईश चमत्कारा संबंधाने हजरत मूसा व फिरऔन यांचा किस्सा वर्णिला गेला. आता निवेदनाचा रोख पुन्हा क़ुरआना कडे वळला आहे.

१३९. म्हणजे क़ुरआन नखशिखान्त सत्य आहे व प्रत्येक प्रकारच्या मिश्रणाविरहित यात ना सैतान हस्तक्षेप करू शकला आणि ना अन्य एखाद्या तर्फे यात उणे अधिक होऊ शकले. किंबहुना ज्या प्रकारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने अवतरीत करू इच्छिले त्याच प्रमाणे ते पैगंबरावर अवतरीत झाले व ज्या प्रकारे पैगंबरावर अवतरीत झाले होते त्यांनी तुमच्या समोर पूर्ण विश्वस्तेने सादर केले.

१४०. हे त्या आक्षेपाचे उत्तर होय की क़ुरआनास एकाच वेळी पूर्ण ग्रंथाच्या स्वरुपात का अवतरीत केले गेले नाही. फर्माविले गेले क़ुरआनास आयती व सूरतींच्या स्वरुपात क्रमश:अवतरीत केले गेले. जेणकरून पैगंबरानी लोकांना थांबून थांबून ऐकवावे.

क़ुरआनच्या संबोधनाचा रोख सर्वप्रथम ज्या लोकांकडे होता त्यांच्या करिता ही सवड आवश्यक होती की पैगंबरांच्या आवाहनाच्या परिणामी ज्या प्रकारची परिस्थिती उद्भवेल तद्नुषंगाने मार्गदर्शनाचा मार्ग देखील उज्वल होत जावा. अशा प्रकारे लोकांना आवाहन समजणेहि सोपे व्हावे व मार्ग दर्शनाच्या मार्गावर चालणेहि.

१४१. अभिप्रेत ते ग्रंथधारक होत जे ईश-ग्रंथाचे ज्ञानहि बाळगत होते व सदाचारीहि होते. क़ुरआन ऐकताच ते समजले की ही ईश-वाणी होय. मग त्यांची अशी कैफीयत झाली जी पुढे वर्णिली गेली आहे.

१४२. हनुवटीचा शब्द तोंडाकरिता वापरला गेला आहे. अर्थात सजदा अवस्थेत नतमस्तक होतात. यात हा संकेतहि आहे की गर्व करणारे तर आपली तोंडे वर करतात. परंतु या ईमान बाळगणाऱ्यांची ही दशा आहे की ते आपली हनुवटी अल्लाह समोर झुकवित सजदा करतात.

१४३. म्हणजे तौरात व इंजील मध्ये ज्या गुणाविशेषांनी युक्त अशा पैगंबरास पाठविण्याचा वायदा केला गेला होता तो हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आगमनाने पूर्ण झाला.

१४४. म्हणजे क़ुरआन ऐकून यांच्यावर दहशतीची अवस्था होऊ लागते आणि अश्रूपूर्ण नेत्रांनी सजदा करू लागतात. अशा प्रकारे क़ुरआन-श्रवणाने नम्रतेत वाढ होत जाते.

यांचा पहिला सजदा ज्याच्या उल्लेख वर आयत १०७ मध्ये केला गेला. क़ुरआन अवतरणाच्या खुशीत होता आणि हा दुसरा सजदा त्या अनुकंपेचा परिणाम म्हणून होता जी क़ुरआन श्रवणाने निर्माण होते.

ही सजद्याची आयत होय. म्हणून हिच्या पाठणावर सजदा केला पाहिजे.

१४५. 'रहमान' या शब्दाच्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह फातिहा टीप क्र. ५

क़ुरआनात 'रहमान' हा शब्द अल्लाह साठी विशेषण म्हणून वापरला गेला आहे आणि विशेष नाम म्हणूनहि. यास्तव हे नाव फक्त अल्लाहसाठीच खास आहे. दुसऱ्या कोणासाठी याचा वापर केला जात नाही.

क़ुरआनाचा इन्कार कारणाऱ्यांनी एका अकारण आक्षेप उभा केला की तुम्ही ईश्वरासाठी अल्लाह व रहमान या दोन शब्दाचा वापर करता यावरून असे दिसते की दोन ईश्वर आहेत उलट आम्ही अल्लाहशी परिचित आहोत. रहमानशी नवहे. त्यांच्या या आक्षेपास येथे उत्तर दिले गेले आहे की ईश्वर एकच आहे मग त्याला अल्लाह म्हणून पुकारा किंवा 'रहमान' म्हणून याने एकेश्वरवादात कसलाहि फरक पडत नाही. अर्थात तुम्ही शाब्दिक विवादात गुरफटला आहात जेव्हा अर्थ आणि वस्तुस्थिती एकच आहे.

१४६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. २७८ व २७९.

१४७. ज्या अर्थी अल्लाहला पुकारण्याची सर्वोत्तम स्थिती नमाज़ आहे म्हणून येथे ताकीद केली गेली की नमाज गंभीरतापूर्वक व इतमामाने अदा केली जावी. ना तर नमाज पढतांना एवढ्या उंच स्वरात क़ुरआन पठण करावे की शिष्टाचाराविरुद्ध ठरावे आणि ना एवढ्या हळू आवाजात पठण करावे की सामूहीक नमाज़ पढणाऱ्यांना ऐकू न यावे. उचित पद्धत हि की आपला स्वर मध्यम रित्या वापरावा.

स्पष्ट असावे की येथे मंद स्वरात (सिरी) पढली जाणारी व मोठ्या स्वरात (जहरी) पढली जाणारी नमाज़ यांच्याविषयी विवाद नाही; किंबहुना हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की ज्या नमाज़ मध्ये क़ुरआन पठण मोठ्याने करावयाचे आहे त्यात दोन्ही गोष्टींची काळजी बाळगावी. ना आवाज एवढा मोठा केला जावा की ज्यामुळे नमाज़च्या प्रतिष्ठेला गालबोट लागावे आणि ना इतका हळू की नमाज़ अदा करणाऱ्यांना ऐकू न यावा. या दोन्ही टोकांपासून अलिप्त राहत दरम्यानी व समतोल स्वर अंगिकारला जावा. जेणेकरून नमाजची शांतीहि कायम रहावी व मागे नमाज़ पढणाऱ्यांनाहि ऐकू यावे.

१४८. हा उक्ति समोरोप होय. सूरहचा आरंभ अल्लाह साठी 'पावित्र्य'याने झाला होता. समोरोप त्याच्या प्रशंसेने होत आहे.

१४९. या आयतीत शीर्कच्या तिनही प्रकारंचे खंडन केले गेले आहे. ज्यात सर्वसामान्य पणे भिन्न धर्मीय लोक ग्रस्त आहेत. पैकी १) ईश्वराचा पुत्र व संतती असण्या विषयीची श्रद्धा २) त्याच्या राज्य सत्तेत अन्य एखाद्याचा सहभागी होण्याची श्रद्धा आणि ३) त्याचे अन्य सहाय्यक असण्या संबंधीची कल्पना. सहाय्यकाची गरज त्यालाच भासते जो अगतिक आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह या व्यंगा पासून अलीप्त आहे आणि तो जबरदस्त सामर्थ्य व अधिकार बाळगणारा आहे. मग त्याला सहाय्यकांची गरज काय?

१५०. म्हणजे त्याची अशी महानता वर्णन करा की पूर्ण पणे स्पष्ट व्हावी व अनेकेश्वरवादी ज्या व्यांग दोषांचा त्यांच्याशी संबंध जोडतात त्याच्या विरोधात त्याच्या महानतेचे वैभव प्रकट व्हावे.

‘अल्लाहु अकबर’ (अल्लाह सर्वांहून महान आहे) हे वचन ज्याची अजान व नमाज मध्ये पुनरावृत्ति केली जाते. अल्ल्लाहच्या ह्याच महानतेचे प्रकटीकरण होय.

# १८. सूरह अल् कहफ

**नावः** आयत क्र. ९ मध्ये कह्फच्या लोकांचा किस्सा वर्णिला गेला आहे. तद्नुषंगाने या सूरहचे नाव 'अल्कहफ' आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे. आणि मजकूरां वरून असे दिसते की मक्केच्या शेवटच्या काळात अवतरली असेल.

**मध्यवर्ति विषयः** घटनांच्या प्रकाशात दुसऱ्यांदा लाभणाऱ्या जीवनाचा विश्वास निर्माण करणे होय. मागच्या सूरह मध्ये विशेषत्वाने यहुदी लोकांना तंबी होती. या सूरह मध्ये विशेषत्वाने ख्रिश्चन लोकांना तंबी आहे व या पैलूने की त्यांनी अल्लाहला पूत्र असण्याची श्रद्धा मनाने रचून घेतली, ज्यामुळे त्यांच्या हातून 'शिर्क'चा अपराधहि घडला व आखिरत विषयक श्रद्धा देखील कलुषित झाली.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ८ प्रस्तावना स्वरुप आहेत ज्यात क़ुरआन अवतरणाचा हेतु स्पष्ट केला गेला आहे.

आयत क्र.९ ते २६ मध्ये कह्फ वाल्यांचा किस्सा वर्णिला गेला आहे जो दुसऱ्या जीवनाकरीता एक घटनात्मक उदाहरणहि आहे व ज्यात ईश-मार्गात स्थलांतर संबंधी मार्ग दर्शनाची सामुग्री देखील.

आयत क्र. २७ ते ३१ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांची कदर वाढवली गेली आहे आणि भौतिक पूजेत मग्न असणाऱ्या लोकांना त्यांच्या दशेवर सोडून देण्याची आज्ञा दिली गेली आहे.

आयत क्र. ३२ ते ४४ मध्ये दोन व्यक्तिंचा किस्सा वर्णिला गेला आहे ज्यापैकी एक जण ऐहीक यशालाच खरे यश समजत होता व दुसरा आखिरतचे यश हेच खरे यश असण्याबद्दल दृढ विश्वास बाळगत होता. मग ऐहीक यशाला खरे यश समजणाऱ्यास कशा प्रकारे शोक विलाप करावा लागला.

आयत क्र. ४५ ते ४९ मध्ये इहलोकाच्या तात्पुरत्या जीवनास एका उदाहरणाद्वारे स्पष्ट करीत कियामतीच्या दिवसाच्या उपस्थितीचे चित्र रेखाटले गेले आहे आणि सत्कृत्यास परिणामकारक व चांगला मोबदला लाभण्यास कारक ठरविले गेले आहे.

आयत क्र. ५० ते ५९ मध्ये आदम व इब्लिस (सैतान) चा किस्सा संक्षिप्त पणे वर्णन करीत अनेकेश्वर वाद्यांची विचारसरणी व क़ुरआन संबंधाने त्यांच्या वर्तनावर अंकूश ठेवला गेला आहे.

आयत क्र. ६० ते ८२ मध्ये हजरत मूसा यांच्या प्रवासाचे प्रसंग सादर केले गेले आहेत ज्यांत अल्लाहच्या बुद्धिकौशल्याची काही रहस्ये अनावारित केली गेली, ज्यावरून हे मार्गदर्शन लाभते की जगात ज्या अगणित घटना घडतात त्यांच्या केवळ बाह्य पैलू वर दृष्टी ठेवून एखादे निर्णयात्मक मत कायम करणे योग्य नव्हे. या घटनांमागे अल्लाहचे बुद्धिकौशल्य व उद्दिष्टे कारक असतात ज्यांचे माणसाला ज्ञान नसते; आणि तो आपल्या अपूर्ण ज्ञान व उतावळे पणा मुळे त्यांचे चुकीचे स्पष्टीकरण करतो. घटनांचा हा पैलू की यात कसकशी रहस्ये दडलेली आहेत, आखिरत संबंधाने मोठा महत्वपूर्ण आहे.

आयत क्र. ८३ ते १०१ मध्ये एका प्रश्नाच्या उत्तरात जुलकरनैनचा किस्सा वर्णिला गेला आहे. या किश्श्यात त्याच्या आचरणाचा हा पैलू प्रामुख्याने प्रकट केला गेला आहे की कशा प्रकारे त्याने आपल्या सत्ताधिकाराचा ईश्वराचे भय बाळगून आणि आखिरतच्या उत्तरदायित्वाची जाणीव राखून वापर केला.

आयत क्र. १०२ ते ११० समारोपाच्या आयती आहेत ज्यात शिर्क व आखिरतचा इन्कार करण्यावर तंबी आहे.

# १८. सूरतुल कहफ

سُورَةُ الكَهْف

अनुवाद

आयती ११०

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. प्रशंसा अल्लाह करिता आहे ज्याने आपल्या दासावर ग्रंथ अवतरीत केला व त्यात कसलीहि वक्रता राखली नाही.[१]

الْحَمْدُ لِلَّهِ الَّذِي أَنزَلَ عَلَىٰ عَبْدِهِ الْكِتَابَ وَلَمْ يَجْعَل
لَّهُ عِوَجًا ۜ (١)

२. सरळ ग्रंथ.[२] या साठी की त्याने (लोकांना सक्त ईश-शिक्षेपासून सचेत करावे जो त्याच्या तर्फे येईल आणि सत्कर्म करणाऱ्या ईमान धारक लोकांना खुशखबरी द्यावी की त्यांच्या करीता चांगला मोबदला आहे.[३]

قَيِّمًا لِّيُنذِرَ بَأْسًا شَدِيدًا مِّن لَّدُنْهُ وَيُبَشِّرَ الْمُؤْمِنِينَ
الَّذِينَ يَعْمَلُونَ الصَّالِحَاتِ أَنَّ لَهُمْ أَجْرًا حَسَنًا (٢)

३. ज्यात ते सदैव राहतील.

مَّاكِثِينَ فِيهِ أَبَدًا (٣)

४. तसेच त्या लोकांना खबरदार करावे जे असे म्हणतात की अल्लाहने आपल्यासाठी संतती बनविली.[४]

وَيُنذِرَ الَّذِينَ قَالُوا اتَّخَذَ اللَّهُ وَلَدًا (٤)

५. या बाबत ना त्यांना काही ज्ञान आहे आणि ना त्यांच्या वाडवडीलांना होते.[५] मोठी सक्त गोष्ट आहे, जी त्यांच्या तोंडून निघत आहे [६] केवळ खोटे आहे जे ते बोलत आहेत.

مَّا لَهُم بِهِ مِنْ عِلْمٍ وَلَا لِآبَائِهِمْ ۚ كَبُرَتْ كَلِمَةً
تَخْرُجُ مِنْ أَفْوَاهِهِمْ ۚ إِن يَقُولُونَ إِلَّا كَذِبًا (٥)

६. (हे पैगंबर !) जर त्यांनी या वाणीवर ईमान बाळगले नाही तर कदाचित तुम्ही त्यांच्या मागे लागून आपल्या जीवाचा दुःखातिरेकाने नाश कराल.[७]

فَلَعَلَّكَ بَاخِعٌ نَّفْسَكَ عَلَىٰ آثَارِهِمْ إِن لَّمْ يُؤْمِنُوا
بِهَٰذَا الْحَدِيثِ أَسَفًا (٦)

१. वक्रता न असण्याचा अर्थ असा की क़ुरआनात अशी कोणतीहि गोष्ट नाही, जी बुद्धि व विवेक आणि न्याय व सत्या पासून वेगळी असावी, ती तत्वज्ञानीय गुंतागुंत, परस्पर भिन्न निवेदन आणि इत्यादि गोष्टींपासून अगदी अलीप्त आहे. याच कारणास्तव सुस्वभावी व मांगल्य प्रेमी लोकांच्या मनात क़ुरआन सहजगत्या प्रवेश करते. या वैभवाचा ग्रंथ अवतरीत केल्याबद्दल त्याचा लेखक (अल्लाह) प्रशंसा व स्तुतीस पात्र आहे. या ग्रंथाचे सौंदर्य त्याच्या लेखकाच्या सौंदर्या विषयी व त्याचे नैपुण्य त्याच्या लेखकाच्या नैपुण्याविषयी युक्तिवाद करते. आपल्या एका अशा दासावर याचे अवतरण जो परंपरागत शिक्षणापासून अगदी अपरिचित होता, त्याच्या अद्वितीय बुद्धिकौशल्याची स्पष्ट निशाणी होय.

क़ुरआनाच्या या खास वैशिष्ट्याचा अंदाजा माणसाला अशा वेळी होतो जेव्हा तो इतर धर्मांच्या पवित्र ग्रंथाना पाहतो आणि हे पाहून त्रस्त होतो की यांच्यात ईश्वर व धर्मा संबंधाने कशा परस्परविरुद्ध आणि गुंतागुंतीच्या तत्वज्ञानीय गोष्टी सादर केल्या आहेत. परंतु क़ुरआनाच्या शिकवणी अत्यंत साध्या सरळ व मनात उतरणाऱ्या आहेत.

२. म्हणजे सरळ मार्ग दाखविणाऱ्या व योग्य आणि दृढ शिकवणी वर आधारीत.

३. येथे क़ुरआनास अवतरीत करण्याचे दोन महत्वपूर्ण हेतु निवेदिले गेले आहेत. एक हा की गफलतीत बुडालेल्या मानवजातीस ईश-प्रकोपा पासून सावध करणे आणि दुसरा ईमान व सदाचाराचे जीवन आंगिकारणाऱ्यांना चांगल्या मोबदल्याची खुशखबरी ऐकवणे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ही दुप्पट कर्तव्ये पार पाडली. तेव्हा त्यांच्या प्रतिनिधित्वात या जन समूहावर देखील या दोन्ही कामांची जबाबदारी येते. क़ुरआनाची समज जिथे मुसलमानांना घावयाची आहे तिथे संपूर्ण मानव जातीला क़ुरआनाच्या तंबी पासून सावध करावयाचे आहे.

४. म्हणजे अशा लोकांना विशेषत्वाने सावध करावे. जे अल्लाहला संतती असल्याचे मानतात. संकेत प्रामुख्याने ख्रिश्चनाकडे आहे, जे हजरत मसीह (येशू)ला ईश्वरांचा पुत्र मानतात. तसे पाहिले तर ही तंबी सर्व सामान्यापणे त्या सर्वांसाठी आहे जे कसल्या न कसल्या स्वरुपात ही श्रद्धा बाळगतात की ईश्वर संतती बाळगतो. उदाहरणार्थ मक्केचे अनेकेश्वरवादी फिरिश्त्यांना ईश्वराच्या मुली ठरवित.

५. जे लोक अल्लाहला मुली वा संतती असण्याचा दावा करतात त्यांच्या या दाव्यामागे कोणतेहि ज्ञानविषयक प्रमाण नाही. ईश्वराबाबत माणसाला ज्ञान एक तर सुज्ञतेमुळे लाभते जे माणसाच्या स्वभावात सुप्त असते, किंवा त्या निशाण्यांद्वारे होते ज्या सर्वश्रेष्ठ अल्लाहने अंतरंगात व क्षितिजांमध्ये ठेवल्या आहेत किंवा वही द्वारे जिला तो पैगंबरांवर अवतरीत करतो व ज्याचे व्यक्त स्वरुप ईश-ग्रंथाचे आहे. या खेरीज अल्लाहबाबत जाणून घेण्याचे साधन माणसाजवळ कोणतेहि नाही. या तिन्ही माध्यामापैकी कोणतेहि माध्यम असे नाही की ज्या द्वारे या गोष्टीचे समर्थन होत असावे की ईश्वराला संतती असते, किंबहुना प्रत्येक या गोष्टीस नकार दर्शविते. मग कशाच्या आधारावर लोक ईश्वराला संतती वा पुत्र असण्याचा दावा करतात? राहिली त्यांची ही गोष्ट की ही श्रद्धा वडिलोपार्जित आहे तर हा या गोष्टीचा पुरावा नव्हे की ईश्वराला संतती आहे किंबहुना हा या गोष्टीचा पुरावा होय की यांचे पूर्वज देखील अशाच प्रकारे अज्ञानाच्या गोष्टी करीता होते ज्या प्रमाणे हे करीत आहेत.

६. म्हणजे ईश्वराविषयी संततीची गोष्ट बोलणे लोकांना सोपे वाटले व संशोधनाची गरज त्यांना जाणवत नाही वस्तुत: कोणत्याहि व्यंग किंवा उणीवाचा अल्लाहशी संबंध जोडणे फार भयंकर अपराध आहे.

७. यावरून असे दिसते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या जन-समूहाचे किती मोठे हितचिंतक व ईमान न बाळगण्याबद्दल त्यांना केवढी खंत होती. पैगंबर एक सहृदय मनुष्य होते म्हणून आपल्या जन-समूहाला ईश-प्रकोपास तोंड द्यावे लागावे हा विचार देखील त्यांना असह्य होता. परंतु ताकीद व उपदेशानंतरहि जर लोक स्वत:ला अगीत झोकू इच्छित असतील तर त्यांच्या बद्दल दु:ख करून काय साध्य होईल यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही सांत्वना दिली गेली की त्या लोकांच्या संदर्भात तुम्ही आपले कर्तव्य पार पाडले आहे. जर हे मानत नाही तर यांच्या ईमान न बाळगण्याच्या दु:खात तुम्ही झुरू नका. यात जेथे पैगंबराची आपल्या जन-समूहाशी सहानुभूति व्यक्त झाली आहे तेथे ईमान न बाळगणाऱ्यांवर क्रोध देखील की हे या लायकीचे नाहीत की यांना समजावले जावे.

إنا جعلنا ما على الأرض زينة لها لنبلوهم أيهم
أحسن عملا ﴿٧﴾

७. वस्तुतः भूतलावर जे काही आहे त्याला आम्ही त्याची सजावट बनविले आहे.या साठी की लोकांची कसोटी घ्यावी की त्यांच्यात उत्तम कामे करणारा कोण आहे.[८]

وإنا لجاعلون ما عليها صعيدا جرزا ﴿٨﴾

८. आणि जे काही या (भूतला) वर आहे त्याला आम्ही सपाट मैदान बनविणार आहोत.[९]

أم حسبت أن أصحاب الكهف والرقيم كانوا من
آياتنا عجبا ﴿٩﴾

९. काय तुम्हाला असे वाटते की ‘कहफ’ व ‘रकीम’ वाले आमच्या निशाण्यापैकी एखादी नवलाची गोष्ट होती ? [१०]

إذ أوى الفتية إلى الكهف فقالوا ربنا آتنا من
لدنك رحمة وهيئ لنا من أمرنا رشدا ﴿١٠﴾

१०. जेव्हा काही तरुणांनी गुहेत आश्रय घेतला [११] आणि प्रार्थना केली,हे आमच्या पालन कर्त्या आपल्या तर्फे आम्हावर कृपा कर आणि या मामल्यात आमच्या मार्गदर्शनाची सामुग्री कर.[१२]

فضربنا على آذانهم في الكهف سنين عددا ﴿١١﴾

११. तेव्हा आम्ही गुहेत त्यांचे कान कित्येक वर्षा करिता थोपटून दिले.[१३]

ثم بعثناهم لنعلم أي الحزبين أحصى لما لبثوا أمدا ﴿١٢﴾

१२. मग आम्ही त्यांना उठविले. या साठी की दोन्ही समूहांपैकी कोण त्यांच्या वास्तव्याच्या मुदतीची उचित गणना करतो हे पहावे.[१४]

نحن نقص عليك نبأهم بالحق إنهم فتية آمنوا بربهم
وزدناهم هدى ﴿١٣﴾

१३. आम्ही त्यांची घटना तुम्हाला यथायोग्य ऐकवितो.[१५] ते काही तरुण होते,ज्यांनी आपल्या पालनकर्त्यावर ईमान बाळगले होते आणि आम्ही त्यांच्या मार्गदर्शनामध्ये अधिकाधिक वाढ प्रदान केली होती.[१६]

وربطنا على قلوبهم إذ قاموا فقالوا ربنا رب السماوات
والأرض لن ندعو من دونه إلها لقد قلنا إذا شططا ﴿١٤﴾

१४. आणि त्यांच्या हृदयांना आम्ही मजबूत केले जेव्हा ते उठले आणि म्हटले की आमचा पालनकर्ता तर तोच आहे जो आकाशांचा व जमीनीचा रब्ब (स्वामी) आहे. आम्ही त्याच्या खेरीज अन्य एखाद्या उपास्यास कदापि पुकारणार नाही.जर आम्ही असे केले तर अतिशय चुकीची गोष्ट करु.[१७]

८. म्हणजे दुनिया आहे तर बहरलेली परंतु सदा बहार नाही आणि तिला आकर्षक अशासाठी बनविले गेले की मानव जातीची कसोटी घेतली जावी की कोण तिच्या भूलावणीस बळी पडून ऐहिक भक्त बनतो आणि कोण बुद्धि व विचार आणि संयम व धैर्याने वागून व ईश्वरी मार्गदर्शनाचा स्वीकार करून स्वत:ला उत्कृष्ट वैशिष्ट्यांचा मनुष्य सिद्ध करून दाखवितो अर्थात या दुसऱ्या प्रकारच्या माणसांनाच सदैव व बहरलेल्या जन्नतीत वसविले जाईल.

९. म्हणजे कियामतीच्या दिवशी या जमीनीची सर्व बहार संपून जाईल. मनुष्य जे काही यावर उभारतो व बनवतो ते सर्व मातीत मिळेल. कियामतीचा स्फोट माणसाच्या समस्त भौतिक व सांस्कृतिक प्रगतीना मातीत मिळवील तेव्हा अशा गोष्टीला ध्येय उद्दिष्ट बनविण्यात काय लाभ?

१०. असहाबे कहफ (गुहेवाल्या) चा किस्सा हजरत ईसा (येशू) यांच्या अनूयायींशी संबंधित होता परंतु हा किस्सा अशा प्रकारे प्रसिद्ध झाला की मक्कावासी देखील जाणू लागले व यास एक विचित्र घटना समजू लागले. ज्याअर्थी ही घटना मनुष्याच्या दुसऱ्यांदा जिवंत केले जाण्याचे एक प्रकट उदाहरण आहे म्हणून क़ुरआनाने याच्या अवश्यक पैलूंवर प्रकाश टाकला.

ह्याच अरब लोकांना संबोधून क़ुरआनाने प्रश्न केला की, काय तुम्ही असहाबे कह्फ च्या घटनेस विचित्र समजता वस्तुत: ही घटना ईश-सामर्थ्याच्या अनेक निशाण्यांपैकी एका निशाणीची अभिव्यक्ति होती, जी माणसाच्या दुसऱ्यांदा उठविले जाण्याबद्दल युक्तिवाद करते. तुम्ही घटनेच्या बाह्य पैलूवर दृष्टी ठेवून आश्चर्यमुग्ध झालात परंतु यात दुसऱ्या जीवनाच्या घडून येण्याबद्दल युक्तिवाद करणारे जे मार्गदर्शन होते त्याच्या कडून तुम्ही डोळे मिटून घेतले. कह्फचा अर्थ अरबी भाषेत विस्तुत गुहा असा आहे आणि रकीमचा शाब्दिक अर्थ लेख आहे. या अनुषंगाने 'अर्रकीम' शी अभिप्रेत काही भाष्यकारांच्या मते 'शिलालेख' असा आहे. यांच्या कथनानुसार हा शिलालेख कहफ वाल्यांच्या स्मारक म्हणून गुहेत लावला गेला होता व ज्या शहरात ही घटना घडली त्याचे नाव इफेसस (Ephesus)असे सांगितले जाते ते रोमचे एक मोठे शहर होते. आजच्या काळात टर्की मध्ये आहे. ज्या अत्याचारी शासकाच्या अत्याचाराने त्रस्त होऊन कहफ वाल्यांनी गुहेत आश्रय घेतला होता त्याचे नाव दकीयानुस असे दर्शविले जाते. त्याचा काळ इ.स तीसऱ्या शतकात होता आजच्या काळातील एका भाष्यकाराने अर्रकीमशी अभिप्रेत नबतीयां (Nabateaus) चे प्रसिद्ध ऐतिहासिक शहर पेट्रा घेतले आहे.परंतु समस्त विवरण ख्रिश्चनांच्या कथनांमधून उद्धृत आहे. ज्यात कथा कथन व अनुमानाचाच भाग जास्त आहे.यास्तव क़ुरआनने आयत क्र. ४२ मध्ये हा स्पष्ट आदेश दिला आहे की कहफ वाल्यांच्या बाबत त्या लोकांना (मग ते अनेकेश्वरवादी असोत किंवा ख्रिश्चन) काहीहि विचारले जाऊ नये. तथापि एक आधुनिक शोध जो मुहम्मद तयसीर जब्यान यांनी जार्डनच्या दायरतुल आसारिल आम्माच्या मदतीने लावला आहे तो मोठ्या प्रमाणात त्या गुहेला लागू पडतो जिचा उल्लेख क़ुरआनात केला गेला आहे. विद्वान संशोधकाने आपल्या 'अहलुल् कहफ' या पुस्तकांत यावर संशोधनात्मक चर्चा केली आहे व अरबी भाषेतला हा ग्रंथ दारुल एतिसाम इजिप्त द्वारे प्रकाशित झाला आहे. या संशोधनानुसार ही गुहा अम्मान (जार्डन च्या राजधानी) पासून आठ किलोमीटर अंतरावर अर्रजीब येथे आहे आणि हे अर्रजीबच अर्रकीम चे रुपांतरीत स्वरूप होय. जार्डन शासनाच्या पुराण-वस्तु संशोधन खात्याने खोदकामाचे जे काम केले त्यानंतर सत्य अगदी स्पष्ट समोर आले. जे संक्षिप्तपणे खालील प्रमाणे:-

१) ही गार दक्षिणोत्तर आहे आणि सूर्य पूर्व व पश्चिम च्या दिशेत गुहेच्या अगदी जवळून जातो.

२) गुह आतून विस्तृत आहे, जसे क़ुरआनात वर्णन केले गेले आहे.

३) गुहेत आठ कबरी आहेत.

४) गुहेच्या वर मस्जिद भग्नावशेष आहेत. मसजिदीचा उल्लेख आयत क्र. २१ मध्ये केला गेला आहे. या मस्जिदीचे सात खांब आहेत जे संभवत: असहाबे कहफ्च्या संख्येनुसार कायम केले गेले होते.

५) उत्तरेकडील भिंतीवर एका जनावराचे चित्र रेखाटले गेले आहे. ज्यासंबंधी पुरातत्त्ववेत्त्यांचे म्हणणे असे की हे कुत्र्याचे चित्र आहे. या खेरीजच्या भिंतींवर प्राचीन यूनानी अक्षरात काही गोष्टी कोरीव आहे.

६) असहाबे कहफ्च्या गुहेत आश्रय घेण्याचा प्रसंग दकीयानुसच्या काळातील नव्हे किंबहुना ताराजान च्या काळातील आहे ज्याने इ.स. ९८ ते ११७ पर्यंत राज्य केले आणि सन १०९ मध्ये त्याने पूर्व जार्डन जिंकला होता. हा मोठा अत्याचारी शासक होता. जो कोणी मूर्तिपूजेस व मूर्त्यांपुढे बळी देण्यास इन्कार करीत असे त्याला तो ठार करीत असे. त्याच्या काळात हजरत ईसा यांच्या अनुयायींवर भयंकर अत्याचार केले गेले. त्याच्या प्रतिज्ञेचे बेजंतीनी शिक्के हि या गुहेत मिळाले आहेत.

७) मुस्लिम इतिहासकारांच्या कथनान्वये हि या गोष्टीस समर्थन लाभते की ही गुहा अम्मान जवळ आहे. म्हणून मुकद्दसी चे पुस्तक 'अहसनुत्तकासीम' मध्ये उल्लेख आहे की अर्रकीम जार्डन मध्ये अम्मान जवळीत एक शहर आहे आणि याक़ूत हमवी 'मुअजमुल बुल्दान' मध्ये लिहितात - 'अम्मान सिरीयाच्या जवळपास एक शहर आहे आणि हे बल्का देशातले मोठे शहर आहे. याच्या जवळच कहफ व अर्रकीम आहे.

समस्त विवरणाकरिता पहा मुहम्मद तयसीर जबयान लिखित अहलुल कहफ)

आमच्या मते हे संशोधन अगदी उच्च आहे. ख्रिश्चनी निवेदनांच्या व कमकुवत कथांच्या विरोधात अग्रक्रम देण्यायोग्य आहे कहफ व अर्रकीमच्या संदर्भात ज्याअर्थी हे नवे रहस्योद्घाटन आहे, म्हणून याच्या स्पष्टीकरणात आम्हाला काही दीर्घतेने काम घ्यावे लागले.

११. म्हणजे संख्येच्या विवरणात न जाता एवढे जाणणे पुरेसे आहे की ते काही तरुण होते, ज्यांनी आपले ईमान सुरक्षित राखण्यासाठी गुहेत आश्रय घेतला होता एका अत्याचारी वस्तीतून काही तरुणांचे ईमानाच्या सर्व शक्तिनिशी उठून उभे राहणे त्यांच्या सत्या विषयीच्या आदराचे व उच्च साहसाचे लक्षण होय आणि ही गोष्ट तरुणांमध्ये अधिक आढळून येते.

१२. आपल्या धर्म-संरक्षणासाठी व आवाहन कार्यासाठी अल्लाहच्या मदत व मार्गदर्शनाचे अभिलाषी बनले आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने यांचे ज्या प्रकारे मदत व मार्गदर्शन केले ते नंतरच्या घटनांवरून जाहीर होते.

१३. म्हणजे त्यांना कित्येक वर्षे गुहेत झोपवून ठेवले. कानांना थोपटणे झोपविण्याकरिता रुपक योजिले आहे. यास्तव नंतरच्या आयतीत त्यांना उठविल्याचा उल्लेख आहे जो या गोष्टीचा पुरावा होय की त्यांच्यावर झोपेची गुंगी चढविली गेली होती. तसेच आयत १८ मध्येहि हे स्पष्टीकरण आहे की ते झोपत होते.

१४. दोन समूहांशी अभिप्रेत एक कहफ्च्या सहचारीचा समूह व दुसरा अशा लोकांचा ज्यांच्याशी यांचा उठल्या नंतर संबंध आला. जेथपावेतो असहाबे कहफ चा संबंध आहे ते आपल्या वास्तव्य-मुदतीचा योग्य अंदाज लावू शकले नाहीत, किंबहुना आयत क्र. १९ मध्ये स्पष्ठ झाल्याप्रमाणे त्यांना हे जाणवले की आम्ही काही तासच झोपून होतो. राहिलेत शहरवासी लोक ज्यांच्याशी त्यांचा संबंध उठल्यानंतर आला तर त्यांनी शिक्के वगैरे पाहून या निष्कर्षाप्रत पोहचले की हे गुहेत दीर्घ मुदती पावेतो झोपत राहिले. यावरुन स्पष्ट झाले की दीर्घ मुदतीपर्यंत त्यांचे झोपून राहणे एक वस्तुस्थिती होती, मात्र याची जाणीव झोपून राहणाऱ्यांना होऊ शकली नाही. तात्पर्य हे बर्जखच्या जीवनाचे उदाहरण होते जेथे मनुष्य दीर्घकाळ पडून राहील. परंतु कियामतीच्या दिवशी त्याला जेव्हा उठवले जाईल तेव्हा असे जाणवेल की त्याने काही तासच बर्जख विश्वात घालवले आहेत. वेळेच्या प्रदीर्घतेची जाणीव न होणे या गोष्टीचा पुरावा होय की ज्या मनुष्याला मरण आले त्याची जणू कियामत कायम झाली. सर्वश्रेष्ठ अल्लाह ने असाहबे कहफ्च्या किश्श्या पासून या हकीगतीस जाहीर केले आहे.

१५. उपरोक्त आयतींमध्ये या वृत्तांताचा मुखवटा प्रस्तुत केला गेला होता. आता त्याचे विवरण सादर केले जात आहे.

या वृत्तांतास यथायोग ऐकविण्याचा अर्थ असा की या घटने संदर्भात ज्या अनुमानपूर्ण गोष्टी सांगितल्या जात आहेत त्यांच्या विरोधात क़ुरआनाचे निवेदन विशुद्धपणे सत्य घटनेचे निवेदन होय आणि याचा प्रत्येक शब्द सत्याचे प्रतिबिंब आहे. तसेच सर्व पैलूनी हेतुपूर्ण आहे.

१६. यावरुन हे कळले की मार्गदर्शनात अधिकता व प्रगती देखील होते आणि ही अधिकता व प्रगती अल्लाहने प्रदान केलेल्या सुबुद्धिवर अवलंबून आहे.

१७. असहाबे कहफ् चे ऐलान एकेश्वरवादाचे ऐलान होते आणि ज्याअर्थी त्यांनी अत्यंत संकटमय स्थितीत या गोष्टीचे ऐलान केले होते म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या हृदयांना मजबूत केले आणि त्यांचा जो उत्साह वाढविला म्हणून त्यांनी आपल्या जन-समूहाचे भय बाळगून मूर्तिपूजेशी कसलीहि तडजोड केली नाही आणि अल्लाहखेरीजच्या उपास्यांना मानण्यास साफ इन्कार केला.

## कहफ़ आणि अर्रक़ीम

अर्रक़ीम पर्वताचे दृश्य व गुफेवर बनविलेली प्राचीन मसजीद.



गुफेच्या समोरच्य भागाचे दृश्य व तिच्यावर बनलेल्या प्राचीन मस्जिदीचे भग्नावशेष



१५. हा आमचा जन समूह आहे, ज्याने त्याला सोडून इतरांना उपास्य बनवून ठेवले आहे.[१८] हे लोक याच्या समर्थनार्थ एखादे स्पष्ट प्रमाण का नाही आणत ? [१९] मग त्याहून अधिक अत्याचारी आणखी कोण असेल, जो अल्लाहशी असत्याचा संबंध जोडील.[२०]

هٰٓؤُلَآءِ قَوْمُنَا اتَّخَذُوْا مِنْ دُوْنِهٖٓ اٰلِهَةً ۭ لَوْلَا يَاْتُوْنَ عَلَيْهِمْ
بِسُلْطٰنٍۢ بَيِّنٍ ۭ فَمَنْ اَظْلَمُ مِمَّنِ افْتَرٰى عَلَى اللّٰهِ كَذِبًا ۝١٥

१६. आता जेव्हा तुम्ही यांच्यापासून व यांच्या त्या उपास्यांपासून ज्यांची ते अल्लाहऐवजी उपासना करतात, अलग झाला आहत तर गुहेत आश्रय घ्या. [२१] तुमचा पालनकर्ता तुम्हाला आपल्या कृपेचा लाभ घडवील आणि तुमच्या या कार्याकरिता साधन-सामुग्री उपलब्ध करुन देईल.[२२]

وَاِذِ اعْتَزَلْتُمُوْهُمْ وَمَا يَعْبُدُوْنَ اِلَّا اللّٰهَ فَاْوٗٓا اِلَى الْكَهْفِ
يَنْشُرْ لَكُمْ رَبُّكُمْ مِّنْ رَّحْمَتِهٖ
وَيُهَيِّئْ لَكُمْ مِّنْ اَمْرِكُمْ مِّرْفَقًا ۝١٦

१७. आणि तुम्ही सूर्याला (अशा स्थितीत) पाहीले असते की जेव्हा तो उगवतो तेव्हा गुहेपासून उजवीकडे हटलेला असतो आणि जेव्हा मावळतो तेव्हा त्यांच्या डाव्या बाजूस कातरुन निघून जातो आणि ते यात एक विस्तीर्ण जागेत पडून आहेत.[२३] हे अल्लाहच्या निशाण्यांपैकी आहे.[२४] ज्याला अल्लाह मार्गदर्शन देईल तोच सन्मार्गावर आहे आणि ज्याला तो मार्गभ्रष्ट करील तर तुम्हाला त्यांचा कोणीहि सहाय्यक, मार्गदर्शन करणारा आढळणार नाही.

وَتَرَى الشَّمْسَ اِذَا طَلَعَتْ تَّزٰوَرُ عَنْ كَهْفِهِمْ ذَاتَ
الْيَمِيْنِ وَاِذَا غَرَبَتْ تَّقْرِضُهُمْ ذَاتَ الشِّمَالِ وَهُمْ فِيْ
فَجْوَةٍ مِّنْهُ ۭ ذٰلِكَ مِنْ اٰيٰتِ اللّٰهِ ۭ مَنْ يَّهْدِ اللّٰهُ فَهُوَ الْمُهْتَدِ ۚ
وَمَنْ يُّضْلِلْ فَلَنْ تَجِدَ لَهٗ وَلِيًّا مُّرْشِدًا ۝١٧

१८. तुम्ही (यांना पाहिले असते तर ) समजले असते की ते जागत आहेत, वस्तुतः ते झोपत होते. आम्ही त्यांची उजव्या डाव्या बाजूस कूस वळवित राहीलो आणि त्यांचा कुत्रा (गुहेच्या) तोंडाशी हात पसरून बसला होता. जर तुम्ही त्यांना डोकावून पाहिले असते तर उलट पावली पळ काढला असता व तुमच्यावर त्या (दृश्या) मुळे दहशतीची कैफीयत चढली असती. [२५]

وَتَحْسَبُهُمْ اَيْقَاظًا وَّهُمْ رُقُوْدٌ ڰ وَّنُقَلِّبُهُمْ ذَاتَ الْيَمِيْنِ
وَذَاتَ الشِّمَالِ ڰ وَكَلْبُهُمْ بَاسِطٌ ذِرَاعَيْهِ بِالْوَصِيْدِ ۭ لَوِ اطَّلَعْتَ
عَلَيْهِمْ لَوَلَّيْتَ مِنْهُمْ فِرَارًا وَّلَمُلِئْتَ مِنْهُمْ رُعْبًا ۝١٨

१८. यावरुन कळते की असहाबे कहफ चा जन. समूह अनेकेश्वरवादी होता.

१९. म्हणजे शिर्क व मूर्तिपूजा अगदी निराधार आहे. याला जर एखादे प्रमाण आहे तर मग मूर्तिपूजक ते प्रमाण प्रस्तुत का करीत नाही? आणि एक प्रमाणशून्य गोष्ट ते दुसऱ्यांकडून जबरीने का मान्य करवून घेऊ इच्छित आहेत.

२०. ही श्रद्धा की ईश्वराने आपल्या ईशत्वात इतरांना सहभागी ठरविले आहे किंवा ईशत्वाचे अधिकार यांच्यात विभागले गेले आहेत किंवा त्यांना उपासना करण्यायोग्य ठरविले आहे अगदी असत्य व अल्लाहवर मिथ्यारोप आहे कारण अल्लाहने कधीहि अशी एखादी गोष्ट सांगितली नाही. मग जे असत्य अल्लाहविषयी बोलले जावे ते किति गंभीर स्वरुपाचे असेल आणि ते बोलणारा केवढा मोठा अपराधी ठरेल.

२१. गुहेत आश्रय घेण्याचा निर्णय त्यांनी परिस्थितीच्या गंभीरर्यास लक्षात घेऊन केला होता. जसे की आयत क्र. २० द्वारे स्पष्ट आहे. त्यांचा जनसमूह मूर्तिपूजक होता आणि श्रद्धा व धर्माच्या स्वतंत्र्यास मान्य करीत नव्हता. शासन एवढे अत्याचारी होते की एका ईश्वरास मानणाऱ्या व मूर्तिपूजेचा इन्कार करणाऱ्यास ठार करी. अशा परिस्थितीत असहाबे कहफ यांनी आपल्या ईमानाचे रक्षण करण्याकरिता गुहेत आश्रय घेण्याचा निर्णय घेतला. यावरुन हे मार्गदर्शन लाभते की मूळ गोष्ट आपल्या ईमानाचे व धर्माचे संरक्षण होय आणि जर परिस्थिती एवढी बिकट असेल की ही प्राणप्रिय गोष्ट संकटात सापडेल तेव्हा एक ईमान बाळगणारा त्याच्या संरक्षणासाठी हिजरत (देशत्याग) चा मार्ग अंगिकारु शकतो किंवा एखाद्या गुहेतहि आश्रय घेऊ शकतो अशाच प्रसंगाकरीता हदीस मध्ये उल्लेखिले गेले आहे:-

> ''समीप आहे की मुसलमानाचा उत्कृष्ट माल त्याच्या जवळ मेंढ्या असेल ज्याला घेऊन त्याने पर्वत शिखरावर किंवा एखाद्या अशा एकांत स्थानी जिथे खूप पाऊस पडत असावा, प्रस्थान करावे जेणेकरून आपल्या धर्माचे उत्पात उपद्रवापासून रक्षण करु शकावे''.(बुखारी-किताबुल ईमान)

स्पष्ट असावे की याचा कसलाहि संबंध ना ब्रम्हचर्याशी आहे ना सूफी संतांच्या एकांतवासाशी, किंबहुना हे अशा संकटमय परिस्थितीकरिता आहे जेव्हा आपल्या ईमान व धर्मास वाचविण्याकरिता या खेरीज कोणताहि मार्ग नसेल.

२२. अरबी भाषेची ही शैली आहे की जेव्हा एखाद्या समूहतील लोक आपसात एकमेकाला संबोधितात तेव्हा 'तुम्ही' व 'तुमचा' ही सर्वनामे वापरली जातात. अरबीच्या या शैलीस जर समोर ठेवले गेले नाही तर ही चुकीची समजूत होऊ शकते की संबोधणारा- आपसातील इसम नव्हे किंबहुना अन्य एखादा आहे.

असहाबे कहफ यांनी अल्लाहच्या मदतीवर भरवसा करीत पूर्ण विश्वासाने सांगितले की जेव्हा आम्ही एकमेव ईश्वरालाच उपास्य मानले आहे आणि शिर्क व अनेकेश्वर वाद्यांपासून विभक्तता अंगिकारली आहे तर सर्वश्रेष्ठ अल्लाह आम्हाला आपल्या कृपेने खचितच उपकृत करेल आणि ज्या कार्यानिशी आम्ही उठलो आहोत त्यात तो निश्चित आमची मदत करील.

२३. म्हणजे जेव्हा ते गुहेत आश्रयाला गेले ते अशा प्रकारचे होते की सूर्य-प्रकाश आंतल्या विस्तृत जागेत ज्यात ते झोपून होते, पोहचत नसे. अर्थात गुहा दक्षिणोत्तर आहे.

२४. निशाणी या गोष्टीची आहे की जे अल्लाहवर भरवसा करतात,सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांची कशा प्रकारे मदत करतो. असहाबे कहफची एका अशा गुहेकडे मार्गदर्शन केले जी या नाजुक परिस्थितीत त्यांच्या संरक्षणासाठी प्रत्येक दृष्टीने योग्य होती आणि ज्यात त्यांना शांतता लाभली, हे या गोष्टीचे लक्षण होय की सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या एकनिष्ठ दासांची नाजूक प्रसंगी मदत करतो व त्यांना मार्गदर्शनहि करतो.

२५. म्हणजे ते अशा प्रकारे झोपत होते व त्याबरोबरच कूस बदलत जात होते की जर संयोगवश एखाद्या माणसाने त्यांना पहिले असते तर तो हेच समजला असता की ते केवळ पहुडलेले आहेत व जागत आहेत आणि त्यांचा कुत्रा देखील गुहेच्या तोंडावर हात पसरून बसला होता. या अंध:कारमय गुहेत जर एखाद्या माणसाने डोकावून पाहिले असते तर हे दृश्य इतके भितिदायक होते की पाहणारा उलट पावली पळाला असता. त्याला हे भय वाटले असते की न जाणो हे कोणते लोक आहेत. जे या अंधाऱ्या गुहेत लपले आहेत आणि त्यांचे इरादे काय आहेत.

सर्वश्रेष्ठ अल्लाहने ही भितिदायक स्थिती अशासाठी निर्माण केला होती की कोणत्याहि माणसाने यांच्याजवळ येण्याचे धाडस करू नये व ते अगदी सुरक्षित रहावेत. त्यांच्या संरक्षणाची ही असामान्य उपाययोजना होती जी त्यांच्यासाठी केली गेली.

कुत्र्याला त्यांनी या वैराण स्थानात आपल्या संरक्षणाकरिता सोबतीला ठेवले होते जी एक उचित गरज होती म्हणून शरीअतच्या दृष्टीने याबाबत कसलाहि आक्षेप येत नाही.

१९. आणि अशाच प्रकारे आम्ही त्यांना उठविले [२६] अशासाठी की त्यांनी आपसात विचारपूस करावी.[२७] त्यांच्यापैकी एक बोलणारा बोलला, किती वेळ राहीलोत? त्यांनी उत्तर दिले एक दिवस किंवा याहून कमी राहीलो असावेत. मग ते म्हणाले, तुमचा पालन कर्ताच अधिक चांगले जाणतो की तुम्ही किती वेळ राहिलात ?[२८] आता एका माणसाला चांदीचे हे नाणे देऊन शहरात पाठवा. त्याने बघावे की कोणाजवळ स्वच्छ शुध्द अन्न मिळते.[२९] तेथून त्याने तुमच्यासाठी थोडे खाद्य आणावे आणि गुपचुपरित्या हे काम करावे- कोणाला आमची खबर होऊ देऊ नये.

وَكَذَٰلِكَ بَعَثْنَاهُمْ لِيَتَسَاءَلُوا بَيْنَهُمْ ۚ قَالَ قَائِلٌ مِّنْهُمْ
كَمْ لَبِثْتُمْ ۖ قَالُوا لَبِثْنَا يَوْمًا أَوْ بَعْضَ يَوْمٍ ۚ قَالُوا رَبُّكُمْ
أَعْلَمُ بِمَا لَبِثْتُمْ فَابْعَثُوا أَحَدَكُم بِوَرِقِكُمْ هَٰذِهِ
إِلَى الْمَدِينَةِ فَلْيَنظُرْ أَيُّهَا أَزْكَىٰ طَعَامًا فَلْيَأْتِكُم بِرِزْقٍ
مِّنْهُ وَلْيَتَلَطَّفْ وَلَا يُشْعِرَنَّ بِكُمْ أَحَدًا ⑲

२०. जर त्यांना खबर झाली तर ते तुम्हाला संगसार करतील [३०] (दगडांनी ठेचून मारतील) किंवा आपल्या धर्मात परत नेतील जर असे झाले तर तुम्ही कधीहि सफलता प्राप्त करू शकणार नाहीत.

إِنَّهُمْ إِن يَظْهَرُوا عَلَيْكُمْ يَرْجُمُوكُمْ أَوْ يُعِيدُوكُمْ
فِي مِلَّتِهِمْ وَلَن تُفْلِحُوا إِذًا أَبَدًا ⑳

२१. अशा प्रकारे आम्ही लोकांना त्यां (च्या अवस्थे) विषयी अवगत करविले.[३१] यासाठी की लोकांनी हे जाणून घ्यावे की अल्लाहचा वायदा सच्चा आहे व कियामतीच्या येण्याविषयी काहीच शंका नाही. [३२] जेव्हा लोक यांच्या बाबतीत भांडत होते [३३] तेव्हा ते म्हणाले, यांच्यावर एक भिंत उभी करा. त्यांचा पालनकर्ताच त्यांना अधिक चांगले जाणतो [३४] जे लोक त्यांच्या मामल्यात प्रभावशाली होते ते म्हणाले आम्ही अवश्य यांच्यावर एक मसजिद बनवू.

وَكَذَٰلِكَ أَعْثَرْنَا عَلَيْهِمْ لِيَعْلَمُوا أَنَّ وَعْدَ اللَّهِ حَقٌّ
وَأَنَّ السَّاعَةَ لَا رَيْبَ فِيهَا إِذْ يَتَنَازَعُونَ
بَيْنَهُمْ أَمْرَهُمْ ۖ فَقَالُوا ابْنُوا عَلَيْهِم بُنْيَانًا ۖ
رَّبُّهُمْ أَعْلَمُ بِهِمْ ۚ قَالَ الَّذِينَ غَلَبُوا عَلَىٰ أَمْرِهِمْ
لَنَتَّخِذَنَّ عَلَيْهِم مَّسْجِدًا ㉑

२२. हे लोक म्हणतील की ते तीन होते. चौथा त्यांचा कुत्रा होता. आणि हेहि म्हणतील की पाच होते. सहावा त्यांचा कुत्रा होता. हे सर्व अंधारात बाण सोडतात. [३५] आणखी काही लोक म्हणतील सात होते व आठवा त्यांच्या कुत्रा होता. सांगा माझा पालनकर्ताच त्यांच्या संख्योविषयी अधिक चांगले जाणतो. फार थोडे लोक त्यांच्या संख्येशी परिचित आहेत. म्हणून तुम्ही त्यांच्या मामल्यात वरवरच्या विविदाव्यतिरिक्त वादविवाद करु नका आणि ना त्यांच्याविषयी एखाद्या जवळ काही विचारपूस करा.[३६]

سَيَقُولُونَ ثَلَاثَةٌ رَّابِعُهُمْ كَلْبُهُمْ وَيَقُولُونَ خَمْسَةٌ
سَادِسُهُمْ كَلْبُهُمْ رَجْمًا بِالْغَيْبِ ۖ وَيَقُولُونَ سَبْعَةٌ
وَثَامِنُهُمْ كَلْبُهُمْ ۚ قُل رَّبِّي أَعْلَمُ بِعِدَّتِهِم مَّا يَعْلَمُهُمْ
إِلَّا قَلِيلٌ ۗ فَلَا تُمَارِ فِيهِمْ إِلَّا مِرَاءً ظَاهِرًا وَلَا
تَسْتَفْتِ فِيهِم مِّنْهُمْ أَحَدًا ㉒

२६. म्हणजे या असामान्य स्थितीत झोपविल्यानंतर त्यांना जागे केले.

२७. म्हणजे त्यांनी एकमेकांपासून हे जाणून घ्यावे की ते किती वेळ झोपत राहीले.

२८. यांच्या आपसातील संभाषणावरून हे स्पष्ट झाले की ते आपल्या निद्रावस्थेत पडून राहण्याचे उचित अनुमान लावू शकले नाहीत. एकाने अनुमान लावले की एक दिवस किंवा याहून कमी आणि जेव्हा ते एखाद्या निष्कर्षाप्रत पोहचू शकले नाहीत तेव्हा त्यांनी हा मामला अल्लाहवर सोपविला की तोच अधिक चांगले जाणतो की किती काळ ते या स्थितीत पडून राहीले.

वस्तुत: ते दीर्घकाळ पावेतो पडून राहीले परंतु जेव्हा जागे झाले तेव्हा त्यांना असे वाटले की जणू एक दिवस किंवा याहूनहि कमी वेळ त्यांनी झोपेत काढला. त्यांची ही घटना आलमे बर्जखच्या हकीगतीस समजण्याकरिता एक निशाणी आहे. मेल्यानंतर मनुष्य दीर्घकाळ पावेतो आलमे बर्जखमध्ये पडून राहील आणि जेव्हा कियामतीच्या दिवशी त्यास उठविले जाईल तेव्हा त्याला असे वाटेल की एक दिवस किंवा काही तासच ते या अवस्थेत पडून राहीले.

२९ जागे झाल्यानंतर त्यांना खाण्याची इच्छा झाली म्हणून त्यांनी आपल्या एका माणसाला चांदीचे नाणे देऊन शहरात पाठवू इच्छिले व त्याला ही आज्ञा दिली की विचारपूस करून स्वच्छ-शुद्ध अन्न घेऊन यावे. ते समजत होते की शहराचे वातावरण तेच अनेकेश्वरवादी वातावरण आहे, ज्याला सोडून ते आले होते आणि अनेकेश्वरवादी सोसायटीत हलाल व हरामचा कसलाहि भेद नसतो. मूर्त्यांच्या नावाने जबह (पशु-वध) हि असू शकतो म्हणून त्यांनी स्वच्छ शुद्ध अर्थात हलाल खाद्य आणण्याची ताकीद केली. यावरून त्यांच्या मनाच्या स्वच्छ शुद्धतेची कल्पना येते.

३०. यावरून हे स्पष्ट होते की ज्या जन-समूहाला ते सोडून आले होते तो किती अत्याचारी होता त्यांच्याजवळ त्यांच्या मूर्तिपूजक धर्माचा त्याग करण्याची शिक्षा मृत्युदंड होती, तसेच हे की ते आपल्या धर्मात परत आणण्याकरिता जबरदस्ती करीत.

३१. तो मनुष्य जेव्हा जुन्या काळातील नाणे घेऊन जेवण विकत घेण्याकरिता गेला तेव्हा हे रहस्य उलगडले की हे लोक दीर्घ मुदती पावेतो गुहेत झोपत राहीले आणि आता जागे झाले आहेत. ही ती साधने होत जी अल्लाहने लोकांना त्यांच्या अवस्थेशी परिचित करण्याकरिता घडविली.

३२. सर्वश्रेष्ठ अल्लाहने या वस्तुस्थितीस अनावरित करण्याची उपाय योजना अशासाठी केली की कियामतीविषयी लोकांच्या शंका कुशंका दूर व्हाव्यात व त्यांना हा विश्वास व्हावा की अल्लाहचे वचन पूर्ण होईलच. जर अल्लाहच्या सामर्थ्यशक्तिने मनुष्य दीर्घकाळ झोपून पुन्हा उठू शकतो तर त्याच्या सामर्थ्यान्वये तो मेल्यांनतर पुन्हा का उठू शकत नाही? जर इहलोकात नित्यनेमाविपरित घटना घडू शकतात तर या जगाच्या विनाशानंतर दुसऱ्यांदा जिवित केली जाण्याची नित्यनेमाविपरित घटना का म्हणून घडू शकत नाही?

३३. शब्दशैली वरुन हे स्पष्ट होते की यानंतर असहाबे कह्फचे निधन झाले व त्यांच्या मृत्युबद्दल हा अनावश्यक विवाद उद्‌भवला की त्यांना कोणत्या प्रकारे दफन केले जावे व त्यांचे स्मारक कशा प्रकारे कायम केले जावे.

३४. त्या वेळी शासन देखील बदलले होते आणि प्रजेचा धर्म देखील. प्रजा व शासन दोघांनी ख्रिश्चन मत अंगिकारले होते म्हणून असहाबे कहफ विषयी दोघांनाहि श्रद्धा होती. एक परिस्थिती ती की प्रजा व शासन दोघेहि त्यांना दगडांनी ठेचून मारण्यास टपून बसले होते व एक परिस्थिती ही की दोघेहि त्यांचे श्रद्धाळू बनले आणि जेव्हा श्रद्धाळू बनले तेव्हा समतोल बाकी राहिला नाही. त्यांना रुजू करण्याचे स्थान बनविण्याकरिता त्यांच्या कबरीवर मस्जिद उभारणे जरूरी समजले गेले. जरी त्या लोकांमध्ये एक समूह असा होता ज्याची विचारशैली योग्य होती व त्याने हा योग्य प्रस्ताव मांडला होता की त्यांच्या प्रेतांना गुहेतच राखले जावे व गुहेच्या तोंडावर एक भिंत उभारली जावी, जेणेकरून ते तिच्यात दफन व्हावेत व त्यांचा मामला अल्लाहच्या हवाली केला जावा जो त्यांच्या स्थितीशी चांगल्याप्रकारे परिचित आहे. श्रद्धेच्या आहारी जाऊन एखादे अप्रिय कृत्य आमच्या हातून न घडो परंतु एवश्वरवाद्यांचा हा प्रस्ताव त्या लोकांना मान्य करण्याजोगा ठरला नाही. ज्यांच्या हाती चर्च चा सत्ताधिकार व शासनाची सूत्रे होती. त्यांनी आपली विकृत विचार सरणी व बिदअत प्रिय स्वभाव लक्षात घेता या गोष्टीचा निर्णय घेतला की यांच्या कबरीवर अर्थात गुहेवर एक प्रार्थना स्थळ उभारले जावे, जेणेकरून त्यांच्या विषयीची श्रद्धा व्यक्त व्हावी.

कबरीविषयीची हीच ती श्रद्धा होय जी माणसाला कब्रपूजा व मार्गभ्रष्टतेकडे नेते. म्हणून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कबरीवर ईमारत उभारण्याबाबत व मस्जिदी बनविण्याबाबत सक्तिने मना फर्माविले आहे.

لَعَنَ اللّٰهُ الْيَهُوْدَ وَ النَّصَارَى اِتَّخَذُوْا قُبُوْرَ اَنْبِيَائِهِمْ مَسَاجِدَ

''अल्लाह यहुदी व ख्रिश्चनांना शापित करो त्यांनी आपल्या पैगंबरांच्या कबरीना प्रार्थना स्थळ बनविले''
(बुखारी-किताबुल जनाइज)

اُولٰئِکَ اِذَا مَاتَ مِنُھُم الرَّجُلُ الصالِحُ بَنَوا عَلٰی قَبُرِہٖ مَسُجِدًاوَ صَوَّرُوُا فیه تلکَ الصُّوَرَ اُولٰئِکَ شرارُ الُخَلُقِ عندَ اللّٰہِ۔ (بخاری کتاب الجنائز)

"त्यांच्यात जेव्हा एखादा सदाचारी मनुष्य मृत्यु पावत असे तेव्हा ते त्याच्या कबरीवर उपासना-गृह (मस्जिद) बनवित व त्यात त्याचे चित्र बनवित. हे लोक अल्लाहच्या दृष्टीने सर्वाधिक निकृष्ट निर्मिती ठरतील". (बुखारी- किताबुल् जनाइज़)

نَھیٰ رسول اللّٰہ صلی اللہ علیہ وآلہٖ وسلم اَنۡ یُّجَصَّصَ الۡقَبۡرُ وَ اَنۡ یُّقۡعَدَ عَلَیۡهِ وَاَنۡ یُّبۡنیٰ عَلَیۡهِ۔ (بخاری کتاب الجنائز)

"पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कब्रीला चुन्याने मजबूत करण्यास, तिच्यावर बसण्यास व त्यावर ईमारत बनविण्यास मनाई फर्माविले आहे." (मुस्लिम-किताबुल जनाइज़)

उपरोक्त हदीस वचनांना लक्षात घेता थोर पुरुषांच्या कबरींवर शानदार मकबरे आणि दरग्यांची उभारणी इस्लामी शिकविण्याच्या अगदी विरूद्ध व कबर पूजा व मार्गभ्रष्टतेस कारणीभूत आहे.

काही विद्वानांनी या आयतीचा चुकीचा अर्थ लावला आहे आणि ते या आयतीस थोर पुरुषांच्या कबरींवर मस्जिद उभारण्याबाबत शास्त्रसंमत म्हणून सादर करतात. परंतु पैगंबर वचनाच्या स्पष्टीकरणानंतर त्यांचा हा युक्तिवाद अगदी चुकीचा आहे. यास्तव अल्लामा आलूसीने आपल्या 'तफसीर रूहूल मआनी' या पुस्तकात यावर सक्तिने अंकूश ठेवला आहे आणि त्यांच्या उफराट्या तर्काचा समाचार घेतला आहे आणि स्पष्टपणे सदाचारी लोकांचा कबरींवर इमारत बनविले विहीत ठरविण्यास असत्य व दुषित वचन ठरविले आहे. (पहा- रुहूल मआनी खंड-५ पृष्ठ- २३७)

आयतीला जर पूर्णपणे विचाराधीन राखले गेले तर तिचा हा उद्देश्य स्पष्ट होईल की असहाबे कह्फला दीर्घ मुद्‌तीनंतर जागे करुन सर्वश्रेष्ठ अल्लाहने कियामतीच्या घडून येण्याबद्दल एक निशाणी लोकांना उपलब्ध करून दिली होती. म्हणून या गोष्टीची गरज होती की त्यांनी आपल्या दृष्टीला केंद्रित केले असते व असहाबे कहफच्या संबंधाने जेव्हा बोलले असते तर मात्र गोष्टीस मूळ विषय बनविला असता. परंतु त्यांच्या श्रद्धाळूंनी मूळ विषयाला सोडून त्यांचे स्मारक कायम करण्यास मूळ विषय बनविले.

३५. म्हणजे या सर्व अटकळीच्या गोष्टी आहेत.

३६. ज्यांना मूळ उद्देश्याविषयी स्वारस्य नव्हते व जे या घटनेपासून कोणताहि बोध घेऊ इच्छित नव्हते. त्यांनी असहाबे कह्फच्या संख्या वगैर संबंधी अनावश्यक चर्चाविवाद उभा केला होता. क़ुरआनाने त्यांच्या या विवादांना उत्तर न देता मोजक्या शैलीत वृत्तांत ऐकविला व बोधजनक पैलूंना दृगोचर केले. त्या सोबतच ईमान बाळगणाऱ्यांना हे मार्गदर्शन केले की त्यांनी या चर्चा विवादांवर ओझरता दृष्टिक्षेप टाकावा. त्यात गुरफटू नये. संख्येविषयी क़ुरआनने तिसऱ्या कथनास (की त्यांची संख्या सात होती) पहिल्या दोन कथनाप्रमाणे रद्द केले नाही ना ते योग्य असण्याविषयी स्पष्टीकरण केले, किंबहुना फर्माविले, सांगा माझा पालनकर्ताच त्यांच्या संख्येला अधिक चांगले जाणतो. यास्तव आम्हाला कसलीहि चौकशी न करता या मार्गदर्शनानुसार आचरण करावयाचे आहे.

असे दिसून येते की असहाबे कह्फच्या घटनेने या काळातच कथेचे रूप धारण केले होते. क़ुरआनने याच्या मूळ हकीगतीस जी कथेआड लपली होती लोकांसमोर आणल्यानंतर ईमान बाळगणाऱ्यांना आज्ञा दिली की आता या किश्श्याबाबत कोणाला काहीहि विचारायची गरज बाकी राहिली नाही. म्हणून कोणाला कसलाहि प्रश्न विचारला न जावा परंतु मोठ्या खेदाची गोष्ट आहे की क़ुरआनाच्या या स्पष्ट आज्ञेनंतरहि भाष्यांमध्ये ख्रिश्चनांच्या कथात्मक गोष्टींना स्थान लाभले, येथपावेतो की असहाबे कह्फची नावे तसेच त्यांच्या कुत्राचे नाव देखील वर्णिले गेले!

परंतु हे की अल्लाहने इच्छिल्यास आणि जर तुम्ही विसरुन जाल तर आपल्या पालन कर्त्याचे स्मरण करा आणि म्हणा, अपेक्षा आहे माझा पालनकर्ता याहूनहि अधिक सन्मार्गाकडे माझे मार्गदर्शन करील. आणि ते आपल्या गुहेत तीनशे वर्षे राहिलेत आणि अधिक नऊ वर्षे. (अल-क़ुर्आन)

وَلَا تَقُوْلَنَّ لِشَایْءٍ اِنِّیْ فَاعِلٌ ذٰلِكَ غَدًا ﴿۲۳﴾

२३. आणि कोणत्याहि गोष्टीविषयी असे म्हणू नका की मी उध्या हे करीन.

اِلَّآ اَنْ یَّشَآءَ اللّٰهُ ۫ وَاذْكُرْ رَّبَّكَ اِذَا نَسِیْتَ وَقُلْ عَسٰٓی
اَنْ یَّهْدِیَنِ رَبِّیْ لِاَقْرَبَ مِنْ هٰذَا رَشَدًا ﴿۲۴﴾

२४. परंतु हे की अल्लाहने इच्छिल्यास. [३७] आणि जर तुम्ही विसरुन जाल तर आपल्या पालन कर्त्याचे स्मरण करा [३८] आणि म्हणा, अपेक्षा आहे माझा पालनकर्ता याहूनहि अधिक सन्मार्गाकडे माझे मार्गदर्शन करील.[३९]

وَلَبِثُوْا فِیْ كَهْفِهِمْ ثَلٰثَ مِائَةٍ سِنِیْنَ
وَازْدَادُوْا تِسْعًا ﴿۲۵﴾

२५. आणि ते आपल्या गुहेत तीनशे वर्षे राहिलेत आणि अधिक नऊ वर्षे.

قُلِ اللّٰهُ اَعْلَمُ بِمَا لَبِثُوْا ۚ لَهٗ غَیْبُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ؕ
اَبْصِرْ بِهٖ وَاَسْمِعْ ؕ مَا لَهُمْ مِّنْ دُوْنِهٖ مِنْ وَّلِیٍّ ۫ وَّلَا یُشْرِكُ
فِیْ حُكْمِهٖٓ اَحَدًا ﴿۲۶﴾

२६. सांगा, अल्लाहच अधिक चांगले जाणतो की ते किती काळ राहिलेत. [४०] आकाशांच्या व जमीनीच्या गुप्त गोष्टींचे ज्ञान केवळ त्याला आहे. केवढा वैभवशाली आहे तो पहाणारा व ऐकणारा ! त्याच्या शिवाय त्यांचा कोणीहि पुरस्कर्ता नाही आणि तो आपल्या हुकमांत कोणालाहि सहभागी करीत नाही. [४१]

وَاتْلُ مَآ اُوْحِیَ اِلَیْكَ مِنْ كِتَابِ رَبِّكَ ؕ لَا مُبَدِّلَ لِكَلِمٰتِهٖ ۚ
وَلَنْ تَجِدَ مِنْ دُوْنِهٖ مُلْتَحَدًا ﴿۲۷﴾

२७. आणि तुमच्या पालनकर्त्याचा जो ग्रंथ तुमच्यावर अवतरीत केला गेला आहे तो ऐकवा. [४२] त्याच्या फर्मानांना कोणी बदलू शकत नाही. [४३] आणि त्याच्या शिवाय तुम्हाला कोठेहि आश्रय लाभू शकणार नाही.

وَاصْبِرْ نَفْسَكَ مَعَ الَّذِیْنَ یَدْعُوْنَ رَبَّهُمْ بِالْغَدٰوةِ
وَالْعَشِیِّ یُرِیْدُوْنَ وَجْهَهٗ وَلَا تَعْدُ عَیْنٰكَ عَنْهُمْ ۚ
تُرِیْدُ زِیْنَةَ الْحَیٰوةِ الدُّنْیَا ۚ وَلَا تُطِعْ مَنْ اَغْفَلْنَا
قَلْبَهٗ عَنْ ذِكْرِنَا وَاتَّبَعَ هَوٰىهُ وَكَانَ اَمْرُهٗ فُرُطًا ﴿۲۸﴾

२८. आणि अशा लोकांच्या संगती वर समाधान बाळगा जे आपल्या पालन कर्त्यास, त्याची प्रसन्नात प्राप्त करण्यासाठी सकाळ संध्याकाळ पुकारतात. तुमच्या नजरा ऐहीक जीवनाच्या सजावटी खातीर यांच्या कडून फिरता कामा नये. [४४] आणि अशा माणसाचे म्हणणे मानु नका,ज्याच्या हृदयास आम्ही आपल्या स्मरणापासून गाफील केले आहे, व जो आपल्या इच्छा-आकांक्षांच्या मागे लागला आहे व ज्याचा मामला मर्यादे बाहेर गेला आहे.[४५]

३७. म्हणजे दृढतापूर्वक ही गोष्ट म्हणू नका की मी अमुक एक काम उद्या करीन. तुम्हाला काय माहित की उद्या कोणती परिस्थिती उद्‌भवेल व तुम्हाला ते काम करणे शक्य होईल किंवा नाही म्हणून अशा प्रसंगी 'इन्शाअल्लाह' म्हटले पाहिजे अर्थात अल्लाहने इच्छिल्यास. ही या गोष्टीची अभिव्यक्ति होय की खरी गोष्ट अल्लाहची मर्जी होय, माझा स्वत:चा फैसला नव्हे त्याची मर्जी झाली तर मी अमुक एक काम करु शकेन अन्यथा नाही. यास्तव ईमान बाळगणाऱ्याचा हा स्वभाव आहे की जेव्हा तो एखादा वायदा करतो किंवा एखादे काम भविष्यात करण्याचा इरादा जाहीर करतो, तेव्हा 'इन्शाअल्लाह' ज़रुर म्हणतो.

हा तर झाला आयतीचा सर्वसाधारण पैलू राहिला निवेदन-क्रमाच्या दृष्टने खास पैलू तर हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना मार्गदर्शन आहे की जर लोक प्रश्न विचारतील ज्याचे उत्तर ईश-आदेश (वही) वर अवलंबून असेल तर 'मी उद्या याचे उत्तर देईल' से म्हणू नका उलट असे म्हणा की अल्लाहने इच्छिल्यास.

३८. म्हणजे जेव्हा तुम्ही 'इन्शाअल्लाह' म्हणणे विसरुन जाल व जेव्हा तुम्हाला आठवण येईल तेव्हा आपल्या पालनकर्त्याचे स्मरण करा जेणेकरुन जे विस्मरण घडले होते त्याचा परिहार व्हावा.

३९. म्हणजे असहाबे कह्‌फ ला ज्या प्रकारे त्यांने सन्मार्गाचे मार्ग खुले केलेत, अपेक्षा आहे याहूनहि जास्त सन्मार्गाचे मार्ग तो माझ्यासाठी खुले करील. हे उत्तर आहे मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांना की तुम्ही अत्याचार बळजबरीची पध्दत अंगिकारुन तिच परिस्थिती निर्माण केली आहे जी असहाबे कहफ साठी त्यांच्या जन समूहाने निर्माण केली होती. परंतु माझा पालनकर्ता या अवस्थेत माझ्यासाठी यांच्याहून अधिक यशाचे मार्ग उघडील हा संकेत या गोष्टीकडे होता की लवकरच देशत्यागाचा मामला उद्‌भवणार आहे. म्हणून काही दिवसानंतरच ही अवस्था समोर आली व पैगंबर सोरे नामक गुहेत आश्रय घेण्यास विवश झाले. परंतु या गुहेत त्यांना फक्त तीन दिवस रहावे लागले. यानंतर जेव्हा ते मदीनेस पोहचले, तेव्हा यशाचे मार्ग त्यांच्याकरिता उघडत गेले.

४०. हे वाक्य या गोष्टीस प्रमाणित करते की वर तीनशे नऊ वर्षाच्या मुदतीचा जो उल्लेख केला गेला आहे, ते लोकांचे कथन होय ज्यास सर्वश्रष्ठ अल्लाहने प्रस्तुत केले आहे. वर आयत क्र.२२ मध्ये संख्येच्या बाबतीत लोकांच्या विविध कथनांचा उल्लेख केला गेला होता या दरम्यान गौण बाब आली आता पुन्हा त्याच निवेदन क्रमात असहाबे कहफ्च्या गुहेत पडून राहण्याच्या मुदतीविषयी लोकांचे कथन उल्लेखिले गेले की ते तीनशे नऊ वर्षे सांगतात. परंतु या विवादात गुरफटण्याची गरज नाही. जेवढा काळ देखील राहिले, अल्लाह अधिक चांगले जाणतो.

या किश्शयाच्या आरंभात सर्वश्रेष्ठ अल्लाहने हे स्पष्ट केले आहे की ते गुहेत वर्षानुवर्षे राहीलेत (आयत क्र.११) म्हणजे ते एका दीर्घ मुदती पावेतो गुहेत झोपून राहीले आणि एवढी गोष्ट बोध ग्रहण करण्यास पुरेशी आहे.

असहाबे कहफच्या संबंधाने भाष्यकारांनी चमत्कारांचा (करामतींचा) विवाद उभा केला आहे. जेथपावेतो या गोष्टीचा संबंध आहे की एखाद वेळी सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या सदाचारी दासांकरवी एखादी असामान्य घटना उजेडात आणतो, एक वस्तुस्थिती आहे ज्याचे उदाहरण असहाबे कहफ्ची घटनाहि होय व हजरत मरीयमची घटना देखील. ह्या घटना सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्याचे प्रमाण आहे व या गोष्टीचा पुरावा होय की समस्त सृष्टीवर त्याचे शासन आहे आणि तो इच्छिल तेव्हा नैसार्गिक नियमांमध्ये परिवर्तन आणू शकतो. राहीली ती व्यक्तिमत्तवे ज्यांच्याद्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाह एखाद्या असामान्य घटनेस उजेडात आणतो तर या घटना त्यांच्या सदाचारी असण्याचे चिन्ह जरुर आहे. ज्या आधारे त्यांना ही करामत म्हणजे सन्मान प्रदान केला गेला परंतु या घटनांना उजेडात आणण्यात त्यांचा एवढा हस्तक्षेप नाही आणि ते या मामल्यात अगदी अधिकारशून्य आहेत, कोणताहि चमत्कार ते दाव्यासह दाखवू शकत नाही, जेव्हा एक पैगंबर अल्लाहच्या हुकुमाने दाव्यासह चमत्कार दाखवितो, म्हणून असा चमत्कार अल्लाहचे स्पष्ट प्रमाण होय. तात्पर्य चमत्कार संबंधी लोकांची ही कल्पना की अवलीया व धार्मिक महापुरुष चमत्कार (करामत) दाखवतात, अगदी चुकीची आहे. उचित हे की सर्वश्रेष्ठ अल्लाह कधी कधी एखाद्या खास हेतूने एका सदाचारी मनुष्याद्वारे एखाद्या असामान्य घटनेस उजेडात आणतो अर्थात असल्या घटना क्वचितच घडतात आणि काही प्रसंगी अशा व्यक्तिमत्त्वास या गोष्टीची खबर देखील नसते की त्याच्या द्वारे एखादा चमत्कार जाहीर होत आहे यास्तव असहाबे कहफ् एका दीर्घ मुदती पावेतो झोपून राहीले, पण त्यांना या गोष्टीची जाणीवहि झाली नाही की त्यांच्या द्वारे चमत्कार (करामत) उदयास येत आहे. आणि जेव्हा ते जागे झाले तेव्हा आपल्या झोपण्याच्या मुदतीचा उचित अंदाजहि लावू शकले नाहीत. मग त्यांनी चमत्कार दाखविला तो कोणता? ही तर सर्वश्रेष्ठ अल्लाहची निशाणी होती जी त्यांच्या द्वारे जाहीर झाली. हीच त्यांच्याकरिता मान व चमत्काराची बाब होय.

स्पष्ट असावे की मुसलमानांमध्ये अवलीया व पीरांच्या ज्या करामती प्रसिध्द आहेत ती अधिकांश या व्यक्तिमत्वांशी असामान्य श्रद्धाभाव निर्माण करण्याकरिता अतिशयोक्ति प्रिय स्वभावांनी रचलेल्या आहेत. वस्तुस्थितीशी तर यांचे दूरचेहि नाते नाही . या निराधार किस्सा-कहाण्यांनी मुसलमानांमध्ये अवलीया भक्तिची

विचारसरणी निर्माण केली आहे.

४१. मूळ ग्रंथात 'हुक्म' हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा अर्थ फैसला असाहि आहे व ते अधिकार देखील ज्यांच्या तहत फैसले व आदेश फर्माविले जातात.अल्लाह आपल्या हुकुमा मध्ये कोणालाहि सहभागी करीत नाही याचा अर्थ असा की आपल्या अधिकारात त्याने कोणालाहि सहभागी ठरविले नाही. एकेश्वरवादाची हकीगत ही की ईशत्वाचे अधिकार एक अल्लाह करिताच आहेत, उलट शिर्कचे तत्वज्ञान असे की ईशत्वाच्या अधिकारात इतरहि सहभागी आहेत आणि जो शिर्क (अनेकेश्वर भक्ति) मुसलमानांमध्ये अवलीया भक्तिच्या मार्गाने आला आहे तो असा की अल्लाहने स्वत:च आपले काही अधिकार अवलीयांना देऊन टाकले आहेत. या शिर्कवर ज्याअर्थी अवलीयाशी श्रद्धेचे लेबल लागलेले आहे म्हणून मुसलमान सहजगत्या मार्गभ्रष्ट होतात.

या श्रद्धेच्या खोट्या असण्या विषयी ही एक आयतच पुरेशी आहे ज्यात स्पष्टत: निवेदिले गेले आहे की अल्लाह आपल्या अधिकारांमध्ये कोणालाहि सहभागी करीत नाही.

४२. क़ुरआन ऐकविण्याचा हा आदेश सर्वसामान्यपणे दिला गेला आहे म्हणजे केवळ मुसलमानांनाच ऐकविणे अभिप्रेत नाही, किंबहुना त्या समस्त माणसांना ऐकविणे जे कुरआन ऐकण्यासाठी तयार असावेत.

अरब लोकांची भाषा अरबी होती आणि क़ुरआन अरबी भाषेत आहे म्हणून त्यांना क़ुरआन ऐकविणे, अल्लाहच्या संदेशास त्यांच्या भाषेत त्यांच्या प्रत पोहचविण्याच्या समान अर्थाने होते. आता जेव्हा मुस्लिम जनसमूहाचा अरबेतर भाषीय लोकांशी संबंध आहे क़ुरआनास त्याच्या अर्थासह त्यांच्या भाषेत पोहचवावे. लागेल याच स्थितीत त्यांच्यावर क़ुरआनाचे प्रमाण प्रस्थापित होऊ शकेल आणि अल्लाहने इच्छिल्यास कित्येकांना सन्मार्ग प्राप्तीचा लाभहि घडू शकेल.

४३. म्हणजे अशी कोणतीहि शक्ती नाही जी अल्लाहच्या विधिनियमांना परिवर्तित करु शकेल त्याचा प्रत्येक आदेश अटळ,प्रत्येक फैसला लागू व प्रत्येक वायदा पूर्ण झाल्याविना राहणार नाही. यास्तव तुम्हा लोकांचे हित याच गोष्टीत आहे की त्याच्या वाणीत कसल्याहि परिवर्तनाची अपेक्षा न बाळगता स्वत:ला बदलण्याचा प्रयत्न करा व स्वत:ची अशी जडण घडण करा जी त्याला अभिप्सित आहे.

४४. ज्या लोकांनी ईमान बाळगून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहिं वसल्लम) यांचे साहचर्य पत्करले होते, त्यात बहुतेक असे होते, ज्यांच्या जवळ ना आर्थिक साधन सामग्री होती व ना ते प्रभावशाली होते परंतु त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने ईमान द्वारे उपकृत केले होते यास्तव त्यांचे जीवन अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यास्तव व्यतीत होत होते. भौतिकवादी लोक त्यांना तुच्छ जाणत-परंतु ते होते मौल्यवान हिरे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या पैगंबरास आदेश दिला की त्यांची पूरेपूर कदर जाणावी व त्यांच्या साहचर्यास स्वत:साठी पर्याप्त समाजावे. असे कदापि होता कामा नये की त्यांच्या कडून लक्ष हटवून अशा लोकांना महत्त्व देऊ लागावे जे धन सम्पत्ति व ऐहीक वैभवांचे स्वामी आहेत, परंतु आपल्या पालनकर्त्याशी गाफील आहेत.

या आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधले गेले असले तरी अनेकेश्वरवाद्यांवर हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की तुम्हाला आपल्या वैभवाचा एवढा अभिमान आहे आणि तुम्ही प्रामाणिक ईमान बाळगणाऱ्यांना तुच्छ समजता परंतु अल्लाहच्या नजरेत कदर करण्यास खऱ्या अर्थाने पात्र तुम्ही नाहीत, किंबहुना त्याचे हे प्रामाणिक दास होत.

इस्लामने नमाज़च्या जमात ची जी पध्दत प्रचलीत केली आहे त्याचा एक महत्त्वपूर्ण हेतु हाहि आहे कि मुसलमानंना एकमेकांचे साहचर्य लाभावे आणि त्यांचे हे सम्मेलन अल्लाहच्या उपासनेचे सम्मेलन ठरावे व त्याची ही मजलिस जिक्रे इलाही ची मजलिस ठरावी.

४५. जेव्हा मनुष्य ईश्वराबाबत गंभीर होत नाही तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याच्या हृदयास आपल्या स्मरणापासून गाफील करतो व जेव्हा अल्लाहच्या स्मरणापासून मनुष्य गाफील होतो तेव्हा अपरिहार्यत: तो आपल्या इच्छा-आकांक्षांचा दास बनतो व जेव्हा इच्छा आकांक्षाचे भूत त्याच्या मानगुटीवर बसते तेव्हा व्यवहार-संबंधात अतिरेक व अफरा तफरीची स्थिती निर्माण होते आणि अशा प्रकारे तो बुद्धि व स्वभावाच्या मार्गदर्शनापासूनहि वंचित होतो व शरीअतच्या मार्गदर्शनापासून देखील.

अशा लोकांचे आज्ञापालन न करण्याचा (त्यांच्या म्हणण्यानुसार न चालण्याचा) अर्थ असा की अल्लाहच्या मार्गदर्शनाच्या विरोधात त्यांचे मार्गदर्शन व त्याच्या आदेशांच्या विरोधात त्यांच्या एखाद्या हुकुमास कबूल केले न जावे.

या आयतीद्वारे ओघाओघाने ही गोष्ट देखील स्पष्ट होते की अल्लाहच्या नाम-स्मरणाचा संबंध हृदयाशी आहे व हृदय कोणत्याही स्थितीत अल्लाहच्या स्मरणापासून गाफील होता कामा नये.

## अर-रक़ीम चे स्थान (अस्हाबे-कहफ़)



२९. आणि सांगा, हे सत्य आहे तुमच्या पालनकर्त्या तर्फे तेव्हा ज्याच्या मनाला वाटेल त्याने ईमान बाळगावे व ज्याच्या मनाला येईल त्याने कुफ्र करावे.[४६]आम्ही अत्याचारी करिता अशी आग तयार करून ठेवली आहे जिच्या कनातींनी त्यांना घेरले आहे.[४७] जर ते पाण्यासाठी याचना करतील तर त्यांना असे पाणी दिले जाईल जे वितळलेल्या धातु समान असेल व त्यांचे तोंड भाजून टाकील. केवढे वाईट हे पेय, आणि केवढे वाईट विश्रांती-स्थान !

وَقُلِ الْحَقُّ مِنْ رَّبِّكُمْ فَمَنْ شَآءَ فَلْيُؤْمِنْ وَّمَنْ شَآءَ
فَلْيَكْفُرْ إِنَّآ أَعْتَدْنَا لِلظّٰلِمِيْنَ نَارًا أَحَاطَ بِهِمْ
سُرَادِقُهَا وَإِنْ يَّسْتَغِيْثُوْا يُغَاثُوْا بِمَآءٍ كَالْمُهْلِ
يَشْوِي الْوُجُوْهَ بِئْسَ الشَّرَابُ وَسَآءَتْ مُرْتَفَقًا ﴿٢٩﴾

३०. तथापि ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कृत्ये केली तर आम्ही सत्कृत्य करणाऱ्यांचा मोबदला कधीहि व्यर्थ जाऊ देत नाही.

إِنَّ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ إِنَّا لَا نُضِيْعُ أَجْرَ مَنْ
أَحْسَنَ عَمَلًا ﴿٣٠﴾

३१. त्यांच्या करिता सदैव कालीन बागा आहेत, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. तिथे त्यांना सुवर्ण कंकण घातले जाईल ते बारीक व तलम रेशमाचे हिरवे कपडे घालतील. [४८] आणि सिंहासनावर तक्के लावून बसले असतील. केवढा चांगला मोबदला आहे व केवढे चांगले विश्रांती-स्थान !

أُولٰٓئِكَ لَهُمْ جَنّٰتُ عَدْنٍ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهِمُ الْأَنْهٰرُ
يُحَلَّوْنَ فِيْهَا مِنْ أَسَاوِرَ مِنْ ذَهَبٍ وَّيَلْبَسُوْنَ ثِيَابًا
خُضْرًا مِّنْ سُنْدُسٍ وَّإِسْتَبْرَقٍ مُّتَّكِـِٔيْنَ فِيْهَا عَلَى
الْأَرَآئِكِ نِعْمَ الثَّوَابُ وَحَسُنَتْ مُرْتَفَقًا ﴿٣١﴾

३२. या लोकांना दोन माणसांचा अहवाल ऐकवा. [४९] त्यांच्यापैकी एकाला आम्ही द्राक्षाचे दोन बाग दिले व त्याभोवती खजूरीची झाडे लावली व त्यांच्या दरम्यान शेती उगवली.[५०]

وَاضْرِبْ لَهُمْ مَّثَلًا رَّجُلَيْنِ جَعَلْنَا لِأَحَدِهِمَا جَنَّتَيْنِ
مِنْ أَعْنَابٍ وَّحَفَفْنٰهُمَا بِنَخْلٍ وَّجَعَلْنَا بَيْنَهُمَا زَرْعًا ﴿٣٢﴾

३३. दोन्ही बागा खूप फलदूप झाल्या आणि यात कसलीहि कसर बाकी राहू दिली नाही. आम्ही त्यांच्यात प्रवाह देखील जारी केले होते.

كِلْتَا الْجَنَّتَيْنِ اٰتَتْ أُكُلَهَا وَلَمْ تَظْلِمْ مِّنْهُ شَيْـًٔا
وَّفَجَّرْنَا خِلٰلَهُمَا نَهَرًا ﴿٣٣﴾

३४. आणि (या बागां मध्ये) त्याच्यासाठी भरपूर फळे आली तेव्हा तो आपल्या सोबतीशी वार्तालाप करीत म्हणला, मी तुझ्याहून अधिक श्रीमंत आहे आणि माझा ज़था देखील अधिक शक्तिशाली आहे .[५१]

وَّكَانَ لَهُ ثَمَرٌ فَقَالَ لِصٰحِبِهِ وَهُوَ يُحَاوِرُهُ أَنَا
أَكْثَرُ مِنْكَ مَالًا وَّأَعَزُّ نَفَرًا ﴿٣٤﴾

४६. ही व या प्रकारच्या इतर आयती या बाबतीत स्पष्ट आहेत की सर्वश्रेष्ठ अल्लाहने ईमान व कुफ्र च्या मामल्यात माणसावर जबरदस्ती केलेली नाही, किंबहुना त्याला अधिकार देऊन त्याच्या सावधगिरीची उपाय योजना केली आहे. मग त्याने वाटेल तो मार्ग पत्करावा, आपल्या चांगल्या-वाईटास तो स्वत:च जबाबदार आहे.

४७. येथे अत्याचारीशी अभिप्रेत तेच ईश्वरापासून गाफील असलेले लोक होत ज्यांचा वर उल्लेख केला गेला आहे व आगीच्या कनातीशी अभिप्रेत जहन्नमचे अग्नि-लोळ होत अर्थात ते जहन्नम च्या तावडीत सापडले आहेत व त्यापासून कोणत्याहि प्रकारे वाचू शकत नाहीत.

सूर्य पृथ्वीपासून कोट्यावधी मैलांच्या अंतरावर आहे परंतु त्याची उष्णता जमीनीवर बरोबर पोहचते आणि जर आपल्या गुरुत्वाकर्षणामुळे तो जमीनीला अधिक जवळ करील तर पृथ्वी आगीचा गोळा बनेल. भौतिक जगाची जिथे ही दशा आहे तर जे विश्व आमच्या दृष्टीपासून दूर आहे तिच्या आगीची दशा मुळीच नवल वाटण्याजोगी नाही तिची उष्णता या जगात इन्कार करणाऱ्यांप्रत पोहचत आहे व हीच ती उष्णता जी त्यांच्या चारित्र्यास मातीत मिळवित आहे.

४८. जन्नतच्या वातावरणाचा इहलोकावरुन कयास केला जाऊ शकत नाही. तेथले जीवन राजेशाही वैभवाचे जीवन असेल. यास्तव पुरुषांना सुवर्ण कंकण घातले जातील व रेशमी वस्त्र प्रावरणे देखील.

हिरवा रंग शोभायमानहि असतो व डोळ्यांना गारवा देण्यास कारणीभूत देखील म्हणून या रंगाची निवड अगदी उचित निवड होय आणि या गोष्टीची रहस्ये तर जन्नतमध्येच उकलतील.

४९. हे एखादे काल्पनिक उदाहरण नव्हे किंबहुना सत्य घटना आहे जी बोध प्राप्तीसाठी निवेदिली गेली आहे. पुढे आयत क्र.३४व ३७ मध्ये स्पष्टीकरण आहे की दोन माणसांच्या दरम्यान संभाषण झाले होते जे या उदाहरणाचे घटनात्मक उदाहरण असल्याचा स्पष्ट पुरावा होय.

५०. म्हणजे या माणसाला सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशा प्रकारे उपकृत केले होते की त्याने एका ऐवजी दोन बागा प्रदान केल्या होत्या व या बागा उच्च प्रकारच्या होत्या. अरब लोकांच्या येथे उच्च प्रकारच्या बागा द्राक्षांच्या असत ज्या सभोवती खजुरीची झाडे असत, या साठी की जोराच्या सोसाट्याच्या वाऱ्यांपासून द्राक्ष-वेलींचे संरक्षण व्हावे आणि दरम्यानच्या हिश्श्यात शेत-पीके असत ज्या द्वारे अन्न धान्य प्राप्त होत असे.

५१. या त्याच्या अभिमानाच्या गोष्टी होत्या व जो गर्व त्याच्या मनात होता तो संभाषणात प्रकट झाला.

३५. मग तो आपल्या बागेत अशा अवस्थेत दाखल झाला की आपल्या जीवावर जुलुम करीत होता. तो म्हणाला, मला नाही वाटत की याचा कधी नाश होईल.[५२]

وَدَخَلَ جَنَّتَهُ وَهُوَ ظَالِمٌ لِّنَفْسِهِ قَالَ مَا أَظُنُّ
أَن تَبِيدَ هَٰذِهِ أَبَدًا ٣٥

३६. आणि ना मी असे समजतो की कियामत कायम होईल आणि जर मला आपल्या पालन कर्त्याकडे परतवले गेलेच तर मी याहून अधिक चांगली जागा प्राप्त करीन.[५३]

وَمَا أَظُنُّ السَّاعَةَ قَائِمَةً وَلَئِن رُّدِدتُّ إِلَىٰ رَبِّي لَأَجِدَنَّ
خَيْرًا مِّنْهَا مُنقَلَبًا ٣٦

३७. त्याचा सोबती ने संभाषण करीत म्हणाला, काय तू त्याचा इन्कार करतोस ज्याने (प्रथम) तुला मातीपासून निर्माण केले. मग वीर्य बिंदू पासून नंतर तुला यथोचित मनुष्य बनविले.[५४]

قَالَ لَهُ صَاحِبُهُ وَهُوَ يُحَاوِرُهُ أَكَفَرْتَ بِالَّذِي
خَلَقَكَ مِن تُرَابٍ ثُمَّ مِن نُّطْفَةٍ ثُمَّ سَوَّاكَ رَجُلًا ٣٧

३८. परंतु मी म्हणतो अल्लाहच माझा स्वामी आहे आणि मी आपल्या पालन कर्त्याचा कोणालाहि सहभागी ठरवित नाही.[५५]

لَّٰكِنَّا هُوَ اللَّهُ رَبِّي وَلَا أُشْرِكُ بِرَبِّي أَحَدًا ٣٨

३९. आणि जेव्हा तू आपल्या बागेत दाखल झालास तेव्हा 'माशा अल्लाह ला कुव्वता इल्ला बिल्लाहि' (अल्लाह जे इच्छितो तेच होते-अल्लाहच्या मदती विना कोणाचे कसलेहि सामर्थ्य नाही)असे का म्हटले नाही [५६] जर तू पाहत आहेस की मी धन व संततीत तुझ्याहून फार कमी आहे.

وَلَوْلَا إِذْ دَخَلْتَ جَنَّتَكَ قُلْتَ مَا شَاءَ اللَّهُ لَا قُوَّةَ إِلَّا بِاللَّهِ
إِن تَرَنِ أَنَا أَقَلَّ مِنكَ مَالًا وَوَلَدًا ٣٩

४०. तर नवल नव्हे की माझा पालन कर्ता मला तुझ्या बागेहून उत्तम प्रदान करील.[५७] आणि तुझ्या बागेवर आकाशातून एखादी अशी आपत्ति उतरवील की ती सपाट मैदान होऊन जाईल.[५८]

فَعَسَىٰ رَبِّي أَن يُؤْتِيَنِ خَيْرًا مِّن جَنَّتِكَ وَيُرْسِلَ
عَلَيْهَا حُسْبَانًا مِّنَ السَّمَاءِ فَتُصْبِحَ صَعِيدًا زَلَقًا ٤٠

४१. किंवा त्याचे पाणी खाली उतरुन जाईल व तु त्याला प्राप्त करू शकणार नाही.[५९]

أَوْ يُصْبِحَ مَاؤُهَا غَوْرًا فَلَن تَسْتَطِيعَ لَهُ طَلَبًا ٤١

५२. जेव्हा साधनांची विपुलता एखाद्याला प्राप्त होते तेव्हा धन सम्पत्तिच्या धुंदीत त्याला असे वाटू लागते की निदान माझ्या आयुष्यात या वैभवाचा ऱ्हास होणार नाही. धनवानांची हीच मनोवृत्ती असते आणि हे समाधान त्यांना ईश्वरा पासून निस्पृह करते.

५३. म्हणजे प्रथम तर कियामत कायम होणार नाही आणि जर झाली तर ज्या प्रकारे इहलोकात धन संपदेने मला उपकृत केले गेले तद्वतच आखिरत मध्येहि उपकृत केले जाईल. ही धनवानांची विचार सरणी आहे. ते असे समजतात की जगात जी धन संपदा त्यांना लाभली आहे ती कसोटी म्हणून नव्हे. किंबहुना एवढ्यासाठी लाभली आहे की ते यास पात्र होते. आणि जेव्हा ते जगात यास पात्र ठरले तर आखिरत मध्ये पात्र का नसतील?

५४. त्याच्या साथीदाराने जो ईमान बाळगणारा होता तयाला सावध केले. त्याच्या अभिमान पूर्ण व गर्वाने ओतप्रोत असलेल्या गोष्टींना कुफ्र ठरविले व त्याला विचार चिंतनाचे आवाहन केले की ज्याने आपल्या सामर्थ्याने मातीतून माणसाला निर्माण केले, मग पाण्याच्या तुच्छ बींदूपासून त्याचा वंश क्रम चालविला आणि नंतर तुला परिपूर्ण मनुष्य बनवून उभे केले. त्याच्याशीच तू कृतघ्न बनतोस काय?

५५. हे एकेश्वर वादाचे ऐलान व शिर्कचा नकार होता. याद्वारे हा इशाराहि मिळतो की ईमान बाळगणारा मनुष्य आवाहन व प्रसार आणि सुधारणा व शुद्धी बाबत प्रसंगाचा यथोचित लाभ उचलतो त्याचे संभाषण याच्या विरहित नसते. त्याला आपल्या सोबत्याच्या सुधारणेचीहि काळजी लागलेली असते व तो बोलता बोलता मोठे मौल्यवान बोल बोलतो.

५६. म्हणजे बागेला पाहून तू आपल्या मोठेपणास जाहीर करावयास नको, किंबहुना अल्लाहच्या कृपेस मान्य केले पाहिजे होते. तसेच या गोष्टीची स्वीकृती व अभिव्यक्ति की त्याच्या एखाद्या देणगी पासून लाभ प्राप्त करणे त्याच्याच मदतीवर अवलंबून आहे. ना माझे काही बळ सामर्थ्य आहे की या पासून काही लाभ प्राप्त करू शकेन आणि ना एखादी अशी शक्ति आहे जी मला पोहचवू शकते.

या आयतीत ही शिकवण अध्यारुत आहे की मनुष्य जेव्हा आपल्या बाग, शेत कारखाना इत्यादीत दाखल होईल तेव्हा उत्पन्नाच्या आकर्षक दृश्यास पाहून त्याने आपल्या पालन कर्त्याशी कृतज्ञता व्यक्त करावी व यावर ईश्वरावरील भरवसा जाहीर करावा. या उद्दिष्टा करिता ''माशा अल्लाह ला कुव्वता इल्ला बिल्लाहि'' हे वचन अगदी यथार्थ आहे.

५७. म्हणजे अपेक्षा आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह मला याहून अधिक चांगली देणगी प्रदान करील यात संकेत आहे. आखिरतच्या जन्नतकडे जिच्या तुलनेत इहलोकीय बागा कसलेहि महत्व बाळगत नाही.

५८. म्हणजे आपल्या बागेवर एवढा अभिमान करु नकोस ईश्वराचे भय बाळग की तो एखादी आपत्ति आकाशातून उतरवून तुझ्या बागांना मातीत मिळवू शकतो.

५९. म्हणजे या गोष्टीचीहि शक्यता आहे की प्रवाहाचे पाणी जमीनीत खोलवर जावे. अर्थात कोणता तरी प्रसंग असा उद्‌भवू शकतो जो बागेला उध्वस्त करण्यास कारणीभूत ठरावा.

४२. मग त्या (बागे)ची फले फेऱ्यात सापडली आणि जी धनसंपदा त्याने खर्ची घातली होती त्याबद्दल तो हात चोळत राहिला जेव्हा बाग आपल्या मांडवासह कोसळून पडली होती. म्हणू लागला, मी आपल्या पालन कर्त्यासह एखाद्यास सहभागी ठरविले नसते तर बरे झाले असते.[६०]

وَاُحِيْطَ بِثَمَرِهٖ فَاَصْبَحَ يُقَلِّبُ كَفَّيْهِ عَلٰى مَاۤ اَنْفَقَ فِيْهَا
وَهِيَ خَاوِيَةٌ عَلٰى عُرُوْشِهَا وَيَقُوْلُ يٰلَيْتَنِيْ
لَمْ اُشْرِكْ بِرَبِّيْۤ اَحَدًا ﴿٤٢﴾

४३. (तर पहा) कोणताहि जथा असा होऊन गेला नाही, जाने अल्लाहच्या विरोधात त्याची मदत केली असती आणि ना तो स्वत: (या आपत्तिचा) मुकाबला करु शकला.[६१]

وَلَمْ تَكُنْ لَّهٗ فِئَةٌ يَّنْصُرُوْنَهٗ مِنْ دُوْنِ اللّٰهِ
وَمَا كَانَ مُنْتَصِرًا ﴿٤٣﴾

४४. त्या वेली ही गोष्ट उघडकीस आली की समस्त अधिकार सत्य अशा अल्लाह करिताच आहे. तो प्रतिफळ देण्याच्या दृष्टीनेहि उत्तम आहे व परिणामाच्या दृष्टीनेहि श्रेयस्कर.[६२]

هُنَالِكَ الْوَلَايَةُ لِلّٰهِ الْحَقِّ ؕ هُوَ
خَيْرٌ ثَوَابًا وَّخَيْرٌ عُقْبًا ﴿٤٤﴾

४५. आणि त्यांना ऐहिक जीवनाचे उदाहरण ऐकवा, ते असे की पाणी ज्याला आम्ही आकाशातून वर्षाविले. ज्यामुळे जमीनीची वनस्पति घनदाट झाली मग तिचा अगदी चुराडा झाला ज्याला वारे उडवित नेत फिरतात.[६३] आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.[६४]

وَاضْرِبْ لَهُمْ مَّثَلَ الْحَيٰوةِ الدُّنْيَا كَمَآءٍ اَنْزَلْنٰهُ
مِنَ السَّمَآءِ فَاخْتَلَطَ بِهٖ نَبَاتُ الْاَرْضِ فَاَصْبَحَ
هَشِيْمًا تَذْرُوْهُ الرِّيٰحُ ؕ وَكَانَ اللّٰهُ عَلٰى كُلِّ
شَيْءٍ مُّقْتَدِرًا ﴿٤٥﴾

४६. धन व संतती ऐहिक जीवनाची शोभा आहे आणि बाकी राहणारी सत्कर्मे तुमच्या पालन कर्त्याजवळ मोबदल्याच्या दृष्टीनेहि उत्तम आहेत व अपेक्षेच्या दृष्टीनेहि.[६५]

اَلْمَالُ وَالْبَنُوْنَ زِيْنَةُ الْحَيٰوةِ الدُّنْيَا ۚ وَالْبٰقِيٰتُ
الصّٰلِحٰتُ خَيْرٌ عِنْدَ رَبِّكَ ثَوَابًا وَّخَيْرٌ اَمَلًا ﴿٤٦﴾

४७. तो दिवस की जेव्हा आम्ही पहाडांना चालवू आणि तुम्ही पहाल की जमीन अगदी अनावरित झाली आहे.[६६] आणि लोकांना आम्ही एकत्रित करू. कोणालाहि सोडणार नाही.[६७]

وَيَوْمَ نُسَيِّرُ الْجِبَالَ وَتَرَى الْاَرْضَ بَارِزَةً ۙ وَّحَشَرْنٰهُمْ
فَلَمْ نُغَادِرْ مِنْهُمْ اَحَدًا ﴿٤٧﴾

६०. ईमान बाळगणाऱ्या दासाचे अनुमान खरे ठरले. यास्तव बागेवर असे संकट कोसळले की ती उध्वस्त झाली. जेव्हा या काफीरा ने विनाशाचे हे दृश्य पाहिले तेव्हा पश्चात्तापाने हात चोळत राहिला. त्या वेळी त्याला आपल्या चुकीच्या विचार सरणीची जाणीव झाली आणि या गोष्टीचे आकलन झाले की एकेश्वरवादाची श्रद्धा हीच खरी श्रद्धा आहे. म्हणून ज्या शिर्क मध्ये तो गुरफटून होता त्याबद्दल त्याला पशचात्ताप झाला.

६१. जेव्हा अल्लाहने त्याच्या बागेला नष्ट करू इच्छिले तेव्हा ना तो जथा त्याच्या कामी आला ज्याचा त्याला अभिमान होता व ना त्याने सहभागी ठरविलेले (दैवते) त्याच्या मदतीस पोहचू शकले आणि ना त्याच्या अंगी एवढे बळ होते की स्वत:च या आपत्तिचा मुकाबला केला असता.

६२. म्हणजे या घटनेवरून ही गोष्ट जाहीर झाली की सर्व अधिकार अल्लाह जवळच आहे जो खराखुरा पालनकर्ता आहे. त्याच्या आधिकारांमध्ये कोणीहि सहभागी नाही. लाभ किंवा हानी त्याच्याच इच्छेनुसार पोहचते. यास्तव बक्षीस व मोबदला त्याच्या कडूनच मागितला जावा आणि अशा आकांक्षाहि त्याच्याशीच बाळगल्या जाव्यात.

या मार्गदर्शना खेरीज या घटनेपासून हा धडाहि मिळतो की जे लोक ईश्वर व आखिरतवर ईमान ठेवतात व त्याचे आवाहन इतरां समोर मांडतात ते संभवत: भौतिक साधनांच्या दृष्टीने कसलेहि स्थान बाळगत नसावेत. पण शेवट त्यांचाच उत्तम होईल. कुफ्र (इन्कार) करणाऱ्यांना व आपल्या सम्पत्तिवर गर्व करणाऱ्याना शेवटी पश्चाताप करावा लागेल.

६३. या उदाहरणात ऐहीक जीवनाच्या बहाराला जमीनीच्या बहाराची उपमा दिली गेली आहे. पाऊस पडल्यावर जमीनीस जणू नवतारुण्य लाभते व ती हिरवीगार होते, परंतु तिची ही प्रफुल्लता तात्पुरती असते. काही दिवस लोटल्यानंतर तिचा रंगहि बदलू लागतो आणि ती चूर चूर होते. मग वाऱ्याच्या झुळका तिला उडवित नेतात. अशा प्रकारे जमीनीचे हे तेज मातीला मिळते. ऐहिक जीवनाचीहि हिच दशा आहे. या जीवनाची बहार काही दिवसांपुरतीच आहे. या नंतर हेमंत ऋतु येणार आहे जो हिच्या सर्व मनमोहकतेस नष्ट करून टाकील म्हणून जे लोक ऐहीक जीवनास ध्येय उद्दिष्ट बनवितात, त्यांच्या हिश्श्यात हेमंत ऋतुच येईल.

स्पष्ट असावे की इहलोकास ध्येय उद्दिष्ट बनवून जीवन व्यतीत करण्यात व आखिरतला ध्येय उद्दिष्ट बनवून जगण्यात जमीन आसमानाचे अंतर आहे. इथे ज्याला दुषित ठरविले गेले आहे ती पहिली गोष्ट होय.

६४. म्हणजे अल्लाह ज्या प्रकारे बहार आणण्यास समर्थ आहे तद्‌वतच तो पानगळ आणण्यासहि समर्थ आहे आणि तो जमीनीवर अशी पानगळ आणू शकतो की तिची सध्या असलेली रौनक नेहमी करिता संपावी.

६५. धन आणि संतती अल्लाहच्या देणग्यापैकी आहे परंतु मनुष्य जेव्हा यांच्या बाह्य आकर्षणाने इतका प्रभावित व्हावा की त्यांच्यातच मग्न व्हावा व आखिरतला पाठीमागे टाकावे तर हे जीवनाच्या उद्दिष्टाशी विपरित आहे म्हणून कुरआन या विचार सरणीवर अंकूश ठेवते आणि जी गोष्ट बुद्धित बिंबवू इच्छिते ती ही की जी गोष्ट मेल्यानंतर व जगाचा विध्वंस झाल्यानंतर शिल्लक राहणार आहे ती सत्कृत्येच होत. यांच्यामुळेच सर्वश्रेष्ठ अल्लाह जवळ दास मोबदल्यास पात्र ठरेल व या आधारेच तो आपल्या पालन कर्त्याशी त्याच्या कृपेची अशा बाळगू शकतो. म्हणून माणसाच्या प्रयत्नांची दिशा ही असावी की त्याचे जीवन सत्कृत्यांचे जीवन असावे व त्याने अधिकाधिक सत्कर्मे कमवावीत.

धन संततीच्या मामल्यात माणसाने तेच वर्तन अंगिकारले पाहिजे जे त्याच्या सत्कृत्यात वाढ करणारे असावे.

६६. म्हणजे कियामतीची घडी जेव्हा येईल तेव्हा जमीनीच्या रूप व तिच्या प्रचलित व्यवस्थेत भयंकर परिवर्तन घडून येईल. कोणताहि पर्वत, मग तो हिमालय का असेना आपल्या स्थानावर राहू शकणार नाही. किंबहुना सर्वच्या सर्व पहाड हवेत उडू लागतील आणि मग कुरआनात अन्यत्र स्पष्ट केल्यानुसार, त्यांचे कण न कण होतील. मग जेव्हा पर्वतांची ही दशा असेल तर माणसाने बनविलेली घरे, उंच इमारती, महाल हे कोठे बाकी राहतील. सर्व नष्ट होतील आणि संपूर्ण जमीन एका सपाट मैदानाच्या स्वरुपात प्रकट होईल.

६७. म्हणजे मानव जातीचे समस्त मानव, जे हजरत आदम पासून कियामती पर्यंत जन्माला येत राहीले व मरण पावले त्या सर्वांना कियामतीच्या दिवशी दुसऱ्यांदा जिवीत करून हश्रच्या मैदानात एकत्र केले जाईल. राजा असो वा रंक, श्रीमंत असो वा गरीब आणि ईमान बाळगणारा असो किंवा काफीर. कसलाहि अपवाद न राखता सर्वांना हजर केले जाईल.

४८. आणि सर्व तुमच्या पालनकर्त्या समोर पंक्ति, पंक्ति ने हजर केले जातील.[६८] आलात तुम्ही आमच्या जवळ अगदी त्याच प्रकारे ज्या प्रकारे आम्ही तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले होते. तुम्ही तर असे गृहीत धरले होते की आम्ही तुमच्या हजेरी करिता एखादी वेळ निश्चितच केली नाही.[६९]

وَعُرِضُوا عَلَىٰ رَبِّكَ صَفًّا لَّقَدْ جِئْتُمُونَا كَمَا خَلَقْنَاكُمْ
أَوَّلَ مَرَّةٍ ۚ بَلْ زَعَمْتُمْ أَلَّن نَّجْعَلَ لَكُم مَّوْعِدًا ﴿٤٨﴾

४९. आणि कर्म लेख (समोर) ठेवला जाईल तेव्हा तुम्ही पहाल की जे काही यात नमूद असेल त्यामुळे अपराधी भयभीत होत असतील आणि म्हणत असतील की आमचे दुर्भाग्य हे कसा लिखित आहे की कोणतीहि लहान मोठी गोष्ठ अशी नाही जी यात नमूद केलेली नसावी. [७०] आणि जे काहि त्यांनी केले होते ते सर्व हजर असलेले आढळेल. आणि तुमचा पालनकर्ता कोणावरहि अत्याचार करणार नाही.[७१]

وَوُضِعَ الْكِتَابُ فَتَرَى الْمُجْرِمِينَ مُشْفِقِينَ
مِمَّا فِيهِ وَيَقُولُونَ يَا وَيْلَتَنَا مَالِ هَٰذَا الْكِتَابِ
لَا يُغَادِرُ صَغِيرَةً وَلَا كَبِيرَةً إِلَّا أَحْصَاهَا ۚ وَوَجَدُوا
مَا عَمِلُوا حَاضِرًا ۗ وَلَا يَظْلِمُ رَبُّكَ أَحَدًا ﴿٤٩﴾

५०. आणि जेव्हा आम्ही फरिश्त्यांना म्हटले की आदमला सजदा करा तेव्हा त्यांनी सजदा केला. परंतु सैतानाने केला नाही. [७२] तो जिन्नांपैकी होता [७३] तर त्याने आपल्या पालन कर्त्याच्या आदेशाची अवज्ञा केली. मग काय तुम्ही मला सोडून त्याला व त्याच्या वंशाला [७४] आपला कार्य साधक बनविता, वस्तुतः ते तुमचे शत्रू आहेत किती वाईट मोबदला आहे अत्याचारीं करिता ![७५]

وَإِذْ قُلْنَا لِلْمَلَائِكَةِ اسْجُدُوا لِآدَمَ فَسَجَدُوا
إِلَّا إِبْلِيسَ كَانَ مِنَ الْجِنِّ فَفَسَقَ عَنْ أَمْرِ رَبِّهِ ۗ
أَفَتَتَّخِذُونَهُ وَذُرِّيَّتَهُ أَوْلِيَاءَ مِن دُونِي وَهُمْ
لَكُمْ عَدُوٌّ ۚ بِئْسَ لِلظَّالِمِينَ بَدَلًا ﴿٥٠﴾

५१. मी त्यांना आकाश व जमीन निर्माण करते वेळी बोलावले नव्हते आणि ना स्वतः त्यांना निर्माण करते वेळी बोलावले होते. आणि माझे हे काम नव्हे की मार्गभ्रष्ट करणाऱ्यांना आपला मित्र व बाजू बनवावे. [७६]

مَّا أَشْهَدتُّهُمْ خَلْقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَلَا خَلْقَ
أَنفُسِهِمْ وَمَا كُنتُ مُتَّخِذَ الْمُضِلِّينَ عَضُدًا ﴿٥١﴾

५२. ज्या दिवशी तो फर्मावील की बोलवा त्यांना, ज्यांना तुम्ही माझे सहभागी समजून बसले होते. तेव्हा ते त्यांना पुकारतील परंतु ते त्यांना कोणतेहि उत्तर देणार नाहीत आणि आम्ही त्यांच्या दरम्यान एक विनाशाचा खड्डा आड आणू. [७७]

وَيَوْمَ يَقُولُ نَادُوا شُرَكَائِيَ الَّذِينَ زَعَمْتُمْ فَدَعَوْهُمْ
فَلَمْ يَسْتَجِيبُوا لَهُمْ وَجَعَلْنَا بَيْنَهُم مَّوْبِقًا ﴿٥٢﴾

६८. त्या वेळी ईश्वरा समोर त्यांची पेशी होईल अशा साठी की ते जगात जे काही करीत राहिलेत त्यांचा जाब द्यावा ही पेशी व्यवस्थितपणे होईल म्हणून त्यांना रांगा रांगाने उभे केले जाईल की ते सृष्टीच्या सत्ताधिकाऱ्याच्या न्यायालयात हजर होत आहेत. अर्थात नमाज़च्या रांगा याचे उदाहरण होय.

६९. जेव्हा लोक ईश्वरासमोर रांगेत हजर होतील तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावील की दुसऱ्यांदा निर्माण करण्याची जी खबर अम्ही तुम्हाला दिली होती ती आज आक्षरशः पूर्ण झाली. परंतु आखिरतचा इन्कार करणाऱ्या तुम्ही लोकांनी हे गृहीत धरले होते की आमच्या समक्ष हजर व्हायचेच नाही, आम्ही ना याचा वायदा केला आहे ना या साठी वेळ निश्चित केली आहे. आज तुम्हाला कळाले की तुमची ही कल्पना केवळ भ्रम होता आणि सत्य तेच होते ज्या विषयीची खबर आम्ही आपल्या प्रेषिताना ग्रंथाद्वारे दिली होती.

७०. प्रत्येक व्यक्तिच्या कर्माचे असे रेकार्ड मांडले जाईल की अगदी लहानातले लहान कर्म देखील नमूद केल्याचे राहिले नसेल. आपल्या आयुष्याभरच्या कर्माचे एवढे खरे व परिपूर्ण रेकॉर्ड पाहून मनुष्य आश्चर्यचकित होईल. कारण तो आखिरतचा इन्कार करीत राहिला. यास्तव हे रेकॉर्ड त्याच्या करिता अनापेक्षित असेल.

७१. म्हणजे ना एखाद्याचा हक्क मारला जाईल ना एखाद्यावर अतिरेक होईल. न्यायाच्या सर्व निकडी प्रत्येककाच्या हक्कात पूर्ण केल्या जातील.

या आयती मध्ये ईश्वराच्या न्यायलयाचे जे चित्र रेखाटले गेले आहे त्याचे उदाहरण ना बायबल मध्ये आहे ना अन्यत्र कोठे. हे क़ुरआनाचेच वैशिष्ट्य होय की ते कियामत व आखिरतचा अहवाल. एवढ्या विवरणाने निवेदन करते की विश्वास व समाधान प्राप्त होते. या आयतींमध्ये ईश्वरा समोर हजर होण्यासंबंधी जो मजकूर वर्णिला गेला आहे तो एक आहे जो मन मस्तिष्कास परिवर्तित करण्यास अगदी पुरेसा आहे.

हेहि स्पष्ट असावे की आखिरतची ही श्रद्धा भारतातल्या अनेकेश्वरवाद्यांच्या आवागमन (पुनर्जन्मा) च्या कल्पनेहून अगदी भिन्न आहे. या कल्पने नुसार ना कियामत घडून येईल ना ईश्वरासमोर हजर होण्याचा प्रशन उद्‌भवेल आणि ना जाब द्यावा लागेल.

७२. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ४७ व ४८ मध्ये केले गेले आहे. येथे आदम व सैतानाच्या किश्श्याकडे संकेत करण्याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की सैतान मनुष्याचा अगदी प्रारंभापासूनच शत्रू आहे माणसाने जगाच्या परिक्षेत पास होऊन जन्नतीस पात्र ठरावे असे तो इच्छित नाही. केवळ यासाठीच तो मनुष्याला शिर्क मध्ये अडकवितो, जेणेकरुन आखिरतला त्याने कोणत्याहि प्रकारे जीवन-ध्येय बनवू नये.

७३. ही आयत हे स्पष्ट करते की सैतान (इब्लीस) जिन्नांपैकी होता यास्तव ती कथने रद्द करण्या योग्य आहेत. ज्यात तो फिरिश्त्यां पैकी असल्याचे म्हटले गेले आहे. इब्ने कसीर यांनी अगदी खरे फर्माविले आहे की या संदर्भात अधिकांश कथने 'इस्राइलियात' यहुदी कथनापैकी आहेत तर काही कथने अगदी खोटी आहेत (पहा तफसीर इब्ने कसीर खंड ३ पृ. ८९)

क़ुरआनने फरिश्त्यांचे हे वैशिष्ट्य वर्णिले आहे की ते अल्लाहच्या आज्ञेचा भंग करीत नाही. इब्लीस (सैतान) जिन्नांपैकी होता जो मनुष्या प्रमाणेच एक निर्मिती होता, म्हणून त्याने अल्लाहची अवज्ञा केली.

७४. यावरून हे कळते की सैतानाचा वंशहि आहे आणि त्याचा संपूर्ण कबिला सैतानांचा कबीला आहे.

७५. अनेकेश्वरवादी खऱ्याखुऱ्या परमेश्वरास ईश्वर मानण्या ऐवजी सैतानाला ईश्वराचे स्थान देऊ लागतात. अशा प्रकारे ईश्वराला सोडून ते सैतानाला ईश्वर बनवितात. ईश्वराचा हा केवढा वाईट बदल आहे जो या अत्याचारींनी आपल्यासाठी योजिला आहे.

जेथपावेतो सैतानाच्या अस्तित्वाचा संबंध आहे. क़ुरआन त्यास व्यक्तिगत अस्तित्व राखणारे, जाणून बुजून मार्गभ्रष्ट करणारे व उपद्रव माजविणारे आस्तित्व दर्शवितो म्हणून याचे हे स्पष्टीकरण करणे की हे केवळ उपद्रवाचे नाव आहे. याचे व्यक्तिगत अस्तित्व नाही, क़ुरआनाच्या निवेदनाच्या अगदी विरुद्ध आहे. सैतानाशी हजरत आदम व हव्वा या दोघांचाहि संबंध आला होता म्हणून वंशानुवंशे या कल्पनेचे माणसांमध्ये स्थित्यंतर होत राहीले आणि पैगंबर देखील सैतानाच्या उपद्रवापासून वाचण्याची शिकवण देत राहीले म्हणून याचे अस्तित्व लोकांच्या दृष्टीने कायम राहिले व अरबच्या अनेकेश्वर वाद्यांनाहि त्याच्या अस्तित्वाचा इन्कार नव्हता आणि त्याच्या अस्तित्वाचे स्पष्ट प्रमाण हे होय की माणसांची फार मोठी संख्या उपद्रवात नेहमी व्यस्त राहीली. जसे इतिहासावरून स्पष्ट आहे व ज्याचे अवलोकन आज देखील आम्ही करतो. असंख्य लोकांचे प्रत्येक युगात उपद्रव ग्रस्त असणे व उपत्पात माजविणे साफ जाहीर करते की अगदी सुरवाती पासून माणसाला बहकविण्याचे काम होत आहे आणि ही बहकविणारी शक्ति माणसाची शत्रू आहे. अर्थात ही शक्ति काही आंधळी शक्ति नाही, किंबहुना धोका व कट्‌ कारस्थानां द्वारे माणसांना फासणारी विद्रोही शक्ति आहे.

७६. अरब देशीय अनेकेश्वरवादी सैतानांना आपला मित्र व कार्यसाधक एक तर या अर्थाने दर्शवितात की आपल्या मनाची, सर्व सूत्रे त्यांच्या हाती सोपवितात व त्यांच्या इशाऱ्यावर चालतात आणि दुसरीकडे या अर्थाने की त्यांना ईश्वरीय

व्यवस्थेत दाखील समजून त्यांच्या अपाया पासून वाचण्या करिता त्यांची भक्ति करतात, जेणेकरून त्यांनी प्रसन्न रहावे व संकटे टळत रहावीत. अशा प्रकारे त्यांनी सैतानांना देखील ईश्वराचा सहभागी ठरविले होते. यावर अंकूश ठेवित इथे फर्मावले गेले की ईश्वराच्या आज्ञापालन व उपासनेच्या हक्कात सैतानांना सहभागी करण्याचा प्रश्नच कसा, जेव्हा ईश्वरीय व्यवस्थेत त्यांचा कसलाहि हस्तक्षेप नाही. त्यांचा ना आकाश व जमीनीच्या रचनेत काही हिस्सा आहे ना स्वत:च्या निर्मितीत. अल्लाहने त्यांना आपल्या मदती करिता कधीहि बोलावले नाही. प्रथम तर ही कल्पनाच मूर्खता पूर्ण आहे की अल्लाहने एखाद्यास आपला सहाय्यक बनविले आहे आणि अधिक मूर्खता म्हणजे हे समजणे की सैतानांना त्याने आपला सहाय्यक बनविले आहे. तात्पर्य ईश्वराने आपली ईश्वरीय व्यवस्था चालविण्या करिता सहाय्यकांची निवड केली. तर मार्ग भ्रष्ट करणाऱ्या सैतानांची ! अल्लाह आमचे यापासून रक्षण करो!

७७. म्हणजे कियामतीच्या दिवशी या अनेकेश्वरवाद्यांना सांगितले जाईल की ज्यांना तुम्ही ईश्वराचा सहभागी समजून आपला मित्र व कार्यसाधक बनवून घेतले होते आता त्यांना आपल्या मदती करिता बोलवा ते त्यांना बोलवतील परंतु ते काहीच उत्तर देणार नाहीत, आणि त्या दोघांच्या दरम्यान विनाशाची खाई 'आड' म्हणून टाकली जाईल जेणेकरून हे भक्त आपल्या उपास्यांजवळ पोचवू नयेत व उपास्ये आपल्या भक्तांजवळ.

आणि अपराधी आग पाहतील व समजून घेतील की त्यांना यात पडायचे आहे. मात्र या पासून वाचण्याचा कोणताहि मार्ग त्यांना आढळणार नाही. आणि आम्ही या क़ुरआनात लोकांकरिता प्रत्येक प्रकारची उदाहरणे निवेदिली. परंतु मनुष्य मोठा भांडखोर होय. (अल-क़ुर्आन)

५३. आणि अपराधी आग पाहतील व समजून घेतील की त्यांना यात पडायचे आहे. मात्र या पासून वाचण्याचा कोणताहि मार्ग त्यांना आढळणार नाही.

وَرَاَ الْمُجْرِمُوْنَ النَّارَ فَظَنُّوْٓا اَنَّهُمْ مُّوَاقِعُوْهَا
وَلَمْ يَجِدُوْا عَنْهَا مَصْرِفًا ﴿٥٣﴾

५४. आणि आम्ही या कुरआनात लोकांकरिता प्रत्येक प्रकारची उदाहरणे निवेदिली. [७८] परंतु मनुष्य मोठा भांडखोर होय.[७९]

وَلَقَدْ صَرَّفْنَا فِيْ هٰذَا الْقُرْاٰنِ لِلنَّاسِ مِنْ كُلِّ مَثَلٍ
وَكَانَ الْاِنْسَانُ اَكْثَرَ شَيْءٍ جَدَلًا ﴿٥٤﴾

५५. आणि जेव्हा लोकांजवळ मार्गदर्शन येऊन पोहचले तर त्यावर ईमान बाळगण्यात व आपल्या पालनकर्त्या पासून माफी मागण्यात कोणतीहि गोष्ट बाधक ठरली नाही, परंतु हे की पूर्वी होऊन गेलेल्या जन-समूहां बरोबर जो मामला केला गेला तो यांच्या बरोबरहि व्हावा किंवा ईश-शिक्षा यांच्या समोर प्रकट व्हावी. [८०]

وَمَا مَنَعَ النَّاسَ اَنْ يُّؤْمِنُوْٓا اِذْ جَآءَهُمُ الْهُدٰى وَيَسْتَغْفِرُوْا
رَبَّهُمْ اِلَّآ اَنْ تَاْتِيَهُمْ سُنَّةُ الْاَوَّلِيْنَ اَوْ يَاْتِيَهُمُ
الْعَذَابُ قُبُلًا ﴿٥٥﴾

५६. आणि आम्ही पैगंबराना याच करीता पाठवितो की त्यांना शुभ संदेश द्यावा व खबरदार करावे. [८१] परंतु काफीर असत्याचा सहारा घेऊन भांडू लागतात यासाठी की सत्याला पराजित करावे. [८२] त्यांनी माझ्या आयतींना व ज्या पासून त्यांना खबरदार केले गेले त्या गोष्टीस [८३] थट्टा-विनोद बनविले.

وَمَا نُرْسِلُ الْمُرْسَلِيْنَ اِلَّا مُبَشِّرِيْنَ وَمُنْذِرِيْنَ
وَيُجَادِلُ الَّذِيْنَ كَفَرُوْا بِالْبَاطِلِ لِيُدْحِضُوْا
بِهِ الْحَقَّ وَاتَّخَذُوْٓا اٰيٰتِيْ وَمَآ اُنْذِرُوْا هُزُوًا ﴿٥٦﴾

५७. आणि त्याहून अधिक अत्याचारी कोण असेल, ज्याला त्याच्या पालन कर्त्याच्या आयती द्वारे पून:स्मरण घडविले जावे व त्याने त्यापासून तोंड फिरवावे व आपल्या दुष्कृत्यांना विसरून जावे? अशा लोकांच्या हृदयांवर आम्ही आवरणे घातली आहेत की त्यांना काहीच उमजू नये व त्यांच्या कानांमध्ये जडत्व निर्माण केले आहे.[८४] त्यांना तुम्ही मार्गदर्शनाकडे कितीहि बोलवा, ते कधीहि मार्गदर्शन प्राप्त करणार नाहीत.

وَمَنْ اَظْلَمُ مِمَّنْ ذُكِّرَ بِاٰيٰتِ رَبِّهٖ فَاَعْرَضَ عَنْهَا
وَنَسِيَ مَا قَدَّمَتْ يَدٰهُ اِنَّا جَعَلْنَا عَلٰى قُلُوْبِهِمْ اَكِنَّةً
اَنْ يَّفْقَهُوْهُ وَفِيْٓ اٰذَانِهِمْ وَقْرًا وَاِنْ تَدْعُهُمْ
اِلَى الْهُدٰى فَلَنْ يَّهْتَدُوْٓا اِذًا اَبَدًا ﴿٥٧﴾

७८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बनी इस्राईल-टीप क्र. १२२.

७९. म्हणजे उपदेशाकडे लक्ष देण्याऐवजी तो वादविवाद करू लागतो. आणि माणसाचा हा सर्वसामान्य दोष आहे.

८०. म्हणजे स्पष्ट मार्गदर्शन आल्यानंतर ईमान न बाळगण्यास कोणतेहि कारण राहत नाही आणि जे शिर्क ते करीत राहिले त्याविषयी त्यांनी अल्लाह समोर माफी मागावी. तरीहि जर ते ईमान बाळगत नाहीत तर याचा अर्थ हाच की त्यांनाहि त्याच विनाशाला तोंड द्यावे लागेल ज्यास पूर्वीच्या जन-समूहांना तोंड द्यावे लागले अथवा त्यांना या गोष्टीची प्रतिक्षा असावी की ईश-शिक्षेला आम्ही आपल्या समक्ष पाहू तेव्हा ईमान बाळगू परंतु त्या वेळी ईमान बाळगणे व्यर्थ ठरेल. अर्थात अल्लाहचे प्रमाण त्यांच्यावर पूर्णत:प्रस्थापित झाले आहे. एवढे असतानाहि जर ते ईमान बाळगत नाही तर ईश-शिक्षाच त्यांचे डोळे उघडू शकते.

८१. म्हणजे पैगंबरांचे काम ईश-शिक्षा आणणे नव्हे किंबहुना ईमान बाळगणाऱ्यांना निरंतर यशाची खुशखबरी एकविणे व कुफ्र करणाऱ्यांना निरंतर विनाशा पासून खबरदार करणे होय.

८२. म्हणजे ज्या लोकांना पैगंबरांचे म्हणणे मान्य नाही ते चुकीच्या व अयोग्य गोष्टींच्या आधारे वाद घालू लागतात आणि योजना अशी आखतात की कशा प्रकारे सत्याला पराजित करावे की ते दबले जावे.

८३. म्हणजे ईश-शिक्षेला ज्या पासून त्यांना खबरदार केले गेले आहे.

८४. स्पष्टीकरणा करिता पहा सूरह अनआम टीप क्र. ४४

५८. आणि तुमचा पालन कर्ता मोठा क्षमा करणारा व कृपाशील आहे. जर त्याने त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल धरले असते तर त्वरीत अजाब (ईश-शिक्षा) अवतरीत केली असती. परंतु त्यांच्यासाठी एक वेळ निश्चित आहे. जिच्या पासून स्वत:ला वाचवून आश्रय घेण्याची कोणतीहि जागा त्यांना आढळणार नाही. [८५]

وَرَبُّكَ الْغَفُورُ ذُو الرَّحْمَةِ ۖ لَوْ يُؤَاخِذُهُم بِمَا
كَسَبُوا لَعَجَّلَ لَهُمُ الْعَذَابَ ۚ بَل لَّهُم مَّوْعِدٌ لَّن يَجِدُوا
مِن دُونِهِ مَوْئِلًا ﴿٥٨﴾

५९. आणि या वसत्या होत [८६] ज्यांना आम्ही नष्ट केले. जेव्हा त्यांनी अत्याचार केला. आणि आम्ही त्यांच्या विनाशा करिता वेळ निश्चित करून ठेवली होती.

وَتِلْكَ الْقُرَىٰ أَهْلَكْنَاهُمْ لَمَّا ظَلَمُوا وَجَعَلْنَا
لِمَهْلِكِهِم مَّوْعِدًا ﴿٥٩﴾

६०. आणि जेव्हा मूसा यांनी आपल्या सेवकाला म्हटले होते की मी चालत राहीन येथपावेतो की दोन समुद्रांच्या मीळनाच्या स्थानावर पोहचेन मग मला कितीहि काळ घालवावा लागो.[८७]

وَإِذْ قَالَ مُوسَىٰ لِفَتَاهُ لَا أَبْرَحُ حَتَّىٰ
أَبْلُغَ مَجْمَعَ الْبَحْرَيْنِ أَوْ أَمْضِيَ حُقُبًا ﴿٦٠﴾

६१. मग जेव्हा ते त्या दोन समुद्रांच्या मीलन-स्थानी पोहचले तेव्हा त्यांना आपल्या माशाचे भान राहीले नाही आणि त्याने समुद्रात जाण्याकरिता सुरंगासारखा मार्ग केला.[८८]

فَلَمَّا بَلَغَا مَجْمَعَ بَيْنِهِمَا نَسِيَا حُوتَهُمَا فَاتَّخَذَ سَبِيلَهُ
فِي الْبَحْرِ سَرَبًا ﴿٦١﴾

६२. जेव्हा पुढे गेले तेव्हा मूसा आपल्या सेवकाला म्हणाले आणा आमचे जेवण. या प्रवासाने तर आम्हाला मोठा थकवा आला. [८९]

فَلَمَّا جَاوَزَا قَالَ لِفَتَاهُ آتِنَا غَدَاءَنَا لَقَدْ لَقِينَا
مِن سَفَرِنَا هَٰذَا نَصَبًا ﴿٦٢﴾

६३. तो म्हणाला, आपण पाहिले नाही जेव्हा आम्ही खडकाजवळ थांबलो होतो तेव्हा मला माशाचे भान राहीले नाही आणि हा सैतानच होय ज्याने मला असा विसर पाडला की मी त्याचा उल्लेख करू शकलो नाही. त्याने समुद्रात जाण्याचा मार्ग विचित रीतीने काढला.[९०]

قَالَ أَرَأَيْتَ إِذْ أَوَيْنَا إِلَى الصَّخْرَةِ فَإِنِّي نَسِيتُ
الْحُوتَ وَمَا أَنسَانِيهُ إِلَّا الشَّيْطَانُ أَنْ أَذْكُرَهُ ۚ
وَاتَّخَذَ سَبِيلَهُ فِي الْبَحْرِ عَجَبًا ﴿٦٣﴾

६४. त्यांनी (मूसा यांनी) म्हटले हेच तर आम्ही इच्छित होतो [९१] मग ते दोघे आपल्या पदचिन्हांचे अनुसरण करीत परतले.[९२]

قَالَ ذَٰلِكَ مَا كُنَّا نَبْغِ ۚ فَارْتَدَّا عَلَىٰ آثَارِهِمَا قَصَصًا ﴿٦٤﴾

८५. म्हणजे ह्या इन्कार करणाऱ्यांची दुष्कृत्ये तर अशी आहेत की अल्लाहचा अजाब (शिक्षा) त्वरीत त्यांच्यावर कोसळावी परंतु अल्लाह माफ करणारा व कृपावंत आहे म्हणून तो यांना तोल सावरण्याची संधी देत आहे.यासाठी की त्यांनी तौबा (क्षमा-याचना) करावी व त्याच्या कृपेस पात्र व्हावे. अर्थात ही सवड एका निश्चित वेळेपुरतीच आहे. जेव्हा ईश-शिक्षा येईल तेव्हा मात्र त्यांना कोठेहि आश्रय लाभणार नाही.

८६. हा संकेत त्या वस्त्यांकडे आहे ज्यांच्या विनाशांचा उल्लेख क़ुरआनात वारंवार केला गेला आहे.

८७. आयतीच्या मजकूरावरून असे दिसते की हजरत मूसा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या संकेतानुसार एका खास मोहीमेवर निघाले होते आणि ती ही की एका विशिष्ट स्थानी अल्लाहच्या एका खास दासाशी भेट घेऊन त्या ज्ञानाचा लाभ घ्यावा जे जगात घडणाऱ्या घटनांच्या रहस्यभेदांसंबंधी सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याला दिले या प्रवासात त्यांनी आपला हा सुप्त इरादा जाहीर केला होता की या प्रवासास कितीही काळ का लागेना, कोणत्याहि स्थितीत प्रवास जारी राखावयाचा आहे. येथपावेतो की मी निश्चित स्थानापर्यंत पोहचावे आणि ते स्थान दोन सागरांच्या संगमावर आहे.

हे दोन समुद्र कोणते व ते कोणत्या ठिकाणी मिळाले याचे स्पष्टीकरण क़ुरआनात नाही कारण या घटनेचे निवेदन करण्याचा जो उद्देश्य क़ुरआनापुढे आहे तो लक्षात घेता हे विवरण अनावश्यक होते आणि जेथपावेतो परिस्थितीला समोर ठेवून कयास करण्याचा संबंध आहे हजरत मूसा यांनी हा प्रवास अशा वेळी केला असेल जेव्हा ते सीना वाळवंटात वास्तव्य करून होते आणि बनी इस्राईलला जेहाद (धर्मयुद्धा) पासून अलिप्त राहण्याच्या परिणामी ही शिक्षा मिळाली होती की त्यांनी चाळीस वर्षे सीना वाळवंटात वणवण भटकत राहवे. या आधी हजरत मूसा बनी इस्राईलला प्रशिक्षण देण्यात मग्न राहीले म्हणून त्यांना सोडून त्यांचे एका लांबच्या प्रवासाला जाणे अनुमान गम्य नाही आणि ना ही गोष्ट अनुमान गम्य होय की मिस्र (इजिप्त) मधील वास्तव्य-काळात त्यांनी हा प्रवास केला असेल कारण त्या वेळी ते फिरऔनला सत्य-आवाहन देण्यात, त्यावर प्रमाण प्रस्थापित करण्यात व बनी इस्राईलला फिरऔनच्या तावडीतून सोडविण्यात महत्वपूर्ण कर्तव्ये पार पाडण्यात मग्न होते. यास्तव अनुमाने याच्याच समर्थनात आहे की प्रवासाची ही घटना सीना वाळवंटातील वास्तव्य-काळात घडली असेल व यावरून हा निष्कर्ष देखील काढला जाऊ शकतो की दोन सागरांच्या मीलन स्थानाशी आभिप्रेत ते स्थान होय जिथे तांबडा समुद्र (कुलजुम) व अकबा उपसागर मिळतात. हे स्थान द्विपकल्प सीनाच्या दक्षिणेत शर्मुश्शेख जवळ आहे जिथे लहान लहान बेटे बनलेली आहेत आणि त्याच्यासमोर म्हणजे अकबा उपसागराच्या दुसऱ्या किनाऱ्यावर मदयनचा इलाका पडतो.

८८. या प्रवासासंदर्भात हजरत मूसा यांना ही आज्ञा मिळाली होती की त्यांनी मासा सोबत न्यावा व जिथे मासा गायब होईल तेच स्थान त्यांचे इप्सित स्थान असेल. हा मासा त्यांच्या सेवकाने शिदोरीत ठेवला होता आणि ज्याअर्थी त्याद्वारे स्थान ओळखले जाणार होते म्हणून या मामल्यात सतर्क रहायची गरज होती. परंतु दोघांनाहि याचे भान राहीले नाही. हजरत मूसा तर विश्रांती घेत होते आणि त्यांच्या सेवकाने माशाला खालून मार्ग काढून समुद्रात जातांना पाहीले. परंतु नंतर हज़रत मूसांना बोलायचे विसरला आणि स्वत: हज़रत मूसांनाहि जागे झाल्यावर माशाविषयी काही विचारण्याचे भान राहीले नाही. मासा जिवंत होऊन शिदोरीतून समुद्रात चालला गेला होता. हा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्याचा चमत्कार होता. आणि अशासाठी प्रकट झाला होता की आपल्या पैगंबरास स्थानाचा ठावठिकाणा दाखविला जावा यावरून होहि जाहीर झाले की अल्लाहकरिता कोणत्याहि मृत जीवास जिवंत करणे किंचित मात्र कठीण नाही.

८९. मग जेव्हा या स्थानाला सोडून ते पुढे गेले तर थोडे दूर गेल्यानंतर हज़रत मूसा यांना थकवा जाणवला ज्याअर्थी अपेक्षित स्थानापासून ते पुढे गेले होते म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्यावर थकव्याची गुंगी चढविली. त्यावेळी त्यांनी आपल्या सेवकाकडून जेवण मागितले.

९०. सेवकाने आपले विस्मरण मान्य करीत माशाचे विचित्ररित्या समुद्रात जाण्याची घटना हज़रत मूसा यांना ऐकवली आणि याचा खरा कर्ता सैतानास ठरविले. जो माणसाला विस्मरण घडवून त्याचे लक्ष महत्वपूर्ण कामांकडून वळवित राहतो.

९१. म्हणजे हेच ते स्थान ज्याचा आम्ही शोध घेत होतो माशाचे जिवंत होऊन विचित्ररित्या समुद्रात जाणे स्थानाचा निर्देश करते.

९२. म्हणजे दोघेहि आपल्या पाऊल खुणांचा मार्ग घेत परतले व त्या खडकाजवळ पोहचले जिथे ते आपला मासा विसरले होते. पावलांच्या खुणा वाळवंटात स्पष्ट उमटतात. यावरून असे दिसते की तो खडक वाळवंटात समुद्र किनाऱ्याशी लागून होता.

६५. तिथे त्यांना आमच्या दासांपैकी एक दास आढळला ज्याला आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले होते आणि आपल्या जवळून विशेष ज्ञान प्रदान केले होते .[१३]

فَوَجَدَا عَبْدًا مِّنْ عِبَادِنَآ اٰتَيْنٰهُ رَحْمَةً مِّنْ عِنْدِنَا
وَعَلَّمْنٰهُ مِنْ لَّدُنَّا عِلْمًا ﴿٦٥﴾

६६. मूसा त्यांना म्हणाला, काय मी आपल्या सोबत राहू शकतो? यासाठी की सामंजस्य (व्यवहार-ज्ञान)ची जी शिकवण आपणास दिली गेली आहे त्यातून आपण काही मला देखील शिकवावे .[१४]

قَالَ لَهٗ مُوْسٰى هَلْ اَتَّبِعُكَ عَلٰٓى اَنْ تُعَلِّمَنِ
مِمَّا عُلِّمْتَ رُشْدًا ﴿٦٦﴾

६७. तो म्हणाला, आपण माझ्यासह धैर्य राखू शकणार नाही.

قَالَ اِنَّكَ لَنْ تَسْتَطِيْعَ مَعِيَ صَبْرًا ﴿٦٧﴾

६८. आणि आपण त्या गोष्टींबद्दल कशा प्रकारे धैर्य बाळगू शकाल ज्या आपल्या ज्ञान-कक्षेबाहेर असाव्यात. [१५]

وَكَيْفَ تَصْبِرُ عَلٰى مَا لَمْ تُحِطْ بِهٖ خُبْرًا ﴿٦٨﴾

६९. त्याने (मूसा ने) म्हटले इन्शाअल्लाह ( अल्लाने इच्छिल्यास) आपणास मी धैर्य बाळगणारा आढळून येईल आणि मी कोणत्याहि मामल्यात आपल्या आज्ञेचा भंग करणार नाही.

قَالَ سَتَجِدُنِيْٓ اِنْ شَآءَ اللّٰهُ صَابِرًا وَّلَآ اَعْصِيْ لَكَ اَمْرًا ﴿٦٩﴾

७०. तो म्हणाला, जर आपणास माझ्या सोबत रहायचे आहे तर कोणत्याहि गोष्टीविषयी मला विचारू नका, जो पावेतो मी स्वत: आपणाजवळ त्या गोष्टीचा उल्लेख करीत नाही.[१६]

قَالَ فَاِنِ اتَّبَعْتَنِيْ فَلَا تَسْـَٔلْنِيْ عَنْ شَيْءٍ حَتّٰٓى اُحْدِثَ
لَكَ مِنْهُ ذِكْرًا ﴿٧٠﴾

७१. मग दोघेहि निघाले, येथपावेतो की ते एका नावेत स्वार झाले तेव्हा त्याने त्या नावेत चीर पाडली मूसा ने म्हटले, आपण यात चीर पाडली जेणे करून नावेतल्या लोकांना बुडवून द्यावे. ही तर आपण विचित्र हरकत केली.[१७]

فَانْطَلَقَا حَتّٰٓى اِذَا رَكِبَا فِي السَّفِيْنَةِ خَرَقَهَا
قَالَ اَخَرَقْتَهَا لِتُغْرِقَ اَهْلَهَا لَقَدْ جِئْتَ شَيْـًٔا اِمْرًا ﴿٧١﴾

७२. तो म्हणाला, मी आपणास म्हटले नव्हते की आपण माझ्या सोबत धैर्य बाळगू शकणार नाहीत.

قَالَ اَلَمْ اَقُلْ اِنَّكَ لَنْ تَسْتَطِيْعَ مَعِيَ صَبْرًا ﴿٧٢﴾

९३. खडकाजवळ त्यांची भेट अल्लाहच्या एका खास दासाशी झाली ज्याचे नाव हदीसमध्ये खिज्र असे आले आहे 'ज्याला आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले होते'चा संकेत पैगंबर-पदाकडे आहे की आम्ही त्या विशिष्ट दासाला प्रेषितत्वाने सम्मानित केले होते. आणि ''अपल्या जवळून विशेष ज्ञान प्रदान केले होते'' शी अभिप्रेत अधिकार नसलेल्या व्यवहारात अल्लाहच्या फैसल्याच्या रहस्याविषयीचे ज्ञान. पुढे आयत क्र.८२ मध्ये या विशिष्ट दासाचे हे कथन उल्लिखित आहे की 'मी हे काम आपल्या मताने केले नाही' हा या गोष्टीचा पुरावा आहे की ईश्वराचा आदेश वहीद्वारे त्याच्यापर्यंत पोहचत होता व तो त्याचे पालन करीत होता. वहीचे या प्रकारे अवतरण पैगंबरावरच होते. व म्हणूनच त्याचे म्हणणे लोकांकरिता प्रमाण ठरते.

जेथपावेतो बहुतेक भाष्यकारांचा संबंध आहे. ते या विशेष दासाला पैगंबर म्हणूनच मान्य करतात. तथापि काही विद्वानांच्या मते की तो फरिश्ता होता. त्यांच्या कथनाचे समर्थन या आयतीद्वारे होत नाही की ज्याला आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले होते. कारण क़ुरआनात कोणत्याहि ठिकाणी कोणत्याहि फरिश्त्याविषयी या प्रकारचा उल्लेख केला गेला नाही की त्याला ईश कृपेने उपकृत केले गेले होते. आणि फरिश्ते तर अनिवार्य आदेशांना (तकविनी अहकाम) लागू करण्यावर कार्यरत असतात म्हणून कृपेने उपकृत केले जाण्याची गोष्ट फरिशत्यांबाबत योग्य होऊ शकत नाही, किंबहुना ही गोष्ट पैगंबराच्या दृष्टीनेच योग्य ठरते.

९४. सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबराना वेगवेगळी वैशिष्ट्ये प्रदान केली होती. हज़रत मूसा यांना आपल्याशी बोलण्याची संभाषण करण्याचा मान दिला होता. हज़रत ईसा (येशू) यांना मृतांना जिवंत करण्याचा चमत्कार प्रदान केला होता. हज़रत यूसुफ यांना स्वप्नाचा अर्थ विदित करण्याचे ज्ञान दिले होते. हज़रत सुलेमान यांना पक्ष्यांची भाषा समजण्याची पात्रता दिली होती. तद्वतच हज़रत खिज्र यांना बाह्य परिस्थिती व घटनांच्या मागे जी रहस्ये दडलेली असतात त्याचे ज्ञान दिले होते. ज्यामुळे त्यांच्या अंगी घटनेच्या आकलनाची असामान्य पात्रता निर्माण झाली होती. हज़रत मूसा एक प्रतिष्ठीत पैगंबर होते जे हज़रत खिज्र यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण ज्ञानाचा लाभ घेऊ इच्छित होते व या गरजेपोटीच त्यांनी हा प्रवास केला होता.

९५. सर्वश्रेष्ठ अल्लाह हज़रत खिज्रवर ज्या अनिवार्य घटनांचे रहस्य उकलीत होता त्या संदर्भात ते उचित योजना अंगिकारात. परंतु ज्याअर्थी हजरत मूसा यांच्या ज्ञान-कक्षेत या गोष्टी नव्हत्या म्हणून या प्रयत्नांना चुकीचे मानण्यात ते सत्याच्या बाजूने होते. आणि मनुष्य बाह्या स्थितीना पाहूनच निर्णय लावतो. यास्तव हज़रत खिज्र यांचे अनुमान खरे होते की ज्या असमान्य गोष्टी त्यांच्या करवी घडतील. त्या हज़रत मूसाना सहन होणार नाहीत.

९६. ही ज्ञानाच्या मार्गात हज़रत मूसा यांच्या सहनशीलतेची परिक्षा होती. प्रश्न न विचारण्याची कडक शर्त हज़रत खिज्र यांनी अशासाठी ठेवली होती की हज़रत मूसा यांना चांगल्या प्रकारे कळून यावे की त्यांचे ज्ञान व त्यांची कामे कोणत्या प्रकारची आहेत.

९७. हज़रत मूसा यांचा हा आक्षेप बाह्य दृष्टीने होता आणि तो योग्यहि होता. जेव्हा हज़रत खिज्र यांनी हे काम एका उद्देश्याने केले होते, जो आपल्या जागी योग्य होता. परंतु पुढील निवेदना नुसार गुप्त होता. हजरत खिज्र यांच्या मार्गदर्शनात ज्या प्रवासाचा आरंभ झाला त्यात हज़रत मूसा यांच्या सेवकाचा सोबत चालण्याचा उल्लेख नाही. असे दिसते की त्यांना त्या खडका जवळच सोडण्यात आले, अशासाठी की परतातांना, हज़रत मूसानी त्यांना सोबत न्यावे (आणि अल्लाह सर्व ज्ञानी आहे.)

७३. मूसा ने म्हटले भूल चूक झाल्याबद्दल पकडीत घेऊ नका आणि माझ्या बाबत सक्ती चे वर्तन करू नका.

قَالَ لَا تُؤَاخِذْنِي بِمَا نَسِيتُ وَلَا تُرْهِقْنِي
مِنْ أَمْرِي عُسْرًا ﴿٧٣﴾

७४. मग दोघे चालले येथपावेतो की त्यांना एक मुलगा भेटला त्याने त्याची हत्त्या केली. मूसा ने म्हटले आपण एका निरपराधाची हत्त्या केली. जेव्हा त्याने कोणाचा जीव घेतला नव्हता. आपण मोठे अनुचित कृत्य केले.[९८]

فَانْطَلَقَا حَتَّىٰ إِذَا لَقِيَا غُلَامًا فَقَتَلَهُ قَالَ أَقَتَلْتَ
نَفْسًا زَكِيَّةً بِغَيْرِ نَفْسٍ لَقَدْ جِئْتَ شَيْئًا نُكْرًا ﴿٧٤﴾

७५. तो म्हणाला, काय मी तुम्हाला म्हणालो नव्हतो की आपण माझ्या सोबत धीर धरू न शकाल?

قَالَ أَلَمْ أَقُلْ لَكَ إِنَّكَ لَنْ تَسْتَطِيعَ مَعِيَ صَبْرًا ﴿٧٥﴾

७६. मूसा ने म्हटले, यानंतर जर मी आपणास काही विचारीन तर आपण मला सोबत ठेवू नका. माझ्या तर्फे आपणास सबब मिळाली.

قَالَ إِنْ سَأَلْتُكَ عَنْ شَيْءٍ بَعْدَهَا فَلَا تُصَاحِبْنِي قَدْ بَلَغْتَ
مِنْ لَدُنِّي عُذْرًا ﴿٧٦﴾

७७. मग ते दोघे चालले येथपावेतो की एका वस्ती वाल्यांजवळ पोहचले व त्यांच्याकडून जेवणाची मागणी केली. परंतु त्यांनी त्यांचे आतिथ्य करण्यास नकार दिला.[९९] तिथे त्यांनी एक भिंत पाहिली, जी पडण्याच्या बेतात होती. त्याने ती भिंत उभी केली. मूसा ने म्हटले, आपण इच्छिले असते तर याचे पारिश्रमिक घेतले असते.[१००]

فَانْطَلَقَا حَتَّىٰ إِذَا أَتَيَا أَهْلَ قَرْيَةٍ اسْتَطْعَمَا
أَهْلَهَا فَأَبَوْا أَنْ يُضَيِّفُوهُمَا فَوَجَدَا فِيهَا جِدَارًا يُرِيدُ أَنْ
يَنْقَضَّ فَأَقَامَهُ قَالَ لَوْ شِئْتَ لَتَّخَذْتَ عَلَيْهِ أَجْرًا ﴿٧٧﴾

७८. तो म्हणाला, हे आपल्या व माझ्या दरम्यान वियोगाचे बोलणे झाले. [१०१] आता मी तुम्हास त्या गोष्टींची हकीगत सांगतो. ज्यांच्या विषयी आपण सबूरी राखू शकले नाहीत.

قَالَ هَٰذَا فِرَاقُ بَيْنِي وَبَيْنِكَ سَأُنَبِّئُكَ بِتَأْوِيلِ
مَا لَمْ تَسْتَطِعْ عَلَيْهِ صَبْرًا ﴿٧٨﴾

७९. नावेचा मामला असा की ती काही दरिद्री लोकांची होती, जे समुद्रात मेहनत-मजूरी करीत. मी तिला (नावेला) व्यंगपूर्ण करू इच्छिले कारण पुढे एक बादशहा होता जो प्रत्येक (चांगल्या) नावेला बळजबरीने हिरावून घेत असे.[१०२]

أَمَّا السَّفِينَةُ فَكَانَتْ لِمَسَاكِينَ يَعْمَلُونَ فِي الْبَحْرِ فَأَرَدْتُ
أَنْ أَعِيبَهَا وَكَانَ وَرَاءَهُمْ مَلِكٌ يَأْخُذُ كُلَّ
سَفِينَةٍ غَصْبًا ﴿٧٩﴾

९८. बाह्यत: त्या मुलाने असा कोणताहि अपराध वा हत्त्या अपराध केला नव्हता की त्याला मृत्युदंड दिला जावा. म्हणून हज़रत मूसा यांना राहवले गेले नाही म्हणून त्यांनी या कृत्यास अनुचित ठरविले, जेव्हा हजरत खिज्र यांनी ही सेवा एका सुप्त हेतु पोटी पार पाडली होती. जसे पुढे वर्णिले गेले आहे.

९९. प्रवाशाला जेऊ घालणे नितीमत्तेची निकड आहे आणि त्या काळात प्रवाशांच्या खाण्या-पिण्याचा त्या सवलती नव्हत्या. ज्या आधुनिक काळात आढळतात म्हणून परिचित मार्ग हाच होता की प्रवाशी एखाद्या वस्तीत आल्यास त्याचे आदरातिथ्य केले जावे परंतु या वस्तीतल्या लोकांनी या असह्य अतिथींची अशी हेळसांड केली की त्यांना एक वेळ जेऊ घालण्यासहि नकार दिला.

१००. हज़रत मूसा यांनी हे एवढ्यासाठी म्हटले की वस्तीचे लोक या गोष्टीस पात्र नव्हते की त्यांची मोफत सेवा केली जावी. जेव्हा त्यांनी उपाशी प्रवाशांना एक वेळ जेऊ घालण्यासाठी नकार दिला परंतु हज़रत खिज्र यांच्या पुढे दुसरा हेतु होता जो अजून पडद्याआड होता.

१०१. हज़रत मूसा यांचा हा आक्षेप तिसऱ्यांदा होता, म्हणून अधिक सबबी साठी वाद राहिला नाही. व विभक्त व्हायची पाळी आली. यावरून हे उघड झाले की मनुष्य मग तो पैगंबर का असेना बाह्य गोष्टीवरच निर्णय लावतो व जोपर्यंत सुप्त उद्दिष्टे व ही द्वारे त्याला स्पष्ट कळत नाहीत तोपर्यंत तो बाह्य गोष्टीवरच निर्णय लावण्यास अगतिक आहे शरीअतची मागणी देखील यापासून त्याच्या ज्ञान-मर्यादेपर्यंतच आहे.

१०२. म्हणजे नावेला सदोष करणे केवळ हेतु पुरतेच नव्हते तर खरे पाहता त्याचा उद्देश्य गरीबांच्या नावेला जालीम बादशहाच्या जबरीने केल्या जाणाऱ्या कब्जा पासून वाचविणे हा होता. हा बादशहा आपल्या इलाक्यातून जाणाऱ्या प्रत्येक चांगल्या नौकेला जबरीपूर्वक हिरावून घेई. यावर हज़रत खिज्र यांनी हा उपाय योजिला की नावेचा एक फट काढून घेतली जेणेकरून बादशहाच्या माणसांनी तिला तुटलेली नाव समजून तिची उपेक्षा करावी. त्यांनी हा उपाय त्या खास ज्ञाना आधारे केला होता जो त्यांना प्रदान केला गेला होता. आणि ज्या अर्थी ते पैगंबर होते म्हणून उघड आहे. त्यांना वही द्वारे बादशहाच्या अत्याचारी कारवायी बाबत सूचित केले गेले असेल.

यासंबंधी हज़रत मूसा यांचा आक्षेप बाह्यत: होता व तो योग्य होता आणि हज़रत खिज्र यांचा हा प्रयत्न त्या विशेष ज्ञाना आधारे होता जो त्यांना प्रदान केला गेला होता व हज़रत मूसांना त्याचे आकलन झाले नसेल तरी हा प्रयत्न अगदी योग्य व लाभप्रद होता.

राहिला हा प्रश्न की दुसऱ्याच्या नावेत त्याच्या अनुमती शिवाय बदल कशा प्रकारे केला गेला तर याचे उत्तर हे होय की प्रथम तर हा बदल अल्लाहच्या हुकुमाने केला गेला होता म्हणून तो अगदी उचित होता दुसरे असे की काही परिस्थितीत एखाद्याला संभाव्य हानी पासून वाचविण्याकरिता त्याच्या मिळकतीत बदल करावा लागतो. उदा. जर एखाद्या घराला आग लागली असेल व त्या घराचा दरवाजा बंद असेल व तो तोडल्याखेरीज आग विझवणे अशक्य असेल तर घर मालकाच्या अनुमतीची वाट न बघता दरवाजा तोडला जाईल. व्यक्ति वा समाजाला नुकसाना पासून वाचविण्या करीता अशा प्रकारच्या परिवर्तनाची अनेक उदाहरणे दिली जाऊ शकतात.

८०. मुलाचा मामला असा की त्याचे माता पिता मोमीन (ईमान बाळगणारे ) होते. आम्हास हे भय वाटले की त्याने शिरजोरी व कुफ्र द्वारे त्यांना कदाचित यातना-ग्रस्त न करावे.

وَأَمَّا الْغُلَامُ فَكَانَ أَبَوَاهُ مُؤْمِنَيْنِ فَخَشِينَا أَن يُرْهِقَهُمَا
طُغْيَانًا وَكُفْرًا ﴿٨٠﴾

८१. यास्तव आम्ही असे इच्छिले की त्यांच्या पालनकर्त्याने याच्या जागी त्यांना अशी संतती द्यावी जी त्याच्या तुलनेने स्वच्छ शुद्धतेच्या दृष्टीनेहि अधिक चांगली असावी व सहानुभुतितहि वरचढ असावी. [१०३]

فَأَرَدْنَا أَن يُبْدِلَهُمَا رَبُّهُمَا خَيْرًا مِّنْهُ زَكَاةً
وَأَقْرَبَ رُحْمًا ﴿٨١﴾

८२. राहिली भिंत तर ती शहरातल्या दोन अनाथ मुलांची होती, जिच्या खाली त्यांचा खजीना होता, आणि त्यांचा पिता एक सदाचारी मनुष्य होता.आपला पालन कर्त्याने इच्छिले की त्यांनी आपल्या तारूण्यावस्थे प्रत पोहचावे व आपला खजीना काढून घ्यावा.[१०४] हे आपल्या पालनकर्त्याच्या कृपेने घडले.मी जे काही केले आपल्या आधिकारान्वये केले नाही.[१०५] ही आहे खरी हकीकत त्या गोष्टींची ज्यांच्या बाबत तुम्ही धैर्य बाळगू शकले नाहीत.[१०६]

وَأَمَّا الْجِدَارُ فَكَانَ لِغُلَامَيْنِ يَتِيمَيْنِ فِي الْمَدِينَةِ وَكَانَ
تَحْتَهُ كَنزٌ لَّهُمَا وَكَانَ أَبُوهُمَا صَالِحًا فَأَرَادَ رَبُّكَ أَن يَبْلُغَا
أَشُدَّهُمَا وَيَسْتَخْرِجَا كَنزَهُمَا رَحْمَةً مِّن رَّبِّكَ ۚ وَمَا فَعَلْتُهُ
عَنْ أَمْرِي ۚ ذَٰلِكَ تَأْوِيلُ مَا لَمْ تَسْطِع عَّلَيْهِ صَبْرًا ﴿٨٢﴾

८३. आणि ते तुम्हाला जुलकरनैन विषयी विचारतात [१०७] सांगा, मी त्याचा काही वृत्तांत तुम्हाला ऐकवितो.

وَيَسْأَلُونَكَ عَن ذِي الْقَرْنَيْنِ ۖ قُلْ سَأَتْلُو عَلَيْكُم مِّنْهُ ذِكْرًا ﴿٨٣﴾

८४. आम्ही त्याला जमीनीवर सत्ताधिकार प्रदान केला होता आणि प्रत्येक प्रकारची साधने प्रदान केली होती.[१०८]

إِنَّا مَكَّنَّا لَهُ فِي الْأَرْضِ وَآتَيْنَاهُ مِن كُلِّ شَيْءٍ سَبَبًا ﴿٨٤﴾

८५. तर त्याने (एका मोहीमे साठी) साधन सामुग्री केली.

فَأَتْبَعَ سَبَبًا ﴿٨٥﴾

८६. येथेपावेतो की तो सूर्यास्ताच्या ठिकाणा पर्यंत पोहचला तिथे त्याने सूर्याला काळ्या कुंडात बुडत असतांना पाहिले. [१०९] आणि त्याजवळच त्याला एक जन-समूह भेटला. [११०] आम्ही फर्माविले, हे जुलकरनैन, वाटल्यास यांना शिक्षा द्या, वाटल्यास यांच्याशी सद्व्यवहार करा.[१११]

حَتَّىٰ إِذَا بَلَغَ مَغْرِبَ الشَّمْسِ وَجَدَهَا تَغْرُبُ فِي عَيْنٍ حَمِئَةٍ
وَوَجَدَ عِندَهَا قَوْمًا ۗ قُلْنَا يَا ذَا الْقَرْنَيْنِ إِمَّا أَن
تُعَذِّبَ وَإِمَّا أَن تَتَّخِذَ فِيهِمْ حُسْنًا ﴿٨٦﴾

१०३. मूळ ग्रंथात ‘गुलाम’ हा शब्द वापरला गेला आहे. ज्याचा अर्थ अवयस्क मुलालाहि लागू पडतो व वयस्क मुलालाहि. सूरह युसूफ मधील उल्लेखा नुसार जेव्हा काफिल्या वाल्यांपैकी एका माणसाने विहीरीत डोल (बादली) टाकल्या नंतर युसूफ यांना पाहिले तेव्हा उद्‌गारला, खुशखबरी असो. हा तर मुलगा आहे. वास्तविक त्या वेळी हज़रत युसूफ १७ वर्षाचे होते म्हणून हा मुलगा ज्याला हज़रत खिज्र यांनी ठार केले, वयस्क राहिला असेल व काफीर देखील. त्याचे माता पिता ईमान बाळगणारे होते म्हणून मुलाचे काफीर असणे त्याचे इस्लाम धर्माशी प्रतारणा करण्याच्या अर्था समान होते. आणि इस्लाम धर्माशी प्रतारणा करणाऱ्याची शिक्षा इस्लाम मध्ये मृत्युदणड ही आहे. आणि हा मुलगा शिरजोरहि होता. या परिस्थितीचे हज़रत खिज्र यांना ईश-संदेशा द्वारे जेव्हा आकलन झाले तेव्हा त्यांना भय जाणवले की हा मुलगा आपल्या माता-पित्यास सक्त यातना देईल. या भया पोटी त्यांनी ही प्रार्थना केली की अल्लाहने त्यांना याच्या जागी दुसरा चांगला मुलगा प्रदान करावा. असा मुलगा जो श्रद्धा व चारित्र्याच्या दृष्टीनेहि खूप स्वच्छ शुद्ध असावा आणि फार दयाळू देखील. या साठी की त्याने आपल्या माता पित्याशी सहानुभूति पूर्वक वागावे. त्या नंतर ईश आदेशान्वये त्यांनी त्या मुलाला ठार केले. हा वध एक तर इस्लाम धर्माकडे पाठ फिरविणाऱ्याचा वध होता, जो शरीअत दृष्ट्या उचित आहे किंवा जर मुलगा अवयस्क होता तर हा एक प्रकारे अल्लाहच्या लागू होणाऱ्या आदेशाची अंमलबजावणी होती जी असामान्यपणे एका पैगंबरच्या हस्ते पार पडली. अशा स्थितीत यास वधाच्या सर्व सामान्य आदेशांवर कयास केला जाऊ शकत नाही. किंबहुना ही एक अपवादात्मक परिस्थिती होती जी केवळ हज़रत खिज्र साठी विशेषत्वाने होती आणि जिला शरीअत धारक हजरत मूसा यांच्यावरहि स्पष्ट केले गेले हा त्याच स्वरुपाचा अपवादात्मक आदेश होता. जसा हज़रत इब्राहीम यांना त्यांचे पुत्र हज़रत इस्माईल याना कत्तल करण्याचा दिला गेला होता. उघड आहे हा हज़रत इब्राहीम करीता पैगंबर होण्याच्या रुपात विशेष आदेश होता. तद्‌वतच हज़रत खिज्र यांना एका काफीर मुलाच्या हत्त्येचा आदेश ते पैगंबर असल्याच्या नात्याने विशेषत्वाने दिला गेला होता म्हणून या वर ना एखादा आक्षेप येतो आणि ना इतरांकरिता धर्मानुकूल ठरण्यास कारणीभूत होऊ शकतो.

हजरत खिज्र यांनी स्वत:साठी ‘आम्हाला हे भय जाणवले’ तसेच ‘आम्ही इच्छिले’ शब्दांद्वारे जे अनेक वचनी सर्वनाम योजिले त्याचे कारण असे की हत्त्येचे हे काम खरे पाहता लागू होणाच्या स्वरुपाचे होते ज्यास फिरिश्तेच पार पाडू शकत होते यास्तव नवल नव्हे की या कार्यास फिरिश्ते हज़रत खिज्र यांना सहाय्यक राहिले असावेत व त्यांच्या मदतीस लक्षात घेता, त्यांनी ‘आम्ही’ हे सर्वनाम प्रयोजिले असावे. हत्त्येचे हे काम समुद्र किनारी ज्या शांततेने पार पडले त्यावरून असे दिसते की अल्लाहच्या या आदेशाची अंमल बजावणी करण्यात फिरिश्त्यांनी हज़रत खिज्र यांना सहाय्य केले असेल.

१०४. वस्तीवाल्यांनी अनुचित वागणूक केली.असतांनाहि भिंतीला पारिश्रमिक न घेता उभारण्याची सेवा हज़रत खिज्र यांनी अशासाठी पार पाडली की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना ही खबर दिली होती की या भिंतीखाली अनाथांची सम्पत्ति गाडलेली आहे. जर भिंत पडली असती तर कोणीहि ती सम्पत्ति गिळकृत करू शकत होता, जेव्हा वस्तीचे लोक दृष्ट व वाईट आचरण बाळगणारे होते. हजरत खिज्र यांनी वस्ती वाल्यांच्या वर्तनास ध्यानी मनी न घेता आपल्या हातांनी त्या पडक्या भिंतीची पुन्हा उभारणी केली. अर्थात हे मोठे सत्कृत्य होते जे त्यांच्या हातून पार पडले.

१०५. हा या गोष्टीचा स्पष्ट पुरावा होय की ते पैगंबर होते कारण त्यांनी ही कामे आपल्या मर्जीने वा अधिकाराने केली नाहीत.किंबहुना ईश-आदेशाने केलीत. यावरून असे दिसते की हज़रत खिज्र यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने जे विशेष ज्ञान प्रदान केले होते त्या आधारे विशेष प्रकारची सेवा त्यांना सोपविली गेली होती. म्हणजे अशी उपाय योजना अंगिकारणे की जिचा हेतु स्पष्ट न व्हावा. परंतु निष्कर्षाच्या दृष्टीने ते काम मांगल्याकारक व लोकांच्या उत्कर्षास कारणीभूत ठरावे.

१०६. हजरत मूसा यांच्या प्रवासाचा हा वृत्तांत जो एका विशेष ज्ञानाच्या प्राप्ती करिता होता. येथे संपला. या वृत्तांताच्या निवेदानाचा हेतु असा की अनिवार्यत: अशा घटना घडून येतात व अशी अवस्था निर्माण होते. ज्यांच्या खऱ्या हेतूवर आवरण पडलेले असते. बाह्यात: डोळ्यांना ते दिसून येत नाही, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहची कृपा व त्याचे ईशत्व पडद्याआड कार्यरत असते. याची एक झळक त्या घटनांद्वारे दिसून येते ज्या हज़रत मूसा यांना हजरत खिज्र यांच्या संबंधाने उद्‌भवल्या. यास्तव कुफ्र व इस्लामच्या संघर्षात ईमान बाळगणाऱ्यास ज्या प्रतिकूल परिस्थितीतून पार पडावे लागत आहे त्यामुळे विमनस्क होऊ नये. नवल नव्हे की यातून फार मोठे मांगल्य उदयास यावे व मेघांमध्ये लपलेल्या त्याच्या कृपेचा वर्षाव व्हावा. म्हणून ईमान बाळगणाऱ्यांनी अल्लाहवर भरवसा ठेवीत धैर्याने वागावे.

या वृत्तांताच्या माध्यमाने दुसरा जो बोध देण्याचा हेतु आहे तो हा की हे जग घटनांचे जग आहे व त्या मागे जी महान उद्दिष्टे आहेत ती अध्यारूत आहेत. तेव्हा हे आवश्यक ठरते की एक दिवस असा यावा जेव्हा वस्तुस्थितीस अनावरित केले जावे जेणेकरून लोकांना हे कळून यावे की दुनिया केवळ अंधेर नगरी नव्हती, किंबहुना सर्व ज्ञानी व सत्ताधिकारी अल्लाहची योजना होती जिच्या पाठीमागे महान उद्दिष्टे कार्यरत होती. सर्वश्रेष्ठ

अल्लाहने कियामतीचा दिवस याच कारणास्तव निश्चित केला आहे. यासाठी की जगाच्या रहस्य भेदांवरून आवरण हटावे व जगाच्या बाबतीत खरा व चुकीचा दृष्टीकोन बाळगणाऱ्यांना आपापल्या कर्माचा चांगला किंवा वाईट मोबदला मिळावा.

१०७. हा प्रश्न मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी यहुदींच्या इशाऱ्यावरून केला होता व या द्वारे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची परिक्षा घेणे अभिप्रेत होते की जर खरोखर पैगंबरांवर वही (ईश-संदेश) अवतरीत होतो तर त्यांनी जुलक़रनैनचा वृत्तांत निवेदन करावा. त्यांना हे चांगल्या प्रकारे ठाऊक होते की पैगंबरांनी ना इतिहासाचे ज्ञान कोठून प्राप्त केले आणि ना धर्म-ग्रथांचे वाचन केले आहे. म्हणून त्यांना या प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही. परंतु अल्लाहच्या संदेशाने जुलकरनैनच्या समस्येवर अशा प्रकारे प्रकाश टाकला की पैगंबरांच्या प्रेषित्वाचा आणखी एक पुरावा समोर आला.

यहुदींच्या प्रश्नाने ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की जुलकरनैन यांचे व्यक्तिमत्व त्यांना चांगल्या प्रकारे परिचित होते व ही उपाधि पूर्वीपासून चालत आली होती. म्हणून पवित्र क़ुरआनाने या विश्व विजेत्याच्या अति महान विजयांचा उल्लेख करीत त्याच्या चारित्र्याच्या त्या पैलूंना प्रकट केले. ज्या द्वारे त्याचे ईश-भय, न्याय-प्रियता व ईश्वरा समोर उत्तर दायित्वाच्या तीव्र जाणीव व्यक्त होते. या नावाने होण्याचे कारण संभवत: हे होते की त्याचे साम्राज्य पूर्वेस व पश्चिमेस दूर पर्यंत विस्तृत झाले होते आणि बहुधा हा पहिला शासक होय ज्याची राज्य सत्ता मनुष्य वस्तीच्या फार मोठ्या हिश्श्यावर कायम झाली होती. 'कर्न'चा अर्थ शिंग असा आहे व जुलक़रनैन चा अर्थ दोन शिंगे असलेला असा आहे. दोन शिंगाशी अभिप्रेत पूर्व आणि पश्चिमची ती दोन टोके होत जिथे मनुष्य वस्ती संपत असे. त्यानंतर जी मानव वस्ती होती ती एक तर अन्य दिशेत होती किंवा समुद्र व पर्वतांना ओलांडल्या नंतर होती.

'जुलक़रनैन'चे व्यक्तिमत्व कुरआन अवतरणाच्या काळी सुपरिचित होते. परंतु नंतर मात्र पडद्याआड लपले आणि जेव्हा भाष्यकारांनी त्याला निश्चित करण्याचा प्रयत्न केला तेव्हा अलेक्झांडरला ज्याचा काळ इ. स. पूर्वी ३२३ ते ३४५ होता व जो ॲरिस्टॉटलचा शिष्य होता. सुप्रसिद्ध विश्वविजेता असल्या कारणाने या व्यक्तिचा प्रयोकृत्य ठरविले. वस्तुत: अलेक्झांडर बाबत विश्वासाने हे म्हटले जाऊ शकत नाही की तो मुसलमान होता व तो न्यायी बादशाह होता आणि ना त्याची पश्चिमेस एखाद्या अशा मोहीमेचा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध आहे ज्याचा क़ुरआनाने उल्लेख केला आहे. किंबहुना याच्या उलट इतिहास त्याला एक मूर्तिपूजक व विस्तार-प्रिय शासक या नात्याने प्रस्तुत करतो. वास्तव त्यास क़ुरआनातील जुलकरनैन ठरविले जाऊ शकत नाही.

ज्याअर्थी जुलकरनैनचे व्यक्तिमत्व यहुद्यांना परिचित होते म्हणून याच्या संशोधनासाठी प्राचीन ग्रंथांकडेच रुजू करावे लागेल. आजच्या काळात मौलाना अबुल कलाम आजाद यांनी या ग्रंथांद्वारे व इतर ऐतिहासिक अवशेषांच्या हवाल्याने आपले संशोधन तफसीर 'तर्जुमानुल् कुरआन' मध्ये सादर केले आहे ते आपल्या संशोधनाच्या आधारावर 'सायरस'(Cyrus) ला ज्याचा काळ ५२९ते ५५९ इ. स. पूर्वीचा होता. जुलकरनैन ठरवितात.

सायरस हा इराणाचा शासक होता. त्याने फारस व मीडिया (उत्तर इराण) चे संयुक्त साम्राज्य बनविल्या नंतर पश्चिमेकडे रोख वळविला होता व त्यांच विजय तुर्की पर्यंत पोहचले होते आणि पूर्वेत हि त्याची साम्राज्य- कक्षा विस्तृत झाली होती त्याने बाबील जिंकल्यानंतर बनी इस्राईलला जे बुख़्ते नस्रच्या काळा पासून गुलामीचे जीवन जगत होते, स्वतंत्र करून येरूशालेम जाण्याची अनुज्ञा दिली तात्पर्य बनी इस्राईल करिता सायरस मुक्तिदाता म्हणून प्रकटला होता. बायबल मध्ये त्याचा उल्लेख एक चांगला शासक या स्वरुपात केला गेला आहे व त्याला ईश्वराचा गुराखी म्हटले गेले आहे (रासअिया ४४:२८) आणि 'अज्रा'च्या ग्रंथाद्वारे तो ईश्वर भक्त असल्याची साक्ष मिळते (पहा 'अज्रा'प्रकरण १ व ६) यास्तव शक्य आहे की सायरसचे व्यक्ति क़ुरआनातील जुलकरनैन असेल.

प्राचीन इतिहासकार हेरोडोटस (Herodotus)याने सायरसला ईराणचे सर्वाधिक मान्यवर व्यक्तिमत्व म्हटले आहे व त्याच्या मोहीमांचा उल्लेख केला आहे. इन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकाचा निबंधकार त्याचा परिचय अशा प्रकारे करवितो.

'सायरस' अखमीनीयीन साम्राज्याचा संस्थापक होता हे साम्राज्य पहिले विश्व-राज्य (World-State) होय. ज्यात एजियन समुद्रा पासून सिंधू नदी पर्यंतचा प्रदेश समाविष्ट होता. तो एक सहिष्णु व आदर्श शासक होता ज्याला प्राचीन ईराण वासीयांनी 'राष्ट्रपिता' या नावाने पुकारले आणि बायबल मध्ये ज्याला बाबीलच्या यहुदी गुलामांच्या संबंधाने मुक्ति दाता म्हटले गेले (Ency. Britannica Vol. V. P. 409)

१०८. म्हणजे एका विशाल साम्राज्या करिता ज्या अतिशय विस्तृत साधन सामुग्रीची गरज होती अल्लाहच्या कृपेने त्याला प्राप्त झाली होती.

१०९. म्हणजे पश्चिमे कडे खुश्कीच्या शेवटच्या किनाऱ्यापर्यंत पोहचला. त्यापुढे समुद्र होता. ज्याने काळ्या सरोवराचे स्वरुप धारण केले होते. तिथे त्याला असे दिसून आले की सूर्य त्या गढूळ पाण्यात बुडत आहे. सूर्य बुडणे हा सर्वसामान्य वाक्प्रचार आहे. त्याचा शाब्दिक अर्थ अन्य कसलाही अभिप्रेत नाही. अर्थात जुलकरनैन जेव्हा पश्चिमेच्या मोहीमेवर रवाना झाला तेव्हा देशा पाठोपाठ देश जिंकत एका अशा देशाप्रत पोहचला

जे खुश्कीचे शेवटचे टोक होते. त्याच्यापुढे सरोवरा सारखा समुद्र होता म्हणून त्या पुढे जाण्याचा प्रश्नच नव्हता.

सायरसचे शासन केंद्र हमदान (इराण) हे होते आणि जेव्हा तो पश्चिमेच्या मोहीमेवर रवाना झाला केव्हा त्याने लीडिया (तुर्क) पर्यंतचा इलाका जिंकला त्याच्या पश्चिमेस अेजियन समुद्र पडतो आणि समुद्र किनारी अजमीर उपसागारने एक निर्झरला सरोवर सा दृश्य स्वरुप धारण केले आहे ज्यात गदीस या नदीचे लाल माती मिश्रीत गढूळ पाणी पडते. संभवत: सायरसने त्याच्याच किनाऱ्यावर उभे राहून पाहिले असेल तेव्हा त्याला गढूळ पाण्यात सूर्य बुडत असलेला दिसला असेल (हे विवरण डॉ. अब्दुल अलीम अब्दुल रहमान खिज्रचे पुस्तक 'मुफाहीम जॉग्रीफीया फिल कससिल कुरआनी किस्सा जुलकरनैन मधून उद्धृत आहे. हे पुस्तक अरबी भाषेत आहे.)

११०. हा तुर्की जन समूह असेल जसे सायरसच्या घटनांवरून दिसून येते.

१११. म्हणजे जुलकरनैनच्या मनात या गोष्टीची प्रेरणा दिली गेली की तो एका अशा पोजीशन मध्ये आहे की त्याने त्या जन समूहास शिक्षा द्यायची इच्छा बाळगल्यास तसे त्याला पूर्ण सामर्थ्य आहे आणि जर सद्व्यवहार करायची इच्छा असेल तर हे हि त्याच्या अधिकारात आहे याचा असा अर्थ नव्हे की त्याने ज्यांच्यावर विजय मिळविला त्या जनसमूहावर वाटल्यास अत्याचार करावा किंवा त्यांच्याशी सद्व्यवहार करावा, किंबहुना याचा अर्थ त्याच्या त्या पोजीशनला स्पष्ट करणे होय जी प्रत्यक्षत: त्याला प्राप्त झाली होती.

## सागर मीलाप

**हज़रत मूसा व हज़रत ख़िज्र यांच्या भेटीचे संभाव्य ठिकाण**



८७. तो म्हणाला यांपैकी जो अत्याचार करील त्याला आम्ही शिक्षा देऊ. [११२] मग तो आपल्या पालन कर्त्याकडे परतविला जाईल आणि तो त्याला सक्त शिक्षा-यातना देईल.

قَالَ أَمَّا مَن ظَلَمَ فَسَوْفَ نُعَذِّبُهُ ثُمَّ يُرَدُّ إِلَىٰ رَبِّهِ
فَيُعَذِّبُهُ عَذَابًا نُّكْرًا ﴿٨٧﴾

८८. आणि जो ईमान बाळगेल व सत्कृत्ये करील तर त्याच्या साठी चांगला मोबदला आहे आणि आम्ही त्याला अशा गोष्टींचा आदेश देऊ ज्या सोप्या असतील.[११३]

وَأَمَّا مَنْ آمَنَ وَعَمِلَ صَالِحًا فَلَهُ جَزَاءً الْحُسْنَىٰ ۖ
وَسَنَقُولُ لَهُ مِنْ أَمْرِنَا يُسْرًا ﴿٨٨﴾

८९. मग त्याने (आणखी एका मोहीमे साठी) साधन सामुग्री केली.[११४]

ثُمَّ أَتْبَعَ سَبَبًا ﴿٨٩﴾

९०. येथेपावेतो की जेव्हा तो सूर्योदयाच्या ठिकाणापर्यंत पोहचला तेव्हा त्याने पाहिले की तो एका जन-समूहा वर उदय पावतो ज्याच्या समोर आम्ही कोणतीहि आढ राखली नाही.[११५]

حَتَّىٰ إِذَا بَلَغَ مَطْلِعَ الشَّمْسِ وَجَدَهَا تَطْلُعُ عَلَىٰ قَوْمٍ لَّمْ نَجْعَل
لَّهُم مِّن دُونِهَا سِتْرًا ﴿٩٠﴾

९१. अशा प्रकारे (आम्ही त्याला या जन समूहावर देखील वर्चस्व प्रदान) केले आणि त्याच्या जवळ जे काही होते त्यास आम्ही पूर्ण पणे जाणून होतो. [११६]

كَذَٰلِكَ وَقَدْ أَحَطْنَا بِمَا لَدَيْهِ خُبْرًا ﴿٩١﴾

९२. मग त्याने (तिसऱ्या मोहीमेची ) साधन सामुग्री केली.

ثُمَّ أَتْبَعَ سَبَبًا ﴿٩٢﴾

९३. येथपावेतो की जेव्हा तो दोन (पर्वतांच्या) भिंतीच्या दरम्यान पोहचला तेव्हा त्याला त्यांच्या अलीकडे एक असा जन समूह भेटला ज्याला कोणतीही गोष्ट समजून येत नव्हती.[११७]

حَتَّىٰ إِذَا بَلَغَ بَيْنَ السَّدَّيْنِ وَجَدَ مِن دُونِهِمَا
قَوْمًا لَّا يَكَادُونَ يَفْقَهُونَ قَوْلًا ﴿٩٣﴾

९४. ते लोक म्हणाले, हे जुलकरनैन ! याजूज माजूज या देशात उत्पात माजवितात, तर काय आम्ही आपणाकरिता खराज (कर) निश्चित करावा, जेणे करून आपण आमच्या व त्यांच्या दरम्यान एक भिंत बनवावी.[११८]

قَالُوا يَا ذَا الْقَرْنَيْنِ إِنَّ يَأْجُوجَ وَمَأْجُوجَ
مُفْسِدُونَ فِي الْأَرْضِ فَهَلْ نَجْعَلُ لَكَ خَرْجًا
عَلَىٰ أَن تَجْعَلَ بَيْنَنَا وَبَيْنَهُمْ سَدًّا ﴿٩٤﴾

११२. म्हणजे आम्ही शिक्षा केवळ अशांनाच देऊ जे अत्याचार पूर्वक कृत्य करतील अन्यथा अतिरेक कोणावरहि केला जाणार नाही. जुलकरनैनच्या या घोषणेचा अर्थ हा होता की एका पराभूत जन समूहाशी त्याचे वर्तन व त्याच्या शासनाची पॉलीसी न्यायाला धरून असेल.

स्पष्ट असावे की सायरसने ज्या वेळी सत्ताधिकार सांभाळला त्या वेळी त्याच्या सभोवती अत्याचारी शासने कायम होती आणि मानवता क्रूर शासकांमुळे त्रस्त झाली होती. यास्तव बाबीलचे शासन जुलुम-अत्याचाराचे निकृष्टतम उदाहरण होती जाने बनी इस्राईलला कैद्याचे जीवन जगण्यास विवश केले होते. या अत्याचारी शासकांच्या जुलुमा पासून मुक्ति देण्याचे कार्य सर्वश्रेष्ठ आल्लाहने ज्याच्या हस्ते घेतले तो सायरस होता.

क़ुरआनाने जुलकरनैनच्या ज्या विजयांचा उल्लेख केला आहे त्याचा अर्थ हाच की त्याने मानवतेस अत्याचार व उत्पाता पासून मुक्त करण्याकरिता ही पाऊले उचलली होती आणि ही मानवतेची फार मोठी सेवा होती याचा अर्थ मुलुखगिरी व आपले वैभव वाढविणे असा मुळीच नव्हता. जगात जेथे अत्याचाराचे सावट पसरते तिथे अल्लाहच्या कृपेचा चमत्कारहि उदयास येतो मग न्यायाचे वारे वाहू लागतात.

११३. यावरून हे स्पष्ट झाले की जुलकरनैनच्या दृष्टी पथात केवळ हेच उद्दिष्ट नव्हते व अत्याचार पिडीत जनसमूहांना अत्याचारी शासकांच्या विळख्यातून सोडवावे, किंबहुना हे उच्च ध्येयहि विचाराधीन होते की लोकांना एकेश्वरवादाचा मार्ग दाखविला जावा आणि आखिरतच्या उत्तर दायित्वाची सुज्ञता निर्माण करून सदाचार युक्त जीवन जगण्यास प्रवृत्त केले जावे.

जुलकरनैनच्या या प्रयत्नांद्वारे ज्यांचा उल्लेख क़ुरआनाने केला आहे. एक फार मोठी तात्विक बाब ही देखील स्पष्ट होते की या पवित्र उद्दिष्टास लक्षात घेता युद्ध पातळी वर प्रयत्न करणे उचित आहे.

११४. ही दुसरी मोहिम पूर्वेकडे होती.

११५. म्हणजे तो पूर्वेकडे वस्त्यांना ओलांडत ओलांडत एका अशा ठिकाणी पोहचला जिथे लोकांना उन्हापासून सुरक्षित राहण्याजोगे कोणतेहि साधन नव्हते म्हणजे घरे वगैरे नव्हती. किंबहुना लोक वाळवंटात भटक्या जातीचे जीवन व्यतीत करीत होते.

सायरस आपल्या पूर्वेकडील मोहीमेत बल्दव पर्यंत पोहचला जे अफगानीस्तानात आहे आणि दुसरीकडे बलुचीस्तानातल्या मकरान पर्यंत पोहचला याच्या पुढे पर्वतमाला होती. येथे भटक्या विमुक्त कबीले होते हे कबीले संस्कृती पासून अगदीच अनभिज्ञ होते (पहा मफाहीम जुगराफिया फिल कससिल क़ुरआनी पृष्ठ २६२,२६३)

हे जंगली कबीले इराणच्या सरहद्दीवर लूटमार व उत्पात माजवित राहिले असतीत म्हणून सायरसने त्यांच्या प्रदेशाच्या शेवटच्या हद्दी पर्यंत पोहचून त्यांची मुस्कुटदाबी केली.

११६. अशा प्रकारे अल्लाहने या जंगली कबिल्यावरहि जुलकरनैनला वर्चस्व प्रदान केले आणि त्याच्या त्या योजना व साधनांना सर्वश्रेष्ठ अल्लाह पूर्णत: जाणून होता ज्या त्याने या मोहीमेस जिंकण्याकरिता अंगिकारल्या होत्या.

११७. हा जुलकरनैनच्या तिसऱ्या मोहीमेचा उल्लेख होय. प्रमाण पद्धति अशी की ती मोहीम उत्तरेकडे होती. तो पुढे गेल्यावर एका अशा ठिकाणी पोहचला जिथे दोन पहाडांच्या दरम्यान एक दरी होती जिच्या शेजारी एक असंस्कृत जन समूह रहात होता जो मोठ्या कष्टाने एखादी गोष्ट समजत असे. संभवत: असंस्कृत असण्याखेरीज या जन-समूहाची भाषा देखील वेगळी राहीली असेल.

सायरस ने पश्चिमेकडील व पूर्वेकडील देशांना जिंकले तसेच त्त्कालीन प्रसिद्ध व सर्वाधिव मजबूत शासन बाबीलला देखील जिंकले होते आणि त्याचे साम्राज्य क्षेत्र कॉस्पीयन सागरा (Caspian Sea) पर्यंत विस्तृत झाले होते. म्हणून त्याची तिसरी मोहीम उत्तरेकडे राहिली असेल. इतिहासात याचा स्पष्टीकरणासह झालेला नसला तरी हेरोडोटस व जिनोफन दोघे यूनानी इतिहासकार स्पष्टीकरण करतात की गोरेश ने लिडिया जिंकल्या नंतर सेथीन या काबिल्यांचा सरहद्दीवरील आक्रमणांची रोक थाम करण्याकरिता विशेष प्रबंध केला होता.(कससुल क़ुरआन-मौलाना मुहम्मद हिफजुर्रहमान ख.३पृष्ठ१५३) आजार बायजान व अरमिनीया यांच्या दरम्यान एक कालवा 'नहर कोरा' या नावाने प्रसिद्ध आहे. ज्याचा संबंध गोरश म्हणजे सायरसशी जोडलेला दिसतो उत्तर कॅस्पीयन समुद्र व काळा समुद्र यांच्या दरम्यान कॉकोशस (Caucasus)चा पर्वत-क्रम आहे. याला कोहे काफ म्हणतात. या पर्वत श्रृंखलेत एक खिंड होती, तिथे सायरसला एक जन समूह भेटला ज्याची भाषा भिन्न होती.

११८. या जनसमूहाने जुलकरनैनला कसेतरी स्पष्ट केले की याजूज माजूज या दरीतून निघतात व उत्पात माजवितात म्हणून आपण या दरीची पोकळी भिंत उभारून पूर्ण भरावी जेणेकरून त्यांचा येण्याचा मार्ग बंद व्हावा. या कामासाठी आम्ही आपणास कर देण्यास तयार आहोत.

याजूज माजूज (Gog & Magog) शी अभिप्रेत ते जन-समूह होत जे कॉकेशिया पर्वताच्या उत्तरेस वासल्या होत्या आणि रशिया पासून मंगोलिया पर्यंत पसरलेल्या होत्या. त्यांच्या विषयी त्या कथनांमध्ये काही तथ्य नाही ज्यांच्यात यांना विचित्र निर्मिती या नात्याने प्रस्तुत केले गेले आहे. किंबहुना ते जंगली जन समूह होते आणि आसपासच्या देशांवर हल्ला चढवून

लूटमार करीत. क़ुरआनने, 'ते जमीनीवर उत्पात माजवित होते' या शब्दात उल्लेख केला आहे. बायबल मध्ये माजूजला नूहच्या वंशापासून दर्शविले गेले आहे म्हणजे यॉफसबिन नूहची संतती (उत्पत्ति १:१०) आणि हिजकईल या ग्रंथातील उल्लेख असा- "हे मानवपुत्रा, जोगविरूद्ध संदेश देऊन सांगा, प्रभू परमेशवर म्हणतो, हे गोगा रोश मेशोख व तुबला यांच्या अधिपति,पहा मी तुज विरूद्ध आहे.......... मी मागोगांत व द्वीपात निर्भय राहणाऱ्या लोकांत अग्नि पाठवीन, तेव्हा त्यास समजेल की मी परमेश्वर आहे." (यहेज्केल:३९)

संभवत: रोशशी अभिप्रेत रशिया 'मस्क' शी अभिप्रेत मास्को आणि तोबल शी अभिप्रेत तोबालिस्क होय. यावरून स्पष्ट झाले की त्या काळात रशियामध्ये जंगली कबीले होते. जे लूटमार हत्या वगैरे करीत इब्ने खल्दून लिहितात-

'आणि पूर्वेकडे याजूजच्या वस्त्या आहेत आणि त्यांच्या दरम्यान कॉकोशिया पर्वत आडपडदा आहे. (मुकद्दमा इब्ने खल्दून पृष्ठ ७९)




सायरसची पश्चिमेकडील मोहीम


सायरसची पूर्वेकडील मुहीम
68⁰ Long.
28⁰ Lat.
बल्ख़
अफ़ग़ानिस्तान
मकरान
ईराण
परशिया
कैस्पियन समुद्र
मीडिया
हमदान
N

**तो म्हणाला, माझ्या पालन कर्त्याने जे काही माझ्या कब्ज्यात (ताब्यात) देऊन ठेवले आहे ते अधिक चांगले आहे. तुम्ही सामर्न्यानिशी माझी मदत करा, मी तुमच्या व त्यांच्या दरम्यान भिंत बनवून देतो.** ***(अल-क़ुर्आन)***

९५. तो म्हणाला, माझ्या पालन कर्त्याने जे काही माझ्या कब्ज्यात (ताब्यात) देऊन ठेवले आहे ते अधिक चांगले आहे. तुम्ही सामर्थ्यानिशी माझी मदत करा, मी तुमच्या व त्यांच्या दरम्यान भिंत बनवून देतो.[११९]

قَالَ مَا مَكَّنِّي فِيهِ رَبِّي خَيْرٌ فَأَعِينُونِي بِقُوَّةٍ أَجْعَلْ
بَيْنَكُمْ وَبَيْنَهُمْ رَدْمًا ﴿٩٥﴾

९६. मला लोखंडाचे तुकडे आणून द्या-येथपावेतो की दोन्ही पर्वतांच्या मधल्या पोकळीस भरून टाकले, तेव्हा आदेश दिला याला (प्रज्वलीत करण्यासाठी) फूंका-येथपावेतो की जेव्हा त्यास अगदी अग्नि (सारखे लाल) केले तेव्हा तो म्हणाला, आणा,आता यावर वितळलेले तांबे ओततो.[१२०]

آتُونِي زُبَرَ الْحَدِيدِ ۖ حَتَّىٰ إِذَا سَاوَىٰ بَيْنَ الصَّدَفَيْنِ قَالَ
انفُخُوا ۖ حَتَّىٰ إِذَا جَعَلَهُ نَارًا قَالَ آتُونِي أُفْرِغْ عَلَيْهِ قِطْرًا ﴿٩٦﴾

९७. (आणि जेव्हा तट बनला) तेव्हा याजूज माजूज ना त्याच्यावर चढू शकत होते आणि ना त्यास छिद्र पाडू शकत होते.[१२१]

فَمَا اسْطَاعُوا أَن يَظْهَرُوهُ وَمَا اسْتَطَاعُوا لَهُ نَقْبًا ﴿٩٧﴾

९८. तो म्हणाला,ही माझ्या पालनकर्त्याची कृपा होय मग जेव्हा माझ्या पालनकर्त्याचा वायदा उदयास येईल तेव्हा याला मातीत मिळवील आणि माझ्या पालनकर्त्याचा वायदा अगदी सच्चा आहे.[१२२]

قَالَ هَٰذَا رَحْمَةٌ مِّن رَّبِّي ۖ فَإِذَا جَاءَ وَعْدُ رَبِّي جَعَلَهُ دَكَّاءَ ۖ
وَكَانَ وَعْدُ رَبِّي حَقًّا ﴿٩٨﴾

९९. आणि त्या दिवशी [१२३] आम्ही लोकांना (अशा स्थितीत) सोडून देऊ की लाटांप्रमाणे ते एकमेकांवर आदळतील व सूर फूंकला जाईल आणि आम्ही सर्वांना एकत्रित करू.[१२४]

وَتَرَكْنَا بَعْضَهُمْ يَوْمَئِذٍ يَمُوجُ فِي بَعْضٍ ۖ وَنُفِخَ فِي الصُّورِ
فَجَمَعْنَاهُمْ جَمْعًا ﴿٩٩﴾

१००. त्या दिवशी आम्ही काफीरां समोर जहन्नम सादर करणार. [१२५]

وَعَرَضْنَا جَهَنَّمَ يَوْمَئِذٍ لِّلْكَافِرِينَ عَرْضًا ﴿١٠٠﴾

१०१. ते लोक, ज्यांच्या डोळ्यांवर माझ्या स्मरणा पासून पडदा राहीला आणि ते कोणतीहि गोष्ट ऐकू शकत नव्हते.[१२६]

الَّذِينَ كَانَتْ أَعْيُنُهُمْ فِي غِطَاءٍ عَن ذِكْرِي وَكَانُوا
لَا يَسْتَطِيعُونَ سَمْعًا ﴿١٠١﴾

१०२. काय [१२७] या काफिरांनी असे समजून घेतले आहे की ते मला सोडून माझ्या दासांना आपला कार्य साधक बनवतील.आम्ही काफिरांच्या पाहुणचारासाठी जहन्नम तयार करून ठेवली आहे. [१२८]

أَفَحَسِبَ الَّذِينَ كَفَرُوا أَن يَتَّخِذُوا عِبَادِي مِن دُونِي
أَوْلِيَاءَ ۚ إِنَّا أَعْتَدْنَا جَهَنَّمَ لِلْكَافِرِينَ نُزُلًا ﴿١٠٢﴾

१११९. म्हणजे अल्लाहने मला एवढी विपुल साधने प्रदान केली आहेत की या तट उभारणी करिता, ज्याचे उद्दिष्ट उत्पात माजविणाऱ्यांचा मार्ग रोखणे हा आहे, तुमच्या कडून टॅक्स वसूल करण्याची गरज नाही. ही सेवा मी पार पाडीन तथापि या कार्यात तुम्ही कष्ट सामर्थ्याने माझी मदत करा.

१२०. तात्पर्य हा तट दगड मातीने नव्हे तर लोखंड व तांबे या धातूनी बनविला गेला होता लोखंडाचे तक्ते उभारून त्यांना खूप आच दिली गेली व जेव्हा ते आगी सारखे लाल झाले तेव्हा त्यांच्यावर वितळलेले तांबे ओतले गेले. अशा प्रकारे ही लोखंडी भिंत तयार झाली.

जिथपावेतो लोखंड व तांबे या धातूंच्या उपलब्धतेचा प्रश्न आहे कॉकोशिया पर्वताच्या जवळचा प्रदेश आजरबायजान मध्ये लोखंडाच्या विपुल खाणी आढळतात आणि अरमीनीया मध्ये लोखंडाखेरीज तांबे वगैरेच्या खाणीहि. (पहा मफाहीम जुग्राफीया फिल कससिल कुरआनी-३०७)

तट दोन पर्वतांच्या मध्ये उभारला गेला होता. ही एक खिंड होती जी तटामुळे बंद झाली.

१२१. या तट उभारणी मुळे याजूज माजूज यांची लूटमार थांबली. तट उंच होता त्यामुळे ते तटावर चढून येऊ शकत नव्हते व तो लोखंडी होता म्हणून त्यास छिद्रहि पाडू शकत नव्हते. अशा प्रकारे हे महान सेवा कार्य जुलकरनैनच्या हस्ते पार पडले.

१२२. या ऐतिहासिक तटाच्या उभारणीस जुलकरनैन ने आपली कामगिरी ठरविले नाही. किंबहुना ईमान बाळगणाऱ्या दासाप्रमाणे म्हटले की हा अल्लाहच्या मेहेरबानीचा परिणाम आहे व कियामतीवर विश्वास ठेवत म्हटले की हा तट कितीहि मजबूत का असेना अविनाशी नाही, तर कियामतीच्या दिवशी कोणत्याहि स्थितीत त्याला चूर चूर व्हावे लागेल.

याचा अर्थ असा नव्हे की हा तट कियामती पर्यंत कायम राहील, किंबहुना त्याचा अर्थ असा की हा अगदी दीर्घ मुदती पर्यंत कायम राहिला तरी कियामतीच्या दिवशी तो नाश पावेलच. ही लोखंडी भिंत एक हजार वर्षाहून अधिक काळ कायम राहिली. यास्तव अब्बासी खलीफा वासिकबिल्लाह ने आपल्या काही विद्वानांना याच्या संशोधन करिता पाठविले होते आणि त्यांनी हा रिपोर्ट सादर केला होता की हा तट लोखंडी विटांनी बनविला गेला आहे.ज्यात वितळलेले तांबे सामील केले गेले आहे, आणि याच्या लोखंडी दरवाजाला कुलुप लावलेले आहे.

(तफसीर कबीर खंड २१ पृष्ठ १७०)

१२३. त्या दिवसाशी अभिप्रेत कियामतीचा दिवस होय. जुलकरनैनचे निवेदन या वाक्यावर संपले होते की माझ्या पालनकर्त्याचा वायदा सत्य आहे. या वायद्याच्या सत्यतेच्या अनुषंगाने सर्वश्रेष्ठ अल्लाहने या गोष्टी फर्माविल्या आहेत.

कियामतीचा जेव्हा आरंभ होईल तेव्हा अगदी घाबरून गेल्यामुळे लोक बाहेर पडू लागतील. माणसांचा एक अफाट समुद्र उंचंबळू लागेल. लोक सैरावैरा धावू लागतील आणि या धावपळीत एकमेकांवर आदळतील.

१२४. माणसांच्या परस्पर आदळण्याची घटना पहिल्या सूरच्या प्रसंगी घडून येईल. या घटनेमुळे सर्व माणसे मरतील. त्यानंतर जेव्हा दुसरा सूर फुंकला जाईल तेव्हा सर्व माणस मग ती कोणत्याहि काळात वा कोणत्याहि ठिकाणी मेलेले असोत दुसऱ्यांदा जिवंत होतील आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह या सर्वांना आपल्या समोर हजर राहण्याकरीता एकत्रित करील. अशा प्रकारे आरंभापासून अंतापर्यंतची मानव जाति हश्रच्या मैदानात आपल्या कृतकर्माचा जाब देण्यासाठी एकत्र होईल.

१२५. जे लोक जहन्नमचा इन्कार करीत राहिले व तिची थट्टा उडवित राहिले. कियामतीच्या दिवशी त्यांच्या समोर जहन्नम सादर केली जाईल की घ्या आता आपल्या स्वत:च्या डोळ्यांनी जहन्नमला पाहून घ्या.

१२६. म्हणजे त्यांना भानावर आणण्यासाठी जे हितोपदेश अवतरीत केले गेले होते त्यापासून त्यांनी आपले डोळे मिटून घेतले होते व तो ऐकून घेण्यास हि ते तयार नव्हते.

सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाला श्रवण व दृष्टीची सामर्थ्ये अशा साठी प्रदान केली आहेत की त्याने अल्लाहच्या निशाण्यांना पहावे व त्याच्या उपदेशास ऐकावे. परंतु जेव्हा तो या हेतुसाठी या सामर्थ्यांचा उपयोग करीत नाही तेव्हा ती बेकार होतात मग ना त्याला ईश्वरभक्तिचे एखादे वैभव दिसून येते आणि ना तो ईशोपदेश ऐकण्यासाठी सहिष्णू बनतो.

काफीरांच्या स्वभावधर्माचा अनुभव घेतल्यास हे समजणे सोपे होईल की कशा प्रकारे ते मार्गभ्रष्टते बद्दल स्वत:ला संतुष्ट समजतात. माणसाला जेथे अल्लाहने निर्णायक शक्ती प्रदान केली आहे तिथे त्याच्या अंगी इच्छा आकांक्षाहि ठेवल्या आहेत. जेणेकरून त्याची परिक्षा घेतली जावी. जेव्हा मनुष्य इच्छा-आकाक्षांना काबूत ठेवण्या ऐवजी त्यांच्या अधीन होतो तेव्हा तो चुकीचे निर्णय करून बसतो आणि कुफ्रचा मार्ग खरे पाहता इच्छा आकांक्षांच्या वर्चस्वाच्या परिणामी अंगिकारतो आणि जेव्हा तो इच्छा-आकाक्षांनी प्रभावित होतो तेव्हा त्यांचे पडदे त्याच्या बुद्धिवर पडतात व जेव्हा बुद्धिवर इच्छा आकांक्षांचे पडदे पडतात तेव्हा दृष्टी व श्रवणाची सामर्थ्ये, जी बुद्धिला खरे ज्ञान प्रदान करणारी माध्यमे आहेत यासाठी की बुद्धिने ज्ञानाच्या प्रकाशात माणसाचे मार्गदर्शन करावे, कृतिशून्य होऊन जातात आणि इच्छा- आकांक्षाचे हे पडदे जे बुद्धिवर पडतात वस्तुत: आज्ञानाचे पडदे होत.

१२७. ह्या सूरहच्या समारोपाच्या आयती होत, ज्यात शिर्क व आखिरतचा इन्कार संबंधाने तंबी व उपदेश केला गेला आहे.

१२८. ही तंबी आहे अशा लोकांना जे अल्लाहला आपला एकमेव कार्यसाधक मानण्या ऐवजी त्याच्या दासांना कार्यसाधक मानतात. त्याच्या विषयी ते असे समजतात की कियामत घडूनच आल्यास हे फिरिश्ते ज्यांना आम्ही माध्यम व वसीला बनवून ठेवले आहे. अल्लाह समोर आमच्या मुक्तिसाठी शिफारस करतील त्यांना हे स्पष्ट सांगितले जात आहे की ही तुमची केवळ भ्रामक-कल्पना आहे. फिरिश्ते किंवा आमचे इतर सदाचारी दास तुम्हाला कसे वाचवू शकतील जेव्हा आम्ही काफिरांच्या पाहुणचारासाठी जहन्नम तयार करून ठेवली आहे.

स्पष्ट असावे की मनुष्य आखिरतचा मान्यकर्ताहि असला तरी अल्लाहच्या सदाचारी दासांना कर्ता-करविता मानण्याची श्रद्धा ती मार्गभ्रष्टता होय. जी ईश्वर समोर जाब देण्याच्या जाणीवेस नष्ट करते. परिणामत: मनुष्य आचरणाच्या जागी अमुक एका व्यक्ति वा विभूतीच्या कार्य साधकतेवर विश्वास ठेवू लागतो. या प्रकारे आखिरतची श्रद्धा अगदी कृतीशून्य होऊन जाते. ख्रिश्चनांनी हज़रत ईसा यांना आपला कार्य साधक बनविले आहे. 'कफ्फारा'ची श्रद्धा याचे स्पष्ट प्रमाण होय आणि या श्रद्धेचा परिणाम म्हणून त्यांचे आखिरतला मानणे न मानण्यासमान झाले आहे.

मुसलमानांमध्येहि दुषित श्रद्धा बाळगणारे लोक आहेत कोणी हज़रत अली व हज़रत इमाम हुसैन यांना कार्य साधक बनवून बसले आहे. तर कोणी ''पीराने पीर'' यांना आणि हा याचा परिणाम होय की आखिरतच्या काळजी विषयी ते बेपर्वा झालेले आहेत.

# सायरसची तिसरी मोहीम
# आणि
# लोखंडी तटाची उभारणी



१०३. सांगा, काय आम्ही तुम्हाला दर्शवू की आपल्या आचरणाच्या दृष्टीने सर्वाधिक दुर्दशाग्रस्त लोक कोणते आहेत?

قل هل ننبئكم بالأخسرين أعمالا ﴿١٠٣﴾

१०४. ते, ज्यांचे प्रयत्न इहलोकीय जीवनात हरवले व ते असे समजत राहीले की मोठे चांगले काम करीत आहोत.[१२९]

الذين ضل سعيهم في الحيوة الدنيا وهم يحسبون
أنهم يحسنون صنعا ﴿١٠٤﴾

१०५. हेच ते लोक ज्यांनी आपल्या पालन कर्त्याच्या आयतींचा व त्याच्या भेटीचा इन्कार केला. यास्तव त्यांची कर्मे वाया गेलीत आणि कियामतीच्या दिवशी आम्ही त्यांचे कसलेहि वजन कायम करणार नाही.[१३०]

أولئك الذين كفروا بايت ربهم ولقائه فحبطت
أعمالهم فلا نقيم لهم يوم القيمة وزنا ﴿١٠٥﴾

१०६. त्यांचा मोबदला असेल-जहन्नम, यासाठी की त्यांनी कुफ्र केले होते आणि माझ्या आयतींना व प्रेषितांना थट्टा-विनोद बनविले होते.

ذلك جزاؤهم جهنم بما كفروا
واتخذوا ايتي ورسلي هزوا ﴿١٠٦﴾

१०७. (तथापि) ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कृत्ये केली त्यांच्या आतिथ्या करिता जन्नतच्या बागा असतील.[१३१]

إن الذين امنوا وعملوا الصلحت كانت لهم جنت
الفردوس نزلا ﴿١٠٧﴾

१०८. ज्यांच्यात ते सदैव राहतील व तेथून कोठेहि जाण्याची इच्छा करणार नाहीत.[१३२]

خلدين فيها لا يبغون عنها حولا ﴿١٠٨﴾

१०९. सांगा,जर माझ्या पालनकर्त्याच्या गोष्टी लिहिण्यासाठी समुद्र शाई बनला तरीहि माझ्या पालनकर्त्याच्या गोष्टी संपण्या आधीच तो संपेल, जरी आम्ही या सारख्या आणखी एका समुद्राची वाढ करू.[१३३]

قل لو كان البحر مدادا لكلمت ربي لنفد البحر قبل
أن تنفد كلمت ربي ولو جئنا بمثله مددا ﴿١٠٩﴾

११०. सांगा, मी तर तुमच्या सारखाच एक मनुष्य आहे. मजवर वही (ईश-संदेश) अवतरीत होते[१३४] की तुमचा ईश्वर एकमेव ईश्वर आहे तेव्हा जो कोणी आपल्या पालनकर्त्याशी भेटीची आशा बाळगत असेल त्याने अवश्य सत्कृत्ये करावी व आपल्या पालनकर्त्याच्या 'इबादतीत' (उपासनेत ) कोणासहि सहभागी न करावे.[१३५]

قل إنما أنا بشر مثلكم يوحى إلي أنما إلهكم إله وحد فمن كان
يرجوا لقاء ربه فليعمل عملا صلحا ولا يشرك بعبادة ربه أحدا ﴿١١٠﴾

१२९. म्हणजे ज्यांनी आखिरत ऐवजी इहलोकास आपले ध्येय बनविले आहे. ज्यांची समस्त धावपळ याच ऐहीक जीवनास 'वैभवशाली' बनविण्या करिता असते. उचित हेतु निर्धारीत न करता त्यांनी आपल्या जीवनास अगदी चुकीच्या मार्गाला लावले आहे व अशा भ्रमात गुरफटले आहेत की मोठे चांगले काम करीत आहोत.

आज देखील मानव समाजाचा फार मोठा भाग इहलोकालाच जीवन-ध्येय ठरवून बसला आहे. ते आपल्या वैयक्तिक जीवनात ऐहीक लाभासच दृष्टी समोर ठेवतात आणि आपल्या सामूहिक जीवनातहि यालाच उद्दिष्ट बनवितात. जर ते राष्ट्राची सेवा करतात तर या हेतुने की आपले ऐहीक जीवन बनावे, ते शैक्षणिक व्यस्तता दर्शवितात तर एवढ्यासाठी की सोसायटीला ऐहिक ज्ञानाने समृद्ध करावे. ते एखादा सामाजिक कार्यक्रम हाती घेतात तर या साठी की लोकांनी सुख समृद्धीचे जीवन व्यतीत करावे. तात्पर्य त्यांची सर्व कामे ऐहिक व भौतिक प्रगती साठी असतात. याहून उच्चतम असे कोणतेहि ध्येय धोरण त्यांच्या समोर नसते की त्यांनी मानवतेच्या उभारणीचे कार्य हाती घ्यावे. आपल्या या सेवा कार्यांना ते आपली विशेष कामगिरी समजतात व त्याबद्दल अभिमान बाळगतात.

१३०. इहलोकाला आपले ध्येय उद्दिष्ट बनविणारे ना ईश्वराच्या आयतीना मानतात ना त्याच्या समोर हजर होण्याविषयी विश्वास बाळगतात. यास्तव त्यांचे समस्त आचरण व सर्व कारनामे वाया जाणार आहेत. आखिरतच्या तराजूत ते अगदी भारशून्य असतील. जेव्हा त्यांनी इहलोकासाठीच सर्व काही केले होते व त्याचे फळ देखील त्यांना जगातच लाभले होते तर आखिरत मध्ये त्याचा मोबदला त्यांना का म्हणून लाभेल?

१३१. जन्नतला 'फिर्दोस' हे हि एक नाव आहे. आणि बागांचा तिच्याशी संबंध दर्शविल्याने उघड होते की फिर्दोस हा शब्द इथे त्या विस्तृत जन्नती करीता वापरला गेला आहे जिच्यात अनेक बागा असतील.

१३२. म्हणजे जन्नत मध्ये राहून ते कंटाळणार नाहीत की जेणेकरून अन्य ठिकाणी स्थानांतरीत होऊ इच्छितील. किंबहुना परिपूर्ण शांती व समाधानाने व आनंदाने जन्नतमध्ये वास्तव्य करतील व सदैव जन्नत मध्येच राहू इच्छितील.

क़ुरआन व सुन्नत (प्रेषित-वचना) द्वारे जन्नतची जी कल्पना कायम होते ती अशी की तिचा विस्तार जमीनीच्या विस्ताराप्रमाणे आहे आणि तिच्यात दर्जांची उच्चता अशी आहे जणू तारे जे अतिशय उंचीवर दिसून येतात तात्पर्य जन्नत एक विशाल विश्व आहे आणि ईमान धारकाची अशी कोणतीहि मनोकामना नसेल जी तिथे पूर्ण न व्हावी म्हणून तेथून अन्यत्र कोठे जाण्याची व स्थानांतर करण्याची इच्छा ते कधीहि करणार नाहीत.

१३३. संकेत या गोष्टीकडे आहे की या सूरह मध्ये अल्लाहच्या सामर्थ्याच्या ज्या आश्चर्यांचा व त्याच्या बुद्धिकौशल्याच्या ज्या चमत्कृतिंचा उल्लेख केला गेला आहे, त्या ईश वचनांपैकी काही गोष्टी होत ज्यांना विचार चिंतन व बोध ग्रहणासाठी सादर केले गेले आहे. अन्यथा त्याच्या गोष्टी इतक्या अमर्याद आहेत की त्यांना लिहिण्यासाठी समुद्राइतकी शाई देखील पुरेशी होणार नाही. ही अतिशयोक्ति नव्हे तर वस्तुस्थिती आहे. जर एका कणाच्या वैशिष्ट्यावर एक निबंध लिहिला जाऊ शकतो तर या संपूर्ण सृष्टीवर लिहिण्याकरिता किती तरी दफ्तरांची गरज भासेल. या निवेदनाद्वारे जी गोष्ट मनात बिंबविण्याचा हेतू आहे ती आहे अल्लाहची महानता त्याच्या ज्ञानाची व्यापकता आणि त्याच्या सामर्थ्य व बुद्धिकौशल्याची अमर्यादिता.

१३४. अर्थात मी तुमच्या सारखाच एक मनुष्य आहे, तथापि मला 'वही' (ईश-संदेशा) चे विशेषत्व प्राप्त आहे. मजवर ईश-संदेश अवतरीत होतो, तुमच्यावर होत नाही आणि मी ईश-संदेशामुळेच प्रेषित-पदावर नियुक्त केलो गेलो आहे.

क़ुरआनाचे हे स्पष्टीकरण असतानांही मुसलमानांमध्ये एक गट असाही आहे जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना मनुष्य मानावयास तयार नाही. ते चुकीची स्पष्टीकरणे व अनुचित कथनांचा आधार घेऊन पैगंबराना मनुष्यपदाहून श्रेष्ठतम सिद्ध करू इच्छितात. पैगंबराना 'मनुष्य' म्हणण्यात त्यांना मोठा संकोच वाटतो. वस्तुत: याद्वारे पैगंबरांची ही शान व्यक्त होते की एका मनुष्यास प्रेषित्वाचे ते प्रतिष्ठित स्थान लाभले जे इतर माणसाहून त्यांना विशिष्ट करते.

ख्रिश्चनांनी जेव्हा हजरत ईसा (येशू) च्या व्यक्तिमत्वात अतिशयोक्ति केली तेव्हा (अल्लाह रक्षण करो) त्यांना ईश्वराचा पुत्र बनविले. तात्पर्य प्रेषिताच्या व्यक्तिमत्वात अतिशयोक्ति केल्याने मार्गभ्रष्टतेचे मार्ग उघडतात.

१३५. अल्लाह एकमेव उपास्य असण्याचा अर्थ असा की खराखुरा सत्ताधिकार बाळगण्याची शक्ति अल्लाहच होय. व खराखुरा उपास्य (उपासनीय) देखील तोच होय. म्हणून उपासना त्याचाच हक्क आहे आणि ज्या प्रमाणे अल्लाह सोबत आणखी ईश्वरांना मानणे शिर्क आहे. तद्वतच त्याच्या उपासनेत अन्य एखाद्याचा समावेश करणे देखील शिर्क आहे. पहिले शिर्क श्रद्धेचे आहे तर दूसरे शिर्क आचरणांचे आणि इस्लामची ही शिकवण आहे की मनुष्याने आपल्या श्रद्धेलाहि शिर्क पासून स्वच्छ शुद्ध राखावे आणि आचरणासहि.

इबादतेत (उपासनेत) कोणकोणत्या गोष्टींचा समावेश आहे याचे स्पष्टीकरण क़ुरआनाने प्रसंगानुरूप केले आहे. उदा.

गरजपूर्ति करिता पुकारणे, न्याय-याचना करणे, नाम:स्मरण करणे, मनाच्या विनम्र भावे झुकणे, विनवण्या करणे, आश्रय शोधणे, दुआ (प्रार्थना) करणे, नवस मानणे, सान्निध्य इच्छिणे जनावराला जबह करतांना नाव घेणे, बलीदान अर्पण करणे, ईश-देणग्या लाभल्याबद्दल कृतज्ञता दर्शविणे, करुणा भाकणे, आशा-आकांक्षा बाळगणे, अत्याधिक प्रेम बाळगणे, नमाज़ पढणे, रोज़ा राखणे, सदका व दान खैरात करणे, प्रदक्षिण व हज्जचे मनासिक अदा करणे. तात्पर्य उपासनेचे सर्व प्रकार 'इबादत' (उपासना) मध्ये सामील आहेत आणि इबादत केवळ अल्लाह साठी आहे.

स्पष्ट असावे अल्लाहच्या उपासने सोबत त्याचे आज्ञापालन अनिवार्य व बंधनकारक आहे परंतु उपासनेस (इबादतीस) केवळ आज्ञापालन (इताअत) ठरविणे. उपासनेच्या वस्तुस्थिती पासून अपरिचित असल्याचे प्रमाण होय. उपासना वा भक्तिचा संबंध त्या विशेष भावनेशी आहे जी स्वभावात ठेवलेली आहे आणि आपल्या उदयासाठी तिचा रोख खऱ्या पालनकर्त्याकडेच आहे जेव्हा आज्ञापालन एक बौद्धिक निर्णय व शारीरिक आचरण होय. वर जी उदाहरणे सादर केली गेली त्यांना सामान्य भाषेत प्रसिद्धीमध्ये व धार्मिक परिभाषेतहि इबादत (उपासना) हा शब्दच लागू पडतो. इताअत (आज्ञापालन) नव्हे. उपासना व आज्ञा पालनामधील दुसरा मोठा फरक असा की उपासना अल्लाह खेरीज अन्य कोणाचीही योग्य नाही, उलट आज्ञापालन शरीअत मर्यादांचे पालन करून माणसांचेहि केले जाऊ शकते आणि पैगंबरांच्या आज्ञापालनाचा तर अल्लाहने स्पष्ट आदेश दिला आहे जेव्हा प्रेषितांची उपासना अनुचितच नव्हे तर शिर्कहि आहे.

# १९.सूरह मरयम

**नावः** या सूरह मध्ये हजरत मरयम व ख्रिस्त-जन्माचा किस्सा वर्णिला गेला आहे. तद्नुषंगाने सूरह चे नाव मरीयम ठरले गेले आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे आणि हब्श (ॲबिसिनिया इथोपिया) (मुसलमानांच्या) स्थानांतर होण्यापूर्वी अवतरली होती.

**मध्यवर्ती कल्पनाः** घटनांच्या प्रकाशात ख्रिश्चनांच्या चुकीच्या श्रद्धांचे खंडन करणे व त्या सोबतच अनेकेश्वर वाद्यांना त्यांच्या मार्ग भ्रष्टते बद्दल सचेत करणे आहे. यात आवाहनाचे तिन्ही अंश,एकेश्वरवाद, प्रेषितत्व आणि आखिरत दृगोचर झाले आहेत.

**आयत रचनाः** आयत क्र.१मध्ये वेग वेगळी अक्षरे आहेत.

आयत क्र.२ ते १५ हजरत यह्या यांच्या जन्माचा किस्सा वर्णिली गेला आहे जो ख्रिस्त जन्माच्या घटनेची प्रस्तावना होय.

आयत क्र. १६ ते ३६ मध्ये हजरत मरयम आणि ख्रिस्त-जन्माची घटना वर्णिली गेली आहे आयत क्र.३७ ते ४० मध्ये ख्रिश्चनांना त्याच्या आपसातील मतभेदां बाबत सावध केले गेले आहे.

आयत क्र.४१ ते ५०मध्ये हजरत इब्राहीम यांचे एकेश्वरवादी आवाहन व त्या परिणामी उद्भवणाऱ्या स्थलांतराची घटना वर्णिली गेली आहे.

आयत क्र.५१ ते ६३ मध्ये हजरत मूसा व इतर पैगंबरांचा उल्लेख केला गेला आहे ज्या द्वारे ऐकीकडे प्रेषितत्व-क्रम निवेदन करण्याचा हेतु आहे तर दुसरी कडे त्यांच्या शिकवणीकडे पाठ फिरवणाऱ्यांना सावध करणे आणि त्यांच्या शिकवणीना आचरणात आणणाऱ्यांना यशाची खुशखबरी देणे हा आहे.

आयत क्र. ६४ ते ६६ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु-अलैहि वसल्लम) यांना सहनशील व दृढशील राहण्याची ताकीद दिली गेली आहे.

आयत क्र. ६७ ते ९८ मध्ये अखिरतचा इन्कार करणाऱ्यांच्या शंका-कुशंकाचे निवारण करीत ईमान व विश्वास निर्माण करणारे अहवाल सादर केले गेले आहेत.

**हबशाधिपतीच्या दरबारात सूरह मरयम ऐकविले जाणे**
मक्केत जेव्हा मुसलमानांवर अनेकेश्वरवाद्यांचे अत्याचार वाढले तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या साथीदारांना फर्माविले की जर तुम्ही हब्श (ॲबिसिनीया) कडे रवाना व्हाल तर बरे, कारण तेथे एक असा बादशहा आहे ज्याच्या राज्यात कोणीहि अत्याचार करू शकत नाही. यास्तव मुसलमानांचा एक काफिला हब्श येथे पोहचला. ही प्रेषित्वाच्या पाचव्या वर्षाची घटना होय. कुरेश ने देखील आपले एक शिष्टमंडळ हब्शच्या बादशहाकडे पाठविले, या साठी की, या महाजीर (देशत्याग केलेल्या) लोकांना त्याने परत पाठवावे शिष्ट मंडळाने बादशहाला देणग्या व नजराणे दिले व त्याला सांगितले की काही तरुण आमच्या देशातून पळून आले आहेत. त्यांनी आपला धर्म बदलला आहे यास्तव त्यांना आमच्या हवाली करा.

बादशहा ज्याला 'नज्जाशी' म्हटले जात होते, तो हजरत ईसा यांचा अनुयायी होता. त्याने मुहाजीर मुसलमानांना बोलावून घेतले व त्यांना विचारले की तुम्ही कोणता धर्म अंगिकारला आहे? त्या वेळी हजरत जाफर बिन अबी तालीब यांनी मोठे परिणामकारक भाषण दिले ज्यात त्यांनी अज्ञान युगातील परिस्थिती दर्शवित पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे ईश्वरामार्फत पाठविले जाणे व इस्लामच्या त्या गुणवैशिष्ट्यांचा उल्लेख केला ज्यामुळे त्यांच्या जीवनात महत्परिर्वतन घडले व त्यांच्या अंगी उत्कृष्ट गुणविशेष निर्माण केले. त्यावर नज्जाशी ने म्हटले मला त्या वाणीचा काही अंश ऐकवा जी तुमच्या पैगंबरांवर अवतरीत झाली आहे. हजरत जाफर यांनी सूरह मरयमचा आरंभीचा भाग ऐकविला नज्जाशी ही वाणी ऐकून रडला आणि दरबारच्या पाद्रींवरहि रूदन कैफीयत चढली. नज्जाशी म्हणाला. नि:संशय ही वाणी आणि जी हज़रत ईसा यांनी आणली होती. एकाच प्रकाशाची किरणे होत. मग तो कुरेशच्या संदेशवाहकांना म्हणाला, मी या लोकांना तुमच्या हवाली कदापि करणार नाही. त्याने त्यांचे नजराणेहि असे म्हणत परत केले की मला लाच लुचपतीची गरज नाही आणि मुसलमान मुहाजीरीनला म्हणाला, तुम्ही शांती समाधानाने राहू शकता. ईश-वाणीचा हाच तो प्रभाव, ज्यापुढे राव रंक सर्वच झुकले (हबशकडे स्थलांतराची घटना तपशीलवार सिरत इब्ने हिशाम खंड १ पृष्ठ ३४३ ते ३६४ मध्ये वर्णिला गेला आहे.

# १९. सूरह मरयम

سُورَةُ مَرْيَمَ

अनुवाद

(आयती ९८)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ ٱللَّهِ ٱلرَّحْمَٰنِ ٱلرَّحِيمِ

१. काफ-हा-या-ऐन-साद .[१]

كٓهيعٓصٓ ①

२. हा तुमच्या पालन कर्त्याच्या त्या कृपेचा उल्लेख आहे, जी त्याने आपला दास जकरीया वर केली होती.[२]

ذِكْرُ رَحْمَتِ رَبِّكَ عَبْدَهُۥ زَكَرِيَّآ ②

३. जेव्हा त्याने आपल्या पालन कर्त्यास सौम्य स्वरात पुकारले. [३]

إِذْ نَادَىٰ رَبَّهُۥ نِدَآءً خَفِيًّا ③

४. त्याने प्रार्थना केली हे माझ्या पालन कर्त्या ! माझी हाडे कमकुवत झाली आहेत आणि शिर वार्धक्यामुळे पांढरे झाले आहे आणि हे पालन कर्त्या असे कधीहि घडले नाही की मी तुला पुकारले असेल व वंचित राहिलो असेल.[४]

قَالَ رَبِّ إِنِّى وَهَنَ ٱلْعَظْمُ مِنِّى وَٱشْتَعَلَ ٱلرَّأْسُ
شَيْبًا وَلَمْ أَكُنۢ بِدُعَآئِكَ رَبِّ شَقِيًّا ④

५. मला आपल्या पश्चात आपल्या भाऊबंदांचे भय वाटते.[५] आणि माझी पत्नी वांझ आहे.[६] तेव्हा तू खास आपल्या तर्फे मला वारस प्रदान कर.[७]

وَإِنِّى خِفْتُ ٱلْمَوَٰلِىَ مِن وَرَآءِى وَكَانَتِ ٱمْرَأَتِى عَاقِرًا
فَهَبْ لِى مِن لَّدُنكَ وَلِيًّا ⑤

६. जो माझाहि वारस असावा व याकूब वंशाचाहि.[८] आणि हे पालनकर्त्या त्याला आवडता बनव. [९]

يَرِثُنِى وَيَرِثُ مِنْ ءَالِ يَعْقُوبَ وَٱجْعَلْهُ رَبِّ رَضِيًّا ⑥

७. हे जकरीया आम्ही तुम्हाला एका मुलाची शुभ-वार्ता देतो. ज्याचे नाव यहया असेल. [१०] यापूर्वी आम्ही या नावाचा कोणताहि मनुष्य निर्माण केला नाही.[११]

يَٰزَكَرِيَّآ إِنَّا نُبَشِّرُكَ بِغُلَٰمٍ ٱسْمُهُۥ يَحْيَىٰ
لَمْ نَجْعَل لَّهُۥ مِن قَبْلُ سَمِيًّا ⑦

१. ही वेगवेगळी अक्षरे होत, ज्यांच्या विषयी आवश्यक स्पष्टीकरण सूरह युनूस बकरा टीप क्र. १ व सूरह युनूस टीप क्र. १ मध्ये केले गेले आहे. या अक्षरांचा इशारा या सूरहच्या काही महत्वपूर्ण मजकूरांकडे आहे ज्याचे विवरण पुढील प्रमाणे- 'काफ'चा संकेत كُنْ فَيَكُوْنَ **''कुन फयकून''** तो आदेश देतो घडून ये, तर ती तत्क्षणी घडून येते. आयत ३५) कडे आहे आणि हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की जो ईश्वर आपल्या एका हुकमाने कोणत्याहि वस्तूस अभावातून अस्तित्वात अणतो, त्याने जर हजरत ईसा (येशू) यांना बापाशिवाय निर्माण केले तर यात आश्चर्यकारक बाब कोणती की ज्या आधारे त्यांना ईश्वर-पुत्र ठरविले जावे किंवा ईशत्वात सहभागी ठरवावे. या मजकूर क्रमात 'काफ' कुन 'घडून ये' करिता निश्चित एक सूचक अक्षर (Significant Letter) आहे. जे बुद्धीला उल्लिखित वस्तुस्थितीकड वळविते.

'हा' संकेत **''हय्यिनुन''** هَيِّنٌ अर्थात 'सोपे' कडे आहे. आयत क्र.९ मध्ये हजरत यहया यांच्या असामान्य निर्मिती संदर्भात फर्माविले गेले आहे.

قَالَ رَبُّكَ هُوَ عَلَيَّ هَيِّنٌ

('तुमचा पालनकर्ता फर्मावितो की हे माझ्या करिता सोपे आहे' आयत क्र.९) आणि मग हजरत यहयाचा जन्म झाला. हजरत यहया यांना असामान्यरित्या निर्माण करणे अल्लाहकरिता कठीण काम नव्हते. त्याच्या सामर्थ्याचा हा अगदी मामुली चमत्कार आहे 'या'चा संकेत यहयाकडे आहे ज्याचा उल्लेख आयत क्र. ७ ते १५ मध्ये केला गेला आहे.

ऐनचा संकेत 'ईसा' (येशू) कडे आहे. त्यांचे नाव आयत क्र. ३४ मध्ये आले आहे व त्यांच्या जन्माविषयीचा उल्लेख या आधीच्या आयतींमध्ये विवरणासह केला गेला आहे.

'साद'चा संकेत 'सबिय्या'कडे आहे. ज्याचा अर्थ 'मूल' असा आहे. आयत क्र.१२ मध्ये हजरत ईसा विषयी ही महत्वपूर्ण गोष्ट सांगितली गेली आहे की,

وَآتَيْنَاهُ الْحُكْمَ صَبِيًّا

आम्ही त्याला हिकमत (बुद्धि कौशल्य) प्रदान केले जेव्हा ते अजून बालक होते त्याच प्रमाणे आयत क्र. २९ मध्ये हजरत ईसा विषयी 'सबीय्या' (मूल) हा शब्द वापरला गेला आहे व तेथे त्यांच्या पाळण्यातील बोलण्यासंबंधीचा उल्लेख केला गेला आहे. अर्थात अल्लाहच्या त्या चमत्काराचा उल्लेख आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने हज़रत ईसाना ते पाळण्यातले बालक असतानां व बोलण्याची शक्ति प्रदान केली होती. (आणि केवळ अल्लाह आपल्या वाणीच्या रहस्य भेदांना अधिक चांगले जाणतो)

२. हजरत जकरीया बनी इस्राईलच्या प्रेषितांपैकी होत आणि त्यांचा काळ हजरत मसीह (यशू) यांच्या जन्मापूर्वीचा आहे. आणि येशू जन्मानंतर देखील ते काही काळ पावेतो जिवंत राहिले.

३. दुआ (प्रार्थने) च्या शिष्टाचारांपैकी एक हे की दास जेव्हा स्वत:साठी प्रार्थना करील तर त्याने अगदी खालच्या स्वरात प्रार्थना करावी जेणे करून तो दंभ आणि दिखाव्यापासून मुक्त असावा आणि आपल्या पालनकर्त्या समोर आपल्या मनातल्या गोष्टी बोलाव्या.

४. हजरत जकरीया यांनी जेव्हा संतती करिता प्रार्थना केली त्या वेळी ते फार म्हातारे झाले होते. त्यांची हाडे सुद्धा कमकुवत झाली होती व डोक्याचे केसहि पांढरे झाले होते. एवढ्या महातार वयात संततीची अभिलाषा केली जाऊ शकत नव्हती. परंतु त्यांनी अल्लाहशी आशा बाळगून प्रार्थना केली की त्याने आपल्या विशेष कृपेने उपकृत करावे. ही प्रार्थना त्यांच्या अगदी अंत:करणापासून निघाली होती व कृतज्ञतेच्या या भावनांसह होती की, अल्लाह ज्या ज्या क्षणी मी तुला पुकारले आहे तुझ्याकडून निराश होऊन परतलो नाही. ही प्रार्थनामय वचने अल्लाहच्या कृपेस आवेग आणण्यासाठी अतिशय योग्य होती.

५. भय या गोष्टीचे की धार्मिक मार्गदर्शन व नेतृत्व पदास सांभाळणारा कोणीहि नाही.

स्पष्ट असावे की इस्राईल वंशात धार्मिक मार्गदर्शन व प्रेषित्व पद त्यांच्या एक कबीला बनी लावी मध्ये चालत आले होते. आणि हजरत जकरीया यांच्या काळात इस्राईल वंश ज्या उणीवांमध्ये ग्रस्त होता, ते लक्षात घेता या पदाला पात्र असा कोणी दिसत नव्हता यास्तव हजरत जकरीया यांना काळजी लागली की आपल्या नंतर इस्राईल वंशाच्या मार्गदर्शनाची व नेतृत्वाची कोणती व्यवस्था होईल?

६. लुका कृत बायबल मध्ये पुढील उल्लेख आहे-

'यहूदीयाचा राजा हेरोद ह्याच्या दिवसात अबीयाच्या वर्गातील जखऱ्या नावाचा कोणी एक याचक (धर्माधिकारी) होता, त्याची पत्नी अहरोनाच्या कुळातील असून तिचे नाव अलीशिमा होते. ती उभयता देवाच्या दृष्टीने नीतिमान होती आणि प्रभूच्या सर्व आज्ञाव विधि पाळण्यात निर्दोष होती'

(लूककृत शुभ वर्तमान १: ५ ते ७)

७. अभिप्रेत संतती होय. यास्तव सूरह आले इमरान आयत क्र. ३८ मध्ये ذُرِّيَّةً طَيِّبَةً **''जुर्रिय्यतन तय्यिबतन''** (स्वच्छ शुद्ध संतती ) हा शब्द प्रयोग केला गेला आहे.

८. वारसशी अभिप्रेत धर्म-संपदा व प्रेषित ज्ञानाचा वारस आहे. यास्तव याकूब- वंशाचा वारस हे शब्द या अर्थास स्पष्ट करतात.

जेथपावेतो अर्थिक वारसाचा संबंध आहे प्रेषितगण ना या हेतुकरिता धन-संपदा जमा करतात, व ना त्यांना त्याची काळजी असते. किंबहुना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या वचनानुसार प्रेषितांच्या धन सम्पत्तिचा कोणीहि वारस नसतो.

لَانُوْرَثُ مَاتَرَكْنَا صَدَقَةٌ۔ (بخاری کتاب الجہاد)

'' आमचा कोणीहि वारस नसतो. जे काही आम्ही आपल्या मागे सोडतो, ते दान असते'' (बुखारी)

तथापि त्यांना या गोष्टीचे भय असते की त्यांच्या नंतर धर्म-ज्ञानाच्या अनामतीस कोण पात्र ठरेल आणि जन-समूहाच्या धार्मिक मार्गदर्शन व नेतृत्वाकरिता एखादा योग्य इसम आहे किंवा नाही.

९. म्हणजे 'दीन' (धर्म),चारित्र्य व नितिमत्तेच्या दृष्टीने त्याला आपला प्रिय बनव.

१०. ही खुषखबरी सर्वश्रेष्ठ अल्लाहने हज़रत जकरीया यांना दिली व सूरह आले इमरानच्या आयत क्र.३९ मधील निवेदनानुसार ही शुभवार्ता सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे फिरिश्त्यांनी ऐकविली, ज्या वेळी ते नमाज पढत होते.

'यहया'चा शाब्दिक अर्थ 'तो जिवंत राहील' असा आहे. हे नाव अल्लाहने ठेवले होते, तेव्हा उघड आहे की ते बुद्धिकौशल्याहीन असू शकत नाही. घटना अशी की हजरत यहया यांचा सत्य-बोलण्यामुळे यहूदी देशाचा शासक हिरोदोसने एका नर्तकीच्या मागणीनुसार त्यांची हत्या केली होती अशा प्रकारे ते सत्य-मार्गात शहीद झाले आणि अल्लाहच्या फर्मानानुसार शहीद होणारे मृत होत नाही किंबहुना जिवंत राहतात (सूरह बकरा आयत क्र.१५१) म्हणून हजरत यहया मेल्यानंतरहि अमर झाले. तात्पर्य त्यांच्या नावातच ही गोष्ट अध्यारूत होती की हे व्यक्तिमत्व अमर होणार आहे. अशा प्रकारे घटनांनी नावाचा मतितार्थ प्रकट केला.

११. मूळ ग्रंथात 'समीय्या' हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा एक अर्थ तर 'एकाच नावाचा दुसरा कोणी आहे' तर दुसरा अर्थ 'त्याच्यासारखा असा आहे.' पहिल्या अर्थाच्या दृष्टीने मतितार्थ असा की हे एक वेगळे नाव आहे. यापूर्वी कोणाचेहि असे नाव आढळले नव्हते आणि दुसऱ्या अर्थानुसार यहयाचे व्यक्तिमत्व वैशिष्ट्यपूर्ण गुणवैशिष्ट्यांमुळे एक अनुपमेय व्यक्तिमत्व ठरेल. यास्तव यांच्या विशेष गुणवैशिष्ट्यांपैकी एक हे की त्यांचा जन्म असामान्यपणे झाला. त्यांचे माता पिता ना केवळ म्हातारे झाले होते, किंबहुना त्यांची माता वांझ होती असे असतांनाहि त्यांचा जन्म झाला. दुसरे हे की त्यांना बालपणातच बुद्धि कौशल्य लाभले तिसरे हे की त्यांच्या अंगी अत्याधिक आत्म संयम होता. यास्तव ऐहीक सुख विलासापासून ते आयुष्यभर अपरिचित राहीले. बायबल मध्ये त्यांची ही अवस्था निवेदिली गेली आहे- 'ह्या योहानाचे वस्त्र उंटाच्या केसाचे होते, त्याच्या कमरेस कातड्याचा कमरबंद होता, आणि त्याचा आहार टोळ व रानमध होता'(मत्तय ३:४) आणि हे साधे जीवन त्यांनी सत्य-उद्दिष्टाच्या मग्नतेत घालवले. त्यांना एकाच गोष्टीचा ध्यास होता व ती ही की लोकांनी अल्लाहकडे रूजू व्हावे. या उद्दिष्टाकरिता ते दूर दूर जात, वणवण भटकत.

**तो म्हणाला, हे माझ्या पालन कर्त्या ! माझ्या येथे मुलगा कसा जन्मेल, जेव्हा माझी पत्नी वांझ आहे आणि मी अत्याधिक वार्धक्याप्रत पोहचलो आहे.(अल-कुर्आन)**

قَالَ رَبِّ أَنَّىٰ يَكُونُ لِي غُلَامٌ وَكَانَتِ امْرَأَتِي عَاقِرًا
وَقَدْ بَلَغْتُ مِنَ الْكِبَرِ عِتِيًّا ﴿٨﴾

८. तो म्हणाला, हे माझ्या पालन कर्त्या ! माझ्या येथे मुलगा कसा जन्मेल, जेव्हा माझी पत्नी वांझ आहे आणि मी अत्याधिक वार्धक्याप्रत पोहचलो आहे.[१२]

قَالَ كَذَٰلِكَ قَالَ رَبُّكَ هُوَ عَلَيَّ هَيِّنٌ وَقَدْ خَلَقْتُكَ
مِنْ قَبْلُ وَلَمْ تَكُ شَيْئًا ﴿٩﴾

९. फर्माविले, असेच होईल. [१३] तुमचा पालन कर्ता फर्मावितो की हे माझ्यासाठी सोपे आहे. याच्या पूर्वी मी तुम्हास निर्माण केले आहे, जेव्हा तुम्ही काहीच नव्हते. [१४]

قَالَ رَبِّ اجْعَلْ لِي آيَةً قَالَ
آيَتُكَ أَلَّا تُكَلِّمَ النَّاسَ ثَلَاثَ لَيَالٍ سَوِيًّا ﴿١٠﴾

१०. तो म्हणाला, हे माझ्या पालन कर्त्या ! माझ्यासाठी एखादी निशाणी ठरवून दे [१५]फर्माविले, तुमच्यासाठी निशाणी ही की तुम्ही तीन रात्र व दिवस लोकांशी बोलू शकणार नाही. [१६]

فَخَرَجَ عَلَىٰ قَوْمِهِ مِنَ الْمِحْرَابِ فَأَوْحَىٰ إِلَيْهِمْ أَنْ
سَبِّحُوا بُكْرَةً وَعَشِيًّا ﴿١١﴾

११. मग तो उपासनेच्या कक्षातून बाहेर येऊन आपल्या लोकांसमोर आला व संकेताद्वारे त्यांना म्हणाला की सकाळ-संध्याकाळ (अल्लाहची) 'तस्बीह' करा.[१७]

يَا يَحْيَىٰ خُذِ الْكِتَابَ بِقُوَّةٍ وَآتَيْنَاهُ الْحُكْمَ صَبِيًّا ﴿١٢﴾

१२. हे यहया ग्रंथास मजबूतपणे धरा. [१८] आणि आम्ही त्याला बालपणातच हिकमत (बुद्धि कौशल्य) प्रदान केले. [१९]

وَحَنَانًا مِنْ لَدُنَّا وَزَكَاةً وَكَانَ تَقِيًّا ﴿١٣﴾

१३. आणि खास आपल्या पासून सहृदयता व स्वच्छ शुध्दता [२१] आणि तो मोठा ईश भय बाळगणारा होता. [२२]

وَبَرًّا بِوَالِدَيْهِ وَلَمْ يَكُنْ جَبَّارًا عَصِيًّا ﴿١٤﴾

१४. आपल्या माता -पित्याशी सद्‌व्यवहार करणारा होता. शिरजोर व आज्ञा भंग करणारा नव्हता.[२३]

وَسَلَامٌ عَلَيْهِ يَوْمَ وُلِدَ وَيَوْمَ يَمُوتُ وَيَوْمَ يُبْعَثُ حَيًّا ﴿١٥﴾

१५. सलामती आहे त्यावर ज्या दिवशी तो जन्मला ज्या दिवशी मरण पावेल आणि ज्या दिवशी जिवंत उठविला जाईल.[२४]

१२. हा प्रश्न शंका म्हणून नव्हता,किंबहुना अधिक समाधान प्राप्त करण्यासाठी होता की ज्या मुलाची खुशखबरी त्यांना दिली जात आहे त्याच्या जन्माची काय अवस्था असेल.

१३. म्हणजे तुम्ही अगदी म्हातारे झाले असतांनाहि व तुमची पत्नी वांझ असूनहि तुमच्या येथे मुलगा होईल.

१४.म्हणजे ज्या ईश्वराने तुम्हाला अभावातून अस्तित्वात आणले त्याच्यासाठी हे कोण ते कठीण आहे की त्याने तुम्हाला म्हतार वयात व तुमची पत्नी वांझ असतांनाहि संतती प्रदान करावी.

हजरत यहया यांच्या असामान्य जन्माची ही घटना वस्तुत: ईसा यांच्या जन्माच्या घटनेची प्रस्तावना होय, जे पित्याविना जन्माला आले होते. या द्वारे खरे पाहता हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की जर असामान्य जन्मामुळे हजरत यहया ईश्वर किंवा ईश्वर-पुत्र ठरले नाहीत तर हजरत ईसा आपल्या असामान्य जन्मामुळे ईश्वर किंवा ईश्वर पुत्र कसे ठरू शकतात. अल्लाहच्या सामर्थ्याच्या चमत्कृतिंची अभिव्यक्ति तर वेगवेगळ्या स्वरूपात होत राहीली मग सामर्थ्याचा जो चमत्कार हजरत ईसा यांच्याविषयी जाहीर झाला त्यानुसार त्यांना ईश्वर-पुत्र समजून घेण्यात काय अर्थ?

स्पष्ट असावे की लूक कृत इंजील (बायबल) मध्येहि प्रस्तावना म्हणून हजरत यहया यांच्या जन्माची घटना निवेदली गेली आहे.

१५. निशाणीची मागणी त्यांनी अशासाठी केली की ज्या गोष्टीची खुशखबरी त्यांना दिली गेली ती घडून येण्याची ठीक ठीक वेळ त्यांना माहित व्हावी व ईश-नाम स्मरणात त्यांनी मग्न व्हावे.

१६. याचे स्पष्टीकरण सूरह आले इमरान टीप क्र.६१ मध्ये केले गेले आहे.

स्वास्थ्य पूर्ण असणे या गोष्टीचे प्रमाण होय की तीन दिवस पावेतो हजरत जकरीया यांचे बोलू न शकणे हे मुकेपणामुळे किंवा एखाद्या रोगामुळे नव्हते, किंबहुना एक असामान्य अवस्था होती ज्यात ते 'तसबीह' (ईश-स्तुती) तर करू शकत होते परंतु बोलू शकत नव्हते.

१७. हा संकेत या गोष्टीकडे होता की अल्लाहतर्फे एक असाधारण घटना उदयास येणार आहे. यास्तव त्याच्या स्तुती जप करण्यात मग्न व्हा.

तात्पर्य 'तस्बीह' (ईश-स्तुती) करणे एक महान उपासना होय व सकाळ - संध्याकाळ त्याचा इतमाम करणे अल्लाहच्या दृष्टीने अतिशय आवडते कर्म आहे. या उपासनेची कद्र केवळ तेच लोक घटवितात जे धर्माच्या महत्ते (Values) विषयी दृष्टी हीन असतात.

१८. संभाषण शैलीवरून स्पष्ट आहे की ज्या प्रकारे शुभ संदेश दिला गेला होता. यहयाचा जन्म झाला व नंतर त्यांना प्रेषित्व पदाने सम्मानित केले गेले. ग्रंथाशी अभिप्रेत तौरात होय व त्याला मजबूतपणे धरण्याचा अर्थ त्यावर दृढ ईमान राखणे व योग्य रित्या त्यानुसार आचरण करणे.

यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की हजरत यहया यांच्या काळात तौरातचा एक भाग आपल्या मूळ स्वरूपात सुरक्षित होता म्हणून त्याला मजबूतपणे धरण्याचा आदेश दिला गेला.

१९. हजरत यहया यांच्यावर अल्लाहची ही विशेष कृपा झाली की त्यांना बालवयातच त्याने बुद्धि कौशल्य प्रदान केले. अर्थात त्यांना सामंजस्य व विद्वत्ता प्रदान केली.

२०. सहृदयता (मनाची कोमलता) असा उच्च गुण आहे जो माणसाला उपदेश ग्रहण करण्यास प्रवृत्त करतो तसेच यामुळे मनात करूणा भाव निर्माण होतो, ज्यामुळे मनुष्याला दुसऱ्याच्या वेदनेचा प्रहार स्वत:च्या हृदयावर जाणवू लागतो. ही गोष्ट त्याला सहादुभूत व मानवतावादी बनविते आणि तो वाम मार्गाला लागलेल्या लोकांच्या सुधारणेसाठी उभा राहतो. हजरत यहया यांच्या अंगी हा गुण अल्लाहच्या कृपेने अत्याधिक प्रमाणात होता.

२१. म्हणजे मनाची स्वच्छ शुद्धता प्रत्येक प्रकारच्या आंतरीक रोगापासून मुक्त. अगदी विशुद्ध अंत:करण.

२२.म्हणजे ज्या प्रकारे आंतरीक दृष्ट्या स्वच्छ शुद्ध होता तद्वतच बाह्यत:देखील वाईट गोष्टीपासून अलिप्त होता. अल्लाहचे भय बाळगून त्याच्या शरीयतीनुसार जीवन व्यतित करणारा.

२३. ईश्वराच्या दासांमध्ये सर्वप्रथम व सर्वाधिक हक्क माता-पित्याचा आहे. जो मनुष्य यांच्याशी भलेपणा करीत नाही त्याच्याकडून ही अपेक्षा केली जाऊ शकत नाही की तो जगाशी भलेपणाचे वर्तन करील आणि जो मनुष्य माता-पित्याशी चांगले वर्तन करतो तो नेकी (पुण्य) च्या संगोपनाची सामुग्री करतो म्हणून त्याच्याकडून यथोचित ही अपेक्षा केली जाऊ शकते की तो ईश्वराच्या दासांबरोबरहि भलाई करील. इस्राईल वंशात त्या वेळी जो बिघाड निर्माण झाला होता त्यामुळे त्यांच्यातील हा मूलभूत गुण लोप पावला होता. ते लोकांवर अत्याचार करणारे व ईश-आदेशांची पायमल्ली करणारे बनले होते. अशा परिस्थितीत सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत यहया यांना उल्लिखित गुणवैशिष्ठ्यांसह प्रेषित या नात्याने पाठवून त्यांच्या समोर आचरणाचा एक नमूना ठेवला यासाठी की त्यांच्यात जाणीव निर्माण व्हावी व त्यांनी आपल्या सुधारणेकडे लक्ष द्यावे.

२४. म्हणजे जगाने त्याच्याशी जे काही वर्तन केले असेल परंतु अल्लाहतर्फे त्यावर सलामतीच सलामीती आहे. तो शांतीपूर्वक जगात आला आणि शांतीपूर्वक जगाचा निरोप घेतला आणि कियामतीच्या दिवशी देखील शांतीपूर्वक उठविला जाईल. अशा महान व्यक्तिमत्वाची ज्यांनी कदर केली नाही त्यांनी त्याला काहीच नुकसान पोहचविले नाही. उलट आपल्या विनाशालाच ओढवून घेतले.

१६. आणि (हे पैगंबर !) ग्रंथात मरयमचा उल्लेख करा [२५] जेव्हा ती आपल्या लोकांपासून अलग होऊन पूर्व दिशेकडे एकांतवासात बसली.[२६]

وَاذْكُرْ فِي الْكِتٰبِ مَرْيَمَ ۘ إِذِ انْتَبَذَتْ مِنْ أَهْلِهَا
مَكَانًا شَرْقِيًّا ﴿١٦﴾

१७. मग तिने त्यांच्यापासून पडदा केला.[२७] तेव्हा आम्ही तिच्याजवळ आपला आत्मा (फिरिश्ता) पाठविला व तो तिच्या समोर अगदी मानव स्वरूपात प्रकट झाला.

فَاتَّخَذَتْ مِنْ دُونِهِمْ حِجَابًا ۖ فَأَرْسَلْنَا
إِلَيْهَا رُوحَنَا فَتَمَثَّلَ لَهَا بَشَرًا سَوِيًّا ﴿١٧﴾

१८. ती उद्गारली, जर तू ईश-भय बाळगणारा असशील तर मी तुझ्यापासून रहमानचे शरण मागते.[२८]

قَالَتْ إِنِّي أَعُوذُ بِالرَّحْمٰنِ مِنْكَ إِنْ كُنْتَ تَقِيًّا ﴿١٨﴾

१९. तो म्हणाला, मी तर तुमच्या पालनकर्त्याचा पाठविलेला (फरिश्ता) आहे व अशासाठी की तुम्हाला एक स्वच्छ शुद्ध मुलगा द्यावा.[२९]

قَالَ إِنَّمَا أَنَا رَسُولُ رَبِّكِ ۖ لِأَهَبَ لَكِ غُلٰمًا زَكِيًّا ﴿١٩﴾

२०. ती म्हणाली, मला मुलगा होईल तरी कसा, जेव्हा एखाद्या माणसाने मला स्पर्श देखील केला नाही आणि मी व्यभिचारीहि नाही.[३०]

قَالَتْ أَنّٰى يَكُونُ لِي غُلٰمٌ وَلَمْ
يَمْسَسْنِي بَشَرٌ وَلَمْ أَكُ بَغِيًّا ﴿٢٠﴾

२१. तो म्हणाला, असेच होईल [३१]तुमच्या पालनकर्त्याने फर्माविले आहे की असे करणे माझ्यासाठी सोपे आहे आणि आम्ही हे अशासाठी करू की त्याला लोकांकरिता एक चिन्ह बनवावे [३२] व आपल्या तर्फे कृपा [३३] आणि ही गोष्ट ठरून गेली आहे.[३४]

قَالَ كَذٰلِكِ ۚ قَالَ رَبُّكِ هُوَ عَلَيَّ هَيِّنٌ ۚ وَلِنَجْعَلَهُ آيَةً
لِلنَّاسِ وَرَحْمَةً مِنَّا ۚ وَكَانَ أَمْرًا مَقْضِيًّا ﴿٢١﴾

२२. मग तिला गर्भधारणा झाली आणि ती त्याला घेऊन दूर स्थळी गेली.[३५]

فَحَمَلَتْهُ فَانْتَبَذَتْ بِهِ مَكَانًا قَصِيًّا ﴿٢٢﴾

२३. मग प्रसव-वेदना तिला खजूरीच्या बुंध्याजवळ घेऊन गेली. ती म्हणू लागली या पूर्वीच मी मेले असते व विस्मृत झाले असते तर बरे झाले असते. [३६]

فَأَجَاءَهَا الْمَخَاضُ إِلٰى جِذْعِ النَّخْلَةِ ۚ قَالَتْ يٰلَيْتَنِي مِتُّ
قَبْلَ هٰذَا وَكُنْتُ نَسْيًا مَنْسِيًّا ﴿٢٣﴾

२५. या उल्लेखाचे महत्व त्या वेळी लक्षात येते जेव्हा मनुष्य वर्तमान काळातील बायबलचा तुलनात्मक अभ्यास करतो व त्यात या घटनेचे महत्वपूर्ण दुवे नाहीसे झालेले पाहतो. पवित्र क़ुरआनने हज़रत मरयम यांचे शील व हजरत मसीह (येशू) यांच्या जन्माच्या समस्त महत्वपूर्ण पैलूना अशा प्रकारे सुरक्षित केले आहे की घटनेचे संपूर्ण चित्र डोळ्यसमोर उभे राहते आणि निवेदनाची सत्यता विश्वासाची कैफीयत निर्माण करते.

लूका कृत इंजील मध्ये विवरणात्मकरित्या हजरत मरयमचा उल्लेख केला गेला आहे. परंतु अन्य इंजील मध्ये केवळ वरकरणी उल्लेख केला गेला आहे.

२६. सूरह आले इमरान आयत क्र. ३५ मधील निवेदनानुसार हजरत मरीयम यांना त्यांच्या मातेने उपासने करिता वक्फ केले होते म्हणून त्या बैतुल मक्दिस मध्ये हैकलच्या पूर्वेकडील भागात एक हुजऱ्यात एकांत वास पत्करून उपासनेत लीन झाल्या.

ज्याअर्थी त्यांच्या उपासनेची जागा हैकलच्या पूर्वेकडील हिश्श्यात होती म्हणून ख्रिश्चनांनी पूर्वेला आपला किब्ला ठरविला आणि ही त्यांनी स्वत:च धर्मात नवीन गोष्ट निर्माण केली.

२७. म्हणजे हैकलच्या ज्या भागात त्यांनी एकांतवास पत्करला होता तिथे त्यांनी पडदा टाकला होता जेणेकरून लोकांनी त्यांना पाहू नये व एकाग्रतेने उपासना करणे शक्य व्हावे.

असे दिसून येते की हैकल मध्ये हुजरा अशा प्रकारे बनला होता की त्याला दरवाजा नव्हता म्हणून पडदा टाकून लोकांच्या नजरेपासून स्वत:चे संरक्षण केले जात होते. दरवाजा नसण्याचा व केवळ पडदा टाकण्याचा लाभ असा झाला की त्यांचे जीवन एक खुले पुस्तक बनले. त्यांच्या निष्कलंक चारित्र्यात दोष पाहण्यासाठी कोणाला कसलाहि वाद राहिला नाही.

२८. एका अनोळखी पुरुषाला आपल्या हुजऱ्यात पाहून हजरत मरयमचे घबरणे ही स्वाभाविक बाब होती. आणि त्यांनी त्याला अल्लाहचे भय दर्शवित रहमान चे शरण मागितले ते त्यांच्या निष्कलंक असण्याचे डोळस प्रमाण होय.

२९. लूक कृत इंजील (बायबल) मध्ये पुढील उल्लेख आहे- 'ती दावीदाच्या घराण्यातील योसेफ नावाच्या पुरुषाला वाग्दत्त होती, आणि त्या कुमारीचे नाव मरीया होते देवदूत तिच्याकडे आत येऊन म्हणाला, हे कृपा पावलेल्या स्त्रीये, कल्याण असो, प्रभु तुझ्या बरोबर असो ह्या बोलण्याने तिच्या मनात खळबळ उडाली आणि हे अभिवादन काय असेल ह्याचा ती विचार करू लागली. देवदूताने तिला म्हटले, मरीये भिऊ नको कारण देवाची कृपा तुझ्यावर झाली आहे. (लूक १: २७ ते ३०)

३०. इंजील मध्ये पुढील उल्लेख आहे.

"मरीयेने देवदूताला म्हटले, हे कसे होईल? कारण मला पुरूष ठाऊक नाही." (लूक १: ३४)

३१. म्हणजे कुमारी असतांनाहि तुम्हाला मुलगा होईल. पवित्र क़ुरआनाचे हे स्पष्टीकरण या बाबतीत क्षुल्लक संशयलाहि वाव ठेवत नाही की हजरत ईसा (येशू) यांचा जन्म पित्याविना कुमारी मातेपासून झाला होता नि:संशय हा सर्वश्रेष्ठ अल्लाहचा चमत्कार होता.

राहिले बायबलचे हे निवेदन की हजरत मरयम यांचा साखरपुडा युसूफ नामी एका माणसाबरोबर झाला होता (पैगंबर हज़रत युसूफ नव्हते.) तर हे निखालस खोटे होये जे बायबलमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. हजरत मरीयमला तर त्यांच्या मातेने उपासनेकरिता सोडून दिले होते. यासाठी त्यांनी हैकलच्या एका भागात एकांतवास पत्करला होता तेव्हा त्यांच्या विवाहाचा प्रश्न उद्‌भवत नाही तसेच बायबल मध्ये एका ठिकाणी काही सांगितले तर दुसऱ्या ठिकाणी काही. मत्त कृत बायबल मध्ये युसूफला मरयमचा पती म्हटले गेले आहे (मत्त प्रकरण १: १६) जेव्हा लूक कृत बायबल मध्ये युसूफला मरयमचा भावी पती दर्शविले आहे (लूक२:५) आणि दुसऱ्या ठिकाणी हजरत ईसा (येशू) यांना युसूफ चा पुत्र देखील म्हटले गेले आहे (लूक ३:२३) आता जर मरयम युसूफची वाग्दत्ते होती तर केवळ वाग्दाना (साखरपुड्या) मुळे हजरत ईसा युसूफचे पुत्र कसे ठरले? आणि जर विवाह झाला होता तर युसूफला भावी पती म्हणण्याचा अर्थ काय? आणि काय ही गोष्ट एका कुमारीकेचे गर्भवती असण्यांला शंकाकुल दर्शवित नाही? बायबलचे हे विरोधात्मक निवेदन त्याच्या भाष्यकारालाहि जाणवले आहे म्हणून तो असे लिहितो:-

"Furthermore, the genealogy here is not in agreement with that in Luke 3 : 23-28. Actually the genealogy in Matt. is that of Joseph, who is represented as Mary's husband rather than as the actual Father of Jesus (V. 5.16)"

(The Interpreter's Commentary on the Bible P. 610)

हे आहे बायबलचे परस्पर विरूद्ध निवेदन जे हजरत मरयमच्या कुमारीका अवस्थेत गर्भवती होण्याला शंकायुक्त

दर्शविते. याऊलट क़ुरआनचे निवेदन अगदी स्पष्ट आहे की हजरत मरयम उपासनेकरिता वक्फ केल्या गेल्या होत्या. त्यांनी आपल्या लोकांपासूनहि विभक्त होऊन उपासने करिता एकांतवास पत्करला होता. त्या अशा क़ुमारीका होत्या की एखाद्या पुरुषाने त्यांना स्पर्शहि केला नव्हता आणि हा अल्लाहचाच चमत्कार होता की अशा स्थितीतहि त्यांना गर्भ राहिला.

३२.म्हणजे हजरत ईसाचा जन्म चमत्कार पूर्णरित्या झाला व यामुळे ते त्याच्या सामर्थ्याचे चिन्ह ठरले.

३३. म्हणजे हजरत ईसा यांचे अस्तित्व अल्लाहच्या कृपेचा लाभ ठरेल. किती तरी लोक त्यांच्याद्वारे मार्गदर्शन प्राप्त करून अल्लाहच्या कृपेस पात्र ठरतील.

३४. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे हा निर्णय घेतला गेला आहे यास्तव ही घटना घटल्याशिवाय राहणार नाही.

३५. अभिप्रेत बैतलहेम होय जे यरूशलेम पासून आठ-नऊ मैलांच्या अंतरावर आहे. बायबल मध्ये या ठिकाणाला हजरत ईसा यांचे जन्म स्थान म्हटले गेले आहे.

३६. हज़रत मरयम यांनी कोणाकडेहि तक्रार गाऱ्हाणे मांडले नाही आणि ना आततायीपणा व्यक्त केला त्या या विचाराने विमनस्क होत्या की लोकांना ज्याअर्थी वस्तुस्थितीचे ज्ञान नाही म्हणून आपल्यावर ते आरोप ठेवतील. एका अत्यंत सत्शील नारीकरीता ही कल्पनाच अशी होती की मती गुंग व्हावी. या भयाचा विचार करता त्यांच्या मुखातून ही वचने बाहेर पडली की यापूर्वी मी मेले असते तर बरे झाले असते व लोकांना माझ्या आठवणीचेहि विस्मरण झाले असते तर बरे झाले असते. त्याच्या या निष्पाप भावना होत्या, ज्या त्यांनी आपल्या पालनकर्त्या समोरच व्यक्त केल्या.

## यरूश्लेमच्या हैकल चा नकाशा




## बैतलहम (बॅथलहेम) जेथे हज़रत ईसा (येशू) यांचा जन्म झाला.



२४. त्या वेळी तिला खालून पुकारले, दु:खी होऊन नका तुमच्या पालनकर्त्याने तुमच्या खाली एक झरा प्रवाहित केला आहे. [३७]

فَنَادٰىهَا مِنْ تَحْتِهَآ اَلَّا تَحْزَنِىْ
قَدْ جَعَلَ رَبُّكِ تَحْتَكِ سَرِيًّا ﴿٢٤﴾

२५. आणि खजुरीच्या खोडास धरून आपल्याकडे हलवा. ताजी टवटवीत खजूरे तुमच्यावर झडून पडतील. [३८]

وَهُزِّىْٓ اِلَيْكِ بِجِذْعِ النَّخْلَةِ تُسٰقِطْ عَلَيْكِ
رُطَبًا جَنِيًّا ﴿٢٥﴾

२६. तेव्हा खा व प्या आणि (आपले) नेत्र गार करा. [३९] मग जर एखादा मनुष्य दृष्टीस पडला तर सांगा, मी रहमानकरिता 'रोजा'चा नवस मानला आहे म्हणून मी आज कोणत्याहि माणसाशी बोलणार नाही.[४०]

فَكُلِىْ وَاشْرَبِىْ وَقَرِّىْ عَيْنًا ۚ فَاِمَّا تَرَيِنَّ مِنَ الْبَشَرِ اَحَدًا ۙ
فَقُوْلِىْٓ اِنِّىْ نَذَرْتُ لِلرَّحْمٰنِ صَوْمًا فَلَنْ اُكَلِّمَ الْيَوْمَ اِنْسِيًّا ﴿٢٦﴾

२७. मग ती त्याला घेऊन आपल्या जन-समूहाजवळ आली. लोक म्हणू लागले, हे मरयम तू मोठे विचित्र कृत्य केलेस.[४१]

فَاَتَتْ بِهٖ قَوْمَهَا تَحْمِلُهٗ ۗ قَالُوْا يٰمَرْيَمُ لَقَدْ جِئْتِ شَيْـًٔا فَرِيًّا ﴿٢٧﴾

२८. हे हारूनच्या बहीणी ![४२] ना तुझा पिता वाईट मनुष्य होता आणि ना तुझी आई व्यभिचारी स्त्री होती .[४३]

يٰٓاُخْتَ هٰرُوْنَ مَا كَانَ اَبُوْكِ امْرَاَ سَوْءٍ وَّمَا كَانَتْ اُمُّكِ بَغِيًّا ﴿٢٨﴾

२९. तिने त्या (अर्भका) कडे संकेत केला.[४४] लोक म्हणाले, आम्ही त्याच्याशी काय बोलावे जो अजून पाळण्यातले बाळ आहे. [४५]

فَاَشَارَتْ اِلَيْهِ ۗ قَالُوْا كَيْفَ نُكَلِّمُ مَنْ كَانَ فِى الْمَهْدِ صَبِيًّا ﴿٢٩﴾

३०. बाळ बोलू लागला. मी अल्लाहचा दास आहे. त्याने मला ग्रंथ दिला व पैगंबर बनविले.[४६]

قَالَ اِنِّىْ عَبْدُ اللّٰهِ ۗ اٰتٰنِىَ الْكِتٰبَ وَجَعَلَنِىْ نَبِيًّا ﴿٣٠﴾

३१. आणि मला बाबरकत (समृद्धशाली) केले मी जेथेहि राहो.[४७] आणि त्याने मला नमाज़ व ज़कातचा आदेश दिला आहे जोपर्यंत मी जिवंत राहीन. [४८]

وَّجَعَلَنِىْ مُبٰرَكًا اَيْنَ مَا كُنْتُ ۖ وَاَوْصٰنِىْ بِالصَّلٰوةِ وَالزَّكٰوةِ
مَا دُمْتُ حَيًّا ﴿٣١﴾

३२. आणि त्याने मला आपल्या मातेशी सद्वर्तन करणारा बनविले आहे.[४९] शिरजोर व दुर्दैवी बनविले नाही.

وَّبَرًّاۢ بِوَالِدَتِىْ ۖ وَلَمْ يَجْعَلْنِىْ جَبَّارًا شَقِيًّا ﴿٣٢﴾

३७. सर्वश्रेष्ठ अल्लाहने चमत्कार म्हणून एक झरा खालच्या बाजूने प्रवाहित केला होता म्हणून फिरिश्त्याने तिथून साद घातली की पहा, जेव्हा तुमच्यावर अल्लाहची एवढी कृपा आहे की त्याने तुमच्यासाठी पाण्याचा खास झरा प्रवाहित केला आहे तेव्हा तुम्हाला चिंता कसली ? जेव्हा परमेश्वर स्वत:तुमच्या सोबतीला आहे तर हे जग तुमचे काय बिघाडू शकेल. सांत्वनेची ही उपाय योजना होती जी हज़रत मरयमचे दु:ख दूर करण्याकरिता केली गेली.

३८. म्हणजे खजुरीच्या खोडाला थोडेसे हलविणे या गोष्टीसाठी पर्याप्त आहे की त्याने तुमच्या आदर सत्कारासाठी ताजी व पिकलेली खजूर टपकून द्यावीत.

अशा रीतीने हजरत मरयम करीता एका अशा ठिकाणी की जेथे त्यांच्या मदतीला कोणीहि नव्हता, खाद्यपानाची असामान्य व्यवस्था केली गेली. एका बाजूला हजरत मरयम यांचा अल्लाह वरील दृढ विश्वास होता तर दुसरीकडे अल्लाहच्या कृपेचे वैभव !

३९. म्हणजे बाळाला पाहून आपले नेत्र गार करा की अतिशय स्वच्छ शुद्ध व महान प्रतिष्ठित व्यक्तिमत्वाने जन्म घेतला आहे.

४०. असे दिसून येते की इस्राईल वंशात मौन व्रताचा रोजा राखला जात होता आणि नवस म्हणून या प्रकारचा रोजा राखणे त्यांच्याकरिता उचित होते. हजरत मरीयम यांचा ज्या परिस्थितीशी सामना होता ती लक्षात घेता त्यांना ही ताकीद की त्यांनी नवस म्हणून 'मौन' रोज़ा राखावा मोठी बुद्धि कौशल्याची बाब होती. कारण आक्षेप घेणाऱ्यांना संतुष्ट करणे सोपे काम नव्हते. त्यांना वस्तुस्थितीशी अवगत करण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने बाळाला बोलण्याचे सामर्थ्य प्रदान केले. तसा उल्लेख पुढे येत आहे.

स्पष्ट असावे नज्र (नवस) चा अर्थ एखाद्या गोष्टीस स्वत: वर बंधनकारक करून घेणे असा आहे (लिसानुल अरब खंड. ५ पृ. २००)

राहिला हा प्रश्न की हजरत मरीयम त्या वेळी प्रसूतीमुळे विटाळशी झाल्या आणि रोजा एक उपासना आहे तर अशा अवस्थेत त्यांनी रोजा कसा राखला असेल तर याचे उत्तर असे की प्रसूतीनंतरचा रक्तस्राव एक महिना किंवा चाळीस दिवस होत राहावा हे आवश्यक नाही. एखाद्या स्त्रीच्या रक्तस्रावाची मुदत अल्प देखील असते. यास्तव फुकहा (धर्मशास्त्रवेत्त्या) नी याचे स्पष्टीकरण केले आहे. 'मुगनी'तील उल्लेख असा-

وليس لاقله حداى وقت رأت الطهر اغتسلت

(مغنی جلد ۱ صفحہ ۳۴۷)

'प्रसूतीनंतर होणाऱ्या रक्तस्रावाच्या कमीत कमी मुदतीसाठी कोणतीहि मर्यादा नाही स्त्रीला जेव्हा देखील 'पाकी'ची अवस्था आढळेल तिने स्नान करून घ्यावे'.

(मुगनी खंड१पृष्ठ- ३४७)

अर्थात प्रसूतीनंतरचा रक्तस्राव एक अर्ध्या दिवसातहि बंद होऊ शकतो आणि हे हि शक्य आहे की प्रसव-काळात रक्तस्राव सुरवातीपासूनच न व्हावा.

४१. हजरत मरीयम जेव्हा बाळाला घेऊन आपल्या जन-समूहाजवळ पोहचल्या तेव्हा लोकांनी आक्षेपांचा वर्षाव केला. हज़रत मरयमवर दुष्कर्म केल्याचा ते आरोप ठेवत होते.

४२. हज़रत मरयम हज़रत हारून यांच्या कुटुंबातली होती. हज़रत हारून पैगंबर होते म्हणून लोकांनी त्यांना हारूनच्या बहीणी असे संबोधले. अन्यथा हज़रत मरयम यांना कोणताहि भाऊ नव्हता. अरबी भाषेत याची उदाहरणे मिळतात. उदाहरणार्थ हमदान कबील्याच्या इसमास हे हमदानच्या बांधवा असे संबोधितात. हज़रत मरीयम यांना हज़रत हारूनची बहीण संबोधून लोकांनी त्यांना ही जाणीव करून देऊ इच्छिले की तुम्ही एका सभ्य व सुसंस्कृत घराण्याशी संबंधित आहात जे एका प्रसिद पैगंबरांचे घराणे होय यास्तव तुमच्याकडून अशी अपेक्षा नव्हती की एवढ्या खालच्या पातळीप्रत जाल.

सर्वसामान्यत: भाष्यकारांनी हारूनशी अभिप्रेत पैगंबर हारून नव्हे तर मरयमचा एखादा भाऊ घेतला आहे. त्यांचा युक्तिवाद मुगीरा बिन शुअबाच्या एका कथनाद्वारे आहे ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी नजरानच्या ख्रिश्चनांच्या या आक्षेपास उत्तर देतांना, की हजरत हारुन तर हज़रत मरयम पूर्वी शेकडो वर्षांनी होऊन गेले तेव्हा हज़रत मरयम यांना हज़रत हारुनची बहीण का म्हटले गेले. त्यावर पैगंबरानी फर्माविले, इस्राईल वंशाचे लोक आपली नावे पैगंबरांच्या व सत्पुरुषांच्या नावानुसार ठेवीत हे हदीस वचन मुस्लिम तिर्मिजी इत्यादित निवेदिले गेले आहे परंतु ही हदीस याविषयी स्पष्ट नाही की हज़रत मरयम यांना एखादा हारून नावाचा भाऊ होता. दुसरे असे की या हदीस वचनाचा एक उल्लेख कर्ता सिमाक बिन हर्ब आहे ज्याच्या विषयी हदीस-विद्वानांची मते भिन्न आहेत. कोणी त्यांना विश्वसनीय ठरवितो तर कोणी कमज़ोर ठरवितो.सुफयान व शुअबा तयांना कमज़ोर ठरवितात आणि इमाम अहमद यांच्या मते ते 'मुज्तरिबुल हदीस' आहेत म्हणजे त्यांच्या हदीस वचनांमध्ये एक प्रकारची गुंतागुंत आढळून येते. (मीजानुल एतेदाल खंड २ पृ. २३२ -२३३) आणि इब्ने हबान म्हणतात ते विश्वसनीय आहेत परंतु मोठ्या प्रमाणात चुका करतात (तहजीबुत तहजीब खंड

४ पृष्ठ २३४ )

४३. ही या गोष्टीची स्वीकृति होती की हजरत मरयम अतिशय सुसभ्य घराण्याची स्त्री आहे.

४४. हजरत मरयम यांनी अल्लाहच्या ताकीदीनुसार आचरण करीत मौन रोजा ठेवला होता म्हणून त्यांनी लोकांना काहीच उत्तर दिले नाही, किंबहुना बाळाकडे इशारा केला की याच्याशी बोला.

४५. म्हणजे जे बाळ अजून पाळण्यात आहे त्याच्याशी आम्ही कशा प्रकारे बोलू शकतो?

४६. नवजात अर्भकाचे बोलू लागणे हा सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून चमत्कार होता आणि हा चमत्कार सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशासाठी दाखविला की हे हज़रत मरयम यांच्या निष्कलंक असण्याचे प्रमाण ठरावे व त्यांना आपल्यावरील. आरोपाचे निरसन करण्यासाठी काहीहि सांगण्याची गरज न भासावी तसेच हज़रत ईसाच्या प्रेषित्वाची निशाणी ठरावी.

पाळण्यातून त्यांची ही घोषणा की 'मी अल्लाहचा दास आहे' या वास्तवतेची अभिव्यक्ति होती की त्यांचे स्थान दास्यत्वाचे स्थान आहे. याहून भिन्न असे नाही. त्यांना ईश-पुत्र ठरविले जाण्याचे हे पूर्व खंडन होते.

ग्रंथाशी अभिप्रेत इंजील (बायबल) होय, 'ग्रंथ दिला व पैगंबर बनविले' याचा अर्थ असा नव्हे की पाळण्यातच हजरत ईसा यांना ग्रंथ दिला गेला होता व पैगंबर पद ही प्रदान केले गेले होते. या गोष्टी तर त्यांना अशा वेळी प्रदान केल्या गेल्या जेव्हा ते या जबाबदाऱ्या पार पाडण्यास योग्य झाले, परंतु ज्याअर्थी हा अल्लाहचा निर्णय होता म्हणून त्यास निश्चितपणे घडून येणे क्रमप्राप्त होते अशा प्रकारे बालकाच्या मुखाने ऐलान करविले गेले की जणू ह्या गोष्टी प्रदान केल्या गेल्या आहेत. ही वर्णन शैली घडून येणाऱ्या एखाद्या गोष्टीची अटळता व्यक्त करते.

या चमत्काराचा उल्लेख सध्याच्या बायबलमध्ये नाही. याचे कारण ती परिस्थिती होय ज्या परिस्थितीत बायबल ग्रंथाची रचना झाली. या घटनेचे मूळ साक्षीदार यहुदी होते परंतु हजरत मसीह (येशू) यांना प्रेषित पदाचा सम्मान लाभल्यानंतर ते त्यांचे शत्रू बनले आणि जे लोक त्यांचे अनुयायी बनले त्यांना मोठ्या सक्त परीक्षेतून जावे लागले म्हणून या उपद्रव पूर्ण परिस्थितीत हज़रत मसीह यांची जीवन-स्थिती व त्यांच्या शिकवणीचा फार मोठा हिस्सा सुरक्षित राहू शकला नाही परंतु क़ुरआनाच्या निवेदनाची सत्यता व उचितता अगदी स्पष्ट आहे. कारण यहुदी द्वारे हज़रत मरयमवर दोषारोप लादला जाणे मग त्यांना शिक्षा न देता सोडून देणे, जेव्हा बनी इस्राईलच्या शरीअतीत व्यभिचाराची शिक्षा मोठी कठोर होती, हे उघड करते की एखादी असामान्य घटना निश्चितपणे घडली होती. ज्यामुळे हजरत मरयम यांची निष्कलंकता सिद्ध झाली होती. क़ुरआन कथनानुसार ही नवजात अर्भकाची साक्ष होती, जिने हे सिद्ध केले की ही एक असामान्य घटना (ईश्वरी-चमत्कार) आहे. यानंतर कोणाला काही बोलण्यास वाव राहीला नाही.

४७. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने मला पूर्णत: मांगल्य बनविले आहे. ज्या एखाद्या ठिकाणी माझे वास्तव्य असेल, मांगल्य व समृद्धीकारक ठरेल. तात्पर्य ना माझा जन्म उपद्रवकारक आहे आणि ना भावी काळात माझ्याकडून एखादे अमंगल सादर होईल. हे त्या आक्षेपांचे पूर्व-खंडन होय जे भविष्यात यहुदीद्वारे त्यांच्यावर केले जाणार होते.

४८. नमाज़ व ज़कातचा उल्लेख विशेषत्वाने केला की हे अल्लाहच्या धर्माचे आधारभूत स्तंभ आहेत ज्यांना नष्ट करणे म्हणजे धर्माला नष्ट करणे होय. यहुद्यांनी यांना नष्ट केले होते म्हणून हज़रत ईसा यांनी वाचा फुटताच यांचा उल्लेख केला.

४९. सद्‌वर्तन करण्या संबंधाने फक्त आईचा उल्लेख केला जो या गोष्टीचा पुरावा होय की हज़रत ईसा (येशू) पित्याशिवाय जन्मले होते अन्यथा ते म्हणाले असते की मला माता-पित्याशी सद्‌वर्तन करणारा बनविले. क़ुरआनाच्या निवेदनाने बायबलच्या त्या कथनांचे खंडन होते ज्याद्वारे हा निष्कर्ष निघतो की हजरत ईसा आपल्या आईशी बेपर्वा झाले होते. (यूहन्ना २:४)

सलामती आहे मजवर ज्या दिवशी मी जन्मलो, ज्या दिवशी मी मरेल आणि ज्या दिवशी जिवंत करून उठविलो जाईन. हा आहे मरयम-पुत्र ईसा (आणि ही आहे) सत्य गोष्ट ज्या विषयी लोक वाद घालीत आहेत.(अल-क़ुर्आन)

३३. सलामती आहे मजवर ज्या दिवशी मी जन्मलो, ज्या दिवशी मी मरेल आणि ज्या दिवशी जिवंत करून उठविलो जाईन.[५०]

وَالسَّلٰمُ عَلَيَّ يَوْمَ وُلِدْتُّ وَيَوْمَ اَمُوْتُ وَيَوْمَ اُبْعَثُ حَيًّا ﴿۳۳﴾

३४. हा आहे मरयम-पुत्र ईसा (आणि ही आहे) सत्य गोष्ट ज्या विषयी लोक वाद घालीत आहेत.[५१]

ذٰلِكَ عِيْسَى ابْنُ مَرْيَمَ ۚ قَوْلَ الْحَقِّ الَّذِيْ فِيْهِ يَمْتَرُوْنَ ﴿۳۴﴾

३५. अल्लाहच्या योग्यतेस हे अनुरुप नव्हे की त्याने एखाद्यास पुत्र बनवावे [५२] तो पवित्र आहे. जेव्हा तो एखाद्या गोष्टीचा निर्णय घेतो तेव्हा फक्त फार्मावितो घडून ये आणि ती (तत्क्षणी) घडून येते. [५३]

مَا كَانَ لِلّٰهِ اَنْ يَّتَّخِذَ مِنْ وَّلَدٍ ۙ سُبْحٰنَهٗ ؕ اِذَا قَضٰۤى اَمْرًا
فَاِنَّمَا يَقُوْلُ لَهٗ كُنْ فَيَكُوْنُ ؕ ﴿۳۵﴾

३६. आणि (ईसा ने स्पष्टपणे म्हटले होते) अल्लाह माझाहि 'रब्ब' (स्वामी) आहे व तुमचा देखील-तेव्हा त्याचीच उपासना करा-हाच सरळ मार्ग आहे. [५४]

وَاِنَّ اللّٰهَ رَبِّيْ وَرَبُّكُمْ
فَاعْبُدُوْهُ ؕ هٰذَا صِرَاطٌ مُّسْتَقِيْمٌ ﴿۳۶﴾

३७. परंतु विविध संप्रदायांनी परस्पर मतभेद केला. [५५] तेव्हा ज्या लोकांनी कुफ्र केले. त्यांच्याकरिता एका सक्त दिवसाची हजेरी विनाशाचे कारण ठरेल .[५६]

فَاخْتَلَفَ الْاَحْزَابُ مِنْۢ بَيْنِهِمْ ۚ فَوَيْلٌ
لِّلَّذِيْنَ كَفَرُوْا مِنْ مَّشْهَدِ يَوْمٍ عَظِيْمٍ ﴿۳۷﴾

३८. ज्या दिवशी हे आमच्या समोर हजर होतील, त्या दिवशी ते खूप ऐकतील व खूप पाहतील [५७] परंतु आज हे अत्याचारी खुल्या मार्गभ्रष्टतेत पडले आहेत.

اَسْمِعْ بِهِمْ وَاَبْصِرْ ۙ يَوْمَ يَاْتُوْنَنَا لٰكِنِ الظّٰلِمُوْنَ الْيَوْمَ
فِيْ ضَلٰلٍ مُّبِيْنٍ ﴿۳۸﴾

३९. आणि त्यांना हळहळ (पश्चातापा) च्या दिवसाविषयी खबरदार करा जेव्हा निर्णय दिला जाईल[५८]आणि त्यांची अशी दशा आहे की गफलतीत पडले आहेत आणि ईमान बाळगत नाही.

وَاَنْذِرْهُمْ يَوْمَ الْحَسْرَةِ اِذْ قُضِيَ الْاَمْرُ ۘ وَهُمْ فِيْ غَفْلَةٍ وَّهُمْ
لَا يُؤْمِنُوْنَ ﴿۳۹﴾

४०. नि:संशय आम्ही जमीनीचे व तिच्यावर वसणाऱ्यांचे वारस असू. [५९] आणि सर्वांना आमच्याकडेच परतविले जाईल.

اِنَّا نَحْنُ نَرِثُ الْاَرْضَ وَمَنْ عَلَيْهَا وَاِلَيْنَا يُرْجَعُوْنَ ﴿۴۰﴾ ع

५०. म्हणजे ईश्वरातर्फे माझ्यासाठी आयुष्यभर सलामती आहे आणि दुसऱ्या जीवनातहि सलामती. ''ज्या दिवशी मी मरेन'' हे शब्द असे स्पष्ट करतात की हजरत ईसा यांनाहि एक ना एक दिवस मृत्यु क्रमप्राप्त आहे.

५१. हजरत ईसा (येशू) यांना यहुदी लोक आरंभापासूनच पैगंबर मानीत नाही आणि ख्रिश्चनांनी त्यांच्या व्यक्तिमत्वात अतिशयोक्ति करून त्यांना अल्लाहचा पुत्र बनविले मग या विवादात अशा रीतीने गुरफटले की मूळ वस्तुस्थिती. पडद्या आड राहीली. परंतु क़ुरआनने समस्त पडदे उठविले आणि खऱ्या वस्तुस्थितीला प्रकट केले.

५२. म्हणजे ईश्वराकरिता ही गोष्ट मुळीच साजेशी नाही की त्याने एखाद्यास आपला पुत्र बनवावे. हा अवगुण आहे गुण नव्हे आणि या गोष्टीचा अल्लाहशी संबंध जोडण्याचा अर्थ हा की तो उणीव दोषांपासून मुक्त नाही.

५३. म्हणजे ज्याच्या सामर्थ्याचे हे वैभव असावे की कोणतीहि गोष्ट त्याच्या 'घडून ये' म्हणण्याने अस्तित्वात यावी तो एखाद्यास पुत्र बनविण्यास गरजवंत कसा असू शकतो.

५४. हजरत ईसा (येशू) यांनी पाळण्यात दिलेल्या निवेदनाचा वर उल्लेख केला गेला आहे. येथे त्यांच्या त्या आवाहनास प्रस्तुत केले गेले आहे जे त्यांनी प्रेषित्व पदाने सम्मानित झाल्यानंतर बनी इस्राईल समोर मांडले होते. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले इमरान टीप क्र.७६.

५५. जेव्हा अल्लाहच्या धर्मात ऐखादी नवीन श्रद्धा सामील केली जाते तेव्हा अपरिहार्यपणे मतभेद निर्माण होतात परिणामी संप्रदाय अस्तित्वात येतात. ख्रिश्चनांनी जेव्हा हजरत ईसाच्या शिकवणीत मतभेद केला व त्यांच्या व्यक्तित्वासंबंधी अतिशयोक्तियुक्त श्रद्धा मनाने रचली तेव्हा सांप्रदायिकतेने जन्म घेतला. याकूबीया व नस्तूरयासारखे पंथ त्यांच्यात निर्माण झाले आणि नंतरच्या काळात कॅथालीक व प्राटेस्टंट पंथ उदयास अले. अशा प्रकारे ते आपल्या मध्यवर्ती एकेश्वरवादी बिंदूपासून वेगळे झाले व त्यांची जमात देखील अस्ताव्यस्त झाली.

५६. अभिप्रेत कियामतीच्या दिवसाचा विनाश होय.

५७. म्हणजे कियामतीच्या दिवशी ते चांगल्या प्रकारे जाणून घेतील की वस्तुस्थिती काय होती, हजरत ईसा (येशू) ईश्वराचे पुत्र होते किंवा दास?

५८. म्हणजे कियामतीच्या दिवसाविषयी खबरदार करा जो काफिरांसाठी पश्चातापाचा दिवस असेल. काही भाष्यकारांनी तो दिवस अभिप्रेत घेतला आहे जेव्हा मुसलमानांनी बैतुल मक्दिसला जिंकले व ख्रिश्चनांकरिता हळहळीचे सबब बनले (तर्जुमानुल क़ुरआन खंड २ पृष्ठ ४३६) परंतु आयतीमधील शब्द या भाष्याची सोबत देत नाही. निर्णय दिला गेल्याची गोष्ट तर क़ुरआनात कियामतीच्याबाबत म्हटली गेली आहे व नंतरच्या आयतीत हे जे फर्माविले गेले आहे की 'सर्वांना आमच्याकडे परतविले जाईल' तेव्हा उघड आहे की हे कियामतीच्या दिवसासंबंधी आहे.

५९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हिज्र टीप क्र.२१

४१. आणि ( हे पैगंबर !) ग्रंथात इब्राहीमचा उल्लेख करा निःसंशय तो अतिशय सच्चा होता [६१] आणि पैगंबर होता.

وَاذْكُرْ فِي الْكِتَابِ إِبْرَاهِيمَ ۚ إِنَّهُ كَانَ صِدِّيقًا نَّبِيًّا ﴿٤١﴾

४२. जेव्हा त्याने आपल्या पित्याला म्हटले,हे पिता ! आपण अशा वस्तूंची पूजा का म्हणून करता ज्या ना ऐकतात, ना पाहतात आणि ना तुमच्या काही कामी येऊ शकतात? [६२]

إِذْ قَالَ لِأَبِيهِ يَا أَبَتِ لِمَ تَعْبُدُ مَا لَا يَسْمَعُ وَلَا يُبْصِرُ وَلَا يُغْنِي
عَنكَ شَيْئًا ﴿٤٢﴾

४३. हे पिता ! माझ्याजवळ असे ज्ञान आले आहे जे तुमच्या जवळ आले नाही [६३] तेव्हा आपण माझ्या मागे चालावे मी आपणास सरळ मार्ग दाखवीन.

يَا أَبَتِ إِنِّي قَدْ جَاءَنِي مِنَ الْعِلْمِ مَا لَمْ
يَأْتِكَ فَاتَّبِعْنِي أَهْدِكَ صِرَاطًا سَوِيًّا ﴿٤٣﴾

४४. हे पिता ! आपण सैतानाची भक्ति करू नका [६४] सैतान तर रहमानाचा अवज्ञाकारी आहे.

يَا أَبَتِ لَا تَعْبُدِ الشَّيْطَانَ ۖ إِنَّ الشَّيْطَانَ كَانَ لِلرَّحْمَٰنِ عَصِيًّا ﴿٤٤﴾

४५. हे पिता ! मला भय वाटते की रहमानची शिक्षा यातना आपणास येऊन न धरावी आणि आपण सैतानाचे साथीदार बनून रहावे.

يَا أَبَتِ إِنِّي أَخَافُ أَن يَمَسَّكَ عَذَابٌ مِّنَ الرَّحْمَٰنِ
فَتَكُونَ لِلشَّيْطَانِ وَلِيًّا ﴿٤٥﴾

४६. पिता म्हणाला, हे इब्राहीम ! काय तू माझ्या उपास्यांकडून पराङगमुख झाला आहे.जर तू परावृत्त झाला नाहीस तर मी तुझ्यावर दगडांचा मारा करीन [६५] तू माझ्या पासून नेहमी करीता अलग हो.[६६]

قَالَ أَرَاغِبٌ أَنتَ عَنْ آلِهَتِي يَا إِبْرَاهِيمُ ۖ لَئِن لَّمْ تَنتَهِ لَأَرْجُمَنَّكَ ۖ
وَاهْجُرْنِي مَلِيًّا ﴿٤٦﴾

४७. इब्राहीमने म्हटले, सलाम (शांती) असो आपणावर मी आपणाकरीता माझ्या पालनकर्त्याशी क्षमेची दुआ करीन. [६७] तो मजवर मोठा मेहरबान आहे.

قَالَ سَلَامٌ عَلَيْكَ ۖ سَأَسْتَغْفِرُ لَكَ رَبِّي ۖ إِنَّهُ كَانَ بِي حَفِيًّا ﴿٤٧﴾

४८. मी तुम्हा लोकांपासून तसेच त्यांच्यापासून ज्यांना तुम्ही अल्लाहशिवाय पुकारता, विभक्त होतो आणि आपल्या पालनकर्त्यालाच पुकारतो. आशा आहे, मी आपल्या पालनकर्त्यास पुकारून वंचित राहणार नाही.

وَأَعْتَزِلُكُمْ وَمَا تَدْعُونَ مِن دُونِ اللَّهِ وَأَدْعُو رَبِّي عَسَىٰ
أَلَّا أَكُونَ بِدُعَاءِ رَبِّي شَقِيًّا ﴿٤٨﴾

६०. ग्रंथात उल्लेख करा याचा अर्थ असा की हे पैगंबर ! अल्लाहचा जो ग्रंथ तुम्ही लोकांना ऐकवित आहात त्यात त्यांना इब्राहीमचा वृत्तांतहि ऐकवा की हा वृत्तांत सर्वश्रेष्ठ अल्लाहने निवेदिला आहे व या ग्रंथा (क़ुरआना) त सामील आहे.

६१. हजरत इब्राहीम यांचा 'सत्यनिष्ठ' गुणधर्म निवेदन केला गेला आहे. अर्थात अतिशय सच्चा व सदाचारी सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांची वेगवेगळ्या गोष्टीत परीक्षा घेतली व ते प्रत्येक परीक्षेत पूर्णत: यशस्वी झाले मूर्तिपूजेविरूद्ध त्यांनी ज़बरदस्त प्रयत्न केले आणि या संदर्भात तत्कालीन शासनाचे आव्हान स्वीकारण्यातहि कच खाल्ली नाही. एवढेच नव्हे तर आपल्या पित्यालाहि मूर्तिपूजेविषयी कटू सत्य ऐकविले. शिर्क विरूद्ध त्यांची निर्भिड वृत्ती, अल्लाहसाठी गृह त्याग करणे एकेश्वरवादाच्या प्रचारासाठी सक्त कष्टाचा व त्रासाचा प्रवास करणे, स्वत:च्या पुत्राचे अल्लाहकरिता बलीदान करण्यास तयार होणे त्यांच्या सत्यनिष्ठतेची उच्च उदाहरणे होत.

''हज़रत इब्राहीम सच्चे होते'' या क़ुरआनाच्या निवेदनाने बायबलच्या त्या निवेदनाचे आपोआप खंडन होते ज्यात इब्राहीमकडे या असत्याचा संबंध दर्शविला गेला आहे की जेव्हा ते मिस्र (इजिप्त) देशी गेले तर या भिती पोटी की तिथल्या बादशहाने यांच्या पत्नीस (सारा हिस) सुंदरतेमुळे ठेवून न घ्यावे व इब्राहीमला ठार मारावे, इब्राहीम आपल्या पत्नीस म्हणाले, की तुम्ही असे सांगा की मी या माणसाची बहीण आहे (उत्पत्ति १२:११ ते २०) बायबलचा हा किस्सा अगदी खोटा आहे. जर त्या बादशहाची नियत खराब होती तर केवळ बहीण म्हटल्याने तो आपल्या घाणेरड्या इराद्यापासून प्रवृत्त का झाला असता? बायबल मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी हजरत इब्राहीम व हज़रत सारा यांचे जे वयोमान दाखविले गेले आहे ते लक्षात घेता मिस्र (इजिप्त) च्या प्रवासाच्या प्रसंगी हजरत सारा एखादी अल्पवयीन तरूणी नव्हती की ज्यामुळे त्यांना बादशहाचा धोका राहीला असता. तसेच बायबल मध्ये या प्रकारच्या असत्याचा संबंध हजरत इसहाक यांच्याशीहि जोडला गेला आहे. म्हणजे त्यांनी देखील याच भयापोटी आपल्या पत्नीविषयी म्हटले की 'ती माझी बहीण आहे' (उत्पत्ति प्रकरण २६) बायबलच्या या गोष्टी एवढ्या गुंतागुंतीच्या व अनुचित आहेत की त्यांच्यावर कदापि विश्वास ठेवला जाऊ शकत नाही. वस्तुस्थिती अशी की बायबलच्या संकलन कर्त्यांनी आपल्या प्रेषितांच्या चरित्रास कलंकीत केले आहे परंतु पवित्र कुरआन त्यांच्या चरीत्रास अशा प्रकारे सादर करते की ते अगदी निष्कलंक दिसून येते आणि हे त्याच्या सत्यतेचे प्रमाण होय.

६२. स्पष्टीकरणाकरिता पहा सूरह अनआम टीप क्र. १२७, १२८, १२९.

६३. ज्ञानाशी अभिप्रेत वही (ईश-संदेशा) चे ज्ञान व प्रेषित-ज्ञान

६४. म्हणजे ह्या मूर्तिची पूजा वस्तुत: सैतानाचीच पूजा होय, कारण ही सैतानाच्या इशाऱ्यानुसार केली जात आहे अर्थात सैतानाचे असे आज्ञापालन की ज्याने एईश्वराच्या आज्ञा पालनाची जागा घ्यावी. पर्यायाने त्याला उपास्य बनविणे व ईश्वराचा सहभागी ठरविणे होय.

६५. त्या काळात संततीवर पिल्याचा फार जबरदस्त प्रभाव असे आणि धार्मिक पक्षपातामुळे तो आपल्या संततीवर अत्याचार करण्यासहि धजावत असे. आणि हा धार्मिक पक्षपातच होता ज्यामुळे हजरत इब्राहीम यांच्या पित्याने त्यांना दगडांचा मारा करण्याची धमकी दिली.

६६. म्हणजे तुमची भलाई यातच आहे की घर सोडून चालते व्हा व मला तोंड दाखवू नका.

६७. ही होती हजरत इब्राहीम यांच्या चारित्र्याची उच्चता की पिता त्यांना दगडांचा वर्षाव करून मारण्याची धमकी देतो व घर सोडून जाण्याचा आदेश देतो तरीहि त्यांच्या कपाळावर आठी उमटत नाही किंबहुना त्यांच्यासाठी शांतीची प्रार्थना मागत व आपल्या पालनकर्त्याशी त्याच्यासाठी क्षमा याचनेच्या प्रार्थनेचे वचन देत निरोप घेतात.

हजरत इब्राहीम यांनी आपले वचन पाळले परंतु जेव्हा त्यांना ही गोष्ट स्पष्टपणे कळून आली की त्यांचा पिता शिर्कपासून प्रवृत्त होणारा नाही व ईश्वराचा वैरी आहे तेव्हा प्रार्थना करण्यापासून थांबले. जसा उल्लेख सूरह तौबा टीप क्र. २०९ व २१० मध्ये केला गेला आहे.

४९. मग जेव्हा तो त्यांच्यापासून तसेच त्यांच्या (उपास्यांच्या ) पासून, ज्यांना ते अल्लाहशिवाय पुकारत होते, वेगळा झाला तेव्हा आम्ही त्याला इसहाक व याकूब प्रदान केले आणि यांच्या पैकी प्रत्येकाला पैगंबर बनविले.

فَلَمَّا اعْتَزَلَهُمْ وَمَا يَعْبُدُونَ مِنْ دُونِ اللَّهِ
وَهَبْنَا لَهُ إِسْحَاقَ وَيَعْقُوبَ وَكُلًّا جَعَلْنَا نَبِيًّا ﴿٤٩﴾

५०. आणि त्यांना आपल्या कृपेने उपकृत केले व त्यांच्या करिता सत्याच्या जिव्हा उंचावल्या. [६९]

وَوَهَبْنَا لَهُمْ مِنْ رَحْمَتِنَا وَجَعَلْنَا لَهُمْ لِسَانَ صِدْقٍ عَلِيًّا ﴿٥٠﴾

५१. आणि ग्रंथात मूसाचा उल्लेख करा. तो निवडक (दास) होता [७०] आणि 'रसूल' व 'नबी' होता. [७१]

وَاذْكُرْ فِي الْكِتَابِ مُوسَىٰ إِنَّهُ كَانَ مُخْلَصًا وَكَانَ رَسُولًا نَبِيًّا ﴿٥١﴾

५२. अम्ही त्याला तूर (पर्वता) च्या उजव्या बाजूकडून पुकारले [७२] आणि कानगोष्टी करण्या करिता जवळ केले. [७३]

وَنَادَيْنَاهُ مِنْ جَانِبِ الطُّورِ الْأَيْمَنِ وَقَرَّبْنَاهُ نَجِيًّا ﴿٥٢﴾

५३. आणि आपल्या कृपेने त्याच्या भाऊ हारूनला पैगंबर बनवून त्याला प्रदान केले.[७४]

وَوَهَبْنَا لَهُ مِنْ رَحْمَتِنَا أَخَاهُ هَارُونَ نَبِيًّا ﴿٥٣﴾

५४. आणि ग्रंथात इस्माईलचा उल्लेख करा. तो वचनाचा सच्चा [७५] आणि 'रसूल' व 'नबी' होता.

وَاذْكُرْ فِي الْكِتَابِ إِسْمَاعِيلَ إِنَّهُ كَانَ صَادِقَ الْوَعْدِ
وَكَانَ رَسُولًا نَبِيًّا ﴿٥٤﴾

५५. तो आपल्या कुटुंबियांना नमाज़ व ज़कातचा आदेश देत असे आणि आपल्या पालनकर्त्याजवळ आवडता होता.[७६]

وَكَانَ يَأْمُرُ أَهْلَهُ بِالصَّلَاةِ
وَالزَّكَاةِ وَكَانَ عِنْدَ رَبِّهِ مَرْضِيًّا ﴿٥٥﴾

५६. आणि ग्रंथात इदरीसचा उल्लेख करा [७७] तो फार सच्चा होता व पैगंबर होता.

وَاذْكُرْ فِي الْكِتَابِ إِدْرِيسَ إِنَّهُ كَانَ صِدِّيقًا نَبِيًّا ﴿٥٦﴾

५७. आणि आम्ही त्याला उच्च स्थानावर उठविले होते. [७८]

وَرَفَعْنَاهُ مَكَانًا عَلِيًّا ﴿٥٧﴾

६८. म्हणजे जेव्हा इब्राहीम आपल्या देशास सोडून सिरीया व पॅलेस्टीन पोहचले तर सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना अशी संतती प्रदान केली की त्यांच्या वंशात मोठी समृद्धी झाली व कृपा लाभाचे स्त्रोत जारी झाले.

याकूब इब्राहीमचे नातू होते ज्यांचे दुसरे नाव इस्राईल आहे त्यांच्यापासूनच बनी-इस्राईलचा क्रम चालला.

६९. अर्थात खऱ्या लोकांच्या जिव्हांवर त्यांच्या स्तुती-प्रशंसेची वचने जारी केलेत. ईमान बाळगणाऱ्यांच्या मनात त्यांची खरी कदर आहे. ते मोठ्या इतमामाने त्यांचे नाव घेतात व त्यांच्यावर सलाम, व दरूद पाठवितात.

यावरून ही वस्तुस्थिती स्पष्ट होते की जगात प्रतिष्ठा व ईश्वराच्या सदाचारी दासांमध्ये मान्यता व त्यांच्या जिव्हांवर चांगली स्मरण अल्लाहची मोठी देणगी आहे परंतु अल्लाहचे सदाचारी दास यापासून अगदी निरपेक्ष असतात.

७०. म्हणजे अल्लाहने आपल्या सान्निध्याकरिता हजरत मूसा यांना निवडले होते.

७१. 'रसूल' म्हणजे पाठविलेला संदेश पोहचविणारा आणि नबी'चा अर्थ खबर देणारा म्हणजे जो अल्लाहतर्फे लोकांना खबर ऐकवितो. क़ुरआनात हे दोन्ही शब्द अल्लाहच्या त्या विशेष दासांकरिता, ज्यांच्यावर त्याच्यातर्फे वही (ईश-संदेश) अवतरीत केला जातो, वापरले जातात तथापि रसूल हा शब्द 'पाठविले गेलेले' या अर्थाने काही ठिकाणी खास खास फिरिश्त्यांकरिता वापरले गेले आहेत. रसूल व नबी या दोन्हीचा अर्थ एकच आहे परंतु दोन्ही परिभाषा एकाच वेळी वापरल्याचा हेतु त्यांच्या जन-समूहा (उम्मत) संबंधाने त्यांच्या रिसालत (पैगंबरीय) स्थानास स्पष्ट करणे हा होय. म्हणून आयत क्र. ४१ ते ५७ मध्ये अनेक पैगंबरांचा उल्लेख केला गेला आहे परंतु हजरत मूसा व हजरत इस्माईल यांचा उल्लेख अशा शैलीत केला गेला आहे की ते रसूल व नबी होते. ज्याअर्थी हजरत इब्राहीम यांच्या वंशाच्या दोन शाखा होत्या, एक बनी इस्राईल व दुसरी बनी इस्माईल. आणि बनी इस्राईल हजरत मूसा यांचा जन-समूह ठरला व बनी इस्माईल हजरत इस्माईल यांचा. म्हणून त्यांच्या रिसालत (पैगंबरीय) स्थानास प्रकट केले गेले आहे. अर्थात हजरत मूसा व हज़रत इस्माईल अशा प्रतिष्ठेचे नबी होते की आज जे दोन मोठे जन समूह तुम्ही पाहात आहात ते त्यांच्याशी संबंधित होत.

७२. 'उजवा' हा शब्द अरबी भाषोत शुभ या अर्थाने वापरला जातो. येथे तूर पर्वताच्या उजव्या बाजूने शी अभिप्रेत ती मंगलमय भूमी होय जेथे हजरत मूसा यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने पुकारले होते व त्यांना प्रेषित्व प्रदान केले होते. क़ुरआनात दुसऱ्या ठिकाणी या भूमीला 'तूर'ची पवित्र खिंड म्हटले गेले आहे. اِذْنَادَاهُ رَبُّهٗ بِالْوَادِ الْمُقَدَّسِ طُوًى

''जेव्हा त्याच्या पालनकर्त्याने त्याला तूरच्या पवित्र खिंडीत पुकारले.''(नाजिआत :१६)

उजव्या बाजूचा जर शाब्दिक अर्थ घेतला गेला तर त्याचा अर्थ असा होईल की हजरत मूसा मदयन पासून मिस्र देशाकडे जात असताना तूरच्या या भागात जो त्यांच्या उजव्या बाजूला होता, सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना पुकारले.

७३. म्हणजे हजरत मूसा यांच्याशी एकांतात सर्वश्रेष्ठ अल्लाहने संभाषण केले आणि समोरासमोर संभाषण करण्याचा मान देण्याकरीता त्यांना आपल्याजवळ केले.

७४. म्हणजे हजरत हारून यांना प्रेषित बनवून हज़रत मूसा यांचा सहाय्यक बनविले.

७५. संकेत कुर्बानीच्या घटनेकडे आहे की त्यांनी आपल्या पित्यास असे जे म्हटले होते की

سَتَجِدُنِیۡۤ اِنۡ شَآءَ اللّٰهُ مِنَ الصّٰبِرِیۡنَ ـ (صافات ـ ١٠٢)

''अल्लाहने इच्छिल्यास मी धैर्यशील असल्याचे आपणास आढळेल.'' (साफ्फात-१०२)

तर हे वचन त्यांनी पूर्ण केले व ईश्वराकरीता बलीदान देण्याकरीता अधोमूख स्थितीत पहुडले. वचन पूर्तिचे याहून उच्चतम असे उदाहरण आणखी कोणते असू शकते.

७६. हरजत इस्माईल यांचा हा गुणधर्म की ते आपल्या कुटुंबियांना नमाज़ व ज़कातची ताकीद करीत असत विशेषत्वाने निवेदिला गेला आहे जेणे करून त्यांच्या वंशापासून असलेल्या अरबांनी विचार चिंतन करावे की त्यानी करावयाचे काम कोणते होते व ते करीत काय आहेत. तसेच ईमान बाळगणाऱ्यांकरीताहि हा आर्दश ठरावा. त्यांनी आपल्या कुटुंबियांच्या सुधारणेची काळजी घ्यावी आणि विशेषरित्या नमाज़चा इतमाम करण्याची व जकात अदा करण्याची ताकीद करावी.

७७. हजरत इदरीस यांचा उल्लेख क़ुरआनात संक्षेपाने आला आहे. एक येथे व दुसरा सूरह अंबिया आयत क्र.८५ मध्ये. त्यांचा वृत्तांत एखाद्या सहीह हदीस मध्ये निवेदन केला गेला नाही. मेअराज वाली हदीस शिवाय ज्यात त्यांचे चौथ्या आकाशावर असण्याचा उल्लेख आहे. बायबल मध्येहि या नावाच्या व्यक्तिमत्वाचा उल्लेख नाही. भाष्यकारांनी यांच्या विषयी जी कथने निवेदिली आहेत ती 'इस्राइलियात' पैकी आहे यास्तव आम्ही कुरआनाच्या निवेदनावरच पर्याप्त राहीले पाहिजे.

क़ुरआनातील निवेदनानुसार हज़रत इदरीसचे व्यक्तिमत्व सत्यनिष्ठ व एकनिष्ठतेच्या दृष्टीने महान व्यक्तिमत्व होते. इतिहासाने त्यांचे विस्मरण घडविले होते, परंतु क़ुरआनाने त्यांच्या उल्लेखास स्थायित्व प्रदान केले.

७८. म्हणजे त्यांचा दर्जा उच्च केला होता.

५८. हे आहेत पैगंबरांपैकी ते लोक ज्यांच्यावर अल्लाहने इनाम (देणग्या)फरमाविल्या [७९] आदमच्या संततीपैकी.[८०] त्या लोकांच्या वंशा पैकी ज्याना आम्ही नूह बरोबर (नौकेत) चढविले आणि इब्राहीमच्या वंशापासून व इस्राईलच्या वंशापासून. [८१] आणि त्या लोकांपैकी ज्यांना आम्ही मार्गदर्शन प्रदान केले व निवडले. त्यांना जेव्हा रहमानच्या आयती ऐकविल्या जात तेव्हा ते रूदन करीत सजद्यात जात .[८२]

أُولَٰٓئِكَ الَّذِينَ أَنْعَمَ اللَّهُ عَلَيْهِمْ مِنَ النَّبِيِّينَ مِنْ ذُرِّيَّةِ
آدَمَ وَمِمَّنْ حَمَلْنَا مَعَ نُوحٍ وَمِنْ ذُرِّيَّةِ إِبْرَاهِيمَ وَإِسْرَائِيلَ
وَمِمَّنْ هَدَيْنَا وَاجْتَبَيْنَا ۚ إِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِمْ آيَاتُ الرَّحْمَٰنِ خَرُّوا
سُجَّدًا وَبُكِيًّا ۩ ﴿٥٨﴾

५९. मग त्यांच्या नंतर असे उत्तराधिकारी बनले ज्यांनी नमाज़ वाया घालविली व इच्छा आकांक्षांच्या मागे लागले [८३] तेव्हा लवकरच यांना मार्ग भ्रष्टतेच्या परिणतिशी तोंड द्यावे लागले.[८४]

فَخَلَفَ مِنْ بَعْدِهِمْ خَلْفٌ أَضَاعُوا الصَّلَاةَ وَاتَّبَعُوا
الشَّهَوَاتِ ۖ فَسَوْفَ يَلْقَوْنَ غَيًّا ﴿٥٩﴾

६०. तथापि जे लोक तौबा (क्षमा-याचना ) करतील ईमान बाळगतील व सत्कर्म करतील ते जन्नत मध्ये दाखल होतील व त्यांच्याशी किंचित मात्र अन्याय होणार नाही .[८५]

إِلَّا مَنْ تَابَ وَآمَنَ وَعَمِلَ صَالِحًا فَأُولَٰٓئِكَ يَدْخُلُونَ
الْجَنَّةَ وَلَا يُظْلَمُونَ شَيْئًا ﴿٦٠﴾

६१. सदैव कालीन बागा ज्यांचे रहमानने आपल्या दासांशी अध्यारूत वचन देऊन ठेवले आहे. निश्चितच त्याचे वचन पूर्ण होऊन राहील.[८६]

جَنَّاتِ عَدْنٍ الَّتِي وَعَدَ الرَّحْمَٰنُ عِبَادَهُ بِالْغَيْبِ ۚ
إِنَّهُ كَانَ وَعْدُهُ مَأْتِيًّا ﴿٦١﴾

६२. तिथे त्यांना कोणतीहि निरर्थक गोष्ट ऐकू येणार नाही. [८७] जे काही ऐकतील शांती-सलामतीचीच गोष्ट असेल आणि सकाळ-संध्याकाळ त्यांना आपली उपजिविका लाभत राहील. [८८]

لَا يَسْمَعُونَ فِيهَا لَغْوًا إِلَّا سَلَامًا ۖ وَلَهُمْ رِزْقُهُمْ فِيهَا
بُكْرَةً وَعَشِيًّا ﴿٦٢﴾

६३. ही आहे ती जन्नत जिचा वारस आम्ही आपल्या दासांपैकी अशांना बनवू जे अल्लाहचे भय बाळगत राहीले. [८९]

تِلْكَ الْجَنَّةُ الَّتِي نُورِثُ مِنْ عِبَادِنَا مَنْ كَانَ تَقِيًّا ﴿٦٣﴾

६४. (हे पैगंबर !) आम्ही तुमच्या पालनकर्त्याच्या आदेशाखेरीज उतरत नाही [९०] जे काही आमच्या पुढे आहे व जे मागे आहे आणि जे याच्या दरम्यान आहे सर्व त्याचेच आहे आणि तुमचा पालनकर्ता विसरणारा नाही. [९१]

وَمَا نَتَنَزَّلُ إِلَّا بِأَمْرِ رَبِّكَ ۖ لَهُ مَا بَيْنَ أَيْدِينَا وَمَا خَلْفَنَا
وَمَا بَيْنَ ذَٰلِكَ ۚ وَمَا كَانَ رَبُّكَ نَسِيًّا ﴿٦٤﴾

७९.वरील आयतींवरून स्पष्ट आहे की या पैगंबरांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने कशा प्रकारचे इनामांनी उपकृत केले होते हीच ती देणगी होय जिचा उल्लेख सूरह फातेहा मध्ये अशा प्रकारे केला गेला आहे, الَّذِينَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ''ज्यांना तू इनामाने उपकृत केलेस.''

८०. म्हणजे हे सर्व पैगंबर आदमच्या संतती पैकी होते यांच्यापैकी कोणीहि ना ईश्वर होता ना ईश्वराचा पुत्र होता ना ईश्वराचा अवतार.

८१. हजरत मूसा, हारून, जकरीया, यहया व ईसा हे सर्व इस्राईल म्हणजे याकूबच्या वंशापैकी होत.

८२. येथे पैगंबरांचा हा आदर्श वर्णिला गेला आहे की जेव्हा अल्लाहच्या आयती त्यांना ऐकविल्या जात तेव्हा त्यांच्यावर अनुकंपाची कैफीयत चढत असे व ते आपोआप सजद्यात जात. अल्लाहच्या वाणीचा प्रभाव अनुकंपनीय हृदय द्रावक व नम्रता व शालीनतेचा आहे. परंतु आजच्या काळातील कारी (विशेषरित्या कुरआन पठण करणारे) सामान्यपणे केवळ स्वर माधुर्य व्यक्त करतात. त्यांची किरअत (क़ुरआन पठण) हृदय द्रावकतेपासून रिक्त असते. परिणामी ऐकणारे अल्लाहच्या वाणीने प्रभावित होण्याऐवजी कारीच्या उत्कृष्ट उच्चारणाची वाहवा करू लागतात.

ही सजद्याची आयत होय म्हणून ती पठण केल्यावर वा ऐकल्यावर सजदा केला पाहिजे.

८३. संकेत यहुदी व ख्रिश्चनांकडे आहे ज्यांनी पैगंबरांच्या आदर्शास सोडून त्यांचे केवळ श्रद्धावान बनून राहीले. बनी इस्माईल (अरबा) ची ही हीच दशा झाली. हजरत इस्माईल यांनी आपल्या संततीस नमाज़ कायम करण्याचा ताकीदपूर्ण आदेश दिला होता परंतु त्यांच्या वंशाने नमाजच्या जागी मूर्तिपूजा अंगिकारली.

नमाज़ व्यर्थ घालविणे व इच्छा अभिलाषांच्या मार्ग लागण्याचा जो एकाच वेळी उल्लेख केला गेला आहे त्यावरून हे हि स्पष्ट होते की नमाज घालविल्यानंतर शरीयतचे पालन करणे व सदाचारपूर्ण जीवन व्यतीत करणते शक्यच नसते असा मनुष्य अपरिहार्यत स्वत:च्या इच्छा अभिलाषांना बळी पडतो व त्याचे जीवन चुकीच्या मार्गाला लागते.

या आयतीत मुसलमानांकरिता फार मोठा बोध आहे. पूर्वी होऊन गेलेल्या जनसमूहांच्या (उम्मतीच्या) नमाज़ला वाया घालविण्याचे बोधदायक परिणाम समोर आल्यानंतर त्यांनी सक्तीने नमाजच्या आदेशाचे पूरेपूर पालन केले पाहीजे होते परंतु मोठ्या खेदाची बाब अशी की मुसलमानांची फार मोठी संख्या नमाज़ सोडून बसली आहे. आणि हा याचाच परिणाम होय की त्यांचे नैतिक पतन होत चालले आहे व त्यांचे जीवन इच्छा-अभिलाषांच्या अधीन झाले आहे.

८४. तात्पर्य नमाज़ सोडणे मार्गभ्रष्टता आहे.

८५. म्हणजे ज्यांनी नमाज़ सोडून इच्छा अभिलाषांचे अनुसरण केले त्यांच्यासाठी सुधारणेची संधी आहे जर ते आपल्या दुर्वतनापासून परावृत्त होतील,आपल्या अपराधांची अल्लाहजवळ माफी मागतील, क़ुरआन व त्याच्या प्रेषितावर ईमान बाळगतील व सत्कर्म करतील तर ते जन्नतला पात्र ठरतील आणि त्यांचा कोणताहि हक्क डावलला जाणार नाही.

८६. अर्थात जन्नतच्या बागा या दासांच्या दृष्टी पलीकडे आहेत असे असले तरी त्यांचे यांच्यात दाखल होणे निश्चित आहे कारण हे अल्लाहचे वचन आहे जे अवश्य पूर्ण होईल.

८७. स्पष्टीकरणाकरिता पहा सूरह गाशीया टीप क्र.१३

८८. म्हणजे जन्नत मध्ये उपजिविकेकरिता कसलाहि प्रयत्न करावा लागणार नाही,किंबहुना सदैवकाळ त्यांना आपली जिविका प्राप्त होत राहील.

८९. म्हणजे जन्नतचे हक्कदार ते लोक बनतील ज्यांनी अल्लाहचे भय बाळगून जीवन व्यतीत केले होते. उपरोक्त निवेदन क्रमावरून तकवा (ईश-भया) चा अर्थ अगदी स्पष्ट आहे. जो मनुष्य या सद्गुणांना आपल्या आचरणात आणतो तोच खरा ईश भय बाळगणारा होय.

९०. हे कसातील वाक्य होय जे 'वही' आणणाऱ्या फिरिश्त्यांच्या मुखाने अदा झाले आहे. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यास आपल्या ग्रंथात- समाविष्ट केले आहे.

'वही' (ईश-संदेश) अवतरणाचा क्रम जेव्हा काही काळाकरिता थांबत असे तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विमनस्कता जाणून लागे. कारण ज्या सहनशीलतेची परिक्षा घेणाऱ्या परिस्थितीतून पैगंबर जात होते त्यात वहीचे अवतरण त्यांच्याकरीता सांत्वन कारक ठरे. तसेच अधिक मार्गदर्शनासाठीहि ते ईश-संदेशाची मोठ्या उत्कटतेने वाट बघत त्यांच्या ह्याच प्रतिक्षेस लक्षात घेता जिब्रील व त्यांच्या साथीदार फरिश्त्यांनी आपली ही पात्रता स्पष्ट केली की आमच्या अधिकारात ही बाब नव्हे की वाटेल तेव्हा अवतरीत व्हावे. किंबहुना जेव्हा अल्लाह आम्हाला आदेश देतो तेव्हा आम्ही त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास अवतरतो.

हे मूळ विषयाशी अलग वाक्य असले तरी उपरोक्त निवेदन-क्रमाशी त्याचा संबंध आहे. वर पैगंबरांची योग्यता स्पष्ट केली गेली होती. येथे फरीश्त्यांची योग्यता स्पष्ट केली गेली आहे की सर्व त्याच्या हुकुमाचे ताबेदार आहेत.

९१. म्हणजे अल्लाह सर्व स्थळ काळाचा स्वामी आहे. वर्तमान, भूत आणि भविष्य या सर्वांचेच त्याला चांगल्या प्रकारे ज्ञान आहे. त्याच्याकडून कोणतीहि विस्मृती शक्य नाही म्हणून हे पैगंबर! जी परिस्थिती तुमच्या समोर उद्भवत आहे ती त्याच्यापासून लपलेली नाही आणि जेव्हा त्याच्या बुद्धिकौशल्याची निकड असते तेव्हा तो 'वही' अवतरीत करतो, जी घेऊन आम्ही (म्हणजे फरिश्ते) अवतरतो. येथे फरिश्त्यांचे निवेदन संपले.

६५. तो स्वामी आहे आकाशांचा व जमीनीचा आणि यांच्या दरम्यान असलेल्या वस्तूंचा तेव्हा त्याचीच उपासना करा व त्याच्याच उपासनेवर कायम रहा. काय तुमच्या माहीतीत त्याचेच नाव असलेला (त्याच्या सारखा )एखादा आहे ?[१२]

رَبُّ السَّمٰوٰتِ وَ الْاَرْضِ وَمَا بَيْنَهُمَا فَاعْبُدْهُ وَاصْطَبِرْ لِعِبَادَتِهٖ ؕ هَلْ تَعْلَمُ لَهٗ سَمِيًّا ﴿٦٥﴾

६६. आणि मनुष्य म्हणतो, काय मी जेव्हा मरण पावेन तर पुन्हा जिवंत करून काढला जाईन ?

وَيَقُوْلُ الْاِنْسَانُ ءَاِذَا مَا مِتُّ لَسَوْفَ اُخْرَجُ حَيًّا ﴿٦٦﴾

६७. काय माणसाला आठवत नाही की आम्ही या पूर्वी याला निर्माण केले आहे जेव्हा तो काहीच नव्हता.

اَوَلَا يَذْكُرُ الْاِنْسَانُ اَنَّا خَلَقْنٰهُ مِنْ قَبْلُ وَلَمْ يَكُ شَيْئًا ﴿٦٧﴾

६८. तुमच्या पालन कर्त्याची शपथ आम्ही या सर्वांना तसेच सैतानांना अवश्य एकत्रित करू. मग त्या सर्वांना जहन्नम जवळ अशा प्रकारे हजर करू की ते गुडघे टेकलेल्या स्थितीत पडले असतील. [१३]

فَوَرَبِّكَ لَنَحْشُرَنَّهُمْ وَالشَّيٰطِيْنَ ثُمَّ لَنُحْضِرَنَّهُمْ حَوْلَ جَهَنَّمَ جِثِيًّا ﴿٦٨﴾

६९. मग प्रत्येक समूहामधून अशा लोकांना वेगळे करू जे रहमान विरूद्ध फार जास्त बंडखोर बनले होते.[१४]

ثُمَّ لَنَنْزِعَنَّ مِنْ كُلِّ شِيْعَةٍ اَيُّهُمْ اَشَدُّ عَلَى الرَّحْمٰنِ عِتِيًّا ﴿٦٩﴾

७०. मग आम्ही त्या लोकांना चांगल्या प्रकारे जाणतो जे जहन्नम मध्ये जाण्यास अधिक पात्र आहेत.

ثُمَّ لَنَحْنُ اَعْلَمُ بِالَّذِيْنَ هُمْ اَوْلٰى بِهَا صِلِيًّا ﴿٧٠﴾

७१. आणि तुमच्या पैकी असा कोणी नाही जो यावर आलेला नसेल. ही निर्धारीत गोष्ट आहे जी तुमच्या पालनकर्त्यावर आवश्यक आहे.[१५]

وَاِنْ مِّنْكُمْ اِلَّا وَارِدُهَا ۚ كَانَ عَلٰى رَبِّكَ حَتْمًا مَّقْضِيًّا ﴿٧١﴾

७२. मग [१६] आम्ही त्या लोकांना वाचवू ज्यांनी ईश-भयाचा अंगिकार केला होता [१७]आणि अत्याचारींना त्यातच गुडघा टेकून व पडलेल्या स्थितीत सोडून देऊ. [१८]

ثُمَّ نُنَجِّى الَّذِيْنَ اتَّقَوْا وَّنَذَرُ الظّٰلِمِيْنَ فِيْهَا جِثِيًّا ﴿٧٢﴾

९२. म्हणजे अल्लाहला कोणतीहि उपमा नाही तो आपल्या स्वत:विषयी अद्वितीय आहे. आणि गुणवैशिष्ट्यांमध्येहि एकटा आहे. म्हणून त्याचे नाव अल्लाह यासाठीच खास आहे. त्या सदृश्य अन्य नाव त्याला नाही. मग उपासनेस पात्र त्याच्या खेरीज आणखी कोण असू शकतो?

९३. म्हणजे अतिशय अपमानाच्या स्थितीत.

९४. हे त्यांचे प्रमुख, सरदार व नेता असतील जे जगात फार जास्त बंडखोर बनले होते आणि आपल्या जन-समूहास मार्गभ्रष्ट करीत राहीले.

९५. उपरोक्त आयतीत त्या लोकांचा उल्लेख केला गेला आहे जे माणसाला दुसऱ्यांदा निर्माण केल्या जाण्याचा इन्कार करीत होते. यांच्याविषयी आयत क्र. ६८ मध्ये फार्माविले गेले आहे की या सर्वांना आम्ही जहन्नम जवळ अशा स्थितीत एकत्रित करू की ते गुडघे टेकून पडलेले असतील. येथे या इन्कार करणाऱ्यांना सरळ संबोधून फर्माविले गेले आहे की लक्षात ठेवा. तुमच्या पैकी कोणाचीहि सुटका नाही प्रत्येक काफीराला जहन्नम प्रत पोहचणे अनिवार्य असेल.

मग पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सांत्वना देत फर्माविले गेले की तुमच्या पालन कर्त्याचा हा अटळ फैसला आहे की काफीराने जहन्नमची शिक्षा भोगावी, यास्तव हा फैसला कयामतीच्या दिवशी लागू झाल्याखेरीज राहणार नाही. येथे काही गोष्टींचे स्पष्टीकरण आवश्यक वाटते यासाठी की या आयतीचा खरा अर्थ स्पष्ट व्हावा.

(१) आयतीचा पहिला तुकडा 'तुमच्या पैकी कोणी नाही जो यावर आलेला नसेल' हे काफिरांना संबोधून आहे आणि दुसरा तुकडा,'ही एक निर्धारीत गोष्ट होय' ज़ी तुमच्या पालनकर्त्यावर बंधनकारक आहे' हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून आहे. एकाच आयतीत संबोधनाचे हे परिवर्तन अलंकारीक भाषेच्या निकडीनुसार आहे. कुरआनात हीच शैली दुसऱ्या ठिकाणीहि अंगिकारली गेली आहे. यास्तव सूरह अनआम आयत क्र. १२८ मध्ये फर्माविले गेले आहे-

قَالَ النَّارُ مثوٰ كُمْ خَالِدِيْنَ فِيْهَا اِلَّا مَا شَآءَاللّٰهُ ـ

اِنَّ رَبَّکَ حَكِيْمٌ عَلِيْمٌ ـ

'सांगितले जाईल, तुमचे ठिकाण आग आहे ज्यात तुम्ही सदैव रहाल, परंतु जे अल्लाह इच्छिल (हे पैगंबर) नि:संशय तुमचा पालनकर्ता बुद्धि कौशल्य बाळगणारा व ज्ञानी आहे'

या आयतीत देखील पहिल्या वाक्यात इन्कार करणाऱ्यांना संबोधिले आहे. दुसऱ्या वाक्यात اِنَّ رَبَّکَ 'तुमचा पालनकर्ता ......... पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधिले आहे.

(२) मूळ ग्रंथात 'वारीद' हा शब्द प्रयोग केला गेला आहे अरबी भाषेत हा शब्द 'पोहचणे' या अर्थानेहि वापरला जातो व 'दाखल होणे' या अर्थानेहि 'सिहाह जोहरी' मधील उल्लेखानुसार-

ورد فلان ورودا حضر

'अमूक 'वारीद' झाला म्हणजे हजर झाला' (अस-सिहा लिल-जौहरी खंड २ पृ. ५४९)

'लिसानुल अरब' या आरबी शब्दकोशानुसार-

ورد عليه: اشرف عليه،دخله اولم يدخلهٗ

'त्यावर वारीद झाला म्हणजे त्याच्यावर पोहचला मग तो त्यात दाखल झालेला असो वा नसो' (लिसानुल अरब खंड ३ पृ. ४५७)

आणि कुरआनातहि हा शब्द दोन्ही अर्थांनी वापरला गेला आहे. पहिल्या अर्थाचे उदाहरण सूरह कससची आयत क्र.२३ होय-

وَلَمَّا وَرَدَ مَآءَ مَدْيَنَ

'जेव्हा तो मदयनच्या पाण्यावर पोहचला (वारीद झाला) उघड यात वारीदचा अर्थ पोहचणे असा आहे, पाण्यात दाखल होणे असा नव्हे.

आणि दुसऱ्या अर्थाचे उदाहरण सूरह अंबियाची आयत क्र. ९९ होय-

لَوْ كَانَ هٰٓؤُلَآءِ اٰلِهَةً مَّا وَرَدُوْهَا ـ

'जर ह्या (मुर्ति) ईश्वर असत्या तर जहन्नम मध्ये वारीद (दाखल) झाले नसते.'

या आयतीत वारीद हा शब्द दाखल होणे या अर्थाने वापरला गेला आहे त्यामुळे भाष्याकारांच्या एका गटाने आयतीचे स्पष्टीकरण असे केले आहे की हे सर्वसामान्य माणसांना संबोधून आहे व असे फर्माविले गेले आहे की प्रत्येक मनुष्यात मग तो काफिर असो वा ईश-भय बाळगणारा मोमीन जहन्नमवर हजर होणे आवश्यक असेल. काफिरांची हजेरी तर त्यात दाखल होण्यासाठी असेल परंतु ईश-भय बाळगणाऱ्यांची हजेरी केवळ जवळून जाण्यापुरती असेल आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना यापासून मुक्ति देईल. परंतु हे स्पष्टीकरण क़ुरआनाच्या इतर आयतींशी सुसंगत नाही. उदाहरणार्थ एका ठिकाणी फर्माविले गेले आहे.

اِنَّ الَّذِيْنَ سَبَقَتْ لَهُمْ مِنَّا الْحُسْنٰى اُولٰئِکَ عَنْهَا مُبْعَدُوْنَ ـ لَا يَسْمَعُوْنَ حَسِيْسَهَا وَهُمْ فِىْ مَا اشْتَهَتْ اَنْفُسُهُمْ خَالِدُوْنَ ـ (سورۂ انبياء : ١٠١ـ١٠٢)

'ज्यांच्याकरिता आमच्या तर्फे आधीच भलाईचा निर्णय झाला आहे. ते यापासून दूर ठेवले जातील. ते याची चाहूलहि ऐकणार नाहीत आणि आपल्या मनपसंत गोष्टीमध्ये सदैव राहतील'

لَا يَحْزُنُهُمُ الْفَزَعُ الْأَكْبَرُ وَتَتَلَقّٰىهُمُ الْمَلٰٓئِكَةُ هٰذَا يَوْمُكُمُ الَّذِىْ كُنْتُمْ تُوْعَدُوْنَ۔ (انبیاء:١٠٣)

"त्यांना कयामतीचा कसलाहि त्रास उद्‌भवणार नाही: (त्या दिवसाची) मोठी घाबरणूक त्यांना त्रस्त करणार नाही आणि फिरिश्ते त्यांचे स्वागत करतील की हाच तो दिवस ज्याचे तुम्हाला वचन दिले जात होते." (अंबिया : १०३)

يَوْمَ نَحْشُرُ الْمُتَّقِيْنَ اِلَى الرَّحْمٰنِ وَفْدًا۔ (مریم: ٨٥)

'ज्या दिवशी आम्ही ईश-भय बाळगणाऱ्यांना रहमान समोर अतिथी प्रमाणे एकत्रित करू." (मरयम : ८५)

(३) पवित्र क़ुरआनात अनेक ठिकाणी हे सांगितले गेले आहे की सैतानाचे अनुसरण करणाऱ्या मनुष्य व जिन्नांनी जहन्नमला भरेन. म्हणून येथे जे फर्मावले गेले आहे की ही एक निर्धारीत गोष्ट आहे जी पूर्ण करणे तुमच्या पालनकर्त्यासाठी आवश्यक आहे तर याशी अभिप्रेत तोच निर्णय होय जो सर्वश्रेष्ठ अल्लाहने काफिरांना जहन्नम भरण्या संदर्भात केला आहे.

९६. 'सुम्म' (मग) हा शब्द अरबी भाषेत नंतरच्या अर्थानेच येत नाही तर 'आणखी' या अर्थानेहि येतो (पहा अन-नृवुल वाफी खं. ३ पृ. ५७८ ) उदाहरण दाखल वर आयत क्र. ७० मध्ये फर्मावले गेले आहे.

ثُمَّ لَنَحْنُ اَعْلَمُ بِالَّذِيْنَ هُمْ اَوْلٰى بِهَا صِلِيًّا

'मग अम्ही त्या लोकांना चांगल्या प्रकारे जाणतो जे जहन्नम मध्ये जाण्यास अधिक पात्र आहेत'

उघड आहे या आयती मध्ये 'सुम्म'चा अर्थ आहे आणखी किंवा हे हि अशा प्रकारे भाष्यांतर्गत आयतीत 'सुम्म' हा शब्द काल रचनेस नव्हे तर सूचना क्रमास जाहीर करतो. अर्थात हे की जेथे आम्ही काफिरांना जहन्नम प्रत पोहचू तेथे ईश-भय बाळगणाऱ्यांना आम्ही त्याच्यापासून वाचवू.

९७. 'मुक्ति देऊ' याचा अर्थ असा नव्हे की ईश-भय बाळगणाऱ्यांना प्रथम जहन्नमवर पोहचवू आणि मग या आपत्तितून त्यांची सुटका करू किंबहुना अर्थ असा की त्यांना अशा प्रकारे वाचवू की जहन्नमची शिक्षा यातना व त्याच्या त्रासापासून ते अगदी सुरक्षित राहतील मुक्तिचा हा अर्थ सूरह हूदची आयत क्र. ५८ द्वारे स्पष्ट आहे ज्यात फर्मावला गेले आहे की-

وَنَجَّيْنَاهُمْ مِنْ عَذَابٍ غَلِيْظٍ۔

'आम्ही त्यांना सक्त शिक्षा-यातनेपासून मुक्ति दिली'

उघड आहे या ठिकाणी मुक्ती देण्याचा अर्थ असा नव्हे की जी शिक्षा हूद जन समूहावर अवतरली होती, त्यात ईमान बाळगणारे देखील सापडले होते आणि मग त्यापासून त्यांना मुक्ति दिली, किंबहुना अर्थ असा की ही शिक्षा येण्यापूर्वीच ईमान बाळगणाऱ्यांना तेथून सुरक्षित ठिकाणी स्थानांतरीत केले गेले व शिक्षेपासून वाचवले गेले.

९८. म्हणजे अत्याचारींकरीता (अनेकेश्वरवादी व काफिरांकरिता) मुक्तिचा कोणताहि मार्ग नसेल, त्यांना ज्या प्रकारे गुडघे टेकलेल्या अपमानजनक स्थितीत जहन्नममध्ये फेकले गेले होते त्याच स्थितीत त्यांना सदैव कालीन शिक्षा-यातना भोगण्याकरिता सोडले जाईल.

तुम्ही त्या माणसाला पहिले ज्याने आमच्या आयतींचा इन्कार केला व म्हणतो की मी निश्चित सम्पत्ति व संततीने उपकृत केला जाईल. काय त्याने अपरोक्षात डोकावून पाहिले आहे किंवा रहमानकडून एखादे वचन घेऊन ठेवले आहे. (अल-क़ुर्आन)

وَإِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِمْ اٰيٰتُنَا بَيِّنٰتٍ قَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْا لِلَّذِيْنَ
اٰمَنُوْٓا اَيُّ الْفَرِيْقَيْنِ خَيْرٌ مَّقَامًا وَّاَحْسَنُ نَدِيًّا ﴿٧٣﴾

७३. आणि जेव्हा आमच्या उज्वल आयती या लोकांना ऐकविल्या जातात तेव्हा कुफ्र करणारे ईमान बाळगणाऱ्यांना म्हणतात की आम्हा दोघाजणांपैकी असा कोण आहे जो अधिक चांगले स्थान बाळगतो व अधिक चांगली सभा.

وَكَمْ اَهْلَكْنَا قَبْلَهُمْ مِّنْ قَرْنٍ هُمْ اَحْسَنُ اَثَاثًا وَّرِءْيًا ﴿٧٤﴾

७४. वस्तुतः आम्ही यापूर्वी किती तरी जन-समूहांना नष्ट केले आहे जे केवढे जास्त साधन-सामुग्री बाळगत होते आणि थाटामाटात किती वरचढ होते.[९९]

قُلْ مَنْ كَانَ فِي الضَّلٰلَةِ فَلْيَمْدُدْ لَهُ الرَّحْمٰنُ مَدًّا ۚ حَتّٰٓى
اِذَا رَاَوْا مَا يُوْعَدُوْنَ اِمَّا الْعَذَابَ وَاِمَّا السَّاعَةَ ؕ فَسَيَعْلَمُوْنَ
مَنْ هُوَ شَرٌّ مَّكَانًا وَّاَضْعَفُ جُنْدًا ﴿٧٥﴾

७५. जे लोक मार्गभ्रष्टतेत पडतात, रहमान त्यांना सैल सोडत जातो.[१००] येथपावेतो की जेव्हा ते त्या गोष्टीस पाहतील ज्याचे त्यांना वचन दिले जात आहे मग ती ईश-शिक्षा असो[१०१] वा कयामतीची वेळ, त्यावेळी त्यांना कळून येईल की कोणाचे स्थान निकृष्ट व कोणाचा जथा अत्यंत दुर्बल आहे.

وَيَزِيْدُ اللّٰهُ الَّذِيْنَ اهْتَدَوْا هُدًى ؕ وَالْبٰقِيٰتُ الصّٰلِحٰتُ
خَيْرٌ عِنْدَ رَبِّكَ ثَوَابًا وَّخَيْرٌ مَّرَدًّا ﴿٧٦﴾

७६. आणि जे लोक सन्मार्ग अंगिकारतात, अल्लाह त्यांच्या मार्गदर्शनात वृद्धि फर्मावितो.[१०२] आणि बाकी राहणारी सत्कर्मे तुमच्या पालनकर्त्याजवळ मोबदल्याच्या दृष्टीनेहि उत्तम आहेत व परिणतिच्या दृष्टीनेहि.[१०३]

اَفَرَءَيْتَ الَّذِيْ كَفَرَ بِاٰيٰتِنَا وَقَالَ لَاُوْتَيَنَّ
مَالًا وَّوَلَدًا ﴿٧٧﴾

७७. तुम्ही त्या माणसाला पहिले ज्याने आमच्या आयतींचा इन्कार केला व म्हणतो की मी निश्चितच सम्पत्ति व संततीने उपकृत केला जाईल.[१०४]

اَطَّلَعَ الْغَيْبَ اَمِ اتَّخَذَ عِنْدَ الرَّحْمٰنِ عَهْدًا ﴿٧٨﴾

७८. काय त्याने अपरोक्षात डोकावून पाहिले आहे किंवा रहमानकडून एखादे वचन घेऊन ठेवले आहे.[१०५]

كَلَّا ؕ سَنَكْتُبُ مَا يَقُوْلُ وَنَمُدُّ لَهُ مِنَ الْعَذَابِ مَدًّا ﴿٧٩﴾

७९. मुळीच नाही. तो जे काही म्हणतो ते आम्ही लिहून घेऊ व त्याच्या शिक्षा-यातनेत अधिक वाढ करू.

९९. गरीब मुसलमानांच्या तुलनेने सत्य विरोधकांना जे ऐहीक वैभव प्राप्त होते व त्यांच्या सभेत जो झगमगाट होत असे त्याविषयी त्यांना केवळ अभिमान नव्हता तर ते या भ्रमात होते की ते अल्लाहच्या नजरेत प्रिय आहेत अन्यथा त्यांना हे वैभव प्राप्त झाले नसते.

त्यांच्या या विचारास चुकीचा ठरवित येथे फर्माविले गेले आहे की या पूर्वी आम्ही किती तरी जन-समूहांना नष्ट केले आहे जे याहून अधिक जास्त साधन सामुग्री व वैभव बाळगत होते यांचा विनाश या गोष्टीचे प्रमाण होय की एखाद्या जन समूहास ऐहीक वैभव प्राप्त होणे त्याच्या ईश्वराच्या नजरेत प्रिय असण्याचे प्रमाण नव्हे. जर तो कुफ्रचा मार्ग अंगिकारतो तर तो अल्लाहच्या शिक्षा यातनेपासून वाचू शकणार नाही.

१००. म्हणजे ईश्वराच्या कृपेची ही निकड आहे की बिघडलेला लोकांना तोल सावरण्याची संधी द्यावी, म्हणून तो मार्गभ्रष्टतेत गुरफटलेल्या लोकांना त्वरीत पकडत नाही किंबहुना ढील देतो.

१०१. अभिप्रेत ऐहीक शिक्षा-यातना.

१०२. म्हणजे मार्गदर्शन अंगिकारणाऱ्यांवर अधिक मार्गदर्शनाचे द्वार उघडतात. त्यांना सत्कर्म करण्याची अधिक सुबुद्धि लाभते आणि ते सन्मार्गावर पुढेच जात राहतात.

१०३. स्पष्टीकरणाकरिता पहा सूरह कहफ टीप क्र. ६५

१०४. अभिप्रेत एखादा विशिष्ट मनुष्य नव्हे किंबहुना असा प्रत्येक मनुष्य जो आखिरतचा इन्कार करणारा असावा व त्याच बरोबर हा दावा करीत असावा की जर आखिरत घडून आल्यास तिथेहि त्याला याच प्रकारे धन व संततीची देणगी लाभेल जशी जगात लाभली आहे. इहलोकाचे पुजारी नेहमी भव्य भविष्याची स्वप्ने पाहात राहतात.

१०५ म्हणजे त्याचा हा विचार व हा दावा कोणत्या आधारावर आहे कि त्याने अपरोक्षात डोकावून पाहिले आहे की आखिरतमध्ये आपल्यासाठी मांगल्यच मांगल्य आहे किंवा ईश्वराने त्याला हे वचन देऊन ठेवले आहे की तो त्याला नेहमी धन-संततीने उपकृत करीत राहील? जर दोन्ही गोष्टी पैकी एक ही खरी नाही तर उज्वल भविष्याची काय हमी?

८०. ज्या गोष्टीचा तो दावा करतो त्याचे वारस आम्ही असू आणि तो आमच्या समोर एकट्याने हजर होईल. [१०६]

وَنَرِثُهُۥ مَا يَقُولُ وَيَأْتِينَا فَرْدًا ﴿٨٠﴾

८१. या लोकांनी अल्लाह शिवाय इतर उपास्ये बनवून ठेवली आहेत यासाठी की त्यांचे सहाय्यक व्हावेत.

وَٱتَّخَذُوا۟ مِن دُونِ ٱللَّهِ ءَالِهَةً لِّيَكُونُوا۟ لَهُمْ عِزًّا ﴿٨١﴾

८२. मुळीच नाही. ते कयामतीच्या दिवशी यांच्या भक्तिचा इन्कार करतील व त्यांच्या विरूध्द होतील. [१०७]

كَلَّا ۚ سَيَكْفُرُونَ بِعِبَادَتِهِمْ وَيَكُونُونَ عَلَيْهِمْ ضِدًّا ﴿٨٢﴾

८३. काय तुम्ही पाहत नाही की आम्ही काफिरांवर सैतानांना सोडून दिले आहे जे त्यांना खूप भडकवित राहतात. [१०८]

أَلَمْ تَرَ أَنَّآ أَرْسَلْنَا ٱلشَّيَٰطِينَ عَلَى ٱلْكَٰفِرِينَ تَؤُزُّهُمْ أَزًّا ﴿٨٣﴾

८४. तेव्हा त्यांच्या विरूध्द (निर्णयाकरिता) तुम्ही घाई करू नका आम्ही त्यांचे दिवस मोजत आहोत. [१०९]

فَلَا تَعْجَلْ عَلَيْهِمْ ۖ إِنَّمَا نَعُدُّ لَهُمْ عَدًّا ﴿٨٤﴾

८५. ज्या दिवशी आम्ही ईश-भय बाळगणाऱ्यांना रहमान समोर शाही अतिथी प्रमाणे एकत्रित करू. [११०]

يَوْمَ نَحْشُرُ ٱلْمُتَّقِينَ إِلَى ٱلرَّحْمَٰنِ وَفْدًا ﴿٨٥﴾

८६. आणि अपराध्यांना जहन्मकडे तहानलेल्या जनावरां-प्रमाणे हाकलून नेऊ.

وَنَسُوقُ ٱلْمُجْرِمِينَ إِلَىٰ جَهَنَّمَ وِرْدًا ﴿٨٦﴾

८७. (त्या दिवशी) कोणालाहि शिफारसीचा अधिकार नसेल. तोच शिफारस करू शकेल ज्याने रहमानच्या हुजुरात फर्मान प्राप्त केले असेल. [१११]

لَّا يَمْلِكُونَ ٱلشَّفَٰعَةَ إِلَّا مَنِ ٱتَّخَذَ
عِندَ ٱلرَّحْمَٰنِ عَهْدًا ﴿٨٧﴾

८८. हे म्हणतात रहमानने पुत्र बनवून ठेवला आहे. [११२]

وَقَالُوا۟ ٱتَّخَذَ ٱلرَّحْمَٰنُ وَلَدًا ﴿٨٨﴾

८९. मोठी सक्त गोष्ट आहे जी तुम्ही रचली.

لَّقَدْ جِئْتُمْ شَيْـًٔا إِدًّا ﴿٨٩﴾

९०. जवळ आहे की आकाश विदीर्ण व्हावे, जमीन दुभंगून जावी व पर्वत धराशायी व्हावेत.

تَكَادُ ٱلسَّمَٰوَٰتُ يَتَفَطَّرْنَ مِنْهُ وَتَنشَقُّ ٱلْأَرْضُ وَتَخِرُّ ٱلْجِبَالُ
هَدًّا ﴿٩٠﴾

१०६. म्हणजे धन-संतती ज्या देणग्या त्याला या तात्पुरत्या जीवनात दिल्या गेल्या आणि ज्यांच्या विषयी तो दाव्यासह म्हणतो की या गोष्टी भावी काळातहि त्याला लाभतील, त्या शेवटी अल्लाहच्याच मालकीच्या होणार आहेत आणि कियामतीच्या दिवशी त्याला एकट्याने अल्लाह समोर हजर व्हावे लागेल.

१०७. म्हणजे या लोकांनी अल्लाह शिवाय इतर उपास्ये अशासाठी बनवून ठेवले आहेत की त्यांनी यांच्या भक्तिने खुष होऊन त्यांची मदत करावी, संकटे टाळावी प्रत्येक प्रकारच्या आपत्तिपासून मुक्ति द्यावी परंतु हे सर्व त्यांचे चुकीचे विचार व खोट्या श्रद्धा आहेत ते आज आपल्या श्रद्धेविरूद्ध काहीहि ऐकायला तयार नाहीत परंतु कयामतीच्या दिवशी ते पाहतील की त्यांची उपास्ये त्यांचे विरोधक बनले आहेत. ते म्हणतील की आम्हाला नाही ठाऊक की तुम्ही आमची भक्ति करीत होता आणि आम्ही तुम्हाला केव्हा सांगितले की आमची भक्ति करा तसेच हशरच्या मैदानात ते यांच्या मदतीला धावून जाण्याचे तर राहीले उलट यांचे विरोधक बनतील.

१०८. जे लोक कुफ्र करतात त्यांच्यावर सैतान बसविले जातात, जे त्यांना ईमान बाळगणाऱ्यां विरूद्ध खूप भडकवितात अशा प्रकारे हे काफिर सत्य आवाहनाचे विरोधक आणि ईमान बाळगणाऱ्यांचे वैरी बनून उभे राहतात मग ही जमीन सत्य व असत्याचे युद्ध क्षेत्र बनते.

१०९. म्हणजे तुम्ही सहनशीलता पूर्वक आमच्या निर्णयाची वाट बघा. त्यांच्याकरिता आम्ही जी सवड निश्चित केली आहे ती पूर्ण होणांरच. आम्ही तिचा एकेक क्षण मोजत आहोत ईश-शिक्षा यांच्यावर ना एक क्षण आधी येईल ना एक क्षण नंतर.

११०. 'रहमान समोर' म्हणण्यात अल्लाहच्या कृपेचे वैभव व्यक्त होते. अर्थात हे की कियामतीच्या दिवशी आम्ही ईश-भय बाळगणाऱ्यांना आपल्या समोर अशा सन्मानाने एकत्रित करू की हे अतिशय प्रतिष्ठीत पाहुणे होत, जी सृष्टीच्या सर्व सत्ताधिकारीशी भेट घ्यावयास आले आहेत. मग आम्ही त्यांना आपल्या कृपेने व आपल्या मेहरबानींनी उपकृत करू.

१११. म्हणजे ज्यांना यांनी उपास्य बनवून ठेवले आहे ते कयामतीच्या दिवशी ईश्वरासमोर यांच्या हक्कात कसलीहि शिफारस करू शकणार नाहीत. सूरह जुखरफ मध्ये ही गोष्ट अधिक स्पष्टीकरणासह निवेदिली गेली आहे-

وَلَا يَمْلِكُ الَّذِيْنَ يَدْعُوْنَ مِنْ دُوْنِهِ الشَّفَاعَةَ اِلَّا مَنْ شَهِدَ بِالْحَقِّ وَهُمْ يَعْلَمُوْنَ۔ (سورۂ زخرف:۸۶)

''अल्लाहला सोडून ज्यांना हे पुकारतात ते शिफारसीचा काहीहि अधिकार बाळगत नाही.परंतु सत्याची साक्ष देतील आणि ते जाणत असतील.

(सूरह जुखरुफ : ८६)

शिफारस करणे केवळ त्यांनाच शक्य होईल ज्यांनी रहमान (अल्लाह) कडून फर्मान प्राप्त केलेले असेल. अर्थात हा सन्मान अशाच लोकांना लाभेल जे सत्याची साक्ष देणारे असतील व जाणत असतील की कोण या गोष्टीस पात्र आहे की त्यांच्या हक्कात शिफारस केली जावी. यांच्यात पैगंबरांचा समूह पुढे असेल.

शिफारसीच्या या कठीण शर्ति लक्षात घेता अनेकेश्वरवादी व काफीरांकरिता कोणीहि शिफारस करणार नाही. राहिलेत ते गुन्हेगार जे ईमान बाळगणाऱ्यांपैकी असतील तर त्यांच्या पैकी ज्यांच्या हक्कात सर्वश्रेष्ठ अल्लाह अनुज्ञा देईल त्यांच्याच करिता शिफारस केली जाऊ शकेल.

क़ुरआनाच्या निवेदनाने स्पष्ट होते की शिफारस एक अपवादात्मक स्थिती असेल जे अल्लाहच्या क्षमादानाचे एक स्वरूप आहे. अन्यथा मुक्तिकरिता खरा नियम म्हणजे ईमान आधारे व्यतित केलेले सदाचार युक्त जीवन होय.

आज मुसलमानांची मोठी संख्या शिफारसीवर भरवसा ठेवून आहे. त्यांचे जीवन अगदी 'फासिकाना'(दुराचाराचे) आहे परंतु ते समजतात की ज्या अर्थी आम्ही हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या उम्मतींत जन्माला आलो आहोत तेव्हा आमचा बेडा पार आहे ते या गोड भ्रमात या कारणास्तव आहेत की त्यांनी क़ुरआनाच्या त्या आयतींकडे डोळे उघडून पाहिले नाही ज्यांच्यात शिक्षा व मोबदल्याचा निर्भिड कायदा निवेदिला गेला आहे.

उदाहरणार्थ

بَلٰى مَنْ كَسَبَ سَيِّئَةً وَّ اَحَاطَتْ بِهٖ خَطِيْٓئَتُهٗ فَاُولٰٓئِكَ اَصْحٰبُ النَّارِ هُمْ فِيْهَا خٰلِدُوْنَ۔ (سورۂ بقرہ : ۸۱)

'का नाही? ज्याने देखील वाईटपणा कमविला व त्याच्या अपराधांनी त्याला वेढून घेतले तर असेच लोक 'दोजख' (जहन्नम) वाले आहेत ते सदैव काळ त्यात राहतील.'(सूरह बकरा: ८१)

आणि यहुद्यांबद्दल म्हटले गेले आहे की ते आखिरत ऐवजी इहलोकाचे लाभ गोळा करू लागले होते आणि म्हणत سَيُغْفَرُلَنَا ''सयुग़फ़रूलना'' की आम्हाला माफ केले जाईल.

११२. ह्या सूरहच्या समारोपाच्या आयती होत. म्हणून निवेदनाचा रोख पुनश्च त्या मार्गभ्रष्टतेच्या खंडनाकडे वळला आहे ज्यात ख्रिश्चन ग्रस्त होते. त्यांचा हा दावा की हजरत मसीह (येशू) अल्लाहचे पुत्र होत. एक अशी पथ भ्रष्टता होती की जिने

त्यांना एकेश्वरवादाच्या मार्गापासून दूर करून शिर्क (अनेकेश्वरवादा) च्या खाईत लोटले होते आणि बायबल मधल्या फेर बदलामुळे तर या पथभ्रष्टतेने दृढ श्रद्धेची जागा घेतली होती. उदाहरणार्थ मार्ककृत शुभवर्तमानाचा इंजील (Gospel) चा आरंभ पुढील शब्दात झाला आहे.

‘(देवाचा पुत्र) येशू ख्रिस्त ह्याच्या विषयीच्या शुभवर्तमानाचा प्रारंभ.’(मार्क १: १)

यात मोठ्या धारीष्ट्याने हजरत मसीहना ईश-पुत्र म्हटले गेले आहे. वास्तविक ही गोष्ट त्या इंजील मध्ये नव्हती जे हज़रत मसीह (येशू) यांच्यावर अवतरीत झाले. ‘ईश-पुत्र’ या शब्दाची वाढ नंतर करण्यात आली. आणि ही गोष्ट बायबलचा भाष्यकारहि मान्य करतो की बायबलच्या काही प्राचीन प्रतीमध्ये ईश-पुत्र हे शब्द नाहीत.

> ' Some ancient manuscript have the descriptive phase the son of God at The end and others do not have it' (Interpreter's One Volume Commentary on the Bible U.S.A.P. 645)

प्रशन हा उद्भवतो की विद्यमान बायबल जर ईश-वाणी आहे तर त्याच्या काही प्राचीन प्रतींमधून ‘ईश-पुत्र’ हे शब्द नाहीसे कसे झालेत? काय हा या गोष्टीचा पुरावा नव्हे की मूळ इंजील मध्ये हजरत मसीह यांना ईश-पुत्र म्हटलेच गेले नव्हते. तरी हि मार्क कृत बायबलच्या प्रस्तावनेच्या विधानात हज़रत मसीह यांचा वंश ईश्वराशी जोडला गेला आहे. जणू ईश्वराने स्वत: त्यांना जन्म दिला होता. (अल्लाह असल्या गोष्टीपासून रक्षण करो). परंतु लूक कृत बायबलच्या निवेदनानुसार जेव्हा हजरत मसीह (येशू) यांनी बाप्तिस्मा (एक विशेष प्रकारचे स्नान) घेतले त्यावेळी त्यांना पुत्र होण्याचा सन्मान दिला गेला.

> ‘सर्व लोकांनी बाप्तिसमा घेतला व येशूहि बाप्तिस्मा घेऊन प्रार्थना करीत असतां असे झाले की, आकाश उघडले गेले, पवित्र आत्मा देह रूपाने कबुतराप्रमाणे त्याच्यावर उतरला आणि अकाशांतून अशी वाणी झाली की तू माझा प्रिय पुत्र आहेस, तुझ्या विषयी मी संतुष्ट आहे. (लूक ३:२१-२२)

लूकच्या ह्या निवेदनाद्वारे हे स्पष्ट होते की हजरत मसीह यांना ईश-पुत्र असण्याची उपाधि दिली गेली होती. दुसऱ्या शब्दात ते दत्तक पुत्र होते उलट मार्कचे निवेदन त्यांना वांशिक-पुत्र या नात्याने सादर करते बायबल मधील हि परस्पर विरूद्ध निवेदने या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की पुत्र असण्याची गोष्ट मनाने रचलेली गोष्ट होय. जिचा बायबलमध्ये अंतर्भाव करून ईशवराशी जबरदस्त असत्य जोडले गेले आहे. अर्थात सत्य तेच जे कुरआन सांगते की हज़रत मसीना न खऱ्या अर्थाने ईश्वराचे पुत्र होते, ना लाक्षणिक अर्थाने, म्हणजे ना ईश्वराने त्यांना जन्म दिला होता ना त्यांना दत्तक घेतले होते किंबहुना ते ईश्वराचे दास होते.

या गोष्टीमुळे की हे रहमान करीता पुत्र असण्याचा दावा करीत आहेत. रहमानची हि शान नव्हे की (एकाद्यास) पुत्र बनवावे. आकाशांमध्ये व जमीनीवर जे काही आहे, सर्व त्याच्या समोर दास या नात्याने हजर होणार आहेत.(अल-क़ुर्आन)

९१. या गोष्टीमुळे की हे रहमान करीता पुत्र असण्याचा दावा करीत आहेत.[११३]

أَن دَعَوْا لِلرَّحْمَٰنِ وَلَدًا ﴿٩١﴾

९२. रहमानची हि शान नव्हे की (एकाद्यास) पुत्र बनवावे.

وَمَا يَنبَغِي لِلرَّحْمَٰنِ أَن يَتَّخِذَ وَلَدًا ﴿٩٢﴾

९३. आकाशांमध्ये व जमीनीवर जे काही आहे, सर्व त्याच्या समोर दास या नात्याने हजर होणार आहेत. [११४]

إِن كُلُّ مَن فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ إِلَّا آتِي الرَّحْمَٰنِ عَبْدًا ﴿٩٣﴾

९४. सर्वांना त्याने वेढून ठेवले आहे व प्रत्येकाची गणना करून ठेवली आहे.[११५]

لَّقَدْ أَحْصَاهُمْ وَعَدَّهُمْ عَدًّا ﴿٩٤﴾

९५. आणि सर्व कियामतीच्या दिवशी एकट्याने हजर होतील.

وَكُلُّهُمْ آتِيهِ يَوْمَ الْقِيَامَةِ فَرْدًا ﴿٩٥﴾

९६. ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्मे केली, त्यांच्या करीता रहमान प्रेम निर्माण करील.[११६]

إِنَّ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ سَيَجْعَلُ لَهُمُ الرَّحْمَٰنُ وُدًّا ﴿٩٦﴾

९७. आम्ही या (ग्रंथा) स तुमच्या भाषेत अशासाठी सोपे बनविले आहे की तुम्ही ईश-भय बाळगणाऱ्यांना शुभ समाचार द्यावा व भांडखोर लोकांना खबरदार करावे.[११७]

فَإِنَّمَا يَسَّرْنَاهُ بِلِسَانِكَ لِتُبَشِّرَ بِهِ الْمُتَّقِينَ وَتُنذِرَ بِهِ قَوْمًا لُّدًّا ﴿٩٧﴾

९८. यांच्या पूर्वी आम्ही किती तरी जन-समूहांचा नाश करून टाकला काय तुम्हाला त्यांच्यापैकी एखादा अस्तित्वात असलेला आढळतो किंवा त्यांची भनक तरी ऐकू येते?[११८]

وَكَمْ أَهْلَكْنَا قَبْلَهُم مِّن قَرْنٍ هَلْ تُحِسُّ مِنْهُم مِّنْ أَحَدٍ أَوْ تَسْمَعُ لَهُمْ رِكْزًا ﴿٩٨﴾

११३. म्हणजे अल्लाहशी पुत्रत्वाचा संबंध जोडण्यास तुम्ही साधारण गोष्ट समजतात, वस्तुत: ही एवढी गंभीर गोष्ट आहे की याबद्दल अल्लाहचा प्रकोप कोसळून पडल्यास नवल नाही. हे अल्लाहकडे व्यंग दर्शविण्याखेरीज त्याचा अपमान देखील आहे, व त्याच्या प्रतिष्ठेस आव्हानहि ! या आव्हानाच्या परिणामी त्याचा प्रकोप भडकू शकतो व त्याच्या भयंकर प्रकोपामुळे आकाश व जमीनीची व्यवस्था अस्ताव्यस्त होऊ शकते. परंतु तो रहमान अर्थात दयाळू असल्यामुळे आपल्या दासांना शिक्षा यातना देण्यात घाई करीत नाही. किंबहुना त्यांना आपले आचरण सुधारण्याची संधी देतो.

११४. जेव्हा सर्व जन्मत: दास आहेत व दास या नात्यानेच ईश्वरासमोर हजर होणार आहेत तेव्हा हजरत ईसा (येशू) याला अपवाद कसे ठरतील? ते देखील इतर दासांप्रमाणे दास आहेत व दास या नात्यानेच ईश्वासमोर हजर होतील.

११५. म्हणजे सर्व त्याच्या सामर्थ्याधीन आहेत व प्रत्येक जीवाची त्याने गणना करून ठेवली आहे. असा कोणीहि नाही जो त्याच्या गणनेत नसावा सर्वांनाच त्याच्यापुढे जाब देण्यासाठी हजर व्हावे लागेल.

११६. ही जी खुशखबरी ईमान बाळगणाऱ्यांना अशा वेळी दिली गेली जेव्हा संपूर्ण समाज त्याच्या विरोधात लीन होता. फर्माविले सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या दासांच्या मनात त्यांच्या करीता प्रेमभाव निर्माण करील यास्तव जगाने हे पाहीले की त्याच्या एकनिष्ठ दासांच्या मनात त्यांच्याविषयी प्रेम निर्माण होते.

या सूरहचे महत्वपूर्ण वैशिष्ट असे की यात 'रहमान' हे नाव वारंवार आले आहे, जे रहमानची खरी ओळख करून देते, याने त्याच्या दयेच्या निकडी समोर येतात. व त्या गैरसमजुतींचे निराकरण होते ज्यात व्यस्त राहिल्यामुळे धार्मिक विश्व आपल्या दयावंत ईश्वरास ओळखू शकले नाही.

११७. भांडखोर लोकांशी अभिप्रेत अरब होत ज्यांनी एकेश्वरवाद प्रेषित्व व आखिरत वगैरे बाबत मोठा विवाद उभा केला होता, व सत्याला सहजा सहजी मान्य करण्यास तयार झाले नाहीत.

कुरआन अवतरणाचा सर्वप्रथम हेतु हा की ईश्वराशी गफलत बाळगणाऱ्या लोकांना वाईट परिणति विषयी सावध केले जावे व ईश-भय बाळगणाऱ्यांना चांगल्या परिणतीची खुशखबरी दिली जावी. कुरआनात या गोष्टी सर्वांना समजतील अशा व अत्यंत सुबोध शैलीत निवेदिल्या गेल्या आहेत. म्हणून ज्यांची मातृभाषा अरबी आहे किंवा ज्यांनी अरबी भाषा अवगत केली आहे. त्यांच्या करीता कुरआनचे आवाहनास कुरआनाच्याच माध्यमाने समजणे काही कठीण नाही. राहीलेत ते लोक, ज्यांना अरबी भाषेचे ज्ञान नाही तर ते देखील अनुवादाच्या माध्यमातून कुरआनच्या आवाहनास सहजरित्या समजू शकतात. तथापि स्पष्टीकरणाची बाब याहून भिन्न आहे. आणि यासाठी अरबी भाषेत प्राविण्य प्राप्त करणे अनिवार्य ठरते.

११८. म्हणजे विनाश पावलेल्या जन-समूहांचे कोणतेहि आस्तित्व राहीले नाही, आणि त्यांचा गलगला व त्याचा नादनिनाद अशा प्रकारे संपला की आता त्यांची चाहूल देखील ऐकू येत नाही. मग काय तुम्ही सुद्धा आपल्या भौतिक भोग विलासात मग्न त्याच जन-समूहांच्या मार्गाला अनुसरू इच्छिता?